SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY
PUNE 411 004
FOR INTERNAL CIRCULATION
To be returned on or before

16 OCT 1978

# आत्मवृत्त

लेखक

धोंडो केशव कर्वे

उपोद्घातलेखकः


नामदार श्रीयुत रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे

१९२८

किंमत २ रुपये

वामन मल्हार जोशी यांनीं अनाथ
बालिकाश्रमाच्या मंडळांतर्फे हिंगणेंबुद्रुक येथें प्रसिद्ध
मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले सेक्रेटरी, श्री ग
प्रिंटिंग वर्क्स ४९५-९६ शनवार पेठ पुणें.

V2wM58,1
F8
7260



प्रो. धोंडो केशव कर्वे. (वय ७०.)

# समर्पण.

देशोद्धारासाठीं तळमळणाऱ्या
परमात्मस्वरूपी युवयुवतींना
हें आत्मवृत्त
लेखकानें
अत्यंत प्रेमानें अर्पण केलें आहे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशकांचे चार शब्द | ५ |
| दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना | ११ |
| पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशकांचे दोन शब्द | १२ |
| उपोद्घात | १४ |
| पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना | २१ |
| प्रकरण १ लें, जन्मभूमि | १ |
| ,, २ रें, मातृवंश | १२ |
| ,, ३ रें, पितृवंश | १८ |
| ,, ४ थें, मातापितरें | ३१ |
| ,, ५ वें, बंधुभगिनी | ३९ |
| ,, ६ वें, बाळपण व मराठी शाळेंतील शिक्षण | ४५ |
| ,, ७ वें, लहानपणांतील व्यवसाय | ४९ |
| ,, ८ वें, देशकार्याचें बाळकडू | ५८ |
| ,, ९ वें, सहाव्या इयत्तेची परीक्षा | ६१ |
| ,, १० वें, इंग्रजी शिकण्याची संधि | ७१ |
| ,, ११ वें, विद्यार्थिदशेंतील कांहीं गोष्टी | ७७ |
| ,, १२ वे, कॉलेजांतील तीन वर्षें | ८५ |
| ,, १३ वें, उदर निर्वाहाची तरतूद | ८९ |
| ,, १४ वें, शिकवण्या. | ९८ |
| ,, १५ वें, एक नवीन तऱ्हेचें संयुक्त कुटुंब | १०२ |
| ,, १६ वें, नरहरपंतांचा सहवास | १०५ |
| ,, १७ वें, गृहस्थाश्रम—पूर्वभाग | १०९ |
| ,, १८ वें, कुटुंबांतील कांहीं महत्वाचे प्रश्न | ११४ |
| ,, १९ वें, गृहस्थाश्रमांतील अन्य कर्तव्यें | १२४ |
| ,, २० वें, पुण्यास येण्यापूर्वीचीं सार्वजनिक कामें | १२७ |

| | | |
|---|---|---|
| प्रकरण २१ वें, | अकल्पित भाग्य | १४१ |
| ,, २२ वें, | पुनर्विवाहाकडे माझें मन कसें वळलें ? | १४५ |
| ,, २३ वें, | पुनर्विवाह | १५४ |
| ,, २४ वें, | पुनर्विवाहासंबंधाचें त्या वेळचें लोकमत | १६५ |
| ,, २५ वें, | मुरूडची पहिली खेप | १६९ |
| ,, २६ वें, | बहुजन समाजाशीं वागण्याचें धोरण | १७४ |
| ,, २७ वें, | लोकमताच्या निदर्शक कांहीं गोष्टी | १८१ |
| ,, २८ वें, | आमचा नवा संसार | १८५ |
| ,, २९ वें, | लेखनव्यवसाय | १९० |
| ,, ३० वें, | विधवा-विवाहोत्तेजक मंडळी | १९३ |
| ,, ३१ वें, | पुनर्विवाहितांचें कुटुंब मेळे | १९८ |
| ,, ३२ वें, | विधवाविवाह-प्रतिबंध-निवारक मंडळी | २०२ |
| ,, ३३ वें, | लोकमताच्या जागृतीचे प्रयत्न | २०८ |
| ,, ३४ वें, | आपल्या मनाप्रमाणें न वागणारे लोक | २१६ |
| ,, ३५ वें, | सेक्रेटरीच्या कामाचा राजिनामा | २१९ |
| ,, ३६ वें, | विधवा-शिक्षणाची चळवळ | २२४ |
| ,, ३७ वें, | अनाथबालिकाश्रमाची मंडळी | २२९ |
| ,, ३८ वें, | अनाथबालिकाश्रम | २३७ |
| ,, ३९ वें, | वर्गणीसाठीं धडपड | २४३ |
| ,, ४० वें, | स्वार्थत्यागी सुशिक्षित स्त्रियांची जोड | २५५ |
| ,, ४१ वें, | कांहीं थोर स्त्रीपुरुषांच्या भेटी | २६२ |
| ,, ४२ वें, | आश्रमाचे हितकर्ते | २७३ |
| ,, ४३ वें, | आश्रमाचा विस्तार | २७७ |
| ,, ४४ वें, | अनाथबालिकाश्रम आणि विधवाविवाह | २८३ |
| ,, ४५ वें, | अनाथबालिकाश्रम आणि विधवावपन | २९७ |
| ,, ४६ वें, | आश्रमावरील कांहीं कठिण प्रसंग | ३०१ |
| ,, ४७ वें, | अनाथबालिकाश्रमानें आजपर्यंत काय केलें ? | ३१३ |
| ,, ४८ वें, | महिलाविद्यालयाची गर्भावस्था | ३१८ |
| ,, ४९ वें, | महिलाविद्यालयाचा जन्म | ३२६ |

प्रकरण ५० वें, महिलाविद्यालयाचा पुण्यांतील जीवनक्रम ३३२
,, ५१ वें, आश्रमाच्या शेजारीं विद्यालयाची स्थापना ३३६
,, ५२ वें, महिलाविद्यालयाचा विस्तार ३४०
,, ५३ वें, महिलाविद्यालयाची खरोखर जरूर आहे काय ? ३४६
,, ५४ वें, प्रौढ मुलांच्या शाळेंत प्रौढ मुलींच्या शिक्षणाचा प्रयोग ३५२
,, ५५ वें, स्त्रीशिक्षणासंबंधानें कांहीं विचार ३५८
,, ५६ वें, निष्कामकर्ममठ ३६३
,, ५७ वें, निष्कामकर्ममठाच्या उत्क्रान्तींतील कांहीं पायऱ्या ३६९
,, ५८ वें, निष्कामकर्ममठासंबंधीं खुलासा ३७६
,, ५९ वें, ज्याचा शेवट गोड तें सर्वच गोड ३८३
,, ६० वें, इंदुप्रकाशांतील लेख ३८५
,, ६१ वें, माझे कांहीं स्वभावदोष ४००
,, ६२ वें, त्रिवेणीसंगम ४०४
,, ६३ वें, स्टूडंट्स फंड ४१०
,, ६४ वें, गृहस्थाश्रम–उत्तरभाग ४१५
,, ६५ वें, वानप्रस्थाश्रम ४१९
,, ६६ वें, कांहीं किरकोळ गोष्टी ४२४
,, ६७ वें, धर्म व तत्वज्ञान यांविषयीं कांहीं विचार ४३०
,, ६८ वें, उपसंहार ४४१

## उत्तरार्ध

प्रकरण १ लें, कुटुंबाची सद्यःस्थिति ४४७
,, २ रें, अनाथबालिकाश्रमाचें गेलें एक तप ४५५
,, ३ रें, महिलाविद्यापीठाची कल्पना ४७५
,, ४ थें, महिलाविद्यापीठाची गर्भावस्था ४९५
,, ५ वें, महिलाविद्यापीठाचीं पहिलीं चार वर्षें ५१२
,, ६ वें, सर विठ्ठलदास ठाकरसी यांची अनपेक्षित उदार देणगी ५२४
,, ७ वें, विद्यापीठाच्या धोरणाच्या शाळा काढण्याचे प्रयत्न ५२९
,, ८ वें, महिला–विद्यापीठाचा विस्तार ५३६

प्रकरण ९ वें, महिला विद्यापीठाबद्दल लोकमत ५४५
,, १० वें, महिला–विद्यापीठाचें वैशिष्ट्य ५७६
,, ११ वें, मुंबई युनिव्हर्सिटी व महिलाविद्यापीठ यांतील पदवीधर स्त्रियांची तुलना ५८६
,, १२ विद्यापीठाला मिळालेल्या ठळक देणग्या ५९९
,, १३ वें, महिलाविद्यापीठाच्या प्रचाराचें कार्य ६०६
,, १४ वें, महिला–विद्यापीठाच्या इतिहासावर प्रकाश पाडणाऱ्या कांहीं गोष्टी ६१०
,, १५ वें, वाचकांचा निरोप ६१६
परिशिष्ट—मुरूडगांवची हकीकत ६१९

# द्वितीयावृत्ति

## प्रकाशकांचे चार शब्द

गुरुवर्य प्रोफेसर कर्वे यांची कीर्ति महाराष्ट्र–नभोमंडलांत चंद्रिकेप्रमाणें सकलांना आनंद देणारी व सुस्पष्ट असल्यामुळें प्रकाशकानें तिच्यावर प्रकाश पाडण्याच्या हेतूनें लांबलचक प्रस्तावना लिहिल्यास "अभिव्यक्तायां चन्द्रिकायां किं दीपिका–पौनरुक्त्येन" असा आरोप येण्याचा संभव आहे, पण कित्येक वेळां 'तो पहा त्या शाखेवरचा चन्द्र' असें चंद्राकडे लक्ष वेधण्याकरितां म्हणावें लागतें व याच न्यायानें ही लहानशी प्रस्तावना लिहिण्यांत येत आहे. गुरुवर्य अण्णा यांचें तन-मन-धन हिंगणें येथील आश्रमाकरितां व महिलाविद्यापीठाकरितां खर्च झालें आहे, होत आहे व भविष्यकाळींही या जन्मापुरतेंच नव्हे तर पुढील जन्मींही या करितांच खर्च व्हावें अशी त्यांची इच्छा आहे (पान ६१८ पहा), तेव्हां अर्थात् त्यांचें हें आत्मवृत्त प्रसिद्ध करण्याचे वेळींही त्यांनीं स्वतःच्या फायद्यापेक्षां आश्रमाच्या हिताकडेच अधिक लक्ष दिलें यांत नवल नाहीं. त्यांच्या वयाला येत्या १८ एप्रिल रोजीं एकाहत्तरावें वर्ष लागणार तेव्हां आपण या मंगलदिनानिमित्त जन्मोत्सव करावा व त्यांची परवानगी मिळाल्यास दुर्मिळ होऊं लागलेल्या त्यांच्या 'आत्मवृत्ता'ची दुसरी आवृत्ति त्याच दिवशीं प्रसिद्ध करावी असें आश्रमाच्या आजन्म–सेवक–सेविकांच्या मनांत आलें व या पुस्तकांत १९१६ पासून पुढची सर्व हकीकत घालून तें आजतागायत आणून सोडावें व प्रसिद्ध करण्याचा मान संस्थेस द्यावा अशी संस्थेकडून त्यांना विनंति करण्यांत आली. ही विनंति त्यांनीं मान्य केली व त्यांच्या स्वभावाला अनुसरून उतार वयांतही वेळांत वेळ काढून व हरतऱ्हेच्या शारीरिक व मानसिक अस्वस्थतेला बाजूला सारून त्यांनीं पूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'आत्मवृत्ता'वर पुनः नजर टाकून कांहीं दुरुस्त्या केल्या व कांहीं टीपा जोडल्या आणि पुढील हकीकत लिहून काढली. "या पुस्तकाच्या द्वारें आर्थिक फायदा जो होईल तो सर्व आश्रमाचाच, मला एक पैही नको" असेंहि त्यांनीं जेव्हां सांगितलें तेव्हां आम्हांला आश्चर्य वाटलेंच नाहीं व हा उपकार घेण्याला लाजहि वाटली नाहीं. आपलें सर्व आयुष्य—

सर्व वृत्त–ज्यानें आश्रमाला व त्याच्या अपत्याला–महिलाविद्यापीठाला—अर्पण केलें त्यानें या वृत्ताची वाङ्मयात्मक छायाही आश्रमाला अर्पण केली यांत आश्चर्य कसलें ! त्यांचें मन आमचें, त्यांचा देह आमचा, त्यांची वाचा आमची, मग या सर्वांची वाङ्मयात्मक छायाहि आमचीच असें आम्हीं मनांत म्हटलें व पित्यानें किती जरी उपकार केले तरी पुत्रांना व कन्यांना त्यांचा जसा भार होत नाहीं त्याप्रमाणेंच गुरुवर्य अण्णांच्या या उपकाराचा आश्रमाच्या आजन्म-सेवक-सेविकांना फारसा भार झाला नाहीं व त्यांनीं त्यांचे आभारहि मानले नाहींत !

हें 'आत्मवृत्त' कांहीं विश्वविद्यालयांच्या परीक्षांकरितां नेमलेलें होतें व त्याची आठ हजार प्रतींची आवृत्ति संपून गेली आहे ह्या बाह्य प्रमाणां-वरून व ज्यांनीं हें पुस्तक वाचलें आहे त्यांच्या तोंडून निघालेल्या उद्गारां-वरून या पुस्तकाची भाषा या दृष्टीनें, आंतील माहितीच्या दृष्टीनें व त्या-पासून मिळणाऱ्या बोधाच्या व स्फूर्तीच्या दृष्टीनें किती योग्यता आहे हें कळून येतेंच आहे, तेव्हां या विषयीं अधिक लिहिण्याचें कारण नाहीं. प्रो. कर्वे यांना वाङ्मयवाचनाचा फारसा नाद नाहीं. "नाटकें अगर कादंबऱ्या वाचण्याकडे माझें लक्ष कधीं गेलें नाहीं, मी इंग्रजी कादंबऱ्या काय त्या तीन वाचल्या, मराठींतल्याहि तीन चारांहून अधिक कादंबऱ्या मी वाचल्या नाहींत" (पान ४२५) असें ते आपणच सांगतात. अलंका-रादिकांच्या फंदांत ते फारसे पडत नाहींत, पण त्यांच्या भाषेंत एक प्रकारचें मधुर वैशिष्ट्य आहे हें कोणालाहि कबूल करावें लागेल. या पुस्तकाच्या शेवटीं दिलेली मुरूड गांवची बखर, तसेंच गु. अण्णांनीं शब्दद्वारा चितारलेली तीसचाळीस वर्षांपूर्वींच्या समाजाचीं चित्रें, त्याप्रमाणेंच अनाथ-बालिकाश्रम, महिलाविद्यालय व निष्काम–कर्म–मठ या तीन संस्थांच्या स्थापनेचीं कारणें, त्यांच्या मार्गांतल्या अडचणी, त्यांतील शेवटली संस्था मृतप्राय व दुसरी पहिलीशीं एक जीव होण्याचीं कारणें, या संस्था चाल-वितांना आलेले इरतऱ्हेचे चांगलेवाईट, कडूगोड अनुभव इत्यादि गोष्टींची माहिती, हीं सर्व अत्यन्त उपयुक्त असून मनुष्याच्या बहुश्रुतपणांत व व्यवहारज्ञानांत भर घालणारीं आहेत. गु. अण्णांचें चरित्रच काव्यात्मक असल्यामुळें हें शब्दमय चरित्रहि सत्काव्याप्रमाणेंच मनोहर व सात्विक

आनन्द देणारें, बोधपूर्ण व स्फूर्तिदायक झालें आहे हें म्हटलें तर तें अन्ध-प्रेमामुळें नव्हे किंवा प्रेमान्धतेमुळेंहि नव्हे, तर तें वस्तुगुणांमुळेंच होय हें कोणींहि कबूल करील.

तुलना करण्याचें हें स्थळ नव्हे, पण मराठींत उपलब्ध असलेल्या कांहीं आत्मचरित्रांचा व आत्मचरित्रात्मक प्रकरणांचा येथें थोडक्यांत निर्देश केल्यास प्रस्तुत आत्मचरित्राचें त्यांत स्थान कोणतें हें ठरविण्यास मदत होईल असें वाटतें. आपल्या रामायण—महाभारतांत व पुराणांत ऋषींनीं वगैरे आपापलीं त्या त्या जन्मींचीं किंवा पूर्वजन्मींचीं चरित्रें कोठें कोठें सांगितलेलीं आहेत, पण तीं त्या त्या कारणापुरतीं, अत्यल्प व असंभवनीय वाटणाऱ्या चमत्कारानीं परिपूर्ण अशीं आहेत. ऐतिहासिक कालांतील बाबरानें स्वतःविषयीं लिहिलेली थोडीशी माहिती मराठींत उपलब्ध आहे व नाना फडणाविसाचें लहानसें आत्मचरित्रहि मराठींत प्रसिद्ध आहे. उत्तरकालीन पेशवाईतील गंगाधर शास्त्री पटवर्धन यानेंही स्वतःचें चरित्र लिहिलें आहे, पण तें कितपत विश्वसनीय मानावें हा प्रश्नच आहे, कारण तें आत्मसमर्थनार्थ म्हणून लिहिलेलें आहे. सत्तावन सालच्या बंडाच्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत गेलेल्या एका महाराष्ट्रीय भटजीनें—त्याचें नांव गोडसे—आपली थोडीशी हकीकत चिंतामणराव वैद्य यांजवळ सांगितली होती व ती त्यांनीं लिहून काढून गोडसे याच्या आत्मचरित्राच्या रूपानें प्रसिद्ध केली असून अत्यन्त मनोवेधक झाली आहे. पण हें पुस्तक त्यांच्या हातचें नाहीं—त्यांत चिंतामणराव वैद्यांकडून "ही गोष्ट प्रसिद्ध केली असतां कदाचित् पचणार नाहीं व रुचणार नाहीं" या बुद्धीनें कांहीं गोष्टी गाळल्या गेल्या असतील व कदाचित् कांहीं अबुद्धिपुरःसर राहून गेल्या असतील. शिवाय भाषाहि गोडसे याची स्वतःचीच आहे अशी खात्री नाहीं. बाबा पदमज़ी यांच्या अरुणोदय नांवाच्या पुस्तकांत त्यांनीं आपण ख्रिस्ती धर्म कसा स्वीकारला याविषयीं व इतर गोष्टींविषयीं पुष्कळ माहिती दिली आहे व ती ( धर्मविषयक पूर्वग्रह बाजूला सारल्यास ) अत्यन्त रसपूर्ण आहे. विनायक कोंडदेव ओक यांनींही आपल्या सुप्रसिद्ध सरळ बालबोध भाषेंत आपल्याविषयीं माहिती दिलेली आहे. महाराष्ट्रांतील इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं ग्रंथमालेंत आपल्या शाळे-

तल्या व कॉलेजमधल्या अभ्यासाबद्दल जी माहिती दिलेली आहे ती कितीही अहंकारपूर्ण वाटली तरी ती त्यांच्यासारख्यांच्या लेखणींतून उतरलेली आहे व तिच्यांत विचार करण्यासारख्या पुष्कळ गोष्टी सांपडतील. सुप्रसिद्ध व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांचें आत्मचरित्र विविधज्ञानविस्तारांत अलीकडे प्रसिद्ध होत आहे तें त्यांच्या कालांतील व्यक्तींवर चांगला प्रकाश पाडणारें आहे. तदनंतर पंडिता रमाबाई यांचे लेखणींतूनहि स्वतःविषयींची थोडीशी माहिती लिहिली गेली आहे ती वाचनीय आहे. कैलासवासी रमाबाईसाहेब रानडे यांनीं लिहिलेल्या "आमच्या आठवणीं" त न्यायमूर्ती रानडे यांच्याबद्दल चांगली माहिती उपलब्ध आहे व कांहीं ठिकाणीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें त्यांच्या स्वतःबद्दलहि ओझरते उल्लेख आले आहेत तेहि मार्मिक वाचकाला मनोरंजक वाटण्यासारखे आहेत. प्रो. भाटे यांनीं "प्रेम व लौकिक" या आत्मचरित्रपर कादंबरींत आपलें आत्मचरित्र बरेंच दिलें आहे व तें चांगलेंही दिलेलें आहे पण, त्यांत कादंबरीचा, थोडा का होईना, अंश असल्यामुळें आत्मचरित्र या दृष्टीनें त्यांत गौणता आली आहे. नानासाहेब पावगी यांचेंहि मोठें आत्मचरित्र चार पांच वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालें आहे. साताऱ्च्या हायस्कुलचे हेडमास्तर कैलासवासी सीताराम गणेश देवधर यांनीं लिहून ठेवलेलें स्वतःचें चरित्र प्रसिद्ध झालें असून तें सविस्तर व साद्यंत आहे, त्यांतील भाषा चांगली आहे व गेल्या पिढींतील चांगल्या सुधारकांच्या एका आत्म्याचें एक चांगलें शब्दचित्र त्यांत पाहतां येण्यासारखें आहे. प्रो. धर्मानंद कौसंबी यांच्या 'निवेदनां'तील भाषा उत्तम असून माहिती फार मनोरंजक आहे. तसेंच बॅरिस्टर सावरकर यांनीं कादंबरींत शोभतील अशा खऱ्या खऱ्या प्रसंगांचें अत्यन्त मनोवेधक वर्णन केलेलें उपलब्ध आहे व तें त्यांचीं राजकीय मतें पसंत नसणाऱ्यांनाहि वाचनीय झालें आहे. महात्मा गांधी यांनीं आपलें जें चरित्र दिलें आहे व ज्याचें मराठींत भाषान्तर झालें आहे तें तर आत्मसंशोधन, आत्मशुद्धि व आत्मोन्नति यांविषयीं आस्था असणाऱ्यांना केव्हांहि बोधपूर्ण व उत्साहवर्धक वाटेल हें सांगावयास नकोच. याशिवाय श्री. पार्वतीबाई आठवले यांनीं आपली 'कहाणी' लिहिली आहे हें आम्हांला ठाऊक आहे, पण हें पुस्तक अद्यापि प्रसिद्ध झालेलें नाहीं.

प्रसिद्ध झाल्यास तें मनोरंजक होईल. सुप्रसिद्ध नाटककार, कादंबरीकार व कवि रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनींहि आत्मचरित्र लिहिल्याचें आम्हांला माहीत आहे. तें अद्यापि प्रसिद्ध झालें नसलें तरी तें मराठींतील आत्म-चरित्रात्मक वाङ्मयांत चांगली भर घालील असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. इंग्रजीतील अनेक मनोरंजक आत्म चरित्रांपैकीं बुकर टी. वॉशिंग्टन यानें लिहिलेला बोधप्रद 'आत्मोद्धार' मराठी पेहारावांत आला आहे. वर उल्लेख न आलेलीं आणखी कांहीं प्रसिद्ध–अप्रसिद्ध आत्मचरित्रें असतीलच. पण कोठलेंहि आत्मचरित्र घेतलें तरी भाषा, तपशीलवार सुसंगत माहिती, यथार्थता, मार्मिकता, वाक्संयम, वाचकांमध्यें सहानुभव किंवा सहकंप उत्पन्न करण्याची शक्ति, सौजन्य–सुवास–परिपूर्णत्व, सत्स्फूर्ति उत्पन्न करण्याचें सामर्थ्य इत्यादि सर्व गुणांचा विचार केला असतां प्रस्तुत पुस्तकाहून ते विशेष श्रेष्ठ ठरेल असें वाटत नाहीं.पण याविषयींची सविस्तर चर्चा करूं लागल्यास अतिस्नेह कदाचित् वाचालत्व उत्पन्न करील म्हणून आतां येथेंच थांबून कांहीं व्यावहारिक गोष्टींकडे वळलेलें बरें.

प्रस्तुत पुस्तक गु. अण्णांनीं लिहिलें व तें छापविण्याचा आणि प्रसिद्ध करण्याचा मान आश्रमास दिला खरा; पण सर्वारंभांना मूलभूत असलेल्या 'तण्डुलप्रस्थां'ची व्यवस्था कोण कशी करणार हा प्रश्न आश्रमापुढें येऊन पडला. सुदैवानें नाशिक हायस्कुलचे माजी हेडमास्तर व आश्रमाचे नित्य हितचिंतक रा. रा. रामचंद्र काशिनाथ भिडे यांनीं पांचशें रुपये बिन-व्याजी देण्याचें कबूल केलें व इतर मार्गांनें अशीच थोडीबहुत व्यवस्था लागली. पुस्तक लवकर व सुंदर छापणें हा पुढचा प्रश्न उत्पन्न झाला व या बाबतींतही श्रीगणेश प्रिन्टिंग वर्क्सचे सेक्रेटरी रा. गणेश काशिनाथ गोखले यांनीं आपलें काम वेळेवर व चांगलें केल्यामुळें सर्व काळजी निवारण झाली. शुद्धलेखनाच्या वगैरे कांहीं चुका राहून गेलेल्या आहेत, पण त्या सहज ध्यानांत येण्यासारख्या आहेत म्हणून शुद्धिपत्र जोडलेलें नाहीं. इंग्रजी उताऱ्यांचें भाषान्तर करण्याचे कामीं, फोटो व ब्लॉक्स वगैरे मिळविण्याचे कामीं व प्रुफें तपासण्याचे कामीं ज्यांची मदत झाली आहे त्यांचेहि एका अर्थी आभार मानलेच पाहिजेत. पण गु. अण्णांशीं म्हणा, किंवा आमच्या आश्रमाशीं म्हणा, त्यांचा संबंध निकटचा व स्नेहपूर्ण आहे

हें येथें मनांत येतें व त्यांचा नामनिर्देश करून त्यांचे आभार मानणें कदाचित् अनुचित होईल असें वाटूं लागतें, म्हणून तें टाळतोंच. शेवटीं या पुस्तकांत ज्या उणीवा किंवा जे दोष असतील त्यांकडे दुर्लक्ष करावें असें न सांगतां त्यांकडे लक्ष देऊन ते आम्हांला कळवावे व पुढील आवृत्ति लवकर काढण्याचा योग आणून ते आमच्याकडून दुरुस्त करून घ्यावेत अशी विनंति करून ही "दीपिका-पुनरुक्ति" येथेंच थांबवितों.

हिंगणें.<br>
२० मार्च १९२८.

वा. म. जोशी<br>
(अध्यक्ष, प्रो. कर्वे ज्युबिली कमिटी)<br>
गो. म. चिपळूणकर,<br>
वारुबाई शेवडे,<br>
(चिटणीस, प्रो. कर्वे ज्युबिली कमिटी)

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

आत्मवृत्तीची दुसरी आवृत्ति निघण्याचा योग आला व तो माझ्या ह्यातींत आला हें मी आपलें भाग्य समजतों. मित्रांना व आश्रमाच्या आश्रयदात्यांना फुकट वांटण्यासाठीं दिलेल्या दोनशें प्रतींखेरीज अन्य मोबदला न घेतां पहिली आवृत्ति 'मनोरंजन' कारांना दिली होती. तिच्या प्रती संपत आल्या तेव्हां नवीन आवृत्ति काढण्याचा विचार सात आठ महिन्यांपूर्वी मनांत आला. छापण्यास लागणाऱ्या भांडवलावर शेंकडा नऊ रुपये व्याज आकारून तें सर्व फिटेपर्यंत मला कांहीं न देतां नंतर नफा झाल्यास तो अर्धा अर्धा वांटून घ्यावा ह्या अटीवर कोणी हें काम करण्यास तयार आहे कीं काय असा शोध केला पण ही जबाबदारी घेण्यास कोणी विशेष उत्सुक दिसेना. ह्याला एक कारण 'मनोरंजन' कारांनीं आपल्या वर्गणीदारांस बक्षीस देण्यासाठीं व इतर मिळून सुमारें सात आठ हजार प्रती काढलेल्या होत्या तेव्हां आतां ह्या पुस्तकाचा खप होणें कठिण असें प्रकाशकांचा धंदा करणारास वाटणें साहजिक होतें. असें झाल्यावर दुसऱ्या आवृत्तीचा विचार मी सोडून दिला.

नंतर आश्रमाच्या सेवक-सेवकांनीं हें धाडस करण्याचें मनांत आणलें व मला तें फिरतीवरून परत आल्यावर जानेवारी महिन्यांत कळलें. लेखनाचा माझा व्यवसाय नसल्यामुळें कांहीं लिहावयाचें झालें तर मजवर मोठें संकट येऊन पडतें. पहिल्या भागांत दोन तीन ठिकाणींच थोडासा नवीन मजकूर घातला आहे. उत्तरभाग लहानच आहे पण तो लिहिण्यास जवळ जवळ दोन महिने लागले ह्यावरून हें काम करणें मला किती जड जातें ह्याची कल्पना होईल. इतकें असून इंग्रजींतून जे उतारे घेतले आहेत त्यांचें भाषान्तर करण्यास मित्रांची मदत घेतली ती वेगळीच.

दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्याचा योग आला नसता तर महिलाविद्यापीठाच्या स्थापनेची व प्रगतीची सविस्तर हकीकत इतक्या लवकर लोकांपुढें आली नसती. ती कधीं काळीं इतकी काळजीपूर्वक लिहून तरी झाली असती कीं नाहीं ह्याबद्दलही मला मोठी शंका आहे.

आत्मवृत्ताबद्दलचे सर्व हक्क मी अनाथबालिकाश्रमाच्या मंडळीस दिले आहेत. माझी इच्छा एवढीच आहे की ह्या खटाटोपांत आश्रमाला कोणत्याही प्रकारें घस सोसावी लागूं नये.

आत्मवृत्ताचा उत्तरभाग लिहिण्याची ज्यांनीं संधि दिली व ह्या कामीं ज्यांनीं मदत केली त्या सर्वांचे आभार मानून ही प्रस्तावना संपवितों.

महिलाविद्यापीठ, एरंडवणें, २३ मार्च १९२८. } धोंडो केशव कर्वे

---

## पहिल्या आवृत्तीच्या

# प्रकाशकांचे दोन शब्द

महाराष्ट्रीय स्त्रीवर्गाच्या सर्वांगीण सुधारणेसाठीं मनोरंजन आज सतत वीस वर्षें केवळ्या आस्थेनें, कळकळीनें आणि अंतःकरणपूर्वक झटत आहे, हें महाराष्ट्राला विदितच आहे. मनोरंजनाच्या या ध्येयाला अनुसरून अर्थात् महाराष्ट्रस्त्रियांच्या उत्कर्षासाठीं ज्यांनीं ज्यांनीं आतांपर्यंत प्रयत्न केले आहेत, व जे करीत आहेत, त्या सर्व व्यक्तींविषयीं मनोरंजनाला अत्यंत पूज्यबुद्धि वाटणें स्वाभाविक होय. अबला स्त्रीवर्गाच्या उद्धारासाठीं श्रीयुत प्रो. कर्वे यांनीं आरंभिलेल्या एकनिष्ठ प्रयत्नांचीं मधुर फळें महाराष्ट्र आज चाखीत आहे. प्रो. कर्वे यांचें नांव महाराष्ट्रांत आज जसें घरोघर आदरानें उच्चारलें जात आहे, तसाच किंबहुना त्याहूनहि जास्त, त्यांनीं आरंभिलेल्या आणि उत्तम रीतीनें यशस्वी करून दाखविलेल्या संस्थांबद्दल संपूर्ण महाराष्ट्राला आदर, अभिमान आणि पूज्यभाव वाटत आहे. आपलें सारें आयुष्य, तनुमनोधन किंबहुना आपलें सर्वस्वच ज्यांनीं स्त्रीवर्गाच्या उन्नतीचे प्रयत्न करण्याकडेच अर्पण केलें आहे, अनाथबालिकाश्रम, महिलाविद्यालय आणि निष्कामकर्ममठ या संस्था ज्यांनीं उत्तम रीतीनें नांवारूपाला आणून महाराष्ट्राचें मुख उज्वल केलें आहे, आणि बोलण्यापेक्षां

प्रत्यक्ष कृति करून दाखवून करवे हे नांव ज्यांनीं सार्थ केलें आहे, अशा महाराष्ट्राच्या या श्रेष्ठ समाजसुधारकाचें हें आत्मचरित्र महाराष्ट्राला आज सादर करतांना मनोरंजनाला समाधान आणि धन्यता वाटते.

येत्या नाताळांत मुंबई येथें भरणाऱ्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षस्थानीं या श्रेष्ठ विभूतीची योजना झाली असून त्याच संधीला त्यांचें हें विस्तृत आत्मवृत्त प्रसिद्ध होण्याचा सुयोग येत आहे, ही एक ईश्वरी योजनाच म्हटली पाहिजे. स्त्रीवर्गाच्या उन्नतीची आस्था बाळगणारांना हें पुस्तक आवडेल, असा भरंवसा आहे.

आत्मवृत्ता ( Autobiography ) संबंधीं विशेष नांव घेण्यासारखीं पुस्तकें मराठींत आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं नाहींत. महाराष्ट्रवाङ्मयांत अशा जातीचें हें पहिलेंच पुस्तक होय, असें म्हटलें तरी चालेल. या दृष्टीनें या पुस्तकाचें अत्यंत महत्त्व आहे, हें तर स्पष्टच आहे; परंतु याहूनहि दुसऱ्या अनेक दृष्टींनीं या पुस्तकाची योग्यता कितीतरी जास्त आहे, हें, हें पुस्तक समग्र वांचून पहाणारांना तेव्हांच कळून येईल. महाराष्ट्र वाङ्मयांतील या अद्वितीय पुस्तकाचें गुजराथींत त्याचप्रमाणें हिंदींतहि रूपांतर होत असून, हीं दोन्ही पुस्तकेंहि लवकरच प्रसिद्ध होतील, हें कळविण्यास आम्हांला संतोष वाटतो.

आमच्या नम्र विनंतीस मान देऊन श्रीयुत प्रो. कर्वे यांनीं हें विस्तृत आत्मवृत्त मनोरंजनासाठीं लिहिण्याची कृपा केल्याबद्दल, त्याचप्रमाणें नामदार प्रिन्सिपॉल परांजपे यांनीं या पुस्तकाला उपोद्घात लिहिल्याबद्दल, या उभय थोर गृहस्थांचे आम्ही आभारी आहों.

गिरगांव–मुंबई,
ता. १५।१०।१५ } काशिनाथ रघुनाथ मित्र

# उपोद्घात.

ती. स्व. रा. रा. धोंडोपंत कर्वे यांच्या आत्मवृत्ताला मीं उपोद्घात लिहिणें म्हणजे खरोखर मर्यादा सोडून वागणें आहे. तरी पण या ग्रंथाचे प्रकाशक रा. मित्र यांनीं आग्रह केल्यावरून खालील दोन शब्द—सूर्याला दिवटी दाखविण्याप्रमाणें असलें तरी—मी लिहीत आहें, याबद्दल वाचकांची व विशेषतः अण्णांची* माफी मागितली पाहिजे.

प्रो. कर्वे यांचा माझा जवळचा आप्तपणाचा संबंध; तशांत लहानपणापासून त्यांनीं मला सर्व प्रकारचें शिक्षण देऊन मजवर केलेला मोठा उपकार; या दोन कारणांमुळें ते मला वडिलांसमान सन्माननीय आहेत. त्यांचेंहि मजवर धाकट्या बंधूप्रमाणें प्रेम आहे. त्यांच्या लेखणींतून उतरलेलें आत्मचरित्र हें आमच्या परांजप्यांच्याहि कुळाला शोभा आणणारें आहे; त्यामुळें माझ्यासारख्या त्यांच्या शिष्याला फार अभिमान साहजिकच वाटतो; व माझें त्यामध्यें नांव आलें आहे यामुळें धन्यताहि वाटते.

पुष्कळ थोर विभूतींबद्दल 'अतिपरिचयादवज्ञा' अथवा 'दुरून डोंगर साजरे' अशी स्थिति होत असते, व बहुतेक वेळां ही गोष्ट साहजिक आहे. बाहेरच्या लोकांना त्या विभूतींची माहिती त्यांच्या एकदोन गुणांवरून किंवा कृत्यांवरून मात्र असते. पुष्कळ परिचय असला म्हणजे त्यांच्या सर्व गुणांची ओळख होते, व हे सर्व गुण त्या एकदोन लौकिक गुणांप्रमाणें विशेष सरस नसल्यामुळें बहुतेक प्रसंगीं त्यांच्याबद्दल तितकी पूज्यबुद्धि रहात नाहीं, व वरील म्हणींची सत्यता थोड्याबहुत प्रमाणांत पटते. परंतु अण्णांच्या बाबतींत अशी स्थिति तिळमात्र नाहीं. त्यांच्याशीं जितकाजितका जास्त परिचय होतो, तितकीतितकी त्यांच्याबद्दलची पूज्यबुद्धि जास्त वृद्धिंगत होत जाते. डॉक्टर जॉन्सन या थोर ग्रंथकाराकडे त्याच्या गरिबीच्या दिवसांत कांहीं विद्यार्थी शिकावयाला असत, त्यांत प्रसिद्ध नट गॅरिक हाहि असे. परंतु गॅरिक व त्याचे सहाध्यायी हे जॉनसनच्या थोर

---

* रा. कर्वे यांना त्यांच्या आप्त व मित्रमंडळीकडून 'अण्णा' हें नांव सर्वत्र दिलें जातें, व म्हणूनच मींहि बहुतेक ठिकाणीं 'अण्णा' याच प्रेमवाचक नांवानें त्यांचा उल्लेख केला आहे. —र. पु. प.

गुणांकडे लक्ष न देतां त्याच्या तऱ्हेवाईकपणाकडेच जास्त पहात असत, व त्याची आपापसांत चेष्टाहि करीत असत. गॅरिकप्रमाणेंच मी व माझ्या वयाचेच तीनचार दुसरे लहान मुलगे प्रोफेसर कर्व्यांच्या घरीं मुंबईला शिकावयाला असूं. अण्णांशिवाय दुसऱ्याहि थोर गृहस्थांशीं आम्हां मुलांची गांठ पडत असे, आणि ते सर्वजण आमच्या आपापसांतल्या थट्टांतून किंवा वेडावण्यांतून सुटले नाहींत. परंतु अण्णांची थट्टा करणें म्हणजे अगदीं 'अब्रह्मण्यम्' असें वाटत असे. दुसऱ्या गृहस्थांकडून मार मिळाला तरी त्यांत कांहीं नाहीं, पण अण्णांची यत्किंचित् गैरमर्जी होणें म्हणजे मोठी शिक्षा, असें आम्हां सर्वांना वाटे. सांगण्याचा हेतु हाच कीं, लहान मुलांच्या तावडींतूनहि जे गृहस्थ सुटले, त्यांच्या अंगीं कांहीं असाधारण गुणच असले पाहिजेत, यांत संशय नाहीं. आमच्या अण्णांची पुण्याला आल्यावर सर्व हिंदुस्तानभर प्रसिद्धि झाली, याबद्दल आम्हां त्यांच्या शिष्यांना कांहीं विशेष आश्चर्य वाटलें नाहीं; आनंद मात्र झाला. त्यांच्या पूर्वींच्या मर्यादित क्षेत्रांत ते किती दिवस तरी तितकेच प्रसिद्ध व सन्माननीय होते. मला तर माझ्या आयुष्यांतील ज्या पहिल्या आठवणी आहेत, त्यांत माझ्या आईकडून ऐकिलेली 'धोंडूची' स्तुति व "त्याच्याप्रमाणें शहाणा हो०" म्हणून मिळालेला उपदेश प्रमुखत्वानें आहेत. पुढें त्यांना अनुकूल परिस्थिति मिळाली म्हणून त्यांच्या अप्रतिम गुणांचा लाभ त्यांच्या सर्व देशबांधवांना व विशेषतः देशभगिनींना झाला, एवढेंच काय तें.

आपल्या देशांतील समाजव्यवस्थेमध्यें स्थित्यंतर होण्याचें गेलीं सातआठ शतकें बहुतेक बंद पडल्यामुळें पूर्वींच्या चालीरीति नांवानें मात्र राहिल्या आहेत. त्यांच्यामध्यें जीवंतपणा उरलेला नाहीं. अमुक गोष्ट आपले पूर्वज करीत आले म्हणून आम्हीहि करितों; इतकेंच नव्हे, तर खरा अर्थ न समजल्यामुळें तिचा पुष्कळदां विपर्यासहि करितों. 'बाबावाक्यं प्रमाणं' हें आमचें तत्त्व, आणि 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' हा आमच्या नेहमींच्या वागणुकीचा नियम. इंग्रजी शिक्षणाचा जेव्हां फैलाव होऊं लागला, तेव्हां चालीरीतींच्या मूलतत्त्वांबद्दल कांहीं लोक विचार करूं लागले, व हळुहळू या विचारी लोकांची संख्या वाढूंहि लागली. परंतु जें हाडींमासीं खिळलेलें असतें, तें जरी विचारसंमत नसलें, तरी आचरणामध्यें

त्यांत लागलाच बदल करणें बहुतेकांना शक्य नसतें. सर्व देशांतल्या सामान्य समाजामध्यें ही मानसिक जडता कमीअधिक प्रमाणांत आढळून येतेच. आमच्या हिंदुस्तान देशांत ती फार जास्त प्रमाणांत आहे, इतकेंच. ही जडता घालवून समाजव्यवस्थेला चेतना देणारे कांहीं तरी अवतारी पुरुष लागत असतात. आमच्यामध्यें असले अवतारी पुरुष फार नाहींत. आमचे सुधारक म्हणजे बोलके माल, असा जो आरोप नेहमीं केला जातो, त्यांत अर्थहि बराच आहे. बोलण्याप्रमाणें कृति करण्याला लागणारें मानसिक धैर्य फार लोकांच्या अंगीं नसतें. समाजांतील जितक्या जास्त व्यक्तींच्या अंगीं तें असेल, तितका तो समाज जास्त सजीव. आपल्या समाजांतील सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांचीसुद्धां मेंढरांप्रमाणें वर्तणूक पाहिली म्हणजे आपणांमध्यें कांहीं तरी जीव राहिला आहे कीं नाहीं, याबद्दल शंका वाटूं लागते. परंतु हा ग्रंथ वाचला म्हणजे ही भीति कांहीं अंशीं तरी कमी व्हावयाला लागेल, व आमच्या भावी अभ्युदयाची थोडीतरी आशा वाटूं लागेल, यांत शंका नाहीं, आणि म्हणूनच या ग्रंथाचें फार महत्त्व आहे.

अण्णा कर्वे जोंपर्यंत मुंबईंत होते, तोंपर्यंत त्यांचे विचार मात्र सुधारलेले, पण त्यांची दिनचर्या पहाणाराला ते कर्ते सुधारक नसावेत, असेंच वाटलें असतें. अगदीं जिवलग मित्रांशिवाय दुसऱ्या कोणाजवळ ते आपले विचारसुद्धां बोलून दाखवीत नसत. पुण्याला १८९२ सालीं प्रोफेसरच्या जागेवर रुजू होऊन एक वर्षानें त्यांनीं पुनर्विवाह केला, हें जेव्हां त्यांच्या मुंबईंतील मित्रांना कळलें, तेव्हां त्यांना अतोनात आश्चर्य वाटलें. ते गणितविषय उत्तम शिकवीत, अशी त्यांची मुंबईस ख्याती होती, व त्यांच्याकडे शिकावयाला पुष्कळ लोकांच्या उड्या पडत असत. ते हे कर्वे मास्तर एवढे कर्ते सुधारक असतील, असें त्यांच्या शिष्यांच्या स्वप्नींसुद्धां नव्हतें. त्यांच्याजवळ गणित शिकलेले पुष्कळ लोक मुंबईला मोठ्या हुद्द्यांवर आहेत; त्यांना आपले अगदीं 'गोब्राह्मण' मास्तर आतां पुण्याला दोन प्रसिद्ध संस्था आपल्या कर्तबगारीनें उत्तम तऱ्हेनें व नमुनेदार चालवीत आहेत, असें समजलें म्हणजे ही जादू कीं काय, असा संशय येतो; पण ही जादू म्हणजे खरी मानसिक शक्ति मात्र आहे, दुसरें कांहीं नव्हे, असें या ग्रंथावरून दृष्टोत्पत्तीला येईल.

अण्णांचें कुल भारदस्त व संभावित असलें, तरी ते कांहीं मोठ्या सरदारांच्या वंशांतले नाहींत. द्रव्यदृष्ट्या त्यांची स्थिति किती खालावलेली होती, हें त्यांनींच या आत्मवृत्तांत सांगितलें आहे. मोठेपणा येण्याला या साधनांची नेहमीं फार मदत होत असते; पण त्यांपैकीं कोणतेंहि साधन नसतां नुसत्या शीलाच्या जोरावर किती मोठें देशकार्य करतां येण्यासारखें आहे, याचें उत्तम उदाहरण आमचे अण्णा होत. अण्णांच्या उदाहरणावरून, आनुषंगिक साधनें नसलीं तरी खऱ्या देशभक्ताचा धीर खचून जाण्याचें कारण नाहीं; आपल्या हिकमतीनें हल्लींच्या शांततेच्या दिवसांतसुद्धां देशाची मोठी सेवा करितां येते, व-या गोष्टीकडे अण्णांचें काडीइतकें लक्ष्य नव्हतें तरीहि-आपलें नांव आपले सर्व देशबांधव वाखाणूं लागतात, हें स्पष्ट समजतें. एकदां अमुक एक कार्य चांगलें आहे अशी खात्री करून घेतल्यावर तें करण्याचा निश्चय केला म्हणजे त्याकरितां जन्मभर झटणें, ध्यानींमनींस्वप्नीं तेंच कार्य असणें, आपलें कार्य बरें व आपण बरे या नियमानें नेहमीं वागणें, ही गुरुकिल्ली हल्लींहि सर्व गोष्टींना लागू पडते, याची खात्री अण्णांनीं आपणां सर्व हिंदीजनांना पटवून दिली आहे. त्या किल्लीचा उपयोग आमचे कांहींतरी बांधव त्यांच्यापासून शिकले, तर त्यांनीं हें आत्मवृत्त लिहून जो आपला अमूल्य वेळ खर्च केला आहे त्याचें सार्थक झालें, असें ते समजतील.

अण्णा कर्वे यांची रहाणी अगदीं साधी असून वरवर पहाणाराला त्यांच्या अंगांत इतकें धैर्य असेल असें कधींहि वाटणार नाहीं. साधारण व्यावहारिक गोष्टींत ते अगदीं भोळ्यासारखे वाटतात. अडचण सोसावी लागली तरी हरकत नाहीं, आपण मागें राहिलेलें पुरवलें पण आपलें घोडें पुढें ढकलणें नको. नेहमींच्या संसारांत त्यांची वागणी अशी आहे; इतकेंच नाहीं, तर खुद्द सामाजिक सुधारणेच्या अशा ज्या कमी महत्त्वाच्या बाबी असतात त्यांबद्दलहि ते फारशी विचक्षणा करीत नाहींत. सोंवळें न नेसण्याबद्दल आग्रह नाहीं, श्रावणी करावी लागली तरी तिला तयारी, याप्रमाणें होतां होईल तों मुद्दाम कोणाला दुखवावयाचें नाहीं, ही त्यांची नेहमींची रीत. मुख्य मुद्याची गोष्ट आली म्हणजे मात्र ते काडीइतके ढळावयाचे नाहींत, व आपलें तत्त्व सोडावयाचे नाहींत. ज्यांत खरी सुधारणा आहे, व

ज्याच्या आवश्यकतेबद्दल त्यांची एकदां बालंबाल खात्री झाली आहे, ती गोष्ट कितीही अडथळे आले तरी करावयाला ते कदापि कमी करावयाचे नाहींत. हल्लींच्या दिवशीं–एवढेंच नव्हे, तर सुधारणेच्या सर्व इतिहासांत–असे पुष्कळ लोक सांपडतात कीं, जे क्षुल्लक बाबतींत जोंपर्यंत अडचण नसते तोंपर्यंत पुढें जावयाला एका पायावर तयार असतात, व वेळ आला म्हणजे मागें घ्यावयाला तितकेच तयार! त्यांतील कांहीं या प्रकारच्या वागणुकीला फार मनोहर नांवें देत असतात. कोणी त्याला लघुतमविरोधमार्ग ( Line of least resistance ) असें म्हणतात; कोणी सामान्यसमाजाला बरोबर घेऊन जाणें असें म्हणतात; परंतु असल्या आचरणाला खरेंखुरें नांव म्हटलें तर 'मानसिक दौर्बल्य' हेंच होय. बहुतेक वेळां लघुतमविरोधमार्गानें जातांना आपली जास्त अधोगति मात्र होत असते. सामान्यसमाजाला आपण ओढीत नेण्यापेक्षां बहुधा समाज–आणि त्यांतला अगदीं अडाणी भाग--आपणांला ओढून नेतो! तडजोड करावयाची ती क्षुल्लक बाबींत. ध्येयामध्यें कोणतेंहि न्यून सहन करावयाचें नाहीं, हाच खरा सुधारणेचा मार्ग. एक वीर पुढें गेला म्हणजे त्याच्या आकर्षणानें मोठा समाजहि थोडा तरी पुढें जातोच, याची सर्वदा पूर्ण जाणीव सुधारकांनीं मनांत बाळगली पाहिजे. अण्णा कर्व्यांनीं स्त्रियांच्या उन्नतीचा मार्ग स्वीकारला, त्यांत पुष्कळ अडचणी होत्या, व आहेत; काम फार नाजूक; गैरसमजाला पुष्कळ वाव; असें असलें तरी त्यांनीं आपल्या कामाच्या पवित्रपणाबद्दल थोड्याच दिवसांत सर्व लोकांची खात्री करून दिली, व या कामाला समाजाची फार सहानुभूति मिळविली, याचें मूळ म्हणजे त्यांचे धैर्य व खरें शहाणपण, हेंच होय.

१८९२ सालीं मी पी. ई. च्या वर्गांत असतां अण्णांबरोबर संध्याकाळीं फिरावयाला जात असें. एकदां बोलतांबोलतां आपल्या वागणुकीनें वडील माणसांना कोणत्या प्रसंगीं प्रसन्न ठेवावें, व कोणत्या प्रसंगीं कोणाचीहि भीड न बाळगतां आपणा स्वतःला योग्य वाटेल तसेंच वागावें, याबद्दल ते बोलत होते. ओंवळ्यानें जेवावयाला बसणें, किंवा इराण्याच्या दुकानांत चहा घ्यावयाला जाणें, या किंवा अशाच दुसऱ्या गोष्टींमुळें जर वडिलांचें मन दुखत असेल तर त्या गोष्टी करूं नये, हें चांगलें; पण बायकोला

शाळेंत पाठविणें, पुनर्विवाह करणें, लहानपणीं मुलींचं लग्न न करणें, किंवा मोठेपणीं लहान मुलींशीं लग्न न करणें, यामुळें जर तें दुखत असेल, तर त्याला नाइलाज समजून आपणाला जो मार्ग योग्य दिसेल तो स्वीकारावा, असा उपदेश त्या वेळींहि–तेव्हां ते सुधारक म्हणून प्रसिद्धीला आलेले नव्हते–त्यांनीं मला केला होता. बाकी त्यावेळींच त्यांनीं असेंहि सांगितलें कीं, एकदोन महत्त्वाच्या गोष्टींत प्रसंग पडल्यास वडिलांचें मन दुखवावें लागलें, तर बाकीच्या कमी महत्त्वाच्या प्रसंगीं त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागून त्यांच्या नैसर्गिक प्रेमाचा ओघ पुनः आपणाकडे ओढून घ्यावयाचा नेहमीं प्रयत्न करणें यांतच शहाणपणा आहे. या संभाषणावरून त्यांनीं आयुष्याला जी दिशा लाविली आहे, ती अगदीं विचारान्तीं असून नुसती प्रसंगानुरूप नव्हे एवढें स्पष्ट होतें.


अण्णांचें सर्व आयुष्य जरी शिक्षणप्रसारांत, व मुख्यत्वें स्त्रीशिक्षणप्रसारांत गेलें असलें, तरी बाकीच्या सुधारणेच्या महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं त्यांची नेहमीं पूर्ण सहानुभूति असते. निकृष्ट जातींचा प्रश्न, जातिभेदाचा प्रश्न, मद्यपानाचा प्रश्न, पवित्र आचरणाचा प्रश्न यांबद्दल त्यांचीं मतें अगदीं पुढें गेलेलीं होतीं; परंतु साधारण माणसांनीं–ते विनयानें आपणाला अगदीं साधारणच समजतात–आपली शक्ति पुष्कळ गोष्टींत न खर्चितां एकाच गोष्टीकडे ती लावावी, असा त्यांचा विचार झाल्यामुळें या बाकीच्या प्रश्नांमध्यें ते सार्वजनिक रीतीनें पडले नाहींत. हातांत एकच काम घ्यावें, पण तें धड करावें, हा त्यांचा नियम होता; म्हणूनच त्यांचें नांव दुसऱ्या गोष्टींत ऐकूं येत नाहीं.

आत्मवृत्त लिहिणें म्हणजे एका प्रकारची स्वतःची बढाई मारणें, असें सकृद्दर्शनीं दिसतें. अण्णा कर्वे यांची ज्यांना थोडी तरी ओळख आहे, त्यांना, यांनीं हें पुस्तक लिहिण्याचा धीर कसा केला, याचेंच आश्चर्य वाटेल; परंतु असल्या वृत्तापासून खरोखरच फार फायदा होण्यासारखा आहे, अशी त्यांची पूर्ण खात्री झाल्याशिवाय त्यांच्यासारखे विनयशील गृहस्थ या कामांत पडतेच ना! त्यांनीं हें पुस्तक एक अवघड कर्तव्य म्हणूनच लिहिलें आहे. आमच्या मराठी भाषेंत असलीं पुस्तकें फार–मुळींच–नाहींत, असें म्हटलें तरी चालेल. यूरोपीय देशांत अशा प्रकारचीं आत्म-

वृत्तें, आठवणी वगैरे शेंकडों प्रसिद्ध होत असतात; तरी त्यांतील बहुतेक गप्पा किंवा कुटाळक्या यांच्याच दर्जाचीं असतात. मनुष्याच्या विचारांचें व कृतींचें हुबेहुब चित्र—जणूं काय प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकार रूसो यानें लिहिल्याप्रमाणें जगाच्या शेवटच्या दिवशीं परमेश्वराला आपल्या सर्व जीवितावर जो निकाल द्यावयाचा असतो, त्याकरितां आपण दिलेली जबानी—अशा प्रकारचीं आत्मचरित्रें कोणत्याहि भाषेंत झालीं तरी अगदीं थोडींच असावयाचीं. तेव्हां आपल्या मराठी भाषेंत अण्णा कर्वे यांनीं हें जें आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे त्यामुळें त्यांनीं आपल्या देशाच्या उन्नतीकरितां जीं अनेक बहुमोल कामें केलीं आहेत त्यांतच आणखी एक महत्त्वाची भर घातली आहे, असेंच सर्व लोक समजतील, अशी माझी खात्री आहे.

फर्ग्युसन कॉलेज,<br>
पुणें ता. १० आक्टोबर, १९१५. } रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे

---



डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे.

येते. माझी किंमत मी जाणून आहें. मी मोठेसें कांहीं केलें नाहीं, ही जाणीव मला आहे; पण परिस्थितीच्या व सद्दीच्या जोरावर लहानसें कार्य माझ्या हातून झालें आहे, असें मला वाटतें, व त्याबद्दल समाधानहि होतें. वांगी ( हल्लीं बारामती ) येथील व्हिलेज एज्युकेशन सोसाइटीचे उत्पादक प. वा. श्रीयुत रामचंद्र अण्णाजी कळसकर, वऱ्हाडांतील केळीवेळी गांवाला योग्यतेला चढवणारे श्रीयुत सूर्यभान जानजी, पैसाफंडाचे उत्पादक श्रीयुत अंताजी दामोदर काळे प्रभृति गृहस्थांच्या वर्गांतील मी आहें. आम्हांपैकीं एखाद्याला परिस्थिति कांहीं बरी सांपडल्यामुळें शिक्षण थोडें अधिक मिळालें असेल, अगर एकाद्याचें काम लोकांच्या नजरेला अधिक आलें असेल, एवढेंच; पण आमचा वर्ग एक. आमच्या जवळची निसर्गप्राप्त सामग्री विशेष चांगली नव्हे. पण बऱ्यांपैकीं, आणि उद्योगहि साधारण बऱ्या प्रकारचा. आमच्यासारख्या हजारोंहजार माणसांची जरूरी आपल्या देशाला आहे. आमचीं चरित्रें मध्यम सामर्थ्याच्या युवयुवतींमध्यें, सामान्य मनुष्यालाहि करतां येण्यासारख्या कांहीं गोष्टी आहेत अशी थोडीशी जाणीव उत्पन्न करूं शकतील, असा विचार माझ्या मनांत आला. लोकोत्तर स्त्री-पुरुषांचीं व त्यांच्या खालोखाल विशेष सामर्थ्याच्या मनुष्यांचीं चरित्रें हीं बंडोपंती अथवा बिवलकरी कित्त्यांप्रमाणें होत. अशीं चरित्रें वाङ्मयांत चिरस्थायी होऊन रहावयाचीं. हे जाड व टिकाऊ कागदावर घातलेले कित्ते आपल्यापुढें ठेवून विद्यार्थ्यांनीं त्यांजवर दृष्टि ठेवली पाहिजे; पण सामान्य विद्यार्थ्यांचें या कित्त्यांनीं भागत नाहीं. अक्षरें गिरविण्यासाठीं म्हणजे त्यांतून लेखणीचें सुकें अगर ओलें टोंक फिरविण्यासाठीं त्यांना घोंटकित्ते अगर वळणें लागत असतात. हीं वर्गाचा शिक्षक अथवा शाळेतला एकादा चांगल्या अक्षराचा मुलगा पाठकोऱ्या अगर पातळ कागदावर घालून देत असतो. हीं वळणें चुरगळलीं, फाटलीं अगर त्यांवर शाई सांडली, तरी फारशी फिकीर नसते. या घोंटकित्त्यांप्रमाणें आमचीं चरित्रें सामान्य विद्यार्थ्यांच्या उपयोगीं पडतील, असें मला वाटलें. या चरित्रांची आयुमर्यादा अर्थात् घोंटकित्त्यांप्रमाणेंच असणार; पण तितक्या मुदतींत त्यांचा तेवढ्यापुरता उपयोग होईल, असें मला वाटलें आणि म्हणून मी या उद्योगाला लागलों.

'आत्मवृत्त' लिहावें हा विचार पहिल्यानें पांच वर्षांपूर्वी माझ्या मनांत आला. त्या वेळची कल्पना अशी होती कीं, आत्मवृत्त लिहून ठेवून तें आपल्या पश्चात् प्रसिद्ध होण्याची तजवीज करून ठेवावी. हा विचार मनांत आल्यानंतर पांचपंचवीस पानें लिहिलीं देखील. पण उद्योगाच्या व अनेक प्रसंगांच्या गडबडींत हा विचार पुनः उद्भवला नाहीं, व तीं लिहिलेलीं पानें कोणीकडल्या कोणीकडे नाहींशी झालीं. मासिक मनोरंजनाच्या संपादकांनीं तीनचार वर्षांपूर्वी, कांहीं गृहस्थांचीं चरित्रें लिहवून प्रसिद्ध करावीं, यासाठीं एक यादी करून ती कांहीं निवडक मंडळीकडे पाठविली होती. या यादींत त्यांनीं माझें नांव घातलें होतें. हें माझ्या नजरेला पडल्यानंतर संपादकांना मीं उलट लिहिलें कीं, आपण माझें चरित्र लिहविण्याच्या कामीं पडूं नका. या वेळीं माझ्या मनाचा कल आपलें चरित्र प्रसिद्ध व्हावें असा नव्हता. तो पुढें एका विशेष कारणानें बदलला; तें कारण असें:—

पुण्यांतल्या जान स्मॉल मेमोरियल हॉलमध्यें एक व्याख्यानमाला होत असते, तींत मीं एक व्याख्यान द्यावें, अशी आपली इच्छा डॉ. एन्. मॅकनिकोल साहेबांनीं मला कळविली. बऱ्याच वर्षांमागें त्यांनीं एकदां अशीच इच्छा प्रदर्शित केली होती; पण त्या वेळीं नकाराचा जबाब देऊन मी त्यांना नाखुष केलें होतें. या वेळीं त्यांनीं आपल्या पत्रांत असेंही म्हटलें होतें कीं, तुम्हीं आश्रमाची माहिती सांगितल्यानें तुमच्या संस्थेला खचित फायदा होईल; व तें पुढें प्रत्ययाला देखील आलें. अशा सद्बुद्धीनें लिहिलेल्या पत्राला नकाराचा जबाब मला देववेना. अर्थात् मीं त्यांचें म्हणणें कबूल केलें. मात्र त्यांनीं सुचविलेल्या विषयाला व्यापक स्वरूप देऊन आपल्या वीस वर्षांच्या कामाची हकीकत संक्षिप्त रीतीनें सांगावी, असें मी योजिलें, व तें त्यांना मान्य झालें. विषयाची अशी योजना करण्याला एक विशेष कारण झालें. मजविषयीं ज्यांच्यामध्यें बरी भावना होती, अशा बऱ्याच सुशिक्षित मंडळींचें मन मीं नवीन काढलेल्या 'निष्काम-कर्म-मठ' या संस्थेमुळें बरेंच कलुषित झालें होतें. आश्रमाच्या चालक व अधिकारी मंडळींपैकींहि बऱ्याच जणांचें मत या उद्योगाला फार प्रतिकूल होतें. यामुळें या विरुद्ध मताचा फैलाव खाजगी संभाषणांतून जोरानें होत होता. अशा वेळीं माझ्या विचारांची व कृतींची उत्क्रान्ति

कसकशी होत गेली, व हा उद्योग हातीं घेण्यांत माझा हेतु काय, वगैरे गोष्टी सुशिक्षित जनसमूहाच्या नजरेला आणल्या असतां नवीन संस्थेविषयीं व मजविषयीं झालेला गैरसमज बराच दूर होईल, असें वाटल्यावरून शिष्टाचाराच्या मर्यादेचें उल्लंघन करूनहि 'My Twenty Years in the Cause of Indian Women–हिंदी स्त्रियांच्या उन्नतीप्रीत्यर्थ माझीं वीस वर्षें हा विषय मीं घेतला. यावर एक निबंध लिहून तो तारीख २८ ऑगस्ट १९१३ रोजीं वर निर्दिष्ट केलेल्या स्थळीं वाचला, व तो छापून त्याच्या प्रति बऱ्याच गृहस्थांकडे पाठविल्या. कित्येकांना हा लेख फार आवडला, व कांहींनीं तो मराठींत लिहून प्रसिद्ध करण्याविषयीं सूचना केल्या; पण मीं त्यांकडे लक्ष दिलें नाहीं. नंतर कांहीं दिवसांनीं मासिक मनोरंजनाच्या संपादकांकडून मनोरंजनासाठीं सदर लेख थोडासा अधिक विस्तारपूर्वक लिहून देण्याविषयीं आग्रहाची मागणी करण्यांत आली, व तिला अनुसरून मीं तो लेख त्यांना तयार करून दिला. यानंतर मला असें वाटूं लागलें कीं, मी जर 'आत्मवृत्त' लिहिलें, तर तेंहि कित्येकांना आवडेल. मनाच्या या स्थितींत असतां मनोरंजनानें प्रसिद्ध केलेलें 'आत्मोद्धार' पुस्तक माझ्या हातीं पडलें. तें वाचल्यावर माझ्या मनांत असें आलें कीं, बुकर टी. वाशिंग्टन यांनीं जसें आपल्या हयातींत आत्मचरित्र लिहून प्रसिद्ध केलें, तसेंच आपण केलें असतां काय हरकत आहे! हा विचार, व 'कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी' या लहानपणीं वाचनाच्या क्रमिक पुस्तकांत वाचलेल्या लहानशा वाक्यांतील विचार, हे दोन्ही एकदम मनांत उभे राहिले. यांचा अखेर निकाल असा केला, कीं, इंद्राचा ऐरावत मोठें कार्य करूं शकेल; पण शामभटाच्या तट्टाणीचाहि तिच्यापरी उपयोग आहे. हे विचार मनांत घोळत होते, तोंच मनोरंजनकारांकडून माझ्या लेखाचीं प्रुफें तपासण्याकरितां आलीं. त्यावरील उपोद्घातांत पुढील पूर्वी मनोरंजनाच्या वर्गणीदारांना बक्षीस देण्यासाठीं मीं आत्मवृत्त तयार करावें, अशी इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली होती. आत्मवृत्त लिहिण्याचा माझा विचार होता; पण तें काम तसेंच पडून राहिलें होतें, व या संधीचा उपयोग करून घेतला नाहीं तर पुढेंहि तें पडूनच रहाणार, असें दिसत होतें. असल्या कामाला वेळ बराच लागतो, आणि

मागें तगादा असल्यावांचून तें तडीला जाणें कठिण असतें. शारीरिक व मानसिक शक्ति विगलित होतपर्यंत तें लांबणीवर पडलें तर पुढें तें नीट होणार नाहीं; वगैरे विचार मनांत येऊन सहजीं प्राप्त झालेल्या संधीचा उपयोग करून घेण्याचें मीं ठरविलें, व एकदम कामाला सुरवात केली.

आत्मवृत्त लिहिण्याचा प्रसंग मला येईल, असें कधीं माझ्या स्वप्नींहि आलें नाहीं; यामुळें मी कधीं कसलीं टिपणें करून ठेविलीं नाहींत. मीं कधींहि दिनचर्या ( डायरी ) लिहिली नाहीं. सभांचीं प्रोसीडिंगें ( हकीकतीचे लेख ) व संस्थांचे रिपोर्ट यांवरून कांहीं माहिती घेऊन बाकीची स्मरणानें लिहिली आहे. हें आत्मवृत्त शक्य तितकें हुबेहूब रेखाटण्याचा मीं यत्न केला आहे, आणि अगदीं क्षुल्लक व नीरस अशाहि गोष्टी यांत दिल्या आहेत. ज्या गोष्टी कोणी कोणाला फारशा सांगत नाहींत, व ज्या सांगण्यासाठीं केलेल्या नसतात, अशाहि कित्येक गोष्टी यांत आढळतील. लहान मुलासारखें मी सांगत सुटलों आहें, असें सहज कोणाच्या लक्षांत येईल. मी ग्रंथकर्ता तर नाहींच, पण फारसे ग्रंथ वाचलेहि नाहींत; यामुळें काय लिहावें, आणि काय नाहीं, याचें मार्मिक ज्ञान मला नाहीं. जें खरें असून लिहिलें असतां कांहीं वाचकांना तरी आवडेल असें मला वाटलें, तें सगळें मीं लिहून टाकलें आहे. हेतु इतकाच कीं, एकाद्याला बारकाईनें पहावयाचें असल्यास एका जीवाचें उत्क्रमण कसकसें होत गेलें, याची त्याला कल्पना व्हावी. मात्र या सर्व गोष्टी लिहितांना शिष्टाचाराला अगदीं रजा द्यावी लागली आहे.

या आत्मवृत्तांत एक मोठी उणीव राहिलेली आहे. आपले दोष व आपल्या दोषास्पद कृति दुसऱ्याला सांगणें कोणाला आवडत नाहीं, या मनुष्यस्वभावाला मी अपवाद नसल्यामुळें, त्यांचा व्हावा तसा उल्लेख यांत झाला नाहीं. तथापि सामान्य मनुष्यांत आढळून येणारे दोष माझ्यांत आहेत, व त्यांना अनुरूप कृतिदेखील माझ्या हातून घडल्या आहेत.

हें काम हातीं घेण्याला मूळ कारण झालेले डॉ. मॅक्निकोल, माझ्या मूळ निबंधाचें गुणग्राहकतेच्या दृष्टीनें परीक्षण करून त्यावर चांगला अभिप्राय देऊन त्याच्या विशेष प्रसिद्धीला कारणीभूत झालेले त्या सभेचे अध्यक्ष नामदार हिलसाहेब, व हें काम तावडतोब हातीं घेण्याला प्रवृत्त करणारे

माझे मित्र श्रीयुत काशीनाथ रघुनाथ मित्र यांचे या ठिकाणीं मनःपूर्वक आभार मानणें जरूर आहे.

संकल्पित कार्य तडीला गेलें याबद्दल आनंद वाटतो. राष्ट्रकार्यासाठीं बरीच झीज सोसून काम करणारा मध्यम कर्तबगारीच्या मनुष्यांचा वर्ग तयार होण्याला अल्पांशानें तरी मदत व्हावी, या हेतूनें हें आत्मवृत्त लिहिलें आहे. अर्थात् हा यत्न ' प्रांशुलभ्ये फले मोहादुद्वाहुरिव वामनः ' या न्यायाचा आहे. याचा कांहीं उपयोग झाला तर इष्टच आहे; न झाला तरी त्यांत आश्चर्य नाहीं.

हिंगणें बुद्रुक, पुणें,<br>४ सप्टेंबर, १९१५ } धोंडो केशव कर्वे

---

# आत्मवृत्त

## पूर्वार्ध

# आत्मवृत्त

## प्रकरण पहिलें

### जन्मभूमि

माझा जन्म जरी आमच्या चार पिढ्यांच्या मुरूड गांवापासून पंधरा मैलांवरील शेरवली या गांवीं माझ्या आजोळीं झाला, तरी मुरूड हीच माझी जन्मभूमि, असें मला नेहमीं वाटत आलें आहे. दक्षिण कोंकणांत समुद्रकांठीं वसलेले उत्तम हवेचे जे कांहीं थोडे गांव आहेत, त्यांत मुरूड गांवाचा नंबर कदाचित् पहिला लागेल. आपले बहुतेक गांव पूर्वी विशेष योजना न होतां अव्यवस्थितपणें वसलेले आढळतात; पण हा गांव विचारपूर्वक वसविला गेल्यामुळें याच्याइतकी व्यवस्थेशीर रचना इतर ठिकाणीं क्वचित् आढळून येईल. हा गांव कसा वसविला गेला, यासंबंधाच्या हकीगतीची एक जुनी बखर गांवांतील धर्माधिकारी वैशंपायन यांच्या संग्रहीं होती, ती प. वा. रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांनीं प्रयत्नांनीं मिळविली. या बखरीसंबंधानें रावसाहेबांनीं निबंध लिहून तो रॉयल एशिआटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या सभेपुढें ता. ९ फेब्रुवारी १८६५ रोजीं वाचला, व सदर निबंध, बखरीचें इंग्रजी भाषांतर आणि जशीच्यातशी बखर यांचें एक लहानसें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें. सदर पुस्तक हल्लीं फार दुर्मिळ झालें आहे. त्याची एक प्रत फार कष्टानें मिळवून तीवरून पुढील मजकूर मी देत आहें. मूळ बखर जशीच्या तशी परिशिष्टांत दिली आहे.

'मुरूड' नांवाचा उल्लेख सगळ्या बखरींत कोठें नाहीं; तिचा पहिला एक बंद फाटून गेला आहे, त्यांत मात्र असल्यास नकळे. एका ठिकाणीं 'मूळवटग्राम' असा उल्लेख आहे. मूळवट याचा अपभ्रंश मुरूड झाला असावा. 'ही बखर निदान दोनशें वर्षांपूर्वी लिहिलेली, व गांव निदान चारशें वर्षांपूर्वी वसलेला असावा' असें १८६५ सालीं रा. सा. मंड-

लिकांनीं लिहिलें आहे. " आणि चित्तांत पाहिलें तों पुढें यवनी राज्य होईल; याजकरितां गांवाचे उत्तरेस गडदू (सीमेचा दगड) पलीकडेस शून्यालय बांधिलें. शून्यालयाचे पूर्वेस पश्चिम भागीं गडदूपलीकडे यवनास स्थळ ठेविलें. "* असा उल्लेख बखरींत आहे. यावरून रावसाहेबांनीं असें अनुमान काढिलें आहे कीं, दक्षिणेकडे यवनांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या-नंतर, म्हणजे इसवी सनाच्या तेराव्या अगर चौदाव्या शतकांत, या गांवाची वसाहत झाली असावी. गांवांतील धर्माधिकारी वैशंपायन यांचें म्हणणें 'हा गांव १९०० वर्षांपूर्वी वसला, व तेव्हांपासून आम्ही या गांवाचे धर्माधिकारी आहों,' असें आहे; परंतु या म्हणण्याला कांहीं आधार नाहीं, असें रावसाहेबांनीं आपलें मत दिलें आहे. बखरींतील वसाहतीचा इतिहास मनोरंजक व विश्वसनीय आहे. कांहीं गांव अशा रीतीनें वसले गेले असावे, असें त्यावरून अनुमान निघतें.

हल्लीं ज्या ठिकाणीं मुरूड गांव आहे, तेथें पूर्वी जंगल होतें, व त्यांत शेजारच्या आसूद गांवाची स्मशानभूमि होती. हा गांव गंगाधरभट नांवाच्या उत्तरहिंदुस्थानांतून आलेल्या व सिद्धपुरुष या नांवानें लोकांत प्रसिद्ध असलेल्या कनोजा ब्राह्मणानें वसविला. प्रथम गंगाधरभट, पद्माकरभट, व शिष्य वैशंपायन असे आसूद गांवीं आले. समुद्रकांठच्या जंगलाची जागा ग्रामरचनेला योग्य आहे, असें पाहून तेथें गांव वसविण्याचा त्यांनीं संकल्प केला. नंतर तिघेहि हल्लीं गुहागर आहे तेथें गेले व गुहागर गांव वसविण्यासाठीं पद्माकरभट तेथें राहिले. गुहागर व मुरूड हे दोन गांव पाहिले असतां त्यांची रचना एका नमुन्यावर आहे, हें सहज दिसून येतें. त्यांतल्या त्यांत मुरूड गांवाची रचना अधिक शिस्तवार आहे. गंगाधरभट हे वैशंपायन याला बरोबर घेऊन मुरूड गांवाची रचना करण्यासाठीं परत आसुदास आले. नंतर तेथील ग्रामस्थांच्या परवानगीनें जंगल तोडून जागा साफ करण्याचें काम त्यांनीं सुरू केलें. " जंगल तोडतां तोडतां गांवाच्या मध्यमार्गीं वडाचा वृक्ष थोर होता, तो सिद्ध पुरुषाचे विचारें तोडावा असें चित्तांत आणून बरोबर दहावीस ब्राह्मण व शिष्य वैशंपायन समागमें घेऊन वडाचा वृक्ष तोडीवयास लागले. तेसमयीं घाव घालितां

---

* पुढील पृष्ठावरील टीप पहा.

दातार ब्राह्मण मृत पावला. तेव्हां सिद्धानें चित्तांत पाहिलें, तों यामध्यें पिशाच्य बहुत आहे, व वटवृक्षांत कोणी देवता आहे. तेव्हां देवतेची प्रार्थना करून, पिशाच्याचें बंधारण करून, ब्राह्मण जीवंत करविला. (ब्राह्मण जीवंत) केल्यानंतर सर्व जंगल मोडून क्षेत्र सिद्ध केलें." * असा उल्लेख बखरींत आहे.

गांवाच्या वस्तीसाठीं व जमिनीच्या लागवडीसाठीं पुरेशी जागा याप्रमाणें तयार झाली; पण गुरचराईसाठीं जागा नव्हती. तेव्हां मुरुडापासून आठ मैलांवर जालगांव येथें शेलार वंशांतला जालंदर राजा राज्य करीत होता, त्याच्याजवळ जमीन मागितली. त्यानें जवळच्या चार गांवांच्या सीमेंतली थोडथोडी डोंगराळ जमीन घेऊन ती गोचारासाठीं सिद्धपुरुषाला दिली. याप्रमाणें सर्व क्षेत्राची सिद्धता झाल्यावर दक्षिणेकडून उत्तरेकडे गांव वसवीत चालले. अंतराअंतरावर क्षेत्रपाल व देवळें यांची स्थापना केली. मध्यभागीं श्रीदुर्गेचें देऊळ घेतलें, व शेजारीं वटवृक्षांतील देवतेच्या मूळच्या स्थळीं स्वयंभुवादेवीचें देऊळ स्थापिलें. श्रीदुर्गादेवीची मूर्ति आणण्यासाठीं सिद्धपुरुष व शिष्य वैशंपायन हे मुद्दाम कर्नाटक प्रांतीं गेले, आणि गंडकी शिळेच्या तीन मूर्ति घेऊन आले. त्यांतील एक गुहागरास व दुसरी दिव्यास पाठविली, आणि तिसरीची स्थापना मुरूड गांवीं केली. गांवाचे वेगवेगळे विभाग करून प्रत्येकांत एकेक अधिकारी स्थापिला. हे ग्रामाधिकारी येणेंप्रमाणें होतेः—वैशंपायन (धर्माधिकारी); नेने (महाजन); बाळ (वर्तक); सुतारब्राह्मण (वर्तक); करंदीकर (महाजन); कोपरकर (वर्तक); व धारप (वर्तक). दातार हे देवीचे पुजारी असून त्यांजकडे पुष्कळ कामें दिलेलीं आहेत; पण त्यांचा महाजन या नांवानें उल्लेख केलेला नाहीं. हल्लीं त्यांच्या वंशजांना महाजन म्हणण्याचा प्रघात आहे. या आठांना मानकरी असें म्हटलें आहे. यांपैकीं नेने, सुतार, करंदीकर, धारप व कोपरकर यांचे कोणीहि वंशज गांवांत नाहींत. धारप यांजबद्दल कर्वे मानकरी झाले आहेत. बागूल हे एक मानकरी कोपरकरांबद्दल

* सगळ्या बखरींत हें एक, व यवनांसाठीं जागा राखून ठेवण्यासंबंधाचें दुसरें, अशीं दोनच स्थळें दंतकथेवरून लिहिलेलीं व विचाराची कसोटी लावणाराला न पटण्यासारखीं आहेत; एरव्हीं सर्व हकीगत विश्वसनीय दिसते.

असावे. कोपरकर यांनाच बागूल म्हणूं लागले, अगर कोपरकरांकडून बागूल यांजकडे मान गेला, हें कळत नाहीं. हल्लीं काणे व जोशी हे उपाध्ये व वृत्त्यंशी म्हणून मानकरी समजले जातात. जोशी यांचा उल्लेख बखरींत आहे. काणे यांचा नाहीं. याशिवाय पंडित हे कुळकर्ण्यांचें काम करीत, म्हणून ते मानकरी मानले जात. त्यांचे हस्तक दामले हे आज अनेक पिढया तें काम करीत आहेत, म्हणून ते मानकरी समजले जातात. पंडित यांच्या नांवाचा उल्लेख बखरींत नाहीं. एकंदर तेरा ब्राह्मण कुटुंबांची स्थापना करून त्यांना जमिनी दिल्याबद्दल बखरींत उल्लेख आहे. ब्राह्मणेतरांसाठीं ब्राह्मणवस्तीपासून दूर जागा राखिल्या आहेत, पण ब्राह्मणेतरांकडेहि बरेच मान ठेवून ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांनीं मिलाफानें वागून सामाजिक कार्यें तडीस न्यावीं, अशी योजना केलेली दिसते. या योजनेप्रमाणें पिढयान्‌पिढया व्यवहार चालत आले आहेत.

हा गांव रत्नागिरी जिल्ह्यांत मुंबईच्या दक्षिणेस ९० मैलांवर उत्तर अक्षांश १७° ४२′ व पूर्व रेखांश ७३° ८′ या ठिकाणीं वसलेला आहे. याची लांबी दक्षिणोत्तर १ मैल ११३३ यार्ड असून रुंदी पूर्वपश्चिम सरासरीच्या मानानें अर्धा मैल आहे. याशिवाय गुरें चरण्यासाठीं डोंगराळ भाग वेगळा आहे. दक्षिणटोंकापासून तों उत्तरटोंकापर्यंत दगडांनीं सरळ रस्ता बांधलेला आहे, त्याला पाखाडी म्हणतात. समुद्राकडून गांवांत शिरण्यास, व गांवांतून बाहेर जाण्यास सारख्या अंतरावर तीन पूर्वपश्चिम मार्ग ठेविले आहेत. पाखाडीच्या दोन्ही बाजूंना रांगेनें ब्राह्मणांचीं घरें आहेत. प्रत्येक कुटुंबाच्या मालकीच्या जमिनीचा विस्तार घराच्या पुढील भागीं थोडा असून मागें फार आहे. घरें एकमेकांपासून फार जवळ नाहींत, व फार दूरहि नाहींत; यामुळें एकमेकांना उपसर्ग न होतां शेजाराचा फायदाहि मिळतो. पश्चिमेच्या घरांच्या जमिनीची सीमा समुद्रापर्यंत गेली आहे. प्रत्येक घराभोंवतीं एक मोठा आगर असून त्यांत माड व पोफळी लाविलेल्या असतात. घरासभोंवतीं या झाडांची छाया असून नेहमीं गारवा असल्यामुळें उन्हाळ्यांत गांवीं रहाणें फार सुखावह होतें. ब्राह्मणेतरांची वस्ती या पाखाडीपासून दूर वेगवेगळ्या ठिकाणीं आहे. १८६५ सालीं मुरूड गांवांत ३०५ घरें व १३५८ माणसें असल्याचें रा. सा. मंडलि-

कांनीं लिहिलें आहे. १९११ च्या मनुष्यगणतींत ३८९ घरें * व १८१७ माणसें असून त्यांत ८४२ पुरुष व ९७७ स्त्रिया आहेत. यांपैकीं १६७ घरें व ६०९ माणसें ब्राह्मणांचीं आहेत. दीडशें वर्षांपूर्वी हा गांव फार श्रीमंत होता. गांवांतील पांच गृहस्थांनीं प्रत्येकीं पांच हजार रुपये वर्गणी देऊन पंचवीस हजार रुपयांचे श्रीदुर्गादेवीचें देऊळ फारच उत्कृष्ट बांधलें आहे. या भागांतला हा एवढाच गांव पेंढाऱ्यांनीं लुटला, तेव्हांपासून या गांवाला गरिबी आली. तथापि पूर्वीच्या स्वस्ताईच्या दिवसांत लोकांचा निर्वाह होण्यास फारशी अडचण पडत नसे. माझ्या लहानपणीं सुमारें दीडशेंपासून दोनशेंपर्यंत ब्राह्मण पुरुष या गांवांत असत. आतां चाळीस-पन्नासहि सांपडण्याची मारामार. बहुतेक तरुण लोक निर्वाहाचें साधन मिळविण्यासाठीं बाहेर पडतात. या गांवांतून बाहेर गेलेल्या ब्राह्मणमंडळींत शाळामास्तर व कारकून फार आहेत. येथपर्यंत मजल न पोहोंचली, तर मुंबईतील चहाकाफीच्या व फराळाच्या दुकानांत नोकरी धरण्यासाठीं तरी त्यांना बाहेर पडावें लागतें. ब्राह्मणेतर मंडळीहि कांहीं तरी उद्योगधंद्यासाठीं मुंबईस जातात. हल्लीं हा गांव फारच गरिबीस आला आहे.

ब्राह्मणवस्तीचा मोठा गांव, अशी या गांवासंबंधानें फार दिवसांपासून ख्याति आहे. वेदविद्येसंबंधानें पूर्वी याची फार प्रसिद्धि होती. † कोणी

* येथें घरें शब्द विभक्त कुटुंबें याअर्थीं योजिला आहे. एका घरांत दोन वेगळीं कुटुंबें अगर बिऱ्हाडें असल्यास तीं दोन घरें गणलीं आहेत.

† वेदविद्येचें व ब्राह्मण्याचें रक्षण करण्याच्या कामीं मुरूड गांव किती प्रसिद्ध होता, हें पुढील पत्रावरून कळून येईल. त्यावर शक नाहीं; परंतु त्यांतील मजकुरावरून तें केव्हां लिहिलें गेलें हें सहज कळतें. अलीकडील सामाजिक घडामोडीमुळें उत्पन्न होणाऱ्या चळवळींचें चित्रहि यांत चांगलें उमटलें आहे म्हणून हें मुद्दाम देत आहें.

" वेदशास्त्रसंपन्न राजमान्यराजश्री आहित अग्नि जयराम जोशी आपा अग्निहोत्री, व सखाराम भटजी काणे व सदाशिव भटजी तात्या आगाशे, काशीकर तात्या बिवलकर व बाळंभटजी वैशंपायन व वासुदेव भटजी गोडबोले व बाळंभटजी रानडे व बाबाभटजी देवधर प्रमुख समस्त ग्रामस्थ व धर्माधिकारी मुक्काम मुरूड तालुके सुवर्णदुर्ग यांसी.

घनपाठी वैदिक आले असतां त्यांजबरोबर सामना करणारे वैदिक या गांवीं असत. उत्तम विद्वानांची परीक्षा होऊन योग्यतेप्रमाणें त्यांचा बहुमान व संभावना या ठिकाणीं होत असे. पंचवीसतीस वैदिक एका बाजूला, व तितकेच दुसऱ्या बाजूला बसून पट्टीचें म्हणणें चाललें आहे, असे वसंतपूजेचे प्रसंग मीं माझ्या लहानपणीं किती तरी पाहिले आहेत. आतां या गांवांतली ही विद्या लयाला गेली आहे. हा गांव अलीकडील विद्येच्या

---

स्नेहाभिलाषी मुंबईकर धोंडभट कटके आदिकरून सर्व ब्राह्मण यांचे साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ चैत्र शु॥५ पावेतों सर्वक्षेम जाणोन स्वकीयलेखनद्वारा संतोषवीत असावें. हल्लीं इकडील विशेष मजकूर. कोणी एक शेषाद्रिपंत परळी वैजनाथकर ब्राह्मण याचे मुलगे दोन इंग्रजाकडे जाऊन दोन महिनेपर्यंत सतत त्याचे घरीं अन्न व मद्यमांसादि भक्षण करून भ्रष्ट जाहले. नंतर त्यांचा बाप येथें येऊन वेदमूर्ति बाळशास्त्री जांभेकर व कोणी एक धनवान् याचा आश्रय करून सरकारांत फिर्याद केली. त्याला सरकार कायदा मुलानें सोळा वर्षेपर्यंत बापाचे आज्ञेंत चालावें असें आहे. त्या न्यायानें कनिष्ठ मुलगा चवदा वर्षांचा आहे तो येत नसतां सरकार–जबरीनें बापाचे स्वाधीन केला. नंतर त्याला शुद्ध करून घेण्याविषयीं बाळशास्त्री जांभेकर उद्युक्त होऊन कांहीं एक शास्त्री सरकार–चाकर अशी दहा मंडळी मिळून नाशीक व पुणें व सातारा येथील सरकार–चाकर शास्त्री यांचीं संमतें शुद्ध करावा अशीं आणून तेथील ब्राह्मणांची सभा केली आणि बोलले कीं या मुलास शुद्ध करावा. अज्ञान मुलास शुद्ध करून घ्यावा असें शास्त्र आहे. व क्षेत्रज्ञांचीं संमतेंही आणिलीं आहेत. तेव्हां शुद्ध करण्याला चिंता नाहीं असें बोलल्यावरून सभेंतील कांहीं मंडळी बोलली कीं हा शुद्ध होणार नाहीं. नीचाचे घरीं मद्यमांसादि भक्षण करून भ्रष्ट झाला, हा ज्ञातींत घेण्यास उपयोगी नाहीं. व कांहीं एक बोलले कीं, हीं पत्रें आणिलीं हीं सर्वांचे मतानें दिसत नाहींत. तरी येथील सर्वांनीं मिळून साद्यंत मजकुराचीं पत्रें पाठवावीं आणि तीं उत्तरें येतील तसें करूं. असें भाषण ऐकून बाळशास्त्री यांनीं उत्तर केलें कीं आह्मी शुद्ध करितों असें अनुमोदन द्यावयाचें असेल त्यांनीं बसावें. नाहींपेक्षां उठून जावें. तेव्हां सर्व मंडळी उठून

प्रसाराला योग्य आहे, ही गोष्ट इंग्रजी राज्याच्या सुरुवातीबरोबरच सरकारी अधिकाऱ्यांच्या लक्षांत आली. महाराष्ट्रांत विद्याखातें सुरू होऊन ज्या थोड्या मराठी शाळा अनुभव घेण्यासाठीं पहिल्यानें सुरू करण्यांत आल्या, त्यांत मुरूडची शाळा होती. ही शाळा ता. १ आगष्ट सन १८३४ रोजीं स्थापन झाली. या शाळेंत पूर्वी आसपासच्या पुष्कळ गांवांतले मुलगे शिकावयाला येत, व हल्लींहि येतात.

या गांवांतील कांहीं मंडळी अलीकडल्या काळांत बऱ्याच प्रसिद्धीला आली आहे. या सर्वांत पहिलें स्थान युनिव्हर्सिटी स्थापन होण्यापूर्वी प्रसिद्धीला आलेले रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांना दिलें पाहिजे. हे अत्यंत नियमितपणानें वागणारे, अशी यांची ख्याति होती. यांची तेजस्विता अवर्णनीय होती. विशेषतः या व इतर अनेक गुणांमुळें यूरोपियन लोकांमध्यें यांचें मोठें वजन होतें. मुंबईच्या म्युनिसिपालिटींत आज सर

---

गेली. नंतर शास्त्री यांणीं याद करून त्यांची सरकारी मंडळी दहाबारा असामी शास्त्री यांची संमति घेतली. त्याकाळीं संमतकर्ते बोलले कीं या मुलांस शुद्ध करण्यास बाहेर जाऊं न द्यावा, असें बोलले. नंतर कांहीं एक दिवसांनीं बाळशास्त्री यांनीं चार मंडळी घेऊन त्या मुलाचें प्रायश्चित्त पूर्वांग येथें केलें. त्या वेळेस त्यांतील मंडळी बोलली कीं, हा विषय ठीक नाहीं. तेव्हां बाळशास्त्री बोलले कीं, हें करणें उक्त आहे. तुम्हांला ठीक (वाटत) नसल्यास उठून जावें. असें झाल्यानंतर सर्व ब्राह्मणांनीं देवळांत जमून विचार करतात तों परभू व शेणवी व सोनार सर्व इतर जातीनें ब्राह्मणांची निर्भर्त्सना केली. तेव्हां दुसरे दिवशीं सर्व ब्राह्मण मिळून शास्त्री यांचे पक्षाची मंडळीखेरीज करून सर्वांनीं एक मत ठरविलें, कीं, शास्त्री याचा व आमचा अन्नोदक संबंध न व्हावा असें ठरलें. त्यावरून आपणाला ब्रह्मवृंदांस पत्र समस्तांचे आहे व आपणही सर्व शिष्ट मिळून एकत्र होऊन ब्राह्मण्य संरक्षण होईल असें संमत–पत्र येईल असा अर्थ करावा. येथें नाशीक व कल्याण व पुणें व अलिबाग व पनवेल येथील समस्तांचीं संमतें आम्हीं आणलीं आहेत. त्यास हा विषय मनन करून पत्राचें उत्तर सत्वर यावें. सुज्ञांप्रति बहुत काय लिहावें ही विज्ञापना."

फेरोजशहा मेहता यांचें जें वजन आहे, तसेंच त्या वेळीं रावसाहेबांचें असे. हे नामांकित हायकोर्ट वकील होते. व्हाइसराय साहेबांच्या कौन्सिलांत या प्रांतांतून यांची पहिल्यानें नेमणूक झाली. यांनीं हिंदी समाजाची कीर्ति उज्ज्वल केली. यांचें चांगलेंसें चरित्र अद्याप कोणीं लिहिलें नाहीं, ही अत्यंत दुःखाची गोष्ट होय.* दुसरे गृहस्थ प. वा. श्रीयुत वामन आबाजी मोडक हे होत. हे मूळचे मुरूडचे नव्हत. अत्यंत गरीबीच्या स्थितींत यांनीं विद्यार्जन करून पुढें ते एवढ्या मोठ्या योग्यतेला चढले. यांनीं मुरूड गांवीं एक आगर विकत घेऊन त्यांत घर बांधलें व हे मुरूडकर बनले. यांनीं आपल्या एका मुलाची मुंज नवीन बांधलेल्या घरांत केली. पूर्वी हिंदी मनुष्याला न दिलेली एल्फिन्स्टन हायस्कुलाच्या प्रिन्सिपॉलची जागा प्रथम यांना मिळाली. हे मोठे धर्मशील होते. तिसरे गृहस्थ ज्योतिःशास्त्रविशारद प. वा. श्रीयुत शंकर बाळकृष्ण दीक्षित हे होत. सिद्धपुरुषांचे मानसपुत्र शिष्य वैशंपायन यांचे हे वंशज होत. हे फार बुद्धिमान् होते. ट्रेनिंग कॉलेजांत शिकत असतांना हे सकाळीं बाबा गोखल्यांच्या इंग्रजी शाळेंत जाऊन अभ्यास करीत, व अशा रीतीनें यांनीं मॅट्रिक्युलेशनची परीक्षा दिली. गरीबीमुळें यांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळाला नाहीं; नाहीं तर हे फार मोठ्या योग्यतेला चढले असते. चवथे गृहस्थ प. वा. श्रीयुत हरि नारायण गोखले होत. हेहि अगदीं गरीब स्थितींतून वर आले. अंगीं फारशी विद्वत्ता नसतां आपल्या शहाणपणानें व कर्तबगारीनें पुण्यांतील आर्यभूषण व ज्ञानप्रकाश या छापखान्यांचे हे मालक बनले, व पुण्यांतील मुद्रण-कलेच्या प्रगतीला हे कारण झाले. दैनिक ज्ञानप्रकाश सुरू करण्याचें धाडस यांनींच केलें. पांचवे पुढें आलेले ग्रामस्थ श्रीयुत रामचंद्र भिकाजी जोशी× हे आहेत. विधवाविवाहाच्या सुधारणेंत पुढाकार घेणारे, व महाराष्ट्रवाङ्मया-

---

हे॥ रामचंद्रभट बापट मालगुंडकर यांचे शिरसाष्टांग नमस्कार लोभ करावा हे विज्ञापना.

* रा. रा. गणेश रामचंद्र हवालदार बी. ए. एल. एल. बी. शिरस्तेदार हाय-कोर्ट अपिलशाखा मुंबई यांनीं गेल्याच वर्षीं [ १९२७ ] रावसाहेबांचें विस्तृत चरित्र सहासहाशें पानांच्या दोन भागांत प्रसिद्ध केलें आहे.

× हे गेल्यावर्षी [ १९२७ ] परलोकवासी झाले.

ऱ्या अभ्यासांत प्रवीण म्हणून हे प्रसिद्ध आहेत. यांचीं मराठी भाषेचीं लहानमोठीं व्याकरणें शाळाखात्यांत चालू आहेत. मुरूड गांवांतील प्रसिद्धीला आलेले शेवटले गृहस्थ मुरूडकरबुवा या नांवानें पुण्यांत माहीत असलेले दोघे कीर्तनकार बंधु होत. हे चांगले वेदान्ती आहेत. यांच्या कीर्तनाला व पुराणाला बरीच सुशिक्षित मंडळी जात असते. *

चित्पावन आणि कऱ्हाडे या ब्राह्मणांच्या पोटजातींत शरीरसंबंध होणें अजूनहि किती तरी कठीण जातें; पण मुरूड गांवांत अनेक पिढ्यांपूर्वी कऱ्हाड्यांचीं दोनतीन कुटुंबें चित्पावनांत अगदीं एकजीव होऊन गेलीं, ही आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे. हीं कुटुंबें कऱ्हाड्यांचीं आहेत, या गोष्टीचाहि हल्लीं विसर पडलेला आहे.

येथले परंपरागत कांहीं ग्रामाचार सांगण्यासारखे आहेत. प्रथम ग्रामस्थापनेची आठवण करून देणारा हल्लीं बंद झालेला विलक्षण आचार सांगून नंतर बाकीचे सांगतों. त्यासंबंधाचा बखरींतील उल्लेख येणेंप्रमाणें:—

"ज्येष्ठ वद्य १४ (स) मढेरूं काढावें. मढेराचें साहित्य बालवर्तक यांनीं करावें. दातारानें संकल्प करून उदक उपाध्ये यांहीं सोडवावें. पूर्वी पिशाच्यांहीं ब्राह्मण बल घेतली होती. तेव्हां सिद्धांहीं ब्राह्मण त्यांजकरवीं जीवंत करून त्यासी नरबळ देऊं केली. त्यास वस्त्र नूतन घालावें, आणि सर्व गांवांमध्यें शूद्रांहीं व गुरवांनीं समागमें जाऊन गांवाभोंवतें फिरवून श्रीचा देवळास आणावा, आणि आणिल्यानंतर श्रीचें तीर्थ व सिद्धाचे हातींचे आड व तळ्या आहेत त्याचें उदक आणून त्याजवरी शिंपवावें. श्रीस धुपारत करावी आणि सर्वांनीं श्रीजवळ प्रार्थना करावी. केल्यानंतर श्रीनें त्यास जीवंत करावा."

एका तिरडीवर जीवंत मनुष्यास मृताप्रमाणें निजवून त्यास हिंडवून

---

* अलीकडे विशेष प्रसिद्धीस आलेल्या, मुरुड गांवच्या आणखी एका गृहस्थांचा येथें उल्लेख करणें जरूर आहे. श्रीयुत नारायण विश्वनाथ ऊर्फ बाळासाहेब मंडलीक बी. ए. एल. एल. बी. हे रावसाहेब मंडलिकांचे चिरंजीव होत. आज कित्येक वर्षे हे जे. पी. असून मुंबई कार्पोरेशन व मुनिसिपल स्टॅन्डिंग कमिटी व स्कूलबोर्ड यांचे सभासद असत. यंदा सरकारनें मुंबईच्या शेरिफच्या बहुमानाच्या जागेवर त्यांची नेमणूक केली आहे.

आणून नंतर त्याजवर तीर्थ वगैरे शिंपून त्याला जीवंत केला असें समजून सोडून द्यावयाचें, ही चाल फार वर्षांपूर्वी बंद पडलेली असावी. तीबद्दल ऐकींव देखील माहिती माझ्या लहानपणीं वृद्ध मनुष्यांनांहि नव्हती. ती बंद पडण्याचें कारण कित्येक असें सांगतात, कीं, एका वर्षी मृताप्रमाणें निजविलेला मनुष्य पुनः उठला नाहीं, आणि त्यामुळें हा प्रचार बंद पडला. हा विचार आरंभापासून पुष्कळ वर्षें चालत आला असला पाहिजे. बखर लिहिली तेव्हां हा चालू असावा. याच्या खर्चासाठीं वसाहतीच्या वेळींच मढयेत म्हणून वेगळें काढून ठेवलेलें होतें. हा आचार बंद झाला, हें फार चांगलें झालें.

ग्रामस्थापनेची आठवण करून देणारा दुसरा विशेष आचार म्हणजे सिद्धपुरुषांची पुण्यतिथि होय. सिद्धपुरुषांचा शिष्य वैशंपायन याला ते आपला मानसपुत्र समजत. यांच्या वंशानें सिद्धपुरुषांची पुण्यतिथि वर्षानुवर्षे कार्तिक वद्य द्वादशी रोजीं करून त्यांचें स्मारक चालविलें आहे, हें त्यांना विशेष भूषणावह आहे. या दिवशीं अष्टमानकऱ्यांना भोजनाला निमंत्रण करण्याची वहिवाट आहे. या पुण्यतिथीच्या प्रसादाला लहानपणीं मी पुष्कळ वेळां गेलेला आहें. *

वर्षप्रतिपदेच्या दिवशीं सर्व ग्रामस्थांनीं पंचांगश्रवण व निंबभक्षण यांसाठीं श्रीदुर्गादेवीच्या देवालयांत जमावें, अशी वहिवाट आहे. मंडळी जमल्यानंतर मागील वर्षांत ज्या ज्या घरीं मनुष्यें मृत झालीं असतील, त्या त्या घरीं मानकरी व चार शिष्ट यांनीं जाऊन कुटुंबनायकांचें सांत्वन करून त्यांना बहुमानानें वाजतगाजत देवळांत आणावें, व नंतर पंचांगवाचनाला सुरवात करावी, हा ग्रामाचार फार प्राचीनकाळापासून आजतागायत सारखा चालत आला आहे.

अष्टमानकऱ्यांचा परंपरागत मान अजूनहि देण्यांत येत असतो. बऱ्या

---

* अलीकडे वैशंपायन यांच्या कुळांतला पुण्यतिथि साजरी करण्यासारखा कोणी वंशज मुरूड गांवांत राहिला नसल्यामुळें माझे बंधु ती. भिकाजीपंत कर्वे (दादा) ही पुण्यतिथि सिद्धपुरुष स्मारकफंडांतून साजरी करीत असतात. अष्टमानकऱ्यांना न बोलावितां फक्त दोन वैदिक ब्राह्मण भोजनास बोलावून श्राद्धतिथीप्रमाणें ही पुण्यतिथि साजरी केली जाते.

स्थितींतील लोक मंगलकार्यांच्या प्रसंगीं गांवांतील सर्व ब्राह्मणकुटुंबांना निमंत्रण देतात; परंतु जे गरीब असतील, त्यांनीं सर्व ग्रामस्थांना निमंत्रण न करितां आपले आप्त व अष्टमानकरी यांना मात्र करावें, व त्यांच्या घरीं मानकऱ्यांनीं जाऊन मंगलकार्य पार पाडावें, अशी जुनी वहिवाट आहे. अशा रीतीची मदत मानकऱ्यांकडून हल्लीं होत नाहीं. तथापि कितीहि गरीब मनुष्य असला, तरी तो मंगलकार्यांच्या आदल्या दिवशीं सर्व मानकऱ्यांकडे जाऊन त्यांच्या भेटी घेतो, व शिवाय दुसऱ्या दिवशीं इतरांबरोबर त्यांना निमंत्रण करितो, व मानकरीहि मंगलकार्यांच्या वेळीं हजर रहातात. कार्याचा समारंभ आटोपला म्हणजे जमलेल्या ग्रामस्थांना एकेक नारळ वांटण्याची वहिवाट आहे. हे सर्व वांटून झाल्यानंतर मानकऱ्यांना ठरलेल्या अनुक्रमानें नारळांची जोडी देण्यांत येते. नारळ वांटण्यापूर्वी सर्वांना गंध लावितात. सर्वांचें झाल्यानंतर मानकऱ्यांना ठरलेल्या क्रमानें गंध लावण्यांत येतें. लग्न व मुंज या दोन संस्कारांच्या वेळीं मात्र मानकऱ्यांना नारळांची जोडी दिली जाते. इतर संस्कारांच्या वेळीं इतरांबरोबर त्यांना एकेकच नारळ देतात. गर्भाधान, पुत्रावण, षष्ठीपूजन, चौल वगैरे संस्कार यथाविधि झाले असतां अष्टमानकऱ्यांना बोलावलेंच पाहिजे, अशी चाल अद्यापि चालू आहे. कुळाचा मान कायम राखण्याकरितां शाळेंत गैरहजर राहूनहि मला कधीं कधीं असल्या प्रसंगीं हजर रहावें लागे.

# प्रकरण दुसरें

## मातृवंश

रँगलर परांजपे यांचें घराणें म्हणजे माझा मातृवंश होय. परांजप्यांचें मूळ गांव आडिवरें. यांचें गोत्र विष्णुवर्धन, कुलस्वामी लक्ष्मीकेशव व कुलस्वामिनी आडिवऱ्याची देवी महाकाली. हे दापोली तालुक्यांत केव्हां आले, हें निश्चित नाहीं. अलीकडच्या काळांतील यांचा मूळपुरुष महादेव हा माझा खापरपणजा. याचे मुलगे तीन–विठ्ठल, रामाजी व हरि. हर्णैपासून चार मैलांवर मुर्डी येथें हल्लीं रँगलर परांजपे यांचे बंधु रहातात. तें ठिकाण त्या वेळीं पडित जमीन म्हणून सरकारमालकीचें होतें, तें विठ्ठल-भटांनीं संपादन केलें; व तेथें आपण आणि रामाजी राहूं लागले. कनिष्ठ बंधूनें दाभोळ येथें जमीनजुमला संपादन केला. विठ्ठलभट हे कष्टाळू व पराक्रमी होते. यांनीं वेदाध्ययन संपविल्यावर तीन वेळां पायांनीं चालून काशी-यात्रा केली, व नंतर गृहस्थाश्रमी बनले. मुर्डीपासून आठ मैलांवर इळणें म्हणून गांव आहे. हा गांव वांईच्या भानूंचा. तेथें ब्राह्मणेतरांची वस्ती आहे. त्या गांवीं कांहीं घरें व देवळें बांधून ब्राह्मणांची लहानशी वसाहत करावी, या हेतूनें ते इळणें येथें लहानसा घरटा बांधून तेथें राहूं लागले व त्यांनीं एक कोशावरील डोंगरांत देवळाच्या इमारतीसाठीं मोठमोठे चिरे काढण्याचें काम सुरू केलें. हा डोंगर नुसता चढून उतरणें हेंच किती तरी कष्टाचें काम आहे. त्या ठिकाणीं एकेक दहाबारा मनुष्यांनाहि खालीं जाणार नाहीं असले अवजड दगड पाडून ते खालीं नेणें म्हणजे भगीरथ प्रयत्न होता. पण कसल्याहि अडचणींना न जुमानतां त्यांनीं हें काम आकारांत आणलें व देवळाचा चौथरा पुरा केला. असले शेंकडों दगड त्या डोंगरावर तयार होऊन पडले आहेत. तेथें जाऊन यांच्या कामाचा आराखडा पाहिला म्हणजे मन थक्क होतें. नाना फडनविसांचें मूळ गांव वेळास; तेथून हा गांव जवळ आहे. या गांवांत ब्राह्मणांची वसाहत करण्याला यांना नानांचें उत्तेजन असावें. यांचें कर्तृत्व तेथल्या गांवकऱ्यांना सहन झालें नाहीं. नवीन बांधलेल्या चौथऱ्याच्या बाहेरच्या बाजूला एक कोनाडा करून त्यांत एक देव ठेविला होता. हे त्याची पूजा करीत बसले असतां कांहीं मनुष्यांनीं येऊन यांचा खून केला. अजून त्या देवाला दरसाल एक कोंबडें दिलें जातें. पूर्वींचे काळीं भुतांखेतांवर लोकांचा फार विश्वास असे. या

गांवीं भुताटकीचा उपद्रव आहे, अशी तेथल्या लोकांची समजूत आहे. पुढें पुष्कळ वर्षांनीं बेहरे यांनीं यांचे जागेवर दुमजली घर बांधलें तें यांनीं लोटून दिलें, असा तेथील लोकांचा समज आहे. आतां तेथें घर बांधावयाला कोणीहि धजत नाहीं. यांचे चिरंजीव केसोपंत हेहि वडिलांप्रमाणेंच कर्तृत्ववान् पुरुष निपजले. हे वडिलांचा खून झाला त्या वेळीं लहान होते; ते आपल्या चुलत्याकडे दाभोळ गांवीं जाऊन राहिले. तेथें त्यांचा विद्याभ्यास वगैरे झाला. विठ्ठलभट असते तर त्यांनीं त्यांना वेदविद्येचें शिक्षण दिलें असतें. आतां ते उत्कृष्ट कारकून बनले. त्यांनीं जालगांव येथें इस्टेट संपादन करून ती वडील भावाला दिली, व आपण रत्नागिरी जिल्ह्यांतल्या खेड तालुक्यांतील शेरवली गांवीं जाऊन राहिले. हा गांव त्यांनीं मुरूडकर गद्र्यांकडून शके १७४६ त ३२५ रुपयांना गहाण घेतला. हा गांव अगदीं पड होता, तो त्यांनीं उत्पन्नाला आणिला. नवीं शेतें पाडण्याचें काम यांनीं सारखें चालू ठेविलें. त्यांच्या खटपटीपासून यांना स्वतःला फारसा फायदा झाला नाहीं. कारण, जमीन पिकाला आल्याबरोबर गद्रे यांनीं तो गांव सोडविला. यांनीं सुमारें आण्यादीडआण्याचा हिस्सा खरेदी केला. यांच्या प्रयत्नांनीं तो गांव मोठ्या किंमतीला चढला. थोड्या वर्षांपूर्वी या गांवांचा एकअष्टमांश त्याच्या मालकानें चार हजार रुपयांना विकला. हे अत्यंत धार्मिक गृहस्थ होते. अतिथिअभ्यागताचा योग्य समाचार घेणें हें यांच्या वंशाचें कायमचेंच ब्रीद होऊन बसलें आहे. आपणाला वेदविद्या शिकावयाला सांपडली नाहीं, ही गोष्ट त्यांच्या मनाला लागून राहिली. स्वतःमधील कमीपणा त्यांनीं मुलांमध्यें राहूं दिला नाहीं. एक चांगले वैदिक घरीं बाळगून यांनीं आपल्या मुलांना वेदविद्येचें शिक्षण दिलें. ब्राह्मणाचें कर्तव्य म्हणून वेदविद्या शिकावयाची, उदरनिर्वाहासाठीं नव्हे, हें तत्त्व यांनीं आपल्या मुलांच्या मनांत बिंबविलें, व तें त्यांनीं यावज्जीव पाळिलें. यांनीं स्वतः आपल्या मुलांना कारकुनीचें शिक्षण दिलें. कर्तृत्ववान् मनुष्याला शत्रु उत्पन्न व्हावयाचेच. एका जमिनीसंबंधानें कांहीं तंटा पडून केसोपंतांनीं सरकारदरबार करून वाद जिंकला; तेव्हां यांच्या प्रतिपक्षीयांनीं सूड घेण्याचा शेवटला उपाय योजून यांचा खून केला. या वेळीं यांचें वय सुमारें ६० वर्षांचें होतें. मरण–समयीं यांचे दोन मुलगे

कर्ते पुरुष झाले होते. यांची पत्नी यांच्या मागें पुष्कळ वर्षे जगली. मुलगे मुली, सुना, नातवंडें मिळून तीसचाळीस मनुष्यांच्या कुटुंबांत तिला गृह-देवतेप्रमाणें सर्व मानीत. ती पुढें काशीयात्रेला जाऊन प्रयाग क्षेत्रीं तिचें देहावसान झालें.

केसोपंत हे पुण्यवान् व भाग्यशाली पुरुष होते. त्यांना मरण मात्र वाईट तऱ्हेनें आलें. याशिवाय त्यांच्या व त्यांच्या मुलांच्या जीवनक्रमांत मनाला लागण्यासारखें कांहीं झालें नाहीं. यांचीं मुलें कुळाला भूषण झालीं. तीं एकंदर सहा भाऊ व तीन बहिणी. यांपैकीं एक भाऊ अल्पायु निपजला, व एक बहीण पन्नास वर्षांच्या वयाची होऊन वारली; परंतु बाकीची मंडळी दीर्घायु झाली. हीं सर्व भावंडें धार्मिक, सद्गुणी आणि संसार-दक्ष निघालीं. चार खेडेगांवांत यांनीं आपलीं रहाण्याचीं ठिकाणें केलीं. सर्वांत वडील भाऊ रामभाऊ हे शेरवलीपासून एक मैलावर सुकदर म्हणून एक गांव आहे तेथें जाऊन राहिले. दुसरे लखुतात्या शेरवली गांवींच राहिले. तिसरे भास्करभाऊ व पांचवे सर्वांत लहान बळवंतराव (पुरुषोत्तम), रँगलर परांजपे यांचे वडील, हे शेरवलीपासून पंधरा मैलां-वरच्या मोहने गांवीं राहिले, आणि चवथे मोहन्यापासून एक मैलावरच्या नानवळें गांवीं राहिले. या सर्व ठिकाणीं यांचें एकटेंच ब्राह्मणाचें घर असे, व अतिथिअभ्यागताचा समाचार घेऊन ब्राह्मणसंतर्पण करणें हें यांच्या कुळाचें ब्रीद सर्व ठिकाणीं चांगलें पाळलें जात असे. स्नानसंध्यादि ब्रह्म-कर्मे व रात्रीं हरिविजय, रामविजय, संतलीलामृत वगैरे हस्तलिखित पोथ्यांचें वाचन, या सर्वांच्या घरीं अप्रतिबंध चालत असे. गोरसविक्रय करणें हें पाप मानीत. यांच्या घरीं दूधदुभतें भरपूर असावयाचें; पुष्कळसें तूप जमवावयाचें व तें ब्राह्मणभोजनाच्या कामीं खर्चीं घालावयाचें, असा यांचा क्रम असे. कष्ट करून मिळवावें व मुलांबाळांनीं भरलेल्या कुटुंबाचें उत्कृष्ट संगोपन करून कांहीं अंश दानधर्मांत खर्चीं घालावा, हा या सर्वांचा आयुष्यक्रम होता. अलीकडे तीसचाळीस वर्षें मोहन्याला राहणारे भास्कर-भाऊ व बळवंतराव हे आपल्या मूळ ठिकाणीं मुर्डीला येऊन राहिले. भास्करभाऊंनीं मुर्डीला नवीन इस्टेट संपादन केली, व बळवंतराव आपल्या वडिलोपार्जित ठिकाणांत राहिले. या सर्व भावांमध्यें परस्पर प्रेम असे.

इस्टेटीच्या वांट्यासंबंधानें यांचे बिलकुल तंटे झाले नाहींत. विभक्त होते-वेळीं यांनीं आपापसांत गुण्यागोविंदानें वांटप करून घेतलें. लखुतात्यांनीं फार वर्षे घारग्र चालविलें होतें, तें पत्नीच्या निधनामुळें बंद ठेवावें लागलें. रँगलर परांजपे यांचे वडील केसोपंतांच्या मृत्यूच्या वेळीं लहान होते; यामुळें त्यांचें वेदाध्ययन लहानपणीं झालें नाहीं, तेव्हां त्यांनीं तरुणपणीं संहितेचे अध्ययन केलें. नंतर यांनीं घारग्र घेतलें व तें पुष्कळ वर्षे चालविलें, आणि अलीकडे उतारवयांत तितका नियमितपणा राहूं शकत नाहीं, म्हणून तें बंद केलें.*यांनीं पुष्कळ वर्षांपूर्वी एक तिळहोम केला होता. भास्कर-भाऊंचे चिरंजीव अजून चातुर्मास्य अग्नि ठेवितात. जालगांव येथें चैत्र महिन्याचे पहिले दहा दिवस नारायणाचा उत्सव होत असतो, त्यांत परां-जप्यांकडून बराच खर्च होत असतो. दाभोळचे परांजपे या उत्सवांत पुढारीपणा घेऊन मोठा खर्च करितात. केसोपंत या उत्सवासाठीं दरसाल एक मण तूप व सव्वामण तांदूळ पाठवीत असत. हल्लींहि पांच बंधूंच्या कुटुंबांकडून आळीपाळीनें दरसाल अर्धा मण तूप व सव्वा मण तांदूळ जात असतात. पुष्कळसा वंशविस्तार व्हावा, व वंशांतील बहुतेक मंडळी सुवृत्त, दीर्घायु, उद्योगी आणि कुटुंबाचा योगक्षेम चालविण्याला समर्थ अशी निपजावी, असें भाग्य फार थोड्यांच्या वांट्याला येतें, तें केसोपंत परांजप्यांना लाधलें, हें पुढील कोष्टकावरून लक्षांत येईल.

| मुलांचीं नांवें. | हल्लींचें अगर मरणसमयीं वय. | | मुलगे, नातू व पणतू मिळून हल्लीं हयात असलेले परांजप्यांच्या वंशांतील पुरुष. |
|---|---|---|---|
| रामचंद्र. (मयत) | ८० | | १७ |
| लक्ष्मण. (मयत) | ८६ | | १३ |
| भास्कर. (हयात) | ८७ | | ५ |
| वासुदेव. (मयत) | ६० | | १५ |
| बळवंत. (हयात) | ७४ | | १६ |
| | | एकूण | ६६ |

* हे गेल्या वर्षीं वयाच्या ८४ व्या वर्षीं वारले.

यांच्या मुलींचा वंशविस्तार विशेष झाला नाहीं; पण त्याहि दीर्घायु, सुवृत्त आणि उद्योगी निपजल्या. माझी आई ८० वर्षांचें वय असतांना परलोकवासी झाली, व माझी मावशी ७६ वर्षांची अजून हयात असून मातृभक्त आणि धर्मशील अशा मुलाच्या सहवासांत, हातांत कांहीं काम आणि तोंडीं रामनाम, अशा वृत्तीनें रहात आहे.

परांजप्यांच्या वंशांत अलीकडल्या विद्येंत पुढें सरकलेले असे रँगलर परांजपे व त्यांच्यामुळें पुढें आलेले त्यांचे दोघे धाकटे भाऊ, एवढेच काय ते आहेत. त्यांपैकीं एक बी. ए. होऊन सरकारी शेतकीखात्यांत नोकर आहेत, व दुसरे बी. ए., एल. सी. ई. होऊन हल्लीं पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर आहेत.* यांचे एक चुलतबंधु कांहीं वर्षें पूर्व-आफ्रिकेंत राहिले होते; हल्लीं ते नागपुराकडे सरकारी नोकर आहेत.

माझे चुलतआजे नाना परांजपे हे जालगांवीं रहात असत. अलीकडे नवीन रामदासी पंथाच्यासंबंधानें विशेष प्रसिद्धीला आलेले श्रीरामदासानुदास ( पूर्वाश्रमींचे श्रीयुत श्रीधर विष्णु परांजपे ) हे यांचे नातु होत. हे बुद्धिमान् व कर्तृत्ववान् आहेत. मोरोपंतांच्या केकावलीवर उत्कृष्ट विस्तृत टीका लिहून हे प्रथम प्रसिद्धीला आले. आरंभीं यांनीं सुधारणेच्या कांहीं बाबी हातांत घेतल्या, त्यांसाठीं हे नेटानें झटले, व कर्ते सुधारक बनले. पूर्व वयांत सुधारणेसाठीं धडपड करावयाची, व पुढें असल्या मार्गांत पडल्यावर सुधारणेशीं विरोध करावयाचा, असा प्रकार कित्येकांचा घडतो. यांनीं नवीन पंथ स्वीकारल्यानंतर सुधारणेविषयीं सहानुभूति कायम ठेविली. हे असामान्य पुरुष आहेत. यांनीं पुष्कळ वर्षें तीर्थाटनें करून साधुसंतांचा सहवास साध्य करून घेतला, आणि नंतर केवळ रुळलेल्या मार्गानें न जातां, धैर्यानें रामदासीपंथाला नवें वळण देण्याचा प्रयत्न करून वर्ध्याजवळच्या एका टेंकडीवर नवीन मठाची स्थापना केली. कांहीं वर्षें यांचा हा मठ फार जोरानें चालून वर्ध्याजवळचें हनुमानगड हें ठिकाण क्षेत्राप्रमाणें मानलें जाऊं लागलें होतें. मोठमोठ्या अधिकारावर असणारी नवी सुशिक्षित मंडळी व त्याचप्रमाणें पुष्कळ जुनी मंडळीहि यांची अनुयायी बनली होती. परंतु अलीकडे कांहीं कारणांमुळें यांच्या बहुतेक सुशिक्षित

* हे हल्लीं शिकारपूर येथें म्युनिसिपल इंजिनिअर आहेत.

## परांजपे कुटुंबाच्या चार पिढ्या.



श्री. विनायकराव,   रँ. परांजपे यांचे वडील,   श्री. निळकंठराव,
(रँ. परांजपे यांचे बंधु)   पुरुषोत्तमपंत   (विनायकरावांचे चिरंजीव)
विनायकरावांचें कुटुंब, रँ. परांजपे यांच्या मातुश्री, निळकंठरावांचें कुटुंब व मुलगा.

अनुयायांनीं यांना सोडलें आहे. धर्मसंबंधानें यांचे विचार अगर आचार अलीकडल्या सुशिक्षितांच्या विचाराच्या कसोटीला उतरण्यासारखे नसतील; पण लोकमताला न भितां यांनीं लोकांना न रुचणारे कित्येक विचार धैर्यानें प्रसिद्ध केले, व कित्येक आचार अमलांत आणले. हल्लीं यांजवर आलेलें किटाळ यांच्या चुकीमुळें आलेलें आहे कीं काय, व चुकी असल्यास ती केवढी आहे, हें ठरविणें फार कठीण आहे. चुकी झाली व ती फार मोठी झाली असें गृहीत धरलें, तरी मनुष्याची किंमत ठरवितांना त्याच्या एकंदर आयुष्यक्रमाचा विचार झाला पाहिजे. यांच्या सर्व कृति व मतें मला मान्य नाहींत; पण यांचे कांहीं विचार व कांहीं कृति अत्यंत थोर आहेत.

---

# प्रकरण तिसरें

## पितृवंश

पेशवाईच्या काळांत कोंकणांतले पुष्कळ हिंमतवान आणि कर्तबगार लोक आपल्या नशीबाची पारख करण्याकरितां पुण्याला येत. अशा मंडळीपैकीं माझे चुलत पणजे केशवभट कर्वे अग्निहोत्री, व त्यांचे धाकटे बंधु म्हणजे माझे पणजे रघुनाथभट हे असावे. यांचे गोत्र गार्ग्य, कुलस्वामी हरिहरेश्वर व कुलस्वामिनी जोगेश्वरी. हे पुण्यांत कधीं आले, याबद्दल नक्की माहिती मिळत नाहीं; पण शके १६६६ त यांचें पुण्याला दुकान होतें. शके १६६६ पासून शके १६९९ पर्यंतचा सदर दुकानचा ताळेबंदासारखा एक कागद सांपडतो, त्यावरून त्यांचा श्रीमंतांशींहि देवघेवीचा व्यवहार होता, असें दिसतें. हे मूळचे दापोली तालुक्यांतील पंचनदी गांवीं रहाणारे. यांच्याकडे कांहीं गांवचें उपाध्येपण असे. केशवभट अग्निहोत्री असून धार्मिक व तेजस्वी ब्राह्मण होते.* यांच्या गुणांचें चीज कर-

---

* यांच्या या गुणांची निदर्शक पुढील पत्रें येथें देण्यासारखीं आहेत:-

"श्रीकोळेश्वर

स्वस्तिश्री शके १६७६ भावनामसंवत्सरे आश्विन वद्य ७ ते दिवशीं वेदसंपन्न राजश्री केशवभट कर्वे अग्निहोत्री, व रघुनाथभट कर्वे, बिन वासुदेवभट कर्वे, गोत्र गार्ग्य, सूत्र आश्वलायन, यांसी महाजन व जोशी व उपाध्ये व समस्त ग्रामस्थ मौजे कोळथरें, तर्फ पंचनदी, प्रांत दाभोळ, मामले राजापुर यांनीं लिहून दिलें ऐसीजे. तुम्ही पूर्वी मौजेमजकुरीं गयाळ आगर होता तेथें राहात होतेत; त्या आगरावर ब्रह्मग्रह उभा राहोन तुमचा त्याणें नाश बहुत केला. तेव्हां तुम्ही श्रीहरिहरेश्वरास जाऊन शोध करून ब्रह्मग्रह यासी मुक्त केला. तुम्ही अग्निहोत्री, थोर ब्राह्मण, सर्वांस तुमचे आवश्यक जाणोन सर्वांचे विचारें ज्या आगराचा कोणी वारीसदार नसेल तो आगर तुह्मांस धर्म द्यावा म्हणोन समस्त ग्रामस्तांनीं मिळोन करार केले; त्यांजवरून मौजे मजकूरचा आगर तुम्हास धर्मदत्त दिला आहे. त्यास तुम्ही पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें उपभोग करीत जाणें. त्याचा कोणी वारसदार

ण्यासाठीं श्रीमंतांनीं यांना हातनोर गांव इनाम दिला होता. रघुनाथभट हे व्यवहारचतुर व शहाणे होते, व त्यांची भ्रातृभक्ति विशेष असल्यामुळें केशवभटजींच्या नांवानेंच सर्व व्यवहार चालवून हें त्यांच्या मागें असत. आपलें नांव पुढें आणण्याची यांनीं खटपट केली नाहीं. यांचा व्याप

---

नाहीं. कोणी कजिया करील त्यास श्रीची शपत असे. आगरांत घर बांधोन अग्निहोत्र स्नान संध्या नैवेद्य वैश्वदेव करून ग्रामस्तांस आशीर्वाद देत जाणें. आगराची महामुरी करून सरकाराचा महसूल देऊन तुम्ही आपला कालक्षेप करीत जाणें. आगराची चतुःसीमा येणेंप्रमाणें. पूर्वेस पाखाडी, दक्षिणेस दातार याचा आगर, पश्चिमेस समुद्र, उत्तरेस जोशी वाडी. या चतुःसीमांमधील आगर तुम्हास धर्मपत्र करून दिला असे. हें लिहिले बा॥ सही विसाजी हरी बाम महाजन मौजे मजकूर."

याखालीं आठ साक्षी आहेत.

[ २ ]

"श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
आपाजीपंत स्वामी गोसावी यांस—

सेवक बाळाजी महादेव कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. वेदमूर्ति राजश्री केशवभट कर्वे यास पालखीचे सरंजामास वाण ( बक्षीस ? ) दिंडोरी परगण्यांत पांचशें साशें रुपयांच्या तनख्याचा व नऊशें हजार रुपये हाली वसुलाचा एक गांव नेमून देणें, म्हणून श्रीमंतांची आज्ञा जाहाली त्यावरून मौजे हातनोर प्रां दिंडोरी हा गांव खो मुकासा दरोबस्त भटजीकडे करार करून दिल्हा असे. तरी तेथील दखलगिरी तुह्मी न करणें. खो मुकासा जागीर बाबती सरदेशमुखी कुळबाब कुळकानु करार करून दिल्हा असे. तरी तुह्मी तेथील देखरेख एकंदर न करणें. मौजे मजकूरची जमाबंदी होणें ते सरकारांतून होईल त्याप्रों ऐवज तुह्मास मजुरा * पडेल. छ १४ रबिलाखर सबा शीतैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंति."

* कमी अगर वजा.

फार पसरला होता. शके १६६८ सालीं रघुनाथभटांनीं गुजराथेंत जकाती मक्त्यानें घेतल्या. त्याबद्दल हिशेब सांपडतात. यांनीं व यांच्या दुसऱ्या दोघां भागीदारांनीं दमाजी गायकवाड सेनाखासखेल यांना साडेसहा लाख रुपये कर्जाऊ दिले होते. त्याच्या फेडीसाठीं गायकवाडी राज्यांतल्या मामलती ते आपल्या कारकुनांकडून करवीत. यांचें वैभव दाखविणाऱ्या जुन्या कागदांच्या कांहीं नकला सांपडतात; त्यांवरून हे बऱ्याच वैभवाला चढले असावे, असें दिसतें. शके १६८३ सालीं दत्ताजी लक्ष्मण थाला नागपूर

---

[ ३ ]

" श्री

राजश्री केशवभट कर्वे व रामाजी नाईक दातार
व गणेश महादेव बिवलकर गोसावी यांस—

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो। दमाजी गायकवाड समशेर बहादूर दंडवत विनंति सु।। इहिदे शीतैन मया व अलफ. तुम्हापासून कर्ज घेतले रुपये साडेसहा लाख त्यावर श्रीमंतसाहेब यांची उगवणी आहे. त्याची मुदत आषाढअखेर पावेतों हिशेबासुद्धां रुपये द्यावे असें लिहिलें आहे. त्यास गहाण महाल बितपशील. १ पा। सिनोर १ पा। बडोदें १ पा। वलवाडें १ पा। कोरळ १ कसबे मोतें १ पा। घणदिवी १ पा। राजपिंपळे १ पा। खडके १ पा। कोस १ पा। वर्यांव १ कसबे नवसरी १ पा। टेंभे (!) १ पा। कडोद १ पा। अनारल १ पा। तडकेश्वर १ पा। व्यारें १ पा। अमदाबाद दसकुराई.

एकूण सतरा महाल लिहून दिले असत. सदरहू मुदतीप्रमाणें ऐवज पावता करून देऊं. न देऊं तर सदरहू महालाचा ऐवज वसूल करून घेणें. जाणिजे छ. ५ मोहोरम. मोर्तब."

[ ४ ]

" श्री

हिशेब दमाजी गायकवाड समशेर बहादर सेना खासखेल

प्रांतीं जानोजी भोंसले वगैरे यांजकडील कर्जाचा ऐवज येणें होता, त्याच्या वसुलासाठीं रवाना केलें व वर्षाचें १५०० रुपये वेतन यांना देण्याचा करार केला, याबद्दल उल्लेख आढळतो. शके १६८४ सालीं मुरूड येथील

| रुपये | |
|---|---|
| १५९२९६७॥. | केशवभट कर्वे. |
| १९४७५३ | रामाजी नाईक दातार. |
| ५६५५६९ | गणेश महादेव त्रिवलकर. |
| २३५३२८९॥." | |

एवढाच लेख आहे.

[ ५ ]

" श्री

राजश्री दमाजीबावा गायेकवाड सेनाखासखेल
समशेर बहादुर गोसावी यांसी—

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो अंताजी पर्शराम गोडबोले नेिा केशवभट कर्वे आशीर्वाद विनंती येथील कुशल जाणून स्वकीये कुशल ल्याहावें विशेष. आपली आज्ञा घेऊन आलों ते ज्येष्ठ शुा १० पुणियास क्षेम पावलों. श्रीमंतांची भेट जाली. सर्व वर्तमान निवेदन केलें. आपल्याकडील एकनिष्ठेचा प्रकार निवेदन केला. त्याजवरून फार संतोष जाला. राजश्री कृष्णाजी नाईक बाबा आमचे अगोदर पंधरा रोज आले होते. त्यांणीं आपल्याकडील साकल्प ( साकल्य ? ) वर्तमान निवेदन केलें होतें. त्यावरून श्रीमंतांनींहि उत्तर केलें कीं, दोनही जाबसाल येकच दिसतात. उत्तम आहे. ऐसा जाबसाल जाला. फिरोन एकदोन वेळां येविशींची विनंति केली आहे. आपल्ये आज्ञेप्रमाणें श्रीमंतांची कृपा आपल्यावर पूर्ण होये याच मजकुरांत आहों. मागाहून श्रीमंतांची व बापूंची कृपेचीं पत्रें पाठवून देतों. राजश्री कृष्णजी नाईक बाबा यांची रवानगी श्रीमंतांहीं आपणाकडे केली आहे. त्यांची भेट सत्वरच होईल. ते येथील मजकुर सर्व निवेदन करितील. राजश्री रामचंद्रपंत बाबा विसनगरास आले म्हणून आइकलें त्यांस आपणास विनंति

घरांतील पुतळ्यांची मोजदाद केल्याचा एक कागद सांपडतो, त्यांत १४६३ तोळे वजनाचे एकंदर ५१९२ नग असल्याचें नमूद आहे.

उभयतां बंधूंनीं मुरूड गांवांत वतन संपादन केलें व तेथें एक मोठा चौसोपी वाडा बांधला. या गांवांत त्यांनीं धर्मादायाचीं दोन मोठीं कामें केलीं. पहिलें तलावाचें आणि दुसरें देवळाचें. तलावासाठीं सहा हजार सातशें पन्नास रुपये तेरा आणे मुरुडाला कसकसे पाठविले, याबद्दल यादी सांपडते. हा तलाव गांवापासून एक फर्लांग दूर असून सभोंवतीं तीन

---

हेंच कीं, सर्वांवर कृपा करून सर्व कार्यें सिद्धीस न्यावीं. बोभाट आल्यानें श्रीमंतांची व बापूंची मर्जी खची होईल. याचा सर्व अर्थ कृष्णाजी नाईक बाबा सांगतील तो ध्यानांत आणावा. याचें मानस व आमचें मानस आहे कीं आपलें कल्याण असावें. हा हेत पूर्ण आहे. यानंतर वो रघुनाथभट आपल्ये आशेवरून नडियादेस राहिले आहेस. ते भेटीस येतील तर कृपा करून ऐवजाचा करार जाल्याप्रों त्याची नेमणूक सध्या ऐवज पदरीं पडे तो अर्थ करावा. येथील वाढीचा प्रकार व चौघे सरकती यांचा प्रकार रा कृष्णाजी नाईक बाबा सांगतां कळों येईल. तुम्हांमुळें आम्ही फार श्रमांत आहों. विस्तार कोठवर ल्याहावा ! वरकड सरकारचे सवापांच लक्ष ऐवज आहे येविशीं श्रीमंत रावसाहेबांची मर्जी. कृपा संपादून घेणें त्याअर्थीं हें कार्य आधीं करावें. म्हणजे श्रीमंतांशीं उभयतांहीं भाषण केलें आहे तें प्रमाण पडेल. आपण सर्वन्य ( ज्ञ ) आहेत. विस्तारें ल्याहावें असें नाहीं. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे ही विनंति."

[ ६ ]

"श्री

सेवेसीं अंताजी परशराम गोडबोले कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान ताा आषाढ वाा ३ पाा पुणियासी सुखरूप असो. विशेष. हिकडील वर्तमान तर राा रघुनाथभटाकडून पत्रें येतात. अद्याप कांहीं निकाल जाला नाहीं. दमाजी गायेकवाड याची छावणी अमदाबादेजवळ जाली आहे. राा रामचंद्र ( ! ) व नरहरपंत हे उभयतां कारभारी आहेत. कांहीं कार्य करून देऊं ह्मणून ह्मणतात. परंतु दमाजी बावा हिकडील तर्तें

दे वळें आहेत, व गांवांतील लोकांचीं गोड्या पाण्यावर जाण्याची वाट त्याच्या एका काठानें जाते. गोड्या पाण्याचें ठिकाणहि तेथून जवळच आहे. दापोलीहून मुरूड गांवीं येण्याचा रस्ता या तळयाच्या कांठावरूनच आहे. सारांश, गांवापासून दूर पण जेथें मनुष्याची रहदारी बरीच असते, असें रम्य ठिकाण त्यांनीं तलावासाठीं पसंत केलें. आतां हा तलाव अगदीं मोडकळीला येऊन गाळ सांचून होरून गेला आहे.

यांचें दुसरें धर्मादायाचें काम श्रीदुर्गादेवीचें देवालय होय. त्यासाठीं यांनीं स्वतः पांच हजार रुपये देऊन व दुसऱ्या चौघां ग्रामस्थांकडून प्रत्येकीं पांच हजार देववून पंचवीस हजारांचें देऊळ बांधलें. आमच्या प्रांतांत काळ्या दगडांची खाण अगदीं नाहीं. जिकडेतिकडे भुसभुशीत जांभा दगड आहे. यांनीं फार प्रयासानें कणखर काळा दगड आणविला, आणि चांगले किरिस्तावी कारागीर आणवून घडीव दगडांचें उंच जोतें करून त्यावर देवळाची मजबूत इमारत बांधली. इमारतीसाठीं सागवानी लांकूड फार

---

बुडते पाहतो. आह्मीं सरकारचीं ताकीदपत्रें व बापूंचीं स्वदस्तुरी पत्रें यजमानास व कारभारी यांस हा काळपावेंतों पंचवीस परियेंत पाठविलीं आहेत. परंतु या दरबारांत कांहीं ताल नाहीं. कोणाचें चित्त शुद्ध नाहीं. ही त्यांस बातमी वरचेवर जात्ये, त्यामुळें ठिकाण लागों देत नाहीं. पुढें काय होईल तें पहावें. श्रीमंत छावणीस राहिले. फौज दहा हजार आहे. परंतु दाणा व पैसा नाहीं. हैराण बहुत आहेत. त्यांमध्यें फितुर बहुत आहे. प्रस्तुत दादासाहेब श्रावणअखेर कांहीं फौज घेऊन तिकडे जाणार. महादजी शिंदे दूर करून मानाजी शिंदे करार केले. महादजी गोविंद कारभारी करून दिल्हे. सात लक्ष नजर घेतली. दहा हजार फौजेनिशीं कर्नाटकास जावें ऐसा करार केला. महादजी शिंदे पळोन गेले. वरकड नाना फडणीस नाशिकास गेले. सामलती तेथेंच. (?) मौजे हातनोर येथील मजकूर तर सरंजामी गांव सोडीत नाहींत, इनामी सोडतात. आबाजीपंत व चिंतो विठल प्रेत्नांत आहेत. बापूंचीं पत्रें दादांस आणलीं होतीं परंतु सोडीत नाहींत. आह्मी तेथें गेल्यावर जो मजकूर होईल तो लिहून पाठवूं. आह्मी हुंडी महादजी पंतावर पंचवीस हजाराची केली होती ती फिरली............बहुत, काय लिहिणें ही विनंति.”

उत्तम आणविलें, आणि जाड गोल खांब घेऊन त्यांवर उत्तम कारागिराकडून नामी नक्षी खोदविली. इतक्या किंमतीचें व इतक्या कलाकुसरीचें देऊळ या प्रांतांत दुसरीकडे नाहीं.*

या ठिकाणीं या देवळाचें थोडेंसें वर्णन देणें अप्रासंगिक होणार नाहीं. हें पूर्वाभिमुख असून याची लांबी ६७॥ फूट व रुंदी २९॥ फूट आहे. जोतें घट्ट माठीव दगडाचें ५ फूट उंच आहे. सभामंडप २९॥ फूट लांब व

---

[ ७ ]

" श्री

यादी निसबत दमाजी गायकवाड. नेमणूक पाणिपताहून आली. शके १६८२ उगवणीच्या ऐवजास माहाल बा। पत्र.

ऐन रु.

| | | | |
|---|---|---|---|
| पा। सिनोर | ११५००० | पा। अनावल | ४००० |
| पा। घणदिवी | ८१००० | कसबे मोते | १३००० |
| कसबे नर(व)सरी | २१००० | पा। वर्याव | १५००० |
| पा। बडोदें | ४५८००० | पा। तडकेश्वर | ५००० |
| पा। राजपिंपळे | ३१००० | पा। व्यारें | १८००० |
| पा। टेंभे | ४९००० | अमदाबाद दसकुरई | २७००० |
| पा। कोरळ | ४०००० | | ९२५००० |
| पा। वलवाडें | १८००० | | |
| पा। खडकें | १२००० | | |
| पा। कडोद | १४००० | | |
| पा। कोस | ४००० | | |

उगवणीशिवाय सरकारचे आज्ञेवरून ऐवज दिल्हा त्यास महाल..."

पुढील कागद फाटून गेला आहे.

* हें देवालय बांधून झाल्यानंतर श्रीदुर्गेच्या पुनःप्रतिष्ठेच्या वेळच्या एका जुन्या लेखाची नक्कल सांपडली आहे, ती येथें देण्यासारखी आहे. पुनःप्रतिष्ठा म्हणण्याचें कारण ग्रामरचनेच्या वेळींच श्रीदुर्गेचें देऊळ सिद्धपुरुषांनीं स्थापिलें, त्या देवालयाचा हा जीर्णोद्धार होय:—

तितकाच रुंद असा चौरस घेतला आहे. हा तीन बाजूला उघडा असून सभोंवती भिंतींच्याऐवजीं कांतीव गज घालून सुबक केलेला दीड फूट उंचीचा कठडा आहे. त्याच्या मागच्या भागांत १२॥ फूट लांब व ११। फूट रुंद गाभारा आहे, व तीन बाजूंना ५॥ फूट रुंदीची प्रदक्षिणेसाठीं वाट ठेविली आहे. मागच्या भागाला चारी बाजूनीं भिंती आहेत. गाभाऱ्याच्या पुढें व सभामंडपाच्या मागें प्रशस्त जागा ठेविली आहे. कीर्तनाच्या व पुराणाच्या वेळीं पुरुष मंडळी सभामंडपांत बसते, व स्त्रिया या भागांत बसतात. सभामंडपांत उत्तम खोदीव व नक्षीचे वीस खांब सारख्या अंतरावर चार रांगांनीं बसविले आहेत. बाजूच्या दोन रांगांचे खांब वेढीला किंचित् कमी आहेत. खांबांची उभारणी येणेंप्रमाणें केली आहेः—खालीं पावणेदोन फूट लांब व तितकेच रुंद आणि एक फूट दोन इंच उंच असें उत्कृष्ट काळ्या दगडाचें उथळें दिलें आहे. हें बुडाशीं चौकोनी व पुढें

---

" श्रीमाता

स्वस्तिश्री शके १६८५ सुभानुनामसंवत्सरे भाद्रपद शुद्ध प्रतिपदेस श्रींचें देवालय सिद्ध होऊन स्थापना करावयासी मुहूर्त पाहिला, आणि श्रींचे पुनः-प्रतिष्ठेचा संकल्प माध्यानकाळीं आपाभट दातार यांजकडून केला. त्याजवर आचार्यवर्णाचे ( आचार्य—वरण ? ) समयीं त्र्यंबकभट वैशंपायन यांनीं त्याचें व आपलें प्रवर म्हणविलें. तेव्हां सुपारी देऊं लागले ते समयीं काणे यांनीं आचार्यवर्णाचा आक्षेप केला. तेव्हां समस्त ग्रामस्त श्रींचे देवालयांत मिळाले होते त्यांमध्यें विश्वनाथ जोशी व कृष्ण जोशी व केशवभट अग्नि-होत्री कर्वे वर्तक यांहीं आपाभट दातार यांसी सांगितलें कीं, तुम्ही आपलें पूर्वे स्मरोन वडिलार्जित देत आलेत त्यास द्यावें. त्याजवर ते दोन घटका उगेच राहिले. मग आपाभट बोलिले कीं त्यांनींच आपले सत्योत्तरें ज्याचें पूर्वार्जित असेल त्यानें सत्योत्तरें घ्यावें. त्याजवर तेच विश्वनाथ जोशी व कृष्ण जोशी व केशवभट कर्वे अग्निहोत्री व ग्रामस्त काणे यास बोलिले कीं, तुमचें पूर्वार्जित सत्योत्तरें असेल तरी तुम्ही घ्यावें. त्यास काणे बोलिले कीं, तुम्ही पांचांहीं सांगितलें तरी मी घेईन, सत्योत्तरें माझ्यानें घेववत नाहीं. त्याजवर वैशंपायन बोलिले कीं, काणे आपले सत्योत्तरें घेत असेल तरी आम्ही नको म्हणत नाहीं. त्याणें आपलें सत्योत्तरें घ्यावें. परंतु

प्रमाणबद्ध कमानदार घडून शेंड्याजवळ जेथें खांब टेंकावयाचा तेथील पृष्ठभाग बरोबर वर्तुलाकार घेतला आहे. अशा उथळ्यांवर पांच फूट चार इंच उंचीचे गोल खांब दिले आहेत. संबंध उंचीच्या अर्धबोट जाडीच्या अंगच्या उभ्या कडा ठेवून खांबाच्या पृष्ठभागाचे सारखे बारा भाग केले आहेत. प्रत्येक भागांत खालपासून वरपर्यंत वेलबुट्टीची नक्षी खोदली आहे. खांबाच्या शेंड्यावर नक्षीदार आठ इंच जाडीचें चौकोनी लांकडी उथळें दिलें आहे, आणि उथळ्यावर पाऊण फूट जाडीचे एकमेकांशीं काटकोन करणारे नक्षीदार दोन ठोकळे एकांत एक बसविले आहेत, व त्यांवर साडेतीन इंच जाडीची लग व साडेआठ इंच जाडीची तुळई मिळून एक फूट जाडीचीं रोखीव लांकडें दिलीं आहेत व तुळईवर कडीपाट आहे. तुळईची रुंदी १३ इंच आहे. गोल खांबाची वेढ खालपासून वरपर्यंत सारखी साडेतीन फूट आहे. गाभाऱ्याच्या पुढील प्रशस्त जागेंत डाव्या बाजूला दोन व उजव्या बाजूला दोन, असे चार गोल खांब सभामंडपांतील खांबांपेक्षांहि

---

त्याच्यानें घेववलें नाहीं. ऐसा वाद होत असतां संध्याकाळ झाला. मग शंकर दीक्षित वैशंपायन उपाध्ये धर्माधिकारी व नारो हरि वर्तक व विश्वनाथ जोशी व कर्वे केशव भट अग्निहोत्री वर्तक व आपाभट दातार ( यांनीं प्रत्येकीं पांच हजार रुपये दिलेले होते ) या पांचांनीं निश्चय केला कीं, यांचा कजिया ( कज्जा ) होतो परंतु आपण तीन वर्षें श्रम केला त्याचें सार्थक केलें पाहिजे. म्हणून पांचाजणांनीं संध्या करून यावें आणखी पांचजणांनीं अनुष्ठान करावें असा निश्चय करून संध्येस घरोघर गेले. संध्या करून आल्यानंतर हरभट दातार ग्रामस्तांस पुसों लागले कीं, तुम्ही काय तें सांगा. त्याजवर ग्रामस्त बोलिले कीं, तुम्हांस ठाऊक आहे. तुम्ही ज्याचें वडिलोपार्जित सिद्धपुरुषापासून असेल त्यास द्यावें. त्याजवर हरभट दातार बोलिले कीं आम्हांस वृद्धि क्षय आला तरी वैशंपायन अधिकारी. त्याजवर ग्रामस्त बोलिले कीं वैशंपायन यास द्यावें. त्याजवर आपाभट दातार त्रिंबकभट वैशंपायन याचे हातीं सुपारी देऊं लागले तेव्हां काणे यांनीं गाई ब्राह्मणांची शपत घातली. मग कोणी एकहि गोष्ट बोलेना. म्हणोन शंकर दीक्षित बोलिले कीं, तुम्ही असके ( सगळे ) ग्रामस्त असोन निकालाची

मोठे आहेत. या खांबांच्या उथळ्याचें बूड दोन फूट लांब, तितकेंच रुंद व एक फूट दोन इंच उंच आहे. या खांबांची वेढ चार फूट सात इंच आहे. या चार खांबांवरील नक्षी अधिक कलाकुसरीची असून तींत दशावतारांचीं व इतर देवतांचीं आणि सर्प, पोपट, हत्ती, वाघ, सिंह वगैरे प्राण्यांचीं सुबक चित्रें कोरलीं आहेत. या खांबांपुढें कांहीं वेळ उभें राहून कारागिराच्या कसबाचें खरोखरच कौतुक करीत बसावें, असें वाटतें. सभामंडपाच्या बाहेरच्या बाजूला पोर्तुगीज देवळांत असतात तशा प्रकारची एक मोठी घंटा टांगली आहे. या घंटेवर "Omnes gentes Laudate Dominum" असा ल्याटिन भाषेंत लेख आहे. त्याचा अर्थ सर्व लोकांनीं (राष्ट्रांनीं) प्रभूची स्तुति करावी, असा आहे. ही घंटा पूर्वी कोणत्या देवळांत होती, व तेथून ही श्रीदुर्गेच्या देवळांत केव्हां व कशी आली हें कळत नाहीं. परंतु हें देऊळ बांधलें तेव्हांच ती आणली असावी. या घंटेची उंची एक फूट अकरा इंच व वरील केळ्याची उंची सात इंच मिळून एकंदर उंची अडीच फूट आहे. जाडी सव्वादोन इंच आहे. घेर शेंड्याजवळ सव्वातीन फूट, मध्यें पावणेचार फूट व बुडाशीं साडेसहा फूट आहे.

---

(गोष्ट) बोलाना. दातारांनीं निश्चय सांगितला असतां काणा आण घालितो. रात्र फार झाली. अनुष्ठान रहातें. याजकरितां केशवभट कर्वे अग्निहोत्री दीक्षितांजवळ येऊन बोलिले कीं, पांचाजणांनीं आम्ही जीर्णोद्धार केला. पांचजण आम्ही यजमानकृत्य करून अनुष्ठान सिद्धीस नेऊं असा निश्चय केला. तेव्हां वैशंपायन बोलिले कीं, आमचा निर्णय जाहल्यावांचून अनुष्ठानास प्रारंभ करूं देणार नाहीं. असें बोलिले असतां तें कोणी मान्य न करितां अनुष्ठानास प्रारंभ केला. जीर्णोद्धाराचें अनुष्ठान आपाभट दातार यांहीं केलें. शंकर दीक्षित यांहीं श्रीची पुनः प्रतिष्ठा व नूतन पिंडिकेची प्रतिष्ठा केली. लक्ष होम नारो हरि यांनीं केला, आणि प्रासाद—वास्तु-ग्रहमख केशवभट कर्वे व महादेव जोशी यांहीं केलें. असें अनुष्ठान पांचांहीं केलें. याप्रमाणें हकीकत झाली. सर्व बोलिले कीं, ही गोष्ट दुराभिमान केलात. परंतु बरें केलेंत नाहीं. येणेंप्रमाणें हकीकत."

याखालीं ५६ लोकांच्या साक्षी आहेत. दीडशें वर्षांपूर्वीचे तंटे व गांवक्या यांची थोडीशी कल्पना वरील लेखावरून होईल!

केशवभट व रघुनाथभट यांच्या औदार्यानें आणि धार्मिकपणानें मुरूडच्या ग्रामस्थांवर त्यांचें चांगलें वजन बसलें. मुरूड गांवांतील अष्टमानकऱ्यांपैकीं धारप यांचा निर्वंश होण्याची वेळ आली, तेव्हां त्यांच्या वंशांतली एक वृद्ध बाई हयात होती. सिद्धपुरुषांनीं मानाचें म्हणून जें ठिकाण धारप वंशाला दिलें होतें त्या ठिकाणांतल्याच घरांत ती रहात होती. तिजकडून हें ठिकाण उभयतां बंधूंनीं विकत घेतलें, आणि ग्रामस्थांनीं धारपांच्या वंशाचा मान कर्वे यांच्या वंशाला दिला, व कर्वे यांना ते अष्टमानकऱ्यांपैकीं समजूं लागले. सरकारानेंही ही गोष्ट कबूल केली, व धारपांच्या वंशाकडे असलेलें दहा रुपयांचें वर्षासन (याला खटपटें म्हणत) कर्वे यांच्या वंशाकडे सुरू केलें, आणि धारपांच्या वंशाचा 'वर्तक' हा किताब कर्वे यांच्या वंशाला मिळाला.

मुरूडच्या श्री दुर्गेच्या देवालयासाठीं ज्या प्रकारचा उत्कृष्ट काळा दगड आणला होता, त्याच घडीव काळ्या दगडाचें जोतें धारपांकडून घेतलेल्या मानाच्या ठिकाणांत यांनीं बांधून ठेविलें होतें; त्यावर चांगलें घर बांधण्याचा यांचा विचार असावा, पण तो तडीला गेला नाहीं. शके १६८९ सालीं केशवभटजींनीं काशीयात्रा केली, तेव्हां एक हजार रुपये खर्चासाठीं बरोबर घेतले व साडेचार हजारांच्या हुंड्या काशींत पटतील अशा घेतल्या. त्यांना हुंडणावळ शेंकडा नऊ रुपयेप्रमाणें ४०५ रुपये पडली, याबद्दल जुन्या कागदांत उल्लेख सांपडतो. हे उभयतां बंधु विभक्त न होतां राहिले, व एका वर्षाच्या अंतरानें, आधीं वडील मागून धाकटे, असे शके १६९६ व १६९७ या वर्षी वारले.*

श्रीमंतांचे उपाध्ये कर्वे होते, त्यांशीं केशवभटजींचा जवळचाच संबंध असावा; पण तो कोणता याचा शोध लागला नाहीं. केशवभट व रघुनाथभट यांच्या कुटुंबांतील मंडळीचाहि श्रीमंतांच्या कुटुंबांतील मंडळीशीं परिचय होता, व तो पुढील पिढींतहि तसाच राहिला, असें दिसतें. यांचा रहाण्याचा खासगत वाडा श्रीमंतांच्या वाड्यापासून शंभर पावलांच्या अंतरावर म्हणजे शनिवारवाड्यासमोर नदीकडे गल्ली जाते,

---

*केशवभटजींविषयीं सरकारी अधिकाऱ्यांमध्यें पूज्यबुद्धि किती होती, हें पुढील पत्रावरून व्यक्त होईल.

तींत पश्चिमाभिमुख आहे, त्यांत ते रहात असत. केशवभटजींनां औरस संतति नव्हती. त्यांनीं रघुनाथभटांचे मधले चिरंजीव नारोपंत दत्तक घेतले. नारोपंतांनींहि चिंतु नांवाच्या मुलाला दत्तक घेतलें. दुसरे बाजीराव व चिमाजी आप्पा जेव्हां पुणें सोडून गेले, तेव्हां चिमाजी अप्पांनीं या दहा वर्षांच्या लहान मुलाला आपल्याबरोबर काशीस नेलें. इकडे कर्व्यांचा वाडा गहाणदारच बळकावून बसले होते. पुढें या चिंतोपंतांचे दोघे चिरंजीव वे. रामभट व गणेशभट कर्वे हे काशीहून पुण्याला आले, आणि त्यांनीं कोर्टांत फिर्यादी करून तीनचतुर्थांश वाडा सुमारें चाळीस वर्षांपूर्वीं आपल्या हवालीं करून घेतला. या वाड्यांत वर उल्लेख केलेले वे. गणेशभटजी कर्वे हे विद्वान वैदिक रहात होते, व आपल्या घराण्याची परंपरा चालवीत होते, ते गेल्या जुलै महिन्यांत स्वर्गवासी झाले आणि त्यांचा

" अज * स्वारी राजश्री मोरो बापूजी सुभेदार तालुके सुवर्णदुर्ग ता। कारभारी कसबे मुरूड तर्फ पंचनदी सु॥ खमस सबैन मयाव अल्लफ. वा। केशवभट कर्वे यांस देवआज्ञा झाली. त्यांची क्रिया जाली पाहिजे. ऋग्वेदी यांकडील उपाध्यपण वैशंपायन यांकडे अमानत सरकारांतोन आहे त्यास वैशंपायन आपोदभ ( आपस्तंभ ), कर्वे ऋग्वेदी. त्यांत अग्निहोत्री. यांची क्रिया यथास्थित जाली पाहिजे. याजकरितां तुम्हास आज्ञा केली असे. तर वो राजश्री लक्षुमण जोशी कोळथरकर याकडून क्रिया चालवावी. लक्षुमण जोशी न चालवील तर काणे. याशिवाय ब्राह्मणाकडून चालवावी. ऋग्वेदी ब्राह्मणाकडून चालवावी. सारांश क्रियेची खोटी न होय तें करणें. जाणिजे. छ १२ रा॥ ॥

मोर्तब
सुद.

* फारशींत 'अज' म्हणजे 'पासून'.

एकटाच मुलगा त्यांचे आधीं कांहीं महिने हा लोक सोडून गेला होता. आतां यांचें कोणी मागें राहिलें नाहीं.

रघुनाथभटजींचे ज्येष्ठ चिरंजीव दाजीबा यांना संतान नव्हतें. कनिष्ठ चिरंजीव आमचे आजे बापूनाना हे मुरुडास रहात असत. वर सांगितलेल्या रहात्या वाड्याखेरीज यांचे आणखी तीन वाडे पुण्यांत होते. एक शनवारवाड्यासमोरील पाराजवळ, दुसरा मंगळवार पेठेंत व तिसरा वेताळ पेठेंत. या वाड्यांच्या भाड्याचा वसूल करण्यासाठीं बापूनाना मधूनमधून पुण्याला येत. शके १७५३ पर्यंत भाडें वसूल केल्याबद्दलचीं टिपणें आढळतात. पुढें हे वाडे माझ्या चुलत्यांनीं विकून टाकले, कीं, भाडेकऱ्यांच्याच मालकीचे बनले, हें कांही कळत नाहीं.

बापूनाना निरुपद्रवी गृहस्थ होते. यांच्या अंगीं कर्तबगारी अगदीं नव्हती. हे पूर्वीच्या संपत्तीवर वैभवानें राहिले. हे स्वभावाने गोड असून कोणाचें मन दुखविणारे नव्हते. यांचे मुलगे सखाराम, केशव, व बल्लाळ असे तीन. सखारामपंत पुष्कळ वर्षें मुरुडास राहिले; पण ज्या ठिकाणीं फुलें वेंचलीं त्याच ठिकाणीं गोंवऱ्या वेंचण्याची पाळी आली, तेव्हां ते मुरूड गांवांत त्यांचें जें कांहीं शिल्लक राहिलें होतें तें विकून टाकून पनवेलीजवळ तुराडें गांवीं येऊन राहिले. बल्लाळांचे चिरंजीव गंगाधरपंत यांचा थोडासा उल्लेख पुढें येईल. मधले केसोपंत हे माझे वडील. यांचें चरित्र पुढील प्रकरणांत दिलें आहे.

# प्रकरण चवथें

## मातापितरें

सुवृत्त व उद्यमशील मातापितरांच्या पोटीं जन्माला येणें, यासारखें दुसरें भाग्य नाहीं! हें भाग्य मला पूर्वपुण्याईनें लाधलें, या विचारानें पुष्कळ वेळां माझें मन आनंदानें अगदीं भरून जातें. माझ्या आईचा जन्म शके १७४६ त झाला. लहानपणीं हिचें राहणें शेरवली गांवीं होतें. पुढें लग्न झाल्यानंतर ती आपल्या सासरीं म्हणजे मुरुड गांवीं राहूं लागली. माझे वडील केसोपंत यांचा जन्म ज्येष्ठ शुद्ध १३ शके १७४२ त मुरुड गांवीं झाला. यांचा विद्याभ्यास मुरूड येथील मराठी शाळेंतच झाला. हे हुषार विद्यार्थ्यांपैकीं एक होते. यांना मी 'बाबा' म्हणत असें. बाबा ११।१२ वर्षांचे असतांना त्यांचे वडील वारले. वडील वारल्यानंतर एका वर्षानेंच यांचें लग्न झालें त्यावेळीं आई सात वर्षांची होती. पूर्वीच्या वैभवाची थोडी झुळूक यांना लागली होती. पूर्वीच्या चौसोपी वाड्यांत हे लहानपणीं रहात होते, व यांच्या हातांत सोन्याचीं कडीं घातलेलीं होतीं. हा मागील वैभवाचा अवशेष होता, तो लवकरच लयाला गेला! आजोबा वारल्यावर माझे चुलते सखारामपंत हे संसार पाहूं लागले. बाबांपेक्षां सखारामपंत दहा बारा वर्षांनीं मोठे होते. बापूनानांबरोबर पुण्यांतील वाड्यांचें भाडें वसूल करण्याकरितां हे एकदां पुण्याला आले होते. हेहि कर्तबगार नव्हते. वडिलांच्या मागें यांनींहि होतें नव्हतें तें मोडून संसार चालविला. पुढें जेव्हां कर्ज केल्यावांचून संसार चालविणें अशक्य झालें, तेव्हां हे तिघे बंधु विभक्त झाले. प्रत्येकाच्या वांटणीला सुमारें पंचवीसतीस रुपये वार्षिक निव्वळ उत्पन्नाची जमीन, पांचपंचवीस रुपये किंमतीचीं भांडींकुंडीं, बायकोच्या अंगावरचें किडूकमिडूक, कीं, जें विकावयाला गेलें असतां पांचपंचवीस रुपयेहि हातीं लागावयाचे नाहींत, व १०५ रुपये लोकांचें देणें, याप्रमाणें इस्टेट आली. आपणांला गरीबी आली ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन जर बापूनानांनीं अगर सखारामपंतांनीं पसारा आवरून छाटछूट संसार केला असता, तर अशी स्थिति आली नसती. पण तिघे बंधु विभक्त होतपर्यंत गुरांढोरांचा वगैरे पसारा कायम ठेवून जुनें असेल नसेल तें विकून व्यवहार चालविला होता.

जमिनी मात्र थोड्याच होत्या त्या कायम होत्या. त्याहि अखेर आप
वांटणीच्या विकून टाकून सखारामपंत जे एकदां गांव सोडून गेले ते पु
त्या गांवीं कधीं परत आले नाहींत.

सखारामपंतांचा अव्यवस्थितपणा बाबांना कळून चुकला होता. मुरुड
राहून आपला निभाव लागणार नाहीं, हें ते पूर्ण जाणून होते. मर
शाळेतील शिक्षण पुरें झाल्यावर पुढें विद्याभ्यास चालविण्याला मार्ग नव्ह
तेव्हां मोठी हांव न धरतां आपल्या पायांवर उभें रहाण्याचा यांनीं नि
केला. मुरूड गांवांत बर्वे उपनांवाचे एक सुखवस्तु गृहस्थ होते, त्यां
शेरवलीपासून दोन कोसांवर कोरेगांव नांवाचा खोतीचा गांव होता.
गांवांत राहून तेथील वसुलबाकी करण्यासाठीं बर्वे यांना कारकून पा
होता. हें काम माझ्या बाबांनीं पतकरलें. अवशेष राहिलेल्या श्रीमंती
अनुभव लहानपणीं घेतलेला, आणि मुरुडासारख्या ठिकाणीं वयाचीं ए
णीस वर्षे काढलेलीं, अशा स्थितींत कुग्रामवास पतकरणें बाबांना वि
असह्य झालें असेल, ते त्यांचें त्यांनाच ठाऊक! परंतु दैवगति लक्ष
घेऊन मन घट्ट करून ते एकदम कोरेगांवला जाऊन आपलें काम
लागले. यांना जेऊनखाऊन वर्षाचा पगार पंचवीस रुपये होता. हे तेथें
तेव्हां त्यांना विसावेंच वर्ष होतें. जातांना सखारामपंतांना विनयपूर्वक त्य
एवढेंच सुचविलें कीं कर्जाचा बोजा न वाढवितां तुम्हांला जें काय करा
करा. पुढें चार वर्षांनीं म्हणजे शके १७६५ सालीं त्रिवर्गबंधूंचें वांटपप
झालें व शके १७६७ त त्यावर मान्यतेच्या सह्यासाक्षी झाल्या. या पत्र
"तीन पुतळ्या तिऱ्हाइताच्या आहेत, त्या ज्याच्या त्यास हिसेरशीप्र
त्रिवर्गांनीं द्याव्या," असें वाक्य आहे. ज्या वास्तूंत शके १६८४ स
आजोबांनीं पुतळ्यांची मोजदाद करावी तेव्हां ५१९२ पुतळ्या निघा
त्याच वास्तूंत रहाणाऱ्या त्यांच्या तीन नातवांनीं शके १७६५त पुतळ्य
मोजदाद करावी, तेव्हां तिघांच्या बायकांच्या अंगावर जें खिळ्कमि
होतें त्यांतल्या तीन पुतळ्या लोकांच्या उसन्या आणलेल्या आहेत
निदर्शनाला यावें, या गोष्टींत केवढें अजब तात्पर्य आहे!

कर्व्यांचा वाडा आणि बाहेरचा डामडौल पाहून असल्या घरा
आपली मुलगी पडते, याबद्दल माझ्या आजोळच्या आजोबांना व आज

किती तरी आनंद झाला असेल, व नसतें वैभव दाखविण्यासाठीं आयत्या वेळीं कोणाकडून तरी दागिने आणून ते जेव्हां लग्नांत आईच्या अंगावर घातले असतील, तेव्हां तिला किती डौल वाटला असेल! पण हें सर्व उसनें वैभव असून आपल्या गळ्यांत राहिलेली एक पुतळी आहे ती देखील लोकांची, असें पुढें कळल्यानंतर तिच्या व तिच्या आईबापांच्या मनाची स्थिति काय झाली असेल! परंतु तीं सत्त्वगुणी सालस माणसें असल्यामुळें त्यांनीं एका शब्दानेंहि कोणाला दुखविलें नाहीं.

बाबांचा स्वभाव अतिशय शांत. त्यांना राग म्हणून कसा तो यावयाचाच नाहीं. आईचा स्वभाव किंचित् रागीट असे; परंतु तिचा राग दुसऱ्याला फारसा कळावयाचाहि नाहीं, व त्यापासून कोणाला बिलकूल त्रास व्हावयाचा नाहीं. आपणाला गरिबी आली आहे हें उभयतांनीं जाणलें, पण कोणावर न चरफडतां तीं शांतपणें तिच्याशीं झगडत राहिलीं, व अखेरीला त्यांनीं तिला जिंकलें! कांहीं झालें तरी कर्ज काढावयाचें नाहीं, असा त्यांनीं निश्चय करून तो तडीलाहि नेला. कोरेगांव व शेरवली हे गांव दोन कोसांच्या अंतरावरच असल्यामुळें आईबाबांची मोठी सोय झाली होती. शेरवलीचें घर नेहमीं पंघरावीस माणसांनीं गजबजलेलें असावयाचें. तेथें दूधदुभत्याला व अन्नाला तोटा नव्हता. पहिल्यापहिल्यानें बाबा कोरेगांवीं एकटेच रहात, व आईला शेरवलीला ठेवीत. हेतु हा, कीं, कांहीं पैसे जमवावे व आपल्या वांट्याला आलेलें मुरूडचें कर्ज फेडावें. कोरेगांवाला एकटे राहिले म्हणजे बाबांना आपल्या हातांनीं स्वयंपाक करावा लागे, व कधींकधीं यजमान आले तर त्यांनाहि करून घालावा लागे. परंतु तें त्यांनीं खुषीनें पतकरलें. आई कोठेंहि राहिली, तरी ती सर्वांना हवीशीच वाटे. पडेल तें काम करण्याला ती नेहमीं तयार असे. व कोणी कोणाविषयीं कांहीं बोललें तरी पोटांत ठेवी. लावालावीचा प्रकार ती कधीं करीत नसे, यामुळें ती सर्वांना प्रिय झाली. शिल्लक पैसे उरतील ते बाबांनीं तेथच्या तेथेंच कुळांकडे व्याजीं लावावे. खोतीच्या वसूलबाकीचें काम करतांना कोणतीं कुळें चांगलीं व कोणतीं वाईट, हें त्यांना माहीत झालेलें होतें. व्याज कमी मिळालें तरी तरत्या कुळांकडे पैसे ठेवावे

हें त्यांचें तत्त्व असे. पहिलीं पंधरा वीस वर्षें आईबाबांनीं फार काटकस केली, पण पुढें तीं सुखी झालीं. संसार वाढल्यावर मग पुढें तितव काटकसर करतां यावयाची नाहीं, हें तीं जाणून होतीं. त्यांच एकामागून एक पहिलीं तीन मुलें वारल्यामुळें हीं दुःखी असत. पु आम्ही तीन भावंडें मोठीं झालों, तेव्हां तें दुःख तीं विसरलीं.

बाबा हरकसबी गृहस्थ होते. काथ्याच्या पिळवा काढून त्याचें सुं तयार करणें व त्याचीं गुरांचीं दावीं, रहाटाच्या माळा वगैरे वळणें यांत ते चांगले वाकबगार होते. यांना चित्रें काढण्याचीहि हौस असे हे पागोटीं चांगलीं बांधीत. मुंबईला जाऊन पगडबंदाचा धंदा कराव असेंहि एकदां यांच्या मनांत आलें होतें; पण तें त्यांनीं केलें नाहीं बाबा मुरुडाला आले म्हणजे लोकांचीं पागोटीं बांधून देण्याचें त्यांन एक मोठें काम असे. ते पागोट्याबद्दल कधीं कोणाकडून पैसे घेत नस व नकाराचें उत्तर देऊन ते कधीं कोणाचें मन दुखवीत नसत. त्या वेळ हल्लींच्यासारख्या मुलांनीं टोप्या घालण्याचा प्रघात नव्हता. आठदहा वर्षां मुलगेसुद्धां लग्नामुंजींना पागोटीं घालून जात. लहान मुलगे बाबांक पागोटीं घेऊन यावयाचे, तेव्हां त्यांशीं गोड बोलून त्यांना तीं त्यांन बांधून द्यावयाचीं. त्यांच्या कामांत अंगचोरपणा बिलकूल नसे. कोणतेंहि काम ते मनापासून चांगलें करीत. आई आणि बाबा यांना कामाच्य आणि काटकसरीच्या उत्तम संवयी लागल्यामुळें यांचा सर्व जन्म सुखांत गेला. माझे वडील बंधू दादा आणि मी यांना शाळेंत घालणें जेव्हां भाग पडलें, तेव्हां मुरूडचें वडिलोपार्जित जुनें घर मोडून पार नाहींसें झालें होतें; म्हणून त्यांनीं चारशें रुपये खर्चून मुरुडाला आपल्या ठिकाणांत नवीन घर बांधलें व त्यांत आईला व आम्हां तिघां भावंडांना आणून ठेविलें. हेतु हा, कीं, आमच्या शिक्षणाची हयगय होऊं नये. दरसाल पंचवीस रुपये वेतन आणि मुरूडच्या जमिनीचें वगैरे सालीना वीसपंचवीस रुपयांचें उत्पन्न एवढ्या प्राप्तींतून घर बांधण्याला चारशें रुपये शिल्लक टाकणाऱ्या गृहस्थाचें धोरण आणि दूरदर्शीपणा हीं किती असलीं पाहिजेत, हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. याशिवाय आई आणि आम्ही मुलें यांच्या पोषणाची जबाबदारी त्यांच्यावर होती. कुग्रामांत दूधदुभतें वगैरे पुष्कळ

आणि धान्याची स्वस्ताई, यामुळें कुटुंबपोषणाचें काम फारसें अवघड नव्हतें. पण मुरुडासारख्या गांवांत कुटुंब पोसणें सुलभ नव्हतें. आम्हांला मुरुडाला ठेविल्यापासून पुनः आई व बाबा यांच्या कष्टांना सुरुवात झाली. बाबांनीं कोरेगांवाला रहावयाचें व नेहमीं चुलीची आराधना करावयाची, आणि आईनें घरीं सर्व प्रकारचें काम करून आम्हांला कांहीं कमी पडूं द्यावयाचें नाहीं. कधीं आठ दिवस, कधीं चार चार दिवस, असे बाबा वर्षांतून महिना दीडमहिना मुरुडास रहात. तेव्हां काय कमी-अधिक असेल तें पाहून त्याची तरतूद करून जात. निर्वाहाला लागणारें भात व सर्व प्रकारचीं कडधान्यें याची व्यवस्था बाबांनीं कोरेगांवीं करून ठेविली होती. कोरेगांव हा गांव खाडीकाठीं असल्यामुळें फार सोयीचा आहे. येथें मचव्यांत जिन्नस भरून चिपळुणावरून दाभोळ खाडींतून मचवा समुद्रांत नेतां येत असे व घरापासून पाव मैलावर आणून लावतां येत असे. मुरूड गांवच्या पश्चिमेला समुद्र आहे; पण पाणी उथळ असून डोंगरांचा आडोसा नसल्यामुळें गलबतें लावण्याला सोयीचें बंदर नाहीं. मुरुडाच्या उत्तरेला जी खाडी आहे, ती दोनशें वर्षांपूर्वीं बरीच खोल असून तींत बरींच दूरपर्यंत गलबतें जात असत. त्या वेळीं मुरुडांतील कांहीं लोकांचीं घरचीं गलबतें होतीं; परंतु मुंबईच्या दक्षिणेकडील इतर खाड्या वाळूनें ज्याप्रमाणें भरून जात आहेत त्याप्रमाणें ही खाडी देखील अगदीं होरून गेली आहे. माझ्या लहानपणीं या खाडीवर एकदोन होड्या ठेवलेल्या असत, आतां या खाडींत होडी चालण्यासारखें ठिकाणच नाहींसें झालें आहे. खाडींत मचवे जाण्याचें बंद झाल्याला शंभर वर्षें झालीं असावीं यानंतर विशेष कारणानें कोणाला मुरूड गांवीं मचवा नेणें झाल्यास भरतीच्या वेळीं समुद्राच्या किनाऱ्यापासून फार दूर नाहीं अशा उथळ पाण्यांत तो नांगरावा लागे. मग ओहोटीच्या वेळीं खालचें वाळवंट बहुतेक उघडें पडलें म्हणजे माल उतरून घ्यावयाचा, व पुनः भरती आली म्हणजे मचवा हाकारावयाचा, असें करावें लागे. हल्लीं अशा रीतीनेंहि फारसे कोणी मुरुडास मचवे नेत नाहींत. त्या वेळीं बऱ्याच्या कुटुंबाला लागणारें भात, कडधान्यें वगैरे कोरेगांवाला भरून, व गूळ मिरची वगैरे वर्षाच्या पुरवठ्याचे जिन्नस चिपळुणाला भरून, दरसाल एक मचवा मुरु-

डाला येत असे, तेव्हां वर्षाच्या बेगमीचे बहुतेक जिन्नस बाबा एकदम भरून टाकीत. फक्त दूधदुभत्याची मात्र मोठी अडचण पडे. तिकडला एक शेर म्हणजे पुण्याच्या अर्धाशेर दुधांत आईला कांहीं वर्षें आम्हां सर्वांचें भागवावें लागलें. बव्योंकडून किंवा दुसऱ्या कोणाकडून ताक आणावें आणि त्यावर निर्वाह करावा, असें पुष्कळ वर्षें चाललें होतें. पुढें आम्ही घरीं गाय बाळगूं लागलों व त्यापुढें म्हैस बाळगण्याचीहि ऐपत आली. कुटुंबाला लागणारे तांदूळ एकटी आई दुसऱ्या कोणाची मदत न घेतां भात कांडून तयार करी. आईला आम्हां तिघांचेंच काम पडे असें नाहीं, तर आमच्या आंधळ्या आजीचेंहि सर्व तिला करावें लागे. बाबा कोरेगांवीं होते तोंपर्यंत आजी माझ्या धाकट्या चुलत्याच्या घरीं रहात असे; परंतु बाबांनीं मुरुडाला घर केल्यावर त्यांनीं तिला घरीं आणलें. त्रिवर्गबंधु विभक्त झाले, तेव्हां त्यांनीं आजीच्या निर्वाहासाठीं सालीना बारा मण भाताच्या उत्पन्नाचीं शेतें वेगळीं काढून ठेविलीं होतीं. तिला अगदींच दिसेनासें झालें होतें. जरूर पडे तेव्हां तिला हात धरून इकडेतिकडे न्यावें लागे. आम्हां मुलांची या कामीं मदत होई.

आई व बाबा या उभयतांनीं अशा रीतीनें आपण हालांत दिवस काढून आमचा मार्ग सुखकर केला. तीं उभयतां कष्टाळू माणसें होतीं. पुढेंपुढें त्यांना बरे दिवस आले होते. तरी देखील त्यांनीं अंगवळणीं पडलेले कष्ट सोडले नाहींत, व गरीबी असतांहि गरीबीची उघडीक लोकांपुढें केली नाहीं. यांच्या अंगीं स्वाभिमान व कुलाभिमान विशेष असे. मी अगदीं लहान असतांना बडोद्याच्या महाराजांनीं गांवोगांव ब्राह्मणांना गोप्रदानें देवविलीं. प्रत्येक ब्राह्मणाला दहा रुपये मिळाले. मुरूडच्या पुष्कळ गृहस्थ मंडळींनींहि हे दहादहा रुपये घेतले, त्या वेळीं बाबा कोरेगांवीं होते. आई एकटीच घरीं होती. दादांची मुंज झालेली होती, तेव्हां त्यांनीं "मी जाऊन दहा रुपये घेऊन येऊं का ?" असें आईला विचारलें, त्या वेळीं ती म्हणाली "बाबारे, दक्षिणेसाठीं हात पसरणाऱ्यांच्या वंशांत तुम्ही जन्माला आलां नाहीं. तुमचे मामा दशग्रंथी ब्राह्मण आहेत. पण त्यांनीं कधीं कोणत्या प्रकारचें दान घेतलें नाहीं. तुमचे पूर्वज मोठ्या नांवलौकिकाचे होते. तुमचे वडील गरीब असले तरी ते कुलाभिमान विस-

रले नाहींत. हें आधीं मरतिकाचें दान ! आणि ज्यांच्याकडे तुमचे लाखों रुपये येणें* आहे त्या बडोदे सरकाराकडचें ! तेव्हां ही गोष्ट तूं स्वप्नांतहि आणूं नको. " या गोष्टीचा असा निकाल लागल्याचें जेव्हां बाबांना कळलें, तेव्हां त्यांना अतिशय आनंद झाला.

आई व बाबा हीं उभयतां धार्मिक वृत्तीचीं होतीं. बाबांनीं गुरूपदेश घेतलेला होता. दररोज मनांतल्यामनांत गुरूंनीं सांगितलेलें भजन म्हणाववयाचें व नंतर निजावयाचें, असा त्यांचा क्रम असे. आई पहांटेला दोन दोन घटका देवांपुढें बसून देवांचीं गाणीं गाई. जीवरून तिच्या स्वभावाची ओळख पडेल, अशी एक गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे. माझ्या लग्नाच्या वेळीं वधूगृहीं जावयाचें असतांना कांहीं पदार्थ बरोबर घेण्यास ती विसरली. त्या वेळीं वधूच्या आजीनें " तुम्ही एवढाल्या बायका ! या साध्या गोष्टीसुद्धां तुम्हांला कशा कळत नाहींत ? " वगैरे मर्मभेदक शब्दांनीं सर्वांसमक्ष तिला दुखविलें. आईनें उलट मर्मभेदक शब्द न बोलतां एकदम स्वतःच्या श्रीमुखांत मारून घेतली व " माझी चुकी झाली, क्षमा करा ! " असे शब्द उच्चारले. सर्व बायका थक्क झाल्या व पुढील कार्यक्रम निर्विघ्नपणें तडीला गेला. वरमाईला अशा रीतीनें दुखविल्यावर त्याचा सूड घेतल्यावांचून किती बायका रहातील ? पण आईनें त्या लग्नांत किंवा नंतरहि याबद्दल कोणालाहि दुखविलें नाहीं.

बाबांचें वय होऊं लागलें, तेव्हां कोरेगांवची नोकरी सोडावी व मुरुडाला येऊन रहावें, असे विचार त्यांच्या मनांत येऊं लागले होते; पण ते तडीला नेण्यापूर्वींच त्यांचा अंत झाला. त्यांना कोरेगांवींच ताप येऊं लागला, व

---


*बडोदें सरकाराकडे जें कर्व्यांचें येणें होतें तें आलें नाहीं अशी आई व बाबा यांच्या लहानपणीं सर्वांची समजूत होती. केशवभटजींनीं दमाजी गायकवाड यांना लिहिलेल्या एका पत्रांत " सध्या ऐवज पदरीं पडे तो अर्थ करावा.........तुम्हांमुळें आम्ही फार श्रमांत आहों. " अशीं वाक्यें आहेत. नंतर फार वर्षांनीं म्हणजे १७४१ सालीं आमचे आजोबा बापूनाना यांना कर्व्यांचे कारकून व भागीदार गोडबोले यांच्या मुलानें पत्र लिहिलें आहे, त्यांत " पेशजीं तुमच्याजवळ गायकवाड प्रकरणीं कागदपत्र शिक्कयाचे काय असतील ते तुम्ही व आम्ही मिळोन बडेसाहेब यांस दाखवूं......" असा उल्लेख आहे. अस्सल कागदांची काय व्यवस्था लागली असेल ती असो !

डोलींत घालून घरीं आणल्यानंतर पंधरा दिवसांनीं म्हणजे श्रावण शुद्ध ५ शके १८०१ रोजीं त्यांनीं इहलोकची यात्रा संपविली. त्यांनीं चाळीस वर्षें इमानेइतबारें यजमानांची चाकरी केली. पहिले यजमान वारल्यानंतर त्यांचे दोघे मुलगे यांचे यजमान झाले. ते यांना वडिलांप्रमाणें मानीत, व यांच्या सल्ल्याप्रमाणें वागत. शेवटलीं दहा वर्षें यांचें सालीना वेतन तीस रुपये केलें होतें. बाबा वारले, तेव्हां त्यांच्या कोरेगांवच्या खासगी देण्याघेण्याच्या कागदांचा रुमाल कोरेगांवालाच होता. तो बर्व्यांनीं आणून माझ्या वडील भावाच्या स्वाधीन केला. त्यांचें लिहिणें अगदीं चोख होतें. देण्याघेण्या-संबंधानें बिलकूल अडचण पडली नाहीं. त्यांनीं त्या प्रांतांत फार चांगला लौकिक संपादन केला होता. केसोपंत बर्व्यांचें नांव घेतल्याबरोबर त्यांच्या ओळखीच्या गृहस्थांच्या मनांत सत्त्वगुणाची मूर्ति उभी राहत असे.

बाबांचा स्वभाव निग्रही असे. कांहीं विशेष प्रसंगीं तो नजरेला येई. त्यांतला एक प्रसंग आईनें कित्येकवेळां आम्हांला सांगितला. दादांची मुंज झाली तेव्हां मुरूडगांवांत समाराधना घालण्याविषयीं आईनें आग्रह धरिला. त्यावेळीं बाबांनीं निक्षून सांगितलें कीं, "माझ्या आटोक्याबाहेरची गोष्ट मी करणार नाहीं." पुढें माझ्या मुंजीच्या वेळीं त्यांनीं आईची इच्छा पुरविली.

बाबांच्या व आईच्या वयांत अंतर पांच वर्षांचें होतें. बाबांनीं आम्हां सर्वांना बऱ्याच सुस्थितींत आणून सोडिलें होतें. उतारवयांत आईला कष्ट करावयाचें कारण राहिलें नव्हतें. जन्मस्वभाव म्हणून ती नेहमीं काम करीत राही, ही गोष्ट वेगळी. बाबांच्या मागें सव्वीस वर्षें गृहदेवतेप्रमाणें कुटुंबांतील सर्व मनुष्यांना आनंद देऊन, व सर्वांच्या उपयोगीं पडून, ती चैत्र शुद्ध २ शके १८२७ रोजीं ऐशीं वर्षांची होऊन निजधामाला गेली. मरणाच्या पूर्वी पंधराच दिवस तिनें चूल दुसऱ्याच्या हातीं दिली. तोंपर्यंत दोनशें पावलांवरच्या विहिरीचें पाणी आपल्या हातीं आणून स्वयंपाक स्वतः केल्यावांचून ती कधीं राहिली नाहीं.

या दोघां प्रेमळ माणसांच्या मूर्तिमंत उदाहरणाचा आम्हां भावंडांवर फार परिणाम झाला.



प्रो. कर्वे,  अंबाताई,  दादा,  श्री. आचवल.

# प्रकरण पांचवें

## बंधुभगिनी

माझे वडील बंधु भिकाजीपंत हे माझ्याहून पांच वर्षांनीं वडील आहेत. यांना मी दादा म्हणतों. हे बुद्धीनें मध्यम, पण मनानें फार थोर सत्त्वगुणी गृहस्थ आहेत. यांचीं बालबोध व मोडी हस्ताक्षरें फार चांगलीं आहेत. पूर्वीची मराठी चवथी इयत्ता पास झाल्यावर यांनीं दरमहा पांच रुपयांवर खेड तालुक्यांतील एका शाळेंत शिक्षकाची नोकरी धरली, पुढें सहावी इयत्ता पास झाल्याशिवाय ही नोकरी कायम रहाणार नाहीं, असा विद्याखात्याचा नियम झाल्यावरून यांनीं मराठी सहाव्या इयत्तेची परीक्षा दिली, व हे पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजांत गेले. तेथें पहिल्या वर्षाच्या परीक्षेंत नापास झाल्यामुळें सर्टिफिकीट न मिळतां यांना परत यावें लागलें. पुढें यांनीं शाळाखात्यांत शिक्षकाची नोकरी धरिली व यांना दरमहा दहा रुपये मिळूं लागले. मग वडील वारले, व मी इंग्रजी शिकण्याला बाहेर रहाणार म्हणून यांनीं कमी पगारावर म्हणजे सात रुपयांवर मुरूड गांवीं बदली करून घेतली. नंतर यांना दरमहा आठ रुपये मिळूं लागले. हल्लीं यांना दरमहा चार रुपये पेनशन मिळतें. यांनीं मला इंग्रजी शिकण्यास उत्तेजन दिलें. हे स्वतः अडचण सोसून आपल्या अल्पप्राप्तींतून कांहीं शिल्लक राखून मला खर्चासाठीं पाठवीत; शिवाय अधिक लागणाऱ्या खर्चाबद्दल कर्जाचें जोखीम घेण्यासहि हे तयार झाले!

वडिलांप्रमाणेंच दादांनीं त्या प्रांतांत फार चांगला लौकिक मिळविला आहे. हे स्वभावानें गरीब, सालस व कधीं कोणाचें मन न दुखविणारे असल्यामुळें माहितीच्या सर्व लोकांना प्रिय झालेले आहेत. हे कधीं कोणाकडे गप्पा मारावयाला जावयाचे नाहींत, अगर कधीं कोणाच्या भानगडींत पडावयाचे नाहींत. लिहिण्यासवरण्याचा कांहीं उद्योग असल्यास करावा, नाहीं तर भजनांत अगर पारमार्थिक चिंतनांत काळ घालवावा, हा यांचा क्रम आहे. यांना संसारसुखाचा लाभ फारसा झाला नाहीं. यांची बायको प्रकृतीनें अशक्त आणि बहुतेक आजारी असे. यांना सहासात मुलें झालीं,

पण दुर्दैवानें तीं वारलीं. एक मुलगा पुण्याला इंग्रजी शिकण्याला आला होता. तोहि यांना लाभला नाहीं, आतां काय ती यांची एक मुलगी हयात आहे. यांची बायको यांच्या चाळिशीच्या सुमाराला वारली. पुनः लग्न करण्याविषयीं यांना कित्येकांनीं सांगितलें, पण यांनीं तें ऐकिलें नाहीं. यांना संसारसुख मिळालें नाहीं, पण यांच्या मनाची शांति कधीं तिळमात्रहि ढळली नाहीं. हे नेहमीं समाधानी असतात व पारमार्थिक ग्रंथ वाचण्यांत आणि पुराणकीर्तन ऐकण्यांत कालक्षेप करतात.

माझी धाकटी बहीण अंबाताई माझ्याहून तीन वर्षांनीं लहान आहे. ही बुद्धिमान्, दूरदर्शी, व्यवहारदक्ष आणि कर्तबगार बायको आहे. हिचे यजमान भिक्षुक होते. हिनें बरींच वर्षें कडक सासुरवास सोसला. तिशीच्या वयांतच हिजवर वैधव्याचा घाला पडला. हिच्या दोन मुली सुखानें संसार करीत आहेत. घरची गरीबीच, तेव्हां घरांतील कामांत मदत करून स्वतःच्या आगरवाडींतलें काम हीच संभाळी. नवरा व सासू वारल्यानंतर संसाराची सर्व जबाबदारी हिजवरच पडली. हिनें आपला स्वतःचा आगर घरीं केला, व आमचाहि आगर मक्त्यानें घेतला; आणि रात्रंदिवस खपून आपलें व मुलींचें पोषण केलें, व जवळ थोडीशी शिल्लकहि केली. ही धार्मिक वृत्तीची बायको आहे. देवांपुढें बसून आपलें आपण ध्यानचिंतन करावें व पोथी वाचावी, हा हिचा नित्यक्रम आहे. ही दुसऱ्या कोणाकडे बसावयाला जाऊन गप्पागोष्टी करीत कधीं बसावयाची नाहीं. शरीर कष्टवून उद्योग करणें हें शरीराचें सार्थक आहे, असें ही मानते. काम करीत असतांहि आपणाला पाठ येत असलेलीं स्तोत्रें अगर देवाचें नांव म्हणत असावयाचें. दुसऱ्याच्या कुटाळ्या कधींहि न करितां आत्मसंशोधन करून स्वतःचा मार्ग चोखाळावयाचा. हिनें गुरूपदेश घेतलेला नाहीं. उद्योगापासून फारशी प्राप्ति झाली नाहीं तरी चालेल; पण रिकामपणासारखा, आळसासारखा, दुसरा शत्रु नाहीं, हें लक्ष्यांत आणून अल्पफलदायी तरी कांहीं उद्योग काढावयाचा, असा हिचा निश्चित मार्ग आहे. हिनें आगरांत पुष्कळ केळी लाविल्या आहेत, त्यांचीं पानें विकतील तितकीं ही विकते. बाकीच्यांचीं सुखवतें होतात. हीं सुखवतें पुष्कळ लोक अगदीं व्यर्थ दवडतात. हिनें तीं वेळच्या वेळीं आणून साफसूफ करून दडपून

ठेवावीं आणि रिकाम्या वेळीं त्यांचे द्रोण लावून ते विकावे. गांवप्रयोजनांत लोकांना द्रोणांची जरूर लागते, तेव्हां त्यांना ते मिळत नाहींत. अंबाताईकडे दोनदोन महिने अगोदरपासून मागण्या आलेल्या असावयाच्या. हिचा रिकामपणचा दुसरा उद्योग म्हणजे कुंपणाला पारे (घायपात) पुष्कळ असतात, त्यांच्या पात्या आणून पांढरा वाक काढावयाचा, व गळ्यांतलीं ओंवण्यासाठीं त्याच्या दोऱ्या करावयाच्या. एकेक हात लांबीच्या पंचेचाळीस बारीक दोऱ्या तयार केल्या म्हणजे काय तो एक पैसा मिळावयाचा. पण रिकामें बसावयाचें त्या ऐवजीं हा एक पैसा कां मिळवूं नये, असें म्हणून तिनें हा उद्योग हातीं घ्यावयाचा.

स्वतःच्या कष्टानें जें कांहीं मिळेल त्यांत तृप्त असावयाचें, व दुसऱ्याच्या एका पैशाचाहि लोभ धरावयाचा नाहीं, असा हिचा बाणा आहे. वडिलांच्या इच्छेवरून दोनशें रुपये हिला मीं दिले होते; हे ती मला परत देऊं लागली. मीं नको म्हटलें, तेव्हां ते तिनें धर्मादायाच्या कामीं खर्च केले. हिचा धर्मादाय म्हणजे गुप्त दान असतें. धोंडोपंतांनीं हा धर्म केला आहे, असें सांगून सत्पात्र पाहून ही आपल्या अल्पसामर्थ्याप्रमाणें दानधर्म करीत असते. लौकिकासाठीं कोणतीहि गोष्ट करण्याचा हिला तिटकारा आहे. तत्त्वदृष्टीनें विचार करून खरेंखोटें, बरेंवाईट ओळखण्याचें सामर्थ्य हिच्या अंगीं चांगलें आहे. अलीकडल्या शिक्षणाचा फायदा जर हिला मिळाला असता, तर हिच्याकडून फार मोठा कार्यभाग झाला असता. विद्येचा विशेष संस्कार नसतांहि मनुष्याचे विचार किती प्रगल्भ असूं शकतील, याचें अंबाताई मूर्तिमंत उदाहरण आहे!

मातुःश्री वारल्यानंतर दादा अगदीं एकटे पडले, तेव्हां अंबाताई त्यांच्याकडेच येऊन राहूं लागली. दोघांच्याहि मुलींचें माघारपण तेथेंच करितात. भिकाजीपंतांची शरीरप्रकृति चांगली नसल्यामुळें ते वारंवार आजारी पडावयाचे. अशा वेळीं अंबाताईनें त्यांची सेवा त्यांना वडिलांसमान मानून करावयाची. शरीरकष्टांना ही कधीं कंटाळत नाहीं. दादांच्या अडचणीसाठीं ही त्यांजकडे येऊन रहाते खरी, पण आपला व आपल्या मुलींचा भार त्यांजवर बिलकूल पडूं देत नाहीं. त्यांच्यासाठीं आपणाला झीज सोसावी लागली तरी हरकत नाहीं; पण आपणासाठीं त्यांना झीज लावावयाची

नाहीं, याविषयीं ती फार दक्ष असते. अशीं बाणेदार मनुष्यें आपल्या समाजांत फार थोडीं आहेत.

अंबाताईचें मन किती उदार, थोर व निर्लोभ आहे, हें दर्शविणारीं दोन उदाहरणें नुकतींच घडलेलीं आहेत. महिलाविद्यालयाची कल्पना तिला फार आवडली, व तिनें स्वयंस्फूर्तीनें १९१२ सालीं या संस्थेला पंचवीस रुपयांची देणगी दिली. या देणगीची खरी किंमत कळण्यास हे पंचवीस रुपये मिळविण्याला तिला किती कष्ट पडले असतील व किती काळ लागला असेल, या गोष्टी लक्ष्यांत आणल्या पाहिजेत. हजार रुपयांच्या देणगीनें जो आनंद होणारा नव्हे, तो आनंद अशा स्थितींतल्या मनुष्यांकडून अल्प देणग्या आल्या तरी त्यांपासून होत असतो ! मग आपल्या प्रेमळ भगिनीनें आपल्या कामाची किंमत ओळखून अशा रीतीची मदत केली असतां मला आनंदानें भरतें आलें व क्षणभर धन्यता वाटली, तर त्यांत आश्चर्य तें कसलें ! दुसरें उदाहरण थोड्या वर्षांपूर्वी घडलें. ब्यांका बुडाल्यामुळें माझें सर्वस्वीं नुकसान झालें असें तिनें ऐकिलें होतें. त्यानंतर मी घरीं गेलों, तेव्हां तिनें मला सर्व हकीकत विचारली, व मीं ती सर्व सांगितली. कांहीं वडिलोपार्जित इस्टेट विकून आलेल्या अकराशें रुपयांचें व्याज दादांच्या हयातींत त्यांना द्यावें व त्यांच्या पश्चात् ती रक्कम पूर्वजांचें स्मारक म्हणून मुरूड फंडाच्या स्वाधीन करावी, अशी योजना आम्ही केलेली तिला माहीत होती, व ते रुपये इकडे आणून दरवर्षी व्याजाचें चवेचाळीस रुपये मुरुडास दादांकडे मी पाठवितों, हेंहि तिला ठाऊक होतें. तेव्हां ही रकम देखील ब्यांकेंत बुडाली कीं काय, असा प्रश्न तिनें मला केला, तेव्हां तीहि हकीकत सांगणें मला भाग पडलें. अडचणींत असलेल्या एका मित्राला मीं ती रकम दिली आहे, व तो अधिक अडचणींत पडल्यामुळें ती त्याजकडून परत होणें बहुतेक अशक्यच आहे, आणि दोनतीन वर्षं व्याजाचे रुपये मी स्वतःच पाठवीत असतों, वगैरे तिला सांगितलें. हें ऐकून तिनें एकदम सांगितलें, कीं, " हे चवेचाळीस रुपये तुम्ही पाठवूं नका. मी ते दादांना देण्याची व्यवस्था येथेंच करीन. " केवढी धमक ही ! अर्थात् मला मिळतें आहे तोंपर्यंत मी पाठवितों; पुढें तूं आहेसच ! असा जबाब मीं दिला. कोळशाच्या खाणींत लपलेल्या हिऱ्याप्रमाणें

अशीं कांहीं अमूल्य रत्नें सामान्य जनांमध्यें मिसळलेलीं असतात, व कांहीं विशेष प्रसंगीं मात्र त्यांची चमक एखाद्याच्या नजरेला पडते! असो.

दादांचें वय आतां बासष्ट वर्षांचें आहे, व अंबाताईचें चौपन्न वर्षांचें आहे. हीं उभयतां समाधानानें आहेत. दादा जीवंत आहेत तोंपर्यंत त्यांच्याजवळून दूर जावयाचें नाहीं, असा अंबाताईचा निश्चय आहे. या साध्वीचा आमच्या समाजाला कांहीं विशेष उपयोग व्हावा, असें माझ्या मनांत येतें; परंतु तें या जन्मीं तरी बहुतेक अशक्य दिसतें!

## द्वितीयावृत्तीचे वेळीं लिहिलेली पुरवणी

दादा व अंबाताई यांचा आयुष्यक्रम पूर्वीप्रमाणेंच चालला आहे. मुरूडांतील आमचें घर व आगर विकल्यावर दादा अंबाताईकडेच राहूं लागले. मुरूड गांवाची स्थापना करणाऱ्या सिद्ध पुरुषांच्या स्नानसंध्या करण्याच्या जागेचा उल्लेख बखरींत केला आहे. त्या जाग्यावर फक्त पडकी विहीर मात्र राहिली होती. दादांनीं या जागेला चांगलें रूप आणून देण्याचा प्रयत्न केला. विहीर करून तिचा चिरेबंदी व वर्तुळाकृति आड बनविला व जवळ लहानसें मंदिर बांधून त्यांत सिद्ध पुरुषाच्या पादुका स्थापिल्या. ह्या कामीं दादांनीं स्वतःचे सुमारें एक हजार रुपये खर्चिले आहेत. ह्या कामांवर देखरेख करण्याची जबाबदारी श्रीयुत विठ्ठल नारायण गोडबोले यांनीं कांहीं मोबदला न घेतां पतकरली. हें झाल्यावर आमचे चुलत बंधु गंगाधरपंत व दादा ह्यांनीं सिद्धपुरुषाच्या पुण्यतिथीचा उत्सव कार्तिक वद्य १२ रोजीं करण्यासाठीं वर्गणी जमविण्याची खटपट केली. जमलेल्या रकमेला सिद्धपुरुष स्मारकफंड म्हणून नांव देऊन ती तीनशें रुपयांची रकम मुरूडफंडांत ठेविली व तिचे व्याजांत वर्गणीची आणखी भर घालून दरसाल पुण्यतिथीचा उत्सव कार्तिक वद्य १२ रोजीं करण्यास सुरुवात केली. पांच वर्षांपूर्वी गंगाधरपंत वारले तेव्हांपासून एकटे दादाच ही खटपट करितात. सकाळीं पादुकांवर रुद्राभिषेक केला जातो. दोन प्रहरीं दोन वैदिक ब्राह्मण भोजनास बोलावून पुण्यतिथि साजरी केली जाते व सायंकाळीं वसंतपूजा होते. पुण्यतिथीचें भोजन व सायंकाळची वसंतपूजा अंबाताईच्या घरींच होते. दादांच्याजवळ आतां तीनशें रुपये शिल्लक जमली आहे. तीपैकीं स्वतःच्या उत्तरक्रियेसाठीं पन्नास रुपये ठेवून बाकीचे अडीचशें

रुपये सिद्धपुरुष स्मारकफंडांत घालण्यासाठीं मुरूड फंडाकडे देण्याचा त्यांचा विचार आहे.

अंबाताईनें काटकसरीनें जमविलेले आठशें रुपये मुरूड येथील नागलेश्वर देवाला अर्पण केले आहेत. त्यांच्या व्याजांतून दरसाल पौष महिन्यांत महारुद्राचा अभिषेक देवावर व्हावा अशी योजना केली आहे. ह्या उत्सवाचा कार्यक्रम येणेंप्रमाणें ठरविला आहे. प्रथम महारुद्राचें अनुष्ठान व नंतर ब्राह्मणभोजनाची सांगता; सायंकाळीं वैदिक ब्राह्मणांची वसंतपूजा व रात्रीं भजन. ही रक्कम पंचांचे मार्फत व्याजीं लाविली आहे. पांच ग्रामस्थ पंच नेमिले आहेत. ते कांहीं करीत नाहींत असें आढळून आल्यास ग्रामस्थांस जुने पंच काढून नवे नेमण्याचा अधिकार दिला आहे. परिस्थितीमुळें महारुद्र होणें शक्य नसेल तर होतील तितके लघुरुद्रच करावे अशी सवलत ठेविली आहे. ह्या संबंधाचें ट्रस्टडीड करून तें, अंबाताई व पांच पंच दापोलीचे सबरजिस्ट्रार यांचेसमोर हजर राहून ता. २१ डिसेंबर १९२७ रोजीं रजिस्टर केलें आहे.

अंबाताईनें आपल्या समजुतीप्रमाणें मनाच्या समाधानासाठीं हें धर्मकृत्य केलें आहे, पण माझ्या नवीन उद्योगालाही तिनें हातभार लाविला आहे. महिला विद्यापीठासाठीं तिनें पन्नास रुपयांची देणगी न मागतां दिली आहे. कष्ट करून संपादन केलेल्या ह्या प्रेमाच्या देणगीची किंमत करितां येणार नाहीं.

# प्रकरण सहावें

## बाळपण व मराठी शाळेंतील शिक्षण

माझा जन्म माझ्या आजोळीं म्हणजे शेरवली या गांवीं वैशाख शुद्ध ५ शके १७८० म्हणजे तारीख १८ एप्रिल १८५८ या दिवशीं झाला. माझ्या आईचीं पहिलीं तीन मुलें अल्पवयांत गेल्यामुळें वडील बंधूंचें नांव भिकू व माझें नांव धोंडू असें ठेविलें. मी लहानपणीं रडून व हट्ट करून बराच त्रास देत असें, असें आई सांगत असे. तीनचार वर्षांचा असतांना कोरेगांवीं आत्म्या नांवाचा एक चाकर आमच्या घरीं असे. त्याची मुद्रा उग्र होती. मी त्रास देऊं लागलों, म्हणजे मला आईबाबांनीं या मनुष्याच्या स्वाधीन करावें व त्यानें माझ्या अंगावर रागावून मला एका ठिकाणीं, बहुधा परशा—शेकोटी—जवळ, बसवून ठेवावें, असें चालत असे. असा मी कधींकधीं तासांचेतास बसून रहात असें. माझ्या अगदीं लहानपणच्या हट्टाची मला एक आठवण आहे. मला तोंडीं लावण्यासाठीं भिजवून अगर भाजून शिजविलेले कडवे फार आवडतात. एके दिवशीं सकाळच्या जेवणाच्या वेळीं 'कडवे मला करून घाल' म्हणून मी आईजवळ हट्ट घेऊन बसलों. अखेरीला फोडणीच्या पळींत दहावीस दाणे भाजल्यासारखे व शिजविल्यासारखे करून तिनें माझ्या पानांत घातले, व तेच हिरवेकच्चे दाणे मीं खाल्ले तेव्हां माझें जेवण झालें! मजवर आईबाबांचें फार प्रेम असे व तीं माझा बराच हट्ट पुरवीत असत. नाइलाज झाला म्हणजे मात्र तीं मला आत्म्याच्या स्वाधीन करीत.

दादांचें वय नऊ वर्षांचें झालें व माझें चार वर्षांचें झालें, तेव्हां आम्हांला शिक्षणासाठीं आपल्या मूळ गांवीं म्हणजे मुरुड गांवीं ठेवण्याचें माझ्या वडिलांनीं ठरविलें. याच्या अगोदर दोन वर्षांपासून हा विचार त्यांच्या मनांत घोळत होता, व त्यांनीं चारशें रुपये खर्च करून मुरुडांत एक लहानसें घर बांधलें होतें. या घरांत माझी आई आम्हां तीन मुलांना घेऊन राहूं लागली. हा ब्राह्मण वस्तीचा मोठा गांव असून या गांवीं बहुतकरून हुषार मास्तर येत, व परगांवचींहि मुलें शिक्षणासाठीं मुद्दाम या गांवीं येत. माझ्या वडिलांचें शिक्षण याच शाळेंत झालें होतें. माझ्या वडील बंधूंना

थोडें लिहितांवाचतां येत होतें, म्हणून ते या शाळेंत जाऊं लागले; व मला शिकावयासच आरंभ करावयाचा होता, तेव्हां मी शेणवी पंतोजीच्या शाळेंत जाऊं लागलों. पहिलें शिक्षण शेणवी शाळेंत करून घ्यावें, व नंतर सरकारी शाळेंत शिकावें, अशी तेथली वहिवाट होती. सकाळीं शाळेंत गेल्यावर एकीकडे कित्ते गिरवावे व तोंडानें भूपाळ्या म्हणाव्या, असा तेथला क्रम असे. या शाळेंत व सरकारी शाळेंतसुद्धां धूळपाटीवरच शिकवीत असत. पाटीवर सारखी धूळ पसरून लांकडाच्या बोंथट लेखणीनें लिहावयाचें असे. दर रविवारीं पाट्या माजवावयाच्या असत. पाटी माजविणें म्हणजे पाटी स्वच्छ धुवून ओल्या मातीचा अगर खडूचा अगदीं पातळ लेप तिजवर देणें. या शाळेंत सुमारें सहा महिने शिकून नंतर मी सरकारी शाळेंत जाऊं लागलों. माझी बुद्धि साधारण बरी असल्यामुळें मी क्रमाक्रमानें वरच्या वर्गांत जाऊन तेथला अभ्यासक्रम संपवीत आणला. या वेळीं हलक्या प्रतीच्या सरकारी नोकऱ्यांसाठीं मराठी चवथ्या इयत्तेची परीक्षा घेत असत. ही परीक्षा, डेप्युटी इन्स्पेक्टर शाळेंत परीक्षेला जात, त्या वेळीं घेत, व जीं मुलें पास होत त्या मुलांना एजुकेशनल इन्स्पेक्टराच्या सहीचें सर्टीफिकेट मिळे. ही परीक्षा बंद होऊन जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं मराठी सहाव्या इयत्तेच्या परीक्षा सप्टंबर महिन्यांत घेण्याची सुरुवात व्हावयाची होती. १८६९ सालीं मराठी चवथ्या इयत्तेची शेवटची परीक्षा निरनिराळ्या शाळांतून झाली. या परीक्षेला मी बसलों होतों; परंतु मी नापास झालों. माझे मित्र रामभाऊ जोशी हे ही परीक्षा याच वर्षी पास झाले. ही परीक्षा बंद होऊन सहाव्या इयत्तेची परीक्षा सुरू झाली, तेव्हां अभ्यासक्रमांत बराच फेरफार करण्यांत आला. गणित व मोडी अक्षर या विषयांवर पूर्वी भर असे; पण भाषाविषयाकडे लक्ष कमी असे. कवितेकडे मुळींच लक्ष नसे. याच सुमाराला वाचनाचीं क्रमिक पुस्तकें बदलून नवीं सुरू करण्यांत आलीं. त्यांत बऱ्याच कठिण कविता दिलेल्या होत्या. या नव्या अभ्यासक्रमांत मी पडलों.

श्रीयुत विनायक लक्ष्मण सोमण हे तरतरीत व हुशार गृहस्थ आपल्या वयाच्या वीसएकविसाव्या वर्षी ट्रेनिंग कॉलेजांतील पहिल्या प्रतीचें म्हणजे पंचवीस रुपयांचें सर्टिफिकेट मिळवून १८७० सालीं डिसेंबर महिन्यांत

आमच्या गांवीं मास्तर होऊन आले. पहिल्या उमेदींत यांनीं फार उत्साहानें काम केलें. यांनीं मला पुनः चवथ्या इयत्तेंत घातलें; व क्रमानें चवथी, पांचवी व सहावी या इयत्ता माझ्या चांगल्या तयार झाल्या. मी मास्तरांचा अगदीं आवडता विद्यार्थी होतों. बहुतकरून मी अभ्यासाला व निजावयाला त्यांच्याकडेच जात असें. इतर कांहीं विद्यार्थीहि निजावयाला त्यांच्याकडे येत. ते आम्हाला अमरकोश पाठ करावयाला शिकवीत. माझा शाळेंतला अभ्यास संपल्यावर मी जुन्या पद्धतीनें रघूचा दुसरा व अकरावा सर्ग गांवांतील एका शास्त्रीबुवांजवळ शिकलों. शाळेंतील अभ्यास आटोपतांच मी अगदीं रिकामा झालों. अशीं दोनतीन वर्षे मला काढावीं लागलीं. या मुदतींत शाळेंत बिनपगारी शिकवावें, किंवा सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला जाऊं इच्छिणाऱ्या मुलांना मदत करावी, अशा रीतीनें मी आपला वेळ कंठीत असें.

या रिकामपणच्या वेळांत माझ्या आवडत्या गणितविषयाचा अभ्यास करण्यांत मी कांहीं काळ घालवीत असें. बऱ्याच मुलांना न सुटणारीं अंकगणितांतलीं बरींच कठिण उदाहरणें मला सुटत. वाढत्या कुरणाचीं वगैरे अवघड उदाहरणें सहाव्या इयत्तेच्या विद्यार्थ्यांना मी समजावून सांगत असें. पूर्वी मुलांच्या ट्रेनिंग कॉलेजांत रावजीशास्त्री देवकुळे म्हणून मोठे व्यवस्थित व हुशार गृहस्थ गणिताचे शिक्षक असत. त्यांनीं गणितविषयावर उत्कृष्ट रीतीचीं टिपणें करून ठेविलीं होतीं, तीं ते विद्यार्थ्यांकडून लिहवून घेत. मास्तरांच्या या टिपणांच्या वह्या मी मागून घेऊन वाचीत असें, व मला त्या बऱ्याच समजतहि असत. सर्व अंकगणित व युक्लिडच्या सिद्धांतांचें पहिलें पुस्तक एवढे भाग मराठी सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला होते, तेवढ्यावरचींच टिपणें मीं वाचलीं. याचा मला पुढें चांगला उपयोग झाला.

माझी मराठी चवथी इयत्ता संपली, त्या सुमाराला मुरुडापासून सहा मैलांवर दापोली येथें एक सरकारी इंग्रजी शाळा सुरू झाली होती. या शाळेंत शिकण्याला जर मला सवड मिळाली असती, तर बरें झालें असतें; पण त्या वेळीं दादांची मराठी चवथ्या इयत्तेची परीक्षा पास होऊन ते रिकामे बसले होते. त्यांना तेथें शिकावयाला घातलें. गांवांतील दुसरी

तीनचार मुलें मिळून त्यांनीं तेथें बिऱ्हाड केलें. ते आळीपाळीनें स्वयंपाक करीत. माझ्या बंधूंना ही सर्व दगदग करून अभ्यास उरकेना, म्हणून तीनचार महिने झाल्यावर त्यांनीं तो मार्ग सोडला, व रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतल्या एका गांवीं दरमहा पांच रुपयांवर शिक्षकाची जागा पतकरली. पुढें माझा शाळेंतील अभ्यास संपून मी इंग्रजी शिकण्यासारखा झालों. इतक्यांत ती शाळा बंद झाली.

नवीन सहाव्या इयत्तेची परीक्षा सुरू झाली, तेव्हां पूर्वीच्या चवथ्या इयत्तेचें सर्टीफिकीट मिळविलेल्या शिक्षकांनीं ही नवी परीक्षा दिली पाहिजे, तरच त्यांची नोकरी कायमची समजली जाईल, असा सरकारी हुकूम झाला. तेव्हां माझे बंधु ही परीक्षा देण्यासाठीं रजा घेऊन घरीं आले. त्यांना बऱ्याच नवीन विषयांचा अभ्यास करावयाचा होता. या कामीं मीं त्यांना मदत केली. त्यांना पुनः शाळेंत जाण्याचें कारण पडलें नाहीं.

# प्रकरण सातवें

## लहानपणांतील इतर व्यवसाय, खेळ व अन्य गोष्टी

लहानपणापासून माझी वाणी खणखणीत, शुद्ध आणि स्पष्ट असे. माझें वाचन फार चांगलें होतें. माझ्या आजोळीं रामविजय, हरिविजय वगैरे ग्रंथ दररोज रात्रीं वाचण्याचा परिपाठ असे. तोच क्रम आमच्या घरींहि सुरू झाला. प्रथम माझे दादा हें काम करीत असत; नंतर मी तें करूं लागलों. पुढें अभ्यासासाठीं मी रात्रीचा मास्तरांकडे जाऊं लागलों; पण अगोदर पोथी वाचून नंतर मी तिकडे जाई. देवपुजेप्रमाणेंच हें एक आमचें घरचें नित्यकृत्य झालेलें होतें. पोथ्या वाचणें हें पुण्यकृत्य आहे, असें आम्ही समजत असूं. विशेष प्रसंगीं ईश्वराराधना करण्याचा तो एक मार्ग झाला होता. शिवलीलामृताचें सूर्योदयापासून सूर्यास्ताच्या आंत पारायण करणें व गुरुचरित्राचा सप्ताह करणें, हें माझ्या परिपाठांतलें झालें होतें. या गोष्टी मी भक्तीनें करीं. वर्षांतून दहापांच वेळां शिवलीलामृताचीं पारायणें व चारदोन वेळां गुरुचरित्राचे सप्ताह झाल्यावांचून राहिले नाहींत. माझे वडील बंधु सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला गेले, तेव्हां त्यांची परीक्षा पास व्हावी म्हणून परीक्षेच्या आरंभाच्या दिवशीं मीं शिवलीलामृताचें पारायण केलें. दररोज देवपूजा झाली म्हणजे लघुगुरुचरित्र वाचावें, असाहि आमच्या घरचा परिपाठ होता. हें दादा किंवा मी कोणीतरी करीत असूं. दररोज संध्याकाळीं दिवे लागल्यानंतर देवांना फुलें वाहून निरांजन ओंवाळून नैवेद्य दाखवावा, व आरत्या म्हणून नंतर सायंकाळचें जेवण व्हावें, असा आमचा नित्यक्रम असे. हे सर्व परिपाठ अजून दादांनीं चालू ठेविले आहेत.

आमच्या घराशेजारींच वैश्वदेव, पुरुषसूक्त, सौर, रुद्र, पवमान इत्यादि शिकविण्यासाठीं एका वृद्ध वैदिकांनीं आपल्या घरीं सोय केली होती. ही विशेषतः मराठी शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां असे. याशिवाय गांवांत वेदशाळाहि असत; त्यांत भिक्षुकीचा उद्योग करूं इच्छिणारे विद्यार्थी मात्र जात. आमच्या गांवांत दशग्रंथी विद्वान् ब्राह्मण पुष्कळ असत. हल्लीं मात्र

या बाजूकड फारसें कोणी वळत नाहीं. मुलांनीं सकाळची शाळा सुटल्यानंतर घरीं येऊन जेवावें, व नंतर कांहीं शिकण्यासाठीं यांच्या घरीं जावें, असा नित्यक्रम असे. मी मुंज होण्याच्या पूर्वीच दादांबरोबर या ठिकाणीं जात असें. वडील मुलांचें ऐकून मी बऱ्याच ऋचा, व कधीं कधीं सबंध वर्गहि पाठ म्हणें. हें गुरुजीच्या लक्षांत आल्यावर ते माझ्याकडे लक्ष देऊन मला शिकवूं लागले. वैश्वदेव, पुरुषसूक्त, सौर व पवमानाचा कांहीं भाग इतकें मी शिकलों. पुढें शाळेच्या अभ्यासाची विशेष गोडी लागल्यानंतर ही बाजू मीं सोडून दिली. आमच्या घरीं वैश्वदेव नियमानें होत नसे. जेवावयाला बसते वेळीं एक आहुती चुलींतल्या अग्नींतच टाकावयाची व नंतर जेवावयाला बसावयाचें, असा क्रम असे; पण कांहीं विशेष प्रसंगीं व दशमी, द्वादशी, अमावास्या वगैरे कारणानें घरीं जेवावयाला भट सांगितलेला असला म्हणजे आमच्या घरीं वैश्वदेव होत असे, व तो मीच करीं. आमचे वडील नेहमीं कोरेगांवीं रहात. मोठा सण आला म्हणजे आठचार दिवस ते घरीं येऊन रहात. तेव्हां देखील त्यांचें जेवण यजमानांकडे, म्हणजे बर्व्यांच्या घरींच होत असे. फक्त सणाचे दिवस व श्राद्धपक्ष या प्रसंगीं मात्र ते घरीं जेवीत. ते घरीं जेवावयाचे असले म्हणजे मात्र ते स्वतः वैश्वदेव करीत; इतर प्रसंगीं बहुधा मीच करीं. शेजारच्या एकदोन घरीं सोहेरसुतक वगैरे आलें, तर त्यांची देवपूजा करावयाला मला बोलावीत. मी या कामाला मोठ्या आनंदानें जाई; कारण, मोबदला म्हणून देवाच्या नैवेद्याला दहींपोहे किंवा दूधपोहे मिळत असत!

माझ्या बरोबरीचे रामभाऊ जोशी इंग्रजी शिक्षणासाठीं त्यांचे मावसे वा. आ. मोडक यांच्याकडे रत्नागिरीला गेले, व बहुतेक मंडळी ट्रेनिंग कॉलेजांत गेली. मी एकटाच घरीं राहिलों. कारण, मी वयानें लहान व माझी मूर्ति फारच लहान. यामुळें मला परीक्षेला घेण्याचा अगर ट्रेनिंग कॉलेजांत घेण्याचा मुळींच संभव नव्हता. वयानें कमी, परंतु शरीरानें उंच व सुदृढ दिसणारी मंडळी एकदोन वर्षें चोरून परीक्षेला गेली; पण मला तो मार्ग मोकळा नव्हता.

ट्रेनिंग कॉलेजांतील मंडळी सुट्टींत घरीं आली, म्हणजे त्यांच्याकडे जाऊन शिकण्याची मला उमेद येई. मला तितकी इच्छा असती, तर मास्तरांनीं

मला संस्कृत शिकविलें असतें; परंतु मनुष्याला नवीनपणा नेहमीं प्रिय असतो; शिवाय अधिक शिकून आलेल्या बरोबरीच्या मंडळीजवळ शिकण्याला विशेष हौस वाटते; म्हणून मी मास्तरांकडे शिकावयाला न जातां माझे मित्र काशीनाथपंत काणे यांच्याजवळ भांडारकरांचें संस्कृत पहिलें पुस्तक शिकलों. त्यांनीं मला परीक्षेचे प्रश्न घालावे व ते तपासून मार्क द्यावे. दोनतीन वेळां ट्रेनिंग कॉलेजांतून त्यांनीं मला प्रश्न पाठविले व माझीं उत्तरें तपासून परत पाठविलीं. इंग्रजी शिकण्याला मात्र गांवांत कोणत्याहि प्रकारें मदत मिळण्यासारखी नव्हती.

माझा गळा बराच गोड आहे. आर्या, श्लोक, पदें वगैरे सुरावर म्हणण्याचा मला लहानपणापासून नाद असे. समाराधनेचें जेवण झालें म्हणजे कोणी तरी मला श्लोक म्हणण्याचा आग्रह करावा व मीं तो म्हणावा, असें बहुतकरून होत असे. फर्ग्युसन कॉलेजाच्या ग्यादरिंगच्या प्रसंगींहि कधीं कधीं मंडळीच्या आग्रहावरून मीं श्लोक म्हटलेले आहेत. या कलेकडे लक्ष देण्याला मला कधींच सवड झाली नाहीं. गांवांत कीर्तनें झालीं म्हणजे बहुधा सुरावर म्हटलेलीं पदें वगैरे ऐकण्याच्या हेतूनें मी कीर्तनाला जात असें. आडिवऱ्याकडील गुरवांचे तमाशे गांवांत येत त्या वेळीं विशेष शोकी मंडळी त्यांच्या बैठका निवडक लोकांसाठीं करीत असत; परंतु वर्षांतून दोनतीन तमाशे तरी सार्वजानिक म्हणून होत असत; त्यांत विचकट लावण्या असत, तरी लहान मुलांनीं असल्या तमाशांना जावें, असा गांवचा परिपाठ होता, व त्याबद्दल कोणाला कांहीं वाटत नसे. मी विशेषतः गाणें ऐकण्याच्या हेतूनें तमाशांना जात असें.

मला नाटकें पाहण्याची हौस होती. खेडेगांवांत असले प्रसंग फारच थोडे यावयाचे; पण ते आले असतां मी वायां जाऊं देत नसें. उत्सवांच्या अखेरीला नाटकें करण्याची तिकडल्या कांहीं गांवांत चाल होती. जवळच्या गांवीं अशीं नाटकें झाल्यास तीं पहावयाला मी जाई. फिरस्त्या नाटक मंडळ्या त्या वेळीं तिकडे क्वचित् जात; पण एकादी गेली, तर दापोलीला जाऊनहि त्यांचें एकादें नाटक मी पाहीं. एकदां असें एक नाटक दापोलीला होतें. त्याच कंपनीचें एक नाटक मी तीन मैलांवरच्या दुर्णे गांवीं जाऊन पाहिलें होतें. दापोली येथील नाटकाला बरीच मंडळी

मुरुडांतून गेली होती. त्यांच्याबरोबर दादाहि गेले होते. मला त्यांनीं दुसऱ्यानेंहि नेलें असतें, परंतु आमचे यजमान बर्वे यांजकडे त्या रात्रीं षष्ठीपूजन होतें व आम्हांपैकीं कोणी तरी त्या प्रसंगीं हजर असणें जरूर होतें. कारण, एक तर आम्ही मानकरी म्हणून, व दुसरें ते आमचे यजमान म्हणून. मीं एक नाटक पाहिलें असल्यामुळें मीं गांवीं रहावें व दादांनीं नाटकाला जावें असें ठरलें; तरी माझ्यानें राहवेना. रात्रींचीं जेवणें झाल्यानंतर कांहीं मंडळी चालत जाणार होती. तेव्हां षष्ठीपूजनाचें काम झाल्यानंतर जेवण आटोपून मी त्यांच्याबरोबर चालत गेलों. याबद्दल मला बरींच बोलणीं ऐकून घ्यावीं लागलीं.

त्या वेळीं पत्त्यांचा खेळ इतका बोकाळलेला नव्हता. आमचे आवडीचे खेळ म्हणजे गट्टे व आट्यापाट्या. या खेळांचे बरेच अड्डे गांवांत असत. चवारी सुपारी हें झाड इकडे आढळांत येत नाहीं. ही चवारी सुपारी हिरवी असते, तेव्हां तिचा गर, रांप धुऊन टाकिला असतां सुपारीसारखा खाण्याला उपयोगीं पडतो. हें फळ पिकल्यानंतर वरची साल काढून टाकली म्हणजे आंत मोठ्या रोंठ्याचे दुपटीपासून चौपटीपर्यंत आकाराचे गट्टे असतात. यांचा उपयोग गोट्यांप्रमाणें खेळण्याच्या कामीं होतो. सणावारीं मोठमोठे लोक सुद्धां हा खेळ आवडीनें खेळत. आमच्या घरामागच्या वाडींतच या खेळाची एक जागा होती, तेथें आम्ही हा खेळ खेळत असूं. आट्यापाट्यांचा खेळ बहुधा आम्ही ओल्या वाळवंटावर म्हणजे भरतीनें धुऊन गेलेल्या स्वच्छ कठीण वाळूवर खेळत असूं. उन्हाळ्यांत उन्हाची वेळ टाळण्यासाठीं शाळा तीन वाजल्यापासून सहा वाजेपर्यंत भरत असे. आम्ही त्या वेळेचा उपयोग पुष्कळ वेळां ओल्या वाळवंटावर जाऊन पाट्या खेळण्याकडे करीत असूं. तिकडला खेळ संपावावयाचा व लागलेंच घरीं येऊन पुस्तकें घेऊन शाळेंत जावयाचें. सावली मोजून आम्ही किती वाजले त्याचा अजमास करीत असूं. दोनप्रहरांपासून तीन वाजेपर्यंत साधारण मानानें पावलांच्या निम्मे वाजलेले असावयाचे.

आमच्या घराशेजारीं जेथें मी देवपूजेला वगैरे जात असें, तेथें सोंगट्यांनीं खेळण्याचा एक मोठा अड्डा असे. नागपंचमीपासून दिवाळी संपेपर्यंत जे सण येतात, त्या सणांच्या दिवशीं हा खेळ दिवसरात्रींतून आठ-

दहा तास तरी चालावयाचा. मी अगदीं लहान वयाचा असतांच हा खेळ चालत असला म्हणजे तेथें जवळ बसत असें. तीन फांशानींच नेहमीं खेळत. मला पाहूनपाहून चांगलें दान लावतां येऊं लागलें. मी एखाद्या वेळीं खुबी दार दान सुचवीत असें. दोन बाजूंला दोन उत्कृष्ट दान लावणारे बसत असत व एकेका गड्याचा दुरंगीचा डाव बहुतकरून खेळत असत. मी सुमारें दहा वर्षांचा असतांना, एकदां पुष्कळशी मंडळी खेळ पहावयाला बसली होती, व तेथें मीहि होतों. एका बाजूच्या दान देणारानें माझें कौतुक करण्यासाठीं मला आपल्या बाजूचें दान लावण्याला सांगितलें. पंधरा-वीस वेळां फांसे टाकून होतपर्यंत मीं तें काम हुषारीनें केलें; परंतु पुढें घाबरलों. तेव्हां नेहमींच्या मनुष्यानें तें काम आपणाकडे घेऊन डाव संपविला.

माझ्या लहानपणच्या स्वभावाचें चित्र रेखाटण्याला उपयोगी पडतील, अशा दोन गोष्टी माझ्या चांगल्या स्मरणांत आहेत. माझी नुकतीच मुंज झालेली होती. मंडलिकांच्या घरीं एक मोठी समाराधना असून पात्रावर पावली दक्षिणा होती. मीं आपल्याबरोबर माझ्या लहान बहिणीला जेवावयाला नेलें होतें. मला एक पावली व माझ्या बहिणीला एक आणा दक्षिणा मिळाली.आम्ही जेवून घरीं यावयाला निघालों.माझ्या बहिणीनें आपली दक्षिणा आपल्या मुठींत गच्च धरून ठेविली होती. ते ' पैसे माझ्याजवळ ठेवावयाला दे, ' म्हणून मी मागूं लागलों. ती ते देईना. माझा हेतु एवढाच होता, कीं, ते सर्व पैसे आपण नेऊन आईजवळ द्यावे व थोडी प्रौढी मारावी. आमची बरीच बोलाचाली झाली. मी ते पैसे हिसकून घेईन म्हणून माझी बहीण बऱ्यांच्या घरांत शिरली व माझ्याबरोबर परत न येतां सावकाश मागून एकटी आली. अर्थात् तिच्या मनांतहि आपण आपले पैसे आईला नेऊन द्यावे व फुशारकी मिरवावी असें होतें. ती संधि तिला न देतां आपणच मोठेपणा मिरविण्याचा माझा प्रयत्न फुकट गेला.

दुसरी गोष्ट फुशारकी मारण्याचीच, परंतु निराळ्या स्वरूपाची आहे. मी सुमारें आठदहा वर्षांचा होतों. आमच्या बाबांनीं थंडीच्या निवारणार्थ एक नवी सकलाद विकत आणली होती. आमच्या शेजारचे एक गृहस्थ नेहमीं सकलाद पांघरून इकडेतिकडे हिंडत असत; तेव्हां धोतराऐवजीं सकलाद पांघरणें हें मला अधिक प्रतिष्ठेचें लक्षण वाटलें. तो वर्षप्रति-

पदेचा दिवस होता. आज सकलाद पांघरून पंचांगश्रवणासाठीं देवळांत जाणार असा मीं हट्ट धरला. गांवांतल्या लहानमोठ्या सर्व पुरुषांनीं उंची कपडे घालून देवळांत जमावें, व पंचांग वाचून झाल्यानंतर कडूलिंबाच्या पाल्याचा चूर करून त्यांत साखर मिसळून ती वांटावी व ती खाऊन सर्वांनीं घरोघर जावें, असा परिपाठ असे. या प्रसंगीं सकलाद पांघरून मी देवळांत जाणार होतों. दुसरें कोणीहि मनुष्य अशा प्रसंगीं सकलाद पांघरून जात नाहीं, व मी गेलों तर माझें हंसें होईल, असें अनेक प्रकारांनीं बाबांनीं व आईनें मला सांगितलें, पण माझी समजूत पडेना! अखेरीला जेव्हां चवदाव्या रत्नाचा प्रयोग होऊं लागला, तेव्हांच मी गप्प बसलों.

महिन्यांतून तीन दिवस स्वयंपाकाचें काम आमच्याकडे येत असे. यासंबंधाची मुख्य जबाबदारी दादांवर पडे. धाकटी बहीण मुलगी असल्यामुळें तिजवरहि स्वाभाविक बरेंच काम पडे. मी थोडासा अधिक आवडता असल्यामुळें घरकामांत चुकारतट्टूपणा करीत असें व तो खपूनहि जाई; तथापि थोडेसें काम माझ्या वांटणीला येतच असे.

आमच्या गांवांत बहुधा केळीच्या पानावर जेवण्याची वहिवाट असे. आमचा आगर आम्ही मक्त्यानें देत असूं, त्यामुळें आम्हांला केळीचीं पानें मिळत नसत; म्हणून आम्हीं कसल्या तरी पत्रावळीवर जेवीत असूं. मला झाडावर चढतां येत असे. वड, भुरवड, चांदडा, फणस वगैरे झाडांवर चढून पत्रावळीसाठीं पानें आणण्याचें काम मी मोठ्या हौसेनें करीत असें, व पत्रावळीहि लावीत असें. एकदां बोरीच्या झाडावर चढून बोरें पाडीत असतां खांदीवरून माझा पाय निसटला व एका खांदीला हात धरलेला होता त्या खांदीपासून मी लोंबकळत राहिलों. माझ्या बरोबर बारातेरा वर्षांचा माझा एक मित्र व धाकटी बहीण हीं होतीं; तीं मीं पाडलेलीं बोरें टिपीत होतीं. माझ्या पायांपासून जमिनीपर्यंत अंतर सुमारें दोन पुरुष होतें. त्या दोन मुलांनीं खालच्या वाळूवरील कांटे वगैरे काढून टाकिले, व मी हात सोडून देऊन खालीं पडलों. अंगाला बोरीचे कांटे बरेचसे बोंचले होते, पण दुसरी म्हणण्यासारखी इजा झाली नव्हती. ही गोष्ट त्या वेळीं आम्हीं घरीं कळविली नाहीं. पुढें चारदोन महिन्यांनीं ती कळविली.

पावसाळ्यांत तळीं भरलीं म्हणजे कांहीं मोठे लोक व कांहीं मुलें मिळून दर रविवारीं पोहावयाला जात. आमच्या गांवांत बहुतकरून सर्वांना पोहावयाला येतें. आठदहा वर्षांचा मुलगा झाला कीं, त्याला पोहावयाला शिकवावयाचें, असा तिकडील प्रघात आहे. मी पाण्यांत जावयाला फार भीत असें. एकदां शेजारच्या वडील मंडळींनीं फार वेडेपणा केला, त्यामुळें तर मीं फारच भीति घेतली. पोहावयाला शिकवावयाचें झाल्यास चांगल्या पोहणारानें पाण्यांत जावें व नवशिक्या माणसाला कमरेभोंवतीं सुखडी अगर भोंपळा बांधून धीर देऊन पाण्यांत नेलें पाहिजे. तसें कांहीं न करितां शेजारच्या मंडळींनीं माझी भीति घालविण्यासाठीं आसुरी उपाय योजला. पोहावयाला विहिरीपेक्षां तळें चांगलें; पण तळ्यावर न जातां आमच्या परसांतील आडावरच त्यांनीं मला नेलें. दोनप्रहरची वेळ होती, सर्वांचीं जेवणें झालेलीं होतीं; तेव्हां आपण कोणी पोहावयाला न येतां मला एकट्यालाच विहिरींत टाकण्याचा त्यांनीं बेत केला. माझ्या कमरेला सुखडी बांधल्या. मी एकसारखा भीत होतों व ओरडत होतों; पण तिकडे कोणीच लक्ष्य देईना. तुझ्या मागोमाग मी येतों, असें एकानें मला सांगितलें, व दोघांनीं एकेक हात धरून त्यांनीं मला विहिरींत फेंकून दिलें. माझ्या कमरेला दोर बांधून जर त्यांनीं मला आंत सोडिलें असतें, तर दोराच्या मदतीनें मी पोहूं शकलों असतों; पण मी फार भ्यालेला असल्यामुळें हातपाय हालविण्याचें भान मला राहिलें नाहीं व मी गटंगळ्या खाऊं लागलों. त्या वेळीं एका मनुष्यानें विहिरींत उडी टाकली व मला वर काढलें. या त्यांच्या अविचारीपणानें माझ्या उरांत धडकी भरली. पोहण्याचें नांव काढलें, तर मी अगदीं भिऊन जाई. त्याच्या पुढल्या रविवारीं मंडळी मला पोहावयाला नेतील, म्हणून मी आमच्या माळ्यावर काळोखांत जाऊन लपून बसलों. आमच्या घराला माळा होता; पण दिवसाहि दिवा नेल्यावांचून तेथें कांहीं दिसावयाचें नाहीं, अशी स्थिति होती. घरची मंडळी माझा शोध करूं लागली, पण मी कोठें सांपडलों नाहीं. घरांत मनुष्यें बोलत तें मी ऐकत होतों, पण मी बाहेर आलों नाहीं. कारण हे टोळभैरव मला पाहिल्याबरोबर पोहण्यासाठीं उचलून नेतील, व घरच्या मंडळींचें त्यांच्यापुढें कांहीं चालणार नाहीं, हें मला माहित होतें. मी कोठें विहिरींत

वगैरे तर पडलों नाहीं ना, अशी देखील शंका घरच्या मनुष्यांना आली; पण करतात काय ? त्यांनीं शोध करावयाचा तितका केला व अखेरीला कंटाळून स्वस्थ बसली. पोहणारी मंडळी सर्व आटोपून आपापल्या घरीं जाण्याची वेळ टळून गेल्यानंतर दोनप्रहरच्या जेवणाच्या सुमाराला मी माळ्यावरून खालीं आलों, व तेथें लपून बसण्याचें कारण त्यांना सांगितलें. त्यानंतर कांहीं दिवस पोहण्यासंबंधानें कोणी माझ्या वाटेला गेलें नाहीं. पुढें बऱ्याच दिवसांनीं ही माझी भीति जाऊन मला साधारण पोहतां येऊं लागलें.

लांकडाच्या ताड्यांचे अष्टकोनी सांगाडे तयार करून रंगीत कागद त्याच्यावर चिकटवून दिवाळीसाठीं कंदे तयार करण्याचा मला नाद असे. पुढें पुढें पांढऱ्या स्वच्छ जाड कागदावर जाळी खोदून सिलिंडरच्या आकाराचे पायलीचे कंदे मी तयार करीत असें. त्यांत बाहेरून चित्रें लावलेली कागदाची पायली कंदिलांत पणती लाविली म्हणजे फिरत असे. छत्रीचे अभ्रे शिवावयाला मी शिकलों होतों. लोखंडी सांगाडा असला, म्हणजे मेण व बिरदा यांच्या मिश्रणानें पावसाळ्यासाठीं मेणकापडी छत्र्या घरच्या मंडळीच्या उपयोगासाठीं मी करीत असें. अशा रीतीनें मी तयार केलेली छत्री बाबांनीं आपले यजमान बर्वे यांना दाखविली व त्यांनीं माझी तारीफ केली. याशिवाय माझा लहानपणचा आणखी एक उद्योग चातीवर कापसाचें सूत काढून त्याचीं जानवीं बनविणें हा होता. आळशी लोक जानवींजोड विकत घेत. आमच्या घरापुरतीं जानवीं आमची आम्हीच तयार करीत असूं.

आमच्या आगरांत आंब्याचें झाड मुळींच नव्हतें; पण उन्हाळ्यांत आंबे पिकूं लागले म्हणजे आम्ही रात्रीं व पहाटेला कंदील घेऊन आजू बाजूच्या पांचपंचवीस झाडांखालीं हिंडून पडलेले आंबे सांपडतील तेवढे टिपून आणीत असूं. सुमारें एक महिनाभर रात्रींचा हा उद्योग चालत असे. हीं झाडें अर्थात् लोकांच्या मालकीचीं होतीं. आम्ही मालकाच्या नजरेला पडलों, तर ते आम्हांवर रागें भरत; पण अशा रीतीनें आंबे नेणें फारसें गैर समजलें जात नसे.

शिमग्याच्या दिवसांत मुलांनीं होळीसाठीं लांकडें, गोवऱ्या व गवत चोरणें ही गोष्ट अगदीं साहजिक होती. शिवाय शिमग्यांत बारीक सारीक चोऱ्या करण्याला हरकत नाहीं, असा समज असे. केळवंड, नारळ, फणस

इत्यादिकांची चोरी क्वचित्प्रसंगीं शिमग्याच्या दिवसांत मीं केलेली आहे. कडव्याच्या ओल्या शेंगा चोरून आणाव्या व त्या मातीच्या मडक्यांत घालून त्यांचीं तोंडें बंद करून तीं मडकीं गवतांत भाजावीं व आंतल्या शेंगा वाफेनें चांगल्या शिजल्यानंतर त्या काढून खाव्या, हा उद्योग होळी आटोपल्यानंतर दहाबारा मंडळींच्या टोळ्या जमून ठिकठिकाणीं व्हावयाचा. असल्या व्यवसायांत माझे रिकामपणचे दिवस गेले.

# प्रकरण आठवें

## देशकार्याचें बाळकडू

हें बाळकडू मला पाजणारे माझे गुरुजी सोमण मास्तर होत. आमच्या गांवीं पांडुरंग दाजी बाळ नांवाचे एक गृहस्थ मोठे हुषार, कर्तबगार, सरकारीदरबारी कामांत शहाणे असे असत. त्यांजकडे बरींच वर्तमानपत्रें येत. यांचा व गुरुजींचा फार स्नेह जमला. मी रिकामा असल्यामुळें वर्तमानपत्रें वाचणें हा एक माझा वेळ घालविण्याचा मार्ग झाला. वर्तमानपत्रांतील कांहीं निवडक भाग गांवांतील लोकांना वाचून दाखविले असतां त्यांना सार्वजनिक प्रश्नांची बरीच माहिती करून देतां येईल असा विचार गुरुजींच्या मनांत आला, व या कामावर त्यांनीं माझी योजना केली. गुरुजींचा मी अगदीं आवडता शिष्य होतों. ते सांगतील तें काम मी बिनहरकत करावयाचा. या आमच्या संबंधामुळें लोक व इतर विद्यार्थी मला थट्टेनें 'कल्याण' म्हणत. गुरुजींना अर्थात् 'रामदास' म्हणत. पुढें आमचे आम्हीच परस्परांमधील पत्रव्यवहारांत त्या नांवांनींच सह्या करूं लागलों. श्रीदुर्गादेवीच्या देवालयांत लोकांची दर्शनाला जाण्याची वेळ सायंकाळीं पांच वाजल्यापासून दिवे लागण्यापर्यंतची असे. या वेळीं मीं वर्तमानपत्रें घेऊन देवळांत बसावें आणि वाचनाला सुरुवात करावी, व येणाराजाणारांनीं वाटल्यास कांहीं वेळ बसून ऐकावें असें चालत असे. हा क्रम महिन्यादोनमहिन्यांपलीकडे चालला नाहीं. पण हा माझा सार्वजनिक कामांतला पहिला धडा होता!

दुसऱ्या धडयापासून मला चांगलाच अनुभव मिळाला. गुरुजींच्या मनांत देशोद्धाराच्या अनेक कल्पना येत. त्या वेळीं 'सामाजिक भांडवलाच्या कंपन्या' या विषयाचा ऊहापोह वर्तमानपत्रांतून बराच चालला होता. गुरुजींच्या मनांत आपण हा अनुभव पहावा असें आलें, आणि त्यांनीं मुरुड गांवांत व्यापारोत्तेजक मंडळी स्थापन करण्याची खटपट केली. आपण अध्यक्ष झाले, व शाळेंतील एक शिक्षक श्रीयुत नाना सामल यांना चिटणीस केलें. परंतु पुढें लवकरच त्यांच्या ध्यानांत आलें कीं, सर-

कारी नोकरांनीं हीं कामें उघड करणें बरें नव्हे. म्हणून त्यांनीं श्रीयुत पांडुरंग दाजी बाळ यांना अध्यक्ष, व श्रीयुत गोविंद विनायक गद्रे यांना चिटणीस केलें. हीं नांवें दाखविण्याला मात्र होतीं; सर्व काम ते आपणच करीत. पांच रुपयांचा एकेक भाग याप्रमाणें सुमारें आठशें रुपयांचें भांडवल जमलें. या भांडवलावर एक दुकान चालविण्याचें ठरलें. कांहीं गृहस्थांनीं पांचपांच भाग घेतलेले होते. गांवांत खाजगी तऱ्हेनें चालविलेलीं दुसरीं तीनचार दुकानें होतीं, त्यांच्याच धर्तीवर हें दुकान सुरू झालें. गुरुजींचें बिऱ्हाड चिटणीस गद्रे यांच्या घराजवळ होतें. तेव्हां चिटणीसांच्या घरीं बाहेरच्या खोलींत व पडवींत हें दुकान मांडलें. मी या येळीं गांवांत रिकामटेंकडा होतों, तेव्हां दुकानदार मीं व्हावें, असें ठरलें. आमच्या घरीं घरगुती जमाखर्च ठेवण्याची वहिवाट होती, व माझे दादा या सुमाराला शिक्षकाच्या चाकरीवर गेले असल्यामुळें घरचा जमाखर्च मी लिहीत असें; पण दुकानाचें लिहिणें मला माहीत नव्हतें. मास्तरहि अगदीं अननुभवी होते; आम्ही जमाखर्च ठेवीत होतों, पण वेळच्यावेळीं शिल्लक तपासून पाहणें वगैरे गोष्टी नियमितपणें घडत नसत. उधार मालाचाहि जमाखर्च नीटपणें ठेवला जात नव्हता. मी दुकानांत असलों म्हणजे मीं माल विकावा, नसलों तर मास्तरांनीं अगर गद्रे चिटणिसांनीं विकावा, असें चालत असे. स्वदेशीविषयीं तीव्र भावना त्यावेळीं सर्वत्र पसरली नव्हती. देशी अगर विलायती माल जो सोयीचा पडे तो दुकानांत ठेवला जाई. मला दरमहा तीन रुपये पगार द्यावा, अशी गुरुजींची इच्छा होती; पण वर्षअखेर नफ्याचा हिशोब झाल्यानंतर ते पगार देणार होते. परंतु वर्षाअंतीं हिशेब केल्यावर असें आढळून आलें, कीं, नफा व्हावा तितका झाला नाहीं. तेव्हां भागीदारांना दरसाल दरशेंकडा नऊप्रमाणें व्याज दिलें व माझ्या कामाचा मोबदला म्हणून मला सव्वासहा रुपये दिले. पुढें हें दुकान मोठ्या कष्टानें आणखी सातआठ महिने चाललें. आपणाला हें काम उरकत नाहीं, असें पाहून तें बंद करण्याचें ठरलें. सवडीसवडीनें भागीदारांचे पैसे परत देण्यांत आले, कांहींच्या गळ्यांत उरलेला माल बांधला, व आणखी राहिलेला कमी दरानें विकून सर्व निरवानिरव करण्यांत आली. या कामांत गुरुजी, गद्रे व पांडुरंग दाजी यांचे पांचपांच भाग अंजी

बुडाले. बाकीच्यांचे परत देण्यांत आले. माझ्या अव्यवस्थितपणामुळें हा सर्व घोंटाळा झाला, ही गोष्ट मला खात असे. बाकीच्यांना जसा चट्टा बसला, तसा आपणहि आपणाला बसवून घ्यावा असा विचार मीं केला, व माझे मित्र श्रीयुत काशीनाथपंत काणे यांचे चुलते वे. दाजीबा काणे यांचे पांच भाग होते ते पंचवीस रुपये त्यांनीं मागूं नयेत असें मीं केलें, व कोणाला न कळवितां श्रीयुत भिकाजीपंत वैशंपायन म्हणून त्यांच्याच वयाचे गृहस्थ दुकानाच्या कामांत मला मदत करीत, त्यांच्या मध्यस्थीनें पावणोत्रा व्याजानें पंचवीस रुपयांचें कर्जखत मीं त्यांना लिहून दिलें. अशा रीतीनें गुरुजी मला चट्टा सोसूं देणार नाहींत, हें मला माहीत होतें; म्हणून ही गोष्ट मीं त्यांना कळविली नाहीं. काणे यांजकडे उधार माल पंचवीस रुपयांचा आहे म्हणून त्यांचे भागाचे रुपये परत द्यावयाला नकोत, असें मीं खोटेंच सांगितलें व तें पचूनहि गेलें. माझ्याजवळ त्या वेळीं पैसा नव्हता; पण हा पुढें थोडीफार चाकरी करून पैसे मिळवील व आपले पैसे फेडील, अशी काणे यांना खात्री वाटली. त्या वेळीं माझें वय १८ वर्षांचें होतें. ही रकम मीं पुढें इंग्रजी शिकत असतांनाच मॅट्रिक्युलेशनची परीक्षा होण्यापूर्वी शिकवण्या वगैरे करून पैसे मिळवून फेडली. मध्यंतरीं एकदां पांच रुपये दिले व पुढें पंचवीस दिले. अधिक झालेलें व्याज त्यांनीं माफ केलें.

# प्रकरण नववें

## सहाव्या इयत्तेची परीक्षा

सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला बसावयाला वयाचीं सतरा वर्षे पुरीं व्हावीं लागत. हीं पुरीं झाल्यानंतर या परीक्षेला जाण्याचा मीं बेत केला. परीक्षेची वेळ हल्लींप्रमाणेंच सप्टेंबर महिन्यांत होती, ती अतिशय गैरसोयीची असे. रत्नागिरी मुरुडाहून तीस कोस आहे. पावसाळ्याचे दिवस, व वाटेंत जिकडेतिकडे खाड्या; यामुळें रत्नागिरीस जाणें अशक्य असे. म्हणून मुरूडचे विद्यार्थी परीक्षेसाठीं मुंबईस जात. विद्यार्थ्यांनीं आपापल्या जिल्ह्यांत परीक्षेला बसलें पाहिजे, असा नियम पुढें झाला. या वेळीं विद्यार्थ्यांना वाटेल त्या ठिकाणीं परीक्षेला घेत. शिवाय मुंबईची परीक्षा रत्नागिरीपेक्षां सोपी, अशीहि विद्यार्थ्यांची समजूत असे. त्या वर्षी आम्ही पांच विद्यार्थी परीक्षेला जाणारे होतों. आंजर्ल्याच्या खाडींतील एक गलबत मुंबईस जावयाचें होतें, त्यांतून जाण्याचा आम्ही बेत केला. गलबत रात्रीं बारा वाजतां निघणार होतें. आम्ही आवशीलाच खाडीजवळच्या धर्मशाळेंत जाऊन बसलों. इतक्यांत पाऊस अतिशय जोराचा पडूं लागला व तो थांबण्याचें चिन्ह दिसेना. अर्थात् गलबत जाण्याचें राहिलें व आम्ही दुसऱ्या दिवशीं सकाळीं पावसाच्या टोंबांतून सहा मैल घरीं परत आलों. आमच्या गांवांतील खाडीलाच इतकें पाणी झालें कीं, मोठ्या कष्टानें ती उतरून आम्ही पार पडलों. पायरस्त्यानें मुंबईला जावयाचें म्हणजे रत्नागिरीसारखीच अडचण होती. जिकडेतिकडे उतार न होणाऱ्या खाड्या. आतां आमचें परीक्षेला जाणें बहुतकरून राहतें, असें सर्वांना वाटलें. साताऱ्च्या परीक्षेला अजून चार दिवस होते. कसें तरी करून अठरा कोसांवर असणारें चिपळूण गांठतां आलें तर पुढील रस्त्यावर नद्यांना जिकडे तिकडे पूल होते. पाऊस फारसा कमी झाला नव्हता, म्हणून आमच्या कोणाच्याच घरची मंडळी आम्हांला परवानगी येईना. शिवाय दीडकोसांवर कर्दे येथें राहणारा एक विद्यार्थी होता, त्याची परवानगी मिळवावयाची होती. आम्ही हट्ट करून परवानगी मिळविली आणि सर्वजण कर्दे येथील मुलाच्या घरीं वस्तीला गेलों. आतां पाऊस कमी झाला होता; पण तीन दिवसांत सातारा गांठावयाचा होता.

सर्वांना हें अशक्य वाटलें. कंदें येथील मुलाच्या घरची परवानगी मिळेना; तेव्हां आम्हीच निघालों व तो मुलगा आम्हांला पोहोंचवावयाला आला. सामानसुमानाशिवायच तूं आमच्या बरोबर चल, म्हणून आम्ही त्याला म्हटलें, व तोहि आम्हांबरोबर आला. दोनप्रहरीं सहा कोसांवर कुंभे[१] गांवीं आम्हीं दुपारच्या जेवणासाठीं मुक्काम केला. इकडे या मुलाच्या घरच्या मंडळींनीं ताडलें कीं, ज्या अर्थीं हा परत आला नाहीं, त्या अर्थीं हा परस्पर गेला असावा. तेव्हां त्याचा वडील भाऊ त्याचें सामानसुमान घेऊन निघाला व आमचीं जेवणें होऊन आम्हीं पुढें जावयास निघणार, तों त्यानें आम्हांला गांठलें. आम्हीं सर्वांनीं आपापलीं ओझीं पाठीशीं बांधलीं व जेवल्याबरोबर पुढें जाण्यास निघालों. आठ कोसांवर आम्हीं रात्रींचीं वस्ती केली. पुनः पहांटेला उठून उजाडल्याबरोबर आम्हीं चिपळूण गांठलें. तेथें आमच्या गांवचे एक गृहस्थ फौजदार होते, त्यांच्या घरीं आम्ही उतरलों. दोन-प्रहरची जेवणें करून थोडी विश्रांति घेऊन आम्ही पुनः निघालों. फौज-दारसाहेबांनीं आम्हांला ओझ्यासाठीं भाड्याचें एक घोडें करून दिलें. चिप-ळुणापासून पाटण अठरा कोस, व पाटणपासून सातारा अठरा कोस, इतकी मजल आम्हांला मारावयाची होती, व अवकाश काय तो दीड दिवस व दोन रात्री इतका होता. आम्ही कुंभार्लों घांटाच्या पायथ्याशीं जाऊन फराळ केला, व रात्रींची चारपांच तास झोंप घेऊन पहांटेला दोन वाजतां घांट चढूं लागलों. इतकें नेटानें चालण्याची आह्मांला संवय नव्हती. यामुळें आम्ही थकलों होतों; तथापि कसेंबसें करून एक वाजण्याच्या सुमाराला पाटण गांठलें. तेथें एका गृहस्थाच्या घरीं वाटसरूंना भोजन मिळत असे. तेथें जाऊन आम्ही स्नान करून जेवणखाण आटोपलें, तों तीनसाडेतीन वाजले. दुसऱ्या दिवशीं दहा वाजतां परीक्षेसाठीं हजर व्हावयाचें होतें, व अठरा कोसांचा प्रवास करावयाचा होता. परीक्षेला जाण्यासाठीं विद्यार्थी आले आहेत अशी शाळामास्तरांना खबर कळली, तेव्हां ते आम्ही उत-रलों होतों तेथे आले. त्या मंडळीनें आम्हांला अशी सल्ला दिली कीं, मोठ्या रस्त्यानें गेलें तर सातारा अठरा कोस आहे; परंतु पायवाटेनें खिंडी-तून धनगरसड्याच्या मार्गानें गेल्यास सहा कोसांचा हिसका वांचतो; आम्ही जलदी केली, तर काळोख पडण्यापूर्वी धनगरसड्यावर जाऊं, व मग पुढील

वाट तितकी वाईट नाहीं. आम्हीं सर्वांनीं लागलीच निघण्याची तयारी केली. या सर्व प्रवासांत एक आनंदाची गोष्ट एवढीच होती, कीं, पहिल्या सहा कोसांच्या पुढें आम्हांला पाऊस बिलकूल लागला नाहीं. आम्ही पाटणहून निघाल्यानंतर दोनतीन मैल कसेबसे ठीक गेलों; परंतु पुढें घोडें अगदीं थकलें. पाटणहून निघतांनाच घोडेवाल्यानें खूप आढेवेढे घेतले; परंतु आम्हीं त्याला जुलुमानें आमच्याबरोबर यावयाला लावलें. आम्हांला परीक्षेचा ध्यास लागला होता, त्यामुळें जरी आमचीं शरीरें थकलीं होतीं, तरी आमचीं मनें त्यांना जोर देऊन ओढओढून नेत होतीं. तसें उत्तेजन त्या बिचाऱ्या घोड्याला काय होतें! बोलूनचालून तें भाडेकरी घोडें. त्याला खाणें बेताचेंच मिळावयाचें. चिपळुणापासून पाटणपर्यंतच्या अठरा कोशांच्या प्रवासानें तें थकून गेलें होतें. एक काठी मारिली कीं, चार पावलें चालावें व पुनः थबकून उभें रहावें, असा क्रम त्यानें सुरू केला. आम्ही त्याला मारून चालविण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. आम्ही अर्ध्या खिंडींत आलों व काळोख पडला. एका बाजूला उंच कडा व दुसऱ्या बाजूला खोल दरी आणि मध्यें दोनएक हातांची अरुंद वाट व जिकडेतिकडे किर्र झाडी! अशा अडचणींत आम्ही सांपडलों. घोडेवाला आमच्या मूर्खपणाबद्दल व आम्ही आपल्याबरोबर त्याला संकटांत घातल्याबद्दल आमचें शब्दांनीं ताडण करीत होताच. मोठे धीट मनुष्यहि अशा वाटेनें रात्रीला जाण्याचें धाडस करावयाचे नाहींत; पण आम्हांला त्या वाटेची कांहीं कल्पना नव्हती. आम्ही घोड्याला मारमारून चालविण्याचा प्रयत्न केला. अखेरीला नाइलाज होऊन थकल्यामुळें तें घोडें खालीं बसलें, तें कांहीं केल्या उठेना! आम्ही त्या वेळीं स्वार्थ साधण्यासाठीं अतिशय निर्दयपणानें वागलों! आम्ही पांचजण व घोडेवाला पडला एकटा. त्यांतून तो तसा खाष्ट नव्हता. नाहीं तर तो इतक्या संध्याकाळीं खिंडींत शिरताच ना. किती मारलें तरी घोडें उठत नाहीं, हें स्पष्ट दिसून आलें. अशा अरण्यांत सबंध रात्र काढणें अशक्य होतें. घोडेवाल्याचें मन द्विधा होत होतें. घोड्याला टाकून जावें कसें व अरण्यांत थांबावें तरी कसें? अखेरीला तो आमच्याबरोबर पुढें जाण्याला तयार झाला. आम्हीं ओझीं पाठींगळीला मारलीं. घोडेवाला पुढें झाला. आम्ही

मागोमाग निघालों. वाट बिलकूल दिसेना. पांचपंचवीस पावलें चालल्या नंतर मधून एखाद्यावेळीं आकाश दिसावें व पुनः झाडीमध्यें लपून जावें, असें होत होतें. घोडेवाला माहीतगार होता, त्यामुळें आम्ही मोठ्या कष्टानें दहाअकरा वाजतां खिंडींतून बाहेर पडलों. जवळच धनगरसड्याचा माळ होता, तेथें धनगरांच्या चारदोन झोंपडया होत्या. त्यांच्या शेजारीं माळावरच आम्हीं मुक्काम केला. पहांटेला अतिशय वारा सुटला आणि थंडीनें आम्ही कुडकुडून गेलों. आम्हांला जर पुढील वाट माहीत असती, तर आम्ही तसेच पुढें चाललों असतों. आम्ही घोडेवाल्याला घेऊन पुढें गेलों असतों, पण तो येईना. दिसूं लागलें तेव्हां आम्ही पुढची वाट धरली. घोडेवाल्याला अधिक पैसे देऊन खुष करण्यालाहि आम्हांजवळ कांहीं नव्हतें! सातआठ रुपये एकेकाजवळ होते. तेवढ्यांत परीक्षेची एक रुपया फी, सातार्‍यांत जितके दिवस रहावें लागेल तितक्या दिवसांची खाणावळ व प्रवासाचे सर्व खर्च भागवावयाचे होते. तेव्हां आम्ही सातारपर्यंत ठरलेलें भाडें देऊन त्याला परत लावलें. त्या बिचार्‍याचें घोडें त्याला परत मिळालें, कीं रानांतच त्याला कोणीं हिंस्र पशूनें खाऊन टाकलें, कीं अतिश्रमानेंच तें निजधामाला गेलें, ईश्वर जाणे! या बरोबरीच्या चार विद्यार्थ्यांपैकीं दोघे अजून हयात आहेत. त्यांपैकीं कोणाची गांठ पडली कीं, त्या प्रसंगाची आठवण होऊन त्यावर संभाषण सुरू होतें, व अंगावर शहारे येतात!

आम्हीं त्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां सातार्‍याला जाऊन पोहोंचण्याची जी खटपट केली, ती व्यर्थ गेली! आम्हांला सातार्‍याला पोहोंचण्याला संध्याकाळचे पांच वाजले. आमचे एक ग्रामस्थ तेथें कलेक्टराच्या कचेरींत कारकून होते, त्यांजकडे आम्हीं बिर्‍हाड ठेवलें व जेवणाची सोय खाणावळींत केली. परीक्षेला दोनतीनशें विद्यार्थी होते. त्यांचीं नांवें नोंदण्यांतच तो दिवस गेला होता, व खर्‍या परीक्षेला सुरुवात झाली नव्हती. नांवें नोंदून झाल्यावर जर वेळ उरला, तर निबंध लिहावयाला देण्याची वहिवाट असे; पण या वर्षीं तसें झालें नव्हतें. हें ऐकून आम्हांला धीर आला. आमच्या ग्रामस्थांनीं परीक्षेच्या अध्यक्षांची गांठ घेतली व आमची हकीगत त्यांच्या कानीं घातली, तेव्हां आम्हांला परीक्षेला घेण्याचें त्यांनीं

कबूल केलें. दुसऱ्या दिवशीं दहा वाजतां आम्ही परीक्षेच्या ठिकाणीं गेलों. मी नांव नोंदून घेण्यासाठीं पुढें झालों, तेव्हां माझी मूर्ति पाहिल्याबरोबरच त्या सर्वांना मी वय खोटें सांगतों, असें वाटलें. कमिटीनें माझ्याबरोबरच्या चार विद्यार्थ्यांचीं नांवें नोंदलीं, व मला परीक्षेला बसूं दिलें नाहीं. मीं शाळेंतला वयाचा दाखलाहि नेला होता, पण त्याकडे कोणीं पाहिलें नाहीं. मी इतका ठेंगणा व कृश दिसें, कीं पंधरा वर्षांहून अधिक वर्षें मला खास नाहींत, असें कोणालाहि वाटावें. परीक्षकांना परीक्षा सुरू करण्याची घाई होती, तेव्हां त्यांनीं मजकडे अधिक लक्ष न देतां "तुला परीक्षेला घेत नाहीं," असें मला सांगून ते पुढील उद्योगाला लागले !

झालें ! माझ्या सर्व आशेचा भंग झाला ! पुनः गांवीं परत जाऊन रिकामटेंकडें हिंडत रहाणें माझ्या कपाळीं आलें. मी भित्रा मुखदुर्बळ म्हणून मला या वेळीं परीक्षेला घेतलें नाहीं. हा माझा भित्रेपणा व मुखदुर्बळपणा मला माझ्या आयुष्यांत पुष्कळ ठिकाणीं नडला, व अजूनहि नडतो !

पूर्वी घडून आलेला आणखी एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. पांडुरंग दाजी बाळ हे आमच्या गांवचे कर्ते पुरुष होते. अशांना विरोध करणारा एक पक्ष असावयाचाच; तसा तो आमच्या गांवींहि होता. या दुसऱ्या पक्षांतील एक गृहस्थ दापोली येथें वकील होते. त्यांनीं कंपनीच्या दुकानांतले पांच भाग घेतले होते. हे गृहस्थ कधींकधीं दुकानांत येऊन अधिकउणी विचारपूस करीत; हेतु हा कीं, पांडुरंग दाजी व त्यांचे स्नेही यांनीं चालविलेल्या उद्योगांत कांहीं दोष काढून टवाळी करावी. दोष हवे तेवढे होते. एकदां त्यांनीं दुकानांत येऊन घटकाभर अनेक प्रश्न विचारून व जमाखर्च पाहून व त्यांतले दोष काढून मला अगदीं घाबरवून सोडलें, व मी रडूं लागलों. मला कांहीं न विचारतां मास्तर व बाळ यांनाच काय तें विचारा, असें मीं सांगितलें असतें म्हणजे माझें काम झालें असतें. पण हा विचार मला सुचावा कसा ? हे शब्द माझ्या तोंडून निघावे कसे ? माझी अवस्था पाहून ते निघून गेले. संध्याकाळीं ही हकीगत गुरुजींजवळ सांगतांना पुनः मला रडूं कोसळलें. माझ्यामध्यें प्रसंगावधान अगदीं नाहीं.

एक प्रकारचा भित्रेपणा व एक प्रकारचा धीटपणा यांचा चमत्कारिक तऱ्हेचा मिलाफ मजमध्यें झालेला आहे. एकादें पाठ केलेलें भाषण सभेंत बोलून दाखविण्याला अगर तयार असलेल्या विषयांची परीक्षा परीक्षक घेत असतील तर त्यांजपुढें उत्तरें देण्याला मी भीत नसें; पण ज्या ठिकाणीं प्रसंगावधानानें उत्तरें द्यावयाचीं असत, त्या ठिकाणीं माझी अगदीं तिरपिट उडून जाई. वयानें मोठ्या व अपरिचित मनुष्यांपुढें मी गेलों कीं, माझी गाळण उडालीच. एकाद्या मोठ्या मनुष्याला निरोप सांगावयाचा असला, तरी मला भीति वाटे. माझ्या भित्रेपणाचे आणखी एकदोन प्रसंग पुढील भागांत येतील.

या प्रसंगीं जर एकादा धीट मुलगा असता, तर त्यानें परीक्षकांच्या कमिटीला आपलें नांव नोंदावयाला भाग पाडलें असतें. वय अगदीं खरेंखरें सांगितलेलें होतें व त्याबद्दल शाळेच्या मास्तरांच्या सहीचा दाखला होता. "परीक्षेला घेत नाहीं," हे त्यांच्या तोंडचे शब्द ऐकल्याबरोबर मी गर्भगळित झालों. ही माझी अवस्था पाहून दाखला खोटाच असावा, असा त्यांचा समज अधिक दृढ झाला, व ते एकदम आपल्या उद्योगाला गेले, व मी हिरमुसला होऊन परत बिऱ्हाडीं आलों. पहिल्याच दिवशीं अंकगणिताची परीक्षा झाली व लागलाच दुसऱ्या दिवशीं निकाल सांगून त्या विषयांत पास झालेल्या विद्यार्थ्यांची पुढें परीक्षा सुरू झाली. मजबरोबरचे चारहि विद्यार्थी गणितांत नापास झाले होते. आम्ही सर्वच नाउमेद झाल्यामुळें शहर पाहण्याच्या वगैरे नादाला न लागतां आल्या वाटेनें तसेच मागें फिरलों. खिंडींत आलों, तेव्हां पहिला प्रसंग मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभा राहिला. या वेळीं अर्थात् दिवस होता. त्या प्रसंगांतून आम्ही कसे निभावलों याचें मला अजून आश्चर्य वाटतें.

मी घरीं येऊन पुनः पूर्वक्रम सुरू झाला. त्या वेळचें माझ्या क्षितिजावरचें महत्त्वाकांक्षेचें अत्युच्च शिखर म्हणजे सहाव्या इयत्तेची परीक्षा देऊन ट्रेनिंगांत जाणें व तेथून पहिल्या प्रतीचें सर्टिफिकिट मिळवून मास्तर होऊन बाहेर पडणें, हें होतें. तेव्हां पुनः सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला वारी करण्यावांचून दुसरा मार्ग नव्हता. परीक्षेचे दिवस जवळ आले, तेव्हां परीक्षेला कोठें जावें, हा एक प्रश्न येऊन पडला. मुंबईला जावयाचें म्हणजे गलब-

ताच्या स्वाधीन, अर्थात् अनिश्चित. त्यावेळीं आगबोटी आठवड्यांतून दोनदां जात असत, पण त्या दिवाळीनंतर; व परीक्षा सप्टेंबर महिन्यांत होई. तेव्हां गलबतांतूनच जावें लागे. सातार्‍याला पुनःहि परीक्षेला घेणार नाहींत, ही भीति. या वर्षी माझ्याहून बाराचौदा वर्षांनीं वडील असे माझे चुलत बंधु गंगाधरपंत कर्वे यांना परीक्षेसाठीं जावयाचें होतें. हे एका खेडेगांवच्या शाळेचे मास्तर होते. त्या वेळी शाळाखात्याचें असें सर्क्युलर निघालें होतें कीं, नवीन सुरू झालेल्या सहाव्या इयत्तेची परीक्षा जे पास होणार नाहींत त्यांना बढती मिळावयाची नाहीं. त्यामुळें तीसपस्तीस वर्षे वयाच्या कांहीं मास्तरांना सुद्धां परीक्षेला जावें लागत होतें. गंगाधरपंत एकदोन वेळां नापास झाले होते, व आतां त्यांना पुनः शेवटचा प्रयत्न करावयाचा होता. ते शाळेंत असतांना मुरुडाला जे मास्तर होते, ते या वेळीं कोल्हापुरच्या ट्रेनिंग कॉलेजांत शिक्षक झाले होते. तेव्हां त्यांच्या ओळखीनें कोल्हापुराला परीक्षेसाठीं जावें असा गंगाधरपंतांनीं बेत केला, व मीहि त्यांजबरोबरच जाण्याचें ठरविलें. मागील वर्षांचा अनुभव होता, म्हणून त्या वर्षी आम्ही परीक्षेच्या अगोदर बरेच दिवस निघालों, व चिपळुणावरून कर्‍हाडाच्या मार्गानें कोल्हापुराला जाऊन पोहोंचलों. आपलें सामानसुमान पाठीवर बांधून दररोज सुमारें पंचवीस मैलांचा प्रवास आम्हीं करीत असूं. येथें एकेका विषयाची परीक्षा घेऊन तेवढा निकाल करून राहतील त्यांचीच पुढील परीक्षा घेत. असें शेवटच्या विषयापर्यंत करीत. आमची परीक्षा संपण्याला वीसपंचवीस दिवस लागले. आम्ही दोघेहि पास झालों. गंगाधरपंत हे भाविक गृहस्थ आहेत. मिरजेला त्यांचा एक मित्र होता, तेव्हां मिरज, औदुंबर, नृसिंहवाडी वगैरे ठिकाणीं जाण्याचें त्यांनीं ठरविलें. अर्थात् मीहि त्यांजबरोबर गेलों. हें सर्व आटोपून आम्हीं आपल्या गांवीं येण्यासाठीं परत फिरलों. नरकचतुर्दशीच्या रात्रीं आम्हीं कर्‍हाडला वस्ती केली. कर्‍हाडच्या एका श्रीमंत गृहस्थाच्या घरचे दोन मुलगे कोल्हापुरास इंग्रजी शिकावयाला असत. ते घोड्यावर बसून सुट्टीचे घरीं चालले होते. त्यांची सहजीं वाटेंत गांठ पडली. गंगाधरपंत हे बोलके असल्यामुळें त्यांनीं त्यांची विचारपुस केली व ते कर्‍हाडलाच जाणार असल्यामुळें आमची रात्रींची वस्तीची सोय करण्याबद्दल त्यांनीं गोष्ट काढली व ती आनंदानें

मान्य करण्यांत आली. अर्थात् आम्ही त्यांजकडेच वस्ती केली. *पहांटेचें नरकचतुर्दशीचें स्नान आम्ही गंगेवर केलें. ज्यांच्याकडे आम्ही उतरलों होतों त्यांनीं दिपवाळीचा फराळ केल्याशिवाय अगोदर निघूं नये, असा आग्रह केल्यावरून फराळ उरकून आम्ही पुढील प्रवास सुरू केला. हा परत जाते वेळचा प्रवास आम्हीं फार जलदीनें केला. भाऊबिजेच्या दिवशीं मुरुडास जाऊन पोहोंचावयाचें, असा बेत केला. मधले मुक्काम माझ्या लक्षांत नाहींत; पण प्रतिपदेच्या रात्रीं आम्हीं चिपळुणापासून तीन कोसां-वर घाटाखालीं कान्हें म्हणून गांव आहे तेथें वस्ती केली. या गांवीं गंगा-धरपंत पूर्वी मास्तर होते. तेव्हां तेथील मंडळीला भेटून नंतर पुढें जावें, अशा हेतूनें ते तेथें गेले. मी फार थकल्यामुळें लागलाच निजून गेलों. त्यांनीं मात्र आपल्या मंडळींत कांहीं भक्तिपर पदें वीण्याच्या सुरांत म्हणण्यांत व गप्पा मारण्यांत बहुतेक रात्र घालविली. नंतर आम्ही पहांटेला तीनचार वाजतां निघालों ते एकसारखे बेचाळीस मैल चालून भाऊबिजेच्या रात्रीं अकरा वाजतां घरीं जाऊन पोहोंचलों. मध्यंतरीं दोनतीन वेळां फराळ करून प्रत्येक वेळीं तासाअर्धातासाची विश्रांति घेतली. घरीं गेल्यावर भाऊ-बीजेचें ओंवाळणें व फराळ होऊन नंतर कुटुंबांतील मंडळींत प्रवाससंबं-धानें थोडें संभाषण होऊन निजावयाला गेलों.

गंगाधरपंत हे सत्त्वगुणाचे पुतळे आहेत. शरीरकष्टांसंबंधानें त्यांचा पहिला नंबर. रात्रींचा प्रवास करणें हें यांच्या अंगवळणीं पडलेलें आहे. हे मुरुडापासून सहा कोसांवर केळशी गांवीं बरेच दिवस मास्तर होते. तेथेंच त्यांचा लग्नाचा योग जुळला व हल्लीं पेन्शन् घेऊन ते तेथेंच आपल्या श्वशुरगृहीं रहातात. मुरूड व केळशी यांमध्यें त्यांच्या किती तरी

*कित्येक गोष्टी सहजीं अशा कांहीं चमत्कारीक रीतीनें घडून येतात कीं त्यांत कांहीं अमानुष योजना असावी, असें भोळ्या माणसाला वाटावें. वरील वाक्य लिहून होतें तों रात्रीचे आठ वाजले; इतक्यांत पार्वतीबाई आल्या व “ आज मला शिक-विण्याला वेळ आहे का ? ” असें म्हणाल्या. मी लागलेंच लिहिणें बंद केलें, व त्यांना शिकवूं लागलों आणि पहांटेला आश्रमांत नरकचतुर्दशीच्या स्नानांची गडबड चालली आहे, अशा वेळीं पुढील वाक्यें लिहावयाला बसलों; तेव्हां झटदिशीं हा मेळ माझ्या लक्षांत आला.

खेपा होतात. मध्यरात्रीं मुरुडाहून निघावें व सूर्योदयाला केळशीला जावें, अगर तिनीसांजा केळशीहून निघावें व मध्यरात्रीं मुरुडाला यावें, असें त्यांनीं किती वेळां तरी केलेलें आहे. यामुळें यांना त्यांची मित्रमंडळी ‘ निशाचर ’ म्हणत. हे आतां सत्तर वर्षांचे आहेत, पण अजून असा प्रवास करितात. यांची ओढ नसती तर मीं हा परत येते वेळचा प्रवास इतक्या जलदीनें केला नसता. यांना भाऊ अगर बहीण नसल्यामुळें आम्हां भावंडांवर यांचें विशेष प्रेम असे, व तें अजूनहि तसें आहे. मी कोंकणांत गेलों कीं, एकदोन दिवस ते मुरुडाला येऊन मजबरोबर अधिक-उणें बोलून मग जावयाचे. भाऊबिजेसाठीं मुरुडाला जावयाचेंच, असा त्यांनीं नेट धरला व तो आम्हीं शेवटल्या दिवशीं बेचाळीस मैल चालून तडीला नेला. या गंगाधरपंतांनीं जुने कागदपत्र चाळून पूर्वजांची संगतवार हकीगत जुळवून देण्याच्या कामीं मला फार मदत केली.

## द्वितीयावृत्तीचेवेळीं लिहिलेली पुरवणी

[ ह्या ठिकाणीं गंगाधरपंतांबद्दल आणखी थोडी माहिती दिली पाहिजे. ते वारल्याला आतां पांच वर्षें झालीं आहेत. नवीन काळाला अनुसरून त्यांनीं आपली मुलगी काशी हिच्या लग्नाचा विचार बाजूला ठेवून तिला मुरूड येथें मुलांच्या शाळेंत घातलें. त्याच शाळेंतून ती रत्नागिरी येथें सातव्या इयत्तेच्या परिक्षेला गेली. जिल्ह्यांतल्या मुलांमध्यें तिचा नंबर दुसरा आला. गंगाधरपंत वारल्यानंतर त्यांच्या पत्नीनें मुलीला पुण्यांतील स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजांत घातलें. तेथें तिचा नेहमीं पहिला नंबर असे. तिला तिसऱ्या वर्षाचें सर्टिफिकीट मिळून ती आतां मुंबईत नव्या वाडींतील मुलींच्या शाळेवर शिक्षकिणीचें काम करीत आहे. काशीबाई हुषार असून आणखी शिकण्याची तिची उमेद आहे. घरीं अभ्यास करून येत्या जून मध्यें इंग्रजी सहाव्या इयत्तेंत बसण्याचा तिचा हेतू आहे. आजच्या प्रगतीचा विचार केला असतां झालें ह्यांत कांहीं विशेष नाहीं असें वाटेल. परंतु इंग्रजी न शिकलेल्या खेडेगांवांतल्या अगदीं जुन्या मताच्या गृहस्थानें वृद्धापकाळांत आपल्या मुलीचें लग्न न करितां तिला मुलांच्या शाळेंत घालून सातव्या इयत्तेचें शिक्षण द्यावें ही गोष्ट कौतुक करण्यासारखी आहे.

या साताऱ्याच्या व कोल्हापुरच्या प्रवासाप्रमाणें पाठीवर बोजा मारून चालण्याचा प्रसंग मला पुढें फक्त एकदांच आला. या वेळीं माझ्या गांठो-ड्यांत अगदीं नेमकें सामान असे, म्हणजे नेसावयाचें व पांघरावयाचें धोतर, मुकटा, तांब्यापंचपात्री, अभ्यासाचीं पुस्तकें, व पोहे, दशम्या, थालीपीठ, फोडणीच्या मिरच्या, लोणचें वगैरे फराळाचें बरेंचसें सामान. वाटेंत जेवणें किती मिळतात आणि किती नाहीं, याचा नियम नसे. या-मुळें ही सामुग्री बरीच घ्यावी लागे. याशिवाय बरोबरचें सामान म्हणजे एक घोंगडी व एक छत्री. पाऊस असला म्हणजे घोंगडीची खोळ करून घ्यावयाची. रात्रीला तिचा अंथरावयाला उपयोग होई. डोकीचा मोठा चौकोनी रुमाल रात्रीचा पांघरावयाला उपयोगीं पडे. ]

---

# प्रकरण दहावें

## इंग्रजी शिकण्याची संधि

साताऱ्याहून परत आल्यानंतर सुमारें दोन महिन्यांनीं आमच्या गांवीं लहानशी इंग्रजी शाळा सुरू झाली. पांडुरंग दाजी बाळ यांचा माझ्याहून दोनतीन वर्षांनीं लहान असा एक मुलगा होता. त्याची मराठी पांचवी इयत्ता होऊन त्याला इंग्रजी शिकवण्यासाठीं काय करावें, या विचारांत ते होते. गुरुजींनीं त्यांना युक्ति सुचविली कीं, एकादा शिक्षक मुरुडांत आणल्यास दुसऱ्या कित्येक मुलांनाहि इंग्रजी शिकण्याला संधि मिळेल. हा विचार त्यांना पटला. शिक्षकानें पांडुरंग दाजींच्या घरींच रहावें, जेवावें व त्याबद्दल त्यांनीं कांहीं देऊं नये आणि इतर मुलांकडून एकेक रुपयाप्रमाणें जी फी मिळेल ती त्यानें पगार म्हणून घ्यावी, अशी योजना होऊन मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिकलेले एक गृहस्थ मुंबईहून आणविले, व मंडलिकांच्या गोठ्याच्या माडीवर आमची इंग्रजी शाळा सुरू झाली. अशा रीतीनें वयाला सतरा वर्षें व सहा महिने झाल्यावर मी ए, बी, सी शिकूं लागलों. ही संधि जर मला मिळाली नसती, तर मी या वेळीं बहुधा कोठें तरी मराठी शाळामास्तराचें काम करतांना आढळलों असतों. ही शाळा दोन वर्षें चालली व पंधरासोळा मुलांना आयुष्याची निराळी दिशा लागली. या वेळचे माझ्याबरोबरीचे हल्लीं पुढें आलेले गृहस्थ म्हणजे प्रख्यात प. वा. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांचे पुतणे श्रीयुत शिवराम गंगाधर मंडलिक हे होत. हे हल्लीं मुंबई इलाख्याच्या उत्तर-भागांत असिस्टंट कमिशनर आहेत.* बाकीच्यांपैकीं बरीच मंडळी ट्रेनिंग कॉलेजांत जाऊन मास्तर व्हावयाची, ती अधिक किफायतीच्या कारकुनांच्या वगैरे जागांवर आहे.

साताऱ्याला सहाव्या इयत्तेच्या परीक्षेला जाऊन परत आल्यानंतर ही शाळा सुरू झाली. कोल्हापुरची परीक्षेची फेरी या इंग्रजी शाळेंत असतां-नाच झाली. पण परत आल्यावर मी पुनः शाळेंत जाऊं लागलों. दोन

---

* हल्लीं हे पेनशनर असून मुंबईस राहतात.

वर्षांत तीन इयत्ता पदरांत पडल्या, पण पुढें काय! तिसरी इयत्ता तीन महिन्यांनीं संपणार, तोंच मी पुढला विचार करूं लागलों. या वेळीं गुरुजींची बदली गुहागर गांवीं झाली होती. इंग्रजीचा अभ्यास पुढें करण्यासाठीं मी बाहेर जावें म्हणून गुरुजींनीं पुष्कळ उचल केली. "प्रसंग आला असतां मी थोडी मदत करीन," असेंहि आश्वासन त्यांनीं दिलें होतें; पण या मदतीचें कारण पडलें नाहीं. हा वेळपर्यंत आमच्या बाबांनीं कर्ज म्हणून कधीं काढलें नव्हतें. पण माझ्या शिक्षणासाठीं जरूर पडल्यास मामांकडून थोडें कर्ज काढावें असा विचार त्यांनीं केला, व ओझ्यासाठीं एक गडी बरोबर देऊन ऑगस्ट महिन्यांत रत्नागिरीस जाण्यासाठीं त्यांनीं माझी रवानगी केली. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें मी पायवाटेनें चालतच गेलों. पुढें आगबोटी सुरू झाल्या असत्या, पण अगोदर जाण्यांत माझा हेतु हा होता कीं, तिसऱ्या इयत्तेचे दोन महिने तरी हायस्कुलांत काढायला मिळावे. हा माझा हेतु साधला व वार्षिक परीक्षेंत माझा नंबर पांचांच्या सुमारानें आला. रत्नागिरीस माझ्या ओळखीचें कोणी नव्हतें. माझे मराठी शाळेंतील साहाध्यायी रामभाऊ जोशी हे त्यांचे मावसे श्रीयुत वामन आबाजी मोडक यांजकडे इंग्रजी शिकावयाला गेलेले होते. त्यांची अशी सोय झाल्यामूळें त्यांना सहाव्या इयत्तेकडे वळावें लागलें नाहीं. मी प्रथम रामभाऊंच्या ओळखीनें वामनरावजी मोडक यांजकडेच उतरलों, व महिना पंधरा दिवस तेथें राहून नंतर दुसऱ्या कांहीं विद्यार्थ्यांच्या शेजारीं बिऱ्हाड केलें, व खाणावळींत जेवावयाला जाऊं लागलों. रत्नागिरीस मी सुमारें सहा महिने होतों. चवथ्या इयत्तेंत जाऊन दोनतीन महिने होतात, तों मी तापानें आजारी पडलों व घरीं आलों. रत्नागिरीस मला एक स्कॉलरशिप मिळूं लागली होती. दरमहा दोन रुपये मिळत. पैकीं दीड रुपया फीला जाई. तापानें मला बरेच दिवस कुचंबविलें व त्यांतून बरा होतों तो चातुर्थिक ज्वर सुरू झाला. तीन दिवस बरें असावें, पण चवथ्या दिवशीं नेमक्या वेळीं ताप येई. माझें इंग्रजी शिकणें पुनः मागें पडलें; तरी तें मीं अगदीं सोडलें नव्हतें. रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांचे पुतणे धोंडोपंत मुंडालिक हे त्या वेळीं प्रकृति नीट नसल्यामुळें घरीं आलेले होते. ते बी. ए.-च्या परीक्षेंत नापास झालेले होते. त्यांच्याजवळ इंग्रजी चवथ्या इयत्तेचीं

पुस्तकें ' सॅन्डफर्ड ॲण्ड मर्टन ' व ' इलियड ' हीं वाचूं लागलों. पावसाळा आला तरी मला चातुर्थिक ज्वरानें सोडलें नव्हतें, तेव्हां अर्थात् माझें इंग्रजी शिकावयाला जाणें रहित झालें. इतक्यांत मुरूडच्या मराठी शाळेंत शिक्षकाची एक जागा रिकामी झाली. पगार दरमहा पांच रुपये होता. ही जागा शाळामास्तर मला देत ना. माझा हेतु चारपांच महिने काम करून कांहीं पैसे शिल्लक टाकावे व दिवाळीनंतर इंग्रजी शिकण्याला जावें असा होता. मास्तर ती जागा कायम राहणाऱ्या मनुष्याला देणार होते. शेवटीं धोंडोपंत मंडलिकांनीं माझ्यासाठीं मास्तरांना भीड घातली व त्यांनीं मला शिक्षक नेमलें. हे मास्तर नवे होते म्हणून अडचण पडली. सोमण मास्तर असते, तर तेव्हांच काम झालें असतें. शाळा सकाळीं व संध्याकाळीं असे. सात तास शाळेचें काम करून राहिलेल्या दोन प्रहरच्या वेळांत मी मंडलिक यांच्याजवळ इंग्लिश शिकत असें. अशा रीतीनें घरींच चवथी इयत्ता पुरी करून माझे सहाध्यायी मुंबईत रॉबर्ट मनी स्कुलांत शिकत होते त्यांज़बरोबर मुंबईला जाऊन नवीन वर्ग सुरू होण्याबरोबर मी पांचव्या इयत्तेंत जाऊन बसलों. मुरूडची पुष्कळ मंडळी मुंबईला असत. मुरूडच्याच विद्यार्थ्यांनीं मिळून एक खोली घेतली होती. जेवावयाला मुरूडच्या नागोपंत दातारांनीं नुकतीच खाणावळ घातली होती, तींत जात असें.

पुढील तीन वर्षे अभ्यास निर्वेध झाला. लवकरच माझे मित्र परशुरामपंत दामले हे ट्रेनिंग कॉलेजांतून सुटून मास्तर होऊन मुंबईला आले. त्यांनीं मुगभाटांत आंग्र्याच्या चाळींत बिऱ्हाड केलें; व त्यांच्या घरीं मी राहूं लागलों. ते, त्यांची बायको, त्यांचे दोघे बंधु व मी इतकीं माणसें त्या लहानशा दोन खोल्यांत रहात असूं. त्यांतलीच एक खोली स्वयंपाक घराऐवजीं होती. आम्ही ग्यालरींत निजत असूं. या चाळींत राहत असतां माझी गाणें ऐकण्याची हौस आपोआप पुरली. चाळीसमोर मुगभाटच्या रस्त्यावर एका शोकी गृहस्थाचें एक मोठें घर होतें. या घरीं दर शनिवारीं नायकिणीचें गाणें होत असे. बहुधा त्या वेळची सुप्रसिद्ध कृष्णी झुलपी व तिची मुलगी श्यामी यांना बोलावीत. रात्रीं एक झोंप झाल्यानंतर मधुर आवाजांनींच आम्ही जागे होत असूं. रात्रीच्या शांत वेळीं गाण्याचे मोहक स्वर स्पष्ट ऐकूं येत. एकादें पद ध्यानांत रहावें व आठवडाभर त्याच्या

लकेऱ्या माराव्या, असेंहि होत असे. तथापि ही आवड पुरविण्यासाठीं मी कधींहि गाण्याला अगर कीर्तनाला गेलों नाहीं. मी एकमार्गी असल्यामुळें आपला अभ्यास व आपण यापलीकडे मी फारसें लक्ष्य देत नसें.

मनी स्कुलांत गेल्यावर लवकरच माझ्या भित्रेपणामुळें मजवर एक प्रसंग गुदरला. या शाळेंत दर दोन महिन्यांनीं परीक्षा होत, व परीक्षेच्या नंबरांप्रमाणें स्कॉलरशिपा देत. पांचव्या इयत्तेंत सहा, पांच व चार रुपये अशा तीन स्कॉलरशिपा होत्या. या दरमहाच्या नसून प्रत्येक परीक्षेनंतर एकदां मिळावयाच्या असत. या वर्गांत आठवड्यांतून एकदां घरीं कॉपी लिहून शाळेंत नेऊन दाखवावयाची असे. गणित, इतिहास वगैरे विषयांना जसे शंभर मार्क असत, तसे इंग्रजी कॉपीलाहि शंभर मार्क ठेविले होते. माझें अक्षर अतिशय वाईट, त्यामुळें मला स्कॉलरशिप मिळण्यांत अडथळा येईल, असें मला दिसून आलें. म्हणून मीं अक्षर सुधारण्याचा नेटानें प्रयत्न केला व तो कांहींसा साधला. चवथ्या इयत्तेंतले स्कॉलरशिप मिळविणारे जे विद्यार्थी पांचवींत चढून आले होते, त्यांना असें दिसून आलें कीं, हा आपल्या बरोबर स्कॉलरशिपच्या कामांत चढाओढ करणार. त्यांची मजवर बारकाईची नजर होती. माझ्या पहिल्या कॉप्या फारच वाईट आल्या होत्या व त्यांवर एफ् (F) असा शेरा मिळाला होता, व या वेळची कॉपी बरी निघून तिजवर जी (G) असा शेरा मिळाला. दोन महिन्यांतले शेरे एकत्र करून त्यांजवरून मार्क देत असत. परशुरामपंत दामले यांचे बंधु माझ्या वर्गांत होते, त्यांचें अक्षर चांगलें होतें. दामले यांनीं मला कॉपी काढून दिली असली पाहिजे, असा प्रतिस्पर्धी मुलांनीं तर्क केला. जॅकसनसाहेब आमच्या कॉप्या पहात, व इंग्रजी कविता शिकवीत. कॉप्या पाहून झाल्यावर ते आपल्या टेबलावरच त्या ठेवीत व नंतर इंग्रजीच्या तासाला मुलें आलीं म्हणजे त्या परत देत. मध्यंतरीं ते कोठें गेले म्हणजे एखादा धीट मुलगा अगोदरच जाऊन आपणाला व दुसऱ्या कित्येक मुलांना काय शेरा मिळाला तो पाही. माझ्या एका प्रतिस्पर्धी मुलानें मला 'जी' मिळालेली पाहिल्याबरोबर मीं लबाडी केली असावी, असें त्याला वाटलें व ती उघडकीला आणण्यासाठीं त्यानें कंबर बांधली. इंग्रजीच्या तासासाठीं मुलें जमल्याबरोबर कॉप्या परत देणार, तों

हा मुलगा उठला व त्यानें माझी व दामले यांची अशा दोन्ही कॉप्या जॅकसनसाहेबांना दाखविल्या. त्यांची मुद्रा उग्र होती व ते फार कडक असल्याबद्दल मुलें बोलत असत. त्यांनाहि तसाच संशय आला व त्यांनीं मला उभें केलें. त्यांच्या वर्गांत मराठी कोणीं बोलावयाचें नाहीं, इंग्रजींतच बोललें पाहिजे, असा नियम असे. मराठींत बोलावयाचें असतें तरी माझ्या तोंडून शब्द निघाले असते कीं नसते, ह्याबद्दल शंकाच आहे! त्यांनीं दामले यांना विचारतां आपण कॉपी काढून दिली नाहीं असें त्यांनीं सांगितलें. तथापि त्यांना तें खरें वाटेना. मी तर घाबरून गेलों व तोंडांतून शब्द निघेना. साहेबांनीं एका मुलाला पाठवून वेताची छडी आणविली व आतिशय रागानें मला जवळ बोलावून हात पुढें करण्यास सांगितलें. वयाच्या एकविसाव्या वर्षी असल्या अपराधाबद्दल सगळ्या वर्गा-समक्ष अशी शिक्षा भोगावी लागणार, अशा स्थितींत माझ्या अंतःकरणांत जें काहूर उठलें त्याचें वर्णन शब्दांनीं करणें अशक्य आहे! अशा स्थितींत नशीबाला बोल लावण्यासाठीं मीं आपल्या कपाळाला हात लावला व तोच छड्या घेण्यासाठीं पुढें केला. या अंगविक्षेपाकडे साहेबांचें लक्ष गेलें, व मी कदाचित् निरपराधी असेन अशी शंका त्यांना आली. 'तूं पुनः कॉपी काढून दाखवितोस काय?' असा इंग्रजींत त्यांनीं मला प्रश्न केला व मीं 'होय' असें त्याचें उत्तर दिलें. तेव्हां लागलेंच वर्गांत जाऊन वर्गाच्या शिक्षकासमक्ष कॉपी काढण्यास त्यांनीं मला पाठविलें. मी घाबरलों होतों, त्यामुळें कॉपी तितकी चांगली आली नाहीं; तथापि पहिल्यानें ज्या अगदीं वाईट कॉप्या लिहिलेल्या त्याच वहीवर होत्या त्यांपेक्षां कितीतरी चांगली आली. त्यामुळें कॉपी मला कोणीं काढून दिलेली नसून माझी मींच काढली असें सिद्ध झालें व तो प्रसंग टळला. माझ्या अंगीं प्रसंगा-वधान अगदीं नाहीं. 'मी येथें कॉपी काढून दाखवितों,' एवढे शब्द जर आरंभींच धैर्यानें उच्चारले असते, तर सर्व कांहीं ठीक झालें असतें. परंतु माझ्या भित्रेपणाला अजूनपर्यंत औषध मिळालेलें नाहीं.

मला पांचव्या व सहाव्या इयत्तेंत नेहमीं पहिली स्कॉलरशिप मिळत गेली. सातव्या इयत्तेंत मात्र एक वेळां दुसरी व बाकीच्या वेळां तिसरी मिळाली. या वर्गांत मॅट्रिक्युलेशनची परीक्षा नापास होऊन आलेले दोन

हुषार विद्यार्थी होते. मला इंग्रजी व इतिहास हे विषय शिवायकरून बाकी-च्यांत पुष्कळ मार्क मिळत. इंग्रजीचा विषय माझा अखेरपर्यंत कच्चा राहिला. न्यायमूर्ति गणपत सदाशिव राव हे आम्हांला पांचव्या इयत्तेंत इंग्रजी गद्य शिकवीत असत. प. वा. राजारामशास्त्री भागवत यांनीं तीनहि वर्षे संस्कृत शिकविलें. पुढे कांहीं एक व्यत्यय न येतां पहिल्याच वर्षी मी मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेला बसलों व पासहि झालों.

# प्रकरण अकरावें

## प्रौढ विद्यार्थिदशेंतील कांहीं विशेष गोष्टी

**शिकवण्याः**—मुंबईला आल्यानंतर साधल्यास एकादी शिकवणी शिकवून पैशाची थोडी मदत मिळवावी असें मनांत होतेच. तशी संधि आपोआप मिळाली. मी पांचव्या इयत्तेंत असतांना वर्गांतील एका मुलानें 'तूं माझे भावाला शिकविशील काय?' म्हणून विचारलें. मीं होय म्हटलें व कांहीं एक ठराव न करितां त्याच्या घरीं जाऊन दररोज एक तास त्याच्या भावाला शिकविण्यास सुरुवात केली. हा निदान दोन रुपये दरमहा तरी देईल, असें मला वाटलें होतें. परंतु महिना झाल्यानंतर एक रुपया त्यानें माझ्या हातावर ठेवला; तेव्हां मीं थोडासा विरस झालों. तथापि मुंबईस आल्यानंतर स्वतःच्या कष्टानें मिळविलेला हा पहिला रुपया होता, म्हणून मला आनंद झाला. तरी ती शिकवणी मीं दुसऱ्या दिवसापासूनच सोडली. परशरामपंत दामले हे मास्तर असल्यामुळें त्यांजकडे शिकवण्या येत व मधुनमधून दरमहा दोन अगर तीन रुपयांची शिकवणी ते मला देत. तेव्हां एक लहानशी शिकवणी मला लागली, ती मॅट्रिक्युलेशन पास होईपर्यंत टिकली. एक गृहस्थ दर रविवारीं मजबरोबर एक तास नवनीतांतला कांहीं भाग वाचीत, व त्याबद्दल मला ते दर खेपेला दोन आणे देत असत. अशा रीतीनें महिन्याचे आठ आणेच मिळत, तरी त्याबद्दल मला किती तरी आनंद होई!

**परोपकाराचा पहिला धडाः**—स्कॉलरशिपांचे अगर शिकवण्यांचे जे पैसे मला मिळूं लागले, त्यांतील दर रुपयाला एक पैसा याप्रमाणें मी धर्मादायासाठीं काढूं लागलों. त्याशिवायहि विशेष कारणानें कांहीं अचानक मिळाल्यास तें मी यांत टाकीं. ही कल्पना माझ्या मनांत कशी आली, हें मला सांगता येत नाहीं. पण पहिली स्कॉलरशिप हातीं पडल्यापासून मी हा नियम अमलांत आणूं लागलों. अशा रीतीनें तीन रुपये जमतपर्यंत त्यांतून मीं कांहीं खर्च केला नाहीं. तीन रुपये जमल्यानंतर एक चांगली संधि आली. ज्यांच्या खाणावळींत मी जेवावयाला जात होतों ते

नागोपंत दातार क्षयानें आजारी पडून मुरूड गांवीं आपल्या घरीं आले होते, व सुमारें महिन्याच्या आंत मरणार इतकी त्यांची स्थिति आलेली होती. मुंबईस त्यांनीं मजकडून पांच रुपये उसने घेतलेले होते. ते फेडण्याला त्यांना सवड झाली नव्हती. ते आणि त्यांची बायको व आई हीं त्यांच्या आजारामुळें खाणावळ बंद करून मुरुडास रहावयाला आलीं होतीं. मी सुट्टींत मुरुडास आलों असतां त्यांच्या समाचाराला गेलों. तीनहि माणसें कष्टी होऊन बसलीं होतीं. माझ्याकडे पाहून नागोपंतांना वाईट वाटलें. " तूं पैसे मागण्यासाठीं आलास काय ? " असा त्यांनीं मला प्रश्न केला. " ते पैसे फिटले, असें तुम्ही समजा. तुमच्या अडचणींत मदत व्हावी म्हणून हे तीन रुपये तुम्हांला देण्यासाठीं मी आलों आहे, " असें म्हणून तीन रुपये मीं त्यांच्यापुढें ठेवले. नागोपंतांची चर्या एकदम पालटली, आणि त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु आले! परोपकार करणाऱ्या मनुष्याला होणाऱ्या अवर्णनीय आनंदाचा थोडासा अनुभव त्या दिवशीं मला आला.

एका मित्राची जोडः—मी सातव्या इयत्तेत गेलों तेव्हां श्रीयुत नरहर बाळकृष्ण जोशी यांच्याशीं माझा स्नेह जडला. नरहरपंत हे वास्तविक त्या वर्षी कॉलेजांत असावयाचे; परंतु दुर्दैवानें मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेत कोणाच्या तरी हलगर्जीपणामुळें त्यांचा इंग्लिशचा पेपर हरवला, त्यामुळें ते पास झाले नाहींत. तीन विद्यार्थ्यांचे पेपर अशा रीतीनें हरवल्यामुळें त्या बिचाऱ्यांना नापास व्हावें लागलें. नरहरपंत हे माझ्यासारखे कपाळाला हात लावून बसणारे नाहींत ! त्यांनीं रजिस्ट्रारच्या व परीक्षकांच्या घरीं पुष्कळ खेपा घातल्या व मनीस्कुलाचे प्रिन्सिपॉल कार्ससाहेब यांच्या मध्यस्थीनेंहि खटपट केली. पण ती सर्व व्यर्थ गेली. तेव्हां ते पुनः मनीस्कुलांत सातव्या इयत्तेत आले. माझा स्वभाव भित्रा व भिडस्त असल्यामुळें मीं कधीं कोणाशीं स्नेह जोडण्याचा प्रयत्न केला नाहीं. परंतु नरहरपंतांनीं मी बऱ्यांपैकीं मुलगा आहें असें पाहिलें, व मला आपल्याबरोबर अभ्यास करण्यासाठीं बोलाविलें. नरहरपंत हे माझ्यापेक्षांहि अधिक अडचणींतून बाहेर आले होते व आत्मबलानें त्यांनीं येथपर्यंत मजल मारली होती. हे बुद्धीनें तरतरीत असून एरव्हींहि त्यांची चलाखी फार होती, व दुसऱ्यावर छाप

घाडण्याच्या कामीं यांचा पहिला नंबर असे. मराठी सहाव्या इयत्तेच्या परीक्षेंत रत्नागिरीला यांनीं पहिला नंबर पटकाविला होता. गरीबी असल्यामुळें घरचा एक पैसाहि न घेतां इंग्रजी शिकण्यासाठीं ते मुंबईला निघून आले. त्यांच्या ओळखीचे एक गृहस्थ हायकोर्टांत बऱ्याच पगारावर नोकर होते; त्यांच्या घरीं ते राहिले. त्यांची बायको आजारी वगैरे असल्यास स्वयंपाक करावा व नेहमीं बाजाराची ने आण करावी हें काम त्यांना करावें लागे. यजमानाची बायको बाळंतपणासाठीं गेली म्हणजे यजमानासाठीं व स्वतःसाठीं महिन्यांचे महिने यांना स्वयंपाक करावा लागत असे. एवढे कष्ट करून त्यांनीं विद्यार्जन केलें. मॅट्रिक्युलेशनची परीक्षा झाल्याशिवाय मी घरीं जाणार नाहीं अशी प्रतिज्ञा यांनीं केली होती, व ती तडीला नेली. पत्नीच्या गर्भाधानासाठीं यांनीं घरीं जावें म्हणून यांच्या वडिलांनीं येऊन शिकस्त केली. पण यांनीं आपला निश्चय ढळूं दिला नाहीं. यांचें आत्मसंयमन फार दांडगें आहे.

रेव्हरेंड जानी अल्ली या नांवाचे गृहस्थ मनीस्कुलांत कांहीं वर्गांना बायबल शिकवीत असत. हे पूर्वीचे मुसलमान असून नंतर खिस्ती झालेले होते. खिस्ती मुलांसाठीं एक हॉस्टेल [ बोर्डिंग ], हल्लीं चंदारामजी हायस्कूल नांवाची मुलींची शाळा कावसजी पाटलाच्या तळ्याजवळ आहे, त्या बंगल्यांत होतें, त्याचे हे प्रमुख होते. नरहरपंतांनीं हॉस्टेलमध्यें एक मोठी दिवाणखान्यासारखी खोली अभ्यासासाठीं व निजण्यासाठीं जानी अल्ली यांजकडून मिळविली होती. टेबल, खुर्ची, एक मोठा दिवा व निजावयासाठीं एक पलंग इतकें सामानहि त्यांजकडून यांना मिळालें होतें. या ठिकाणीं मला नरहरपंतांनीं अभ्यासासाठीं बोलाविलें व माझ्यासाठीं आणखी एक खुर्ची व पलंग मिळविला. ते व मी रात्रीं जेवल्यानंतर तेथें जात असूं व सकाळीं एकदोन तास वाचन झाल्यावर परत घरीं जात असूं.

याप्रमाणें चार महिने जाऊन मे महिन्याची सुट्टी आली. मी प्रत्येक दिपवाळीच्या व मे महिन्याच्या सुट्टींत घरीं जात असें. नरहरपंत पांचसहा वर्षें घरीं गेल्यावांचून कसे राहिले, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. या सुट्टींत नरहरपंत मुरुडाला आमच्या येथें आले. आम्ही सुट्टींत कांहीं इंग्रजी व संस्कृत पुस्तकें वाचलीं.

नरहरपंत हे स्वभावतः फार धीट होते. ते जानी अलीसाहेब व कार्स-साहेब यांच्याशीं धर्मसंबंधीं गोष्टींत वगैरे न भितां वादविवाद करीत. त्यांच्या घरचें पाणी पिण्याला यांना बिलकुल दिक्कत वाटत नसे. नरहरपंतांचें पाहून मीहि तसें करूं लागलों; पण मला फार भीति वाटे! कोणी पाहिलें तर कसें होईल, कोणी विचारल्यास त्याला काय जबाब द्यावा, अशी मला मोठी धास्ती पडे. नरहरपंत असल्या भीतीला कधीं भीक घालीत नसत.

**इंग्रजी पांचव्या इयत्तेची परीक्षाः**—माझें इंग्रजी शिकण्याचें तारूं कोठपर्यंत सुरक्षित जाईल व केव्हां कोणत्या खडकावर आदळून फुटेल, याबद्दल मी नेहमीं साशंक असें. तेव्हां जेवढी परीक्षा पदरांत पडेल, तेवढी पाडून घ्यावी, असें मला वाटे. म्हणून सहाव्या इयत्तेंत असतांना सेकंडक्लास पब्लिक सर्व्हिस अगर इंग्रजी पांचव्या इयत्तेची परीक्षा दर जिल्ह्याला व मुंबईला होत असे, त्या परीक्षेला मी बसलों व पासहि झालों. ही परीक्षा देण्याचें नरहरपंतांच्या स्वप्नींहि आलें नाहीं. मॅट्रिक्युलेशनच काय पण आपण बी. ए. होणार, ही त्यांना खात्री वाटे. मला अशी खात्री कधीं वाटली नाहीं!

**बाबांचे आकस्मिक मरणः**—मी मुंबईला येऊन सातआठ महिने झाले नाहींत तोंच बाबांना मृत्यूनें गांठलें. सुमारें पंधरा दिवस ताप आला व त्यांत त्यांचा अंत झाला. दिवस पावसाळ्याचे असल्यामुळें भेटा-वयाला जावयाचें म्हणजे एवढा लांबचा प्रवास पायांनीं करावयाचा. तेव्हां घरच्या मंडळींनीं बाबांच्या आजाराचें त्यांच्या सांगण्यावरून मला कांहीं-एक कळविलें नाहीं. एकदम त्यांच्या मरणाबद्दल पत्र आलें. मला फार दुःख झालें. विशेषतः शेवटची भेट झाली नाहीं याबद्दल फार वाईट वाटलें.

बाबांच्या मरणानें एक नवीनच प्रश्न उत्पन्न झाला. कोरेगांवीं देण्या-घेण्याचा व्यवहार होता, तिकडे वर्षांतून एकदोन वेळां जाऊन व्यवस्था करणें जरूर होतें. शिवाय घरीं पुरुषमनुष्य अगदींच कोणी नव्हतें. दादा बाणकोटाला मास्तर होते. ते रजा घेऊन बाबांच्या आजारांत घरीं आले होते. बाबा नागपंचमीला वारले. दिवाळीपर्यंत चाललें होते तसेंच सर्वांनीं चालविलें. दिवाळीला आम्ही सर्व मनुष्यें जमलों तेव्हां या प्रश्नाचा विचार केला. दादांनीं सवडीनें मुरुडासच शिक्षकाची जागा मिळवावी व संसार

पहावा, आणि मी तसेंच इंग्रजी शिकावें, असें ठरलें. दादांना बाणकोटाला अकरा रुपये मिळत असत. मुरूडाला प्रथम सात रुपयांवर व नंतर आठांवरच त्यांना काम करावें लागलें.

**स्वाभिमान व स्वावलंबनः**—आमची गरीबी असल्यामुळें पैशाची ओढाताण होत असे. ही स्थिति धोंडोपंत मंडलीक यांना चांगली माहीत होती. त्यांचे मुंबईला पुष्कळ मित्र होते. धोंडोपंतांनीं असें सुचविलें कीं मला वार मिळण्याला बिलकुल अडचण पडणार नाहीं. या कामीं त्यांचे मित्र मला मदत करतील व असें केलें असतां पैशाच्या अडचणींतून मी मोकळा होईन असा त्यांच्या म्हणण्याचा आशय होता. या त्यांच्या सूचनेचा मी, दादा आणि आई अशा त्रिवर्गांनीं विचार केला व ही गोष्ट करावयाची नाहीं, असें ठरविलें. घरचा संसार काटकसरीनें करून त्यांतूनच दरमहा चार रुपये उरविण्याचा यत्न करावा, व आणखी मदत लागेल तिच्यासाठीं मामांकडून कर्ज काढावें, असें आम्हीं ठरविलें.

**मुंबईचा पायवाटेनें प्रवासः**—एका मे महिन्याच्या सुट्टींत मी घरीं आलों होतों, तेव्हां मे महिन्याच्या अखेरीला वादळ होऊन पावसाळा सुरू झाला व आगबोटी बंद झाल्या. तेव्हां आम्ही दहापंधरा मंडळी पाठीवर बोजे मारून मुंबईच्या प्रवासाला निघालों, ते दररोज वीसपासून पंचवीस मैलपर्यंत चालून पांचव्या दिवशीं मुंबईला येऊन पोहोंचलों. समुद्रकांठच्या रस्त्यानें अलिबागपर्यंत आलों व पुढें स्थलमार्गानें धरमतरीपर्यंत जाऊन आगबोटीनें मुंबईला आलों. पाठीवर बोजा मारून लांबचा प्रवास करण्याचा प्रसंग यापुढें आला नाहीं.

**हातांनीं स्वयंपाक करण्याचा पहिला धडाः**—मुरुडाला असतांना आम्हांला हातांनीं स्वयंपाक करण्याचे जे प्रसंग येत, त्यांत प्रथम वडील बंधु व मागून धाकटी बहीण हीं शिजवण्याचें काम संभाळीत, व किरकोळ कामें मी करीत असें. अन्न शिजवण्याचें काम मजवर पडलें नव्हतें. मीं मुंबईला सुमारें सहा महिने खाणावळींत काढले. नंतर परशुरामपंत दामले, त्यांचे बंधु व मी मिळून हातांनीं करून खाण्याचा बेत केला. आम्ही आळीपाळीनें स्वयंपाक व इतर कामें करीत असूं. या ठिकाणीं मीं आपल्या

कामांत बिलकुल कसूर केली नाहीं व करून चाललीहि नसती. सुमारें एक वर्ष आम्हीं याप्रमाणें काढलें. नंतर परशुरामपंतांनीं आपली बायको आणली व त्यांच्या बिऱ्हाडांतच मी जेवूं लागलों.

मुरुडास नाटकाचे प्रयोगः—मुरुडास आम्ही समवयस्क मंडळी बरीच असूं व मे महिन्यांत करमणुकीचे प्रकार बरेच करीत असूं. दोनतीन वर्षें आम्हीं नाटकाचे प्रयोग केले. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें विदूषक, सूत्रधार, गणपति व सरस्वती हीं पात्रें येऊन नंतर खेळाला सुरुवात होई. या प्रसंगीं या कामांत मी बराच रंगून जात असें. एकदां नाटकाकरितां मुंबईहून दोन पडदे तयार करून नेवविले होते. त्यांचा व इतर खर्च नाटकाला माणशीं एक आण्याचें टिकीट लावून भागविण्यांत आला. आम्हीं चालचलाऊ स्टेजहि तयार करीत असूं. गणपति व सूत्रधार यांचा संवाद संस्कृत भाषेंत तयार करून घेतला होता. मी गणपतीचें काम करीं. शिवाय एका नाटकांत राधा व कृष्ण यांचा संवाद केला. आम्हांला स्त्रीपार्टी कोणी मिळेना. तेव्हां कृष्ण बाहेरून बोलत आहे व राधा त्याला पडद्यांतून उत्तरें देत आहे, असा भाग आम्ही घेतला होता. त्यांत राधेचें काम मीं केलें. एका नाटकांत वेणीसंहारांतील अश्वत्थामा व कर्ण यांचा संवाद आणि त्याच्या अगोदरचा कांहीं भाग आम्हीं संस्कृतांतून केला. त्यांत मीं अश्वत्थाम्याचें काम केलें. हें काम चांगलें वठल्याबद्दल माझी तारीफ झाली. एका वर्षीच्या नाटकाचे वेळीं बाबाहि नाटकाला आले होते. मी नाटकांत सोंग घेऊं नये म्हणून त्यांनीं माझें मन वळविण्याचा पुष्कळ यत्न केला. परंतु डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थीहि आपल्या गुरूंच्या परवानगीनें नाटकें करितात असें मीं वर्तमानपत्रांतून वाचलें होतें तें त्यांना सांगितलें व त्यांजकडून परवानगी मिळविली.

गणतीदाराचें कामः—हिंदुस्तानांतील मनुष्यगणती १८८१ सालीं झाली, तेव्हां मी गणतीदाराचें काम केलें. दररोज एक रुपया याप्रमाणें मोबदला देऊन बारा दिवस काम करण्यासाठीं पुष्कळ गणतीदार मुंबईत नेमण्यांत आले होते. यांचें काम तपासणारे वरचे अधिकारी वेगळे होतेच. प्रनी स्कुलांतले कांहीं विद्यार्थी हें काम करण्यास गेले होते. या वर्षाचे अखेरीस मला मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेला जावयाचें होतें, तेव्हां अशा

कामांत बारा दिवस घालविणें ठीक नव्हतें. नरहरपंतांनीं हें काम केलें नाहीं, परंतु हें काम करून बारा रुपये मिळविण्याचें मीं योजिलें. आगगाडीवर जातांना तिसऱ्या वर्गाच्या दरवाजाच्या तोंडाशीं जी गर्दी होते, तशी गर्दी गणतीदार निवडण्याच्या ऑफीसांत झाली. प्रत्येक मनुष्याला थोडेसें इंग्रजी वाचावयाला सांगून मनुष्यगणतीच्या माहितींत येणाऱ्या दहापांच शब्दांचीं स्पेलिंगें विचारून परीक्षा घेत असत. मनुष्य बरा वाटला, तर त्याचें नांव नोंदून कोणत्या ब्लॉकांत [ भागांत ] काम करावयाचें, तें त्याला सांगत. नाहींतर त्याला परत पाठवीत. नंतर दुसरा मनुष्य आंत जाई. या गर्दींत माझी दाद न लागतां मी तसाच परत आलों असतों; परंतु आमच्या शाळेंतील एका धिप्पाड यहुदी विद्यार्थ्यानें तें काम मिळविलें होतें, त्यानें मला पाहिलें आणि माझ्यासाठीं खटपट केली. त्यानें एका पोलीसच्या शिपायाला मथविलें व मला निराळ्याच दारानें आंत नेलें. माझें नांव नोंदविल्यावर मला बाहेर आणून सोडलें व मग तो घरीं गेला. माझ्या भित्रटपणामुळें अजूनहि मला त्रास होतो. मी बहुधा तिसऱ्या क्लासानें आगगाडीचा प्रवास करितों. अशा प्रसंगीं तिकिटांच्या ऑफिसाजवळ गर्दी झाल्यामुळें अगर माणसें आंत सोडण्याच्या दरवाज्यावरील गर्दीतून वाट न मिळाल्यामुळें माझी गाडी चुकली, असें अनेक प्रसंगीं झालें आहे. हुषार मनुष्यें अशा वेळीं हरतऱ्हा करून आपलें कार्य साधतात. मनुष्यगणतीच्या कामांत माझ्या वांट्याला सुदैवानें पाताणे प्रभूंची नवी वाडी व सभोंवतालची वस्ती हा ब्लॉक आला होता; त्यामुळें मला विशेष त्रास झाला नाहीं. हे बारा रुपये मिळाल्यामुळें कंपनीचे दुकानाच्या वेळीं केलेलें कर्ज जरासें लवकर फेडतां आलें.

**कांहीं खिस्ती लोकांचा विलक्षण धर्मभोळेपणा**:—आम्ही मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालों, तेव्हां इंग्रजीची तोंडी परीक्षा घेत असत. नरहरपंतांच्या व माझ्या नंबरांमध्यें फारसें अंतर नव्हतें. आम्हां दोघांनाहि तोंडी परीक्षेसाठीं आठपंधरा दिवस विनाकारण मुंबईंत थांबावें लागणार होतें. मी निमूटपणीं तसाच थांबलों असतों. पण माझे मित्र धडपड करून होईल तितकी आपली गैरसोय दूर करणारे असल्यामुळें त्यांनीं एकदम परीक्षकांची म्हणजे पीटर्सनसाहेबांची गांठ घेतली व आमची

दोघांची परीक्षा लवकर घेण्याविषयीं विनंति केली. त्यांनीं रविवारीं आम्हांला आपल्या बंगल्यावर बोलाविलें व परीक्षा घेऊन टाकिली, ही गोष्ट आम्ही सहज रेव्हरंड जानी अलीसाहेबांजवळ बोललों, तेव्हां त्यांना पीटर्सनसाहेबांच्या धर्मभ्रष्टपणाबद्दल अतिशय त्वेष आला. साब्बाथच्या विश्रांतीच्या दिवशीं काम करणें त्यांना मोठ्या गुन्ह्याहूनहि भयंकर वाटलें. यांचा धार्मिकपणा कर्मठपणाच्या वळणावर होता. रेव्हरंड कार्ससाहेबांना या गोष्टीचें कांहीं विशेष वाटलें नाहीं. त्यांचा धार्मिकपणा भक्तिमार्गाच्या वळणावर असे.

# प्रकरण बारावें

## कॉलेजांतील तीन वर्षें

पुढील आयुष्यांत सार्वजनिक कामांत पडूं लागल्यावर अनेक संस्थांच्यासंबंधानें आपण अमुक करूं, तमुक करूं, अशाविषयीं नानाप्रकारचे कल्पनातरंग मनांत उठून मनोराज्य करण्यांत मीं किती तरी वेळ घालविला आहे. पण विद्यार्थिदशेंत मी अमुक शिकेन, मी तमुक परीक्षा देईन, असे विचार माझ्या मनांत येत नसत. माझें शिकणें कोठवर तडीला जाईल याची अटकळ मला बिलकुल होईना. जितकें पदरांत पडलें तितकें मिळविलें, एवढेंच मला वाटत असे. माझे कॉलेजाला पाय लागतील असा विश्वास मला मॅट्रिक्युलेशनचा निकाल कळल्यानंतर सुद्धां आला नव्हता. परीक्षेत बराच वर नंबर आल्याचें जेव्हां मला कळलें तेव्हां आपल्याला कॉलेजांत जावयाला सांपडेल असें वाटूं लागलें.

नरहरपंतांची मनःस्थिति अगदीं वेगळी होती. ते अतिशय बुद्धिमान् आणि उद्योगी असल्यामुळें त्यांना आपणाला कॉलेजांत जावयाला सांपडणार, याविषयीं खात्री वाटे. शिवाय ते फार चौकस असत. त्यांनीं कॉलेजांतल्या अभ्यासाची चांगली माहिती करून घेतली होती, व कॉलेजांत शिकणाऱ्या वरच्या वर्गांतल्या कित्येक विद्यार्थ्यांची चांगली ओळख करून घेतली होती. जुन्या विद्यार्थ्यांकडून पुस्तकें मिळविणें व नसतील तीं नवीं घेणें वगैरे खटपटी त्यांनींच केल्या. कोणत्या कॉलेजांत जावयाचें, या प्रश्नाचा आम्हांला फारसा विचारच करावा लागला नाहीं. वुइल्सन कॉलेजाचे प्रिन्सिपॉल डॉ. म्याकिकन हे आपल्या कॉलेजासाठीं हुषार मुलें युक्तिप्रयुक्तीनें मिळवीत असत. रे. कार्स व रे. जानी अल्ली यांना भेटून आम्हीं वुइल्सन कॉलेजांत जावें, अशाविषयीं त्यांनीं आम्हांला सल्ला देण्याची व्यवस्था मॅकिकनसाहेबांनीं करून ठेविली होती. नरहरपंतांना दरमहा दहा रुपयांची व मला आठ रुपयांची स्कॉलरशिप देण्याचीहि आपली तयारी त्यांनीं कळविली होती. नरहरपंतांना जगन्नाथ शंकरशेटची दुसरी स्कॉलरशिप मिळून त्यांचा नंबर सर्व विद्यार्थ्यांत तिसरा आला होता, व माझा सोळावा आला होता. वुइल्सन कॉलेज त्या वेळीं हल्लीं वुइल्सन हाय-

स्कूल आहे तेथेंच म्हणजे गिरगांवांतल्या पोलीस कोर्टासमोरच्या रस्त्यावर होतें. तें जवळ असल्यामुळें आम्हांला सोईचें वाटलें, व आम्ही त्याच कॉलेजांत जाऊं लागलों. नरहरपंतांचे बंधु वामनराव हे त्या वेळीं मराठी सहाव्या इयत्तेची परीक्षा पास होऊन तलाठ्याची नोकरी करीत बसले होते. त्यांना वर काढावें असें नरहरपंतांना वाटलें. त्यांची पत्नी आतां मोठी झाली होती, तेव्हां मुंबईला निराळें बिऱ्हाड करण्याचा विचार त्यांनीं केला. आंग्रयांच्या वाडीसमोर गोपीनाथ खत्र्याच्या चाळींत अगदीं वरच्या मजल्यावर दरमहा पावणेचार रुपयांची जागा त्यांनीं घेतली. मी दामल्यांकडलें बिऱ्हाड सोडून यांच्या बिऱ्हाडांतच येऊन राहिलों. या बिऱ्हाडांत आम्ही चार मनुष्यें होतों. आम्ही खर्च फारच बेताबाताचा करीत असूं. माणशीं दरमहा चार रुपयांत आम्ही अन्नखर्च भागवीत होतों. जिन्नस विकत घेण्याच्या कामांत नरहरपंतांची कसोशी असे. सर्व बाजार तेच करीत. मी जमाखर्च ठेवीत असें. महिन्यांतून तीन दिवस आम्ही आळीपाळीनें स्वयंपाक करीत असूं.

पैशासंबंधानें नरहरपंतांची ददात नाहींशी झाली होती. त्यांना दोन स्कॉलरशिपा मिळत होत्या व ते क्वचित् एकादी शिकवणीहि शिकवीत. माझीहि पैशाची सोय चांगली झाली. आतां मला दरमहा पांच रुपयांपासून आठ रुपयेपर्यंत एका तासाच्या शिकवणीचे मिळत. मी कधीं दोन, कधीं तीन, अशा शिकवण्या करीत असें. स्कॉलरशिपेपैकीं दरमहा पांच रुपये फी जाई, बाकी तीन रुपये रहात. माझ्या हायस्कुलच्या शिक्षणासाठीं मामांकडून (रँगलर परांजपे यांच्या वडिलांकडून) मला दोनशें रुपये कर्ज काढावें लागलें होतें. हें कर्ज जितकें लवकर फिटेल तितकें फेडावें, असें मला वाटूं लागलें. शिकवण्यांत बराच वेळ गेल्यामुळें अभ्यासाचें नुकसान होई, परंतु लवकर कर्जमुक्त होण्याकडेच माझें लक्ष लागलें.

हा क्रम एक वर्ष सुरळीत चालला. आम्ही दोघेहि प्रीव्हिअसची परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास झालों. आम्हीं वुइल्सन कॉलेज सोडून एल्फिन्स्टन कॉलेजांत जाण्याचा बेत केला. त्या वेळीं डॉक्टर मॅकिकन रजेवर गेले होते म्हणून हा आमचा बेत साधला. ते असते तर त्यांनीं आमच्या या करण्याला हजार विघ्नें आणलीं असतीं. त्या वेळीं आम्ही पांच विद्यार्थी

वुइल्सन कॉलेजांतून एल्फिन्स्टन कॉलेजांत गेलों. त्यांपैकीं चौघे सेकंड क्लासांत आलेले होतों. त्या वेळीं स्टार्थर्टसाहेब वुइल्सन कॉलेजाचे प्रिन्सिपॉल होते. ते आम्हांवर अतिशय संतापले व अनेक शब्द बोलून अखेरीला त्यांनीं लीव्हिंग सर्टिफिकिटें दिलीं. सेकंड क्लासांत आलेले आम्ही चौघेहि विद्यार्थी गरीबच होतों. त्या सर्वांना वर्ड्स्वर्थसाहेबांनीं माफी केलें. हे त्या वेळीं एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. एक कॉलेज सोडून दुसऱ्या कॉलेजांत विद्यार्थी गेला, तर त्याला एकदम माफी करीत नाहींत. एका टर्मची फी घेऊन त्या टर्मचे अखेरचे परीक्षेंत त्याचे मार्क पाहून नंतर माफी करण्याची वहिवाट पूर्वी होती, व अजूनहि आहे. त्यांत एक कॉलेज सोडून दुसऱ्या कॉलेजांत जाणारे चार विद्यार्थी एकदम माफी करणें हें विशेष होतें. यासंबंधानें नरहरपंतांनीं खूप खटपट केली व तींत त्यांना यश आलें. वर्ड्स्वर्थसाहेबांचें शिकवणें अप्रतिम असे. त्याचा फायदा घेण्यासाठींच आम्हीं एल्फिन्स्टन कॉलेजांत गेलों. खरें सांगावयाचें म्हणजे त्यांच्या शिक्षणापासून इंग्रजींत बरेच हुषार व बरींच बाहेरचीं पुस्तकें वाचलेल्या विद्यार्थ्यांना चांगला उपयोग होई. सामान्य विद्यार्थ्यांच्या आटोक्याबाहेर त्यांचें शिकवणें असे. माझा इंग्रजी विषय अखेरपर्यंत कच्चा राहिला. मला वर्गांत त्यांचें शिकवणें समजत नसे. मागाहून इतर विद्यार्थ्यांकडून त्यांचीं टिपणें घेऊन मला तो विषय तयार करावा लागे. अर्थात् नरहरपंतांची या कामीं मला पुष्कळ मदत होई.

त्या वेळीं एल्फिन्स्टन कॉलेज राणीच्या बागेसमोर हल्लीं व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूट* आहे, त्या ठिकाणीं होतें. आम्ही रेल्वेचा पास घेऊन महालक्ष्मी स्टेशनावरून कॉलेजांत जात असूं. एकदां जानेवारीपासून एप्रिलपर्यंत हा खर्च वांचविण्यासाठीं पायींच जाण्याचा क्रम ठेविला. चर्नीरोड स्टेशन् ग्रँटरोडपेक्षां जरासें जवळ होतें, पण पासांचे किंमतींतील थोडी कसर वांचविण्यासाठीं आम्ही ग्रँटरोडपासून पास काढीत असूं. या तीन वर्षांत विशेष कांहीं घडलें नाहीं. वुइल्सन कॉलेजांत असतांना एक मोठा बक्षीससमारंभ झाला होता. त्या वेळीं प्रीव्हिअसचे क्लासांत गणित व पदार्थविज्ञान या दोन विषयांतील मार्कांची बेरीज करून त्यांत पहिला

* आतां ही इन्स्टिटयूटही परेळ येथील नवीन इमारतींत गेली आहे.

येणाऱ्या विद्यार्थ्याला बक्षीस ठेविलें होतें तें मला मिळालें होतें. एल्फिन्स्टन कॉलेजांतून जे विद्यार्थी फर्स्ट बी. ए. च्या परीक्षेला गेले होते, त्यांचे युनिव्हर्सिटीच्या परीक्षेचे मार्क आणविले होते, त्यांत गणित विषयांत माझा नंबर पहिला आला होता.

एल्फिन्स्टन कॉलेजांत आम्हांला कधीं स्कॉलरशिप मिळाली नाहीं. मी दोन्ही परीक्षांत दुसऱ्या वर्गांत पास झालों. आमची माफी दोन्ही वर्षें कायम राहिली. नरहरपंतांनीं इतिहास व अर्थशास्त्र हा ऐच्छिक विषय घेतला व मीं गणित विषय घेतला. पहिलीं अडीच वर्षें बिऱ्हाडाची व्यवस्था एकदां सुरू केली ती तशीच राहिली. कॉलेजाचा पुरा अनुभव मिळावा म्हणून नरहरपंतांनीं शेवटले सहा महिने कॉलेजाच्या रेसिडेन्सींत ( वसतिगृहांत ) राहून घालविण्याचा बेत केला. त्यांच्या पत्नीलाहि बाळंतपणासाठीं त्यांनीं घरीं पाठविलें होतें. तेव्हां मी आपली पत्नी राधाबाई हिला आणलें आणि बिऱ्हाड तसेंच चालू ठेविलें. नरहरपंतांचे बंधु वामनराव बिऱ्हाडांत होतेच. माझ्या पत्नीबरोबर आमचा अडीच वर्षांचा मुलगा रघुनाथ हाहि आला. अशा रीतीनें सहा महिने निघून जाऊन माझा कॉलेजचा अभ्यासक्रम पुरा झाला.

याप्रमाणें विद्यार्जनाच्या काळांतच विवाहित स्थितीचा थोडथोडा अनुभव मीं घेतला, व त्यापासून मला कांहीं सुखहि झालें; परंतु खऱ्या गृहस्थाश्रमाला प्रारंभ १८८५ च्या जानेवारींत म्हणजे कुटुंबपोषणासाठीं उद्योग करणें हें प्रधान कर्तव्य होऊन पुढील अभ्यास करणें गौण झालें, तेव्हांपासून झाला. खऱ्या गृहसौख्यालाहि या वेळींच सुरुवात झाली. याच्या अगोदरचे विशेष सुखाचे प्रसंग म्हणजे राधाबाईला शिकवण्यासंबंधाचे होते.

# प्रकरण तेरावें

## उदरनिर्वाहाची तरतूद

मी बी. ए. झालों, व मला फार आनंद झाला. माझ्या खऱ्या गृहस्थाश्रमाला या वेळीं प्रारंभ झाला. पूर्वीच्या शिकवण्या चालू होत्या, व खर्चाची अडचण नव्हती; पण आतां पुढें कायमचा उद्योग काय करावयाचा, हा प्रश्न लागलाच मजपुढें येऊन उभा राहिला. नरहरपंतांनीं एल्एल्. बी. होण्याचा निश्चय केला. ती बाजू मला अगदीं अयोग्य आहे, असें माझ्या मनानें पूर्वीपासूनच घेतलें होतें. मला एम्. ए. चा अभ्यास करावा असें वाटलें; पण तें सवडीनें करण्याचें मी ठरविलें. मला सत्ताविसावें वर्ष लागलें होतें, तेव्हां थोडासा पैसा मिळवून घरची स्थिति थोडीशी सुधारावी, असें मनांत आलें. दोनशें रुपयांचें कर्ज फेडलें होतें. पण घरची साधारण हलाखीच होती. रेव्हिन्यूकडे अगर मुंबईतल्या एकाद्या सरकारी अगर कंपनीच्या ऑफीसांत नौकरी करावयाची नाहीं, हाहि निश्चय मीं केला होता. माझ्या स्वभावाला शिक्षकाचा धंदा बरा आहे असें मला वाटत होतें व तोच करण्याचें मीं योजिलें. तूर्त कांहीं तरी सोय लावावी, एवढाच हेतु त्या वेळीं होता. सुदैवानें एल्फिन्स्टन हायस्कूलचे प्रिन्सिपाल प. वा. वामन आबाजी मोडक हे होते, व त्या शाळेंत दोन जागाहि रिकाम्या झाल्या होत्या. नरहरपंतांची व वामनरावजींची पूर्वीची ओळख नव्हती. तरी त्यांनीं त्यांची एकदम गांठ घेतली व त्यांजवर छाप पाडून 'तुला एक जागा देतों,' असें त्यांजकडून त्यांनीं कबूल करून घेतलें. रत्नागिरीला असतांना मी कांहीं दिवस वामनरावजींकडे राहिलों होतों व मुंबईला एकदोन वेळां मी त्यांना भेटलों होतों. मी स्वभावानें अगदीं गरीब व भित्रा आहे, अशी माझ्या स्वभावाची पारख त्यांनीं करून ठेविली होती. मी त्यांजकडे जाण्याला किती तरी भीत होतों. अखेरीला एकदांचा त्यांच्यापुढें जाऊन उभा राहिलों व भीतभीत मला जागा देण्याविषयीं गोष्ट काढिली. थोडेसें भाषण होऊन त्यांनीं अखेरीला "तूं अगदीं लहान दिसतोस, तुला वर्ग संभाळतां यावयाचा नाहीं, याकरितां

जागा देतां येत नाहीं," असा जबाब दिला. तो ऐकून मला वाईट वाटलें; परंतु मीं यत्न सोडला नाहीं. एल्फिन्स्टन कॉलेजांतले गणिताचे अध्यापक प्रोफेसर हाथार्नथ्वेट, हे मला चांगले ओळखीत होते. हे आपल्या विद्यार्थ्यांची शिफारस करण्यांत कसूर करीत नाहींत, असें मीं ऐकिलें होतें. म्हणून मीं त्यांची भेट घेतली व वामनरावजींजवळ झालेलें संभाषण त्यांना सांगितलें. 'माझ्यानें कांहीं झालें तर मी पहातों,' एवढें सांगून त्यांनीं मला निरोप दिला. पुढें कांहीं दिवसांनीं वामनरावजींकडून मला बोलावणें आलें, व मी गेलों तेव्हां "तुला जागा दिली आहे, तूं अमुक दिवशीं येऊन रुजू हो," असें त्यांनीं मला सांगितलें. मजकडे चवथ्या इयत्तेचा एक वर्ग दिला होता. वर्गांत चाळीस विद्यार्थी होते. मीं तो वर्ग बऱ्या रीतीनें संभाळला व शिकविला. या रीतीनें माझ्या स्वतंत्र आयुष्यक्रमाला--खऱ्या गृहस्थाश्रमाला--सुरुवात झाली.

बॉयलर ॲक्टाप्रमाणें होणाऱ्या परीक्षा व सैन्यांतील ऑफिसरांच्या परीक्षा यांना गणित विषयाची जरूर असते. या परीक्षांची तयारी करणारे यूरोपियन लोक कधींकधीं प्रोफेसर हाथार्नथ्वेट साहेबांकडे एकादा शिक्षक मिळेल काय, म्हणून चौकशी करीत. अशा रीतीनें दोन ठिकाणीं हाथार्नथ्वेट साहेबांनीं माझी शिफारस केली होती. या दोन गृहस्थांकडे व पुढें यांच्या ओळखीच्या इतर गृहस्थांकडे चांगल्या किफायतीच्या शिकवण्या मिळत. आठड्यांतून तीन तास शिकवावें, व दरमहा वीस अगर पंचवीस रुपये मिळावे, अशा रीतीनें शिकवण्यांचाहि जम बसला.

एल्फिन्स्टन हायस्कुलांत ज्या गृहस्थांच्या बदली मला नेमलें होतें ते गृहस्थ परत आले तेव्हां मी मोकळा झालों. मी तेथें एक वर्ष काम केलें. तेथले बरेच शिक्षक एल्‌एल्. बी. च्या परीक्षेसाठीं रजा घेत व पास झाले तर सोडून जात. मला जर सरकारी शाळाखात्यांत नोकरी करावयाची असती, तर या वेळीं चांगली संधि मिळाली होती. प्रिन्सिपॉल मोडक यांचें माझ्यासंबंधानें बरें मत झालें होतें. प्रथम दुसरी एकादी बदली देऊन नंतर त्यांनीं मला कायमची जागा दिली असती. परंतु सरकारी नोकरींत पडूं नये असा मीं बेत केला. दोनतीन बऱ्यांपैकीं शिकवण्या ठेवून एम्. ए. च्या परीक्षेला जावें असें मीं ठरविलें. गणितविषय न घेतां पदार्थवि-

ज्ञान व रसायनशास्त्र हा विषय मी घेतला. या वेळचें या विषयांतील शिक्षण बरेंचसें उपपत्तिप्रधान असे. प्रयोग अगदीं नसत असें नाहीं, पण प्रयोगांकडे लक्ष्य फार कमी होतें. एम्. ए. च्या परीक्षेच्या वेळीं प्रयोगांच्या ज्ञानाची परीक्षा होतच नसे. प्रश्नांचीं लेखी उत्तरें दिलीं म्हणजे झालें. मीं एकदांचा एम्. ए. च्या परीक्षेला गेलों इतकेंच. माझी तयारी चांगली नसल्यामुळें मी नापास झालों. पण पदार्थविज्ञानशास्त्र शिकल्याचा पुढें मला उपयोग झाला. एकदां सबंध वर्ष व एकदां सहा महिने फर्ग्युसन कॉलेजांत अडचण होती, त्या वेळीं इंटरमिजिएट क्लासाला तो विषय मला शिकवितां आला व बी. ए. च्या क्लासाला थोडीशी मदत करितां आली.

सन १८८४ च्या अखेरीला मी बी. ए. झालों व १८८७ च्या अखेरीला एम्. ए. नापास झालों. नंतर परीक्षेचा नाद मीं सोडून दिला, व आपली कायमची सोय करण्याच्या मार्गाला लागलों. इतक्यांतच कॅथीड्रल गर्ल्स हायस्कुलांत प्रोफेसर हाथार्नथ्वेट यांच्या शिफारसीनें मला गणिताच्या शिक्षकाचें काम मिळालें. दररोज सव्वातास शिकवून दरमहा पंचवीस रुपये पगार मिळत असे. मॅट्रिक्युलेशनच्या वर्गाला दररोज पाउण तास गणित व अर्धा तास शास्त्रीय विषय शिकवावयाचे असत. पुढें येथें दररोज सव्वा दोन तास काम करून दरमहा पन्नास रुपये मिळूं लागले. पुढें मराठा हायस्कुलांत तीन तास काम करूं लागलों, तेव्हां ही शिकवणी मीं एका मित्राला दिली. या शाळेंत मोठमोठ्या यूरोपियन लोकांच्य मुली असत. विशेषप्रसंगीं अपवादकरून हिंदी विद्यार्थिनी घेत असत महर्षि दादाभाई नौरोजी यांची कन्या माणकबाई व प.वा.डॉ. आत्माराम पांडुरंग यांची कन्या माणकबाई या दोन विद्यार्थिनींना या शाळेंत मीं शिकविलें होतें. नंतर एकदोन वर्षांनीं अलेक्झांड्रा गर्ल्स स्कुलमध्यें मला दररोज दोन तासांचें काम मिळालें. याबद्दल मला दरमहा पंचेचाळीस रुपये मिळत. या शाळेंत बहुतेक पार्शी विद्यार्थिनी असत. खालच्या इयत्तां क्वचित् एखादी हिंदु मुलगी नजरेला पडे. हीं दोन कामें कायमचीं होतीं तेव्हां आतां आपण दुसऱ्या कोणत्याहि नोकरीचे वगैरे नादाला न लागत मुंबईचेच कायमचे रहिवासी व्हावें असा मीं निश्चय केला.

मुंबईलाच कायमचें रहावें, असा निश्चय करण्याला आणखी एक मोठें कारण होतें. प. वा. राजाराम रामकृष्ण भागवत यांचा मी आवडता विद्यार्थी होतों, व पुढेंहि त्यांचें मजवर फार प्रेम असे. ते व प. वा. ना. वें. खोत या दोघांनीं मिळून 'बाँबे इंग्लिश स्कूल' नांवाची खासगी शाळा काढली होती. शास्त्रीबुवांविषयीं मला फार पूज्यबुद्धि असल्यामुळें मी या शाळेंत कमी पगारावर काम करूं लागलों. कॅथीड्रल गर्ल्स स्कूल व अलेक्झांड्रा स्कूल या दोन शाळांत शिकवून राहिलेला वेळ म्हणजे सामान्यतः दोन तास मी या कामाकडे देत असें. या दोन तासांबद्दल मी पंधरा रुपये दरमहा घेत असें. अशी आणखी दोनतीन मंडळी याप्रमाणें करी. पुण्यांतल्या न्यू इंग्लिश स्कुलाची हकीगत मला माहित होती. त्या वळणावर ही शाळा नेऊन पुढेंमागें हिचे लाइफमेंबर आपण व्हावें, ही इच्छा मनांत होती; पण तिजबद्दल कोणाजवळ मीं परिस्फोट केला नव्हता. कारण घरची साधारण सुस्थिति होईपर्यंत चांगल्या पगाराचें काम सोडणें शक्य नव्हतें, व पुढें तरी आपली कितपत तयारी होईल, याजबद्दल खात्री नव्हती. या शाळेचा जमाखर्च पहाणें शास्त्रीबुवांनीं मजवर सोंपविलें होतें. पुढें शास्त्रीबुवा आणि श्रीयुत खोत यांचें जमेनासें झालें, आणि शास्त्रीबुवांनीं मराठा हायस्कूल ही शाळा आपल्या एकट्याच्या जबाबदारीवर काढली. या शाळेंत अगदीं आरंभापासून मीं बऱ्याच प्रमुखत्वानें काम केलें. पुढेंमागें मी कदाचित् लाइफमेंबर होईन, अशी आशा शास्त्रीबुवांना असावी. माझी ही इच्छा अधिक दृढ झाली. पण तिजबद्दल मी कोणाजवळ बोललों नाहीं. मात्र शाळेच्या जमाखर्चाकडे मी या दृष्टीनें लक्ष देत असें व सूचना करीत असें. मी व दुसरे कांहीं गृहस्थ (श्रीयुत मा. गों. मणेरीकर, बेळगांव; प. वा. वा. के. मावळणकर, सबजज्ज; श्रीयुत वा. ग. चिरमुले, वकील, सातारा व श्रीयुत म. स. बापट, वकील, बुलढाणा) दर तासाला साडेसात रुपयेप्रमाणें पगार घेत असूं. मी बहुधा दररोज दोन तास काम करीं. बाकीची मंडळी एल्एल्. बी. चा अभ्यास करीत होती, व त्यांचें तें कार्य साधेपर्यंत या पगारावर काम करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. मी मात्र कायमचा त्या शाळेंत रहाण्याचा संभव होता, आणि कांहीं अंशीं या हेतूनें मी मुंबईचा कायमचा रहिवासी झालों होतों. पण ईश्वरीयोजना कांहीं वेगळीच

होती! मीं मुंबई सोडली, तेव्हां या शाळेचा व माझा संबंध तुटला. मराठा हायस्कुलांत फार दिवस स्वार्थत्यागाचें कारण पडलें नाहीं. पुढें दर तासाला पंधरा रुपये घेतां आले व शेवटीं तीन तास काम करून पन्नास रुपये घेऊं लागलों.

---

# माझ्या शिकवणींच्या

| विद्यार्थ्यांचें अथवा शाळेचें नांव. | तारखा. | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ऑगस्ट १८८८ | तास | | | | | तास | | | | | | तास | |
| मराठा हायस्कूल | १ | १ | १ | २॥ | रविवार. | १ | १ | १ | १ | १ | ... | | १ |
| कॅथीड्रल गर्लस् स्कूल | १। | १। | १। | ... | रविवार. | १। | १ | १। | १। | १। | ... | रविवार | १। |
| सेंटपीटर्स गर्लस् ,, | १॥ | १॥ | १॥ | ... | रविवार. | १॥ | १॥ | १॥ | १॥ | १॥ | ... | रविवार | १॥ |
| फोर्ट हायस्कूल | १ | ... | ... | ... | | ... | ... | ... | ... | ... | ... | | .. |
| मि. दस्तुर कामदिन | ... | १ | १ | १ | १ | १ | १ | | १ | १ | १ | १ | १ |
| मिस् लँडर | ॥ | ... | ... | ... | | ॥ | ... | ॥ | ॥ | ॥ | ... | ... | ॥ |
| मिस् रॉब | ॥ | ॥ | ॥ | ... | | ॥ | ॥ | ॥ | ॥ | ॥ | ... | ... | ॥ |
| मि. पटेल. मि. बामजी | २ | ... | ... | ... | २ | ... | ... | २ | ... | ... | ... | २ | .. |
| मि. एस्पेरॅन्स | १ | १ | १ | १ | ... | १ | १ | १ | १ | १ | १ | ... | १ |
| मि. बर्नार्ड | | | | | | | | | | | | | |
| ऑक्टोबर १८८९ | | | | | | | | | | | | | |
| मराठा हायस्कूल | १ | १ | १ | ... | ... | रविवार | ... | ... | ... | ¾ | ¾ | ... | |
| कॅथीड्रल गर्लस् स्कूल | २ | २ | ... | ... | ... | रविवार | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| सेंट पीटर्स गर्लस् ,, | २ | २ | ... | ... | ... | | ... | ... | ... | ... | ... | ... | रविवार |
| अलेक्झांड्रा स्कूल | २ | २ | २ | ... | ... | ... | २ | २ | २ | २ | २ | ... | रविवार |
| सेंट पीटर्स बॉइज स्कूल | १ | १ | १ | १ | ... | ... | १ | १ | १ | १ | १ | १ | |
| मि. लाड | १ | १ | १॥ | १॥ | १॥ | १॥ | ... | १॥ | १॥ | १॥ | १॥ | ... | |
| फोर्ट हायस्कूल | | | | | | | | | | | | | |

# वेळांचें वेळापत्रक.

| तारखा. | | | | | | | | | | | | | | | | | महिन्यांत आलेल्या पगाराची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | |
| | | | | | | ताप | | | | | | | ताप | | | | रु. आ. |
| १ | १ | १ | २॥ | | ... | ... | १ | १ | १ | २॥ | | १ | १ | १ | ... | १ | २० ० |
| १। | १। | १। | ... | रविवार | १। | १ | १। | १। | १। | ... | रविवार | १। | १ | १। | १। | १। | २५ ० |
| ... | १॥ | १॥ | ... | | १॥ | १॥ | १॥ | १॥ | १॥ | ... | | १॥ | १॥ | १॥ | १॥ | १॥ | ३० ० |
| ... | ... | ... | ... | | ... | ... | ... | ... | ... | ... | | ... | ... | ... | ... | ... | ० ० |
| ... | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ... | १ | १ | २ | १ | १ | २५ ० |
| ॥ | ॥ | ॥ | ... | ... | ॥ | ... | ॥ | ॥ | ॥ | ... | ... | ॥ | ॥ | ॥ | ॥ | ॥ | १२ ० |
| ॥ | ॥ | ॥ | ... | ... | ॥ | ... | ... | ॥ | ॥ | ... | ... | ॥ | ॥ | ॥ | ॥ | ॥ | १२ ० |
| २ | ... | ... | ... | २ | ... | ... | ... | २ | ... | ... | २ | ... | ... | ... | २ | ... | १५ ० |
| ... | १ | १ | १ | १ | ... | १ | १ | १ | १ | १ | १ | ... | १ | १ | १ | १ | २० ० |
| १ | ... | १ | ... | ... | १ | ... | १ | ... | १ | ... | ... | १ | ... | ... | ... | १ | ७—८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | रु१६६-८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | रु. आ. |
| ३/४ | ३/४ | ३/४ | ३/४ | ... | | ... | ... | ... | ... | ... | ... | | ... | ... | ... | ... | ११ ४ |
| १॥ | १॥ | १॥ | १॥ | ... | | १॥ | १॥ | १॥ | १॥ | १॥ | ... | | १॥ | १॥ | १॥ | १॥ | २५ ० |
| २॥ | २॥ | २॥ | २॥ | २ | रविवार | २। | २। | २। | २। | २। | २ | रविवार | २। | २। | २। | २। | ५० ० |
| ... | ... | ... | ... | ... | | ... | ... | ... | ... | ... | ... | | २ | २ | २ | २ | ४५ ० |
| १ | १ | १ | १ | १ | | १ | १ | १ | १ | १ | १ | | १ | १ | १ | १ | २५ ० |
| १॥ | १॥ | १॥ | १ | १ | | ... | ... | ... | ... | ... | ... | | १॥ | १॥ | १॥ | १॥ | २० ० |
| | | | | | | १ | १ | १ | १ | १ | १ | | १ | १ | १ | १ | |
| | | | | | | | | | | | | | | | | | रु१७६-४ |

# माझ्या शिकवणींच्या

| विद्यार्थ्यांचें अथवा शाळेचें नांव. | तारखा. | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एप्रिल १८९०** | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | तास | | | | | | | | | | |
| मराठा हायस्कूल | ३/४ | ३/४ | ३/४ | १ | ... | | ३/४ | ३/४ | ... | ३/४ | ३/४ | १ | | ३/४ |
| अलेक्झांड्रा स्कूल | २ | २ | ... | ... | २ | | ... | २ | २ | २ | २ | २ | | २ |
| सें. पीटर्स गर्ल्स् स्कूल | २। | २। | २। | ... | ... | रविवार | ... | ... | २। | २। | २। | २ | रविवार | २। |
| ,, ,, बॉइज् ,, | २। | २। | ... | ... | ... | | ... | ... | १॥ | १॥ | १॥ | १॥ | | १॥ |
| मि. सी. रूस | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ३/४ | ३/४ | ... | ... | ॥ |
| मि. एडवर्ड्स् | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | १ | ... | १ | ... | ... | १ |
| ले. ए. सी. लव्हेट | १ | ... | ... | १ | ... | १ | ... | १ | ... | ... | १ | ... | १ | ... |
| **एप्रिल १८९१** | | | | | | | | | | | | | | |
| मराठा हायस्कूल | ३ | ३ | ३ | ३ | | ३ | ३ | ३ | ... | ३ | ३ | | ३ | ३ |
| अलेक्झांड्रा स्कूल | २ | २ | २ | ... | | २ | २ | २ | २ | २ | ... | | २ | २ |
| सें. पीटर्स बॉइज् स्कूल | १॥ | १॥ | १॥ | ... | रविवार | १॥ | १॥ | १॥ | १॥ | १॥ | ... | रविवार | १॥ | १॥ |
| फोर्ट हायस्कूल | ... | ... | २ | ... | | ... | ... | ... | ... | ... | २ | | ... | ... |
| ले. ए. सी. लव्हेट | ... | १ | ... | १ | | १ | ... | १ | १ | ... | ... | | ... | ... |

# वेळांचें वेळापत्रक.

| तारखा. | | | | | | | | | | | | | | | | | महिन्यांत आलेल्या पगाराची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | |
| | | | | | तास | | | | | | | | | | | | रु. आ. |
| ३/४ | ३/४ | ३/४ | ३/४ | ३/४ | रविवार | ... | ... | ... | ... | ... | ... | रविवार | ... | ... | ... | | १२ १२ |
| २ | २ | २ | २ | ... | | २ | २ | २ | ... | २ | ... | | २ | २ | २ | | ४५ ० |
| २। | २। | २। | २। | २ | | २। | २। | २। | २। | ... | ... | | ... | ... | ... | | ५० ० |
| १॥ | १॥ | १॥ | १॥ | १॥ | | १॥ | १॥ | १॥ | १॥ | १॥ | ... | | ... | ... | ... | | ३५ ० |
| ॥ | ॥ | ॥ | ॥ | ... | | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | १॥ | ... | | १२ ० |
| १ | ... | १ | १ | ... | ... | १ | १ | ... | १ | १ | ... | ... | ... | १॥ | ... | | १२ ० |
| १ | ... | ... | १ | ... | २ | ... | ... | १ | ... | ... | १ | ... | १ | ... | १ | | २० ० |
| | | | | | | | | | | | | | | | | | १८६-१२ |
| ३ | ३ | ... | ३ | रविवार | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ... | रविवार | ... | ... | ... | ... | | ५० ० |
| २ | २ | २ | ... | | २ | २ | २ | २ | ... | २ | | २ | २ | २ | २ | | ४५ ० |
| १॥ | १॥ | १॥ | ... | | १॥ | १॥ | १॥ | १॥ | १॥ | ... | | ... | ... | ... | ... | | ३० ० |
| ... | ... | ... | १ | | ... | | ... | ... | ... | १ | | ... | ... | ... | ... | | ० ० |
| ... | १ | ... | १ | | ... | १ | ... | १ | ... | १ | | १ | ... | १ | ... | | २० ० |
| | | | | | | | | | | | | | | | | | १४५-० |

# प्रकरण चौदावें

## शिकवण्या

मागील प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें माझ्या कायमच्या कामाचा जम चांगला बसला. तरी मुरूडच्या व्यवस्थेसाठीं अधिक पैसा मिळविण्याकरितां मीं आणखी शिकवण्या पतकरण्याचें योजिलें. मला शिकवण्यांची कधीं वाण पडली नाहीं. मला झेंपतील इतक्या शिकवण्या मला नेहमीं मिळत. मी गणितविषय बरा शिकवतों, अशी पार्शी विद्यार्थ्यांमध्यें बरीच माहिती झाली होती. त्या वेळीं मुंबईतलें फोर्ट हायस्कूल फार चांगल्या स्थितींत होतें. त्यांचे मालक माणकजी कूपर हे मोठे हुषार व खटपटी गृहस्थ होते. त्यांनीं प्रीव्हियस व फर्स्ट बी. ए. च्या विद्यार्थ्यांसाठीं संध्याकाळीं पांच वाजल्यानंतर शिकविण्याचे खाजगी वर्ग काढले होते. या वर्गाचें अध्यापकत्व त्यांनीं मजकडे दिलें होतें. या वर्गापासून त्यांचा तोटाच होई. पण विद्यार्थ्यांचा शाळेशीं संबंध अधिक दिवस रहातो, या गोष्टीला ते महत्त्व देत. अहमदनगरचे डिस्ट्रिक्ट जज्ज श्रीयुत माडगांवकर* हे कॉलेजांत असतांना त्यांना घरीं गणित शिकविण्याचें काम मजकडे आलें होतें. वकील ज्याप्रमाणें पुष्कळ काम असलें तरी नवीन खटले आले असतां ते आपल्या हातांतून जाऊं देत नाहींत, अगर डॉक्टर लोकहि येईल तेवढें काम घेतच असतात, त्याचप्रमाणें काम अधिक झालें तरी चांगली शिकवणी मी आपल्या हातांतून जाऊं देत नसें. यामुळें मला पुष्कळ वेळां अतिशय काम पडे.

माझा नित्यक्रम इतर मनुष्यांपेक्षां अगदीं भिन्न झाला होता. माझी एक शिकवणी माजगांवांत, तर दुसरी कोटांत, आणि तिसरी कुलाब्याला, असा प्रकार असे. जेथें ट्रॅमवेची गाडी होती तेथें मी तिचा उपयोग करीत असें. पण जेथें ट्रॅम नसे तेथें मला पायांनींच जावें लागे. माजगांवच्या सेंट पीटर्स बॉइज स्कूल नांवाच्या मुलांच्या शाळेंत मला एक मॅट्रिक्युलेशनच्या वर्गाला गणितविषय समजून देण्याची कायमची शिकवणी होती. सकाळीं

---

* हे हल्लीं मुंबईच्या हायकोर्टीत न्यायाधीश आहेत.

सहापासून साडेसातपर्यंतचा वेळ मीं तिच्यासाठीं ठरविला होता. याशिवाय साडेसातांनंतर कधींकधीं त्याच शाळेंतून शिक्षकशिक्षकिणींच्य अगर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिविषयक शिकवण्या मिळत. माझ्या कायमच्य शिकवण्या येणेंप्रमाणें होत्याः—१ सेंटपीटर्सस्कूल, माजगांव; २ कॅथीड्रल गर्ल्स स्कूल; ३ आलेक्झांड्रा स्कूल; ४ मराठा हायस्कूल; ५ फोर्ट हायस्कूल; यांशिवाय दुसऱ्या किरकोळ शिकवण्या मधूनमधून असत. दिवसांतून बहुतकरून पांचसहा मैल पायीं चालावें लागे. माजगांवांतील शिकवणीला बरोबर सहा वाजतां सुरुवात होई. थंडीच्या दिवसांत अर्धा तास दिवा लावून वर्ग चालवावा लागे. मला दोन प्रहरीं वेळ नव्हता, व या वर्गाला मींच शिकवावें, अशी शाळेच्या हेडमास्तरांची इच्छा होती. साडेसात वाजल्यानंतर विद्यार्थ्यांना दुसरे उद्योग होते. नाहीं तर मला साडेसातपासून नऊपर्यंत वेळ देतां आला असता. सहापासून साडेसात हा वेळ विद्यार्थ्यांना व मलाहि फार गैरसोईचा होता, पण उभयतांनाहि तोच पत्करावा लागला. युरोपियन व युरेशियन विद्यार्थ्यांचें तें बोर्डिंगस्कूल होतें. मी बरोबर सहा वाजतां जात असें. विद्यार्थीही प्रातर्विधि व अल्पाहार आटोपून तयार असत. मला पहांटेला साडेचार वाचतां उठावें लागे. हे साडेचार हल्लींचे नव्हत. मुंबई साडेचार म्हणजे हल्लींचे पांच वाजून दहा मिनिटें. मी बहुधा मजूरलोकांप्रमाणें स्नान सकाळीं न करितां रात्रीं करीत असें. सकाळीं थोडा दहींभात खाऊन मी निघें. भात रात्रीचा ठेवलेला असे. गिरगांवांतून माजगांवच्या शाळेंत जाण्याला पंचेचाळीसपासून पन्नासपर्यंत मिनिटें लागत. त्या वेळीं माजगांवाला ट्रॅमवेचा रस्ता नव्हता. साडेसात वाजतां तेथलें काम संपल्यानंतर तेथलीच एकादी लहानशी शिकवणी असली तर शिकवावी, नाहीं तर नऊ वाजेपर्यंत तेथेंच कांहीं वाचीत बसावें, असें करीं. नंतर एका इराण्याच्या दुकानीं जाऊन चहा व पाव यांचा फराळ करीं, व मग प्रिन्सेसडॉकच्याजवळ ट्रॅमटर्मिनसपाशीं येऊन ट्रॅमवेंतून टाऊन हॉलपाशीं उतरें, व तेथून दोनतीन मिनिटांच्या रस्त्यावर क्याथीड्रल गर्ल्सस्कूल होतें, तेथील काम करावयाला लागें. हें काम आटोपल्याबरोबर आलेक्झांड्रा स्कूलांत जाई. एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत जाण्याला सुमारें पांच मिनिटें लागत. तेथलें काम संपलें म्हणजे बहुधा घरीं येई.

पुनः मराठा हायस्कूलांत जावयाचें असे, म्हणून मध्यें वेळ अगदीं थोडा असे. तेव्हां पोशाख बदलण्याच्या भानगडींत न पडतां पायांत बूट असतांनाच अभ्यासाच्या टेबलाशींच खुर्चीवर बसून टेबलावर ताट ठेवून थोडा ताकाचा अगर दह्याचा भात राधाबाई कालवून तयार करून आणून देई, तो व दुपारची भाजी असा अल्पाहार करून तीन वाजायाला मराठा हायस्कुलांत हजर असें. तेथलें काम आटोपून ठाकूरद्वाराजवळच्या एका इराण्याच्या दुकानांत पुनः थोडा पाव व चहा यांचा फराळ करून फोर्ट हायस्कूलांत जाई. तेथें एक तास काम करून घरीं येई. नंतर स्नान व जेवणखाण आटोपल्यावर रात्रींहि कधींकधीं एकादी शिकवणी असे. नसल्यास थोडें मुलांना अगर राधाबाईला शिकवावयाचें व दहांचे आधींच निजून जावयाचें, असा माझा नित्यक्रम असे.

माझ्या आयुष्यांतील सामान्य अगर विशेष गोष्टींसंबंधानें मीं कधीं कांहीं लिहून ठेवलेलें नाहीं, पण आपण किती काम करीत होतों, याची उत्तरवयांत कांहीं कल्पना व्हावी म्हणून माझ्या दोनतीन वर्षांच्या कामाचे क्याटलाग मीं करून ठेविले होते, ते अजून माझ्याजवळ आहेत. त्यांतून चार कोष्टकें येथें दिलीं आहेत; त्यांवरून त्या वेळच्या माझ्या कामाचा अजमास होईल. कधींकधीं काम बेताचें असे, व कधींकधीं फार असे. सन १८८६ व १८८७ हीं दोन वर्षे बेताचें काम ठेवून मी एम्. ए. चा अभ्यास करीत होतों. १८८८ सालापासून भरपूर काम असे. पुष्कळ वेळां रोज सात ते नऊ तास शिकवण्याचें काम असून जाण्यायेण्यांत निराळा वेळ मोडे.

पहांटेला लवकर उठून माजगांवाला जावें लागे यासंबंधानें एकदां एक गमतीचा प्रकार घडला. माझी बहीण अंबाताई त्या वेळीं सहजीं मुंबईला आलेली होती. मी जागा झालों तर वेळेवर उठत असें; नाहीं तर राधाबाई मला उठवीत असे. या वेळीं मला उठवून खावयाला देण्याचें वगैरे काम अंबाताईनें आपणाकडे घेतलें होतें. एके दिवशीं अवरकांट्याकडे लक्ष न जातां अंबाताईनें मला बरोबर एक तास आधीं उठविलें. नित्यक्रम आटोपून मी बाहेर पडलों. मींहि घड्याळाकडे निरखून पाहिलें नाहीं. अर्धा-अधिक वाट चालून गेलों तरी जिकडे तिकडे अगदीं सामसूम होतें, ही

गोष्ट माझ्या लक्ष्यांत आली. नेहमीं मनुष्यें उठून थोडीबहुत गडबड चाल-लेली दिसे. शंका येऊन घड्याळाकडे पहातों, तों बरोबर एक तास मी अगोदर चाललों आहें! आतां परत घरीं जावयाचें म्हणजे विनाकारण किती तरी चालावयाचें. तेव्हां तो तास रस्त्यावर रेंगाळण्यांत घालविला, आणि वेळेवर शाळेंत हजर झालों, व दिव्याच्या उजेडांत वर्ग चालविण्याला सुरुवात केली.

## प्रकरण पंधरावें

## एक नवीन तऱ्हेचें संयुक्त कुटुंब

भाऊभाऊ मुलांबाळांसह एकत्र राहिल्याचीं उदाहरणें बरींच असतात, परंतु ज्यांचा आप्तसंबंध अगदीं नाहीं असे गृहस्थ एक कुटुंब करून राहिल्याचीं उदाहरणें फारशीं आढळत नाहींत. कुटुंबांतील मनुष्यांचा एकमेकांना थोडाफार उपसर्ग झाला असतां तो सोसण्याची तयारी पुष्कळांची झालेली असते. परंतु आप्तांव्यतिरिक्त इतर मनुष्यांचा उपसर्ग सोसण्याची मनाची तयारी होत नाहीं. वास्तविक पहातां ज्यांमध्यें आप्तसंबंध अगदीं नसतो, अशा मनुष्यांनीं एकत्र राहणें बरेंच फायद्याचें आणि सोईचें असतें. एकमेकांचा थोडासा उपसर्ग सोसल्यानें परस्परांच्या कितीतरी गैरसोयी दूर होतात. खर्चाची वांटणी परस्परांच्या विचारानें हिस्सेराशीनें करतां येते, व आप्तांमधील भांडणाचें एक मुख्य बीज अजीबात नाहींसें करितां येतें. अनेक मनुष्यें एकत्र राहिल्यानें थोडें फार घर्षण होणारच. केव्हांकेव्हां भांड्याला भांडें लागणार. पण त्याला फारसें महत्त्व देतां कामा नये. अशा संबंधापासून एकप्रकारचें शिक्षणहि मनुष्यांना मिळत असतें.

नरहरपंतांनीं मॅट्रिक्युलेशन झाल्याबरोबरच आपला संसार मांडला, व मीं बी. ए. होण्याच्या पूर्वींच सहा महिने संसार सुरू केला होता. परंतु उभयतांच्या बायका एका वेळीं एका ठिकाणीं नव्हत्या. आम्ही दोघेहि बी. ए. होऊन मिळवूं लागल्यानंतर वेगळीं बिऱ्हाडें करून रहावयाचें कीं काय, हा प्रश्न उत्पन्न झाला. नरहरपंतांच्या कुटुंबाशीं माझें दळणवळण बरेंच झालें होतें. कॉलेजांत असतांना मी एकदां सुट्टींत त्यांच्या घरीं म्हणजे देवरुखाला गेलों होतों, व त्यांच्या आईबापांशीं माझा चांगला परिचय झाला होता. त्यांची एक बहीण मुंबईला राहत असे, तिजकडून नरहरपंतांना फारशी मदत झाली नव्हती; पण तिजकडे त्यांचें जाणेंयेणें असे, व मीहि त्यांजबरोबर तिजकडे जात असें. आमच्या कुटुंबांतील मनुष्यांशींहि नरहरपंतांची चांगली ओळख झालेली होती. ते एका सुट्टींत

आमच्या येथें एक महिना राहिले होते, व आमच्या सर्व मनुष्यांची त्यांनीं चांगली पारख केलेली होती. अशा स्थितींत त्यांच्या व आमच्या मंडळींनीं एका बिऱ्हाडांत एका कुटुंबाप्रमाणें रहावें, असें आम्हीं ठरविलें. ही कल्पना नरहरपंतांची. त्यांनीं सांगितल्याबरोबर मला ती लागलीच पटली. हें उभयतांनाहि फार सोयीचें झालें. आमच्या बायका वांटणीप्रमाणें घरांतलीं कामें करीत. शिवाय माझी मेहुणी, जी अनाथबालिकाश्रमाच्या कामीं फार उपयोगी पडली, तीहि राधाबाईजवळ रहावयाला आली होती. तिचाहि पुष्कळ उपयोग होई. बाजार करण्याचें काम नरहरपंत अगर त्यांचे बंधु वामनराव करीत. या कामीं मी अगदीं निरुपयोगी असें. मीं कधीं बाजार केला, तर कसला तरी माल घरीं आणून टाकीत असें, व त्याला अधिक किंमत पडे. जमाखर्चाची व पैशाची व्यवस्था मी करीत असें. संस्कृत व्याकरणाचे कर्ते व कांहीं संस्कृत पुस्तकांवर टीपा लिहिणारे आमचे एक मित्र श्रीयुत मोरेश्वर रामचंद्र काळे हे या कुटुंबांत दोनतीन वर्षें येऊन मिळाले होते. प्रथम ते एकटेच आले, व नंतर त्यांनीं आपल्या पत्नीला आणलें. आरंभीं बिऱ्हाडाची जागा पावणेचार रुपये दरमहाची होती; तिच्या शेजारींच आणखी सव्वाचार रुपये दरमहाची घेतली. एवढ्या जागेंत आम्ही बारापासून पंधरापर्यंत मंडळी राहत असूं. कधींकधीं आम्हांपैकीं कोणाचे पाहुणेहि असत. नरहरपंतांचे बंधु वामनराव हे पुढें वकिलीच्या अभ्यासासाठीं मुंबईतच नोकरी धरून राहिले, तेव्हां तेहि या संघांत सपत्नीक येऊन दाखल झाले. भांडणें अगर बोलाचालीचे प्रसंग अगदींच नसत असें नाहीं; परंतु ते कधीं विकोपाला गेले नाहींत. या कुटुंबासंबंधानें जमाखर्च वगैरे नीट ठेवलेले असत; पण आतां त्यांपैकीं कांहीं शिल्लक नाहीं. शिकवण्यांचीं कोष्टकें ज्या क्याटलागांतून घेतलीं आहेत, त्यांमध्येंच या संयुक्त कुटुंबासंबंधानें हजिरी व कांहीं माहिती लिहिली आहे, व त्यांतच पुढील नियम लिहिलेले आढळतात.

( अ ) तीन दिवसपर्यंत कोणाचाहि पाहुणा असला तर तो हिशोबांत धरूं नये.

( ब ) तीन दिवसांची गैरहजिरी हजिरीप्रमाणें समजली जावी.

घरांत एकंदर मंडळी बारापासून पंधरापर्यंत असत. त्यांत मजकडे अभ्यासासाठीं असणारे विद्यार्थीसुद्धां माझींच आठनऊ माणसें होतीं. सुट्टींत मंडळी गेली म्हणजे संख्या कमी होई. १८८८ सालची वर्षाची सरासरी दररोज १२·१ मनुष्यांची होती, १८८९ सालीं ११·१ आणि १८९० सालीं ११ होती. १८८९ सालचा सरासरीच्या मानाचा खर्च दरमहा दरमाणशीं पांच रुपये एक आणा आला. यांत खोलींचें भाडेंहि धरलेलें आहे. त्या वेळीं हल्लींइतकी महागाई नव्हती, ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे. बाकीच्या दोन वर्षांची खर्चाची सरासरी दाखविलेली नाहीं. सन १८९१ च्या आरंभीं नरहरपंत मुंबई सोडून गेले, तेव्हां ते संघांतून सुटले. नंतर त्याच वर्षाच्या अखेरीला मी पुण्याला आलों, तेव्हां पाठीमागें वामनराव एकटेच राहिले, व संयुक्त कुटुंबाची समाप्ति झाली.

हें आमचें संयुक्त कुटुंब एकंदर सात वर्षें टिकलें. पुरुष आपापल्या कामांसाठीं बहुतेक बाहेर असल्यामुळें व त्यांचीं कामें वेगवगळीं असल्यामुळें त्यांचा तितका निकट संबंध येत नाहीं. जो थोडा येतो, तो घर्षण उत्पन्न करण्यासारखा नसतो. पण एका कुटुंबांत रहाणाऱ्या स्त्रियांचा संबंध पदोपदीं येतो. त्यांचीं सर्व कामें एकाच ठिकाणीं करावयाचीं असतात. तशांत मुंबईतल्या आकुंचित जागेंत तर तो विशेष यावयाचा. अशा स्थितींत सात वर्षें आम्हीं गुण्यागोविंदानें राहूं शकलों, याचें सर्व श्रेय आमच्या बायकांना आहे. त्यांनीं जर परस्पर घस· सोसण्याच्या कामीं मोठें मन केलें नसतें तर हा प्रयोग यशस्वी झाला नसता.

हें आमचें कुटुंब म्हणजे एक आश्चर्य करण्यासारखी गोष्ट झालेली होती. एकदोन वेळां नरहरपंतांचे वडील व मातुःश्री आणि त्याचप्रमाणें माझी मातुःश्री व अंबाताई हीं येऊन या कुटुंबांत कांहीं दिवस राहिलीं होतीं. अशा रीतीनें आम्हां उभयतांच्या कुटुंबांचें विशेष रीतीनें संघट्टन झालेलें होतें.

# प्रकरण सोळावें

## नरहरपंतांचा सहवास

कोणाशीं मैत्री जोडण्याला अगर विशेष परिचय करून घेण्याला जरूर लागणारे गुण मजमध्यें नसल्यामुळें लहानपणीं ज्यांचा विशेष परिचय झाला, अशा मंडळीखेरीज माझा कोणाशीं फारसा स्नेह जडला नाहीं. दुसऱ्याशीं विशेष परिचय करणें मला साधतच नाहीं. नरहरपंतांनीं आपण होऊन मला जवळ घेतलें, म्हणूनच त्यांच्याशीं माझा एवढा निकट संबंध झाला.

माझे मित्र नरहर बाळकृष्ण जोशी यांची मजवर एवढी छाप बसण्याला या गृहस्थांमधील अनेक असामान्य गुण कारण झाले. यांच्याशीं दहापांच मिनिटांचें संभाषण केलें असतां यांची बुद्धिमत्ता व तेजस्विता प्रत्ययाला येते. यांच्या ओजस्वितेनें दुसऱ्या मनुष्यावर तेव्हांच छाप बसून जाते. मोठमोठ्या मनुष्यांशीं हे क्षणांत मैत्री जोडूं शकतात. केवळ एवढेच गुण यांच्या अंगीं असते, तर मी त्यांना फारशी किंमत दिली नसती. परंतु दुसरेहि कित्येक अमोलिक गुण त्यांजमध्यें आहेत, त्यामुळें ते मला फार प्रिय व वंद्य झालेले आहेत. यांचा मनोनिग्रह फार दांडगा आहे. प्राप्तयौवनस्त्री घरीं असतां विद्यार्जनासाठीं ब्रह्मचर्यव्रताचें पालन करून घराचें दर्शनहि न घेणारा तरुण लाखांत एक तरी मिळेल कीं नाहीं, याची वानवा आहे. त्याचप्रमाणें चाळिशी पुरी होण्याच्या आधींच द्वितीय पत्नी निवर्तल्यानंतर पुनः विवाहपाशांत न पडतां अनेक अडचणी सोसून देह विटाळू न देतां राहणें व आईप्रमाणें कष्ट सोसून मुलांचें पालन करणें, या गोष्टीहि असामान्यच आहेत. यांनीं दहा वर्षें राजकोट येथील सौराष्ट्र हायस्कुलाची निरपेक्षबुद्धीनें सेवा केली. लाभाची अपेक्षा न धरतां तरुणांमध्यें उत्कृष्ट नीतिविचार बिंबविण्यासाठीं यांनीं पुष्कळ प्रयत्न केलेले आहेत, व तसें करण्याची हातोटी यांना उत्कृष्ट साधली आहे. यामुळें विद्यार्थ्यांचेंचसें काय पण इतरांचेंहि मन आपणाकडे ओढून घेऊन त्यांना सन्मार्गाकडे वळविण्याचें काम हे नेहमीं करीत असतात. हे आणि मी एकत्र रहात असतां

आमच्या येथें विद्याभ्यासासाठीं जीं मुलें होतीं, त्यांजकडून कांहीं चांगलीं पुस्तकें यांनीं वाचून घेतलीं. हे उत्तम लेखक आहेत. राल्फ व्हाल्डो ट्राइन या अमेरिकन ग्रंथकाराचें अत्युत्तम पुस्तक 'In Tune With The Infinite' याचें रूपांतर करून 'अनंताशीं साधर्म्य' हें पुस्तक यांनीं लिहिलें आहे. हें पुस्तक लहानथोरांनीं पुनःपुनः वाचण्यासारखें व मनन करण्यासारखें आहे.

यांच्यापासून मला अतिशय फायदा झाला. मला यांचा सहवास नऊ-दहा वर्षे मिळाला. या मुदतींत आम्हीं कितीतरी संभाषणें केलीं, व कांहीं पुस्तकें एकत्र वाचलीं—किंवा यांनीं मला शिकविलीं, असें म्हणणें अधिक योग्य होईल! मी अगदीं एकमार्गी असल्यामुळें शाळेच्या अगर कॉलेजाच्या अभ्यासापलीकडे माझें लक्ष्य दुसऱ्या कोठें जात नसे. पण हे चौकस आणि बहुश्रुत असल्यामुळें यांनीं मला अनेक गोष्टींची माहिती करून दिली, व विशेषतः स्पेन्सरच्या ग्रंथांविषयीं मजमध्यें अभिरुचि उत्पन्न केली. आपण कोणतीं पुस्तकें वाचावीं, वगैरे माहिती ते शिक्षकांकडून अगर इतर गृहस्थांकडून मिळवीत, व अनेक खटपटी करून पुस्तकें पैदा करीत. सुधारणेच्या अनेक कल्पनाहि यांनीं माझ्या मनांत बिंबविल्या. आगरकरांचे केसरींतील व सुधारकांतील लेख आम्ही अत्यंत प्रेमानें वाचीत असूं. सुधारकाच्या अगदीं पहिल्या अंकापासून सर्व लेख आम्हीं वाचले. कांहीं मराठी वाचावयाचें असलें म्हणजे मीं वाचावें, व यांनीं ऐकावें, असें बहुधा होत असे. सुधारकाच्या पहिल्या अंकांतील आरती किती वेळां तरी मीं प्रेमानें गाइली आहे.

पहिलीं चारपांच वर्षे आम्ही रात्रंदिवस एकत्र असूं. अभ्यासाचा कंटाळा आला म्हणजे जानीअल्लीच्या बंगल्याच्या व्हरांड्यांत अगर अभ्यासाच्या दिवाणखान्यांतच आम्ही हिंडत असूं. अशा वेळीं कधींकधीं एकादें नवीन पुस्तक वाचावयाचें व कधींकधीं पाश्चात्य आणि पौर्वात्य विचारांची तुलना करावयाची. अंथरुणावर पडल्यानंतरसुद्धां आमचीं संभाषणें चालावयाचीं. कधींकधीं आम्ही लहान तोंडीं मोठा घांस घेऊन आमच्या व ख्रिस्ती धर्मातल्या आचारविचारांवर कडक टीका करीत असूं. आम्हांला शाळेंत बायबल शिकावें लागे, त्यामुळें ख्रिस्ती धर्मातील अनेक आचार-

विचार आमच्या परिचयाचे झाले होते. जें विचारशास्त्र आम्ही आपल्या आचारविचारांवर चालवूं लागलों, तेंच खिस्ती आचारविचारांवरहि आम्ही चालविलें. आम्ही केवळ कल्पनाक्षेत्रांतच वावरत असल्यामुळें आमच्या विचारांची भरारी निरंकुश असे. आमच्या चर्चेत त्या वेळचे सर्व प्रचलित विषय येऊन जात.

शेवटल्या चारपांच वर्षांत आमचे व्यवसाय भिन्न झाल्यामुळें पहिल्या-इतकें आमचें संघटन होत नसे. तरी आम्ही एका कुटुंबांतच रहात असल्यामुळें एकत्र बसण्याबोलण्याचे पुष्कळ प्रसंग येत, व त्या वेळीं एकसारखा विचारविनिमय चालत असे. नरहरपंत अनेक इंग्रजी पुस्तकें वाचीत असत. विशेषतः चिकित्सक बुद्धीनें लिहिलेले ग्रंथ त्यांना फार आवडत. अर्थात् त्यांतील विषय संभाषणांत यावयाचे. पुष्कळ वेळां आमचे वाद-विवाद बायकांच्या व विद्यार्थ्यांच्या देखत होत असत व त्यांना त्यांचा फायदा मिळे.

यांनीं माझ्या अंगचा भित्रेपणा घालविण्याविषयीं बरेच प्रयत्न केले. त्यांतलीं दोन उदाहरणें मला चांगलींच स्मरतात. पंडिता रमाबाई नुकत्याच अमेरिकेहून आल्या होत्या, व त्यांनीं चौपाटीवरील एका मोठ्या बंगल्यांत आपल्या शारदासदनाला सुरुवात केली होती. पंडिताबाईंना भेटावें म्हणून त्यांनीं मला पुष्कळ आग्रह केला; परंतु त्यांजबरोबर जाऊन देखील त्यांना भेटण्याचें धैर्य माझ्यानें होईना. कोणाहि मोठ्या मनुष्याला भेटावयाचें म्हणजे माझ्यावर मोठें संकट पडल्यासारखें होई. एके दिवशीं ते व मी बॅकबेवर फिरावयाला गेलों असतां यांनीं मला जुलूमानें शारदा-सदनांत नेण्याचा बेत केला. यांनीं मला हात धरून त्या रस्त्यानें खेंचीत नेलें. मी खुषीनें येतों असें दर्शवून त्यांचा हात किंचित् ढिला पडूं दिला व संधि साधून त्यांना झुकाटा देऊन मी एकदम निसटलों तों थेट घरीं येऊन बसलों. नंतर ते पंडिताबाईंची भेट घेऊन घरीं आले. पंडिताबाईंशीं माझी पुढें चांगली ओळख झाली. दुसरा प्रसंग श्रीयुत माधवदास रघुनाथदास यांच्या बंगल्यांत होणाऱ्या एका पुनर्विवाहाचा होता. मला तेथें जाण्याला धैर्य होईना. शेवटीं यांजबरोबर मी भीतभीत गेलों, व अगदीं एका कोपऱ्यांत बसलों. हे मला वधूवरांना पाहण्यासाठीं पुढें बोला-

चीत होते; पण मी पुढें गेलों नाहीं. अखेरीला हे पुढें गेले व सर्व प्रकार सावकाशपणें पाहून परत आले आणि नंतर ते व मी घरीं गेलों.

नरहरपंत आपलें कल्याण साधूनच स्वस्थ बसले नाहींत. यांनीं आपल्या भावांचें शिक्षण करून त्यांना मार्गाला लाविलें. त्यांपैकीं एक वकील असून दुसरा अल्पवयांत परलोकवासी झाला. आप्तांचें हित साधण्यासंबंधानें नरहरपंतांची फार मोठी कामगिरी म्हणजे त्यांची बहीण गोदूबाई हिला शारदासदनांत घालण्यासंबंधानें होय. लोकापवाद सोसून मातापितरांच्याहि मर्जीविरुद्ध त्यांनीं तिला १८८९ सालीं शारदासदनांत आणून घातलें. शारदासदन निघण्यापूर्वींच कांहीं महिने त्यांनीं तिला मुंबईला आणलें होतें, व ती आमच्या संयुक्त कुटुंबांत राहत असे. शारदासदन निघालें नसतें, तरी त्यांनीं तिच्या शिक्षणाची कांहीं सोय केली असती. ही शारदा-सदनांतील पहिली विधवा विद्यार्थीण होय. ही गोष्ट जर नरहरपंतांच्या हातून घडली नसती, तर तिचा सर्व जन्म दुःखांत आणि कष्टांत गेला असता.

सारांश आयुष्याच्या अत्यंत महत्त्वाच्या काळांत नरहरपंतांच्या दहा वर्षांच्या निकट सहवासामुळें मजवर अत्यंत इष्ट परिणाम घडला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे माझ्या विवेचक व चिकित्सक शक्तीला उजळा देऊन त्यांनीं माझ्या विचारक्षेत्राची मर्यादा पुष्कळ वाढविली.

# प्रकरण सतरावें

## गृहस्थाश्रम ( पूर्वभाग )

आमच्या सुशिक्षित समाजांत देखील नांवाची विवाहित स्थिति, खरी विवाहित स्थिति, आणि जबाबदारी ओळखून स्वतःच्या संसाराचा भार आपल्या अंगावर घेऊन स्वीकारलेली गृहस्थाश्रमाची स्थिति, या तीन अवस्थांतून मनुष्याला जावें लागतें. अलीकडे पहिल्या दोन स्थितींच्या कालमर्यादा थोड्याशा आकुंचित झाल्या आहेत. पस्तीस वर्षांपूर्वी या दोनहि स्थितींत बरींच वर्षे घालवावीं लागत.

माझें लग्न पंधराव्या वर्षी झालें. मुलगी शेजारचीच पाहिली. आमचे वयांत अंतर सहा वर्षांचें होतें. त्या वेळीं मुलामुलींच्या लग्नाचा हाच योग्य काळ समजला जात होता. आमची परस्परांची चांगलीच ओळख होती. आमच्या घरांमध्यें अंतर फारसें अंतर नसल्यामुळें आम्ही कधींकधीं खेळावयालासुद्धां एकत्र जमत असूं. याशिवाय आमची विशेष ओळख असण्याला आणखी एक कारण होतें. राधाबाईची चुलती ती माझी मामेबहीण होती, यामुळें त्यांच्या घरीं माझें जाणेंयेणें असे. आमची पूर्वीची इतकी ओळख होती, तरी आमचें लग्न झाल्याबरोबर आम्हांला ती विसरून जाणें भाग पडलें. जनरीतीप्रमाणें आमचें परस्पर बोलणें, हंसणें, खेळणें अगदीं बंद झालें.

तथापि आमच्या घरीं इतरांच्याइतका प्रतिबंध नव्हता. आमची आई फार चांगल्या स्वभावाची असल्यामुळें ती मुलीप्रमाणेंच सुनांना वागवीत असे, व घरांतील मनुष्यांचें एकमेकांशीं वागणें अधिक प्रेमाचें व मोकळेपणाचें असे. कित्येक जुन्या कुटुंबांत वडील मनुष्यांचा लहान मुलांना फार धाक वाटत असतो. तशी स्थिति आमच्या कुटुंबांत नव्हती. पांचसहा वर्षे नांवाच्या विवाहित स्थितींत गेल्यावर मी खऱ्या विवाहित स्थितीचा अनुभव घेऊं लागलों. यानंतर मी सुट्टीचा घरीं गेलों म्हणजे कुटुंबांतील सर्व मंडळी एकत्र बसून सुखदुःखाच्या गोष्टी कराव्या, असें कधींकधीं घडत असे. मुंबईत शिकावयाला गेल्यावर मे महिल्याच्या सुट्टींत मी घरीं गेलों, त्या वेळीं पत्नी राधाबाई व बहीण अंबाताई या उभयतांना लिहिणेंवाचणें

शिकविण्याचा प्रारंभ केला. आईनें या कामीं बिलकूल अडथळा केला नाहीं. बाबांनाहि ही गोष्ट कळली, पण त्यांनीं देखील नाखुषी दर्शविली नाहीं. आई व बाबा या उभयतांचेंहि मजवर फार प्रेम होतें. मी कदाचित् कुटुंबाला बरे दिवस दाखवीन, अशा आशेचा अंकुर त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाला असावा. मी बी. ए. झालों, तेव्हां मला फार आनंद झाला, पण तो दुणावण्याला बाबा असते तर कितीतरी मौज झाली असती. असो. राधाबाई आणि अंबाताई यांनीं शिकण्याला प्रारंभ केला, व सवडीनें आपला अभ्यास दादांच्या मदतीनें चालविला. या दोघी चांगलें लिहावयाला व वाचावयाला शिकल्या. राधाबाई आणखीहि शिकली असती, पण तिला लवकरच मूल झाल्यामुळें तिचें शिकणें मागें पडलें. तिला त्या वेळीं अठरावें वर्ष होतें, व मला चोविसावें होतें. मी कॉलेजांत जाण्याला सुरुवात केली व पंधरा दिवसांनीं मला रघुनाथाच्या जन्माची वार्ता कळली.

बी. ए. होण्याच्या आधींच सहा महिने मी मुंबईला वेगळा संसार मांडला होता; परंतु माझ्या खऱ्या गृहस्थाश्रमाला प्रारंभ द्रव्यार्जन करणें ही मुख्य गोष्ट होऊन अभ्यास करणें ही गौण झाली तेव्हांपासून, म्हणजे खऱ्या विवाहित स्थितीचा अनुभव घेऊं लागल्यानंतर, सहा वर्षांनीं झाला. राधाबाई शांत व सोशिक आणि आज्ञाधारक बायको होती. तिच्या सहनशीलतेमुळेंच भिन्न कुटुंबांतील मनुष्यें एकत्र राहणें शक्य झालें. आमचा उभयतांचा समागम आम्हांला फार आनंददायी झाला. आम्हां दोघांनाहि भरपूर काम असे; यामुळें राधाबाईच्या शिक्षणाकडे मला फारसें लक्ष देतां आलें नाहीं. तथापि तिनें कांहीं मराठी पुस्तकें वाचलीं व इंग्रजी तिसरें पुस्तक ती शिकत होती.

बऱ्याच गोष्टींत नवीन प्रयोग करून पाहणें हा माझा स्वभावच झाला. लहान मुलांना एकसारखें पुष्कळ तास शाळेंत बसवून ठेवणें बरें नव्हे, असें मला वाटत होतें; म्हणून आमचा मुलगा रघुनाथ याला शाळेंत न घालतां घरींच कांहीं शिकवावें, असें आम्हीं ठरविलें. राधाबाई मधल्या वेळीं त्याला शिकवीत असे. पुढें एकदोन वर्षें दररोज एक तास शिकविण्यासाठीं घरींच मास्तर ठेविला. पुढें तो आठ वर्षांचा झाल्यावर त्याला

शाळेंत घालण्याचें ठरविलें. परंतु पहिल्यापासून सगळे अभ्यास क्रमानें झालेले नसल्यामुळें वर्गांत याचें बरोबर चालणार नाहीं, असें वाटलें. नियमितपणें शाळेंत न गेल्यामुळें त्याच्या अंगीं राहिलेला कच्चेपणा काढून टाकणें जरूर होतें. यासाठीं त्याला दुसऱ्या कोणत्या शाळेंत न पाठवितां माझे बालमित्र बाळकृष्ण वामन आचवल यांच्या स्वाधीन त्याला करावा, असें वाटलें. हे ट्रेनिंगकॉलेजांतून पास होऊन आलेले होते, व या वेळीं मुरुडापासून तीन कोशांवर बुरोंडी गांवीं मुख्य मास्तर होते. रघुनाथाच्याच वयाचा यांचा मुलगा होता, व त्या दोघांचा अभ्यासहि बरोबरच होता. तेव्हां त्यांनीं रघुनाथाला आपल्याकडे ठेवण्याचें कबूल केलें. या कामीं राधाबाईनेंहि हरकत घेतली नाहीं. बाळकृष्णपंतांचें घर तिच्या घराशेजारींच असल्यामुळें त्यांची व त्यांच्या बायकोची विशेष ओळख होती, व या दोन्ही माणसांवर तिचा विश्वास होता; यामुळें आपल्या मुलाला त्यांच्या स्वाधीन करणें तिला जड वाटलें नाहीं. सुमारें वर्षदीडवर्ष तेथें राहून रघुनाथाची पांचवी इयत्ता चांगली झाल्यावर त्याला परत मुंबईला आणलें.

ज्यांच्याशीं माझें विशेष संघट्टन झालें, असे माझे मित्र काय ते दोनच. एक नरहरपंत व दुसरे बाळकृष्णपंत. बाळकृष्णपंताचा व माझा व्यवहार अत्यंत प्रेमाचा व मोकळेपणाचा आहे. यांच्याइतके व्यवस्थित गृहस्थ फार थोडे सांपडतील. यांनीं दरमहा अकरा रुपये पगारापासून सतरा रुपये पगारापर्यंतची पंचवीस वर्षें मास्तरची नौकरी केली, व आतां ते पेनशनर आहेत. यांना इंग्रजीचा गंधहि नाहीं; पण यांचे विचार फार पुढें गेलेले आहेत. माझ्या पुनर्विवाहामुळें मजवरचें यांचें प्रेम रतिभरहि कमी झालें नाहीं. यांनीं गरिबींतून डोकें वर काढलें. काटकसरीनें संसार करून आतां हे सुखी झाले आहेत. हे गृहस्थ व्यवहारदक्ष व दुसऱ्याची लबाडी ओळखणारे आहेत; पण यांचा व्यवहार अगदीं प्रामाणिकपणाचा असतो. यांच्या अंगीं अनेक अनुकरणीय गुण आहेत.

राधाबाई फार थोर मनाची बायको होती. बिऱ्हाडाची जागा अगदीं लहान आणि घरांत मंडळी पुष्कळ यामुळें तिला निवांतपणा अगदीं मिळत नसे. दगदगीला ती कंटाळली नाहीं, व कोणत्याहि गोष्टीबद्दल तिनें कधीं

कुरकुर केली नाहीं. तिला थोडें स्वास्थ्य द्यावें असें माझ्या मनांत होतें; पण तसा योग येण्यापूर्वीच विचारीला ह्या लोक सोडून जाणें भाग पडलें. ती एकदोन वेळां अजारी पडली, तेव्हां तिला मुरुडाला ठेविलें. त्यावेळीं लांबलचक पत्रें लिहून आम्ही एकमेकांना संतुष्ट करण्याचा यत्न करीत असूं. नंतर ती चांगली बरी होऊन मुंबईला आली; परंतु पुनः कांहीं महिन्यांनीं तिला दुखण्यानें पछाडलें, तेव्हां तिला मुरुडाला पाठविलें. ही आतां जगत नाहीं, असें कळल्यावर मी तिला परमार्थपर पत्रें लिहून तिचें मन मरणाला तयार व्हावें असें करीत होतों, व त्या प्रसंगासाठीं स्वतःच्या मनाचीहि तयारी करीत होतों. आमच्या कुटुंबांतील मनुष्यांमध्यें अशा प्रसंगीं मन कठोर बनविण्याचा गुण विशेष प्रमाणांत आहे. बाबा वारले त्या वेळीं आईनें विशेष प्रकारचें धैर्य दाखविलें होतें. शेवटच्या दोन दिवसांत शुश्रूषेसाठीं जरूर तेवढें त्यांच्याजवळ बसून बाकीचा वेळ तिनें देवांपुढें बसून आपलें मन तयार करण्यांत घालविला होता. जेव्हां अखेरचा वेळ आला, तेव्हां कोणत्याहि प्रकारचा आरडाओरडा न करितां ज्या गोष्टी करावयाच्या त्या तिनें निमूटपणें केल्या. पतिमरणोत्तर ब्राह्मणस्त्रियांवर जो अत्यंत हिडिस प्रसंग येतो त्यालाहि तिनें निमूटपणें मान वांकविली. बाबांच्या मरणाच्या वेळीं मी मुंबईला होतों. त्या वेळीं माझें वय एकवीस वर्षांचें होतें. मला सर्व कांहीं चांगलें कळूं लागलें होतें, व बाबांच्या मरणानें माझ्या शिक्षणावर गदा येते कीं काय, हेंहि भय होतें. तथापि ते आजारी असल्याची वार्ताहि नसतां एकदम त्यांच्या देहावसानाबद्दल पत्र आलें, तरी मी घाबरून हताश होऊन बसलों नाहीं. राधाबाईच्या मरणाच्या वेळीं माझ्या मनाची चांगलीच तयारी झालेली होती. तिच्या मरणाचा प्रसंग पावसाळ्यांत आल्यामुळें व पावसाळ्यांत कोंकणचा प्रवास पुष्कळ वेळ खाणारा व कष्टाचा असल्यामुळें मला शेवटीं तिला भेटावयाला जाण्याला सांपडलें नाहीं. श्रावण शुद्ध ५ शके १८१३ रोजीं तिचा अंत झाला. तिच्या मरणाची वार्ता मी नित्याप्रमाणें संध्याकाळीं बाहेरून आला तेव्हां मला पत्रद्वारें कळली. त्या रात्रीचा कांहीं भाग झोंपेवांचून विचारतां गला असेल, पण मीं पहांटेला रोजच्याप्रमाणें कार्यक्रम सुरू केला, व संध्याकाळीं घरीं आलों. जणूं काय विशेष कांहीं घडलेलेंच नव्हतें



प्रो. कर्वे यांच्या कुटुंबांतील मंडळी आप्तवर्ग आणि मित्र.

असल्या प्रसंगीं मनुष्यें निरुद्योगी होऊन बसतात, व समाचाराला येणाऱ्या आसांशीं त्याच त्या गोष्टींची चर्चा करीत राहतात, यामुळें त्यांना निष्कारण कितीतरी त्रास होतो. नित्य कृत्यांत व्यग्र होऊन जाणें यासारखा असल्या गोष्टींचा विसर पाडण्याला दुसरा उपाय नाहीं. रघुनाथाची या वेळीं मुंज झालेली होती. तेव्हां उत्तरक्रियेचे अतिजरूरीचे शेवटचे भाग मीं रघुनाथाकडून अगदीं थोड्या खर्चांत करविले, व यासंबधाचें माझें लौकिक कर्तव्य मीं निराळ्या प्रकारें केलें. राधाबाई स्मारकफंड म्हणून पांचशें रुपयांची रकम मुरूडफंडांत कायम ठेवून तिच्या व्याजाचा उपयोग मुरूड गांवांत इंग्रजी शिक्षण आणि स्त्रीशिक्षण यांना उत्तेजन देण्याच्या कामीं करावा म्हणून अट घालून दिली. मुरूडफंड लयाला जाईल, तर त्या वेळीं ही रकम स्त्रीशिक्षणाच्या संबंधानें जी चांगली संस्था वाटेल तिच्या हवालीं करण्याविषयींहि दुसरी अट घालून ठेविलेली आहे.

---

# प्रकरण अठरावें

## कुटुंबांतील कांहीं महत्त्वाचे प्रश्न

काका आजारी पडून घरीं आले, तेव्हां कोरेगांवाला पुनः आपले पाय लागावयाचे नाहींत ही कल्पना त्यांच्या मनांत आली नाहीं. कांहीं फार महत्त्वाचे कागद ते मुरुडाला ठेवीत; परंतु साधारण महत्त्वाचे सर्व कागदपत्र कोरेगांवींच असत. ह्या कागदपत्रांचा रुमाल बाबा वारल्यावर यजमानांनीं दादांच्या हवालीं केला. त्यांनीं कुटुंबाचें पोषण होण्यासारखी व्यवस्था तेथें केली होती, व त्यांच्या हाताखालीं तयार झालेलें मनुष्य तेथेंच राहतें, तर त्यानें ती तशीच पुढें चालविली असती. परंतु खेडेगांवांतल्या अशिक्षित शेतकऱ्यांशीं व्यवहार करावयाचा म्हणजे मनुष्य नेहमीं जाग्यावर पाहिजे, व त्यानें डोळ्यांत तेल घालून संधि येईल त्याप्रमाणें वसूल करण्यासाठीं तत्पर राहिलें पाहिजे. तसें आमच्या घरीं कोणी मनुष्य नव्हतें. आई व दादांचीं मुलेंबाळें असा व्याप मुरुडाला बराच वाढलेला होता, तेव्हां त्यांनीं मुरुडाला राहणें जरूर होतें. शाळेंत त्यांना दरमहा आठ रुपये मिळत असत. वर्षांतून आठपंधरा दिवसांची रजा घेऊन ते कोरेगांवाला जात व होईल तेवढा वसूल करीत, पण तिकडे पेरलेल्या पैशाला बरीच बूड आली.

मला मिळूं लागल्यापासून मी मुरुडाला खर्चासाठीं पैसे पाठवूं लागलें. एकदां कांहीं अधिक खर्च झाल्याबद्दल मीं दादांना जरासें लागण्यासारखें पत्र लिहिलें. अर्थात् तें त्यांना सहन झालें नाहीं, व उलट पत्र लिहून त्यांनीं माझी चांगली खरडपट्टी काढली. या पत्राचें उत्तर मीं मनोवृत्ति उचंबळित होऊन लिहिलें. मीं त्यांची क्षमा मागितली. पत्र लिहावयाला बसलेल्या जागींच मीं साष्टांग नमस्कार घातला. आणि तसें केल्याबद्दल मी त्यांना लिहिलें.

या माझ्या पत्रानें त्यांचा राग शांत झाला. दादांना लागण्यासारखें पत्र जें मी लिहिलें तें केवळ चढून जाऊन उद्दाम वृत्तीनें लिहिलेलें नव्हे. मी स्वतः अगदीं काटकसरीनें खर्च करीत असें. शिल्लक राहिलेल्या पैशाचा सद्व्यय करण्याचे विचार माझ्या मनांत सारखे येत असत. तेव्हां ही दे-

गेली खरी, परंतु प्रश्नाचा निकाल लागला नाहीं, असें मला वाटत होतें. यासाठीं योग्य संधि साधून हा प्रश्न मी दादांजवळ काढिला. महत्त्वाच्या कुटुंबाच्या बाबींचा विचार बहुतकरून आम्ही कुटुंबांतील सर्व मंडळी एकत्र जमून करीत असूं. आई, अंबाताई, दादा, चुलत बंधु गंगाधरपंत, बालमित्र बाळकृष्णपंत आचवल आणि मी इतक्यांचें कौन्सिल कोणत्याहि महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करणें झाल्यास भरत असे. या कौन्सिलापुढें मीं आपलें म्हणणें सांगितलें. त्याचा सारांश एवढाच होता कीं, 'कुटुंबाला सालोसाल सारखी मदत करीत राहणें माझ्या हातून होणार नाहीं. कांहीं द्रव्य मिळवून त्याचा सदुपयोग करण्याचें माझ्या मनांत आहे. तरी कांहीं वर्षें मदत केली म्हणजे पुढें मदत करण्याची जरूर राहूं नये, अशी कांहीं तरी योजना करा.'

या प्रश्नावर बराच विचार होऊन अखेर निकाल झाला तो येणेंप्रमाणेंः- 'मीं कुटुंबाच्या तरतुदीसाठीं म्हणून पंधराशें रुपये दादांना द्यावे. ही फेड होईपर्यंत सदर रकमेचें अगर शिल्लक राहिलेल्या रकमेचें व्याज दरसाल दर शेंकडा सहा रुपयेप्रमाणें मीं द्यावें. शिवाय आपल्या इस्टेटींतून दोनशें रुपये अंबाताईला द्यावे, अशी इच्छा बाबांनीं प्रदर्शित केली होती ती रकम मीं द्यावी, व आणखी शंभर रुपये दादांची मुलगी मनुताई हिच्यासाठीं द्यावे. असे एकंदर अठराशें रुपये मीं दिले म्हणजे पुढें कांहींएक देण्याची जबाबदारी मजवर नाहीं,' असें ठरलें, व मला माझ्या डोईवरचा एक भार उतरल्यासारखें वाटलें.

वरील योजना कायम करून टाकण्यासाठीं पुढें दोन वर्षांनीं आम्हीं एक व्यवस्थापत्रक केलें. त्यांतील मुद्याचा मजकूर पुढीलप्रमाणेंः—

**व्यवस्थापत्रक शके १८१० सर्वधारी नाम संवत्सरे माहे मार्गशीर्ष वद्य ११, मंदवार, ते दिवशीं, भिकाजी व धोंडो केशव कर्वे राहणार मुरूड, तालुके दापोली, जिल्हा रत्नागिरी कारणें व्यवस्थापत्रक करितों जे मनुष्यदेह क्षणभंगुर आहे, त्याचा घटकेचा नियम नाहीं; करितां आम्हांपैकीं कोणी मयत झाला असतां त्याच्या कुटुंबाची पाठीमागें नीट व्यवस्था रहावी व इस्टेटीच्या वांटणींत तंटेबखेडे होऊं नयेत म्हणून आज रोजीं आम्ही**

एकमेकांच्या विचारें आपल्या वडिलोपार्जित व स्वकष्टार्जित स्थावरजंगम इस्टेटीची व्यवस्था करून ठेवीत आहों, तिचा तपशील.

आजमितीस आपलें स्थावर जंगम इस्टेट आहे त्याची यादीः—

( या यादींत स्थावरजंगम इस्टेटीचे नऊ तुकडे आहेत.

सदरहू इस्टेटींचे विभाग करावयाचे ते कलमवारः—

१ पहिला भागः—भाट रु. ३००, मधलें ठिकाण खुद्दपैकीं रु. ३००, रामभाऊपैकीं रु. ३१० व कोरेगांवचें शेत रु. ५० एकूण अजमासें रु. ९६०.

१ दुसरा भागः—राहतें ठिकाण रु. ५०० व काळे यांचें ठिकाण रुपये ५००, मिळून रु. १०००.

१ तिसरा भागः—जमीन किंमत रु. २००.

१ चवथा भागः—गहाण मिळकत किंमत रु. १९८.

१ पांचवा भागः—कर्जखत रु. १००.

उभयतां बंधूंपैकीं जो मयत होईल त्याचे कुटुंबास सदरील इस्टेटीपैकीं दुसरा भाग द्यावा, व मागें राहील त्यानें पहिला भाग घ्यावा. तिसरा भाग मातोश्रींच्या निर्वाहाकरितां ठेवावा व त्याचें उत्पन्न घेऊन जो मागें राहील त्यानें मातोश्रींचें पालन करावें. चवथा भाग अंबाबाईकरतां ठेवावा व त्याचें उत्पन्न घेऊन तिला व्याजाबद्दल दरसाल १२ रुपये देत जावे. सदरहू भागावर हक्क सर्वस्वीं अंबाबाईचा असून तिच्या इच्छेप्रमाणें त्याची व्यवस्था व्हावयाची. पांचवा भाग मनुताईकरितां ठेवावा व व्याजाबद्दल तिला दरसाल सहा रुपये पोंचते करावे.

ह्याशिवाय दागदागिना, भांडेंकुंडें वगैरे (हें कोणाजवळही शेंदोनशें रुपयांहून अधिक किंमतीचें नव्हतेंच) जें ज्याजवळ असेल तें त्यानें घ्यावें व धोंडोपंत यांची खाजगी शिल्लक असेल तिचे दोन सारखे भाग करून एकेकानें घ्यावे, आणि भिकाजी पंत यांनीं घराकडील कर्ज दाखवूं नये.

इस्टेट घेण्याकरितां आजपर्यंत धोंडोपंत यांनीं नऊशें रुपये पाठविले आणि सहाशें रुपये पाठविण्याचा त्यांचा इरादा आहे. ते आल्यानंतर इकडील इस्टेटीची किंमत २५६० रुपये होईल. नंतर धोंडोपंत यांजकडून पैसा इकडे यावयाचा नाहीं. त्यांचे जवळच शिल्लक रहावयाचा. धोंडोपंतांजवळ ही शिल्लक २५६० रुपये जमेपर्यंत जर आपण उभयतां हयात असलों तर इकडील सर्व इस्टेट भिकाजीपंतांनीं घ्यावें व तिकडील धोंडोपंतांनीं घ्यावें. परंतु ह्या योग येण्यापूर्वींच जर उभयतांपैकीं कोणी मयत झाला तर वरील पत्रकाप्रमाणें व्यवस्था होऊन धोंडोपंत यांचें खासगी शिलकेचे दोन सारखे भाग करून एकेकानें घ्यावे.

धोंडोपंत यांचे हिश्श्याचे २५६० रुपये जाऊन अधिक रकम त्यांस संसारांत घालावीशी वाटल्यास तिचे तीन सारखे भाग करून भिकाजीपंत, धोंडोपंत व अंबाबाई यांनीं घ्यावे.

तिसऱ्या भागापैकीं मातोश्रींच्या उत्तरकार्यास जरूर लागेल तो खर्च करून बाकी राहील त्याचे दोन सारखे भाग करून एकेकानें घ्यावे.

येणेंप्रमाणें व्यवस्था करण्याचें उभयतांचे विचारें ठरविलें आहे. याचे विरुद्ध कोणीं वागूं नये. ह्या व्यवस्थापत्रकाची एक प्रत भिकाजीपंत यांचे हातची उभयतांचे सह्यांनिशीं धोंडोपंतांजवळ असावी, व धोंडोपंत यांचे हातची उभयतांचे सह्यांनिशीं भिकाजीपंतांजवळ असावी. हें व्यवस्थापत्रक आम्हीं उभयतांनीं आपले राजीखुषीनें व अक्कलहुशारीनें केलें आहे. तारीख २९ दिजंबर १८८८ इसवी.

भिकाजी केशव कर्वे वर्तक दस्तुर खुद्द.
धोंडो केशव कर्वे वर्तक दस्तुर खुद्द.

याप्रमाणें व्यवस्था होऊन मी एका जबाबदारींतून सुटलों असें मला वाटलें. जवळ पैशाचा संग्रह करण्याचें कधींच माझ्या मनांत आलें नाहीं. एकीकडून पैसा येत होता व दुसरीकडून खर्च होत होता.

या प्रकरणांतच आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. दादांची मुलगी मनुताई हिचें जेव्हां दहाअकरा वर्षांचें वय झालें, तेव्हां तिच्या लग्नासंबंधानें काय करावें, हा प्रश्न उपस्थित झाला. गरीब कुटुंबांतला एकादा बऱ्या बुद्धीचा मुलगा पहावा व लग्न अगदीं थोड्या खर्चांत करून त्या मुलाला आपण शिक्षण द्यावें, हा माझा विचार मीं दादांना कळविला, व तो त्यांना पसंत पडला. तेव्हां मुरुडांतल्याच एका मुलाची निवड करून हें लग्न उरकून घेतलें, व त्या मुलाला इंग्रजी शिकण्यासाठीं मीं मुंबईला आणिलें. मी मुंबईहून पुण्याला आलों, तेव्हां या मुलाला बरोबर आणून त्याला न्यू इंग्लिश स्कुलांत घातलें. त्याची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा झाल्यानंतर कॉलेजांत शिकण्याचें त्यानें मनांत आणलें. तेव्हां मीं त्याला सांगितलें कीं, " आतां तुझ्यासाठीं अधिक पैसा खर्च करण्याची माझी इच्छा नाहीं. तथापि पुढें शिकण्याची तुझी इच्छा असेल तर मी तुला कर्जाऊ रक्कम देतों, तिजवर तूं दरसाल दरशेंकडा पावणेचार रुपयेप्रमाणें चक्रवाढीनें व्याज दिलें पाहिजे. " ही गोष्ट त्याला कबूल झाली. तेव्हां त्याच्या आयुष्याचा एक हजार रुपयांचा विमा उतरला, व त्याला खर्चासाठीं लागतील ते पैसे देऊं लागलों. पोस्टऑफिसाच्या पासबुकाप्रमाणें या हिशोबाचें पासबुक केलें होतें. पुढें कॉलेजाचा अभ्यास झेंपत नाहीं असें लवकरच त्याला दिसून आलें, तेव्हां तो नाद सोडून तो वकिलीचा अभ्यास करूं लागला. त्यासंबंधाचा खर्चहि मी वरील शर्तीवर देऊं लागलों. पुढें दुर्दैवानें तो वारला. त्याच्या पॉलिसीची रक्कम ९४९ रुपये हातीं आली. तींतून माझा झालेला खर्च मीं घेतला व शिवाय त्यानें कोणाचें कांहीं देणें होतें तें देऊन व त्याच्या बापाचें थोडें कर्ज फेडून व बापाला थोडें खर्चावयाला देऊन बाकी उरलेली रक्कम परत व्याजीं लाविली आहे. हल्लीं ती चारशें रुपये झाली आहे. ही कांहीं अटींवर मुरूड फंडाच्या स्वाधीन करण्याचा माझा विचार आहे. *

---

* ही रकम पुढें मुरूडफंडाकडे दिली. १९२६ अखेर ती व्याजासह ७६६८८१० झाली आहे; पैकीं ६०० रुपये दर्शनी किंमतीच्या साडे तीन व्याजाच्या प्रॉमिसरी नोटा आहेत. व्याज मुरूड गांवांत मुलींच्या शिक्षणासाठीं खर्च व्हावयाचें आहे.

मनूताईचें लग्न थोडेसें जनरीतीला सोडूनच झालें होतें. तात्कालिक भपक्याकडे लक्ष न देतां वधूवरांच्या भावी हिताकडे अधिक लक्ष देऊन लग्नांतला निरर्थक खर्च वांचवून त्याचा उपयोग वराच्या विद्यार्जनाकडे करण्यांत आला होता. यानंतर आणखी एक कार्य उपस्थित झालें. आमच्या कुटुंबाची स्थिति साधारण बरी झालेली होती. अशा स्थितींत माझा मुलगा रघुनाथ याची मुंज करण्याची वेळ आली. असल्या कार्यांत गरीब लोक-सुद्धां किती तरी खर्च करितात हें बरें नव्हे, असें मला वाटत असे. अशा बाबतींत आपण एक उदाहरण घालून द्यावें, असें माझ्या मनांत आलें. हें करणें बरेंच अवघड होतें. आपण या प्रसंगीं गांवांत एक मोठें प्रयोजन करूं, आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांना देणग्या वगैरे देऊन खुष करूं, असें दादांना व आईला वाटणें साहजिक होतें. राधाबाईलाहि आपल्या माहेरच्या माणसांना या वेळीं खुष करावेंसें वाटत होतें. या सर्वांच्या समजुती पाहून मनांत आलेला बेत तडीला नेणें बरेंच अवघड काम होतें. प्रथम एक गोष्ट मी अशी ठरविली कीं, या कार्याकरितां सुमारें दोनशें रुपये खर्चण्याची आपली ऐपत आहे, तर हे रुपये एका सत्कार्याकडे देऊन फार थोड्या खर्चांत मुंजीचा जरूर तो विधि उरकून टाकावा. असलीं कार्यें ज्या तऱ्हेनें लोकांनीं करावीं असें मला वाटतें व ज्या प्रकारचा उपदेश लोकांना मी करूं इच्छितों, त्याप्रमाणें मी स्वतः जर वागलों नाहीं तर माझें वजन लोकांवर काय पडेल, हा विचार तुम्ही करा, असें मी दादा, आई व राधाबाई यांना सांगितलें. माझ्या मुलाची मुंज कशी करावी हें ठरविण्याची जबाब-दारी मुख्यतः माझ्यावर आहे. तेव्हां माझी मनोदेवता सांगेल त्याप्रमाणें तुम्ही मला वागूं देणें हें योग्य होईल. आईला मीं आणखी असेंहि सांगि-तलें कीं, तुझीं म्हणून जीं कर्तव्यें आहेत, तीं तुझी मनोदेवता सांगेल त्याप्रमाणें तुला करतां यावीं, म्हणून मजकडून जर कांहीं मदत पाहिजे असेल, तर ती देण्याला मी तयार आहें. उदाहरणार्थ, व्रतें केल्यावांचून आपणाला गति नाहीं, किंवा इतर स्त्रिया तीं करितात म्हणूनच आपल्याला तीं करावींशीं वाटतात असें जरी तुझें म्हणणें असलें, तरी त्या कामांत मी तुझ्या आड येणार नाहीं, आणि या कामांत तूं माझ्या आड येऊं नये. हा विचार तिला पटला व तिच्या व्रतांसाठीं मीं तिला खर्चहि दिला. अशा

तऱ्हेनें समजूत होऊन मुंजीचें कार्य माझ्या इच्छेप्रमाणें करावयाचें ठरलें. या कामीं माझे बालमित्र श्रीयुत बा. वा. आचवल यांची मला चांगली मदत झाली. त्यांच्याहि मुलाची मुंज करावयाची होती, ती त्यांनीं माझ्या धोरणानेंच करावयाचें ठरविलें. आमचे मित्र काशीनाथपंत काणे हे त्या वेळीं मुंबईमाहिमाला मास्तर होते, त्यांच्या घरीं या मुंजी आम्हीं पंधरा-रुपये खर्चांत उरकून घेतल्या, आणि माझे दोनशें व आचवल यांचे शंभर मिळून एकंदर तीनशें रुपये आम्हीं मुरूडफंडाच्या हवालीं केले. ही रक्कम कायम राहून तिच्या व्याजाचा उपयोग मुरूडगांवांत इंग्रजी शिक्षण अगर स्त्रीशिक्षण यांना उत्तेजन देण्याच्या कामीं करावा अशी अट यासंबंधानें घालण्यांत आली आहे.

दादांचा मुलगा वारल्यानंतर पुढील पिढींत आमचें कोणी मुरुडाला जाऊन राहणारें मनुष्य नाहीं, ही गोष्ट स्पष्ट दिसूं लागली. तेव्हां तिकडील मालमिळकतीची बुद्धिपुरःसर कांहीं व्यवस्था लावून टाकावी, असें आमच्या मनांत आलें व आम्हीं पुढील व्यवस्थापत्र करून टाकलें.

**व्यवस्थापत्रक शके १८१८ पराभवनाम संवत्सरे माहे वैशाख शुद्ध ३ शुक्रवार तारीख ११ माहे मे सन १९०६ ते दिवशीं, व्यवस्थापत्रक लिहून ठेवणार भिकाजी केशव कर्वे, वर्तक, धोंडो केशव कर्वे, वर्तक, व रघुनाथ धोंडो कर्वे, वर्तक, राहणार कसबे मुरूड हल्लीं मुक्काम मुरूड. आम्ही त्रिवर्ग एकमेकांच्या समजुतीनें व विचारानें आपल्या स्थावरजंगम वगैरे सर्व मिळकतीची व्यवस्था करीत आहों. सदर व्यवस्था करण्याचें मनांत येण्यास कारणः—आमचे पूर्वज प. वा. वेदशास्त्रसंपन्न केशवभट्ट व रघुनाथभट्ट कर्वे, वर्तक, यांनीं पुष्कळ संपत्ति मिळविली. त्यांच्या त्या वैभवाची साक्ष आजमितीस बहुतेक नामशेष झालेलें श्रीमहादेवेश्वराजवळचें तळें व श्रीदुर्गादेवीचें देवालय हीं देत आहेत. वैभव सर्व नष्ट झालें, पण परोपकारार्थ उभारलेलीं कामें मात्र अजून जिवंत आहेत. प. वा. तीर्थरूप केसो बापूजी कर्वे, वर्तक, हे वयांत येण्याचे सुमारास कर्वे वर्तक यांचें वैभव**

पूर्णपणें नष्ट झालें होतें. त्रिवर्गबंधू विभक्त झाले तेव्हां प्रत्येकाचे वांटणीस सुमारें एक हजार रुपये किंमतीचें स्थावर इस्टेट आलें. त्यांतूनच सावकाराचें देणें शंभर रुपये वारावयाचें होतें. तीर्थरूप केसोपंत व लक्ष्मीबाई यांनीं फारच गरिबीनें राहून कर्जवाम वगैरे न करितां मुलांचीं लग्नें कार्यें व शिक्षण केलें. ती अत्यंत दक्षपणानें संसार न करतीं तर आम्हांस ही स्थिति प्राप्त झाली नसती. मुलांबाळांच्या पोषणास व विद्येसाठीं त्यांनीं सर्व इस्टेट फ़ोक्त केलें असतें तरी त्यांना कोणीहि दोष दिला नसता. हें लक्ष्यांत आणून व आम्हांपैकीं भिकाजी केशव यास पुत्र नाहीं व धोंडो केशव यांच्या मुलांची साधारण प्रकारची सोय होण्यासारखी स्थिति आहे हें ध्यानांत घेऊन, कर्वे वर्तक यांच्या वंशाचें व विशेषतः आम्हांपैकीं उभयतां बंधूंचीं मातापितरें लक्ष्मीकेशव यांचें कांहीं तरी स्मारक व्हावें, या हेतूनें आम्ही त्रिवर्ग व्यवस्था करतों ती येणेंप्रमाणें:—

१. ता. २९ दिजंबर १८८८ चें पूर्वीं केलेलें व्यवस्थापत्र रद्द केलें आहे.

२. आम्हांजवळ जी जंगम जिनगी असेल ती ज्यापाशीं जितकी असेल ती सर्व ज्याची त्यानें घेऊन तिची व्यवस्था त्यानें आपल्या मर्जीप्रमाणें करावी.

३. आमच्या दरोबस्त स्थावर मिळकतीचा उपयोग कालेंकरून वर लिहिलेल्या स्मारकाकडेच करावयाचा. परंतु आम्हांपैकीं भिकाजी केशव हयात असतील तोंपर्यंत त्यांनीं या सर्व इस्टेटीचें उत्पन्न भोगून सरकारदस्त वारावा.

४. रहातें ठिकाण व घर हीं जोंपर्यंत अंबाबाईचे देखरेखीखालीं सुव्यवस्थित राहूं शकतील तोंपर्यंत विकूं नये. परंतु सदर इस्टेटीची खराबी होते असें दिसून आल्यास भिकाजी केशव यांच्या पश्चात् ती विकावी. भाऊबंदांपैकीं ती कोणी विकत घेईल तर

त्याला रुपयाला चार आणेप्रमाणें नुकसान सोसून तीं खरेदी द्यावीं.

५. वरील कलमांतील इस्टेटीशिवाय बाकीची सर्व विकून टाकावी. मात्र सदर रकमेचें व्याज भिकाजी केशव यांच्या हयातींत त्यांस मिळावें.

६. एकंदर सर्व इस्टेट विकून जी रक्कम येईल ती मुरूड फंडाचे हवालीं करून तिचे समान दोन भाग करावे. एका भागाची रक्कम जशीच्यातशीच राहून तिचें व्याज मुद्दलांत मिळवीत जावें अशा रीतीनें एकंदर रक्कम व्याजमुद्दल मिळून पंचवीस हजार रुपये होईपर्यंत तींतून खर्च करूं नये. नंतर तिच्या व्याजाचा उपयोग मुरूड गांवांत देशकालवर्तमानास अनुसरून विद्याप्रसाराचे कामीं करावा. राहिलेल्या शिलकेचे दोन सारखे विभाग करून निमे श्रीमहादेश्वराजवळचे तळ्याची सार्वजनिक जागा कायम राहून फुलझाडांचा बाग वगैरे करण्यासाठीं, व त्याचा निरंतर खर्च चालू राहण्यासाठीं ठेवावी; व राहिलेली निमे श्रीदुर्गादेवीच्या दुरुस्तीसाठीं व शाकारणीसाठीं वगैरे जरूर लागेल तसतशी खर्च करण्यासाठीं ठेवावी. श्रीमहादेश्वराचे तळ्यासाठीं व श्रीदुर्गादेवीच्या देवालयासाठीं ठेवलेल्या रकमांपैकीं तितकी जरूर वाटल्यास मुद्दलांतूनहि खर्च करण्याला हरकत नाहीं. या सर्व रकमा मुरूड फंडांत लक्ष्मीकेशव स्मारक फंड म्हणून निराळेंच खातें घालून पोस्टब्यांकेमार्फत ठेवाव्या.

७. भिकाजी केशव यांच्या पश्चात् त्यांची मुलगी चिरंजीव सौ. सीताबाई हिची गरीबी असेल तर भिकाजी केशव यांच्या जंगम इस्टेटींतून अगर कलम ४ मधील इस्टेटीच्या निवळ वार्षिक उत्पन्नांतून तिला दरमहा तीन रुपये द्यावे. या दोहों मिळून दरमहा तीन रुपये देतां येत नाहींत, अशी स्थिति झाली तर कलम ४ यांतील इस्टेट विकून येईल ती रक्कम मुरूड फंडाचे हवालीं करून तिचें व्याज सीताबाईचें हयातीपर्यंत तिला द्यावें.

तिचे पश्चात् सदर रकमेची व्यवस्था कलम ६ यांत दर्शविल्याप्रमाणें व्हावी.

येणेंप्रमाणें व्यवस्थापत्रक आम्ही त्रिवर्गांनीं स्वसंतोषानें व अक्कलहुषारीनें लिहून ठेविलें आहे. मिति व तारीख मजकूर.

सह्या.
भिकाजी केशव कर्वे वर्तक दस्तुर खुद्द.
धोंडो केशव कर्वे वर्तक दस्तुर खुद्द.
रघुनाथ धोंडो कर्वे वर्तक दस्तुर खुद्द.

साक्ष.
गंगाधर बल्लाळ कर्वे वर्तक दस्तुर खुद्द.
बाळकृष्ण वामन आचवल दस्तुर खुद्द.

दादांचा वृद्धापकाळ होत चालला व तिकडील कारभारांत मदत करणारे आमचे व्यवहारचतुर मित्र बाळकृष्णपंत आचवल हेहि दिवसेंदिवस कमकुवत होत चालले. यामुळें मुरूडच्या इस्टेटीला पुढें योग्य किंमत येणार नाहीं, असा विचार माझ्या व दादांच्या मनांत आला व संधि आली असतां इस्टेट विकून टाकण्याचें आम्ही ठरविलें. त्याप्रमाणें बाळकृष्णपंताच्या मदतीनें चार महिन्यांपूर्वींच आम्ही इस्टेटीचें खरेदीपत्र करून दिलें. आतां आमचें मुरूड गांवीं कांहींएक राहिलेलें नाहीं. दादा अंबाताईचे घरीं राहतात. कांहीं महिन्यांपूर्वीं विकलेल्या इस्टेटीचें अकराशें रुपये व आतां विकलेलीचे एकोणीसशें मिळून एकंदर तीन हजार रुपये उत्पन्न झाले आहेत. त्यांची व्यवस्था वरील पत्रकांत दर्शविल्याप्रमाणें करावयाची आहे.*

---

* वरील रकमेपैकीं खर्चाचे ५० रुपये द्यावे लागल्यामुळें २९५० रुपये हातीं आले. त्यांतील ५०० रुपये दादांची मुलगी सीताबाई हीस दिले. राहिलेले २४५० रुपये मुरूड फंडाचे स्वाधीन करण्याच्या हेतूनें फंडाकडे पत्रव्यवहार केला. त्यांच्या अटी न पटल्यामुळें तो बेत रहित केला. सदर रकमेपैकीं सुमारें ४०० रुपये आप्तांच्या मुलांमुलींच्या शिक्षणाकडे खर्च झाले आहेत. बाकीची रकम मीच मुलाच्या शिक्षणाकरितां कर्जाऊ घेतली आहे. ती दादांच्या पश्चात् आश्रमाकडे लक्ष्मीकेशव स्कालरशिप सुरू करण्यासाठीं द्यावी असा हेतु आहे.

# प्रकरण एकोणिसावें

## गृहस्थाश्रमांतील अन्य कर्तव्यें

आपण, आपली बायको आणि आपलीं मुलें एवढेंच काय तें आपलें कुटुंब, आणि इतक्यांचें सुख साधलें कीं इहलोकींच्या आपल्या कर्तव्याची सीमा झाली असें ज्यांच्या कृतींत दिसून येतें, असे मनुष्य-प्राणी या जगांत किती तरी आढळतात, आणि सुशिक्षितांमध्यें देखील अशांचें प्रमाण असावें त्यापेक्षां कितीतरी अधिक आढळतें. सुदैवानें माझ्या मनावर बरे संस्कार होऊन माझी बुद्धि इतकी आकुंचित राहिली नाहीं.

माझ्या पूर्वजांनीं पुष्कळ संपत्ति मिळविली; पण ती लयाला जावयाला उशीर लागला नाहीं. त्यांच्या संपत्तीपैकीं थोडा अधिक वेळ टिकलेल्या दोनच गोष्टी मला दिसत होत्या. मोडकळीला येऊन निरुपयोगी झालेला त्यांनीं बांधलेला मोठा तलाव व श्रीदुर्गादेवीचें देवालय. पूर्वजांच्या इति-हासाचा माझ्या मनावर अतिशय परिणाम झाला. पैसे मिळवून घरदार करावें अगर चैन भोगावी, असा विचार क्षणभरहि मला शिवला नाहीं. थोडा पैसा मिळवून अगदीं जरूर तेवढा कुटुंबाच्या तरतुदीला लावून बाकीच्याचा सद्व्यय करावा, हा विचार गृहस्थाश्रमांत प्रवेश केल्यापासूनच सारखा माझ्या मनांत घोळत असे. आधीं कुटुंबाची तरतूद करूं आणि मग इतर विचारांकडे लक्ष्य देऊं, असेंहि मीं केलें नाहीं. सगळे विचार कांहीं प्रमाणानें एकदम अमलांत आणावयाचे, असें मीं ठरविलें.

कॉलेजाचें शिक्षण पुरें होईपर्यंत शिकवण्यांचे जे पैसे मला मिळत, त्यांपैकीं रुपयाला पैसा याप्रमाणें धर्मादायासाठीं काढून ठेवण्याला मी कधीं विसरलों नाहीं. पुढें एल्फिन्स्टन हायस्कुलांत जेव्हां मीं नोकरी धरली, तेव्हां या प्रमाणानें माझें समाधान होईना. यासाठीं प्राप्तीचे शेंकडा पांच टक्के अशा कार्यासाठीं मी काढून ठेवूं लागलों. या फंडाला ' धि मराठा फाइव्ह पर्सेंट ( शेंकडा पांच ) फंड ' असें नांव मीं दिलें होतें. प. वा. श्रीयुत राजाराम रामकृष्ण भागवत यांना मराठा हें नांव अत्यंत प्रिय होतें, आणि त्यांच्या सहवासानेंच हें नांव मीं या फंडाला दिलें असावेंसें वाटतें. या फंडाचा हिशोब मी ठेवीत असें; पण ते कागद आतां माझ्याजवळ शिल्लक

नाहींत. हा मीं केव्हां बंद केला, तेंहि स्मरण मला नाहीं. तरी चारपांच वर्षे तो मी जमवीत होतों. पुढें माझा धर्मादाय किती तरी अधिक प्रमाणावर आपोआपच होऊं लागला व हा फंड मीं बंद केला.

धर्मादायासाठीं काढून ठेवलेल्या वरील फंडाशिवाय दुसऱ्या एका कामीं आपल्या प्राप्तीचा बराच भाग खरचण्याचा मीं निश्चय केला. माझ्या शिक्षणाच्या कामांत आलेल्या अडचणी नेहमीं माझ्या लक्षांत असल्यामुळें मला पैसे मिळूं लागल्याबरोबर कांहीं विद्यार्थ्यांच्या या अडचणी दूर कराव्या असें मला वाटूं लागलें. या कामांत प्रथमतः मीं आपल्या आप्तांपासूनच आरंभ केला. माझे मामेभाऊ (रँगलर परांजपे) हे आठनऊ वर्षांचे असतांनाच त्यांना इंग्रजी शिकण्याला पाठविण्यासाठीं त्यांच्या वडिलांचें मन मीं वळविलें, व नरहरपंतांचे बंधु वामनराव जोशी हे दापोली येथील मिशनस्कुलांत मास्तर होऊन गेले होते त्यांच्या घरीं त्यांनीं रहावें, व मिशनस्कुलांत शिकावें, अशी व्यवस्था जुळविली. दापोलीला तीन इयत्ता झाल्यानंतर त्यांना मुंबईला नेलें. दुसरे विद्यार्थी दादांचे जांवई व तिसरे माझे मेहुणे म्हणजे राधाबाईचे बंधु. हे शेवटले दोघे अल्पायुषी निघाले. राधाबाईचे बंधु मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास होऊन नुकतेच पोस्टखात्यांत नोकरी करूं लागले होते. चवथ्या एका विद्यार्थ्यालाहि मजकडून थोडीशी मदत झाली. या विद्यार्थ्याचा माझ्याशीं आप्तपणा कोणताहि नव्हता. होतकरू विद्यार्थ्यांना मदत करावी या हेतूनेंच मीं त्याला तीन वर्षें मदत केली. पुढें त्याला गोकुळदास तेजपाळ बोर्डिंगाकडून मदत मिळून तो बी. ए. झाला. मी मजकडे असलेल्या सर्व मुलांना मराठा हायस्कुलांत घातलें होतें. मीं मुंबई सोडली तेव्हांच परांजपे मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाले व तींत त्यांचा पहिला नंबर आला.

एकाशिवाय करून बाकीचीं मुलें मजबरोबर पुण्याला आलीं. वरील तीन मुलांशिवाय माझा मुलगा रघुनाथ व माझे बालमित्र श्रीयुत बा. वा. आचवल यांचा मुलगा असे दोघे आणखी होते. आमचें घर मुलांनीं नेहमीं गजबजलेलें असे. परांजपे कॉलेजांत अभ्यास करूं लागल्यानंतर त्यांना थोडीशी स्कॉलरशिप मिळूं लागली, पण तेवढ्यानें सर्व खर्च भागत नसे. त्यांनाहि अधिक लागणारी मदत मी कर्जाऊ देऊं लागलों. दरसाल दर

शेंकडा पावणेचारप्रमाणें चक्रवाढ व्याजाचा दर ठेविला, आणि पोस्टव्यांके-प्रमाणें त्यांचें एक पासबुक करून ठेविलें. यांच्याहि आयुष्याचा एक हजार रुपयांचा विमा उतरला. यांनीं ही सर्व रक्कम पुढें सवडीप्रमाणें फेडून टाकली, तेव्हां मी त्यांना त्यांची विम्याची पॉलिसी परत दिली, व ती त्यांनीं अनाथबालिकाश्रमाला अर्पण केली. माझ्या आयुष्यक्रमाला जर इल्लींची दिशा लागली नसती, तर आणखी कांहीं विद्यार्थ्यांना मजकडून मदत झाली असती.

मुरूड गांवांतील श्रीदुर्गादेवीच्या देवालयाची माहिती पूर्वीं दिलेली आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं शाकारणीची हयगय होत असे, यामुळें छपरावरील रीफ कुजून देऊळ गळूं लागलें होतें. तीनचार वर्षें असें चाललें होतें, तरी या गोष्टीकडे कोणी लक्ष देईना. दातार, बाळ, कर्वे, दीक्षित (वैशंपायन) व जोशी या पांच वंशांतील पूर्वजांनीं हें देऊळ बांधलें होतें, व या सर्व वंशांतील मंडळी मुरुडांत होती. या कामांत कोणींच मन घातलें नाहीं, तर आपल्या पूर्वजांचें स्मारक नष्ट होऊन जाणार, हा विचार मनांत आणून हें काम अंगावर घेण्याचें मीं ठरविलें. जो खर्च होईल, त्याचे सारखे पांच भाग करून प्रत्येक वंशांतील मंडळींनीं आपल्या हिस्सेरशीनें आपला भाग पुरा करून द्यावा, अशी योजना केली व ती बऱ्याच मंडळीला पटून कांहींनीं वर्गण्यांचे आंकडेहि घातले. प्रथम सर्व खर्च मींच करावयाचें योजिलें, व गांवांतील एका संभावित गृहस्थाच्या मार्फत १८८९ च्या मे महिन्यांत हें काम करवून घेतलें. आयती तयार केलेली रीफ मुंबईहून पाठविण्याची व्यवस्था केली होती. वर्गणीचे आंकडे लोकांनीं घातले असले, तरी वर्गणी वसूल व्हावयाची नाहीं हें भविष्य कित्येकांनीं केलें होतें, तेंच अखेर खरें ठरलें. याला अपवाद एकच गृहस्थ निघाले. ते माझे साहाध्यायी श्रीयुत नारायण जगन्नाथ दातार होत. यांनीं मात्र दहा रुपये वर्गणी दिली. या कामीं खर्च दीडशें रुपये आला. पूर्वजांनीं करून ठेविलेल्या आपल्या स्मारकाची थोडीशी दुरुस्ती करण्याचें भाग्य मला लाधलें, याबद्दल मला फार समाधान झालें.

# प्रकरण विसावें

## पुण्यास येण्यापूर्वींचीं सार्वजनिक कामें

### मुरुडफंड

ही एक लहानशी नमुनेदार संस्था आहे. मुरूड गांवांत सहकार्याच्या बळावर कांहीं सार्वजनिक कामें व्हावीं या हेतूनें हिची स्थापना झाली आहे. आज सत्तावीस वर्षें ही सुयंत्र चालली आहे. ही सुरू करण्याचा पहिला यत्न माझे मित्र परशुराम हरी दामले व मी या उभयतांनीं केला. ही कल्पना प्रथम त्यांना सुचली कीं मला सुचली हें मला स्मरत नाहीं. मी मॅट्रिक्युलेशनच्या वर्गांत असतां परशुरामपंत व मी या उभयतांच्या सह्यांनीं मुरुडांतील जी मंडळी बाहेर नोकरीवर होती त्यांना पत्रें लिहून मुरूडफंडाची कल्पना कळविली होती व त्यांचे अभिप्राय मागविले होते. परंतु मी विद्यार्थी व परशुरामपंत नुकतेच मास्तर होऊन आलेले, यामुळें त्या वेळीं आमच्या पत्रांकडे कोणी फारसें लक्ष्य दिलें नाहीं, व ती गोष्ट तशीच राहून गेली. पुढें मी बी. ए. झाल्यानंतर परशुरामपंत, आमचे मित्र काशीनाथ वामन काणे, मी व या त्रिवर्गांनीं ही संस्था अस्तित्वांत आणण्यासाठीं पुनः खूप जोराचा प्रयत्न केला. आम्ही तिघेहि समवयस्क व लहानपणापासून एका ठिकाणीं वाढलेले व खेळलेले होतो. या कामांत आमच्याहून वडील अशा कांहीं ग्रामस्थांचें साहाय्य आम्हीं मिळविलें, आणि विजयादशमीच्या मुहूर्तानें ही संस्था मुंबई येथें सुरू केली. आम्हांपैकीं परशुरामपंत हे कारस्थानी व आपल्या भाषणानें दुसऱ्यांचीं मनें वळविणारे होते; काशीनाथपंत गंभीर आणि विचारी असत, आणि मी सद्बुद्धीनें हुरळून जाऊन आहाराबाहेर एकादी गोष्ट करणारा असें. शनिवार व रविवार हे दोन माझे बऱ्याच फुरसतीचे दिवस असत. ते बहुधा मुरूडफंडाच्या कार्याकडे जात. वरील गृहस्थांपैकीं एक कुलाब्याच्या ऑब्झर्व्हेटरींत बऱ्याच वरच्या दर्जाचे नोकर होते, व दुसरे कुर्ल्यास स्टेशनमास्तर होते. आम्हीं किती तरी शनिवाररविवारच्या रात्री या गृहस्थांकडे मुरूडफंडाच्या कामांचा खल करण्यांत घालविल्या. आमच्या गांवांतून

मोठ्या पगाराचे अगर विशेष वजनदार लोक फारसे तयार झालेले नाहींत. परंतु सामान्य कारकून व मास्तर मंडळी मिळून सुमारें १०० लोक बाहेर नोकरीवर आहेत. त्यांपैकीं सुमारें २५ मुंबईला असतात. मुरूडांत जन्मलेल्या अगर स्थायिक झालेल्या कोणत्याहि ब्राह्मण गृहस्थाला फंडाचा वर्गणीदार होतां येतें. प्रत्येक वर्गणीदाराला प्राप्तीच्या दर रुपयाला पैप्रमाणें वर्गणी द्यावी लागते. या नियमामुळें या फंडाला शेजारपाजारच्या गांवची मंडळी 'पैफंड' असेंहि म्हणतात. मुरूड गांवीं राहणाऱ्या नौकरी नसणाऱ्या वर्गणीदारानें निदान वर्षाची आठ आणे वर्गणी द्यावी असा नियम आहे. मुरूडफंडाचें मुख्य ठिकाण मुंबई असून कमेटीच्या सभा मुंबईलाच भरतात. वर्गणीदारांच्या सभा दोन भरतात. एक मुंबईला नवंबर महिन्यांत व दुसरी मुरूडाला मे महिन्यांत भरते. या सर्व सभा व वार्षिक आणि सहामाही रिपोर्ट हीं अगदीं नियमितपणें चाललेलीं आहेत. कमेटी दर दोन वर्षांनीं निवडली जाते. तींत अठरा सभासद असतात. मुंबई येथें रहाणारे १२, मुरूडास रहाणारे ३, व बाहेरगांवीं रहाणारांपैकीं ३. मुंबईला नसणाऱ्या सभासदांचीं मतें लेखी मागविलीं जातात. मी आरंभापासून आतांपर्यंत या कमेटीचा सभासद आहे. मुंबईला असतांना फंडासंबंधाची एकहि सभा मीं चुकविली नाहीं, व पुण्यास गेल्यानंतरहि महत्त्वाचें काम असलें तर मी मुद्दाम फंडाच्या सभेसाठीं मुंबईला जातों. कमेटीच्या सभेंतील प्रश्नांवर मतें पाठविण्यांत मी बिलकूल कसूर करीत नाहीं. प्रवासांत वगैरे असून पत्रच पोहोचलें नाहीं तर माझा इलाज नसतो. दसऱ्याच्या मुहूर्तानें मुरूडफंड स्थापन झाला, यासाठीं दसऱ्याचा दिवस मुरूडफंडाचा वाढदिवस म्हणून पाळला जातो. मुंबईला मुरूडफंडाचे सभासद व इतर मुरूडकर मंडळी दसऱ्याच्या दिवशीं रात्रीं एकत्र जमतात, व कांहीं भाषणें आणि गायन वगैरे होऊन कॉफीपान झाल्यावर घरोघर जातात. मी मुंबई सोडून पुण्याला आलों, तेव्हां शंभर रुपयांची देणगी मुरूडफंडाला दिली, व तिचें व्याज या वाढदिवसाच्या समारंभासाठीं खर्च करावें, अशी इच्छा प्रदर्शित केली. या फंडाचे वर्गणीदार सुमारें १३५ आहेत. फंडाजवळ आज ३६५२८३८३ रुपये शिल्लक आहेत. पैकीं २५४० रु. स्थायिक फंडाचे आहेत, व ११५२८३८३ चालू फंडाचे

आहेत. शिवाय गेल्या सत्तावीस वर्षांत २५३१८८५ रुपये खर्च झाला. पैकीं २०६५८१४८८ सार्वजनिक उपयोगाच्या (रस्ते, धर्मशाळा, पाण्याची सोय वगैरे) कामांसाठीं, व ४६५८१८९ रुपये गांवांतील देवळांच्या उत्सवांसाठीं वगैरे मदत म्हणून खर्च झाले आहेत.

या संस्थेचें काम फारच शिस्तवार चाललें आहे. वर्षांतून कमेटीच्या सभा चारपांच होतात. सहामाही रिपोर्ट व वार्षिक रिपोर्ट अगदीं नियमित-पणें एप्रिल व अक्टोबर महिन्यांत तयार होऊन वर्गणीदारांना वांटले जातात, व नवंबर आणि मे महिन्यांत भरणाऱ्या साधारण सभांपुढें ठेविले जातात. आज सत्तावीस वर्षें हा क्रम अबाधित चाललेला आहे. अधिक उपयोगाच्या मोठ्या संस्थांशीं माझा संबंध जडला आहे. पण माझ्या गांवच्या या संस्थेवरील माझें प्रेम कमी झालेलें नाहीं. ती दीर्घ काळ टिकावी यासाठीं माझे प्रयत्न अजून चालू आहेत.*

## श्रीदुर्गादेवीच्या इस्टेटीच्या व्यवस्थेसाठीं खटपट

सुधारलेल्या पद्धतीप्रमाणें आपल्या गांवांतील श्रीदुर्गादेवीच्या इस्टेटीची व्यवस्था नियमबद्ध सुरू व्हावी, असें माझे ग्रामस्थ मित्र परशुराम हरि दामले व मी यांच्या मनांत येऊन आम्हीं उभयतांनीं या कामीं खटपट केली. नियमबद्ध व्यवस्थेचें नवीन तऱ्हेचें वळण मुरूड गांवांतील लोकांना लागत चाललें होतें. १८८३ च्या सुमाराला पुण्यांतील सार्वजनिक सभेच्या धर्तीवर मुरूड गांवीं सार्वजनिक सभा स्थापन झाली होती. त्या-नंतर मुरूडफंडाचें कामहि लोकांच्या नजरेपुढें व्यवस्थित रीतीनें चाललें. तेंच वळण श्रीच्या इस्टेटीच्या व्यवस्थेसंबंधानेंहि लोकांना लागावें अशी आमची इच्छा होती. म्हणून आम्हीं प्रथम मुंबई येथें रहाणाऱ्या कांहीं ग्रामस्थांच्या सह्यांनिशीं स्थानिक ग्रामस्थांना "श्रीची इस्टेट कोणाकडे व किती आहे यांबद्दलची यादी बरेच वर्षांत झालेली नाहीं असें समजतें,

---

* अलीकडे मला या संस्थेकडे लक्ष देतां आलें नाहीं. पण तिचें काम पद्धतशीर चालू आहे. १९२६ अखेर फंडाची शिल्लक ११४८२८४८३ रु. आहे पैकीं ८९०० रुपये दर्शनी किंमतींच्या साडेतीन व्याजाच्या प्रॉमिसरी नोटा आहेत व बाकीचे पोस्टच्या ब्यांकेंत आहेत.

करितां श्रीकडे आलेल्या वस्तूंचा तपास होऊन यादी व्हावी" असें पत्र लिहिलें. परंतु त्याचा उपयोग व्हावा तसा झाला नाहीं. पुढें आम्हीं मुद्दाम नाताळाच्या सुट्टींत मुरुडाला जाऊन प. वा. गो. वि. गद्रे, वेदमूर्ति ग. ना. जोशी, प. वा. प. ह. दामले व मी अशा चार गृहस्थांच्या सह्यांचें निमंत्रणपत्रक काढून, आणि आम्ही दोघे ग्रामस्थांच्या घरोघर जाऊन लोकांना गांवकीला येण्याविषयीं विनंति करून ता. ३० डिसेंबर १८८८ रोजीं श्रीच्या देवालयांत गांवकी भरविली. त्या वेळीं सुमारें १०० ग्रामस्थ हजर होते. श्रीदुर्गादेवी अध्यक्षस्थानीं आहे असें समजून काम सुरू झालें, व आम्ही केलेल्या नियमांचा मसुदा दामले यांनीं वाचून दाखविला. नंतर जे नियम पास झाले त्यांवर कारभारी बाळ व बागूल यांच्या वंशांतील पुरुष शिवायकरून बाकीच्यांपैकीं सुमारें ७५ गृहस्थांनीं सह्या केल्या. या नियमांप्रमाणें १८८९ च्या मे महिन्यांत आम्हीं मुरूड येथें जाऊन पुनः गांवकी भरविली. प्रथम अध्यक्षस्थानीं माझी नेमणूक होऊन कामाला सुरुवात झाली, व कारभारी यांच्या म्हणण्याप्रमाणें नियमांत थोडी दुरुस्ती होऊन प. वा. कारभारी बा. ना. बागूल यांची वर्षाच्या कायमच्या अध्यक्षाच्या जागीं निवड होऊन सभेचें पुढील काम त्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. याप्रमाणें काम मार्गाला लागून गांवकीच्या ठरावावरून नियमांचें पुस्तक छापून प्रसिद्ध झालें व पुढील एका गांवकींत इस्टेटीची नोंद करण्यासाठीं एक कमेटी नेमण्यांत आली, व बहुतेक इस्टेटीची नोंद होऊन काम व्यवस्थेशीर सुरू झालें. दरसाल जरूरीप्रमाणें एक अगर दोन गांवक्या आम्हीं भरवीत असूं.

अशा रीतीनें व्यवस्था झाली खरी, पण ती पचनीं पडली नाहीं. १८९२ सालीं चैत्र शुद्ध ९ शके १८१४ रोजीं रात्रौ कीर्तनोत्तर पुढील चमत्कारिक प्रकार घडला. कीर्तनाला जमलेल्या मंडळीपुढें अशी एक सूचना आली कीं, प्रोसीडिंग वगैरे चालू झालेली नवीन नियमबद्ध व्यवस्था रद्द होऊन जुन्या वहिवाटीप्रमाणें काम चालावें. सदर सूचना येतांच कांहीं सद्‌गृहस्थांनीं "नियमाप्रमाणें निमंत्रणपत्रक लागलें नाहीं, करितां गांवकीचें काम चालवूं नये," अशी तक्रार अध्यक्ष श्रीयुत ना. के. बागूल यांजपुढें केली; परंतु तिचा उपयोग न होतां चालू झालेली व्यवस्था रद्द करण्यांत

आली. पुढें मे महिन्यांत आम्ही मुरुडाला आलों व उमेद खचूं न देतां पुनः घरोघर फिरून लोकांना गांवकीला येण्याविषयीं विनंति करून गांवकी भरविली व तींत नवीन व्यवस्था रद्द करण्यापासून होणारे तोटे सांगून लोकांची समजूत करण्याचा प्रयत्न केला. परंतु कांहीं मंडळीच्या दुराग्रहामुळें आम्हांला यश आलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर रद्द झालेलें प्रोसीडिंग आम्हांला पहावयाला मिळावें व त्याची आम्हांला नक्कल करून घेऊं द्यावी, हें आमचें म्हणणेंहि मान्य झालें नाहीं. याप्रमाणें आम्हीं हातीं घेतलेल्या कामाचा शेवट झाला. एवढ्यानें आम्ही माघार घेतली नसती; परंतु माझ्या पुनर्विवाहामुळें हा उद्योग असाच सोडून देणें भाग पडलें. माझे मित्र परशुरामपंत दामले हे पेनशन घेऊन घरीं गेल्यावर त्यांनीं कांहीं गृहस्थांच्या मदतीनें हा उद्योग दोन वर्षांपूर्वी पुनः हातीं घेतला व त्यांना बरेंच यश आलें होतें; परंतु दुर्दैवानें ते नुकतेच परलोकवासी झाले. कोणी ग्रामस्थ हा उद्योग हातीं घेऊन शेवटाला पोहोंचवील तर तेथील लोकांना चांगलें वळण लागेल.*

## मुरूडचें शाळागृह.

सन १८८९ सालीं मुरूडच्या मराठी शाळेचें जुनें घर अगदीं मोडकळीला आल्यामुळें नवीन शाळागृह बांधण्याची योजना सरकारकडून झाली. प्रथम २५०० रुपयांचा अंदाज होऊन सव्वासहाशें रुपये ग्रामस्थांनीं दिले पाहिजेत, तर सरकारकडून पुढील व्यवस्था होईल, असें ग्रामस्थांना कळविण्यांत आलें. तुम्हीं वर्गणी जमविण्याची खटपट करावी म्हणून सरकारमार्फत दापोलीच्या मामलेदारसाहेबांनाहि पत्र गेलें होतें, व त्याप्रमाणें त्यांनीं गांवांत येऊन खटपट करून येथें वर्गणी जमणें शक्य नाहीं, असें परत कळविलें होतें; तरी शाळाखात्याचे इन्स्पेक्टरसाहेब आपला आग्रह सोडीनात. एवढी रक्कम या भिकार गांवांत जमणार कशी, ही आम्हांला मोठी काळजी पडली. शाळागृहावांचून तर गति नव्हती.

*ही व्यवस्था बरींच वर्षें बंद पडली होती, पण श्रीयुत त्र्यंबक गोविंद गद्रे यांच्या खटपटीनें ती पुन्हां सुरू झाली आहे. दरवर्षीं मे महिन्यांत देवीचे देवळांत गांवकी भरून हिशोब वाचला जातो. देवीचा पैसा क्याश सर्टीफिकिटांचे रूपानें व पोस्टाच्या ब्यांकेंत ठेविला आहे.

तेव्हां परशुरामपंत दामले, काशीनाथपंत काणे, मी व इतर कांहीं गृहस्थ मिळून या कामासाठीं कंबर बांधली. मुरूड गांवांत घरोघर हिंडून जमेल तितकी वर्गणी जमवावयाची व मुरूडच्या बाहेरगांवीं असणाऱ्या नोकर मंडळीकडूनहि वर्गणी मिळविण्याविषयीं शिकस्त करावयाची असें आम्हीं ठरविलें. नोकरलोकांनीं आपल्या पगाराच्या अष्टमांश वर्गणी दिली पाहिजे, असा आम्ही आग्रह धरला. यासाठीं आम्हीं मुंबईत १०।३।८९ रोजीं एक सभा केली, तींत बऱ्याच पगाराचे एक गृहस्थ विरुद्ध बोलले. मीं या सभेंत (ही फक्त मुरूड ग्रामस्थांची सभा होती) आवेशाचें भाषण केलें, व वरील गृहस्थांना थोडें लागण्यासारखेंहि बोललों. याबद्दल पुढें मला वाईट वाटलें. मीं स्वतः पन्नास रुपये वर्गणी देण्याचें कबूल केलें. मे महिन्याच्या सुट्टींत मुरूड गांवीं घरोघर हिंडून आम्ही वर्गणी जमविली. अशा रीतीनें मोठ्या प्रयासानें ५८५ रुपये वर्गणी जमली. परंतु शाळेला पुरेशी इमारत इतक्या पैशांत होऊं शकत नाहीं, तिचा एकंदर अंदाज ४५४४ रुपये झाला आहे, पैकीं चतुर्थांश म्हणजे ११३६ रुपये ग्रामस्थांनीं भरल्याशिवाय शाळागृह बांधण्यास सुरुवात करितां येत नाहीं असा हुकूम शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांकडून आला. या वेळीं शाळेचे कांहीं वर्ग देवळांत वगैरे बसवावे लागत होते. मला मुरूड गांवाबद्दल अत्यंत प्रेम व अभिमान वाटत असे. आतां याला काय उपाय करावा म्हणून मी विचार करीत बसलों. मुरूडच्या शाळेला जोडून एक खोली बांधून तींत सरकारानें मुलींचा वर्ग सुरू करावा व खोलीसाठीं मी अडीचशें रुपये देतों, असा पत्रव्यवहार मीं एज्युकेशनल इन्स्पेक्टर, दक्षिण भाग, यांजकडे अगोदरच सुरू केला होता. सदर रकम ग्रामस्थांच्या हिश्शांतच धरली जावी व सवडीनें मुलींचा वर्ग सुरू करावा, हें म्हणणें इन्स्पेक्टरसाहेबांना पटलें, तरी अजून ३०१ रुपयांची रकम पाहिजे होती तीपैकीं पाऊणशें मुरूडफंडानें उसनवार देऊन, राधाबाई स्मारक फंडाच्या व्याजाचे येतील तसतसी फेड करून घ्यावी, व बाकीचे दोनशें सव्वीस मुरूड फंडानें द्यावे, अशी सूचना करण्यांत आली व ती पसंत होऊन मुरूडच्या शाळेला चांगलें घर मिळालें. ज्याकरितां मीं अडीचशें * रुपये

* याबद्दल उल्लेख अन्य ठिकाणीं आला आहे.

दिले, तो मुलींचा वर्ग मात्र मुरूडच्या शाळेंत अजून निघाला नाहीं.* याचें कारण पुढें लवकरच मी पुनर्विवाहाच्या भानगडींत पडलों व त्यामुळें मुरूडच्या स्त्रीशिक्षणानें पिच्छेहाट खाल्ली हें होय. या वेळीं बहुतेक लोकांनीं आपल्या मुली शाळेंतून काढून घेतल्या. अलीकडे सुमारें दहाबारा मुली मुलांच्या शाळेंत जाऊं लागल्या आहेत.

## मुरूड येथील इंग्रजी शाळा.

इंग्रजी शिकण्याला संधि मिळाली नाहीं म्हणजे होतकरू मुलांचें कसें नुकसान होतें व पुष्कळ प्रसंगीं त्यांच्या अंगचे गुण जन्मभर मुग्धावस्थेंत कसे रहातात, याची मला थोडीशी कल्पना झाली होती. यामुळें आपल्या गांवांतील मुलांची थोडें तरी इंग्रजी शिकण्याची कांहीं सोय करावी, असे विचार वारंवार माझ्या मनांत येत असत. मला व माझ्या बरोबरीच्या दहापंधरा विद्यार्थ्यांना गांवांतल्या गांवांत थोडेंसें इंग्रजी शिकावयाला मिळालें, यामुळें आमचा बराच फायदा झाला. आमचा वर्ग बंद झाल्याबरोबर दुसऱ्या एका वर्गाला असाच फायदा मिळाला. पण त्यानंतर दहाबारा वर्षें पुनः कोणीं प्रयत्न केला नाहीं. या कामीं आपण प्रयत्न करावा, असें मनांत येऊन मुरूडफंडाच्या मदतीनें तो तडीला नेण्याचें मीं योजिलें व फंडाच्या चिटणिसांना एक पत्र लिहिलें. त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—

'मुरूडफंडानें मुरूड गांवांत इंग्रजी शाळा सुरू करावी. पहिलीं दोन वर्षें मी दरसाल चाळीस रुपयेप्रमाणें मदत देण्याला तयार आहें. तितकीच मदत मुरूडफंडानें केल्यास अडचण पडणार नाहीं.'

या पत्राचा विचार होऊन ता. १ जानेवारी १८९१ रोजीं शाळा सुरू झाली. आरंभीं तेरा विद्यार्थी जमले. दुसऱ्या वर्षी शाळेंत मुलें तेवीस झालीं, व सरकारी मदतीसाठीं शाळा नोंदविण्यांत आली. लवकरच मुरूडफंडानें एक स्कूलकमिटी नेमिली. त्या कमिटीनें श्रीयुत का. वा. काणे यांना सेक्रेटरी व

---

* माझ्या सूचनेवरून मुरूडफंडानें १९१७ च्या मे महिन्यांत आपल्या जबाबदारीवर मुलींची शाळा सुरू केली. माझे चुलत बंधु गंगाधरपंत यांची त्या शाळेवर योजना झाली. एक वर्षानंतर ती शाळा सरकारचे स्वाधीन करण्यांत आली. हल्लीं ती शाळा चालू आहे.

मला अध्यक्ष नेमिलें. १८९३च्या आरंभीं शाळेंत चवथी इयत्ता सुरू होऊन ३ शिक्षक नेमण्यांत आले, व १८९४ सालीं पांचवी इयत्ता निघून बेचाळीस विद्यार्थी इंग्रजी शाळेचा फायदा घेऊं लागले. पुढें शाळेला ओहोटी लागली परंतु एक शिक्षक आणि दहापंधरा विद्यार्थी अशा स्वरूपांत शाळा बरेच दिवस चालली. मुंबईच्या रॉबर्ट मनी स्कूलांत शिक्षकाचें काम केलेले एक मुरूडकर गृहस्थ उतारवयांत मुरुडाला जाऊन राहिले होते, व मिळेल तेवढ्या फीत संतुष्ट राहून येतील तेवढ्या मुलांना ते शिकवीत असत. यामुळें मोडक्यातोडक्या स्थितींत तरी ती बरींच वर्षे टिकली. पुढें १९०४ सालीं मुरूड गांवांत प्लेगचा त्रास होऊन ती शाळा बंद करण्यांत आली. नंतर ते गृहस्थहि वारले. तेव्हांपासून मुरुडांतली इंग्रजी शिकण्याची सोय नाहींशी झाली. *

या शाळेसाठीं मजकडून द्रव्याची मदत काय ती १०५ रुपये झाली; पण इतर खटपट मी शक्त्यनुसार केली. पुनर्विवाहामुळें माझें मुरूड गांवीं जाणें जर अगदीं बंद झालें नसतें, व सार्वजनिक कार्यासाठीं खर्च होणाऱ्या अल्प द्रव्यसामर्थ्याला जर निराळ्या दिशा लागल्या नसत्या, तर कदाचित् मुरूडच्या इंग्रजी शाळेला वेगळें स्वरूप आलें असतें. मुरुडांत जीं दोन हवाशीर ठिकाणें आहेत, तेथें फिरावयाला गेलें म्हणजे या ठिकाणीं इंग्रजी शाळा व तिचें बोर्डिंग करावें, असे विचार मनांत येत व क्वचित् ते बरोबर असणाऱ्या मित्रांजवळ मी बोलूनहि दाखवीत असें. परंतु इकडील नव्या संस्थांकडे माझें सर्व लक्ष लागल्यामुळें ते विचार मागें पडले.

## शिक्षणोत्तेजक मंडळी.

या संस्थेशीं माझा म्हणण्यासारखा संबंध नव्हता; पण तिच्या पुनर्घटनेच्या कामीं मीं बराच पुढाकार घेतला होता, म्हणून या संस्थेचा येथें उल्लेख करीत आहें. या संस्थेचे उत्पादक प. वा. वामन गोपाळ केळकर, दापोली तालुक्यांतील एका शाळेचे हेडमास्तर, हे होते. मथळ्यांतील नांव हें

*लोकलबोर्डाच्या परवानगीनें पुन्हां गेल्या जूनमहिन्यापासून मराठी शाळेंत एका इंग्रजी जाणणाऱ्या शिक्षकाची नेमणूक होऊन मुलांची इंग्रजी शिकण्याची सोय झाली आहे. ग्रामस्थांनीं वर्षाचे ५४० रुपये देण्याचें कबूल केलें आहे. त्यांत फीचें उत्पन्न वजा करावयाचें.

पुनर्घटनेच्या वेळीं दिलेलें नांव होय. तिचें पहिलें नांव दापोली तालुक्यांतील मास्तर लोकांची सभा अशा अर्थाचें होतें. महिन्यांतून एक वेळ तालुक्यांतील कोणत्या तरी एका गांवीं तालुक्यांतील शाळांचे हेडमास्तर व शिक्षक मंडळी जमत, उपयुक्त विषयांवर निबंध वाचीत, शिक्षणविषयक प्रश्नांची चर्चा करीत आणि शिकवितांना आलेल्या शंकांचें समाधान करून घेत. ज्या गांवीं सभा भरे, तेथील हेडमास्तरांच्या घरीं सर्व मंडळी जेवीत असत. सभेची वर्गणी अगर फंड कांहीं नसे. मुरूड गांवीं भरणारी ही सभा दरसाल मे महिन्यांत भरावी, असें ठरलेलें असे. मुरूड गांव मे महिन्यांत सुट्टींत घरीं आलेल्या मंडळींनीं अगदीं गजबजून जातो, व या मंडळींत मास्तर लोक बरेच असतात, हें मे महिन्यांत मुरूड गांवीं सभा भरविण्याचें कारण होतें. फर्स्ट बी. ए. च्या वर्गांत असतांना या सभेंत मीं एक निबंध वाचला होता. पुढें मी शिक्षक झालों, तेव्हां या सभेंत सुधारणा होऊन तींत मला व इतर शिक्षकांना सभासद होतां येईल असें करण्याविषयीं विनंति केली, व ती मान्य होऊन मुरूड गांवांत भरलेल्या सभेंत नियम वगैरे करण्यांत आले. मीं प्रथम वीस रुपयांची देणगी सभेला दिली व दरवर्षी एका सभेचा खर्च सोसण्याचें कबूल केलें. मुरूडच्या सभेचा खर्च मुरूडचे मास्तर सोशीतच असत. तेव्हां दरसाल मीं तितकी वर्गणी देण्याचें कबूल केलें. सभेचा खर्च सोसण्यास समर्थ नसणाऱ्या लोकांनीं पगारावरून ठरविलेल्या स्केलाप्रमाणें वर्गणी द्यावी, असें ठरविण्यांत आलें. अशा रीतीनें जमविलेल्या फंडाचा विनियोग दापोली तालुक्यांतील शाळांच्या समायिक उपयोगासाठीं करावयाचा होता. या मंडळीकडे आणखी लक्ष्य देण्याचें माझ्या मनांत होतें; परंतु पुनर्विवाहामुळें माझा मुरूड गांवचा संबंध बरींच वर्षें तुटला व माझें नियमानें तिकडे जाणें बंद झालें. ही सभा पुढें बरींच वर्षें चालली व आणखीहि चालली असती; परंतु राजकीय वातावरण प्रक्षुब्ध झाल्यानंतर सरकारानें तिजवर डोळा ठेवला, व शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांनीं ती भरण्यासंबंधानें कडक नियम केले. त्यांत एक नियम हा होता कीं, डेप्युटी इन्स्पेक्टर अगर असिस्टंट डे. इन्स्पेक्टर हजर असल्याशिवाय सभा भरूं नये. अशा स्थितींत कोणी मंडळीच्या कामांत मन घालीनासा झाला व ती लयाला गेली. या

सभेचा कांहीं फंड अजून तसाच पडला आहे, तो बाहेर येऊन सत्कारणीं लागावा म्हणून श्रीयुत परशुरामपंत दामले, काशीनाथपंत काणे व मी या तिघांच्या सह्यांनीं रत्नागिरीच्या डे. ए. इन्स्पेक्टरांकडे यासंबंधानें चौकशी करण्याबद्दल अर्ज केला होता; परंतु आम्हांला या कामांत लक्ष घालण्यास कारण दिसत नाहीं, असा जबाब मिळाला. यानंतर श्रीयुत सीताराम विष्णु रानडे खजिनदार, हेडमास्तर, शाळा दापोली, यांनीं आपल्या जवळच्या १३८८४८११ शिलकेची व्यवस्था लावण्यासंबंधानें ३ मे १९०९ तारखेचें सर्क्युलर कांहीं सभासदांकडे पाठविलें होतें. परंतु अजून त्या फंडाची कांहीं व्यवस्था लागली नाहीं. * सार्वजनिक फंडासंबंधानें आम्ही लहानमोठीं सर्वच माणसें आपली जबाबदारी बिलकुल ओळखीत नाहीं. आपल्याजवळ सार्वजनिक वित्त असेल, तर त्याची व्यवस्था लावणें आपलें कर्तव्य आहे, असें आम्हांला वाटतच नाहीं. ही स्थिति आहे तोंपर्यंत आमचें डोकें वर निघणें अशक्य आहे!

## स्नेहवर्धक मंडळी.

मी पुण्याला येण्यापूर्वीं आपला गांव व तालुका यांच्यापलीकडे माझी दृष्टि फारशी गेली नव्हती. मुरूडफंड व्यवस्थित रीतीनें चालूं लागला. फंडाची काम करण्याची पद्धत नियमबद्ध होती. या कामांत चांगलें यश आलें. त्याचप्रमाणें शिक्षणोत्तेजक मंडळीच्या कामाला चांगली दिशा लागली तेव्हां आपल्या तालुक्यासाठीं आपण कांहीं करावें, अशी कल्पना मनांत आली, व त्या उद्योगाला मी लागलों. तालुक्यांतील प्रमुख गांवांच्या पुढारी मंडळींना माझें नांव ठाऊक झालें होतें, व कित्येकांच्या प्रसंगविशेषीं भेटी झाल्या होत्या. अशा पन्नाससाठ मंडळींना प. वा. वा. ना. गोळे (हर्णै), प. वा. प. ह. दामले व मी यांच्या सह्यांचीं पत्रें लिहून मुरूड गांवीं बोलाविलें. मे महिन्यांतील एक शनिवाररविवार घेतला होता. हेतु हा कीं, तालुक्यांतील कांहीं मास्तरलोकांनाहि यावयाला सांपडावें. शनिवारीं रात्रीं कांहीं मंडळी बसून रविवारचा कार्यक्रम ठरविण्यांत आला. तालुक्यांतील

---

* श्रीयुत रानडे मास्तर दोन वर्षांपूर्वीं वारले. सदर शिक्षणफंडाची व्यवस्था अजूनही ( जानेवारी १९२८ ) लागली नाहीं असें कळतें.

सुशिक्षित लोकांच्या परस्पर भेटी होऊन त्यांजमध्यें स्नेहभाव उत्पन्न होऊन तो वाढावा, व एकाद्या सहकार्यांच्या कामीं त्याचा उपयोग करितां यावा, हा या मंडळीचा हेतु होता. या मंडळीला ‘ मित्रमेळा ’ असेंहि नांव पडलें होतें. हिच्या पहिल्या बैठकीचा खर्च मींच सोसला. मुरुडांत आमचें घर अगदींच लहान आहे. तेव्हां मंडळीच्या राहण्याची, जेवणाची व सभेची व्यवस्था माझे मित्र काशीनाथपंत काणे यांचे चुलते श्रीयुत दाजीबा काणे यांजकडे, म्हणजे प. वा. वामन आबाजी मोडक यांनीं बांधलेल्या नव्या घरीं, केली होती. कंपनीच्या दुकानाच्या वेळीं मीं पंचवीस रुपयांचें कर्ज काढलें तें यांजकडूनच. रविवारच्या सभेंत अशा संस्थेच्या उपयुक्ततेबद्दल भाषणें वगैरे होऊन कांहीं ठोकळ नियम ठरले. मुरूडफंड हा केवळ ब्राह्मण मंडळीचा आहे, तशी ही संस्था न होतां ब्राह्मणेतरांचा तींत समावेश व्हावा अशी माशी इच्छा होती; पण दुसऱ्या मंडळीचें पाठबळ मिळेना, म्हणून ‘ प्रथमग्रासे मक्षिकापातः ’ अशी स्थिति होऊं न देण्यासाठीं तो प्रश्न मी पुढील वर्षाच्या सभेंत काढण्यासाठीं ठेविला. दुसऱ्या वर्षाची सभा दापोली येथील प्रमुख वकील प. वा. धोंडोपंत बर्वे यांच्या घरीं जालगांव येथें भरण्याचें ठरलें. प्रत्येकानें खर्चासाठीं एक रुपया वर्गणी द्यावी, असें ठरलें होतें. जालगांव येथील दुसऱ्या वर्षाची सभा फारच चांगल्या रीतीनें झाली. गांवोगांवची मिळून सुमारें पाउणशें मंडळी आली होती; पण सभेच्या वेळीं सुमारें दोनशें मंडळी असावी. या सभेंत मला न रुचण्यासारखी एकच गोष्ट झाली, आणि ती ही कीं, या मंडळींत ब्राह्मणेतरांना घेण्याला सवलत असावी अशी माझी इच्छा होती ती तडीला गेली नाहीं. यासंबंधानें मीं जोरदार भाषण केलें. त्यांत आपल्या पूर्वजांनीं ग्रामव्यवस्थेंत ब्राह्मणेतरांना किती महत्त्व दिलें आहे, व सार्वजनिक उत्सवांच्या वगैरे प्रसंगीं त्यांजवर मानाच्या किती गोष्टी सोंपविण्यांत येत असतात, हें मीं सभासदांच्या निदर्शनाला आणिलें, व मुरुडगांवाच्या रचनेचा इतिहास ज्या बखरींत दिला आहे तींत “ यवनांच्या शून्यालयासाठीं जागा राखून ठेविली, ” असा उल्लेख आहे तो सांगून मंडळींनीं या कामीं थोर मन करावें म्हणून विनवणी केली. पण तिचा उपयोग झाला नाहीं; फार काय पण मला दुजोरा देण्यालासुद्धां कोणी उभा राहिला नाहीं. एरव्हीं या

सभेचें काम फार उत्कृष्ट झालें आणि एक रात्र व एक दिवस एकत्र घालवून रविवारीं संध्याकाळीं मंडळी आपापल्या गांवीं जाण्यासाठीं निघून गेली.

पुढें दोनतीन वर्षें हे मेळे वेगवेगळ्या गांवीं भरले जाऊन लोकांमध्यें त्यांविषयीं आदर उत्पन्न झाला होता. १८९३ चा मेळा केळशी गांवीं भरण्याचें ठरलें. या बैठकीच्या आधीं दोनच महिने माझा पुनर्विवाह झालेला होता, व माझ्याविरुद्ध लोकमत अत्यंत प्रक्षुब्ध झालेलें होतें. मी या सभेला जाऊं नये, असा माझ्या मित्रांनीं फार आग्रह धरला होता. तथापि तालुक्यांतील सुशिक्षित मंडळी कांहीं शांतपणें विचार करील असें मला वाटलें. मी निराळ्या पंक्तीला अगर शूद्रांना जेवावयाला वाढतात तसा अगदीं दूर पडवींत किंवा अंगणांत बसून जेवीन, आपलें उष्टें मी स्वतः काढीन व जरूर वाटल्यास सभेच्या वेळींहि मी कोणाला विटाळ होऊं न देतां वेगळा बसेन, वगैरेप्रमाणें माझी तयारी असल्याचें मीं कळविलें होतें. मीं केळशी गांवींसुद्धां जाऊं नये, अशी माझ्या कांहीं मित्रांची इच्छा होती; त्यांचें न ऐकतां मी केळशीला गेलों. एकदम सभागृहांत न जाण्याचा माझ्या मित्रांनीं आग्रह धरिला, व तें मीं कबूल केलें. माझी तेथील एका संभावित गृहस्थाकडे राहण्याची सोय केली. मी केळशी गांवीं आलों असें कळतांच सभेला जमलेल्या मंडळींत जिकडेतिकडे लहानलहान थवे जमून या विषयाची चर्चा सुरू झाली. त्या मोठ्या गांवांत त्या दिवशीं लहानथोरांच्या तोंडीं एकच विषय होता. विशेषतः स्नेहवर्धक मंडळीच्या सभासदांना दुसरें कांहीं सुचेना. दुसऱ्या दिवशींच्या दोनप्रहरपर्यंत मंडळी जमत होती. मी त्या दिवशीं घरांतून बाहेर पडलों नाहीं. तिकडील हकीकत मला कांहीं मित्रांकडून कळत होती. माझें जेवण मी उतरलों होतों त्या घरींच झालें. सुमारें अडीच वाजतां सभेचें काम सुरू झालें; वादाचा अर्थात् एकच विषय होता. तो विषय म्हणजे मला स्नेहवर्धक मंडळींत येऊं द्यावें कीं नाहीं? कोणत्याहि सभासदाला सभेतून काढणें झाल्यास तीन चतुर्थांश सभासदांचें बहुमत व्हावयाला पाहिजे होतें, तें होईना. मला मंडळींत राहूं द्यावें असें म्हणणारे एकचतुर्थांशाहून थोडे अधिक इतके सभासद होते. मला सभेंत हजर राहतां आलें असतें. परंतु मी सभेंत गेलों

असतां माझें म्हणणें ऐकून न घेतां एकदम बाहेर निघून जावयाचें, असें बहुतेक मंडळींनीं ठरविलें होतें. त्यामुळें मला सभेंत जातां येईना. मला सभेंत येऊं देऊन माझें बोलणें ऐकून घ्या व नंतर काय तो निकाल करा, असें मीं एका मित्रामार्फत सुचविलें होतें; पण तिकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. अखेरीला तीन तास पुष्कळसा शब्दच्छल होऊन कांहींएक निष्पन्न न होता मंडळी उठली. सर्वच मंडळींना अतिशय वाईट वाटलें. जी मंडळी मला सभेंत ठेवूं नये असें म्हणणारी होती, तिला सगळ्या कामाचा बिघाड झाला म्हणून वाईट वाटलें. मला सभेंत ठेवावें म्हणून जे म्हणत होते त्यांना वाईट वाटण्याला हें एक कारण होतेंच; परंतु मीं त्यांना निष्कारण पेचांत घातलें, असेंहि त्यांना वाटत होतें. आपल्या आप्तानें एकादें निंद्य कर्म केलें असतां जसें मनुष्याला वाईट वाटतें व खिन्न होऊन तो मान खालीं घालतो, तशी मनःस्थिति माझ्या हिंतचिंतकांची होती. पुनर्विवाहाच्या पूर्वी हा मनुष्य आपल्या तालुक्याला भूषण आहे असें बऱ्याच लोकांना वाटूं लागलें होतें; त्याच्या उलट यानें आपल्याला काळिमा लावला असें या वेळीं सर्वांना वाटूं लागलें. याहून भिन्न मताचीं मनुष्यें त्या वेळीं तेथें पांचचार तरी होती कीं नाहीं याबद्दल मला शंका आहे.

त्या दिवशीं रात्रीं एक विलक्षण प्रकार घडला. आम्ही दहापंधराजण संध्याकाळीं केळशीहून निघालों, ते रात्रीं पाडलें गांवीं एका गृहस्थाच्या घरीं आलों व अंगणांत निजलों. रात्र बरीच उलटून गेल्यावर एकजण स्वप्नांत भ्याल्यामुळें म्हणा, अगर अंगणांत कांहीं दिसल्यामुळें म्हणा, एकदम किंचाळला. त्याबरोबर अंगणांतील सर्व मंडळी घाबरून मोठ्यानें ओरडूं लागली व सर्व एकच कल्लोळ झाला. झालें काय हें कोणाला कांहींच कळेना. रात्र अगदीं अंधारी होती. घराच्या मालकानें दिवा लावून अंगणांत आणला तों कोठें कांहीं दिसेना. ओरड झाल्याबरोबर प्रत्येकाच्या मनांत हा विचार आला कीं, केळशीच्या सभेंतील विरुद्ध बाजूची मंडळी आपणाला चोप देण्यासाठीं तर आली नाहींना! दिवा येईपर्यंत प्रत्येक इसम या विचारानें ग्रस्त होऊन आपणावर आतां तडाखा बसतो कीं काय, अशा भीतींत होता. ही मनाची स्थिति फारच थोडा वेळ टिकली. पण ती

इतकी तीव्र होती कीं, त्या प्रसंगाची आठवण झाली असतां अजूनहि कसेंसेंच वाटतें ! बराच वेळ जाऊन कोठें कांहीं नाहीं असें पाहून सर्व मनुष्यें लाजल्यासारखीं झालीं. प्रथम किंचाळला कोण, हें अखेरीला गूढच राहिलें. एक गृहस्थ अंगणांतून आपल्याला वाघ गेल्यासारखें वाटलें असें म्हणाला;पण पहिल्या ओरडीनें जागा झाल्यानंतरचा हा त्याचा भास. शेजारच्या एका मनुष्याची म्हैस रात्रीं सुटली होती, असें नंतर कळलें.

पुढें मी मंडळीच्या सभासदपणाचा राजिनामा पाठविला. या मंडळीच्या कामांत माझे मित्र श्रीयुत ना. ह. लिमये, वकील, जळगांव यांनीं बरीच मदत केली होती. पुढील वर्षाची सभा त्यांनीं आपल्या पाडळें गांवीं केली, ती फार चांगली झाली, पण त्यापुढें कोणी कांहीं पुढाकार न घेतल्यामुळें संस्था लयास गेली. या मंडळीला मुरूडफंडासारखें स्वरूप देऊन जिल्हा-संबंधानें अशी संस्था काढण्याचा माझा विचार होता. अशा कल्पना कधीं कधीं माझ्या मनांत येत व मी पुनर्विवाहांत पडलों नसतों तर मीं या दिशेनें उद्योग केला असता व तो कदाचित् तडीलाहि गेला असता.

# प्रकरण एकविसावें

## अकल्पित भाग्य

मुंबई हेंच माझें कायमचें राहण्याचें ठिकाण झालें, असें मला बरींच वर्षें वाटूं लागलें होतें, व त्याप्रमाणें कामाचा जमहि मीं बसविला होता. घरीं पैसे पाठवावयाचे असतील तोंपर्यंत थोड्याशा ठळक शिकवण्या ठेवाव्या, व तें कारण नाहींसें झालें म्हणजे मराठा हायस्कुलाकडेच आपलें बहुतेक सामर्थ्य खर्ची घालावें, असे विचार माझ्या मनांत येऊं लागले होते. परंतु कित्येक वेळां मनुष्य एकपरी विचार करीत असतो, व भवितव्यतेच्या उदरांत दुसरेंच कांहीं तरी असतें. तसा प्रकार या वेळीं झाला.

फर्ग्युसन कॉलेजाला १८९१ च्या नवंबरपर्यंत प्रीव्हिअस व फर्स्ट बी. ए. हे दोनच वर्ग शिकवण्याची परवानगी होती; पुढें नवंबरपासून सेकंड बी. ए. चा वर्ग काढण्याची परवानगी मिळाली. अर्थात् पूर्वीच्या अध्यापकांचें काम वाढलें व नवीन अध्यापक नेमणें जरूर झालें. प्रो. बा. गं. टिळक हे डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडून गेल्यावर प्रोफेसर गोखले हे गणितविषय शिकवीत असत. शिवाय इंग्रजीहि थोडें शिकवीत. पुढें त्यांच्याकडे अधिक इंग्लिश दिल्यावांचून भागेना; यामुळें गणितासाठीं वेगळा अध्यापक आणणें भाग पडलें. प्रोफेसर गोखले हे एल्फिन्स्टन कॉलेजांत माझे सहाध्यायी होते, व आम्हां उभयतांचा गणित हाच ऐच्छिक विषय होता. एल्फिन्स्टन् कॉलेज सुटल्यानंतर त्यांची-माझी गांठ क्वचित्च पडली असेल. ध्यानींमनींहि नसतां एके दिवशीं प्रोफेसर गोखले यांचें पत्र माझ्या हातीं पडलें. त्यांत मजकूर कीं, गणिताच्या अध्यापकाची जागा मला देण्याचें लाइफ मेंबरांच्या मनांत आहे, तेव्हां ती पत्करण्याचा माझा मानस असल्यास मीं सर्वांच्या भेटीसाठीं पुण्याला यावें. मी वाचतों हें खरें कीं स्वप्न, असें कांहीं वेळ मला होऊन गेलें. शिकस्तीचे प्रयत्न करून जी जागा मिळणें शक्य झालें नसतें ती आपणांकडे चालून येत आहे, तर ती जरूर पत्करावी, असें एकदां वाटे; पण हें काम झेंपलें नाहीं तर आपली फजीती होईल याची वाट काय, अशी भीतीहि वाटे. प्रीव्हिअस व फर्स्ट बी.ए. या दोन वर्गांचें गणित माझें

तयार होतें. कारण या वर्गातील विद्यार्थ्यांना खासगी रीतीनें हे विषय शिकविण्याचे प्रसंग मला पुष्कळ आले होते. पण बी. ए. च्या विद्यार्थ्यांना गणित शिकविण्याचा प्रसंग मला एकदोन वेळांच आला होता. शिवाय, माझें स्वतःचें अध्ययनहि बी. ए.च्या पलीकडे नव्हतें. तेव्हां बी. ए. ला शिकवण्याचें आपणाला कितपत झेपेल, व प्रीव्हिअसचा दीडशेंपासून दोनशें विद्यार्थ्यांचा वर्ग आपणाला संभाळतां कसा येईल, या दोन काळज्या मला वाटत होत्या. या कामीं मीं शास्त्रीबुवांचा सल्ला घेतला. त्यांनीं मला प्रोत्साहन दिलें व मी पुण्याला मंडळींच्या भेटीसाठीं आलों. भेटींत असें ठरलें कीं, माझें काम पसंत पडलें नाहीं तरी डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें मला दोन वर्षेपर्यंत दरमहा शंभर रुपये पगार देऊन कामावर ठेविलें पाहिजे व मला पुढें रहावयाचें नसलें तरी दोन वर्षेपर्यंत सोसायटीची नोकरी सोडतां यावयाची नाहीं. उभयतांमध्यें असा करार होऊन मी मुंबईला परत आलों. कॉलेज उघडण्याला दोन महिने अवकाश होता, तेवढ्या मुदतींत सर्व व्यवस्था लावून मुंबईतील तेरा वर्षांचें वास्तव्य पुरें केलें आणि १५ नवंबर १८९१ रोजीं पुण्याला येऊन कामावर हजर झालों.

मनुष्याच्या आयुष्यक्रमाला वेगळी दिशा लागण्याला कांहीं बरेवाईट विशेष प्रसंग कारणीभूत होत असतात. राधाबाईचें मरण हा एक तसाच प्रसंग होता. तो प्राप्त झाल्यानंतर महिन्या दीड महिन्यानेंच माझ्या आयुष्यक्रमांत बदल करणाऱ्या या दुसऱ्या प्रसंगासंबंधानें वाटाघाट सुरू झाली. अर्थात् याच्या निकालावर माझा पुढील कार्यक्रम ठरावयाचा होता. हा निकाल लागून मी पुण्याला येऊन अगदीं वेगळ्या परिस्थितींत पडलों. या दोनहि क्रान्तिकारक गोष्टी एकामागून एक थोड्याच काळांत घडून आल्या, हेंहि बरेंच झालें. यामुळें पुढील मार्ग ठरविण्याला स्वस्थपणा मिळाला.

पुण्यांत आल्यानंतर माझ्या एकमार्गी स्वभावाप्रमाणें आपलें घर व कॉलेज यापलीकडे मीं पाहिलें नाहीं. कोणत्याहि सभेला अगर व्याख्यानाला गेलों नाहीं, किंवा कोणा मोठ्या मनुष्याची ओळख करून घेतली नाहीं. आपले धडे घरीं तयार करावे आणि कॉलेजांत जाऊन शिकवावे, हा माझा नित्यक्रम असे. पांचसहा मैलांचें तरी हिंडणें दररोज झाल्या-

वांचून मला कधीं चैन पडलें नाहीं. बहुतकरून मी सकाळीं आणि संध्या-काळीं असा दोन्ही वेळीं फिरावयाला जातों. या कामीं दररोज माझे दीडपासून दोन तासपर्यंत नेहमीं खर्च होतात व या कामीं गेलेला वेळ सार्थकीं लागला, असें मी समजतों.

राधाबाई आजारी पडण्याच्या अगोदरपासूनच तिची वडील विधवा बहीण आमच्या घरीं येऊन राहिली होती, तिचा गृहकृत्यांच्या कामीं फार उपयोग होत असे. राधाबाई आजारी पडली तेव्हांपासून हा सर्व भार तिजवरच पडला व पुढें तीच आमच्याबरोबर पुण्याला आली. त्यामुळें गृहव्यवस्थेसंबंधानें मला कोणतीहि अडचण पडली नाहीं. मेहुणीच्या मद-तीला दोन मुली तिच्या हाताखालीं दिल्या होत्या. या दोन मुली म्हणजे एक माझी पुतणी व एक तिची भावजय. या दोघींचे नवरे मुंबईपासूनच मजकडे विद्याभ्यासासाठीं होते, ते पुण्यासहि आले होतेच. तेव्हां पांच मुलगे, व तीन बायका, व मी मिळून आम्ही नऊ मनुष्यें कुटुंबांत होतों. बाजारांतील जिन्नस आणण्याचें काम मी मुलांवरच सोंपवीत असें. अशा रीतीनें पहिलें दीड वर्ष निघून गेलें.

बी. ए. च्या वर्गाला शिकविण्याची आपल्या अंगीं पात्रता यावी म्हणून मी एम्. ए. च्या परीक्षेच्या अभ्यासाचीं कांहीं पुस्तकें वाचूं लागलों. त्या सुमाराला नेटिव्ह इन्स्टिट्यूशनचे प्रिन्सिपॉल विष्णुपंत गोखले हे एम्. ए. च्या परीक्षेचा अभ्यास करीत होते, तेव्हां ते व मी दिवसांतून कांहीं तास बरोबर अभ्यास करीत असूं. परीक्षेला जाण्याचें माझ्या मनांत नव्हतें; पण बी. ए. चे अभ्यास शिकविण्याला अप्रत्यक्ष मदत व्हावी म्हणून मी पुढील भाग वाचीत होतों. लवकरच कामाचा जम बसला, आणि दोन वर्षांची वाट न पाहतां साडेचार महिन्यांनींच म्हणजे, एप्रिल १८९२ पासून मला डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या लाइफमेंबरांनीं आप-णांपैकीं एक करून घेतलें. पुढें जवळजवळ एक वर्ष विशेष कांहीं घडल्या-वांचून सरळ गेलें.

रँगलर परांजपे विलायतेंतून परत येतपर्यंत म्हणजे १९०१ सालापर्यंत फर्ग्युसन कॉलेजांतील गणिताविषय मजकडेच होता. नंतर जरूरीप्रमाणें फर्ग्युसन कॉलेजांत कांहीं तास व न्यू इंग्लिश स्कूलांत कांहीं तास असें काम

मी करीत असें. पुढें प्रो. नाईक लाइफमेंबर होऊन आल्यावर कांहीं वर्षें मी कॉलेजांत मुळींच काम न करितां फक्त न्यू इंग्लिश स्कूलांतच काम केलें. बरेंच वेळां न्यू इंग्लिश स्कूलच्या बोर्डिंगाचे व न्यू इंग्लिश स्कूलाचे हिशोब तपासण्याचें काम मजवर येत असे. एक वर्ष नवीन मराठी शाळेच्या सुपरिंटेंडेंटचें कामही मजवर सोंपविलें होतें. १९१२ सालाचे अखेरीस माझीं वीस वर्षें पुरीं झालीं होतीं व तेव्हांच पेनशन घेण्याचा माझा विचार होता. परंतु कॉलेजांत गणित शिकविण्याला पुरेशी मंडळी नव्हती म्हणून मला १९१३ व १९१४ ह्या सालीं मुद्दाम ठेऊन घेतलें, आणि १९१४ च्या अखेरीस माझा डेक्कन एज्युकेशन सोसायटीशीं संबंध सुटला.

---

# प्रकरण बाविसावें

## पुनर्विवाहाकडे माझें मन कसें वळलें ?

मुरूड येथील प. वा. पां. दा. बाळ हे गृहस्थ हुषार, बहुश्रुत आणि वर्तमानपत्रें वगैरे वाचणारे होते. यांचें आणि मला दिशा दाखविणारे माझे गुरुजी प. वा. वि. ल. सोमण यांचें बरेंच सख्य जमलें होतें, व ते त्यांच्या घरीं राहावयालाहि गेले होते. पुनर्विवाहासंबंधानें प. वा. विष्णुशास्त्री पंडित यांनीं लिहिलेले लेख व इंदुप्रकाश पत्र हीं मुरूडाला येत. मी बहुतकरून मास्तरांच्या बरोबर असावयाचा, तेव्हां बाळ व सोमण यांचीं बरींचशीं संभाषणें माझ्या कानीं पडत. यापूर्वी पहिला पुनर्विवाह घडून आला होता. त्यावेळीं मी अकरा वर्षांचाच होतों, पण अभ्यासांत मी माझ्याहून तीन चार वर्षांनीं वडील मुलांबरोबर असें, व माझी विवेचकशक्ति बरीच वाढलेली होती. वर्तमानपत्रांतून आलेल्या या पुनर्विवाहाच्या हकीकतीची चर्चा आमच्या गांवींहि सुरू झाली होती व त्याचें इंदुप्रकाशांतील चटकदार वर्णन वाचून त्याचा माझ्या मनावर फार परिणाम झालेला होता. मुरूड गांवांत या पहिल्या पुनर्विवाहासंबंधानें विशेष चर्चा सुरू होण्याला कारण होतें. त्या पुनर्विवाहांतील वधू वेणूबाई व तिचे दोघे बंधु (पैकीं ज्यांनीं पुढाकार घेतला त्यांचें नांव वामनराव) हीं मुरूडचीं असून तीं तेथें पुष्कळ दिवस राहिलेलीं होतीं; पण या लग्नाच्या अगोदर बरींच वर्षें त्यांनीं मुरूड गांव सोडला होता. आतां या पुनर्विवाहाचा प्रत्यक्ष संबंध मुरूडाशीं पोहोंचण्याचा संभव नसल्यामुळें 'दूरतः पर्वता रम्याः' या न्यायानें मुरुडांत शिळोप्याच्या वेळीं या पुनर्विवाहावर संभाषण पुष्कळसें होत असे. तेव्हांपासूनच पुनर्विवाहाचें कार्य हें एक सत्कार्य आहे असें माझ्या मनानें घेतलें.

मी कॉलेजांत असतांना, ता. १२ जून १८८३च्या केसरीच्या अंकांत, विधवांच्या स्थितीसंबंधानें हृदय हालवून सोडणारें एक पद प्रसिद्ध झालें, तें मला फारच आवडलें. मीं तें पाठ केलें व कारणपरत्वें तें मी म्हणत

असे. माझे मित्र नरहरपंत मजकडून तें अनेक वेळां म्हणवीत. त्यांचे कोणी मित्र एकत्र जमलेले असले कीं, त्यांनीं मला हें पद म्हणावयाला सांगावें. हें पद माझे मित्र सितारामपंत देवधर यांनीं लिहिलें, हें मला कांहीं वर्षांपूर्वी कळलें. न्यायमूर्ति रानडे यांनीं तें मुद्दाम छापवून त्याच्या पुष्कळशा प्रति फुकट वांटविल्या, व त्याच्या लेखकाचा शोध लावून त्याजकडे म्हणजे सितारामपंतांकडे त्याच्या कांहीं प्रती पाठविल्या. पुढें विधवाविवाहप्रतिबंधनिवारक मंडळीचें काम करीत असतां मीं हें पद व दुसरें असेंच एक हृदयद्रावक पद अशीं दोन्ही एकत्र छापवून त्यांच्या तीन हजार प्रती वांटविल्या; परंतु आतां तें या ठिकाणीं प्रसिद्ध करण्याचें माझ्या मनांत आलें तेव्हां त्याची एकहि प्रत कोठें मिळेना! अखेरीला केसरी ऑफिसांत जाऊन तेथली फाईल चाळली, तेव्हां तें पद मिळालें. तें येणेंप्रमाणें:—

[ पंचतुंड नररुंडमालधर०—या चालीवर. ]

विचार सोडुनि अविचारातें निशिदिनिं जनहो कां वरितां?
मानवधर्मा अनुचित ऐसे गतानुगतिकचि कां होतां?
डोळे जाउनि दंतहि पडुनी केशां आली पांडुरता,
साठी उलटुनि काठी झाली स्थाइक जरि उठतांबसतां?
तरुण समजुनी तरिही त्यासी द्वितिय विवाहा मत देतां,
पंचमवर्षा विधवा बाला असुनि तियेतें नाडवितां!
ओढवलें हें पूर्वजन्मिचें पाप ह्मणुनि तिस समजवितां,
पुरुषांना परि धर्मतत्त्व हें लागु कधींही नच करितां!
स्वेच्छेनें संन्यासी होती कैक तयांमधिं तुह्मि पहातां,
सोडुनि भजना हरिच्या निशिदिनिं विषयसमुद्रामधिं रमतां.
प्रभाव ऐसा हा मदनाचा पूर्ण तुह्मी जाणत असतां
षोडशवर्षा तरुणी सांगा दिन कशि कंठिल पति नसतां?
सुशील पतिरत असुनी भार्या वारविलासिनीरत होतां,
नवल कशाचें तरि मग विधवा गर्भवती दृष्टिस पडतां?
विषयवासना तरुणपणामधिं नैसर्गिक केवल असतां,

नष्ट कराया बाह्य उपाधी व्यर्थ करुनियां कां शिणतां ?
माता श्रमली प्रतिदिनिं ज्यांतें न्हाउनिमाखुनि वाढवितां,
जीवप्राण जे असति युवतितें हर्ष बहु ज्यां शोभवितां,
कांत अवडिनें वेणि फुलांची झाला ज्यांवरि निशि रचिता,
त्या केशांतें कां हो चरचर नापितहस्तें कापवितां ?
करणी करुनी क्रूर अशी ही धर्मात्मे हें पद घेतां !
निष्ठुर निर्दय दुष्ट घातकी कसाब केवळ मज गमतां !
हाल अपेष्टा दुसऱ्या अगणित बाला भोगिति पति मरतां,
सदयहृदय जन कवण न गाळी अश्रू त्यांतें आठवितां ?
फार काय वदुं वाटे छलना विधवांची ही मनिं अणितां
हृदयद्रावक सहगमनाचा मार्गहि बरवा ग्रापरता !
शोभत नाहीं तुह्मां खचित हें दोषांचे कां धनि होतां ?
दुःखसमुद्रीं ढकलितसां कां अपराधाचा लव नसतां ?
पुरे गांजणुक, कींव येउं द्या अनाथ भगिनींची आतां !
पुनर्विवाहा संमति द्या हो सांडुनि मनिंची निर्दयता !

हें पद मी आपल्याशींच म्हणें, तेव्हां माझ्या मनोवृत्ति उचंबळून येत.

आणखी एक कारण, माझे बालमित्र व ग्रामस्थ श्रीयुत रामभाऊ जोशी यांनीं या कामीं दाखविलेलें विशेष प्रकारचें धैर्य होय. यांचे वडील व मातुःश्री हीं दोघें वैदिक घराण्यांतलीं जुन्या काळचीं माणसें, तेव्हां त्यांच्या भयंकर रोषाला आपण पात्र होऊं हें माहीत असतांहि त्यांनीं आपल्या गतभर्तृका भगिनीचा विवाह आपल्या जबाबदारीवर मोठ्या धारिष्टानें करून दिला होता. रामभाऊ आपल्या बहिणीला घेऊन पुनर्विवाहासाठीं पुण्याहून निघून गेले, व तिसऱ्या दिवशीं म्हणजे ज्या दिवशीं पुनर्विवाह होणार होता त्याच दिवशीं त्यांचीं आईबापें*कर्मधर्मसंयोगानें पुण्याला आलीं. ही

* कांहीं आगंतुक कारणांनीं मनुष्याला आपल्या मुलांचा राग आला, तरी अखेरीला अपत्यप्रेमाची मनोवृत्ति त्याजवर आपली छाप बसविल्यावांचून रहात नाहीं. हीं जुन्या चालीचीं आईबापें पुढें आपल्या पुनर्विवाहित मुलीच्या घरीं रहावयालाहि जात असत. त्यांनीं पुनर्विवाहितांच्या हातच्या अन्नोदकांचें सेवन केलें नाहीं; पण

हकीकत कळल्याबरोबर त्यांची काय स्थिति झाली असेल, हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. तशांत आगींत तेल ओतणाऱ्या विघ्नसंतोषी व्यक्तींना तोटा नव्हता. "या वयांत न आलेल्या मुलीचे कायदेशीर पालक तुम्ही आहां, तेव्हां तुम्ही आपल्या मुलावर फिर्याद करण्याला मागें घेऊं नका व आधीं हा समारंभ थांबविण्यासाठीं तुम्ही जबलपूरच्या मॅजिस्ट्रेटसाहेबांना तार करा," असा सल्ला रामभाऊंच्या वडिलांना ताबडतोब मिळाला! त्यांनीं या भानगडींत पडण्याचें नाकारलें ही गोष्ट वेगळी. रामभाऊंच्या या उदाहरणानें माझ्या मनावर बराच परिणाम घडला.

विधवांविषयीं विशेष प्रकारची सहानुभूति उत्पन्न होण्याला नरहरपंतांच्या वडील बहिणीचें अत्यंत हृदयद्रावक प्रत्यक्ष उदाहरण माझ्या डोळ्यांसमोर होतेंच. नरहरपंतांच्या बहिणी चार व भाऊ दोन मिळून एकंदर हीं सात भावंडें. यांतला सर्वांत धाकटा शिवायकरून बाकीचीं सर्व तेजस्वी आणि पराक्रमी निपजलीं. सर्व बहिणींत यांची वडील बहिण हुशार, तरतरीत व अत्यंत तीव्र मनोवृत्तींची होती. त्या बिचारीची आहुति आपल्या समाजांत जो वैधव्याग्नि सारखा प्रज्वलित होऊन राहिला आहे त्याला पडली. तीस वर्षांपूर्वीच्या या अग्नीचा प्रताप व हल्लींची त्याची स्थिति यांत बरेंच अंतर

---

पुनर्विवाहाविषयींचा त्यांचा तिटकारा नाहींसा झाला. नंतर पुष्कळ वर्षांनीं पुण्यांत मळेकरांच्या वाड्यांत रावबहादुर वामनराव कोल्हटकर यांच्या मुलीचा विवाह मोठ्या थाटानें झाला त्या प्रसंगीं हे वृद्ध गृहस्थ हजर होते. पुरोहिताच्या हातून पौरोहित्य नीट होत नाहीं असें यांना दिसून आलें तें त्यांच्यानें निमूटपणीं पहावेना. मग ते पुढें सरले, व स्वतः पुरोहित बनून त्यांनीं सर्व कर्म यथासांग करविलें. ज्या केवळ जुन्या संस्कारांच्या गृहस्थांना विवाहाचा केवळ आळ आलेल्या आपल्या मुलीच्या पुनर्विवाहाच्या वेळीं मरणप्राय दुःख व्हावें त्यांनींच पुढें पुनर्विवाहित दांपत्याच्या कन्येच्या विवाहाच्या प्रसंगीं पौरोहित्य करण्यास पुढें सरावें, ही गोष्ट विशेष विचार करण्यासारखी आहे. मनुष्याच्या मनावर सहवासाचा परिणाम बराच होतो ही गोष्ट खरी आहे. पण या ठिकाणीं दुसरेंहि एक बलवत्तर कारण आहे. आपल्या मुलांनीं पुनर्विवाहासारखें कृत्य केल्यानें मनुष्याला जें दुःख होत असतें त्याचें मुख्य कारण लोकमत हें असतें. आपल्या कुळाला काळिमा लागून आपल्याला तोंड बाहेर काढतां येणार नाहीं व लोक आपला छळ करतील ही भीति त्याच्या मुळाशीं असते. ती एकदां गेली म्हणजे मनुष्याला या कृत्यांचा बाऊ वाटेनासा होतो.

आहे. वैधव्याची स्थिति तीव्र मनोवृत्तींच्या मनुष्यांना जात्याच किती तरी उद्वेगजनक असते. तींत आणखी या स्थितींत पडलेल्या मनुष्यांविषयीं समाजाची अत्यंत निष्ठुर बुद्धि. तिची भर पडल्यामुळें, कित्येक स्त्रियांना वैधव्य दुःसह व्हावें यांत नवल नाहीं. ती रेल्वेच्या ऑफिसांतील एका गृहस्थाच्या पदरीं पडली होती. त्याला शिक्षणाची आवड बिलकुल नव्हती व तिला या कामीं उत्तेजन अगदीं मिळालें नाहीं. तथापि ती चांगलें वाचावयाला शिकली होती. वैधव्याच्या प्रसंगानें तिच्या मनाला जो भयं-कर धक्का बसला त्यांतून ती कधीं बाहेर पडली नाहीं. वैधव्याचा प्रसंग येतांक्षणींच जो दुसरा दुर्धर प्रसंग स्त्रियांवर येतो त्यांतून तरी तिला सोड-वावें म्हणून तिच्या बंधूंनीं शिकस्त केली. मीहि त्या प्रसंगीं तेथें होतों. मधले बंधु वामनराव हे शरीरानें भीमसेनासारखे असून त्यांनीं आपलें उग्रस्वरूप धारण केलें. पण तें अनाठायीं झालें. त्यांच्या बहिणीच्याच मनाची तयारी होईना. ती त्या वेळीं तेथें एकटी असती, तर तिला धैर्य झालें असतें. परंतु तिजकडे कधीं न येणारी धुळ्याकडे राहणारी तिची विधवा मावशी कर्मधर्मसंयोगानें तेथें आली होती त्यामुळें तिचें धैर्य अगदींच खचून गेलें, व तिनें त्या निर्दय आणि गलिच्छ प्रसंगाला मान वांकविली. हा प्रसंग जर टळता, तर कदाचित् तिच्या आयुष्यक्रमाला निराळा मार्ग लागता. या प्रसंगानंतर तिनें अंधारी खोली फारशी सोडली नाहीं. नरहरपंतांमुळें मजवर तिचा फार लोभ जडला होता व मलाहि ती वडील बहिणीप्रमाणें वाटे. तिनें राहिलेल्या आयुष्याचें चीज करावें म्हणून मीहि आपली शिकस्त केली, पण यश आलें नाहीं. ती दिवसाला घराच्या बाहेर कधीं पडलीच नाहीं. आमच्या बायकांबरोबर रात्रीला तरी तिनें फिरावयाला यावें, म्हणून आम्ही यत्न केला, पण ती एकदां मात्र आली; पुनः आली नाहीं. तिनें आपलें अन्न तोडलें, कधींहि गोड खाल्लें नाहीं, आजारांत औषध घेतलें नाहीं, आणि अशा रीतीनें तिनें देहाचे हालहाल केले. या प्रसंगानंतर तिच्या तोंडावर हसूं म्हणून कधीं कोणाला दिसलेंच नाहीं. मुंबईला आजारी पडून ती देवरुखाला गेली, व तेथें पुष्कळ दिवस हाल भोगून अखेरीला मृत्युमुखीं पडली. तिनें सहासात वर्षें ही यमयातना भोगिली. कित्येक मनुष्यें स्वतः दुःख करितात, पण तें यांचें दुःख इतकें

शांत व दुसऱ्याला न कळण्यासारखें असतें कीं त्यापासून कोणाला यत्किंचित्हि ताप होऊं नये. परंतु कित्येक तेजस्वी मनुष्यें स्वतःला जाळून घेतात; इतकेंच नव्हे, पण तीं जवळच्या मनुष्यांनाहि जाळतात; त्यांच्या दुःखाग्नीचे भपकारे जवळच्या मनुष्यांनाहि असह्य होतात. तशा प्रकारची ही बाई होती. बिचारीनें बुद्धिपुरःसर कोणाला ताप दिला नाहीं; पण तिला आपलें मन आवरतां येईना, याला तिचा इलाज नव्हता. अशा प्रकारच्या बायका हल्लींहि आपल्या समाजांत आढळतील, पण त्यांचें प्रमाण कमी असेल, एवढेंच काय तें.

मी निस्वार्थबुद्धीनें तिच्यासाठीं झटत होतों हें तिनें ओळखलें होतें. तिला माझ्या मुलाच्याच वयाची एक मुलगी होती. तिजकडे मीं लक्ष्य द्यावें व तिच्यासाठीं मीं कांहीं करावें, असें तिनें मला अनेक वेळां सांगितलें होतें. तीहि हुषार व तरतरीत मुलगी होती. माझ्या मुलाकरितां शिक्षक ठेविला होता त्याच्याजवळ ती बरेच दिवस त्याजबरोबर शिकत असे. तिच्या लग्नाचा योग मीं रँगलर परांजपे (त्या वेळीं रँगलर झाले नव्हते) यांच्याशीं जुळविला. हें लग्न झाल्याची वार्ता ऐकून तिच्या आईनें सुखानें प्राण सोडला.

दुसरें एक उदाहरण माझ्या दूरच्या आप्तांमध्यें घडलें होतें तें वेगळें होतें. या बाईचें पाऊल वांकडें पडून त्याचा दुष्परिणाम कसा निस्तरावा या विचारांत ती मंडळी होती. ही बाई मुंबईला आली होती. ती आल्याचें कळल्यानंतर तिच्या आप्तांना व तिला मी भेटलों. पंढरपुराला पोहोंचवून तेथून सुटल्यानंतर तिला मी शाळेंत घालून तिजकडून विद्याभ्यास करवीन, ही गोष्ट तुम्हांला पसंत असली तर तिनें मजबरोबर यावें, व तिच्यासंबंधाची सर्व जबाबदारी मी घेतों, असें मी त्यांना सांगितलें; परंतु तें त्यांना पटलें नाहीं. पंढरपुरचा कार्यभाग उरकून परत तिला मी तुमच्या स्वाधीन करतों, असें जर मीं म्हटलें असतें तर तीं लागलींच कबूल झालीं असतीं परंतु शिक्षणाची गोष्ट त्यांना पसंत पडेना आणि ती विकेशा असून शिक्षणाची गोष्ट मी काढतों कशी, याचा त्यांना मोठाच अचंबा वाटला! माझें बोलणें त्यांना पसंत न पडल्यामुळें पुढें मी त्या कामांत पडलों नाहीं.

मी पुनर्विवाहाकडे वळलों, याला सामान्यतः स्त्रीजातीविषयीं सहानुभूति हेंहि एक कारण होतें. स्त्रीजातीकडे निसर्गप्राप्त जें एक कर्तव्य आलें आहे, त्यामुळें ती जात अगदीं पंगू झाली आहे. ज्या अपराधाचें मुख्य कर्तृत्व पुरुषाकडे असतें, व ज्याचा उगम शेंकडा नव्वद उदाहरणांमध्यें पुरुषाकडूनच होतो, त्याबद्दल निसर्ग आणि समाज या उभयतांनींहि स्त्रीलाच कडक शासन करावें, व पुरुषाला दोघांच्याहि तावडींतून निसटून जातां यावें, या प्रकाराला काय म्हणावें तें कळत नाहीं! निसर्गाचे मार्ग अगाध आहेत, पण तेहि शोधण्याची मनुष्याची धडपड चालली आहे. ते त्याला कधीं युगांतरीं कळतील तेव्हां कळोत! परंतु समाजकृति मनुष्यकृत आहे आणि ती मनुष्याला सावकाश खरी पण बदलतां येणारी आहे. तेव्हां समाजानें स्त्रियांवर जें शस्त्र धरलें आहे त्याची धार तरी बोथट करण्याचा प्रयत्न विचारी पुरुषांनीं करावा. ज्यांचें पाऊल वांकडें पडलें त्या स्त्रिया विधवा असोत अगर विधवावजा सुवासिनी असोत, त्यांच्या शोचनीय स्थितीची कल्पना 'नहि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम्' या न्यायानें त्यांच्या त्याच करूं जाणोत! दुसरें कोणतेंहि संकट उद्भवलें तर उजळ माथ्यानें चार उसासे टाकून मोकळेपणीं रडतां तरी येतें, व जवळच्या मनुष्यांची सहानुभूति उद्दीपित करितां येते; पण हा तोंड दाबून बुक्यांचा मार असतो! तीव्र वेदनांमधून त्यांची लवकरच कशीबशी सुटका होते, पण या कृतीचे दुष्परिणाम बहुतेकांना जन्मभर भोगावे लागतात. अपराध केवढा आणि त्याला शासन केवढें! अशा रीतीनें निसर्गाच्या व समाजाच्या रोषाला पात्र झालेल्या स्त्रीजातीची अल्प सेवा माझ्या हातून घडत आहे, हें मी माझें मोठें भाग्य समजतों.

स्त्रीजातीच्या या दुःखानें माझें मन कळवळण्याला माझ्या लहानपणीं घडलेलें व मराठी सहाव्या इयत्तेची परीक्षा आटोपल्यानंतर कोल्हापुराहून परत फिरल्यावर नरसोबाच्या वाडीला असतां विशेष रीतीनें नजरेपुढें आलेलें एक उदाहरण कारण झालें.

नृसिंहवाडीचें नांव निघालें, कीं, अंतःकरणाला चटका लावणाऱ्या एका गोष्टीचें स्मरण होतें. आम्ही नृसिंहवाडीला गेलों, तेव्हां तेथें सेवेकऱ्यांची गर्दी होती. आम्हीं स्नान करून दत्ताचें दर्शन घेतलें व प्रदक्षिणेला निघालों

त्या वेळीं हातांत माळ घेऊन प्रदक्षिणा घालीत असणारी एक बाई आमच्या नजरेला पडली. आम्हीं तिजकडे पाहिलें, व तिनेंहि आम्हांकडे पाहिलें. एकदांच काय ती आमची दृष्टादृष्ट झाली. पुनः परस्परांकडे पाहण्याचें धैर्य कोणाला होईना. एक चकार शब्दहि न बोलतां आम्ही दोघे परतलों. यापुढें या बाईची गांठ कधीं पडलीं नाहीं.

माझ्या थोड्याशा परिचयांतलें वयोवृद्ध भिक्षुकाचें एक सुशील घराणें होतें. ही बाई कांहीं आप्तपणामुळें त्या घरीं राहत असे. तिचा नवरा नाहींसा होऊन फार वर्षें झालीं होतीं. माझ्या अगदीं लहानपणापासून मीं तिला तशीच पाहिलेली होती. नवरा मेला कीं जीवंत होता हें कांहींच न कळल्यामुळें ती सुवासिनीच्याच वेषानें राहत असे. या बिचारीची कोणा नरपशूच्या कामाग्नींत आहुति पडली. असल्या पापाचें बाह्यस्वरूप बहुधा आजूबाजूला राहणाऱ्या बायकांच्याच लक्षांत आधीं येतें. तसें होऊन शेजारींपाजारीं कुजबूज सुरू झाली, व ती या बाईच्या घरच्या मनुष्यांच्याहि कानीं गेली. अर्थात् हिला घर सोडावें लागलें. सभोंवतीं जिकडेतिकडे चळवळ उडून गेली. या वयोवृद्ध भिक्षुकाच्या घरावर बहिष्कार घालण्यासाठीं देवळांत गांवकी ( गांवांतील ब्रह्मवृंदांची सभा ) जमली. जो पापात्मा या कृत्याचा मुख्य चालक, तो उघडकीला आला नाहीं, आणि येता तरी त्याचें कोण काय करणार होतें! त्या वृद्ध भटजींनीं 'अशी बाई आपल्या घरीं कांहीं महिने राहिली या पापाच्या क्षालनार्थ गांवकी ठरवील ती शिक्षा भोगावयाला मी तयार आहें,' असें कबूल केलें, व गांवकीनें एक मण तेल देवाच्या उत्सवाच्या प्रसंगीं त्यानें द्यावें ही शिक्षा ठरविली. अशा रीतीनें या प्रकरणाचा येथें वरवर निकाल लागला, पण या कृत्याचे परिणाम ज्या एका अगर दोन जीवांना जन्मभर भोगावे लागले, त्याचा योग्य विचार करणारी गांवकी अगर देशकी कोठें आहे काय ! नसली तर अशी कोठें उत्पन्न होईल काय ! त्या बाईनें आपल्या पापाचें क्षालन कोठें केलें असेल व बिचाऱ्या अर्भकाचें काय झालें असेल ! तें तिचें तिलाच माहीत ! बा निसर्गा, कसली अजब मोहिनी तूं जीवसृष्टींत भरून ठेविली आहेस ! आणि सुधारलेल्या मनुष्यकोटींत पापपुण्याच्या कल्पनेशीं तिचा संबंध जोडून

देऊन केवढ्या दुःखपरंपरेचें अमोघ बीज तिच्या कोशांत लपवून ठेविलें आहेस ! हें तुझ्या कृतीचें गूढ मनुष्याला कधीं उकलेल काय ?

राधाबाईच्या मृत्यूनंतर वर दिलेल्या सर्व गोष्टी मनांत मूर्तिमंत उभ्या राहत. जेव्हांजेव्हां पुनर्लग्नाविषयीं विचार मनांत येत तेव्हांतेव्हां विवेकबुद्धि मला विचारी कीं, 'तूं सामान्य माणसाप्रमाणें भ्याड मनानें जनरूढीला बळी पडणार कीं, मनाला पवित्र वाटणाऱ्या व कांहीं थोर विभूतींनीं घालून दिलेल्या नवीन मार्गाचें धैर्यानें अवलंबन करणार ?' आनंदाची गोष्ट एवढीच कीं, अखेरीला सद्विचारांचा जय झाला !

# प्रकरण तेविसावें

## पुनर्विवाह

कित्येक वेळां मनुष्यावर दुःखाचे प्रसंग येतात ते बरे की वाईट, हें ठरविणें मोठें कठिण असतें. एकुलता एक मुलगा गेल्यानें मनुष्याचें मन परमार्थाकडे वळलें व तो प्रसंग त्याच्या आत्मोन्नतीची एक पायरी होऊन बसला, असें अनेक वेळां घडलें आहे. प्रसंगाचा मनुष्य ज्याप्रमाणें उपयोग करून घेईल त्याप्रमाणें त्याला बरा किंवा वाईट म्हणावा लागेल. वैधव्य प्राप्त होणें याहून अधिक दुःखदायक प्रसंग हिंदु स्त्रियांच्या आयुष्यांत नाहीं ही गोष्ट कोणीहि कबूल करील, पण शहाण्या स्त्रियांनीं त्या प्रसंगाचा सुद्धां स्वतःच्या व इतरांच्या उन्नतीच्या कामीं उपयोग करून घेतला आहे. याचें ठळक उदाहरण पंडिता रमाबाई होत. हा प्रसंग जर त्यांजवर न गुदरता तर जी अमोलिक लोकसेवा त्यांच्या हातून घडली आहे ती कधीं घडली नसती. जो प्रसंग एकाला अधोगतीला नेण्याला कारण झाला तोच दुसऱ्याला उन्नतीप्रत नेऊं शकतो, अशीं उदाहरणें पुष्कळ सांपडतील.

राधाबाईच्या देहावसानानंतर वरच्यासारखे विचार माझ्या मनांत येऊं लागले. राहिलेलें आयुष्य विधुरावस्थेंत घालवून त्याला उपयुक्त दिशा लावणें आपणाला साधेल कीं नाहीं, याबद्दल मला शंका होती. नाइलाज म्हणजे तो मार्ग पतकरणें भाग होतें. पुनः संसारांत पडणें हा प्रश्नहि फार बिकट होता, पण तो सोडविल्यावांचून गत्यंतर नव्हतें. विधवाविवाहाचा प्रश्न वीस वर्षांपूर्वी हल्लींच्या इतका सोपा नव्हता. माझी वृद्ध मातुःश्री व वडील बंधु हीं मनुष्यें अत्यंत प्रेमळ होतीं, आणि आमचें परस्परांवर अ-कृत्रिम प्रेम होतें. विधवेशीं लग्न करणें म्हणजे या उभयतांच्या निसर्गप्राप्त धर्मबुद्धीला जबरदस्त धक्का देऊन त्यांना दुःखसागरांत लोटून देण्यासारखें होतें. माझ्याएवढ्या वयाच्या मनुष्यानें लहानशा कुमारिकेशीं लग्न करणें म्हणजे केवळ पशूच्याहि खालच्या पायरीवर जाणें होय, असें मला वाटत होतें. एकदां मन एकीकडे ओढलें जावें व पुनः तितक्याच जोरानें दुस-रीकडे ओढलें जावें, असें होऊन कधींकधीं अंतःकरण क्षुब्ध होऊन जाई.

अखेरीला मीं असा निश्चय केला कीं, मातुःश्री व वडील बंधु यांची अनुमति न मिळेल, तर पुनः विवाहपाशांतच पडावयाचें नाहीं! हा निश्चय मीं अत्यंत सौम्य वृत्तीनें मातुःश्री व वडील बंधु यांना कळविला. हीं अत्यंत थोर व कोंवळ्या मनाचीं होतीं. त्यांनीं माझ्या मनाची स्थिति ओळखिली, व "आम्हांला आमच्या परिस्थितींत सोडून देऊन तुझ्या मनाला योग्य दिसेल तें तूं कर," अशी त्यांनीं मला मोकळीक दिली.

वडील बंधु व मातुःश्री यांजकडून ही पडत्या फळाची परवानगी मिळाल्यामुळें मी एका अडचणींतून पार पडलों खरा; पण दुसऱ्या अडचणी कांहीं थोड्या नव्हत्या. ज्यांनीं या कामीं पुढें पाऊल टाकलें होतें अशीं काय तीं दोनतीनच मनुष्यें पुण्यांत होतीं; पण या कामीं फारसें पाठबळ मिळण्यासारखें नव्हतें. यापूर्वीं पुण्यांत काय तो एकच पुनर्विवाह प्रसिद्धपणें झाला होता.* व तो होऊन पंधरावीस वर्षें होऊन गेलीं होतीं. हा विवाह म्हणजे सर डॉ. भांडारकर यांचे आप्त प. वा. अण्णासाहेब भांडारकर यांची कन्या गंगूताई भांडारे यांचा होय. पुण्यांत त्या वेळीं जुन्या मताच्या लोकांचें विशेष प्राबल्य होतें, व माझ्यासारख्या सामान्य मनुष्यानें या कामीं पुढें पाऊल टाकणें कितपत दूरदर्शीपणाचें होईल, याबद्दल मन साशंक होत होतें. तथापि, जी गोष्ट करावयाला मी निघालों होतों, ती अगदीं निष्पाप व आपल्या समाजाच्या परिस्थितीला अत्यंत आवश्यक आहे, असें माझी मनोदेवता मला सांगत होती. अशा रीतीनें विचारांचें झुंज चालून अखेर कायमचा निश्चय ठरला. तथापि ही गोष्ट कोणाशीं व केव्हां घडवून आणावयाची, या गोष्टीच्या विचाराला मी लागलों नाहीं. कारण, पुण्यांतल्या नवीन कामाचा जम कसा काय बसतो या गोष्टीचा अजून निकाल व्हावयाचा होता.

पुढें लवकरच लग्नसराई आली, तेव्हां कांहीं मुलींचे पालक दुरूनदुरून मजविषयीं चौकशी करूं लागले. आतां कुमारिकेशीं लग्न करावयाचें नाहीं, हा माझा निश्चय मजकडे विचारावयाला येणाऱ्या मनुष्यांना मी स्पष्टपणें

---

* हा विवाह देखील पुण्यास न होतां मुंबईसच झाला असें माझे मित्र प. वा. श्रीयुत सदाशिवराव केळकर यांनीं मला पुढें सांगितलें. त्यांचें म्हणणें माझा विवाह हाच प्रसिद्धपणें झालेला पुण्यांतला पहिला पुनर्विवाह होय.

कळवीत असे. पुढें लवकरच मजकडे कोणी येईनासें झालें. बहुधा कोणत्याहि मोठ्या जबाबदारीच्या कामांत मी दुसऱ्याच्या सल्ल्यावर फारसा अवलंबून नसतों. आपल्या मनाची बळकटी आपणा स्वतःला जितकी कळते तितकी दुसऱ्याला कळण्याचा संभव नसतो. या कामीं मीं कोणालाहि न विचारतां निश्चय केला, व जेव्हां तो तडीला नेण्याच्या कामीं दुसऱ्याच्या मदतीची जरूर लागली तेव्हां मी आयत्या वेळीं त्यांजकडे गेलों. या कामीं मला किती तरी मनुष्यांनीं सल्ला विचारला आहे. त्या सर्वांना माझें एकच उत्तर असतें. 'कोणाहि मनुष्याला यत्किंचित् दोष न लावतां अडचणींना तोंड देण्याचें जर तुमच्यांत सामर्थ्य असलें तर जरूर या कामीं पडा; तसें नसलें तर या वाटेला जाऊं नका.'

नंतर कॉलेजाच्या कामाचा बरा जम बसून सव्वा वर्ष झालें तरी आणखी आठदहा महिने तसेंच घालविण्याचें माझ्या मनांत होतें. माझ्या कांहीं मित्रांनीं एकाद्या पुनर्विवाहेच्छु वधूविषयीं बोलणें काढलें असतां मी तिकडे दुर्लक्ष्य करीं. यामुळें मी कांकूं करूं लागलों आहें व कदाचित् माझा निश्चय डळमळेल अशी त्यांना शंका येऊं लागली होती. इतक्यांत एक अकल्पित गोष्ट घडून आली.

नरहरपंतांचे वडील व मातुःश्री यांचा आणि माझा चांगला परिचय झालेला होता. हीं अगदीं जुन्या तऱ्हेचीं मनुष्यें होतीं. तेव्हां यांच्या मुलीशीं लग्न करावें, हा विचार मला कधीं शिवलाहि नाहीं. परंतु जिकडून या गोष्टीचा पुरस्कार * होईल असें कधीं कोणाच्या स्वप्नींहि आलें नसतें, तिकडूनच तो झाल्यामुळें वधू शोधण्याचा प्रश्नच उरला नाहीं. आतां फक्त गोदूबाईला प्रत्यक्ष विचारावयाचें राहिलें होतें तें मीं शारदासदनांत जाऊन आढेवेढे न घेतां सरळ विचारिलें. तिलाहि या प्रश्नाचें आश्चर्य वाटलें नाहीं, कारण एकाच उगमापासून उभयतांच्या अंतःकरणांना चालना मिळाली होती. या प्रश्नाला रुकार मिळाला, तरी विवाह घडून येण्याला वर्षभर अवकाश लागेल असें मला वाटलें होतें. कारण त्या दिवसांत

---

* ही इत्थंभूत हकीकत हृदयद्रावक व मनोवेधक आहे. परंतु ती येथें दिली असतां कदाचित् कोणाला जाचक होण्याची भीति आहे. पुनरावृत्तीपर्यंत या पुस्तकाची आयुर्मर्यादा असल्यास सदर भीति नाहींशीं झाल्यावर ती जरूर देईन. (ती या आवृत्तींत प्रकरणाच्या शेवटीं टीपेंत दिली आहे.)



सौ. आनंदीबाई कर्वे (वय ६३.)

कोंकणप्रांतांत पंधरासोळा वर्षांच्या वरील वयाची विधवा विरूप झाल्या-वांचून राहणें शक्य नव्हतें. यासाठीं पहिल्या प्रश्नाचें उत्तर होकारार्थी मिळाल्याबरोबर शिरोभूषणाची तयारी होण्याला किती काळ लागेल हा दुसरा प्रश्न मीं तिला केला. या प्रश्नानें मात्र तिला आश्चर्य वाटलें. विवाहाची गोष्ट ध्यानींमनींहि नसतां या निंद्य चालीला दरपंधरवड्याला किंवा महिन्याला बळी पडावयाचें नाहीं, या हेतूनें या हिडिस प्रकाराला तिनें पुष्कळ महिने फांटा दिलेला होता व ही गोष्ट माझ्या लक्षांत आली असावी अशी तिची समजूत होती. कित्येकांची दृष्टि खोल असते, व कित्येकांची अगदीं उथळ असते. ज्या गोष्टी दुसऱ्या मनुष्याच्या सहज लक्षांत येतात, त्या कित्येकांच्या येत नाहींत. मी या दुसऱ्या वर्गांतला मनुष्य आहें. ज्या गोष्टीचें कारण नसतें, त्या गोष्टीकडे माझें लक्षच जात नाहीं. गोदूबाईनें बाह्यस्वरूपांत फरक केलेला नसल्यामुळें ही गोष्ट माझ्या लक्षांत आली नव्हती. ही अडचण अगोदरच दूर झालेली असल्यामुळें संकल्पित गोष्ट लवकरच घडवून आणण्याचा मीं निश्चय केला.

गोदूबाईनें पंडिताबाईजवळ जेव्हां ही गोष्ट काढली, तेव्हां त्यांना अतिशय आश्चर्य वाटलें. कांहीं बंगाली गृहस्थांच्या इच्छेवरून 'तूं पुनर्विवाह करण्याला तयार आहेस काय?' असा प्रश्न पंडिताबाईनीं तिला एक-दोन वेळां विचारला होता, तेव्हां 'बंगाली म्हणूनच नव्हे, पण दक्षिणी मनुष्याशींसुद्धां मला पुनर्विवाह करावयाचा नाहीं' असा जबाब तिनें दिला होता. 'तुम्हांला कोणीं विचारल्यास तुम्ही परस्परच नकाराचा जबाब द्या, व पुनर्विवाहासंबंधानें पुनः तुम्ही मला विचारूं नका,' असेंहि तिनें त्यांना सांगितलें होतें. अशा स्थितींत हिजकडूनच हा प्रश्न आला, हें पाहून त्यांना साहजिकच आश्चर्य वाटलें. माझ्याशीं लग्न करण्याच्या विचारापासून गोदूबाईला परावृत्त करण्याचा यत्न त्यांनीं केला. मी त्या वेळीं हल्लींपेक्षांहि कृश होतों व वरवर पाहणाराला मी अतिशय निःशक्त व आजाऱ्यासारखा दिसत असें. आमच्या पुनर्विवाहावर मत देणाऱ्या एका वर्तमानपत्रकारानें या गोष्टीचा विशेष उल्लेख केला आहे. तुला लग्न करावयाचें असेल तर या मनुष्याशीं तरी करूं नको, असा सल्ला त्यांनीं दिला. जेव्हां त्यांनीं तिचा विशेष आग्रह पाहिला, तेव्हां निदान एवढा

पावसाळा तरी जाऊं दे, असें त्यांनीं तिला सांगितलें. माझ्या शरीराची काठी बारीक खरी पण ती कमावलेली होती, ही गोष्ट वरवर पाहणाराला कळण्यासारखी नव्हती. माझी सर्व हकीगत जेव्हां त्यांना कळली, तेव्हां त्यांनीं या गोष्टीला आपला रुकार दिला.

या ठिकाणीं गोदूबाईचें (हिचें नांव पुढें मीं आनंदीबाई ठेविलें) थोडें पूर्ववृत्त दिलें असतां बरें होईल. हिचें पहिलें लग्न हिच्या वयाच्या आठव्या वर्षीं झालें. हिला हिच्यापेक्षां १७ वर्षांनीं मोठ्या अशा बिजवराला दिलें होतें. हा चांगला विद्वान् असून पुढें नांवालौकिकाला येण्याचा संभव होता, एवढीच गोष्ट त्यांत बरी होती. थोड्या महिन्यांनींच तिला वैधव्य आलें. देवरुखाला तिचें माहेर आणि माखजनाला सासर. दोन्ही ठिकाणीं बायकाहि पुरुषांप्रमाणें शेतांत राबत असत. हिला घरच्या व शेतांतल्या सर्व कामांचा अभ्यास होता. यामुळें सर्व प्रकारचे शरीरकष्ट हिच्या अंगवळणीं पडलेले होते. मुंबईत शारदासदन निघणार असें प्रसिद्ध होण्याच्या आधींच नरहरपंतांनीं तिला आमच्या मुंबईच्या बिऱ्हाडीं आणलें होतें व तिची घरींच शिकण्याची सुरवातहि झालेली होती. मींहि तिला पुष्कळ वेळ शिकविलेलें होतें. तिच्या शिक्षणाची काय व्यवस्था करावी, ही नरहरपंतांना काळजी होतीच. इतक्यांत मुंबईला शारदासदनाची सुरुवात झाली व नरहरपंतांनीं गोदूबाईला पहिली विधवा विद्यार्थीण दाखल केली. हिच्यापूर्वीं प. वा. गंगाधरपंत गद्रे यांची मुलगी कुमारी शारदा ही दाखल झाली होती व तिजवरूनच पंडिताबाईनीं संस्थेला शारदासदन हें नांव दिलें होतें. गोदूबाई शारदासदनांत चार वर्षें होती. हा पुनर्विवाहाचा योग विलक्षण रीतीनें जुळून आला नसता, तर हिचा अभ्यासक्रम असाच पुढें चालून हिनें एकादें स्त्रीशिक्षणाचें काम हातीं घेतलें असतें.

आम्हां उभयतांचा निश्चय झाल्यानंतर पुढील व्यवस्थेचें काम मीं माझे मित्र रामभाऊ जोशी यांजवर सोंपविलें. हे व प. वा. प्रि. गो. ग. आगरकर यांनीं निमंत्रणपत्रिकेवर सह्या केल्या. १८७४ सालीं पुण्यांतला पहिला पुनर्विवाह ज्या घरीं झाला होता त्याच म्हणजे प. वा. अण्णासाहेब भांडारकरांच्या घरांत तारीख ११ मार्च १८९३ रोजीं हें कार्य उरकून घेण्याचें ठरलें. एकदोन मित्रांनीं विवाहविधि वगैरे पाहून पौरोहित्य कर-

ण्याची तयारी चालविली होती, इतक्यांत या कामीं एका गृहस्थांची अकल्पित मदत मिळाली. हे गृहस्थ देवमूर्ति भिकंभटजी वझे होत. हे मालवण तालुक्यांतील एका गांवचे भिक्षुक. यांना विधवांच्या संबंधानें फार कळकळ वाटे व त्यासंबंधानें आपण कांहीं करावें म्हणून ते मुद्दाम मुंबईला आले. त्यांनीं कांहीं गृहस्थांच्या भेटी घेतल्या; त्यांत माझे मित्र प. वा. सदाशिवराव केळकर यांची गांठ घेतली. "पुनर्विवाहाच्या प्रसंगीं पुरोहितपणा करण्याची तुमची तयारी आहे काय?" असा प्रश्न सदाशिवरावांनीं भिकंभटजींना केला. या प्रश्नाचें उत्तर 'होय' असें मिळाल्याबरोबर "तर मग उद्यां पुण्याला पुनर्विवाह आहे, तो चालविण्यास जा," असें सदाशिवराव एकदम म्हणाले आणि श्रीयुत रामभाऊ जोशी यांच्या घराचा पत्ता देऊन त्यांनीं भिकंभटजींची एकदम पुण्याला रवानगी केली. त्याप्रमाणें पुनर्विवाहाच्या आदल्या रात्रीं रामभाऊंच्या बिन्हाडीं येऊन ते दत्त म्हणून उभे राहिले, तेव्हां सर्व मंडळीला विस्मय वाटला. हें कार्य आटोपल्यावर "पुनर्विवाहाचें मंगल कार्य केव्हांहि उपस्थित झाल्यास मला जरूर बोलावा, मी अगत्यपूर्वक येईन," असें सांगून ते आपल्या गांवीं गेले. पुढें दोनतीन विवाहांसाठीं ते मुद्दाम आले होते. नंतर ते परलोकवासी झाले. पुनर्विहाच्या प्रसंगीं पौरोहित्य करणें म्हणजे एक पुण्यकृत्य करणें असें त्यांना वाटे. ते म्हणत कीं, एक पुनर्विवाह चालविला तर एका काशीयात्रेचें पुण्य लागतें!

विवाहांत कन्यादान करण्याची चाल केव्हां कशी पडली असेल ती असो! कन्येचें दान करणें ही गोष्ट विवेकबुद्धीला कशीशीच वाटते. त्यांत प्रौढ वधूचें दान फारच चमत्कारिक दिसतें. प्रौढ वधूवरांचे विवाह स्वयंवराच्या स्वरूपाचे होत. स्वयंवर या नांवाला शोभेल असा कांहीं तरी विधि यासंबंधानें असावा, असें माझें मत आहे. पुनर्विवाहाच्या विधींतहि कन्यादान करण्याची वहिवाट आहे. आमच्या विवाहांत वधूचें कन्यादान न होतां तिनें आत्मदान करावें असें आम्हीं उभयतांनीं ठरविलें, व कन्यादानाचा विधि न करितां आत्मदानाचा केला. असें करण्यास वे. भिकंभटजींनीं हरकत घेतली नाहीं. या गोष्टीची मीं त्या वेळीं फारशी परिस्फुटता केली नाहीं, तथापि एकदोन वर्तमानपत्रकारांनीं या शब्दांचा उप-

योग लग्नाची माहिती देतांना केला होता. अर्थात् कित्येक लोकांमध्यें या गोष्टीची चर्चा झाली होती.

विवाहसमारंभाच्या वेळीं चौघडा आणवावा अशाविषयीं प्रसिद्ध सुधारक प. वा. वामनराव मोडक यांच्या पत्नी प. वा. रखमाबाई यांनीं फार आग्रह धरिला होता. रत्नागिरीला असतांना कांहीं दिवस मी यांच्या घरीं राहिलों होतों, व यांचे मजवर बरेच उपकार होते. यांना नाखुष करणें माझ्या जिवावर आलें. तथापि ही गोष्ट करावयाची नाहीं असें मी निक्षून सांगितलें. विवाहसमारंभ सकाळींच उरकला व भोजनसमारंभ दोनप्रहरीं झाला. या समारंभाला तीसचाळीस मंडळी हजर होती; पण नांवें प्रसिद्ध करण्याचें ज्यांना धैर्य नव्हतें अशी मंडळी त्यांत बरीच होती. हा कार्यभाग आटोपल्यावर सायंकाळीं पांच वाजतां पंडिता रमाबाईच्या निमंत्रणावरून आम्ही हल्लीं विद्याखात्याच्या डायरेक्टरांचें ऑफिस असलेल्या शारदासदनाच्या बंगल्यांत गेलों.

आनंदीबाई ही पंडिता रमाबाईची फार आवडती विद्यार्थीण होती. त्यांनीं तिला वस्त्रें व भूषणें यांच्या देणग्या देण्यांत व तिच्या अभिनंदनार्थ जो भोजनसमारंभ केला त्यासाठीं बराच पैसा खरचला. आपल्या पहिल्या विद्यार्थिनीची योग्य व्यवस्था लागत आहे, हें पाहून त्यांना अतिशय आनंद झाला होता. सदनांतील विद्यार्थिनींनाहि आपल्या एका मैत्रिणीला संसारसुखाचा अनुभव घेण्याची संधि मिळाल्यामुळें आणि विधवांच्या भावी सुस्थितीचें द्वार मोकळें होत चालल्यामुळें अत्यंत हर्ष झाला होता. तो व्यक्त करण्याची त्यांनीं संधि साधली. या वेळीं शारदासदन अत्यंत भरभराटीच्या स्थितींत होतें, व आमच्या पुढाऱ्यांच्या विश्वासांतून उतरलेलें नव्हतें. रात्रीं भोजनसमारंभ आटोपल्यावर सर्व विद्यार्थिनी व इतर निमंत्रित मंडळी यांची सभा होऊन कांहीं भाषणें झालीं, व एका विद्यार्थिनीनें अभिनंदपर कविता केल्या होत्या, त्या तिच्या कांहीं मैत्रिणींनीं गोड स्वरानें गायिल्या. त्या येणेंप्रमाणें—

( 'झाला सायंकाळ०' या चालीवर. )

**आनंद झाला फार। अह्मांला। आनंद झाला फार!**
**प्रिय भगिनी गे गोदूबाई। करीं सुखें संसार!**

जनअपवादा न गणुनि सखये । केला योग्य विचार !
वाहवा करितिल सुजन तुह्मी गे । करितिल साह्य अपार !
तुह्मां उभयतां प्रभु सुख देवो । करा तुह्मी उपकार !

श्लोक.

नांदा सौख्यभरें प्रसन्न हृदयें या सृष्टिमाजी तुह्मी,
लोकां साह्य करूनि कीर्ति मिळवा इच्छीतसों ह्या अह्मी;
दुष्टांचीं वचनें मना न गणुनी सद्वाक्य आणा मनीं,
संपादा सुजनत्व कीं सुखद जें आहे खरें ह्या जनीं.
सौभाग्यानुभवास विन्मुख अशा हीनस्थितीनें जिला,
स्वीकारूनि जियेसि सख्य जुळिलें वैधव्य आली कळा;
ऐशी एक अनाथ बालविधवा जी सिद्ध लग्नास या,
झाली धैर्य धरूनि जी भगिनिंनो चिंता तियेच्या जया.
दीनोद्धार प्रभो ! सुरक्षितपणें राखीं नव्या जोडप्या,
व्हावें साह्य तयांकडूनि करवीं दीनांवरी सत्कृपा;
वैधव्याग्नित शेकडों बुडति ज्या प्रारब्धयोगें स्त्रिया
ज्यांतें मानिति तुच्छ आर्य जन त्यां रक्षीं करूनी दया.

मधुर सुरावर गायिलेलीं व आम्हांला कर्तव्यदिशा दाखविणारीं हीं पद्यें ऐकून आमच्या मनोवृत्ति उचंबळित झाल्या होत्या. उत्तरादाखल आनंदीबाईंचें व माझें थोडें भाषण होऊन हारतुरे झाल्यावर हा समारंभ आटोपला. पन्नाससाठ विधवा विद्यार्थिनींनीं नवपुनर्विवाहित दंपत्याचें अशा रीतीनें अभिनंदन करण्याचा हा योग अपूर्व होता. विधवांच्या शिक्षणासाठीं कमालीचे प्रयत्न करून शारदासदन यशस्वी करून दाखविणाऱ्या बाईंच्या उत्तेजनानें त्यांच्या विधवा शिष्यिणींनीं केलेलें हें अभिनंदन आम्हांला फार स्फूर्तिदायक वाटलें. सर्वांचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन आम्ही तेथून निघून आपल्या बिऱ्हाडीं म्हणजे शनिवार पेठेंत नदीजवळच्या मेहेंदळ्यांच्या बागेंतील छाटेखानी बंगल्यांत आलों. यांत पूर्वी प. वा. प्रि. गो. ग. आगरकर रहात होते. ते फर्ग्युसन कॉलेजाच्या आवारांत स्वतःसाठीं बांध-

लेल्या घरांत रहावयाला गेले, तेव्हां मी या घरांत रहावयाला आलों होतों. या ठिकाणीं आम्हीं आपल्या नवीन संसाराला प्रारंभ केला.

## पुरवणी

[पृष्ठ १५६ याखालीं दिलेल्या टीपेंतील भीति नाहींशी झाली आहे. माझे श्वशुर आपल्या वयाच्या ९२ व्या वर्षी परलोकवासी होऊन आठ वर्षे झालीं आहेत. तेव्हां आतां ती हकीकत देण्यास हरकत नाहीं सबब ती येथें देतों.

नरहरपंतांचे वडील श्रीयुत बाळकृष्ण केशव जोशी ( ह्यांना आम्ही बाबा म्हणत असूं ) हे भाविक आणि भक्तिमार्गांतले गृहस्थ होते. हे सहजीं त्यावेळीं पुण्यांत आले होते. पुण्यांतले हुंडीवाले साठे हे त्यांच्याच गांवचे म्हणजे देवरुखचे. ते समवयस्क असल्यामुळें त्यांजकडे उतरत. बाबा आमचे येथें बसावयास आले व आमच्या सुखदुःखाच्या गोष्टी सुरू झाल्या त्यावेळीं नरहरपंत विधुरावस्थेंत होते व मीही त्याच स्थितींत होतों. " तुम्ही दोघेही लग्नावांचून तसेच राहिलां अहां तेव्हां तुमच्या मनांत तरी काय आहे ? " असा प्रश्न त्यांनीं मला केला. मीं त्यांना मोकळ्या मनानें सांगितलें " बाबा, नरहरपंतांच्या मनांत काय आहे हें मला सांगतां येत नाहीं कारण त्यांची भेट झाल्याला पुष्कळ दिवस झाले आहेत व त्यांचें माझें या संबंधानें बोलणें झालेलें नाहीं. मी मात्र विधवेशींच लग्न करावयाचें असें ठरविलें आहे. " बाबा थोडा वेळ स्तब्ध राहिले व मग म्हणाले, " असें असेल तर शोध करावयाला तुम्ही दूर कशाला जातां ? " हे त्यांचे उद्गार ऐकून मी थक्क झालों. " बाबा, मी तुमच्या म्हणण्याचा आशय समजलों, पण हे तुम्ही विचार करून मनापासून बोललां काय ? " 'होय' असा त्यांचा जबाब मिळाल्यावर मी त्यांना म्हटलें, " तर मग तुम्हीच शारदासदनांत जाऊन गोदूबाईची भेट घेऊन तिच्या मनाची तशी तयारी आहे काय म्हणून विचारा. " एकदोन दिवसांनीं ते तिला जाऊन भेटतच असत. त्यांनीं तिच्याजवळ ती गोष्ट काढून तिची कबुली घेतली व मला त्याप्रमाणें कळविलें. अर्थात मला अतिशय आनंद झाला. नंतर बाबांवर मी आणखी एक कामगिरी सोंपविली. बाबांचा व माझ्या आईचा परिचय होताच. तेव्हां तुम्ही परत घरीं

जातांना वाटेंत हर्णै बंदरावर उतरून मुरुडास जा व आईचें व दादांचें या कामीं मन वळविण्याचा प्रयत्न करा अशी मीं त्यांना विनंति केली. आई व दादा यांची पडत्या फळाची आज्ञा मिळाली होती खरी, परंतु मनांतून ही गोष्ट व्हावी अशी त्यांची इच्छा नव्हती. ह्या वृद्ध गृहस्थांनीं आपली सहानुभूती व्यक्त केल्यास त्यांचें दुःख कांहीं तरी हलकें होईल असें मला वाटलें. बाबांनीं ती गोष्ट कबूल केली. परंतु पुढें ते मुंबईस गेल्यानंतर त्यांना कोणी गुरु भेटला व तुम्ही ह्या भानगडींत पडूं नका असा सल्ला त्यांना मिळाला आणि म्हणून ते मुरुडास गेले नाहींत. आपल्या विधवा मुलीच्या लग्नाला—गुप्तपणें कां होईना-संमति देणारे बाप आजच्या घटकेला तरी किती सांपडतील? मग ३५ वर्षांपूर्वी ह्या गोष्टीबद्दल केवढा गहजब होईल याची कल्पना असतां जुन्या विचारांच्या खेडेगांवांत राहणाऱ्या वृद्ध गृहस्थानें आपण आपल्या मुलीच्या पुनर्विवाहाचा प्रश्न तिच्याजवळ काढावा व तिला त्या मार्गाला प्रवृत्त करावें ह्यावरून त्याचें हृदय किती कोवळें असलें पाहिजे व मन किती थोर असलें पाहिजे ह्याची कल्पना होईल. बाबांची ह्या गोष्टीला अनुकूलता आहे ही गोष्ट मी सहजीं प्रि. आगरकरांचे जवळ बोलून गेलों होतों. ती त्यांनीं सुधारकपत्रांत प्रसिद्ध केली व तीबद्दल देवरुख गांवांत केवढी तरी गडबड उडून गेली. पुढें सुधारकपत्रांत चुकीची दुरुस्ती करून हा मजकूर गैरसमजुतीनें छापला गेला असें प्रसिद्ध झालें तेव्हां तेथील लोकांचा रोष थोडासा कमी झाला. तथापि तेथील ग्रामस्थांनीं त्यांच्या मुलीच्या पुनर्विवाहाबद्दल त्यांजकडून रघुपतीच्या देवळांत बारा नमस्कार घालविले व शंभर रुपये तीन देवळांच्या जीर्णोद्धारासाठीं त्यांजकडून घेतले. एवढें तरी प्रायश्चित्त दिल्यावांचून त्यावेळीं ग्रामस्थांचें समाधान झालें नाहीं. तसाच कांहीं प्रकार पहिल्या आवृत्तीला ही हकीकत दिली असतां होईल हें मनांत आणून त्यावेळीं ही हकीकत प्रसिद्ध केली नाहीं.]

# प्रकरण चोविसावें

## पुनर्विवाहासंबंधाचें त्या वेळचें लोकमत

## वर्तमानपत्रांतील अभिप्राय

माझे एक मित्र 'रिपोर्टर ऑन धि नेटिव्ह प्रेस' यांच्या ऑफिसांत कारकून होते. त्यांना माझ्या पुनर्विवाहासंबंधानें वर्तमानपत्रांत जे लेख आले असतील त्यांचें टांचण करून मजकडे पाठविण्याविषयीं मीं विनंति केली होती. त्या वेळचें लोकमत कळावें व पुढेंमागें त्यांत किती बदल होतो याची तुलना करितां यावी, म्हणून मीं हें टांचण मागविलें होतें. तें पाठवितांना त्यांनीं जें पत्र लिहिलें त्यांत असें लिहिलें आहे कीं, "हिंदूंनीं चालविलेलीं जेवढीं पत्रें आमच्या ऑफिसांत येतात, तीं सर्व पाहून त्यांत मिळालेले एवढे हे उतारे आहेत." हे सर्व १८९३ च्या मार्च महिन्यांतल्या कोणत्या तरी अंकांतून घेतलेले आहेत. लोकमताच्या भिन्न छटा समजतील अशा रीतीच्या उताऱ्यांपैकीं कांहीं भाग येथें देणें जरूर वाटतें. सर्वस्वी सुधारक मताच्या पत्रांचे लांबलचक अभिप्राय देण्याची जरूर नाहीं.

### सर्वस्वी अगर अंशतः अनुकूल अभिप्राय.

१ इंदुप्रकाश, मुंबई:—हा विवाह लावण्यास येथून भिकंभट वझे या नांवाचे याज्ञिक व वैदिक व्युत्पन्न भिक्षुक मुद्दाम गेले होते. पुण्यांत अशा प्रकारचा हा पहिलाच विवाह म्हटला तरी चालेल.

२ सुधारक, पुणें:—नैसर्गिक सौजन्य, सुशिक्षण, स्वावलंबन व निश्चय इत्यादि सद्गुण ज्याच्या अंगीं आहेत त्यावर विधुरतेचा दुःखकारक प्रसंग आला असतां त्यानें काय करावें, याचें अत्युत्कृष्ट उदाहरण प्रो. कर्वे यांनीं घालून दिलें आहे.

३ ज्ञानप्रकाश, पुणें:—पुनर्विवाहपक्षाचे अभिमानी रा. वा. आ. मोडक हे मुंबईहून व पाटील वकील हे पंढरपुराहून मुद्दाम आले होते. वर्ध्याहून रा. वासुदेवराव परांजपे वगैरे मंडळीकडून अनुमतिदर्शक तार आली होती.

४ सुबोधपत्रिका, मुंबई:—कर्वे यांनीं पढतमूर्खत्वाचें अवलंबन न करितां खरें मानसिक धैर्य दाखविलें.

५ वैदर्भ, अकोलाः—This has been an exceptionally good match.

६ ज्ञानचक्षु, पुणें; ७ वेंगुर्लेवृत्त, वेंगुर्लें; व ८ प्रमोदसिंधु, उमरावती या पत्रांचे अभिप्राय सर्वस्वी अनुकूल आहेत.

९ केसरी, पुणेंः—डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे लाइफ मेंबर व फर्ग्युसन कॉलेजांतील गणिताचे प्रोफेसर, रा. रा. धों. के. कर्वे, बी. ए., कोकणस्थ ब्राह्मण, वय ३५, यांचा शारदासदनांतील विद्यार्थी गोदूबाई जोशी, वय अजमासें २४ यांच्याशीं विवाह गेल्या शनिवारीं अष्टमीच्या सुमुहूर्तावर हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें करण्यांत आला. गोदूबाई यांचे पहिले पति लहानपणींच निवर्तले व त्यांच्या हल्लींच्या विवाहास त्यांचे वडील व बंधु रा. रा. न. बा. जोशी, बी. ए. एल्एल्. बी. यांची संमति आहे. राजश्री जोशी व कर्वे हे स्नेही आहेत. रा. कर्वे यांचें पहिलें कुटुंब निवर्तल्यापासूनच पुनर्विवाह करण्याचा त्यांचा निश्चय होता व त्यांनीं तो अखेरीस तडीस नेला, याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत. बालविधवांचे अशा रीतीनें जर कांहीं पुनर्विवाह घडतील तर ही सुधारणा कांहीं लोकप्रिय होईल. रा. कर्वे हे सुधारणेची वाचालता करीत नसूनहि ते अशा रीतीनें पुनर्विवाह करण्यास तयार झाले हेंहि या लेखणी व तोंडसुधारकांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

१० मराठा, पुणेंः—The remarriage which took place yesterday at the residence of the late Annasaheb Bhandakar in Shukravar Peth, was, except being a remarriage, in every way decent, and was performed according to the strict orthodox ritual. Whatever may be our opinion on the general question about the necessity of widow remarriages, we must say that if the thing is worth trying at all, it ought to be made in a way that would make it popular. Mr. Karve, though never known to have been a blustering reformer, has set a practical example of moral courage which not a legion of social quacks have shown in their whole conduct.

११ नेटिव्ह ओपिनियन, मुंबईः—मि. कर्वे यांच्या पुनर्विवाहांत तो शास्त्रविरुद्ध होता याशिवाय दुसरें कांहीं नांव ठेवण्यासारखें नव्हतें. विवाहविधि चालविण्याकरितां कोणी ब्रह्मो भट धरून आणिला नव्हता. तो अगदीं जुन्या हिंदुशास्त्रोक्त पद्धतीप्रमाणें एका ब्राह्मणाकडून चालविण्यांत आला. मेसर्स जोशी, कर्वे व बाम * यांनीं आपल्या धैर्यानें पहिल्या पिढीच्या सुधारकांस खचित खालीं पाहण्यास लावलें यांत संशय नाहीं.

१२ विद्याविलास, कोल्हापूरः—आमचें मत पुनर्विवाहाच्या सर्वथैव प्रतिकूल आहे असें समजूं नये. स्मृतिवचनांत सांगितल्याप्रमाणें आपत्ति आल्या असतां इच्छेप्रमाणें विवाह करावा; मात्र त्याबद्दल शास्त्रोक्त मर्यादा असावी.

१३ जगद्धितेच्छु, पुणेंः—आमच्या धर्मशास्त्राला खरोखरच जर पुनर्विवाह असंमत असेल तर धर्माकरितां म्हणून या विवाहाला व तो करणारांना दोष द्यावा लागेल. बाकी नुसत्या विचारदृष्टीनें पाहिल्यास धोंडोपंतांनीं आपल्या समकालीन बंधूंस उत्तम कित्ता घालून दिला असें आम्ही म्हणतों. या पुनर्विवाहासंबंधानें दोष देण्यास जागा असली तरी फारच थोडी असेल ही गोष्ट अगदीं खरी आहे.

१४ तुकाराम, अहमदनगरः—एक सुधारक मताचा व एक असुधारक अशा दोघांच्या काल्पनिक संवादांत जुन्या मतांच्या अभिमान्याचें शेवटचें भाषणः—शास्त्रसंमतीनें म्हणाल तर आम्ही नाहीं ऐकणार; आणि जर गतभर्तृकेस दुःखार्णवांतून बाहेर काढण्याच्या उद्देशानें केला असेल, तर प्रो. कर्वे यांच्या धैर्याबद्दल तुम्हांला लाज वाटली पाहिजे व ते आमच्या प्रशंसेला पात्र आहेत. असे लोक पुढें येऊन बोलल्याप्रमाणें जर करतील तर त्यांच्यावर विश्वास बसण्यास काय बरें उशीर ?

१५ कल्पतरु, सोलापूरः—एकंदरींत सामाजिकदृष्ट्या व नीतिदृष्ट्या विचार करतां धोंडोपंत आणि गोदूबाई यांच्या विवाहानें पुनर्विवाहपक्षास चांगलीच मदत होईल व सुधारणेच्या इतिहासांत हा पुनर्विवाह महत्त्वाचा गणला जाईल.

---

* श्रीयुत न. बा. जोशी यांनीं नुकताच श्रीयुत बाम यांच्या प्रौढ कन्येशीं विवाह केला होता.

१६ नाशिकवृत्त, नाशिकः—पुनर्विवाह का होईना, परंतु तो यथाशास्त्र व यथाविधि लावण्याची खटपट केल्यास कांहीं लोकांची संमति मिळून यश येण्याचा संभव आहे.

१७ जगदादर्श, अहमदनगरः—ज्या अबलांचा कांहीं अपराध नसतां पति गत झाल्यापासून त्यांस मरण येईपर्यंत त्यांनीं दुःख भोगावें हें धर्मशास्त्रकर्त्यांस तरी कसें संमत झालें असेल तें असो. तेव्हां या गोष्टीला कांहीं सवड असलीच पाहिजे. आणि जरी धर्मशास्त्रकर्त्यांनीं पूर्वी सवड करून ठेविली नसली तरी हल्लीं सवड केलीच पाहिजे......पुनर्विवाह ही व्यवस्था इतर अनन्वित कृत्यें होतात त्यापेक्षां फार उत्तम आहे.

१८ खानदेशवैभव, धुळेंः—हा विवाह बऱ्याच मंडळींस पसंत पडेल, यांत संशय नाहीं.

## प्रतिकूल अभिप्राय.

१ वार्ताहर, मुंबईः—हीं वधूवरें, गौदूबाई जोशी ( २८ वर्षें वयाची बालविधवा असून यांच्या केसांची दुष्ट चालीनें विटंबनाही झालेली होती; परंतु पंडिता रमाबाईंच्या शारदसदनांत या जाऊं लागल्यापासून यांच्या अंतःकरणांत लख्ख उजेड पडला आणि त्या कारणानें त्यांनीं आतां केशभार बाळगून देहाला सुरूपता आणिली आहे ) व फर्ग्यूसन कॉलेजचे प्रोफेसर मि. धों. के. कर्वे, हीं होत.

२ चंडांशु, तासगांवः—पुनर्विवाह होण्यांत मोठेंसें तात्पर्य किंवा महत्त्व आहे असें मानतां येत नाहीं. या पुनर्विवाहापासून कोणत्याही गोष्टीचा फायदा नाहीं ही गोष्ट सिद्ध आहे.

३ प्रांतिकसमाचार, पुणेंः—प्रो. कर्वे यांची प्रकृति साधारणच, किंबहुना लक्षांत येण्यासारखी अशक्तच आहे म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां पहिला संबंध सुटला असून, शिवाय हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें जन्माचें सार्थक असा उभयकुलांस पाणी देणारा एक पुत्र असून त्यांनीं हा विवाह करून घेतला हें एक गैर झालें, असें आमचें मत आहे.

४ पुणेंवैभव, पुणेंः—यास पाट किंवा पुनर्विवाह ह्यांपैकीं एकही नांव देतां येणार नाहीं. वस्तुतः पाहिलें तर षड्रिपुकारांच्या स्वाधीन होऊन

ज्यांनीं आपल्या कुलांत कधींहि न झालेला प्रकार केला त्यांच्या मानसिक धैर्याची तारीफ करणें सुधारक बच्चांखेरीज इतरांस कधींहि शोभावयाचें नाहीं.

५ मंत्री, पुणें:—यांनीं जो पाट लावून घेतला त्याबद्दल त्यांच्या मानसिक धैर्याची जितकी स्तुती करावीशी वाटते तितकीच किंबहुना त्याच्याहि पलीकडे हिंदुधर्मशास्त्राच्या अज्ञानाबद्दल वाखाणणी व स्तुति करण्याची पाळी येते, याबद्दल खेद वाटतो.

६ श्रीशिवाजी, पुणें:—या विधवात्मदानप्रकरणांत धेडगुजरी प्रकार झाला नाहीं, तेव्हां त्याजपासून होणाऱ्या संततीस "क्रॉस ब्रीड" हें नांव देतां येणार नाहीं. तथापि आज दहापंधरा वर्षें जिनें वैधव्यांत काढून त्या स्थितीस आपलीशी करून घेतली तिजवर इतका अनुग्रह करण्यापेक्षां दुसऱ्या एकाद्या नवीनच तयार झालेलीवर ही अनुकंपा केली असती तर हल्लींच्या संबंधांतील वधूवरांचा आज कित्येक वर्षांचा स्नेहसंबंध असल्याकारणानें जो कमीपणा येत आहे तो तरी आला नसता.

७ कर्नाटकपत्र, धारवाडः—या पुनर्विवाहाचें पर्यवसान काय होणार ह्मणाल तर नवी एक गोळकांची जात पैदा होणार. अशी गोळक जात त्या जुन्या गोळकजातीच्या गुलामांचीहि बरोबरी करूं शकणार नाहीं. गोव्यांच्या किरिस्तावांचीच उपमा हिला साजेल.

८ धारवाडवृत्त, धारवाडः—स्त्रीशिक्षण वाढलें, पंडिता रमाबाईसारख्या रत्नांचा उदय झाला, स्त्रियांना पुरुषांबरोबर आपले हक्क असावे असें वाटूं लागलें, तेव्हां पुनर्विवाहाची चाल पडली हें बरेंच झालें, असें ह्मटलें पाहिजे. श्रीजगद्गुरु सध्यां कामांतून गेले आहेत, तेव्हां चार पुढारी मंडळींनीं तरी याचा अवश्यमेव विचार करावा!

९ गंगालहरी, नासिकः—जसे इतर जातींत पुनर्विवाह होतात तद्वतच आह्मां हिंदुलोकांत हे होत, यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. खऱ्या ब्रह्मबीजी ब्राह्मण बच्चाकडून असें कधींहि व्हावयाचें नाहीं.

१० विदूषक, कऱ्हाडः—आमच्या पंडिता रमाकाकूंच्या शिष्यिणीनें आपल्या जन्माचें सार्थक केल्याबद्दल त्यांस धन्यता वाटत असेल यांत संशय नाहीं, व सुधारकांसहि धन्यता वाटणें साहजिक आहे. या त्यांच्या कृतीवरून यांच्या सुधारणेची कमाल आहे कीं नाहीं!

# प्रकरण पंचविसावें

## पुनर्विवाहासंबंधाचें त्या वेळचें लोकमत

### पुनर्विवाहानंतरची आमची मुरूडची पहिली खेप

दर मे महिन्यांत मुरूड गांवीं जाऊन महिनापंधरा दिवस तेथें राहण्याची जी माझी वहिवाट होती ती तशीच चालू ठेवण्याचा मीं विचार केला. मुरूड गांवाबद्दल मला अतिशय प्रेम वाटत असे व या महिन्यांत तेथें ज्या अनेक चळवळी होत त्यांशीं माझा विशेष संबंध जडला होता. सगळ्या तालुक्यांत जिकडेतिकडे माझा पुनर्विवाह हाच विषय होऊन गेला होता. नोकरीवर असणाऱ्या इतर लोकांप्रमाणें पांचचार वर्षांनीं एकदां आठपंधरा दिवस राहून कोणत्याहि भानगडींत न पडतां परत जाणारा मी असतों, तर माझ्या वाटेस कोणी गेलें नसतें; पण अनेक चळवळींमुळें माझा लोकांशीं पुष्कळ संबंध येणार होता व त्या प्रसंगीं मला कसें वागवावें, हा प्रश्न लोकांपुढें होता. मानापमानाचा विचार न करितां लोक जसे वागतील तसें वागवून घेण्यास मी तयार होतों. शूद्र लोकांत पुनर्विवाहाची चाल आहे त्या लोकांप्रमाणेंच मला तुम्ही वागवा, असें मी ग्रामस्थांना स्पष्ट सांगितलें होतें; पण मला खड्यासारखें उचलून टाकण्याचाच त्यांनीं बेत केला. मी मुरुडास केव्हां येणार याबद्दल कोणाला कांहीं न कळवितां मी आनंदीबाईसह एकदम एके दिवशीं सायंकाळीं मुरुडास जाऊन दाखल झालों, व आपल्या घरीं बाहेरच्या पडवींतील खोलींत उतरलों. मी आल्याची बातमी हांहां म्हणतां सर्व गांवभर पसरली. तावडतोब ठिकठिकाणीं दहादहा पांचपांच लोकांचे थवे जमून मला वागविण्यासंबंधाचे नियम गांवकींत करून ते सर्वांना जाहीर करण्याच्या विचारांचा खल होऊं लागला. दुसऱ्या दिवशीं गांवभर गांवकीचें निमंत्रण होऊन रात्रीं गांवकी जमली. अठरा वर्षांवरील प्रत्येक ब्राह्मण ग्रामस्थ त्या दिवशीं गांवकीला हजर होता. महत्त्वाचा एकादा प्रश्न गांवकींत यावयाचा असला तर बहुधा त्यासंबंधानें गांवांत दोन पक्ष असावयाचे. पण या प्रश्नासंबंधानें तसें कांहीं होण्याचा संभव नव्हता. नव्या सुशिक्षित

मंडळीपैकीं बरेच लोक त्या वेळीं गांवांत होते; पण एकालाहि अशा रीतीनें पुनर्विवाहित मनुष्याला वागविणें योग्य नव्हे असें म्हणण्याचें धैर्य झालें नाहीं व तें होऊन उपयोगहि नव्हता. एकाद्या गांवकुटाळ मनुष्यानें वाटेल तें बोलावें व त्याविरुद्ध कोणीं ब्र काढूं नये असा प्रकार बहुधा अशा गांवकींत असतो. कोणी नेता अगर अध्यक्ष नसल्यामुळें अशा सभेच्या कामाला आवर घालणें कठिण असतें.

दादांची स्थिति या वेळीं अतिशय कठिण झाली होती. मी अगदीं जवळ येऊन राहिलेला, तेव्हां घरांतील मनुष्यांनीं माझ्याशीं व आनंदीबाईशीं कितपत संबंध ठेवावा, हा त्यांना मोठा पेंच होता. या कामीं त्यांना सल्ला देणारे गृहस्थ म्हणजे आमचे बालमित्र बाळकृष्णपंत आचवल. हे त्या वेळीं मुरुडाहून तीन कोशांवर बुरोंडी येथें मास्तर होते. दादांनीं त्यांना तावडतोब बोलावून आणलें. हे गांवकीलाहि हजर राहिले. गांवकींत कोणीहि मनुष्य विरुद्ध न बोलतां ठराव झाले ते येणेंप्रमाणें:—

१. धोंडोपंतांना एका बैठकीवर घेऊन बसूं नये.

२. ते ज्या सभेंत असतील त्या सभेला कोणी जाऊं नये.

३. या मे महिन्यानंतर ते पुनः येऊन आपले कवाडींत पाऊल टाकतील तर त्यांचे बंधु भिकाजीपंत यांना बहिष्कार घालावा.

पहिल्या ठरावासंबंधानें बोलतांना एका बैठकीवर बसण्याचा प्रसंग टाळण्याकरितां एका गाडींतून ( बैलाच्या ) हि यांच्याबरोबर जाऊं नये असे उद्गार एका गृहस्थानें काढले होते. ज्या गृहस्थांकडे बसावयाला वगैरे जाण्याचा माझा परिपाठ होता, व ज्यांकडे गेलें असतां त्यांना वाईट वाटणार नाहीं असें मला वाटलें, त्यांजकडे मात्र मी गेलों, व त्यांनीं मला निराळ्या बैठकीवर बसविलें. एक जुन्या तऱ्हेचे सद्गृहस्थ पूर्वी मला चांगलें मानीत ते माझ्या कृतीनें अतिशय रागावले होते. त्यांजकडे जाणें म्हणजे त्यांना मुद्दाम चिडविणें होईल म्हणून मी त्यांजकडे गेलों नाहीं. ज्या फंडांत मी आहे त्याशीं आपला संबंध नको म्हणून या व दुसऱ्या तीनचार गहस्थांनीं माझा पुनर्विवाह झाल्याबरोबरच मुरूडफंडाचा राजिनामा दिला होता. मुरूडफंड हा ब्राह्मण ग्रामस्थांचा आहे, आणि धोंडोपंत आतां ब्राह्मण नाहींत, तेव्हां त्यांचें नांव मुरूडफंडांतून काढून टाकावें,

अशा कित्येकांचा विचार होता; पण त्यांना दुसऱ्यांची अनुकूलता न मिळाल्यामुळें माझें नांव फंडांतून निघालें नाहीं, तथापि त्या वर्षी मला मुरूडफंडाच्या सभेला येऊं दिलें नाहीं. मी सभेंत गेलों असतों तर नव्या सुशिक्षित मंडळीपैकीं देखील पांचचार मंडळी सभेंत राहिली असती कीं नाहीं, याबद्दल मला शंका आहे. कारण, जो तो विनाकारण चिखलांत दगड टाकून अंगावर चिखल उडवून घेतो कोण, असें म्हणणार. मीं सभेंत जाऊन विनाकारण बखेडा करूं नये, असा सल्ला माझ्या मित्रांनीं मला दिला व मीं मुरूडफंडाची सभा सभेंत न जातां निर्विघ्नपणें पार पडूं दिली. तालुक्यांतील सुशिक्षित मंडळी तरी अधिक विचार करतील, असें मला वाटलें होतें; पण त्यांच्यासंबंधानेंहि उलट प्रत्यय आला. स्नेहवर्धक मंडळीसंबंधानें केळशीस काय झालें, तें पूर्वी सांगितलेंच आहे.

पहिल्या दोन बंधनांचें मला कांहीं वाटलें नाहीं; पण तिसरें बंधन मात्र माझ्या काळजाला झोंबलें ! यापेक्षां माझा शारीरिक छळ झाला असता, तर तो मीं मोठ्या आनंदानें सोसला असता. परंतु प्रियजनांमधील प्रेमपाश छेदणारा हा नियम मला असह्य झाला. आम्ही कुटुंबांतील सर्व माणसें अतिशय एकोप्यानें व प्रेमळपणानें वागणारीं होतों. आई, दादा, वहिनी, अंबाताई, राधाबाई व मी अशीं सर्व मनुष्यें एकत्र बसून सुखदुःखाच्या गोष्टी कराव्या, असे प्रसंग मी घडवून आणीत असें. आतां आईजवळ व अंबाताईजवळ माझेंहि बोलणें अशक्य झालें, मग आनंदीबाईनें बोलण्याची गोष्ट तर विचारावयालाच नको. ग्रामस्थांनीं अशा प्रकारें शस्त्र उचललेलें पाहून आई व अंबाताई यांची मनःस्थिति अत्यंत शोचनीय झाली. त्यांच्याशीं संभाषण करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे त्यांच्या दुःखावर डाग देण्यासारखें मला वाटूं लागलें. शिवाय, शेजारीं आपखुषीच्या स्त्रीडिटेक्टिवांची कमतरता नव्हती. शिजवलेले कांहीं पदार्थ घरांतून मला देण्यांत येतात कीं काय, वगैरे गोष्टीवर नकळत पहारा होता. या मे महिन्यांत माझें आईशीं अगर अंबाताईशीं भाषण झालें नाहीं, व माझें पाऊल घरांत पडलें नाहीं. मी त्यांच्या प्रेमाला अंतरलों, याबद्दल तर वाईट वाटलेंच; पण तीं माझ्या प्रेमाला अंतरलीं, एवढेंच नव्हे, पण कुलाला कलंक लावणारा मी निघालों, याबद्दल त्यांना जाचणी व्हावी, व वेळोवेळां मान

खालीं घालण्याचा प्रसंग यावा, हें दुःख मला शल्यासारखें झालें. दादा स्वभावानें अतिशय गरीब, यामुळें हा लोकापवाद त्यांना दुःसह झाला. बाहेरची सुशिक्षित मंडळी गांवांत होती, तोंपर्यंत त्यांनीं धीर धरला होता; पण पुढें हें सर्व दुःख असह्य झालें. दादा हे धीराचे पुरुष. पत्नी व सहा-सात मुलांच्या वियोगाचें दुःख त्यांनीं धिमेपणानें सोसलें. असल्या दुःखानें ते कधीं खचले नाहींत; पण या प्रसंगानें उत्पन्न झालेल्या दुःखावर त्यांना आवर घालतां येईना. कांहीं दिवसांनीं त्यांना भ्रमिष्टासारखें झालें, व ते वेड्यासारखें करूं लागले. परिस्थिति बदलल्यानें त्यांना बरें वाटेल म्हणून मामांनीं त्यांना शेरवलीस नेलें. सुमारें तीनचार महिने त्यांची स्थिति अत्यंत शोचनीय होती. आईच्या व अंबाताईच्या दुःखाचा तर कळस झाला. मी त्यांच्या दुःखाचा वांटेकरी होणें अशक्यच होतें. या सर्व गोष्टींनीं माझ्या मनाची स्थिति काय झाली, हें माझें मलाच ठाऊक! मला तरी त्या स्थितीचें शब्दांनीं वर्णन करितां येत नाहीं. इतक्या थरावर हें प्रकरण जाईल, असा माझा अंदाज नव्हता. इतका अंदाज असता तर मीं ही उडी घेतली असती कीं नाहीं, याची मला शंका आहे. लवकरच दादा पूर्वस्थितीवर आले म्हणून सर्व ठीक झालें. नाहींतर काय प्रकार घडले असते कोण जाणे!

यानंतर कांहीं वर्षें मीं मुरूड गांवाची वास्तपुस्त सोडून दिली. पुढें दोनतीन वर्षांनीं एकदां जावें व दोन दिवस राहून परत यावें, असा क्रम आरंभला. या सर्व प्रसंगीं चुलत बंधु गंगाधरपंत यांच्या रिकाम्या घरांत मी उतरत असें, व दादांची किंवा अंबाताईची कुमारिका मुलगी आमच्या घराहून माझ्यासाठीं अन्न घेऊन येई तें मी खात असें. आठदहा वर्षांत मीं माझ्या घराच्या आवारांत पाऊल टाकलें नाहीं. तसें केलें असतें तर लोकांकडून घरच्या मंडळीला त्रास झाला असता. या प्रसंगीं आई व अंबाताई या मला एकाद्या वेळींच भेटत. मध्यरात्रीं त्यांनीं मी असें त्या घरीं यावें, व नंतर भीतभीत माझ्याशीं चार शब्द बोलावे. आठदहा वर्षें गेल्यानंतर ग्रामस्थांचा राग शांत झाला व मी घरीं जाऊन उतरूं लागलों, आणि मला मुरूड फंडाच्या सभेला जातां येऊं लागलें. तरी सभेला मी असलों

म्हणजे कांहीं मंडळींनीं येऊं नये, असा प्रकार होत असे. आतां तो नाहींसा झाला आहे.

आनंदीबाईची स्थिति फारच चमत्कारिक झाली. मला बोलाचालावयाला पुष्कळ मंडळी होती, पण तिच्याशीं सहानुभूतीनें वागणारें एकंहि मनुष्य तेथें नव्हतें. तिचें बोलणें, चालणें, व वागणें कसें आहे, हें सर्व मनुष्यें डिटेक्टिव्हाच्या नजरेनें पहात होतीं. शेजारच्या एका विधवा बाईनें तर "लग्नाच्या वेळीं तुला किती महिने गेले होते?" म्हणून बेधडक प्रश्न केला. पुनर्विवाह करणारी बाई चांगल्या वर्तनाची असणें शक्यच नाहीं, असें तिला वाटत होतें! स्नेहवर्धक मंडळीच्या सभेसाठीं आलेल्या दापोलीच्या एका गृहस्थांना मुरुडास व केळशीस झालेले प्रकार पाहून फार आश्चर्य वाटलें, व थोडीशी चीडहि आली. त्यांनीं आम्हां उभयतांना दापोली येथें आपल्या घरीं चार दिवस राहण्यासाठीं बोलाविलें. त्यांचें निमंत्रण मोठ्या आनंदानें स्वीकारून आम्ही तेथें गेलों. सदर गृहस्थांच्या आईनें व बायकोनें आनंदीबाईला फार सहानुभूतीनें वागविलें. त्या तिची वेणीफणी करीत व कौतुकानें अनेक प्रकारच्या हकीकती विचारीत. जेवणाच्या वेळीं निराळ्या पंक्तीला बसावें व अन्नाला आणि पिण्याच्या पाण्याला स्पर्श करूं नये, एवढाच भेद काय तो त्यांनीं ठेविला होता.

अशा रीतीनें अनेक प्रकारचे सुखदुःखाचे अनुभव घेऊन व तालुक्यांतील लोकांना महिना दोन महिने संभाषणाला पुरतील असे विषय उत्पन्न होण्याला कारणीभूत होऊन आम्ही परत पुण्याला येऊन नित्यकृत्यांना लागलों.

# प्रकरण सव्विसावें

## बहुजनसमाजाशीं वागण्याचें धोरण

तारीख २३ मे १८९३ च्या केसरींत पुढील स्फुटलेख आहेः—

" प्रो. कर्वे यांच्या पुनर्विवाहाच्या वेळीं येथें कांहीं गडबड झाली नाहीं. तिचा वचपा काढण्याकरितांच कीं काय त्यांनीं एका समानशील मित्रासहवर्तमान आपल्या ग्रामस्थ धर्माभिमानी जनसमूहावर नुकतीच स्वारी केली असावी, असें एका मुरूडकराच्या पत्रावरून दिसतें. मुरूडमहात्म्य गाणाऱ्या येथील एका पत्रानें म्हटल्याप्रमाणें परांगदा झालेले मुरूडकर कदाचित् दिग्विजयी असतील; परंतु खुद्द मुरूडचे लोक इतर ठिकाणच्या धार्मिकंमन्यांपेक्षां फारसे शहाणे नाहींत. निदान येथील शुद्धपक्षीयांपेक्षां त्यांच्यांत विशेष सौजन्य व पोंच नाहीं, हें या हकीकतीवरून उघड होतें. पुनर्विवाहाच्या शास्त्राशास्त्रत्वाचा किंवा इष्टानिष्टतेचा विचार न करितां प्रो. कर्व्यांच्या पुनर्विवाहाचें आम्हीं अभिनंदन केलें त्याचें मुख्य कारण, असल्या सुधारणा अमलांत आणतांना परंपरागत शास्त्रोक्त विधींचें उल्लंघन व दुसरे पुष्कळ फाजिल प्रकार दिसून येतात ते घडूं न देऊन प्रो. कर्व्यांनीं विद्युद्वेगानें सर्व सुधारणा एका क्षणांत करूं पाहणाऱ्या मंडळीला चांगला कित्ता घालून दिला, हें होय. पुनर्विवाह निषिद्ध मानणाऱ्यांनीं प्रो. कर्व्यांना नुसतें पंक्तिबाह्य ठेविलें असतें तर आम्हीं त्यांना फारसा दोष दिला नसता; पण तसें करतांना सभ्य रीतीचा व सारासार विचाराचा त्याग केल्यानें आपल्याच पक्षाची हानि होते, हें मुरुडकर धर्माभिमान्यांच्या लक्षांत आलें नाहींसें दिसतें. केवळ पक्षाभिमानास पेटून स्नेहवर्धक सभेसारख्या नुकत्याच स्थापलेल्या होतकरू संस्थांचा बिघाड करणें उचित नाहीं, हें तेथील पुढाऱ्यांच्या लक्षांत यावयास पाहिजे होतें. "

हा लेख प्रसिद्ध झाल्यावर त्यांतील पाहिल्या वाक्यानें होणारा गैरसमज दूर व्हावा या हेतूनें मीं केसरींत छापण्यासाठीं एक पत्र लिहिलें, तें तारीख ३० मे १८९३ च्या केसरींत छापलें आहे. बहुजनसमाजाशीं कोणत्या रीतीनें वागण्याचा मीं संकल्प केला होता, हें त्यावरून कळून येण्यासारखें

असल्यामुळें तें पत्र येथें समग्र देत आहें. त्या पत्रावरील हेडिंग केसरी-कारांनीं घातलें आहे.

"प्रो. फर्ग्यांची मुरुडावर स्वारी.

रा. रा. केसरीकर्ते यांसः—

सा. न. वि. वि.—गेल्या केसरींत आपल्या हातून व्यक्तिसंबंधानें माझ्यावर आरोप झाला आहे, त्यासंबंधानें दोन शब्द लिहिणें जरूर वाटल्यावरून लिहीत आहें. तरी या पत्रास येत्या अंकीं स्थळ देण्याची कृपा करावी.

बहुजनसमाजाच्या मताविरुद्ध मीं एक गोष्ट केली आहे, व तिजबद्दल मला जो त्रास होईल तो भोगण्यास मीं तयार असलें पाहिजे. तरी मनुष्यस्वभावाप्रमाणें तो होईल तितका कमी करण्यासहि झटलें पाहिजे. करितां माझ्याबद्दल ज्यांना प्रत्यक्ष माहिती नाहीं अशा आपल्या वाचकसमुदायाचा, आपल्या लेखानें माझ्याबद्दल होणारा गैरसमज दूर करण्याविषयीं यत्न करितों.

आपल्या लिहिण्यावरून वाचणाराची अशी समजूत होते कीं, मला 'गडबड' अत्यंत प्रिय असून ती येथें झाली नाहीं म्हणून ती इच्छा तृप्त करून घेण्याकरितां मी आपल्या समानशील मित्रावरोबर मुरूडकर धर्माभिमान्यांवर हल्ला केला. अर्थात् केवळ मुरूड येथील लोकांना खिजविण्याच्या उद्देशानें मी तेथें गेलों. परंतु वास्तविक प्रकार तसा नाहीं. मुरुडास माझें घर आहे व आप्तइष्ट आहेत. आज दहा वर्षांपर्यंत वर्षांतून दोनदां, निदान एकदां तरी, आपल्या जन्मभूमीस जाऊन तिच्या हिताकरितां आपल्या हातून होण्यासारखे अल्पस्वल्प यत्न करावे व आप्तइष्टांस भेटून विश्रांतीचे दिवस तेथें घालवावे, असा माझा परिपाठ आहे. त्यास अनुसरूनच यंदां मी तेथें गेलों. मला तेथें 'गडबड' करावयाची नव्हती, व म्हणून 'समानशील मित्राची'-हि जरूर नव्हती. माझ्याप्रमाणेंच माझ्या मित्राचेंहि घर मुरु-

डास असून कधींकधीं ते तेथें जात असतात. ते व मी बरोबर गेलों आलों नाहीं. तेथें असतांना त्यांचा माझा बसण्याउठण्याचाहि संबंध फारसा नव्हता. त्यांची बैठक ज्या घरांत होती तेथील गृहस्थांस, तेथें मी गेल्यानें वाईट वाटेल अशी माझी समजूत होती, म्हणून तेथें जाणें मीं मुद्दाम टाळलें. मुरूड येथें असतां मीं कोणाकडे जेवण्याचा अगर पाणी पिण्याचाहि प्रसंग आणला नाहीं. ज्यांस आवडणार नाहीं अशा गृहस्थांकडे बसाउठावयासहि मी गेलों नाहीं. कांहीं गृहस्थांकडे जाऊन निराळ्या बैठकीवर बसण्याचा प्रसंग आला असतांहि, त्यांस शब्दानें अथवा कृतीनें दुखविलें नाहीं. ज्या गृहस्थांकडे पांचचार वेळां तरी गेल्याशिवाय व चारदोन घटका बोलत बसल्याशिवाय वर्ष गेलें नाहीं, अशा कित्येक गृहस्थांना माझ्या कृत्यापासून वाईट वाटलें असें पाहून, मी त्यांजकडे गेलों नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांच्याशीं बोलल्यानें देखील त्यांच्या मनास वाईट वाटेल, असें जाणून तोहि प्रसंग टाळला. ज्या धर्माभिमानी लोकांनीं मला चांगल्या तऱ्हेनें वागवलें नाहीं असें आपणांस वाटतें ते गृहस्थदेखील माझ्यावर वरील आरोप करणार नाहींत. व्यक्तीसंबंधानें मला एकाहि माणसाकडून यत्किंचित्‌हि त्रास झाला नाहीं. मी तेथें गेल्यावर लोकांस माझ्याशीं बसण्याउठण्याचा तरी प्रसंग येणारच, हें जाणून धर्मदृष्टीनें लोकांनीं माझ्याशीं कसें वागावें याबद्दल गांवकींत ठराव होणें साहजिक होतें. त्या ठरावावरून आपलें वरील मत झालें असल्यास नकळे. मुरूड ही माझी जन्मभूमी व विश्रांतीची जागा आहे. तेव्हां तेथें अगदींच न जाणें माझ्या हातून होणार नाहीं; परंतु तेथें गेल्यावर कोणाचेंहि मन दुखवलें जाणार नाहीं, अशाविषयीं मी योग्य काळजी घेतली होती. ज्या समाजांत रूढ व्हावी अशा हेतूनें मी ही गोष्ट केली, त्या समाजाशीं होईल तितका संबंध ठेवण्याला मला यत्न केला पाहिजे. मात्र तसें करतांना समाजाला

डिंवचतां कामा नये. समाज ज्या रीतीनें वागवील त्या रीतीची वागणूक सहन केली पाहिजे. म्हणजे कालांतरानें समाजालाच आपल्या कडकपणाबद्दल वाईट वाटून तो मला बऱ्या रीतीनें वागवूं लागेल. वरील तत्त्व आपणासहि कदाचित् कबूल असेल, व या तत्त्वास अनुसरूनच माझें वर्तन होतें. असें असूनहि वरील आरोप माझ्यावर होत राहतील तर निरुपाय म्हणून स्वस्थ बसावें लागेल.

इतका पाल्हाळ करण्याची गरज नव्हती; परंतु माझ्या वर्तनावर अनेक लोकांचे डोळे लागलेले असण्याचा संभव आहे, तेव्हां वेळींच पूर्ण खुलासा करणें जरूर वाटलें. तसदीची माफी व्हावी. कळावें, लोभ असावा, ही विनंति.

धोंडो केशव कर्वे."

याच अंकांत या पत्राचा उल्लेख करून केसरीकारांनीं स्फुटलेख लिहिला आहे तो येणेंप्रमाणें:—

"गेल्या खेपेस प्रो. कर्व्यांच्या पुनर्विवाहासंबंधानें लिहितांना त्यांजवर किंवा दुसऱ्या कोणावर 'व्यक्तिसंबंधानें आरोप' करण्याचा आमचा हेतु होता, असा आपला चुकीचा ग्रह करून घेऊन त्याच्या निराकरणार्थ त्यांनीं एक पत्र पाठविलें आहे, तें दुसरीकडे छापलेंच आहे. त्याच अर्थाचें त्यांच्या समानशील मित्राकडूनहि एक पत्र आलें आहे. आपणाकडून घडलेल्या सत्कृत्याची फाजील बडेजाव न करतां, समाजाकडून थोडाबहुत त्रास पोंचला तरी तो निमूटपणें सोसण्याविषयीं, प्रो. कर्व्यांचा व त्यांच्या समानशील मित्राचा संकल्प पाहून आम्हांस फार आनंद वाटतो, व हा त्यांचा निश्चय तसाच कायम राहील अशी आम्हांस उमेद आहे. आपापल्या समजुतीनें शुद्ध वाटणाऱ्या

सुधारणांचें आपल्या खासगी वर्तनानें उदाहरण घालून देण्यास हल्लीं प्रत्येकास मुभा मिळाली आहे, व तसें कोणी करूं लागल्यास त्याला कोणी समंजस मनुष्य अडथळा करील असें वाटत नाहीं. मात्र, प्रो. कर्व्यांनीं म्हटल्याप्रमाणें 'तसें करतांना समाजाला डिवचतां कामा नये' ही गोष्ट असल्या प्रत्येक सुधारकानें ध्यानांत ठेविली पाहिजे. हल्लींच्या वाक्पटु सुधारकांचा व आमचा मतभेद काय तो येथेंच. आईबाप मूर्ख असले तरी ते जसे वंदनीय आहेत, त्याचप्रमाणें बहुजनसमाजाच्या समजुतींनाहि प्रत्येकानें योग्य तो मान दिला पाहिजे. एकंदर लोकसमूहापेक्षां एकाददुसरा गृहस्थ फार विद्वान् असेल, किंवा जगांत शहाणे लोकांची संख्या नेहमींच कमी असल्यामुळें असल्या थोड्या लोकांचेंच मत कदाचित् शेवटीं खरें ठरेल; परंतु जनसमाजाचें बहुत्व हेंच त्याच्या ठायीं एक प्रकारचें पूज्यत्व उत्पन्न करितें. त्याचें उल्लंघन करणें असल्या एकाद्या व्यक्तीस किंवा अल्पसमूहास कधींहि उचित होणार नाहीं. सबब समाजाच्या मठ्ठपणाबद्दल शिव्या देत सुटून, किंवा परकीय राजाच्या धमक्या देऊन त्याला चिथवणें आणि जगापुढें आपली असहिष्णुता आणि क्षुद्रबुद्धि प्रकट करणें, हा सुधारणेचा खरा उपाय नव्हे. केवळ अपशब्दांचा वर्षाव करण्यांतच परपक्षापेक्षां आपला श्रेष्ठपणा ज्यांना मिळवावयाचा असेल त्यांची गोष्ट निराळी; परंतु हा खऱ्या सुधारणेचा मार्ग नव्हे, हें आम्हीं अनेक वेळां दाखविलें आहे. वस्तुतः पुनर्विवाहासारखें बरेंवाईट कृत्य करण्याला मोठेंसें धैर्य लागतें असें नाहीं; तर तें करून गेल्यानंतर समाजाकडून होणारा त्रास मनाची समता व शांतता न ढळूं देतां निमूटपणें सोसण्यांतच सुधारकांच्या नीतिधैर्याची खरी परीक्षा व्हावयाची असते, व ती आजपर्यंत एकाचीहि उतरली नाहीं, असें आम्हांस मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागतें. एकादा भेकड मनुष्यहि लढाईच्या आवेशांत अलौकिक शौर्य दाखवितो, किंवा

विकारवशतेनें ग्रस्त होऊन एकादा सात्त्विक पुरुषहि खुनासारखें साहस करूं शकतो. तथापि तेणेंकरून त्याचें नेहमींचें शील बदलत नाहीं, त्याचप्रमाणें कोणा इसमाला सुधारणेची तात्कालिक उकळी येऊन तिच्या भरांत त्यानें पुनर्विवाहासारखें एकादें 'शतकृत्य' केलें तर तेवढ्यावरून त्याच्या नीतिधैर्याची प्रशंसा करीत सुटणें आमच्या मतें कदापि रास्त होणार नाहीं. खरें धैर्य लागतें तें पुढेंच. दुसऱ्याला शिव्या देण्यापेक्षां दुसऱ्याच्या शिव्या संथपणें ऐकून घेणें अधिक धैर्याचें लक्षण आहे, असा सर्व देशांतील साधुजनांनीं उपदेश केला आहे, त्यांतील बीज हेंच. हें दुसऱ्या प्रकारचें धैर्य, केवळ सुधारक नामाभिधान पावल्यानेंच एकंदर समाजापेक्षां शहाणे बनणाऱ्या मंडळीमध्यें आजपर्यंत कितीजणांनीं दाखविलें आहे? बहुजनसमाजाशीं अरेरावी व स्पर्धा करण्यापेक्षां नम्रतेचा स्वीकार करून गोडीगुलाबीनेंच त्याला आपल्याकडे वळवून घेणें, यांतच सुधारकवर्गाचा खरा शहाणपणा व मानसिक औदार्य दिसून आलें असतें. टाकीचे घाव सोसल्याखेरीज जसें देवपण येत नाहीं, त्याचप्रमाणें सुधारणेप्रीत्यर्थ वर्तमानपत्रांत पोकळ बडबड केल्यानें किंवा एकादा पुनर्विवाह लाविल्यानें, सुधारक म्हणविण्याला पात्रता येत नाहीं; तर पुढील हालअपेष्टांतून न डगमगतां जो पार पडेल, त्याचेंच आम्हीं अभिनंदन करूं. जों जों हल्लींची सुधारकमंडळी 'मठ्ठ' समाजावर कोपाविष्ट होते, तों तों त्यांचाच मूर्खपणा आणि कमकुवतपणा दिसून येतो, हें जोंपर्यंत त्यांच्या लक्षांत येणार नाहीं, तोंपर्यंत त्यांच्याविषयीं लोकांतील आदरबुद्धि वाढण्याचा संभव नाहीं. तात्पर्य, प्रो. कर्व्यांची सुधारणेची कळकळ कसोटीस लागण्याचा प्रसंग अजून पुढेंच आहे. त्यांतून ते बिनधोक पार पडल्यास, इतर समानशीलांपेक्षां त्यांना आम्ही वरच्या पायरीस बसवूं; परंतु तशी खातरी होईपर्यंत मौन धरणेंच आम्हांस बरें वाटतें."

वरील स्फुटलेखांत बहुजनसमाजाशीं वागण्याचें जें धोरण केसरीकारांनीं रेखाटलें आहे तें माझ्या विचारांशीं जुळणारें आहे, त्याप्रमाणें वागण्याचा माझ्याकडून होईल तितका यत्न मीं केला आहे, व पुढेंहि अशाच प्रकारचा यत्न मजकडून व्हावा ही इच्छा आहे.

---

# प्रकरण सत्ताविसावें

## पुनर्विवाहाविषयींच्या लोकमताच्या निदर्शक कांहीं गोष्टी

आम्हांला रहावयाला चांगल्या वस्तींत घर मिळतें कीं नाहीं, याची मला काळजी वाटत होती; पण ज्यांच्या घरांत आम्ही रहात होतों, त्या प. वा. श्रीयुत गंगाधरपंत मेहेंदळ्यांनीं आम्हांला कांहींएक न विचारतां तेथें राहूं दिलें. घरासंबंधानें आम्हांला या वेळीं अडचण पडली नाहीं खरी, तरी हें घर सोडल्यानंतर पुढें बरीच अडचण सोसावी लागली.

लग्नाच्या दुसऱ्याच दिवशीं आम्हांला एक विलक्षण अनुभव आला. आनंदीबाईच्या कनिष्ठ भगिनीचे श्वशुर हे पूर्वी लहानशा पगारावर सरकारी नोकर होते व या वेळीं पेनशन घेऊन पुण्यांत राहिले होते. आमच्या पुनर्विवाहाची वार्ता ऐकून यांचें मस्तक भणभणून गेलें होतें, व आंत सांठलेला सर्व संताप बाहेर ओकून टाकल्यावांचून यांना चैन पडणें शक्य नव्हतें. आमच्या जुन्या लोकांमध्यें असा एक विशेष वर्ग असे, व आहे कीं, या वर्गांतील लोकांचें आचरण शुद्ध व निर्मळ असावयाचें, पण यांच्या वाणींत अपवित्र, अभद्र शब्द व शिव्या यांचा बराच भरणा असावयाचा. वरील गृहस्थ या वर्गांतले होते. ते तिसऱ्या प्रहरीं आमच्या येथें आले, व आम्हां उभयतांना हांक मारून समोर बसवून तास दीडतास त्यांनीं आमची यथेच्छ पूजा केली. आम्हांला बोलावयाला त्यांनीं अवसरच दिला नाहीं, आणि दिला असता तरी आम्ही काय बोलणार होतों! आम्हांला जें वर्तन शुद्ध व पवित्र वाटलें तें आम्हीं केलें, अशा अर्थाचे उद्गार दोनतीन वेळां काढण्याचें मीं धाडस केलें, पण असे उद्गार निघाल्याबरोबर त्यांना अधिकच चेव येऊन ते जास्त आवेशानें बोलूं लागत, व शिव्याशापांची वृष्टि करीत. हे एकदां येथून जातात कसे, असें आम्हांला होऊन गेलें. अखेरीला आपले आपणच कंटाळून "तुम्हां काळतोंड्यांचें पुनश्च दर्शन नको!" असें म्हणून ते निघून गेले!

अशाच तऱ्हेच्या अस्सल शिव्या खाण्याचा आणखी एक लक्षांत राहण्यासारखा प्रसंग पुढें तीनचार वर्षांनीं आला. ते गृहस्थ मला ओळखीत नव्हते, व मीहि त्यांना ओळखीत नव्हतों. ते कोण हें मला नंतरहि कळलें नाहीं! कारण, मीं ती चौकशीच केली नाहीं. त्यांची माझी गांठ सर भालचंद्र यांच्या घरीं पडली. अनाथबालिकाश्रमाची स्थापना नुकतीच झाली होती, व सर भालचंद्र यांना संस्थेची हकीगत सांगून त्यांजवळ मदत मागण्यासाठीं मी गेलों होतों. सदरील गृहस्थ, पुढें गणेशचतुर्थी आली होती तीसंबंधानें सार्वजनिक गणपति व मेळे वगैरे बाबतींत संभाषण करण्यासाठीं आले होते. त्यांचें बोलणें आटोपल्यावर सर भालचंद्र मजकडे वळले, व माझें बोलणें ऐकून घेऊं लागले. या प्रसंगीं वरील गृहस्थ सरसाहेबांना वारा घालीत बसले होते. आमचें संभाषण आटोपल्याबरोबर मदत करण्याचें आश्वासन देऊन सरसाहेबांनीं मला निरोप दिला. मी बाहेर पडून ट्रॅमटर्मिनसजवळ येतों तों वरील गृहस्थांनीं मला गांठलें. माझ्या बोलण्यावरून मी कोण हें त्यांनीं ओळखिलें होतें. पुनर्विवाहाच्या प्रवर्तकांसकट एकंदर सुधारकवर्ग आपली जुनी घडी बिघडवीत आहे व समाजाचा घात करीत आहे, अशी यांची प्रामाणिक समजूत असावी असें दिसत होतें. या सर्व मंडळींवरचा राग माझ्यावर काढण्याला यांना ही उत्कृष्ट संधि मिळाली, तिचा त्यांनीं चांगला उपयोग करून घेतला. रात्रींची दहा वाजण्याची शांत वेळ होती. यांनीं देखील मला बोलण्याला फारसा वेळच दिला नाहीं. रानडे, भांडारकर, वगैरे सन्मान्य गृहस्थांचा नामनिर्देश करून त्यांजवर शिव्यांचा भडिमार करण्याला त्यांनीं सुरुवात केली. आम्ही अगदीं हळूहळू चाललों होतों. त्यांना ठाकुरद्वाराशीं डाव्या बाजूच्या रस्त्यानें जावयाचें होतें व मला हल्लीं इंदुराला न्यायाधीश असलेले श्रीयुत बॅरिस्टर कीर्तने यांजकडे जाण्यासाठीं समोर ट्रॅमच्या रस्त्यानें जावयाचें होतें. बोलणें पुरें झालें नव्हतें. तेव्हां त्यांनीं मला मुद्दाम उभें केलें, आणि पंधरा मिनिटेंपर्यंत यथेच्छ तोंडसुख घेऊन व "तुमच्या कर्मांचीं फळें तुम्हांला भोगावीं लागतील," असा इशारा देऊन ते आपल्या वाटेकडे वळले, व मीहि सरळ पुढें चालता झालों.

तिसऱ्या प्रसंगांत जो समज निर्भीडपणें व्यक्त केला आहे तशा प्रकारचा समज पुष्कळ पुनर्विवाहितांसंबंधानें अनेक लोकांचा झालेला असतो, व खासगी संभाषणांतून तो चहूंकडे पसरत असतो. आश्रमाला मदत मिळविण्यासाठीं मी एका तालुक्याच्या गांवीं गेलों होतों. त्या गांवीं एक लहानशी सभा होऊन व्याख्यान झालें. नंतर दुसऱ्या दिवशीं गांवांतील एका सभ्य गृहस्थांबरोबर वर्गणीसाठीं सुशिक्षित लोकांच्या घरीं जाऊन त्यांच्या भेटी घेतल्या. त्यांत एका शास्त्रीबुवांच्या घरीं गेलों. हे शास्त्री जुन्या तऱ्हेनें चांगले शिकलेले असून नव्या इंग्रजी तऱ्हेच्या विद्येचाहि त्यांजवर संस्कार झालेला होता, व ते पुण्यांत बरेच दिवस राहिलेले होते. त्यांच्या शेजारीं एक सुशिक्षित गृहस्थ बसले होते. औपचारिक प्रश्न व उत्तरें झाल्यावर मी आश्रमाची हकीगत सांगूं लागलों. थोडेसें बोलल्यावर शास्त्रीबुवा म्हणाले “ पुरे करा, आपली मला माहिती आहे. व्यभिचारावर पांघरूण घालण्यासाठीं पुनर्विवाह करून आतां हे धंदे आरंभले आहेत!” माझें तोंड बंदच झालें. माझ्या बरोबरीच्या गृहस्थांनाहि कशाला मीं यांना येथें आणलें, असें होऊन गेलें. आम्ही उभयतां कसातरी संभाषणाचा शेवट करून त्या उभयतांना नमस्कार करून तेथून निसटलों, व पुढल्या उद्योगाला लागलों.

चवथा एक स्मरणीय प्रसंग दोनतीन वर्षांपूर्वींच आला. माझ्या एका ग्रामस्थ मित्राबरोबर आश्रमासाठीं वर्गणी मिळविण्याकरितां मी मुंबईंत हिंडत होतों. ते मला आपल्या ओळखीच्या कित्येक गृहस्थांकडे घेऊन जात. एके दिवशीं एका दानशूर गृहस्थांकडे हे मला घेऊन गेले. हे गृहस्थ बी. ए. असून मी एल्फिन्स्टन हायस्कुलांत शिक्षक असतां माझ्या वर्गांत हे होते, असें त्यांनीं मला सांगितलें. मला त्यांची ओळख राहिली नव्हती. यांना चांगला पगार असून आपल्या प्राप्तीचा बराच अंश हे दानधर्माच्या कामीं खर्चतात असें मीं ऐकलें होतें. माझ्या भेटीचा उद्देश कळविल्यावर एकंदर सुधारकवर्ग व त्याचे अत्याचार यासंबंधानें त्यांनीं अतिशय कडक टीका करण्याला प्रारंभ केला. आठदहा मंडळी बुदबळांचा डाव चाललेला पहात बसली होती. अर्थात् खेळाचा विरस होऊन डाव तसाच थांबला. सुधारकांवरच यांचा कटाक्ष होता, असें नाहीं. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या

लाइफ मेंबरांवरहि यांचा कटाक्ष दिसला. "शाळेचीं व कॉलेजांचीं ग्यादरिंगें करून सगळेजण ओंवळ्यांनीं जेवावयाला बसून जिकडेतिकडे भ्रष्टाकर माजविण्याचें काम तुम्ही चालविलें आहे, व तुमच्या या प्रयत्नांनीं समाजाला तुम्ही रसातळाला नेऊन पोंचवीत आहां " वगैरे गोष्टी त्यांनीं काळिजाला झोंबणाऱ्या भाषेनें उच्च स्वरानें सांगितल्या. मधूनमधून अगदीं हलक्या स्वरानें माझें मत सांगण्यासाठीं एखादें वाक्य बोलण्याचा मी प्रयत्न केला, पण तो अगदींच फिक्का पडला. तेव्हां कांहीं न बोलतां त्यांचेंच म्हणणें मीं ऐकून घेतलें आणि अर्ध्यापाऊणतासानें त्यांनीं आपलें बोलणें थांबविल्यावर आम्हीं तेथून उठलों ते शेजारीं रहाणाऱ्या एका मराठी शाळेच्या मास्तरांकडे गेलों. माझ्या बरोबर हिंडणाऱ्या गृहस्थांजवळ यांनीं माझ्या भेटीची इच्छा अनेक वेळां दर्शविली होती. यांच्या बोलण्याचा सारांश इतका होता, कीं, " तुम्ही ज्या गोष्टीसाठीं प्रयत्न करीत आहां त्यांचा एकंदर काय परिणाम होणार हें आपल्याला समजत नाहीं, पण तुमच्याविषयीं आदरभाव उत्पन्न होतो, व तो हा एक रुपया देऊन मी व्यक्त करीत आहें. " माझ्या कामांत अशा रीतीचे दोन्ही प्रकारचे पुष्कळ प्रसंग आले.

आमचें लग्न होऊन तीनचार महिने झाले नाहींत तोंच आमचें पटत नसून आमचीं भांडणें होतात, व आम्ही विभक्त होण्याच्या खटपटींत आहोंत अशा बातम्या उठूं लागल्या, व त्या वरच्या दर्जाच्या मंडळींत देखील पसरूं लागल्या. कांहीं कारणानें नरहरपंत पुण्याला आले होते, तेव्हां आमचें भांडण मिटविण्यासाठींच हे आले आहेत असा तर्क कित्येकांनीं केला व तो चहूंकडे पसरला. वेडावांकडा प्रसंग आला असतां आनंदीबाई व तिची संतति यांची कांहींतरी तरतूद असावी म्हणून माझ्या पश्चात् तिला विम्याच्या पॉलिसींतून वगैरे एकंदर तीन हजार रुपये मिळावे अशी व्यवस्था करून तो कागद रजिष्टर करण्याचें काम याच सुमाराला चाललें होतें, त्यानेंहि वरील कल्पनेला चांगली पुष्टि मिळाली. अशा भुमका मधुनमधून बरीच वर्षे उठत असत. आरंभींच्या अनेक पुनर्विवाहित दंपत्यांसंबंधानें लोकांमध्यें अशा बातम्या वारंवार उठत.

# प्रकरण अठ्ठाविसावें

## गृहस्थाश्रम

### मध्य भाग

## आमचा नवा संसार

आपण गोडधड खावें, उत्तम घरांत रहावें, उत्कृष्ट पोषाख करावा, आणि चैनीनें संसारसुख भोगावें, अशा कल्पना मला अगर आनंदीबाईला कधीं शिवल्या नाहींत. राधाबाईशीं संसार करितांनाहि या गोष्टी कधीं तिच्या अगर माझ्या मनांत आल्या नाहींत. पूर्वी आणि हल्लींहि आमच्या घरांत आठदहा मनुष्यें असावयाचीं; यामुळे असल्या आयुष्य-क्रमाला आम्हांला कधीं अवकाशच मिळाला नाहीं. असल्या गोष्टींनीं होणारें सुख मनुष्याला चकविणारें आहे व निर्भेळ सुख ज्यांत व्यवहारिक स्वार्थ कमी अशा कृत्यांनींच मनुष्याला होऊं शकेल, ही गोष्ट अनुभवानें मला पटत चालली होती. आम्हां उभयतांनाहि निसर्गाच्या शाळेंत उत्कृष्ट शिक्षण मिळून उद्योगांत वेळ घालविणेंच आमच्या अंगवळणी पडलें होतें. उर-लेल्या वेळांत मिळणाऱ्या संसारसुखाच्या घुटक्यांनीं आमची तृप्ति होत असे. आम्ही अशा सुखाच्या कधीं पाठीला लागलों नाहीं. त्यांतल्या त्यांत सहजीं जें करून घेतां येई तें टाकलेंहि नाहीं. लग्नानंतर लवकरच माझी पुतणी व आनंदीबाईची भाची म्हणजे रँगलर परांजपे यांची पत्नी, या दोन मुलींना आम्हीं विद्याभ्यासाठीं आणलें, व त्यांच्या शिक्षणाला सुरुवात केली. या दोघींचे नवरे व माझा मुलगा रघुनाथ हे तीन मुलगे घरांत होतेच. इतक्या मंडळीचें आमचें कुटुंब बनून आम्ही संसाराला सुरुवात केली.

विशेष महत्त्वाचें असें कांहीं न घडतां लग्नानंतर तेरा महिन्यांनीं आनं-दीबाईच्या पहिल्या प्रसूतीचा समय येऊन ठेपला. जी अगोदर माझ्याजवळ रहात होती व पुढें अनाथबालिकाश्रमाच्या कामीं उपयोगी पडली, ती माझी मेहुणी पुनर्विवाहानंतर लागलीच मुरुडाला गेली होती. दुसरें कोणी मनुष्य मदतीला येण्यासारखें नव्हतें. तेव्हां या अडचणींतून बाहेर पडण्याचा

मार्ग आनंदीबाईनेंच सुचविला, व तो मलाहि पसंत पडला. मंगळवारच्या स्त्रियांच्या इस्पितळांत बाळंतपण उरकून घ्यावें व अकराव्या दिवशीं परत घरीं यावें, असें आम्हीं ठरविलें. आनंदीबाई शरीरानें सशक्त असून कामानें तिचें शरीर कमावलेलें होतें. नाजूकपणाचे चोंचले हिला कधीं खपले नाहींत. दळणकांडणासकट सर्व काम गर्भावस्था बरीच पूर्णतेला येईपर्यंत हिचें चालू असावयाचें. मंगळवारच्या इस्पितळांत दीड मैल चालून गेल्या-वर दोन तासांनीं ती प्रसूत झाली. धर्मार्थ चालविलेल्या संस्थेवर व्यर्थ भार घालणें बरें नव्हे हें लक्षांत आणून लहानशी देणगी मीं संस्थेकडे पोहों-चती केली.

संकेताप्रमाणें आनंदीबाई अकराव्या दिवशीं घरीं आली. बाराव्या दिवशीं मुलाचे कान टोंचण्याची वेळ आली. आनंदीबाईला हें करणें अत्यंत वेडगळपणाचें वाटत होतें. तिनें या कामीं माझा सल्ला विचारला व आम्हीं उभयतांनीं त्याचे कान टोंचावयाचें नाहींत, असें ठरविलें. मात्र आनंदीबाईनें या करण्याला सौम्य स्वरूप दिलें. मुलगा फार रडेल, यासाठीं आतां सोन्याच्या सुंकल्यानें कानाला स्पर्श करून वेळ चालवून नेऊं, मग पुढें पहातां येईल, असें जमलेल्या चार बायकांना सांगून कोणाला कांहीं विपरीत भासू न देतां आपला कार्यभाग साधला. आम्हीं आमच्या कोणत्याहि मुलाचे कान टोंचले नाहींत. आम्हांला मुलगी झाली नाहीं त्याला इलाज नाहीं; पण झाली असती तर तिचेहि नाककान टोंचावयाचे नाहींत, असें आम्हीं ठरविलें होतें. मुलाचें नांव अर्थाकडे लक्ष देऊन शंकर ठेविलें.

यानंतर दीड वर्षानें दुसऱ्या बाळंतपणाचा प्रसंग आला. या वेळीं मी विधवाविवाहप्रतिबंधनिवारक मंडळीच्या कामासाठीं बाहेर हिंडावयाला गेलों होतों. प्रसूति विशेष त्रासदायक होत नाहीं असा पहिल्या वेळचा अनुभव आल्यामुळें इस्पितळांत न जातां हा प्रसंग घरींच गुदरून नेण्याचें ठरविलें होतें. पहिला मुलगा अगदींच लहान होता. तो घरीं एकटा राहिला नसता, हेंहि त्याला एक कारण होतें. सुदैवानें आनंदीबाईचे बंधु नरहरपंत यावेळीं पुण्याला आले होते ते या प्रसंगीं उपयोगीं पडले. मुलगा झाला होता तो उपजल्यानंतर चोवीस तासांनींच वारला. यावेळीं मला घरीं राहतां आलें नाहीं म्हणून फार वाईट वाटलें. सार्वजनिक कामांत गुंतल्यामुळें स्वतःच्या

संसारांतील कर्तव्यांकडे दुर्लक्ष करावें लागलें असे पुष्कळ प्रसंग माझ्या आयुष्यांत आले, त्यांतला हा बऱ्याच महत्त्वाचा होय.

आनंदीबाई संसारांत पडल्यानंतर तिचा विद्याभ्यास वाढविण्यासाठीं मधुनमधून प्रयत्न करण्यांत आले, पण ते साधले नाहींत. घरांत मंडळी बरीच होती, त्यामुळें घरकामाचा बोजा तिच्या अंगावर बराच असे. एकदां साधल्यास ट्रेनिंग कॉलेजाचें सर्टिफिकेट मिळवावें म्हणून कांहीं महिने ती तेथें गेली; परंतु तें मध्येंच सोडावें लागलें. पहिला मुलगा शंकर हा साडे-तीन वर्षांचा होऊन बराच आपला आपण खेळूं लागला होता, व त्याच्या पाठीवरचा मुलगा वारला होता. अशा संधीला पुनः कांहीं यत्न झाल्यास करून पहावा, असें मनांत आलें. या वेळीं घरांत मंडळी अगदीं थोडी होती. मी, वडील मुलगा रघुनाथ व पार्वतीबाई आठवले यांचा मुलगा नाना इतकींच मनुष्यें होतों. माझी पुतणी व पार्वतीबाई आठवले या, मुलींच्या ट्रेनिंग कॉलेजाच्या बोर्डिंगांत राहत होत्या. परांजपे विलायतेला गेले होते, व पुतणीच्या नवऱ्यानें खाणावळींत जेऊन मित्राकडे वकिलीच्या अभ्यासाची सोय केली होती. या वेळीं नेट देऊन व गैरसोय सोसून, वेडावांकडा प्रसंग आल्यास निर्वाहाचें कांहीं साधन आनंदीबाईच्या हातीं करून द्यावें असा विचार माझ्या मनांत आला. नागपुराला डफरिन इस्पितळांत एक वर्षांत मिडवुइफ्री व नर्सिंग हा अभ्यासक्रम पुरा करून देण्याची नवीन सोय झाली होती, तिचा फायदा घेण्याचें आम्हीं ठरविलें. मुलगा बरोबर असूं देण्याची विशेष परवानगी मिळवून आनंदीबाईची नागपुराला रवानगी केली. या वेळीं आम्हीं फर्ग्युसन कॉलेजाच्या आवारांत प्रि. आगरकर यांनीं स्वतःसाठीं बांधलेल्या घरांत राहत होतों. आमच्या जेवणाखाणाची व्यवस्था काय करावी हा प्रश्न उपस्थित झाला. घरांत ब्राह्मण अगर बाई ठेवणें हें बऱ्याच खर्चाचें काम; शिवाय त्यांजवर कोणीं पाहणारें नसलें म्हणजे नासधूस व नेआण काय करतील ती वेगळीच. तेव्हां या पंचाइतींत न पडतां स्वतःच स्वयंपाक करण्याचें मीं ठरविलें, व तें कोणतीहि अडचण न येतां एक वर्ष तडीस गेलें. घरांत चाकर माणूस ठेवलें म्हणजे पुष्कळ वेळां पैसा खर्चून आपली स्थिति परतंत्र होते. तें मनुष्य मालकाची सवड न पाहतां आपलीच सवड

पाहत असतें. यासाठीं याहि भानगडींत न पडतां सर्व काम आपलें आपणच करण्याचें मीं ठरविलें. झाडसारवणापासून तों धोतरें धुणें, स्वयंपाकाचीं भांडीं घांसणें, वगैरे सर्व कामें माझा मीच करूं लागलों. किरकोळ कामांत मुलांची थोडी मदत होई. फक्त दळण मात्र बाहेर देत असें. पैसे वांचविणें हा मुख्य हेतु होताच; पण स्वतःला एक प्रकारची शिस्त लागावी व वेळ पडल्यास कोणतेंहि काम करण्याला जड वाटूं नये, या हेतूनें या प्रसंगाचा असा उपयोग मीं करून घेतला. मध्यें कांहीं अडचणी न येतां आनंदीबाईचा एक वर्षाचा अभ्यास पुरा होऊन सर्टिफिकेट मिळून ती घरीं आली.

ज्याप्रमाणें पहिल्या संसारांत राधाबाईला घरीं भरपूर काम असे, त्याचप्रमाणें या नव्या संसारांत आनंदीबाईलाहि अतिशय काम असे. ही कामाला कधीं कंटाळली नाहीं. बाजारहाट करण्याचें काम दुसऱ्या कोणाकडून चांगलें होत नाहीं हें पाहून तेंहि तिनें आपणाकडेच घेतलें. उंची कपडे अगर दागदागिने यांत तिनें कधीं लक्ष घातलें नाहीं. आमच्या संसारांत दुखणींबाणीं अगर बरेवाईट प्रसंग फारसे आले नाहींत. आनंदीबाईचा आणखी एक प्रसूतीचा प्रसंग इस्पितळांत व एक घरींच उरकून घेण्यांत आला. अशा रीतीनें विशेष कांहीं न घडतां आमची संसारयात्रा बरींच वर्षें चालली.

आतां एका आनंदाच्या प्रसंगाचा उल्लेख करून हें प्रकरण संपवितों. आनंदीबाईचे तीर्थरूप कांहीं कामानिमित्त पुण्यास आले होते ते आम्हांला भेटावयाला आले. जनलज्जा आणि मनलज्जा यांच्यासाठीं त्यांनीं आमच्या घरीं उतरून अन्नोदकाचें ग्रहण करणें अशक्य होतें. बाबा, आनंदीबाई व मी अशीं सुखदुःखांच्या गोष्टींत गुंतलों असतां आमचा मुलगा शंकर तेथें आला. त्याला पाहून गहिंवरलेल्या स्वरानें पुढील वाक्य त्यांच्या तोंडून निघालें. "रामा! हें तुझें स्वरूप या जगांत कारे कोणाच्या नजरेला पडावयाचें होतें! पण तुझी लीला अगाध आहे!" तोंडांतून हे शब्द आणि डोळ्यांतून टप् टप् टप् आनंदाश्रु एकदमच बाहेर पडले, आणि त्यांनीं झट्दिशीं त्या मुलाला घेऊन कवटाळलें. हे भक्तिमार्गी माविक गृहस्थ आहेत. सर्व कांहीं राममय आहे, अशी यांची दृढ भावना आहे. दररोज पहांटेला चार साडेचार वाजतां उठून रघुपतीच्या देवळांत जाऊन कांकड

आरती करावयाची, व गांवांतील सर्व देवांचें दर्शन घेऊन सूर्योदयापूर्वी परत यावयाचें, असा यांचा नित्यक्रम आहे. घरांतून बाहेर पडल्यापासून परत येईपर्यंत उच्चस्वरानें भजन व अभंग म्हणणें सारखें चाललेलें असावयाचें. नव्वद वर्षांच्या वयांतहि हा त्यांचा क्रम अजून चालला आहे. फक्त अलीकडे दोनतीन वर्षें पहांटेला उठवत नाहीं. हे पुनः एकदां आम्हांला भेटावयाला आले होते, त्या वेळीं आश्रम वगैरे पाहून त्यांना फार आनंद झाला. सर्वांभूतीं परमेश्वर ही त्यांची भावना आहे. महार वगैरे अस्पृश्य मानलेल्या जातींविषयीं यांचें मन थोर आहे. त्यांचा कंटाळा न करितां उन्हाळ्यांत कांहीं कामानिमित्त अशीं माणसें थकूनभागून यांजकडे आलीं, तर त्यांना ताक वगैरे पाजून तृप्त करून परत पाठवावयाचें, असा यांचा परिपाठ आहे.

# प्रकरण एकोणतिसावें

## लेखनव्यवसाय

हा करण्याची माझ्या अंगीं पात्रता नाहीं, व हा मीं फारसा केलाहि नाहीं. तो आपण होऊन जर मजकडे चालत आला नसता, तर मी त्याच्या वाटेला गेलों नसतों. मी अगदीं पहिला लेख पै फंडासंबंधानें लिहिला. मुरूडफंडाची कल्पना मनांत येऊन ती यशस्वी झाली होती, व स्नेहवर्धक मंडळीच्या द्वारें त्या धर्तीवर तालुक्यासाठीं फंड काढण्याचे विचार मनांत येत. सगळ्या हिंदुस्तानासाठीं एक फंड निघावा, व कोणावर विशेष ओझें न पडतां बरीच मोठी रक्कम जमून तिचा देशकार्यासाठीं विनियोग व्हावा, असेंहि मनांत येई. ही माझी कल्पना मीं हौसेनें लिहून काढिली. हा लेख लहान खरा, पण तो तळमळीनें लिहिलेला व स्वयंस्फूर्तीचा होता. दरसाल दरमाणशीं एक पै याप्रमाणें हिंदुस्तानांतील लोकसंख्येइतक्या पै वसूल करून त्या फंडाची व्यवस्था लावण्यासाठीं एक योजना तयार केली होती. एका जिल्हाकामगाराच्या हाताखालीं तीनचार फंड जमविणारे कारकून असावे, त्यांनीं गांवोगांव हिंडून जिल्ह्याचा वसूल करावा, गांवांतील लोकसंख्येइतक्या पै वसूल झाल्या नाहींत, तर तेथल्या प्रमुख मनुष्यांनीं ती तूट भरून काढावी, तालुक्यांत येणारी तूट तालुक्याच्या मुख्य ठिकाणच्या पुढाऱ्यांनीं भरून काढावी, व जिल्हाकामगारानें जिल्ह्याच्या लोकसंख्येइतक्या पै जिल्ह्यांतील ठळक लोकांची मदत घेऊन भरून काढाव्या. याप्रमाणें प्रांतासाठीं, इलाख्यासाठीं व देशासाठीं ऑफिसर व कमेटया नेमून फंड जमविणें व तो खर्च करणें यासंबंधानें व्यवस्था लावावी. हा लेख नरहरपंतांनीं नेटिव्ह ओपिनियन वर्तमानपत्रांत छापविला होता.

दुसरा लहानसा लेख मुंबईला असतांनाच लिहिला. 'परोपकार' या विषयावर नरहरपंत व मी यांजमध्यें पुष्कळ वादविवाद होत असे. स्पेन्सरच्या उन्नत स्वार्थाच्या (enlightened selfishness) बाजूनें ते नेहमीं बोलत, व निवळ परोपकाराच्या तर्फे मी भांडत असें. या सुमाराला

अमेरिकेंतील सुप्रसिद्ध दानशूर गृहस्थ आन्ड्र्यू कार्नेजी यांचा या विषयावर एक निबंध वर्तमानपत्रांतून आला होता, तो त्यांनीं मला दाखविला. तो मला फारच आवडला. कारण त्यांतील विचार मला तंतोतंत पटले. परोपकार करणें तो असा करावा कीं, त्याचें पर्यवसान उपकृत मनुष्य आळशी बनण्यांत होऊं नये; शिडीप्रमाणें वर चढत जाण्याच्या कामीं त्याचा त्याला उपयोग व्हावा, हा त्यांतला सारांश होता. नरहरपंतांच्या प्रोत्साहनानें या निबंधाचें मीं भाषांतर केलें, व तें त्यांनीं श्रीयुत हरिभाऊ आपटे यांच्या मार्फत त्या वेळचें पुण्यांतील मासिक पुस्तक 'मनोरंजन व निबंधचंद्रिका' यांत प्रसिद्ध करविलें.

पुण्यांत आल्यानंतर श्रीयुत दाभोळकर यांच्या पुस्तकमालेंत मीं कांहीं पुस्तकें लिहिलीं. हीं सर्व भाषांतरेंच होतीं. प्रथम 'शास्त्ररहस्य' पुस्तकांत 'मानवी प्राण्याची मूळपीठिका' हा निबंध डार्विनच्या 'मनुष्याचा अवतार' (Descent of Man) या पुस्तकांतील एका लहानशा भागावरून लिहिला, तो पसंत पडल्यावरून श्रीयुत ब. ग. दाभोळकर यांनीं मला स्पेन्सरच्या 'Beneficence' या ग्रंथाचें भाषांतर करण्याचें काम दिलें. सदर भाषांतर त्यांनीं 'आत्मनीतीचीं तत्त्वें व परोपकार' या पुस्तकांत प्रसिद्ध केलें. यानंतर स्पेन्सरच्या 'Inductions of Ethics' या पुस्तकाचें भाषांतर त्यांच्याच इच्छेवरून मीं केलें, तें त्यांनीं 'नीतिशास्त्राचे सामान्य सिद्धांत' या पुस्तकाच्या द्वारें आपल्या पुस्तकमालेंत प्रसिद्ध केलें. सिजविकच्या 'Elements of Politics' या पुस्तकाच्या पूर्वार्धाचें भाषांतर करण्याचें काम त्यांनीं प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन यांजवर सोंपविलें होतें; परंतु तें पुरें करण्यास त्यांना वेळ न मिळाल्यामुळें त्यांतला अर्धा भाग दाभोळकरांनीं मजकडे दिला. तो 'राजनीतीचीं मूलतत्त्वें, पूर्वार्ध' या पुस्तकांत प्रसिद्ध झाला. श्रीयुत दाभोळकर यांनीं जर हें काम मजवर सोंपविलें नसतें, तर आपण होऊन अशा प्रकारचें काम मीं हातीं घेतलें नसतें.

या व्यवसायापासून मला फार उपयोग झाला. माझें इंग्रजी ग्रंथांचें वाचन अगदींच तुटपुंजीचें होतें, त्यांत थोडीशी भर पडली. एरव्हीं पुस्तक वाचणें आणि भाषांतर करण्यासाठीं हळुहळू विशेष लक्ष्य देऊन वाचणें यांत फार फरक असतो. हीं पुस्तकें काळजीपूर्वक वाचलीं गेल्यानें माझ्या

ज्ञानांत भर पडली व विचारशक्ति वाढली. वेळेवर काम संपवून देण्याचा नेट मार्गे नसता, तर माझ्या हातून हें वाचन झालें नसतें. शिवाय द्रव्याचीहि थोडीशी प्राप्ति झाली. पुढें अनाथबालिकाश्रमाचें काम पुष्कळ पडूं लागलें व हा व्यवसाय मीं अगदीं सोडून दिला.

# प्रकरण तिसावें

## विधवाविवाहोत्तेजक मंडळी

माझ्या हातून हिंदी स्त्रीसमाजाची जी अल्प सेवा घडत आहे, तिचें मूळ कारण पुनर्विवाहाच्या कामांत मीं पुढें पाऊल टाकलें हें होय. मीं अतिशय मोठ्या जबाबदारीची गोष्ट केली आहे व आतां मला माझ्या आयुष्याचा उपयोग ही जबाबदारी ओळखून केला पाहिजे असे विचार माझ्या मनांत येऊं लागले. जी गोष्ट मीं केली तिनें मी कृतकृत्य झालों नसून माझ्या कार्याला केवळ प्रारंभ झाला आहे असें मला वाटूं लागलें. ज्या महत्कार्याशीं मी निगडित झालों आहें, त्याला उज्ज्वल स्वरूप येईल असें माझ्या हातून कांहीं तरी घडावें, अशी इच्छा मला उत्पन्न झाली. विधवाविवाहाच्या कार्यासाठीं आपणाला काय करतां येईल, हे विचार एकसारखे मनांत घोळूं लागले. दक्षिणी लोकांत विधवाविवाहाच्या कार्यासाठीं झटणारी संस्था त्या वेळीं मुंबई, महाराष्ट्र, वऱ्हाड व मध्यप्रांत या कोणत्याही ठिकाणीं नव्हती. प. वा. विष्णुशास्त्री पंडित यांनीं स्थापन केलेली पुनर्विवाहोत्तेजक मंडळी त्यांच्या बरोबरच लयाला गेली. हे गृहस्थ पश्चिमहिंदुस्तानांतील पुनर्विवाहाच्या कार्याचे अध्वर्यु होते, व यांनीं आपलें तनमनधन या कार्याला अर्पण केलें होतें. यांनीं श्रीशंकराचार्यासमोर विधवाविवाहाच्या सशास्त्रतेबद्दल वादविवाद होऊन निर्णय व्हावा यासाठीं अतोनात खटपट केली. हा निर्णय जरी त्या वेळीं प्रतिकूल झाला, तरी जे दहा शास्त्री पंच नेमले होते, त्यांपैकीं चारांनीं अनुकूल मत दिलें होतें, व पांचव्या शास्त्र्यांनीं जरी आयत्या वेळीं प्रतिकूल मत दिलें, तरी त्यांचें खरें खरें मत पुनर्विवाहपक्षाला अनुकूल होतें या गोष्टी फार महत्वाच्या होत्या. त्या वेळीं सगळा महाराष्ट्र लोकसमाज या प्रश्नावरील चर्चेनें दुमदुमून राहिला होता. पण महाराष्ट्राच्या दुर्दैवानें विष्णुशास्त्री पंडित आमच्या समाजाला पुष्कळ वर्षें लाभले नाहींत. हे स्वतः विधवेशीं लग्न करून 'बोले तैसा चाले' या साधुवर्यांच्या कसोटीला उतरले; परंतु यानंतर

एकदोन वर्षांतच म्हणजे १८७५ च्या सुमाराला यांचा अंत झाला. यांच्या पश्चात् दक्षिणी लोकांत या कार्याचा वाली कोणी नाहींसा झाला. दानशूर गुजराती पुनर्विवाहित गृहस्थ माधवदास रघुनाथदास हे पुनर्विवाहेच्छु विधवांना आश्रय देत असत, व न्यायमूर्ति रानडे हेहि कोणाला सल्ला-मसलत देऊन व द्रव्याची मदत देऊन थोडी झीज सोशीत. १८७५ पासून विधवाविवाहाच्या कार्याची फारच हेळसांड झाली. या कार्यासाठीं थोड्याशा कळकळीनें काम करणारे एक गृहस्थ होते. ते माझे मित्र प. वा. सदाशिवराव केळकर होत. हे गृहस्थ सत्पुरुष या पदवीला पात्र होते; पण हे ब्रह्मसमाजाला वाहिलेले असल्यामुळें विधवाविवाहाच्या कार्याला यांचा व्हावा तितका उपयोग झाला नाहीं. त्यांनीं विधवेशीं लग्न केलेलें होतें, व तें हिंदुधर्मशास्त्राच्या विधीनेंच केलें होतें; पण पुढें हे अनुष्ठानिक ब्राह्मो म्हणजे ब्रह्मसमाजाचीं मतें आचरणांत आणणारे झाल्यामुळें जुन्या पद्धतीनें या कार्याचा विस्तार करण्याला हे असावे तितके योग्य नव्हते. तथापि या स्थितींतहि या कार्याला त्यांजकडून बरीच मदत झाली. पण त्यांचें खरें जीवितकार्य म्हणजे प्रार्थनासमाजाचें काम होय. या गृहस्थां-विषयीं अत्यंत पूज्यबुद्धि माझ्या मनांत नेहमीं असे व आहे. असे वंद्य पुरूष आपल्या समाजांत अत्यंत विरळ आहेत म्हणूनच तो अशी कष्ट-दशा भोगीत आहे.

अशा स्थितींत आपण या कार्यासाठीं एक संस्था स्थापन करावी, असें माझ्या मनांत आलें. विधवाविवाहाचे आद्यप्रवर्तक पंडित ईश्वरचंद्र विद्या-सागर आणि आमच्याकडील या कार्याचे धुरीण प. वा. विष्णुशास्त्री पंडित यांनीं आंखलेल्या मार्गानें या कार्याचा विस्तार करण्याला या संस्थेनें झटावें, अर्थात् १८५६ च्या कायद्याला संमत असणारे पुनर्विवाह मात्र या संस्थेला मान्य असावे, असें मीं योजिलें. जातिभेदाचा अत्यंत बिकट प्रश्न बाजूला ठेवून निर्भेळ पुनर्विवाहाच्याच कार्यासाठीं झटण्याचा मीं निश्चय केला, व अशा प्रकारच्या पुनर्विवाहित गृहस्थांशीं मीं पत्रव्यवहार सुरू केला. रा. ब. वामनराव कोल्हटकर हे गृहस्थ पुष्कळांना माहीत आहेत. हे त्या वेळीं मध्यप्रांतांत एका मोठ्या सरकारी हुद्दयावर होते. हे स्वतः पुनर्विवाहित असून त्यांनीं पुष्कळ धस सोसून वजनदार लोकांमध्यें

कांहीं पुनर्विवाह घडवून आणिले होते. रा. ब. कोल्हटकर यांना मीं आपले विचार कळविले, व ते त्यांना पसंत पडून त्यांनीं मला या कामीं फार प्रोत्साहन दिलें.

या प्रांतांत पुनर्विवाहाच्या जुन्या पद्धतीचा पुरस्कार करणारे वजनदार पुनर्विवाहित गृहस्थ कोणी नव्हते. तेव्हां मध्यप्रांतांत जाऊनच आपण या कार्याचा पाया घालावा असें मला वाटलें. म्हणून १८५६च्या कायद्या-अन्वयें पुनर्विवाहाचा प्रचार करूं इच्छिणाऱ्या व मध्यप्रांतांतील पुनर्विवाहित गृहस्थांच्या विचारें ता. ३१ डिसेंबर १८९३ रोजीं वर्धो येथें श्रीयुत वासुदेव विनायक परांजपे यांच्या घरीं सभा भरविण्याचें ठरविलें.

इतक्यांत पुण्यांत पुनर्विवाहाच्या कार्याचें पाऊल पुढें पडण्याचा लवकरच एक योग आला. श्रीयुत ए. शंकरराव अगर शं. सी. फडके हे दक्षिण-हैदराबादेच्या हायस्कुलांत मास्तर होते. यांचें पहिलेंच लग्न व्हावयाचें असून तें विधवेशीं करण्याचा यांनीं संकल्प केला, व तो तडीलाहि नेला. त्यांना वधूहि अगदीं योग्य मिळाली. श्रीयुत सदाशिवराव गोवंडे म्हणून इनामखात्यांत मोठ्या दर्जाचे एक कामगार पुण्यांत होते, त्यांची पंधरा वर्षांची विधवा मुलगी होती. तिचे बंधु श्रीयुत भास्करराव गोवंडे यांनीं धैर्यानें आपल्या बहिणीच्या पुनर्विवाहाच्या कामीं पुढाकार घेऊन कार्य तडीला नेलें. ज्या घरीं मी राहत होतों तेथें, म्हणजे मेहेंदळयांच्या बागेंतील बंगल्यांत, हें मंगलकार्य करण्यांत आलें. गोवंड्यांचें घराणें पुण्यांतील वजनदार घराण्यांत गणलें जात होतें यामुळें या विवाहाचा लोकमतावर चांगला परिणाम झाला. हा विवाह डिसेंबरांत झाला व पुढें लवकरच पुनर्विवाहाच्या मंडळीची स्थापना करण्यासाठीं वर्ध्याला जावयाचें होतें. श्रीयुत गोवंडे व फडके यांनीं या कामीं मदत करण्याचें कबूल करून आम्ही त्रिवर्ग वर्ध्याला गेलों.

तिकडील मंडळी आमची वाटच पहात होती. आमच्या प्रयत्नांना व्यवस्थित स्वरूप यावें यासाठीं आम्हाला संस्थेची घटना करावयाची होती. यासाठीं निवळ मौज पाहणाऱ्या कमी धैर्याच्या लोकांना न बोलावितां आस्थेच्या गृहस्थांना मात्र आम्हीं बोलाविलें होतें. सभेला एकंदर १४

गृहस्थ हजर होते पण त्यांपैकीं तीव्र कळकळीचे सातच होते, व तेवढेच त्या दिवशीं सभासद झाले. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

१. श्रीयुत ह. गो. पाध्ये, ए. अ. कमिशनर, (प्रि. दा. ग. पाध्ये यांचे चुलते) (अध्यक्ष).

२. रा. ब. वा. म. कोल्हटकर, नागपूर.

३. श्रीयुत श्री. ग. परांजपे, फॉरेस्ट ऑफिसर, जबलपुर.

४. ,, वा. वि. परांजपे, वकील, वर्धा.

५. ,, शं. सी. फडके, शिक्षक, दक्षिण हैदराबाद.

६. ,, भा. स. गोवंडे, पुणें.

७. ,, धों. के. कर्वे, पुणें.

यांत श्रीयुत पाध्ये, व वा. वि. परांजपे यांचा पुनर्विवाहाच्या कार्याशीं प्रत्यक्ष संबंध नसतां केवळ विधवांविषयीं वाटणाऱ्या कळकळीनें पुनर्विवाहितांच्या बरोबर लोकनिंदा सहन करण्याला हे तयार झाले होते. या सभेंत मंडळीच्या घटनेसंबंधानें वगैरे एकंदर २५ नियम ठरले. त्यांतील महत्त्वाचे येणेंप्रमाणें:—

१. या मंडळीला विधवाविवाहोत्तेजक मंडळी असें नांव द्यावें.

२. होईल तितकें जातिबंधनें व पूर्वापार चाली यांचें उल्लंघन न करितां विधवाविवाहाला उत्तेजन देणें.

३. पुनर्विवाहित स्त्रीपुरुष अगर त्यांच्याशीं उघडपणें पंक्तिव्यवहार करणारे स्त्रीपुरुष यांना मात्र या मंडळीचे सभासद होतां येईल.

४. पंक्तिव्यवहार न करितां सहानुभूति दाखविणारे स्त्रीपुरुष मंडळीचे हितचिंतक समजले जावे.

५. या मंडळीच्या सभासदांमध्यें व त्यांच्या कुटुंबांतील मनुष्यांमध्यें दळणवळण व्हावें या हेतूनें दोनदोन वर्षांनीं या मंडळीच्या सभासदांचा कुटुंबमेळा भरला जाईल व त्याच वेळीं सभासदांची साधारण सभा भरली जाईल.

अशा रीतीनें संस्थेची घटना होऊन व तिचें धोरण आंखलें जाऊन आम्ही पुण्याला परत आलों, व व्यवस्थित रीतीनें कामाला सुरुवात केली.

या ठिकाणीं पुनर्विवाहाच्या कार्यासाठीं मनापासून झटणाऱ्या व झीज सोसणाऱ्या मध्यप्रांतांतील दोघां गृहस्थांच्या नांवांचा उल्लेख प्रमुखत्वानें करणें जरूर आहे. यांपैकीं एक रा. ब. वामनराव कोल्हटकर यांचे मित्र जबलपुरचे प. वा. कृष्णराव गोळवलकर हे होते. हे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर होते. यांनीं पुनर्विवाहाच्या शास्त्रार्थासंबंधानें एक लहानसें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें होतें. हे पुनर्विवाहितांशीं उघडउघड पंक्तिव्यवहार करीत, व यामुळें लोकांनीं यांना अपंक्त ठेविलें होतें. दुसरे गृहस्थ जबलपूरचे सन्मान्य वृद्ध मुनि काका साने* होत. यांनीं पुनर्विवाहाची बाजू जी एकदां धरली ती कायम ठेविली. हे अगदीं जुन्या पद्धतीनें वागणारे गृहस्थ आहेत. धर्मसंबंधीं नैमित्तिक कर्मे यांच्या घरीं अगदीं व्यवस्थित रीतीनें होत असतात. पुनर्विवाहितांशीं उघडपणें संबंध ठेविल्यामुळें भिक्षुक त्रास देऊं लागले, तेव्हां यांनीं खटपट करून वर्गणी जमवून पुनर्विवाहाच्या मंडळीसाठीं एक पगारी भिक्षुक ठेविला. वर्गणींत जेवढें कमी पडे तेवढें हे स्वतः देत असत. या कामीं यांनीं फारच झीज सोसली. कोणत्याहि देश-कार्यासाठीं अतोनात खटपट करून मदत मिळवून द्यावयाची हें व्रत त्यांनीं अद्यापपर्यंत चालू ठेविलें आहे. यांच्यासारखे करारी व देशकार्याची कळकळ बाळगणारे गृहस्थ आपल्या समाजांत फार थोडे आहेत.

---

* हे दोन वर्षांपूर्वीं परलोकवासी झाले.

# प्रकरण एकतिसावें

## पुनर्विवाहितांचे कुटुंबमेळे*

पुनर्विवाहित गृहस्थांमध्यें विधवाविवाहाच्या कार्यासाठीं जितकी कळकळ असूं शकेल तितकी सामान्यतः इतरांमध्यें उत्पन्न होणें शक्य नाहीं. एकदां ही पायरी चढल्यावर या कार्यासाठीं झटणें हा त्यांचा स्वार्थच होऊन बसतो. ही गोष्ट लक्ष्यांत आणूनच कुटुंबमेळे भरविण्याची मीं योजना केली. इतर गृहस्थांची जरी या कार्याला सहानुभूति मिळाली, तरी ती पुरुषांपुरतीच व कित्येक वेळां तितक्यापुरतीच असते. या कार्यासाठीं स्त्रियांनीं पुढें येणें ही गोष्ट त्या वेळीं तरी बहुतेक अशक्य होती. पुनर्विवाहित गृहस्थ दूरदूर राहणारे असल्यामुळें त्यांजमध्यें संघट्टन होऊन त्यांजकडून कांहीं सहकार्य व्हावें हा या मेळ्यांचा हेतू होता. पुनर्विवाहित गृहस्थ, त्यांच्याशीं शरीरसंबंध केलेले गृहस्थ व त्यांच्याशीं उघडपणें पंक्तिव्यवहार करणारे गृहस्थ इतक्यांचा या मेळ्यांत समावेश व्हावयाचा होता.

पहिला मेळा पुण्यांत मी राहत होतों त्या घरीं म्हणजे शनिवारांत मेहेंदळ्यांचे बागेंत २१ मे १८९४ रोजीं भरला. पुनर्विवाहित गृहस्थ व त्यांची पुनर्विवाहापासून झालेली संतति मिळून एकंदर या कार्याचे आधार अशीं २२ मनुष्यें हजर होतीं, त्यांचा तपशीलः—

| | |
|---|---|
| श्रीयुत दिनकर भिकाजी जोशी व कुटुंब (बेळगांव) | ७ |
| श्रीयुत कृष्णाजी धोंडदेव पंगे व दोन मुलें (नासिक) | ३ |
| श्रीयुत कृष्णाजी गोविंद पेंडसे व कुटुंब (पुणें) | ७ |
| श्रीयुत शंकर सीताराम फडके व कुटुंब (द. हैदराबाद) | २ |
| श्रीयुत धोंडो केशव कर्वे व कुटुंब (पुणें) ... ... | ३ |
| एकूण | २२ |

या वेळीं या कार्यासाठीं झटणारे व उघडपणें सहानुभूति दर्शविणारे कित्येक गृहस्थ हजर होते, त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

* पहिल्या दोन मेळ्यांची हकीकत मंडळीच्या प्रोसीडिंग बुकांतून घेतलेली आहे.

रा. ब. चिं. ना. भट; प्रिन्सिपल गो. ग. आगरकर; प्रो. चिं. गं. भानु; प्रो. वा. ब. पटवर्धन; श्रीयुत वा. प्र. परांजपे; श्रीयुत रा. भि. जोशी; श्रीयुत सी. ग. देवधर; श्रीयुत वा. ग. जोशी व श्रीयुत स. ग. परांजपे.

याच वेळीं मंडळीच्या सभासदांची सभा होऊन नियमांत दुरुस्ती करून सभेचीं इतर कामें करण्यांत आलीं. प्रि. आगरकर यांना सभेचें अध्यक्ष-स्थान दिलें होतें. या सभेंत एक व्यवस्थापक मंडळी नेमण्यांत आली व डॉ. भांडारकर यांना तिचे अध्यक्ष नेमलें.

पुनर्विवाहित कुटुंबांचा दुसरा मेळा सन १८९७ सालीं उमरावतीला सामाजिक परिषद भरली तेव्हां म्हणजे डिसेंबरचे अखेरीला भरण्यांत आला. मेळ्याला हजर असलेलीं पुनर्विवाहित मनुष्यें व त्यांची संतति यांची यादी येणेंप्रमाणें:—

| | |
|---|---|
| रा. ब. वा. म. कोल्हटकर (नागपूर) ... ... ... | १ |
| श्रीयुत भा. स. थत्ते व त्यांचें कुटुंब (उमरावती) ... | २ |
| ,, ना. चिं. भट (अकोला) ... ... ... ... | २ |
| डॉ. ल. दा. गद्रे व कुटुंब (नागपुर) ... ... ... | २ |
| श्रीयुत डी. बी. जयवंत व कुटुंब (उमरावती) ... ... | २ |
| ,, गो. रा. अनगळ व कुटुंब (यवतमाळ) ... ... | २ |
| ,, रा. गं. देशपांडे व कुटुंब व मुलगा (नागपूर) ... | ३ |
| ,, श्री. ग. परांजपे (जबलपूर) ... ... ... ... | ३ |
| ,, वि. ना. मराठे (हर्दा) ... ... ... ... | १ |
| ,, धों. के. कर्वे व कुटुंब व मुलगा (पुणें) ... | ३ |
| एकूण | २१ |

या मंडळीचें चारपांच दिवस बरेंच संघटण झालें. या मंडळीची एक सभा श्रीयुत रा. ब. अनगळ यांच्या घरीं भरविण्यांत आली. रा. ब. वामनराव कोल्हटकर हे अध्यक्ष होते. या सभेंत विशेषतः पुनर्विवाहित गृहस्थांमध्यें दळणवळण वाढविण्याला व बहुजनसमाज आणि पुनर्विवाहित गृहस्थ यांजमधील अंतर करवेल तितकें कमी करण्यास कोणते उपाय योजावे, याबद्दल विचार झाला. सरतेशेवटीं मीं पुढील सूचना सभेपुढें

मांडल्या, व त्या सर्वानुमतें पसंत होऊन त्या त्या वेळीं हजर नसणाऱ्या पुनर्विवाहित गृहस्थांकडे मतांकरितां पाठवाव्या, असें ठरलें.

१. निदान पांच वर्षांतून एकदां पुनर्विवाहित कुटुंबांचा मेळा अशा वेळीं व अशा स्थळीं भरवावा कीं, त्यासाठीं सर्व पुनर्विवाहित कुटुंबांना जातां यावें. आणि ज्या गरीब कुटुंबांना भाड्याचा खर्च करण्याचें सामर्थ्य नसेल त्यांना तो देऊन तेथें आणावें, आणि वेळ व स्थळ हीं अशा रीतीनें पसंत करावीं कीं, त्या प्रसंगीं दुसरे कोणतेहि महत्त्वाचे उद्योग असूं नयेत.

२. शरीरसंबंधाच्या कामांत देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे यांच्या पलीकडे तूर्त जाऊं नये.

३. व्रतबंध आणि विवाह हे दोन विधि आपल्या प्राचीन पद्धतीप्रमाणें व्हावे. निदान १८५६ चा विधवाविवाहाचा कायदा लागू पडण्यास अवश्य इतके तरी विधि झाले पाहिजेत.

४. पंक्तिव्यवहाराच्या कामांत सामान्यतः आपल्या पूर्व पद्धतीला अनुसरून चालावें आणि विवाहादि सार्वजनिक प्रसंगीं तर त्यासंबंधानें विशेष काळजी घ्यावी अशी पुनर्विवाहित गृहस्थांना शिफारस करावी.

या मेळ्यासंबंधानें एक प्रसिद्ध पंक्तिभोजन करून त्याला कॉन्फरन्ससाठीं आलेल्या व पुनर्विवाहितांशीं उघडपणें पंक्तिव्यवहार करण्याला तयार असलेल्या तेथल्या गृहस्थांना निमंत्रण करावें, असा बेत होता व त्याप्रमाणें बहुतेक तयारीहि झाली होती. परंतु बऱ्याच गृहस्थांची त्यामुळें मनें दुखविलीं जाण्याचा संभव दिसल्यामुळें तो बेत रहित करावा लागला. तथापि श्रीयुत व्यंकटराव मुधोळकर यांनीं त्या प्रसंगीं पुनर्विवाहित कुटुंबांना मेजवानी देऊन त्या वेळीं कांहीं इतर गृहस्थांस बोलाविलें होतें. यानंतर सर्व मंडळी परत आपापल्या गांवीं गेली.

तिसरा मेळा पुणें येथें रा. ब. वामनराव कोल्हटकर यांच्या ज्येष्ठ कन्येच्या विवाहाच्या प्रसंगीं सदाशिव पेठेंत मळेकरांच्या वाड्यांत १९१३ सालीं भरला होता. हा विवाह पुनर्विवाहाच्या कार्याला बळकटी आणणारा

होता. पुनर्विवाहितांच्या संततीचें पुढें काय होणार, हा प्रश्न पुष्कळांना फार बिकट वाटत होता, आणि आणि पुनर्विवाहितांना पश्चाताप करण्याची वेळ त्यांच्या मुलींचीं लग्नें करण्याच्या प्रसंगीं येईल, असें ते म्हणत असत. या विवाहांतील वधू पुनर्विवाहित दांपत्याची संतति असून वर सिव्हिल सर्व्हि-सची परीक्षा झालेले प्रथमवरच असल्यामुळें या विवाहाला फारच महत्त्व आलें होतें. वरपक्ष आणि वधूपक्ष हे दोन्ही समाजांतील वरच्या दर्जाचे होते. यामुळें उभयतांचे उच्च दर्जाचे आप्तइष्ट दूरदूरच्या ठिकाणांहून आले होते व पुनर्विवाहाच्या प्रसंगीं थोडी दूर राहणारी पुण्यांतील पुष्कळ प्रति-ष्ठित मंडळी या विवाहाच्या प्रसंगीं हजर होती. या विवाहानें पुण्यांत पुन-र्विवाहाच्या कार्याचें पाऊल बरेंच पुढें पडलें. सोळा पुनर्विवाहित कुटुंबांचीं मिळून एकंदर ४६ मनुष्यें हजर होतीं. इतकी पुनर्विवाहित मंडळी सहजीं एकत्र जमण्याचा योग आल्यामुळें मेळ्याचें काम याच वेळीं साधून घेण्यांत आलें. पुनर्विवाहित मंडळीची सभा होऊन पुनर्विवाहासंबंधाच्या कित्येक गोष्टींची चर्चा झाली. हल्लीं दरसाल २५ जुलई हा दिवस पुनर्विवाहाच्या कार्याचा दिवस म्हणून पाळला जातो, व त्या दिवशीं पुष्कळ ठिकाणीं सभा होऊन या विषयावर चर्चा होत असते. ता. २५ जुलई १८५६ रोजीं पुन-र्विवाहाचा कायदा पास झाला, यासाठीं या कार्याच्या चळवळीकरितां हा दिवस पसंत करण्याचें या मेळ्याच्या वेळीं ठरलें.

यानंतर चवथा मेळा गेल्या मे महिन्यांत प्रांतिक सामाजिक परिषद् भरली त्याच मंडपांत भरला होता. सुमारें पंचवीस पुनर्विवाहित कुटुंबांतील बायका व मुलें मिळून ६० मंडळी हजर होती व या कार्याची विशेष कळ-कळ बाळगणारे कांहीं स्त्रीपुरुष होते. या मेळ्याचा बेत आयत्या वेळीं ठर-ल्यामुळें कार्यक्रमाला मिळावा तितका वेळ मिळाला नाहीं. तथापि उपाहारानंतर स्त्रीपुरुषांची सभा भरून पुनर्विवाहितांच्या कर्तव्यांबद्दल वगैरे भाषणें झालीं. पुनर्विवाहाच्या कार्याला सर्वस्वी वाहिलेला, निदान आपला फुरसतीचा सर्व वेळ या कामीं लावणारा, कोणी तरी पुरस्कर्ता या कार्याला पाहिजे आहे.

# प्रकरण बत्तिसावें

## विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळी

विधवाविवाहाचें कार्य जितकें लोकमताला न दुखवितां करणें शक्य असेल तितकें करावें, असें मीं योजिलें होतें. तारुण्यांतील बेपर्वाई माझ्यांतून नाहींशी झाली होती. सोंवळयाओंवळयावरची माझी श्रद्धा कधींच उडालेली होती, व श्रावणीसारखे विधि आजच्या काळाला निरर्थक आहेत असें मला वाटत होतें तें माझें मत बदललेलें नव्हतें. तथापि पुनर्विवाहितांकडे लोकांचें लक्ष्य साहजिकरीत्या विशेष असल्यामुळें या गोष्टींत देखील लोकमताला न दुखविण्याचें धोरण ठेवावें, असें मला वाटत होतें. घरीं नेहमीं सोंवळेंओंवळें संभाळणें त्रासाचें व अशक्य होतें; पण प्रवासांत जुन्या विचारांच्या लोकांकडे उतरण्याचे प्रसंग आले असतां अगर जुन्या-चालीच्या विवाहादि कार्यांत जाण्याचे प्रसंग आले असतां ज्याप्रमाणें आपण सोंवळें संभाळतों, त्याप्रमाणें तें पुनर्विवाहाच्या प्रसंगींहि पाळलें जावें, अशाविषयीं मीं यत्न केला. पुनर्विवाहाच्या कार्यासाठीं मी धड-पड करीत असतां पांचसहा वर्षांत जे पुढें चारपांच पुनर्विवाह झाले, त्या प्रसंगीं भोजनसमारंभांत आम्ही कांहीं मंडळी सोंवळ्याचा उपयोग करीत असूं. तरी कांहीं मंडळी अशी असत, कीं, ते या प्रसंगीं ओंवळ्यानें बसा-वयाचे व जुन्या लग्नसमारंभांत मात्र सोंवळ्यांनीं बसावयाचे. पुनर्विवाहा-नंतर बरींच वर्षें मीं श्रावणी करण्याचा क्रम ठेविला होता. याच धोरणाला अनुसरून संस्थेचें नांव 'विधवाविवाहोत्तेजक मंडळी' असें होतें तें २० ऑगस्ट १८९५ रोजीं भरलेल्या मंडळीच्या सभासदांच्या विशेष सभेंत 'विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळी' असें बदलण्यांत आलें. विधवा-विवाहाला उत्तेजन द्यावयाला नको, फक्त त्यासंबंधानें असलेला प्रतिबंध समाजानें दूर केला म्हणजे पुरे, असा अर्थ नांवांतूनच निघालेला बरा असा हेतु होता. विधवाविवाह समाजांत रूढ होण्यासाठीं जो हा प्रयत्न होत होता, त्याचें वर्णन करतांना 'आमची पुनर्विवाहित मंडळी=प्रस्तुतचा हिंदुसमाज+पुनर्विवाह' या समीकरणाचा उपयोग मी करीत असें.

या मंडळीच्या आश्रयाखालीं पुनर्विवाहितांच्या मुलांच्या शिक्षणासाठीं एक बोर्डिंग चालवावें, अशी माझ्या मनांत कल्पना आली, आणि आपण आपल्या जबाबदारीवरच हा प्रयोग करून पहावा, व तो यशस्वी झाल्यास तें बोर्डिंग मंडळीच्या स्वाधीन करावें, असें मीं योजिलें होतें. सन १८९४ च्या आरंभींच मीं या प्रयोगाला सुरुवात केली. श्रीयुत कु. धों. पंगे यांनीं आपला एक मुलगा व मुलगी अशीं दोन मुलें पाठविली, व श्रीयुत दि. भि. जोशी यांनीं एक मुलगा व दोन मुली अशीं तीन मुलें पाठविलीं. हे दुसरे गृहस्थ गरीब होते. यांना कांहीं मदत मंडळींतून, व कांहीं रा. ब. कोल्हटकर यांजकडून होत असे आणि कांहीं ते स्वतः पाठवीत. हा प्रयोग सुमारें वर्ष दीड वर्ष करून पाहिला; पण असें बोर्डिंग चालविणें इष्ट व शक्य नाहीं असें वाटल्यामुळें मीं तो नाद सोडून दिला. तथापि गरीब पुनर्विवाहितांच्या मुलांमुलींना मदत करण्याचें काम विधवाविवाहप्रतिबंध-निवारक मंडळी करीत होती.

सार्वजनिक कामांत जेथें जेथें माझा पैशाशीं व्यवहार येतो, तेथें तेथें हिशोब अगदीं चोख ठेवून ते वेळच्यावेळीं रिपोर्टांत प्रसिद्ध करण्याचें काम मी अगदीं नियमितपणें करीत आहें. मंडळीच्या पहिल्या वर्षाच्या कामाचा रिपोर्ट १३ एप्रिल १८९५ रोजीं भरलेल्या सभेपुढें सादर करण्यांत आला, त्यांत पुढील मजकूर आहेः—

" आपल्या लोकांच्या अनेक संस्था अल्पायुषी होण्याला जीं कारणें आहेत, त्यांपैकीं जमाखर्चाची अव्यवस्था व पैशाची अफरातफर, हें एक आहे. आमच्या संस्थेचा अंत होणें झाल्यास तो या कारणानें तरी होऊं द्यावयाचा नाहीं, असा तिच्या चालकांचा बेत आहे. मंडळीच्या पैशाचा जमाखर्च शिस्तवार ठेविलेला आहे व तो मंडळीच्या ऑफिसांत येऊन मागितल्यास कोणाहि सभासदाला कोणत्याहि वेळीं दाखविण्यांत येईल. "

सन १८९४ अखेर मंडळीचे आश्रयदाते सभासद व साहाय्यकारी या सर्वांची मिळून संख्या १०० होती, ती १८९५ अखेर ५०० झाली, १८९६ अखेर ५६० झाली व १८९७ अखेर ६०० झाली. यानंतर आश्रमाच्या कामाकडे माझें लक्ष्य विशेष जाऊं लागल्यामुळें पुनर्विवाहाच्या हितचिंतकांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न शिथिल पडले.

द्रव्याशिवाय कोणत्याहि संस्थेचें काम चांगलें चालावयाचें नाहीं, ही गोष्ट लक्ष्यांत आणून मी आरंभापासूनच वर्गण्या जमविण्यास लागलों. प्रत्येक आश्रयदात्यानें १०० रुपये, व सभासद आणि हितचिंतक यांनीं दरसाल एक दिवसाची प्राप्ति, याप्रमाणें वर्गणी दिली पाहिजे, असा नियम केला होता. नियम असला तरी वर्गणी वसूल होणें फार कठिण असतें व त्या दिवसांत तें फारच कठिण होतें. पण मी कमालीची खटपट करीत होतों. पुढील कोष्टकावरून मंडळीच्या सालोसालच्या सांपत्तिक स्थितीची कल्पना होईल.

| वर्ष | वर्षारंभीं शिल्लक. | वर्षांतील जमा. | वर्षांतील खर्च. | वर्षअखेर शिल्लक. |
|---|---|---|---|---|
| १८९४ | ० | ५११/५/९ | १७०//३ | ४२१/५/६ |
| १८९५ | ४२१/५/६ | ११८२/७/६ | २९४//६ | १३०९/१२/६ |
| १८९६ | १३०९/१२/६ | ९२७/७/८ | २१४/१४/६ | २०२२/११/८ |
| १८९७ | २०२२/११/८ | ४७१/८/६ | १२७/१३/३ | २३६६/६/११ |
| १८९८ | २३६६/६/११ | ४६५/३/५ | १४६/२/६ | २६८५/७/१० |
| १८९९ | २६८५/७/१० | १२६२ | २८९/१५/३ | ३६५७/८/७ |
| एकूण. | | ४९००//१० | १२४२/१४/३ | |

आज पंधरा वर्षांत सार्वजनिक कार्यासाठीं वर्गण्या देण्याची लोकांना संवय झाली आहे तितकी त्या वेळीं ती नव्हती ही एक गोष्ट, व पुनर्विवाहाचें कार्य त्या वेळीं किती तरी अप्रिय होतें ही दुसरी गोष्ट, लक्षांत आणली असतां हा फंड जमविण्याला किती खटपट लागली असेल याची कल्पना होईल.

शेवटल्या वर्षांत प. वा. विष्णुशास्त्री मेमोरिअल फंडाचे एक हजार रुपये जमा आहेत. या फंडाचे पैसे हातीं येण्याला फारशी खटपट करावी लागली नाहीं ही गोष्ट खरी; पण त्या फंडाविषयींची आठवणसुद्धां बहुतेक बुजून गेली होती. आम्हां सुशिक्षित लोकांमध्येंसुद्धां अजून कर्तव्यदक्षता उत्पन्न झाली नाहीं, हें दर्शविणारें विष्णुशास्त्री मेमोरियल फंडाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. विष्णुशास्त्री पंडित वारल्याला सुमारें पंचवीस वर्षें झालीं होतीं, व हा फंड ज्यांच्याकडे ठेविला होता, ते श्रीयुत नारायण महादेव परमानंद वारल्यालाहि बरींच वर्षें झालीं होतीं. विष्णुशास्त्री पंडित यांनीं

आपलें सर्वस्व या कार्याला वाहिलें होतें, व त्यांच्याबद्दल विशेष प्रकारचा आदरभाव बऱ्याच सुशिक्षित लोकांमध्यें उत्पन्न झाला होता. ते वारल्यानंतर वर्तमानपत्रांत दुखवट्याचे लेख येऊन मुंबईला एक व पुण्याला एक असे दोन स्मारकफंड सुरू झाले. पण एकादी गोष्ट नवीन आहे तों तिचें वाटेल तेवढें स्तोम माजवून ती जरा डोळ्यांआड झाली कीं तिला अगदींच विसरून जावयाचें ही जी मुलांची प्रवृत्ति तीच आम्हां थोर मुलांमध्यें असल्यामुळें यासंबंधाचें आपलें कर्तव्य आम्ही सर्व विसरून गेलों. मुंबईचा फंड सुमारें सातशें रुपये जमला होता. श्रीयुत प. वा. बाळाजी पांडुरंग हे त्या फंडाचे सेक्रेटरी होते. त्यांजकडे मी गेलों व त्या फंडाची व्यवस्था लावण्याच्या कामीं मी खटपट करितों, तिला आपणच सहाय्य करावें, म्हणून विनंति केली. त्यांनीं या वेळीं ५० रुपये आणखी वर्गणी दिली व श्रीयुत परमानंदांच्या चिरंजीवांना पत्र दिलें. त्यांनीं जुन्या यादी वगैरे काढून पाहिल्या व जमलेल्या पैशांत आणखी थोडीशी भर घालून एक हजाराची प्रॉमिसरी नोट माझ्या स्वाधीन केली. हे गृहस्थ फार थोर असल्यामुळें कांहीं अडचण पडली नाहीं. परंतु आम्हांला कांहीं माहीत नाहीं असा जबाब त्यांनीं दिला असता तर काय करावयाचें होतें ? विष्णुशास्त्री मेमोरियल फंडाच्या वर्गणीदारांपैकीं कांहीं गृहस्थ त्या वेळीं हयात होते. त्यांचीं मतें घेऊन सदर फंड पुण्याच्या विधवाविवाहप्रतिबंधनिवारक मंडळीच्या स्वाधीन करावा व त्याचें व्याज पुनर्विवाहेच्छु विधवांना मदत करण्याच्या कामीं लावावें, असें ठरविलें. विष्णुशास्त्री पंडित मेमोरियल फंडाचे सातआठशे रुपयेच जमावे, व वीस पंचवीस वर्षेंपर्यंत त्या रकमेची विल्हेवाट लावण्याचें कोणाच्या मनांत येऊं नये, यावरून काय निष्पन्न होतें तें पहा !

पुण्यांतल्या विष्णुशास्त्री मेमोरियल फंडाचे चिटणीसहि एक थोर गृहस्थ होते. याचे ट्रेझरर कोण होते हें मला कळलें नाहीं व तें शोधून काढण्याचा मीं प्रयत्नहि केला नाहीं. या फंडाचीहि कांहीं रकम जमली होती, पण तिनें सूर्यप्रकाश पाहिला नाहीं. जसा मीं मुंबईच्या फंडाची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न केला, तसाच पुण्याच्या फंडाची व्यवस्था लावण्याचें माझ्या मनांत होतें. मी या चौकशीला लागलों तेव्हां मला कळून आलें कीं, माझ्या आधींच सार्वजनिक चळवळींत पडणाऱ्या एका गृहस्थांनीं पुण्यांतील

नेटिव्ह जनरल लायब्ररीची इमारत बांधतेवेळीं या फंडाचा उपयोग झाला तर पहावा म्हणून खटपट केली, पण ती निरर्थक झाली. आम्हां सुशिक्षित लोकांमधील दानत व कर्तव्यदक्षता हीं अजूनहि त्याच स्थितींत आहेत. पुण्यांतील एक स्वार्थत्यागी गृहस्थ वारल्याला वीस वर्षें होऊन गेलीं, पण त्यांच्या स्मारकफंडाची व्यवस्था अजूनहि लागली नाहीं ! फंडाचे चिटणीस, ट्रेझरर अगर वर्गणीदार यांपैकीं कोणालाहि या सार्वजनिक पैशाची व्यवस्था लावण्याची बुद्धि झाली नाहीं, यावरून काय अनुमान निघतें बरें ? जबाबदार मनुष्यें अजून जीवंत आहेत तोंपर्यंत तरी या फंडाची व्यवस्था लावण्याचें यश कोणी घेईल काय ?

हल्लीं ब्यांकांच्या व्यवहारासंबंधानें जे प्रकार बाहेर आले आहेत, त्यांवरून काय सिद्ध होतें ? यांत ठिकठिकाणच्या सुशिक्षित लोकांकडे केवढा दोष येतो ? ब्यांकेचे एजंट वाटेल तसा व्यवहार करीत असतां त्याजकडे लक्ष देण्याची एकाहि डायरेक्टराला बुद्धि होऊं नये, भागीदार व ठेवीदार लोकांनीं खुशाल झोंपा घ्याव्या, व कांहीं सार्वजनिक फंडांचेहि पैसे अशा ब्यांकांत ठेविले जाऊन सार्वजनिक पैशाचें नुकसान व्हावें, हा बंदुकीच्या दारूनें भरलेल्या मोठमोठ्या पिंपांजवळ मुलांनीं आगकाड्या घेऊन खेळावें असा प्रकार नव्हे काय ? आंधळें दळतें आणि कुत्रें पीठ खातें असा हा व्यवहार वर्षानुवर्ष चालला असतांना ठिकठिकाणच्या शहाण्यासुर्त्या माणसांची अक्कल कोणीकडे गेली होती ? या कामीं माझ्या स्वतःच्या हातूनहि फार मोठा *अपराध घडला आहे.

* मला पैशाचा अगर व्याजाचा लोभ पुष्कळ कमी आहे. माझ्या कुटुंबाच्या संरक्षणासाठीं ठेवलेली रक्कम मीं पुष्कळ वर्षें दरसाल दरशेकडा चार रुपये व्याजानें माझ्या एका मित्राला व नंतर डेक्कन एज्युकेशन सोसायटीला दिली होती. तेथून सुटल्यावर ती तीन खाजगी ब्यांकांत विभागून ठेविली. या ब्यांका तितक्या सुरक्षित नसतात हें मनांत आणूनच असा विभाग केला. आपल्या उद्योगधंद्याला थोडें उत्तेजन मिळावें हा एक हेतु होता. मद्रासच्या आर्बथनॉट कंपनीचें उदाहरण डोळ्यांपुढें होतें;तथापि एकाद्या ठिकाणीं बूड आली तर आली अशा तयारीनेंच हे पैसे ठेवले होते. दोन अडीच वर्षांपूर्वीं बॉंबे ब्यांकिंग कंपनीवर आलेलें किटाळ ब्यांकेच्या चालकांनीं आंतून सर्व पोंखरलेलें आहे ही गोष्ट बाहेर फुटूं न देतां घालविलें, त्यामुळें ही ब्यांक धोक्याची नाहीं अशी माझी समजूत झाली, व विद्यालयाला कमी व्याजानें कांहीं रक्कम मिळाल्यामुळें माझे दिलेले पैसे परत आल्यावर तें वर्ष दोन वर्षांकरितां त्याच

लिहितांलिहितां मी कोणीकडे तरी वहावलों. आम्हां सुशिक्षित लोकांच्या हलगर्जीपणाबद्दल वाटणारी मनाची तळमळ एकदांची ओकून बाहेर पडली, हेंहि बरेंच झालें.

आपले दोष लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. आत्मपरीक्षण होऊन आपणांत सुधारणा व्हावी या बुद्धीनें हा मजकूर लिहिला आहे. वर सांगितलेल्या कित्येक उदाहरणांत किती तरी सुशिक्षित व संभावित गृहस्थांचा समावेश होत आहे, व त्यांजकडे थोडाफार कर्तव्यपराङ्मुखतेचा तरी दोष येत आहे. यावरून मला तरी असें वाटतें कीं, आमचा समाज अजून नीतिमत्तेंत फार मागें आहे. या गोष्टीची जाणीव ठेवून जर आपण धडपड केली नाहीं, तर जगाच्या हल्लींच्या चढाओढींत आपण मागें राहूं व आम्हांला लवकरच नामशेष होण्याची पाळी येईल !

---

ब्यांकेंत ठेविले. यामुळें मला स्वतःला एकदम २६०० रुपयांची ठोकर बसली. तथापि माझ्य कुटुंबाच्या पैशाची वाटेल ती व्यवस्था करण्याला माझा मी मुखत्यार होतों. या कामांत देखील कुटुंबाचें नुकसान करण्याचा दोष माझ्या पदरीं येतो, नाहीं असें नाहीं. पण सार्वजनिक पैशासंबंधानें मीं असा हलगर्जीपणा व बेफिकीरी केली याबद्दल मी अक्षम्य दोषाला पात्र आहें ! मजकडे या कामीं दोष येतो, याचें आणखी एक कारण आहे. आश्रमाची विशेष कळकळ बाळगणारे गृहस्थ श्रीयुत सिताराम नारायण पंडित यांनीं ही गोष्ट १९०३ सालीं माझ्या नजरेला आणून दिली होती. असें करणें ट्रस्ट अॅक्टांत घालून दिलेल्या नियमाविरुद्ध आहे, असेंहि त्यांनीं लिहिलें होतें पण हा दुसरा भाग माझ्या लक्षांत राहिला नाहीं. आश्रम व विद्यालय यांचे पैसे खाजगी ब्यांकेंत व्याजाच्या फायद्याच्या दृष्टीनें ठेवलेले नव्हते. इतर ब्यांकांपेक्षां या ब्यांकेंत देवघेव करण्याला अधिक सोयीवार पडतें यासाठीं चालू (करंट) खात्यांतच रकमा ठेविल्या होत्या. पोष्टाच्या ब्यांकेंत दोन्ही संस्थांचीं खातीं आहेत व त्यांत शेंकडा तीन रुपये व्याज मिळूं शकतें. थोड्याच दिवसांत जरूर लागणार होती म्हणून विद्यालयाचे ४५०० रु. व आश्रमाचे १५०० रु. ब्यांकेत ठेविले होते. आश्रमाचे आणखी १५०० रु. दुसऱ्या ब्यांकेंत ठेवण्यासाठीं पाठविले असतां दुर्दैवानें याच ब्यांकेंत ठेविले गेले. स्टूडंट्स् फंडाचे ७०८ ॥३ रुपये मींच या ब्यांकेंत व्याजाच्या आशेनें ठेविले. वेळ आली तर आश्रमाचे व विद्यालयाचे पैसे तावडतोब काढून घेतां येतील असें वाटत होतें. तिकडे पीपल्स ब्यांकेची गडबड उडाल्याबरोबर मीं सावध व्हावयाला पाहिजे होतें. परंतु ती दृष्टीच मजमध्यें नसल्यामुळें हा अनर्थ गुदरला. हा भयंकर गुन्हा माझ्या हातून घडला आहे.

# प्रकरण तेहेतिसावें

## पुनर्विवाहाच्या प्रश्नासंबंधानें लोकमताच्या जागृतीचे प्रयत्न *

विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळीची लोकांना माहिती करून द्यावी, मंडळीसाठीं द्रव्याची मदत मिळवावी, पुनर्विवाहासंबंधानें लोकमत कसें आहे तें पहावें, व या अत्यंत बिकट प्रश्नासंबंधाने लोकांमध्यें जागृति व सहानुभूति उत्पन्न करावी, या हेतूनें कॉलेजांत मिळणाऱ्या मोठमोठ्या सुट्यांचा उपयोग मी ठिकठिकाणीं हिंडून व्याख्यान वगैरे देण्याच्या कामीं करूं लागलों. जसें लोकमत असेल तसें तें बहुजनसमाजाच्या नजरेपुढें आणणें हा लोकांमध्यें जागृति उत्पन्न करण्याचा एक मार्ग आहे. यासाठीं लोकमताचें मापन अगदीं व्यवस्थित रीतीनें करण्याचें मीं मनांत आणलें, व त्या कामाचा उपक्रमहि केला. सुशिक्षित जनसमूहाचे मीं पुढीलप्रमाणें एकंदर पांच वर्ग केलेः—( १ ) आपापल्या जातींत पुनर्विवाहितांशीं उघडपणें पंक्तिव्यवहार करणारे; ( २ ) या प्रश्नासंबंधानें आपली सहानुभूति उघडपणें व्यक्त करून दाखविणारे; ( ३ ) सहानुभूति असून ती उघडपणें सांगण्याचें ज्यांना धैर्य नाहीं असे ( अशा गृहस्थांचीं मतें गुप्त म्हणून समजलीं जात. यांचीं नांवें प्रसिद्ध न करतां केवळ आंकड्यांच्या रूपानें मोघम माहिती प्रसिद्ध करावयाची अशा अटीवर तीं घेतलीं जात ); ( ४ ) कांहीं विशेष प्रकारच्या पुनर्विवाहांनाच ज्यांची संमति आहे असे; उदाहरणार्थः—बालविधवांचा अगर अनपत्य विधवांचाच पुनर्विवाह ज्यांना मान्य आहे असे गृहस्थ; व शेवटचा वर्ग म्हणजे ( ५ ) पुनर्विवाहाच्या सर्वस्वीं विरुद्ध असणारे गृहस्थ. मतपत्रिकांचे छापील नमुने तयार केले होते, व त्यांवर हीं मतें मी घेत असें. हें काम बरेंचसें झालें होतें व आणखी पुष्कळ व्हावयाचें होतें. हे कागद या संस्थेचा मी चिटणीस होतों, तोंपर्यंत जपून ठेविले होते; पण ते पुढें गहाळ झाले. हे कागद असते, तर बरीच मनोरंजक माहिती संकलित करितां आली असती.

---

* यांतील कांहीं माहिती मंडळीच्या प्रोसिडिंग बुकांत रिपोर्ट नमूद केले आहेत त्यांवरून दिली आहे.

१८९४ च्या डिसेंबर महिन्यांत राष्ट्रीय सभेसाठीं मद्रासला जी दक्षिणी मंडळी जमली होती त्यांना या प्रयत्नांची माहिती देण्यासाठीं मी मद्रासला गेलों होतों. जातांना वाटेंत पंढरपूर व सोलापूर, व परत येतांना हुबळी आणि बेळगांव, या ठिकाणीं उतरून सभांत व्याख्यानें देऊन व घरीं लोकांच्या भेटी घेऊन या विषयाची बरीच चर्चा व्हावी, असे प्रयत्न मीं केले. पुढें १८९५ च्या एप्रिल व मे महिन्यांत मुंबई, अहमदनगर, सोलापूर, सांगली, मिरज, कोल्हापूर आणि बेळगांव या ठिकाणीं, व नंतर सप्टेंबर, अक्टोबर व नवंबर या महिन्यांत सातारा, नाशीक, धुळें, भुसावळ, अकोला, उमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा आणि रायपूर इतक्या ठिकाणीं खटपट करण्यांत आली. कामाचा क्रम म्हटला म्हणजे प्रथम गांवांतील कांहीं प्रमुख मंडळीच्या गांठी घेऊन कोठें तरी लोकांची सभा जमवावी व त्या सभेला आपले हेतु समजून सांगावे आणि नंतर मंडळीच्या घरोघर जाऊन प्रत्येकाकडून कोणती मदत होण्यासारखी आहे याचा निकाल करावा; किंवा मदत करण्याची इच्छा नसल्यास या प्रश्नाच्या संबंधानें जसें मत असेल तसेंच देण्याविषयीं विनंति करावी. प्रत्येक सभेला जे लोक जमत त्यांना मंडळीच्या हकीगतीचीं पुस्तकें व मताचे तक्ते देण्यांत येत असत. अशा रीतीनें चार हजार पुस्तकें वांटण्यांत आलीं. या प्रवासाला एकंदर १३० दिवस मोडले व ९५८५८९ खर्च आला. एकदोन अडचणीच्या वेळा खेरीजकरून बाकीचा सर्व प्रवास रेल्वेच्या तिसऱ्या वर्गानें करण्यांत आला.

स्मरणांत राहिलेल्या कित्येक लोकांच्या मतांचा या ठिकाणीं उल्लेख केला असतां त्या वेळच्या लोकमताची थोडी कल्पना होईल. श्रीयुत बाळ गंगाधर टिळक यांनीं पुनर्विवाहितांशीं पंक्तिव्यवहार करण्याला हरकत नाहीं, असें आपलें स्पष्ट लेखी मत दिलें होतें; पण अशा रीतीनें आपणाला वाटेल तें स्पष्टपणें लिहून देण्याला सुशिक्षित मंडळी तयार नव्हती. हायस्कुलाच्या हेडमास्तराच्या दर्जाच्या एका गृहस्थांनीं पुनर्विवाहाला अनुकूल असें गुप्त मत दिलें होतें. एका डेप्युटी कलेक्टरांनीं चौदा वर्षांच्या आंतील विधवांचीं लग्नें करण्याला हरकत नाहीं असें उघड मत दिलें होतें, व तें बऱ्याच मह-

त्याचें म्हणून इतरांना दाखवून त्यांच्या मनावर कांहीं परिणाम व्हावा म्हणून मी यत्न करीत असें. पुढें लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या मेंबरच्या पदवीला पोंचलेल्या दोघां गृहस्थांचीं मतें त्या वेळच्या लोकस्थितीचीं चांगलींच निदर्शक आहेत. एका गृहस्थांनीं अनुकूल पण गुप्त मत दिलें व दुसऱ्यांनीं " I do not wish to be consulted in this matter "— म्हणजे या प्रकरणीं माझें मत विचारलें जाऊं नये—अशा अर्थाचा जबाब दिला. अर्थात् अनुकूल अगर प्रातिकूल असें कोणच्याच प्रकारचें मत देण्याला ते तयार नव्हते. पुढें हायस्कुलाचे हेडमास्तर झालेल्या एका गृहस्थांनीं पुनर्विवाहाविषयीं प्रतिकूल मत देऊन पुनर्विवाहाच्या कामीं खटपट करणाऱ्या लोकांविषयीं अनुदार विचार प्रकट केले होते. मागाहून स्वतः पुनर्विवाह करण्याचें ज्यांनीं धैर्य केलें, अशा एका गृहस्थांनीं आढेवेढे घेऊन व अनेक अटी घालून अंशतः अनुकूल मत दिलें होतें. ही लोकमताची स्थिति प्लेग सुरू होण्याच्या पूर्वीची होती. प्लेगामुळें अनेक अल्पवयस्क स्त्रियांवर वैधव्याचा घाला पडला, त्याच्या योगानें या प्रश्नावरील लोकमत पुष्कळ बदललें. तथापि अजूनहि पुनर्विवाहितांशीं उघडपणें पंक्तिव्यवहार करणारे लोक फार थोडे आहेत. पुनर्विवाहाविषयीं अनुकूल मत देण्याला जे भिणार नाहींत अशांची संख्या मात्र बरीच वाढली आहे.

विधवाविवाहासंबंधानें लोकमत तयार करण्यासाठीं जेव्हां मी प्रयत्न करीत होतों, तेव्हां खासगी संभाषणांत व व्याख्यानांत पुढील मुद्यांवर बोलत असें.

( १ ) विवाहित स्थिति अगर गृहस्थाश्रम हाच बहुतेक स्त्रीपुरुषांना उत्तम मार्ग होय; परंतु देह विटाळूं न देतां शरीरसामर्थ्य चांगलें राखून कुटुंबकार्य अगर समाजकार्य यांसाठीं आपलें आयुष्य अर्पण करण्याला लागणारी मनाची बळकटी ज्यांमध्यें असेल त्यांनीं जरूर ब्रह्मचर्यानें राहून आजन्म लोकसेवाव्रताचें आचरण करावें. हें असिधाराव्रत तडीला नेण्याइतका करारीपणा ज्यांमध्यें असेल तीं मनुष्यें धन्य व वंद्य होत. अशीं मनुष्यें हजारांत एक इतकीं तरी निपजतील कीं नाहीं, याबद्दल शंका आहे; पण हीं मनुष्यें राष्ट्राला भूषण व राष्ट्रत्व देणारीं होत.

(२) यांहून अन्य मनुष्यांना गृहस्थाश्रम हीच स्वाभाविक स्थिति होय. प्राचीनकाळीं बहुधा सर्व मनुष्यांना या स्थितीचा अनुभव घ्यावयाला मिळे. पण अर्वाचीन काळीं भिन्न परिस्थितीमुळें पुष्कळ स्त्रीपुरुषांना अविवाहित स्थितींत आयुष्य कंठणें भाग पडत आहे व यापुढें ही संख्या झपाट्यानें वाढत जाणार आहे. ही स्थिति नाहींशी करण्यासाठीं निदान तिची तीव्रता कमी करण्यासाठीं उपाय शोधून काढणें हा फार गहन प्रश्न आहे व त्याशीं झगडण्याला तेजस्वी पुरुष पाहिजेत. पण मनुष्याला त्याच्या स्वाभाविक स्थितीचा उपयोग घेऊं न देणारीं कृत्रिम बंधनें जर समाजांत उत्पन्न झालीं असतील, तर त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं आपली शिकस्त करणें हें सामान्य मनुष्याचें देखील कर्तव्य आहे. हिंदूंच्या उच्च वर्णांतील विधवांना पुनः लग्न करण्यासंबंधानें जो प्रतिबंध आहे, तो अशा प्रकारचा आहे. त्याचप्रमाणें कांहीं जाति अत्यंत लहान झाल्यामुळें जातींतल्या जातींत वधूवरांची निवड करणें अशक्य होऊन जातें. असलीं कृत्रिम बंधनें दूर करणें हें मनुष्याच्या आटोक्यांतलें काम आहे, तें त्यानें जरूर करावें. दुसऱ्या अडचणींमुळें ज्यांना अविवाहित स्थितींत राहणें भाग पडेल, त्यांनीं मनाला आवर घालून लोककार्याला आपलें जीवित वाहून प्राप्त स्थितीचा सदुपयोग करणें बरें.

(३) नीतीसंबंधानें स्त्रीपुरुषांना एकच कसोटी लाविली पाहिजे. अल्पवयी मुलांमुलींना विधवा अगर विधुर समजणें योग्य नव्हे. ज्यांनीं संसारसुखाचा अनुभव मुळींच घेतला नसेल त्यांचे पुनर्विवाह हे प्रथम विवाहच समजले पाहिजेत, व नीतीच्या दृष्टीनें यांची योग्यता प्रथमविवाहाच्या स्त्रीपुरुषांप्रमाणेंच मानली पाहिजे. संसारसुखाचा कांहीं काळ अनुभव घेतल्यानंतर पुनः विवाह करणें नीतीच्या दृष्टीनें किंचित् गौण समजलें पाहिजे. पण त्यांत दोष बिलकुल नाहीं. पुनर्विवाहित स्त्री किंवा पुनर्विवाहित पुरुष हीं नीतीच्या दृष्टीनें सारख्या पायरीचीं आहेत. त्यांना समाजानें तसें लेखलें पाहिजे.

(४) विधुरानें कुमारीशीं लग्न करणें हें हिंदूंच्या उच्च वर्णांच्या सद्यःस्थितींत तरी अनुचित मानलें गेलें पाहिजे. विधुरानें लग्न करणें तर विधवेशींच करावें. तरुण कुमारांनीं वैधव्याचा आरोप आलेल्या विधवा

मुलींशीं लग्न केल्यास तो त्यांचा विशेष थोरपणा होय. प्रथमविवाहांत काय किंवा द्वितीयविवाहांत काय, मनुष्य स्वार्थाच्या नैसर्गिक वृत्तीनेंच या कार्याला प्रवृत्त होत असतो. पण पुनर्विवाहाच्या कार्याचें महत्त्व जाणून जो मनुष्य अनेक अडचणी सोसून स्वार्थ साधतांना समाजकार्य साधतो तो नीतीच्या दृष्टीनें अंधपरंपरेनें कुमारीशीं लग्न करणाऱ्या विधुरापेक्षां श्रेष्ठ होय.

( ५ ) आपली मुलगी शोभेल अशा मुलीशीं लग्न करण्याला प्रवृत्त होणें ही शुद्ध अनीति होय. ही पशुवृत्ति नीतिमान् मनुष्याला शोभत नाहीं.

याच सुमाराला मुंबईच्या हेमंतव्याख्यानमालेंत मीं एक व्याख्यान द्यावें म्हणून त्या वेळचे मालेचे चिटणीस यांनीं मला पत्र लिहिलें. या वेळीं पुनर्विवाहाच्या कामांत माझें मन गढून गेलें होतें. तेव्हां ' पुनर्विवाहाच्या चळवळीचा पंचवीस वर्षांचा इतिहास ' या विषयावर व्याख्यान देण्याचें मीं कबूल केलें. या विषयावर त्या वेळीं फारसें कोणी बोलत अगर लिहीत नसत. व्याख्यान आर्यसमाजमंदिरांत झालें. न्यायमूर्ति रानडे अध्यक्षस्थानीं होते. मंडळींनीं मंदिर अगदीं गच्च भरून गेलें होतें. मीं आपल्या व्याख्यानांत विष्णुशास्त्री पंडितांच्या प्रयत्नाची माहिती सांगून जातींचा प्रश्नहि या प्रश्नाबरोबरच सोडविण्याचे प्रयत्न करणारा जो एक पक्ष होता त्याच्या कार्यक्रमाचाहि उल्लेख करून नंतर मी नवीन चालविलेल्या प्रयत्नाची—'विधवाविवाह—प्रतिबंध—निवारक मंडळी'ची—हकीकत सांगितली, व यासंबंधानें लोकांचें कर्तव्य काय, हें सांगून व्याख्यानाचा समारोप केला. मी वक्ता नाहीं, आणि ज्या कामांत माझें मन रमलेलें असतें त्या कामाशिवाय अन्य विषयावर मी सहसा बोलत नाहीं. माझें बोलणें अगदीं साधें पण अंतःकरणाच्या कळवळ्याचें द्योतक असतें, यामुळें तें बहुधा शांतपणें ऐकून घेतलें जातें. मी एक तासभर बोललों व व्याख्यान श्रोतृसमाजाला आवडल्यासारखें वाटलें. माझें व्याख्यान झाल्यावर एक तरुण गृहस्थ बोलावयाला उठले. त्यांनीं बोलक्या सुधारकांवर विषारी वाग्बाण सोडण्याला सुरवात केली. स्वतःवर प्रसंग आला असतां न्यायमूर्तींनीं जें वर्तन केलें त्याचा उल्लेख करून " या पुनर्विवाहाच्या कार्याचें जें भयंकर नुकसान झालेलें आहे त्या सगळ्याचें खापर न्यायमूर्तींच्या डोक्यावर फोडलें पाहिजे, " असें म्हणतांना त्यांनीं आपले दोन्ही हात लांब करून जवळ आणून ते त्यांच्या

शिरोभागावर नेले. श्रोतृसमाजाकडून टाळ्यांचा गजर झाला. पुनः त्याच अर्थाचीं दोन वाक्यें उच्चारून दोन्ही वेळां त्यांनीं तसेच अंगविक्षेप केले. जणूं काय कार्याचें नुकसान केल्याच्या जबाबदारीचें सर्व ओझें हे न्यायमूर्तींच्या मस्तकावर नेऊन ठेवीत आहेत! दुसऱ्या वेळीं श्रोतृसमाजाला कसेंसेंच वाटल्यासारखें दिसलें, आणि तिसऱ्या वेळीं तर अगदीं चीड आली. आणखी कांहीं वेळानें त्यांनीं आपलें भाषण संपविलें. या अतिप्रसंगामुळें त्या वेळच्या त्या देखाव्याचा ठसा माझ्या अंतःकरणपटावर कायमचा उठलेला आहे. त्या वेळीं न्यायमूर्तींची सागरासारखी गंभीर वृत्ति सर्वांच्या प्रत्ययाला आली. ते बोलावयाला उठले तेव्हांचें त्यांचें पहिलें वाक्य माझ्या लक्षांत राहिलें आहे. 'आम्ही लंगडीं पांगळीं माणसें आहों; आपण पुढें चला, आम्ही तुमच्या मागून लंगडतलंगडत येतों' अशा अर्थाचें तें वाक्य होतें. नंतर त्यांनीं अर्धातास अत्यंत सुरस व माहितीनें भरलेलें असें भाषण केलें, त्यानें श्रोतृसमाज फार आनंदित झाला. या तरुण गृहस्थांना खचित पुढें या त्यांच्या कृतीचा पश्चात्ताप झाला असेल. आपलें वय काय, आपण बोलतों कोणाला आणि प्रसंग कोणता, या गोष्टींचा विचार त्यांना त्या वेळीं झाला नाहीं. हे गृहस्थ हल्लीं मोठे समाजकार्यकर्ते झाले आहेत, ही आनंदाची गोष्ट होय.*

अनाथबालिकाश्रमाच्या कामाकडे माझा फुरसतीचा बहुतेक वेळ जाऊं लागल्यानंतर या मंडळीच्या कामांत मला लक्ष घालतां येईना. तरी १९०० सालीं प्रो. भाटे व श्रीयुत भाजेकर यांच्याबरोबर मीहि व्याख्यानें देण्यासाठीं हिंडावयाला गेलों. मे महिन्यांत या कामीं सुमारें वीस दिवस खर्चिले व सातारा, कऱ्हाड, बेळगांव, धारवाड, हुबळी, गदग, विजापुर, सोलापूर इतक्या ठिकाणीं गेलों. व नाताळांत सुमारें दहा दिवस खर्चून हरिपुर, सांगली, नरसोबाची वाडी, शिरोळ, कुरुंदवाड व इचलकरंजी इतक्या ठिकाणीं गेलों. या सर्व ठिकाणीं सभा केल्या व प्रत्येक ठिकाणीं बऱ्याच मंडळीला खाजगी रीतीनेंहि भेटलों. आम्ही तिघेहि प्रत्येक सभेंत भाषणें करीत असूं. अहमदनगर येथें सभेचें जमलें नाहीं, पण इतर काम केलें.

---

* हे गृहस्थ म्हणजे गजानन भास्कर वैद्य होत. दुर्दैवानें ते अकालीं परलोकवासी झाल्यानें त्यांच्या कर्तृत्वाचा लाभ समाजास फार थोडा मिळाला.

या आमच्या डेप्युटेशनचा मुख्य उद्देश पुनर्विवाहितांबरोबर उघडपणें पंक्तिव्यवहार करण्याला शंभर गृहस्थ तयार झाल्यास पहावे, व तितके मिळाल्यास त्या सर्वांचीं नांवें प्रसिद्ध करावीं, असा होता. शंभर नांवें मिळाल्यास तीं प्रसिद्ध करण्यांत येतील, या अटीवरच या सह्या घेण्यांत येत होत्या. या झालेल्या कामांत साठ गृहस्थ मिळाले होते. हा उद्योग तितक्या नेटानें आणखी चालला असता तर कदाचित् शंभर लोक मिळाले असते. तसें होऊन शंभर नांवें प्रसिद्ध झालीं असतीं तर लोकमतावर बराच परिणाम घडला असता; पण या उद्योगाबद्दल पुढें कोणीं नेट धरला नाहीं. जरी उद्दिष्ट हेतु सफळ झाला नाहीं, तरी लोकांमध्यें जागृति करण्याच्या कामीं या आमच्या डेप्युटेशनचा बराच उपयोग झाला. इचलकरंजी व कुरुंदवाड येथील अधिपतींनीं आम्हांला चांगली मदत केली. आम्हीं यांचेच पाहुणे होतों. श्रीमंत बाबासाहेबांचें मत प्रतिकूल असूनहि त्यांनीं सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें, व शेवटचें अध्यक्षांचें भाषण झाल्यानंतर त्यांना उत्तर देण्याची संधिहि त्यांनीं सौजन्यानें श्रीयुत भाजेकर यांना दिली. प. वा. श्रीमंत बाळासाहेब कुरुंदवाडकर यांनीं सभेचा योग श्रीविष्णूच्या मंदिरांत जुळवून दिला होता. कुरुंदवाडासारख्या ठिकाणीं पुनर्विवाहित गृहस्थांचें पुनर्विवाहाच्या विषयावर व्याख्यान श्रीविष्णूच्या मंदिरांत व्हावें, ही गोष्ट विशेष होती. श्रीमंतांच्या निमंत्रणावरून शास्त्री व भिक्षुक मंडळीहि सभेला आली होती. सांगलीस मात्र याच्या उलट प्रकार झाला. तेथील मारुतीचें देऊळ प्रशस्त असून तें एक सभा भरविण्याचें ठिकाणच झालेलें होतें. अर्थात् ही सभाहि त्या देवळांतच भरविण्याचा विचार तेथील पुढारी मंडळींनीं ठरविला. त्यावेळीं तेथें पुण्यांत पुनर्विवाहाला विरोध करणाऱ्या पक्षाचे अध्वर्यु होते, त्यांना हा प्रकार सहन झाला नाहीं. त्यांनीं लगेच ही सभा देवळांत भरूं न देण्याविषयीं खटपट केली, व दुसऱ्या बाजूच्या कैवाऱ्यांत तितका वजनदार व जोरदार मनुष्य कोणी नसल्यामुळें त्यांच्या खटपटीला यशहि आलें. नंतर ही सभा देवळाजवळील उघड्या जागेंत झाली. सभा कोठें भरवावी याबद्दल पुष्कळशी वाटाघाट व बाचाबाच झाली व सभा देवळांत भरली नाहीं हें एकपरि चांगलेंच झालें. कारण तीन पुनर्विवाहित गृहस्थ सांगलींत आले असून त्यांचीं भाषणें

होणार या गोष्टीचा डांगोरा पिटला जाऊन सभेला खूप मंडळी आली होती, तितक्यांना देवळांत जागाहि झाली नसती.

आमच्या लोकांत निरनिराळ्या सार्वजनिक कामांना वाहून घेतलेल्या मनुष्यांची अतिशय उणीव आहे. त्याच त्याच व्यक्तींना वेगवेगळीं अनेक कामें करावीं लागतात, त्यामुळें कोणतेंच काम चांगलें होत नाहीं. सुट्टी संपल्याबरोबर आम्ही हें कार्य तसेंच ठेवून आपापल्या व्यवसायाला लागलों व हा उद्योग जो एकदां मागें पडला तो पुनः कोणी हातीं घेतला नाहीं. लोककार्याशीं एकरूप झालेल्या हजारों युवयुवतींनीं ही भरतभूमि गजबजून जाईल तरच हें मृतप्राय राष्ट्र सजीव होण्याची कांहीं आशा आहे.

# प्रकरण चौतिसावें

## पुनर्विवाहाच्या कामीं आपल्या मनाप्रमाणें न वागणारे लोक

पुनर्विवाहाच्या कामीं पुढाकार घेणाऱ्या ब्याच गृहस्थांवर पत्नीवियोगाचे प्रसंग येऊन या कामीं स्वतः उदाहरण घालून देण्याची अनुकूल संधि त्यांना मिळाली. सभांतून अगर मित्रमंडळींत या कार्याची जोरदार तरफदारी करून स्वतःवर प्रसंग आला असतां ते मागें सरले, अशीं उदाहरणें पुष्कळ घडलीं व अजूनहि घडत आहेत. पत्नीवियोगाचा प्रसंग आला असतां विधवेशीं लग्न करावें, कीं कुमारीशीं करावें, अशा बुचकळ्यांत ज्याचें मन पडलें नाहीं, असे गृहस्थ सुशिक्षितांमध्यें हल्लीं शेंकडा दहा देखील मिळणार नाहींत. असें असतां शेंकडा दहापांचहि विधुर पुनर्विवाहाला तयार होत नाहींत, ही स्थिति अजून असावी ही गोष्ट अत्यंत निराशेची आहे. आम्हांमध्यें अशा कामीं लागणाऱ्या धैर्याचा अभाव आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. पुष्कळ लोक, विनाकारण अशा अडचणींत पडून आपणांला त्रास कशासाठीं करून घ्यावा या केवळ स्वार्थाच्या बुद्धीनेंच या कार्यापासून दूर राहतात हें अगदीं खरें आहे. वाटेल त्या स्वैर वर्तनानें वडिलांचीं मनें दुखलीं तरी त्याची पर्वा न करितां या प्रसंगीं मात्र एखाद्या काकीच्या अगर मामीच्या मागें लपणारे शेंदाड शिपाई आमच्या सुशिक्षितांत पुष्कळ आहेत. असे लोक कित्येक वेळां पुनर्विवाहाच्या कार्याचे शत्रु बनतात. पुनर्विवाहाच्या पुढाऱ्यांनीं मोठमोठ्या चुका करून घाण केली, पुनर्विवाहित मनुष्यें वाईट चालीचीं आहेत, वगैरे कारणांनीं आम्ही पुनर्विवाहापासून अलिप्त राहतों, असा बहाणा हे करीत असतात. पुनर्विवाहाच्या कामीं आपल्या मनाप्रमाणें न वागणाऱ्या लोकांत या अनेक प्रकारच्या मंडळींचा भरणा मोठा आहे यांत संशय नाहीं. परंतु कित्येक धीराच्या उदारधी गृहस्थांनाहि दुसऱ्या एका कारणानें पुनर्विवाहाच्या कामीं स्वतः उदाहरण घालून देतां येत नाहीं, ही गोष्ट खोटी नव्हे.

अगदीं जुन्या चालीचे वृद्ध आईबाप, वडील बंधु अगर वडील बहीण यांचीं मनें दुखलीं जाऊन आपल्यामुळें त्यांना पदोपदीं खालीं मान घाल-

ण्याचा प्रसंग यावा, ही गोष्ट विचारी मनुष्यालाहि बुचकळ्यांत पाडणारी आहे. एकीकडे निर्दोष वाटणारी व समाजहित आणि खरें स्वहित यांच्या दृष्टीनें आवश्यक अशी गोष्ट आचरणांत आणण्यासंबंधाची मनाची उचल, व दुसरीकडे अत्यंत प्रिय आप्तांचे प्रेमपाश तोडणाऱ्या या कृतीपासून मागें ओढणारी मनोवृत्ति, या दोहोंची झुंज सोडवणें फार कठिण आहे. आप्तांच्या प्रेमाला आपण मुकूं हा विचार स्वार्थाचा व हीन–वृत्ति–दर्शक आहे; पण त्यांना अपत्यप्रेमाला मुकावयाला लावणें भाग पडतें व कुलाला कलंक लागला अशा प्रामाणिक बुद्धीनें त्यांना दीर्घकाल दुःखांत रहावें लागतें, या विचारानें मन अस्वस्थ होणें हें उच्चवृत्तीचें दर्शक आहे. समाजाच्या दृष्टीचें कर्तव्य, व वृद्ध आप्तांच्या दृष्टीचें कर्तव्य, हीं भिन्न झालीं असतां जर मनुष्याच्या हातून इष्ट वर्तन घडलें नाहीं तर त्याला फारसा दोष लावितां येणार नाहीं व कदाचित् कित्येक विशेष प्रसंगीं तसें करणेंच योग्य असेल. दिवसेंदिवस, सन्मान्य वृद्ध आप्तांना दुःख होईल यासाठीं पुनर्विवाहासारखी गोष्ट करणें योग्य होणार नाहीं असे प्रसंग फार कमी येतील; पण पूर्वीच्या काळीं ते फार होते. कित्येक अशा लोकांवर फार कडक टीका करितात, पण ती करणें योग्य नाहीं असें मला वाटतें.

यासंबंधानें मला स्वतःला फार कडू अनुभव आले. माझ्या कृतीमुळें, अर्थात् तिच्यामुळें लोकांकडून जो त्यांना त्रास झाला त्यामुळें, माझे बंधु कांहीं महिने भ्रमिष्ट होऊन त्यांना कायमचें वेड लागतें कीं काय अशी भीति वाटूं लागली. मी पुण्यांत असतां माझ्या बंधूंना लोकापवादामुळें आपल्या मुलाच्या शिक्षणाची सोय रँगलर परांजपे यांजकडे करावी लागली. लोकापवादामुळें माझ्या आईला आपल्या पोटच्या मुलाला घरांत घेतां येईना, व परक्या घरीं राहिलेल्या आपल्या मुलाची गांठ मध्यरात्रीला काळोखांतून जाऊन घ्यावी लागे. पंढरपुरच्या यात्रेला जातांना आई व दादा हीं पुण्याला आलीं; पण मी पुण्याला असून त्यांना उतरण्याची सोय दुसऱ्या ठिकाणीं करावी लागली. अंतकाळीं आपल्या मुलानें आपल्याजवळ असावें असें कोणत्या आईला वाटणार नाहीं! पण मी गेलों असतां लोक विनाकारण नांवें ठेवतील, तेव्हां हा न आलेला बरा, असें वाटून अगदीं अखेरची वेळ येईपर्यंत तिनें आपल्या दुखण्याविषयीं मला बिलकूल कळूं

देऊं नये, व अखेरीला जेव्हां पत्र पाठविण्याला सांगावें तेव्हां तें निरुपयोगी व्हावें, व मला पत्र पोहोंचल्याबरोबर क्षणाचाहि विलंब न लावितां मीं निघावें, पण ती हा लोक सोडून गेल्यानंतर एका दिवसानें घरीं जाऊन पोहोंचावें, यापेक्षां सांसारिक माणसाला अधिक दुःख देणारी कोणती गोष्ट असणार? जी अनाथबालिकाश्रमाची संस्था पहाण्याकरितां फार दूरदूरचीं माणसें अनेक गैरसोयी सोसून येतात ती संस्था पहाण्याचा सहजीं योग आला असतां माझ्या अगदीं जवळच्या आप्तांनीं तो लोकापवादासाठीं टाळावा, ही गोष्ट मनुष्याच्या अंतःकरणाला झोंबल्यावांचून कशी राहील? असल्या भावी प्रसंगाचें चित्र मनुष्याच्या मनःपटावर उठून जर तो या कामीं पुढें पाऊल टाकण्याला कचरला, तर त्याला दोष तरी कसा द्यावा? रूढिपिशाच्चिके! तूं कसल्या शृंखलांनीं या हिंदु समाजाला जखडून टाकलें आहेस? वरून धर्माचें पांघरूण घेऊन अधर्म हाच धर्म असें तूं अज्ञ हिंदुसमाजाला भासवीत आहेस! डोळे असून तूं त्याला आंधळें करून सोडलें आहेस! हातापायांतील शृंखलांना हीं हस्तपादभूषणें म्हणून तो कवटाळीत आहे, व हें पाहून आपल्या पराक्रमाचें कौतुक करीत तूं आनंदसागरांत डुलत आहेस! धिक्कार असो या तुझ्या कृतीला!

अशा प्रसंगीं जें खरें मनोधैर्य लागतें तें स्वतःवर व संततीवर येणाऱ्या अडचणी व गैरसोयी सोसण्यासंबंधाचें नव्हे, तर आपणाला अप्रत्यक्ष रीतीनें जिव्हाळ्याच्या माणसांना दुःखसागरांत लोटून देणें भाग पडतें तें मन घट्ट करून सहन करण्यासंबंधाचें होय. शेंकडा ९० मनुष्यें या प्रश्नाचा केवळ स्वार्थाच्या दृष्टीनें विचार करतात व पहिल्या प्रकारच्या अडचणींना भिऊनच माघार घेतात. पण शेंकडा दहा मनुष्यें वरच्या दर्जाचीं असतात तीं या दुसऱ्या प्रकारच्या विचारांना महत्त्व देऊन कचरतात. ज्या ठिकाणीं मन कुसुमापेक्षांहि मृदु करावयाचें, त्याच ठिकाणीं तें वज्रापेक्षांहि कठोर करणारे शेंकडों कन्यापुत्र भरतभूमीच्या उदरीं निपजतील, तरच या रूढिव्याघ्रीच्या जबड्यांतून समाजधेनूची सुटका होऊं शकेल!

---

# प्रकरण पस्तिसावें

## विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळीच्या सेक्रेटरीच्या कामाचा राजिनामा

पुण्यांतील पहिला पुनर्विवाह १८७४ सालीं झाला. त्यानंतर १९ वर्षांनीं म्हणजे १८९३ सालांतील मार्च महिन्यांत दुसरा झाला व त्याच वर्षीं डिसेंबर महिन्यांत तिसरा झाला. १८९४च्या आरंभीं पुनर्विवाहाच्या कार्यासाठीं खटपट करणारी संस्था सुरू झाली व पुण्यांत या कार्याचें पाऊल बरेंच जोरानें पुढें पडूं लागलें. १८९५ सालीं एक आणि १८९६ सालीं एक असे आणखी दोन पुनर्विवाह पुण्यांत झाले. या दोन्ही विवाहांतील वर प्रथमवर होते, व पहिल्यांतील वधूचें कन्यादान वधूच्या वडील भावानें केलें होतें. पुढें दोन वर्षें तशीच गेलीं; परंतु १८९९त दोन पुनर्विवाह झाले. त्यांपैकीं एक माझ्या पुतणीचा होता. पुनर्विवाहाच्या कामीं पुढें पाऊल टाकल्यानंतर मजमध्यें आपल्या जबाबदारीसंबंधानें विशेष जाणीव उत्पन्न झाली, तेव्हां मीं माझ्या पुतणीला स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजांत घातलें. तेथलें तिचें शिक्षण पुरें होऊन तिला पहिल्या प्रतीचें म्हणजे पंचवीस रुपयांचें सर्टिफिकेट मिळालें. तिच्या नवऱ्याचीहि मॅट्रिक्युलेशनची परीक्षा होऊन त्यानें पुढील अभ्यास सोडून दिला होता. या उभयतांनीं शाळाखात्यांत नोकरी करावी असें योजून वऱ्हाडच्या शाळाखात्याकडे उभयतांकडून अर्ज करविला होता, त्याप्रमाणें त्यांची नेमणूक एका गांवीं झाली होती. परंतु तीं आपल्या जागेवर हजर होण्यापूर्वीच दुर्दैवानें माझ्या पुतणीवर वैधव्याचा घाला पडला. पुढें तिनें वऱ्हाडांत कांहीं वर्षें शिक्षकिणीचें काम केलें व नंतर मीं माझे मित्र प्रो. भाटे यांच्याशीं तिचा विवाह करून दिला. या विवाहाच्या मंगल प्रसंगीं आणखी एक मंगल घडून आलें. विवाहसमारंभासाठीं मंडळी जमून नाना प्रकारच्या गोष्टी बोलत बसली होती. 'शुभलग्नसावधान' होण्याची वेळ जवळ आली होती; इतक्यांत परांजपे सीनियर रँगलर झाल्याची तार आली व सर्व आनंदीआनंद होऊन गेला. त्या वेळीं माझे आनंदाश्रु मला आवरतना !

या संस्थेला स्थैर्य येण्यासाठीं १८९८ च्या ऑक्टोबर महिन्यांत ही संस्था कायदेशीर रीतीनें नोंदवून घेतली. अशा रीतीनें या संस्थेचें काम व्यवस्थित रीतीनें चाललें होतें खरें, तथापि आरंभीं जसें माझें सर्व लक्ष या संस्थेकडे होतें तसें अनाथबालिकाश्रमाची सुरवात झाल्यानंतर तें राहणें शक्य नव्हतें. शिवाय विधवाशिक्षणाचें काम व विधवाविवाहाचें काम हीं वेगळीं केलीं असतां विधवाशिक्षणाच्या कामाला विशेष जोर येईल, असें मला वाटूं लागलें होतें. माझ्या मनाची विधवाविवाहाकडील ओढ कमी होऊन ती विधवाशिक्षणाच्या कार्याकडे वळली, तो प्रकार असा.

पुनर्विवाहाच्या कार्यांत मन घातल्यापासून अनेक लोकांशीं माझा सहवास घडला व जुन्यानव्या अनेक मतांच्या लोकांशीं संभाषण करण्याचे प्रसंग आले. त्यावरून मला असें वाटूं लागलें कीं, या प्रश्नासंबंधानें लोकमत अजून अगदींच तयार झालें नाहीं, व कांहीं थोड्या व्यक्तींनीं आपली शिकस्त केली तरी या सुधारणेंत आपलें पाऊल फारसें पुढें पडण्याचा संभव नाहीं. या कार्यांत मोठी अडचण म्हणजे विवाहपाशानें बद्ध होऊं इच्छिणारीं योग्य वधूवरें मिळण्याची होय. ही अडचण अजूनहि फारशी कमी झालेली नाहीं. या कार्यांत उडी घालण्याला मनाची बळकटी मोठी पाहिजे, व अशा मनोधैर्याचीं प्रत्यक्ष उदाहरणें नजरेला पडल्यावांचून समाज या कार्याचा अंगीकार करण्याला तयार होणार नाहीं. सुशिक्षण आणि नीतिमत्तेची योग्य कल्पना यांची समाजांत–विशेषतः स्त्रीसमाजांत–वाढ झाल्यावांचून स्त्रीपुरुषांमध्यें मनोधैर्य तरी उत्पन्न व्हावें कसें? शिवाय हा प्रश्न धर्माचा मानला गेल्यामुळें व एकदां उडी घातल्यानंतर माघार घेणें शक्य नसल्यामुळें या कामांत उडी घेण्याला मनुष्यें कचरतात. तेव्हां माझ्यासारख्या सामान्य मनुष्यानें आपलें अल्पसामर्थ्य या अत्यंत बिकट कार्याकडेच खर्चीं घालावें, किंवा त्याहून सोपें एकादें कार्य हातीं घेऊन त्याकडे तें लावावें, हा प्रश्न माझ्यापुढें येऊन उभा राहिला. पंडिता रमाबाईचें शारदासदन निघाल्यापासून विधवांच्या शिक्षणासंबंधानें विशेष प्रकारची सहानुभूति माझ्यांत उत्पन्न झाली होती, व ती पुनर्विवाहाच्या कार्यांत पडल्यानंतर दुणावली होती. याचें एक विशेष कारण माझी पत्नी शारदासदनांतील पहिली विद्यार्थीण होती हें होय. दिवसेंदिवस

माझ्या मनांत असे विचार येऊं लागले कीं पुनर्विवाहाच्या प्रश्नाशीं झगडत राहून जितक्या विधवांना कष्टमय स्थितींतून बाहेर काढतां येणें शक्य आहे, त्यापेक्षां शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला असतां कितीतरी पट अधिक विधवांना कष्टमय स्थितींतून वर काढतां येईल. विधवाविवाहाचा प्रश्न धार्मिक समजला गेल्यामुळें त्यासंबंधानें लोकांची समजूत करणें फार कठिण काम होतें; परंतु विधवाशिक्षणाचा प्रश्न तसा नसल्यामुळें लोकांची समजूत करणें तितकें अवघड काम नव्हतें. विधवाविवाहाच्या प्रश्नासंबंधानें मनाची समजूत पटली, तरी त्या समजुतीचा फायदा आपल्या कुटुंबांतील विधवांना देणारा जर शेंकडा एक मनुष्य आढळला तर विधवाशिक्षणासंबंधानें मनाची समजूत पटल्यावर त्या समजुतीचा फायदा आपल्या कुटुंबांतील विधवांना देणारे शेंकडा दहा तरी निघतील, अशी खात्री वाटे. अशा अनेक विचारांनीं माझें मन विधवाशिक्षणाच्या कार्याकडे ओढ घेऊं लागलें.

विधवाशिक्षणाचें कार्य मीं हातीं घेतलें त्याच्या अगोदर दीड वर्ष तें हातीं घेण्याला एक उत्तम संधि आली होती. इसवी सन १८९३ च्या उत्तरार्धांत पंडिता रमाबाईच्या शारदासदनाविरुद्ध लोकमताचा भयंकर क्षोभ झालेला होता व हिंदु शारदासदन काढण्यासंबंधानें त्या वेळीं खटपटहि सुरू झाली होती. त्या वेळीं जर कोणी कर्तृत्ववान् पुरुष अगर स्त्री पुढें आली असती, तर हिंदु शारदासदन मोठ्या प्रमाणावर एकदम सुरू झालें असतें; पण, त्या वेळीं तसा योग नव्हता. माझी या उद्योगासंबंधानें सहानुभूति होती; पण या वेळीं ती तितकी तीव्र नव्हती. या वेळीं माझें मन पुनर्विवाहाच्या कार्यांत गढून गेलेलें होतें, म्हणून हा प्रश्न मीं बाजूला टाकून पुनर्विवाहाच्या कार्यासाठींच शिकस्तीचे प्रयत्न करूं लागलों. पुढें दीड वर्षानें या बाजूच्या प्रयत्नांना सुरुवात केली.

अनाथबालिकाश्रमाचें काम दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें मला पुनर्विवाहाच्या कामाकडे लक्ष्य देण्याला वेळ मिळेनासा झाला. तथापि, १९०० सालच्या २८ जानेवारीपर्यंत मंडळीच्या चिटणीसाचें काम मीच करीत होतों. त्या दिवशीं प्रोफेसर भाटे यांची चिटणीसाच्या जागीं नेमणूक होऊन त्यांजकडे मी सदर मंडळीच्या कामाचा चार्ज दिला; त्या वेळीं त्या मंडळीचा फंड एकंदर साडेतीन हजार रुपये होता. या मंडळीचे काम

अजूनहि चालू आहे. श्रीयुत प्रो. सहस्रबुद्धे व श्रीयुत रामभाऊ जोशी हे हल्लीं मंडळीचे चिटणीस आहेत. या संस्थेच्या आश्रयाखालीं बरेच पुनर्विवाह झाले.

या रीतीनें पुनर्विवाहाच्या कार्यासाठीं सात वर्षें थोडेफार श्रम करून व विधवाविवाहाच्या मंडळीच्या आरंभापासून सहा वर्षें चिटणीसाचें काम करून अखेर मीं त्या मंडळीच्या विशेष जबाबदारीच्या कामाचा निरोप घेतला, तथापि विधवाविवाहाच्या कार्याचा निरोप मीं घेणें अशक्य होतें. हें कार्य अत्यंत पवित्र आहे अशी माझी समजुत पूर्वीं होती, तशीच त्या वेळीं होती, व अजूनहि आहे, व म्हणूनच तेव्हांपासून आतांपर्यंत मी विधवा-विवाहप्रतिबंधनिवारक * मंडळीच्या कमेटीचा सभासद राहिलों आहें. विधवाशिक्षणाच्या कार्याला अधिक वेळ मिळावा व तें कार्य अधिक सुकर व्हावें, एवढ्यासाठींच मला मंडळीच्या चिटणिसाचें काम सोडणें भाग पडलें.

या विषयाची रजा घेण्यापूर्वीं एका थोर गृहस्थांच्या कळकळीच्या मदतीबद्दल उल्लेख करावयाचा आहे. सदर गृहस्थ प. वा. श्रीयुत वामन विश्वनाथ जोशी हे होत. या गृहस्थांनीं पुनर्विवाहाच्या कार्याला आपलें तन–मन–धन अर्पण केलें. हे पूर्वीं झांशी येथें रेल्वेच्या लोकोऑफिसांत ४५ रुपये पगारावर क्लार्क होते व पुढें तेथेंच त्यांना बढती मिळण्याचा फार संभव होता. त्यांना पुनर्विवाहाच्या कार्याबद्दल फार कळकळ वाटे व त्यांनीं या विषयावरील पुस्तकांचा चांगला संग्रह केला होता. इकडे पुनर्विवाहाच्या मंडळीचें काम जोरानें सुरू झाल्यानंतर त्यांनीं माझ्याशीं पत्रव्यवहार केला व अखेरीला आपल्या तेथल्या नोकरीचा राजिनामा देऊन दरमहा वीस रुपयांत संतुष्ट राहून हें काम करण्यासाठीं ते पुण्याला आले. या मंडळीच्या कामाला व अनाथबालिकाश्रमाला यांची चांगली मदत झाली. मी या मंडळीच्या चिटणीसाचें काम सोडल्यानंतर हे मंडळीचे दुय्यम चिटणीस होऊन यांनीं कांहीं वर्षें फक्त या मंडळीचेंच काम केलें. पुढें या मंडळीच्या उत्पन्नांतून त्यांचा पगार भागणें कठिण होऊं

---

* ह्या मंडळीनें आतां 'विधवा-विवाह-मंडळी' असें आटोपशीर नांव घेतलें आहे. श्रीयुत डॉ. व्ही. एल. देशपांडे व श्री. मा. रा. जोशी हे तिचे चिटणीस आहेत. मी व्यवस्थापक मंडळीचा एक सभासद आहें.

लागलें म्हणून त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजांतील कारकुनाचें काम पत्करलें, तथापि देहावसानापर्यंत त्यांची या कार्यावरील निष्ठा ढळली नाहीं. पुरोहितावांचून मंडळीचें फार अडतें असें पाहून त्यांनीं विवाह, व्रतबंध, श्रावणी इत्यादि विधींचा सप्रयोग अभ्यास केला व ते पुनर्विवाहित मंडळीचे पुरोहित बनले. यांनीं आपली एक हजार रुपयांची विम्याची पॉलिसी विधवाविवाहप्रतिबंधनिवारक मंडळीला अर्पण केली. यांची या अंगीकृत कार्यावरील निष्ठा प्रशंसनीय असून त्यांचा स्वार्थत्याग दांडगा होता. यांच्यासारखीं तळमळीनें काम करणारीं मनुष्यें आमच्या समाजांत अत्यंत विरळ आहेत.

# प्रकरण छत्तिसावें

## विधवाशिक्षणाच्या चळवळीचा संक्षिप्त इतिहास

पाश्चात्य विद्येनें नवीन विचारांची जागृति झाल्याबरोबर विचारी मनुष्यांचें लक्ष हिंदु विधवांच्या कष्टमय स्थितीकडे वळलें, यांत नवल नाहीं. त्या वेळीं यांची स्थिति सुधारण्याचा एकच मार्ग सर्वांना दिसूं लागला. तो मार्ग म्हणजे विधवांना पुनर्विवाहाची मोकळीक करून देणें हा होता. इसवी सन १८५६ सालीं जेव्हां पुनर्विवाहाचा कायदा पास झाला, तेव्हां देशाच्या एका टोंकापसून तों दुसऱ्या टोंकापर्यंत जिकडेतिकडे चळवळ उडून गेली. रत्नागिरीसारख्या मागासलेल्या ठिकाणाहूनहि हा कायदा पास होऊं नये यासाठीं किती तरी सह्यांचा अर्ज गेला होता. सुशिक्षित लोकांमध्येंहि फार थोडे लोक या कार्याला अनुकूल होते. बाकी सर्व या कायद्याला विरुद्ध होते. परंतु या कामीं लोकमताकडे लक्ष न देतां सरकारानें कायदा पास केला. सामान्यतः स्त्रियांच्या व विशेषतः विधवांच्या उन्नतीच्या कार्याचा हा कायदा आधारस्तंभ होय.

त्या वेळीं विधवाशिक्षणाच्या कार्याकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं हें साहजिकच झालें. पुरुषांच्याच शिक्षणाला ठिकाणा नव्हता, तेव्हां स्त्रियांच्या व विशेषतः विधवांच्या शिक्षणाची कल्पना मनांत यावी कशी ! विधवा-शिक्षणाच्या कार्याचा पाया हिंदूंच्या उच्च वर्णांतील एका विधवेकडून घातला जावा, व त्यावरील इमारतीचें कामहि उच्च वर्णांतील विधवांच्याच प्रोत्साहनानें व मदतीनें त्यांशीं विवाहानें बद्ध झालेल्या पुरुषांकडून सुरू व्हावें, व पुढेंहि महाराष्ट्रांत श्रीमती पार्वतीबाई, वेणूबाई व काशीबाई या विधवांचें साहाय्य मिळून तें विशेष रूपाला यावें, या गोष्टी केवळ आकस्मिक नसून निसर्गाच्या उत्क्रमणनियमांनीं घडून आल्या असाव्या, असा माझा तर्क होतो. याला अपवाद असा एक मोठा प्रयत्न झाला, व तो तडीला जाण्याचाहि संभव दिसत होता. परंतु तो प्रयत्न बाहेरून जितका भपकेदार दिसत होता तितका त्याला आंतून जोर नव्हता, यामुळें 'आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः' या नियमाचें तो एक उदाहरण होऊन बसला.

या गोष्टी पुढील कार्यांच्या पूर्वगामी असून तें घडवून आणण्याला कारणीभूत असल्यामुळें त्या येथें सांगणें जरूर आहे.

विधवाशिक्षणाच्या इमारतीचा पाया घालण्याचें अत्यंत श्रेष्ठ कार्य पंडिता रमाबाई यांनीं केलें. जीं कांहीं कोंकणस्थ ब्राह्मणांचीं कुटुंबें मंगळुराकडे जाऊन राहिलीं होतीं त्यांपैकीं रमाबाईच्या पूर्वजांचें कुटुंब हें एक होय. यांचे वडील जुन्या तऱ्हेचे शास्त्री असून यांनीं रमाबाईना बरींच वर्षें अविवाहित ठेवून संस्कृत विद्येंत निष्णात केलें. पुढें वडील वारल्यानंतर त्यांजवर अनेक प्रसंग येऊन त्या बंगाल्याकडे गेल्या. तिकडील पंडितांनीं त्यांची विद्वत्ता पाहून त्यांना ' सरस्वती ' ही पदवी दिली. पंडिता रमाबाई सरस्वती यांनीं नंतर एका बंगाली गृहस्थांशीं विवाह केला. परंतु योगायोग वेगळे होते. या विवाहापासून त्यांना एक कन्या होऊन वर्षदीडवर्षाच्या आंतच त्यांजवर वैधव्याचा घाला आला. यांचें मन सुसंस्कृत असल्यामुळें व निसर्गाच्या शाळेंत यांना स्वावलंबनाचें उत्तम शिक्षण मिळाल्यामुळें या सामान्य विधवेप्रमाणें शोक करीत व दैवाला बोल लावीत बसल्या नाहींत. यांनीं लागलाच आपला मार्ग आंखला. मुंबई व महाराष्ट्र हा प्रांत त्यांनीं आपलें कर्तव्यक्षेत्र म्हणून पसंत केला, व त्या आपल्या कोमल कन्येला घेऊन पुण्याला आल्या. त्यांचीं पुण्यांत व मुंबईत पुष्कळ पुराणें व व्याख्यानें झालीं, त्यांना अतोनात गर्दी जमे. विधवांच्या शिक्षणासाठीं प्रयत्न करण्याची त्यांची इच्छा होती, व ती त्यांनीं पुण्या–मुंबईच्या पुढाऱ्यांना कळविली; परंतु त्यांजकडून त्यांना पाहिजे होती तेवढी मदत मिळेना. तेव्हां त्यांनीं निराळा मार्ग आंखला. मिशनरी मंडळीच्या मदतीनें त्या इंग्लंडाला गेल्या, व तेथें इंग्रजी शिकून मग त्या अमेरिकेला गेल्या. तेथील ' वसुधैवकुटुंबकम् ' या वृत्तीच्या थोर पुरुषांच्या मदतीनें त्यांनीं द्रव्याची मदत मिळविली, व परत मुंबईला येऊन १८८९ सालीं चौपाटीवरील एका बंगल्यांत शारदासदनाची स्थापना केली. त्यांनीं अमेरिकेंत रमाबाई असोसिएशन नांवाची संस्था काढून तिच्या शाखा मोठमोठ्या प्रसिद्ध ठिकाणीं स्थापिल्या होत्या. या संस्थेनें दहा वर्षेंपर्यंत शारदासदनाचा खर्च चालविण्याचें कबूल केलें होतें. पुढें हिंदुस्तानांतल्या लोकांनीं

या संस्थेचा खर्च चालवावा, अशी योजना होती. मुंबई हें ठिकाण शारदासदनाला योग्य नव्हे, असें त्यांना वाटून त्यांनीं ही संस्था पुण्याला आणली, व लवकरच तिच्यासाठीं जागा विकत घेऊन तिजवर भव्य इमारती उठविल्या. पंडिता रमाबाई या ख्रिस्ती झालेल्या होत्या, तथापि सदनांतील विद्यार्थिनींना ख्रिस्ती धर्माचें शिक्षण न देतां हिंदु धर्माप्रमाणेंच त्यांची व्यवस्था ठेविली जाईल, अशी योजना रमाबाई असोसिएशनच्या संमतीनें ठरली होती, व डॉ. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखालीं इकडील पुढाऱ्यांचा एक ॲडव्हायसरी बोर्ड (सल्लागार मंडळ) स्थापन झाला होता. लोकांमध्यें विश्वास उत्पन्न होऊन ६५ पासून ७० पर्यंत विद्यार्थिनी जमल्या होत्या, व त्या बहुतेक विधवाच होत्या. बाहेरून सर्व ठीक चाललेलें दिसत होतें; परंतु आंतून कांहीं विद्यार्थिनींचीं मनें ख्रिस्ती धर्माकडे वळत होतीं. इसवी सन १८९३ च्या जुलै महिन्यांत शारदासदनांतील दहाबारा विद्यार्थिनींनीं बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्तीधर्म स्वीकारला अशी वार्ता हां हां म्हणतां वणव्याप्रमाणें पसरली, आणि ती खरी ठरून सगळें महाराष्ट्र दुःखाकुल झालें. उच्च वर्णांतील इतक्या स्त्रिया एकदम ख्रिस्ती झाल्याचें उदाहरण हिंदुस्तानांतील मिशनरींच्या कामाच्या इतिहासांत सांपडेल कीं नाहीं, याची शंका आहे. पंडिता रमाबाईवर व ख्रिस्ती मिशनऱ्यांवर वर्तमानपत्रांतून व खासगी संभाषणांतून शिव्याशापांचे भडिमार सुरू झाले; पण आंतड्याला पीळ पडून स्वोन्नतीच्या मार्गाचा प्रयत्न मात्र व्हावा तितक्या नेटानें झाला नाहीं! डॉ. भांडारकरप्रभृति ॲडव्हायसरी बोर्डाच्या सभासदांनीं आपल्या सह्यांनीं एक पत्र प्रसिद्ध करून तें सदनांतील विद्यार्थिनींच्या पालकांकडे पाठविलें. त्यांतील मजकूर कीं, "आम्ही बोर्डाचा राजीनामा दिला आहे व यापुढें मुली सदनांत ठेवणें धोक्याचें आहे."

ही हकीकत अमेरिकेंत रमाबाई असोसिएशनकडे जाऊन तिकडून एक बाई इकडील लोकांशीं तडजोड करण्यासाठीं आल्या. परंतु एकदां बिघडलेली घडी पुनः बसली नाहीं. हिंदूंच्या उच्च वर्णांतील विधवांना शारदासदनाचा उपयोग होईनासा झाला, आणि लवकरच त्यांनीं आपली संस्था पुण्यांतून काढून केडगांवीं नेली. पंडिताबाईंचे यापुढील प्रयत्न मुख्यत्वें हीन वर्णांच्या उन्नतीकडे वळले.

पंडिता रमाबाई सरस्वती यांच्याशीं कित्येक गोष्टींत जरी मतभेद झाला, तरी या फार वरच्या कोटींतल्या म्हणजे 'परोपकाराय सतां विभूतयः' या कोटींतल्या होत, असें निदान माझें तरी मत आहे. यांनीं विधवाशिक्षणाचें कार्य स्वतःच्या बळावर केवढ्या तरी स्वरूपाला आणलें, याबद्दल हिंदी समाजानें व विशेषतः दक्षिणी समाजानें यांजबद्दल नेहमीं कृतज्ञ राहिलें पाहिजे. अशा पराक्रमी स्त्रिया हिंदुस्थानांतच काय, पण या भूतलावर एका काळीं हाताच्या बोटांनीं मोजण्याइतक्यासुद्धां मिळावयाच्या नाहींत!

विधवाशिक्षणाचा दुसरा प्रयत्न बंगाल्यांत झाला. बाबू शशिपाद बानर्जी यांनीं मुंबईत शारदासदन सुरू होण्यापूर्वी दोन वर्षें म्हणजे १८८७ सालीं कलकत्त्याजवळ बरानगर येथें आपल्या घरीं विधवागृह काढिलें. हे गृहस्थ ब्रह्मो असून पुनर्विवाहित आहेत. यांचें विधवागृह बऱ्याच स्वरूपाला आलें होतें, व त्यांत भरभराटीच्या वेळीं तीस विद्यार्थिनी होत्या. या विधवागृहांत पुण्याचे प. वा. विनायकराव चावरेकर यांनीं आपल्या तिघी बहिणींना पाठविलें होतें. त्यांपैकीं विधवा बहिणीला आश्रमाच्या मंडळीकडून दरमहा तीन रुपये मदत देण्यांत येत असे. यांना हिंदी लोकांपेक्षां युरोपियन लोकांकडूनच द्रव्याची मदत व सहानुभूति अधिक मिळत असे. ही संस्था पंधरासोळा वर्षें चालवून उत्पादकांनीं आपण होऊनच बंद केली. बंद करण्याचें कारण द्रव्याच्या व कळकळीनें काम करणाऱ्या मनुष्यांच्या मदतीचा अभाव, हें होय. बाबू शशिपाद * वृद्ध झाले होते, व त्यांचा भार शिरावर घेण्याला त्यांना कोणी मिळालें नाहीं. बंगाल्यांत त्या वेळीं स्त्रीशिक्षणाचा प्रसार बराच झाला होता, व ग्रॅजुएट स्त्रिया दशकांनीं मोजतां येण्यासारख्या होत्या, तरीहि असली संस्था बंद करण्याचा प्रसंग दहाबारा वर्षांपूर्वी आला, ही गोष्ट हिंदुस्तानाची हीन स्थिति दर्शविणारी आहे.

तिसरा प्रयत्न मद्रासकडे झाला. रा.ब.वीरेश लिंगम् पंतलु ×हे विधवांच्या कार्याचे त्या प्रांतांतले अध्वर्यु होत. हेहि ब्रह्मो असून पुर्नाववाहित आहेत. मी १८९४साली सामाजिक परिषदेसाठीं मद्रासला गेलों असतां यांच्या चिमकुल्या विधवागृहांत गेलों होतों. तेव्हां तेथें चार विद्यार्थिनी होत्या. तेव्हां-

* हे गृहस्थ परलोकवासी होऊन बरींच वर्षें झालीं.

× हेहि परलोकवासी होऊन बरीच वर्षें झालीं.

पासून आतांपर्यंत यांचे प्रयत्न सारखे चालू आहेत; पण त्यांना म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. ते पुढें पेनशन घेऊन राजमहेंद्रीला गेले, व त्यांनीं आपलें विधवागृहहि आपल्याबरोबर नेलें. यांना लोकांकडून मदत मिळावी तशी मिळाली नाहीं. यांनीं मात्र आपलें सर्वस्व या विधवागृहाला अर्पण केलें. अजून यांनीं हें विधवागृह चालू ठेविलें आहे.

विधवाशिक्षणासाठीं झालेला चवथा प्रयत्न म्हणजे पुण्यांतील शारदासदनावर किटाळ आल्यानंतर पुण्यांत हिंदु शारदासदन स्थापण्यासाठीं १८९३ च्या अखेरीला झालेला प्रयत्न होय. हा प्रयत्न यशस्वी झाला असता, तर मी पुनर्विवाहित असल्यामुळें अनाथबालिकाश्रमासंबंधानें जे गैरसमज पसरले त्यांना अवकाश मिळाला नसता; पण दुर्दैवानें हा प्रयत्न तडीला गेला नाहीं. शारदासदनांतून ज्या गरीब विधवा निघाल्या, त्यांच्या शिक्षणाची सोय स्त्रियांच्या हायस्कुलांत करून त्यांना दोनतीन वर्षें मदत करण्याच्या कामीं या प्रयत्नाचा उपयोग झाला.

---

# प्रकरण सदतिसावें

## अनाथबालिकाश्रमाची मंडळी

विधवाशिक्षणाविषयींच्या आपल्या कल्पना कृतींत उतरविण्याची तळमळ उत्पन्न झाल्याबरोबर त्यासाठीं आपणाला काय करितां येईल या विचाराला मी लागलों. प्रथम असें मनांत आलें कीं, पुनर्विवाहाची संस्था आयती बनलेली आहे, तिच्या आश्रयाखालींच विधवागृह काढण्याची खटपट करावी. या विचाराप्रमाणें तारीख १३ एप्रिल १८९५ रोजीं सदर संस्थेच्या सभेंत तशा अर्थाचा एक ठराव करून घेतला, व पुनर्विवाहाच्या कार्यासाठीं फिरत असतां या कार्यालाहि थोडी वर्गणी जमविण्याचा यत्न केला. पुढें लवकरच मला असें वाटूं लागलें कीं, पुनर्विवाहाच्या संस्थेच्या आश्रयाखालीं विधवागृह निघालें तर ही संस्था पुनर्विवाहासाठींच आहे असा लोकांचा गैरसमज होईल, आणि शिक्षणाचा फायदा घेण्यासाठीं लोक आपल्या विधवा मुलींना पाठविण्याला कचरतील, यासाठीं विधवागृह काढणें तें अगदीं स्वतंत्रपणें निराळी संस्था म्हणून काढावें. हे माझे विचार मीं पुनर्विवाहाच्या संस्थेला कळविले व १५ फेब्रुवारी १८९६ रोजीं सदर संस्थेकडून दुसरा एक ठराव पास करून घेतला, तो येणेंप्रमाणें:—" कर्वे यांनीं विधवागृहाकरितां मिळविलेल्या साहाय्याचा त्यांना युक्त वाटेल त्याप्रमाणें उपयोग करावा."

इतकें झाल्यावर मी नवीन योजनेला लागलों. विधवागृह चालविणें हें मोठ्या खर्चाचें काम होतें. स्वतः कांहीं तरी केल्यावांचून दुसऱ्याजवळ वर्गणी मागण्याचा आपणाला हक्क उत्पन्न होत नाहीं. या विचारानें मीं आपली स्वतःची सर्व शिल्लक म्हणजे एक हजार रुपये या कार्याला अर्पण करण्याचा संकल्प केला होता; पण तो कोणाला कळविला नव्हता. वर्गण्या मिळाल्या तर जमविण्याचें व वार्षिक वर्गण्यांचे आंकडे घेण्याचें काम चालविलें होतें, व कांहीं गृहस्थांनीं वार्षिक वर्गण्यांचें बरेचसे आंकडे घातलेहि होते. पण वर्गणीचे आंकडे व वसूल यांमध्ये हिंदुस्थानांत तरी अंतर फार असतें व सतरा वर्षांपूर्वी तर तें फारच असे! कांहीं झालें तरी हें काम हातीं घ्यावें व त्यासाठीं कमालीचा प्रयत्न करावा, असा मीं निर्धार केला, व १८९६

च्या मे महिन्याच्या २५ तारखेच्या सुधारकपत्रांत आपल्या सहीनें एक पत्र प्रसिद्ध केलें. तें असें:—

### एका लहानशा विधवागृहासाठीं यत्न

रा. रा. सुधारककर्ते यांसः—

वि. वि. सुधारकाच्या गेल्या दोन अंकांत विधवागृहाच्या आवश्यकतेबद्दल वगैरे जो मजकूर आला आहे, त्यामुळें आपल्या वाचकांचे या प्रश्नाबद्दलचे विचार बरेच जागृत झाले असतील. तेव्हां ही संधि साधून आज एक वर्षभर एका लहानशा विधवागृहासाठीं जो यत्न चालला आहे त्यासंबंधानें माहिती दिली असतां फायदेशीर होईल असें वाटून खालील मजकूर आपणाकडे पाठविला आहे.

येथील शारदासदनापासून आपल्या लोकांना (वरिष्ठ जातींतील) उपयोग व्हावयाचा नाहीं अशी माझी खात्री झाल्यानंतर केवळ आपल्या लोकांच्या देखरेखीखालीं लहानसें तरी विधवागृह कसें काढतां येईल, याविषयींचे विचार मनांत घोळूं लागले. परंतु 'उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः' या वाक्यांत सांगितल्याप्रमाणेंच त्यांची स्थिति झाली. आपण बोलूनचालून द्रव्यहीन; बरें, द्रव्यवानांच्या हृदयांना द्रव आणून त्यांजकडून द्रव्य मिळवून त्यावर गृह चालवावें, तर तेंहि सामर्थ्य आपल्या अंगीं नाहीं; या व अशाच विचारांनीं मन निराश होऊन जाई. पुढें विधवाविवाह-प्रतिबंध-निवारक मंडळीचें काम मीं हातीं घेतलें, व त्यांत जेव्हां बरेंच यश येण्याचा संभव दिसूं लागला, तेव्हां ठिकाठिकाणीं फिरून लोकांकडून पुनर्विवाहाच्या कार्याला मदत मिळविण्यासाठीं यत्न करण्याचा मीं निश्चय केला. या वेळीं विधवागृहाची कल्पना पुनः डोक्यांत येऊं लागली. पुनर्विवाहाच्या कार्यासाठीं फिरत असतांनाच, विधवागृहाची संस्था उत्पन्न झाली असतां तिला कोणाकडून किती मदत मिळण्यासारखी आहे, याचा अजमास करण्याला सुलभ पडेल, व विधवा विवाह-

प्रतिबंध-निवारक मंडळीच्या फंडांतूनहि कांहीं मदत मिळून पांचसात विधवांसाठीं लहानसें गृह काढतां येईल, असा विचार मनांत येऊन मंडळीच्या साधारण सभेंत तो प्रश्न आणला, व सभेच्या परवानगीनें कामाला सुरुवात केली. ही गेल्याच्या मागल्या एप्रिल महिन्यांतली गोष्ट. त्या वेळीं मी सांगली, मिरज, बेळगांव, कोल्हापुर वगैरे ठिकाणीं फिरावयाला गेलों, व विधवा-गृहासाठीं वार्षिक वर्गण्यांचे आंकडे मिळविण्याची खटपट केली. परंतु त्या खटपटीला मुळींच यश आलें नाहीं म्हटलें तरी चालेल. कारण वीसपंचवीस रुपये वार्षिक वर्गण्या मिळण्यापुरते काय ते आंकडे मिळाले. जून महिन्यांत परत आल्यानंतर ही स्थिति पाहुन बहुतेक निराशाच झाली. तथापि हातीं घेतलेला महत्त्वाचा उद्योग अजीबात सोडून देण्याची बुद्धि होईना आणि विधवागृह स्थापित होण्याची थोडी तरी संभवनीयता लोकांच्या नजरेला आणण्यासारखी स्थिति दाखविल्याशिवाय लोकांजवळ वर्गण्यांचे आंकडे मागणें अगदीं निरर्थक होईल, हें पूर्वीच्या अनुभवावरून उघड दिसत होतें. तेव्हां आतां पुढें काय करावें, हा मला मोठा विचार पडला लोकांजवळ मागण्यापूर्वी आपण आपली शिकस्त करावी असें मनांत येऊन आपल्या गरीबीकडे लक्ष न देतां एक हजार रुपये या कार्याला अर्पण करण्याचा मीं निश्चय केला, व 'विधवाविवाहासाठीं एका गृहस्थानें एक हजार रुपये देऊं केले आहेत,' असें विधवाविवाह प्रतिबंध-निवारक मंडळीच्या रिपोर्टांत प्रसिद्ध केलें. पुढें सप्टेंबर महिन्यांत विधवाविवाह-प्रतिबंध-निवारक मंडळीच्या कामासाठीं फिरावयाला गेलों, तेव्हां विधवागृहासाठीं लोकांकडून आंकडे मिळविण्याची खट-पट केली. या वेळीं केवळ पूर्वीप्रमाणें स्थिति झाली नाहीं. दोघां-गृहस्थांनीं प्रत्येकीं एका विधवेचा खर्च देण्याचें कबूल केलें, व शिवाय तीनशें रुपयांच्या वर्गणीचे आंकडे पडले. आंकडे आणि वसूल झालेली रक्कम यांच्यामध्यें बराच फरक पडण्याचा संभव

आहे. तथापि पांचसात विधवांचें गृह चालण्यासारखें आहे, अशी स्थिति दिसल्यावरून त्याची काय व्यवस्था करावी अशाविषयीं विधवाविवाह-प्रतिबंध-निवारक मंडळीच्या वार्षिक सभेंत विचार झाला. विधवाविवाहापेक्षां विधवाशिक्षणाला लोकांची अनुकूलता अधिक असल्यामुळें विधवाविवाह-प्रतिबंध-निवारक मंडळीच्या हातांत विधवागृह ठेवून लोकांचा त्या विषयीं गैरसमज करून देणें चांगलें नाहीं असें माझें मत असल्यामुळें मीं असें सुचविलें कीं, विधवागृहाची संस्था निराळी स्वतंत्र करून तिची व्यवस्था त्या संस्थेला वर्गणी देणारांच्या हातांत असावी, व विधवाविवाह-प्रतिबंध-निवारक मंडळीकडून जितकी मदत होईल त्या मानानें त्या मंडळीचे मुखत्यार त्या संस्थेंत असावे; परंतु सभेंत हजर असलेल्या दुसऱ्या कित्येक सभासदांचें मत असें पडलें, कीं, विधवाविवाह-प्रतिबंध-निवारव मंडळीच्या हातांतच विधवागृहाची संस्था ठेवणें इष्ट आहे. यावर बरीच भवतिनभवति झाली, परंतु निश्चित असें कांहींच ठरलें. नाहीं. पुढें फिरून या उद्योगाला आरंभ करावयाचा, इतक्यांत मी आजारी पडलों व बरा झाल्यानंतर प्रकृति सुधारण्यासाठीं कोंकणांत गेलों; त्यामुळें अजून वरील प्रयत्नाला निश्चित स्वरूप देतां आलें नाहीं. तथापि त्याची दिशा मीं आपल्या मनाशीं ठरविली आहे, ती पुढें देतों—

केवळ आपल्या लोकांच्या देखरेखीखालीं चालणारें विधवागृह स्थापन होण्याला किती वर्षें लागतील तीं लागोत, परंतु आजचा यत्न असा करावयाचा, कीं, त्यापासून पुढील प्रयत्नांस कांहीं तरी मदत व्हावी; म्हणजे प्रत्येक यत्नास श्रीपासून आरंभ करावा लागतो तसें होणार नाहीं. तथापि तूर्तातूर्त फायदा नजरेला पडल्याशिवाय या यत्नास मदत करण्याची कोणास इच्छा होणार नाहीं. हे दोन्ही हेतु साध्य होण्याकरितां जमलेल्या पैशापैकीं कांहीं भाग कायमच्या शिलकेंत टाकिला पाहिजे व बाकी-

च्याचा उपयोग कांहीं विधवांचें शिक्षण चालविण्याच्या कामीं केला पाहिजे. असें करावयाचें म्हटलें म्हणजे आज स्वतंत्र विधवागृह काढण्याची कल्पना सोडून दिली पाहिजे. आम्हांला तितकी कळकळ असती तर एक सोडून पांच विधवागृहें आम्हीं चालविलीं असतीं, परंतु ही गोष्ट आमच्या काळजाला झोंबतच नाहीं याला काय करावयाचें ? हें मनांत आणून असा विचार ठरविला आहे, कीं, शंभर रुपये अगर त्याहून अधिक ज्या देणग्या मिळतील त्या कायमच्या फंडांत टाकून त्यांच्या व्याजाचा मात्र चालू खर्चाकडे उपयोग करावयाचा; आणि शंभरांहून कमी किंमतीच्या देणग्या व वार्षिक वर्गण्या यांचा निम्मे भाग कायमच्या शिलकेंत टाकून निम्मे चालू खर्चाकडे लावावयाचा. दहावीस वर्षांनीं विधवागृहाची स्थापना करण्याचा योग आल्यास कायमचा फंड त्याच्या उत्पादकांच्या हवालीं करितां येईल, व चालू खर्चासाठीं जी रक्कम हातांत राहील तींतून कांहीं विधवांचा खर्च चालवितां येईल. विधवागृह सुरू करण्याची ऐपत अंगीं येईपर्यंत येथील फीमेल हायस्कुलाच्या बोर्डिंगांत कांहीं विधवा ठेवून त्यांचा खर्च चालविला म्हणजे झालें. पांच-सात वर्षांच्या अनुभवानें पांचसात विधवांचें गृह चालवितां येईल, असा अजमास वाटल्यास तसें पुढें करतां येईल.


अशा रीतीनें सुरुवात केली असतां मध्येंच प्रयत्न सोडून द्यावा लागणार नाहीं लोकांकडून मदत मिळून त्याला थोडें स्वरूप आलें तर उत्तमच; पण तें न आलें तरी मला आपलें कर्तव्य करतां येईल. एका विधवेचें तरी या फंडांतून पोषण होऊं शकेल. या उद्योगाला लोकांकडून मुळींच आश्रय मिळाला नाहीं, तरी देखील माझ्या हजार रुपयांच्या व्याजांत जरूर तितकी भर घालून मी हयात आहें तोंपर्यंत एका विधवेच्या तरी शिक्षणाची तजवीज करीन. येणेंप्रमाणें आजपर्यंतची हकीकत आहे. थोड्याच दिवसांत या प्रश्नाला निश्चित स्वरूप देण्यांत

येईल व त्यासबंधाचे नियमहि केले जातील. ते झाल्यावर प्रसिद्धीकरतां आपल्याकडे पाठवून देईनच. कळावें, ही विनंति.

हें पत्र प्रसिद्ध झाल्यावर या कार्याला अनुकूल होतील असें वाटलें त्या गृहस्थांच्या मीं गांठी घेतल्या, व तारीख १४ जून १८९६ रोजीं प. वा. रा. ब. वि. मो. भिडे यांच्या घरीं त्यांच्याच अध्यक्षतेखालीं एक लहानशी प्राथमिक सभा भरविली. या सभेला सोळा गृहस्थ हजर होते. त्या सभेंत कांहीं ठोकळ नियम ठरून 'अनाथबालिकाश्रमाची मंडळी' स्थापन करण्यांत आली. मला त्या मंडळीचे चिटणीस नेमलें, व डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर यांची अध्यक्षांच्या जागीं योजना केली. नंतर मी वर्गण्या जमविण्याच्या उद्योगाला लागलें. द्रव्यबलावांचून पुढें पाऊल पडणें शक्य नाहीं हें मला स्पष्ट दिसत होतें. यासाठीं आश्रमाची स्वतंत्र स्थापना करण्याच्या भानगडींत न पडतां, ज्या विधवा मदतीसाठीं अर्ज करतील, त्यांची राहण्याची व शिकण्याची सोय फीमेल हायस्कुलाच्या बोर्डिंगांत करून द्रव्यबल संपादन करण्याच्या मार्गाला लागावें, असा निश्चय करून तो क्रम मीं सुरू केला. तारीख २४ जानेवारी १८९७ च्या साधारण सभेला पहिला रिपोर्ट सादर करण्यांत आला, त्यांत पुढील मजकूर आहे:—

"या संस्थेला मदत मिळविण्यासाठीं धों. के. कर्वे हे सवादोन महिने बाहेर फिरत होते. ते ठाणें, मुंबई, बडोदें, अहमदाबाद, अकोला आणि उमरावती इतक्या ठिकाणीं गेले होते. शिवाय पुणें येथील गृहस्थांकडूनहि मदत मिळविण्याचा यत्न झाला. या संस्थेच्या आश्रयानें शिकणाऱ्या विद्यार्थिनी सात आहेत. मंडळीची शिल्लक ३२२०–१४–११ रुपये आहे."

पुढल्या वर्षी म्हणजे १८९७ सालींहि वर्गणी जमविण्यासाठीं मी बराच प्रवास केला, व त्या वर्षाच्या अखेरीला आश्रमाची एकंदर शिल्लक ५६३३–११–४ झाली. या वर्षाचा रिपोर्ट सादर करतांना शहराबाहेर कोठेंतरी शांत व सुरक्षित अशी जागा पाहून तेथें इमारत बांधून तींत आश्रम चालवावा, व हल्लीं जमलेल्या फंडाला हात न लावतां त्यासाठीं निराळा फंड जमवून हें काम करावें अशी मीं सूचना केली, व ती पसंत झाली.



प. वा. गुरुवर्य सर. डॉ. भांडारकर

पण निराळा फंड कोठून जमवावयाचा हा प्रश्न होता. वर्गणीसाठीं धडपड करण्यास मी तयार होतों, पण धडपड केली म्हणजे वर्गणी जमतेच याचा काय नियम? तेव्हां वर्गणी जमेल तेवढी जमवावी, आणि कमी पडल्यास आपली पांच हजारांची लाइफ पॉलिसी गहाण ठेवून जरूर ती लहानशी रक्कम उभारून इमारत बांधावी, असा बेत मीं केला. जागा मिळाल्यानंतर इमारतीला वेळ लावावयाचा नाहीं, असा माझा बेत होता. पण किती धुंडलें तरी सोयीवार जागा मिळेना. याकरितां नवीन इमारतीचें काम दिवसगतीवर जाऊं लागलें, व जागा मिळेपर्यंत पुण्यांतच भाड्याच्या घरांत आश्रम सुरू करावा असा विचार ठरला. अर्थात् पॉलिसी गहाण टाकून रक्कम उभारण्याचें कारणच पडलें नाहीं.

१८९८ सालीं वर्गणी जमविण्याचें काम बऱ्याच नेटानें होऊन वर्षअखेर मंडळीची शिल्लक ९८७१ रु. झाली. याच वर्षीं आक्टोबर महिन्यांत ही संस्था १८६० च्या २१ व्या ॲक्टाप्रमाणें नोंदविण्यांत आली.

या वर्षाच्या अखेरीला नागपुर येथें वर्गणीचें काम करीत असतां एकदम एक कल्पना मनांत आली. आश्रमासाठीं आयुष्याच्या विम्याची पॉलिसी गहाण टाकण्याचें आतां कारण उरलें नाहीं, हें खरें; तरी आश्रमाच्या कामीं आपली पॉलिसी लागावी हा मनांत आलेला सद्विचार आपण तसाच विलयाला जाऊं द्यावा काय? विचार करतांकरतां मनांत आलें कीं, आपण किती जगतों, व आश्रमाचें काम आपल्या हातून किती होतें, याचा काय नियम आहे? तेव्हां ही पॉलिसी आश्रमाला अर्पण करून त्याला थोडेंसें स्थैर्य आणून ठेवणें काय वाईट? ज्याच्या मनांत कधींच सद्विचार येत नाहींत असे मनुष्य अत्यंत विरळा; त्याचप्रमाणें ज्याचे सर्व सद्विचार कृतींत उतरतात, असाहि मनुष्य अत्यंत विरळा. सद्विचार उत्पन्न व्हावे परंतु ते लवकरच विलयाला जावे, असें बहुतेक मनुष्यांचें होतें. या सद्विचारासंबंधानें आपली अशी स्थिति होऊं नये असें मला वाटलें व त्याला त्याला मीं एक उपाय योजिला. नागपूर येथील एका लहानशा सभेंत मीं आपला हा बेत मुद्दाम बोलून दाखविला, व त्या वेळीं मीं असेंहि सांगितलें, कीं, जर ही गोष्ट माझ्या हातून घडली नाहीं, तर तुम्ही माझी फटफजीती करून मला लाजविल्यावांचून राहूं नका. नंतर १९ एप्रिल१८९९

रोजीं सदर पॉलिसीवर कायदेशीर लेख लिहून ती आश्रमाच्या ट्रस्टींच्या नांवें करून दिली. 'एका गृहस्थानें दिलेली पांच हजार रुपयांची पॉलिसी' म्हणून आश्रमाच्या रिपोर्टांत इस्टेटीच्या यादींत उल्लेख असतो, ती पॉलिसी हीच होय. हिच्यासाठीं दरवर्षाला १३६ रुपये याप्रमाणें वीस वर्षें मीं हप्ते भरले आहेत. *

---

* मीं पेनशन घेतल्यानंतर माझी सांपत्तिक स्थिति समाधानकारक नव्हती. तेव्हां सातआठ वर्षें हे हप्ते आश्रमानें भरले आहेत. नंतर पुन्हां मी भरूं लागलों व गेल्या वर्षी एकदम रकम भरून सहामाही हप्ते भरण्याची जरूरी ठेविली नाहीं. आश्रमानें भरलेल्या हप्त्यांची रकम सवडीनें परत करण्याचा माझा विचार आहे.

# प्रकरण अडतिसावें

## अनाथबालिकाश्रम

आश्रम एकदम शहराबाहेरच सुरू करावा यासाठीं मी आपली शिकस्त करीत होतों; परंतु इतर मंडळींचें या कामीं उत्तेजन नव्हतें. रा. ब. ग. गो. गोखले हे मात्र मला अनुकूल होते. तारीख २१ मार्च १८९८ च्या वार्षिक सभेंत रा. ब. गोखले यांची हिंगण्याची जागा त्यांनीं देऊं केल्यावरून तिचा आभारपूर्वक स्वीकार करण्यांत आला; परंतु तेथल्या गैरसोयीमुळें ती जागा नाकारण्यांत आली. सदरबद्दल १८९९ च्या आरंभीं प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांत उल्लेख आहे तो येणेंप्रमाणें:—

" रा. ब. गोखले यांनीं हिंगणें बुद्रुक गांवांतील आपली कांहीं जमीन देण्याचें कबूल केलें होतें; परंतु ती कित्येक अडचणींमुळें उपयोगी पडत नाहीं, यासाठीं दुसरी जागा पाहण्याच्या उद्योगाला व्यवस्थापकमंडळी लागली आहे. जागा मिळाल्याबरोबर लहानसा आश्रम बांधण्याच्या कामाला सुरुवात केली जाईल. "

आपली जागा नापसंत झाली हें पाहून रा. ब. गोखले यांनीं आपल्या प. वा. कन्येच्या स्मरणार्थ आश्रमाची इमारत होईल तेव्हां तींत एक खोली बांधण्यासाठीं ७५० रुपये देऊं केले. पुढें त्यांची जागा पसंत झाल्यावर ही देणगी देखील त्यांनीं दिली.

शहराबाहेर एकादी सोयीवार जागा पाहून तेथेंच इमारत बांधून मग स्वतंत्र आश्रमाला सुरुवात करावी, हा हेतु लवकर तडीला जात नाहीं असें जेव्हां स्पष्ट दिसून आलें, तेव्हां विलंब न लावितां शहरांत भाड्याच्या घरांतच त्याची सुरुवात करण्याच्या खटपटीला मी लागलों. यासंबंधानें व्यवस्थापक मंडळीचा ठराव करून घेऊन ता. १ जानेवारी १८९९ रोजीं म्हणजे अनाथबालिकाश्रमाच्या मंडळीची सुरुवात झाल्यावर अडीच वर्षांनीं सदाशिवपेठेंत पेरूच्या गेटाजवळ गोरे यांच्या वाड्यांत आश्रमाला सुरुवात केली. सुरवातीच्या वेळीं एकच विधवा होती.

या वेळीं सातआठ विद्यार्थिनी संस्थेच्या खर्चानें फीमेल हायस्कूल व फीमेल ट्रेनिंग कॉलेज या शाळांत शिकत होत्या, व तेथल्याच बोर्डिंगांत

रहात होत्या. त्यांच्या आयुष्यक्रमांत कोणत्याहि प्रकारचा फेरबदल न करितां ज्यांचे नवीन अर्ज येतील, त्यांना मात्र स्वतंत्र आश्रमांत घ्यावयाचें, असें ठरविलें. आमच्या—माझी पत्नी व मी यांच्या—देखरेखीखालींच या आश्रमाला सुरुवात झाली. पुनर्विवाह समाजांत रूढ होणें इष्ट आहे अशी जरी माझी समजूत होती, व त्या कार्यासाठीं जरी माझे यत्न अन्यप्रकारें चालू होते, तरी आश्रम ही संस्था केवळ विधवाशिक्षणाचीच असावी व पुनर्विवाहासंबंधानें या संस्थेनें अगदीं तटस्थ वृत्ति स्वीकारावी, अशी माझी मनापासून इच्छा होती, व ती अजूनहि तशीच आहे. या इच्छेला अनुरूप अशीच आश्रमाची अंतर्व्यवस्था अगदीं आरंभापासून ठेविली होती. माझ्या पत्नीनें मुलींच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांना शिवूं नये, अशी व्यवस्था आम्ही होऊनच सुरू केली, व ती अखेरपर्यंत चालू राहिली. अशा रीतीनें लोकमताला अगदीं न दुखवितां संस्था चालविण्याचा जरी आम्हीं उपक्रम केला, तरी लोकांचा आमच्यावर विश्वास बसेना. आमच्या ताब्यांत मुली दिल्या असतां पुनर्विवाहासाठीं आम्ही त्यांचीं मनें वळवूं, अशी भीति लोकांना वाटे. यामुळें आरंभीं विद्यार्थिनींची वाढ फारच सावकाश झाली. पुष्कळ वेळां माझ्या मनांत येई कीं, पुनर्विवाहाशीं संबंध नसणारा असा एखादा कर्ता पुरुष अगर स्त्री यांना जर हें कार्य हातीं घेतां आलें असतें, तर कितीतरी लवकर या कार्याची प्रगति झाली असती. पण असे विचार मनांत येऊन कांहीं उपयोग नव्हता. अशीं कर्तीं माणसें जर त्या वेळीं आपल्या समाजांत असतीं, तर तीं हिंदुशारदासदनाच्या खटपटीच्या वेळीं पुढें आल्यावांचून राहिलीं नसतीं. वास्तविक पाहिलें असतां त्या वेळचें लोकमत विधवाशिक्षणाच्या विरुद्ध म्हणण्यासारखें नव्हतें. याला उत्कृष्ट प्रमाण म्हटलें म्हणजे पंडिता रमाबाईच्या शारदासदनांत १८९३ सालीं साठसत्तर विद्यार्थिनी होत्या व त्यांतल्या बहुतेक उच्च वर्णांतील विधवाच होत्या, हें होय. असें असतां अनाथबालिकाश्रमाची वाढ इतकी सावकाश व्हावी, याचें मुख्य कारण पुनर्विवाहाविषयीं लोकांना वाटत असणारी भीति हेंच असावें. आश्रमांत पहिल्या वर्षाच्या अखेरीला ४ विधवा होत्या. दुसऱ्या वर्षाच्या अखेरीला त्या ७ होत्या. तिसऱ्या, चवथ्या व पांचव्या

वर्षांच्या अखेरीला ही संख्या अनुक्रमें ११, १४ व २१ अशी झाली.* आश्रमाची वाढ सावकाश झाली, ही गोष्ट एक प्रकारें फार चांगली झाली. तिजमुळें चालकांच्या धिम्मेपणाची पारख झाली, व चालू खर्च एकदम फार न वाढतां स्थायिक फंड वाढून बऱ्याच गोष्टींचा हळूहळू जम बसत गेला.

अशा रीतीनें आश्रमाची सुरुवात पुण्यांतच केली खरी, परंतु मूळचा विचार कायम होता. ही स्त्रियांची नाजूक संस्था, तेव्हां ती शहरापासून दूर असणेंच बरें, असें वाटत होतें. शिवाय, बाहेर स्वच्छ हवेंत राहणें आणि शिक्षणाला निर्वेध एकांत, हा फायदा होताच.. आणखी एक मोठा फायदा म्हणजे प्लेगच्या संकटापासून बचाव. ईश्वरीकृपेनें आजपर्यंत आम्हांला प्लेग-पासून बिलकूल ताप झाला नाहीं.

रा. ब. गोखले यांची जागा नापसंत झाल्यानंतर शहरापासून तीनचार मैलांच्या आंतील चारपांच ठिकाणें मीं पाहिलीं; परंतु मनासारखें ठिकाण एकहि आढळेना; तेव्हां आश्रम बाहेर नेण्याचा आपला हेतु जागच्याजागीं राहतो कीं काय, अशी मला भीति वाटूं लागली. परंतु एक गोष्ट सहजीं घडून आल्यामुळें माझी सर्व काळजी दूर झाली. १८९९ सालीं पुण्यांत प्लेग आला, तेव्हां प. वा. रा. ब. ग. गो. गोखले यांची मंडळी आपल्या बागेंतल्या लहानशा घरांत रहावयाला गेली. रा. ब. गोखले यांना आश्रमा-विषयीं अत्यंत प्रेम वाटत असे व त्यासंबंधानें कांहीं करण्यास ते एका पायावर तयार असत. त्यांनीं आपली बरीच अडचण करून आश्रमाच्या विद्यार्थिनींना राहण्यासाठीं आपल्या घरांत जागा दिली. या ठिकाणीं चार महिने राहिल्यानंतर येथेंच कायमचा आश्रम करावा असा आग्रह मीं धरला, व व्यवस्थापकमंडळानेंहि या वेळीं आपली संमति दिली. तथापि इतक्या दूर राहणें आम्हांला निभेल कीं नाहीं, याची अटकळ करतां येण्या-साठीं या ठिकाणीं वेगळें लहानसें घर बांधून त्यांत कांहीं दिवस राहून चांगला अनुभव घ्यावा व नंतर कायमची इमारत बांधण्याचा विचार कायमचा ठेवावा, असें ठरवून रा. ब. गोखले यांच्याच देखरेखीखालीं पांचशें रुपये खर्चून दगड-

* हे आंकडे विधवा विद्यार्थिनींचे आहेत. शिवाय कांहीं कुमारिका असत. पुढें दिलेल्या प्रगतीच्या कोष्टकांतील आंकडे विद्यार्थिनींच्या एकंदर संख्येचे आहेत.

मातीचें एक झोंपडें बांधलें, व १९०० सालच्या जून महिन्यांत आश्रम तिकडे नेला. यापुढील दोन वर्षें आम्हां सर्वांना फार कष्टानें काढावीं लागलीं. तेथें जाण्याला चांगला रस्ता तर नव्हताच, पण खटारगाडी जाण्यासारखीहि वाट नव्हती. त्यामुळें नेहमींच्या उपयोगाचे सर्व जिन्नस मनुष्यांना वाहून न्यावे लागत असत. शिवाय, सर्व व्यवहार अगदीं काटकसरीनें चालला होता, त्यामुळेंहि थोडा अधिक त्रास होई. या सर्व अडचणींना तोंड द्यावयाला आम्ही तयार झालों. माझी मेहुणी (पहिल्या कुटुंबाची बहीण) फारसें लिहिण्यावाचण्याला शिकलेली नव्हती; परंतु, तिचा माझ्यावर विश्वास होता, आणि मजबरोबर अडचण सोसण्याला तिची तयारी होती. मुलींवर देखरेख करणें, स्वयंपाक वगैरेंत त्यांना मदत करणें व त्यांचें कमजास्त पाहणें, हीं कामें तिनें पतकरलीं व आश्रमाला सुस्थिति येईपर्यंत तीं पुष्कळ वर्षें बिनबोभाट चालविलीं. मुली प्रथम आठच होत्या. मला कुटुंबासह तेथें येऊन राहणें शक्य नव्हतें. याचें एक कारण पुरेशी जागा नव्हती; व दुसरें कारण तेथून मुलांनीं शाळेंत जाण्याची सोय नव्हती. अशा ठिकाणीं बायकांनीं एकटे राहणेंहि इष्ट नव्हतें. मी दररोज कॉलेजांतील काम आटपून संध्याकाळीं आश्रमांत जात असें, व पुनः सकाळीं पुण्यांत परत येत असें. अवशीला व पहांटेला वरच्या वर्गांतील कांहीं विद्यार्थिनींना शिकविण्याचें कामहि मला करावें लागे. एक पेनशनर मास्तर ठेविले होते, ते सकाळीं येऊन संध्याकाळीं पुण्याला जात असत. पावसाळ्यांत तर वाट फारच वाईट व चिखलाची असे. पण होतां होईल तों मी तेथें जाण्याचें चुकवीत नसें. त्या सर्व मंडळीचे डोळे माझ्या वाटेकडे लागलेले असत, व मी नजरेला पडलों, म्हणजे त्यांना मोठा आनंद होई. मी तिकडे जाऊं लागलों, म्हणजे बहुधा पायली दोन शेरांचें कांहीं तरी ओझें मजबरोबर असे. पावसाळ्यांत आम्हां सर्वांना बराच त्रास होई. घर वाईट पुणेरी कौलांनीं शाकारलेलें असल्यामुळें तें बरेंच ठिबकत असे, व अंथरुणें सुकीं ठेवण्यासाठीं हांतऱ्या पांघरून आम्हांला निजावें लागे. सभोंवार चहूंकडे चिखल, खडे व बाभळीचे कांटे यांची समृद्धि असे. एवढें सर्व होतें तरी आम्ही सर्व मोठ्या आनंदानें रहात असूं. हें सर्व हौसेचें काम असल्यामुळें शरीरकष्टांचें मला कांहीं वाटलें नाहीं. परंतु, माझ्या मनाला असह्य वाटण्या-



१९०० सालीं आश्रमाची सुरवात हिंगणें मुक्कामी झाली त्यावेळीं बांधलेली झोपडी.

सारखे प्रसंग कधींकधीं येत. घरांत कुटुंब अगर मुलांपैकीं कोणी आजारी असलें तरी घरच्या मंडळीला तसेंच सोडून देऊन मला हिंगण्याला यावें लागे. अंतःकरण भरून आलेलें आहे, डोळ्यांतून अश्रु गळताहेत, व कठोर वृत्तीनें पावलें हिंगण्याच्या वाटेकडे खेंचलीं जात आहेत, अशा प्रसंगाची आठवण झाली म्हणजे अजूनहि माझें मन मला खातें. पण माझ्या संस्था मला माझ्या आप्तांहून अगर प्राणांहूनहि प्रिय वाटत, व ज्या वेळीं कर्तव्यांचा झगडा उत्पन्न होई त्या वेळीं बहुधा संस्थेच्या बाजूचाच जय होत असे. माझ्या हयगयीमुळें कुटुंबाला व मुलांना त्यांचा कांहीं एक अपराध नसतां त्रास पडलेला पाहिला म्हणजे मला अतिशय वाईट वाटे; परंतु माझी मनोवृत्तीच अशी कांहीं बनून गेली आहे कीं, बहुधा अशा प्रसंगीं माझ्या हातून स्वार्थीपणाचें वर्तन घडत नाहीं. विशेष काळजीचे असे दुसरेहि प्रसंग कधींकधीं उत्पन्न होत. आश्रमांतील कोणी मुलगी बरीचशी आजारी पडली म्हणजे अडचण पडे. त्या आरंभींच्या दिवसांत जर का एकादा वाईट प्रसंग गुदरला असता, तर संस्थेला मोठाच धक्का बसला असता. पण ज्याचा शेवट गोड तें सर्वच गोड ! हे कष्टाचे दिवस निघून गेले, व त्याच जागेवर आश्रमाची कायमची इमारत बांधण्याचें ठरलें.

पहिल्यानें आठ हजार रुपये खर्चून मुख्य चौकाची दक्षिणेकडील बाजू आणि तिला लागूनच पूर्वपश्चिम बाजूंच्या दोनदोन खोल्या एवढा भाग बांधून घेतला. या वेळीं हल्लींचे पुण्याचे सॅनिटरी इंजिनियर श्रीयुत वि. त्रिं आगाशे यांनीं आपल्या मातुःश्रीच्या स्मरणार्थ खोल्या बांधण्यासाठीं एक हजार सहाशें रुपयांची देणगी दिली. आश्रमाच्या बाल्यावस्थेंत ज्या अशा मोठ्या देणग्या मिळाल्या, त्यांची किंमत हल्लीं मिळणाऱ्या देणग्यांहून किती तरी अधिक आहे, हें सांगणें नकोच ! १९०२ च्या उत्तरार्धांत ही इमारत पुरी झाली, आणि नंतर मी कुटुंबासह तेथें रहावयाला गेलों. या सुमाराला बैलाचा छकडा जाण्याला तेथें वाट झाली होती, व स्वतःसाठीं आणि मुलांना शाळेंत पोहोंचविण्यासाठीं मीं बैलाचा छकडा ठेविला. यापुढें मला नित्य नेमानें दररोज आठ मैल चालण्याचें

कारण पडेनासें झालें, व हिंगण्यालाच रहावयाला सांपडल्यामुळें कुटुंबाची फारशी गैरसोय न करितां आश्रमाच्या कामाकडे विशेष लक्ष देतां आलें. ही व्यवस्था बरींच वर्षे चालली होती. पुढें आश्रमाचें बहुतेक काम स्त्रियांनीं अंगावर घेतल्यानंतर मी कुटुंबासह पुण्याला रहावयाला आलों, व जरूरी-प्रमाणें आठवड्यांतून दोनतीन वेळां तेथें जाऊन व्यवस्था पाहूं लागलों. मी कुटुंबासह आश्रमांत रहात असतां माझ्या पत्नीचा आश्रमाच्या गृह-व्यवस्थेच्या कामांत फार उपयोग होत असे व पुण्यांत रहात असतां भाजीपाला, धान्य व इतर जिन्नस खरेदी करणें वगैरे सर्व कामें आरंभीं माझ्या पत्नीवरच पडत.

# प्रकरण एकोणचाळिसावें

## वर्गणीसाठीं धडपड

आश्रमाची संस्था अगदीं लहान होती, व लोकांत विश्वास उत्पन्न झाला नव्हता, त्या वेळीं वर्गणीचें काम अवघड होतें. शिवाय माझ्या अतिशय भिडस्त व लाजाळू स्वभावामुळें मला तें फार कठिण गेलें. प्रवासांतील दगदग मी अगदीं न कंटाळतां सहन करीत होतों, पण द्रव्याची याचना करण्याचें काम मला साधत नसे. मात्र मी अगदीं अल्पसंतुष्ट असें व जें काय कोणी देईल तेवढ्यांत माझी तृप्ति होत असे. प्रथम लहानशी सभा करावी, नंतर सभेला जमलेल्या व इतर मंडळीच्या घरीं जाऊन जमेल तेवढी वर्गणी जमवावी, व नंतर पुढल्या गांवीं जावें, असा क्रम असे. यासंबंधानें माझ्या प्रवासाचीं व कामाचीं व्यवस्थित टिपणें नाहींत. दोनतीन सालच्या रिपोर्टांत थोडी माहिती आहे, तीवरून त्या वेळच्या कामाची बरीच कल्पना होईल.

१९०० सालीं केलेल्या कामाच्या विस्तृत माहितीचीं दोन कोष्टकें त्या सालच्या रिपोर्टांत दिलीं आहेत. तीं येणेंप्रमाणें:—

## सन १९०० सालाच्या अखेरीस प्रो. कर्वे यांनीं आश्रमासाठीं प्रवास केला, त्याच्या माहितीचें कोष्टक.

| अनुक्रम नंबर. | स्थळाचें नांव. | सभेची तारीख. | सभेंत हजर मंडळीची संख्या. | वर्गणी देणाऱ्या गृहस्थांची संख्या. | वर्गणीची एकंदर जमलेली रक्कम | वार्षिक वर्गणीदार. | वार्षिक वर्गणीची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दापोली. | २२ नवंबर १९००. | ३७ | २१ | २९८८ | ५ | १५ |
| २ | खेड. | २६ ,, ,, | ३१ | १० | ६८२ | ४ | ५ |
| ३ | चिपळूण. | २७ ,, ,, | १०० | २१ | ३२८८ | ४ | १५ |
| ४ | मालवण. | २९ ,, ,, | २२ | ७ | १९ | ४ | ४ |
| ५ | सावंतवाडी. | १ डिसेंबर ,, | २७ | ८ | १७८८ | २२ | २४ |
| ६ | वेंगुर्लें. | २ ,, ,, | ४१ | २६ | ४४ | ८ | ९ |
| ७ | कुडाळ. | ३ ,, ,, | २९ | २ | ११ | ७ | ७ |
| ८ | रत्नागिरी. निवडक मंडळी. | ६ ,, ,, | १२ | ३६ | १४० | २५ | ५० |
| ९ | रत्नागिरी जाहीर सभा. | ७ ,, ,, | १७ | | | | |
| १० | देवरुख, | १० ,, ,, | २८ | १८ | ३३८६ | ० | ० |

| अनुक्रम नंबर | स्थळाचें नांव. | सभेची तारीख. | सभेंत हजर मंडळीची संख्या. | वर्गणी देणाऱ्या गृहस्थांची संख्या. | वर्गणीची एकंदर जमलेली रक्कम. | वार्षिक वर्गणीदार. | वार्षिक वर्गणीची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | राजापूर. | १२ डिसेंबर १९०० | ३६ | २२ | ५०८८ | ० | ० |
| १२ | देवगड. | १४ ,, ,, | ३० | १३ | १८८८ | ३ | ३ |
| १३ | श्रीवर्धन. | १६ ,, ,, | १५ | १ | ५ | ० | ० |
| १४ | बाणकोट. | १६ ,, ,, | १० | ० | ० | ० | ० |
| १५ | महाड. | १७ ,, ,, | १०० | २१ | ४८ | ८ | ० |
| १६ | नातें ता. महाड. | १८ ,, ,, | २२ | १० | ३८९८६ | १ | १ |
| १७ | बिरवाडी महाड. | १९ ,, ,, | २५ | २ | ८४८६ | १ | १ |
| १८ | गोरेगांव माण. | १९ ,, ,, | १५ | १ | ८८ | १ | १ |
| १९ | माणगांव. | १९ ,, ,, | ८ | ६ | ४८१२ | ३ | ३ |
| २० | तळें ता. माण. | २० ,, ,, | ४० | २ | १८२ | २ | २ |
| २१ | जंजिरामुरूड. | २१ ,, ,, | २५ | १७ | ५२८४ | ६ | ६ |
| २२ | अलिबाग. | २२ ,, ,, | २० | ९ | ८८४ | ८ | ० |
| २३ | रेवदंडा. | २३ ,, ,, | ३० | ४ | ३८४ | ० | ० |
| २४ | रोहें. | २४ ,, ,, | २० | १० | १८८४ | २ | २ |
| | एकूण | | ७४० | २६७ | ५४७८४ | ११४ | १६४ |

| वेळ. | कोठें घालविला. | शेरा. | तास. |
|---|---|---|---|
| १६ नो. रात्रीं १० ते १८ नो. सकाळीं ८ | पुण्यापासून मुरूड (ता. दापोली) पर्यंत प्रवास. | ६ तास आगगाडी, ११ तास आगबोट, १० तास विश्रांति (हर्णै येथें). | |
| १८ ,, सकाळीं ८ ,, २४ ,, ,, ५ | मुरूड येथें. | हा गांव जन्मभूमीचा असल्यामुळें एक आठवडा विश्रांतींत व ओळखीच्या माणसांस भेटण्यांत गेला. | |
| २४ ,, ,, ५ ,, २४ ,, ,, ७ | मुरूडपासून दापोलीपर्यंतचा प्रवास. | अंतर ६ मैल; प्रवास पायांनीं. | २ |
| २४ ,, ,, ७ ,, २५ ,, सायंकाळीं ४ | दापोली येथें. | रा. मंडलीक वकिलांच्या बंगल्यांत सभा. | ३३ |
| २५ ,, सायंकाळ ४ ,, २५ ,, रात्रीं १०॥ | दापोलीपासून खेडपर्यंतचा प्रवास. | अंतर १६ मैल, प्रवास पायांनीं. | ६॥ |
| २५ ,, रात्रीं १०॥ ,, २६ ,, ,, ८॥ | खेड येथें. | रंगोपंत काळे यांच्या मंडपांत | २२ |
| २६ ,, ,, ८॥ ,, २७ ,, सकाळीं ८॥ | खेडपासून चिपळूणचा प्रवास. | मध्यंतरी लवेल येथें रा. सा. मामलेदार यांची भेट. २ तास संभाषण. ४ तास विश्रांती. | १२ |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ नो.सकाळीं ८॥ ते २८ नो. दुपारीं १॥ | चिपळूण येथें | मराठी शाळेंत सभा. अध्यक्ष रा. रा. पु. दा. छत्रे. | २९ |
| २८ ,, दुपारीं १॥ ,, २९ ,, सकाळीं १०॥ | चिपळूणपासून मालवणचा प्रवास | दाभोळ येथें एक तास खोटी. | २१ |
| २९ ,, सकाळीं १०॥,, ३० ,, ,, ९॥ | मालवण येथें. | सभा अध्यक्षावांचून. | २३ |
| ३० ,, ,, ९॥,, १डिसेंबर ,, ७ | मालवणपासून सावंतवाडीच्या प्रवासांत. | मालवणपासून वेंगुर्लेंपर्यंत आगबोट, पुढें १७ मैल धमनी. मध्यंतरीं वेंगुर्लें येथें पांच तास विश्रांति. | |
| १ डिसें. ,, ७ ,, २ ,, सकाळीं ११ | सावंतवाडी येथें. | सभा लायब्ररींत. अध्यक्ष मेजर मॅरिकाट, अ. पो. एजंट. | २८ |
| २ ,, ,, ११,, २ ,, सायंकाळीं ५ | सावंतवाडीपासून वेंगुर्ल्यांच्या प्रवासांत. | अंतर १७ मैल; धमनीनें प्रवास. | ६ |
| २ ,, सायं. ५ ,, ३ ,, दुपारीं २ | वेंगुर्लें येथें. | सभा इंग्रजी शाळेंत. अध्यक्ष रा. सा. कृ. ना. भिडे. | २१ |

| वेळ. | कोठें घालविला. | शेरा. | तास. |
|---|---|---|---|
| ३ डि. दुपारीं २ ते ४ डि. पहांटेस ३ | वेंगुर्ल्यापासून कुडाळ व कुडाळपासून वेंगुर्ल्याच्या प्रवासांत. | जातांयेतां सव्वीस मैल प्रवास धमनीनें. मध्यंतरीं ४ तास कुडाळ येथें सभा लायब्ररींत. अध्यक्ष रा. सा. सबनीस. | |
| ४ ,, पहांटेस ३ ,, ५ ,, पहांटेस २ | वेंगुर्लें येथें. | आगबोट चुकल्यामुळें वेंगुर्लें येथें रहावें लागलें. | २३ |
| ५ ,, ,, २ ,, ५ ,, दुपारीं ३ | वेंगुर्ल्यापासून रत्नागिरीच्या प्रवासांत | प्रवास आगबोटीनें. | १३ |
| ५ ,, दुपारीं ३ ,, ९ ,, सायंकाळीं ५ | रत्नागिरी येथें. | एक सभा मे. रा. ब. माडगांवकर यांच्या बंगल्यांत. दुसरी हायस्कुलांत अ. रा. सा. कृ. ना. खेर. | १८ |
| ९ ,, सायंकाळीं ५ ,, १० ,, सकाळीं ९ | रत्नागिरीपासून देवरुखच्या प्रवासांत | २२ मैल बैलगाडीनें व ८ मैल पायांनीं. | १६ |
| १० ,, सकाळीं ९ ,, ११ ,, दुपारीं २ | देवरुख येथें. | सभा सर्कसच्या मंडपांत. सभा अध्यक्षांवांचून. | २९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ डि. दुपारीं ३ ते १२ डि. सकाळीं १० | देवरुखपासून राजापूरच्या प्रवासांत | देवरुखापासून लांज्यापर्यंत १६ मैल डोंगरी वाट पायांनीं व पुढें २२ मैल बैलगाडीनें. | १९ |
| १२ ,, सकाळीं १० ,, १३ ,, सायंकाळीं ५ | राजापूर येथें. | सभा विश्वनाथ विद्यालयांत, अध्यक्ष रा. सा माळवणकर. | ३१ |
| १३ ,, सायंकाळीं ५ ,, १४ ,, सकाळीं ८ | राजापूरपासून देवगडच्या प्रवासांत | राजापूरपासून जैतापूरपर्यंत होडी, पुढें आगबोट. | १५ |
| १४ ,, सकाळीं ८ ,, १५ ,, ,, ८ | देवगड येथें. | सभा इंग्लिश स्कुलांत अध्यक्षावांचून. | २४ |
| १५ ,, ,, ८ ,, १६ ,, ,, ७ | देवगडापासून बाणकोटच्या प्रवासांत | प्रवास आगबोटीनें मध्यंतरीं जयगड येथें ४ तास खोटी. | |
| १६ ,, ,, ७ ,, १७ ,, सकाळीं ३ | बाणकोट व श्रीवर्धन येथें. | अंतर ७ मैल. जाणें येणें पायांनीं. | २० |
| १७ ,, ,, ३ ,, १७ ,, ,, ८ | बाणकोटपासून महाडच्या प्रवासांत. | बाणकोटपासून दासगांवपर्यंत आगबोट; पुढें ७ मैल टांगा. | ५ |

| वेळ. | कोठें घालविला. | शेरा. | तास. |
|---|---|---|---|
| १७ डि. सकाळीं ८ ते १९ डि. दुपारीं २ | महाड येथें | महाडास असतांना नातें (५मैल) व बिरवाडी (६मैल) येथल्या सभांसाठीं जाऊन आलों. प्रवास बैलगाडीनें. दोहों मिळून सुमारें ३० तास. | ५४ |
| १९ ,, दुपारीं २ ,, २० ,, सकाळीं ७ | महाडपासून तळें-पर्यंतच्या प्रवासांत | ५० मैल घोड्याचा तांगा. पुढें १६ मैल छकडा. मध्यंतरीं गोरेगांव व माणगांव येथील सभा. | १७ |
| २० ,, सकाळीं ७ ,, २० ,, सायंका. ५ | तळें येथें | सभा विठ्ठलमंदिरांत अध्यक्षावांचून. | १० |
| २० ,, सायंकाळीं ५ ,, २१ ,, सकाळीं ७ | तळ्यापासून जंजिरा मुरूडपर्यंतच्या प्रवासांत | ३ मैल पायांनीं. पुढें होडींत | १२ |
| २१ ,, सकाळीं ७ ,, २२ ,, ,, ८ | जंजिरामुरूड येथें | सभा लायब्ररींत अध्यक्ष सरदार विनायकराव. | २५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ डि. सकाळीं ८ ते २२ डि. दुपारीं १२ | जंजिरा मुरुडपासून अलिबागच्या प्रवासांत | प्रवास आगबोटीनें | ४ |
| २२ ,, दुपारीं १२,, २३ ,, दुपारीं २ | अलिबाग येथें. | सभा क्लबांत; अध्यक्ष रा. रा. वि. वि. सप्रे. | २६ |
| २३ ,, दुपारीं २ ,, २३ ,, सायंकाळीं५ | आलिबागपासून रेवदंड्याचे प्रवासांत | ७ मैल तांग्यानें. | ३ |
| २३ ,, सायंसाळीं५ ,, २४ ,, सकाळीं ९ | रेवदंडा येथें. | सभा पोस्ट ऑफिसानजीक मंडपांत; अध्यक्ष रा. रा. विनायकराव महाजन. | १६ |
| २४ ,, सकाळीं ९ ,, २४ ,, दुपारीं १ | रेदंवड्यापासून रोह्याचे प्रवासांत | प्रवास आगबोटीनें. | ४ |
| २४ ,, दुपारीं १ ,, २५ ,, रात्रौ २ | रोहें येथें. | सभा रा. रा. गांगल यांचे मंडपांत अध्यक्षांवांचून. | १२ |
| २५ ,, रात्रौ १ ,, २६ ,, सकाळीं ३ | रोह्यांपासून पुण्याचे प्रवासांत. | मध्यंतरीं मुंबई येथें पांच तास खोटी. | २६ |

१९०१ सालच्या डिसेंबर महिन्यांत मुंबईंत चाळीचाळींतून लहान-लहान सभा केल्या. यांची माहिती त्या सालच्या रिपोर्टांवरून देत आहें. या सभांच्या प्रसंगीं १० पासून ५० पर्यंत मंडळी चाळीच्या लहानमोठे-पणाच्या मानानें व सभा भरविणारांच्या खटपटीच्या मानानें जमत असत. रात्रीं माहिती सांगावी व कांहीं आंकडे सभेंत घेऊन दुसऱ्या दिवशीं वर्गणीसाठीं त्या चाळींत हिंडावें असा क्रम असे. त्या वेळच्या कामाचें कोष्टक येणेंप्रमाणें:—

| अ. नं. | सभेचें ठिकाण | तारीख | वेळ | वर्गणी |
|---|---|---|---|---|
| १ | जावजी बिल्डिंग. | १४ डि. १९०१ | रात्रीं | ७८३ |
| २ | खत्र्याची चाळ, कांदेवाडी. | १५ | तिसऱ्या प्रहरीं. | ३८८ |
| ३ | गोरेगांवकरांच्या चाळी, गिरगांव. | १५ | रात्रीं | २१८१२ |
| ४ | भाटवडेकरांची चाळ, ग्रांटरोड. | १७ | ,, | ७ |
| ५ | माधवदास प्रेमजीची चाळ, मुगभाट. | १८ | ,, | ७८८ |
| ६ | मनोरंजन ऑफिस, कांदेवाडी. | १९ | ,, | ११८८ |
| ७ | जगन्नाथाची चाळ, फणसवाडी | २० | वेगळी वर्गणी नमूद नाहीं. | |
| ८ | धुसवाडी ठाकुरद्वार. | २१ | ,, | ४८०८६ |
| ९ | पेंडशांची चाळ, गिरगांव. | २२ | ,, | ३८८ |
| १० | खत्र्याची चाळ, गिरगांव. | २३ | ,, | १८१२ |
| ११ | स्टूडंटस् लॉज, मंगळदासची वाडी. | २४ | ,, | १ |
| १२ | शेंड्यांची चाळ, सदाशिव गल्ली. | २६ | ,, | १ |
| १३ | टोपीवाल्याची चाळ, ग्रांटरोड. | २७ | ,, | ८८८ |
| | | | एकूण | ७८८३८६ |

या सभांचा प्रत्यक्ष उपयोग थोडा होई हें खरें; पण त्या त्या चाळीं-तून संस्थेविषयीं अधिकउणी चर्चा होण्याला त्यांचा फार उपयोग होई.

१९०३ सालीं असाच आणखी एक प्रकारचा उद्योग केला. शनिवार-रविवार साधून कोठें तरी जावें, व होईल तेवढें काम करून पुनः कॉले-जाच्या कामासाठीं परत यावें, असा क्रम ठेविला होता. त्या कामाचें कोष्टक १९०३ च्या रिपोर्टांत दिलें आहे.

| अ. नं. | सभेचें ठिकाण | तारीख | वर्गणीची रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| १ | वांद्रे मि. के. नटराजन् यांच्या घरीं. | २५ जानेवारी १९०३ | २५ |
| २ | हिंदु यूनियन क्लब. | २ फेब्रुवारी | |
| ३ | भुलेश्वराच्या मुलींच्या शाळेंतील गुजराती स्त्रियांची सभा. | ७ फेब्रुवारी | ,, |
| ४ | आर्यसमाजमंदिर. | ८ फेब्रुवारी | १५८२ |
| ५ | टोपीवाल्याची यमुना चाळ. | १५ फेब्रुवारी २ वाजतां | ९८४ |
| ६ | वुडहाउसब्रिज हेल्थक्यांप. | ,, ५ वाजतां | ९८४ |
| ७ | वेदधर्मप्रचारिणी सभेमार्फत मुखडवाला यांच्या धर्मार्थ लायब्ररींत | २२ फेब्रुवारी ५ वाजतां | ४० |
| ८ | कुलाबा येथील वेधशाळेंत. | ,, रात्रीं ८ वाजतां | |
| ९ | मरीन लाइन्स सारस्वत हेल्थकॅम्प. | १ मार्च ,, | १७८८ |
| १० | भांगारवाडी, लोणावळ्याजवळ | १९ एप्रिल ,, | |
| | | एकूण | ११६८४ |

अशा रीतीचें हें मला न साधणारें अल्पफलदायी वर्गण्यांचें काम मी उत्साहानें करीत होतों. पुढें पार्वतीबाईंनीं व काशीबाईंनीं तें घेतल्यानंतर मी फारसा या कामीं पडलों नाहीं. नंतर मी पत्रव्यवहारानें वार्षिक वर्गणीदार मिळविण्याची खटपट केली; ती बरीच यशस्वी झाली.

वर्गण्या मिळविण्यासाठीं मीं दूरदूरच्या ठिकाणींहि बराच प्रवास केला. त्या सगळ्यांत वर्गणीची प्रत्यक्ष जमा बेताबाताचीच असे. पण माझें जें एकसारखें नेटानें काम चाललें होतें त्याचा बऱ्याच मनुष्यांच्या मनावर परिणाम झालेला होता, आणि त्यामुळें कित्येक थोर गृहस्थ स्वयंस्फूर्तीनें आश्रमासाठीं मोठाल्या देणग्या पाठवीत व इतरांना पाठविण्यासाठीं प्रोत्सा-

हून देत. अशा रीतीनें आश्रमाला द्रव्याची मदत पुष्कळ झाली. मी स्वतः मागावयाला जाऊन म्हणण्यासारखी मदत मिळालेली नाहीं.

वर्गण्यांसाठीं मी दूरदूरच्या ठिकाणीं जाई त्यासंबंधानें एक विशेष गोष्ट सांगण्यासारखी आहे. ते दिवस प्लेगच्या आरंभाचे होते आणि बरींच वर्षे प्लेगप्रतिबंधक उपाय ठिकठिकाणीं फार कडक रीतीनें अमलांत येत असल्यामुळें प्रवास करणारांना त्यांपासून अतिशय ताप होत असे. क्वारंटाइन, सर्व्हेलन्स, कपडे वाफाळणें, जन्तुनाशक द्रव्यें घालून तयार केलेल्या पाण्यांत स्नान करणें वगैरे सर्वांचा अनुभव मीं पुष्कळ वेळां घेतला. अत्यंत काटकसरीनें खर्च करण्याची माझी सवय असल्यामुळें मी नेहमीं रेल्वेच्या तिसऱ्या वर्गानेंच प्रवास करीत असें. दुसऱ्या वर्गातील उतारूंना असा त्रास होत नसे. अशा प्रसंगीं तिसऱ्या क्लासानें प्रवास करणें ही वेडेपणाची काटकसर होय असें माझें मलाहि कधीं कधीं वाटे. पण सवयीचा जोर जबर आहे. वेळ आली कीं, मी तिसऱ्या वर्गानेंच जावयाचा, व जो काय त्रास होईल तो मुकाट्यानें सोसावयाचा. इंटरमीजिएट क्लास सुरू झाल्यापासून अलीकडे मी कधीं कधीं त्या क्लासानें प्रवास करूं लागलों आहें.*

---

* अलीकडे बहुतेक प्रवास मी दुसऱ्या वर्गानें करतों.

# प्रकरण चाळिसावें

## अनाथबालिकाश्रमाला स्वार्थत्यागी सुशिक्षित स्त्रियांची जोड

आजपर्यंत आश्रमाचें काम मी, माझी पत्नी आणि माझी पहिली मेहुणी इतकीं मिळून कसेंबसें चालवीत होतों. आपलें सर्व लक्ष त्या कामांत घालणारी कोणी स्त्री अजून आश्रमाला लाभली नव्हती. परंतु मोठ्या भाग्यानें १९०२ च्या अखेरीला श्रीमती पार्वतीबाई आठवले आश्रमाला येऊन मिळाल्या. पार्वतीबाई आठवले यांचें नांव आतां महाराष्ट्रांत चांगलें ठाऊक झालेलें आहे. यांची हकीगत बरीच मनोवेधक आहे. पंचवीस वर्षांचें वय होईपर्यंत यांची पाटीपुस्तकांशीं गांठ नव्हती. आमचा विवाह झाल्यानंतर माझ्या पत्नीचें पहिलें काम म्हणजे शिक्षणाच्या मार्गाला लावण्यासाठीं आपल्या बहिणीचें मन वळविण्याचा प्रयत्न करणें हें होतें. हें करण्याला बरींच वर्षे लागलीं. पार्वतीबाईवर त्यांच्या मुलाची जबाबदारी असल्यामुळें इकडे येण्याला त्यांचें मन घेईना. अखेरीला मनाचा घडा करून मुलासह त्या आमच्या येथें येऊन दाखल झाल्या. आल्या दिवसापासूनच त्यांच्या शिक्षणाला सुरुवात झाली. त्यांनीं अतिशय कष्टानें अभ्यास करून ट्रेनिंग कॉलेजाचें पहिल्या प्रतीचें म्हणजे २५ रुपयांचें सर्टीफिकेट मिळविलें. त्यांना सरकारची स्कॉलरशिप होती व तीन वर्षे सरकारची नोकरी करणें भाग होतें; परंतु आमच्या अर्जावरून सरकारनें विशेष ठराव करून पार्वतीबाईंना आश्रमांत काम करण्याला परवानगी दिली.

पार्वतीबाई पुण्यांत आल्यापासूनच आश्रमाकडे त्यांचा फार ओढा लागला. आश्रमाचें काम अखेरीला बायकांचें बायकांनींच हातीं घेतलें पाहिजे, व तुम्हीं या कामांत पुढाकार घेतला पाहिजे, असें मी वारंवार त्यांच्याजवळ म्हणत असें, व आपला अभ्यास संपल्यानंतर आपणाला आश्रमांतच काम करावयाला यावयाचें, असें त्यांचें त्यांनाहि लवकरच वाटूं लागलें. मात्र आपलें शिकणें किती काय होईल व आपल्या हातून काम कितपत रेटेल याची त्यांना वारंवार फार शंका वाटे; पण मी त्यांना

होईल तितकें उत्तेजन देत असें. माझ्यावर त्यांचा अतिशय विश्वास बसला, व माझ्या आशेचा अंकुर काय त्या या बाई होत्या. माझे डोळे एकसारखे त्यांच्या अभ्यासक्रमाकडे लागले होते. पार्वतीबाई येतात केव्हां आणि माझा भार हलका करतात केव्हां असें मला होऊन गेलें होतें. सरतेशेवटीं तो सुदिन एकदांचा उगवला आणि सरकारची अडचण दूर होऊन त्या आश्रमांत काम करूं लागल्या. त्या ट्रेनिंग कॉलेजांत असल्यापासूनच आश्रमाच्या किती तरी उपयोगी पडत असत. त्या आपल्या नेहमींच्या व प्लेगच्या मोठ्या सुट्या आश्रमांतच घालवीत, व लहानपणापासून सर्व प्रकारच्या कामांची सवय असल्यामुळें पडेल तें काम करीत. धान्याच्या व भाजीपाल्याच्या मोटल्या आश्रमांत नेण्याच्या कामीं पुष्कळ वेळां त्या माझ्या भागीदार होत. हिंगण्याच्या वाटेनें त्यांचे व माझे बरोबर जाण्या-येण्याचे प्रसंग पुष्कळ येत. या वेळीं आम्ही भावी गोष्टींविषयीं कांहीं तरी मनोराज्य करीत असूं.

पार्वतीबाई आश्रमांत आल्याबरोबर त्या आश्रमाच्या लेडी सुपरिंटेंडेंट झाल्या. त्यांच्यासंबंधानें ईश्वरीयोजना कांहीं निराळीच होती. लेडी सुपरिंटेंडेंटच्या कामाला अधिक योग्य स्त्रिया पुढें मिळाल्या. नंतर आश्रमासाठीं वर्गणी मिळविण्याचें काम आपणाला साधतें कीं काय तें पाहण्याच्या त्यांनीं प्रयत्न केला व त्यांत त्यांना कल्पनेबाहेर यश आलें. स्वभावतः पार्वतीबाई धीट व चिकाटीनें काम करणाऱ्या आहेत. अभ्यासानें त्यांना सभांत चांगलीं भाषणें करतां येऊं लागलीं व त्यांच्या कळकळीचा लोकांच्या मनावर चांगला परिणाम होऊं लागला. सरासरीनें वर्षाची सुमारें तीन हजार रुपये वर्गणी त्या जमवितात. मराठी भाषा जाणणाऱ्या लोकांच्या मुलुखांतच त्या हिंडतात असें नाहीं तर कानडी मुलुख, तेलंगण, गुजरात व संयुक्तप्रांत यांमध्येंहि त्यांनीं अनेक अडचणी सोसून काम केलें आहे. प्रथम शक्य असल्यास स्त्रीपुरुषांची मिश्र, नाहीं तर पुरुषांसाठीं एक व स्त्रियासाठीं एक अशा सभा करून आपल्या येण्याचा उद्देश लोकांना कळवावा व नंतर सुशिक्षितांच्या भेटी त्यांच्या घरीं घेऊन त्यांच्यापासून वर्गणी मिळवावी असा त्यांचा कार्यक्रम आहे. द्रव्यबळाच्या दृष्टीनें पार्वतीबाई या आज अनेक वर्षें आश्रमाचा आधारस्तंभ आहेत.

श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनीं १९०२सालच्या ऑक्टोबर महिन्यापासून १९०३ सालच्या अखेरपर्यंत आश्रमांतील अंतर्व्यवस्थेसंबंधाच्या बऱ्याच गोष्टींचा जम बसविला होता. सर्व प्रकारचीं कामें त्यांच्या अंगवळणीं पडलेलीं असल्यामुळें तीं त्या स्वतः करीत व इतरांकडून करवून घेत. परंतु शाळेंतल्या व घरांतल्या सर्व गोष्टींकडे त्यांना लक्ष द्यावें लागत असल्यामुळें त्यांची फार ओढाताण होई. पुढें लवकरच श्रीमती वेणूबाई व श्रीमती काशीबाई यांची मदत मिळून श्रमविभागानें कामें करतां येऊं लागलीं, व नंतर थोड्याच काळांत पार्वतीबाईवर वर्गणीचें काम सोंपविण्यांत आलें.

पार्वतीबाईच्या अंगीं धीटपणा व समयसूचकता हे गुण विशेष आहेत. एकदां सातारा येथें एका सभेंत त्यांचें व माझें अशीं एका सामाजिक विषयावर भाषणें झालीं. पुढें अध्यक्षांनीं आपल्या विरुद्ध भाषणानें श्रोत्यांच्या मनावर विपरीत परिणाम केला. मी स्वस्थ बसलों; परंतु पार्वतीबाई धैर्यानें पुढें आल्या व अध्यक्षांच्या परवानगीनें भाषण करून अध्यक्षांचें म्हणणें खोडून काढून त्यांनीं पुनः लोकमताचा प्रवाह आपल्या बाजूला वळविला.

एकदां बनारसच्या कॉन्फरन्सच्या वेळीं काशीबाई पार्वतीबाई व मी अशीं तिघें बनारस येथें गेलों होतों. त्या वेळीं सर्व लोक गडबडींत असल्यामुळें आश्रमासंबंधानें कोणाजवळ बोलणें काढण्याला आम्हांला धीर होईना. परंतु अगदीं कांहीं केल्यावांचून परत जावें लागतें हें पार्वतीबाईच्यानें पाहवेना. त्यांनीं अखेरीला बंगाली गृहस्थांच्या क्यांपमध्यें जाऊन मोडक्यातोडक्या हिंदुस्थानी भाषेंत आपले विचार कित्येक मंडळीला कळविले, व भोजनोत्तर अर्धा तास आश्रमाची हकीकत ऐकून घेण्याचें त्यांनीं कबूल केलें. नंतर पार्वतीबाईनीं काशीबाईना ही हकीकत कळवून त्यांजकडून इंग्रजींत आश्रमाची माहिती सांगविली व धडपड करून त्या मंडळींतून ४० रुपये वर्गणी जमविली.


पार्वतीबाई या जबर उद्योगी आहेत. त्यांची चिकाटीहि वर्णनीय आहे. त्यांना इंग्रजी येत नाहीं, यामुळें वर्गणीच्या कामीं त्यांना फार अडचण

येते. त्यांनीं महिनापंधरा दिवस इंग्रजी शिकण्याचा यत्न करावा व असाध्य म्हणून सोडून द्यावा, असें दोनतीन वेळां घडलें. पण आतां पुनः त्या नेटानें यत्न करीत आहेत. मला फुरसत होते तेव्हां मीहि त्यांना मदत करण्यासाठीं आपली शिकस्त करितों. मुसळाला अंकुर फोडण्याचा हा यत्न आहे. तो फसला तरी दीर्घोद्योगाचा धडा त्यापासून मिळेलच मिळेल. या वेळचा त्यांचा यत्न थोडासा तरी तडीला जाईल अशी आशा वाटूं लागली आहे. *


श्रीमती वेणूबाई नामजोशी व काशीबाई देवधर या १९०४ सालीं आश्रमाला येऊन मिळाल्या. प्रथम वेणूबाई लाइफमेंबर झाल्या. नंतर सहा महिन्यांनीं काशीबाईनींहि आपला निश्चय केला. या दोघींनीं आपलें सर्व सामर्थ्य आश्रमाच्या कामीं खर्ची घातलें. आश्रमाला आज जी उन्नतावस्था आली आहे तिचें बरेंचसें श्रेय या दोघींना आहे. वेणूबाईचा आश्रमाशीं संबंध अगदीं नवीन होता. पण काशीबाईचा आश्रमाशीं संबंध स्वतंत्र आश्रमाच्या बहुतेक आरंभापासून होता. हिंगण्याच्या चालचलाऊ घरांत सर्वांनीं आनंदानें व धैर्यानें ज्या अडचणींना तोंड दिलें त्यांत काशीबाईची मदत होती. त्याच वर्षाच्या अखेरीला त्यांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उतरून त्या पुढें कॉलेजाच्या अभ्यासाला लागल्या. पुढेंहि त्या मोठ्या सुट्या असल्या म्हणजे आश्रमांत येऊन जात. मद्रास युनिव्हर्सिटींत काशीबाईचा अभ्यास बी. ए. पर्यंत झालेला आहे, आणि बी. ए. च्या एका विषयांत त्या पास झालेल्या आहेत. काशीबाईवर वैधव्याचा प्रसंग अल्पवयांत आला, व त्यांच्या वडिलांनीं त्यांना एकदम शारदासदनांत नेऊन घालण्याचें मोठें धैर्य केलें. त्या दिवसांत विधवा मुलीला शिकविणें म्हणजे समाजाचा मोठा अपराध करणें होतें. अशा कामीं पडणाऱ्या मनुष्याला लोकनिंदेचे बरेच प्रहार सहन करावे लागत असत. वडिलांनीं दाखविलेल्या धैर्याचें काशीबाईनीं चीज केलें. काशीबाईनीं मधूनमधून आश्रमासाठीं वर्गण्या जमविण्याचें काम केलें, तेंहि फार चांगलें झालें. या कामासाठीं त्यांनीं मद्रास इलाखा, निजामचें राज्य, राजपुताना, संयुक्तप्रांत वगैरे

---

* यासंबंधीं मजकूर पुढें एका प्रकरणांत आलेला आहे.



डॉ. विठ्ठल राघोबा लांडे इमारत ( १९२६ )



खटाव मकनजी वसतिगृह ( १९२३.)

ठिकाणीं पुष्कळ प्रवास केला, व आश्रमाविषयीं लोकांना माहिती करून दिली. या त्यांच्या कामाचा आश्रमाला फार उपयोग झाला. परंतु त्यांची सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे त्यांचें आश्रमांतील लेडी सुपरिंटेंडेंटचें काम होय. या कामांत हिंदी मनुष्यांमध्यें क्वचित् आढळणारे त्यांच्या अंगचे गुण प्रत्ययाला आले. त्यांनीं विशेष प्रकारचा स्वार्थत्याग दाखविला. अशा अत्यंत गुणी स्त्रीच्या सहवासाला मुकण्याचा प्रसंग आश्रमावर यावा हें त्याचें मोठें दुर्भाग्य होय! कांहीं मतभेदांमुळें त्यांनीं आश्रमाचा संबंध सोडला. १९१२च्या जून महिन्यांत त्यांनीं प्रथम परीक्षेसाठीं रजा घेतली, व पुढें तारीख १ फेब्रुवारी १९१३ रोजीं आपला राजिनामा सादर केला. व्यवस्थापक मंडळीनें तो अत्यंत नाखुषीनें व नाइलाजानें मान्य केला. तो मान्य करतांना काशीबाईसंबंधानें व्यवस्थापकमंडळीनें पुढील ठराव नमूद करून ठेविला आहे:—

"श्रीमती काशीबाई देवधर यांचा राजीनामा मोठ्या नाखुषीनें मान्य करण्यांत आला आहे. आजपर्यंत काशीबाईंनीं आपलें आश्रमाचें काम अतिशय कळकळीनें व आस्थेनें केलें असून आश्रमांतील शिस्त त्यांनीं उत्कृष्ट प्रकारें राखिली होती. त्यांच्या राजीनाम्याबद्दल व्यवस्थापक मंडळीला अतिशय वाईट वाटत आहे."

ही गोष्ट अत्यंत शोचनीय झाली; पण त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट इतकीच कीं त्यांची अशाच प्रकारच्या दुसऱ्या संस्थेला मदत होत आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा आपल्या समाजाला असाच उपयोग होत राहो! *

कोणी सुशिक्षित स्त्री आपल्या कार्याच्या उपयोगीं पडण्यासारखी आहे, असें दिसलें, कीं तिला मिळविण्याचा प्रयत्न सुरू करावा असा माझा क्रम असे. कित्येक वेळां हे माझे यत्न निरुपयोगी होत. १८९७ सालीं उमरावतीला राष्ट्रीय सभेचा महोत्सव झाला, त्या वेळीं मी तेथें गेलों होतों. वेणूबाईचे वडील एंजिनियर असून त्यांनीं त्या वेळीं नुकतेंच पेन्शन घेतलें होतें. राष्ट्रीयसभेचा मंडप बांधण्याचें आणि त्यासंबंधानें सर्व व्यवस्था

* हल्लीं श्रीमती काशीबाई या पुण्यांत असून म्युनिसिपल स्कूल कमिटीच्या सभासद आहेत. इतर सार्वजनिक कामांतही त्या भाग घेत असतात.

ठेवण्याचें काम त्यांच्याकडे होतें. त्या कामामुळें त्यांना बिलकूल फुरसत नव्हती; तरी माझ्यासाठीं त्यांजकडून तास अर्धातास मीं मागून घेतला व त्यांच्या मुलीची आश्रमासाठीं मागणी केली. वेणूबाईचा अभ्यास अजून पुष्कळसा व्हावयाचा होता; पण त्या पुढें उपयोगी पडण्यासारख्या आहेत, असें पार्वतीबाईकडून मला कळलें होतें. पुढें योग्य प्रसंग आला असतां मुद्दाम वेणूबाईची गांठ घेऊन या गोष्टी मी त्यांच्यापाशीं बोलत असें. वेणूबाईना हल्लींच्या स्थितींत आणून सोडण्याचें सर्व श्रेय त्यांचे आतेभाऊ प. वा. प्रि. गो. ग. आगरकर यांना आहे. त्यांनीं स्वतः लोकापवाद सोसून आणि इतरांना तो सोसावयाला लावून वेणूबाईना प्रथम शारदासदनांत आणून ठेविलें. प्रिन्सिपल आगरकरांच्या सहवासाचा फायदा वेणूबाईना फार झाला. त्यांच्या उदाहरणामुळें अनेक प्रकारचे विचारतरंग त्यांच्या मनांत घोळत असत, व आपण काय करावें याबद्दल त्या योजना करीत असत. वेणूबाईची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालेली आहे, आणि अशा संस्थेच्या प्रमुख कार्यकारी मनुष्यांमध्यें असावें लागणारें सामान्य ज्ञान, व बहुश्रुतपणा यांच्या अंगीं पुष्कळ आहे. काशीबाईना परीक्षेसाठीं रजा घ्यावी लागे, त्या वेळीं लेडी सुपरिंटेंडंटचें काम वेणूबाईच करीत. काशीबाईच्या मागून दोन वर्षें आश्रमाच्या कामाचें सर्व ओझें यांजवरच पडलें. अशा अडचणीच्या प्रसंगीं आमचा सर्वांचा भार हलका करण्याला कुमारी कृष्णाबाई ठाकुर या आल्या.

कृष्णाबाईची व माझी ओळख बरेच वर्षांपासून आहे. त्या बी. ए. झाल्यापासूनच कधींकधीं त्यांची गांठ घेऊन इकडील कामासंबंधानें मी त्यांच्याजवळ बोलत असें, व या संस्थांचा कांहीं अनुभव घेतल्यावांचून त्यांनीं आपल्या कामाची दिशा ठरवूं नये, अशी विनंति त्यांना करीत असें. आश्रमाच्या भाग्यानें मदतीची अत्यंत जरूर होती अशा वेळीं त्यांचा उपयोग झाला. कुमारी कृष्णाबाई या मुंबई युनिव्हर्सिटीच्या एम्. ए. च्या परीक्षेचा मान मिळविलेल्या पहिल्या हिंदु बाई आहेत. यांचें जिकडेतिकडे कौतुक होत असतां व सरकारी अगर संस्थानांतील पुष्कळ पगाराच्या नोकऱ्या त्यांच्याकडे चालून येण्यासारख्या असतां त्यांनीं आमच्या 'फूल नाहीं फुलाची पाकळी' या न्यायानें दिलेल्या अल्प वेतनांत

संतुष्ट राहून या संस्थांच्या सेवेला दाखल झाल्या, ही गोष्ट त्यांच्या थोर मनाची साक्ष देत आहे. १९१४ च्या एप्रिलपासून त्या आश्रमाच्या शाळेच्या लेडी सुपरिंटेंडंटचें काम करीत आहेत. यांचा या संस्थेला असाच दीर्घकाल उपयोग होत रहावा, ही इच्छा आहे.*

यांच्यापेक्षां कमी प्रमाणानें, पण निरपेक्ष बुद्धीनें आणखी कांहीं स्त्रियांकडून आश्रमाला बरीच मदत झाली आहे. श्रीमती कृष्णाबाई फाळके यांचें शिक्षण खालचे वर्ग शिकविण्यासारखें झालेलें असतां व आणखी शिकण्याचें मनांत आणलें असतें तर तेंहि होण्यासारखें असतां आश्रमाची अडचण जाणून त्या हलकें समजलें जाणारें मुलींचें गृहकृत्य, स्वयंपाक व कोठी यांवर देखरेख करण्याचें काम आज सातआठ वर्षे हौसेनें करीत आहेत.

आश्रम ऊर्जित दशेला येण्यापूर्वी आणखी तीन स्त्रियांनीं आश्रमाला फार मदत केली. त्यांपैकीं पहिल्या श्रीमती बनूताई देशपांडे होत.+ या हल्लीं मुंबईत डॉ. पुरंदरे यांच्या इस्पितळांत नर्सचें काम करीत आहेत. पार्वतीबाई आश्रमांत एकट्याच काम करीत असतां त्यांच्या मदतीला या आल्या. यांनीं ट्रेनिंग कॉलेजचें शेवटल्या वर्षाचें सर्टिफिकेट मिळविलें होतें. अगोदरपासूनच माझें यांजकडे लक्ष होतें, व आश्रमाविषयीं त्यांच्याजवळ मीं बोलणें काढून ठेविलेलें होतें. त्यांच्या वडिलांची परवानगी अगोदरच घेऊन ठेविलेली होती. अति जरूरीच्या वेळीं यांचा आश्रमाला फार उपयोग झाला. श्रीमती आनंदीबाई मराठे व श्रीमती दुर्गाबाई किर्लोस्कर यांनींहि पांच-सहा वर्षे पडेल तें काम करून आश्रमाला मनोभावानें मदत केली. यांपैकीं आनंदीबाईनीं आश्रमावर कोणत्याहि प्रकारचें ओझें घातलें नाहीं. उलट आपल्या एक हज़ार रुपयांची ठेव आश्रमाकडे ठेवून आपल्या हयातींत त्यांचें व्याज मात्र घ्यावें व आपल्या पश्चात् ती रक्कम आश्रमाला मिळावी, अशी व्यवस्था त्यांनीं करून ठेविली आहे. बाकीच्या दोघींनीं केवळ निर्वाहापुरतेंच ओझें आश्रमावर घातलें. या तिघींचेहि आश्रमावर फार उपकार आहेत.

---

* निरनिराळ्या शिक्षण संस्थांस आश्रमाप्रमाणेंच आपल्या ज्ञानाचा फायदा त्यांनीं दिला आहे. हल्लीं या पुण्यामध्यें सेवासदनाचें कार्य करीत आहेत.

+ या नुकत्याच परलोकवासी झाल्या.

# प्रकरण एकेचाळिसावें

## अनाथबालिकाआश्रमाला कांहीं थोर स्त्रीपुरुषांच्या भेटींचा लाभ

स्वतंत्र आश्रमाची सुरुवात झाली त्याच वर्षी म्हणजे १८९९ सालीं मिस् मॅनिंग या हिंदुस्थानांत प्रवास करण्यासाठीं आल्या व त्या वेळीं त्यांनीं आमच्या चिमुकल्या आश्रमाला भेट देऊन आम्हांला ऋणी केलें. तेव्हांपासून देहावसान होईपर्यंत आश्रमावर त्यांचें प्रेम कायम राहिलें. त्यांनीं इंग्लंडांत परत गेल्याबरोबर ३० रुपये स्वतःची वर्गणी पाठवून दिली, व पुढील वर्षापासून लंडनच्या नॅशनल इंडियन असोसिएशन-कडून दरसाल ७५ रुपयांची एक स्कॉलरशिप देवविली. ही संस्था लवकरच दरसाल १५० रुपयांच्या दोन स्कॉलरशिपा देऊं लागली. या स्कॉलरशिपा अद्याप चालू आहेत.* मिस् मॅनिंग यांनीं आश्रमाला पन्नास पौंड देण्याविषयीं मृत्युपत्रांत लिहिलें होतें, व त्याप्रमाणें सदर रक्कम आश्रमाकडे आली. हिंदुस्थानाविषयीं व विशेषतः हिंदुस्थानांतील स्त्रीजातीविषयीं ज्यांना विशेष कळकळ वाटते, अशांपैकीं मिस् मॅनिंग या बाई होत्या. यांनीं मरतेवेळीं आपलें सर्व द्रव्य हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या उन्नतीसाठीं झटणाऱ्या अनेक संस्थांना वांटून दिलें.

दुसऱ्या वर्षी म्हणजे १९०० सालीं आश्रम हिंगण्याला नेण्यांत आला. तेथें एक लहानसें झोंपडें व सातआठ विद्यार्थिनी यांच्याशिवाय कांहीं नव्हतें; परंतु एका थोर गृहस्थांच्या मनांत असलाच आश्रम पहाण्याची इच्छा झाली. हे गृहस्थ म्हणजे राजपुतान्यांतील टोंक संस्थानांतले ट्रेझरर प. वा. दामोदरपंत फाटक हे होत. यांचा वडील मुलगा डॉक्टर होऊन नुकताच धंदा करूं लागला होता, व त्याजवर भार टाकून आपण एकाद्या सार्वजनिक कामांत पडावें, असे विचार त्यांच्या मनांत येत असत. हा मुलगा प्लेगनें वारला तेव्हां ते सर्व विचार जाऊन या मुलाच्याच बायकोची

---

* ह्या स्कॉलरशिपा पुढें युद्धाचे गडबडींत फंडाची टंचाई होऊं लागल्यामुळें बंद झाल्या.

व मुलांची तरतूद करण्याचे नवे विचार करीत बसण्याची वेळ आली. विनाकारण दुःख करीत बसणें हा दामोदरपंतांचा स्वभाव नव्हता. ते तिसऱ्या दिवशीं माझ्या घरीं आले; पण मी घरीं नव्हतों म्हणून निरोप सांगून परत गेले. यांची माझी ओळख नव्हती. त्यांनीं आश्रमाची हकीगत कोठें वाचली होती. मीं दुसऱ्या दिवशीं त्यांच्या घरीं जाऊन त्यांची गांठ घेतली, व तासभर अनेक गोष्टींवर आमचें संभाषण झालें आणि आश्रम पाहण्याची इच्छा त्यांनीं दर्शविली. दुसऱ्या दिवशीं आम्ही टांग्यांतून आश्रमाकडे येण्यास निघालों, तेव्हां समोरच्याच एका वृद्ध पेन्शनरांनीं खुणेनेंच त्यांना कोठें निघाला असा प्रश्न केला. तसेंच कांहीं जरूरीचें काम आहे म्हणून जाऊन येतों असें त्यांनीं उत्तर दिलें. कोणी विशेष जवळचें आप्त मेल्यानंतर शोक करीत खोलींत बसलेलें असावें, व समाचाराला येणाऱ्या मनुष्यांनीं केलेल्या त्याच मृताची आठवण करून देणाऱ्या प्रश्नांचीं तींच तींच उत्तरें देत रहावें, हा प्रकार मला तरी फार अनिष्ट वाटतो. दामोदरपंत वारंवार बाहेर जातात, ही गोष्ट त्या वृद्ध पेन्शनरांना मोठी चमत्कारिक वाटत आहे असें त्यांच्या मुद्रेवरून दिसत होतें. ते व मी हिंगण्याला आलों व त्यांनीं या कामांत एकंदर तीनचार तास घालविले. आश्रम अगदींच साधा होता;पण तो पाहून त्यांना बरें वाटलें, व त्यांचें दुःख थोडें हलकें झालें. तेव्हांपासून दामोदरपंतांचें आश्रमाकडे विशेष लक्ष लागलें. त्यांनीं दोनतीन वेळां आपल्या पत्नी यशोदाबाई फाटक यांनाहि आश्रमांत आणलें व त्यांच्या मनांत आश्रमाविषयीं कळकळ उत्पन्न केली. यशोदाबाईना आश्रमाविषयीं इतकें अगत्य वाटूं लागलें कीं, एकदां कांहीं मंगल कार्याच्या निमित्तानें परगांवच्या सातआठ बायका त्यांच्या घरीं आल्या होत्या. त्या सर्वांना त्यांनीं आश्रम दाखविण्याला आणलें. या दांपत्याचें आश्रमावरील प्रेम येथेंच थांबलें नाहीं. त्यांनीं श्रीरामेश्वराच्या यात्रेसाठीं थोडा वेगळा संचय करून पांचशें रुपये जमविले होते. सदर रक्कम यशोदाबाईनीं दामोदरपंतांच्या प्रोत्साहनानें यात्रेचा बेत तहकूब ठेवून आश्रमाकडे पाठवून दिली. आश्रमाच्या बाल्यावस्थेंत झालेल्या या मदतीनें मला मोठें उत्तेजन मिळालें. अशा रीतीनें विचार व कृति करणारीं दांपत्यें जर आपल्या समाजांत निपजूं लागतील तर त्याचें पाऊल पुढें पडण्याला फार काळ लागणार नाहीं !

१९०२ सालीं हर एक्सलन्सी लेडी नॉर्थकोट यांनीं आश्रमाला भेट दिली. ही संस्था त्या वेळीं अगदीं बाल्यावस्थेंत होती. तेथें पहाण्यासारखें कांहीं नव्हतें. ज्यांत आश्रमाला सुरुवात झाली तें लहानसें घर, पुरी होत आलेली आठ हजारांची नवीन इमारत, व बाराचौदा विद्यार्थिनी, एवढेंच काय तें तेथें होतें. चांगला रस्ता तयार झाला नव्हता; एवढेंच नव्हे पण घोड्याची गाडी जाण्यासारखा वाईटहि रस्ता नव्हता. तथापि ही संस्था पहाण्याचा त्यांनीं निश्चय केला. त्यांची गाडी आश्रमापर्यंत येईना, म्हणून शेवटला एक मैल त्या चालत आल्या व गेल्या. अशा प्रकारची सहानुभूति फार विरळा! लेडी नॉर्थकोट यांच्या भेटीमुळें आश्रम बऱ्याच लोकांना माहीत झाला.

लेडी नॉर्थकोट यांच्या भेटीचें बरेंच श्रेय नामदार सी. एच. हिल् यांना आहे. हे त्या वेळीं लॉर्ड व लेडी नॉर्थकोट यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते. यांनीं प्रथम येऊन आश्रम पाहिला व सर्व हकिकत कळविल्यानंतर लेडी नॉर्थकोट यांनीं आपल्या भेटीचा विचार कायम केला. नामदार हिल दोन वर्षांपूर्वी पुनः एकदां आश्रम व विद्यालय पाहून गेले.

१९०३ सालच्या रिपोर्टांतील पुढील उतारा जशाच्या तसाच देत आहेः—

**"आजपर्यंत सुमारें पांचशें स्त्रीपुरुषांनीं आश्रम प्रत्यक्ष पाहिला आहे. पैकीं सुमारें दोनशें स्त्रीपुरुष या गेल्या वर्षांत येऊन गेले. त्या सर्वांत श्रीमती राणीसाहेब अक्कलकोट यांचें नांव प्रमुखत्वानें सांगितलें पाहिजे. राणीसाहेबांना वैधव्यस्थितीचा अनुभव स्वतःला आहे व आश्रमांतील मुलींना उपदेश करतांना या गोष्टीचा उल्लेख करून, सांपत्तिक अडचणी नसल्या तरी देखील इतर गोष्टींनीं विधवेची स्थिति किती दुःखमय असते व ती स्थिति नाहींशी करण्याला, निदान तिची तीव्रता कमी करण्याला, अशा संस्थांचा केवढा उपयोग आहे हें त्यांनीं मोठ्या कळवळ्यानें स्पष्ट करून दाखविलें. राणीसाहेबांची या संस्थेविषयीं आस्था विलक्षण दिसली. त्या आश्रम पहाण्याला सपरिवार आल्या होत्या. त्यांच्या कन्या म्हणजे सावंतवाडी व**

जत या संस्थानच्या राण्या यांनाहि आश्रम पाहून फार आनंद झाला. राणीसाहेबांनीं आश्रमांतील गोष्टींची बारकाईनें चौकशी केली. एक उच्च कुलांतील मराठे जातीची विधवा आश्रमांत आहे, तिजबद्दल चौकशी करतांना तिचा आजा अक्कलकोट संस्थानांत एक प्रतिष्ठित गृहस्थ होता असें जेव्हां त्यांच्या नजरेला आलें, तेव्हां त्यांना हा दैवदुर्विलास पाहून फार वाईट वाटलें. पण त्यांतल्यात्यांत अशा शाळेंत तिचा प्रवेश झालेला पाहून समाधान झालें. श्रीमती मातुःश्री राणीसाहेबांनीं आश्रमाला दरसाल साठ रुपये देण्याचें कबूल करून व त्यांच्या चिरंजीवींनीं प्रत्येकीं शंभर रुपये देणगी देऊन आश्रमावरील आपली भक्ति व्यक्त केली व सप्रेम निरोप घेतला.

"श्रीमती रमाबाई रानडे यांच्या भेटीचा प्रसंगहि असाच हृदयद्रावक होता. सांपत्तिक साधनें अनुकूल असतांहि वैधव्याग्नीनें हिंदु स्त्रियांचें तेज व उल्हास हीं कशीं कोळपून जातात हें श्रीमती रमाबाई रानडे यांच्या स्थितीवरून फार ढळढळीत रीतीनें लक्ष्यांत येतें. सौभाग्यदीप प्रज्वलित असतांना स्त्रीजातीच्या उन्नतीसाठीं त्यांचे यत्न कसे अव्याहत चालले होते याची साक्ष मुंबईचा स्त्रियांचा क्लब देत आहे. न्यायमूर्ति रानड्यांचें मुंबईच्या स्त्रियांनीं जें स्वतंत्र स्मारक केलें तें स्त्रियांच्या क्लबाशीं रमाबाईचा अतिनिकट संबंध नसता तर क्वचित केलं नसतें. पण आतां त्यांची काय स्थिति झाली आहे पहा! अपत्यवत् रक्षण केलेल्या संस्थेविषयीं प्रेमभाव नष्ट व्हावा हें शक्यच नाहीं. पण भगिनींचा सप्रेम आग्रह असतांहि अजून त्यांच्यानें तिकडे जाववलें नाहीं. परवां लेडी नॉर्थकोट स्वदेशीं गेल्या, त्या वेळीं पुण्यांतील स्त्रियांच्या तर्फे जी त्यांना पानसुपारी करण्यांत आली, त्या प्रसंगींहि–श्रीमती राणीसाहेब अक्कलकोट यांच्यासारख्या वजनदार स्त्रियांचा आग्रह असतांदेखील–त्यांच्यानें जाववलें नाहीं. इतका विलक्षण परिणाम कुलीन हिंदु

स्त्रियांच्या मनावर होत असतो. अशा स्थितींत अजूनपर्यंत त्यांना आश्रमाकडेहि येववलें नव्हतें यांत आश्चर्य नाहीं. आश्रमाविषयीं जरी त्यांच्या मनांत प्रेम होतें, व योग्य प्रसंगीं त्यांजकडून सल्लामसलतहि मिळत असे तरी अदृष्ट वस्तूंवरील प्रेम व दृष्ट वस्तूंवरील प्रेम यांत अंतर असतें. त्यांना आश्रमांत आणण्यासंबंधानें अनेक वेळां यत्न झाले, पण ते व्यर्थ गेले. एकदां तर त्यांच्या येथें आलेल्या एक पाहुण्याबाई-नुकत्याच विलायतेहून आलेल्या डॉक्टर कृष्णाबाई केळवकर-आश्रमाकडे येत असतां व त्यांना येण्याविषयीं आग्रहपूर्वक विनंति केली असतांहि त्यांच्यानें येववलें नाहीं. अलीकडेअलीकडे आपल्या घरींच स्त्रियांच्या सभा वगैरे करून स्त्रियांच्या उन्नतीसाठीं खटपट करण्याचें त्यांनीं सुरू केलें आहे. अशा मनाच्या स्थितींत आश्रमाला भेट देण्याचें त्यांच्या मनांत आलें. अशाच कारणामुळें अजूनपर्यंत आश्रमाकडे न आलेल्या श्रीमती आनंदीबाई भट याहि त्यांजबरोबर होत्या. सुमारें दोन तास त्यांनीं आश्रमांत घालविले व मुलींना योग्य उपदेश केला. आश्रमांतील एकंदर सर्व व्यवस्था त्यांना फारच आवडली, व आपल्या एका नातलग मुलीला कांहीं दिवस आश्रमांत ठेवून त्यांनीं आपली आवड व्यक्त केली.

"पुरुषमंडळींत श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर व श्रीमंत आबासाहेब विशाळगडकर यांची प्रमुखत्वानें गणना केली पाहिजे. आश्रम पहावयाला येणें म्हणजे निदान तीन तास तरी मोडावे लागतात व रस्त्याच्या अडचणीमुळें-ही अडचण येत्या पावसाळ्याच्या आंत दूर होईल असें वाटतें-कधीं कधीं मैल दीड मैल व कधीं अर्धा पाव मैल चालावें लागतें. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें उभय श्रीमंतांना येतांना दीड मैल आणि जातांना दीड मैल असें तीन मैल चालावें लागलें. इतकी अड-

चण सोसून व वेळ खर्चून उद्योगी व श्रीमंत गृहस्थांनीं आपल्या भेटीचा लाभ द्यावा, हें आश्रमाचें लहानसहान भाग्य नव्हे."

ज्यांच्या ऋणांतून आश्रम कधींहि मुक्त होणार नाहीं, असे अत्यंत थोर मनाचे राजकोटचे गृहस्थ श्रीयुत सीताराम नारायण पंडित यांच्या भेटीचा लाभ याच वर्षी झाला. या गृहस्थांच्या औदार्याविषयीं मीं ऐकिलें होतें, व एका सामाजिक परिषदेच्या प्रसंगीं त्यांची मुद्दाम गांठ घेतली होती. त्या वेळीं त्यांना रिपोर्ट वगैरे देऊन मीं एवढीच विनंति केली कीं, सवड होईल तेव्हां आपण आश्रम प्रत्यक्ष येऊन पहावा. त्या गृहस्थांना आग्रह करणें बरें नव्हे, हें जाणून मीं ती गोष्ट तशीच राहूं दिली, व पुढें विसरूनहि गेलों. १९०३ सालच्या दिवाळीच्या सुट्टींत एके दिवशीं सकाळीं माझे मित्र व त्यांचे पुतणे श्रीयुत नारायण भास्कर पंडित, ट्रॅन्स्लेटर हायकोर्ट, यांना घेऊन ते एकदम आश्रमांत आले व त्यांनीं आम्हां सर्वांना चकित केलें. सुट्टीमुळें बऱ्याच मुली घरीं गेल्या होत्या, पण कांहीं थोड्या तेथें होत्या. येथील एकंदर सर्व व्यवस्था पाहून त्यांना फार आनंद झाला व ते खूष होऊन परत गेले. नंतर कांहीं दिवसांनीं त्यांनीं तीनशें रुपयांचा एक चेक पाठविला, व कांहीं अडचण उत्पन्न झाली असतां ती कळविण्याबद्दल एक पत्र लिहिलें. पण अशी विशेष जरूरी उत्पन्न होईपर्यंत ते थांबले नाहींत! थोड्याच दिवसांनीं दरमहा ५० रुपये मदत पाठविण्याला सुरवात केली, व मुलींची संख्या वाढलेली पाहून ही मदत त्यांनीं ७५ रुपये केली. आम्हीं १९०४ सालीं नवीन इमारतीची योजना केली, तेव्हां ते पंचगणीला रहात होते; तेथें जाऊन त्यांना मी भेटलों व सर्व हकीगत सांगितली. मी परत आल्यानंतर लवकरच त्यांनीं एक हजार रुपयांचा चेक पाठविला. या त्यांच्या उपकारांनीं माझें अंतःकरण अगदीं भरून आलें, व त्या स्थितींत मीं त्यांना एक कृतज्ञतापूर्वक पत्र लिहिलें. त्यांनीं एवढेच उत्तर लिहिलें कीं, "तुमचें व संस्थेचेच उलटे मजवर उपकार आहेत. तुम्हीं माझ्या पैशाला योग्य मार्ग दाखविला." हे त्यांचे शब्द औपचारिक नव्हते. इमारतींचें काम सुरू झाल्यानंतर सहासात महिने ते दरमहा पांचशें रुपये पाठवीत असत. या त्यांच्या उपकारांच्या ओझ्यानें मी अगदीं दडपून गेलों, आणि पैशाच्या अडचणींतून पार पडतों असें वाटल्याबरोबर मीं त्यांना

तसें कळविलें. श्रीयुत पंडित हे आश्रमाची प्रगति अगदीं काळजीपूर्वक पहात आहेत, व दरसाल निदान पांचशे रुपये तरी मदत पाठविल्यावांचून रहात नाहींत. त्यांच्याकडून आजपर्यंत सुमारें १३,००० रुपये आले आहेत. जगांत अशा प्रकारचे पुष्कळसे दाते तरी निपजावे, अगर जगांतील पुष्कळशी विपत्ति तरी कमी व्हावी !

१९०४ सालीं बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज आश्रम पाहण्याला आले. महाराजांनीं सुमारें दोन तास आश्रमांत घालविले. प्रथम मुलींच्या अभ्यासाची चांचणी घेऊन नंतर समाजांत विधवांची स्थिति कशी आहे, याबद्दल त्यांचा स्वतःचा अनुभव कित्येक विधवांना विचारिला. तो त्यांनीं सांगितल्यावर सुमारें अर्धा तास महाराजांनीं सर्व मुलींना उपदेश केला. त्यांतील मुख्य मुद्दा असा होता कीं, तुम्हांला समाजाकडून जरी त्रास होत असला तरी तो हेतुपुरःसर दिलेला नव्हे, तर समाजाची आज अनेक वर्षांची जी समजूत झालेली आहे तिला अनुसरून लोक वागतात. त्या त्रासांतून सुटण्यासाठीं तुम्ही धडपड करणें यथायोग्य आहे, व त्यासंबंधानें तुम्हांला जें करणें असेल तें समाजाशीं बहुमानपुरःसर वागून तुम्ही अगदीं निर्भीडपणें करा. असा उपदेश करून महाराज परत गेले. श्रीमंत सावंतवाडीकर त्यांच्याबरोबर होते. श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांच्या भेटीचा लाभ याच वर्षीं झाला. यांनाहि आश्रमांतील व्यवस्था पाहून आनंद वाटला व मोठ्या कळकळीनें त्यांनीं आपली सहानुभूति व्यक्त केली.

१९०५ सालीं एका मंगलकार्याच्या प्रसंगीं हिज एक्सलन्सी लॉर्ड लॅमिंग्टन यांच्या भेटीचा योग आला. आश्रमाच्या नवीन इमारतीचा प्रवेशसमारंभ यांच्या हातून झाला. या समारंभाला सुमारें दीडशें गृहस्थ व शंभर स्त्रिया अशी मंडळी पुण्याहून आली होती.

सर जॉर्ज क्लार्क ( हल्लीं लॉर्ड सिडनहॅम ) यांच्या कुटुंबाला आश्रम फार प्रिय झाला होता. मिस क्लार्क प्रथम फर्ग्युसन कॉलेज पाहण्यासाठीं आल्या, त्या वेळीं त्यांनीं मुद्दाम मला बोलावून नेऊन सांगितलें कीं, तुमचा आश्रम पाहण्याला आम्ही येणार आहों. पुढें लवकरच म्हणजे १९०८ च्या सप्टेंबर महिन्यांत मिस् क्लार्क व सर जॉर्ज क्लार्क यांनीं आपल्या भेटीचा लाभ आश्रमाला दिला. अशा रीतीनें आश्रम पाहिला असतांहि पुढल्याच वर्षीं

सप्टेंबर महिन्यांत बक्षीससमारंभाच्या वेळीं अध्यक्षस्थान पतकरण्याचें त्यांनीं कबूल केलें. याच वेळीं मुलींनीं केलेल्या कलाकौशल्याच्या पदार्थांचें प्रदर्शन केलें होतें, तेंहि त्यांनींच उघडलें. हा समारंभ अत्यंत चित्ताकर्षक झाला. प्रदर्शन आठ दिवस उघडें ठेविलें होतें. या निमित्तानें सातशें स्त्रीपुरुष आश्रम पाहून गेले. आश्रमाच्या इतिहासांत प्रमुखत्वानें नमूद करण्यासारखा हा दिवस झाला.

हर एक्सलन्सी लेडी क्लार्क (हल्लीं लेडी सिडनहॅम) यांनाहि आश्रम पहाण्याची फार उत्कंठा होती. त्या हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच त्यांना सर जॉर्ज यांनीं आश्रमाविषयीं हकीगत कळविली होती, व येथें आल्यावर पहिल्याच वर्षीं आश्रम पहाण्याची त्यांची इच्छा होती, आणि तीप्रमाणें तारीखहि ठरविण्यांत आली; परंतु रस्ता अगदीं नादुरुस्त असल्यामुळें त्यांना त्या वर्षीं आपला बेत रहित करावा लागला. परंतु दुसऱ्या वर्षीं म्हणजे १९१२ च्या सप्टेंबरांत आश्रमाला त्यांच्या भेटीचा लाभ झाला.

हर एक्सलन्सी लेडी विलिंग्डन या फर्ग्युसन कॉलेज पहावयाला आल्या त्या वेळीं त्यांनीं आश्रम पहाण्याची इच्छा प्रदर्शित केली होती; परंतु रस्त्याची स्थिति समाधानकारक नसल्यामुळें या वर्षीं त्यांच्या भेटीचा लाभ आश्रमाला होईल असें आम्हांला वाटलें नव्हतें. परंतु मद्रासच्या गव्हर्नरसाहेबांच्या पत्नी हर एक्सलन्सी लेडी पेन्टलंड या त्यांच्या घरीं थोडे दिवस पाहुण्या आल्या असतां त्या मुदतींतच आश्रम पाहून घेण्याचा विचार त्यांनीं ठरविला, व आपल्या कामगारांमार्फत रस्त्याची वगैरे चौकशी केली. रस्ता वाईट असला तरी एकदोन दिवसांत होईल तेवढीच दुरुस्ती पुरे, अशी अखेरीला रस्त्याच्या अधिकाऱ्यांना त्यांची सूचना गेली. रस्ता बेताबाताचा तरी दुरुस्त होऊन आपलें जाणें घडतें खास असें वाटल्यावांचून त्यांना आमच्याकडे सूचना पाठवितां येईना. शेवटीं तारीख १५ सप्टेंबर १९१३ रोजीं दुपारीं बारा वाजतां त्यांच्या स्वाऱ्या येणार, तों सकाळीं आठ वाजतां त्यांच्याकडील सूचना आली! थोड्या वेळांत करतां आली तितकी तयारी करून लेडी विलिंग्डन व लेडी पेन्टलंड या उभयतांचें स्वागत करण्यांत आलें, व अनाथबालिकाश्रम आणि महिलाविद्यालय या दोन्ही संस्था त्यांना दाखविण्यांत आल्या. एक तासपर्यंत येथील सर्व व्यवस्था

पाहून त्यांना अतिशय आनंद झाला; तो व्यक्त करून उभयतांच्या स्वाऱ्या परत गेल्या.

पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सभासद नामदार म. भा. चौबळ (हल्लीं सर महादेव चौबळ) हे कमिशनचे दुसरे सभासद प्रो. फिशर यांसह १९१४ च्या आरंभीं आश्रम पहावयाला आले. सर्व पाहून झाल्यावर मुलींना चार शब्द सांगतांना "आजपर्यंत ही संस्था प्रत्यक्ष पाहिली नाहीं हें मीं केवढें पाप केलें त्याची कल्पना आतां मला होत आहे!" असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले.

निःसीम देशभक्त पुण्यश्लोक गांधी व त्यांच्या पत्नी यांच्या भेटीचा लाभ आश्रमाला १९१५ च्या आरंभीं झाला. पुण्याला त्यांचा मुक्काम थोडा असतां या संस्थेसाठीं तीनचार तास त्यांनीं वेगळे काढिले. बऱ्याच गोष्टी बारकाईनें पाहून शेवटीं त्यांनीं सर्वांना उपदेशाचे चार शब्द सांगितले, व या संस्थेशीं अधिक परिचय करण्याची इच्छा प्रदर्शित केली. असल्या महात्म्यांचा थोडा तरी सहवास या संस्थेला घडावा, याहून अधिक भाग्य तें कोणतें!

या संस्थेचीं पहिलीं सातआठ वर्षें जवळजवळ अज्ञातवासांत गेलीं असें म्हटलें तरी चालेल. १९०५ सालापासून ही संस्था प्रसिद्धीला येऊं लागली व दूरदूरचे पुष्कळ लोक ती पहाण्यासाठीं येऊं लागले. दरसाल सुमारें एक हजार स्त्रीपुरुष ही संस्था पाहून जातात. प्रेक्षकांपैकीं मोठे अंमलदार व अधिकारी या सर्वांची यादी दिली तर ती फारच मोठी होईल. यासाठीं लोककार्यासाठीं तळमळीनें काम करणाऱ्या कित्येक गृहस्थांचीं नांवें मात्र या ठिकाणीं देतों. दक्षिणी लोकांचीं नांवें पुष्कळच होतील, यासाठीं तीं वगळलीं आहेत. सदर यादी येणेंप्रमाणें:—कलकत्त्याचे ब्रह्मसमाजाच्या वतीनें काम करणारे बाबू अविनाशचंद्र मुजुमदार, बाबू अरविंद घोष व नॅशनल कॉलेजांतील प्रोफेसर बाबू विनयकुमार सरकार; गुजरणवाल्याच्या गुरुकुलाचे उत्पादक लाला राळाराम; जलंदरच्या कन्यामहाविद्यालयाचे उत्पादक लाला देवराज; दक्षिणआफ्रिकेंतील सुप्रसिद्ध मिस्टर व मिसेस पोलक; बनारसच्या सेंट्रल हिंदु कॉलेजांतील प्रोफेसर तारापुरवाला; सेंट्रल हिंदु कॉलेज म्यागझीनच्या हल्लींच्या संपादिका मिस् एडगर; बेलूर मठां-

तील मिसेस् सेव्हियर व मिस् क्रिश्चिआना; मंगळूरच्या डिप्रेस्ड क्लासची वसाहत अस्तित्वांत आणणारे मि. के. रंगराव; मुंबईचे श्रीयुत दयाराम गिडुमल; प. वा. मि. मलबारी; प. वा. शेट धरमसी मुरारजी; शेट नरोत्तम मुरारजी; रा. ब. वसनजी खिमजी; नामदार लल्लूभाई सामळदास व नामदार गोकुळदास पारख; म्हैसूरचे दिवाण एम्. विश्वेश्वर अय्या; राजमहेंद्री येथील विधवागृहाच्यासाठीं आपलें सर्वस्व अर्पण करणारे मद्रास इलाख्यांतील सुप्रसिद्ध सुधारक रा. ब. वीरेश लिंगम् पंतलू व त्यांच्या पत्नी; लाहोरचे सुप्रसिद्ध लाला लजपतराय, प्रो. रुचिराम, व मिसेस सरलादेवी चौधरी; मिसेस सरोजिनी नायडू; प्रसिद्ध थिआसफिस्ट सी. जिनराजदास व वृंदावनच्या औद्योगिक संस्थेचे उत्पादक मि. एम्. प्रताप. या यादींत कांहीं महत्वाचीं नावें चुकून गळून गेलेलीं आहेत. आश्रमाच्या उत्कर्षाला या थोर स्त्रीपुरुषांचे आशीर्वाद कारण झाले आहेत.

नामांकित स्त्रीपुरुषांनीं आश्रम पाहून आनंद प्रदर्शित केला, म्हणजे मला समाधान वाटे ही गोष्ट खरी; पण दोन प्रसंगीं मला जो आनंद झाला, त्याची कशानेंही बरोबरी होणार नाहीं! १९०२ सालीं माझी वृद्ध मातुःश्री व वडील बंधु हीं पंढरपुरच्या यात्रेसाठीं गेलीं होती; तेव्हां परत जातांना त्यांनीं पुण्यांत दोन दिवस मुक्काम केला होता. तुम्हीं माझ्या घरीं उतरावें याबद्दल माझा आग्रह नाहीं; परंतु कसेंहि करून एवढा आश्रम पाहून जा म्हणून मी त्यांना गळ घातली, व त्यांनींहि माझें मन मोडलें नाहीं. आश्रम पाहून झाल्यावर उभयतांच्या नेत्रांतून आनंदाश्रु गळालेले पाहून मला धन्यता वाटली. त्यांच्याबरोबर माझी मावशी आली नाहीं म्हणून मात्र मला वाईट वाटलें. माझ्या मावशीचें मजवर फार प्रेम असे; परंतु माझ्या पुनर्विवाहानंतर तें कमी झालेलें होतें. माझ्या आईबरोबरच मावशीहि यात्रेला आलेली होती; परंतु पुत्रप्रेमानें जसें आईचें मन वळेल तसें मावशीचें वळणें शक्य नव्हतें. ती आश्रम पहावयाला न येतां पुण्यालाच राहिली.

विशेष आनंदाचा दुसरा प्रसंग १९१४ च्या मार्च महिन्यामध्यें आला. माझे वृद्ध मामा व मामी—म्हणजे रँगलर परांजपे यांचे वडील व मातुःश्री हीं उभयतां पुष्कळ वेळां पुण्यांत येऊन गेलीं होतीं; परंतु त्यांनीं आश्रम /आ

पहाण्याचा योग ह्या वेळपर्यंत आला नव्हता. याच वेळीं माझी बहीण अंबाताई व वडील बंधु हींहि अंबाताईच्या मुलीला भेटण्याकरिता खानदेशांत गेलीं होतीं, तीं सहज एकदोन दिवसांच्या फुरसतीनें पुण्याला आलीं होतीं. कांहींएक संभव नसतां अकस्मात् या चौघांच्या गांठी आश्रमांत पडल्या, व सर्वांना अतिशय आनंद झाला. रँगलर परांजपे हेहि या आनंदाचे वांटेकरी होते. वृद्ध व पुण्यशील मामामामींच्या तोंडून निघालेले धन्यवाद ऐकून कोणत्या भाच्याचें अंतःकरण गहिंवरल्यावांचून राहील! त्याचप्रमाणें प्रेमळ बंधुभगिनींना झालेला आनंदातिशय पाहून कोणत्या भावाची चित्तवृत्ति उचंबळित होणार नाहीं! या दोन प्रसंगांचा विसर मला कधीं पडणार नाहीं!

# प्रकरण बेचाळिसावें

## आश्रमाचे हितकर्ते

अगदीं एखादें क्षुल्लक काम असलें तरी शेंकडों लोकांचा हातभार लागला तरच तें तडीला जातें. तेव्हां आश्रमासारख्या संस्थांना हजारों मनुष्यांच्या अप्रत्यक्ष मदतीची अपेक्षा असावी, हें साहजिकच आहे. अशा रीतीची मदत आजपर्यंत लोकांकडून झाली, म्हणूनच आश्रमाला आज हें स्वरूप प्राप्त झालें आहे व त्याची पुढील जीवयात्राहि या मदतीवरच अवलंबून आहे. ज्यांनीं आश्रमाला ठळक मदत केली त्या सर्वांचा नामनिर्देश करणें देखील शक्य नाहीं. येथें फक्त आश्रमाच्या घटकांचे जे वर्ग आहेत, त्यांचा निर्देश करून कांहीं व्यक्तींनीं केलेल्या मदतीचा मात्र थोडासा उल्लेख करावयाचा आहे.

अनाथबालिकाश्रमाच्या मंडळीचे ( या मंडळीला पुढेंमागें हिंदु स्त्रियांच्या शिक्षणाची मंडळी अशा अर्थाचें सामान्य नांव देण्यांत येईल असा संभव आहे. ) घटक दोन प्रकारचे आहेत. मंडळीच्या कामासाठीं आपलें आयुष्य अर्पण करणारे म्हणजे लाइफमेंबर, व द्रव्यद्वारा तिला साहाय्य करणारे. या दुसऱ्या प्रकारच्या घटकांचे आश्रयदाते व साहाय्यकारी असे दोन वर्ग आहेत. एकदम पांचशें रुपयांची देणगी अगर दरसाल पन्नास रुपये वर्गणी देणारे गृहस्थ आश्रयदाते होत, हे सुमारें ५० आहेत. एकदम शंभर रुपये देणारे अगर दरसाल दहा रुपये वर्गणी देणारे साहाय्यकारी होत; हे सुमारें पांचशें आहेत. या संस्थेचीं सूत्रें या सर्वांची मिळून जी मंडळी तिच्या हातांत आहेत. संस्थेचा कारभार करण्यासाठीं एक व्यवस्थापक मंडळी नेमली जाते. तींत सर्व लाइफमेंबर व तितकेच आश्रयदाते व साहाय्यकारी यांनीं निवडून दिलेले सभासद असतात. याशिवाय शाळेच्या कामावर देखरेख करण्यासाठीं वगैरे व्यवस्थापक मंडळींतील आठ सभासदांचा एक स्कूलबोर्ड आहे. एकदम दहा रुपयांहून कमी नाहीं व दरसाल एक रुपयाहून कमी नाहीं, इतकी मदत करणाऱ्या हितचिंतकांचा आणखी एक वर्ग आहे. यांत सुमारें दोन हजार स्त्रीपुरुष आहेत.

कांहीं संदर्भानें आश्रमाच्या ज्या हितकर्त्यांचीं नांवें अन्य ठिकाणीं आलीं आहेत त्यांचा उल्लेख पुनः येथें करीत नाहीं. राहिलेल्या मंडळी-पैकीं फारच थोडयांबद्दल संक्षेपानें सांगावयाचें आहे. आश्रम अगदीं बाल्यावस्थेंत असतां प. वा. श्रीयुत चिं. ह. सोहनी यांनीं आपल्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचीं साठसत्तर पुस्तकें आश्रमाला बक्षीस दिलीं. पुस्तकें उपयुक्त असून प्रत्येकाची किंमत दहा रुपये होती. आश्रमाच्या माहितीचें पत्रक व त्याबरोबरच पुस्तकाची जाहिरात अशीं सुमारें एक हजार वकील व न्यायाधीश लोकांकडे पाठविलीं. या खटपटीनें आश्रमाला सुमारें पांचशें रुपये फायदा झाला. त्या वेळीं हे पांचशें रुपये पांच हजारांच्या किंमतीचे होते!

या प्रयत्नामुळें एका थोर गृहस्थांचें लक्ष या संस्थेकडे वळलें. मि. जी. सी. व्हिटवर्थ हे जिल्हाजज्ज होते. यांच्या नजरेला आश्रमाचें पत्रक पडल्याबरोबर त्यांनीं हें पुस्तक तर मागविलेंच; पण पन्नास रुपयांचा एक चेक पाठवून दरसाल तेवढीच वर्गणी पाठविण्याची इच्छा त्यांनीं कळविली होती. यांना कधींहि वर्गणी पाठविण्याविषयीं सूचना द्यावी लागत नाहीं. अगदीं नियमित वळीं यांची वर्गणी यावयाची. एकदां हे रजेवर विलायतेला गेले असतां तिकडून यांनीं वर्गणी पाठवून दिली; परंतु पत्रावर व चेकावर 'सेक्रेटरी वुइडोज होम, पुणें' एवढाच पत्ता होता. 'हिंदु वुइडोज होम' असें लिहिलें असतें तर घोंटाळा झाला नसता. पुण्यांत लष्करांत यूरोपियन विधवांसाठीं एक लहानसें विधवागृह आहे. त्यांचें नांव नुसतें 'वुइडोज होम' एवढेंच आहे. इंग्लंडांतून मोघम पत्त्यावर आलेलें पत्र सहजीं त्या विधवागृहाकडे गेलें, व त्या सेक्रेटरींनीं ही रक्कम जमा केली असावी असा तर्क मीं कांहीं वर्षांनीं केला. आमचा रिपोर्ट तयार झाल्यावर तो व्हिटवर्थसाहेबांकडे पाठविला, व त्यांच्या वर्गणीविषयीं चौकशीचें पत्र लिहिलें. तेव्हां झालेली चूक त्यांच्या लक्ष्यांत आली. त्यांनीं एवढाच जबाब पाठविला कीं, दुसऱ्या एका संस्थेनें प्रामाणिकपणानें ते पैसे आपले असें समजून घेतले आहेत. पुढें दोनतीन वर्षांनीं त्या संस्थेला उद्देशून लिहिलेलीं कांहीं पत्रें मजकडे व या संस्थेला उद्देशून लिहिलेलीं त्यांजकडे गेलीं, त्यांवरून वरील संस्था पुण्यांत असल्याबद्दल मला कळलें.

व्हिटवर्थसाहेब पेनशन घेतपर्यंत नियमानें दरसाल पन्नास रुपये पाठवीत व पेनशन घेऊन इंग्लंडांत गेल्यापासून दरसाल तीस रुपये पाठवीत असत. यांनीं एकदां महिला विद्यालयाला शंभर रुपये पाठविले व आतां आश्रम, विद्यालय व मठ या संस्था एक झाल्याचें कळल्यावर त्यांनीं आपली वार्षिक वर्गणी साठ रुपये केली आहे.*

कित्येक वेळां मनुष्याच्या मनांत सत्कार्य करावयाचें असतें, परंतु आजचें उद्यांवर टाकल्यानें तें केव्हां केव्हां तसेंच राहून जातें. तसा प्रकार नाशिकचे वकील प. वा. प. वि. योगी यांच्यासंबंधानें होणार होता. या गृहस्थांच्या मनांत आश्रमाविषयीं फार सहानुभूति होती. त्यांनीं स्वतः शंभर रुपये दिले होते व आपल्या मुंबईच्या एका मित्राकडून पांचशें रुपये देवविले होते. आणखी तीन हजार रुपये आश्रमाला द्यावे अशी त्यांची इच्छा होती, व ती त्यांनीं आपल्या पत्नीजवळ एकदोन वेळां प्रदर्शित केली होती. ही व्यवस्था घडून येण्यापूर्वी ते पक्षघातानें आजारी पडून त्यांची वाचा बंद झाली, व पुढें कांहीं दिवसांनीं ते स्वर्गवासी झाले. श्रीमती जानकीबाई योगी यांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवून स्कॉलरशिपांसाठीं ही रक्कम आश्रमाच्या स्वाधीन केली. अशीं उदाहरणें फारच क्वचित् आढळून येतात.

यवतमाळचे वकील प. वा. सदाशिव मोरेश्वर देव यांनीं मृत्युपत्रानें आपल्या इस्टेटीचे व्यवस्थापक नेमून तिचें उत्पन्न आश्रमाकडे द्यावें, अशी व्यवस्था केली आहे. मृत्युपत्र शाबीत करून आपला हक्क सिद्ध करण्याला वगैरे पुष्कळसा खर्च आल्याकारणानें व त्यांच्या इजाऱ्याच्या जमिनीपैकीं बऱ्याच जमिनी कुळांनीं फिर्यादी करून परत घेतल्यामुळें प्रथम वाटलें होतें तेवढें उत्पन्न मिळणें शक्य झालें नाहीं. अलीकडे कांहीं वर्षें सदर इस्टेटीचे

---

* व्हिटवर्थ साहेब परलोकवासी झाल्याला दहा वर्षें होऊन गेलीं. त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत आश्रमाला पांच हजार रुपयांची देणगी देण्याविषयीं लिहिलें होतें. त्याप्रमाणें पांच हजार रुपये आश्रमाला मिळून ती रक्कम वाचनालयाचे इमारतींत व्हिटवर्थ हॉल बांधण्याचे कामीं खर्च झाली आहे.

व्यवस्थापकांकडून दरसाल दोनशें रुपये येत आहेत. पुढें हें उत्पन्न बरेंच अधिक मिळेल अशी आशा आहे.*

डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर हे अगदीं आरंभापासून आतांपर्यंत व्यवस्थापक मंडळीचे अध्यक्ष आहेत, व द्रव्यानें आणि आपल्या सल्ला-मसलतीनें आश्रमाला त्यांनीं चांगली मदत केली आहे. प. वा. न्यायमूर्ति रानडे हे आश्रम बाल्यावस्थेंत असतांच वारले; परंतु अगदीं आरंभापासून या संस्थेकडे त्यांचें फार लक्ष होतें, व पुष्कळ वेळां त्यासंबंधानें ते माझ्याशीं बोलत व कांहीं सूचना करीत.

प. वा. नामदार गोपाळराव गोखले यांनीं अडचणीच्या प्रसंगीं योग्य सल्लामसलत देऊन आश्रमाला विशेष प्रकारची मदत केली आहे. एकदां असेंच कांहीं कारण होतें त्या वेळीं व्यवस्थापक मंडळीचे सभासद होण्या-साठीं केलेली विनंतिहि त्यांनीं मान्य केली होती.

आतां दोनतीन गृहस्थांच्या मदतीबद्दल उल्लेख करून हें प्रकरण संप-वितों. श्रीयुत दि. कृ. साठे या गृहस्थांनीं दोनतीन वर्षें आश्रमासाठीं फार खटपट केली; अनेक गृहस्थांच्या भेटी घेऊन त्यांना आश्रम दाख-विण्यासाठीं घेऊन यावें व नंतर त्यांजकडून मिळेल ती वर्गणी मिळवावी, असा यांचा क्रम होता. यांच्या खटपटीपासून आश्रमाला फार उपयोग झाला. दुसरे दोन गृहस्थ श्रीयुत गो. ग. भागवत व श्रीयुत के. मो. फडके, हे होत. आश्रमांत अनेक अडचणी असून शिक्षक मिळणें जेव्हां बरेंचसें कठीण होतें, त्या वेळीं या दोघांचीहि मदत मिळाली. या उभय-तांनीं आपलें काम मनापासून केलें. हे पडेल तें काम उचलीत असत. श्रीयुत भागवत हे कांहीं कारणानें हें काम सोडून गेले. श्रीयुत फडके हे अजून आश्रमाच्या वर्गणीचें काम करीत असतात.+

---

* अलीकडे या इस्टेटींतून दरसाल सहाशेंपासून एक हजार रुपयेपर्यंत आश्रमाला मिळत असतात.

+ आतां श्रीयुत फडके यांचा आश्रमाशीं संबंध नाहीं.

# प्रकरण त्रेचाळिसावें

## आश्रमाचा विस्तार

उगदीं लहान बीजापासून आश्रमाचा वृक्ष कसकसा वाढत गेला, हें मागल्यापुढल्या प्रकरणांवरून कळेलच; परंतु या वाढींतील कित्येक गोष्टींचा उल्लेख या प्रकरणांत करावयाचा आहे.

विधवागृहाची कल्पना प्रथम १८९५ सालीं आली, व त्यासाठीं कांहीं वर्गणी जमविण्यालाहि सुरुवात झाली. पुढें १८९६ च्या जून महिन्यांत अनाथबालिकाश्रमाची मंडळी स्थापन होऊन कांहीं विद्यार्थिनींच्या शिक्षणाला मदत होऊं लागली. नंतर १८९९ च्या जानेवारींत पुण्यांतच स्वतंत्र आश्रमाला सुरुवात झाली. मग १९०० च्या जून महिन्यांत आश्रम हिंगण्याच्या माळावर बांधलेल्या चालचलाऊ घरांत नेण्यांत आला.

आश्रमाच्या विस्तारासाठीं मी काय करूं आणि काय न करूं, असें मला केव्हां केव्हां होत असे, व आपलें बळाबळ न पाहतां व दूरवर विचार न करितां लहान मुलासारखें मी कांहीं बोलून अगर लिहून जात असें. अजूनहि माझी बहुतेक तीच स्थिति आहे. असे एकदोन प्रसंग येथें देणें वावगें होणार नाहीं. १९०३ सालाच्या रिपोर्टांत मी पुढील मजकूर लिहिला आहे:—

"आश्रमाची मुख्य इमारत सुमारें ८००० रुपये किंमतीची १९०२ च्या जुलई महिन्यांत पुरी झाली. पण स्वयंपाकघर, जेवणघर, न्हाणीघर, कपडे धुण्यासाठीं फरशी वगैरेंची सोय व्हावयाची होती. शिवाय मुलींची संख्या अधिक झाल्यास आणखी दहापंधरा मुलींना राहण्यासाठीं जागा तयार करणें जरूर वाटूं लागलें; परंतु इमारतफंड सर्व संपून जाऊन चालू फंडाची हजारपंधराशें रुपयांची शिल्लक मात्र इमारतफंडाला लावतां येण्यासारखी होती; आणि खर्च तर पांचसहा हजार रुपये होणार. तेव्हां काय करावें, ही मोठी विवंचना होती. या संस्थेचें पाऊल हळुहळू, पण निश्चितपणें सारखें पुढें पडत चाललें आहे, यावरून परमेश्वराचें साहाय्य या उद्योगाला आहे व तो हितचिंतकांच्या मनांत खचित प्रेरणा करणार, हें लक्ष्यांत आणून

**या वर्षाच्या आरंभीं नवीन इमारतीचें काम एकदम सुरू करण्यांत आलें. इमारतफंडासाठीं जरूर तितकी रक्कम जमली तर उत्तमच; परंतु नाहीं जमली तर येणारी तूट खासगी शिलकेंतून व तिनें न भागेल तर स्वतःच्या जबाबदारीवर कर्ज काढून भरून काढावयाची, असा निर्धार चिटणीस यांनीं केला होता, व तो त्यांनीं अनेक प्रसंगीं सभांतून बोलून दाखविला होता; परंतु ईश्वरकृपेनें तसा कांहीं प्रसंग न येतां ५७०० रुपये खर्च होऊन नवीन इमारत पुरी झाली आहे."**

आश्रमाचें काम दिवसेंदिवस वाढत चाललें होतें व काम करणारीं चांगलीं माणसें अधिक असल्याशिवाय तें निभण्यासारखें नव्हतें. तेव्हां मंडळींनीं सोडलें तर डेक्कन एजुकेशन सोसायटीच्या बंधनांतून सुटतां आल्यास पहावें व आश्रमाच्याच कामाकडे सर्वस्वीं लागावें, असा विचार मनांत येऊन ती गोष्ट मीं प्रमुख लाइफमेंबरांजवळ काढली. बंधनांतून सोडण्याची गोष्ट त्यांनीं अगदीं नाकबूल केली; परंतु कार्याचें महत्त्व लक्षांत आणून त्यांनीं मला बरीचशी रजा देण्याचें कबूल केलें. तेव्हां मीं तीन वर्षांची बिनपगारी रजा घेऊन १९०४च्या आरंभीं आश्रमाच्या कामांत आपलें सर्व मन घालण्याला सुरुवात केली. हा क्रम अकरा महिने चालू राहिला. पुढें आश्रमाच्या कामाला योग्य स्त्रिया मिळाल्या, व डे. ए. सोसायटीचीं वीस वर्षें पुरीं केल्यावांचून गत्यंतर नाहीं, हें लक्षांत आणून राहिलेली रजा रद्द करवून मी पुनः सोसायटीच्या कामावर रुजू झालों.

आश्रमांतील मुलींची संख्या जसजशी वाढत गेली, तसतसे इमारतींचे नवीननवीन भाग जोडावे लागले. पैशाची अडचण बहुधा असेच; पण ती कशी ना कशी तरी दूर होई. इमारतीला थोडा तरी जोड लागला नाहीं अशीं सारखीं दोनतीन वर्षें कधीं गेलीं नाहींत. होतांहोतां दोन्ही संस्था मिळून एक लाख रुपयांच्या इमारती झाल्या आहेत.

आश्रमाच्या शाळेची वाढहि चांगल्या रीतीनें झाली आहे. महिलाविद्यालयाच्या ९० मुली आश्रमाच्या शाळेंतच शिकत असतात. या रीतीनें शाळेंत दोनशें मुली होऊन मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिकविण्याची सोय झाली आहे. मराठीचा अभ्यासहि सात इयत्तांचा होऊन सातव्या इयत्तेच्या परीक्षेसाठीं कांहीं मुली पाठविण्यांत येतात.

ज्या हिंगण्याच्या माळावर पूर्वी एकहि मनुष्य नव्हतें तेथें आतां एक लहानशी वसाहत झाली आहे, व विद्यार्थिनी आणि दोन्ही संस्थांतील कामगार आणि त्यांची कुटुंबें मिळून एकंदर अडीचशें मनुष्यें या ठिकाणीं रहात आहेत.

सरकारी टपालखात्यानेंहि आश्रमाची वाढ होऊं लागल्याबरोबर आमची अडचण दूर करण्याला प्रारंभ केला. पहिल्यानें आठवड्यांतून तीनदां पत्रें मिळत असत तीं दररोज मिळूं लागलीं. नंतर अनुभव घेण्यासाठीं लहान ब्रँच पोस्ट ऑफिस सुरू करण्यांत आलें व ऑफिसाला पुरेसें काम नेहमीं मिळेल असें लक्षांत आल्याबरोबर तें कायम करण्यांत आलें. पोस्टमास्तरणीला पगार प्रथम दरमहा चारच रुपये असे, तो वाढत वाढत आतां आठ रुपये झाला आहे. मनीऑर्डर, सेव्हिंग बँक वगैरे पोस्टाच्या सर्व सोयी आतां येथें झाल्या आहेत.

आश्रमाचा फायदा घेण्यासाठीं विद्यार्थिनी फार दूरदूरच्या ठिकाणांहून येतात. महाराष्ट्राच्या सर्व भागांतून तर त्या येतातच; पण वऱ्हाड, मध्यप्रांत, मध्यहिंदुस्तान, गुजरात वगैरे ज्या ज्या भागांत महाराष्ट्र भाषा बोलणाऱ्या लोकांची वस्ती आहे, त्या त्या भागांतूनहि मुली येतात. ज्यांची स्वभाषा मराठी नसते अशाहि कित्येक विद्यार्थिनी मद्रास, म्हैसुर, मंगळूर, राजमहेंद्री वगैरे ठिकाणांहून आश्रमांत येतात. हल्लीं अशा विद्यार्थिनी आश्रमांत पांच आहेत.

पूर्वी आश्रम फारच थोड्या लोकांना माहीत होता. आतां आश्रमाची ज्यांना माहिती आहे असे लोक सर्व हिंदुस्तानांत ठिकठिकाणीं आहेत. ज्यांच्या मनांत आश्रमाविषयीं गुप्त सहानुभूति उत्पन्न झाली आहे अशा लोकांची संख्याहि बरीच मोठी आहे. आश्रमाचे वर्गणीदार हिंदुस्तानाच्या सर्व भागांत पसरलेले आहेत, व आजपर्यंत पंचवीस हजार लोकांकडून तरी आश्रमाला थोडीफार मदत झालेली असेल. दरसाल सुमारें तीनएक हजार लोकांकडून थोडीफार मदत मिळून सुमारें पंधरा हजार रुपये जमा होतात.

आश्रमाचा वार्षिक खर्चहि दांडगा आहे. दरसाल सुमारें तेराचौदा हजार रुपये खर्च होतो. हा दिवसेंदिवस वाढतच जाणार. ही भरून निघ-

ण्याचें साधन म्हणजे सालीना वार्षिक वर्गण्यांचें उत्पन्न सुमारें साडेतीन-पासून चार हजार, खर्च देणाऱ्या विद्यार्थिनीकडून तीन हजार, व्याज दोन हजार, व बाकीचें इतर देणग्यांच्या द्वारें कसेंबसें भरून निघतें.

आश्रमाचा विस्तार हळुहळू कसा होत गेला व त्याच्या उपयोगाचें क्षेत्र किती विस्तृत झालें आहे, याची कल्पना पुढील कोष्टकांवरून होईल. हीं कोष्टकें आश्रमाच्या एकोणिसाव्या वार्षिक रिपोर्टावरून घेतलीं आहेत.

## गेल्या एकोणीस वर्षांतील

### आश्रमाची स्थिति दाखविणारें कोष्टक.

| वर्ष. | सालअखेर विद्यार्थिनींची संख्या. | सालाची जमा. | | | सालाचा खर्च. | | | सालअखेर शिल्लक. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. |
| १८९६ | ... | ३७१५ | ८ | ६ | १९४ | ९ | ७ | ३५२० | १४ | ११ |
| १८९७ | ... | २८७२ | १२ | ९ | ४६० | ० | ४ | ५९३३ | ११ | ४ |
| १८९८ | ... | ४७७९ | १३ | ११ | ८४२ | ० | ६ | ९८७१ | ८ | ९ |
| १८९९ | ४ | ४१०३ | १५ | ६ | ७५७ | ७ | ७ | १३२१७ | ० | ८ |
| १९०० | १० | ३७७३ | २ | १ | १७८७ | ११ | १० | १५२०३ | ६ | ११ |
| १९०१ | १४ | २९१५ | ३ | ४ | १८४३ | ७ | ४ | १६२७५ | २ | ११ |
| १९०२ | १८ | ७३३१ | ११ | ११ | ९५७९ | ७ | १० | १४०६७ | ७ | १० |
| १९०३ | ३० | १३९७४ | १० | ९ | ९०६८ | १३ | ६ | १८९७३ | ५ | १ |
| १९०४ | ३८ | २०८५५ | १५ | १ | ९१८७ | १४ | ४ | ३०६४१ | ५ | १० |
| १९०५ | ६० | १८०४७ | १० | १० | २३४५३ | ० | ० | २५२३६ | ० | ८ |
| १९०६ | ७५ | २९८४० | ११ | ४ | १२१०६ | १५ | ० | ३४९६९ | १३ | ० |
| १९०७ | ६५ | १५८५१ | १३ | ० | ८७७८ | ११ | ० | ४२०४२ | १५ | ० |
| १९०८ | ८० | १३४०७ | ४ | २ | १०९८१ | ६ | १० | ४४४६१ | १२ | ४ |
| १९०९ | ९५ | १६२८७ | १४ | ० | १४६२९ | ५ | ३ | ४६१२० | ५ | १ |
| १९१० | १०० | १९१७३ | १ | ९ | १४०९३ | १३ | ७ | ५११९९ | ९ | ३ |
| १९११ | १०० | २११३३ | १४ | १ | १५१८० | १२ | २ | ५७१५१ | ११ | २ |
| १९१२ | १०५ | २०२४७ | १२ | १ | १६२७६ | ५ | ३ | ६११२४ | २ | ० |
| १९१३ | १०५ | १८९७३ | १५ | ४ | १८३७२ | ९ | ० | ६१७२५ | ८ | ४ |
| १९१४ | ११० | १५३२० | १३ | १० | ३१८१९ | ६ | ५ | ४५२३६ | १५ | ९ |

## विद्यार्थिनींची जातवारी.

| | | | |
|---|---|---|---|
| कोंकणस्थ ब्राह्मण ... ... | ६० | नायडू ... ... ... | २ |
| देशस्थ ब्राह्मण ... ... | ५७ | गोवर्धन ब्राह्मण ... ... | २ |
| कऱ्हाडे ब्राह्मण ... ... | २३ | तेलगू ... ... ... | २ |
| सारस्वत ब्राह्मण ... ... | १४ | द्रविड ब्राह्मण ... ... | २ |
| कायस्थ प्रभु ... ... | १० | देवरुखे ब्राह्मण ... ... | २ |
| मराठे ... ... ... | १० | विदुर ब्राह्मण ... ... | २ |
| दैवज्ञ ब्राह्मण ... ... | ६ | उच्चकुळांतील मराठे ... | १ |
| वाणी ... ... ... | ४ | धनगर ... ... ... | १ |
| तेली ... ... ... | ३ | एकूण | २०१ |

## विद्यार्थिनींची स्थळवारी.

| | | | |
|---|---|---|---|
| पुणें जिल्हा ... ... | २७ | बडोदें ... ... ... | ४ |
| मुंबई ... ... ... | २६ | गुजरात ... ... ... | ४ |
| सातारा जिल्हा ... ... | २० | मध्य हिंदुस्तान ... ... | ३ |
| रत्नागिरी जिल्हा ... ... | १९ | निजामचें राज्य ... ... | ३ |
| कोल्हापूर व दाक्षिणेंतील संस्थानें | १६ | कारवार ... ... ... | ३ |
| मध्यप्रांत ... ... ... | १५ | नाशिक जिल्हा ... ... | २ |
| सोल्हापूर जिल्हा ... ... | १० | सावंतवाडी ... ... ... | २ |
| वऱ्हाड ... ... ... | ८ | म्हैसूर ... ... ... | २ |
| इंदूर ... ... ... | ५ | मंगळूर ... ... ... | २ |
| ठाणें जिल्हा ... ... | ५ | विजापूर जिल्हा ... ... | २ |
| बेळगांव जिल्हा ... ... | ५ | खानदेश ... ... ... | १ |
| कुलाबा जिल्हा ... ... | ५ | राजमहेंद्री ... ... ... | १ |
| ग्वाल्हेर ... ... ... | ५ | गोवा प्रांत ... ... ... | १ |
| अहमदनगर जिल्हा ... | ५ | | |

एकूण २०१

## विद्यार्थिनींच्या पालकांची सामाजिक स्थिति.

| | |
|---|---|
| ६४ | विद्यार्थिनींचे पालक सरकारी नोकर आहेत. |
| २३ | ... ... ... संस्थानांतील अगर खासगी नोकर आहेत. |
| २१ | ... ... ... विद्यार्थिनींचे पालक सुखवस्तु आहेत. |
| १९ | ... ... ... शेतकीच्या उत्पन्नावर निर्वाह करणारे ,, |
| १७ | ... ... ... खाजगी व्यापारधंदा वगैरे करणारे ,, |
| १४ | ... ... ... वकील ... ... ... ... ,, |
| १३ | ... ... ... डॉक्टर ... ... ... ... ,, |
| १२ | ... ... ... पेन्शनर ... ... ... ... ,, |
| ७ | ... ... ... गरीब विधवा ... ... ... ,, |
| ५ | ... ... ... कॉलेजांतील विद्यार्थी ... ... ,, |
| १ | ... ... ... संस्थानिक... ... ... ... ,, |
| ५ | विद्यार्थिनींचे जवळचे आप्त कोणी नाहींत. |
| २०१ | एकूण. |

# प्रकरण चव्वेचाळिसावें

## अनाथबालिकाश्रम आणि विधवाविवाह

अनाथबालिकाश्रम ही संस्था केवळ शिक्षणाची असावी व पुनर्विवाहाच्या प्रश्नासंबंधानें तिनें तटस्थ वृत्ति स्वीकारावी, असें धोरण मीं अगदीं आरंभापासून ठेविलें होतें व त्यासाठीं जरूर ती काळजी घेतली होती. अधिकारी मनुष्यांनीं अगर शिक्षकांनीं या प्रश्नासंबंधानें अनुकूल अगर प्रतिकूल मतें विद्यार्थिनींजवळ प्रदर्शित करूं नयेत, अशी व्यवस्था ठेवलेली होती. मीं स्वतः आश्रमांतील विधवा विद्यार्थिनींच्या विवाहाच्या कामीं बिलकूल पडावयाचें नाहीं असें ठरविलें, व पालकाच्या अनुकूलतेवांचून आश्रमांतील एकाद्या विधवेचा विवाह घडून येऊं लागला, तर त्यासंबंधानें कांहींएक मदत करावयाची नाहीं व त्या प्रसंगीं आपण हजरहि रहावयाचें नाहीं, असें करूं लागलों. तथापि आश्रमाशीं ज्यांचा संबंध नाहीं अशा विधवांच्या विवाहांसंबंधानें शक्त्यनुसार मदत करण्यास मी मागें सरलों नाहीं. आश्रमाच्या लायब्ररीसाठीं करमणूक वर्तमानपत्र सुरू करण्याचें माझ्या मनांत आलें; परंतु सुरू करणार तोंच नवीन वर्षापासून त्या पत्रांत पुनर्विवाहाची गोष्ट देण्याला सुरुवात झाली. तेव्हां मी आपला बेत एक वर्ष तहकूब ठेवला. पुनर्विवाहासंबंधाचें हल्लींचें लोकमत, आणि हे उपाय मी योजीत होतों त्या वेळचें लोकमत, यांत फार अंतर आहे! बहुजनसमाजाचें मत संस्थेविषयीं प्रतिकूल होऊं देऊं नये, यासाठीं मी फार जपत होतों. या माझ्या वागण्याचा परिणाम असा झाला कीं, पुनर्विवाहाची पक्षपाती मंडळी मजवर फार रुष्ट झाली. मला आतां पुनर्विवाह केल्याबद्दल पश्चात्ताप वाटूं लागला आहे व शक्य असतें तर प्रायश्चित्त घेऊनहि मी मोकळा झालों असतों, अशा प्रकारचे उद्गार काढण्यालाहि कित्येकांनीं कमी केलें नाहीं!

कित्येक वेळां मधल्या मार्गानें जाणें बरेंच कठीण असतें. एका पक्षाची मंडळी एका प्रकारचे आरोप करीत असते, तर दुसऱ्या पक्षाची मंडळी त्याच्या अगदीं उलट प्रकारचे आरोप करिते. राजकीय वातावरणांत

'मवाळ' म्हटल्या जाणाऱ्या पक्षाची जी स्थिति केव्हांकेव्हां होई, ती स्थिति सामाजिक वातावरणांत अनेक वेळां आश्रमाची झाली. एका बाजूनें सरकारानें संशय घेऊन त्यांना राजद्रोही म्हणावें, व दुसऱ्या बाजूनें जहाल पक्षानें त्यांना घरभेद्ये, सरकारचे बगलबच्चे, वगैरे विशेषणें देऊन त्यांची संभावना करावी. त्याचप्रमाणें खरें खोटें कांहीं कारण सांपडलें कीं, एका पक्षानें 'पुनर्विवाहगृह,' 'पुनर्विवाहाचा कच्चा माल तयार करण्याचा कारखाना,' वगैरे प्रकारें त्याचें वर्णन करावें व दुसऱ्या बाजूनें 'ही पुनर्विवाहाला विरोध करणारी संस्था आहे' असें म्हटलें जावें. कधीं एका पक्षाची गैरमर्जी, तर कधीं दुसऱ्या पक्षाची, असें पुनः पुनः घडावें. १९०५ व १९०६ सालीं तर दोन्ही पक्षांच्या वर्तमानपत्रांनीं खूपच ओरड केली. या वेळच्या सुमाराचे वर्तमानपत्रांतील कांहीं उतारे दिले असतां त्या वेळीं मजबद्दल व आश्रमाबद्दल प्रगतिपर लोकांचें कसें मत झालें होतें, तें दिसून येईल.

बेळगांव येथील 'चिकित्सक' वर्तमानपत्राच्या १६ ऑगष्ट १९०५ च्या अंकांत 'एक पुनर्विवाहित' या सहीनें 'प्रो. कर्वे व आश्रमाच्या अधिकारिणी स्त्रिया यांस' एक लांबलचक अनावृत पत्र प्रसिद्ध झालें होतें, त्यांतील कांहीं उतारेः—

"जर केस वाढविलेल्या एका विधवेशीं प्रोफेसरसाहेबांनीं लग्न केल आहे, तर तें नाहीं केलें असें होत नाहीं; पण पाहिजे तर त्यांनीं काडी मोडून देऊन प्रायश्चित्त घ्यावें. ......प्रायश्चित्तासारखी तोड काढून जर विधवाविवाहाचा मळ प्रो. कर्व्यांनीं धुऊन टाकिला नाहीं तर सुधारक व इतरहि लोक त्यांना पुनर्विवाहित समजणारच! मग आश्रमाचें काम जितकें उत्तम व्हावयाला पाहिजे तितकें उत्तम होणार नाहीं; पण सध्यां सदसद्विवेकाच्या दोन पेट्यांचा उपयोग करून इकडे सुधारकांना व तिकडे तदितरांना झुलवून पैसे मिळवितां येतात, तसें स्पष्टपणें बोलल्यानें होणार नाहीं ........... दोन सदसद्विवेकाच्या पेट्यांनीं फार मोठें काम होतें. आपला व एका विधवेचा जन्म सुखाच्या संसारांत जातो, विधवांचा कनवाळू ह्मणून घ्यावया-

ला मिळतें; व दुसऱ्या बाजूला शास्त्राप्रमाणें वागणारा ह्मणून उद्धारक, किंवा असुधारक अगर दुर्धारक यांच्या टोळींत मिसळावयाला मिळतें. याकरितां स्पष्टपणें बोलणें हें प्रोफेसरसाहेबांच्या पथ्यावर पडणार नाहीं.............यासाठीं प्रोफेसरसाहेबांनीं आपलें मूकव्रत सोडावें. जर प्रोफेसरसाहेब स्पष्ट सांगतील कीं, मी विधवाविवाह पाप समजतों, 'विधवाविवाह–प्रतिबंध–निवारक मंडळी'च्या ऐवजीं 'विधवाविहावोत्तेजन–निवारक मंडळी' काढण्याचा माझा विचार आहे, विधवांना फक्त शिवलीलामृतासारख्या पोथ्या वाचण्याला शिकवून आपल्या भगिनींच्या घरीं पुराणिकांचें काम करण्याला शिकवावयाचें आहे. व सुईण, दाई, शिंपीण, मास्तरीण, असलीं कामें शिकवण्याचा हेतु इतकाच, कीं, आपल्या सवाष्ण भगिनींच्या बाळंतपणाची, मुलें खेळवण्याची, कपडेलत्ते शिवण्याची आणि लहान मुलींना पुराणांतल्या गोष्टी सांगून सासरीं कसें वागावें वगैरे शिकण्याची सोय व्हावी, या विधवांनीं संन्यासिनी अगर बैरागिणी व्हावें असेंच मी त्यांच्या मनांत भरवून देणार, तर सर्व जुने लोक तरी प्रो. कर्व्यांना आश्रमासाठीं मदत करतील व प्लेग वगैरेमुळें होणाऱ्या लाखों विधवांनीं आश्रम भरून जाईल, आणि हिंगणेंबुद्रुक केडगांवावर ताण करील! असा आश्रम गजबजून गेल्यावर यांतून बाहेर पडणाऱ्या 'गंगाभागीरथी' सर्व देशभर फिरून सनातन धर्माचा झेंडा कायम रोवतील.

"आपल्या आश्रमांत येणाऱ्या बायांशीं आपण प्रतारणाबुद्धीनें कां वागतां? विधवांशीं लग्न करणें पाप आहे अशी त्यांची समजूत होईलसें कां वागतां? बायकांचें पहिलें लग्न व दुसरें लग्न यांत विलक्षण फरक आहे एक स्वर्गप्राप्तीचें व दुसरें नरकप्राप्तीचें साधन आहे, अशी त्यांची समजूत कां करून देतां? ......विधवेनें लग्न करूं नये असें आपले लेफ्टनंट कां सांगतात? ......कुचेष्टा केल्याशिवाय प्रतिष्ठा वाढत नाहीं हें आपलें वाग-

ण्याचें तत्त्व असावें काय?......ज्यांनीं स्वतः विधवेशीं लग्न लाविलें, ज्यांनीं विधवाविवाहोत्तेजक मंडळी स्थापिली, त्यांनींच 'विधवा-विवाह-प्रतिबंध-निवारक' असें त्या मंडळीचें नांव बदलून टाकावें काय? यांनींच विधवांना सुशिक्षित करण्याचा प्रयत्न करावयाचा म्हणून जें विधवासदन स्थापिलें, तेंच विधवा-विवाहाच्या उलट मतें बनविण्याची शाळा व्हावी ना!

"सदसद्विवेकाची एकच पेटी वापरा! अनाथबालिकाश्रम संस्था व तिचे हेतु आणि कामें हीं विधवाविवाहाच्या सुधारणेला अनुकूल तरी असतील, किंवा प्रतिकूल तरी असतील. दोन्ही असूं शकणार नाहींत. म्हणून तुम्ही खऱ्या सुधारकांस अगर तदितरांस कोणास तरी फसवीत आहां असें होतें. पण तसें फसवूं नका."

या पत्रांतील एक उतारा घेऊन 'सुबोधपत्रिके'नें या वेळीं एक लेख लिहिला व त्या पत्राचा उल्लेख करून 'सयाजीविजया'नेंहि एक लेख लिहिला. 'सुधारक' पत्रानें एक बराच लांबलचक अग्रलेख 'प्रो. कर्वे, अनाथबालिकाश्रम, आणि विधवापुनर्विवाह' या मथळ्याखालीं याच सुमाराला लिहिला आहे. त्यांतील उतारे येणेंप्रमाणें:—

"अलीकडे कित्येक वर्षें प्रो. कर्वे व त्यांस मदत करणारें त्यांचें मित्रमंडळ यांस आपलें काम उत्तम प्रकारें साधावें म्हणून आपला सुधारणेचा कार्यक्रम छाटाछूट करून बराच आटोपसर करावा आणि तेवढा साध्य करून घ्यावा, विनाकारण फापटपसारा घालण्यांत अर्थ नाहीं असें वाटूं लागल्यामुळें, त्यांना विधवाविवाह व विधवांची स्थिति सुधारणें हे दोनच विषय हातीं घ्यावेसे वाटले......आणि कित्येकांनीं पुनर्विवाहित पक्ष व सुधारणावादी पक्ष हे दोन वेगळे पक्ष आहेत असें लोकांस भासवून आपण आपल्या पुनर्विवाहित गोतासुद्धां सुधारकांस सोडून धर्माभिमान्यांच्या पंखांखालीं घुसण्याचे प्रयत्न केले. त्यांनीं धर्माभिमानाच्या सुरास सूर लावून सुधारकांस आणि

सुधारणेस इरसाल शिव्या देण्याचा आणि मोठ्या आढ्यतेनें उपदेश करण्याचाहि कावा लढवून पाहिला. अशा प्रकारें विवेक-भ्रष्टाच्या पतनाप्रमाणें खालीं, त्याहून खालीं, अशा पतनास हा पुनर्विवाहितपक्ष कसा पात्र झाला, याची आठवण आमच्या वाचकांस करून देण्याची गरज नाहीं. या पक्षाच्या पराक्रमाशीं व त्यांस आलेल्या यशापयशाशीं आम्हांस येथें कांहीं कर्तव्य नाहीं. परंतु पुनर्विवाहितपक्षानें सुधारकपक्षावर जें शस्त्र घातलें तेंच शस्त्र त्या पक्षावर त्यांतील कांहीं मंडळींनीं घातलें; आणि खुद्द पुनर्विवाहितपक्षांतहि पुनर्विवाहाचा गौरव करणारे व त्यास महत्व न देणारे असे दोन पक्ष आतां उपस्थित झाले आहेत. प्रो. कर्वे हे या दुसऱ्या पक्षाचे अध्वर्यु आहेत, असें त्यांच्या वर्तनावरून म्हणावें लागत आहे. ते स्वतः पुनर्विवाहित आहेत; परंतु पुनर्विवाह करण्याच्या बाबतींत त्यांनीं कोणास मदत केली असें लोकांस म्हणावयास मिळूं नये, हा त्यांचा बाणा आहे. त्यांच्या आश्रमांतील एखाद्या विधवेनें आश्रम सोडल्यानंतरहि पुनर्विवाहाच्या मार्गाकडे जाण्याचा कल दाखविला, तर ते तिला त्यापासून परावृत्त करितात. जी मुलगी, अर्थात् विधवा, पुढें कदाचित् पुनर्विवाह करील असें यांस वाटतें, तीस ते आश्रमांत घेत नाहींत. पुनर्विवाहित दांपत्याची एखादी मुलगी आश्रमांत ठेवण्याचा प्रसंग आला तर तिला ते थारा देत नाहींत. अशा प्रकारें आपला अनाथबालिकाश्रम विधवाविवाहाच्या पापापासून आलिप्त रहावा म्हणून ते झटत आहेत. ते स्वतः पुनर्विवाहित आहेत त्यास इलाज नाहीं! पण न जाणो, त्याच्या प्रायश्चित्तार्थ ते कांहीं देहदंड करीतहि असतील, अशी आजची स्थिति आहे; आणि या सर्व गोष्टींचा उल्लेख ते 'तटस्थवृत्ति' या नेमस्त शब्दानें करीत आहेत......हल्लींच्या आपल्या विरोधी वर्तनास जर ते तटस्थवृत्ति म्हणून खरोखरच म्हणत असतील, तर ते आपणा स्वतःवर आततायीपणानें जुलूम

करीत आहेत, असें म्हणावें लागत आहे. त्यांची त्यांच्या हातून दुसऱ्यांनीं सुटका करून देणें अवश्य आहे असें आम्हांस वाटतें. ......अनाथबालिकाश्रमांत लोकांच्या घरून नेऊन एक पांच-पन्नास तरुण विधवा एका आवारांत कोंडल्या, आणि घरच्या-प्रमाणेंच त्यांचीं मनें संकुचित राहतील, धर्म, आचार, विचार यांच्या कोत्या कल्पना तशाच कायम राहतील अशी तजवीज केली, तर इतके कष्ट करून हा असा आश्रम स्थापण्याचें तरी कारण काय? आणि त्यासाठीं प्रो. कर्वे यांच्या योग्यतेचा थोर किंमतीचा मोहोरा विरेस घालण्याचें तरी कारण काय? जरूरच असेल तर एखादा धर्माभिमानी स्वार्थानंद किंवा वेदशास्त्र-शून्य बाळाचार्य तें काम करणार नाहीं काय?

"आमच्या मतें पुनर्विवाहितपक्ष म्हणून आपणांस वेगळा पंथ कल्पून सुधारणेशीं विरोध करण्यांत नवीन उपस्थित झालेला हा पुनर्विवाहितपक्ष, आणि त्यावरहि मखलाशी करून दाखवूं पहाणारा प्रोफसर कर्वे यांनीं पसंत ठरविलेला हा तटस्थपक्ष, यांची वेळींच कानउघाडणी करून त्यांस आत्मज्ञान करून देण्याची फार आवश्यकता आहे, आणि न्या. मू. रानडे किंवा डॉ. भांडारकर यांच्या मताप्रमाणें सर्व बाजूंनीं इष्ट सुधारणा घडवून आणणें हितकर आहे असें ज्यांचे मत असेल, त्यांनीं हें काम आपलें अवश्य कर्तव्य म्हणून हातीं घ्यावयाला पाहिजे. हल्लींच्या स्थितींत एक महत्वाचा प्रश्न पुढें येण्याचा संभव आहे; तो हा कीं, हल्लीं या आश्रमाला ज्यांनीं द्रव्यद्वारा मदत केली आहे त्यांनीं ती कोणत्या समजुतीवर केली आहे? पुनर्विवाह व सुधारणा यांशीं विरोध करण्यासाठीं लोकांनीं आपले पैसे प्रो. कर्वे यांच्या हातीं दिले, किंवा आम्ही म्हणतों त्याप्रमाणें पुनर्विवाहाच्या प्रश्नाचा आश्रमांत संबंध नाहीं खरा; तथापि त्या प्रश्नाशीं खऱ्या तटस्थवृत्तीनें वागून, स्त्रीजातीची उन्नति या आश्रमांत शिकून तयार झालेल्या मुलींच्या हस्तें

अंशतः तरी व्हावी म्हणून हा फंड गोळा झाला आहे? हा प्रश्न सोडविण्याचा खरा मार्ग आश्रयदात्यांचीं मतें घेणें हा आहे. हें काम दिवसगतीवर न टाकतां अगर परिणाम काय होईल त्यास न भितां केलें पाहिजे."

याच वेळीं २८ सप्टेंबर १९०६ च्या 'काळ' पत्रांत लांबलचक अग्रलेख आला आहे. त्यांतील एक उतारा येथें देतों:—

"येथील अनाथबालिकाश्रमासंबंधानें अतिशय कळकळ बाळगणाऱ्या आणि विशेष खटपट करणाऱ्या अशा एका गृहस्थांनीं आपला असा अंदाज प्रकट केला आहे कीं, ही संस्था एकंदरीनें फार लोकोपयोगी असून हिचा उपयोग हळुहळू पुनर्विवाहाच्या उत्तेजनार्थ होईल असा संभव दिसत आहे. पुनर्विवाहाचा कच्चा माल तयार करण्याचे कांहीं कारखाने अस्तित्वांत असले तर ते आजच्या स्थितीला कांहीं वाईट नाहींत. पुनर्विवाह करण्याचें एकदां आवश्यक ठरल्यानंतर मग तसल्या कलाच्या मुली साऱ्या जगभर शोधीत न बसतां त्या एके ठिकाणीं गवसण्याचा कोठेतरी अड्डा असला तर तो सोईचाच आहे......पुनर्विवाहित जोडप्याच्या देखरेखीखालीं ही संस्था चालू ठेवण्यांत आलेली आहे एवढ्यावरूनच ही पुनर्विवाहाची संस्था आहे असें ठरत नाहीं हें या सद्गृहस्थांसहि मान्य आहे, व ती पुनर्विवाहाचीच संस्था आहे असें त्यांचेंहि स्पष्ट म्हणणें नाहीं; परंतु एकंदर व्यवस्थेवरून पंडिता रमाबाईची संस्था जशी अखेरीस खिस्ती धर्माकडे झुकली, तसा या संस्थेचाहि कांटा एकादे वेळीं पुनर्विवाहाकडे झुकेल कीं काय, अशी त्यांना शंका उत्पन्न झालेली आहे.";

सुशिक्षित लोकमत एवढें खवळून जाण्यास मुख्य कारण १९०४ च्या अखेरीला पार्वतीबाईंनीं मुंबईच्या सामाजिक परिषदेंत जें भाषण केलें तें होतें. पुढील एका प्रकरणांत याबद्दल उल्लेख आला आहे. पार्वतीबाईंचा

पुनर्विवाहाच्या प्रश्नासंबंधानें स्पष्ट विरोध होता. आश्रमानें या प्रश्नासंबंधानें तटस्थवृत्ति सोडून दिल्यास आपण आश्रमाचा संबंध सोडूं असें त्या स्पष्ट म्हणत. मनापासून या कार्याशीं विरोध करणाऱ्या या एकट्याच बाई आश्रमांत होत्या. पण त्या नेहमीं वर्गणीच्या कामासाठीं बाहेर हिंडत असत. यामुळें त्यांचा मुलींशीं संबंध फारसा येत नसे. काशीबाई व वेणूबाई या प्रश्नासंबंधानें अनुकूल मताच्या असून तटस्थवृत्तीचेंच धोरण त्यांना पसंत होतें, व त्यांचाच मुलींशीं निकट संबंध असे.

वर्तमानपत्रांतील टीकांना उत्तर देण्याच्या भानगडींत मी सहसा पडत नसें; परंतु प्रगतिपर सुशिक्षितांच्या मताचा एवढा क्षोभ झालेला पाहून मला उत्तर द्यावेसें वाटलें, व ६ एप्रिल १९०६ च्या सुधारकाच्या अंकांत माझें पुढील पत्र प्रसिद्ध झालें:—

**"सुमारें सात आठ महिन्यांपूर्वी बेळगांव येथील चिकित्सकांत प्रसिद्ध झालेलें एक पत्र, व आपल्या गेल्या अंकांतील एक अग्रलेख यांमुळें होणारा गैरसमज अंशतः तरी नाहींसा व्हावा या हेतूनें हें पत्र लिहीत आहें.**

**"कलकत्त्याकडील पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर आणि आपल्या इकडील विष्णुशास्त्री पंडित यांनीं पुनर्विवाहाचा जो मार्ग रेखाटला त्याचें अवलंबन देशकालवर्तमान व आपलें बळाबळ पाहून मीं केलें. पुढें या प्रयत्नास दुसऱ्या मंडळीचें साहाय्य मिळून हल्लीं त्या यत्नाचें सुकाणूं माझ्या मित्रांच्या हातांत आहे. हा यत्न करतांना सुधारणेच्या मार्गानें पुढें गेलेल्यांशीं अगर जाऊं इच्छिणारांशीं मीं कधीं विरोध केला नाहीं. अंशतः समाजहित साधण्याच्या दृष्टीनें ज्याला जो सुधारणामार्ग इष्ट वाटेल त्याचें त्यानें अवश्य अवलंबन करावें. यांतच सर्वांचें हित आहे. अशा मनुष्यांचा विरोध करणें, त्यांच्यासंबंधानें कुत्सित बोलणें किंवा लिहिणें, किंवा त्यांच्यासंबंधानें लोकांत गैरसमज उत्पन्न होईल असें कांहीं करणें, हें मी पाप समजतों! माझा त्यांच्याशीं मतभेद होऊं शकेल, पण त्यांच्याविषयीं माझी**

पूज्यबुद्धि ढळणार नाहीं! सुधारणामार्गांत पुढें गेलेला मनुष्य पाहिला, व त्याच्याइतकें धैर्य व दृढनिश्चय हीं आपल्या अंगीं नाहींत असें मनांत आलें, म्हणजे लाजेनें मान खालीं घालावी असें वाटतें. अशा पुरुषश्रेष्ठांना मदत करून पुण्य जोडतां न आलें, तरी निदान त्यांच्या मार्गांत विघ्न आणण्याचें पाप तरी माझ्या हातून कधीं न घडो, एवढें मी देवाजवळ मागणें मागतों.

"सुधारणेच्या मार्गांत माझ्यापुढें गेलेले जे लोक आहेत त्यांचें माझ्या उद्योगाला पाठबळ आहे. अशांशीं विरोध करणें म्हणजे एक प्रकारचा कृतघ्नपणा होय, असें मी समजतों; पण जे सद्भावानें माझ्या उद्योगाच्या उलट दिशेनें यत्न करीत असतील त्यांच्याशींहि मला विरोध कर्तव्य नाहीं. ज्याला जो मार्ग शुद्ध व इष्ट वाटेल त्यानेंच त्याला जाऊं देण्यांत एकंदरींत सर्वांचें हित आहे असें मला वाटतें. दुसऱ्याच्या वाटेला न जातां आपल्याला जें कांहीं कर्तव्य असेल तें करावयाला प्रत्येकाला पाहिजे तेवढें क्षेत्र मिळेल. 'आपलें काम बरें व आपण बरें' हा माझा क्रम फार दिवसांचा आहे, व तो तसाच कायम रहावा अशी माझी इच्छा आहे.

"सुधारणेच्या मार्गांत पुढें गेलेल्यांविषयीं एक प्रकारची पूज्यबुद्धि मनांत वागवावी असा माझा यत्न असतो, व मागें असलेले लोक जेवढें करीत असतील तेवढ्यांतच मी समाधान मानून घेत असतों.

"असो. आतां विधवाविवाह व विधवाशिक्षण या दोहोंच्या संबंधाकडे वळतों. आपल्या समाजाची स्थिति लक्ष्यांत घेतां विधवाशिक्षणाचें काम विधवाविवाहापासून अगदीं अलिप्त अशा रीतीनें चालविलें असतां तें लोकप्रिय होऊं शकेल असें माझें मत बरेच वर्षांपासून आहे व तें अजून कायम आहे. ही कल्पना प्रथम पुनर्विवाहाच्या मंडळींतून निघाली व तिचें थोडें काम पुनर्विवाहाच्या मंडळींतच झालें, ही गोष्ट खरी. पण अगो-

दर पूर्ण विचार झाला, नंतर कृतीला प्रारंभ झाला, अशांतला हा प्रकार नव्हे. जसजसे विचार बदलत गेले तसतसे फेरफार होत गेले, आणि विधवाविवाह व विधवाशिक्षण हीं दोन्हीं कामें अगदीं वेगवेगळीं चालविण्याचा संकल्प करून तीं मी चालवूं लागलों. हें माझें करणें चुकीचें झालें असें कित्येकांस वाटत असेल, व तें कदाचित् तसें असेलहि; परंतु माझें मत अजून कायम आहे. पुनर्विवाहाशीं अगदीं संबंध नसलेला कोणी मनुष्य जर आश्रमाचा व्यवस्थापक असता, तर हल्लींची अडचण उत्पन्न झाली नसती; परंतु मी स्वतः पुनर्विवाहाशीं अगदीं संबंध नाहीं अशा रीतीनें आश्रमाचें धोरण राखणें नाजूक काम झालें असून, पुनर्विवाहित मनुष्य मुख्य आहे तेव्हां पुनर्विवाहासाठींच ही संस्था असली पाहिजे, असा लोकांचा समज होणें अगदीं स्वाभाविक होतें. अशी पुष्कळांची समजूत होती व अजूनहि आहे. होतां होईल तो कोणाला संशयाला जागा ठेवूं नये अशा रीतीनें माझें वर्तन होतें व आहे. पुनर्विवाहाच्यासंबंधानें अनुकूलहि नाहीं व प्रतिकूलहि नाहीं असा आपला रोख मीं ठेविला आहे, व शिक्षकिणींनाहि तसाच तो ठेवण्याविषयीं माझें सांगणें आहे. हा संबंध वर दर्शविल्या रीतीनेंच राहणें इष्ट आहे, असें माझें मत आहे.

"यांत प्रसंगीं चूक घडलीच तर पुनर्विवाहाला अनुकूल अशी घडण्यापेक्षां विधवाशिक्षणाला अनुकूल अशी घडेल तर एकंदरींत बरें, असें मला वाटतें. विधवाविवाहाच्या प्रश्नाशीं एकजीव झालेलीं माणसें समंजस व विचारी आहेत; परंतु आश्रमाच्या आजच्या व भावी विद्यार्थिनींचे पालक तितके समंजस असण्याचा संभव नाहीं. थोडेंसें कारण झालें, किंवा झालेंसें वाटलें, तरी तेवढ्यानेंहि बराच घात होण्याचा संभव आहे. यासाठीं अधिक समजुतीच्या मनुष्यांनीं आपल्या कमी समजुतीच्या बांधवांसाठीं घस सोसणें फार थोरपणाचें दर्शक होईल. विधवा-

विवाहाचा उद्योग हें कांहीं अंशांनीं माझेंच अपत्य आहे. त्याच्या नाशास मी प्रवृत्त होत आहे अशी समजूत माझ्या कित्येक मित्रांची झाली आहे व इतरांचीहि ते तशी करून देत आहेत, ही अत्यंत खेदजनक गोष्ट आहे. विधवाविवाहाच्या प्रश्नांत माझें हिताहित अशा रीतीनें गुंतून गेलेलें आहे कीं, त्या प्रश्नाची हेळसांड करणें शक्यच नाहीं! आश्रमाशीं जेव्हां संबंध येतो तेव्हां या प्रश्नासंबंधानें जरी माझी वृत्ति तटस्थपणाची आहे, तरी इतर प्रसंगीं ती तशी नाहीं. सदसत्, योग्यायोग्य, इष्टानिष्ट हा विवेक करण्याचें जें सामर्थ्य ईश्वरकृपेनें मला प्राप्त झालेलें आहे, त्यांच्या कसोटीनें जी वृत्ति तटस्थ अशी मला वाटते, तीच आश्रमाशीं प्रसंग आला असतां मी ठेवीत असतों. हल्लीं आश्रमाचें जें धोरण आहे तेंच कायम राहणें इष्ट आहे असें माझें मत आहे. या धोरणानें पुनर्विवाहाच्या कार्याचें अणुभरहि नुकसान होत नाहीं, हेंहि आपलें मत मी स्पष्टपणानें लिहून ठेवितों. पुनर्विवाहाला अनुकूल अशाच लोकांचा भरणा वर्गणीदारांत मोठा आहे, तेव्हां त्यांनीं आपल्या मतांच्या जोरावर हल्लींचें धोरण बदलावें, असाहि इशारा देण्यांत आला आहे. तटस्थवृत्तीचें जें चित्र माझ्या मित्रांनीं वठविलें आहे तें सर्वस्वी खरें नाहीं, एवढेंच मी येथें सांगतों. पण तें सर्वस्वी खरें, अशी ज्यांची समजूत झाली असेल त्या व इतर पुनर्विवाहाच्या हितचिंतकांस माझें एवढेंच सांगणें आहे, कीं, सद्गृहस्थ हो! पुनर्विवाहाच्या प्रश्नाच्या दृष्टीनेंच तुम्हीं हें धोरण बदलण्याच्या यत्नास लागूं नका. धोरण बदलल्यानें पुनर्विवाहाच्या उद्योगाला जो आज फायदा होईल त्यापेक्षां तें न बदलल्यानें कालान्तरानें अधिक होईल. दुसऱ्याहि एका कारणानें तुम्ही या यत्नास लागूं नका, असें मी त्यांस सांगेन. विधवाशिक्षणाच्या कार्यासाठीं विधवाविवाहाच्या कार्यानें असा स्वार्थत्याग करणें फार थोरपणाचें होईल!

" पुनर्विवाहाच्यासंबंधानें विशेष नेटानें उद्योग होणें जरूर आहे, व त्यांतील एक मुख्य काम पुनर्विवाहेच्छु विधवांसाठीं एक निराळें विधवागृह काढणें हें आहे. उद्योग करणाराला साहाय्य खचित मिळेल. ' विधवाविवाहप्रतिबंधनिवारक मंडळी ' जवळ चार हजार रुपये आहेत. मुद्दल कायम ठेवून व्याजाचा उपयोग या कामीं करतां येण्यासारखा आहे. मला हें काम हातीं घेण्याला कधीं वेळ मिळेल कीं नाहीं, याबद्दल मोठी शंका आहे. परंतु जर कोणी हें काम हातीं घेईल तर या कामासाठीं सवडीनें कांहीं अटीवर एक हजार रुपये द्यावे, असा माझा हेतु आहे. ईश्वरकृपेनें माझ्या आयुष्याची दोरी बरीच बळकट राहिली, व तोंपर्यंत या उद्योगाला कोणी हात घातला नाहीं, तर कदाचित् मीहि तो हातीं घेईन. सवड झाल्यास ज्या कित्येक गोष्टींबद्दल यत्न करण्याचें मीं योजिलें आहे, त्यांपैकीं हा एक आहे.

" आधींच सुधारणापक्ष किती तरी लहान आहे. त्यांत पुनर्विवाहपक्ष म्हणून एक तट आहे व तो इतर सुधारणांना विघातक आहे अशी कित्येकाची समजूत व्हावी, व ती पसरत जावी, यापेक्षां आणखी आत्मघातक तें काय असावयाचें ? मला वाटतें कीं, जीं जीं मनुष्यें जें जें करण्यास तयार असतील, तेवढ्यापुरतेंच त्यांचें साहाय्य घेऊन, त्यांच्या अंगांत पुढें येण्याचें सामर्थ्य नाहीं म्हणून त्यांजवर न रागावतां व त्यांचा तिरस्कार न करितां पुढें जाणारांनीं बाकीचा बोजा जर आपला आपणच हौसेनें उचलला तर किती बहार होईल !

" लोककल्याणासाठीं झटणाऱ्या सत्पुरुषांनों ! जी अल्पसेवा मी करीत आहें तिच्यासंबंधानें आपला गैरसमज झाला असल्यास तो अंशतः जरी दूर झाला, तरी या लिहिण्याचें सार्थक झालें, असें मी समजेन. मला या कामांत अधिक लिहिणें इष्ट वाटत नाहीं. अधिकउण्या शब्दाबद्दल माफी व्हावी, ही विनंति."

यानंतर बरींच वर्षें या प्रकरणासंबंधानें कोणी उचल केली नाहीं; परंतु १९११ सालीं आश्रमाच्या एका थोर आश्रयदात्यानें निकराचें पत्र लिहिलें त्याचा सारांश "ही संस्था पुनर्विवाहाला अनुकूल म्हणून तरी प्रसिद्ध करा, नाहीं तर प्रतिकूल म्हणून तरी स्पष्ट खुलासा होऊं द्या, ही मध्यस्थ वृत्ति नको!" असा होता. या पत्राचा विचार ता. २१ जून १९११ रोजीं भरलेल्या व्यवस्थापक मंडळीच्या सभेंत होऊन सर्वानुमतें पुढील ठराव करण्यांत आलाः—

"The Hindu Widows' Home is a strictly educational institution, and as such, its attitude towards the question of widow-marriage can only be one of absolute neutrality. The committee, however, is of opinion, that when it is settled by the guardians of a widow that she should be married, and active steps have bagun to be taken, it is desirable, that such guardians should withdraw the girl from the Home in consideration of the disturbing influence which the matter is bound to exercise, not only on the mind of the girl concerned, but also on the minds of the other girls in the Home."

अशा रीतीनें या प्रश्नाचा शेवटचा निकाल लागला. आश्रमानें या प्रश्नासंबंधानें जरी तटस्थवृत्ति स्वीकारली, तरी इंग्रजी धर्तीवर सुरू झालेल्या अलीकडल्या शिक्षणाचा स्वभावधर्मच असा आहे कीं, बाबावाक्य प्रमाण न मानतां खरेंखोटें, बरेंवाईट, न्यायअन्याय इत्यादि गोष्टींचा विचार ज्याचा त्यानें स्वतंत्र रीतीनें करण्याकडे विद्यार्थ्यांची प्रवत्ति व्हावी. शेजेबाईनें कोंबडें झांकलें तरी सूर्य उगवावयाचा राहत नाहीं, या म्हणीप्रमाणें विद्यार्थिनींच्या मनांत संस्कार होण्याला अनेक साधनें असतात, तीं बंद करणें शक्य नाहीं! मनुष्य नव्या शिक्षणाच्या मार्गांत असलें म्हणजे प्रौढ झाल्यानंतर अशा प्रश्नांचा विचार केल्यावांचून तें कदापि राहणार नाहीं. शिवाय स्वार्थाच्या विचाराची मदत न्यायाच्या बाजूलाच असल्यामुळें विरुद्ध मताचा मनावर ग्रह करण्याचा यत्न झाला असें गृहीत धरलें, तरी तो टिकणें शक्य नाहीं. या स्वाभाविक परिमाणाला अनुसरून मी आपल्या पत्रांतील ठळक वाक्य लिहिलें होतें, व तें खरें झालें, असें पुढील आंकड्यांवरून सिद्ध होईल.

१८९९ च्या आरंभीं एका विधवेनिशीं स्वतंत्र आश्रमाला सुरुवात झाली. तेव्हांपासून आतांपर्यंतच्या पंधरासोळा वर्षांत दक्षिणी लोकांत एकंदर पुनर्विवाह सुमारें पंचावन्न झाले. त्यांतील वधूंपैकीं अनाथबालिकाश्रमांतील जुन्या विद्यार्थिनींची संख्या पंचवीस आहे. हे पंचवीस पुनर्विवाह आश्रमानें या कार्याची बिलकुल तरफदारी न करितां झालेले आहेत. यापैकीं आठ, मुलींच्या पालकांनीं पुढाकार घेऊन घडवून आणलेले आहेत, व चार, पालकांची गुप्त परवानगी मिळून झालेले आहेत. ज्यांच्या जवळचें कोणी काळजी करणारें नाहीं अशा पांचजणींनीं स्वतःच्या जबाबदारीवर ते घडवून आणले, व राहिलेल्या आठजणींनीं आप्तवर्ग विरुद्ध असतां वयांत आल्यावर स्वतःच्या बळावर पुढें पाऊल टाकलेलें आहे.

---

# प्रकरण पंचेचाळिसावें

## अनाथबालिकाश्रम आणि विधवावपन

विधवाविवाह अगर स्त्रीशिक्षण यांच्यासाठीं जितके नेटाचे प्रयत्न झाले, तितके केशवपनासंबंधानें झालेले नाहींत. पुष्कळ वेळां असें घडतें कीं ज्या सुधारणेवांचून फारसें अडलेलें नसतें, ती सुधारणा मागें पडून राहते. देशस्थ कोंकणस्थ व कऱ्हाडे यांजमध्यें शरीरसंबंध घडून येणें ही गोष्ट किती तरी सोपी आहे; पण आजपर्यंत जितके पुनर्विवाह झाले आहेत त्यांच्या निम्यानें देखील असलीं लग्नें घडून आलीं नाहींत !

वैधव्याचा नवीन घाला ज्यांवर पडतो त्यांचें वपन करण्याचा प्रघात हळूहळू कमी होत आहे, ही गोष्ट खरी. तथापि शहरांत राहणारे लोक अगर त्यांच्याशीं निकट संबंध ठेवणारे लोक या प्रश्नासंबंधानें जितके तयार झालेले दिसतात, तितके खेड्यापाड्यांतले लोक तयार नाहींत. शहरापासून दूरदूरच्या भागांत हा प्रघात अजून बऱ्याच जारीनें सुरू आहे. एकदां विधवेचें वपन झालें तर तिचा आयुष्यक्रम कायमचा आंखला गेला, असें बहुधा घडतें. मग ती विद्याव्यासंग अगर पुनर्विवाह यांविषयीं कल्पनासुद्धां मनांत आणूं शकत नाहीं. पुढें तिला पूर्वीच्या रुळलेल्या मार्गांत आपला जन्म कंठावा लागतो. शाळेंत जाण्यासंबंधानें अगर पुनर्विवाहासंबंधानें सकेशा विधवांच्या मनाची तयारी जशी लवकर होऊं शकते, तशी विकेशा विधवांच्या मनाची होऊं शकत नाहीं. याला अपवाद अशीं कांहीं उदाहरणें घडलीं आहेत; पण तीं फार थोडीं आहेत. सकेशा विधवांनीं शिक्षणाचा फायदा घेण्यासाठीं दिवसेंदिवस अधिक प्रमाणानें पुढें यावें, असें घडणें शक्य आहे; पण विकेशा विधवांनीं पुनः शिरोभूषण धारण करणें हें मात्र भयंकर मानलें गेल्यामुळें फारसें शक्य नाहीं. सकेशा विधवा घरांत असल्या तरी ज्यांना विशेष कांहीं वाटत नाहीं असे शंभर लोक घेतले, तर त्यांतले पांचहि आपल्या घरांतील विकेशा विधवेला सकेशा व्हावयाला अनुमत देणार नाहींत.

एकदां कोणतीहि गोष्ट अंगवळणीं पडली म्हणजे ती कितीही हिडिस असली तरी तिचा वीट येत नाहींसा होतो. दर पंधरवड्याला अगर महिन्याला या किळसवाण्या कृतीची नापितामार्फत पुनःपुनः आवृत्ति करणें हा शिष्टाचार समजला जावा, व ज्यांना तो अनाचार वाटतो त्यांनीं डोळ्यांवर कातडें ओढून स्वस्थ बसावें, यापेक्षां आमची अत्यंत दीनावस्था सिद्ध करण्याला दुसरें काय पाहिजे आहे? ज्या विकेशा विधवांच्या मनांत या प्रश्नासंबंधानें विचारजागृति झाली असेल, त्यांनीं लोकापवादाला न भितां या कामीं उदाहरण घालून द्यावयाला पुढें सरसावलें पाहिजे. पन्नासपन्नास साठसाठ वर्षांच्या वयाच्या कांहीं वयस्क विधवा जर या कामीं पुढें सरसावतील तर त्याचा लोकमतावर फार परिणाम होईल. या हिडिस प्रकाराचे तात्कालिक दुष्ट परिणाम म्हणण्यासारखे घडत नाहींत ही गोष्ट खरी; पण ही चाल म्हणजे आमच्या मनाच्या दुर्बलतेचें एक दृश्य चिन्ह आहे असें मला वाटतें.

विधवावपनासंबंधानें शहरांतील स्थिति हल्लीं बरी आहे; परंतु खेडेगांवीं यासंबंधाची तीव्रता बरीच आहे. विशेषतः एकदां वपन झालेलें असून पुनः केशकलाप धारण करणें अत्यंत निंद्य मानिलें जातें. यासंबंधानें पंधरा वीस वर्षांपूर्वीं कोंकणांत घडलेलें एक उदाहरण नेहमीं माझ्या मनांत येतें. माझ्या माहितीच्या एका बाईच्या घरीं सुधारणेच्या कित्येक विषयांवर संभाषणें होत, तीं यांच्या कानीं पडत. विधवांचें वारंवार वपन करणें हा शुद्ध अनाचार आहे असें या बाईचे यजमान म्हणत असत, व या बाईनांहि तें तसें वाटूं लागलें होतें. त्यांजवर तसा प्रसंग आला, तेव्हां त्यांनीं एकदां पतीच्या प्रेताबरोबर दहन करण्यासाठीं आपला केशभार अर्पण केला; पण पुनः त्या प्रसंगाला मान वांकविण्याचें त्यांनीं नाकारलें! त्या बाईचे मुलगे चांगले कर्तेसवरते होते; पण त्यांपैकीं कोणीहि तिला पाठबळ देईना. उलट तूं असें करशील तर आम्ही कोणीहि तुला जवळ ठेवणार नाहीं, असा त्यांनीं तिला आपला मनोदय कळविला; आणि जेव्हां त्या बाईनीं कोणाचें न ऐकतां आपला निश्चय तडीला नेला, तेव्हां बहिष्काराच्या भीतीनें त्या मुलांनीं त्यांना वेगळें ठेविलें. अखेरीला वेगळ्या खोलींत एकटें राहून त्यांनीं जन्म काढिला; परंतु रूढीनें आपलें शिक्कामोर्तब मार-

लेल्या या अनाचाराला त्या बळी पडल्या नाहींत! मी एकदां कोंकणांत गेलों असतां मुद्दाम निरोप पाठवून त्यांनीं मला बोलावून नेलें, व आपल्या दुःखाची कहाणी सांगितली. बहिष्काराच्या भीतीनें प्रत्यक्ष मुलांनीं आपल्या आईशीं अशा रीतीनें वागावें, यापेक्षां रूढीचा जुलूम आणखी तो कसा असावयाचा! यांच्या देहावसानानंतर प्रेताला अग्नि देण्याच्या वेळीं वपनाचा आग्रह कोणी धरिला नाहीं व त्यांचें क्रियाकर्मांतर यथाविधि झालें, हें मोठें भाग्यच समजावयाचें!

आश्रमानें या कार्याला अप्रत्यक्ष रीतीनें थोडीशी मदत केली आहे. दहाबारा वर्षांपूर्वी जेव्हां यासंबंधानें पहिलें उदाहरण आश्रमांत घडून आलें, तेव्हां जुन्या आचारविचारांत रुळलेल्या पार्वतीबाईंना ही गोष्ट असह्य वाटली व याबद्दल यांनीं शक्य तितका तिरस्कार व्यक्त केला. परंतु इतर स्त्रियांनीं या कामीं मनाचा थोरपणा दाखविल्यामुळें या उपक्रमांत व्यत्यय आला नाहीं. यानंतर कधींकधीं असा एकादा प्रकार घडावा; या रीतीनें आजपर्यंत अशीं सातआठ उदाहरणें घडलीं. अलीकडलें खुद्द पार्वतीबाईंचें उदाहरण फार महत्त्वाचें आहे. पार्वतीबाईंच्या विचारांत झालेला फरक व तो झाल्यानंतर त्याप्रमाणें आचरण करण्यांत त्यांनीं दाखविलेलें धैर्य, हीं प्रशंसनीय आहेत! या कामीं पुढें पाऊल टाकतांना जेव्हां त्यांनीं माझी सल्ला विचारली, तेव्हां त्यांनीं असेंहि सांगितलें कीं, माझ्या या कृत्यापासून जर आश्रमाला अपाय होत असेल तर आश्रमाशीं संबंध आहे तोंपर्यंत मी ही गोष्ट करीत नाहीं. पार्वतीबाईंची ही तयारी पाहून मला अतिशय आनंद झाला. पार्वतीबाईंच्या या कृत्यानें कांहीं लोकांचा आश्रमाविषयीं प्रतिकूल ग्रह होईल असें मला वाटलें व तें खरेंहि ठरलें. परंतु आश्रमावर त्यामुळें म्हणण्यासारखा परिणाम होणें शक्य नाहीं, हेंहि स्पष्ट दिसत होतें; यामुळें मीं मोठ्या आनंदानें त्यांना रुकार दिला.

कोणीं एकादी गोष्ट केली तर तिजबद्दल सद्‌बुद्धीनें अनुमान न करितां दुर्बुद्धीनें करावें, असा मनुष्यस्वभावच दिसतो. कित्येक वेळां चांगलीं चांगलीं मनुष्येंसुद्धां या अनिष्ट मनोवृत्तीला बळी पडून तीमुळें उत्पन्न होणारे लोकप्रवाद पसरीत असतात. पार्वतीबाईंच्या मनांत पुनर्विवाह करण्याचें आल्यामुळें त्यांनीं हा मार्ग स्वीकारला आहे व लवकरच त्यांचा

पुनर्विवाह होणार आहे, अशी बातमी मुंबईत संभावित लोकांत पसरली होती व तिचें प्रतिबिंब पुण्यांतहि पडलें होतें. यांतलें खरें जाणून घेण्या-साठीं आश्रमाच्या एका हितचिंतकांनीं मजकडून याचा खुलासा करून घेतला. जिनें एक तप आश्रमाच्या निरपेक्ष सेवेंत घालविलें, व जिची चाळिशी उलटून गेलेली असून जिला बी. ए. झालेला पंचविशीच्या सुमाराचा एक मुलगा आहे, तिनें पुनः केशकलाप धारण करण्याचें मनांत आणण्याला दुसरें कांहीं कारण या कल्पकाला सुचलें नाहीं! असल्या कामीं पुढें येणाऱ्या स्त्रियांना लोकप्रवाद सहन करावे लागणारच! पण कोणत्याहि सुधारणा जनतेचे प्रहार कोणीतरी सहन केल्यावांचून घडून येणें शक्य नाहीं! सदाचरणी पोक्त स्त्रिया या कामीं कित्ता घालून देण्याला पुढें सरसावतील काय?

# प्रकरण सेहेचाळिसावें

## आश्रमावरील कांहीं कठिण प्रसंग

साधारण मानानें पाहतां आरंभापासून आतांपर्यंत आश्रमाचें काम एकंदरींत फार चांगलें चालून त्याची एकसारखी प्रगतिच होत आहे, ही गोष्ट खरी; परंतु त्याजवर वेगवेगळ्या स्वरूपाचीं संकटें मधून-मधून येऊन त्याविषयीं लोकांचे गैरसमज व कलुषित बुद्धि झाली नाहीं असें मात्र नाहीं. त्यांपैकीं एका संकटाचा उल्लेख मागल्या एका प्रकरणांत झाला आहे. दुसरीं कांहीं या प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे.

श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनीं १९०४ सालीं आश्रमासाठीं वर्गण्या मिळविण्याच्या कामाला आरंभ केला. त्याच वर्षाच्या अखेरीला राष्ट्रीय सभा व राष्ट्रीय सामाजिक परिषद यांच्या बैठकी मुंबईला झाल्या. तेव्हां त्यांनीं सामाजिक परिषदेंत बोलण्याचें धाडस केलें. त्या भाषणांत त्यांच्या अंगचें धैर्य, समयसूचकता, वक्तृत्व वगैरे गुण निदर्शनाला आले; परंतु कोते विचार आणि अदूरदर्शीपणा यांच्या प्राबल्यामुळें आपण काय बोलतों याचें भान त्यांना राहिलें नाहीं. त्यांनीं सुधारकांवर आणि विशेषतः मुंबई-तील स्त्रीवर्गावर शस्त्र उचललें. त्यांचे आचारविचार आणि पोषाखाच्या तऱ्हा वगैरेसंबंधानें खरमरीत टीका केली. पार्वतीबाईच्या आयुष्याचीं पंच-वीस वर्षे खेडगांवांत गेलेलीं होतीं, व पुढलीं सातआठ वर्षे पुण्यांत परंतु शाळेच्या कोपऱ्यांत गेलेलीं. अशा बाईला सुधारकवर्ग आणि मुंबईतील पुढें गेलेला स्त्रीवर्ग यांचें वागणें अत्याचाराचें वाटावें यांत नवल नव्हतें; पण त्यांनीं आपली योग्यता व वेळ अवेळ न पाहतां अशा रीतीनें अनेक लोकांचीं मनें दुखविलीं. सापाच्या शेंपटीवर पाय पडला म्हणजे त्याची जी अवस्था होते, ती पार्वतीबाईच्या भाषणानें कित्येकांची झाली. त्या वेळीं हजर असलेले लोक तो प्रसंग कधीं विसरणार नाहींत. वर्तमानपत्रांतून त्यांजवर गहजब होऊं लागला, व अशा बाईला आश्रमांतून काढून टाकावें अशा उघड सूचना होऊं लागल्या. खाजगी पत्रांचा तर मजवर भडिमारच झाला! हें वादळ कसें शांत होतें याची मला मोठी काळजी पडली. पार्वतीबाईचा अविचार नाहींसा होऊन कालें करून त्या

सुधारणेच्या कार्याचा एक आधारस्तंभ होऊन रहातील अशी मला आशा होती, ती बऱ्याच अंशीं सफल झाली आहे, व आणखी सफल होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. पण सर्व गोष्टी हळुहळू क्रमानें व्हाव्या लागतात. उतावळेपणानें कार्य बिघडण्याचा संभव असतो. हळुहळू सर्व स्थिरस्थावर झालें; परंतु पुष्कळांचा बरींच वर्षे पार्वतीबाईवर कटाक्ष होता.

पुनर्विवाहाच्यासंबंधाचें आश्रमाचें धोरण आणि त्यासंबंधानें वर्तमानपत्रांतून झालेला विपर्यास व अतिशयोक्ति, यांनाहि अप्रत्यक्ष रीतीनें पार्वतीबाई बऱ्याच कारण झाल्या. पार्वतीबाईचें प्रकरण चालू असतांच पुनर्विवाहासंबंधीं चर्चा सुरू झाली. पार्वतीबाईसंबंधानें फारच प्रतिकूल ग्रह अगोदरच झालेला असल्यामुळें या प्रश्नाला अधिक तीव्र स्वरूप आलें. याची सविस्तर हकीकत दुसऱ्या एका प्रकरणांत दिलीच आहे.

याच सुमाराला धर्माविषयीं नाजूक मनोवृत्तींच्या मनुष्यांचीं मनें आश्रमाविरुद्ध खवळण्याला एक प्रकरण उपस्थित झालें. एका गुजराती गृहस्थांनीं पंचवीसशें रुपयांची आश्रमाला देणगी देऊं केली. तींत त्यांना दोन गोष्टी पाहिजे होत्या. एक लहानसें देऊळ व प्लेगसारख्या सांसर्गिक रोगाचा प्रादुर्भाव आश्रमांत झाला असतां त्यासाठीं एक लहानसें हॉस्पिटल. देवळासंबंधानें अनेक गोष्टी विचार करण्यासारख्या होत्या. सकेशा विधवेच्या हातचें पाणी अगर गंध देवपूजेला चालूं नये, अशी ब्राह्मण समाजांतील शिस्त आहे. तेव्हां सकेशा विधवांनीं प्राणप्रतिष्ठा केलेल्या मूर्तीची पूजा वगैरे करावी कीं नाहीं त्याचप्रमाणें ब्राम्हणेतर विधवांनीं त्या मूर्तीला शिवावें कीं नाहीं, असले नाजूक प्रश्न उपस्थित व्हावयाचे. शिवाय देऊळ म्हटलें म्हणजे त्याला विशेष पवित्रपणा आला. तें निरंतर कायम ठेवण्याची आणि नित्य पूजेअर्चेची व्यवस्था राहिली पाहिजे. ही नाजूक जबाबदारी घेणें बरें नव्हे, यासाठीं त्या गृहस्थांचें मन वळविण्याचा आम्हीं यत्न केला. मुंबईचे रा. ब. ना. लिं. वैद्य हे आश्रमाचे हितकर्ते आहेत. आमच्या विनंतीवरून त्यांनीं त्यांची गांठ घेऊन देवळाच्या ऐवजीं देवघर बांधण्याला संमति मिळवून आम्हांला तसें लिहिलें. यावर तारीख २६ ऑगष्ट १९०६ रोजीं भरलेल्या कमिटीच्या सभेंत विचार होऊन झालेल्या निकालाबद्दल प्रोसीडिंगबुकांत उल्लेख आहे, तो येणेंप्रमाणें:—

"शेट......यांच्या सूचनांसंबंधानें रा. ब. ना. त्रिं. वैद्य यांचें पत्र ‡ वाचण्यांत येऊन स्पर्शजन्य रोगासाठीं लहानसें इस्पितळ बांधण्यासाठीं रुपये बाराशें, व तुलसीवृंदावन आणि देवघर यांच्यासाठीं रुपये तेराशें अशा शेटजींच्या देणग्या आभारपूर्वक स्वीकाराव्या."

त्यानंतर ता. ६ सप्टंबर १९०६च्या कमेटीच्या सभेच्या प्रोसीडिंगांत पुढील उल्लेख आहे:—

"स्पर्शजन्य रोगानें आजारी असलेल्या रोग्यांसाठीं इस्पितळ व देवघर यांच्या जागा कायम करण्यांत आल्या, व दोहोंचे प्लॅन पसंत होऊन ते शेटजींकडे पाठविण्याचें ठरलें."

रा. ब. ना. त्रिं. वैद्य यांजबरोबर मी एकदोन वेळां त्यांजकडे गेलों होतों, व यानंतर आश्रमाचे एंजिनियर श्रीयुत मोरोपंत गोखले यांच्याबरोबर प्लॅन दाखविण्यासाठीं जाऊन त्यांची दोन वेळां गांठ घेतली; परंतु मध्यंतरीं कांहीं कारणानें आश्रमाविषयीं त्यांचें मन कलुषित होऊन त्यांनीं आपला तो विचार सोडून दिला. या कामीं मी श्रीयुत बा. गं. टिळक यांच्याहि मध्यस्थीचा प्रयत्न केला. शेटजींचा त्यांजवर विशेष विश्वास होता असें दिसल्यावरून त्या उभयतांची गांठ घालून देण्यासाठीं मी मुद्दाम मुंबईस गेलों होतों. त्यांची गांठ अखेरीला परत येतांना स्टेशनावर दहा मिनिटें पडली; परंतु ही सर्व खटपट व्यर्थ गेली.

या प्रकरणासंबंधानें धर्माभिमानी वर्तमानपत्रांनीं अधिकउणें लिहून आश्रमाविरुद्ध खूप ओरड केली. उत्तर देण्याच्या भानगडींत मी पडलों नाहीं. उत्तरें देण्याचा प्रयत्न करण्यानें लोकमत कधींकधीं अधिक कलुषित मात्र होतें व निष्कारण वाद माजतो. ज्यांनीं खाजगी रीतीनें या प्रकरणीं

---

‡ "I saw Mr.........and he has authorised me to inform you that he is prepared to defray the cost of two rooms to accommodate inmates suffering from infectious or contagious diseases (estimated to cost about Rs. 1200) and a Devghar (instead of a temple) with a Tulasi Vrindavan. He anticipates that the estimate for Devghar will not exceed Rs. 1200 or 1300.)

Bombay, 22 nd August 1906. *Narayan T. Vaidya*

चौकशी केली त्यांचें समाधान करण्यांत आलें. अजूनहि यासंबंधानें केव्हां केव्हां प्रश्न विचारण्यांत येतात.

आश्रमाच्या चालकांची अगर व्यवस्थापक मंडळाच्या सभासदांचीं मतें कशींहि असलीं, तरी हिंदु धर्माच्या तत्त्वांवर आश्रम आरंभापासून चालत आला आहे व तो तसाच चालू राहील. आश्रमांत देव आहेत, व देव-पूजा करणाऱ्या स्त्रिया आहेत. श्रीयुत गोविंद बल्लाळ देवल यांनीं कांहीं अटींवर गीतामंदिर बांधण्यासाठीं तीन हजार रुपये दिले. त्यांचा स्वीकार करण्यांत आला आहे. त्यांच्या अटींचा विचार करण्यासाठीं ३ सप्टेंबर १९०७ रोजीं व्यवस्थापक मंडळीची सभा भरली होती, तींत ते हजर होते. त्यांनीं लेखी सूचना आणल्या होत्या, त्यांत किरकोळ शाब्दिक फेर-फार होऊन त्यांचा लेख पसंत झाला. तो १९०७ सालच्या म्हणजे बाराव्या वार्षिक रिपोर्टांत प्रसिद्ध केला आहे. तो लेख येणेंप्रमाणें:—

" हिंगणें येथील अनाथबालिकाश्रम हिंदुधर्मतत्त्वांप्रमाणें चालावयाचा असल्यामुळें त्या आश्रमाला जोडून आश्रमांतील विद्यार्थिनींच्या उपयोगा-करितां मंदिर बांधण्यासाठीं मीं जी तीन हजार रुपयांची रक्कम दिली, ती खालील अटींवर दिली आहे.

[ अ ] या मंदिराचा उपयोग श्रीमद्भगवद्गीतापठन, वाचन, निरूपण, पुराण, कीर्तन, भजन व नीतिपर व्याख्यानें वगैरे फक्त धार्मिक कामां-करितांच व्हावा.

[ ब ] आश्रमांत रहाणाऱ्या विद्यार्थिनींनीं आपलीं दररोजचीं नियमित धर्मकृत्यें सदर मंदिरांतच करीत जावीं. त्याशिवाय इतर ठिकाणीं धर्मकृत्यें करण्यास त्यांस हरकत नाहीं. आश्रमांतील इतर स्त्रियांस सदर मंदिरांत आपलीं धर्मकृत्यें करण्याची मोकळीक आहे.

[ क ] हिंदूवांचून इतर कोणासहि या मंदिरांत जाण्याची मनाई असावी. तशीच हिंदूंपैकीं अस्पृश्य जातींस मंदिरांत जाण्याची मनाई आहे.

[ ड ] मंदिरांत जाणारांनीं जोडा, बूट वगैरे पादत्राणें बाहेर काढून ठेवून आंत जावें.

[ इ ] " परलोकवासी सौभाग्यवती राधाबाई, भ्रतार गोविंद बल्लाळ देवल, राहणार सांगली, हरीपूर, यांचे स्मरणार्थ. " असा मंदिर बांधल्याचें

वर्षं घातलेला शिलालेख मंदिराबाहेर दारावर लावावा. सदर अटीहि एका फळ्यावर मोठ्या अक्षरांनीं लिहून दारावर तो फळा लावावा.

येणेंप्रमाणें आश्रमाच्या धार्मिक धोरणासंबंधानें स्पष्ट निकाल झालेला आहे. दोन वर्षांपूर्वी महिलाविद्यालय बांधण्यांत आलें, त्यांत देवघर आहे. श्रीयुत देवल यांचें वेगळें गीतामंदिर लवकरच बांधण्यांत येईल.+

आतां वेगळ्या प्रकारच्या संकटांकडे वळूं. 'जेथें गांव आहे तेथें महारवाडा असावयाचाच' अशी म्हण आहे. भिन्नभिन्न परिस्थितींतून आलेल्या अनेक ठिकाणच्या एवढ्या स्त्रीसमाजांत क्वचित् एकादी चंचल स्त्री निघावयाचीच. असें उदाहरण अगदीं न घडेल तर मोठें आश्चर्यच समजावयाचें.

'अनृतं साहसं माया' या कव्युक्तीला पुष्टि देणाऱ्या थोड्याशा विद्यार्थिनींनीं आश्रमावर अनुग्रह करून मधूनमधून त्याजवर वेडेवांकडे प्रसंग आणले, हे एकपरी बरेंच झालें. अशा प्रसंगांमुळें लोकांमध्यें मधूनमधून संस्थेविषयीं अविश्वास उत्पन्न होतो तो नाहींसा करण्यासाठीं चालकांना विशेष सावधपणानें वागावें लागतें, हें एकंदरींत हिताचेंच आहे.

एका संभावित गृहस्थांनीं एका चांगल्या कुटुंबांतील मुलीला आश्रमांत आणून घातलें. ती मुलगी चांगली सुस्वभावाची होती, व बुद्धीनेंही बरी आणि अभ्यासी दिसून आल्यामुळें तिला आम्हीं एक स्कॉलरशिप्हि दिली होती. आश्रमांत ती दहाबारा महिने होती. त्या मुदतींत तिचें वाईट वर्तन आम्हांला कांहींच दिसलें नाहीं. पण ती आश्रमांत येण्यापूर्वीच विचारीवर पाश टाकला गेला होता, असें मागाहून कळलें. मुलींचीं येणारीं व जाणारीं पत्रें वाचलीं जाण्याची व्यवस्था आश्रमांत आहे.पण कसलेंहि कारंटाइन ठेवलें तरी प्लेगचा प्रवेश जसा होऊं शकतो, तसा येथेंहि पत्रांचा अगर निरोपांचा प्रवेश क्वचित् प्रसंगीं होतो. तसल्या उपायानें एके दिवशीं संध्याकाळीं ती मुलगी संधि साधून आश्रमांतून निसटली व संकेतानुरूप पूर्वपरिचित व्याधाच्या पाशांत पुनः जाऊन पडली. ही सर्व गोष्ट आम्हांला

+वाचनालयाच्या इमारतीच्या एका भागाला गीतामंदिर हें नांव देण्यांत आलेलें आहे व त्याचा उपयोग श्रीयुत देवल यांनीं घातलेल्या शर्तींप्रमाणें होत असतो.

फार दिवसानंतर कळली. ही मुलगी ज्यांच्या पाशांत सांपडली त्यांच्याजवळच विवाह न करितां रहात आहे! वाईट संस्काराचा मनावर केवढा पगडा बसतो, हें या उदाहरणावरून सिद्ध होतें. कांहीं महिने आश्रमाचा सहवास मिळून देखील दुष्ट संस्कारांनीं या मुलीवर पुनः आपली छाप बसविली. गरीब स्वभावाच्या भोळ्या मुली कित्येक वेळां नाहक छळल्या जातात!

दुसरें उदाहरण निराळ्या स्वरूपाचें व अधिक धाडसाचें आहे. एका प्रतिष्ठित गृहस्थांची आप्त त्यांच्या संभावित मित्रामार्फत आश्रमांत आली. दोन महिन्यांच्या आंतच तिनें आपले गुण दाखविले. ती येथें आली होती तरी कशासाठीं, याचाच कांहीं उमज पडत नाहीं. तिनें येथें एक अर्धवट मुलगी मैत्रीण जोडली, आणि सर्व मुली एके दिवशीं संध्याकाळीं कोथरूडच्या महादेवाला गेल्या असतां या दोन मुली इतरांची नजर चुकवून तेथून निसटल्या. बिचाऱ्या अर्धवट मुलीचें फार नुकसान झालें. ही जहांबाज बाई एका लग्नें जुळविणाऱ्या एजंटाच्या जाळ्यांत सांपडली, आणि कुंकू लावून प्रौढ कुमारिका बनली. एजंटमार्फत एका बड्या पेन्शनराशीं तिचें लग्न झालें. पुढें हा सर्व प्रकार उघडकीला आला. आम्हांला हें सर्व कळण्याचें कारण त्या गृहस्थांचे चिरंजीव सर्व खाणाखुणा सांगत आमच्याकडे चौकशीला आले. हा प्रकार ऐकून मन थक्क झालें! असली गोष्ट जर आम्हांला कोणीं सांगितली असती तर ती खरी वाटली नसती!

आश्रमांतल्या एकाद्या बाईनें असले गुण उधळले म्हणजे सहजच चहूंकडे गवगवा होतो, व कांहीं दिवसपर्यंत कोठें तोंड दाखविण्याची सोय नाहीं, अशी आमची स्थिति होऊन जाते. सुदैवानें असले प्रकार फार क्वचित् घडतात म्हणून ठीक आहे.

ज्याच्या योगें आश्रमाच्या अब्रूला सहज धक्का लागला असता असें पुढील उदाहरण आहे. यांत एका बाईनें मोठ्याच शिफातीनें आम्हां सर्वांना चकविलें. ही बाई आपल्या लहान बाळासह पुण्याजवळच्या हडपसर स्टेशनाजवळ झाडाखालीं दीनवाण्या स्थितींत पडलेली तेथील शाळामास्तरांना आढळली. तिनें त्यांना अशी हकीकत कळविली कीं, प्लेगमध्यें माझा नवरा व इतर आप्त मरण पावले, आणि मी अनाथ होऊन माझ्या बाळासह हिंगण्याच्या आश्रमाची वाट काढीत चाललें आहें, व

येथें जवळच तो कोठें आहे असें मला कोणीं सांगितल्यावरून मीं या स्टेशनावर उतरून चौकशी केली, पण कांहीं पत्ता न लागल्यामुळें निराश होऊन येथें पडल्ये आहें. ही हकीकत ऐकून मास्तरांचें हृदय कळवळलें, व ते तिला घेऊन पुण्याला आमच्या बिन्हार्डी आले. मी घरीं नव्हतों, यामुळें आनंदीबाईजवळ सर्व हकीकत सांगून तिला ठेवून ते परत गेले. आनंदीबाईलाहि तिची दया आली, व तिला ठेवून घेण्यासंबंधानें तिनें कांहीं आढेवेढे घेतले नाहींत. मीं परत आल्यावर एकदोन दिवसांनीं तिला हिंगण्यास नेलें. आश्रमांतील आम्ही सर्व मंडळीही तिची सर्व हकीकत खरी समजून चाललों होतों. पण पुढें सुमारें दीड वर्षांनंतर खरा प्रकार मोठ्या गमतीनें बाहेर पडला. या बाईची या मुदतींत कोणी कांहीं विचारपूस केली नव्हती. नंतर तिच्या भावाचें मला पत्र आलें. त्यांत अमुकअमुक बाई तुमच्या आश्रमांत आहे, तिची खुशाली कळवावी वगैरे मजकूर होता.

आपले सर्व आप्त प्लेगनें मेले, असें त्या बाईनें सांगितलें असतां आज हा भाऊ कोठून निर्माण झाला म्हणून मला आश्चर्य वाटलें; परंतु आपणाला आश्रमांत घेण्याला अडचण येऊं नये म्हणून तिखटमीठ लावून तिनें आपल्या विपन्न स्थितीचें वर्णन केलें असेल, असें मनांत येऊन मला त्याचें विशेष वाटलें नाहीं. "बाईचें ठीक चाललें आहे; लहान मूल असल्यामुळें अभ्यासाला मिळावा तितका वेळ मिळत नाहीं, इतकेंच." अशा मजकुराचें पत्र मी तिच्या भावाला लिहिलें, व तसें लिहिल्याबद्दल तिला सांगितलें. एवढ्यानें माझें मन स्वस्थ झालें; पण त्या बाईला कसें चैन पडणार! कोठ्यांत न ठरणारा पदार्थ पोटांत गेला असतां तो जसा आंत खळबळ उडवून देऊन अखेरीला ओकून बाहेर पडतो, त्याप्रमाणें तिची अवस्था झाली. आजपर्यंत जें आपण कोणाला कळूं दिलें नाहीं तें आतां केव्हां तरी बाहेर पडणार, हें मनांत येऊन तिला रात्रंदिवस चैन पडेनासें झालें. अखेरीला आपल्या अपराधाची कहाणी तिनें लेडी सुपरिंटेंडेंट यांच्याजवळ सांगितली, व त्यांजकडून ती मजकडे आली. आम्ही आश्चर्यानें थक्क झालों. आतां काय करावें, हा आम्हांला मोठा विचार पडला. सरतेशेवटीं या गोष्टीचा बोभाटा होऊं न देतां तिला कांहीं काळ तशीच ठेवून थोडीशी

मार्गाला लावून परत पाठवावी असें आम्ही ठरविलें व पुढें तिला वाटेला लाविलें. आतां ती सन्मार्गानें वागत असून स्वावलंबी झाली आहे.

आतां एक वेगळ्या प्रकारचें उदाहरण देतों. एका मुलीला आश्रमांत घेतलें गेलें; परंतु ती आश्रमांत ठेवण्याला योग्य नाहीं असें कांहीं महिन्यांनीं विश्वसनीय माहितीवरून कळल्यामुळें तिला एका विश्वासू बाईबरोबर तिच्या पालकाकडे पोहोंचतें करण्यांत आलें. त्यानंतर लवकरच मला पुढील रजिस्टर केलेलें पत्र मिळालें:—

" रा. रा. प्रोफेसर कर्वे, म्यानेजर अनाथबालिकाश्रम, यांस:—

आमची......बाई ही आपले शिक्षणाखालीं होती; परंतु ती काल रोजीं म्हणजे ता. १४ डिसेंबर सन...रोजीं आमच्या घरीं एक बाई सोबत घेऊन आली आहे, व ती असें सांगत होती कीं, आपण तिजला पुनर्विवाह लावण्याचा आग्रह करूं लागलांत व ती तेव्हां पुनर्विवाह लावण्यास नाकबूल करूं लागली, त्या वेळेला आपण तिजवर तूं वाईट चालीचीस आहे असा वृथा दोषारोप करून तिजला घरीं पाठविलेंत. तर या नोटिशीद्वारें तुम्हास असें विचारण्यांत येत आहे, कीं दुसऱ्याच्या मुलीस पालकाच्या संमतीशिवाय पुनर्विवाह लावण्याला व जबरदस्ती करण्याला आपणाला काय अधिकार आहे, व तसें ती नाकबूल करीत असतांना आपण तिजवर तूं बदफैलीची मुलगी आहेस असें कुभांड रचून तूं आम्हांला शाळेंत नकोस असें म्हणून घरीं पोहोंचती केलीत. सबब आपणाला असें विचारण्यांत येतें कीं, तिनें काय बदफैली केली हें आपण पुराव्यानिशीं सिद्ध करून देण्याला तयार आहां काय ? जर आपण या दोन गोष्टीसंबंधी तयार असाल, तर आपण ही नोटीस पोंचल्यापासून २४ तासांच्या आंत आम्हांस समाधानकारक निकाल कळवावा. तसें न केल्यास कायदेशीर इलाज करणें भाग पडेल.

पत्ता.........

आपला

............"

अर्थात् या पत्राला मी कांहींच उत्तर लिहिलें नाहीं !

पुढील उदाहरण भयंकर स्वरूपाचें आहे. आश्रमांतील एका विद्या-

र्थिनीला बारीकसारीक चोऱ्या करण्यांची खोड होती, व तिजबद्दल अनेक तऱ्हेच्या तक्रारी पूर्वी आलेल्या होत्या. नंतर यासंबंधानें माझी स्वतःची खात्री पटण्यासारखी एक गोष्ट झाली. तेव्हां या विद्यार्थिनीला कांहीं शिक्षा करावी म्हणून रात्रीं मुली भजनासाठीं* जमल्या, त्या वेळीं तिच्या अपराधांचा विचार करण्याचें मीं योजिलें. शिक्षकिणी आणि सर्व मुली या वेळीं हजर होत्या. त्या दिवशी घडलेल्या अपराधाची व तिजबद्दल पूर्वीचें जें निरनिराळ्या माणसांना कांहीं वाटत होतें तें, या सर्वांचा विचार करून प्रत्येकीनें ही बाई शिक्षेला पात्र आहे कीं नाहीं, याबद्दल पाटीवर आपलें मत लिहावें, असें मी सर्वांना सांगितलें. एक अपवाद शिवाय करून बाकी सर्वांचें मत ती शिक्षेला पात्र आहे असें होतें. मुलींनीं लिहिलेलें फक्त मी एकटा वाचीन व नंतर त्यांनीं तें पुसून टाकावें, व जें ज्याला वाटत असेल तें त्यानें मोकळ्या मनानें लिहावें, असें मुद्दाम सांगितलें होतें. त्या दिवशींच्या तिच्या चोरीबद्दल मला अगदीं शंका नव्हती. तेव्हां एका शिक्षकीणबाईनीं तिला सर्वांसमक्ष पांच छड्या माराव्या अशी शिक्षा देण्यांत आली, व तेथच्या तेथें अमलांतहि आली. एका हातावर तीन व दुसऱ्या हातावर दोन अशा छड्या वेताच्या छडीनें देण्यांत आल्या. ती रात्र, दुसरा दिवस आणि दुसरी रात्र सरळ गेली. तिसऱ्या दिवशीं या विद्यार्थिनीची आई आजारी असल्याबद्दल तार आली. हिनें शिक्षेची गोष्ट घरीं कळविल्यामुळेंच ही तार आली असावी असें आम्हीं ताडलें, पण तिच्या जाण्याला अडथळा न घेतां आम्हीं तिला जाऊं दिलें, व ज्या गृहस्थांमार्फत ही बाई आश्रमांत आली होती त्यांना घडलेल्या हकीकतीचें एक पत्र लिहिलें. ही बाई जाईपर्यंत तिचे नित्याचे सर्व व्यवहार यथास्थित होत होते, व हिला कांहीं कमजास्त झाल्याची कोणाला शंकाहि आली नाहीं. माझें पत्र पोहोंचण्यापूर्वीच मला त्या गृहस्थांचें पत्र पुढें लिहिल्याप्रमाणें आलें:—

"वि. वि. आपले आश्रमांत......या नांवाची एक मुलगी माझ्या

---

* दररोज रात्रीं सर्व मुलींनीं एकत्र जमून भक्ति, परमार्थ, वैराग्य वगैरे विषयांचीं कांहीं पदें म्हणावीं, व उपदेशपर अगर पौराणिक माहितीचा एखादा ग्रंथ अगर उतारा वाचावा, असा आश्रमांतील नित्यक्रम आहे.

मार्फत शिकण्याकरितां ठेविली होती, ती काल रोजीं तिची आई आजारी असल्यामुळें तिजला भेटण्याला आली आहे. ती येथें आल्यावर तिचे अंगावर मारल्याचे वण दिसल्यावरून तिचे आईनें तिजला विचारतां तिनें मि. कर्वे व...बाई नांवाची कोणी मास्तरीण आहे हिनें असें दोघांनीं मारलें असें सांगितलें, व तिजवर चोरीचे खोटे आरोप करून तिचे पुष्कळ हाल केले असेंहि सांगितलें. व याशिवाय दुसऱ्या कांहीं गोष्टी सांगितल्या; परंतु त्या पत्रांत लिहिण्यासारख्या नाहींत. त्याबद्दल तूर्त विचार करणें नाहीं. तिच्या आईनें डॉक्टराला दाखवून अंगास असलेले वण मारल्याचेच आहेत असें सर्टिफिकीट घेतलें आहे, व त्या झालेल्या इजेमुळें तिजला तापहि येत आहे. असें झाल्यामुळें तिची आई व इतर नातेवाईक मंडळी यांनीं बरीच गडबड करण्याचा विचार केला आहे; परंतु ती मुलगी माझ्या-मार्फत आश्रमांत गेल्यामुळें मजला या कामांत थोडी मध्यस्थी करणें जरूर वाटल्यावरून त्यांना दोन गोष्टी सांगून तूर्त शांत केलें आहे, व तुमचेकडून या गोष्टीचा खुलासा आल्यावर मग काय तें करावें, असें सांगितलें आहे. तर यासंबंधानें आपल्याकडून खुलासा येईल अशी आशा आहे. उत्तर लवकर यावें. एकदोन दिवसांत उत्तर न आल्यास त्यांना योग्य वाटेल ती तजवीज तीं करतील. तर आपले मर्जीनुरूप तजवीज व्हावी, कळावें."

हें पत्र वाचल्याबरोबर माझ्या उरांत धस्स झालें! सूड घेण्याच्या बुद्धीनें विलक्षण कुभांड रचलें जाऊन मजवर, ...बाईवर व बाल्यावस्थें-तील संस्थेवर भयंकर किटाळ आणण्याचा या मंडळींनीं बेत केल्यासारखें दिसलें. यापुढें वकीलाच्या सल्ल्यावांचून या कामांत पत्रव्यवहार करणें बरें नव्हे हें मी समजून चुकलों, व हल्लीं प्रसिद्धीला आलेल्या माझ्या एका होतकरू वकील मित्राच्या सल्ल्यानें पुढील पत्रव्यवहार केला. मीं वरील पत्राचें उत्तर लिहिलें, तें येणेंप्रमाणें:—

"वि. वि. तुमचें.........बाईबद्दलचें ता. १८।१२–चें पत्र पावलें तुम्हांस मीं शनिवारीं पत्र लिहिलेंच आहे, त्यांत जो काय मजकूर जाहला होता त्याजबद्दल लिहिलें आहे. त्याहून जास्त कांहीं एक नाहीं. माझें पत्र तुम्हांला मिळण्यापूर्वीं तुम्हीं हें पत्र लिहिलेलें आहे असें दिसतें......

बाईनें अंगावर मारलें वगैरे जें सांगितलें त्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुम्ही तिचे आईस माझें शनिवारचें पत्र दाखविलेंच असेल. "

यानंतर कांहीं दिवसांनीं पुढील पत्र आलें.

5th January,—

" Dear Sir,

......bai now intends to prosecute her studies and she therefore wants a leaving certificate from you. I hope you will have no objection to comply with her request.

With reference to the conversation we had about her during the last Christmas, I beg to inform you that she denies all charges you have brought against her. She says that they are grossly defamatory and false, and they have been got up in order to take revenge on her for not consenting to your improper proposals. The corporal punishment inflicted on her was extremely cruel, and she holds you and the lady teacher responsible for it. She says that if the charges are not withdrawn, she will have to get her character cleared in such manner as she may be advised to do.

I was asked to write this letter to you long ago, but as we were all busy during the past week, I could not find time to do so. I hope you will consider this letter in such a way as you may deem proper.

I am sorry I have to trouble you in this matter, but as the girl was sent there at my suggestion, I consider it my duty to communicate to you what she has to say, and it is desirable in the interest of the institution itself and the parties concerned in this connection, that this matter may come to an end without much noise. "

या पत्राला मीं पुढील उत्तर लिहिलें:—

" Dear sir,

Kindly let me know what sort of leaving certificate she wants

As regards the other matter touched upon by you in your letter it is immaterial to me whether.........bai admits or denies

the facts as she is not now in my school. But I wonder at the audacity with which she brings forth an entirely false and stupid excuse. I am sorry such a foolish girl happened to be admitted in my school. As regards the charge of 'improper proposals' you make mention of, not only is the statement entirely false, but it is equally improbable, and I am sure, that even the worst enemies of mine, if there be any, and of the institution, would never regard that with the least seriousness for a moment. I am sorry neither.........bai, nor her mother, nor her advisers, if there be any, could see the serious nature and consequences of making such a charge. What I have said to you is true to a letter. I had to tell you, as it was through you thal the girl was admitted in to the Ashram. The nature of the punishment I have told you about. That is all the truth. If either.........bai or her mother take it into their head to act foolishly I cannot help it. The facts are just as I have stated them to you and I think after yon advise.........bai the right course, let them do what they please."

हा पत्रव्यवहार येथेंच थांबला. अलीकडे असले कोणतेहि प्रकार घडून आले नाहींत !

# प्रकरण सत्तेचाळिसावें

## अनाथबालिकाश्रमानें आजपर्यंत काय केलें ?

आश्रमाचा समाजाला काय उपयोग आहे, हा प्रश्न अजूनहि पुष्कळ वेळां विचारला जातो. परंतु दिवसेंदिवस या प्रश्नाला उत्तर देत बसण्याचें कारण राहणार नाहीं, असें वाटतें. सहानुभूतीनें पाहणाराला आश्रमाचा उपयोग सहज दिसून येईल; तथापि यासंबंधानें थोडासा स्पष्ट खुलासा करणें वावगें होणार नाहीं. प्रथम प्रत्यक्ष उपयोग काय झाला व होतो हें पाहून नंतर अप्रत्यक्ष उपयोगाकडे वळूं.

आजपर्यंत आश्रमांत सुमारें ५०० विद्यार्थिनी दाखल झाल्या. यांपैकीं ज्यांना आश्रमाचा म्हणण्यासारखा उपयोग झाला नाहीं अशा फार तर पन्नास असतील. बाकीच्या सर्वांना आश्रमाचा बराच उपयोग झाला आहे. मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालेल्या विद्यार्थिनी सुमारें वीस आहेत. या बहुतेकींनीं कॉलेजांतील शिक्षणाचा थोडा फार फायदा घेतला आहे. आजपर्यंत सुमारें पंचवीस विद्यार्थिनींनीं ट्रेनिंग कॉलेजचीं सर्टिफिकिटें मिळविलीं असून सदतीस विद्यार्थिनी व्हर्नाक्युलर फायनल म्हणजे मराठी सातव्या इयत्तेची परीक्षा पास झाल्या आहेत. मिडवाइफ आणि नर्स हीं कामें करणाऱ्या सुमारें वीस आहेत. प्रसंग पडल्यास आज स्वतःच्या पायांवर उभ्या राहूं शकतील, अशा सुमारें सवाशें विद्यार्थिनी आपला अभ्यासक्रम पुढें चालवीत आहेत.

आश्रमाचा फायदा घेण्यासाठीं किती दूरदूरच्या ठिकाणांहून विद्यार्थिनी येतात हें पाहिलें, व त्याचप्रमाणें स्वतःचा खर्च सोसून येणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या वर्षानुवर्ष कशी वाढत आहे ही गोष्ट लक्ष्यांत आणली, म्हणजे आश्रमाच्या उपयुक्ततेविषयीं शंका घेण्याचें कारण राहणार नाहीं. मराठी सात इयत्ता व इंग्रजी मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिकविण्याची सोय आश्रमाच्या शाळेंत झालेली आहे. आश्रमाकडे आज दोनशें विद्यार्थिनींची बोर्डिंगशाळा अस्तित्वांत आली आहे.

कांहीं विद्यार्थिनींना आश्रमाचा विशेष रीतीनें फायदा झाला आहे. त्याचीं थोडी उदाहरणें येथें देतों. आरंभीं आश्रमाला आश्रमपणा ज्यांनीं

आणला, व आश्रमामुळें ज्यांचें विशेष कल्याण झालें, त्या तीन बहिणींची हकीगत पुढें महिलाविद्यालयाच्या वर्णनांत आढळून येईल. दुसरें एक तीन स्त्रियांचें कुटुंब आश्रम बाल्यावस्थेंत असतांनाच त्यांत येऊन दाखल झालें. हें कुटुंब म्हणजे सहा वर्षांची एक मुलगी, वीस वर्षांची तिची आई व पस्तीस वर्षांची तिची आजी, यांचें होतें. आई व आजी या विधवा होत्या. आजीनें लिहिण्यावाचण्याचा थोडा अभ्यास केला, व पुढें सुइणीच्या वर्गांत जाऊन त्या कामाचें सर्टिफिकेट मिळविलें. हल्लीं या बाई शिक्षकिणीचें आणि मिडवाइफचें काम करीत आहेत. आईनें ट्रेनिंग कॉलेजाचें सर्टिफिकेट मिळवून व इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत अभ्यास करून पुढें पुनर्विवाह केला; परंतु दुर्दैवानें ती लवकरच स्वर्गवासी झाली. मुलगी अजून अविवाहित असून बी. ए. चा अभ्यास करीत आहे.+ दुसरें एक मायलेकींचेंच उदाहरण आहे. आई इंग्रजी चवथ्या इयत्तेपर्यंत शिकून पुढें तीन वर्षें इस्पितळांतील मिडवाइफ व नर्सचें काम शिकून तयार झाली. या बाई हल्लीं मुंबईंत काम करीत असून मुलगी मॅट्रिक्युलेशनच्या वर्गांत आहे.

पुढील उदाहरण एका पराक्रमी बाईचें आहे. घरच्या मनुष्यांची परवानगी मिळेना म्हणून यांनी आपल्या हिंमतीवर आश्रमाचा रस्ता धरला. या बाईंना आश्रमांत कसें दाखल करावें, याचा आम्हांला मोठा विचार पडला. यांचें वर्तन वगैरे कसें असेल हें जाणण्याला कांहीं मार्ग नव्हता. तेव्हां विद्यार्थी म्हणून दाखल न करितां कामासाठीं त्यांना ठेवून घ्यावें व शाळेच्या वेळांत शिकण्याची त्यांना सवड द्यावी, असें आम्हीं ठरविलें. या बाईंनीं आपल्याला स्वयंपाकासंबंधीं व इतर कामें जीं सांगितलीं असतील तीं मनापासून केल्यामुळें त्या सर्वांच्या पसंतीला उतरल्या, व वर्षदीडवर्षानंतर त्यांना विद्यार्थी म्हणून दाखल करण्यांत आलें. आश्रमाच्या शाळेंत अभ्यास करून व्हर्नाक्युलर फायनल पास झाल्यावर या बाईंनीं पुढें पुरुषांच्या

---

+ ही पुढें बी. ए. होऊन तिचें एका मोठ्या एंजिनियरशीं लग्न झालें असून ती सुखानें संसार करीत आहे.

ट्रेनिंग कॉलेजांतील दुसऱ्या वर्षाचा अभ्यास पुरा केला, व हल्लीं त्या महिलाविद्यालयाच्या बोर्डिंगच्या सुपरिंटेंडेंटचें काम करीत आहेत.*

आणखी एका बाईची हकीगत विशेष मनोरंजक आहे. या बाई म्हणजे ज्यांच्या प्रोत्साहनानें देशकार्याकडे माझें मन वळलें त्या माझ्या मराठी शाळेंतील गुरुजींच्या पत्नी होत. माझे गुरुजी, व या त्यांच्या तृतीय पत्नी, यांचा मजवर पूर्ण विश्वास असे. हा विश्वास बसण्याला विशेष कारण होतें. मी त्यांना विसरलों नव्हतों, व त्यांचा माझा पत्रव्यवहार चालू होता. शिवाय मी दोन वेळां, ते शिक्षक होते त्या गांवीं त्यांना भेटण्यासाठीं मुद्दाम गेलों होतों. तेहि एकदां आश्रम बाल्यावस्थेंत असतां तो पाहण्यासाठीं मुद्दाम आले होते. अशा रीतीनें आमचा संबंध कायम राहून प्रसंग-विशेषीं विचारविनिमयहि होत असे. गुरुजींनीं पेन्शन घेतल्यावर महिला-विद्यालयाच्या कामीं मदत करण्यासाठीं मीं त्यांना विनंति केली, व तिला मान देऊन ते सकुटुंब पुण्यांत रहावयाला आले. चार वर्षांपूर्वी हे वारले. त्या वेळीं या बाईचें वय सुमारें तेहेतीस वर्षांचें होतें. यांना चार मुली व एक मुलगा अशीं पांच मुलें असून वडील दोन मुलींचीं लग्नें झालेलीं होतीं, व त्यांतील एकीला मूल होऊन या बाईकडे आजीपणहि आलें होतें. गुरुजी वारले त्या प्रसंगीं मी हजर होतों. नंतर तेराव्या दिवशीं संध्याकाळीं मी या बाईकडे गेलों, व पुढील आयुष्यक्रमाविषयीं बोलणें केलें. "समाजाच्या राहटीप्रमाणेंच आयुष्य कंठावयाचें असेल, तर माझें कांहीं म्हणणें नाहीं; परंतु, आयुष्यक्रमाची दिशा बदलावयाची असेल, तर दिवस फुकट न दवडतां उद्योगाला लागलें पाहिजे, व या कामीं शिकस्तीची मदत करण्याला मी तयार आहें," वगैरे गोष्टी त्यांच्या-जवळ मी बोललों. थोडासा विचार करून त्यांनीं माझ्या सल्ल्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलें, व चौदाव्या दिवसापासून मी त्यांच्याकडे जाऊन त्यांना दररोज दोन तास शिकवूं लागलों. या बाई बुद्धीनें बऱ्या आहेत. यांचें बालबोध वाचन चांगलें तयार होतें, आणि कांहीं गद्य पुस्तकें व कांहीं कविताहि त्यांनीं वाचलेल्या होत्या; परंतु बेरीज, वजाबाकी, व्याकरण, मोडी वगैरेंचा यांना गंधहि नव्हता. त्यांना शिकविण्याचा

* ह्या बाईबद्दल उल्लेख पुढल्या एका प्रकरणांत केला आहे.

क्रम मीं तीन महिने चालू ठेविला, व त्या मुदतींत त्यांची बरीच तयारी झाली. आतां यापुढें घरीं राहून चालणार नाहीं, आश्रमांत गेलें पाहिजे, असें बोलणें त्यांच्याजवळ मी काढलें. अर्थात्, त्यांना हें फार जड वाटलें. आपलीं चिलींपिलीं येथें सोडून तेथें जाऊन आपली विद्या काय होणार, ही त्यांना भीति पडली; परंतु, माझ्या सल्ल्याबाहेर जावयाचें नाहीं, असा आपला निर्धार त्यांनीं मला कळविला. या बाईहून लहान वयाची त्यांची विधवा बहीण पुण्यांतच राहते. तिचें स्वतःचें लहानसें घर आहे, त्या घरांतच या बाई राहतात. तेव्हां आपलीं तीन मुलें बहिणीच्या स्वाधीन करून तुम्ही आश्रमांत जा, व आठपंधरा दिवशीं त्यांना भेटा-वयाला येत जा, असा माझा मनोदय मीं त्यांना कळविला, व तो त्यांना मान्य होऊन त्या आश्रमांत गेल्या. जेव्हांजेव्हां त्यांना शिकविण्याची संधि मला सांपडे, तेव्हांतेव्हां ती मीं वाया दवडिली नाहीं. १९१२ सालीं मी फर्लो रजेवर असतां आठदहा महिने आश्रमांतच राहत होतों. त्यावेळीं दर-रोज पहांटेला त्यांना मी नियमानें शिकवीत असें. गेल्या वर्षी या व्हर्नाक्युलर फायनलच्या परीक्षेंत पास झाल्या, आणि आतां या आश्रमांतच शिक्षकिणीचें काम करीत आहेत. या बाईचा आयुष्यक्रम बदलल्यामुळें त्यांच्या अंगीं विशेष धैर्य आलें आहे. पहिल्या मुलींचीं लग्नें त्यांना फारसें शिक्षण न देतां अल्पवयांत झालीं, तरीं आतां राहिलेल्या दोन मुलींचीं करावयाचीं नाहींत, असें त्यांनीं ठरविलें आहे. या दोन मुलींपैकीं पहिली पंधरा वर्षांची असून इंग्रजी सहाव्या इयत्तेंत आहे, व दुसरी नऊ वर्षांची मराठी सहाव्या इयत्तेंत आहे. आपल्या समाजांत कितीतरी हुषार व कर्तब-गार विधवा स्त्रिया आहेत, परंतु त्यांना मार्ग कसा सांपडावा हीच अड-चण आहे. +

अनाथबालिकाश्रमाचा अप्रत्यक्ष उपयोग बराच झाला आहे, अशी माझी समजुत आहे. कांहीं स्त्रीपुरुषांना सार्वजनिक कामाचा ओनामा शिका-वयाला ही संस्था साहाय्यभूत झाली आहे. महिलाविद्यालय व निष्काम—

+ ह्या बाईची मुलगी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास होऊन तिचें लग्न मध्यभागां-तल्या शिक्षण खात्यांतल्या एका बी. ए. एल. टी. गृहस्थांशीं झालें आहे व दुसरी हल्लीं फर्ग्युसन कालेजांत बी. ए. च्या वर्गांत आहे. मुलगा बी. ए. झाला आहे.

कर्म–मठ यांच्या कल्पनांचा परिपोष आश्रमानें केला असून त्या संस्थांचा उगम आश्रमापासून झाला आहे. हजारों मनुष्यांच्या अंतःकरणांत या संस्थेनें परोपकारबुद्धि उत्पन्न करून त्या बुद्धीला कार्यक्षेत्रांत अवकाश दिला आहे. हिंदी लोकांनीं आपल्या बळावर चालविलेल्या असल्या संस्थांत ही बरीच यशस्वी झालेली असल्यामुळें हिचें अनुकरण करून इतर ठिकाणीं असल्या संस्था काढण्याचें प्रोत्साहन या संस्थेमुळें कित्येकांना मिळालें आहे.

पण आश्रमापासून झालेला सर्वांत मोठा फायदा म्हटला म्हणजे खुद्द विधवावर्गाच्या अंतःकरणांत त्यानें जो आशेचा नवा अंकुर उत्पन्न केला, तो होय. हिंदूंच्या ज्या जातींत विधवाविवाह रूढ नाहीं त्या जातींतील अल्पवयस्क विधवांना शिक्षण देऊन त्यांचीं मनें सुशिक्षित करून त्यांना स्वावलंबी होतां येईल असें साधन त्यांच्या हस्तगत करून देणें व आपलें जीवित उपयोगी असून तें कोणत्या तरी कार्याला लावितां येईल असा विश्वास त्यांच्यामध्यें उत्पन्न करणें, हे आश्रमाचे उद्देश आहेत, व ते चांगल्या रीतीनें तडीला जात आहेत. आमच्या समाजाचा विधवांसंबंधानें एकंदर रोख असा आहे कीं, 'आतां आपणाला जगून काय करावयाचें आहे ? स्वतःला व दुसऱ्याला भार अशा या जीविताचा एकदां शेवट होईल तर बरें!' असे विचार वैधव्याचा अनुभव घेणाऱ्या स्त्रियांच्या मनांत यावे. अशा स्त्रिया आश्रमांत आल्यानंतर लवकरच त्यांची वृत्ति प्रफुल्लित होते व आपलें जीवित म्हणजे स्वतःच्या व देशाच्या उपयोगीं पडण्यासारखी एक मूल्यवान चीज आहे, असें त्यांना वाटूं लागतें. विधवा स्त्रियांच्या विचारांत व मनोवृत्तींत फरक पाडण्याच्या कामीं आश्रमानें बरीच महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

# प्रकरण अठ्ठेचाळिसावें

## महिलाविद्यालयाची गर्भावस्था

महिलाविद्यालय हें झाडावर रुजलेलें झाड आहे. अनाथबालिकाश्रमाच्या वृक्षावर हें रुजलें, तेथून कुंडींत घालून त्याला पुण्याला नेण्यांत आलें, व तेथें त्यानें चांगला जीव धरल्यावर आश्रमाशेजारीं आणून तें लावण्यांत आलें. आश्रमाची अशा रीतीनें वाढ होणें अगदीं साहाजिक होतें. जलंदर येथें कन्यामहाविद्यालयाच्या वृक्षावर विधवागृहाचें बीज रुजलें. सुरत येथें या दोहोंचें बीज एकदम पेरलें जाऊन वनिताविश्राम ही संस्था उत्पन्न झाली. स्त्रीशिक्षणाच्या कोणत्याहि जोरदार प्रयत्नाला असें व्यापक स्वरूप येणें हें निसर्गाच्या उत्क्रमणमार्गाला अनुसरूनच आहे. हें बीज झाडावर न कळत पडलें कसें, व त्याला अंकुर फुटून त्याचें झाड झालें कसें, त्याचा संक्षिप्त इतिहास येथें द्यावयाचा आहे.

आश्रम बाल्यावस्थेंत असतांनाच या संस्थेचें बीज न कळत पेरलें गेलें. आरंभीं आश्रमांत फारशा विद्यार्थिनी येत नसत. तेव्हां विधवा विद्यार्थिनींच्या मुली फुकट घ्याव्या, व त्यांच्या बहिणींनाहि कांहीं सवलत द्यावी अशी योजना केली होती. त्या वेळीं रत्नागिरी जिल्ह्यांतल्या एका धाडसी गृहस्थांनीं मला पत्र लिहिलें कीं, "माझ्या १४, १२, व १० वर्षांच्या तीन मुली आहेत. वडील मुलगी विधवा असून दुसऱ्या कुमारिका आहेत. या सर्वांना शिक्षणासाठीं आश्रमांत पाठवावें, अशी माझी इच्छा आहे. मजकडून द्रव्याची मदत फारशी होऊं शकणार नाहीं व तीनहि मुलींचा बहुतेक भार आश्रमावरच पडेल. विधवा मुलीला एकटीलाच पाठवावें, तर ही गोष्ट केल्यानंतर इकडील परिस्थितींत दुसऱ्या मुलींना स्थळें मिळणें शक्य नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार करून काय तें कळवावें."

या गृहस्थांच्या मनांत सुधारणेच्या कल्पना प. वा. प्रिन्सिपाल आगरकरांच्या लेखांनीं उत्पन्न केल्या होत्या. मुली कशा काय आहेत, तें प्रत्यक्ष पाहून नंतर या गृहस्थांना जबाब द्यावा, असा विचार करून मी मुद्दाम या कुटुंबाला पाहण्यासाठीं तिकडे गेलों. मुलींची तरतरी पाहून त्या सर्वांना

आश्रमांत घ्यावें असें वाटलें, व अठरावीस वर्षांचें मुलींचें वय होईपर्यंत त्यांच्या लग्नाची गोष्ट काढणार नाहीं, असें कबूल करीत असल्यास सर्वांना आश्रमांत पाठवावें, असा जबाब मीं त्यांना दिला. ती अट मान्य करून १९०० सालाच्या आरंभींच त्या गृहस्थांनीं आश्रमांत मुली पाठविल्या. हा महिलाविद्यालयाचा खरा आरंभ होय. या तिघी बहिणींची हुषारी पाहून आश्रम पहावयाला येणाऱ्या मंडळींना मोठा आनंद वाटे. या तीनही बहिणींचा पुढील आयुष्याक्रमहि फार समाधानकारक आहे. वडील बहीण ट्रेनिंग कॉलेजांतील पहिल्या प्रतीचें सर्टिफिकेट मिळवून कांहीं वर्षें आश्रमांत व पुढें पुण्यांतील सेवासदनांत शिक्षकिणीचें काम करीत होती. शिवणकाम, गायन, ड्रॉइंग वगैरे इतर कलाहि तिनें संपादन केल्या आहेत. तिनें बरींच वर्षें आपल्या पराक्रमावर आपल्या तिघां भावांचें शिक्षण चालविलें. हल्लीं तिनें एका सार्वजनिक कामांत झटणाऱ्या गृहस्थांशीं पुनर्विवाह केला आहे.× दुसरीचा अभ्यास इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत होऊन तिचें लग्न एका बी. ए. गृहस्थांशीं तिच्या एकविसाव्या वर्षी झालें.* हे गृहस्थ एका म्युनिसिपल इंग्लिश स्कुलाचे हेडमास्तर आहेत. तिसरीचा अभ्यास प्रिव्हियस परीक्षेपर्यंत होऊन तिचें लग्न तिच्या एकविसाव्या वर्षी माझा वडील मुलगा एल्फिन्स्टन् कॉलेजांतील गणिताच्या अध्यापकांचा मदतनीस आहे त्याच्याशीं झालें. या माझ्या सूनबाई हल्लीं आपला संसार संभाळून चंदारामजी हायस्कुलांत शिक्षकिणीचें काम करीत आहेत.+

आरंभीं विधवा विद्यार्थिनींच्या कुमारिका मुली आणि बहिणी एवढ्यांनाच आश्रमांत घेतलें जात असे; पण पुढें खर्च देऊन येणाऱ्या इतर कुमारिका व सुवासिनी विद्यार्थिनींना घेण्याची सुरवात झाली. आश्रमांतील राहणी व अभ्यासक्रम लोकांना आवडूं लागल्यामुळें बरेच लोक आपल्या कुमारिका व सुवासिनी मुलींना आश्रमांत पाठवूं लागले, आणि अशा विद्यार्थिनींचीं संख्या दिवसेंदिवस वाढूं लागली. आश्रमांतील विधवा व

---

×हे गृहस्थ म्हणजे शेतकी कॉलेजांतील प्रोफेसर रा. बा. द. ल सहस्रबुद्धे हे होत.

*हे गृहस्थ म्हणजे रा. दे. भा. लेले, हेडमास्तर हायस्कूल संगमनेर, हे होत.

+या उभयतांबद्दल आणखी माहिती पुढील एका प्रकरणांत येणार आहे.

अविधवा विद्यार्थिनींची संख्या कसकशी वाढत गेली, हें पुढील कोष्टकावरून ध्यानांत येईल.

| वर्ष | आश्रमांतील विधवा विद्यार्थिनींची संख्या | आश्रमांतील अविधवा विद्यार्थिनींची संख्या |
|---|---|---|
| १८९९ | ४ | ० |
| १९०० | ८ | २ |
| १९०१ | ११ | ३ |
| १९०२ | १४ | ४ |
| १९०३ | २१ | ९ |
| १९०४ | २७ | ११ |
| १९०५ | ४७ | १३ |
| १९०६ | ५६ | १९ |

अविधवा विद्यार्थिनींची संख्या वाढत चालली, तेव्हां आश्रमाच्या कमिटीनें असा नियम केला कीं, आश्रमांतील एकंदर विद्यार्थिनींच्या चतुर्थांशापेक्षां अशा विद्यार्थिनींची संख्या अधिक वाढूं देऊं नये, व विधवा विद्यार्थिनींसाठीं जागेची जरूर लागल्यास अविधवा विद्यार्थिनींना परत पाठवून जागा करावी. या नियमामुळें बऱ्याच अविधवा विद्यार्थिनींच्या अर्जांना नकाराचा जबाब देणें भाग पडे. ही स्थिति माझ्यानें पहावेना. आश्रमानें आपल्या कामाचा विस्तार करून अविधवा विद्यार्थिनींच्या शिक्षणाची सोय करावी, निदान त्यांच्यासाठीं बोर्डिंगाची सोय परस्पर झाल्यास त्यांना आश्रमानें आपल्या शाळेचा फायदा तरी द्यावा, अशा खटपटीला मी लागलों. एक सर्क्युलर कमिटीच्या सभासदांकडे आगाऊ पाठवून नंतर या प्रश्नाचा विचार कमिटीच्या सभेत व्हावा, अशी योजना मीं केली. तें सर्क्युलर येणेंप्रमाणें:—

## अविधवा विद्यार्थिनींची आश्रमाच्या शाळेंत शिकण्याची सोय

१. आश्रमांत अविधवा विद्यार्थिनींचें प्रमाण दरसाल वाढत आहे. हल्लीं १९ अविधवा विद्यार्थिनी आश्रमांत आहेत. यांतल्या ४ विधवा विद्यार्थिनींच्या संबंधी असून बाकीच्या १५ त्यांचा खर्च देऊन त्यांच्या

पालकांनीं, अगर कुमारिकांच्या शिक्षणाला उत्तेजन देणाऱ्या कांहीं थोर गृहस्थांनीं स्कॉलरशिपा देऊन आश्रमांत ठेविल्या आहेत. यांतल्या कांहीं मुली वऱ्हाड, इंदूर वगैरे दूरदूरच्या ठिकाणांहून आलेल्या आहेत. एकाहि मुलीच्या अर्जाला जर आजपर्यंत नकाराचा जबाब न मिळता, तर आतांपर्यंत आश्रमांतली अविधवा विद्यार्थिनींची संख्या कदाचित् हल्लींच्या दुप्पटहि झाली असती. यावरून इतकें स्पष्ट होतें, कीं, खुद्द आश्रमांत किंवा आश्रमाच्या धर्तीवर चालविलेल्या बोर्डिंगशाळेंत आपल्या मुली पाठवाव्या अशी इच्छा आपल्या समाजांतील एका वर्गांत उत्पन्न झाली आहे. अशा शाळेच्या अभावीं कांहीं लोक आपल्या मुली नाखुषीनें, परंतु नाइलाजास्तव हुजूरपागेंत ठेवितील; तथापि कांहीं माणसांचीं ही सदिच्छा अशा शाळेच्या अभावीं जागच्या जागींच जिरेल, व मुली अशिक्षित रहातील. हुजूरपागेंत मुली ठेवण्यासंबंधानें पुरुषपालकांची तयारी असावी, पण बायकांची तयारी नसल्यामुळें मुली घरीं रहाव्या अशींहि कांहीं उदाहरणें घडतील. फीमेल हायस्कूल व फीमेल ट्रेनिंग कॉलेज या शाळा, आश्रम व त्या धर्तीवर निघणाऱ्या शाळांच्या मातृस्थानीं आहेत, व त्यांबद्दल मजमध्यें बहुमान व आदर वसत आहे. या शाळांचा आजपर्यंत फार मोठा उपयोग झालेला आहे व पुढेंहि होणार यांत शंका नाहीं. ही जी नवीन शाळा काढावयाची, ती या शाळांशीं स्पर्धा करण्याकरितां नव्हे, तर त्यांनीं आरंभिलेल्या सत्कार्याचा त्यांच्याच आशीर्वादानें प्रसार करण्याकरितां होय. आश्रमांत ७५ विद्यार्थिनी शिकत असतां वरील शाळांची वाढहि मोठ्या झपाट्यानें होत आहे. यावरून आतां स्त्रियांसाठीं दुसरी एक शाळा चांगल्या रीतीनें चालण्याचा समय आला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. खुद्द आश्रमांत येतील तितक्या अविधवा विद्यार्थिनींच्या शिक्षणाची सोय केली, अथवा त्यांच्यासाठीं निराळी शाळा काढली, तरी वरील शाळांची वाढ खात्रीनें होत राहणार. कारण, शिकणाऱ्या विद्यार्थिनींची संख्याच मोठ्या झपाट्यानें वाढत आहे. ही दुसरी शाळा निघाली तरी मध्यम स्थितींतल्या बऱ्याच विद्यार्थिनी व श्रीमंत स्थितींतील सर्व मुली हूजूरपागेंतच जाणार. आश्रमांत किंवा त्या धर्तीवर चालविलेल्या शाळेंत

मुलींना दिवसांतून दीड दोन तास गृहकृत्यांत घालवावे लागणार, व तें पसंत न करणाऱ्या मुली हुजूरपागेंतच जाणार; या कारणामुळें आपल्या विधवा मुली आश्रमांत न पाठवितां हुजूरपागेंत पाठविल्याचीं उदाहरणें घडून आलीं आहेत. दुसरें, बुद्धिविषयक शिक्षणासंबंधाची सोय सरकारी शाळांत जितकी चांगली असेल, तितकी अशा शाळेंत होऊं शकणार नाहीं तेव्हां अशा शाळेमुळें त्या शाळांस कांहीं धक्का पोंचेल, असा नुसता विचारहि मनांत आणण्याचें कारण नाहीं. 'भिन्नरुचिर्हि लोकः' या न्यायानें ज्यांना आश्रमासारखीच शाळा पसंत वाटते, त्यांच्यासाठीं ती उत्पन्न करून कांहीं अधिक मुलींच्या शिक्षणाची सोय करावी, एवढाच उद्देश आहे.

२. अविधवा विद्यार्थिनींच्या शिक्षणाची वर दर्शविलेल्या रीतीनें सोय करणें जरूर आहे असें धरून चाललें, तर ती कोठें करावी, असा प्रश्न उत्पन्न होतो. प्रत्येक कार्यासाठीं खटपट करणारी मंडळी वेगवेगळी असणें फार इष्ट आहे; पण तिच्या अभावीं राजकीय, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक वगैरे सर्व कामें त्याच त्याच व्यक्तींना करावीं लागतात. त्याचप्रमाणें विधवांच्या शिक्षणाला वाहिलेलीं माणसें निराळीं, व अविधवांच्या शिक्षणासाठीं खटपट करणारीं निराळीं, असें असतें तर ठीक झालें असतें, परंतु वर दर्शविलेल्या शाळेसारखी शाळा स्वतंत्र प्रयत्नांनीं स्थापित होऊन ती लवकर उदयाला येईल, असा आज तरी कांहीं संभव दिसत नाहीं. तेव्हां विधवांच्या शिक्षणासाठीं यत्न करणाऱ्या माणसांनींच हाहि प्रश्न हातीं घेऊन त्याची तड लावणें इष्ट दिसतें. आश्रमासाठीं जर हायस्कुलाचे व ट्रेनिंग कॉलेजाचे वर्ग चालवावयाचे आहेत, तर अविधवांसाठीं आश्रमाला कांहींएक निराळी व्यवस्था करावयाला नको. खालच्या इयत्तांत जरूर पडल्यास कांहीं अधिक शिक्षक ठेवावे लागतील, इतकेंच. तेव्हां माझी सूचना अशी आहे कीं, अविधवा विद्यार्थिनींसाठीं रहाण्याची व जेवणखाण्याची सोय आश्रमाजवळ निराळ्या घरांत करून सर्व विद्यार्थिनींसाठीं शाळा एकच करावी, व या सगळ्यांवर देखरेख आश्रमाच्या व्यवस्थापक मंडळीचीच असावी.

३. अविधवा विद्यार्थिनींच्या रहाण्याची व जेवणाखाणाची सोय करण्याकरितां जें घर लागेल, त्याचा खर्च, शाळागृहाच्या खर्चाचा कांहीं अंश

व शिक्षकांच्या पगाराचा कांहीं अंश यासाठीं लागणारा पैसा आश्रमानेंच त्याच्यासाठीं निराळा फंड उभारून उत्पन्न करावा. आश्रम ही जबाबदारी घेण्यास तयार नसेल, तर ही जबाबदारी आपल्यावर घेण्याला मी तयार आहें.

४. जलंधर येथील 'कन्यामहाविद्यालया'नें प्रथम कुमारिकांच्या शिक्षणाला सुरुवात केली, व आतां त्यांनीं त्याच संस्थेच्या आश्रयाखालीं विधवागृह सुरू केलें आहे, त्यांत १५ विधवा आहेत. आश्रमानें आपला विस्तार याच्या उलट रीतीनें करण्यास हरकत नाहीं.

पण अशा प्रकारें विस्तार करणें हें आश्रमाच्या ज्या मर्यादा आंखलेल्या आहेत त्यांना अनुसरून होईल काय, हा प्रश्न उत्पन्न होतो. याला माझ्या समजुतीनें 'होय' असें उत्तर देतां येईल. पण इतरांच्या समजुतीनें तें तसें नसलें, तरी या गोष्टीचा समावेश होईल अशा रीतीनें नवीन नियम करणें संस्थेच्या हातचें आहे. माझ्या समजुतीनें तशी आवश्यकता नाहीं. हें कसें तें पहाः—

तारीख २४ जानेवारी सन १८९७ रोजीं भरलेल्या आश्रमाच्या साधारण सभेंत पुढील नियम पसंत झाला.

"आश्रमांतील शिक्षणाचा फायदा घेण्यासाठीं आपल्या ताब्यांतील जीवद्भर्तृका स्त्रियांस किंवा कुमारिकांस पूर्ण खर्च देऊन आश्रमांत ठेवण्याची कोणा पालकाची इच्छा असल्यास, विधवांना मदत करणें हा जो आश्रमाचा मुख्य हेतु त्याला कोणत्याहि रीतीनें बाध येत नसेल, तर त्यांना आश्रमांत घेण्याला हरकत नाहीं."

हा नियम मंडळी कायदेशीर रीतीनें नोंदली जाण्याच्या पूर्वीचा आहे. सन १८९८ च्या ऑक्टोबर महिन्यांत मंडळी नोंदली गेली, त्या वेळचा नियम येणेंप्रमाणें आहे. हा नियम २४ जुलई १८९८ रोजीं भरलेल्या साधारण सभेंत पास झालेला आहेः—

The objects for which the Association is established are:—

(a) To establish and maintain Homes, Schools and other similar institutions for the education and training, moral, literary, scientific, technical and professional of Hindu females generally and specially of Hindu Widows belonging to castes, who cannot by the custom of the caste remarry.

(*b*) **To create and maintain a class of Hindu sisters of charity and mercy.**

पुढें तारीख ११ डिसेंबर १९०२ रोजीं भरलेल्या व्यवस्थापक मंडळीच्या सभेंत ठराव झाला तो येणेंप्रमाणें:—

"आश्रमांतील शिक्षणाचा फायदा घेण्यासाठीं सुवासिनींस अगर कुमारिकांस पूर्ण खर्च देऊन आश्रमांत ठेवण्याची त्यांच्या पालकांची इच्छा असल्यास, आश्रमांत जागा असेल तर त्यांस घेण्यास हरकत नाहीं. परंतु अशा रीतीनें घेतलेल्या मुलींची संख्या आश्रमांतील विद्यार्थिनींच्या संख्येच्या एक तृतीयांशाहून अधिक नसावी, व केव्हांहि जागेच्या अडचणीमुळें विधवा विद्यार्थिनीस शाळेंत घेतां येत नाहीं असा प्रसंग आल्यास सुवासिनी अगर कुमारिका विद्यार्थिनीस काढून विधवा विद्यार्थिनीसाठीं जागा करावी."

स्त्रीशिक्षणासाठीं एकादें मिशन काढून तें हिंदु सिस्टर्सनीं चालविणें व त्यासाठीं आश्रमानेंच एकादा निराळा फंड काढून त्यांतून गांवोगांवीं मुलींच्या शाळा काढणें, हें देखील आश्रमाच्या मर्यादेबाहेर होणार नाहीं. अशी पहिली शाळा अविधवा मुलींसाठीं आश्रमांतच काढावी, असें माझें म्हणणें आहे. आतां वेगळी शाळा काढणें गैरसोईचें व विनाकारण अधिक खर्चाचें असल्यामुळें विधवा व अविधवा यांसाठीं एकच शाळा ठेवण्यास हरकत नाहीं.

६. आतां विधवाशिक्षणासाठीं खटपट करणाऱ्या माणसांनींच हें काम हातीं घेतलें असतां, त्यांचें विधवाशिक्षणाच्या कामाकडे दुर्लक्ष्य होऊन त्या कार्याचा विस्तार व्हावा तितक्या झपाट्यानें होणार नाहीं, असा आक्षेप येईल, व तो कांहीं अंशीं खरा आहे; तथापि दुसऱ्या कार्याचेंहि महत्त्व लक्षांत आणलें व स्त्रियांची एक मोठी शाळा अगदीं स्वतंत्रपणें चालविण्याचें आपल्या सुशिक्षित स्त्रियांना जें शिक्षण मिळणार आहे त्याकडे लक्ष्य दिलें तर पहिल्या कार्यानें दुसऱ्या कार्यासाठीं थोडासा स्वार्थत्याग करण्याला तयार व्हावें असें मला वाटतें. अजून आश्रमांत घेण्याला योग्य अशा कोणत्याहि विधवेचा अर्ज नामंजूर करण्यांत आला नाहीं, व अशा अठरा वर्षांच्या आंतल्या विधवेचा अर्ज नामंजूर करण्याची पाळी, हें

नवीन कार्य हातांत घेतलें तरी पुढेंहि दहापांच वर्षें येणार नाहीं, अशी आश्रमाच्या कार्यकारी माणसांस उमेद आहे.

७. या नवीन कार्यामुळें कांहीं कुमारिकांच्या ब्रह्मचर्याची मर्यादा दोन-तीन वर्षें सहज वाढण्यासारखी आहे. प्रौढ कुमारिकांस निर्धास्तपणें ठेवितां येईल असें स्थळ लोकांच्या पसंतीला उतरण्यासारखें असल्यास, त्याचा फायदा घेणारीं कांहीं मनुष्यें खचित निघतील.

८. या दुसऱ्या कार्यानें आश्रमाला अप्रत्यक्ष रीतीनें बराच फायदा होईल. आश्रमाची संस्था जरी हल्लीं थोडीशी लोकप्रिय झाली आहे, तरी तिच्याविषयींची विश्वसनीय माहिती अजून मोठ्या प्रमाणानें लोकांत पसरली पाहिजे. कुमारिका आश्रमांत येऊं लागल्या, म्हणजे अर्थात् त्यांच्या पालकांमध्यें आश्रमाविषयीं विशेष प्रकारची सहानुभूति उत्पन्न होणार, व त्यांच्या सोयऱ्याधायऱ्यांनीं त्यांच्या वर्तनावर टीका केल्यास ते परस्परच त्यांची समजूत करून देणार. शिवाय या कुमारिकांचीं लग्नें होऊन त्या समाजांत वावरूं लागल्या म्हणजे त्या आश्रमांतल्या मुली म्हणून शेजारी-पाजारी साहजिकच त्यांना आश्रमाविषयीं अनेक प्रश्न करणार. अशा रीतीनें आश्रमाचे अनेक हितचिंतक उत्पन्न होण्याचा संभव आहे.

९. आश्रमाची व्यवस्थापक मंडळी या प्रश्नाचा सहानुभूतिपूर्वक विचार करील, अशी आशा बाळगून पुरें करितों.

पुणें, ३१ जानेवारी १९०७. धोंडो केशव कर्वे.

या सर्क्युलराचा विचार ता. ६ फेब्रुवारी १९०७ रोजीं भरलेल्या कमिटीच्या सभेंत झाला. त्यावर ठराव झाला तो असाः—

" सुवासिनी व कुमारिका विद्यार्थिनींचा प्रश्न रा. कर्वे यांनीं आणिला त्यावर वाटाघाट होऊन हा प्रश्न या संस्थेचा नाहीं, असा ठराव झाला. सदरबद्दल रा. कर्वे यांनीं जरूर वाटल्यास दुसरी संस्था काढावी. "

झालें ! माझ्या आकांक्षांना आश्रम थोडा तरी वाव देईल ही माझी आशा विफल झाली ! वेगानें वहात येणारा पाण्याचा लोंढा एकाद्या उंच बांधाशीं येऊन कांहीं वेळ जरी थबकून राहिला, तरी मागून नेट झाला म्हणजे तो आपणासाठीं वेगळा मार्ग करून त्या वाटेनें वाहूं लागतो. त्याप्रमाणें माझ्या मनोवृत्तींची स्थिति होऊन त्या वेगळा मार्ग शोधूं लागल्या.

## प्रकरण एकुणपन्नासावें

## महिलाविद्यालयाचा जन्म

कुमारिका व सुवासिनी यांच्या शिक्षणासाठीं आश्रम आणखी कांहीं-एक करूं इच्छित नाहीं ही गोष्ट ठरल्यानंतर मी मोठ्या अडचणींत पडलों. आश्रमासारखी जेथली राहणी आहे व जेथें बेताच्या खर्चात शिक्षण होऊं शकेल, अशा शाळेंत आपल्या मुलींना शिक्षण देण्याची इच्छा लोकांमध्यें वाढत्या प्रमाणावर दिसून येत असतां तिचा फायदा घेतां येऊं नये, या गोष्टीचें मला अतिशय वाईट वाटे. सामान्यतः स्त्री शिक्षणासंबंधानें व कुमारिकांच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविण्यासंबंधानें माझ्या मनोवृत्ति दिवसेंदिवस अधिकाधिक प्रबल होत चालल्या होत्या. दक्षिणी नव्हे अशा एका थोर मनाच्या हिंदु गृहस्थाला ब्रह्मचर्यफंडाला मदत करण्यासंबंधानें मीं यापूर्वी बरेच महिने विनंति केली होती. ब्रह्मचर्यफंडाची कल्पना येणेंप्रमाणें आहेः—

'वीस वर्षांचें वय होईपर्यंत मुलीचें लग्न करणार नाहीं, व मुलीचें शिक्षण आमच्या देखरेखीखालीं चालवीन, असें गरीब मुलीच्या पालकानें कबूल करावयाचें, व आम्ही सोळासतरा वर्षांचें वय होईपर्यंत मुलीचें शिक्षण चालवून पुढें ती होतकरू दिसली, व आणखी शिकण्याची तिला हौस असली, तर तिला अधिक शिकूं द्यावयाचें, नाहीं तर तिला लग्नाची परवानगी द्यावयाची.'

कांहीं कुमारिकांना चांगलें शिक्षण मिळून प्रौढ वयांत त्यांचे विवाह झाल्याचीं उदाहरणें समाजांत घडवूत आणावीं, हा ब्रह्मचर्यफंडाचा हेतु आहे. हा हेतु त्या गृहस्थांना पसंत पडून त्यांनीं ब्रह्मचर्यफंडाला दरमहा २५ रुपयेप्रमाणें मदत देण्याचें कबूल करून ती मदत त्यांनीं सातआठ वर्षें दिली, व नंतर दुसऱ्या एका अधिक जरूरीच्या कार्याला ती द्यावयाला सांपडावी म्हणून तीन वर्षांपूर्वी ती बंद करण्यांत आली. त्या मदतीनें मला बरीच उमेद वाटूं लागली होती. आश्रम या कामीं अगदीं उदासीन राहणार नाहीं. असें वाटल्यावरूनच तो प्रश्न मीं कमेटींत आणला होता. तेथें निराशा झाल्यामुळें दुसरी संस्था काढण्यावांचून गतिच नाहींशी झाली;

पण आश्रमाच्या संस्थेचें बरेंचसें ओझें शिरावर असतां दुसऱ्या संस्थेचें ओझें अंगावर घेणें सोपें काम नव्हतें. बरें, तयार झालेल्या लोकमताचा फायदा न घेणें म्हणजे पुढें पाऊल टाकण्याला प्राप्त झालेली उत्कृष्ट संधि घालविणें होय, असें मला वारंवार वाटे. उलट पक्षीं आश्रमाच्या धर्तीवर अशा विद्यार्थिनींसाठीं निराळी शाळा काढण्याचा विचार मनांत आला, म्हणजे अवर्णनीय जबाबदारी मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभी राहून छाती दडपून जाई. अशा विचारांच्या व मनोवृत्तीच्या झटापटींत कांहीं काळ जाऊन अखेरीला, काय होईल तें होवो, या कामीं उडी घ्यावयाची, असा मनाचा धडा केला, आणि केवळ स्वतःच्या जबाबदारीवर तारीख ४ मार्च १९०७ रोजीं रंगपंचमीच्या दिवशीं, लकडी पुलाजवळच्या डे. ए. सोसायटीच्या ताब्यांतील जुन्या व पडक्या पण प्रशस्त वाड्यांत सहा विद्यार्थिनींनिशीं महिलाविद्यालयाला सुरुवात केली, व ६ मार्च १९०७ च्या दैनिक ज्ञानप्रकाशांत या संस्थेच्या हेतूंबद्दल वगैरे स्पष्टीकरण करण्यासाठीं स्वतःच्या सहीनें एक लेख प्रसिद्ध केला. तो येणेंप्रमाणें:—

"(१) अनाथबालिकाश्रम स्वतंत्रपणें स्थापित झाल्यापासून आज आठ वर्षें मला जो अनुभव आला आहे, त्यावरून असें वाटतें, कीं, खुद्द आश्रमांत किंवा आश्रमाच्या धर्तीवर चालविलेल्या दुसऱ्या एकाद्या शाळेंत मुलींचें शिक्षण बेताच्या खर्चानें होण्यासारखें असेल, तर बरेच लोक आपल्या अविवाहित अगर विवाहित मुलीस अशा शाळेंत ठेवून शिक्षण देण्यास तयार होतील. हल्लीं आश्रमांत अशा प्रकारच्या १९ विद्यार्थिनी आहेत. असल्या येतील तितक्या मुली आश्रमांत घेतां आल्या असत्या, तर त्यांच्या शिक्षणाकरितां अशी निराळी शाळा काढण्याची अवश्यकता राहिली नसती; परंतु अनाथबालिकाश्रमाची कर्तव्यमर्यादा विस्तृत करणें इष्ट नसल्यामुळें अशा विद्यार्थिनींच्या कित्येक अर्जास नकाराचा जबाब द्यावा लागतो. अर्थात्, कित्येक पालकांच्या मनांत असूनहि त्यांच्या मुलींना अशा प्रकारच्या शाळेचा फायदा मिळूं शकत नाहीं. ही अडचण दूर करावी या हेतूनें महिलाविद्यालयाची सुरुवात करण्यांत आली आहे.

"(२) आज डोळ्यांपुढें असलेले महिलाविद्यालयाचे उद्देश येणें-प्रमाणें आहेत:—

(अ) गृहिणीपदाचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या ज्याच्या योगानें मनावर पूर्णपणें ठसतील, व ज्याच्या योगानें समाजविषयक कर्तव्यांविषयीं चांगली ओळख होऊं शकेल असें शिक्षण देऊन आपल्या समाजांत कांहीं सुशिक्षित स्त्रिया तयार करण्याचा यत्न करणें.

(ब) मुलांप्रमाणेंच मुलींच्याहि ब्रह्मचर्यव्रताची मुदत आठ वर्षांच्या वयानंतर पुढें बारा वर्षांची व्हावी, व त्यांच्या विवाहकालाची मर्यादा वीस वर्षांवर यावी, हें अंतिम साध्य शक्य होण्यासाठीं यत्न करणें.

"(३) पहिला उद्देश साधण्यासाठीं शिक्षण द्यावयाचें तें कोणतीहि परीक्षा अगर सरकारी शाळांतील इयत्ता साध्य ठरवूनच न देतां व्यवहारांतील बऱ्याच गोष्टींची सामान्य माहिती होईल अशा प्रकारचें दिलें जाईल. परंतु पहिलीं चारपांच वर्षें हें शिक्षण झाल्यानंतर पुढें आणखी चारपांच वर्षें विद्याभ्यासासाठीं मिळूं शकतील अशी ज्या विद्यार्थिनींची स्थिति असेल, त्यांना त्यापुढील काळांत म्याट्रिक्युलेशन अथवा शिक्षकिणीची परीक्षा हें साध्य ठरवून शिक्षण देण्यांत येईल. हौसेनें परोपकारांतच आपला जन्म घालवावा असें कोणाला वाटल्यास अथवा संसारांत पडल्यावरहि द्रव्याच्या बाजूनें मदत मिळविणें जरूर झाल्यास परीक्षेचें साधन फार उपयोगी पडतें. सध्या पांचचार विद्यार्थिनी व एक शिक्षक यांनींच शक्य तेवढें करावयाचें आहे; परंतु विद्यालयाचा विस्तार होऊन द्रव्याचें साधन शक्य झाल्यास इयत्ता ठरविणें त्या प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन यांनीं सुचविलेला नवीन अभ्यासक्रम व रा. ब. चिंतामण विनायक वैद्य यांनीं आपल्या स्त्रीशिक्षणावरील निबंधांत स्त्रियांसाठीं सुचविलेला नवीन अभ्यासक्रम हे लक्षांत घेऊन ठरविण्यांत येतील.

"(४) दुसरा उद्देश अत्यल्प प्रमाणानें तरी फलद्रूप व्हावा, म्हणून कांहीं गरीब परंतु धाडसी लोकांच्या मुलींचें शिक्षण विद्यालयानें आपल्या खर्चानें चालवावें, असें योजिलें आहे. कित्येक गरीब पण कुलीन पालक आपल्या मुलींच्या शिक्षणाचा खर्चाचा भार कोणीं सोसल्यास त्यांना वीस वर्षांचें वय होईपर्यंत शिक्षणासाठीं विद्यालयांत ठेवण्याला तयार होतील. ज्यांना पैसा खर्च करण्याचें सामर्थ्य असतें, त्यांच्या अंगीं मानसिक धैर्याची उणीव असते; पण ज्यांच्या अंगीं मानसिक धैर्य असतें,

त्यांच्याजवळ द्रव्याचें बळ नसतें. अशा स्थितींत 'आंधळा माणूस व लंगडा माणूस' या गोष्टींत सांगितल्याप्रमाणें एकमेकांची उणीव एकमेकांनीं भरून काढल्यास मोठें कार्य घडून येऊं शकेल. ज्यांच्या अंगीं या कामीं लागणारें मानसिक धैर्य असेल, त्यांना ही गोष्ट आवडणाऱ्या धनिक गृहस्थांकडून साहाय्य झालें पाहिजे. अशा रीतीनें पुष्कळशा सुशिक्षित स्त्रिया तयार करणें सध्याच्या काळीं अतिशय महत्त्वाचें व जरूरीचें आहे. हें काम द्रव्याच्या बळानें बरेंच होण्यासारखें आहे. यासाठीं या कामाकरितां एक वेगळा फंड करून त्यांतून कांहीं मुलींचें शिक्षण चालवावें असा हेतु आहे. "वीस वर्षांचें वय पुरें होईपर्यंत आमच्या मुलींचा काळ अध्ययन व अध्यापन यांत जावा, या हेतूनें आम्हीं आपल्या मुली विद्यालयाच्या स्वाधीन केल्या आहेत. त्यांचा सर्व खर्च विद्यालयानें चालवावा. ही मुदत भरण्यापूर्वी कोणत्याहि कारणानें आम्हीं आमच्या मुलींला काढून नेलें, तर दरमहा पांच रुपयेप्रमाणें त्यांच्यासाठीं विद्यालयानें केलेल्या खर्चाची रक्कम आम्ही भरून देऊं," असा पालकांकडून करार घ्यावयाचा. अशा मुलींची संख्या अर्थात्च फंडावर अवलंबून राहणार.

"विवाहाच्या वयाची मर्यादा साधल्यास दोनतीन वर्षें पुढें ढकलावीं, असें कित्येकांच्या मनांत असतें; परंतु आपल्या हल्लींच्या समाजस्थितींत चौदा वर्षांहून अधिक वयाच्या अविवाहित मुलींना राहण्यास योग्य परिस्थिति नसते. यासाठीं मुलींचीं लग्नें घाईनें कशीं तरी करून घ्यावीं लागतात; परंतु या मर्यादेच्या बाहेर वर्ष दोन वर्षें मुली अविवाहित राहिल्या, तरी त्यांची राहण्याची व विद्याभ्यासाची सोय करून पालकांची ही अडचण दूर करावी, असाहि विद्यालयाचा हेतु आहे.

"(५) विशेषतः मध्यम व गरीब स्थितींतील लोकांना या विद्यालयाचा उपयोग व्हावा म्हणून दरमहा पांच रुपयांत प्रत्येक मुलीचा खर्च भागवावा अशी तजवीज केली आहे. पुस्तकें व कपडे यांसाठीं मात्र पालकांना वेगळा खर्च पडेल. शिक्षकांची वगैरे मदत नसल्यामुळें तूर्त इंग्रजी पहिल्या इयत्तेपुढें ज्यांची मजल गेली नाहीं अशा विद्यार्थिनींना मात्र घेतलें जाईल.

"(६) धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यासंबंधानें अनाथबालिकाश्रमांत सुरू असलेला क्रमच येथेंहि चालू राहील. Liberal Hinduism—म्हणजे उदार हिंदुधर्माचें शिक्षण मिळावें अशी योजना केली आहे. पुढील गोष्टीं-कडे विशेष लक्ष्य पुरविलें जाईलः—

(अ) Plain living and high thinking—साध्या वृत्तीनें राहणें व श्रेष्ठ विचारांचें आणि मनोवृत्तीचें पोषण करणें.

(ब) धर्मौदार्य–भिन्नभिन्न जाति, धर्म व मतें यांच्यासंबंधानें उदार वृत्ति उत्पन्न करणें.

(क) कर्तव्यजागृति–स्वतःचें ओझें निमुटपणें सहन करून दुसऱ्याचेंहि थोडेंफार ओझें उचलण्याची प्रवृत्ति उत्पन्न करणें.

हल्लींच्या आपल्या हीन स्थितींत या गुणांची अत्यंत आवश्यकता आहे.

(ड) मुलीच्या हातून गृहकृत्यें करविणें; दुसऱ्याच्या मदतीवांचून पांच पानांचा साधा स्वयंपाक करतां आल्यावांचून विद्यालयांतील कोण-त्याहि मुलीचें शिक्षण पुरें झालें असें समजलें जाणार नाहीं.

"(७) अशा प्रकारचें विद्यालय शहरापासून दूर असणें फार जरूर आहे; परंतु बरेच लोक त्याचा उपयोग करून घेण्याला तयार आहेत असें अनुभवानें सिद्ध झालें पाहिजे, व त्यासाठीं मोठें द्रव्यबलहि उत्पन्न झालें पाहिजे. या पुढल्या गोष्टी आहेत. येथें एवढें दिग्दर्शन पुरे आहे.

"(८) तूर्त या विद्यालयाचे दोन फंड केले आहेत; एक ब्रह्मचर्य व दुसरा शिक्षण फंड. पहिल्यांतून वीस वर्षांचें वय होईपर्यंत अध्ययन व अध्यापन यांत काळ घालविणाऱ्या मुलींचा खर्च चालवयाचा व दुसऱ्यां-तून शिक्षक व इतर नोकरांचा पगार वगैरे खर्च चालवायाचा. कोणत्याहि फंडाला एका पैपासून जी मदत मिळेल तिचा आभारपूर्वक स्वीकार केला जाईल. करतांना फंडाचा निर्देश केला नसेल, तर ती मदत शिक्षण-फंडाकडे घेतली जाईल. लोकांकडून मिळणाऱ्या मदतीची पोंच दरमहा ज्ञानप्रकाशांतून दिली जाईल.

"(९) या विद्यालयाची हरएक प्रकारची जबाबदारी खालीं सही करणारावर आहे. या संस्थेला आपलें आयुष्य अर्पण करणाऱ्या स्त्रिया मिळाव्या व या संस्थेची सर्व जबाबदारी हळुहळू त्यांजवर सोंपवावी

असा हेतु आहे; परंतु जन्म आणि मरण हीं जशीं प्राणिमात्राच्या तशीच संस्थांच्याहि पाठीला लागलीं आहेत. या सृष्टिनियमाला अनुसरून पूर्णावस्थेला येण्यापूर्वींच या विद्यालयाचा अंत होणार असला, तर त्या प्रसंगीं देण्याघेण्याची सर्व वाट लावून कांहीं शिल्लक राहिल्यास ती अनाथबालिकाश्रमाच्या स्वाधीन केली जाईल.

"(१०) एका कार्याला लोकांकडून भरपूर मदत मिळाल्यानें उत्तेजन येऊन या दुसऱ्या कार्याचा भार शिरावर घेतला आहे. 'सर्वारम्भास्तुंडुलाः प्रस्थमूलाः' या न्यायानें द्रव्याच्या मदतीवांचून एक पाऊलहि टाकतां यावयाचें नाहीं, हें ध्यानीं आणून याहि कार्याला बहुजनसमाज मदत करील अशी आशा आहे.

धोंडो केशव कर्वे.

अशा रीतीनें महिलाविद्यालयाची कल्पना लोकांपुढें ठेवून कार्यसिद्धीसाठीं धिम्मेपणानें यत्न करूं लागलों.

# प्रकरण पन्नासावें

## महिलाविद्यालयाचा पुण्यांतील जीवनक्रम

सुरुवातीच्या दिवशीं विद्यालयांत सहा विद्यार्थिनी होत्या. पैकीं तीन ब्रह्मचर्य फंडांतून पूर्वी आश्रमांत शिकत होत्या त्या, व तीन माझ्या थोर मनाच्या दोघां मित्रांच्या मुली होत्या. या गृहस्थांनीं या नवीन उद्योगाला मदत करण्यासाठीं आपल्या मुलींचा खर्च देऊन त्यांना मुद्दाम विद्यालयांत आणून ठेविलें.

अशा रीतीनें महिलाविद्यालयाची सुरवात होऊन त्याची वाढ होऊं लागली. आरंभीं विद्यालयाची वेगळी शाळा केली, व माझे लहानपणचे गुरुजी श्रीयुत वि. ल. सोमण यांना शिक्षकाचें काम करण्यासाठीं विनंति केली व ते वडूथ हें आपलें राहण्याचें गांव सोडून या कामासाठीं पुण्यांत आले, व पुढें या शाळेंत त्यांची जरूर नाहींशी झाल्यानंतर ते पुण्यालाच राहिले. हे विद्यालयांतील मुलींना इंग्रजीवांचून इतर विषय शिकवीत व इंग्रजी मी शिकवीत असें. घरांतील व्यवस्था माझ्या ज्या मेहुणीनें कष्ट करून आश्रमाच्या आरंभींच्या दिवसांत मदत केली, तिजवरच सोंपविली. आतां आश्रमाला सुरळीत मार्ग लागला होता आणि विद्यालयाला तिच्या निरपेक्ष श्रमांची फार जरूर होती. पहिलीं दोन वर्षें विद्यालयांत काम करून ती परत आश्रमांत आली. तिचीं अलीकडील दोनतीन वर्षें प्रकृतीच्या अस्वास्थ्यांतच गेलीं व अखेर अडीच वर्षांपूर्वी आश्रमांतच तिचा अंत झाला.

आरंभीं विद्यालयाच्या मार्गांत अडचणी फार होत्या. विद्यालयाच्या पहिल्या वार्षिक रिपोर्टांत पुढील मजकूर आहे:—

"आश्रमांत आतां सर्व प्रकारचा जम बसलेला आहे. तेथें आपल्या मुली पाठविण्यास लोक सहज तयार होतात. पण विद्यालयाच्या आरंभींच्या स्थितींत सर्व प्रकारची गैरसोय असणार; तेव्हां येथें मुली पाठविण्यास लोक कचरतील ही गोष्ट लक्षांत आलेली असूनहि पुढें पाऊल टाकण्यांत आलेलें आहे. कालेंकरून आश्रमाच्या सर्व सोयी विद्यालयालाहि प्राप्त होतील या आशेवरच हें धाडस केलें आहे."

विद्यालयांत वर्षअखेर चौदा मुली झाल्या. मुली थोड्या आणि त्या मानानें वर्ग फार अशी स्थिति झाली. विद्यालय पुण्यांत असेल, तोंपर्यंत त्याची विशेष वाढ होणें शक्य नाहीं हें मला दिसत होतें. संधि सांपडेल तेव्हां विद्यालय आश्रमाशेजारीं न्यावें असा माझा निश्चय झाला होता. तेव्हां विद्यालय पुण्यांत असेल तोंपर्यंत तें नुसतें बोर्डिंग म्हणून चालवून मुलींचें शिक्षण त्यांना इतर शाळांत पाठवून करून घ्यावें असा क्रम मी सुरू केला.

१९०९ च्या जानेवारींत प्रसिद्ध झालेल्या विद्यालयाच्या रिपोर्टांत पुढील मजकूर आहे.

" बऱ्याच संकटांतून पार पडून त्याला ( विद्यालयाला ) आतां स्थिरता येण्याची आशा वाटत आहे. गेल्या जून महिन्यांत विद्यालयाची स्थिति अतिशय वाईट झाली होती. वर्गण्यांच्या उत्पन्नांतून दरमहा सुमारें शंभर रुपये खर्च करणें भाग होतें, व विद्यालयाची एकंदर शिल्लक दोनशांहून अधिक नव्हती. विद्यालयाची कल्पना आज नाहीं उद्यां तरी समाजाला मान्य होणार व ही एक अत्युपयोगी संस्था होऊन राहणार अशा दृढ श्रद्धेनेंच या संस्थेला आरंभ झालेला आहे; पण 'दसऱ्याला जगेल तर दिवाळी पाहील,' या म्हणीप्रमाणें विद्यालयाच्या अस्तित्वावरच गदा येते कीं काय, अशी काळजी उत्पन्न झाली होती; पण तिचा लवकरच निरास झाला. या वेळीं कांहीं मित्रांकडून चांगली मदत झाली. मुंबईतील एका बाईना विद्यालयावरील संकटाची बातमी कळल्यामुळें त्यांनीं मोठ्या उत्साहानें मुष्टिफंड गोळा करून सुमारें पावपल्ला तांदूळ जमविले व अल्प देणग्या मिळवून सव्वासात रुपये केले. ही थोडीशी मदत कशी पाठवावी, असा त्यांना संकोच वाटे. अखेरीस धीर करून ती त्यांनीं पाठवून दिली."

अशा अडचणींतून निघून महिलाविद्यालयाचें पाऊल हळूहळू पुढें पडत चाललें. विद्यालयाची जागा अगदीं भरून जाऊन आणखी मुली घेण्याची सोय नाहींशी झाली. यामुळें विद्यालयाची वाढ थबकून राहिल्यासारखें झालें. विद्यालय शहरापासून दूर नेण्याच्या कल्पनेचा जम लवकर बसेना. एक गोष्ट मात्र अत्यंत उत्साहजनक घडली. निष्काम–कर्म–मठाच्या कल्पनेला १९१० च्या अखेर मूर्त स्वरूप येऊन चार वर्षे महिलाविद्या-

लयाची जबाबदारी जी एकट्या मजवर होती, ती आतां निष्काम-कर्म-मठानें आपणाकडे घेतली. महिलाविद्यालयाच्या पुढील प्रगतींत निष्काम-कर्म-मठाच्या दोघां सेवक मित्रांकडून मोठें साहाय्य झालें. हे दोघे गृहस्थ म्हणजे श्रीयुत महादेव केशव गाडगीळ व बाळाजी विनायक कौलगेकर हे होत. पहिले गृहस्थ बी. ए. असून चाळिशीच्या सुमाराचे आहेत. बडोद्यांत मोठ्या हुद्द्यावर असलेले प. वा. ज. स. गाडगीळ यांचे हे पुतणे व इंदुप्रकाशाशीं संबंध असलेले प. वा. केशवशास्त्री गाडगीळ यांचे चिरंजीव. यांना मुलगा नसून दोन मुली आहेत. वडील मुलगी संसारांत पडलेली असून दुसरी लहान आहे, व ती अजून शिकत आहे; ती इंग्रजी सातव्या इयत्तेंत आहे. यांना पूर्वी बडोदें संस्थानांत नोकरी होती. तिचा राजिनामा देऊन अशा कामीं मदत करण्याकरितां ते कुटुंबासह इकडे आले. दुसरे गृहस्थ मॅट्रिक्युलेशनची परीक्षा झालेले असून पन्नाशीच्या सुमाराचे आहेत. हे सातारा जिल्ह्यांतील एका गांवीं आपल्या जमीनजुमल्याची व्यवस्था पहात असत. यांनीं प्रौढ वयांत स्वतःच्या परिश्रमानें शिक्षण मिळविलें होतें, व देशोद्धाराची तळमळ यांना लहानपणापासून असल्यामुळें यांनीं अनेक धडपडी केल्या होत्या. असल्या हेतूनेंच ते शेतकींत पडले होते. यांनाहि मुलगा नसून दोन मुलीच आहेत. त्यांना शिकविण्यासाठीं यांची तळमळ सुरू झाली, व त्यांनीं एकदोन वर्षें माझ्याशीं पत्रव्यवहार चालविला. हे दोघेहि गृहस्थ यांचीं बेताच्या जबाबदारीचीं आटोपशीर कुटुंबें असल्यामुळें या कामीं फार उपयोगीं पडतील असें जाणून त्यांना सकुटुंब या कार्याला वाहून घेण्याविषयीं विनंति केली व ती त्यांनीं मान्य केली. विद्यालयाला आज जें स्वरूप आलेलें दिसत आहे, त्याचें बहुतेक श्रेय या उभयतांना आहे.

१९११ च्या जानेवारींत प्रसिद्ध झालेल्या विद्यालयाच्या चवथ्या रिपोर्टांत पुढील विचार आहेतः—

" महिलाविद्यालय ही संस्था अजून फार लहान आहे खरी, तरी तिची योग्य प्रकारची जोपासना झाल्यास तिजमध्यें प्रचंड शक्ति उत्पन्न होऊं शकेल, असें बीज तिच्यांत आहे. हिंदी समाजांत फार मोठें स्थित्यंतर होत आहे—किंबहुना त्याचा पुनर्जन्म होत आहे—असें म्हटलें तरी चालेल. या

महत्कार्यांत या संस्थेकडून बराच मोठा कार्यभाग व्हावयाचा आहे, हें भविष्य तिच्या चालकांच्या लक्षांत आलेलें आहे, व परमेश्वरकृपेनें तें खरें ठरेल असा भरंवसा त्यांना वाटत आहे. या संस्थेचीं सूत्रें निष्काम-कर्म-मठाच्या स्वाधीन होणें ही ईश्वरी योजनेंतलीच एक पायरी आहे. या व असल्या संस्थांच्या उपयोगीं पडण्याची आपली बुद्धि कायम रहावी एवढेंच मठाच्या सेवकसेविकांचें जगच्चालकाजवळ मागणें आहे."

वरील विचार रिपोर्टांत नमूद झाले, त्या वेळीं विद्यालय पुण्यांत असून तें धुळींत खेळणाऱ्या मुलाप्रमाणें अगदीं साधें व लहान होतें. तें आश्रमा-जवळ जाण्याचा त्या वेळीं कांहींएक संभव दिसत नव्हता. आश्रमाशेजारीं तें न्यावें अशी इच्छा मात्र उत्कट होती, पण ती तडीला जाण्याला मार्ग दिसेना.

# प्रकरण एकावन्नावें

## आश्रमाच्या शेजारीं विद्यालयाची स्थापना

अनाथबालिकाश्रम व महिलाविद्यालय या दोन्ही संस्थांची जबाबदारी मलाच वहावी लागणार हें स्पष्ट दिसत होतें, व उभय संस्थांचा एकजीव होणें हें दोहोंच्याहि हिताचें आहे, अशी माझी ठाम समजूत होती. यामुळें आश्रमाच्या शेजारीं ही संस्था नेण्याला संधि मिळेपर्यंत पुण्यांतच तिची हलुहळू वाढ होईल, अशी खटपट चालविली.

आश्रमाशेजारीं विद्यालय नेण्याची इच्छा पुष्कळ दिवस जागच्या-जागींच राहिली. आश्रमाशेजारच्या जमिनी विकत घेण्याचे यत्न महिला-विद्यालयाची कल्पना निघण्याच्या आधींपासून चालले होते; पण त्यांना यश आलें नव्हतें. यासंबंधानें आम्हांला मोठाच विचार पडला होता, व काय करावें तें सुचेना. इतक्यांत १९११ च्या मार्च महिन्यांत आश्रमा-शेजारची सुमारें पांच एकर जमीन विकत मिळण्याचा सुयोग आला, व भारी किंमत पडली तरी ती देऊन १६५० रुपये खर्च करून जमिनीचीं खरेदीपत्रकें केलीं. या कामीं श्रीयुत के. मो. फडके यांनीं फारच खटपट केली. यांच्या मदतीवांचून हें कार्य तडीला गेलें नसतें.

जमीन हातीं आल्याबरोबर श्रीयुत गाडगीळ, श्रीयुत कौलगेकर व मी या त्रिवर्गाला अतिशय आनंद झाला व आम्ही या जमिनीवर इमारत बांधण्याच्या उद्योगाला लागलों. विद्यालयाची बहुतेक शिल्लक म्हणजे १६५० रुपये जमीन खरेदी घेण्याला लागले. बाकी शिल्लक काय ती पांचचारशें रुपये उरली. इमारत प्रथम पंधरा हजार रुपयांची करावी, असा आमचा बेत होता; पण तेवढ्यांत जुळेना, यामुळें तो अंदाज पंच-वीस हजारांचा झाला. ही रक्कम आणावी कोठून, हा आम्हांला मोठाच विचार पडला. आम्ही सर्व मध्यम स्थितींतलीं माणसें. तथापि, शक्य तें आपण केल्यावांचून गति नाहीं हें पाहून, आपल्या पश्चात् कुटुंबाची तरतूद म्हणून ठेविलेली प्रत्येकीं तीन हजार रुपयांची रक्कम संस्थेला कर्जाऊ द्यावी, असें आम्हीं ठरविलें. याप्रमाणें नऊ हजारांची सोय झाली. बाकीची रक्कम कशी मिळवावी, याचा फारसा विचार न करितां आम्हीं

इमारतीला सुरुवात केली. कोणी कर्ज दिल्यास ठीक नाहीं तर डिबेंचरें काढून रक्कम उभी करावी, असा आमचा विचार होता, आणि त्याप्रमाणें आमचे प्रयत्न चाललेहि होते. इतक्यांत आमची काळजी दूर करणारी अनपेक्षित मदत आम्हांला मिळाली. महिलाविद्यालयासाठीं मुंबईच्या गांधर्वमहाविद्यालयानें एका जलशाचें उत्पन्न देऊं केलें होतें. त्या जलशाचीं तिकिटें खपविण्याची खटपट श्रीयुत गाडगीळ हे करीत होते. त्यांनीं श्री. एन्. ए. वाडिया, बॅरिस्टर यांची गांठ घेतली, व कांहीं तिकिटें घेण्याविषयीं विनंति केली. शिवाय विद्यालयाच्या इमारत फंडाला त्यांजकडून मदत मिळण्याविषयींहि गोष्ट काढली. तेव्हां त्यांनीं विद्यालयाचे रिपोर्ट, इमारतीचा नकाशा व अंदाजपत्रक वगैरे कागद श्रीयुत गाडगीळ यांजकडून मागून घेतले. नंतर सुमारें एक महिन्यानें एन्. एम्. वाडिया धर्मफंडाच्या सेक्रेटरीकडून पत्र आलें कीं, "एन्. एम्. वाडिया यांच्या मातुःश्री, बाई मोटलीबाई, यांचें नांव इमारतीला देत असाल, तर या फंडांतून अंदाजाच्या रकमेचा म्हणजे पंचवीस हजारांचा एक तृतीयांश देणगी देण्याची ट्रस्टींची इच्छा आहे." 'वसुधैव कुटुंबकम्' या वाक्याचा उच्चार अनेकांनीं अनेक वेळां केला असेल; पण तत्त्व आचारांत आणण्याचें महद्भाग्य ज्यांना लाधलें, अशा विभूति या भूतलावर फारच थोड्या निर्माण झाल्या असतील. अशा विभूतींपैकीं एन्. एम्. वाडिया हे गृहस्थ होते. यांनीं आपली सर्व इस्टेट परोपकारासाठीं ठेविली आहे व तिचें दरसालचें तीनचार लाखांचें उत्पन्न, जातिधर्माचा अगर स्थलकालाचा भेद न ठेवतां भूतलावरील विपत्ति कमी व्हावी व ज्ञान वाढावें, या कार्यासाठीं खर्चिले जाण्याची व्यवस्था त्यांनीं करून ठेविली आहे. वाडियाफंडाच्या सेक्रेटरीचें पत्र हातीं आल्याबरोबर आम्हांला अवर्णनीय आनंद झाला. अशा प्रकारच्या आनंदाचे प्रसंग अवघ्या आयुष्यांत फार क्वचित् यावयाचे. आमच्या डोक्यावरचें एक मोठें ओझें खालीं उतरल्याप्रमाणें झालें. मनाच्या स्थितीचा अनुभव आम्ही थोडा वेळ घेतों न घेतों, तोंच आमच्या आनंदांत विरजण पडतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. सेक्रेटरीचें पत्र व ट्रस्टींचा ठराव पुनः वाचतांना एका गोष्टीकडे लक्ष

गेलें. सेक्रेटरीच्या पत्रांत महिलाविद्यालयासाठीं ४१६६८१०८८ चा चेक पाठविला आहे, असें स्पष्ट असून त्यांत दुसरा संबंध नव्हता. पण ट्रस्टींच्या ठरावांत 'महिलाविद्यालय, पुणें' असें शब्द असून पुढें कंसांत Girl Widow School ( बालविधवांची शाळा ) असे शब्द घातले होते. इमारतीसाठीं पंचवीस हजारांचा तृतीयांश द्यावयाचा त्याचा अर्धा भाग असे स्पष्ट शब्द होते. परंतु कांहीं गैरसमज झाला आहे कीं काय, या गोष्टीचा निकाल केल्यावांचून या पैशाचा उपयोग करणें योग्य नव्हतें. अनाथबालिकाश्रमासाठीं या फंडाकडून कांहीं मदत मिळविण्याची खटपट अगोदरपासूनच चालविली होती. तेव्हां ही मदत म्हणजे आश्रमालाच मदत आहे, असा जर त्यांचा समज होत असेल, तर या रकमेचा स्वीकार करावयाचा नाहीं असें लागलेंच मीं ठरविलें, व चेक तसाच ठेवून देऊन श्रीयुत वाडिया यांना पत्र लिहिलें. बहुधा असा गैरसमज झालेला नसावा, असें मला वाटत होतें; कारण श्रीयुत वाडिया यांनीं मला स्वयंस्फूर्तीनें १७ आक्टोबर १९०९ तारखेचें पत्र लिहिलें होतें, त्यांत पुढील वाक्यें आहेत.

**"My attention has been drawn to your good work in the Hindu Widows' Home Association and the Mahila Vidyalaya and I should like, with your assistance to get all the inforamation I can about the conditions and requirements of these institutions."**

या दोन संस्था वेगवेगळ्या आहेत हें त्यांना ठाऊक होतें. पण न जाणों, त्याचा विसर पडून आश्रमाला जी आपणाला मदत करावयाची आहे तीच ही व आतां आपण त्या जबाबदारींतून मोकळे झालों असें जर त्यांना वाटत असलें, तर हा चेक परत करून त्या संस्थेलाच मदत करा असें मी सांगणार होतों. श्रीयुत वाडिया यांजकडून माझ्या पत्राचें कांहींच उत्तर आलें नाहीं, यामुळें मी फार घाबरलों. ही हयगय त्यांजकडून सहज-गत्या झाली होती; परंतु त्यामुळें हा गैरसमज खराच झालेला असावा, अशी मला शंका आली. पुढें जेव्हां दोन महिन्यांनीं श्रीयुत वाडिया हे आपल्या खडकीच्या घरीं रहावयाला आले, तेव्हां श्रीयुत गाडगीळ व मी या उभयतांनीं त्यांची गांठ घेतली, व यासंबंधाचा खुलासा करून घेतला. दोन संस्थांबद्दल आपले मनांत अगदीं घोंटाळा झालेला नसून ही मदत

विद्यालयालाच केलेली आहे, व 'Girl Widow School' हे शब्द चुकीनें पडले आहेत, असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें, तेव्हां आम्हांला धीर आला, व दोन महिने तसाच ठेवलेला चेक वटावून आणला.

आश्रमाशेजारीं महिलाविद्यालय नेण्याला आम्हीं इमारत पुरी होण्याची वाट पाहिली नाहीं. इमारतीचें काम नुकतेंच सुरू झालें होतें, इतक्यांत पुण्यांत प्लेग आला, तेव्हां विद्यालय दुसऱ्या ठिकाणीं न नेतां विद्यालयाच्या जागेंत नवीन इमारतीशेजारीं झोंपड्या बांधून त्यांत आणलें. तेव्हांपासून म्हणजे १९११ च्या डिसेंबर महिन्यापासूनच विद्यालयाची लहानशी शाळा सुरू केली आणि महिलाविद्यालय हें केवळ बोर्डिंग बनलें होतें, तें त्याचें स्वरूप जाऊन त्याला बोर्डिंग शाळेचें स्वरूप आलें, व अशा तऱ्हेनें महिलाविद्यालय हें नांव सार्थ झालें. तेव्हांपासून १९१३ च्या नवंबरपर्यंत विद्यालयाची वेगळी शाळा आश्रमाशेजारीं होती. नंतर आश्रमानें विद्यालयाच्या मुली आपल्या शाळेंत घेण्याबद्दल कांहीं अटींवर परवानगी दिली.

# प्रकरण बावन्नावें

## महिलाविद्यालयाचा विस्तार

खां वटामध्यें झाड खुरटतें त्याप्रमाणें पुण्यांत महिलाविद्यालयाची स्थिति झाली होती. त्याच्या विस्ताराला तेथें वावच नव्हता. विद्यालयाचें रोप आश्रमाशेजारच्या उघड्या जागेंत आणून लावल्याबरोबर तें झपाट्यानें वाढीला लागलें. या तीनचार वर्षांत त्याची वाढ कल्पनेबाहेर झाली आहे.

वाडिया–धर्म–फंडांतून झालेल्या आठ हजारांच्या मदतीनें आम्हांला मोठी उमेद आली. पुढें श्रीयुत गाडगीळ व श्रीयुत कौलगेकर यांच्या खटपटीनें आणखीहि बरीचशी मदत लोकांकडून मिळाली. मुलींची संख्या इतक्यांत पन्नास झाली, व ती आणखी झपाट्यानें वाढणार, असें दिसूं लागल्यामुळें इमारतीचा आणखी भाग वाढविला, व एकंदर खर्चाचें मान चाळीस हजारांच्या वर गेलें. जसजसे अधिक पैसे मिळत गेले, तसतशी अधिक मुलींची सोय करण्यासाठीं अधिक खर्च करण्याला आम्ही प्रवृत्त झालों. ब्यांकेंत बूड आली नसती, तर कर्जाचा बोजा एवढा राहिला नसता. पण साडेचार हजारांची बूड आल्यामुळें सोळा हजार रुपये इमारतीसाठीं कर्ज काढावें लागलें होतें. सदर कर्जापैकीं हल्लीं बारा हजार रुपये देणें आहेत. एका वेळीं आमच्या मनाची स्थिति काय होती, ती १९१२ सालाच्या रिपोर्टातील शेवटल्या पारिग्राफांत दिली आहे. तो पारिग्राफ येणेंप्रमाणें:—

"आभारप्रदर्शन हें केव्हांकेव्हां औपचारिक मानलें जातें, व क्वचित् प्रसंगीं तें तसें असतेंहि. परंतु आमच्या मानसिक स्थितीची कल्पना ज्यांना होईल, त्यांनाच आमची कृतज्ञता किती कळकळीची आहे, हें कळूं शकेल. स्वतःजवळ द्रव्यबल नसतां लोकांकडून मदत मिळेल—निदान जरूर पडल्यास कर्ज तरी मिळेल, या भरंवशावर पंचवीस हजारांचें काम सुरू करण्याची जोखीम शिरावर घेणाऱ्या मनुष्याच्या मनाची स्थिति कशी असेल, याची कल्पना करणें कठिण नाहीं. एकदां एका मित्रानें 'या

कामांत तुम्हांला अपयश आल्यास—अर्थात् कर्जाच्या फेडीचें टुमणें पाठीला लागल्यास—तुम्हीं काय योजना केली आहे ?' असा प्रश्न केला. त्याला आम्हीं एवढेंच उत्तर केलें कीं, "तशा प्रसंगीं दिवाणी तुरुंगांत जाण्याला आम्हीं आपल्या मनाची तयारी करून ठेविली आहे." कोणी झाला तरी दुसरें काय करणार ? पण आमच्या सद्धेतूंकडे लक्ष पुरवून या कार्याच्या हितचिंतकांनीं थोर मनानें फारच थोड्या वेळांत आम्हांला अंतःकरण पोळणाऱ्या भयंकर काळजींतून मुक्त केलें. या त्यांच्या उपकारांची किंमत करतां येणार नाहीं. त्यांची फेड कायावाचामनानें त्या कार्यासाठीं झटण्यानेंच होणार आहे. परमेश्वर करो आणि आम्हांला तशी बुद्धि होवो."

अनाथबालिकाश्रमाच्या प्रगतींत लोकमताचा विरोध ही एक मोठी अडचण होती. तशी विद्यालयाच्या प्रगतीच्या कामीं नव्हती. विद्यालयाच्या कामीं मोठी अडचण द्रव्यसाहाय्यासंबंधाचीच होती. अगदीं प्रारंभीं या कामीं ज्यांनीं मदत केली, त्यांच्या मदतीची खरी किंमत त्यांनीं केलेल्या द्रव्याच्या मदतीच्या अनेकपट आहे. येथें कांहीं स्त्रीपुरुषांच्या मदतीचा उल्लेख करणें जरूर आहे.

विद्यालयाची सुरुवात होऊन एक महिना होतो न होतो, इतक्यांत मेजर कृष्णाजी विष्णु कुकडे, सिव्हिल सर्जन, यांनीं खटपट करून चारशें रुपये जमवून पाठविले, व आणखी कांहीं महिन्यांनीं दोनशें रुपये पाठविले. जवळ कांहीं एक नसतां संस्थेला सुरुवात केली होती. अशा स्थितींत ही मदत आल्यानें मला मोठें उत्तेजन मिळालें. आणखी एका महिन्यानें श्रीमती गंगाबाई गोखले यांजकडून पत्र आलें, तें येणेंप्रमाणें—

"ज्ञानप्रकाशांत महिलाविद्यालयासंबंधानें माहिती आल्यावरून व माझ्या भाच्यानें प्रत्यक्ष पाहून आपला अनुभव कळविल्यावरून अशा संस्थेला मदत करणें जरूरीचें वाटलें. दुर्दैवानें मजवर जो प्रसंग आला आहे, तो टाळतां येण्याचे प्रयत्न ब्रह्मचर्याश्रमांत सुरू आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट होय. तरी अशा एकाद्या विद्यार्थिनीला माझ्या प्रिय पतीच्या नांवानें दरमहा पांच रुपये प्रमाणें शिष्यवृत्ति देण्याचें मनांत आलें आहे. हिला 'विश्वनाथ सदाशिव गोखले शिष्यवृत्ति' म्हणावें. ही सतत चालावी

अशी माझी इच्छा आहे. परंतु तशी तजवीज होईपर्यंत दरसाल आगाऊ साठ रुपये पाठविण्याची व्यवस्था शक्य तितके दिवस केली आहे. ”

स्त्रियांच्या कार्याला या थोर मनाच्या बाईकडून मिळालेल्या प्रोत्साहनानें मला मोठी उमेद आली. यांजकडून अजून मदत होत आहे.

या संस्थेला स्थैर्य आणण्याच्या कामीं एका गरीब विधवेकडून आरंभ झाला, ही गोष्ट विशेष आहे. श्रीमती लक्ष्मीबाई भिडे यांनीं स्वसंरक्षणासाठीं एक हजार रुपयांचा संग्रह करून ठेविला होता. ही रकम त्यांनीं विद्यालयाच्या स्वाधीन केली. यांच्या हयातींत यांना रकमेचें व्याज द्यावयाचें, व त्यांच्या पश्चात् रकम स्थायिक फंडांत घालून व्याजाचा उपयोग एका ब्रह्मचारिणीच्या पोषणाकडे करावयाचा. अशी अट त्यांनीं घालून ठेविली आहे. आपल्याजवळच्या लहानशा पुंजीचाहि उपयोग अशा रीतीनें करणारीं स्त्रीपुरुषें धन्य होत.

या संस्थेचा उपयोग विशेषतः दक्षिणी लोकांना होणारा असून डॉ. टी. सी. खांडवाला हे या संस्थेला जी चांगली मदत करीत आहेत, ती त्यांच्या विशेष थोरपणाची निदर्शक आहे. हे ब्रह्मचर्यफंडासाठीं दरमहा दहा रुपये देत असतात. शिवाय तापीव्हॅली रेल्वेच्या हजार रुपयांचे शेअर या संस्थेला त्यांनीं दिले आहेत. त्यांचें व्याज ‘ कान्तिलाल खांडवाला स्कॉलरशिप ’ या रूपानें ब्रह्मचर्य फंडाच्या एका मुलीसाठीं खर्च होत असतें.

मेजर हंटर स्टीन हे आश्रम, विद्यालय व मठ या तीनही संस्थांचे मोठे उपकर्ते आहेत. आश्रमासाठीं दरसाल पन्नास, विद्यालयासाठीं साठ व एका सेविकेच्या शिक्षणासाठीं १३२ मिळून एकंदर दोनशें बेचाळीस रुपये दरसाल जानेवारीच्या पांच तारखेच्या आंत मला मिळावे, अशी व्यवस्था त्यांनीं करून ठेविली आहे. विद्यालय सुरू होऊन एक वर्ष होतें न होतें तोंच तें पहावयाला ते आले व त्यांच्या मनांत आलेले विचार त्यांनीं तारीख १४ मार्च १९०८ च्या टाईम्स ऑफ इंडियाच्या अंकांत प्रसिद्ध केले. ही संस्था एक वर्षाची असतां ती प्रत्यक्ष पाहून तिच्या मुद्रेवरून त्यांनीं हिजबद्दल वर्तविलेलें भविष्य त्या पत्रांतील एका वाक्यांत आहे. तें वाक्य असें:—

" In a small house in Narayan Peth, Poona City, not far from Lakadi Pool is to be found the tiny beginning at least on this side of India, of what will one day prove the social regeneration of the country. "

हें भविष्य खरें ठरो वा न ठरो, पण या संस्थेची प्रगति अत्यंत आश्चर्य वाटण्यासारखी झाली आहे, यांत संशय नाहीं. हें पत्र वाचून लेडी म्यूर म्याकेंझी यांनीं या चिमुकल्या संस्थेला भेट दिली, व पन्नास रुपयांची देणगी पाठविली.

श्रीयुत सीताराम नारायण पंडित हे आरंभापासून दरसाल सुमारें शंभर रुपये मदत पाठवीत आहेत. सर भालचंद्र यांनीं आजाऱ्यांच्या खोलीसाठीं प. वा. लेडी भाटवडेकर यांच्या स्मरणार्थ एक हजार रुपये दिलेले आहेत. श्रीयुत रामदास कृष्ण नायडू यांनीं आपल्या मातुःश्रीच्या स्मरणार्थ एन्डाउमेंट फंडाला एक हजार रुपये देऊन त्याच्या व्याजांतून ब्रह्मचर्यफंडाची अर्धी स्कॉलरशिप जातिधर्माचा विचार न करितां देण्यासाठीं पाठविले. एका हितचिंतकानें दोन हजार रुपये पाकशास्त्राच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठीं प. वा. बाबाजी गणेश देशपांडे यांच्या स्मरणार्थ पाठविले आहेत. प. वा. जयराम भाऊ ठाकूर यांच्या ट्रस्टींनीं १६०० रुपये दिले आहेत; पैकीं एका खोलीसाठीं एक हजार व लहानशी एक स्कॉलरशिप देण्यासाठीं सहाशें. कोणी मागावयाला गेलें नसतां स्वयंस्फूर्तीनें केलेल्या मदतीचा परिणाम संस्थेच्या चालकांवर फार होतो. मुंबईचे श्रीयुत जनार्दन राघोबा यांनीं आमच्या ध्यानीमनींहि नसतां विद्यालयासाठीं पांचशें व मठासाठीं पांचशें असे एक हजार रुपये पाठवून दिले. कांहीं स्कॉलरशिपा व हजाराहून कमी अशा बऱ्याच देणग्या मिळाल्या आहेत.

प. वाः नामदार गोपाळराव गोखले यांचें महिलाविद्यालयावर विशेष प्रेम होतें. १९०७ च्या मार्च महिन्याच्या आरंभीं सदर संस्था सुरू केल्याबद्दलचा ज्ञानप्रकाशांतील लेख वाचल्याबरोबर यांनीं मला कलकत्याहून मुद्दाम विशेष अभिनंदनपर एक पत्र लिहिलें होतें. पुढें गेल्या वर्षीं बॉंबे ब्यांकिंग कंपनींत पैसे बुडाल्यानंतर आयत्या वेळीं इमारतीचे देण्यासाठीं वगैरे पैसे कोठून आणावे, ही आम्हांला मोठी पंचाईत पडली होती. त्या

वेळीं कोणाकडे कर्ज मागावयाला जाण्याचीहि सोय नव्हती. यांच्याजवळ ही गोष्ट काढतांच यांनीं सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटीच्या शिलकेपैकीं पांच हजार रुपये आमच्या स्वाधीन केले, आणि आणखी पाहिजे तरी घेऊन जाण्यास सांगितलें. इतका विश्वास व इतका थोरपणा दुर्मिळ आहे. सदर रक्कम आम्हीं दुसरी तजवीज करून एक वर्षाच्या आंतच परत केली.

एका थोर मनाच्या गृहस्थांनीं केलेल्या अन्य प्रकारच्या मदतीचा उल्लेख या ठिकाणीं करणें जरूर आहे. श्रीयुत नारायण जनार्दन जोशी, सुखवस्तु एंजिनियर, यांनीं केवळ परोपकारबुद्धीनें विद्यालयाची इमारत अथपासून इतीपर्यंत तयार करवून देण्याच्या कामीं कष्टाळूपणानें अत्यंत महत्त्वाची मदत केली. यांच्या इतक्या निरपेक्ष बुद्धीचे व उच्च नैतिक ध्येयांचे गृहस्थ आपल्या समाजांत तरी फार विरळा आहेत.

पुढील कोष्टकावरून विद्यालयाचा विस्तार हळुहळू कसा होत गेला, हें कळून येईलः—

## महिलाविद्यालयाची सात वर्षांतील प्रगति दाखविणारें कोष्टक.

| वर्ष. | विद्यार्थिनींची संख्या | | वर्षांतील वर्गण्यांचें वगैरे उत्पन्न. | | | मुलींच्या पालकांकडून जमा. | | | चालू खर्च. | | | इमारतीवर वगैरे खर्च. | | | वर्षअखेर शिल्लक. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुण्यांतील. | हिंगण्यातील. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. |
| १९०७ | १४ | ० | १५२७ | ८ | ६ | १९९ | ० | ० | १०१५ | ० | ९ | ० | ० | ० | ७११ | ७ | ९ |
| १९०८ | १९ | ० | २२८१ | ४ | १० | ८०४ | २ | ६ | १८१२ | ११ | ७ | ० | ० | ० | २०८४ | ३ | ६ |
| १९०९ | २७ | ० | २०१२ | १४ | ४ | ९३५ | ५ | ३ | २२५७ | १२ | २ | ० | ० | ० | २७७४ | १० | ११ |
| १९१० | २९ | ० | १७१३ | ६ | ११ | ७८६ | १२ | ६ | २०२१ | १५ | ७ | ० | ० | ० | ४२५२ | १४ | ९ |
| १९११ | ८ | २२ | ६८३१ | १२ | १० | १२८८ | १० | ९ | ३१२६ | १ | ४ | ३४६२ | ७ | ० | ५७८४ | १३ | ११ |
| १९१२ | १६ | ४४ | २५०५० | १५ | ९ | १४४७ | १० | ३ | ५२९९ | ५ | २ | २३६२६ | १० | १८ | ३३५७ | ८ | १ |
| १९१३ | १८ | ५७ | ९७३९ | १२ | ३ | ४१०० | ० | ६ | ८९६१ | १ | ११ | ११८१९ | १५ | १० | ८९३४ | ६ | ७ |
| | | | | | | | | | ४४५० बँकबूड | ९ | ८ | | | | कर्ज | | |
| १९१४ | ८ | ९१ | ४४१९ | १ | ० | १०३१९ | १३ | ० | १०४८० | ५ | ९ | ४८९९ | ५ | २ | ८६७५ कर्ज | ३ | ६ |

# प्रकरण त्रेपन्नावें

## महिलाविद्यालयाची खरोखर जरूर आहे काय ?

महिलाविद्यालय सुरू झालें, तेव्हां अशा प्रयत्नांकडे सहानुभूतीनें पहाणारीं कांहीं विचारी मनुष्यें सुद्धां अशा संस्थेची खरोखर जरूर आहे काय, असा प्रश्न सद्भावानें करीत होतीं. त्या वेळीं उत्तर देऊन त्यांच्या मनाचें समाधान झालें नसतें. कित्येक प्रश्न असे असतात कीं, त्यांचीं शाब्दिक उत्तरें मनाला कधीं पटत नाहींत. कांहीं काळ लोटल्यावर प्रत्यक्ष नजरेला पडणारे परिणाम हींच अशा प्रश्नाला उत्तरें होत.

महिलाविद्यालय चालवावयाची कल्पना कित्येकांना फार पसंत पडली, व कांहीं मंडळीकडून प्रोत्साहनपर व मदतीचें आश्वासन देणारीं पत्रें आलीं. कांहीं गृहस्थांना ही शाळा पुण्यांतील मुलींच्या हायस्कुलाशीं स्पर्धा करण्यासाठींच काढली आहे असें वाटलें. एका अत्यंत थोर व उदार गृहस्थांनीं पुढील वाक्यें लिहिलीं:—

"When there is already in Poona a High School for girls with boarding arrangements added, the necessity of starting another Home for unmarried girls near the same town is not apparent. It would be a competitor with the Girls' High School."

या गृहस्थांना माझ्या हेतूंबद्दल शंका वाटली नाहीं; परंतु याचा परिणाम एका चांगल्या संस्थेशीं निष्कारण चढाओढ करणें असा होईल, अशी यांना भीति वाटली. या थोर गृहस्थांनीं पुढें विद्यालयाला चांगली मदत केली.

सरकारानें, संस्थानांनीं, म्युनिसिपालिट्यांनीं वगैरे केलेलीं कामें उपयोगाचीं व अधिक टिकाऊ असतात, यांत शंका नाहीं; परंतु मनुष्याच्या अंगांत जोर भरण्याला जसा त्याला व्यायाम पाहिजे, तसा समाजाच्या अंगांत जोर भरण्याला त्यालाहि व्यायाम पाहिजे. आपल्या गरजा आपण भागविण्यासाठीं धडपड केल्यानें शिक्षण मिळत असतें तें फार मूल्यवान् असतें. महिलाविद्यालयानें स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत स्वावलंबनाचा एक

लहानसा धडा शिकविला आहे. प्रयत्न केला असतां आम्हांला अशा प्रकारच्या संस्था उभारतां येणें शक्य आहे, हें त्यानें सिद्ध केलें आहे.

महिलाविद्यालयाचा एक लहानसा उपयोग असा आहे कीं, कित्येक मुलींचे पालक स्थळें पहातांपहातां अगदीं कंटाळून जातात, व अखेरीला कोठें जमत नाहीं. आतां एवढी मोठी झालेली मुलगी घरीं नेली तर शेजारीपाजारीं आपणाला नांवें ठेवतील. व मुलगीहि निरुद्योगी रहाणार या अडचणींत कित्येक पालक पडत असतात. अशा स्थितींतल्या मुलींना विद्यालय हें एक निर्वेध ठिकाण झालें आहे.

जाणूनबुजून मुलींना प्रौढ वयापर्यंत ठेवून त्यांना शिक्षण द्यावयाचें मग प्रसंगीं योग्य स्थळ न मिळाल्यामुळें मुलींच लग्नाचा योग न आला तरी बेहेत्तर आहे; तसें झाल्यास त्यांनीं स्वावलंबी होऊन समाजकार्याच्या उपयोगी पडावें, अशा धाडसी विचारांनीं उद्युक्त होणाऱ्या गृहस्थांना महिलाविद्यालयाचा केवढा तरी उपयोग होईल, किंबहुना महिलाविद्यालयामुळें असे धाडसी विचार कित्येकांच्या अंतःकरणांत उद्भवतील. याचें एक ठळक उदाहरण कोंकणांत घडून आलें आहे. एका सुखवस्तु गृहस्थाला सहा मुली असून मुलगा नाहीं. सुखवस्तु गृहस्थांना मुलींचें लग्न म्हणजे एक दिव्यच होऊन गेलें आहे. महिलाविद्यालयाची हकीकत वाचल्यानंतर या गृहस्थांच्या मनांत असें आलें कीं, या सहा दिव्यांतून पार पडण्याच्या भरीला न पडतां हे सहा मुलगे आहेत असें समजून त्यांना शिक्षण द्यावें, मग पुढें काय होईल तें होईल ! असें मनांत आणून प्रथम त्यांनीं आपली विधवा मेहुणी आणि वडील मुलगी यांना आणून आश्रमांत ठेविलें. नंतर एका वर्षानें दुसऱ्या मुलीला आणून त्या तिघींना विद्यालयांत ठेविलें आणखी दीड वर्षानें खालच्या दोन मुलींना आणलें. अशा रीतीनें चौघी बहिणी व त्यांची मावशी अशीं विद्यालयाचा उपयोग घेत आहेत.* मनुष्यसमाजाच्या अंगीं राष्ट्रत्व आणण्याला अशीं

* हल्लीं ही मावशी मुंबईस शिक्षकीण आहे. हें कुटुंब आतां वाढलें आहे. आठ बहिणी सर्व अविवाहित असून त्यापैकीं चौघी गृहीतागमा होऊन महिलाविद्यापीठाला जोडलेल्या शाळांतून काम करीत आहेत, पांचवी जी. ए. च्या परीक्षेला बसली आहे व बाकीच्या तिघींचेंही शिक्षण चालू आहे.

घाडसी मनुष्यें कारणीभूत होत असतात. केव्हां केव्हां घाडस फसतेंहि; परंतु राष्ट्रपुरुषाच्या अंगीं जोम येण्याला यशाप्रमाणेंच अपयशाचाहि उपयोग होतो.

विद्याव्यासंगी हिंदी समाजांत एक नवीन घातक प्रकार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अस्तित्वांत येऊं पहात आहेत. सुधारणेच्या नांवाखालीं समाजांत घुसत असलेल्या या प्रकाराबद्दल वेळींच कानउघाडणी होऊन तो बंद पाडण्याचे नेटाचे प्रयत्न झाले पाहिजेत. या घातक प्रकाराची जाणीव सुधारकांमध्येंहि व्हावी तितकी झाल्याचें दिसून येत नाहीं. हा प्रकार असाः—

तीसचाळीस वर्षांपूर्वी बारांपासून पंधरांपर्यंत वयाचा मुलगा व सातपासून दहापर्यंतच्या वयाची मुलगी यांचे विवाह होत असत. ते एकपरी बरे, पण हल्लीं होत असलेले पंचवीसपासून तीसपर्यंतच्या वयाचे वर व बारापासून पंधरापर्यंतच्या वयाच्या वधू हे विवाह नकोत, असें म्हणण्याची वेळ आली आहे. पहिल्या प्रकारच्या विवाहांत विजोडपणा बिलकूल नाहीं; पण तो दुसऱ्या प्रकारच्या विवाहांत बराच आहे. पहिल्या प्रकारच्या विवाहांत स्त्रीला संतति सतरा वर्षांच्या सुमाराला बहुधा होते; परंतु दुसऱ्या प्रकारच्या विवाहांत स्त्रीला संतति बिजवरांच्या बायकांप्रमाणें बहुधा चवदा-पंधरा वर्षांच्या सुमारानें होते. हल्लीं समाजाला प्राप्त झालेली ही स्थिति माझ्या मतें अत्यंत शोचनीय आहे. मुलाचें लग्नाचें वय पाहिजे तेवढें वाढलें आहे; कारण त्याला धर्माची आडकाठी नाहीं; पण मुलीच्या लग्नाचें वय मात्र कांहीं एका मर्यादेपर्यंत वाढून तेथेंच थबकलें आहे. या मर्यादेच्या पलीकडेहि कांहीं लोक आपल्या मुली ठेवितात, व त्याकरितां त्यांना कोणी अपंक्त करीत नाहीं ही गोष्ट खरी आहे; पण या मर्यादे-पलीकडे आपल्या मुली अविवाहित ठेवण्याचें धैर्य फारच थोड्या लोकांना होतें. याचा परिणाम असा झाला आहे कीं, उभयपक्षीं प्रथम विवाह असतां दहाबारा वर्षांहून अधिक अंतर ज्या वधूवरांच्या वयांत असतें, असे किती तरी विजोड विवाह हल्लीं आपल्या समाजांत दर वर्षी होत आहेत. वधूचें वय जर अठरा वर्षांहून अधिक असेल, तर उभयतांच्या वयांत इतकें अंतर असलें तरी कांहीं बिघडणार नाहीं; परंतु मुलीची पूर्ण वाढ झालेली नसतां उभयतांच्या वयांत इतकें अंतर असणें फार घातक आहे. आतां

कांहीं केलें, तरी पूर्वस्थितीवर जाणें अशक्य आहे. विचारी तरुण विद्यार्थी दिवसेंदिवस कुटुंबपोषणाचें सामर्थ्य अंगीं आल्याशिवाय, म्हणजे पंचविशी व पुष्कळ प्रसंगीं तिशीहि उलटल्याशिवाय लग्न करण्याला तयार होणार नाहींत. अशा तरुणांसाठीं अठरा अगर त्याहून अधिक वयाच्या वधू समाजानें तयार केल्या पाहिजेत. अर्थात् इतक्या वयापर्यंत मुली घरींच अशिक्षित ठेवणें ठीक नाहीं. त्यांनीं शेवटलीं तीनचार वर्षें विद्यालयासारख्या शाळेंत काढिलीं पाहिजेत. ओघाबरोबर वहात जाण्यांत शहाणपणा नाहीं. विचारी मनुष्यें पुढील धोरण पाहून योग्य तो फेरबदल आपला आपण करीत असतात. विद्यालयामुळें प्रौढ कुमारिका तयार होण्याला उत्तेजन मिळून या प्रकाराला थोडा तरी आळा बसण्याचा संभव आहे.

स्त्रियांच्या प्रौढ विवाहाला उत्तेजन देणारी एक योजना महिलाविद्यालयानें अगदीं आरंभापासून केली आहे. आठ वर्षांच्या वयानंतर पुढें बारा वर्षें मुलींनीं ब्रह्मचर्यानें रहावें, व नंतर गृहस्थाश्रमांत पडावें, हें तत्त्व विद्यालयानें अगदीं पहिल्या दिवशीं नमूद करून ठेविलें आहे, आणि त्याचीं उदाहरणें घडवून आणण्यासाठीं ब्रह्मचर्यफंडाची योजना करून ठेविली आहे. कित्येक गरीब मनुष्यांच्या होतकरू मुली अल्पवयांत विद्याहीन व निस्तेज मनुष्यांच्या पदरीं पडावयाच्या, त्यांना प्रौढ वयापर्यंत शिक्षण देऊन वर आणून सोडावयाचें, हें कार्य अल्पप्रमाणावर ब्रह्मचर्यफंड करीत आहे. या मुली व स्वयंस्फूर्तीनें पालकांनीं विद्यालयांत आणून ठेविलेल्या प्रौढ मुली यांचा समाज पाहिल्याबरोबर पुष्कळांना आपल्या मुलींनांहि पुष्कळ काळपर्यंत अविवाहित ठेवून अशा प्रकारचें शिक्षण देण्याची स्फूर्ति होते.

मला वाटतें कीं, आपल्या समाजसुधारणेच्या कार्यांत प्रौढ विवाहाला बरेंच वरचें स्थान दिलें पाहिजे. हा प्रश्न एकंदर हिंदी समाजाचा आहे. जीवनार्थ कलहांत हिंदी राष्ट्राला इतर राष्ट्रांशीं टक्कर देणें भाग आहे. गतकालाप्रमाणें उपजीविकेचीं साधनें मिळविण्याचें काम आतां सोपें राहिलें नाहीं. लोकांची राहणी दिवसेंदिवस अत्यंत खर्चाची होत चालली आहे, व मुलांना शिक्षण देऊन संसारक्षम करणें हें काम पुष्कळांना झेंपेनासें होत आहे. अर्थात् अशीं मनुष्यें विवाहपाशांतच पडावयाला कचरणार. म्हणजे

समाजांत पुष्कळसे पुरुष एकाकी राहणार. हा प्रकार आजच दृष्टिगोचर होत आहे, आणि मुलींना योग्य स्थळें मिळत नाहींत, याचें एक मुख्य कारण हें आहे. पुष्कळ स्त्रियांनाहि एकाकी रहावें लागणार, हाच याचा परिणाम होय. सामान्यतः स्त्रीपुरुषांना वैवाहिक स्थितिच योग्य होय, यांत शंका नाहीं. परंतु ज्या परिस्थितींत आपण सांपडलों आहों, तींत ही स्थिति इष्ट असली तरी शक्य नाहीं, असेंच आढळून येईल. अर्थात् या परिस्थितीशीं झगडण्यावांचून अन्य गति उरली नाहीं. या निसर्गप्राप्त स्थितीला तोंड द्यावयाचें असेल, तर विवाहासंबंधानें आपल्या समाजांत रूढ झालेल्या बऱ्याच कल्पना आपणाला विचारपूर्वक सोडून देणें भाग आहे. त्या कल्पना म्हणजे ( १ ) प्रत्येक मुलीचा विवाह झालाच पाहिजे; ( २ ) हा विवाह ऋतुकालापूर्वी झाला पाहिजे; व ( ३ ) तो आईबापांनीं करून देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. उत्क्रान्तीच्या प्रवाहांत सांपडून आपण ज्या पायरीवर येऊन पोहोंचलों आहों, ती इष्ट आहे असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं वरील कल्पनांचा त्याग करून सावधगिरीनें प्रवाहाच्या दिशेनें पोहत जावें. ज्यांना ही स्थिति अनिष्ट वाटत असेल, त्यांनाही उत्क्रमणप्राप्त म्हणून त्याच मार्गानें गेलें पाहिजे. ते जर प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनें पोहूं लागतील तर लवकरच थकून जाऊन प्रवाहाच्या वेगानें कोठें तरी जाऊन आपटतील, अगर प्रवाहांत गडप होऊन जातील. यासंबधानें मला तर असें वाटतें कीं, मध्यम स्थितींतील आईबापांनीं मुलाप्रमाणेंच मुलींनाहि त्या वीस वर्षांच्या होतपर्यंत शिक्षण द्यावें, व प्रसंग पडल्यास आपलें व दोन मुलांचें पोषण करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं आणून द्यावें व विवाहाचा प्रश्न त्यांचा त्यांजवर सोंपवून त्यांना या कामीं योग्य सल्लामसलत द्यावी. परिस्थितीला योग्य असाच हा विचार आहे व तो दिवसेंदिवस पुष्कळांना ग्राह्य होण्याचा संभव दिसत आहे.

विवाहाचें वयोमान वाढविण्याच्या दृष्टीनें विद्यालयाचा किती उपयोग आहे, हें पुढील कोष्टकावरून कळून येईलः—

## महिलाविद्यालयांतील कुमारिका मुलींची वयवारी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | वर्षांपासून | २० | वर्षेपर्यंत वयाच्या | ... | १५ |
| १३ | ,, | १५ | ,, ... | ... | २५ |
| १० | ,, | १३ | ,, ... | ... | १३ |
| ८ | ,, | १० | ,, ... | ... | ११ |
| | | | एकूण | | ८४ |

या सर्व गोष्टींचा विचार केला असतां मथळ्यांतील प्रश्नाला आज "एकाचश्या काय, पण अशा अनेक महिलाविद्यालयांची जरूरी आपल्या समाजांत उत्पन्न होत आहे,' असें उत्तर देण्याची वेळ आली आहे. पुण्यांतील मुलींच्या हायस्कुलाचें बोर्डिंग गच्च भरून गेलें आहे, व त्या शाळेंत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींच्या अर्जांना नकाराचे जबाब मिळत आहेत. आमच्या विद्यालयांत आज दूरदूरच्या ९१ विद्यार्थिनी आहेत, व आणखी एक वर्षाच्या आंतच विद्यार्थिनींच्या अर्जांना नकाराच जबाब देण्याची पाळी आम्हांवर येईल, असा संभव दिसत आहे; आणि या सर्व गोष्टी दक्षिणी लोकांच्या उपयोगी पडणाऱ्या नव्या बोर्डिंग शाळा निघत असतांहि होत आहेत. गेल्या तीन वर्षांत बडोदें, इंदूर व उमरावती या तीन ठिकाणीं बोर्डिंगांची चांगली सोय झाली आहे. कांहीं प्रमुख शहरांशिवाय मुलींना प्राथमिक शिक्षणाहून अधिक दर्जाचें शिक्षण देण्याच्या सोयी कोठेंहि नाहींत, आणि यामुळें जिल्ह्याच्या शहरीं राहणाऱ्या लोकांनाहि शिक्षणासाठीं खर्च करून मुली दूर पाठवाव्या लागतात. अशा मुलींची संख्या दिवसेंदिवस वाढतच जाणार, आणि असतील तेवढ्या सोयी अपुऱ्या पडणार.

# प्रकरण चौपन्नावें

## प्रौढ मुलांच्या शाळेंत प्रौढ मुलींना शिक्षण देण्यासंबंधानें एक प्रयोग

श्रीमती गोपिकाबाई लेले यांच्या शिक्षणासंबंधानें त्यांचे भ्रतार व त्या या उभयतांनीं फार अडचण सोसली. मी उमरावतीला गेलों असतां तेथें या उभयतांचा परिचय झाला. हीं उभयतां साधल्यास एक वेळ जेवून अगर दोन्ही वेळां सातूच्या पिठावर संतुष्ट राहून शिक्षणांत व्यत्यय न येईल असें करीत. त्या कान्व्हेंटच्या मुळींच्या शाळेंत जात असत. तेथें बराचसा अभ्यास झाल्यावर मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेच्या धोरणानें अभ्यास करण्याचें त्यांनीं ठरविलें, व त्या पुण्याला आमच्या बिन्हाडीं येऊन राहिल्या. दुसरी भाषा संस्कृत घेण्याचें यांच्या मनांत होतें. त्या वेळीं मुलींच्या हायस्कुलांत संस्कृत भाषा शिकविण्याची सोय नव्हती, यामुळें त्या शाळेंत कोणी संस्कृत शिकत नसत. त्या शाळेंत हें वैगुण्य फार दिवस राहिलें असतां तिकडे कोणाची नजर गेली नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट आहे. डॉ. कृष्णाबाई केळवकर, डॉ. काशीबाई नवरंगे, श्रीमती काशीबाई हेरलेकर, श्रीमती गोदूबाई देशपांडे, श्रीमती काशीबाई देवधर व श्रीमती वेणूबाई नामजोशी या सर्व हुषार स्त्रिया मराठी दुसरी भाषा घेऊन मॅट्रिक्युलेशन पास झाल्या. यांपैकीं ज्या पुढें कॉलेजांत गेल्या, त्यांना संस्कृत शिकण्यासाठीं मोठे प्रयास पडले. असो. गोपिकाबाईनीं संस्कृत घेऊनच न्यू इंग्लिश स्कुलांत शिकावयाला जावें असें आम्हीं ठरविलें, व हा बेत तडीलाहि गेला.

यानंतर १९०७ सालीं आश्रमांतील तीन विद्यार्थिनी मॅट्रिक्युलेशनच्या वर्गात आल्या. आश्रमाच्या मोडक्यातोडक्या शाळेंत एप्रिल महिन्यापर्यंत त्यांचें शिक्षण कसेंबसें चाललें होतें. पुढें मे महिन्याच्या सुट्टींत मीं त्यांना पुण्याला नेलें, व न्यू स्कुलांतील इंग्रजी विषय शिकविणाऱ्या लाइफ मेंबर गृहस्थांनीं माझी विनंति मान्य करून त्यांना इंग्लिश शिकविलें, व मीं स्वतः गणित आणि शास्त्रीय विषय शिकविले. या मुली

आमच्या नजरेखालीं राहिल्या, तर या वर्षी त्या परीक्षेला जाऊं शकतील, असें आम्हांला महिन्यासव्वामहिन्याच्या अनुभवावरून वाटूं लागलें. तेव्हां या मुलींना आश्रमांतून काढून न्यू इंग्लिश स्कुलांत घातलें. मी स्वतः त्यांच्या वर्गावर शिक्षक असल्यामुळें व इतर शिक्षकमंडळींचीहि सहानुभूति असल्यामुळें हा प्रयोग यशस्वी होऊन तीन विद्यार्थिनींपैकीं दोघी पास झाल्या.

हा वेळपर्यंत प्रौढ मुलांच्या शाळेंत प्रौढ मुलींना शिक्षण देण्यासंबंधानें अनुभव घेऊन पहावा ही कल्पना मनांत नव्हती. विशेष कारणानें या मुलींचें शिक्षण न्यू इंग्लिश स्कुलांत करून घेतलें इतकेंच. पण पुढें तसा हेतु मनांत धरून तो अनुभव घेण्यांत आला. आश्रमांत इंग्रजी वरच्या इयत्तांचे वर्ग ठेवण्याची आपली इच्छा अस्थानीं आहे; ही गोष्ट माझ्या लक्षांत येऊन चुकली. मराठी पहिल्या इयत्तेपासून इंग्रजी सातव्या इयत्ते-पर्यंत काय त्या ७५ विद्यार्थिनी आश्रमांत होत्या. अर्थात् इंग्रजी वरच्या इयत्तांतून एकाद्या वर्गांत दोनतीन मुली, तर एकाद्यांत मुळींच् नसाव्या, असा प्रकार होता यांत नवल नाहीं. तेव्हां आश्रमांतले वरच्या इयत्तांचे वर्ग बंद करून त्यांतील मुलींना दुसऱ्या शाळेंत घालण्याचें ठरविलें. अर्थात् ज्या विद्यार्थिनींच्या पालकांनीं आपल्या मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था आपली आपण केली, त्यासंबंधानें मजवर कांहीं जबाबदारी नव्हती. पण ज्यांनीं हें काम मजवर सोंपविलें, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था लावणें माझें काम होतें. याशिवाय पुण्यांतील महिलाविद्यालय वाढत चाललें होतें, व मुली थोडया आणि वर्ग फार, अशी स्थिति लवकरच झाली. तेव्हां पुण्यांत महिलाविद्यालयाची शाळा न ठेवितां फक्त बोर्डिंग ठेवावें, व मुलींना शिक्षणासाठीं दुसऱ्या शाळांत पाठवाव्या, असा क्रम सुरू केला. याहि मुलींना कोणत्या शाळेंत पाठवावें, हा प्रश्न उपस्थित झाला.

सहजीं आलेला अनुभव समाधानकारक व उत्तेजन देणारा असल्या-मुळें इंग्रजी शिकणाऱ्या मुलींना न्यू इंग्लिश स्कुलांत घालावें, असें मनांत आलें. हें मनांत येण्याला अनेक कारणें होतीं. एक नवीन अनुभव घेऊन पाहण्यासारखी ही गोष्ट होती व तो अनुभव घेण्याला ही उत्कृष्ट संधि होती. दुसरें मी स्वतः न्यू इंग्लिश स्कुलांत शिक्षक होतों, व शाळेच्या

व्यवस्थेंतहि माझें थोडें अंग होतें; यामुळें या शाळेंत मुलींना घातल्यानें त्यांच्या अभ्यासावर माझी देखरेख विशेष राहणें शक्य होतें, व त्यांच्या अडचणीहि दूर होण्यासारख्या होत्या. तिसरें प्लेगच्या दिवसांत मुलींचें हायस्कुल वर्षांतून तीनचार महिने बंद राहत असे, तसें न्यू इंग्लिश स्कुलाचें नसल्यामुळें मुलींचा अभ्यास प्लेगच्या दिवसांतहि चालू राहत असे. या अनेक कारणांनीं न्यू इंग्लिश स्कुलांतच मुलींना घालण्याचें मीं ठरविलें, व या माझ्या इच्छेला न्यू इंग्लिश स्कुलाच्या व्यवस्थापकांनीं प्रोत्साहन दिल्यामुळें हा अनुभव घेऊन पाहण्याला मला मोठी उमेद आली.

असें करण्याला आणखी एक लहानसें कारण होतें. मुलींना वरच्या वर्गांत चढविणें व मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेला पाठविणें या कामीं मुलींच्या हायस्कुलांत अतिशय कडकपणा करीत; त्यामुळें मुलींचा उत्साहभंग होत असे. मुलींना मुलांपेक्षां थोडें अधिक उत्तेजन द्यावयाचें तें एकी-कडेच राहून वरील दोन गोष्टींत न्यू इंग्लिश स्कुलांत मुलांसंबंधानें जे नियम असत त्यांपेक्षां किती तरी अधिक कडक नियम मुलींच्या हाय-स्कुलांत मुलींसाठीं घातले होते. माझ्या माहितीच्या बऱ्याच विद्यार्थिनींना हा कडकपणा भोंवल्याचें मला माहीत होतें, व त्यांतून या मुली सुटतील तर बरें, असें मला वाटत होतें. न्यू इंग्लिश स्कूलांत मुली जाऊं लागल्या-पासून हा कडकपणा कमी झालाहि. या कडकपणाचीं कांहीं उदाहरणें येणेंप्रमाणें:—पहिल्या वर्षी बहुधा कोणाला परीक्षेला जाऊं द्यावयाचें नाहीं; दुसऱ्या वर्षीही परीक्षेला जाऊं दिलें नाहीं, व तिसऱ्या वर्षी खाजगी रीतीनें जाण्याला मुलीला परवानगी दिली आणि ती पास झाली, अशीं कांहीं उदाहरणें होतीं. एका हुषार व तरतरीत मुलीला आणखी एक वर्ष त्याच इयत्तेत कुचंबत ठेवल्याचें एक ढळढळीत उदाहरण माझ्या माहितीच्या मुलींत घडलें होतें. एक उदाहरण तर पाषाणहृदयाला द्रव आणणारें होतें. प्लेगचें दुसरें अगर तिसरें वर्ष होतें. एक हुषार व सुशील अशी मुलगी हुजूरपागेच्या बोर्डिंगांतच राहत असे. प्लेग सुरू झाल्या-बरोबर सर्व विद्यार्थिनी आपापल्या घरीं गेल्या, त्यांजबरोबर ही देखील आपल्या बापाकडे गेली. शाळा बंद होऊन गेली, व परीक्षेचा फॉर्म मिळण्याच्यासंबंधानें आगाऊ चौकशी करण्याचें भान मुलीला अगर

तिच्या बापाला राहिलें नाहीं. पुढें जेव्हां त्यांनीं लेडी सुपरिंटेंडंट यांना लिहिलें, तेव्हां त्यांनीं 'कोणत्या तरी शाळेच्या प्रिलिमिनरी परीक्षेला बसून तींत पास झाल्याशिवाय फॉर्म मिळणार नाहीं,' असा जबाब दिला. सर्व शाळांच्या प्रिलिमिनरी परीक्षा होऊन गेल्या होत्या, तेव्हां प्रिलिमिनरींत पास होणें शक्य नव्हतें. फॉर्म पाठविण्याला कांहीं दिवस अवकाश होता, तेव्हां मुलीच्या बापानें लेडी सुपरिंटेंडंट यांचीं आर्जवें केलीं; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेरीला फॉर्म पाठविण्याच्या शेवटच्या दिवशीं मुलीच्या बापानें युनिव्हर्सिटीच्या रजिस्ट्रारसाहेबांची गांठ घेतली, व त्यांना झालेला सर्व प्रकार सांगितला. त्यांच्या हातांत काय होतें ? पण त्यांनीं एवढेंच सांगितलें कीं, आम्ही मुलीला परीक्षेसाठीं बसूं देतों. ती पास झाली तरी लेडी सुपरिंटेंडंट यांची अनुमति मिळाल्याशिवाय तिचा निकाल सांगण्यांत येणार नाहीं. ही गोष्ट मान्य होऊन ती परीक्षेला बसली; एवढेंच नव्हे, तर त्या वर्षी परीक्षेला बसलेल्या सर्व स्त्रियांमध्यें पहिला नंबर येऊन चॅटफील्ड प्राइझ तिला मिळालें असतें, इतके मार्क तिला मिळाले. परंतु त्याचा कांहींएक उपयोग न होतां त्या वर्षी त्या मुलीला नापास व्हावें लागलें.

मीं महिलाविद्यालय काढलें, व मुली न्यू इंग्लिश स्कुलांत घातल्या; या दोन्ही कृत्यांत माझा हेतु मुलींच्या हायस्कुलाशीं स्पर्धा करणें व त्याचा दुष्टावा करणें याहून अन्य नव्हता, असें कांहीं गृहस्थांना वाटत होतें व अजूनहि कित्येकांना कदाचित् वाटत असेल. याच सुमाराला या शाळेविरुद्ध ज्ञानप्रकाशांत एक खरमरीत लेख आला होता. हा लेख मींच लिहिला, असा कित्येक गृहस्थांचा समज झाला. एका गृहस्थांनीं तर माझें नांव घेऊन 'यानेंच हा लेख लिहिला असला पाहिजे,' असे उद्गार कांहीं माणसांसमक्ष काढले, व त्यांपैकीं एकानें ती गोष्ट मला कळविली. असे आरोप होऊं लागतपर्यंत मला या लेखाची वार्ताहि नव्हती. या शाळेविषयीं माझें मत महिलाविद्यालय सुरू होण्यापूर्वी जें गुप्त खाजगी पत्र मीं आश्रमाच्या व्यवस्थापक मंडळींच्या सभासदांना लिहिलें, व जें अठेचाळिसाव्या प्रकरणांत दिलें आहे, त्यांत नमूद केलें आहे. या शाळेनें महाराष्ट्रावर अनंत उपकार केले आहेत. आज आम्ही स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत जें

करीत आहों, अगर पुढें करूं, त्या सर्वांचा पाया मुलींचें हायस्कूल होय. त्याचें अभीष्ट चिंतूनहि तसला दुसरा उद्योग मनुष्याला करितां येईल. दुसऱ्या व्यक्तीला अगर संस्थेला खालीं ओढून आपण वर चढण्याचा प्रयत्न जी व्यक्ति अगर संस्था करील, ती फजित झाल्यावांचून कदापि राहणार नाहीं. स्त्रीशिक्षणाच्या कोणत्याहि संस्थेचा मी कधीं शत्रु झालों नाहीं, व होणार नाहीं. मिशनरी लोकांनीं चालविलेल्या शाळासुद्धां मला प्रिय आहेत. मग ज्या शाळेनें महाराष्ट्राचें एवढें कल्याण केलें, तिचा द्वेष मी कशासाठीं करूं? अशी बुद्धि मला कधीं न होवो, ही माझी मनापासून इच्छा आहे.

न्यू इंग्लिश स्कुलानें पांचपंचवीस मुली शाळेंत घेतल्या, तर तेवढ्यानें मुलींच्या हायस्कुलांतील संख्या कमी होऊन हायस्कुलाचें नुकसान होईल, असा भाग मुळींच नाहीं. न्यू स्कुलांत मुली घालण्याला आधीं फारच थोडे लोक तयार होतील. जे थोडे लोक अशा रीतीनें तयार असतील, त्यांच्या मुली न्यू स्कुलांत अवश्य घ्याव्या, असें माझें मत आहे. अशा प्रकारची वरघट पडणें फार कठीण असतें. पडलेली वरघट नाहींशी झाल्यास ती पुनः पाडणें सोपें नाहीं. मुलींच्या हायस्कूलाच्या हितचिंतकांच्या इच्छेवरून नवीन मुली शाळेंत न घेण्याचा नियम न्यू इंग्लिश स्कुलानें केला आहे. गेल्या मार्चांत पूर्वींच्या सर्व मुली परीक्षेला वगैरे जाऊन आतां न्यू इंग्लिश स्कुलांत एकहि मुलगी राहिली नाहीं, ही गोष्ट बरी झाली नाहीं. आतां कोणाहि पालकाला नवीन मुलगी येथें आणून घालण्याला अवघड वाटेल, व शाळेंत घेणाऱ्यांनाहि पुनः नवख्यासारखें वाटूं लागेल. मुलीला इंग्रजी शिक्षण पाहिजे असेल, तर तिला मुलांच्या इंग्रजी शाळेंत पाठवून तें द्यावें, नाहीं तर तिला शिक्षणावांचून ठेवावी, असा प्रसंग पुण्यांत थोडक्याच वर्षांत येईल असा संभव दिसत आहे. स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत लोकांचें पाऊल मोठ्या झपाट्यानें पुढें पडत आहे. मुलींच्या हायस्कुलाच्या बोर्डिंगांत पुरेशी जागा नाहीं म्हणून अर्ज परत करावे लागतातच; पण घरीं राहून शाळेंत जाऊं इच्छिणाऱ्या इंग्रजी शिकणाऱ्या कांहीं मुलींना 'वर्गांत बसावयाला जागा नाहीं, सबब शाळेंत घेतां येत नाहीं,' असा जबाब मिळाल्याचें दोनतीन मुलींच्या पालकांनीं मला सांगितलें आहे. अशा

स्थितींत मुलांच्या शाळेंत मुली पाठविण्याची ज्यांची तयारी असेल, त्यांना तसें करण्याला सवलत देऊन कमी धारिष्टवान् पालकांच्या मुलींसाठीं मुलींच्या हायस्कूलांत जागा राखून ठेवणें इष्ट आहे. अशा व्यवस्थेच्या अभावीं स्त्रीशिक्षणाची नैसर्गिक वाढ खुंटणार आहे.

न्यू इंग्लिश स्कुलांत मुली पाठविण्याची सुरवात १९०८ सालीं केली. त्या वर्षी पांचसहाच मुली होत्या. ही संख्या वाढतवाढत चारपांच वर्षांत वीसपर्यंत गेली. एकंदरींत हा अनुभव फार समाधानकारक झाला. मुलींना बसण्यासाठीं वेगळीं बांकें ठेवणें व मधल्या सुट्टींत वगैरे बसण्यासाठीं त्यांच्याकरितां एक लहानशी वेगळी खोली देणें, यापेक्षां आणखी कांहीं करावयाला नको. पुष्कळसा खर्च करून मुलींना शिक्षणासाठीं परक्या ठिकाणीं पाठविण्यापेक्षां त्यांना आपल्या नजरेखालीं ठेवून मुलांच्या शाळेंत त्यांचें शिक्षण करून घेणें हा मार्ग मला विशेष सोयीचा वाटतो. या कामीं शाळेंतील शिक्षकांची सहानुभूति मात्र पाहिजे. क्वचित् एकाद्या धीराच्या मनुष्यानें आपल्या मुलीला मुलांच्या शाळेंत पाठवून तिचें शिक्षण करून घ्यावें, असा प्रकार घडला आहे. परंतु ही गोष्ट अधिक प्रमाणावर घडली पाहिजे. जिल्ह्याच्या ठिकाणीं मुलांचीं हायस्कुलें आहेत, पण मुलींचीं नाहींत. मध्यम स्थितींतल्या धैर्यवान् मनुष्यांनीं या शाळांचा उपयोग आपल्या मुलींच्या शिक्षणासाठीं करून घेण्याला कचरूं नये.

# प्रकरण पंचावन्नावें

## स्त्रीशिक्षणासंबंधानें कांहीं विचार

तीनचार वर्षांपूर्वी श्रीयुत न. चिं. केळकर यांनीं केसरीसाठीं मी एक लेख लिहावा, अशी इच्छा प्रदर्शित केली. स्त्रीशिक्षणासंबंधानें आपले विचार भिन्न वाचकवर्गापुढें ठेवण्याला ही संधि बरी आहे, असें मनांत येऊन मीं या विषयावरच लेख लिहिला. त्यांतला बराच भाग येथें दिला असतां कधींकधीं स्त्रीशिक्षणाविषयीं मला किती तळमळ वाटत असे, हें दिसून येईल.

"पुणें येथील स्त्रियांच्या हायस्कुलाचा बक्षिससमारंभ नुकताच झाला, त्या वेळीं नामदार प्रो. गोखले यांनीं सदर संस्थेबद्दलच्या लोकमतांत कसकसे फरक होत गेले, याविषयीं निरीक्षण फार मार्मिकपणानें केलें होतें. स्त्रियांच्या हायस्कुलासंबंधानें सुशिक्षित लोकमताची प्रगति व सामान्यतः स्त्रीशिक्षणासंबंधानें बहुजनसमाजाच्या मताची प्रगति, यांमध्यें पुष्कळच साम्य आहे. आरंभीं क्रियायुक्त विरोध, पुढें निष्क्रिय पण तिरस्कारपूर्ण विरोध, त्यापुढें पक्की उदासीनता, व शेवटीं औदासीन्याच्या बाजूला झुकणारी निष्क्रिय सहानुभूति, अशीं क्रमाक्रमानें लोकमताचीं स्थित्यंतरें होत गेलीं आहेत. ही प्रगति इतक्या मंद गतीनें होत आहे कीं, हें मांद्य अगदीं निराशाजनकच नसलें, तरी जवळजवळ तसेंच आहे. स्त्रीशिक्षणाच्या भावी स्थितीचा विचार केला असतांहि आशाजनक असें क्षितिजावर कांहींच दिसत नाहीं. हिंदी, अर्थात् हिंदु मुसलमान वगैरे हिंदवासीयांनीं बनलेल्या स्त्रीसमाजाची निरक्षरता पाहिली, म्हणजे मनुष्य कितीही आशावादी असला तरी तो उदास होऊन जाण्याचा संभव आहे. निद्रित अगर बेशुद्ध अशा स्थितींत असलेल्या हिंदी समाजाच्या डोळ्यांत अंजन कसें पडावें, हा अति बिकट प्रश्न आहे. त्यांतल्यात्यांत पुरुषसमाजाविषयीं काळजी घेणारे, अनेक नांवानीं संबोधिल्या जाणाऱ्या, विचार करूं लागलेल्या, अनेक पक्षांत कांहीं लोक तरी आढळतात; परंतु स्त्रीसमाजाविषयीं कळकळ बाळगणारे फार थोडे, आणि त्यांतहि स्वार्थत्यागयुक्त कृति पहावयाची असल्यास सूक्ष्मदर्शक यंत्राचेंच साहाय्य घेतलें पाहिजे.

" अव्वल इंग्रजींत पितामह दादाभाई नवरोजी, डॉ. भाऊ दाजी, रा. सा. वि. ना. मंडलिक वगैरे मंडळींनीं ' स्टूडंटस् लिटररी व सायंटिफिक सोसायटी ' स्थापन केली, व तिच्या आश्रयाखालीं मुंबईत मराठी व गुजराती मुलींच्या शाळा स्थापन करून स्त्रीशिक्षणाच्या कार्याला आरंभ केला, आणि न्यायमूर्ति रानडे व त्यांचे सहाध्यायी यांनीं कॉलेजांत विद्यार्थी असतां या शाळांतील वर्ग शिकविले. पारशीसमाज व हिंदुसमाज यांमध्यें स्त्रीशिक्षणाच्या कार्याला सुरुवात एकदमच झाली. परंतु पारशीसमाजानें देशकालवर्तमान ओळखलें, व आज त्यांच्यांत साक्षर स्त्रियांचें प्रमाण शेंकडा शंभर आहे म्हटलें तरी चालेल. स्त्रीशिक्षणाला सुरुवात होऊन अर्धें शतक लोटलें, तरी हिंदुसमाजाची काय स्थिति आहे पहा ! त्यानें साक्षर स्त्रियांचें प्रमाण शेंकडा दोनतीनच्यावर जाऊं दिलें नाहीं ! मुसलमानी समाजाविषयीं तर बोलावयासच नको ! मागच्या पन्नास वर्षांच्या प्रगतीवरूनच जर पुढील अजमास करावयाचा असेल, तर हिंदी स्त्रीसमाज साक्षर बनविण्याला शतकें तर पुरीं पडणार नाहींतच, पण तेथपर्यंत तो जिवंत राहिल्यास कित्येक सहस्रें तरी पुरीं पडतील कीं नाहीं, याचीहि वानवाच आहे. आजपर्यंत आम्हीं या बाबतींत प्रयत्न म्हणून केलाच नाहीं. आपोआप जें घडून आलें तें आलें. स्वावलंबनाची कांस न धरितां परावलंबी रहावयाचें हें आपलें ब्रीदच कायम राखावयाचें असल्यास वरील भविष्य वर्तविण्यास कोणी भविष्यवादी नको.

" स्वावलंबनाची कांस धरावयाची म्हणजे जीं साधनें उपलब्ध असतील त्यांचा तिरस्कार करावयाचा, असें मात्र नव्हे. त्या साधनांचा पूर्ण उपयोग करून घेऊन राहिलेलें क्षेत्र स्वावलंबनानें व्यापलें पाहिजे. आतां अशा या साधनांचा अनुक्रमें विचार करूं. पहिलें साधन सरकारी, म्युनिसिपालिटीच्या अगर लोकलबोर्डांच्या शाळा होत. आजपर्यंत या दिशेनें जें काम झालें आहे, तें कृतज्ञताबुद्धीनें कबूल करणें योग्य आहे. परंतु हल्लींच्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक काम सरकारकडून झालें पाहिजे. सरकारी पैशावर दुसऱ्या निकडीच्या मागण्या किती तरी असल्यामुळें स्त्रीशिक्षणाचा प्रश्न नेहमीं बाजूलाच राहणार. तेव्हां सरकाराकडून या बाजूनें फारसें प्रयत्न होण्याची आशा नको. लोकांनीं नव्यानव्या मुलींच्या शाळा काढून

त्या सरकारच्या स्वाधीन करणें शहाणपणाचें होईल; पण एवढें शहाणपण आणावयाचें कोठून ?

"मुलांच्या शिक्षणासंबंधानें सरकारानें बरेंच मोठें काम केलें आहे. त्याचा फायदा मुलींच्या शिक्षणासाठीं करून घेणें हें कार्य शहाण्या व वजनदार लोकांनीं मनावर घेतल्यास बरेंच साधण्यासारखें आहे. पण या कामीं लोकमत तयार झालें पाहिजे. 'केसरी'सारख्या वर्तमानपत्रांनीं हें लोकमत बनविण्याचें काम हातीं घेतलें पाहिजे. सगळ्या रत्नागिरी जिल्ह्यांत मुलींच्या शाळा दहा पंधराहून ( आतां वीसपंचविसांहून ) अधिक नाहींत, व मुलांच्या दीडशांहून कमी नाहींत. ज्या ठिकाणीं मुलींच्या शाळा नाहींत त्या ठिकाणीं मुलांच्या शाळांतच मुली पाठवून त्यांचें शिक्षण करून घ्यावयाचें, या मार्गाचा अवलंब केल्यास स्त्रीशिक्षणाचें पाऊल बरेंच पुढें पडेल. दहा वर्षांच्या आंतील वयाच्या मुलींचें शिक्षण मुलांच्या शाळांत करून घेण्यास कोणतीहि हरकत नाहीं.

"दुसरें साधन मिशनरी लोकांचे प्रयत्न. धर्मप्रसाराच्या इच्छेनें कां होईना, त्यांनीं स्त्रीशिक्षणाच्या कामीं जी मदत केली आहे, तिचें मोल करितां येणार नाहीं. धर्मप्रसाराच्या हेतूनें त्यांच्यांत जें बळ उत्पन्न होत आहे, त्याहून अधिक बळ स्वधर्मरक्षणाच्या हेतूनें आम्हांत उत्पन्न झालें पाहिजे. त्यांच्या शेजारीं आपली शाळा उत्पन्न होऊन सर्व मुली आपल्या शाळेंत येतात, व त्यांच्या शाळेंत जावयाला एकहि मुलगी शिल्लक राहत नाहीं असें होईल, तर तें स्वाभिमानवृत्तीला शोभेल. पण इच्छासामर्थ्यानें प्रचंड कामें घडवून आणणारीं तीं माणसें पडलीं, व दुबळेपणानें निष्क्रिय राहून नुसत्या शिव्याशापांनीं आपणांला धन्य मानून घेणारीं आम्हीं माणसें पडलों. अर्थात् परिणाम व्हावयाचा तोच होतो. एका बाजूनें जोराचें कार्य चालू राहतें; दुसऱ्या बाजूला स्वतः कार्य करण्याचें सामर्थ्य नाहीं; दुसऱ्याच्या स्वार्थी हेतूनें कां होईना, आपलें कार्य झालें तर तें कबूल करण्याइतकी कृतज्ञता अगर मनाचा थोरपणा नाहीं, अशी स्थिति असते. खुद्द पुणें शहर हें आपल्या प्रांतांत मुंबई खेरीजकरून स्त्रीशिक्षणाचें मुख्य स्थान आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या ठिकाणींच मिशनरींनीं चालविलेल्या शाळांतून मागासलेल्या जातींतील किती हिंदू मुली व प्रसंगीं

पांढरपेशा जातींच्याहि मुली शिक्षणाचा फायदा घेत आहेत तें पहावें, म्हणजे या शाळांचा स्त्रीशिक्षणाच्या कामीं केवढा उपयोग होत आहे, हें कळून येईल. सारांश, याहि साधनाचा कृतज्ञताबुद्धीनें घेववेल तितका उपयोग करून घेतला पाहिजे.

" तिसरें साधन सागरांत बिंदु या प्रमाणानें होत असलेले स्वावलंबनाचे प्रयत्न—अर्थात् धनिकांनीं व सामान्य जनांच्या देणग्यांनीं व स्वार्थत्यागी स्त्रीपुरुषांच्या यत्नांनीं चाललेल्या स्त्रियांच्या खाजगी शाळा. हें साधन अधिक प्रमाणानें अस्तित्वांत येण्याला बऱ्याच निस्वार्थ बुद्धीनें प्रेरित झालेल्या स्त्रियांनीं मनावर घेतलें पाहिजे.

" यांतच अंतर्भूत होणारें—अगर जें भिन्न असें चवथें साधन मानलें तरी चालेल तें—अजून अस्तित्वांत यावयाचें आहे. अत्यल्प प्रमाणावर तरी तें अस्तित्वांत आणण्यासाठीं प्रस्तुत लेखकाला बरीच तळमळ लागली आहे. या साधनाचा येथें थोडासा विचार करावयाचा आहे. कोणत्याही कार्यावर निःसीम प्रेम जडल्यावांचून मनुष्याच्या हातून समाधानकारक काम होत नाहीं. हिंदी स्त्रियांमध्यें शिक्षणाचा प्रसार करणें हें अत्यंत पवित्र देशकार्य—धर्मकार्य—आहे, अशी श्रद्धा अंतःकरणांत बाणली पाहिजे. या कार्यासाठीं केलेले विचार, उच्चार हीच परमेश्वराची प्रार्थना—हेंच जन्माचें सार्थक--अशी वृत्ति निदान कित्येकांची तरी बनली पाहिजे, पंधरा कोटि स्त्रियांच्या शिक्षणाच्या महत्कार्याला मीं थोडा तरी हातभार लावीन, असा आत्मविश्वास उत्पन्न झाला पाहिजे. निदान पंधरा निरक्षर स्त्रियांना साक्षर करून या महत्कार्याचा एक कोट्यंश तरी मी आपल्या श्रमानें साध्य करीन व हें घडून आल्यावर, एक लहानसें व्रत तरी माझ्या हातून तडीला गेलें म्हणून मला धन्यता वाटेल, असे विचार रात्रंदिवस मनांत घोळले पाहिजेत. स्त्रीशिक्षणाच्या कार्याची लांबी, रुंदी व खोली वाढविण्याच्या महत्कार्या-साठीं मी आपलें जीवित अर्पण करीन, आणि पडतील ते कष्ट सोशीन, अशी मनाची तयारी पाहिजे. धर्मप्रसारासाठीं बौद्ध भिक्षुणींनीं विहार स्थापून जें कार्य केलें, तें कार्य स्त्रीशिक्षणाच्या प्रसारासाठीं करणाऱ्या परि-व्राजिका उत्पन्न होऊन त्यांनीं आपले विहार बनविले पाहिजेत. त्यांनीं द्रव्याच्या देणग्यांवर आपली सर्व भिस्त टाकतां कामा नये. द्रव्याच्या

देणग्या जरूर पाहिजेत, व त्या यथाकाळीं मिळतीलहि. पण त्या मिळोत किंवा न मिळोत, त्यांचें काम अबाधित चालू राहिलें पाहिजे. द्रव्यभिक्षेची पाश्चात्य तऱ्हा अजून आम्हां पौर्वात्यांच्या अंगवळणीं पडलेली नाहीं; पण पुढें तरी ती अंगवळणी पडली पाहिजे. तथापि तोंपर्यंत थांबतां कामा नये.अर्थात् त्यांनीं धान्यभिक्षेचा अवलंब केला पाहिजे. अशा संन्यासिनी स्त्रियांचे संघ उत्पन्न होतील, तरच स्त्रीशिक्षणाचा प्रश्न सुटण्याची आशा आहे, नाहींतर हें कोडें उलगडणें दूरापास्त आहे.

" हें कल्पनासृष्टींतलें उड्डाण झालें. मूर्तसृष्टींत याचा काय उपयोग ? वरील कल्पना पूर्णत्वानें साध्य होणें जवळजवळ अशक्य कोटींतीलच आहे खरें; तथापि ' तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ' या न्यायानें यत्न करून पहाण्याला कोणती हरकत आहे ? अत्यल्प प्रमाणावर असा यत्न करून पहाण्याचा मोह या लेखकाला पडला आहे. या जन्मांत यश न आल्यास त्याच ध्यासांत राहून हा देह ठेवावा, व कार्यपूर्तीसाठीं पुनः जन्म घेऊन यावें, अशी त्याची इच्छा आहे. ती परमात्म्याच्या कृपेनें सफल होवो."

# प्रकरण छपन्नावें

## निष्काम-कर्म-मठ

### पूर्व इतिहास

ही माझ्या विचारांतील व कार्यक्रमांतील उत्क्रान्तीची शेवटची पायरी होय. आपल्या राष्ट्राच्या उद्धाराचें अत्यंत कठिण काम तडीला नेण्यास स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर काम करणारे पुरुषांचे व स्त्रियांचे संघ शेंकडों किंबहुना हजारों निर्माण झाले पाहिजेत असें मला पुष्कळ वर्षें वाटत आहे, व अलीकडे तर तो माझ्या श्रद्धेचा एक विषय होऊन बसला आहे. या तत्त्वावर काम करणाऱ्या स्त्रियांचा एक संघ निर्माण करावा, ही कल्पना अनिश्चित स्वरूपानें फार वर्षें माझ्या मनांत घोळत आहे. तारीख २४ जानेवारी १८९८ च्या सुधारकांत आश्रमाचा रिपोर्ट प्रसिद्ध केला त्यांत पुढील मजकूर आहे:—

" स्त्रीशिक्षणाचें काम चालविण्याला थोडक्यांत संतुष्ट असणाऱ्या स्त्रियांची फार आवश्यकता आहे. स्त्रीशिक्षणाच्या कामाकडे खर्च करण्याला आमच्या सरकारजवळ पैसे नाहींत, व भरपूर पगारावर स्त्रीशिक्षक नेमून तें काम आपल्या अंगावर घेऊन चालविण्याची आमच्या अंगीं शक्ति नाहीं. तेव्हां पांचसात रुपयांत आपला चरितार्थ चालवून किंवा प्रसंगीं वारांवर आपली उपजीविका करून स्त्रीशिक्षणाच्या कामीं आपला देह झिजविणाऱ्या स्त्रिया उत्पन्न झाल्यावांचून त्या कामांत फारशी प्रगति व्हावयाची नाहीं. अशा प्रकारच्या स्त्रिया उपदेशानें व प्रत्यक्ष उदाहरणानें तयार करण्याची आश्रमाच्या चालकांना फार उमेद आहे. "

नंतर १८९८ च्या ऑक्टोबरांत अनाथबालिकाश्रमाची संस्था कायद्या-प्रमाणें नोंदविण्यांत आली, त्या वेळीं आश्रमाच्या उद्देशांत एक कलम घातलें आहे, तें येणेंप्रमाणें:—

" परोपकाराच्या कामीं आपलें आयुष्य घालवूं इच्छिणाऱ्या हिंदी सेवि-कांचा ( सिस्टर्सचा ) संघ उत्पन्न करून त्याचा खर्च चालविणें. "

पुढें १९०२ सालीं आश्रमासंबंधानें मी एक पत्रक प्रसिद्ध केलें होतें, त्यांत पुढील मजकूर आहे:—

"सारांश, आश्रमांतील विद्यार्थिनींनीं विद्या संपादन करून नीतीनें आपला चरितार्थ चालवावा, एवढाच केवळ आश्रमाचा हेतु नाहीं, तर त्यांनीं तसें करून शिवाय आपल्या देशभगिनींच्या उपयोगीं पडावें, व त्यांच्या उन्नतीला साहाय्य करावें, हा आश्रमाचा हेतु आहे. याशिवाय विद्या संपादन करून द्रव्याची अपेक्षा न करितां, संपादित विद्येचा उपयोग केवळ परोपकारार्थ करणाऱ्या व आश्रमासारख्या संस्था आपल्या सामर्थ्यावर चालविणाऱ्या कांहीं स्त्रिया आश्रमांतून तयार होतील, अशी आश्रमाला फार उमेद आहे."

करवेल तेवढा स्वार्थत्याग हें मठाच्या कल्पनेचें मुख्य अंग आहे. या कल्पनेला अनुसरूनच आश्रमाच्या लाईफमेंबर स्त्रियांचें वेतन निर्वाहाला अवश्य तेवढेंच ठरविलें होतें, व लाइफमेंबरांची घटना मठ या नांवानें नव्हे, पण त्यांत प्रतिबिंबित झालेल्या तत्त्वांवर व्हावी, अशी माझी इच्छा होती.

तारीख ६ मार्च १९०७ च्या ज्ञानप्रकाशांत महिलाविद्यालयाच्या सुरुवातीच्या वेळीं आपल्या सहीनें जो लेख मीं प्रसिद्ध केला, त्यांत पुढील उल्लेख आहे:—

"या संस्थेला आपलें आयुष्य अर्पण करणाऱ्या स्त्रिया मिळाव्या, व या संस्थेची सर्व जबाबदारी हळुहळू त्यांजवर सोंपवावी, असा हेतु आहे."

यावरून असें दिसून येईल कीं, ही कल्पना मधूनमधून माझ्या मनांत येत असे. पुण्यांतल्या व इतर अनेक संस्थांविषयीं विचार मनांत आला म्हणजे ही कल्पना अधिकाधिक दृढ होत जाई. कोणत्याहि संस्थेची वाढ पूर्ण होऊन ती नीटपणें चालण्यास अत्यावश्यक गोष्ट म्हटली म्हणजे ज्या पवित्र हेतूनें व उत्साहानें ती संस्था काढण्यांत आली असेल, तो हेतु व तो उत्साह पूर्णपणें मनांत बिंबून काम करणाऱ्या मनुष्यांची परंपरा उत्पन्न झाली पाहिजे. संस्थेच्या कार्यासाठीं देह झिजविणें हेंच आपलें अंतिम साध्य, हेंच आपल्या जन्माचें सार्थक्य, ही भावना हाडींमासीं खिळली पाहिजे. प. वा. नामदार प्रो. गोखले यांची सर्व्हंटस् ऑफ् इंडिया सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, झनाना मिशन, पंचहौद मिशन, माझ्या

डोळ्यांपुढें असणारें मुंबईचें कॅथीड्रल गर्लस् स्कूल या संस्थांकडे पाहिलें, म्हणजे तेव्हांच दिसून येईल कीं, धार्मिक कार्यांत मनुष्यांची जी कळकळ दिसून येते, तसल्या कळकळीनें प्रेरित झालेल्या कार्यकारी मनुष्यांचा संघ प्रत्येकीच्या पाठीशीं आहे. त्या संस्थांचें कार्य साधणें हें अत्यंत पवित्र कर्तव्य होय, असें त्या मनुष्यांना वाटत आहे, आणि म्हणूनच त्या संस्था लोकादराला पात्र झाल्या आहेत, व त्यांना हें स्वरूप आलें आहे. अशा संस्थांच्या कामीं देखील इतर व्यावहारिक कार्याप्रमाणेंच द्रव्यबलाची जरूर आहे, ही गोष्ट खरी; पण द्रव्यबल त्या संस्थांचें केवळ जडशरीर होय. त्यांचें खरें जीवित त्यांच्या पाठीशीं असणाऱ्या कार्यकारी मनुष्यांमध्यें असतें. दुर्दैवानें अशा कार्यकारी मनुष्यांची आपल्या समाजांत मोठी उणीव आहे. स्त्रियांच्या उन्नतीचें कार्य प्रचंड आहे; त्याच्या शाखाहि अनेक आहेत. हल्लींच्या संस्था शंभरपटीनें वाढल्या, तरी त्या या कार्याला पुऱ्या पडावयाच्या नाहींत. पैशानें संस्था अस्तित्वांत येऊं शकतील, पण त्या योग्य प्रकारें चालविण्याला उच्च मनोवृत्तींचीं मनुष्यें पाहिजेत.

याकरितां पैशासाठीं नव्हे, पण कार्यासाठीं काम करणाऱ्या स्त्रियांचा संघ उत्पन्न झाला पाहिजे. मनुष्यजातीची सेवा परमेश्वराला प्रिय आहे, हा एक परमेश्वरप्राप्तीचा, अध्यात्मिक साधनाचा, मुक्तीचा मार्ग आहे ही कल्पना आज तरी आम्हांला परकी वाटते; निदान ती आमच्या अंगीं बाणावी तशी बाणलेली नाहीं. ही कल्पना आमच्या हाडींमाशीं खिळली पाहिजे. तिच्या प्रेरणेनें हजारों मनुष्यें कार्याला प्रवृत्त होतील, तरच आमच्या तरणोपायाची कांहीं आशा आहे. निष्काम–कर्म–मठाचा मुख्य हेतु हिंदी स्त्रीसमाजाची सेवा करणें, शक्य असल्यास स्वतःच्या हिंमतीवर स्त्रीसमाजाच्या उपयोगीं पडणाऱ्या संस्था चालविणें हा आहे. मठ शब्दानें बराच गैरसमज होण्याचा संभव आहे, व तसा तो झालेलाहि आहे. या शब्दानें ध्वनित होणाऱ्या मनःशुद्धि, वैराग्य, निःस्वार्थता वगैरे पौर्वात्यांच्या कल्पना व 'मिशन' या पाश्चात्य शब्दानें ध्वनित होणाऱ्या शिक्षण, लोकसेवा इत्यादि उपयुक्त कार्यांच्या कल्पना यांच्या समुच्चयाचा निर्देश होण्यासाठीं आम्हीं हें नांव योजिलें आहे. अलीकडे रूढ झालेल्या अर्थानें मठ शब्दाचा उपयोग केलेला नाहीं. 'मठश्छात्रादिनिलयः' असा

मठ शब्दाचा अर्थ एका कोशकारानें दिलेला आहे. आमच्या ह्या मठाचें साध्य अगदीं साधें आणि त्याचे मार्ग अगदीं सरळ, कोणालाहि सहज समजण्यासारखे आहेत. त्यांत गुह्य किंवा गूढ कांहीं नाहीं. आमचे सर्व व्यवहार अगदीं उघडे आहेत, त्यांत गुप्तपणा अगर लपवाछपवी अगदीं नाहीं. आमच्या सर्व सेवकसेविका समाजांत वावरत आहेत, त्यांना एकान्तांत बसून धर्मसाधन करावयाचें नाहीं. समाजसेवा हा आमचा देव आणि अशा सेवेच्या उपयुक्ततेविषयीं खात्री ही आमची श्रद्धा. आमच्या हातून जें थोडें कांहीं घडेल, ती आमची देवापुढें ठेवण्याची भेट. स्वार्थत्याग, साधी राहणी, वगैरे आमच्या श्रद्धेच्या व आमचा सर्व लय तिकडे लागावा याच्या खुणा आहेत. अपयश आणि निराशा यांच्या प्रसंगीं मन समतोल राखण्याला त्यांचा फार उपयोग आहे. ही संस्था केवळ स्त्रियांची असणें अतिशय आवश्यक आहे, ही गोष्ट अगदीं आरंभापासून माझ्या लक्षांत आहे. व त्या धोरणानेंच तिचा क्रम आंखला गेला आहे. मठाचा सर्व भार आपल्या शिरावर घेऊन मठाच्या आश्रयाखालीं असणाऱ्या संस्था आपल्या बळावर चालविणाऱ्या स्त्रिया उत्पन्न होतील तो सुदिन. हा दिवस आमच्या नजरेला पडावा, हेंच आम्हांला पाहिजे आहे. पुरुषसेवक अत्यंत जरूरीपुरते घ्यावयाचे आहेत, व हे सर्व विवाहित व आपल्या पत्नीसह वेगळे आपल्या कुटुंबांत राहणारे असेच असावयाचे आहेत. कर्तबगार स्त्रिया उत्पन्न होऊन त्या अशा संस्था आपल्या आपण अस्तित्वांत आणीपर्यंत आम्हीं स्वस्थ बसणें हें माझ्या मतें आमच्या दूरदर्शीपणाचें लक्षण नव्हे. मीं आपल्या दृष्टीपुढें असाध्य ध्येय ठेविलें आहे, असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण 'आभाळावर रोख धरावा तेव्हां झाडाच्या शेंड्यापर्यंत तरी बाण जाईल,' ही इंग्रजींतली म्हण लक्षांत घेतली पाहिजे.

मठाच्या कल्पनेचें बरेच दिवस चिंतन झाल्यानंतर त्याला मूर्त स्वरूप देण्याच्या यत्नाला मी लागलों. या तत्त्वांनीं प्रेरित झालेली मंडळी मिळाल्यावांचून आश्रम व विद्यालय या संस्था दीर्घायुषी होणें शक्य नाहीं, असें मला वाटूं लागलें. १९०८ च्या नोव्हेंबर महिन्याच्या ४ थ्या तारखेला मुंबईला गिरगांवांतील पोलिस कोर्टाजवळ सेवासदन

होतें, तेथें दोन मनोभूमिकांत या विचारांचें मीं बीजारोपण केलें, व आम्हीं तिघांनीं या नव्या संस्थेला वाहून घेण्याबद्दल परमात्मस्वरूपाचें चिंतन करून प्रतिज्ञा केल्या, आणि तेव्हांपासून या संस्थेचें रोप वाढीला लागलें, असें म्हणण्याला हरकत नाहीं. त्या वेळीं या नव्या संस्थेविषयीं स्पष्ट कल्पना झालेली नव्हती. फक्त अमूक धोरणावर ही संस्था चालवावयाची, एवढेंच ठरलें होतें. आरंभीं मठाला येऊन मिळालेली सर्व मंडळी विद्यार्थिदशेंतील असल्यामुळें ती तयार होऊन काम करूं लागेपर्यंत मठाला दृश्य स्वरूप देणें शक्य नव्हतें. पुढें श्रीयुत बाळाजी विनायक कौलगेकर व श्रीयुत महादेव केशव गाडगीळ हे उभयतां सपत्नीक मठाला येऊन मिळण्याला तयार झाल्यामुळें मठाला लवकरच दृश्य स्वरूप देतां आलें. तारीख ६ डिसेंबर १९१० रोजीं मठाच्या सर्व सेवकसेविकांची सभा महिलाविद्यालयांत होऊन मठाचे नियम वगैरे ठरले. वरील चार मंडळीला एक वर्षाच्या मुदतीनें प्रोबेशनर घेण्यांत आलें, व ती मुदत संपल्यावर त्यांना कायमचे घेण्यांत आलें. आम्ही वेडींवांकडीं व लहानमोठीं मिळून बाराचौदा माणसें आहोंत. पैकीं पुरुष चार असून बाकीच्या स्त्रिया आहेत. चौघांपैकीं तिघांचा उल्लेख झालाच आहे, आणि चवथे गृहस्थ श्रीयुत नारायण महादेव आठवले यांच्या आशेवर मी मठाच्या कामीं पुढें सरसावलों. अनाथबालिकाश्रमाच्या कामावरून महाराष्ट्रीयांना परिचित झालेल्या श्रीमती पार्वतीबाई आठवले यांचे हे चिरंजीव होत. हे वयाच्या आठव्या वर्षापासून पार्वतीबाईच्या व माझ्या सहवासांत आहेत. आश्रमाशीं यांचा अगदीं लहानपणापासून परिचय झालेला आहे, व आश्रम आणि विद्यालय यांजविषयीं यांच्या मनांत आपलेपणा उत्पन्न झालेला आहे. मठाच्या कामीं मला मदत करण्याचें अभिवचन देणारे हेच पहिले होत. मठासंबंधानें ज्या तिघांनीं प्रथम प्रतिज्ञा केल्या, त्यांतले हे एक आहेत. माझ्या पश्चात् माझ्या सर्व संस्थांविषयीं काळजी बाळगून त्यांना दीर्घायु करण्याविषयीं हे आपली शिकस्त करतील, असा मला दृढ विश्वास आहे. हे बी. ए. झालेले असून फर्ग्युसन कॉलेजांत डेमॉन्स्ट्रेटरचें काम करीत आहेत. आणखी एका वर्षानें आपला अभ्यास पुरा करून हे कार्यक्षेत्रांत प्रवेश करतील. सेविकांपैकीं पांचांबद्दल मला बरीच आशा वाटत आहे. श्रीमती सीताबाई जोशी यांचा

पुरुषांच्या ट्रेनिंग कॉलेजांतील दोन वर्षांचा अभ्यासक्रम पुरा झाला असून हल्लीं त्या विद्यालयाच्या बोर्डिंगाच्या लेडी सुपरिंटेंडेंट आहेत. दुसऱ्या बाईचा सदर ट्रेनिंग कॉलेजांतील तीन वर्षांचा अभ्यासक्रम पुरा झाला आहे व त्या हल्लीं इंग्रजी शिकत आहेत. तिसऱ्या बाई प्रीव्हियस परीक्षा पास होऊन ग्रांट मेडिकल कॉलेजांत गेल्या आहेत, चवथ्या प्रीव्हियस पास झाल्या आहेत, व पांचव्या मॅट्रिक्युलेशनच्या वर्गात आहेत. बाकीच्या सेविकांचा उपयोग बुद्धिविषयक शिक्षणासंबंधानें जरी फारसा झाला नाहीं, तरी त्यांची इतर कामांत फार मदत होईल. हीं सर्व मंडळी मठावर आलेल्या अनेक वावटळींतून टिकली आहे, व ती कांहीं वर्षांनीं आश्रम-विद्यालयांच्या उपयोगीं पडूं लागेल, अशी मला मोठी उमेद वाटत आहे.

# प्रकरण सत्तावन्नावें

## निष्काम-कर्म-मठाच्या उत्क्रान्तींतील कांहीं पायऱ्या

स्त्रीशिक्षणासाठीं एकादें मिशन-पुढें याचेंच नांव मठ ठेविलें— काढावें, असे अनिश्चित विचार माझ्या मनांत येत व अगोदरपासून त्याच्या फंडाची तरतूद करावी म्हणून मला एक कल्पना सुचली. माझ्या कल्पना केव्हांकेव्हां मुलांप्रमाणें क्षुल्लक गोष्टींना विशेष महत्त्व देणाऱ्या असतात. जेथें प्रचंड फंड लागावयाचा, तेथें पैशानें आणि अर्ध्या पैशानें काय होणार ? परंतु कधींकधीं माझें लक्ष अशा बारीक गोष्टींकडे जातें. जेव्हां वेळ येईल तेव्हां थोडी तरी शिल्लक असावी, या हेतूनें पोस्टाच्या तिकिटांच्या विक्रीवर रुपायाला एक पैसाप्रमाणें कमिशन मिळत असे, त्या कमिशनचा उपयोग लहानसा फंड जमविण्याच्या कामीं करावा, असें माझ्या मनांत आलें. हिंगण्याला पोस्ट ऑफिस होतें, त्या ऑफिसांतून होणाऱ्या तिकिटांच्या विक्रीवरील कमिशन या कामाकडे देण्याचें पोस्ट मास्तरणीनें कबूल केलें; याला मीं पैसाफंड असें नांव दिलें होतें. तिकिटें खपविण्यासाठीं मी व माझा एक मित्र खटपट करीत असूं. त्या वेळीं एक आण्याचीं पावतीचीं तिकिटें वेगळीं असत. तीं पोस्ट खात्यामार्फतहि विकीत असत. या तिकिटांवर रुपायाला एक आणा कमिशन मिळे. वर उल्लेख केलेले माझे मित्र आपल्या ऑफिसांत लागणारीं तिकिटें दरमहा मजकडून नेत. ज्ञानप्रकाशाच्या मॅनेजरांना रुपयाच्या तिकिटामागें अर्धा पैसा देण्याचें कबूल करून अर्धा पैसा मी या फंडाकडे ठेवीं. अशा रीतीनें हिंगण्याच्या पोस्ट ऑफिसांतून तिकिटें मागवून क्रम चालविला होता तो तिकिटांचें कमिशन बंद झालें तेव्हां थांबला. कमिशनचा वेगळा जमाखर्च ता. १ जानेवारी १९०७ पासून आहे. या पहिल्याच दिवशीं तिकिटांच्या कमिशनपासून झालेल्या उत्पन्नाची जमा ६५ रुपये आहे.*

ता. ४ नवंबर १९०८ रोजीं आम्हीं तीन मनुष्यांनीं जी प्रथम प्रतिज्ञा केली, ती येणेंप्रमाणें:—

" आश्रमाचें, विद्यालयाचें व अशांसारख्या इतर लोकोपयोगी संस्थांचें

---

*अर्थात् ही रकम पूर्वीच्या कित्येक महिन्यांच्या विक्रींतील फायद्याची आहे.

काम करण्यासाठीं जें 'इंडियन लेडीज् मिशन' स्थापावयाचें आहे, त्याकामीं मी आपलें जीवित या विश्वाचा चालक जो परमात्मा त्याला स्मरून अर्पण करीत आहें. माझ्या जीवितावर आतां माझा हक्क नाहीं. त्याचा उपयोग संस्थेनें वाटेल तसा करून घ्यावा. माझ्या व माझ्या स्वतःच्या कुटुंबाच्या खर्चासंबंधानें संस्था जें ठरवील तें मला मान्य आहे."

यानंतर आश्रमाच्या विद्यार्थिनींतून या संस्थेला वाहून घेणारीं मनुष्यें मिळविण्याबद्दल यत्न सुरू झाला. आश्रमाशेजारच्या डोंगरावर या संस्थेला वाहून घेणाऱ्या मंडळीच्या सभा वर्षांतून दोनतीन वेळां कराव्या, व त्याच वेळीं कोणी नवीन मनुष्यें या संस्थेला मिळूं इच्छीत असल्यास त्यांच्या प्रतिज्ञा करून घ्याव्या, असा क्रम चालू झाला. या सभांचा उद्देश सद्‌विचारांनीं एकमेकांच्या निश्चयांना बळकटी आणावी, हा असे. एकदोन वेळां या सभा लेडी सुपरिंटेंडेंट यांच्या परवानगीनें आश्रमांत भरल्या होत्या. या वेळीं संस्थेला वाहिलेल्या माणसांशिवाय दुसरें कोणी हजर नसे. या वेळीं या उद्योगाला येऊन मिळणारीं सर्व मनुष्यें विद्यार्थिदशेंतलींच असल्यामुळें प्रत्यक्ष कामाला आरंभ करणें शक्य नव्हतें. २५ एप्रिल १९०९ नंतर नवीन मनुष्य आम्हांला मिळालें नाहीं. १९१० अखेरपर्यंत आम्हांला येऊन मिळालेल्या मनुष्यांचा उत्साह कमी न होतां त्यांचा निश्चय ढळूं नये, याबद्दल माझी धडपड चालली होती. या वेळीं सुदैवानें श्रीयुत गाडगीळ व कौलगेकर यांची मदत मिळाल्यामुळें मठाला दृश्यस्वरूप देतां येऊन जगापुढें येतां आलें. जेव्हां या उद्योगाला निश्चित स्वरूप दिलें, तेव्हां पूर्वी प्रतिज्ञा करून ज्या विद्यार्थिनी येऊन मिळाल्या होत्या, त्यांच्या परीक्षेची वेळ आली. पूर्वीचें बंधन हें केवळ इच्छाप्रदर्शक होतें. या वेळचें बंधन त्याहून अधिक महत्त्वाचें होतें. आपणाला हें निभणार नाहीं असें ज्यांना वाटलें, अशा कांहीं या वेळीं गळून गेल्या. बाकीच्या आपला निश्चय कायम करून या संस्थेंत दाखल झाल्या. तेव्हां दाखल झालेलीं सर्व मनुष्यें अद्यापपर्यंत संस्थेला धरून राहिलीं आहेत. या वेळीं मठांत दाखल झालेल्या विद्यार्थिनींपैकीं एकहि अठरा वर्षांहून कमी वयाची नव्हती. हल्लीं वयासंबंधाचे नियम स्पष्ट ठरविण्यांत आले आहेत. यांत येऊन दाखल झाल्यानंतर कोणाला सोडणें झाल्यास डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें ज्याप्र-

माणें एक हजार रुपये दंडाची शिक्षा ठरविली आहे, तशी मठानें कोणतीहि अट ठेविली नाहीं.

माझ्या मनाचा ओढा स्वार्थत्याग व वैराग्य यांजकडे विशेष आहे. हे गुण म्हणजे मला साधावे तितके साधलेले आहेत असें नव्हे. परंतु माझ्या मनाची धांव त्या बाजूला आहे. कांहीं स्त्रियांनीं दागिने न घालण्याचा संकल्प करून इतरांना उदाहरण घालून देण्याचा यत्न करावा, व या कामीं होणारी बचत स्वतःचा संसार सुधारण्याच्या अगर सार्वजनिक कार्यांच्या कामीं लागावी यासाठीं कांहीं स्त्रियांचीं मनें वळविण्याचा मीं प्रयत्न केला व महिलाविद्यालयांतील एका विद्यार्थिनीला 'मनोरंजना'-साठीं यासंबंधाचा लेख लिहिण्याला प्रोत्साहन दिलें. त्याचप्रमाणें रेशमी कांठांचीं लुगडीं न नेसतां सुती कांठांचीं नेसलें, तर किती तरी बचत होईल! देशकार्यासाठीं बऱ्याच स्त्रियांनीं अशा व्रतांचा अंगीकार करून त्यापासून होणारी बचत सत्कार्याला लावावी असें मला वाटे. मठाच्या एका सेविकेला या दोन्ही गोष्टी पटल्या, व तिनें त्यांचें ग्रहण केलें. मठाच्या सेवकांनीं ही गोष्ट अंगीकारावी अशी माझी इच्छा होती; परंतु त्यांच्या मनाची तयारी नसल्यामुळें या गोष्टींचा आग्रह करण्यांत आला नाहीं.

निष्काम–कर्म–मठ हें नांव केव्हां सुचलें तें लक्षांत नाहीं; परंतु मठाला संघटित स्वरूप येण्यापूर्वीं त्या विषयींच्या माझ्या कल्पनेचें एक टिपण मला मिळालें आहे; त्यावर तारीख नाहीं. तें येणेंप्रमाणें:—

## "निष्काम-कर्म-मठ"

"कर्म या शब्दानें या ठिकाणीं वर्णाश्रमधर्मांचीं कर्मे समजावयाचीं नव्हत. 'मी, माझी बायको, माझी मुलें' या कल्पना ज्यांत विसरून जातील, अशा प्रकारचीं परोपकाराचीं–समाजोन्नतीचीं कर्मे.

"'कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः' ही आमची श्रद्धा. समाजोन्नतीच्या निःस्वार्थ कर्मांनींच मनुष्याला जीवन्मुक्त होतां येईल, हा आमचा दृढविश्वास. या मठाचे सेवक व सेविका होण्यास कांहीं खडतर व्रतें आचरलीं पाहिजेत. या व्रतांचा अंगीकार करण्याइतकें मनोधैर्य ज्यांच्या अंगीं असेल, त्यांच्या हातींच मठाचें चालकत्व नेहमीं राहिलें पाहिजे. ही एक प्रकारची तपश्चर्या आहे, अशी भावना करूनच या खडतर व्रतांचा

अंगीकार व्हावयास पाहिजे आहे. मठाच्या अंगी प्रचंड सामर्थ्य उत्पन्न झालें पाहिजे. हें खडतर तपश्चर्येवांचून कसें होणार व असें सामर्थ्य उत्पन्न झाल्यावांचून मठ समाजकार्य तें काय करणार ?

"तेव्हां मठाचें अंतःशरीर (मठाचा केवळ आत्मा) ज्या द्रव्याचें बनणार, तें द्रव्य-अर्थात् तीं मनुष्यें-स्वार्थत्यागाच्या भट्टींतून तावून-सुलाखून निघालीं पाहिजेत. त्यांमधलें हीण जळून गेलें पाहिजे. निदान पुनःपुनः आंच देऊन तें नाहींसें करण्याचा यत्न झाला पाहिजे. जीवन्मुक्ति साधणें-जड देहांत राहून कडकडीत वैराग्य व मनोजय यांची प्राप्ति करून घेणें-हें अत्यंत कठिण काम आहे. तें साधण्याचा यत्न करण्याची ज्यांची तयारी असेल-पुनः पुनः आंच लावून घेण्यास ज्यांची हरकत नसेल-तींच मनुष्यें मठाचे सेवकसेविका होण्यास योग्य समजावयाचीं. कित्येक खडतर व्रतांचें आचरण करावें लागेल, हें लक्षांत ठेवूनच त्यांनीं मठाची दीक्षा घ्यावी. अशीं माणसें थोडींच मिळणार, व मिळाल्यानंतरहि त्यांतलीं कांहीं गळून जाणार.

"इतकी मनाची तयारी ज्यांची नसेल, त्यांच्यासाठीं दुसरी पायरी करावयाची आहे. या पायरीवर येऊन येथें स्थिर झाल्यावर त्यांनीं वरच्या पायरीवर जाण्याचा प्रयत्न करावा. या पायरीवरील मनुष्यांनीं देखील बराच स्वार्थत्याग केला पाहिजे. तथापि त्यांच्यासंबंधाचे नियम वरच्या वर्गाइतके कडक असणार नाहींत."

जोंपर्यंत सर्व व्यवहार मानसिक सृष्टींतच चालले होते, तोंपर्यंत या कल्पनेच्या उड्डाणाला कोणताहि प्रतिबंध झाला नाहीं; परंतु जड सृष्टींत वावरूं लागल्यानंतर खडतर तपश्चर्या बाजूला राहून वर निदर्शित केलेल्या दुसऱ्या वर्गाशीं जुळेल असेंच मठाचें धोरण ठेवण्यांत आलें. आडांतच नाहीं, तें पोहऱ्यांत कोठून येणार !

निष्काम--कर्म--मठ अजून देखील जगापुढें आला नसता; परंतु निसर्ग-योजना वेगळी होती. श्रीयुत बाळाजी विनायक कौलगेकर यांना आपल्या मुलींच्या शिक्षणाबद्दल तळमळ लागून ते मला वारंवार पत्रें लिहीत होते. मीं प्रथम त्यांना आश्रमांत शिक्षकाचें काम करून मुलींच्या शिक्षणाची सोय लावण्याला सल्ला दिली. पुढें त्यांना हिंगण्याची हवा मानवेना, व मठाच्या

कल्पना त्यांना पसंत पडल्यामुळें त्यांनीं आश्रमाचें काम सोडून दिलें, आणि ते मठाचे सेवक होऊन त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या हातीं पुण्यांतील विद्यालयाची व्यवस्था देण्यांत आली. श्रीयुत महादेव केशव गाडगीळ यांचा माझा परिचय यांच्याहि अगोदरपासून झाला होता. १९०४ सालीं आश्रमाची इमारत वाढविण्यासाठीं हिंगण्याला आश्रमाच्या इमारतीसमोर कमेटीची सभा झाली, त्या वेळीं हे हजर होते. आपली नौकरी सोडून आश्रमाचें काम करण्याला यावें, असा विचार या वेळीं यांच्या मनांत आला होता, व तो त्या वेळीं त्यांनीं बोलूनहि दाखविला होता. पुढें या गोष्टी तशाच राहून गेल्यानंतर १९१० च्या मे महिन्यांत त्यांची गांठ पडली, तेव्हां मागील विचार कायम आहेत काय म्हणून मीं त्यांना विचारिलें; व मठासंबंधाचे वगैरे माझे विचार त्यांना कळविले. पावसाळ्यानंतर येण्याचें त्यांनीं कबूल केलें. मध्यंतरीं अनेक गोष्टींविषयीं बराच पत्रव्यवहार होऊन कायमच्या येण्यापूर्वी मठासंबंधीं वगैरे गोष्टींची चर्चा करण्यासाठीं त्यांना मुद्दाम पुण्याला बोलाविलें. नंतर मी, श्रीयुत गाडगीळ, श्रीयुत कौलगेकर व मठाला येऊन मिळतील असें वाटलें होतें ते एक चौथे गृहस्थ असे फर्ग्युसन कॉलेजाच्या मागच्या बाजूला फिरावयाला गेलों, व आम्हांमध्यें मठासंबंधीं अनेक प्रश्नांची चर्चा होऊन त्यांनीं मठासाठीं यावें, आणि प्रथम एक वर्षाच्या रजेंत येऊन तेवढी मुदत पगार न घेतां आश्रमांत शिक्षकाचें काम करावें, व सर्व नीट जुळून आल्यानंतर बडोद्याच्या नौकरीचा राजिनामा पाठवावा, असें ठरलें. श्रीयुत गाडगीळ यांचा स्वार्थत्याग दांडगा आहे. त्यांनीं मठावर अगर दुसऱ्या संस्थेवर आपला भार घातलेला नाहीं. या दोन गृहस्थांचें सहकुटुंब साहाय्य मिळाल्यामुळें मठाच्या कल्पनेला लवकर मूर्त स्वरूप मिळालें, व विद्यालयाचेंहि पाऊल जोरानें पुढें पडलें.

आश्रम व विद्यालय या संस्था चालविण्यासाठीं मनुष्यें तयार करणें, हें मठाचें मुख्य ध्येय आहे. पुढील हस्तपत्रक तारीख ४ एप्रिल १९११ च्या केसरी व ज्ञानप्रकाश पत्रांत प्रसिद्ध झालें आहेः—

## निष्काम-कर्म-मठाची भिक्षा.

वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर या भिक्षेस सुरुवात केली आहे. मठाची स्थापना होऊन चार महिने झाले. या मठांतील सेवकसेविकांनीं फलावर

आसक्ति न ठेवितां सद्भावानें समाजकार्यासाठीं झटावें, असा हेतु आहे. आठ सेविका अजून विद्यार्जन करीत आहेत. त्यांचा विद्याभ्यास संपल्यावर त्या मठाच्या देखरेखीखालीं स्त्रीशिक्षणाचें काम करूं लागतील. यांपैकीं कांहींचा खर्च मठाकडून चालत आहे. महिलाविद्यालयाचीहि सर्व जबाबदारी मठानें आपल्यावर घेतली आहे. मठानें प्रथमतः आश्रमासाठीं व विद्यालयासाठीं काम करणारीं माणसें तयार करावयाचीं आहेत, व सामान्यतः स्त्रीशिक्षणाचा प्रश्न हातीं घ्यावयाचा आहे. दिवसेंदिवस द्रव्यसामर्थ्य एकत्र होणें फार कठीण होत चाललें आहे. केवळ द्रव्याभिक्षेवर अवलंबून न राहतां कार्य करण्याचें सामर्थ्य मठाच्या अंगीं यावें म्हणून शक्य झाल्यास मठाच्या सेवकसेविकांनीं भिक्षेच्या पवित्र अन्नाचें सेवन करावें, असें योजिलें आहे. यासाठीं भिक्षेचें धान्य विकून त्याचे पैसे न करितां तें तसेंच मठाच्या उपयोगांत आणलें जाईल. भिक्षेची तऱ्हा साधल्यास नवीन वळणावर नेण्याचें योजिलें आहे. पुणें शहरांत वारांवर व मधुकरीवर सुमारें दोन अडीचशें विद्यार्थ्यांचा चरितार्थ चालला आहे. याच पद्धतीनें कांहीं सेवकसेविकांचा व विद्यार्थिनींचा चरितार्थ चालल्यास पहावयाचें आहे. ज्या गृहस्थांची एका वाराची मदत देण्याची इच्छा असेल, त्यांनीं आठवड्यांतून ठरलेल्या वारीं एका मनुष्याचें दोन वेळांचें जेवण होईल इतका शिधा द्यावा, व ज्यांना एक माधुकरी द्यावयाची असेल, त्यांनीं सात दिवसांच्या माधुकरीला पुरतील इतके दाणे द्यावे. कोणी ओंजळभर अगर मूठभर दाणे घातले, तरी त्यांत आमचा संतोष आहे. भिक्षेची फेरी आठवड्यांतून एकदांच होईल. ही फेरी करण्याचें काम मठाच्या स्वयंसेविका श्रीमती सौ. गोपिकाबाई लेले व श्रीमती राधाबाई मालवणकर यांनीं पतकरलें आहे. मठानें आपल्या समजुतीप्रमाणें जें सत्कार्य करण्याचें योजिलें आहे, त्याचे अंशभागी व्हावें अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं मठाला वर लिहिल्याप्रमाणें सहाय्य करावें.

निष्काम-कर्म-मठ, पुणें सिटी,
२ एप्रिल १९११.

सेवक-सेविकांच्या आज्ञेवरून
मठाचा नम्र सेवक,
धोंडो केशव कर्वे.

वर निदर्शित केलेल्या दोन स्त्रिया व मी मिळून चारपांच दिवस भिक्षेसाठीं हिंडलों. नंतर हें काम मठाच्या इतर सेविकांनीं केलें. पहिल्या वार्षिक रिपोर्टांत यासंबंधानें उल्लेख आहे, तो असा:—

"मठाच्या सेवकसेविकांनीं प्रसंग पडला असतां धान्यभिक्षेवर आपला चरितार्थ चालवून लोकसेवा करण्याला तयार असलें पाहिजे अशी मठाच्या चालकांची इच्छा आहे. 'भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ॥' ही तुकारामबुवांची उक्ति स्वार्थासाठीं भिक्षा मागणारास लागू आहे. परंतु लोककार्याला वाहिलेल्या माणसांनीं यासंबंधाची आपली लाज काढून टाकिली पाहिजे. या उद्देशानें व मठाला आणि विद्यालयाला कांहीं मदत व्हावी म्हणून वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तानें या कामाचा पहिला धडा घेण्यांत आला. जसे विद्यार्थ्यांना वार देतात, तसा आठवड्यांतून एक वाराचा शिधा द्यावा, व ज्यांना तेवढें सामर्थ्य नसेल त्यांनीं शक्त्यनुसार मूठपसा दाणे द्यावे अशी विनंति करण्यांत आली, व ती पुष्कळजणांनीं मान्य केली. हें काम सहा महिने चांगल्या रीतीनें चाललें व सुमारें ६ पल्ले तांदूळ व ६ पल्ले इतर धान्य जमलें. या सर्व धान्याचा उपयोग सेवकसेविकांच्या व विद्यार्थिनींच्या अन्नासाठीं करण्यांत आला. पुढें प्लेग सुरू झाल्यामुळें हें काम बंद पडलें. या कामीं श्रीमती गोपिकाबाई लेले, बडोद्याच्या श्रीमती काशीबाई बेडे व श्रीमती आनंदीबाई कर्वे यांनीं पुष्कळ खटपट केली. धान्याचे वार कबूल केलेल्या बऱ्याच मंडळींनीं द्रव्याच्या रूपानें मासिक वर्गणी देण्याचें कबूल केलें व त्यांनीं तशी सुरुवातहि केली आहे."

वारांच्या रूपानें विद्यार्थिनींसाठीं धान्य जमविण्याचें काम यानंतर मठाच्या सेविकांनीं केलें नाहीं. परंतु माझी पत्नी आनंदीबाई हिनें तें आणखी दोन वर्षें चालविलें. सामान्य मनुष्यांकडूनहि हें काम होण्यासारखें आहे, व प्रसंगीं याचा उपयोग होऊं शकेल असें माझें मत आहे. तथापि ही गोष्ट हौसेनें करण्याची आहे; जुलुमानें लादण्याची नव्हे. तेव्हांपासून मठाच्या मंडळीनें ही केली नाहीं व हिजविरुद्ध बऱ्याच मंडळीचा विशेष कटाक्ष दिसल्यामुळें मींहि या कामीं आग्रह धरिला नाहीं.

# प्रकरण अठ्ठावन्नावें

## निष्काम-कर्म-मठासंबंधानें विशेष खुलासा

मठासंबंधानें अनेक प्रकारचे गैरसमज पुष्कळसे पसरलेले आहेत. ते दूर व्हावे, यासाठीं मठाच्या रिपोर्टांतील कांहीं उतारे देऊन नंतर मठाचे हल्लींचे नियम या प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे.

मठाच्या पहिल्या म्हणजे १९११ सालाबद्दलच्या रिपोर्टांतील उतारेः—

" सामान्य माहिती.

" श्रीमद्भगवद्गीतेंतील निष्कामकर्माचें तत्त्व मनांत वागवून नेहमींचीं कौटुंबिक व सार्वजनिक कामें केलीं असतां तीं किती सुकर होतात, व ' लाभालाभौ जयाजयौ ' यांविषयीं मनाची समता राखल्यानें मनुष्य खिन्न न होतां त्याची उमेद कशी कायम राहूं शकते, हें थोड्याशा तरी अनुभवावांचून कळावयाचें नाहीं. आपलें आयुष्य लोकसेवेला अर्पण करणारीं, व फळावर आसक्ति न ठेवतां सार्वजनिक कामांत देहभान विसरून जाणारीं पुष्कळशीं माणसें समाजांत उत्पन्न झाल्यावांचून त्याला कधींहि जिवंतपणा यावयाचा नाहीं. मठ शब्द ऐकल्याबरोबर, स्वतःचा व जगाचा संसार सोडून भगवें धारण करून जे भजनपूजनाला लागतात व इतरांना लावूं पाहतात अशांची संस्था, ही कल्पना कितीएकांच्या मनांत येते. यासाठीं आम्ही 'मठ' शब्द कोणत्या अर्थानें योजीत आहों, याचें स्पष्टीकरण होणें जरूर आहे. स्वतःच्या सांसारिक हिताला बरेंच गौण स्थान देऊन समाजाच्या ऐहिक हितासाठीं तळमळीनें झटणें किंबहुना समाजदेवतेचें अशा रीतीनें आराधन करणें, हीच परमात्मस्वरूपाची पूजाअर्चा होय अशी श्रद्धा बाळगणें व इतरांत ती उत्पन्न करणें, ही एक कल्पना आमच्या मठाच्या मुळाशीं आहे. 'मठश्छात्रादिनिलयः' असा मठ शब्दाचा अर्थ एका प्राचीन कोशकारानें दिला आहे. मठानें महिलाविद्यालयाचें जें पहिलेंच काम हातीं घेतलें आहे, तें या अर्थाला अगदीं अनुरूप आहे. पवित्र आचरण ठेवून व्यक्तिहित समाजहितांत लुप्तप्राय करावयास शिकणें हें या मठाचें ध्येय आहे; जपतपानें परमार्थ साधणें हें नव्हे. हे विचार आणखी स्पष्ट होण्यासाठीं एवढेंच लिहिणें जरूर आहे, कीं, जपतप व भजनपूजन या मार्गाचा

हा मठ विरोध करीत नाहीं. सेवकसेविकांपैकीं कोणाला या मार्गाचें मठांत आचरण करण्यास कोणताहि प्रतिबंध नाहीं; परंतु हा संप्रदाय उत्पन्न करून वाढवावा हा मठाचा हेतु नाहीं. साधल्यास लोकसेवेसाठीं निष्काम-बुद्धीनें आपलें तन, मन, धन अर्पण करणारा संघ उत्पन्न करून त्याचा विस्तार करावा, हें या मठाचें ब्रीद आहे. ”

“ या मठाची सर्व भिस्त संघशक्तीवर आहे. आम्ही सर्व मनुष्यें निर्धन आहों व आम्हांपैकीं पुष्कळांना शिक्षण अगदींच बेताचें आहे. परंतु महत्कार्य घडून येण्यास शिक्षणापेक्षां मनोवृत्तींच्या उदारपणाचा अधिक उपयोग होतो व संघशक्ति उत्पन्न करण्यास या वृत्ति फार उपयोगी आहेत, अशी आम्हां सर्वांची समजूत आहे. अधिक शिकलेल्या व कमी शिकलेल्या सेवकसेविकांनीं एकमेकांना कमीअधिक न लेखितां समभावानें वागून आपल्या अंगच्या गुणांचा संस्थेला फायदा करून द्यावा ही इच्छा आहे. बुद्धीचें शिक्षण अगदींच नसून चालणार नाहीं ही गोष्ट खरी आहे; परंतु मनुष्याची किंमत करतांना त्याच्या बुद्धीच्या शिक्षणाला वाजवीपेक्षां किती तरी अधिक महत्त्व दिलें जातें व अंतःकरणाच्या उदार वृत्तींना किती तरी कमी किंमत मिळते हें खोटें नाहीं. कोणत्याहि कार्याला अनेकांची जरूरी लागते व आपलेपणा उत्पन्न झाल्याशिवाय मनुष्याच्या हातून खुल्या दिलानें काम होत नाहीं. म्हणून आम्ही लहानमोठीं व कमीअधिक शिकलेलीं माणसें एकत्र झालों आहों. आम्हीं फार मोठें ध्येय आपल्या दृष्टीपुढें ठेविलें आहे; पण तें साध्य होण्यास लागणाऱ्या अनेक गुणांचा मात्र आम्हांमध्यें अभाव आहे, ही गोष्ट आम्ही जाणून आहों. मतभेद झाला तरी कार्यासाठीं तो विसरून मिलाफानें काम करणें फार कठिण आहे, व या खडकावरच आमचीं पुष्कळ तारवें फुटलीं आहेत. आम्हांसहि या खडकाची मोठी भीति वाटत आहे. तथापि ‘काशीस जावें नित्य वदावें’ या म्हणीप्रमाणें उच्च ध्येयाचा उच्चार करण्यास आम्ही तयार झालों आहों. अल्पांशानें तरी आमचे विचार कृतींत उतरोत, एवढें देवाजवळ मागावयाचें आहे.”

दुसऱ्या म्हणजे १९१२ सालच्या रिपोर्टांतील उतारेः—

“ या वर्षी सेवकसेविकांचें काम फार समाधानकारक झालें. मागील रिपोर्टांत लिहिल्याप्रमाणें आम्हीं आपल्या संघाला ‘निष्काम–कर्म–मठ’ हें

नांव केवळ ध्येय आपल्या नजरेपुढें रहावें यासाठीं दिलें आहे. बाकी आम्ही माणसें सामान्यजनांहून वेगळीं नाहीं. 'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ' या शब्दांचा उच्चार करणें सोपें आहे, पण दुःखाच्या व अपजयाच्या प्रसंगीं कार्यांची चिकाटी कायम राहण्याला लागणारें मनोधैर्य आम्हां सामान्यजनांच्या अंगीं कोठून यावें! आरंभींच असली कसोटी आम्हांला लागली असती तर आमचा निभाव लागला नसता; पण बहुधा असें घडत नाहीं. सामान्यजनांनीं सद्बुद्धीनें आरंभिलेल्या कार्याला थोडें-थोडें यश मिळून त्यास उत्तेजन यावें, अशीच बहुधा ईश्वरी योजना असते. आमच्यासंबंधानें हा प्रकार विशेष रीतीनें घडून आला व आमचें मठावरचें प्रेम दृढ झालें, ही आनंदाची गोष्ट आहे."

"स्वतःच्या जबाबदारीविषयीं जागृति व्हावी, मठाविषयीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलाव्या व एकमेकांचे विचार एकमेकांना कळविण्याला संधि मिळावी, या हेतूनें वर्षाचे अखेरीस हिंगणेंबुद्रुक येथें महिला विद्यालयाच्या इमारतींत सेवकसेविकांचें संमेलन भरविण्यांत आलें होतें. दोन शिवाय करून मठाला वाहून घेतलेली सर्व मंडळी या प्रसंगीं हजर होती. अडीच दिवस एकत्र घालविण्यांत आले. पांचसहा वेळां सभेच्या रूपानें सर्वांनीं जमून मठाच्या कामासंबंधानें वगैरे चर्चा केल्या. एकंदरींत या संमेलनाचा सेवकसेविकांच्या मनांवर चांगला परिणाम झाला."

"याप्रमाणें मठाच्या दुसऱ्या वर्षाची हकीकत आहे. संस्थेचें नांव कितीहि मोहक असलें, तरी तींत काम करणाऱ्या मनुष्यांवरच तिची किंमत अवलंबून असणार, हें आम्ही जाणून आहों. संस्थेचें हातून कांहीं तरी लोककार्य व्हावें ही आमची मनापासून इच्छा आहे. मात्र त्या इच्छेप्रमाणें आमच्या हातून काम कितपत घडेल ही आमची आम्हांसच शंका आहे, मग लोकांस तशी शंका आल्यास नवल नाहीं. आपल्या जबाबदारीची जाणीव सेवक-सेविकांस राहो, एवढेंच परमेश्वराजवळ मागून हा रिपोर्ट पुरा करितों."

तिसऱ्या म्हणजे १९१३ सालच्या रिपोर्टांतील उतारा:—

"सार्वजनिक उद्योग हातीं घेणाऱ्या मनुष्यांचें मन फार थोर असलें पाहिजे. स्वतःच्या संस्थेवर विशेष प्रेम असणें व तीसाठीं रात्रंदिवस घड-

पडणें जरूर आहे, हें खरें; तथापि अशा मनुष्यांचे मनांत सामान्यतः मनुष्यजातीच्या व विशेषतः हिंदी समाजाच्या प्रगतीसाठीं जीं अनेक मनुष्यें व ज्या अनेक संस्था मनापासून झटत आहेत त्यांविषयीं प्रेमभाव व सहानुभूति असणें अत्यंत जरूर आहे. सद्भावानें चालविलेल्या इतर संस्थांविषयीं आपले मनांत प्रेमभाव वसावा यासाठीं मठानें एक लहानशी योजना केली आहे व ती वर्षानुवर्ष चालू रहावी अशी त्याची इच्छा आहे. आपल्या अल्प सामर्थ्यांतूनच, अत्यल्प कां होईना पण तेवढी तरी मदत कांहीं संस्थांस त्यांचें स्मरण करून व अभीष्ट चिंतून प्रेमपुरःसर पाठवून द्यावी असा उपक्रम मठानें केलेला आहे. पितरांचें अगर ऋषींचें तर्पण करण्यांत जो हेतु दिसतो, तोच या उपक्रमांत आहे. 'पत्रं पुष्पं फलं तोयं' अशा भावनेनें केलेल्या या मदतीनें त्या संस्थांची भूक भागणें शक्य नाहीं हें मठ जाणून आहे. परंतु द्वितीयेच्या चंद्राचा गौरव करण्याला दुसरा मार्ग नाहीं हें जाणून जशी वस्त्राची दशी अर्पण करावयाची त्यांतलाच हा प्रकार आहे. सेवक-सेविकांची मनें थोर होण्याचे कामीं त्याच्या प्रतिक्रियेचा कांहीं परिणाम व्हावा एवढाच यांत हेतु आहे."

मठासंबंधानें पाल्हाळिक लिहिण्याचें कारण त्यासंबंधानें निष्कारण झालेला गैरसमज होय. आतां मठाचे नियम देऊन हें प्रकरण पुरें करतों.

## निष्काम-कर्म-मठाचे-नियम.

१. या संस्थेचें नांव 'निष्काम-कर्म-मठ' हें असावें.

२. मठाचे उद्देश येणेंप्रमाणेः—

(अ) समाजहितासाठीं झटणाऱ्या हिंदी सेविकांचा संघ उत्पन्न करणें.

(ब) संस्थेची सर्व जबाबदारी संभाळण्याचें सामर्थ्य सेविकांमध्यें येईपर्यंत कांहीं पुरुषसेवक घेऊन मठाचें काम सुरू करणें व तसें सामर्थ्य आल्यानंतर नवीन सेवक घेण्याचें बंद करून पूर्वीं घेतलेल्या सेवकांनीं त्यांची इच्छा असल्यास मठांत आजन्म काम करणें.

(क) स्त्रियांसाठीं बोर्डिंगशाळा व इतर शाळा चालविणें व सामान्यतः शिक्षणाचीं व दयाधर्माचीं कामें करणें.

(ड) वरील कलमांत दाखल केलेलीं कामें करणाऱ्या संस्थांस शक्त्यनुसार द्रव्याचें अगर मनुष्यांचें साहाय्य देणें.

३. मठाच्या सेवकसेविकांनीं पुढील व्रतांचें पालन करण्याविषयीं प्रतिज्ञा केली पाहिजे:—

(अ) मीं आपलें जीवित आजपासून संस्थेच्या कार्यासाठीं पूर्णपणें अर्पण केलें आहे.

(ब) माझें सर्व सामर्थ्य मी संस्थेच्या कार्यांकडे खर्च करीन व संस्थेचें कार्य करीत असतां खासगी फायदा करून घेण्याची इच्छा धरणार नाहीं.

(क) संस्थेच्या नियमांप्रमाणें जें ठरेल तें मी निमूटपणें मान्य करीन.

(ड) मजकरितां व मजवर अवलंबून रहाणाऱ्या मनुष्यांकरितां जी व्यवस्था संस्था बहुमतानें करील तींत मी संतुष्ट राहीन.

(ई) माझें खाजगी वर्तन मी शुद्ध ठेवीन.

(फ) माझी राहणी व पोशाख हीं मी साधीं ठेवीन.

(ग) मी इतरांच्या धार्मिक समजुतींबद्दल उदार मन करीन व इतरांच्या धार्मिक समजुतींस धक्का बसेल असें वर्तन मी करणार नाहीं.

(ह) मी कोणाचाहि द्वेष करणार नाहीं.

४. मठाचे नियम पाळण्याला तयार असलेल्या कोणत्याहि स्त्रीला सेविका होतां येईल. मात्र तिनें कांहीं मुदतीपर्यंत मठांत प्रोबेशनर राहून काम केलें पाहिजे व तिला संघांत घेण्याबद्दल मठाच्या कौन्सिलाची व तीनचतुर्थांश सेवकसेविकांची संमति पाहिजे.

५. सेवकसेविकांचा मठाशीं संबंध आजन्म राहील. *

६. नवीन होणाऱ्या सेवकसेविकांचें वय निदान पूर्ण २१ वर्षांचें असलें पाहिजे व प्रोबेशनर होण्यापूर्वीं निदान पूर्ण १८ वर्षांचें असलें पाहिजे.

७. इच्छित शिक्षण पुरें होण्यापूर्वीं कोणास प्रोबेशनर करून घेणें असेल तर त्यांच्या शिक्षणास मुदत किती द्यावयाची व शिक्षणाचा खर्च कोणीं करावयाचा यासंबंधीं कौन्सिलचा स्पष्ट ठराव अगोदर झाला पाहिजे व त्याला प्रोबेशनराची संमति पाहिजे.

---

* कोणा सेविकेला विवाह करावयाचा असल्यास तिला परवानगी असावी, असा नियम घालण्याचा विचार होता; परंतु आतां मठ आश्रमांत अंतर्भूत झाला आहे, यासाठीं आश्रमाच्या पोटनियमांत तो दाखल करण्यांत येईल.

८. अक्षम्य गैरवर्तनावांचून कोणाहि सेवकसेविकेला मठांतून काढून टाकतां येणार नाहीं. अक्षम्य गैरवर्तनामुळें कोणास काढून टाकणें झाल्यास तसें करण्याला कौन्सिलची व ३/४ सेवकसेविकांची संमति पाहिजे.

९. कुटुंबी पुरुषांशिवाय इतरांना सेवक म्हणून संस्थेंत घेतलें जाणार नाहीं.

१०. तरुण कुटुंबी पुरुष सेवक होण्यास तो ग्रॅजुएट अगर त्याच्या योग्यतेचा असला पाहिजे.

११. मध्यम वयाच्या अगर त्याहून अधिक वयाच्या गृहस्थांना सेवक करण्यास वरील शिक्षणाची अट नसावी; परंतु त्यांचें मठावर फारसें ओझें पडूं नये या गोष्टीकडे लक्ष असावें व त्यांना मठाकडून कांहीं देणें जरूर असल्यास तें किती व किती मुदतीपर्यंत द्यावयाचें याबद्दल कौन्सिलचा स्पष्ट ठराव अगोदर व्हावा.

१२. संस्थेच्या कामाची मुख्य जबाबदारी कौन्सिलवर राहील. पहिलीं पांच वर्षें कौन्सिलचे सर्व अधिकार रा. कर्वे हे चालवितील.

१३. सेवकसेविकांनीं चरितार्थासाठीं मिळणाऱ्या मासिक वृत्तींतून जरूर तो खर्च करावा; परंतु तींतून शिल्लक राहिल्यास तिचा खासगी संग्रह करण्याचा त्यांना अधिकार नाहीं. राहिलेली शिल्लक परत मठाकडे दिली पाहिजे. ही शिल्लक त्या त्या मनुष्याचे नांवें वेगळी जमा करण्यांत येईल. हींतून खर्च करणें झाल्यास मठाचे परवानगीची जरूर नाहीं. सदर शिलकेची अधिकांत अधिक मर्यादा अडीचशें रुपये आहे.

१४. सेवकसेविकांचा पूर्वींचा कांहीं द्रव्यसंग्रह अगर जमीनजुमला वगैरे असल्यास त्याची त्यांनीं मर्जीप्रमाणें व्यवस्था करावी. परंतु मठांत आल्यावर शारीरिक अगर बौद्धिक श्रमानें मिळणाऱ्या सर्व पैशावर मठाची मालकी राहील.

१५. ही संस्था राजकीय कामांत बिलकूल पडणार नाहीं.

१६. ही संस्था मोडल्यास अगर कांहीं कारणानें बंद पडल्यास तिचें सर्व कर्जवाम वारून कांहीं शिल्लक राहिल्यास ती स्त्रियांच्या हितासाठीं एका अगर अनेक संस्थांस वाटून द्यावी. अशा वेळीं कोणत्या संस्थेला किती मदत द्यावयाची हें त्या वेळीं हयात असलेल्या सेवकसेविकांनीं अगर

त्यांच्या आभावीं ज्या न्यायाच्या कोर्टाकडे हा अधिकार असेल त्या कोर्टानीं ठरवावें.

निष्काम--कर्म--मठाचा प्रयत्न हें एक माझ्या आहाराबाहेरचें काम होतें. हें तडीला लावण्याला माझ्याहून फार मोठ्या सामर्थ्याचीं मनुष्यें पाहिजे होतीं. अशीं मनुष्यें या संस्थेच्या नशिबानें तिला मिळावीं, एवढीच माझी इच्छा होती. अशीं मनुष्यें मिळत तोंपर्यंत मठाचें ध्येय मान्य करून तें अल्पांशानें तरी आचरणांत आणण्याचा प्रयत्न करणारीं कांहीं माणसें मिळवून संस्था जीवंत ठेंवावी, एवढ्यासाठींच मीं यत्न करणार होतों. आतां मठ आश्रमांत अंतर्भूत झाला आहे, तेव्हां त्याची स्वतंत्र वाढ होण्याचा प्रश्नच उरला नाहीं.

# प्रकरण एकुणसाठावें

## ज्याचा शेवट गोड तें सर्वच गोड

सद्भावानें हातीं घेतलेल्या कार्याला सद्बुद्धीनें प्रेरित झालेल्या कांहीं मंडळीकडूनहि विरोध यावा, असा निसर्गाचा क्रमच दिसतो. किंबहुना अशा कार्यांमध्यें त्यांच्यांत जीवनसामर्थ्य असेल, तर जोरदारपणा उत्पन्न व्हावयाला गैरसमज आणि विरोध हे कारणीभूत होत असतात. आश्रमाच्या पुरस्कर्त्यां व कार्यकारी मनुष्यांपैकीं बहुतेकांच्या मनोवृत्ति मठाविषयीं अत्यंत साशंक अथवा विरोधयुक्त अशा होत्या. अर्थात् त्यांच्याशीं विशेष परिचित अशा पुष्कळ मंडळीची मनःप्रवृत्ति तशीच झाली यांत नवल नाहीं. मनुष्य कितीहि चांगलें असो, एकदां अमुक एक गोष्ट अनिष्ट असा त्याचा समज झाला, म्हणजे त्याला तींतील दोष ठळक दिसूं लागतात, व गुणांकडे नजर जात नाहीं. मला आतां चळ लागला आहे, व मी कांहीं तरी करीत सुटलों आहे, असें या वेळीं कित्येकांना वाटलें. दुसऱ्या कित्येकांना आमचा हा सर्व पोरखेळ वाटला, व भातुकलीच्या खेळाप्रमाणें हा खेळ लवकरच आटोपेल, अशी त्यांची समजूत होऊन त्याकडे त्यांनीं दुर्लक्ष्य केलें. परंतु ही संस्था जसजसी वाढूं लागली, तसतशी त्यांची मनःप्रवृत्ति बदलत चालली.

मठ एवढया अंतःकलहाला कारण होईल, अशी कल्पना मला पहिल्यानें झाली नाहीं; आणि तशी झाली असती, तरी आश्रम व विद्यालय या संस्था दीर्घायु करण्याला मला दुसरा मार्ग दिसत नव्हता. माझ्या समजुतीनें जो मार्ग मला उत्तम वाटला, त्या मार्गांत आपली शिकस्त करावी असें माझ्या मनानें घेतलें, व मी आशापूर्ण अंतःकरणानें अडचणींना तोंड देण्याला तयार होऊन पुढील मार्ग चोखाळूं लागलों. आपले विचार दुसऱ्यांच्या मनाला पटतील अशा रीतीनें ते त्यांजपुढे मांडणें व भिन्न मतांच्या माणसांची समजूत घालून त्यांजमध्यें सलोखा उत्पन्न करणें हें दुर्दैवानें मजमध्यें नसल्यामुळें, इतरांची समजूत पडणें अगर न पडणें ही गोष्ट काळावर सोंपवून मनांत आलेल्या कामीं उडी घालणें हाच माझा स्वभाव बनला आहे. खाजगी संभाषणांतून मठावर व त्यासंबंधाच्या कृतींवर जे आक्षेप कानीं

येत, त्यांचा विचार करून जे फेरफार करणें इष्ट वाटलें ते आम्ही करीत गेलों. आश्रम व मठ यांमधील विरोधाग्नि खाजगी संभाषणांतून चहूंकडे पसरला. या अग्नीच्या विस्ताराचें क्षेत्र बरेंच मोठें झालें होतें; पण त्यांत वर्तमानपत्रांनीं तेल ओतून व वारा घालून तें अधिक मोठें केलें नाहीं, हें भाग्यच समजावयाचें. या अग्नीच्या ज्वाळा पुष्कळशा कमी झाल्यानंतर इंदुप्रकाशानें हें प्रकरण हातीं घेतलें. हेंच जर त्यानें एक वर्ष अगोदर हातीं घेतलें असतें, तर हा अग्नि कदाचित अधिक भडकला असता. इंदु-प्रकाशांतील मजकूर अर्थात् कित्येकांच्या खाजगी संभाषणांतील गोष्टींचें प्रतिबिंब आहे. या प्रतिबिंबाचें जें अस्सल असेल, त्याचें तेज किती प्रखर असेल, याची कल्पना सहज करितां येईल. या लेखांना प्रत्यक्ष उत्तर देण्याची माझी इच्छा नाहीं. अप्रत्यक्ष उत्तर मठाची हकीकत व एकंदर सर्व वृत्त काळजीपूर्वक वाचणाराला आपोआप मिळेल. कांहीं लोकांना त्यावेळीं मठाबद्दल काय वाटत होतें, तें आमच्या नजरेपुढें रहावें, व इतरांना कळावें, एवढ्यासाठीं सदर लेख जशाचे तसे पुढील प्रकरणांत देत आहें. हे लेख २१ ऑगस्ट १९१३ च्या इंदुप्रकाशांत प्रसिद्ध झाले आहेत.

# प्रकरण साठावें

## (इंदुप्रकाशांतील लेख)

## A Knotty Problem

### The Anath Balikashram and its two new associates at Hingne Budruk, Poona.

*( From a trusted and esteemed friend. )*

A perplexing situation, demanding serious attention and close scrutiny of all friends of Social Reform in the Deccan has arisen at Hingne Budruk, Poona, in connection with the Widows' Home or the Anath Balikashram and its two new neighbours and associates, the Mahila Vidyalaya and the Nishkama Karma Matha, all three of them started by Prof. Karve and worked side by side, under his direct care and supervision. Of these three institutions the oldest and the most catholic and altruistic is the Widows' Home, and it is precisely this institution which would seem to have become the greatest sufferer, its affairs having come to a state, threatening a serious diminution of its utility and popularity—perhaps its very existence. The Home was founded about seventeen years ago for the amelioration of the moral and intellectual as well as the material lot of the widows and until about four of five years ago the management of its affairs and its prospects were in a satisfactory condition. The institution kept on till then its even tenor of progressive popularity and utility under the fostering care of its founder and devoted sponsor the indefatigable Prof. Karve, whose yeoman services rendered heretofore to the cause, are so well-known and appreciated. Unfortunately, however, things have

very much altered with the development of the two new institutions founded by Prof. Karve, one, the Mahila Vidyalaya started six years since, and the other the Niskama Karma Math started three years later. In part common and analogous, but in part conflicting and divergent as the objects of these three institutions are, those of the Math in particular being of a very debatable character, their working under the common direction and supervision of Prof. Karve and in close proximity with each other, has produced difficulties and complications of a serious charactor. What is worse, the Widows' Home has unfortunately lost that single-minded zeal and devotion which Prof. Karve had been previously bestowing on it, and it is the new institutions, the Vidyalaya and the Math, on which at present all his affections and energies have been almost exclusively concentrated. The result is that to add to the chronic difficulty of want of sufficient funds, the interests of the Widows' Home have been in other directions also serrouly jeopardised. Allowances must of course be liberally made amongst friends of Social Reform for differences of opinion, and no one can claim the right to wean Prof. Karve away from his new loves, the Vidyalaya and the Math. But surely, the patronage of the general public can be extended to the Math and the Vidyalaya, as widely and cheeringly as to the Home, only if the basal principles and management are unobjectionable and the association of the three institutions can be tolerated only if there are no disturbing factors and untoward complications arising therefrom. It is much more with the intention of suggesting a working compromise, as opposed to a split and severance, and of purging away what seem to be the objectionable features of the two new institutions and their working that this note has been penned. It may be mentioned that it embodies the views of a number of tried friends of the cause whom the writer took special care to consult and who consider that remedial action on the lines suggested is peremptorily needed.

# THE WIDOWS' HOME

Now to turn to the facts in elucidation of the serious complaints made and the untoward complications arisen, the Hindu Widows' Home or the Anath Balikashram has a regular constitution of its own under which the general direction is vested in an elective Managing Committee helped by a Ladies' Committee whilst the actual management falls on the Secretaries and the 'Life Members', the latter being ladies serving on principles of self-sacrifice on pittances which scarcely come to a third of the modest allowances sanctioned for the male Life Members of the D. E. Society. Till recently there were three such Lady Life-Members of the Home, two of them being also bracketed with Prof. Karve as Co-Secretaries. Out of this dishearteningly small number of three Life-Members, one, Mrs. Kashibai Devdhar, who was doing duty as Co-Secretary and Lady Superintendnt of the Home, has to a large extent, on account of dissatisfaction, at the new developments, recently left the institution for good. Only two Life-Members remain, Mrs. Venubai Namjoshi and Mrs. Parvatibai Athavale. The latter has generally to spend the whole year, in touring about far and wide, collecting subscription, of which the peremptory necessity may well be gauged from the fact that as against a carefully kept down annual expenditure of about Rs. 15000, only about Rs. 2000 come in, on the income side, as the interest of the permanent endowment fund and about 4000, as the regular annual subscriptions. That leaves the large amount of about Rs. 9000 to be made up every year by town to town collections merely for meeting the ordinary expenses of the Home. Mrs. Venubai Namjoshi, the Acting Lady-Superintendent, is thus the only Life-member on the spot and the brunt of work must fall on her and Prof. Karve until new Life-members come in, of which however the possibility seems remote under the present grievous circumstances, found intolerable by even a long-standing worker like Mrs. Kashibai

Devdhar. Of devoted workers there is thus as great a want as ever. On the other hand, the Home has far from reached its full development. To quote from the Report for 1912, funds are badly wanted for a variety of purposes:— ( 1 ) increasing the building accommodation so that admission may not have to be refused to helpless widows seeking it, as has to be done now, ( 2 ) opening the sixth and the seventh standard classes in the school at the Home, (3) putting its industrial classes upon a satisfactory basis, etc. For all this work, even after the departure of Mrs. Kashibai Devdhar, Prof. Karve, with the able assistance of the devoted Venubai Namjoshi and Parvatibai Athavale would doubtless have proved pretty equal. Unluckily for the Home, however, all the hopes once entertained that after retiring from the Fergusson College Prof. Karve would devote to it his full time and attention have been entirely frustrated.

## RIVALS TO THE HOME

It is so painful to have to say it, but the fact is that Prof. Karve's energies and affections are now almost entirely absorbed by the Mahila Vidyalaya and the Nishkama Karma Math. Since 1910 his time and energy have been devoted to securing subscriptions for the Vidyalaya and the Math and finding work and members for the latter. In the result the Widows' Home has forfeited that zealous love, regard and readiness for work on Prof. Karve's part, which hitherto were its main support. More serious than this grievance of want of sufficient funds and devoted workers are however a number of untoward consequences, adversely affecting the name, reputation, economy and general management of the Widows' Home, which have arisen out of the direct or indirect association with it of Prof. Karve's new loves and pets, the Mahila Vidyalaya and the Nishkama Karma Math. Some of these consequences are likely to injure seriously the Home and to no small extent discredit similar institutions flying the flag of Social Reform and hence a detailed exposition of them becomes necessary.

# THE MAHILA VIDYALAYA AND THE NISHKAMA KARMA MATH

The Vidyalaya was founded about six years ago and the Math two years ago. To-day, however, it is the younger institution namely the Math, of which the objects, constitution and method of work have several objectionable features, which occupies the premier position of master and dictator, as is evident from the Report for 1912 published with the significant title 'निष्काम-कर्म-मठ व महिलाविद्यालय—दुसरा व सहावा वार्षिक रिपोर्ट.' The Math is in fact quartered at present in the buildings erected at a cost of over Rs. 25000 collected by public subscriptions for the Vidylaya and is managing all its affairs. The Math itself is under no outside control. Its sole and absolute dictator for the first five years is Prof. Karve who is to be succeeded by the Council of the members of the Math themselves to then come into existence. Apparently, the Vidyalaya is in absolute and complete charge of the Math and even the subscribers have apparently no legal right to intervene or interfere. The Math and the Vidyalaya are thus legally autonomous institutions separate from the Widows' Home. But they work together or side by side becauce it would seem, of Prof. Karves' common sponsorship and because in a way the new institutions are offsprings of the Widows' Home. The objects are in part at least common. The Widows' Home admits, under its constitution as free boarders widows from castes amongst whom widow remarriage does not prevail and its object is to give education to the inmates and fit them for independent life. Its portals are also open to paying virgins and widows from the castes above named. The Home maintains for fulfilling its objects a boarding and a school with special industrial classes. It would seem that the genesis of the Vidyalaya lay in a dissatisfaction at the restriction of admission in the Widows' Home only to girls

of the non-remarrying castes. Surely, a new branch of the Home would easily have met all the requirements in this behalf. But Prof. Karve went in for a new and seprate institution altogether and one under his sole management. The Vidyalaya, thus come into existence, has, like the Widows' Home, a boarding and a school of its own. It admits girls above eight years of, age of all castes and all kinds—virgins, married girls, with husbands living or widowed. A branch of the Vidyalaya inmates consists of the 'Celibacy ( ब्रह्मचर्य ) Fund' girls, who are virgins bound under their own or their guardins' pledge to remain unmarried to a certain age. It will thus be seen that higher female education is a common object with both the Widows' Home and the Vidyalaya. Leaving aside the question of the justification for starting the Vidyalaya as a separate institution, the points to note are ( 1 ) that the building of the Vidyalaya is in close proximity to that of the Widows' Home, ( 2 ) that Prof. Karve is their common founder, friend and chief worker and ( 3 ) that both are badly suffering from want of funds. And yet, strange to say, not only have the two institutions two separate buildings and establishments under separate management, but they have also got two separate tiny schools of their own, separately located and manned and both semi-developed and semi-starved. The Reports for 1912 show that there were only forty-eight girls in the Vidyalaya School and only a hundred and five girls in the Widows' Home School. The thinking public may well ask the question, as to why these two schools, existing as they do for pure educational purposes, should not be amalgamated so as to secure the double advantage of increasing the teaching efficiency and securing a due economy of public funds so as to materially releive the acutely felt financial pressure. As said before, it is difficult to understand why Prof. Karve at all started the Vidyalaya as an altogether separate institution with no control from the donors. It is twenty times more difficult to understand why the two institu-

tions are made to maintain two different schools. As matters stand, not only are money and energy wasted but unnecessary and unpleasent jealousies exist and bickerings occur between the Home and the Vidyalaya people. There is thus a most unedifying spectacle presented to the public of grave differences amongst persons working for the same cause and under the same banner, in adjacent buildings and under the supervision of one and the same person.

## THE NISHKAM KARMA MATH

Last but most unsatisfactory are some of the features and methods of work of the Math, which under Prof. Karve's sole direction, solely controls and manages the Mahila Vidyalaya. The Nishkama Karma Math is a mixed association of males and females living together, organized after the fashion of the Jesuits, its members, termed 'Sevakas' and Sevikas,' having to pledge themselves irrevocably for life (1) to the dedication of all their life (जीवित) and powers (सामर्थ्य) to the work of the Math without any desire of personal gain, (2) to implicit obedience and discipline and willing acceptance of whatever arrangement is made by the Math for the maintenance of themselves and their dependants and (3) to purity, simplicity, tolerance and charity. Its objects are defined to be to create a body of Indians devoted to Social Service, to conduct institutions promoting female education and to do works of mercy and charity. The membership is to remain open for males as well as females, till it becomes possible to cease enlisting more males. The age limits of admission for these monks and nuns of the Nishkama Karma Math is fixed at twenty-one for regular membership and eighteen for probationership. Any female can be a member, but on males the condition is imposed that they must be 'family persons' (कुटुंबी पुरुष) whatever that means. Presumably any lady, virgin married or a widow, can be a member.

## FAULTY IDEAL AND CONSTITUTION.

The ideal of voluntary poverty and dedication of one's self for social service and a lofty co-living of high-souled men and women without even cause for scandal is no doubt a catching one; and one can understand how it must have captured an energetic, self-sacrificing and personally pure-intentioned optimist like Prof. Karve. It may be granted that the persons who have so far joined the Math as Sevaks and Sevikas come up, or will come up, to the ideal and preserve it. But in judging of the merits of an association of selfless devotees of the monks and nuns type like the Matha, practical men must take into account possibilities and probabilities and the failings and weaknesses of human nature. The history of the Convents of the West as well as the East of old times has its lessons to teach and there are such present day experiences as of the Theosopihcal Society, the Bombay Sevasadan and minor institutions like the Hanumangad Math.¶ Platonic arrangements are not for this world and

---

¶ थिआसॉफिकल सोसायटी, मुंबईचें सेवासदन व हनुमानगड मठ या तीन संस्थांचा उल्लेख करून ज्या तीन व्यक्ति ध्वनित केल्या आहेत, त्यांविषयीं मला पूज्यबुद्धि वाटते, असें स्पष्टपणें नमूद करण्यांत मला कमीपणा वाटत नाहीं. तथापि मला एवढें सांगणें जरूर वाटतें कीं, थिआसॉफिकल सोसायटी अगर हनुमानगड मठ यांचा मी अनुयायी नाहीं. मनुष्य चुकीला पात्र आहे; त्याप्रमाणें एकाद्या वेळीं मनुष्याच्या हातून चुकी घडेल. मनुष्याची अमुक एक कृति चुकीची आहे कीं काय हें ठरविणें फार कठिण आहे. त्यांत असामान्य मनुष्यांच्या कृतीचें परीक्षण करणें त्याहून कठिण आहे. वर ध्वनित केलेल्या व्यक्ति माझ्याहून फार वरच्या पायरीच्या आहेत. चिकित्सक दृष्टीनें त्यांच्या कृतींची परीक्षा करण्याचें मला कारण नाहीं. माझ्या उत्क्रांतीशीं जुळणारे असे त्यांचे विचार मला दिसल्यास ते मी ग्राह्य करावे, एवढेंच माझें कर्तव्य मी समजतों. त्यांपैकीं एकाद्या व्यक्तीचें कांहीं विशेष प्रसंगींचें आचरण चुकीचें आहे असें गृहीत धरलें, व तिचें पुढील आयुष्य असावें तितकें उदात्त राहिलें नाहीं, तरीहि आजपर्यंत त्यांनीं केलेली दांडगी तपश्चर्या विसरतां कामा नये, असें मला वाटतें. यासंबंधानें ' मिरा किडला तरी राळ्याला हार जाणार नाहीं, ' या आमच्या म्हणीकडे लक्ष द्यावें, एवढेंच मला सुचवावयाचें आहे.

the evil results of the occasional scandals to which they give rise are so great that wise men will guard against the temptations and opportunities for abuse which Maths and Convents of this character afford so plentifully. Farseeing practical men cannot therefore be expected to at all approve of the close association of male and female members allowed for an indefinite period by the constitution of the Math. Nor can they help condemning positively the low age limit of 18. Is it morally right to allow inexperienced boys and girls of the tender age of 18 to bind themselves for life by the kind of pledges of poverty and self-abnegation which the Math exacts ? Things may perhaps go on well so long as Prof. Karve is there to closelay watch and exercise effective control. But it cannot be gainsaid that there are great dangers of abuse and corruption as well as of backsliding and hypocrisy and these, if and when they occur, will seriously injure not only the Math but the whole cause of social reform. The risks are great and the stakes heavy while the guarantees are few and feeble.

## ABUSES.

What would appear to disinterested outsiders as abuses have, in fact, already taken place, seriously prejudicing the interests both of the Widows' Home and the Vidyalaya. The ascetic ideal of the Math is forced on the Vidyalaya and because the Widows' Home is not thought by the Math people to come up to that level, there are frictions and bickerings. Secondly, there is an objectionable proselytizing for securing recruits for the Math. The nine persons who appear as the regularly enlisted Sevaks and Sevikas in the Report for 1912 are Prof. Karve himself and two married pairs, Mr. and Mrs. Kaulgekar and Gadgil, the remaining four being widows two of them so young as about 21 and 25. Of the nine members full four were recruited from the teaching staff of the Widows' Home and their services are now transferred to the Vidyalaya. Besides these

nine regular members some five or six girls of 17 or 18 were taken away from the Widows' Home to the Vidyalaya and are reported to have taken pledges and become probationer Sevikas. Even these girls were given some lessons in house to house begging—'भिक्षा'—which is one method of work followed by the Math. There have been cases of withdrawals of girls by parentse for this sort of proselytizing.

The question the public may well ask is whether there was any necessity for the organization of the Math. Would it not have been better to unite the Widows' Home and the Vidyalaya as co-operating branches of one institution aiming at female emancipation and try every means of increasing the Lifemembers devoted to it ? Supposing, however, that the institution of the Math with its more ascetic ideal is a concern only of those who voluntarily join it, the friends of the Widows' Home and the Vidyalaya have undoubtedly the right to demand that the Math shall not directly or indirectly force its ideals on them and what is still more important, that it shall neither seek nor enlist recruits from among the teachers or the pupils and other inmates entrusted to the guardianship of the Home or the Vidyalaya. The two institutions do not certainly exist for furnishing a recruiting field for social asceties of the Don Quixote type.

## THE REMEDIES.

The radical remedies for all this highly unsatisfactory state of things would of course be to absolutely dissociate the Home and the Vidyalaya from the Math and its members, if not altogether to close the Math and to unite the former two into one institution managed by a responsible elective body. It has, however, to be recognized that this would be too great a demand on Prof. Karve and the other Sevaks and Sevikas of the Math and they would naturally not consent to such self-immolation. By way of compromise therefore are the following suggestions made to the parties concerned, namely

the Managing Committee of the Widows' Home and Prof. Karve as the supreme director of the Vidyalaya and the Math, and they are earnestly requested to consider and adopt them without loss of time with any modifications that may be deemed avisable:—

(1) The control over the affairs of the Vidyalaya should be vested in a Managing Committee elected by the Donors. The personnel of this Committee should be as far as possible the same as that of the Widows' Home.

(2) There should be one common School for the Home and the Vidyalaya, under the management of a sub-committee of an equal number of members nominated by the Managing Committees of the two institutions, the expenses being shared equally or in proportion to the number of girls.

(3) Every effort should be made to secure fresh Lady Life-members to serve the Home and the Vidyalaya and the terms offered should be more liberal than the present miserable pittances.

(4) The Math as Math should have its quarters far off from both the Home and Vidyalaya and if it must have male and female members there should be separate quarters at a distance from each other for the two sexes.

(5) The employment of the Sevaks and Sevikas of the Math for any work of the Home or the Vidyalaya should be at the entire discretion of the Managing Committees of the two institutions.

(6) The Math should enlist as members only grown up persons, say above the age of 30.

(7) So long as any Sevaks or Sevikas of the Math are serving in the Home or the Vidyalaya, no one from the inmates or the teaching or the superintending staff of institutions should be admitted as a Savak or Sevika of the Math until two years have elapsed since the person's connection with the institutions ceased.

## The Hindu Widows' Home at Poona

Elsewhere we publish under the heading of 'A Knotty Problem' an article from a gentleman, on whose information and judgment we can place implicit reliance and whose disinterested friendship for the cause we can confidently vouchsafe, on the rather delicate but for the matter of that highly important subject of the plight to which the the Anath Balikashram or the Hindu Widows' Home at Poona has come owing to the starting of two new institutions in its neighbourhood. That indefatigable and unquestionably sincere worker, Prof. Karve, who founded the Home, is also the founder of its two new associates–the Mahila Vidyalaya and the Nishkama Karma Math. We believe we will not be wrong if we lay it down categorically that the general public understand that all these three institutions are working smoothly and harmoniously and with a substantial agreement as to the aims and objects and the methods and principles of work. Doubtless, most patrons send their subscriptions with implicit trust in Prof. Karve's disposals of the fund and allotments as between the three institutions. The facts disclosed in the article we publish by our 'trusted and esteemed friend' and the story they make up of rivalries, differences and wanton wastes of resources will therefore come almost as a surprising revelation to the friends of the Widows' Home and the general cause of Social Reform in the Deccan and our Presidency. There can be no question whatsoever, let us put it down most emphatically, of finding fault with or throwing personal blame on Prof. Karve, or of belittling his great past services. He himself will however be the last person not to allow people to differ from him, and we are persuaded that most sensible people will endorse the criticisms of our 'trusted and esteemed friend' on the Nishkama Karma Math and its ways, on its obsession over the Mahila Vidyalaya, on the irresponsible and

autocratic manner in which these two institutions are managed, and on the untoward results produced thereby on the present condition and future prospects of the Widows' Home. We confess, that we for one feel most anxious on account of the Widows' Home. For the Math and its quixotic ideals we care little and few will take much interest in its fortunes. The Mahila Vidyalaya--aiming merely at giving higher education to girls of all kinds and incidentally at raising the age of marriage—is by no means a novel institution or the only one of its kind. With the thriving Female High School at Poona, with the very well conducted' Chanda Ramji and St. L. So. Society's and other Girls' High Schools in Bombay, with the new High Schools for Girls established at Amraoti, Gwalior and Indore and with the sure prospect of similar institutions springing up elsewhere, even the total disappearance of the Mahila Vipyalaya would be no irreparable calamity. The Widows' Home, on the other hand, is an institution, the sacredness of whose mission of altruistic charity requires no expounding; and the fact of its being the only institution of the kind in the Deccan, is one which entitles it to the most solicitous care and support of all friends of social reform. If therefore, as the writer of our contributed article shows, it is the Widows' Home that is suffering, the situation developed at Poona requires promptest and effective remedies. Our friend does not play the role of a mere destructive critic. He has detailed suggestions to make and these seem to be not only very well thought of but also conceived in a spirit of amity and compromise. We should very much like to learn what Prof. Karve has to say in regard to them. We should also welcome suggestions from the thinking public. We are anxious for nothing else but a a satisfactory settlement. An honest endeavour to bring on such settlement has been the only motive for our taking up the subject, the information given to us showing clearly that an impasse has developed on the subject between the workers and controllers of the three insti-

tutes at Poona and that a free public discussion would best help a right solution.

यानंतर मठासंबंधानें वर्तमानपत्रांतून कांहींएक चर्चा झाल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं.

इंदुप्रकाशांतील लेखकांप्रमाणेंच आश्रमाच्या व्यवस्थापक मंडळींतील बहुतेक सभासदांचीं मनें मठासंबंधानें फार कलुषित झालेलीं होतीं. आश्रमाच्या शाळेंत विद्यालयाच्या मुली घेण्यासंबंधाचा ठराव व्यवस्थापक मंडळीनें तारीख ४ सप्टेंबर १९१३ रोजीं भरलेल्या सभेंत केला, त्या वेळीं एक अट घालण्यांत आली ती अशी:—

" विद्यालयांत मठाच्या सभा भरवूं नयेत. "

थोरथोर मनुष्यांचें मठासंबंधानें असें मत व्हावें, यापेक्षां मठाचें आणखी दुर्दैव तें कोणतें असावयाचें होतें? मठाचीं सर्व मनुष्यें विद्यालयाच्या आवारांत येऊन राहिलीं तरी चालत होतीं, व प्रसंगविशेषीं तीं रहातहि होतीं; पण त्यांची सभा तेथें भरण्याला परवानगी नव्हती.

कांहीं दिवस जाऊं देऊन या मनोवृत्तींत कांहीं फरक पडेल तर पहावा, व आश्रम आणि विद्यालय या दोन संस्थांचा आयुष्यक्रम आणखी एकदोन वर्षें तरी निर्वेध चालावा, एवढ्यासाठींच ही अट कबूल करण्यांत आली होती. मठाची संस्था अगदीं निर्दोष नसेल, किंवा आरंभीं किरकोळ गोष्टींत कांहीं चुका झाल्या असतील; पण तेवढ्यासाठीं ती संस्था थोर पुरुषांच्या बहिष्काराला पात्र व्हावी याला दैवदुर्विलास म्हणावें कीं काय म्हणावें, हेंच मला समजत नाहीं! मठ हें नांव ऐकल्याबरोबर ' मोनास्टरी ' वांचून दुसरी ज्यांना कल्पना होत नाहीं, त्यांची समजूत घालणें कठिण आहे. मला तर तें नांव अत्यंत प्रोत्साहक वाटतें. मठ ही संस्था ' सर्व्हंट्स आफ् इंडिया सोसायटी ' अगर एकादें मिशन यांहून यत्किंचित्हि भिन्न नव्हती. सेवकसेविकांनीं अंगीकारावयाचीं व्रतें अक्षरशः सर्व्हंट्स आफ् इंडिया सोसायटीच्या नियमांतून घेतलीं होतीं. त्या सोसायटीचें ध्येय वेगळें व मठाचें ध्येय वेगळें एवढाच काय तो फरक होता. आश्रम आणि विद्यालय या संस्था जशा अनुकरणीय होत आहेत त्याचप्रमाणें मठ ही संस्था अनुकरणीय करून दाखविण्याची मला उमेद होती. मठाचे नियम

म्हणजे वज्रलेप नव्हते. थोडीथोडी दुरुस्ती होऊन हे तयार झाले होते व अजूनहि त्यांत दुरुस्ती होणार होती. मठाचें जें स्वरूपवर्णन दिलेलें आहे, त्यावरून त्याविषयीं सहानुभूतीच्या दृष्टीनें पाहिलें असतां सर्व कळून येईल. मठ ही पवित्र संस्था व्हावी यासाठीं माझी धडपड चालली होती व माझा हेतु अंशतः तरी सफल होईल, अशी मला खात्री वाटत होती.

सुदैवानें उभयपक्षीं मनःस्थिति बदलण्याला लवकरच आरंभ झाला, आणि हळूहळू सर्व संस्थांच्या हिताकडे दृष्टि जाऊन त्यांच्या एकीकरणाचे विचार सर्वांच्या मनांत येऊं लागले व या सुविचारांचा परिणाम लवकरच घडून आला. मदभेद व अंतःकलह यांना मुख्य कारण काय झालें व या सर्वांचा गोड शेवट कसा झाला, तो प्रकार पुढल्या दोन प्रकरणांत दिला आहे.

# प्रकरण एकसष्टावें

## माझे कांहीं स्वभावदोष

दुसऱ्याला नाखुष करणें माझ्या अगदीं जीवावर येतें. या माझ्या स्वभावामुळें माझ्या मुलांवरसुद्धां कधीं माझा दाब नसतो. तीं लहानपणापासूनच माझ्याजवळ अगदीं सलगीनें व निर्भीडपणें वागूं लागतात. अण्णा आपणावर रागावतील अशी भीतिच त्यांना वाटत नाहीं. मोठ्या दोन मुलांना एकदोन वेळां तरी शिक्षेचे प्रसंग आले; पण धाकट्या दोन मुलांना शिक्षा केल्याचें मला स्मरत नाहीं. जीं दुसरीं मुलें अभ्यासासाठीं मजकडे होतीं, त्यांना रागाचे शब्द बोलण्याचे प्रसंगसुद्धां फार थोडे आले असतील. इतका गोडपणा जगांत चालावयाचा नाहीं; परंतु तो माझ्या अंगीं खिळल्यामुळें इसापनीतींतील लांकडाच्या ओंड्याच्या राजाप्रमाणें माझी स्थिति होते.

या दोषामुळें दुसऱ्याचे अपराध पोटांत घालण्याकडे माझ्या मनाची प्रवृत्ति फार होते व अपराधाला योग्य शासन मजकडून होत नाहीं. यामुळें शिस्त राखण्याच्या कामीं माझ्या हातून ढिलाई होते. एकदोन वेळां न्यू इंग्लिश स्कुलांत सुपरिंटेंडेंटचें व असिस्टंट सुपरिंटेंडेंटचें काम मजकडे आलें होतें त्या वेळीं मुलें माझ्या या स्वभावाचा फायदा घेत. दरमहाची फी १२ तारखेच्या आंत दिली पाहिजे. उशीर झाल्यास एक पैसाप्रमाणें दंड द्यावा, असा नियम असे. कांहीं तरी सबबी सांगून दंड माफ करून घेण्यासाठीं मुलें मजकडे येत व कधींकधीं त्यांना नाखुष करण्याऐवजीं मीच त्यांच्या दंडाचे पैसे त्यांच्याजवळ देऊन त्यांना परत पाठवीत असें.

या स्वभावदोषामुळें अधिकार चालविण्याच्या कामाला मी अगदीं निरुपयोगी आहें. एका विशेष परिचयाच्या लाइफ-मेंबर मित्रांनीं विनोदानें माझें नांव ‘ गोब्राह्मण ’ ठेविलें होतें. या विनोदाच्या लहानशा नांवांत माझें स्वभाववर्णन बरेंचसें उतरलें आहे. एकदां एका पदवीवर शिक्षकांना लेडी सुपरिंटेंडेंट यांनीं खालच्या इयत्तांवर काम दिलें. यामुळें आपला अपमान झाला अशी समजूत करून घेऊन ते ताठ्यानें वर्ग शिकविण्याला गेले नाहींत. ही गोष्ट मजकडे आली तेव्हां मीं त्यांना बोलाविलें,

व "तुमच्या वर्तनाबद्दल मी तुह्मांला बोलणार आहें, याबद्दल मला क्षमा करा," असें म्हणून त्यांना प्रथम साष्टांग नमस्कार घातला व नंतर " तुम्हीं केलें हें बरें केलें नाहीं " वगैरे त्यांना सांगितलें. हा सर्व प्रकार लेडी सुपरिटेंडेंट यांच्या समक्ष घडला. आणखी एकदोन प्रसंगीं आश्रमांतील शिक्षकांशीं मीं असलेंच वर्तन केलें. त्या प्रसंगीं तिसरें कोणी मनुष्य हजर नव्हतें, एवढेंच काय तें.

या दोषाचेंच एक भिन्न स्वरूप पुढील उदाहरणांत आहे. एकदां आश्रमांतील एका विद्यार्थिनीच्या हातून बराच मोठा अपराध घडला. अमुक एक गोष्ट तूं करूं नको असें बजावून सांगितलें असतांहि तिनें ती केली होती. ही मुलगी अतिशय तापट व प्रसंगीं भलतेंच कांहीं करील अशा स्वभावाची होती. शिवाय ती पोरकी होती. हिला आतां काय शिक्षा करावी हा मला मोठा विचार पडला, व हिला बोलूं लागल्यावर माझा राग अनावर होईल कीं काय, ही मला भीति पडली. मीं तिला एकटीलाच बोलावून आणलें व तिची कानउघाडणी करून तिनें केलेल्या चुकीचा प्रसंगीं केवढा घातक परिणाम झाला असता, हें तिच्या नजरेला आणून दिलें. कांहीं वेळ माझी शांत वृत्ति राहिली; पण नंतर राग येऊं लागला. तथापि हिला कडक शिक्षा केली तर ती आततायीपणानें भलतेंच कांहीं करील, हा विचार मनांतून गेला नाहीं. सौम्य शिक्षेनें कार्यभाग होण्यासारखा नव्हता. " या अपराधाला तुला कडक शासन पाहिजे; परंतु तें करण्याला मला धैर्य होत नाहीं. यासाठीं तें मीं स्वतःलाच करून घेतों " असें म्हणून खूप जोरानें मीं आपल्याच श्रीमुखांत फडकाविली, व ' पुन्हां असें करूं नको, ' एवढें सांगून तिला परत पाठविलें. यानंतर मी तिच्याशीं मायेनें वागलों, व पुढें तिनें अपराधही केला नाहीं. ती आतां आश्रम सोडून गेली असून सुस्थितींत आहे.

या मनाच्या दुर्बलतेमुळेंच माझ्या अंगीं उत्पन्न झालेला मोठा दोष म्हणजे हाताखालच्या व बरोबरीच्या मनुष्यांशीं योग्य रीतीनें वागतां न येणें हा होय. आश्रम, विद्यालय व मठ यांच्या परस्परसंबंधांत जी अनर्थपरंपरा उत्पन्न झाली, तिचें मुख्य कारण माझ्या अंगचा हा दोष होय. या

माझ्या स्वभावदोषाचे परिणाम कांहींना भोंवलेच आहेत, व यापुढेंहि ते कितीकांना भोंवतील, हें सांगतां येत नाहीं. जोंपर्यंत सर्व एकमार्गी होतें, तोंपर्यंत सगळें ठीक चाललें. पण भिन्न मतांचीं व परस्परांशीं पटत नाहीं अशीं अनेक मनुष्यें एकत्र जमल्यानंतर कलीला सुरुवात झाली. ती लोकांच्या नजरेला अलीकडे आली एवढेंच. तिचें बीज बरेंच जुनें आहे. तें मनुष्यस्वभावाशीं खिळलेलेंच आहे, व चार मनुष्यें एकत्र झालीं कीं, त्याचा थोडाफार प्रादुर्भाव व्हावयाचाच. कर्त्या माणसांचें खरें शहाणपण या बीजाला अंकुर फुटूं लागल्याबरोबर जेथच्या तेथें त्याचा मोड करण्यांत आहे. हें माझ्या अंगीं अगदींच नसल्यामुळें सर्व अनिष्ट प्रकार घडून आले. जेव्हां मीं उत्साहानें या गोष्टी हातीं घेतल्या, त्या वेळीं मला हे दूरवरचे परिणाम दिसले नाहींत. एकट्या मनुष्याशीं प्रसंग असल्यास आपण माघार घेऊन प्रकरण निकालाला लावतां येतें; परंतु परस्परांविषयीं ज्यांचीं मनें शुद्ध नाहींत अशा अनेक व्यक्तींशीं प्रसंग आला म्हणजे मी गोंधळून जातों, व मला कांहीं सुचत नाहीं. अशा वेळीं मी कात्रींत सांपडल्या-सारखा होतों, व त्यामुळें मला व इतरांना फार ताप होतो. मला ताप होतो त्याबद्दल वाईट वाटत नाहीं. कारण, माझ्या स्वभावदोषाचा परिणाम मला भोगलाच पाहिजे. परंतु इतरांना ताप होतो त्याबद्दल फार वाईट वाटतें.

आणखी एक दोष–किंवा त्याला दोष म्हणण्यापेक्षां गुणाचा अभाव म्हणणें अधिक बरें–माझ्या अंगीं आहे. आपल्याबद्दल कोणाचा गैरसमज झालेला असला, तर योग्य वेळ साधून आपली बाजू युक्तिप्रयुक्तीनें त्याज-पुढें मांडून तो दूर करण्याचें चातुर्य मजमध्यें नसल्यामुळें अशा प्रसंगीं मला काळावर भिस्त ठेवूनच स्वस्थ बसावें लागतें व केव्हांकेव्हां गैरसमज अधिकच पसरत जातात. एकदां माझ्या दोघां मित्रांनीं निष्काम-कर्म-मठाच्या उद्योगापासून मला परावृत्त करण्यासाठीं सद्बुद्धीनें माझी कान-उघाडणी करण्याचा यत्न केला. माझ्यासंबंधानें त्यांचें मन इतरांच्या तोंडच्या तिखटमीठ लावलेल्या गोष्टी ऐकून बरेंच कलुषित झालें असावें, असें मला वाटत होतें. तेव्हां यांची समजूत पाडणें आपल्या हातून होणार नाहीं हें जाणून मी त्या भानगडींत न पडतां, या कामांत जें मीं पुढें पाऊल टाकलें आहे तें मागें घेण्याची माझी इच्छा नाहीं, इतकेंच सांगून

मी मोकळा झालों. आपली खरी बाजूहि नीटपणें पुढें मांडतां न आल्यामुळें कित्येक थोर गृहस्थांचा मजबद्दल गैरसमज व्हावा व तो वर्षानुवर्षे कायम रहावा, असेंहि क्वचित् घडतें.

जेथें आपलें समर्थन करण्यासाठीं दुसऱ्याचा दोष अगर कमीपणा दाखविल्यावांचून गत्यंतर नसतें, तेथें आपणच कमीपणा पतकरून स्वस्थ बसणें मला बरें वाटतें. हें मी थोर मनानें करतों असें नव्हे. दुसऱ्याचा दोष दाखवावयाचा म्हणजे तो सिद्ध केला पाहिजे व तें करणें सोपें नसतें; यासाठीं आपली बाजू लंगडी आहे असें पतकरणेंच माझ्यासारख्या स्वभावाच्या मनुष्याला सोईचें होतें. यामुळें देखील कित्येक वेळां गैरसमज तसेच रहातात.

आश्रमाच्या कमिटीच्या सभांच्या वेळीं अंतःकलहासंबंधाचा कांहीं विषय निघाला तर 'मी आतां वेडा झालों आहे' एवढेंच सांगून मी मोकळा होत असें. या मंडळीची समजूत घालणें माझ्या आटोक्याबाहेर असल्यामुळें मला या मार्गाचाच अवलंब करावा लागे.

माझा स्वभाव मूळचा रागीट आहे; पण प्रयत्नांनीं राग आंतल्याआंत दाबून टाकण्याला मी शिकलों आहें. तथापि कधीं कधीं तो बाहेर पडतो, व अशा प्रसंगीं दुसऱ्याला लागण्यासारखे शब्द माझ्या तोंडून निघतात; पण असे प्रसंग थोडे येतात.

एकादी गोष्ट मला बरी वाटली व ती मी हातीं घेतली म्हणजे दुसऱ्यांच्या बऱ्यावाईट म्हणण्याकडे लक्ष न देतां होतां होईल तों तीपासून माघार घ्यावयाची नाहीं, असा माझा स्वभाव असल्यामुळें कधीं कधीं त्याला हट्टीपणाचें स्वरूप येतें.

या दोषांवर पांघरूण घालणारा एक लहानसा गुण माझ्या अंगीं आहे, एवढीच त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. एखाद्या तत्त्वाचा प्रश्न अगर महत्त्वाची बाब नसली, म्हणजे आपलें म्हणणें मागें घेऊन क्षमा मागण्याला अगर तोडजोड करण्याला मी नेहमीं तयार असतों. त्याचप्रमाणें विशेष महत्त्वाच्या कामीं मतभेद झाल्यास चिकाटीनें आपल्या विचाराप्रमाणें वागून निगरगट्ट बनून प्राप्त स्थितीला तोंड देण्यालाहि मी तयार असतों.

# प्रकरण बासष्ठावें

## त्रिवेणीसंगम

### अथवा

## आश्रम, विद्यालय व मठ यांचें एकीकरण

निसर्गाच्या उत्क्रमणव्यवस्थेंत तोडजोडीचें तत्त्व पदोपदीं निदर्शनाला येतें. तोडजोडीवांचून मनुष्यव्यवहार अशक्यच झाले असते. योग्य वेळीं तोडजोड न झाल्यानें केवढाले अनर्थ गुदरतात याचीं उदाहरणें इतिहासांत शेंकडों आढळतील. तोडजोड होणें अशक्य झालें, म्हणजे युद्धें उपस्थित होतात व पुढें तोडजोड होते तेव्हांच तीं बंद होतात. खासगी व्यवहारांत तोडजोडीचे प्रसंग क्षणोक्षणीं असतात. सार्वजनिक व्यवहारांत तोडजोडीचें महत्त्व फार आहे. योग्य प्रसंगीं तोडजोड न झाल्यामुळें पुष्कळ वेळां संस्थांचें व राष्ट्रांचे भयंकर नुकसान होतें.

मागील प्रकरणांत सांगितलेल्या एका स्वभावदोषामुळें आश्रमाच्या नियामक मंडळींची समजूत न घालतां आल्याकारणानें महिलाविद्यालयाची वेगळी संस्था काढणें मला भाग पडलें व दोन्ही संस्था चालविण्यासाठीं मंडळी तयार व्हावी म्हणून निष्काम–कर्म–मठ ही निराळी संस्था काढणेंहि क्रमप्राप्तच झालें. अशा रीतीनें एका बाजूला आश्रम व दुसऱ्या बाजूला विद्यालय आणि मठ अशा एकमेकांपासून भिन्न दोन व्यवस्था झाल्या. आश्रमाचा बहुतेक कारभार जरी व्यवस्थापक मंडळीच्या अनुमतीनें चालत होता तरी संस्थेची मुख्य जबाबदारी मजवरच होती. विद्यालय व मठ यांची जबाबदारी आरंभीं सर्व मजवर होती. पुढें मठाला व्यवस्थित स्वरूप आल्यावर या संस्थांचें काम सेवक-सेविकांच्या अनुमतीनें चालूं लागलें. तरी जबाबदारीचा मुख्य भाग मजवरच होता.

मनाची दुर्बलता हा जो माझ्या अंगचा मुख्य दोष त्यामुळें कोणत्याहि संस्थेचा सूत्रधार होण्याला मी योग्य नसतां तें सूत्रधारत्व मजकडे आलें, व त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. जवळच्या मनुष्यांमधील गुणावगुण

ओळखून निरनिराळ्या मनुष्यांना त्यांच्या त्यांच्या पायरीनें ठेवून त्यांना तारतम्यानें वागविणें हें मला कधीं साधलें नाहीं. तरतमभाव जगांत सर्वत्र पसरला आहे, तो ओळखून ज्याला वागतां येत नाहीं, तो मनुष्य जगांतील व्यवहाराला निरुपयोगी समजावयाचा. मला तरतमभाव अगदीं ओळखतां येत नाहीं असाच केवळ प्रकार नव्हे; पण तो ओळखल्यानंतर त्याप्रमाणें मनुष्यांना वागविण्याच्या कामीं जी धूर्तता व जो खरमरीतपणा लागतो त्यांचा मजमध्यें अभाव असल्यामुळें वरील संस्थांतल्या कार्यकारी मनुष्यांच्या परस्परसंबंधांत मतभेद व गैरसमज आणि त्यामुळें उत्पन्न होणारे अंतःकलह यांना उग्रस्वरूप प्राप्त झालें. यांचे तीन प्रकार होते. भिन्नमूली संस्थांच्या चालकांमधील आपसांतल्या गैरसमजुती व मतभेद होतेच, व शिवाय उभय संस्थांच्या निकटवर्तित्वामुळें उत्पन्न होणाऱ्या परस्परांविषयींच्या गैरसमजुती व मतभेद हेहि होते. कांहीं खेळ खेळतांना खेळगड्यांची संख्या विषम असली म्हणजे एक गडी कानचिपला म्हणून निवडला जातो. याला दोन्ही बाजूंनीं खेळावयाचें असतें. इकडे त्याला लोणचें म्हणतात. माझी स्थिति या कानचिपल्यासारखी होती. मात्र करमणुकीच्या खेळांत कानचिपल्याची स्थिति इष्ट असते व या ठिकाणीं त्याच्या उलट प्रकार होता, एवढेंच. वरील तीनहि प्रकारांत माझा संबंध जेथेंतेथें येई. अशी प्रकारची मनाची ओढाताण चालली असतांहि सर्व संस्थांची साधारण मानानें प्रगतिच होत होती, ही त्यांतल्या त्यांत मनाला धीर देणारी गोष्ट होती.

एका वेळीं एका बाजूला आश्रम आणि दुसऱ्या बाजूला विद्यालय व मठ यांच्या परस्परसंबंधांत अतिशय ताण उत्पन्न झालेला होता. सभोंवतालचें वातावरण सुमारें दोन वर्षें फार क्षुब्ध स्थितींत होतें. इंदुप्रकाशांतील पत्र प्रसिद्ध झालें त्या वेळीं सर्व स्थिरस्थावर होऊन पुष्कळ महिने लोटले होते. परंतु तें पत्र म्हणजे क्षुब्ध वातावरणाच्या वेळच्या स्थितीचा जणूं फोटोग्राफच होय. त्या वेळचें माझ्या मनाच्या स्थितीचें प्रतिबिंब १९१२ च्या जुलै महिन्यांत प्रसिद्ध केलेल्या मठाच्या पहिल्याच वार्षिक रिपोर्टांतील शेवटल्या पारिग्राफांत दिसून येईल. तो पारिग्राफ असाः—

" अशा रीतीनें निष्काम-कर्म-मठाचा पाया घातला गेला आहे. यावर सुंदर व भव्य इमारत उठते अगर याचाच एकेक दगड कोसळून तो

जमीनदोस्त होतो, हें भविष्यकाळीं ठरावयाचें आहे. असल्या संस्था सुरळीत चालण्याला केवळ पैशाचा स्वार्थत्याग करून भागत नाहीं. अहंकार, स्वतःच्या मताचा फाजील अभिमान, परमतासहिष्णुता वगैरे अनेक मनोवृत्ति सहकार्याच्या आड येतात. कार्यकारी माणसें असल्या मनोवृत्तींच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें संस्था लयाला गेल्याचीं उदाहरणें आपल्या देशांत सध्यांच्या काळीं हवीं तेवढीं सांपडतील. अशी स्थिति आहे तरी 'प्रारम्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः' या कव्युक्तीप्रमाणें 'मध्य' पदाला तरी पात्र व्हावें या बुद्धीनें हा आरंभ केला आहे. हें नाटक शोकपर्यवसायी व्हावयाचें असलें तरी त्यांतील जीं पात्रें आपापलीं कामें मनःपूर्वक करतील त्यांना विषाद वाटण्याचें कारण नाहीं."

महिलाविद्यालयाची संस्था ही आश्रमाची योग्य प्रकारची वाढ होय, आणि या दोन्ही संस्था केव्हांतरी एकजीव झाल्या पाहिजेत, असें मला वाटत होतें. २० जून १९०८ रोजीं प्रसिद्ध केलेल्या विद्यालयाच्या माहितीच्या इंग्लिश पत्रकांत पुढील वाक्यें आहेत:—

"These numbers* clearly prove a growing desire on the part of the public to make use of the Widows' Home for the education of married and unmarried girls. If this healthy desire on the part of the public was to be carefully nursed, the only alternatives were either to induce the authorities of the Widows' Home to remove the restriction or to start an institution on the model of the Widows' Home to provide for the growing want. The first alternative being found impossible, the only course left open was to make an effort for a new institution with a view to get it amalgamated or co-ordinated with the Widows' Home, if it became possible at a later stage."

१९०९ च्या जानेवारींत विद्यालयाचा दुसरा रिपोर्ट प्रसिद्ध केला, त्यांत पुढील विचार आहेत:—

"संस्थेच्या हल्लींच्या स्थितींत 'विद्यालय' हें नांव अन्वर्थक नाहीं. सध्यां विद्यालय हें केवळ बोर्डिंग झालें आहे...ही स्थिति लवकर नाहींशी होऊन

---

* हे आंकडे म्हणजे आश्रमांतील अविधवा विद्यार्थिनीची वाढ दर्शविणारे पृष्ठ ३७९ याजवरील आंकडे होत.

'विद्यालय' हें नांव सार्थ व्हावें अशी फार इच्छा आहे. मुलांच्या काय किंवा मुलींच्या काय, बोर्डिंगशाळा म्हटल्या कीं त्या शहरापासून दूर अशा एकान्त स्थळींच पाहिजेत. पण द्रव्याच्या अनुकूलतेशिवाय हें साध्य होणें शक्य नाहीं. हा योग जितका लवकर येईल तितकें चांगलें."

"अनाथबालिकाश्रम व महिलाविद्यालय या दोन संस्थांनीं मिलाफानें काम केल्यास मोठी बहार होईल. यांनीं आपापलीं बोर्डिंगें निराळीं चालवून दोहोंची शाळा एकत्र चालविल्यास स्त्रीशिक्षणाचें एक नमुनेदार स्थान अस्तित्वांत येऊं शकेल. दोन्ही शाळांतील विद्यार्थिनी एकत्र झाल्यानें त्यांची संख्या बरीच वाढेल, आणि त्यांचें वर्गीकरण करण्यास सोयीवार पडेल; आणि खर्चाचा बोजा एकट्या संस्थेवर न पडतां तो दोहोंमध्यें विभागला जाईल. आश्रमानें मनांत आणलें व विद्यालयाला हाताशीं धरलें, तर हा मिलाफ लवकर होऊं शकेल. आश्रमाशीं बरोबरीच्या नात्यानें वागण्यासारखे दिवस विद्यालयाला यावयाचे असल्यास त्याला अजून बरींच वर्षे पाहिजेत. तथापि विद्यालयाचें बोर्डिंग बांधण्यासाठीं सातआठ हजार रुपये व दोन्ही संस्थांची मिळून एक शाळा बांधणें झाल्यास तिच्यासाठीं सातआठ हजार रुपये इतके खर्च करण्याची ऐपत विद्यालयाच्या अंगीं येईल तितकी लवकर आणावी व मग दोन्ही संस्थांचा मिलाफ घडवून आणण्यासाठीं नेटाचा यत्न करावा, अशी इच्छा आहे."

आश्रम, विद्यालय व मठ या संस्थांचें एकीकरण व्हावें, असें जरी मला वाटत होतें, तरी तें लवकर घडून येणें शक्य नव्हतें. धातूचे तुकडे सांधावयाचे झाल्यास त्यांना पूर्वीं चांगली आंच मिळून ते मऊ व्हावे लागतात. हे एकाच डोंगरांतून निघालेले प्रवाह भिन्न मार्गांनीं जाऊनच त्यांचा संगम होणें क्रमप्राप्त झालें. या नव्या संस्थांमध्येंहि नैसर्गिक तेज असून त्या आपापल्यापरी थोडें तरी कार्य करणार हें आश्रमाच्या नियामक वर्गाला दिसूं लागलें, तेव्हांच हें ऐक्य शक्य झालें. अशी खात्री होण्याला मध्यंतरीं कांहीं काळ जाणें भागच होतें. इतक्या निकट असणाऱ्या या संस्थांचें ऐक्य झाल्यावांचून दुसरी गति नव्हती ही एक गोष्ट, व त्यांचा एकजीव झाल्यानें एक मोठी उपयुक्त संघटना होण्याचा पुष्कळसा संभव दिसूं लागला, ही दुसरी गोष्ट. यांचा परिणाम जबाबदार मनुष्यांच्या

मनांवर घडल्यामुळें कार्यसिद्धि होण्याला विलंब लागला नाहीं. सर्वांनीं मोठें मन करून आपापल्या बाजूनें जरूर तितकी माघार घेऊन गुण्यागोविंदानें तोडजोड घडवून आणली, ही त्यांतल्यात्यांत मोठ्या आनंदाची गोष्ट झाली. विशेषतः आश्रमाच्या नियामकमंडळीनें यावेळीं मोठ्या उदार मनानें व दूरदर्शीपणानें मठाच्या सर्व मंडळीचा संग्रह करून ऐक्य घडवून आणलें हें या संस्थांचें मोठें भाग्य होय. आश्रमाच्या मंडळीची कायदेशीर घटना झालेलीच होती, तींत जरूर तो फेरबदल करून त्या संस्थेंतच विद्यालय व मठ यांचा अंतर्भाव करण्यांत आला, व या संस्थांची सर्व जबाबदारी त्या मंडळीनें आपल्या अंगावर घेतली. आश्रमाच्या मंडळीचे सभासद होण्याला जितकें द्रव्यसाहाय्य द्यावें लागतें तितकें ज्यांनीं विद्यालय व मठ यांना दिलें असेल त्यांना मंडळीचे सभासद करून घेण्यांत आलें, व आश्रमाचे लाइफमेंबर आणि मठाच्या सेवकसेविका या सर्वांचें एक कार्यकारी मंडळ बनविण्यांत येऊन त्याच्या हातीं प्रवर्तक सत्ता देण्यांत आली. आतां या संयुक्तसंस्थेची घटना डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नमुन्यावर केली आहे. संस्थेची आजन्मसेवा करणारांचें कार्यकारी मंडळ, शाळेंतील शिस्तीचे व अभ्यासक्रमाचे वगैरे नियम घालून देण्यासाठीं स्कूलबोर्ड, संस्थेच्या सर्व कामांचें नियमन करणारी व्यवस्थापक मंडळी आणि तिला निवडून देणारी व संस्थेचे मुख्य नियम वगैरे करणारी, द्रव्यानें मदत करणाऱ्या सभासदांची व संस्थेच्या आजन्मसेवकांची मिळून सभा, इतक्या सर्वांची ही नवीन संस्था बनली आहे. आतां ही संस्था केवळ विधवांच्याच शिक्षणाचा प्रश्न हातीं न घेतां सामान्यतः स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाकडे लक्ष देईल. विधवांचें शिक्षण हें कार्यक्रमांतील एक प्रमुख अंग होऊन राहील हें सांगावयाला नकोच.

आतां ही नवीन संस्था जोमानें वाढीला लागेल अशी आशा करण्याला बरीच जागा झाली आहे. माझ्या स्वभावदोषांमुळें उत्पन्न होणारे दुष्परिणाम टाळण्याला नवी संघटना उपयोगीं पडेल. जोंपर्यंत मनुष्यस्वभाव कायम आहे, तोंपर्यंत मतभेद व गैरसमजुती राहणारच. पण त्यांचा निकाल लागून तो अमलांत येण्याची व्यवस्था झाली म्हणजे ठीक जुळतें. आतां सर्व व्यवस्था एकतंत्री झाली आहे, व संस्थेच्या आजन्मसेवकांमध्यें

शहाणीं व समजदार मनुष्यें बरींच आहेत. त्यांच्या वेगळेगळ्या कमेट्यां-पुढें वादग्रस्त प्रश्न ठेवून त्यांनीं केलेला निकाल सर्वांनीं मान्य करावा, असें पूर्वींच्या अनुभवांनीं भाजल्यापोळल्यामुळें आम्हांला वाटूं लागलें आहे. आम्हांला मिळालेली आंच सहकार्याकडे आमच्या मनोवृत्तींचा ओघ वळवील अशी बरीच आशा वाटत आहे.

या संस्थेंत थोडासा नवीन जोम भरेल अशी आशा करण्याला आणखी एक कारण आहे. विशेष प्रकारच्या अनुभवांनीं ज्यांच्या अंगीं कांहीं सात्त्विक गुणांचा विकास झाला आहे अशा एका तरुण विद्वान् गृहस्थांच्या मनांत आश्रम, विद्यालय व मठ या तीनहि संस्थांविषयीं असामान्य प्रेमाचा अंकुर उद्भवला आहे. या संस्थांचें ऐक्य होण्याचा कांहींएक संभव दिसत नव्हता तेव्हांपासूनच या ठिकाणीं आपला जन्म घालविण्याचा संकल्प त्यांनीं केला होता. या संकल्पाला आतां निश्चयाचें स्वरूप आलें आहे व चारदोन महिन्यांच्या आंतच ते संस्थेचे आजन्मसेवक बनून काम करण्यास येतील, अशी बळकट आशा वाटत आहे.

आश्रम, विद्यालय व मठ यांच्या एकीकरणानें बनलेल्या या त्रिवेणी-संगमाला ' महिलाश्रम ' हें नांव द्यावें, असें लोककार्यासाठीं तळमळणाऱ्या एका देशभक्तानें सुचविलें आहे. ही सूचना मान्य झाल्यास या नवसंघट-नेला अन्वर्थक व पूर्वेतिहाससूचक नांव मिळेल. एका संस्थेच्या नांवाचा पहिला शब्द व दुसरीच्या नांवाचा शेवटचा शब्द यांच्या संयोगानें बन-लेल्या या नांवांत आश्रम शब्दानें मठ शब्दाच्या अर्थाचाहि अंतर्भाव होत असल्यामुळें या तीनहि संस्थांची निदर्शक अशी ही शब्दरचना होईल. या त्रिवेणीसंगमाच्या तीर्थाचें माहात्म्य वाढो व त्यांत मज्जन करून हजारों भरतकन्या स्वतःच्या व मातृभूमीच्या उद्धाराला साहाय्यभूत होवोत !

# प्रकरण त्रेसष्टावें

## स्टूडंट्स फंड

पुढील दोन वर्षें मीं फर्ग्युसन कॉलेजाचें काम मनापासून केलें. स्वतःचें ज्ञान वाढविणें व विद्यार्थ्यांच्या उपयोगीं पडणें हेच विचार मुख्यत्वें-करून माझ्या मनांत असत. नंतर विधवाविवाहाच्या कार्यासाठीं मंडळी स्थापन करण्याचे विचार प्रबल झाले व माझा फुरसतीचा बराच वेळ या कामीं खर्च होऊं लागला. पुढें आणखी अनाथबालिकाश्रमाची उभारणी करण्याचे विचार मनांत येऊं लागले व या दोन संस्थांनीं माझ्या अंतः-करणांतील बरीच जागा अडविली. अर्थात् डेक्कन एज्युकेशन सोसायटीसंबंधा-नें माझें कर्तव्य माझ्या मनाला समाधान वाटण्यासारखें होईना. वेळ-च्यावेळीं शाळेंत अगर कॉलेजांत जाऊन तेथला कार्यभाग यथाशक्ति उर-कण्यांत मीं कसूर केली नाहीं. मजकडे दिलेलें शिकविण्याचें काम मी काळजी-पूर्वक करीत होतों. पण लाइफमेंबराचें सोसायटींतील काम सरकारी नोकरीप्रमाणें नाहीं; रात्रंदिवस सोसायटीच्या प्रगतीसंबंधाचे विचार मनांत बागवून तिच्या कल्याणासाठीं झटणें हें कळकळीच्या लाइफमेंबराचें कर्तव्य आहे. तें मजकडून नीट होत नाहीं ही गोष्ट माझ्या मनाला खाई. शिवाय ज्या दुसऱ्या कामांत मी पडलों त्यांत यश येण्याला, सोसायटीच्या कामा-मुळें मला समाजांत जी योग्यता मिळाली ती बऱ्याच अंशीं कारण झाली, ही जाणीव मला होती. यामुळें सोसायटीचें उतराई कसें व्हावें हा विचार पुष्कळ वेळां माझ्या मनांत येई. ज्या नवीन दिशांना माझें मन ओढ घेऊं लागलें होतें तिकडून त्याला परतविणें अशक्य होतें. तेव्हां सोसायटीच्या उपकारांची फेड करण्याला दुसराच कांहीं तरी उपाय योजावा, असें मला वाटूं लागलें. न्यू इंग्लिश स्कुलाचे जुने विद्यार्थी किती तरी आहेत. त्यांच्या अंगीं चेतना उत्पन्न होऊन शाळेसंबंधाच्या त्यांच्या कर्त-व्याची जागृति करून दिल्यास केवढें तरी कार्य होण्याचा संभव आहे असा विचार माझ्या मनांत आला व सुमारें पंधरावीस जुन्या विद्यार्थ्यांची एक लहानशी सभा गद्रे यांच्या वाड्यांत करून एक नवीन संस्था अस्तित्वांत आणण्याचा मीं यत्न केला. या संस्थेला 'न्यू इंग्लिश स्कूल असोसिएशन'

हें नांव दिलें असावेसें वाटतें. या संस्थेला प्रत्येक जुन्या विद्यार्थ्यानें आपली एक महिन्याची प्राप्ति द्यावी, व अशा रीतीनें एक मोठा फंड करून त्याचा उपयोग न्यू इंग्लिश स्कुलाच्या प्रगतीसाठीं करावा, असें मी योजिलें व यासंबंधानें कांहीं नियमहि पहिल्या सभेंत केले. त्यांतील एक मुख्य नियम असा होता कीं, या फंडाचें व्याज दरसाल खर्च न करितां तें मुद्दलांत मिळवीत जावें, व एकंदर फंड एक लाखाचा होईपर्यंत त्याला हात लावूं नये. या सभेचें प्रोसीडिंग ठेविलें होतें; पण ती वही कोठें नाहींशीं झाली. सोसायटीचे लाइफमेंबर व शाळेचे नवेजुने शिक्षक यांचाहि समावेश या संस्थेंत करावा व एक महिन्याची प्राप्ति देण्याचा पहिला धडा यांनींच घालून द्यावा, असें मनांत आणून त्यांपैकीं कांहींचें साहाय्य मी मिळविलें, व वर्गणी जमविण्याला सुरुवात केली. जुने विद्यार्थी शोधून काढून त्यांना भेटून त्यांजकडून वर्गणी मिळविण्याचे काम फार मोठें आहे. करण्याला कोणाला वेळ होईपर्यंत आपण या फंडाचा पाया घालून ठेवावा असा माझा उद्देश होता. सोसायटीचे लाइफ-मेंबर श्रीयुत कृष्णाजी पांडुरंग लिमये हे न्यू इंग्लिश स्कुलाचे जुने विद्यार्थी होते; तेव्हां त्यांच्याबरोबर जाऊन त्यांच्या वेळच्या कांहीं विद्यार्थ्यांच्या गांठीं घेतल्या. एका प्लेगच्या सुट्टींत बरीच फुरसत होती, त्या वेळीं हें काम केलें. माझ्या हातून हें काम जितकें होईल असें वाटलें होतें तितकें झालें नाहीं. अखेरीला तें अगदीं बंद पडलें तेव्हां १९०१ सालीं माझ्याजवळ असलेली शिल्लक ८२६८१०८९ मीं लाइफमेंबरांच्या बोर्डाच्या स्वाधीन केली. बोर्डानें हें काम न्यू इंग्लिश स्कूलच्या सुपरिंटेंडेंटांवर सोंपविलें. त्यांनीं एक इंग्रजी छापील पत्रक काढून तें कित्येक जुन्या विद्यार्थ्यांकडे पाठविले व या फंडाला मदत करण्याला त्यांना विनंति केली. हें काम त्यांनीं सुमारें एक वर्ष केलें. इतक्या मुदतींत हा फंड ८२६ रुपये होता तो १२९८ रुपये झाला. नंतर १९०५ च्या अखेरीपर्यंत हें काम तसेंच पडून राहिलें. या वेळीं हा फंड सव्याज १४८४८१२८५ झाला.

या वेळीं पुनः एकदां माझ्या मनानें उचल खाल्ली. इतर मंडळींत काम करण्याचा माझा विचार नव्हता. पण आपणच स्वतः काय होईल तें करावें व शाळा सोडून जाते वेळीं शाळेंतील विद्यार्थ्यांना या फंडासंबंधानें

माहिती करून द्यावी असें मीं योजिलें. तेव्हां ‘ नाहीं तरी हा फंड पडूनच आहे तुम्ही मला याचा सेक्रेटरी करून तो माझ्या हवालीं करा. इतरांमध्यें नव्हे, पण स्वतः यासंबंधानें कांहीं करावें असें माझ्या मनांत आहे; तुम्ही कोणी नेटानें हें काम हातीं घ्याल तेव्हां मी तो तुमच्या हवालीं करीन’ अशी विनंती मीं लाइफमेंबरांच्या बोर्डाला केली. ती मान्य करून त्यांनीं तो फंड माझ्या ताब्यांत दिला. १९०५ सालापासून या फंडाचा शिस्तवार जमाखर्च मीं ठेविला आहे. आपण डेक्कन एज्युकेशन सोसायटीची नोकरी करीत आहों व दरमहा ७५ रुपये प्रमाणें आपणाला वेतन मिळत आहे तोंपर्यंत दरमहा दहा रुपयेप्रमाणें या फंडाकडे आपण देत जावें, असें मीं ठरविलें व तारीख १ जुलई १९०६ पासून हा विचार अमलांत आणला. आपलें मन बदलण्याचा मोह आपणाला पडूं नये व याचा न्यु स्कूलाच्या कांहीं विद्यार्थ्यांवर परिणाम व्हावा यासाठीं मी एक युक्ति योजिली. विद्यार्थ्यांची प्रिलिमिनरी परीक्षा होण्याच्या सुमाराला या फंडाची कल्पना न्यू इंग्लिश स्कूल सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना द्यावी व ते मिळवूं लागल्यानंतर त्यांनीं एक महिन्याचा पगार या फंडाला देण्याचा आतांच संकल्प करून ठेवावा, यासाठीं सातव्या इयत्तेंतल्या दोनतीनशें मुलांना एकत्र जमवून त्यांना व्याख्यान द्यावें, असा क्रम मीं तीनचार वर्षे ठेविला होता. या व्याख्यानाच्या वेळीं स्वतःचा संकल्प मुलांना सांगून टाकला असतां आपलें बंधन अधिक दृढ होईल व मुलांच्या मनावरहि विशेष परिणाम होईल, असें वाटून तसें करण्याचें मीं ठरविलें. या व्याख्यानांत, त्या वेळीं जे पैसे जमलेले असतील त्यांत मुळींच भर पडली नाहीं तर नुसत्या व्याजानें एक लाख रुपये होण्याला किती वेळ लागेल हें मी त्यांना समजून सांगत असें, व त्यांतल्या एका मुलानें जर आपला महिन्याचा पगार या फंडांत घातला, तर हा काळ त्या एकट्याला किती मागें हटवितां येईल हें त्यांच्या मनांत भरवीत असें. सरकारी प्रामिसरी नोटीच्या दरसाल दरशेंकडा साडेतीन रुपयेप्रमाणें चक्रवाढ व्याजाच्या दरानें हिशोब केला, तर दामदुप्पट होण्याला वीस वर्षें लागतात. या एका व्याख्यानाच्या वेळची शिल्लक १५०० रुपये होती. हिचे २०, ४०, ६०, ८०, १०० व १२० वर्षांनीं अनुक्रमें ३, ६, १२, २४, ४८ व ९६ हजार रुपये होतील, तेव्हां एक लाख रुपये

होण्याला १२२ वर्षें लागतात, ही गोष्ट मीं मुलांना समजावून दिली. आतां आज एकानें आपल्या पगाराचे २५ रुपये दिले. तर सदर देणगीची रास १२० वर्षांनीं १६०० रुपये होते; म्हणजे एका लाखाचें एक वर्षाचें ३५०० रुपये व्याज होणार, तेव्हां या रकमेमुळें सुमारें पांच महिने अगोदर एक लाख रुपयांची रास जमूं शकेल, व व्याजाचा उपयोग करण्याला सुरुवात करितां येईल. यांत इतके दिवसपर्यंत डेक्कन एजुकेशन सोसायटी चालेल, आणि या मुदतींत फंडाची अफरातफर अगर अव्यवस्था करणारा कोणी भेटणार नाहीं; या गोष्टी गृहीत धरल्या आहेत. अशा धरूनच दूरदर्शीपणानें पुष्कळ व्यवहार करणें शहाणपणाचें आहे. त्यांतले कित्येक फसावयाचे, हेंहि निर्विवाद आहे. या सर्व व्याख्यानांच्या वेळीं 'मी दरमहा दहा रुपये देऊन ही १२० वर्षांची मुदत करवेल तितकी कमी करणार आहे,' या गोष्टीचा उल्लेख मी करीत असें, व तेवढा करूनच राहत नसे, तर "मी अशा रीतीनें वर्गणी देतों कीं नाहीं या गोष्टीचा तुम्ही तपास करा व देत नाहीं असें आढळून आल्यास भररस्त्यांत माझी फजीति करण्याला मागेंपुढें पाहूं नका," असेंहि मीं त्यांना सांगत असें.

या फंडाला आणखी एका रीतीनें मदत करण्याचा संकल्प याच वेळीं मीं आपल्या मनाशीं केला होता; पण यासंबंधानें प्रसिद्धपणें मीं कोठें उद्गार काढले नव्हते. हा विचार म्हणजे फर्लो व पेनशन घेतल्यानंतर या मुदतींत मिळणारें वेतन आपण न घेतां तें या फंडाकडे जमा करावें, व आपणाला निर्वाहासाठीं लागणारें द्रव्य ज्या संस्थेंत काम करावयाचें त्या संस्थेपासून घ्यावें, हा होय. ज्या वेळीं आपले हातपाय थकतील, त्या वेळींच पेनशनाचा उपयोग कुटुंबपोषणासाठीं करावा. १ नवंबर १९१० पासून मीं तीन महिन्यांची हक्काची रजा व दोन वर्षांची फर्लो घेतली, आणि आश्रमांत काम करूं लागलों. तेव्हां चरितार्थासाठीं आश्रमांतून दरमहा तीस रुपये घेऊन सोसायटीकडून मिळणारें वेतन मी या फंडाकडे जमा करूं लागलों. असें मी आठ महिने केलें, आणि तीन महिन्यांचे दरमहा पाउणशेंप्रमाणें सव्वादोनशें रुपये व पांच महिन्यांचे दरमहा पन्नासप्रमाणें अडीचशें रुपये मिळून एकंदर ४७५ रुपये या फंडाकडे जमा केले. पुढें अडचण आली. माझी खासगी शिल्लक गुंतलेली होती व माझ्या

मुलाच्या मेडिकल कॉलेजांतील खर्चासाठीं मला दरमहा पन्नास रुपये पाठविणें जरूर होतें. तेव्हां सोसायटीकडून मिळणारें वेतन मी परस्पर त्याला पाठवूं लागलों. हे सर्व पैसे व पुढील पेनशन सव्याज स्टूडंट्स् फंडाला परत करावें असा माझा हेतु आहे, +परंतु बँकेंत ठोकर लागून पैशाच्यासंबंधानें माझी परिस्थिति अगदींच बदलल्यामुळें हा माझा हेतु तडीला जाईलच, असें सांगवत नाहीं.

मी सोसायटीचें काम करीत होतों, तोंपर्यंत दरमहा दहा रुपयेप्रमाणें वर्गणी आणि वर नमूद केलेली ४७५ रुपयांची रक्कम व व्याज मिळून १९१४च्या अखेर एकंदर शिल्लक ३१८६८५८५ झाली आहे. याशिवाय १२० वर्षांची मुदत लवकर कमी करण्याच्या आशेनें मोहांत पडून या फंडांतून मुंबईच्या ब्यांकिंग कंपनींत ठेवलेल्या ७०८८१५८३ च्या रकमेला बूड आली आहे. यापैकीं कांहीं परत आल्यास तेवढी वरील शिलकेंत भर पडेल. आतां माझा डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा प्रत्यक्ष संबंध सुटल्यामुळें वरील शिल्लक व जमाखर्चाचे वगैरे कागद मीं सोसायटीच्या सेक्रेटरीच्या हवालीं केले आहेत.

---

+ हें आतां शक्य नाहीं असें स्पष्ट दिसूं लागलें आहे.

# प्रकरण चौसष्टावें

## गृहस्थाश्रम ( उत्तरभाग )

मीं विशेष आसक्तीनें संसार कधींच केला नाहीं. जेव्हां जेव्हां सार्वजनिक कामांत मी फार गढून जातों तेव्हां तेव्हां सांसारिक सुखांचा मला विसर पडतो. त्या कामांतून अवसर मिळाला म्हणजे मी संसारसुखाचे घुटके मोठ्या आवडीनें घेतों.

आपल्या कुटुंबांतील मनुष्यांची योग्य रीतीची व्यवस्था लावणें हा गृहस्थाश्रमी मनुष्याच्या कर्तव्यांतील प्रमुख भाग आहे. बहुजनसमाजाला प्रगतीचा मार्ग दाखविणाऱ्या कांहीं महाजनांचें अनुकरण करून मीं रुळलेला मार्ग सोडून दिला आहे. जुन्या संस्कारांवर जरी माझा विश्वास नाहीं तरी पूर्वपरंपरा म्हणून यांतले कांहीं भिन्न स्वरूपानें तरी रहावें असें मला वाटतें. या संबंधानें जुन्यानव्याची तोडजोड होण्याचा काळ पुढें आहे. तोंपर्यंत परंपरेंतील एक महत्त्वाचा संस्कार चालू ठेवावा या हेतूनें आम्ही आमच्या तीनहि मुलांच्या मुंजी केल्या. वडील मुलगा रघुनाथ याची मुंज मी या मार्गांत पडण्यापूर्वींच झाली होती, तिची हकीकत मागील एका प्रकरणांत दिलीच आहे.

मुलांच्या लग्नाची जबाबदारी आईबापांवर नसून ती मुलांवरच आहे असें माझें मत आहे. कुटुंबपोषणाचें सामर्थ्य अंगीं आल्यावांचून पुरुषानें आपलें लग्न करूं नये; आईबापांनीं मुलांना या कामीं सल्लामसलत द्यावी व निवड करण्यांत मदत करावी म्हणजे झालें. मुलांच्या लग्नांच्या कामांत तंतोतंत या मताप्रमाणें वागण्याचा माझा निश्चय आहे. मुलें प्रौढ झाल्याबरोबर त्यांचीं लग्नें न केलीं तर तीं कदाचित् कुमार्गगामी होऊन जन्माचा अपाय करून घेतील असें यावर कित्येकांचें म्हणणें आहे. पण संसारक्षम होण्यापूर्वी लग्न केल्यानें होणाऱ्या अपायापेक्षां हा अपाय पुरवला. रघुनाथ स्वावलंबी झाल्याबरोबर मीं हा प्रश्न त्याच्याजवळ काढिला; परंतु आणखी कांहीं वर्षें तशींच जाऊं देण्याचें त्याच्या मनांत असल्यामुळें मीं त्याला आग्रह केला नाहीं. पुढें एकोणतिसाव्या वर्षी त्याचें लग्न झालें व मीं त्याला या कामीं योग्य ती मदत केली.

माझ्या सामर्थ्याप्रमाणें मुलांना शिक्षण दिलें म्हणजे मजवरची जबाबदारी संपली, त्यांच्यासंबंधानें आणखी कांहीं तरतूद करावयाला नको, असा मनाचा निश्चय मीं फार वर्षांपासून केलेला आहे व मुलें आठदहा वर्षांचीं झाल्याबरोबर हे विचार मीं त्यांना कळविलेले आहेत. माझा मोठा मुलगा रघुनाथ याच्या शिक्षणासंबंधानें मला बरीच काळजी घेतां आली. त्याच्या प्राथमिक शिक्षणासंबंधानें पूर्वीच्या एका प्रकरणांत उल्लेख केला आहे.

इंग्रजी शिकण्यासाठीं तो मराठा हायस्कुलांत जाऊं लागला व त्याचें शिक्षण वर्गाबरोबर नीट होऊं लागलें. पुण्याला आल्यावर न्यू इंग्लिश स्कुलांतून तो पहिल्या वर्षी परीक्षेला बसला; तेव्हां त्याची तयारी बरी होती, परंतु तो इतिहास-भूगोलांत नापास झाला. अशा रीतीनें मिळालेल्या अधिक वर्षाचा चांगला उपयोग करून घ्यावा असें मी मनांत आणलें. इतिहास व भूगोल हे विषय मी स्वतः तयार करून त्याला शिकवूं लागलों व गणितविषयाकडे अधिक लक्ष्य देऊन मागील दहापंधरा वर्षांचे गणिताचे पेपर त्याजकडून लिहवून तपासून दिले. सुदैवानें या श्रमांचा उपयोग झाला व मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत त्याचा नंबर पहिला आला. पुढें प्रीव्हियसच्या परीक्षेच्या वेळींहि त्याजकडून मागील दहा वर्षांचे गणिताचे पेपर लिहवून घेतले होते. त्या परीक्षेंत तो पहिल्या वर्गांत पास झाला. मला कॉलेजाच्या रेसिडेन्सींत कधीं रहावयाला मिळालें नव्हतें. माझ्या मुलाला तो फायदा मिळावा म्हणून मीं त्याला तेथें ठेविलें. यथाक्रमें त्याचें शिक्षण पुरें होऊन तो स्वावलंबी झाला.

याप्रमाणें एका मुलाच्या जबाबदारींतून मी मोकळा झालों. दुसरा मुलगा शंकर याच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याला मला फुरसत मिळाली नाहीं. तथापि मॅट्रिक्युलेशनला जाण्याच्या आधीं वर्ष दीड वर्ष त्याच्या गणितविषयाकडे मीं लक्ष दिलें, त्याचा थोडासा उपयोग झाला. त्या वर्षी न्यू इंग्लिश स्कुलांतून एकशेंवीस विद्यार्थी मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत पास झाले. त्यांत त्याचा गणिताविषयांत पहिला नंबर येऊन शाळेंतील या विषयाचें बक्षीस त्याला मिळालें होतें. त्यानें फर्ग्युसन कॉलेजांत राहून बी. ए. व्हावें असें मीं त्याला सुचविलें व तें करण्याला तो कबूल झाला असता, तर या वेळेला मी त्याच्याहि जबाबदारींतून मोकळा झालों असतों; परंतु

प्रीव्हियसची परीक्षा झाल्यावर मेडिकल कॉलेजांत जाण्याची इच्छा त्यानें दर्शविली. तेव्हां तिच्या आड न येतां तो अभ्यासक्रम मीं त्याला घेऊं दिला. तो हल्लीं तिसऱ्या वर्षाच्या वर्गांत आहे.

याप्रमाणें दुसऱ्या मुलाचें शिक्षण चालू आहे. तिसरा फर्ग्युसन कॉलेजांत प्रीव्हियसच्या वर्गांत आहे, व चवथा इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत आहे. यांच्या बी. ए. पर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था माझ्या हातून लागल्यास त्यांच्या ऋणांतून मी मुक्त झालों, असें मला वाटेल. त्यांचें बी. ए. पर्यंतचें शिक्षण माझ्या हातून व्हावें एवढी मात्र माझी फार इच्छा आहे.*

मजवर वेडावांकडा प्रसंग लवकरच आल्यास मागें राहणाऱ्या मनुष्यांची काय तरतूद करावयाची, हा प्रश्न आरंभापासून मजपुढें होताच. डेक्कन एजुकेशन सोसायटीनें यासंबंधाची बरीच तजवीज करून ठेविली होती, परंतु ती पुरेशी नव्हती. सोसायटीची विम्याची पॉलिसी नांवाला तीन हजारांची आहे, पण कित्येक प्रसंगीं तिचें उत्पन्न २१०० अगर २२०० रुपयेच होतें. अलीकडे लाइफमेंबराच्या कुटुंबाला पुरे तीन हजार रुपये मिळावे, अशा प्रकारचा विमा उतरला जातो; पण पूर्वीचा विमा वेगळ्या प्रकारचा होता. एवढ्यानें भागावयाचें नाहीं, यासाठीं थोडासा द्रव्यसंचय करण्याच्या उद्योगाला आम्ही लागलों. या संचयाची सव्याज रक्कम तीन हजार रुपये झाली होती, ती बहुतेक मीं मूर्खपणानें बॉंबे बँकिंग कंपनींत घालविली. तथापि आनंदाची गोष्ट इतकीच कीं, आतां मुलांची शिक्षणाच्या कामांत बरीच प्रगति होऊन त्यांच्याबद्दलची जबाबदारी पुष्कळशी कमी झालेली आहे. मुलें अल्पवयी व शिक्षणांत फार मागें असतां जर अशी ठोकर लागली असती, तर अधिक काळजीची गोष्ट झाली असती.

स्वतःच्या व संस्थांच्या संसारांत येणाऱ्या अडचणींनीं मीं हताश होऊन जात नाहीं. आनंदाच्या प्रसंगीं माझें मन फार हलकें होतें, व कित्येक

---

* जों पर्यंत मुलें लहान होतीं तोंपर्यंत मीं माझ्या इच्छेप्रमाणें वागत होतों; परंतु तीं मोठीं होऊन त्यांच्या आकांक्षा वाढत चालल्या त्यांच्या आड जाणें मला जड जाऊं लागलें व त्यांच्या शिक्षणासाठीं पुष्कळसा पैसा मला खर्च करावा लागला. ही सर्व हकीकत पुढल्या एका प्रकरणांत दिली आहे.

वेळां गहिंवर येऊन आनंदाश्रु आवरेनातसे होतात. परंतु सामान्यतः दुःखाच्या अगर संकटाच्या प्रसंगीं माझें मन अतिशय कठोर बनतें. अशा वेळीं बहुधा दुःखाश्रु न येतां उलट प्रसंगाला तोंड देण्यासाठीं एक प्रकारचें स्फुरण अंगांत चढतें.

कधींकधीं मरणाविषयीं विचार करून त्याविषयींची भीति नाहींशी करणें फार जरूर असतें. जन्माला आलेल्या व्यक्तींना व संस्थांना मरण हें आहेच; तें आज येतें, कीं कांहीं काळानें येतें, याचा कांहीं नियम नाहीं. हे विचार अनेक प्रसंगीं माझ्या मनांत येत असतात, व अशा आपत्तीच्या प्रसंगासाठीं मी आपलें मन तयार करून ठेवीत असतों. प्रेमाच्या मनुष्यांच्या गांठीं पडतात त्या वेळीं ही आपली शेवटचीच भेट असें समजून आपण चालूं, असे उद्गार मी काढीत असतों. पोटच्या मुलांना मूठमाती देण्याचे प्रसंग आईबापांवर आलेले आपण पाहतों. त्याप्रमाणें आपण वाढविलेल्या संस्थांना मूठमाती देण्याचा प्रसंग मजवर येणार नाहीं म्हणून कशावरून ? तसा प्रसंग आला असतांहि माझें धैर्य खचूं नये, व प्राप्तस्थितींत आपल्या हातून कांहीं सत्कर्म घडावें, अशासाठीं मन कठोर बनविण्याचा प्रयत्न मी करीत असतों. असे उद्गार कांहीं मंगलप्रसंगींहि आश्रम–विद्यालयांच्या मुलींसमोर मीं काढले आहेत. माझ्याजवळ कांहीं नाहीं ही गोष्ट खरी; तथापि मी आपलें वेडेवांकडे मृत्यपत्र करून ठेवीत असतों. मरण ही व्यवहारांत नित्य घडून येणारी गोष्ट आहे. तिजबद्दल विचार करून 'आपुलें मरण देखिलें म्यां डोळां । तो झाला सोहाळा अनुपम ॥' अशी मनःस्थिति अल्पांशानें तरी अनुभवण्याचा यत्न मी कधींकधीं करीत असतों. विशेष अडचणींच्या प्रसंगीं असले विचार प्रमुखत्वानें पुढें येतात हें सांगणें नकोच. अडचणींचे प्रसंग हे मनुष्यांचे खरे शिक्षक होत.

# प्रकरण पांसष्टावें

## वानप्रस्थाश्रम

गृहकृतःच्या संसारावरील आसक्ति नाहींशी करणें हा जो या तृतीयाश्रमांतील विशेष धर्म तो गृहस्थाश्रमांत असतांनाच हळुहळू माझ्या अंगीं येत चालला होता. स्वतःचा व संस्थांचा संसार होतां होईल तों अलिप्त राहून लिप्त मनुष्यांप्रमाणें कष्टाळूपणानें करण्याचें शिक्षण मला मिळत होतें. किंबहुना माझा गृहस्थाश्रम हा केवळ गृहस्थाश्रम नसून तो गार्हस्थ्य आणि वानप्रस्थ्य यांच्या संयोगानें बनलेला होता, असें म्हटलें तरी चालेल.

मुलांबाळांसाठीं पुष्कळसा द्रव्यसंचय, जमीनजुमला, घरदार वगैरे करून ठेवण्याची स्वाभाविक प्रवृत्ति ठीक आहे. परंतु आपल्या देशाच्या हल्लींच्या स्थितींत बऱ्याचशा समजदार मनुष्यांनीं या प्रवृत्तीला वश न होतां मुलांना योग्य शिक्षण मिळण्याची व्यवस्था करून बाकीच्या द्रव्याचा उपयोग देशकार्याकडे करणें जरूर आहे. शांतता असतां बेताचें सैन्य पुरतें परंतु युद्ध उपस्थित झालें असतां कारकूनमंडळी, शिक्षकमंडळी व कॉलेजांतील प्रौढ विद्यार्थी यांची सुद्धां सैन्यांत भरती करावी लागते. त्याचप्रमाणें हिंदुस्तानाच्या हल्लींच्या परिस्थितींत गृहस्थाश्रमाचीं कर्तव्यें संपुष्टांत आणून बऱ्याच मनुष्यांनीं वानप्रस्थाश्रमांत प्रवेश केला पाहिजे. वास्तविक पाहिलें असतां मुलांमध्यें स्वावलंबन उत्पन्न करण्यासाठीं शिक्षणापलीकडे त्यांना मदत न करणेंच बरें. स्वकष्टार्जित द्रव्यानें मिळविलेल्या सुखांत जी गोडी आहे ती अन्यकष्टार्जित द्रव्यानें मिळविलेल्या सुखांत नाहीं. शरीरकष्ट करणाराच्या अन्नाची गोडी आणि स्वकष्टार्जित द्रव्याच्या उपभोगानें मिळणारें सुख यांत साम्य आहे. थोड्याशा अडचणींतून वाट काढावी लागल्यानें मनुष्याला शिक्षण मिळत असतें तें तरुणांना मिळणें जरूर आहे. आपल्या मुलांना शिक्षण देण्यापुरतीच तजवीज करावयाची याहून अधिक त्यांच्यासाठीं कांहीं ठेवावयाचें नाहीं हा जो निश्चय मीं केला तो असल्या विचारांनींच केला.

निष्काम–कर्म–मठाची स्थापना झाल्यापासून माझ्या खऱ्या वानप्रस्थ्याला प्रारंभ झाला असें म्हणण्याला हरकत नाहीं. तेव्हांपासून मी आपली सर्व मिळकत मठाकडे देऊं लागलों व मला कुटुंबपोषणासाठीं लागणारें द्रव्य मी मठाकडून घेऊं लागलों. तेव्हांपासून एक पैसाहि आपल्या संसारासाठीं शिलकेंत टाकावयाचा नाहीं, असा मीं निश्चय केला. बाकी, हें सर्व शाब्दिक झालें आहे. माझी सर्व प्राप्ति माझ्या संसाराकडे खर्च होत आहे व मजकडून मठाला द्रव्यद्वारा कांहीं फायदा होत नाहीं. मठावर माझा बोजा पडूं नये, एवढ्यासाठीं मात्र मी काळजी घेत आहें. पूर्वी उरलेली शिल्लक संसारांत टाकावयाची, या दृष्टीनें व्यवहार चालला होता; आतां, शिल्लक उरली तरी ती संसारांत टाकावयाची नाहीं या दृष्टीनें चालला आहे, एवढाच काय तो भेद आहे. माझ्या समजुतीनें हा भेद फार मोठा आहे. कोणत्याहि कार्याची किंमत त्याच्या दृश्य फलावरून न करितां त्या कार्याला प्रवृत्त करणाऱ्या ज्या मनोवृत्ति त्याच्या मुळाशीं असतात, त्यांवरून केली पाहिजे. आजपर्यंतहि द्रव्यसंचयाकडे माझें लक्ष म्हणण्यासारखें गेलें नव्हतें; तथापि यापुढें तो बिलकूल करावयाचा नाहीं असा निश्चय करण्याची बुद्धि मला मठामुळें झाली.

मी वानप्रस्थ आहें, असें म्हणणें सोपें आहे; पण वानप्रस्थ्याला योग्य अशा कृति हातून घडणें फार कठिण आहे. अशा कृति माझ्या हातून क्वचित् प्रसंगींच घडतात. त्यांतल्या दोन येथें देण्याचें योजिलें आहे.

माझा स्वभाव मूळचा रागीट, पण मी भिडस्त आणि भितरा असल्यामुळें माझ्या रागापासून दुसऱ्यांना फारसा ताप होत नाहीं. माझा राग आवरण्याचा मीं पुष्कळ यत्न केला व तो कांहीं अंशीं सफलहि झाला आहे. तथापि कधींकधीं राग अनावर होऊन त्याचा वाईट परिणाम घडतो. ही वृत्ति अनावर होऊन एकदां एका सत्पुरुषाचा उपमर्द माझ्या हातून झाला. महिलाविद्यालय सुरू करण्यापूर्वी कुमारिका व सुवासिनी विद्यार्थिनींच्या शिक्षणाची सोय आश्रमानें करावी, किंवा आश्रमाच्या आश्रयाखालीं मला करूं द्यावी, म्हणून मीं आश्रमाच्या कमेटीला शेवटची विनंति केली होती. ती ज्या सभेंत अमान्य झाली, त्या सभेचें काम संपल्यानंतर सुरू झालेल्या संभाषणांत रागाचे भरांत मीं परमपूज्य गुरुवर्य डॉ. भांडार-

कर यांच्या मनाला लागण्यासारखे शब्द उद्दामपणानें बोललों. नंतर तीन-चार वर्षांनीं याबद्दल आपण माफी मागणें बरें, असें मनांत येऊन मीं त्यांना पुढील पत्र लिहिलें:—

Hyderabad Sind,

*16th December, 1911.*

Revered Sir,

I am exceedingly sorry for my insulting words and attitude at the committee meeting of the Widows' Home, five years ago, when the question of admitting non-widows in the Ashram was finally decided. I was excited at the time and my conduct was disgraceful. For a long time I did not feel so and afterwards when I felt it I had not the courage to ask for forgiveness. How-ever, better late than never. So I now make an unreserved apology for my conduct that night and I request you to kindly pardon me.

I shall circulate a copy of this latter among the members of the committee who were present that night, when I return to Poona in the 2nd week of January.

*Yours obediently,*
D. K. Karve.

यावर डॉ. भांडारकरांकडून पुढील उत्तर आलें:—

Samgam, Poona.
*23rd December, 1911.*

Dear Mr. Karve,

I never thought much of the incident you mention, which consisted simply in your saying that you did not want any committee for your new institution. I did not take it as an insult at all; but simply understood that our assistance was in no way required by you.

*Yours sincerely,*
R. G. Bhandarkar.

दुसरी गोष्ट अशीः—एका थोर मनाच्या गृहस्थांशीं माझा थोडासा परिचय झाला. यांचे वागणें अगदीं नियमितपणाचें होतें व यांनीं ठेविलेलीं व्यवस्थेशीर टिपणें वगैरे पाहून यांच्याबद्दल माझ्या मनावर फार चांगला ग्रह झाला. यांजमध्यें मनाचे कांहीं थोर गुणहि मला दिसून आले. हे पैशाच्या अडचणींत होते. यांना कायमची नोकरी होती, तेव्हां नियमितपणानें वागून हे पैशाची फेड करतील, याबद्दल मला शंका नव्हती. यासाठीं अधिक व्याजानें काढलेल्या रकमा त्यांना परत करतां याव्या, म्हणून मी त्यांना १२० रुपये दरसाल दरशेंकडा ४ व्याजानें दिले, व पावतीचें तिकिट लावून त्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या हातची एक पावती घेतली. याला तारण म्हणून हजाराची एक याप्रमाणें दोन पॉलिसी आपल्याजवळ ठेवून घेतल्या. हें माझें करणें अगदीं निःस्वार्थपणाचें नव्हतें. निष्काम—कर्म—मठाला हे गृहस्थ योग्य होतील, अशी मला आशा वाटत होती, व या हेतूनें त्यांजवर उपकार करण्याची सहज आलेली संधि मीं साधली होती. पुढें कांहीं हेतूनें त्यांनीं आपल्या नोकरीचा राजिनामा दिला, व ते पुणें सोडून गेले. आपण कोठें आहों, काय करतों वगैरेबद्दल त्यांनीं मला कांहींएक कळविलें नाहीं, व मींहि त्यांची फारशी विचारपूस केली नाहीं. पुढें सुमारें दीडवर्षानें आपण अडचणींत असल्याबद्दल त्यांचें पत्र आलें, तेव्हां मी दहा रुपये पाठवूं शकेन, असें कळविल्यानंतर त्यांजकडून मागणें झाल्यावर दहा रुपये पाठवून दिले. पुनः तीनचार महिन्यांनीं तसेंच पत्र आल्यावरून त्यांना आणखी दहा रुपये पाठविले. नंतर ते वडिलांच्या शुश्रूषेसाठीं पुण्यांत येऊन राहिले; पण दोनतीन महिन्यांत त्यांनीं माझी गांठहि घेतली नाहीं. एकदां सहजीं गांठ पडली तेव्हां त्यांना कसेंसेंच वाटलेंसें दिसलें. दुसऱ्याच्या देण्याबद्दल मनुष्याला केवढी ओशाळगत वाटते, या गोष्टीचा प्रत्यय मला त्या वेळीं आला. मीं एका शब्दानेंहि त्यांना व्याज अगर मुद्दल केव्हां देणार, असें लिहिलें अगर विचारलें नाहीं. आतां पैशाची व्यवस्था करण्याच्या भानगडींतून मुंबई बँकिंग कंपनीनें मला बहुतेक सोडविलें होतें; तेव्हां यांनाहि ऋणांतून मुक्त करून आपणहि मोकळें व्हावें असा विचार मीं केला. चांगले विचार फार वेळ टिकत नाहींत, तेव्हां ते तीव्र असतांनाच मनुष्यानें चांगलें कार्य उरकून घ्यावें; म्हणून हे विचार मंदा-

वण्यापूर्वीच मीं त्या उभयतांना पत्र लिहून टाकलें कीं, अमुक दिवशीं तुम्ही मला आश्रमांत येऊन भेटावें, म्हणजे तुमचे कागद मी तुम्हांला परत देईन व मी मोकळा होईन. त्याप्रमाणें त्यांनीं माझी गांठ घेतली, व त्यांनीं लिहून दिलेली पावती व दोन पॉलिसी हे त्यांचे कागद त्यांना परत दिले. तसें करतांना त्यांना एवढेंच सांगितलें कीं, तुम्ही कर्जांतून मुक्त झालां असें समजा. ही रक्कम मीं तुम्हांला वडिलार्जित इस्टेट विकून सार्वजनिक कार्याकडे लावण्यासाठीं जे पैसे तयार केले होते, त्यांतून दिली होती. सहजीं तुम्हांला द्रव्य मिळून ही रक्कम परत करण्याची तुम्हांला इच्छा झाल्यास ती मी जिवंत असल्यास माझ्याजवळ किंवा माझ्या पश्चात् अमुक मनुष्याजवळ देण्याला हरकत नाहीं. परंतु या कर्जासंबंधानें तुम्हांला जाचणी लागण्याचें कारण नाहीं. माझ्या ऋणांतून तुम्हांला मीं मुक्त केलें आहे. पूर्वजांच्या ऋणांतून मुक्त होण्याची तजवीज मी पहातों.

# प्रकरण सहासष्टावें

## कांहीं किरकोळ गोष्टी

माझ्या स्वभावाचें, मनोवृत्तींचें व गुणावगुणांचे अंशतः दिग्दर्शन ज्यांच्यायोगें होईल, अशा कित्येक गोष्टी व कांहीं किरकोळ प्रसंग या प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे. इतर प्रकरणांत ज्यांना स्थळ मिळालें नाहीं, असेहि कांहीं स्फुट भाग या प्रकरणांत दिले आहेत.

माझा एकमार्गीपणाः—करमणुकीच्या मार्गाकडे माझें मन फारसें कधीं वळलें नाहीं. मी मुंबईत विद्यार्थिदशेंत असतां अण्णा किर्लोस्करांचें संगीत शाकुंतल नाटक अत्यंत लोकप्रिय झालेलें होतें, व तें पाहण्यासाठीं दहादहा वीसवीस तासांचा आगगाडीचा प्रवास करून हौशी लोक दूरदूरच्या ठिकाणांहून येत असत. मला गाणें ऐकण्याची हौस असे, पण या बाजूकडे वळावयाचें नाहीं असा मीं निश्चय केला व तो तडीला नेला. मीं तेरा वर्षे मुंबईत काढली, तेवढ्या मुदतींत मीं एकच नाटक पाहिलें. थिएटर कसें असतें व पडद्यांची वगैरे मौज कशी असते तें पहावें, असें मनांत आलें, व मंडळीबरोबर एकदां डोंगऱ्यांचें संगीत शाकुंतल पहावयाला गेलों. पुण्यांतील माझ्या आयुष्यक्रमांतहि एकदांच नाटकाला जाण्याचा प्रसंग आला. मतिविकार हें नाटक पुनर्विवाहाच्या विषयावर लिहिलेलें असल्यामुळें त्यासाठीं मीं जावें, असा कंपनींतील एका गृहस्थांनीं आग्रह केल्यावरून तेवढें नाटक मात्र मीं पाहिलें. याशिवाय गॅदरिंग वगैरेच्या निमित्तानें विद्यार्थ्यांनीं केलेलीं नाटकें पहाण्याचें मात्र कांहीं प्रसंग आले. सगळ्या जन्मांत सर्कशीचा खेळ मीं एकदांच पाहिला आणि तो तरी आश्रमांतील विद्यार्थिनींना दाखविण्याच्या निमित्तानें मी त्यांजबरोबर गेलों तेव्हां. सिनेमॅटोग्राफ मीं अजून पाहिला नाहीं. हें सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, मी अगदीं एकमार्गी होऊन गेलेला असल्यामुळें या इतर गोष्टींकडे मीं कधीं लक्षच दिलें नाहीं. करमणुकीसाठीं व्यायामाचे खेळ खेळण्याकडेहि माझें लक्ष गेलें नाहीं. माझा व्यायाम म्हणजे दिवसांतून चारसहा मैल चालणें. तें सहज घडलें तर ठीकच. तसें न घडलें तर सकाळसंध्याकाळ चालून तें घडवून आणावयाचें—हा माझा क्रम विशेष कारणावांचून

कधीं चुकला नाहीं. करमणुकीसाठीं मीं कधींकधीं पत्त्यांनीं मात्र खेळतों. सुट्टीच्या दिवसांत माझ्या मुलांबरोबर अगर आश्रमांतील विद्यार्थिनींबरोबरहि केव्हांकेव्हां हा खेळ मी खेळलों आहे. पण महत्त्वाचें काम नसून कंटाळ्याचा वेळ घालावावयाचा असला तर किंवा सणाच्या दिवशीं मात्र अशा रीतीनें करमणूक करून घेतों. नाटकें अगर कादंबऱ्या वाचण्याकडे माझें लक्ष कधीं गेलें नाहीं. मीं इंग्रजी कादंबऱ्या काय त्या तीन वाचल्या. ईस्ट लिन, हॅलिबर्टन्स ट्रबल्स आणि चॅनिंग्स. मराठींतल्याहि तीनचारांहून अधिक कादंबऱ्या मीं वाचल्या नाहींत. ईस्ट लिन वाचून स्त्रीजातिविषयींची माझी सहानुभूति दुणावली.

**एका मित्राचा थोरपणा**—परलोकवासी श्रीयुत विनायक नारायण आपटे हे मनाचे फार थोर होते. पुण्यांतील मुलींचें हायस्कुल व ट्रेनिंग कॉलेज या संस्थांवर ज्या मंडळीची देखरेख आहे, त्या महाराष्ट्र फीमेल एजुकेशन सोसायटीचा मीं सभासद असावें असें यांना वाटत असे. तथापि ही आपली इच्छा यांनीं मला कळविली नव्हती. अनाथबालिकाश्रमाच्या मंडळीचे हे एक ट्रस्टी असल्यामुळें यांचा माझा थोडासा परिचय झालेला होता. वरील सोसायटीचा सभासद होण्याला पन्नास रुपयांची देणगी द्यावी लागत असे. श्रीयुत आपटे यांनीं मला कांहींएक न कळवितां परस्पर माझ्या नांवें पन्नास रुपये सोसायटीकडे भरले. मीं त्या मंडळींत असावें पण देणगीचा बोजा मजवर पडूं नये या सदिच्छेनें त्यांनीं वरील गोष्ट केली. पुढें सोसायटीचा रिपोर्ट मजकडे येऊन सभासदांच्या यादींत जेव्हां माझें नांव आढळलें तेव्हां मला फार आश्चर्य वाटलें व चौकशी करितां, श्रीयुत आपटे यांनीं माझी वर्गणी भरल्याचें मला समजलें. अशा ऋणांत रहाणें मला बरें वाटलें नाहीं. मीं त्यांचे हे पन्नास रुपये सवडीनें देऊन टाकले.

**स्वोत्कर्षासाठीं परापकर्ष**—सोलापुरच्या सरस्वतीमंदिराचे उत्साही उत्पादक व सेक्रेटरी माझ्या चांगल्या परिचयाचे होते, व आश्रमाच्या वर्गणीसाठीं मी सोलापुराला गेलों असतां त्यांजकडे मी उतरलों होतों, आणि वर्गणीच्या कामीं त्यांनीं मला मदतहि केली होती. ते परलोकवासी होऊन बरींच वर्षे झालीं. आश्रम निघाला त्याच सुमाराला सरस्वतीमंदिराची स्थापना झाली. पुढील गोष्ट नंतरच्या तीनचार वर्षांतली आहेः—

अगदीं जुन्या पद्धतीनें शिकलेल्या व अगदीं जुन्या पद्धतीनें वागणाऱ्या आणि पूजेअर्चेंत बराच काळ घालविणाऱ्या पंडिता अनसूयाबाई या सरस्वतीमंदिरांत पुराण वाचीत व धर्मशिक्षण देत. मंदिराच्या एका वार्षिक रिपोर्टांत या गोष्टीचा उल्लेख करितांना पुढील अर्थाचें वाक्य सेक्रेटरीच्या हातून लिहिलें गेलें. 'शारदासदन अगर अनाथबालिकाश्रम यांच्यासारखी ही संस्था अधर्म व अनीति शिकविणार नाहीं.' आपली संस्था अधिक लोकप्रिय करण्याच्या भरांत थोर मनुष्यें सुद्धां केव्हांकेव्हां सहज दुसऱ्या संस्थांवर घसरतात. हा रिपोर्ट एका वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेला सहज माझ्या वाचण्यांत आला. सुदैवानें तो वाचून माझी चित्तवृत्ति क्षुब्ध झाली नाहीं. केव्हां केव्हां चांगल्या मनुष्याच्या हातूनहि कशी चूक होते याबद्दल विस्मय वाटून आपण याची फेड कशी करावी, हा विचार मी करूं लागलों. लागलाच एक उपाय सुचला व तो ताबडतोब अमलांतहि आणला. सरस्वती–मंदिर ही चांगली संस्था आहे मला वाटत होतें; पण तिला मदत करण्याची बुद्धि मला झाली नव्हती. या संधीला आपण अल्प मदत पाठविल्यास उत्तम होईल, असें मनांत येऊन मी एकदम पांच रुपयांची मनीऑर्डर पाठवून दिली व सर्व प्रकार विसरून गेलों.

**आश्रमाविषयीं तिटकारा:**—पुनर्विवाहाच्या कार्याला जितका लोकांचा विरोध होता तितका तो विधवाशिक्षणाच्या कार्याला नव्हता, ही गोष्ट खरी; पण कित्येक सुशिक्षित लोकहि या कार्याचा विलक्षण द्वेष करीत असतात. पुढील गोष्ट आश्रमाची सुरवात झाल्यानंतर तीनचार वर्षांत घडलेली आहे. सिव्हिल लिस्ट पाहून मोठमोठ्या अंमलदारांकडे रिपोर्ट पाठवावे, असा माझा परिपाठ होता. त्याप्रमाणें डेप्युटी कलेक्टरच्या दर्जाच्या एका गृहस्थांकडे मीं आश्रमाचा रिपोर्ट पाठविला. हा अर्थात् साध्या बुकपोस्टानेंच पाठविला होता. त्याचा स्वीकार न करितां तो त्यांनीं तसाच परत पाठविला. ही गोष्ट माझ्या लक्षांत न राहून पुनः दुसऱ्या वर्षीं त्यांजकडे तसाच रिपोर्ट पाठविला. या वेळीं बुकपोस्ट परत करून ते थांबले नाहींत. 'पुनः तुमच्याकडून रिपोर्ट येईल तर तुमच्याविरुद्ध कायदेशीर इलाज करणें भाग पडेल' अशा अर्थाचें पोस्टकार्ड त्यांजकडून आलें.

तेव्हांपासून अजूनपर्यंत मीं त्यांजकडे पुनः रिपोर्ट पाठविला नाहीं, हें सांगावयाला नकोच!

**अस्पृश्य वर्गासंबंधानें कांहीं विचारः**—निराश्रित साहाय्यकारी मंडळाच्या तर्फे येथील किर्लोस्कर थिएटरांत एक मोठी सभा होती व त्या प्रसंगीं मीं एक लहानसें भाषण करावें, अशाविषयीं या सभेचा पुरस्कार करणाऱ्या कांहीं मित्रांकडून मला सांगण्यांत आलें. आपल्या हिंदुसमाजाला कलंक लावणारे जे कित्येक निंद्य प्रघात आपल्या समाजांत रूढ होऊन गेले आहेत, त्यांतलाच अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या लोकांना वागविण्याचा प्रघात होय. अशी माझी दृढ समजूत झाली होती, व या कार्याचें महत्त्व आणि त्याचा नाजूकपणा यांविषयींहि मला चांगली जाणीव उत्पन्न झाली होती; परंतु दुसऱ्या कार्यांत मन रमल्यामुळें या कामीं माझ्या हातून कांहीं होण्यासारखें नव्हतें. तेव्हां मित्रांचें सांगणें पतकरावें कीं नाहीं याविषयीं मन द्विधा होत होतें. अखेरीला मला सद्बुद्धि होऊन मीं त्यांचें म्हणणें कबूल केलें. परंतु एकाद्या सत्कार्यासाठीं कांहींएक न करितां नुसती शाब्दिक सहानुभूति दाखविणें मला कसेंसेंच वाटलें. तेव्हां प्रथम या कार्यासाठीं शंभर रुपये देण्याचा संकल्प करून नंतर मदत करण्यासाठीं दुसऱ्यांना विनंति केली. असल्या कामीं सहानुभूति दाखवून द्रव्याची थोडीशी मदत केल्यानें आपलें कर्तव्य संपत नाहीं. खरोखर अधिक महत्त्वाचें कर्तव्य वेगळेंच आहे हें श्रोत्यांच्या मनावर ठसविण्याचा मी प्रयत्न केला. माझ्या भाषणांतील मुद्दे येणेंप्रमाणें होतेः—

१. प्रतिष्ठित साहेबलोक अगर मुसलमानलोक यांना आपण आपल्या घरांत ज्या ठिकाणीं नेऊन बसवितों, त्या ठिकाणीं निराश्रित लोकांमधील संभावित गृहस्थांना घेऊन जावें, व हा व्यवहार अगदीं उघडउघड करावा.

२. हा व्यवहार उघड करण्याचें ज्यांना धैर्य नसेल, त्यांनीं वेळोवेळीं योग्य प्रसंग साधून असें करणें अगदीं निर्दोष आहे, या मताचें मित्रमंडळींत व सभांत स्पष्टपणें प्रतिपादन करावें.

३. ज्या ठिकाणीं त्यांच्या स्पर्शाचा दोष मानला जात असेल त्या ठिकाणीं असा दोष आम्ही मानीत नाहीं, असें उघड उघड सांगावें, निदान तसें मत तरी प्रदर्शित करावें.

४. ज्या ठिकाणीं या लोकांच्या सावलीचा विटाळ मानला जातो त्या ठिकाणीं सावलीचा विटाळ आम्ही मानीत नाहीं, असें स्पष्टपणें सांगण्यास कांहीं गृहस्थांनीं पुढें यावें व त्यासाठीं बहिष्कार सोसण्यालाहि तयार व्हावें निदान सावलीचा विटाळ मानणें गैर आहे, एवढें तरी जुन्या मतांच्या लोकांसमोर उघडउघड बोलावें.

या चवथ्या कर्तव्यासंबंधानें बोलत असतां एक वृद्ध गृहस्थ " आतां सावलीचा विटाळ कोणी धरीत नाहीं, " असें सर्वांना ऐकूं जाण्यासारखें बोलले. मला कोंकणांतील हा प्रघात माहीत होता. तथापि यासंबंधीं अगदीं अलीकडली माहिती आणविण्यासाठीं दापोली तालुक्यांतील एका मोठ्या गांवच्या मित्राला मीं पत्र लिहिलें. त्यानें आपल्या अनुभवाच्या माहितीनें जें उत्तर लिहिलें, त्यांतील सारांशः—

" महारचांभारांच्या सावलीचा विटाळ ब्राह्मण लोक धरतात; एवढेंच नव्हे, तर ब्राह्मणेतरहि सावलीचा संसर्ग घडला असतां स्नान करून शुचिर्भूत होतात. तुमचें पत्र आल्यानंतर एका हायस्कुलाच्या फर्स्ट असिस्टंट मास्तराचे काम केलेल्या गृहस्थांना मीं मुद्दाम विचारलें कीं, ' महाराच्या सांवलीचा विटाळ मी धरीत नाहीं असें गांवांत उघडपणें सांगण्यास तुम्ही तयार व्हाल काय ? " या प्रश्नाचें उत्तर त्यांनीं नकारार्थींच दिलें. "

केवढें आमचें विचारदौर्बल्य ! मिशनरीलोक अंत्यजोद्धाराचें काम करूं लागल्यास शंभर वर्षें झालीं, पण सातआठ वर्षांच्या आधीं या आमच्या बांधवांकडे लक्ष देऊन त्यांच्यासाठीं कांहीं करण्याला कोणा कर्त्या मनुष्याला बुद्धि झाली नाहीं हें आमच्या घोर निद्रेचें लक्षण समजावयाचें नव्हे तर काय ? माझें यावांचून काय अडलें आहे, असें म्हणून प्रत्येकानें नामानिराळें रहाण्याचा प्रयत्न करावा, यापेक्षां आमच्या कर्तव्यपराङ्मुखतेची आणखी साक्ष कोणती पाहिजे ? मनाला निर्दोष वाटणारी गोष्ट जनतेच्या बागुलबोवाला भिऊन तुम्ही आपल्या अंतःकरणांत किती दिवस लपवून ठेवणार ? हें आमचें करणें निखालस आत्मघाताचें आहे. हिंदुस्थानांतील एकषष्ठांश प्रजेला आम्ही दूरदूर वागवीत आहों व परधर्मीलोक त्यांना जवळ करीत आहेत. याचा परिणाम जो व्हावयाचा तोच होत आहे. या

वर्गांतील पुष्कळ माणसांनीं धर्मान्तर केलें आहे व पुष्कळ करीत आहेत— आणि डोळ्यांवर कातडें ओढून हें सर्व आम्ही पहात आहों! या प्रश्नासंबंधानें आपलें प्रामाणिक मत स्पष्टपणें जाहीर करणें हें सुशिक्षितांचें पवित्र कर्तव्य आहे. अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या संभावित गृहस्थांशीं पंक्तिव्यवहार करण्यालासुद्धां हरकत नाहीं, असें माझें स्पष्ट मत आहे.

# प्रकरण सदुसष्टावें

## धर्म व तत्त्वज्ञान यांविषयीं कांहीं विचार

पूर्वीच्या काळांत स्वतंत्रपणें विचार करणारीं मनुष्यें फारच थोडीं असत. त्या थोड्यांनीं विचार करावा आणि बाकीच्या सर्वांनीं परंपरेनें प्राप्त झालेल्या त्या विचारांचें अंधश्रद्धेनें ग्रहण करावें असा प्रकार चालत असे. जुन्या आचारविचारांवर श्रद्धा ठेवून त्याप्रमाणें वागणारे सर्वच लोक अंधश्रद्धेच्या कक्षेंत येतात, असें माझें म्हणणें नाहीं. नव्याजुन्याचें शक्त्यनुसार परीक्षण करून विचारपूर्वक जुन्याचे ग्रहण करणारे अंधश्रद्धेच्या कक्षेंत येत नाहींत. अलीकडल्या काळांत स्वतः विचार करणारांची संख्या फार वाढली आहे व कोणत्याहि विचारांचे ग्रहण करतांना तें केवळ अंधश्रद्धेनें न करतां युक्तिवादाला व अनुभवाला पटण्यासारखे ते आहेत कीं नाहींत हा विचार करणारे लोक अगदीं सामान्य जनांतसुद्धां उत्पन्न होत आहेत. याचा साहजिक परिणाम असा होत आहे कीं जुन्या काळचे धर्मविचार व समजुती यांवरून लोकांची श्रद्धा उडत आहे. जगांतल्या प्रगतिपर सर्व राष्ट्रांत हा प्रकार घडून येत आहे व तीच लाट पाश्चात्य विद्येबरोबर जोरानें हिंदुस्तानांत आली आहे. सर्व प्रकारचीं मतें आणि समजुती चिकित्सक बुद्धीच्या कसोटीला लावण्याची सामान्य मनुष्यांतसुद्धां जी प्रवृत्ति होत आहे तीमुळें धर्मविचारांत होत जाणारा फेरफार राष्ट्राची व धर्माची अवनति करणारा आहे असें पुष्कळांना वाटतें. परंतु मला हा फेरफार राष्ट्रोन्नतिकारक वाटतो. कांहींएक विचार न करितां परंपरेनें प्राप्त झालेल्या समजुतींना चिकटून राहणें हें, त्या समजुती बरोबर आहेत असें धरून चाललें तरी देखील मनुष्याची अवनति करणारें आहे, व विचार करून जुन्यानव्या मतांतून निवड करतांना मनुष्यानें चुकी केली व असत्य मताचें ग्रहण केलें तथापि तें त्याच्या उन्नतीच्या मार्गांतलें आहे, अशी माझी समजूत आहे. मनुष्यानें जबाबदारी ओळखून प्रामाणिकपणें विचार करावा व सत्य वाटणाऱ्या मतांचें ग्रहण करून जेथें संशय वाटेल तेथें कोणतेंच ठाम मत बनूं न देणें हें श्रेयस्कर आहे.

धर्म, तत्त्वज्ञान, नीति आणि इतर सामाजिक निर्बंध या सर्वांचीच खिचडी धर्माच्या रूढ कल्पनेंत झालेली आहे. या वेगवेगळ्या गोष्टींची फारकत होणें फार जरूर आहे, असें मला वाटतें. सनातन सत्य कोणतें, तें शोधून काढण्याचे मार्ग कोणते, ईश्वर आहे कीं नाहीं, असल्यास त्याचाआपला संबंध काय, व त्याच्यासंबंधानें आपलें कर्तव्य काय, वगैरे गोष्टींचा स्वतंत्रपणें विचार करण्याला प्रत्येक व्यक्तीला मोकळीक असली पाहिजे. आजपर्यंत समाजाचा—अर्थात् समाजांतील रूढ मतांचा—व्यक्तींवर फार दाब असल्यामुळें स्वतंत्र विचारांची वाढ अगदीं खुंटून गेलेली होती. अलीकडे हा दाब कमी होत जाऊन स्वतंत्र विचारांना अवकाश मिळत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. लोकमतांत हा जो बदल होत चालला आहे त्यामुळें कांहीं व्यक्तींच्या उद्दामपणाला वाव मिळून क्वचित् प्रसंगीं स्वतंत्रपणाच्या नांवाखालीं स्वैर अत्याचारांना सवड मिळत आहे, ही गोष्ट खरी; परंतु स्वतंत्र विचारांचा कोंडमारा होण्यापेक्षां या बाजूनें होणारें नुकसान पुरवलें. मनुष्यांनीं प्रामाणिकपणानें व सद्बुद्धीनें अनेक बाजूंनीं विचार करून आपल्या आचरणाचा मार्ग ठरवावा, व तो अमलांत आणण्याला त्यांना समाजानें हरकत करूं नये; असें झाल्याशिवाय समाजाच्या अंगीं जिवंतपणा यावयाचा नाहीं. आपल्या राष्ट्रांत प्राचीन काळीं होऊन गेलेल्या सत्पुरुषांविषयीं व सद्ग्रंथांविषयीं आपणांमध्यें पूज्यबुद्धि व आदर पाहिजे ही गोष्ट खरी; तरी 'न निर्दोषं न निर्गुणम्' हें न विसरतां परिस्थितीचा विचार करून व दिवसेंदिवस मनुष्यजातीची जी प्रगति होत आहे ती लक्षांत घेऊन सत्याच्या बळकट आधारावर आपले विचार उभारले पाहिजेत. जुनें जसाचें तसें संभाळून ठेवण्यांत शहाणपणा नाहीं. जुन्यानव्यांचा एकजीव होऊन जुन्यांतून नवें उत्क्रांत होणें, हीच जुन्याची खरी वाढ होय.

स्वतंत्र विचार न करितां आपोआप बनलेल्या पापपुण्याविषयींच्या व ईश्वराविषयींच्या माझ्या कल्पना जसजसा स्वतंत्र विचारांचा उदय होऊं लागला, तसतशा लयाला जाऊं लागल्या. माझे मित्र नरहरपंत यांचा सहवास झाल्यापासून या विषयांवर आम्हीं वारंवार बोलत असूं. हर्बर्ट स्पेन्सर यांच्या ग्रंथावर नरहरपंतांची फार भक्ति बसली, व माझ्या विचारांना तीच

दिसा लागली. ईश्वरप्रणीत असें कोणतेंहि धर्मपुस्तक नाहीं, व ईश्वराचा अवतार असा कोणताहि पुरुष झाला नाहीं, असा माझ्या मनाचा कल झाला व अजूनहि तो तसाच कायम आहे. ईश्वरप्रणीत मानलेल्या व इतरहि ग्रंथांतून जें चांगलें असेल तें ग्राह्य मानावें व जगांत जे सत्पुरुष होऊन गेले ते वंद्य व अनुकरणीय मानावे अशी मनाची प्रवृत्ति होते, पण परमेश्वराशीं त्यांचा इतका निकट संबंध लावणें मनाला पटत नाहीं. परमेश्वराची पूजाअर्चा, प्रार्थना, भजन, जपजाप्य वगैरे गोष्टींकडे माझें मन कधींहि वळलें नाहीं. साधुसंतांच्या ग्रंथांतील नीति, वैराग्य, परोपकार वगैरेसंबंधाच्या प्रासादिक लेखांनीं माझ्या मनोवृत्ती उचंबळूं शकतात, व भक्तीच्या मनोवृत्तीनें कांहीं मनुष्यें जशीं ईश्वरभजनांत तल्लीन होऊन जातात त्याप्रमाणें मी कधींकधीं असलीं पद्यें पुनः पुनः घोकून म्हणण्यांत अगर त्यांतील विचारांचें मनन करण्यांत गढून जातों.

सद्वृत्ति मनांत ठरण्याला सत्पुरुषांच्या वाणींतून निघालेल्या प्रासादिक पंक्ति फार उपयोगी पडतात. पुढील पंक्ति माझ्या विशेष आवडीच्या आहेत.

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥
मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णाः
त्रिभुवनमुपकारश्रेणिभिः प्रीणयन्तः ॥
परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यम्
निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ॥
सर्वे भवन्तु सुखिनः । सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् ॥
तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात ॥
निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंची फळ ॥
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ।
मना बोलणें नित्य सोशीत जावें ॥
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें ।

मना सर्व लोकांस रे नीववावें ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावें ।
परी अंतरीं सज्जना नीववावें ॥

मेरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तोही पुढें जात आहे ॥

जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥

बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाऊलें ॥
त्याचें झाडीन अंगण । त्याचा दास म्हणवीन ॥

भगवन्तीं घडे जेणें अंतराय । हो का बापमाय त्यजावीं ते ॥

सदासर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा ॥

असे हो जया अंतरीं भाव जैसा । वसे हो तया अंतरीं देव तैसा ॥

परस्परविरोधी अनेक गोष्टी पुढें आल्या असतां तर्कशास्त्राची कसोटी लावून सत्यासत्य,न्यायान्याय यांचा निर्णय करण्यास लागणारा विचारांचा जोम व बुद्धीची तीव्रता यांचा मजमध्यें अभाव असल्यामुळें पुष्कळ तात्विक व व्यावहारिक गोष्टींतहि मनाचा कोणताहि निश्चय न करितां मी आपलें मन मध्यस्थ राहूं देतों. आपल्या अनुभवाला येतील व मनाला पटतील तेवढ्या थोड्याशा गोष्टींविषयीं मनाचे ग्रह करून ते आचरणांत आणावयाचे व इतर गोष्टींविषयीं कायमचे ग्रह होऊं द्यावयाचे नाहींत याविषयीं माझा यत्न असतो.

गहन प्रश्नांचीं उत्तरें समाधानकारक मिळालीं नाहींत–अर्थात् त्यां विषयींचीं कायमचीं मतें बनलेलीं नसलीं, तरी मनुष्यानें आपणाला समजूं लागण्याबरोबर आपल्या आचरणाचा मार्ग आंखला पाहिजे. आधीं मी या प्रश्नांचा निकाल लावीन आणि मग आपल्या आचरणाचा मार्ग ठरवीन असें म्हणून चालावयाचें नाहीं. मनुष्यानें जर बुद्धिपुरःसर आपल्या आच-रणाचा मार्ग आंखला नाहीं, तर यदृच्छेनें त्याचें आचरण कसें तरी होत

राहील, व त्याला न कळत त्याच्या आचरणाचे मार्ग ठरून जातील. बहुतेक मनुष्यांची अशीच स्थिति होत असते व ती आपल्या आचरणाला वळण लावण्याचा यत्न करीत नाहींत. आचरणाला दिशा लावण्याचा मुळीं प्रयत्नच न करणें वेगळें, आणि तसा प्रयत्न करीत असतां आगंतुक कारणांनीं अगर मनोविकारांच्या तावडींत सांपडल्यामुळें आपल्या हातून चुका घडणें हें वेगळें. मनुष्य आस्तिक असो अगर नास्तिक असो, त्याचें या जगांतील जीवित ही एक अमोलिक चीज आहे व तिचा उपयोग फार दूरदर्शीपणानें व शहाणपणानें केला पाहिजे अशा प्रकारची जाणीव उत्पन्न होऊन आपल्या आचरणाला दिशा लावण्याचा प्रयत्न मनुष्य करूं लागला म्हणजे त्याला नवजीवन प्राप्त झालें, असें मी समजतों. ही बुद्धि उत्पन्न होणें हा मनुष्याच्या प्रगतीचा पाया आहे. मग जसजसें मनुष्य आत्मनिरीक्षण व आत्मसंशोधन करूं लागेल, तसतसा त्याचा आत्मोन्नतीचा मार्ग अधिकाधिक सुलभ होत जाईल. ईश्वराचें अस्तित्व, आत्म्याचें अमरत्व, पुनर्जन्म, मनुष्याला अतींद्रिय ज्ञान प्राप्त होण्याची शक्यता वगैरे गहन विषयांवर विचार करून पक्षप्रतिपक्ष करणें व प्रतिपक्षाला चीत करून टाकणारे युक्तिवाद शोधीत बसणें हीं तीव्रबुद्धीच्या महान् तत्त्वज्ञांचीं कामें होत. सामान्य तरुणांनीं असल्या विषयांकडे लक्ष देऊन आपल्या वर्तनाला आळा घालण्याचें जें महत्त्वाचें कर्तव्य त्याकडे दुर्लक्ष्य करणें यासारखा दुसरा अविचार नाहीं, असें मला वाटतें. या प्रश्नांचा समाधानकारक निर्णय करणें फार कठिण आहे. हे प्रश्न अत्यंत कठिण आहेत; पण त्यांबद्दल सामान्य मनुष्याचे देखील परंपरेनें प्राप्त झालेले अगर वाचलेल्या व ऐकलेल्या गोष्टींवरून सहज बनलेले मनाचे कल असतात. ते हळूहळू पक्के होण्यासाठीं तसेच ठेवून देऊन वर्तनाला बुद्धिपुरःसर दिशा लावण्याचें काम तरुणानें प्रथम हातीं घेतलें पाहिजे.

आपलें व आपल्या कुटुंबाचें कल्याण करण्याचे विचार प्रत्येक मनुष्याच्या मनांत जरूर आले पाहिजेत व त्यांना अनुलक्षून त्यानें घडपडहि केली पाहिजे. हें मनुष्याचें पहिलें कर्तव्य आहे व हें ज्याच्या हातून होत नसेल तो मनुष्याच्या वरच्या पायरीला तरी पोहोंचला असला पाहिजे, अगर मनुष्य या पदवीला नालायक समजला पाहिजे. हें जरी खरें तरी

ज्यांत ऐहिक अगर पारलौकिक स्वार्थापलीकडे कांहींहि नाहीं असे विचारच मनुष्य जन्मभर करीत राहिला, तर त्याच्या मनाला समाधान मिळणार नाहीं. मीं काय केलें असतां माझ्या जन्माचें सार्थक्य होईल, हा विचार मनुष्याच्या श्रेष्ठ मनोवृत्तीचा दर्शक आहे. हा विचार केव्हांना केव्हां तरी मनुष्याच्या अंतःकरणांत उद्भवतोच. स्वतःच्या कल्याणासाठीं झटत असतां दुसऱ्यांच्याहि कल्याणाची काळजी बाळगून त्यासाठीं धडपड केली असतां माझ्या जन्माचें सार्थक्य होईल, असें या प्रश्नाचें उत्तर पुष्कळांच्या मनांत आलें आहे व तें आचरणांत आणण्याचा त्यांनीं यत्न केला आहे. केवळ स्वार्थापलीकडे ज्यांची नजर कधीं गेली नसेल, असे मनुष्य कितीहि धार्मिक दिसत असले तरी ते खरे धार्मिक नव्हत. आत्मोन्नतीसाठीं तळमळ उत्पन्न होणें हें मनुष्यपणाचें पहिलें चिन्ह होय, व परोन्नतीच्या द्वारें आत्मोन्नति साधण्यासाठीं धडपडणें ही त्याच्यावरची पायरी होय. या उभय विचारांचें आणि आचारांचें संमेलन ज्याच्या जीवितांत योग्य प्रमाणानें झालें त्यानें जन्माचें सार्थक्य केलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आत्मोन्नतीचे व परोन्नतीचे विचार मनांत येऊं लागले व त्यांसाठीं आपण धडपड करूं लागलों म्हणजे ती साधतेच असें नाहीं. जी आपणाला आत्मोन्नति अगर परोन्नति वाटेल ती खरोखरच तशी असेल कीं नाहीं हें समजणें कठिण आहे. तथापि प्रामाणिकपणानें यत्न करणें हें मनुष्याच्या हातचें आहे व तें त्यानें केलें कीं तो आपल्या कर्तव्याला जागला, असें म्हणावयाला हरकत नाहीं. स्वतःला योग्य मार्ग सांपडणें कठिण आहे; पण तो सांपडला असें गृहीत धरलें तरी तो दुसऱ्यांना शिकविणें महादुर्घट आहे. बुद्ध, कृष्ण, ख्रिस्त अशा अवतारी मानलेल्या पुरुषांच्या हातून सुद्धां बहुजनसमाजाला मार्ग दाखविण्याचें कार्य तडीला गेलें नाहीं; मग सामान्य मानवांची काय कथा? असें आहे तरी कोणीं निराश होण्याचें कारण नाहीं. टिटवीनें ज्याप्रमाणें आपल्या चोंचींतून थेंबथेंब पाणी बाहेर आणून टाकून समुद्र आटविण्याचा यत्न केला, त्याप्रमाणेंच आपला यत्न आहे अशी खूणगांठ बांधली म्हणजे निराश होण्याचें कारण राहणार नाहीं. बहुजन समाजाच्या उन्नतीचें कार्य जें हातीं घ्यावयाचें, त्याचा उपयोग स्वोन्नतीच्या साठीं फार होत असतो. फलावर आसक्ति न ठेवतां

सामान्य मनुष्य देखील जर अशा कामाला लागेल, तर त्याचा आत्मोन्नतीचा मार्ग फार सुखकर होईल.

अमुक एक धर्माच्या अगर मताच्या लोकांतच चांगलीं माणसें निपजतात असें नाहीं. सर्व प्रकारच्या आस्तिक व नास्तिक मतांच्या अनुयायांमधून सत्पुरुष निर्माण झाले आहेत. यावरून असें दिसून येईल कीं, मन थोर होण्यास अमुक एक मताचा अंगीकार अवश्य आहे, असें नाहीं. आपल्या आटोक्यांतील अनेक गोष्टींचा विचार करून मनुष्यानें प्रामाणिकपणानें आपलें मत ठरवावें. मनुष्याची किंमत त्याच्या मतावर नाहीं. ती त्याच्या आचरणावर आहे. गहन विषयांवरील मतें मनुष्यांच्या सद्विचारांच्या व सत्कृतींच्या आड येत नाहींत, आणि म्हणूनच सर्व मतांच्या लोकांत थोर पुरुष आढळून येतात.

कोणतेंहि धर्मपुस्तक ईश्वरप्रणीत नाहीं व कोणतीहि व्यक्ति ईश्वरी अवतार नाहीं असें जे मानतात, ते आपल्या राष्ट्रांतील बहुमोल धर्मग्रंथांचा अगर अवतारी म्हणून मानलेल्या पुरुषांचा अनादर करतात असें म्हणणें योग्य होणार नाहीं. आईबापांच्या मतांशीं आपलीं मतें सर्वथैव जुळत नाहींत यासाठीं कांहीं गोष्टींत त्यांच्या इच्छेप्रमाणें न वागणारा मुलगा आईबापांशीं प्रेमानें व पूज्य बुद्धीनें वागूं शकेल; त्याचप्रमाणें वरील मतें धारण करणारा मनुष्यहि आपल्या राष्ट्रांतील उत्कृष्ट ग्रंथ, थोर विभूति आणि त्यांनीं घालून दिलेल्या परंपरा यांविषयीं आदर व पूज्यबुद्धि बाळगूं शकेल. त्याचें म्हणणें एवढेंच असणार कीं देशकालास अनुसरून पूर्वपरंपरेंत क्रमाक्रमानें बदल होत गेला पाहिजे. राष्ट्रीय ग्रंथ, राष्ट्रीय पुरुष आणि राष्ट्रीय परंपरा हीं सर्व राष्ट्राचें जीवन होत; पण पाणी जसें नेहमीं वाहातें राहून शुद्ध राखण्याची खबरदारी घ्यावी लागते त्याचप्रमाणें राष्ट्रीय आचारविचारांना चालन देऊन ते देशकालांशीं जुळतील असे करावे लागतात. पाण्याला उपसा नाहींसा झाला म्हणजे जी त्याची स्थिति होते, तीच आपल्या राष्ट्रीय म्हटल्या जाणाऱ्या आचारविचारांची स्थिति झालेली होती व अजून आहे. प्राचीनकाळच्या आचारविचारांच्या परंपरेंत जें श्रेष्ठ व रमणीय आहे तें राखलें पाहिजे व बाकीचें हळुहळू बदलीत गेलें पाहिजे.

आमच्या पूज्य धर्मग्रंथांविषयीं मजमध्यें किती आदर आहे, हें पुनर्विवाहानंतरचें माझें वर्तन व आश्रम चालविण्याचें धोरण यांवरून दिसून येईल.

पाश्चात्य शिक्षणानें उद्भवलेल्या विचारांनीं अंधश्रद्धा नाहींशी होऊन प्रत्येक गोष्टीला विचाराची कसोटी लावण्याची संवय झाल्यानंतर आपणाला समजतील व पटतील अशीं सत्पुरुषांच्या तोंडचीं वचनें वाचावीं व त्यांचें मनन करावें आणि अल्पांशानें सद्विचार कृतींत उतरविण्याचा यत्न करावा एवढेंच माझें धर्माचरण बनलें. धार्मिक व तात्त्विक ग्रंथाचें माझें वाचन अगदींच थोडें झालें. याचें कारण मला वाचण्याला फुरसत थोडी मिळाली ही एक गोष्ट, व माझ्या वाचनाची गति अगदीं मंद आहे, ही दुसरी. सुमारें दहा वर्षांपूर्वी भगवद्गीतेकडे माझें लक्ष लागलें. तींतील कांहीं विचारांनीं माझ्या मनाला चटका लावून सोडला. 'In Tune With The Infinite' हें पुस्तक माझे मित्र नरहरपंत यांनीं माझ्या नजरेला आणून दिलें. हें मूळ पुस्तक व त्याचें त्यांनीं केलेलें **'अनंताशी साधर्म्य'** हें भाषांतर मीं अनेक वेळां वाचलें. हें मला फार आवडलें. ॲलनचीं लहानमोठीं तसल्याच विचारांचीं पांचसहा पुस्तकें एका गृहस्थांनीं पाठविलीं, तीं मीं मोठ्या प्रेमानें वाचलीं. मिसेस बिझांट यांचें आत्मचरित्र व बाबू केशवचंद्र सेन यांचें चरित्र यांच्या वाचनानेंहि मजवर बराच परिणाम झाला. स्वामी रामतीर्थ यांच्या व्याख्यानांचें मराठी पुस्तक मला फार आवडलें व त्या व्याख्यानांचे तीनहि भाग मीं मुद्दाम आणून वाचले. स्वामी विवेकानंदांच्या समग्र ग्रंथांचे पांच भागही मीं वाचण्याचा यत्न केला. या दोघांच्याहि ग्रंथांतील न समजण्यासारचे गहन भाग सोडून देणें भाग पडलें. रॅशनॅलिस्टिक प्रेस असोसिएशनचीं कांहीं पुस्तकें व इंगरसोल आणि इमर्सन यांचे कांहीं निबंध मीं अलीकडे वाचले आणि माझे मित्र राजश्री गाडगीळ यांच्या सहवासानें थिऑसॉफिक मंडळीनें प्रसिद्ध केलेलीं दोनतीन लहान पुस्तकें वाचलीं. एवढेंच काय तें माझें वाचन. या सर्व संस्कारांच्या समवायानें ईश्वरविषयक विचारांसंबंधानें माझ्या मनाचा हल्लींचा कल, साधुसंतांचा सर्वांभूतीं भगवद्भाव, वेदांत्यांचें अद्वैत, व भौतिकशास्त्रपारंगतांचें सर्वैक्य ( मोनिझम ) यांकडे आहे. या तीन विचारप्रवाहांच्या संगमांत सत्य असावेंसें वाटतें. सद्भावनेनें चालविलेल्या सर्व पंथांत व ते

सद्बुद्धीनें चालविणाऱ्या सर्व व्यक्तींत सत्याचा व चांगुलपणाचा पुष्कळ अंश आहे अशी माझी समजूत आहे, व या सर्वांविषयीं मला सहानुभूति वाटत असून यांजकडे दोषदृष्टीनें न पाहतां गुणग्राहकतेच्या दृष्टीनें पहावें, असें मला वाटतें. आपल्या राष्ट्राला नवजीवन प्राप्त होत आहे. अशा वेळीं स्वतंत्र विचारांना वाव देऊन एकमेकांच्या धर्मविचारांकडे उदार वृत्तीनें व थोर मनानें पाहण्यांतच सर्वांचें कल्याण आहे, असा माझा समज आहे.

परमेश्वर सृष्टीहून वेगळा नसून तो भूतमात्रांत प्रादुर्भूत झालेला आहे. ईश्वराची प्रार्थना करून त्याला आळविणें हें माझें ध्येय नसून ईश्वरस्वरूपांत लीन होणें हें माझें ध्येय आहे. आत्मविकास करीत करीत सर्वात्मभावापर्यंत मजल पोहोंचविणें, हें वरील ध्येय साध्य करून घेण्याचें साधन आहे. हा मार्ग अत्यंत बिकट आहे, हें असिधाराव्रत आहे, हें मी जाणून आहें. पण लक्ष योजनें दूर अशा या ध्येयाकडे एक पाऊल पडलें तरी मनाला थोडेंसें समाधान होतें. असलें समाधान दुसऱ्या कशानेंहि होत नाहीं. असले विचार मनांत ठसण्यासाठीं व कोट्यंशानें तरी ते कृतींत उतरावे यासाठीं भगवद्गीतेंतील कांहीं वाक्यें मीं आदर्शरूप ठरविलीं आहेत. अर्थात् आकाशावर नेम धर म्हणजे झाडाच्या शेंड्यापर्यंत तरी निशाण मारतां येईल, या म्हणीप्रमाणें हा आदर्श आहे. या आदर्शरूप पंक्तींपैकीं कांहीं येथें देतोंः—

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।<br>
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।<br>
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो.................. ॥

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।<br>
शुभाशुभपरित्यागी..................... ॥

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।<br>
शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥

तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिः............... ॥

माझ्यासारख्या मनुष्यानें असलें ध्येय आपणापुढें ठेवणें आणि त्याच्या-साठीं धडपड करणें हें मुलानें चंद्राला पकडण्यासाठीं उडी मारण्याइतकें हास्यास्पद आहे, हें मी जाणून आहें. तथापि याहून कमी प्रतीच्या आद-र्शानें मनाचें समाधान होत नाहीं याला माझा नाइलाज आहे. यांतलें मला कांहीं साधत नाहीं हें क्षणोक्षणीं माझ्या प्रत्ययाला येतें, तरी तें साध-ण्यासाठीं थोडा तरी बुद्धिपुरःसर यत्न करावा असें मात्र बरेच वर्षांपासून मला वाटत आलें आहे. धर्मराजाला अजातशत्रु हें नांव आहे. असें भाग्य या जगांत लाधणें दुर्घटच दिसतें. धर्मराजासंबंधानें तरी तें कितपत खरें असेल कोण जाणे! केवढाहि साधु असला, तरी भर्तृहरीची उक्ति "मृग-मीनसज्जनानां तृणजलसंतोषविहितवृत्तीनाम् ॥ लुब्धकधीवरपिशुना निष्का-रणवैरिणो जगति" त्याला लागू पडावयाचीच. आपणाला कोणी शत्रु उत्पन्न होऊं द्यावयाचा नाहीं हें करणें जसें अशक्य कोटींतलें आहे, तसें आपण कोणाचें शत्रुत्व करावयाचें नाहीं हें करणें नाहीं. अर्थात् तुलनेच्या दृष्टीनें दुसरें पहिल्यापेक्षां सोपें इतकेंच; परंतु दुसरेंहि अत्यंत कठिण आहे. मनोवृत्ति प्रक्षुब्ध झाल्यावर दुसऱ्याच्या संबंधानें द्वेषाच्या अगर वैराच्या कल्पना मनांत आल्यावांचून राहत नाहींत. पण ती वेळ निघून गेल्यानंतर जेव्हां आपण एकान्तांत शांत मनाच्या स्थितींत असतों, तेव्हां ज्यांविषयीं अशा कल्पना मनांत आल्या त्यांच्याविषयींच प्रेमाचे विचार मनांत आणणें, त्यांचें कल्याण व्हावें असें चिंतणें, प्रथमदर्शनीं वाटतें तितकें कठिण नाहीं. ज्यांच्या अंतःकरणांत आपणाविषयीं बरी भावना नसल्याचा आप-ल्याला संशय येत असेल त्यांच्याविषयीं एकान्तांत शुभविचार घोळविणें हें अभ्यासानें मनुष्याला शक्य आहे हें मी अत्यल्प स्वानुभवावरून म्हणूं शकतों. असे प्रयत्न आत्मोन्नतिकर आहेत अशी माझी समजूत झालेली आहे. यामुळें माझ्या आचरणांत दृश्य फरक पडला आहे असें मला वाटत नाहीं. कारण प्रसंग आला म्हणजे मनोवृत्ति क्षुब्ध होऊन त्यांचे परिणाम व्हावयाचे ते होतातच. तथापि वरील प्रयत्न दुष्ट मनोवृत्तींचा पगडा मना-वर फार वेळ राहूं देत नाहींत. कांहीं असो. वरील ध्येयापासून आपण

कितीहि दूर असलें तरी त्याच्यासाठींच तळमळ लागावी व त्या बाजूनें अत्यल्प तरी बुद्धिपुरःसर यत्न व्हावा म्हणजे माझ्या जन्माचें सार्थक्य होईल, असें मला वाटतें.

हा माझा धर्म, हीच माझी नीति, हेंच माझें तत्त्वज्ञान. हें अल्प अंशानें तरी आपल्या अंगीं मुरावें म्हणून माझी तळमळ व धडपड. यापलीकडील गोष्टी मला कळत नाहींत. त्यांविषयीं कोणताहि पूर्वग्रह होऊं न देतां त्या कळण्याविषयीं उन्मुख राहून आपणामध्यें त्या उत्क्रान्त होईतोंपर्यंत उतावीळपणें त्यांच्या पाठीला न लागतां स्वस्थपणें दृष्टीपुढला मार्ग क्रमीत राहण्याचें धर्माचरण मजकडून देहावसानापर्यंत होवो एवढीच माझी इच्छा आहे.

# प्रकरण अडुसष्टावें

## उपसंहार

माझी कहाणी पुरी झाली. लहानसें प्रारब्धकर्म कसेंबसें तरी शेवटाला गेलें. आतां हें विश्वात्म्याला अर्पण करून समारोप करावयाचा आहे. भौतिकसृष्टींतील लहानसें राज्य आणि मानससृष्टींतील त्याचा विस्तार यांचा योग्य प्रमाणानें होणारा मिलाफ अत्यंत आनंददायी असतो. याच्यासारखें सुख संसारी मनुष्याला दुसरें नाहीं. प्रत्यक्ष अनुभविल्या जाणाऱ्या सुखापेक्षां भावी सुखांतच मनुष्य अधिक दंग होऊन जातो. मनुष्याचा सर्व उत्साह पुढील यशाच्या आशेवर—मनोराज्यावर—अवलंबून असतो. या उत्साहदायी मनोराज्यांत संचार करून क्षणभर कल्पनासृष्टींत उड्डाण करण्याची परवानगी घेतों.

हिंगण्याच्या माळावर चाललेल्या स्त्रियांच्या हायस्कुलाची गणना उत्कृष्ट हायस्कुलांत होऊन ती एक नमुनेदार शाळा बनली पाहिजे. मॅट्रिक्युलेशनचा अभ्यासक्रम पुरा होण्यापूर्वी विवाहित स्थितींत पडूं इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठीं वेगळ्या ऐच्छिक अभ्यासक्रमाची सोय याच शाळेंत झाली पाहिजे. या अभ्यासक्रमांत गणितविषय व इतिहास-भूगोल यांच्या विशेष ज्ञानाला रजा देऊन पाकशास्त्र, बालसंगोपन, गृहव्यवस्था, आरोग्यशास्त्र, प्रसूतिशास्त्र, आजाऱ्यांची शुश्रूषा, शारीरशास्त्र वगैरे विषयांच्या थोड्याशा माहितीचा समावेश केला पाहिजे. अर्थात् हे विषय सप्रयोग शिकविले पाहिजेत. या शाळेला सोडून एक लहानसें स्त्रियांचें इस्पितळ असल्यावांचून हें करितां यावयाचें नाहीं. या इस्पितळांत मिड्‌वाइफ व नर्स यांचा उद्योग करूं इच्छिणाऱ्या स्त्रियांना निवळ मराठींतून पूर्ण शिक्षण मिळण्याची सोय झाली पाहिजे. शक्य झाल्यास मराठींतून हॉस्पिटल आसिस्टंटच्या वर्गाइतकें शिकविण्याची सोय व्हावी. मराठी शाळांसाठीं शिक्षकिणी तयार करण्याकरितां या शाळेला जोडून स्त्रियांचें ट्रेनिंग कॉलेज निघालें पाहिजे. इतक्या सगळ्या सोयी होऊन पांचचारशें स्त्रियांच्या शिक्षणाची उत्कृष्ट व्यवस्था झाल्यानंतर किंवा साधल्यास त्यापूर्वींहि महाराष्ट्रासाठीं स्त्रियांची युनिव्हर्सिटी करण्याचे प्रयत्न झाले

पाहिजेत. ही युनिव्हर्सिटी हल्लींच्या युनिव्हर्सिट्यांप्रमाणें आंग्ल-भाषा--प्रधान नसावी, स्वभाषेला प्रथम स्थान मिळून इंग्रजी भाषेला दुय्यम स्थान दिलें पाहिजे, व सर्व विषय स्वभाषेच्या द्वारें शिकविले गेले पाहिजेत. ज्या स्त्रियांना अनुकूलता असेल व ज्यांचे संबंधानें वेळाचा प्रश्न नसेल त्यांनीं हल्लींच्या युनिव्हर्सिट्यांचा उपयोग जरूर करून घ्यावा. परंतु इतर स्त्रियांसाठीं कमी वेळांत, कमी श्रमानें व कमी खर्चानें बऱ्याच उच्च दर्जाचें शिक्षण मिळण्याची सोय अशा रीतीनें केली पाहिजे. अशा प्रकारच्या स्वभाषेंत शिक्षण देणाऱ्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्यावांचून शिक्षणाचा पाया भक्कम होणें शक्य नाहीं. हिंगण्याच्या संस्थांतून जर महाराष्ट्रासाठीं स्त्रियांची युनिव्हर्सिटी उत्क्रान्त होईल तर मोठी बहार उडेल. या सर्व गोष्टी सिद्धीस जाऊन हें ठिकाण सरस्वती-देवीचें क्रीडास्थान बनलेलें, मूर्तसृष्टीत नाहीं तर नाहीं, पण कल्पनासृष्टींत तरी पाहून आनंदसागरांत पोहत रहावें, अशी वेडी इच्छा क्षणभर मनावर आपलें साम्राज्य चालविते.

हें कल्पनासृष्टींतलें राज्य जडसृष्टींत मूर्त स्वरूपांत दिसणें अत्यंत कठिण तर खरेंच, पण केवळ अशक्य कोटींतलें नव्हे ! या कार्याला आरंभ झाला तेव्हांची त्यांची स्थिति, आणि त्याला हल्लीं प्राप्त झालेलें दृश्यस्वरूप यांचा विचार केला असतां वर काढलेलें भावी स्थितीचें चित्र हास्यास्पद वाटणार नाहीं. गेल्या दहा वर्षांत सर्व दिशांनीं जी प्रगति झाली आहे, ती लक्ष्यांत घेतां वर सूचित केलेली या संस्थेची प्रगति होण्यास पाव शतकाचीहि जरूर लागूं नये. मात्र चालकांचा उत्साह आणि लोकांचा विश्वास हीं वाढत गेलीं पाहिजेत. मतभेद हे सर्वत्र असावयाचेच, पण त्यांच्या मुळाशीं व्यक्तिविषयक भावना नसून राष्ट्रीय भावना असली पाहिजे, म्हणजे ते असल्या सद्बुद्धीनें चालविलेल्या प्रयत्नांच्या आड येणार नाहींत. हल्लींचा काळ संघशक्तीचा आहे. या राष्ट्रकार्याविषयीं हजारोंहजार देशबांधवांमध्यें प्रेम उत्पन्न झाल्यास व त्याला अल्पप्रमाणानें तरी दृश्य स्वरूप मिळाल्यास एकचसें काय पण असलीं अनेक स्थळें उत्पन्न होऊन तीं भारतीय राष्ट्राच्या जीवनाचें केंद्र बनतील. अडचण काय ती आम्ही आपल्या घोर निद्रेंतून खडबडून जागे होऊन आपल्या कर्तव्याविषयीं

विचार करूं लागण्यासंबंधाची आहे. यासंबंधानेंहि निराश होण्याचें कारण नाहीं. अल्पप्रमाणानें तरी बहुजनसमाजांत जागृति होत आहे व तिचा थोडासा उपयोगहि राष्ट्रीय संस्थांना होत आहे. हें प्रमाण वाढविण्याचा उद्योग राष्ट्रभक्तांनीं नेटानें चालविला पाहिजे.

माझ्या मनानें पसंत केलेल्या या राष्ट्रीय उद्योगासाठीं माझ्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत परमात्म्यानें मला या संस्थांत काम करण्याची बुद्धि व सवड द्यावी, एवढेंच माझें त्याच्याजवळ मागणें आहे. माझ्या कल्पना-सृष्टींतील चित्र या जन्मींच जडसृष्टींत पाहण्याचें भाग्य जर मला लाधलें नाहीं, आणि पुनर्जन्माच्या कल्पनेंत जर सत्य असेल, तर या वासनेनें युक्त अशा माझ्या जीवात्म्यानें पुनः नवशरीर धारण करून प्रारब्धकर्म संपूर्ण करावें व नंतर जड शरीराचा त्याग करून परमात्मस्वरूपीं लीन व्हावें एवढीच माझी इच्छा आहे.

# आत्मवृत्त

## उत्तरार्ध

# प्रकरण पहिलें

## कुटुंबाची सद्यःस्थिति

गेलीं बारा वर्षें आमच्या कुटुंबाला फार चांगलीं गेलीं. कुटुंबांतील सर्व मंडळी आपापल्यापरी उद्योग करीत असून सुखासमाधानानें नांदत आहेत. प्रत्येक व्यक्तीविषयीं थोडी माहिती ह्या प्रकरणांत देण्याचा मीं विचार केला आहे.

माझी पत्नी आनंदीबाई ही पहिल्यापासूनच संसारदक्ष आहे. आमचे घरीं नेहमीं बरींच मुलें असावयाचीं. आनंदीबाईनें आमचे घरीं लहानसें बोर्डिंगच सुरू केलें होतें असें म्हटलें तरी चालेल. श्रीयुत माधवराव बापट यांचे चारी मुलगे आमचे येथें होते. घरखर्चासाठीं मीं दिलेली मासिक रकम व बोर्डिंगच्या मुलांच्या खर्चासाठीं आलेली रकम यांतून बचत होईल ती शिल्लक टाकावयाची असा तिचा क्रम असे. बहुतेक काम स्वतः करावयाचें व नाइलाज होईल तेव्हांच आणि तेवढेंच मोलानें द्यावयाचें हें तिचें ठरलेलें तत्त्व. आप्तांकडून क्वचित् प्रसंगीं मिळालेल्या देणग्या व पंडिता रमाबाईकडील देणगी ह्या सर्वांची भर त्या शिलकेंत टाकून व सुईण-पणामुळें होणारी प्राप्तीहि त्यांत घालून शिल्लक रकम व्याजासह वाढवेल तितकी वाढवावयाची असा क्रम तिनें सारखा चालू ठेविला होता. पुढें पुढें तिनें कांहीं अनाथ मुलें बाळगावीं व कांहीं खर्च घेऊन ठेवावीं असा क्रम सुरू केला. अशा रीतीनें तिनें दहाबारा अनाथ मुलांमुलींचें पालन-पोषण केलें आहे. ह्यासाठीं तिला क्वचित् प्रसंगीं कित्येक लोकांकडून वर्ग-णीहि मिळे. तिच्या शिलकेंत भर पडण्याला आणखी एक चांगली संधि आली. कुमारी विठाबाई सामंत ( हल्लीं सौ. मनोरमाबाई लेले ) ही आठ वर्षांची असतांनाच हिचें पालकत्व मजकडे आलें. तेव्हांपासून तिचें सर्व प्रकारांनीं पालनपोषण करण्याचें काम मीं आनंदीबाईवरच सोंपविलें. त्या संबंधानें तिला जें मासिक द्रव्य मजकडून मिळे त्यांतूनहि तिच्या श्रमांचा मोबदला म्हणून कांहीं बचत होई. अशा रीतीनें जमलेल्या सव्याज रकमे-पैकीं सहा हजार रुपये आनंदीबाईनें अनाथबालिकाश्रमाकडे ठेव म्हणून

ठेविले आहेत. ह्या रकमेचें व्याज तिला तिच्या हयातींत मिळावें व पुढें तें आश्रमाच्या खर्चाला लागावें अशी योजना आहे. हल्लीं ह्या व्याजाचा उपयोग अनाथ मुलांमुलींच्या पोषणाकडेच होत असतो. आतां स्वतःच्या मुलांबाळांची जबाबदारी न राहिल्यामुळें तिला कांहीं वेळ आश्रमासाठीं वर्गणी मिळविण्याचे कामीं लावितां येतो. तथापि थोड्या अनाथ मुलांची जबाबदारी अजून तिजवर असल्यामुळें त्यांजकडे लक्ष देण्यांतही तिला कांहीं काळ घालवावा लागतो.

माझा वडील मुलगा रघुनाथ ह्यानें दहा अकरा वर्षें सरकारी विद्याखात्यांत नोकरी केली. प्रथम कांहीं वर्षें हायस्कुलांतून शिक्षकाचें व पुढें एम्. ए. झाल्यानंतर कित्येक कॉलेजांतून गणिताच्या अध्यापकाचें काम त्यानें केलें. नऊ दहा वर्षें नोकरी झाल्यावर एक वर्ष फर्लो रजा घेऊन व पुढें ती आणखी चार पांच महिने वाढवून त्यानें पॅरिस येथें फ्रेंच अॅकॅडमीमध्यें गणिताचा अभ्यास केला. त्या अॅकॅडमीची (Diplôme d'Etudes Supèrieures) ही पदवी त्यानें मिळविली आहे. फ्रान्समध्यें गेला त्यावेळीं तो धारवाडच्या कर्नाटक कॉलेजांत गणिताचा अध्यापक होता. त्याच्या गैरहजिरींत त्या कॉलेजाला बी. ए. चे विषय शिकवण्याची परवानगी मिळाली. त्यावेळीं ह्याच्यापेक्षां विद्येनें कमी अशा एका गृहस्थांची कर्नाटक कॉलेजांत नेमणूक होऊन रघुनाथानें परत आल्यावर गणिताचा अॅसिस्टंट प्रोफेसर (Assistant Professor of Mathematics) ह्या जागेवर डेक्कन कालेजांत जावें असा हुकूम त्याला मिळाला. हा अन्याय रघुनाथाला सहन झाला नाहीं. कॉलेजें तपासण्यासाठीं युनिव्हर्सिटीनें एक कमिटी नेमिली होती तिनें कर्नाटक कॉलेजांतील गणित विषयासंबंधानें असा शेरा दिला होता कीं हल्लींचे अध्यापक ह्या कॉलेजांत आहेत तोंपर्यंत गणिताच्या ऑनर्स कोर्सला (बी. ए. चे गणितांतील विशेष प्रावीण्यदर्शक अभ्यासक्रमाला) परवानगी देऊं नये. ह्या जागेवरचे पूर्वींचे गृहस्थ परत आल्यावर ती परवानगी द्यावी. रघुनाथानें पॅरिसमध्यें असतांनाच ह्या अन्यायाबद्दल खरमरीत टीका करून अधिकाऱ्यांना लिहिलें होतें. ह्याचा कांहीं उपयोग न होतां त्याला परत आल्यावर डेक्कन कॉलेजांत रुजू व्हावें लागलें. फर्लो रजा भोगल्यानंतर निदान सहा



श्री. रघुनाथराव व मालतीबाई.

महिने तरी काम केलें पाहिजे असा नियम असल्यामुळें त्याला एकदम राजिनामा देतां आला नाहीं. ह्या अन्यायाचें परिमार्जन करण्यासाठीं त्याला अमदाबादच्या गुजरात कॉलेजांत गणिताच्या अध्यापकाची जागा सरकारनें दिली. पण ह्या वेळीं दुसऱ्या प्रकारानें एक नवीन अन्याय केला. ह्याचे अगोदर एक दोन वर्षे नोकरींत शिरलेले परंतु गुणांनीं कमी अशा लेक्चररच्या जागेवरील गृहस्थांस तीनशें रुपये पगार व प्रोफेसरच्या जागेवर नेमणूक झाली असतां रघुनाथाला अडीचशेंच रुपये पगार देण्यांत आला. अशा प्रकारचे अन्याय जेथें चालतात तेथें नौकरी नको असा विचार करून रघुनाथानें सरकारी नौकरीचा राजिनामा दिला. ह्या राजिनामा दिल्यानंतर राजिनामा देण्याचीं कारणें त्यानें बाँबे क्रॉनिकल पत्रांत प्रसिद्ध केलीं होतीं.

नंतर कांहीं काळानें वुइल्सन कॉलेजांत गणिताचे अध्यापकाची जागा रिकामी झाली ती त्याला मिळाली. येथें कॉलेजांत विद्यार्थी असतांनाच 'संतातीनियमन' आणि 'गुप्त रोगांपासून बचाव' ह्या दोन विषयांकडे रघुनाथाचें लक्ष लागलें होतें. फ्रान्समध्यें ह्या विषयांचा त्यानें अभ्यास केला व इकडे परत आल्यावर त्यानें ह्या विषयांवर पुस्तकें लिहिलीं हे त्याचे उद्योग वुइल्सन कॉलेजांत त्याची नेमणूक झाली त्या वेळीं तेथील अधिकाऱ्यांना माहीत होते. पण पुढें कित्येक लोकांनीं असले उद्योग करणाऱ्या मनुष्याला तुम्ही आपल्या कॉलेजांत अध्यापक कसा राहूं देतां अशा आशयाचीं पत्रें कॉलेजच्या अधिकाऱ्यांकडे पाठविल्यामुळें त्यांनीं त्याला 'हे उद्योग तरी सोडून द्या नाहींतर आपल्या जागेचा राजीनामा द्या' अशा अर्थाचें पत्र पाठविलें. रघुनाथानें आपल्या स्वाभिमानास साजेल अशा रीतीचें वर्तन ह्या वेळींही केलें. कॉलेजच्या अधिकाऱ्यांनींही सहा महिन्यांचा पगार व पगारांतून रुपयास एक आणा कापून व तितकीच रक्कम कॉलेजांतून घालून जो प्रॉव्हिडफंड जमला होता तो, हीं त्यास दिलीं व थोरपणाचें वर्तन करून कोर्टांत जाण्याची पाळी आणली नाहीं.

गणित विषय शिकविण्याचे वर्ग काढून कांहीं प्राप्ति होते कीं काय तें पाहण्याचा प्रयत्न त्यानें केला होता पण त्यांत यश आलें नाहीं. तेव्हां

थोडा थारेपालट करावा व तिकडे कांहीं उद्योग मिळाल्यास पहावा ह्या हेतूनें तो केनिया कॉलनीमध्यें नैरोबी येथें माझा दुसरा मुलगा शंकर होता त्याजकडे गेला. तेथें कांहीं महिने राहून आपल्या दर्जाला योग्य असें काम जमून न आल्यामुळें तो परत आला.

रघुनाथ फ्रान्समध्यें गेला त्या पूर्वीच त्याला फ्रेंच भाषा चांगली येत होती. तेथें गेल्यावर तर सर्व व्यवहार त्याला फ्रेंच भाषेंतच करावा लागत होता. ह्या गोष्टीचा त्याला नोकरी मिळविण्याचे कामीं फार उपयोग झाला. बॉंबे बेहरिंग कंपनी ह्या नांवाची मोत्यें व हिरे यांचा व्यापार करणारी एक कंपनी आहे तिचें ऑफिस टाइम्स ऑफ इंडियाच्या इमारतींत आहे. त्या कंपनीचे मॅनेजर मिस्तर रोझेंथाल हे फ्रेंच गृहस्थ आहेत. त्यांना इंग्रजी व फ्रेंच ह्या दोन्ही भाषा चांगल्या जाणणारा एक प्रायव्हेट सेक्रेटरी किंवा पर्सनल असिस्टंट पाहिजे होता. हें काम अलीकडे दीडवर्ष रघुनाथाला मिळालें आहे.

आपल्या विचारांच्या प्रसिद्धीसाठीं एकादें मासिक काढावें असा त्याचा हेतु बरेच दिवसांपासून होता, पण निर्वाहाची सोय झाल्यावांचून दुसरा कोणताही विचार मनुष्याला सुचत नाहीं. त्या विवंचनेंतून सुटल्यानंतर त्यानें ह्या गोष्टीकडे लक्ष दिलें. "समाजस्वास्थ्य" या नांवाचें लहानसें मासिक त्यानें गेल्या आठ नऊ महिन्यांपासून सुरू केलें आहे. ह्या एकंदर कामांत त्यानें बराच स्वार्थत्याग केला आहे. रघुनाथाचीं कित्येक मतें मला मान्य नाहींत व तीं वेळीं अवेळीं प्रसिद्ध करण्याचा प्रकारही मला संमत नाहीं. पण ज्या गोष्टींची माहिती होणें व्यक्तीच्या आणि समाजाच्या हिताचें आहे असें त्याला विचारपूर्वक वाटतें त्या गोष्टी तो निर्भीडपणें दुसऱ्या कोणाच्याही मताला न जुमानतां प्रसिद्ध करीत आहे आणि त्यासाठीं स्वतःच्या पदराला खार लावून घेत आहे. एकंदरींत त्याच्या बाणेदारपणाबद्दल व त्यासाठीं सोसाव्या लागणाऱ्या अडचणींना तोंड देण्याची तयारी त्यानें दाखविल्याबद्दल त्याचें कौतुक केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

त्याची पत्नी मालतीबाई ही फर्ग्युसन कॉलेजांत प्रीव्हियसपर्यंत शिकलेली असून तिनें पुष्कळ वर्षें मुलींच्या वेगवेगळ्या हायस्कुलांतून शिक्षकिणीचें

काम केलें आहे. हल्लीं ती मुंबई म्युनिसिपॅलिटीच्या मुलींच्या उर्दू शाळांत ड्रिल टीचरचें (कवाईत शिकवण्याचें) काम करीत असते. हल्लींच्या पिढींत तितका दिसून न येणारा काटकपणा व चिकाटी हे गुण मालतीबाईमध्यें विशेष प्रमाणांत आहेत. शाळेंतलें काम संभाळून मुंबईतल्या कित्येक स्त्रियांच्या चळवळींत ती बरेंच लक्ष घालीत असते व इतकें करून घरांतील कामकाज व टापटीप यांत बिलकुल कमी पडूं देत नाहीं. सांपत्तिक दृष्टया मालतीबाई रघुनाथाला बरीच मदत करूं शकण्यासारखी असल्यामुळें व त्याच्या नवीन प्रकारच्या चळवळींत त्याला तिची मनापासून सहानुभूति असल्यामुळें दोन वेळां नौकरीचा राजिनामा देतांना त्याचें मन कचरलें नाहीं.

माझा दुसरा मुलगा शंकर हा एम्. बी. बी. एस्. होऊन पुढें महायुद्धाचे वेळीं लष्करी मेडिकल खात्यांत शिरला. त्याला अफगाणिस्तानचे सरहद्दीवर, इराणांत व मेसोपोटेमियांत सैन्यांतील डॉक्टराचें काम करावें लागलें. तेथून सुटल्यावर त्यानें केनिया कॉलनीमध्यें नैरोबी येथें खाजगी रीतीनें डॉक्टरचें काम केलें व त्यांत त्याला यशही चांगलें आलें. तेथें त्यानें आपल्या दवाखान्याला जोडून हिंदी लोकांसाठीं एक हॉस्पिटल चालविलें व इतर डॉक्टरांना तेथें आपले रोगी ठेवण्यास परवानगी दिली. अशा रीतीनें त्याला तेथील हिंदी लोकांच्या विशेष रीतीनें उपयोगी पडतां आलें. त्यानें आपल्यासाठीं तेथें एक लहानसें घरही बांधलें आहे. सध्यां त्यानें आपलें हॉस्पिटल बंद करून आपला दवाखाना व घर हीं तेथील एका हिंदी डॉक्टराच्या स्वाधीन केलीं आहेत, कारण एफ्. आर्. सी. एस्. होण्याचें त्याच्या मनांत आल्यामुळें मुलांमाणसांना इकडे पाठवून तो त्या अभ्यासासाठीं एडिंबरो येथें नुकताच गेला आहे.

त्याची पत्नी रेवतीबाई ही महिला विद्यापीठाची 'गृहीतागमा' आहे. तिनें सुमारें दोन वर्षें पुण्यांतील नाथीबाई कन्याशाळेंत शिक्षकिणीचें काम केलें आहे. शंकर व रेवतीबाई यांचे दोन मुलगे एक पांच वर्षांचा व एक तीन वर्षांचा असे आहेत. त्यांच्या बाललीला पाहण्याचेंही भाग्य आनंदीबाईला व मला दीडवर्षांपूर्वी लाभलें होतें व हल्लींही लाभत आहे.

माझा तिसरा मुलगा दिनकर हा मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी. एस् सी. च्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिला आला होता. पुढें त्याला स्कॉलर्शिप

मिळून तो बंगलोरच्या रिसर्च इन्स्टिटयूटमध्यें गेला. तेथें त्यानें अडीच वर्षे अभ्यास करून जें संशोधनात्मक काम केलें त्याबद्दल त्याला त्या इन्स्टिटयूटचा असोसिएट करण्यांत आलें आहे. तेथें असतांनाच मुंबई युनिव्हर्सिटीच्या एम. एस् सी. पदवीसाठीं एक निबंध तयार करून त्यानें पाठविला होता. तो प्रशंसनीय ठरून त्याला एम. एस्‌सी. ची पदवी मिळाली व मूसमेडल ( पदक ) ही मिळालें.

पुढें त्यानें जर्मनींत जाऊन अभ्यास करण्याचें मनांत आणलें. चि• शंकरकडून पैशाची मदत झाल्यामुळें व कर्ज काढून थोडीशी पैशाची व्यवस्था केल्यामुळें हा त्याचा बेत तडीस गेला. लैप्झिग् युनिव्हर्सिटींत अडीच वर्षे अभ्यास करून त्यानें पीएच्. डी. ची पदवी मिळविली. परत आल्यावर त्याला बंगलोरच्या रिसर्च इन्स्टिटयूट मध्यें फेलोशिपवजा काम मिळालें होतें. जर्मनीला जाण्यापूर्वीच फर्ग्युसन कॉलेजच्या मंडळीचें असें म्हणणें होतें कीं यानें लाइफ मेंबर होऊन मग जर्मनीला जावें. परंतु अगोदर अभ्यास संपविल्यानंतरच मग जुळल्यास फर्ग्युसन कॉलेजांत जावें असें दिनकरानें ठरविलें. त्याच्या जर्मनींतील शिक्षणाकरितां नऊ हजारांवर झालेल्या खर्चांपैकीं साडेसहा हजार रुपये डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें दिले व तो सोसायटीचा लाइफ मेंबर झाला. ह्यानें आतां डेक्कन जिमखान्याचे वसाहतींत आपणासाठीं लहानसें घर विकत घेतलें आहे. अर्थात् कर्ज काढूनच हें त्याला करावें लागलें. मुंबई युनिव्हर्सिटींत परीक्षक होण्याची संधि मिळाल्यामुळें व मासिक प्राप्तींतून थोडी बचत करून निमेशिमें कर्ज त्यानें फेडलें आहे. मीं ज्या संस्थेंत काम केलें त्याच संस्थेंत काम करण्याची संधि माझ्या मुलाला मिळाली हें पाहून मला फार आनंद झाला.

याची पत्नी इरावतीबाई ही फर्ग्युसन कॉलेजांतून बी. ए. झालेली आहे. कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांत हिचा पहिला नंबर आल्यामुळें हिला फर्ग्युसन कॉलेजांत एक वर्ष दक्षिणा फेलोशिप मिळाली होती. हल्लीं तिनें एम. ए. च्या परीक्षेसाठीं “ कोंकणस्थ चित्पावन ब्राह्मणांचें मानवशास्त्रदृष्ट्या संशोधन ” या विषयावर निबंध लिहून पाठविला आहे.

माझा चवथा आणि सर्वांत लहान मुलगा भास्कर ह्याला मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी. एससी. व बी. टी. ह्या पदव्या मिळाल्या आहेत. शिक्षणशास्त्रांत आणखी डिप्लोमा व पदवी मिळविण्याच्या हेतूनें तो लीड्स येथील युनिव्हर्सिटींत दाखल झाला आहे. तेथें दोन वर्षे राहण्याचा त्याचा मानस आहे. दिनकरासाठीं खरचलेली बरीच रक्कम डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडून परत आली म्हणून हें धाडस करतां आलें. पूर्वीचें कर्ज फेडण्याकडे त्यांतली बरीच उडून गेली आहे हें खरें. तथापि थोडीशी राहिली आहे ती व थोडें नवीन कर्ज काढून कसेंतरी भागवितां येईल. तिकडून परत आल्यावर स्त्रियांच्या युनिव्हर्सिटींत काम करण्याची त्याची इच्छा आहे. पाहूं या कसें काय जुळतें तें.

आतां सरते शेवटीं स्वतःच्या संबंधानें चार शब्द लिहून हें प्रकरण पुरें करितों. शारीरस्वास्थ्याच्या संबंधानें मला कोणत्याही रीतीनें कुरकूर करण्याला जागा नाहीं. माझीं सर्व इंद्रियें शाबूत आहेत. होतां होईल तों सकाळचा व संध्याकाळचा चार चार मैलांचा व्यायाम मी चुकवीत नाहीं. येरंडवण्याच्या माळावर रहात असलों तर साधल्यास दोन्ही वेळा डोंगरांतून वेताळाचे देवळापर्यंत जाण्याचा क्रम मीं ठेविला आहे. पावसाळ्यांत पौडचे रस्त्यानें बरोबर दोन मैल जाऊन परत यावयाचें. बाहेर प्रवासांत असतां कोणत्याही ठिकाणीं गेलें म्हणजे माझें पहिलें काम फिरावयाला जाण्याला चांगला रस्ता कोणता हें पहावयाचें.

मुलांना बी. ए. पर्यंत शिकवून सोडून द्यावें व आपल्या द्रव्याचा राष्ट्रकार्यासाठीं उपयोग करावा हे बारा वर्षांपूर्वी आत्मवृत्ताच्या पहिल्या आवृत्तींत प्रदर्शित केलेले विचार टिकले नाहींत. मुलांच्या पुढें शिकण्याच्या हौसेच्या आड येऊं नये असें वाटल्यामुळें व पार्वतीबाई आठवले यांस अमेरिकेंत पाठविण्याचे कामींही बराच खर्च झाल्यामुळें माझी सांपत्तिक स्थिति बरी नाहीं. ह्यामुळें डेक्कन एजुकेशन सोसायटींतील पेनशन घेऊन शिवाय अनाथबालिकाश्रमांतील माझे व्यवसायबंधु चरितार्थासाठीं जितकें मासिकद्रव्य घेतात तितकें मलाही घ्यावें लागतें. अशीं कांहीं वर्षे गेलीं तर सर्व स्थिरस्थावर होईल आणि तीं तशीं जाण्याचा बराच संभव दिसत आहे.

येरंडवण्याच्या माळावर विद्यापीठाच्या आवारांत माझ्यासाठीं विद्यापीठानें झोंपडीवजा लहानसें घर बांधून दिलें आहे व त्यांतच एकदोन पाहुण्यांची चार दिवस राहण्याची सोय केली आहे. अर्थात् मी हयात आहें तोंपर्यंतच मला व माझ्या मंडळीला त्याचा उपभोग घेतां येईल.

एकंदरींत ईश्वरकृपेनें मला सर्व प्रकारचें सौख्य लाभलें आहे.

---



उभे:— श्री. दिनकरराव, श्री. भास्करराव, श्री. शंकरराव व त्यांची मुलें.
बसलेले:— सौ. रेवतीबाई, श्री अण्णा कर्वे, सौ. आनंदीबाई, सौ. इरावतीबाई.

# प्रकरण दुसरें

## अनाथबालिकाश्रमाचें गेलें एक तप

महिलाविद्यापीठाची जबाबदारी आश्रमानें घेतल्यावर शिकविणारे योग्य अध्यापक कसे मिळतील ही काळजी सुरू झाली. विद्यापीठ आर्थिक दृष्टीनें स्वतंत्र ठेवावें व त्याची घटना अगदीं भिन्न असावी असा आरंभापासून हेतु होता. तथापि विद्यापीठाच्या शिक्षणसंस्था चालविण्याची जबाबदारी आश्रमाच्या आजन्म सेवकांवरच पडणार हें स्पष्ट दिसत होतें. (१) साहित्याचार्य हरि रामचंद्र दिवेकर हे १९१५ च्या जुलईतच आश्रमाचे आजन्मसेवक झाले होते. ह्यांनीं संस्कृत विषयाची जबाबदारी घेतली. सन १९१५ सालच्या रिपोर्टांत त्यांचेसंबंधानें पुढील उल्लेख आहे.

" या वर्षी संस्थेच्या चालकवर्गांत एका उत्साही विद्वान् गृहस्थाची भर पडली, ही गोष्ट नमूद करण्यास आम्हांला अतिशय आनंद होत आहे. राजश्री हरि रामचंद्र दिवेकर, एम्. ए. हे अलाहाबाद येथील म्यूर सेंट्रल कॉलेजांत संस्कृत अध्यापकांचे मदतनीस होते व यांना हिंदुस्थान सरकारानें सालीना दीडशें पौंडांची स्कॉलर्शिप प्राचीन–शिलालेख–वाचन-शास्त्र ( Epigraphy ) व वर्णोत्क्रान्ति ( Palaeography ) या विषयांचें युरोपांत जाऊन अध्ययन करण्यासाठीं दिली होती; परंतु युद्धामुळें उपस्थित झालेल्या परिस्थितींत ह्या विषयांचा अभ्यास करणें सोईवार होणार नाहीं म्हणून युरोपांत जाण्याचा बेत त्यांनीं तूर्त रहित केला आहे. वरच्या दर्जाच्या सरकारी नोकरींत प्रवेश होऊन तींत नांवारूपास येण्याचा चांगला संभव असतां वेगळ्या प्रकारचा आयुष्यक्रम स्वीकारल्यानें आपणास मातृभूमीची सेवा विशेष प्रकारें करितां येईल, हें ध्यानीं आणून या संस्थेच्या चालकांशीं त्यांनीं विशेष परिचय केला व त्याचें पर्यवसान या संस्थेला आपलें जीवित अर्पण करण्यांत होऊन त्यांनीं आपल्या नोकरीचा राजिनामा दिला व ते या संस्थेचे लाइफ मेंबर झाले. "

दिवेकरांना ह्या वेळीं यूरोपला न जाण्याला महायुद्ध हें एक कारण होतें खरें, पण बलवत्तर कारण आमची अडचण व येथें राहण्याविषयीं आम्हीं केलेली आग्रहाची विनंति हें होय. विद्यापीठाची नवीन जबाबदारी

अंगावर घेतली असल्यामुळें यांच्या मदतीची अत्यंत जरूरी होती. त्यावेळीं त्यांना न मिळालेली संधि पुढें सवडीनुसार द्यावी असें आम्हांस वाटत होतें. तो योग नुकताच घडून आला आहे. त्यांना दीडवर्षांची आम्हांस शक्य तितक्या सवलतीनें रजा देण्यांत आली आहे. तिचा फायदा घेऊन ते पॅरिस येथील प्रो. लेव्ही यांच्या मदतीनें संशोधनाचें काम करण्यासाठीं गेल्या जानेवारी महिन्यांत युरोपला गेले आहेत. ते स्वतः कीर्ति मिळवून परत येतील व या संस्थेचें महत्त्व वाढवितील अशी आशा आहे.

( २ ) श्री. नारायण महादेव आठवले हे जरी प्रत्यक्ष काम करावयाला आलेले नव्हते तरी त्यांनीं अगोदरच आपणाला आश्रमाच्या कार्याला वाहून घेतलें होतें. त्यांचा एम्. ए. चा अभ्यास चालला होता व एम्. ए. झाल्याबरोबर ते कॉलेजांत शिकविण्यास येणार हें ठरलेलें होतें. त्याप्रमाणें ते येऊन रुजू झाले. ह्यांनीं पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र हे विषय घेतले.

( ३ ) श्री. गोपाळ महादेव ऊर्फ बापूसाहेब चिपळूणकर हे मुंबई युनिव्हर्सिटीचे बी. ए. असून यांनीं सरकारी सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजांतील परीक्षा दिली होती. व नंतर अमेरिकेंत जाऊन मिनेसोटा युनिव्हर्सिटीचे एम्. ए. होऊन ते नुकतेच परत आले होते. त्यांनीं आम्हांस मदत करण्यासाठीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिला व ते आश्रमाचे आजन्म सेवक होऊन कॉलेजांत शिकविण्यास आले. ह्यांनीं इतिहास व मानसशास्त्र ह्या विषयांची अडचण दूर केली.

( ४ ) आमचेजवळ कॉलेजांत इंग्रजी शिकविण्यास योग्य प्रोफेसर नव्हता. ही आमची अडचण श्री. सखाराम वामन जोशी, बी. ए., एल्. एल्. बी., वकील शिरपूर यांनीं दूर केली. पुष्कळ वर्षें नांवाजलेले वकील म्हणून काम झाल्यानंतर तो उद्योग सोडून दुसरें कांहीं करावें या विचारांत ते होते. त्यांनीं आमची अडचण जाणून एक वर्ष इंग्रजीच्या प्रोफेसराचें काम वेतन न घेतां केलें.

( ५ ) श्री. डॉ. एन्. एल्. रानडे यांनीं पहिल्या वर्षी कॉलेजांत शारीरशास्त्र शिकविण्याचें काम पतकरिलें व नंतर डॉ. ग. स. सहस्रबुद्धे यांनीं तें काम चालविलें.

( ६ ) प्रो. वासुदेव गोविंद मायदेव हेही आजन्मसेवक होण्याचे हेतूनें आम्हांस येऊन मिळाले. पुढें हे एम्. ए. होऊन इंग्रजी शिकविण्याचे कामीं मदत करूं लागले. हे महाराष्ट्र वाङ्मयक्षेत्रांत आपलें नांव करतील अशी आशा वाटत आहे. यांना कवित्वाची स्फूर्ति आहे, तिचा पुढें विकास होण्याचा संभव आहे. आश्रमाला द्रव्य-सहाय्य मिळविण्याचे कामीं यांची चांगली मदत झाली आहे.

( ७ ) श्री. विश्वनाथ आबाजी मोडक, बी. ए., हेही १९१६ सालींच आले व १९१७ सालीं आजन्मसेवक झाले. यांची महिलाश्रम हायस्कूल चालविण्याचे कामीं चांगली मदत झाली आहे.

अशा रीतीनें आरंभींच्या अडचणी दूर होऊन कॉलेजाचें काम व्यवस्थित सुरू झालें. महिलाविद्यापीठाच्या आश्रयाखालीं अध्यापिकाशाळा म्हणजे प्राथमिक शाळांसाठीं शिक्षकिणी तयार करण्याचें कॉलेजही १९१७ सालच्या जून महिन्यांत काढण्यांत आलें. बापूसाहेब चिपळूणकर यांस त्या कॉलेजचे प्रथमतः प्रिन्सिपल नेमण्यांत आलें. कॉलेजलाही त्यांची मदत होतीच.

( ८ ) श्री. गं. बा. गरूड यांची कॉलेजांत इंग्रजी शिकविण्याचे कामीं मदत झाली. यांनीं आजन्मसेवकांत आपलें नांव दाखल केलें होतें, व एक वर्ष आश्रमाच्या मंडळीच्या चिटणिसाचेंही काम केलें. पुढें त्यांच्या पत्नीला हवा मानवेना म्हणून एक वर्षाची रजा घेऊन नंतर त्यांनीं राजिनामा दिला. यांच्याकडून २।३ वर्षें चांगली मदत झाली.

( ९ ) १९१८ सालीं श्री. वामन मल्हार जोशी यांचें साहाय्य आम्हांस मिळालें. यांच्याबद्दल आश्रमाच्या रिपोर्टांत पुढील उल्लेख आहे.

"महाराष्ट्र गद्यलेखकांत रा. वामनराव जोशी आज बरेच वर्षांपासून प्रसिद्ध आहेत. यांच्या काव्यशास्त्रविनोदात्मक 'रागिणी'नें मराठी कादंबऱ्यांत उच्चस्थान पटकाविलें आहे; व यांच्या 'नीतिशास्त्रप्रवेशाच्या' द्वारें अनेक विद्यार्थ्यांनीं नीतिशास्त्रासारख्या अगम्य विषयांत सहज प्रवेश केला आहे. मराठी भाषेचे असले मार्मिक लेखक रा. जोशी प्रथम येथील कॉलेजांत प्रोफेसर म्हणून आले व दोन वर्षें येथील अनुभव घेतल्यावर आपलें पुढील आयुष्य याच कार्यांत घालविण्याचा निश्चय करून हे आश्रमाचे आजन्म-

सेवक झाले. यांच्या योगानें आजन्मसेवकमंडळींच्या कार्यक्षमतेंत केवढी भर पडली आहे हें सांगत बसण्याचें कारणच नाहीं. "

यांनीं मराठी विषय आपल्या ताब्यांत घेतला व आरंभीं इंग्रजीच्या कामींही यांची मदत झाली.

(१०) श्रीयुत परशुराम कृष्ण गोडे, एम्. ए. यांचीही एक वर्ष चांगली मदत झाली. पुढें

(११) प्रो. रा. कृ. लागू यांना कॉलेजांत इंग्रजी शिकविण्याचें मुख्य काम देण्यांत आलें. प्रो. लागू हे न्यू पूना कॉलेजांत इंग्रजी विषय शिकवितात व मुंबई युनिव्हर्सिटीच्या इंग्रजीच्या अभ्यासमंडळाचे ( Board of Studies ) ते सभासद आहेत. एवढ्या योग्यतेच्या अध्यापकाचा लाभ विद्यापीठास झाल्यामुळें इंग्रजी विषयासंबंधीं एक मोठी अडचण दूर झाली आहे.

(१२) १९२० सालीं प्रो. रामचंद्र हरी केळकर हे आम्हांस येऊन मिळाले व पुढें लवकरच आजन्मसेवकांत यांचें नांव दाखल करण्यांत आलें. प्रो. केळकर यांनीं सहा महिने बडोद्याच्या कॉलेजांत प्रोफेसराचें काम केलें होतें. यांनीं इतिहास व राज्यव्यवस्था हे विषय घेतले आहेत. येणेंप्रमाणें कॉलेजांतील बहुतेक विषय शिकविण्याची चांगली सोय झाली.

शारीरशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र हे विषय शिकविण्याला नेहमीं कोणा डॉक्टराची मदत लागते. एक वर्ष डॉ. कृष्णाबाई वेठे (हल्लीं सौ. खाड्ये) यांनीं तें काम केलें. हल्लीं डॉ. आगाशे यांची या कामावर योजना झाली आहे. हल्लीं कॉलेजांत अध्यापक आहेत ते येणेंप्रमाणें:—

१ प्रो. नारायण महादेव आठवले—प्रिन्सिपल व पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र ह्या विषयांचे अध्यापक.

२ प्रो. रामचंद्र कृष्ण लागू<br>
३ प्रो. वासुदेव गोविंद मायदेव } इंग्रजी विषयाचे अध्यापक.

४ प्रो. हरि रामचंद्र दिवेकर—संस्कृत विषयाचे अध्यापक.

( हे रजेवर आहेत तोंपर्यंत त्यांचे जागीं श्री. द. ग. येरवडेकर यांची नेमणूक केली आहे. )

५ प्रो. वामन मल्हार जोशी—मराठी व मानसशास्त्र या विषयांचे अध्यापक.
६ प्रो. रा. ह. केळकर } इतिहास व राज्यव्यवस्था या विषयांचे
७ प्रो. एस्. एस्. भागवत } अध्यापक.
८ डॉ. वा. ग. आगाशे—शारीरशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र ह्या विषयांचे अध्यापक.

प्रो. मायदेव हे इंग्रजीच्या जोडीला मराठी विषयही शिकवितात.

श्री बापूसाहेब चिपळूणकर यांजकडे कन्याशाळेचें धुरीणत्व देणें जरूर झालें, तेव्हां अध्यापिकाशाळेचें धुरीणत्व घेणाऱ्या एका योग्य आजन्मसेवकाची आवश्यकता उत्पन्न झाली.

(१३) आम्ही मोठ्या अडचणींत असतांना श्री. नारायण महादेव पटवर्धन हे आमच्या मदतीस आले. हे एम्. ए., एल्. टी. असून मध्यप्रांताच्या सरकारी विद्याखात्यांत काम करीत होते. तिकडील चांगला पगार व बढती हीं सोडून देऊन ते आम्हांस येऊन मिळाले व अध्यापिकाशाळा त्यांचे स्वाधीन करण्यांत आली.

महिलाविद्यापीठाच्या गृहीतागमा कु. गंगूबाई ओक यांचा श्रीयुत पटवर्धन यांच्याशीं विवाह झाल्यामुळें या उत्साही जोडप्याचा आश्रमाला लाभ होत आहे. सौ. गंगूबाई पटवर्धन यांचा आश्रमांतील मुलींचे गर्ल गाइडचें पथक तयार करण्याच्या कामीं फार उपयोग झाला. कांहीं दिवस त्या या पथकाच्या कॅप्टन् होत्या. हल्लीं त्या लंडन येथें शिक्षणशास्त्राचा अभ्यास करीत आहेत.

विद्यापीठाच्या कॉलेजांतील अध्यापकवर्गाची योजना झाली त्याचप्रमाणें विद्यापीठाचीं ठिकठिकाणीं हायस्कुलें चालविणाऱ्या स्त्रियांची निवड करणें जरूर होतें. यांतली बरीच निवड विद्यापीठ स्वप्नींहि नसतांना निष्काम-कर्म-मठानें करून ठेविली होती. मठाच्या सेविकांपैकीं चौघी शिल्लक राहिल्या आहेत. तिघींनीं विद्यापीठांतला अभ्यासक्रम पुरा करून गृहीतागमा झाल्यानंतर कार्यक्षेत्रांत प्रवेश केला आहे.

( १ ) ह्यांतल्या विद्यापीठाच्या पहिल्या गृहीतागमा श्रीमती वारूबाई शेवडे ह्या आश्रमांतील वसतिगृहावर देखरेख करण्याचें व थोडेसें महिलाश्रमांत शिकविण्याचें व असिस्टंट सुपरिंटेंडेंटचें काम करीत आहेत.

( २ ) श्रीमती सीताबाई अण्णिगेरी व ( ३ ) श्रीमती बनूताई आहो यांचा उल्लेख पुढें येईल. त्यांजकडे मुंबईच्या व बेळगांवच्या हायस्कुलांचें धुरीणत्व दिलें आहे. वारूबाई व सीताबाई ह्या गर्ल गाइडच्या चळवळींत भाग घेत असतात व त्यांनीं हिंगण्याच्या व मुंबईच्या शाळांत मुलींचीं पथकें तयार केलीं आहेत.

( ४ ) चवथ्या सेविका श्रीमती गंगूबाई तांबोळे ह्यांनीं विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा झाल्याबरोबर कार्यक्षेत्रांत प्रवेश केला. ह्या हल्लीं विद्यापीठाचा जमाखर्च ठेवण्याचें व खजिना संभाळण्याचें ( कॅशरचें ) काम उत्कृष्ट प्रकारें करीत आहेत.

( ५ ) यानंतर आश्रमाला येऊन मिळालेल्या सेविका श्रीमती कमळाबाई देशपांडे ह्या होत. ह्यांनीं आपलें सामर्थ्य आश्रमाच्या सेवेकडे खर्ची घालण्याचें ठरविलें आहे. यांची मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिक्युलेशन परीक्षा झाल्यानंतर पुढें त्यांनीं कोणत्या कॉलेजांत जावें हा प्रश्न उपस्थित झाला. देशपांडे मंडळींची इच्छा त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजांत जावें अशी होती. कमळाबाईंचे वडील श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर हे महिलाविद्यापीठाच्या प्रोव्हिजनल कमिटीचे सभासद असून पुढें सेनेटचे व सिंडिकेटचे सभासद होते व हल्लीं सेनेटचे सभासद आहेत. यांनीं कमळाबाईनीं महिलापाठशाळेंत जावें असा सल्ला दिला व तोच कमळाबाईना पसंत पडून त्या महिलाविद्यापीठाच्या गृहीतागमा झाल्या. यानंतर कांहीं दिवस त्यांनीं आश्रमांत काम केलें व हल्लीं त्या सातान्याचे कन्याशाळेंत मुख्य अध्यापिका आहेत. त्यांजबद्दल पुढें उल्लेख येईलच.

आश्रमाचे कांहीं आजन्मसेवक व सेविका आश्रमाला सोडून गेल्याबद्दल येथें उल्लेख करणें भाग आहे. श्री. वेणूबाई नामजोशी ( हल्लीं सौ. जानकीबाई साठे ), सिताबाई जोशी ( हल्लीं सौ. बनारसे ) व यमुनाबाई साने ( आतां सौ. इंदिराबाई नियोगी ), ह्या पुन्हां संसारांत पडल्यामुळें त्यांना राजिनामा द्यावा लागला. पहिल्या दोघींची विशेष अडचणीच्या वेळीं आश्रमाला मदत झाली आहे. यमुनाबाई एम्. बी., बी. एस्. होऊन पुढें बंगलोरच्या स्त्रियांच्या इस्पितळांत एक वर्ष अनुभव घेऊन नुकत्याच काम करूं लागल्या होत्या व त्यांची कॉलेजला मोठी मदत झाली असती,

परंतु पुढील आयुष्याची दिशा बदलण्याचें त्यांच्या मनांत आल्यामुळें आश्रमाची म्हणण्यासारखी सेवा त्यांजकडून झाली नाहीं. याचा मोबदला त्या अन्य रीतीनें देतील अशी आशा आहे.

ह्यापुढील भाग मोठ्या दुःखानें लिहावा लागत आहे. श्री० म. के. गाडगीळ व सौ. पार्वतीबाई गाडगीळ त्याचप्रमाणें श्री. बाळाजी विनायक कौलगेकर व सौ. हरणाबाई कौलगेकर यांची व आश्रमाची ताटातूट होण्याचा प्रसंग आला हा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे. गाडगीळ व कौलगेकर ह्यांच्यासंबंधानें १९२० सालीं प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांत पुढील उल्लेख आहे. "श्री. गाडगीळ व श्री. कौलगेकर यांनीं महिला-विद्यालयाच्या बाल्यावस्थेपासून त्याचें पोषण मोठ्या काळजीपूर्वक केलें व पुढें ती संस्था अनाथबालिकाश्रमांत समाविष्ट झाल्यावर आश्रमाची सेवा यांनीं यथाशक्ति केली. पण पुढें जसजशी नवीन मंडळी या कार्यक्षेत्रांत कामें करूं लागलीं तसतसें जुन्या-नव्यांचें पटणें कठीण पडूं लागलें व आश्रमयंत्राच्या चालण्यांत करकर सुरू झाली. उभय पक्षांच्याहि ध्यानांत ही स्थिति येऊन सर्वांच्या सल्ल्यानें उभयतांनीं राजिनामा द्यावा असें ठरलें." पुढें पार्वतीबाई गाडगीळ व हरणाबाई कौलगेकर यांचाही संबंध सुटला. या सर्वांनीं केलेली संस्थेची सेवा लक्षांत घेऊन त्यांना पेन्शन देण्यांत आलें आहे.

महिला पाठशाळेवर आश्रमाचें स्वामित्व होतें. विद्यापीठाकडून तिला फक्त द्रव्याची वार्षिक मदत होत असे. अशा स्थितींत ठाण्याचे श्री. विनायक लक्ष्मण भावे यांनीं एका मुख्य अटीवर शेंकडा चार व्याजाचे पन्नास हजारांचे रोखे आश्रमाला देऊं केले. ती अट म्हणजे आश्रमानें चालविलेल्या महिला पाठशाळेला श्री. भावे यांच्या मातुःश्रींचे नांव द्यावयाचें. ह्या देणगीचा आश्रमानें आभारपूर्वक स्वीकार करून श्री. भावे यांस तसें कळविलें व वर्तमानपत्रांतून देखील ही गोष्ट प्रसिद्ध झाली. नंतर थोड्याच दिवसांनीं सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या पंधरा लक्षांच्या देणगीबद्दलचें पत्र विद्यापीठाकडे आलें. त्यांत त्यांची अट विद्यापीठाच्या मुख्य कॉलेजला त्यांच्या मातुःश्रींचें नांव दिलें पाहिजे अशी होती. विद्यापीठाच्य मदतीवांचून कॉलेज चालविण्याचें सामर्थ्य आश्रमाचें अंगीं नव्हतें. तेव्हां

आश्रमाला आपण चालविलेलें कॉलेज विद्यापीठाच्या हवालीं करणें भाग पडलें; व त्याला विठ्ठलदासांच्या मातुःश्रींचें नांव दिलें गेलें. श्री. भावे यांच्याशीं देण्याघेण्याचा व्यवहार झालेला नव्हता. महिलाश्रमाला अगर अध्यापिकाशाळेला आपल्या मातुःश्रींचें नांव देण्याची आमची तयारी आहे असें श्री. भावे यांस कळविलें; पण तें त्यांस पसंत पडलें नाहीं. यामुळें त्यांची देणगी तशीच राहिली. यासंबंधानें आश्रमाच्या पंचविसाव्या रिपोर्टांत पुढील उल्लेख आहेः—

" दोन भिन्न दानशूर गृहस्थांनीं दोन भिन्न संस्थांस देऊं केलेल्या या भिन्न देणग्यांच्या खेंचाखेंचींत विद्यापीठ व आश्रम या दोन्ही संस्थांस जोडणारें कॉलेज सांपडलें, व कॉलेज चालविणाऱ्या आश्रमाच्या आजन्म सेवकांपुढें मोठाच कूट प्रश्न येऊन पडला. चार मैलांच्या आंत स्त्रियांसाठीं एकाच धर्तीचीं दोन कॉलेजें चालण्याइतकी स्त्रीशिक्षणाची वाढ झालेली असती, तर सरस्वतीबाई भावे कॉलेज व नाथीबाई ठाकरसी कॉलेज अशीं दोन्ही कॉलेजें चालवून हा प्रश्न सहज सोडवितां आला असता; पण दुर्दैवानें सध्यांच्या स्त्रीशिक्षणाच्या स्थितींत — एका कॉलेजासही पुरेशा विद्यार्थिनी न मिळणाऱ्या स्थितींत — अशीं दोन कॉलेजें चालविणें म्हणजे चालकांच्या शक्तीचा व लोकांच्या पैशाचा अपव्ययच झाला असता, आणि म्हणूनच आपण सरस्वतीबाई कॉलेज तरी चालवावें अथवा विद्यापीठास नाथीबाई ठाकरसी कॉलेज तरी चालवूं द्यावें असा पेंच येऊन पडला होता. स्वार्थाच्या व स्वाभिमानाच्या दृष्टीनें रा. भाव्यांची देणगी स्वीकारावी व आपला गेलेला शब्द परत घेऊन खालीं मान घालण्याचा प्रसंग आपणांवर ओढवून घेऊं नये असें वाटत होतें, तर कार्याच्या दृष्टीनें १५ लक्ष रुपयांच्या सहाय्यानें विद्यापीठास जें कार्य करितां येण्यासारखें आहे त्यांत आपण यत्किंचितही खो न घालतां उलट होईल तेवढें साहाय्य करावें असें वाटत होतें. ह्या दुसऱ्या हेतूनें आश्रमाच्या मंडळींनीं आपलें कॉलेज विद्यापीठाच्या स्वाधीन करावयाचें ठरवून १ जुलै १९२० पासून तें विद्यापीठाच्या स्वाधीन केलें. आश्रमानें रा. भाव्यांची देणगी कां नाकारली याची मीमांसा अशी आहे; व ही गोष्ट लक्षांत घेऊन आश्रमाचे हितचिंतक या कृत्याची योग्यायोग्यता ठरवितील अशी आशा आहे."

तारीख १ जुलई १९२० रोजीं महिला-पाठशाळा विद्यापीठाच्या स्वाधीन करण्यांत आली तेव्हां महिला पाठशाळेच्या खर्चाची सर्व जबाबदारी विद्यापीठानें घेतली. श्रीयुत गाडगीळ यांनीं आश्रमाची गरीबीची स्थिति जाणून स्वतःची अडचण करून हिंगणें येथें कॉलेज चालविण्याकरितां दरसाल एक हजार रुपये देण्याचें कबूल केलें होतें. तशी अडचण होती तोंपर्यंत त्यांनीं साडेतीन वर्षांचे साडेतीन हजार रुपये दिले व पुढें साहजिकच त्यांनीं ती देणगी बंद केली. त्यांच्या देणगीचा विशेष अडचणीच्या वेळीं फार उपयोग झाला.

आश्रमावर विद्यापीठाचें पैशाचें ओझें पडेनासें झालें आहे ही गोष्ट खरी तथापि विद्यापीठाच्या योगक्षेमाची काळजी आश्रमाच्या आजन्मसेवकांसच बरीचशी घ्यावी लागत आहे. विद्यापीठासाठीं द्रव्यसाहाय्य मिळविणें, त्याच्या मूलभूत कल्पनेचा चहूंकडे प्रसार करणें, नवीन शाळा काढण्याचे प्रयत्न करणें, कॉलेजांत शिकविण्याचें काम करणें किंवा त्या कामासाठीं योग्य माणसें शोधून काढणें हें सर्व आश्रमाच्या आजन्मसेवकांसच करावें लागतें. जोंपर्यंत महिला-पाठशाळा हिंगण्यास होती तोंपर्यंत सर्व मंडळी एकत्र असत. १९२३ च्या नवंबर महिन्यांत महिला पाठशाळा येरंडवण्याच्या इमारतींत गेल्यावर आश्रम आणि विद्यापीठ ह्या वेगळ्या संस्था आहेत हें अधिक प्रत्ययाला येऊं लागलें. आरंभापासून जरी त्या वेगळ्या होत्या तरी त्या वेळचा वेगळेपणा लक्षांत येत नसे. नंतर मात्र तो स्पष्टपणें भासूं लागला. कित्येक आजन्म-सेवकांना आश्रमापासून दूर रहावें लागलें व हळूहळू आश्रमाच्या आजन्मसेविकांना विद्यापीठाच्या कामासाठीं निरनिराळ्या ठिकाणीं पाठवावें लागलें, तेव्हां स्वाभाविकच कित्येक सेवकसेविकांचें आश्रमाकडचें लक्ष कमी झालें.

आश्रमाला मदत करतील अशी ज्यांच्या विषयीं मला खात्री वाटे व ज्या आश्रमाच्या बाल्यावस्थेंत मला मदत करण्यासाठीं सर्वांच्या अगोदर आल्या आणि आश्रमावर व त्यांच्या स्वतःवर आलेल्या अनेक प्रसंगांतून निभावून जाऊन ज्या अजूनपर्यंत नुसत्या टिकून राहिल्या आहेत इतकेंच नव्हे, पण ज्यांच्या मदतीवांचून आश्रमाचा एक पाय लंगडा झाला असता त्या पार्वतीबाईच्या धाडसासंबंधाची हकीकत दिल्यावांचून हें

आश्रमवृत्त पुरें होऊं शकणार नाहीं. ही हकीकत मनोरंजक असून धाडसी माणसांस स्फूर्ति देणारी आहे. त्यांच्यासंबंधानें आश्रमाच्या १९२० च्या रिपोर्टांत पुढील उल्लेख मींच केलेला आहे.

" अनाथबालिकाश्रमाच्या गेल्या चार पांच वार्षिक रिपोर्टांत पार्वती-बाई आठवले यांजबद्दल उल्लेख आला नाहीं. ह्याचें कारण एवढेंच कीं, आमच्या अविचाराच्या धाडसी प्रयोगाचा शेवटचा अंक समाप्त झाल्या-वरच ह्या प्रकरणाबद्दल एकदम काय लिहावयाचें तें लिहावें असा माझा हेतु होता, परंतु आतां कांहीं कारणानें त्याजबद्दल लिहिणें प्राप्त झाल्यामुळें आजपर्यंत घडून आलेल्या या गंभीर नाटकाच्या कथानकाचा थोडक्यांत सारांश दिल्यावांचून तसें करितां येत नाहीं.

" आश्रमाच्या जुन्या वर्गणीदारांना माहीतच आहे कीं, पार्वतीबाईंना पंचवीस वर्षांचें वय होईपर्यंत मराठीचीं मुळाक्षरेंही येत नव्हतीं व त्यानंतर अभ्यास करून त्यांनीं स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजांतील पहिल्या वर्गाचें सर्टि-फिकेट मिळविलें व स्वार्थत्यागपूर्वक एक तप आश्रमाची सेवा केली. आरंभापासूनच त्यांची स्मरणशक्ति ( पाठाशक्ति ) कमी प्रतीची होती व वयाच्या मानानें ती आणखी कमी झाली. त्यांना ह्या व्यंगाची जाणीव असूनही त्यांची चाळिशी उलटल्यावर दोनतीन वर्षांनीं त्यांनीं इंग्रजी शिकण्याचें मनांत आणलें. हेतु हा कीं, कामापुरतें इंग्रजी समजूं लाग-ल्यास सगळ्या हिंदुस्थानभर हिंडतां येईल व आश्रमाची माहिती सांगून त्यासाठीं मदत मिळवितां येईल. म्हणून वर्गणीसाठीं ठिकठिकाणीं हिंड-ण्याचें काम चालू असतांच त्यांनीं इंग्रजी शिकण्यास प्रारंभ केला, परंतु कांहीं प्रगति होत नाहीं असें आढळून आलें. ज्यांना त्यांची माहिती आहे त्यांना हजारांत एकामध्येंही न आढळणारे कांहीं गुण त्यांजमध्यें दिसून आले आहेत. निदान माझें तरी त्यांबद्दल तसें मत झालेलें आहे. तेव्हां मलाही वाटलें कीं पार्वतीबाईंचा इंग्रजीशीं थोडासा परिचय झाल्यास त्यांच्या कार्यक्षेत्राचा बराच विस्तार होऊं शकेल आणि म्हणून मी त्यांना सुचविलें कीं, त्यांनीं बऱ्याच मुदतीची बिनपगारी रजा घ्यावी व सर्वस्वी ह्याच उद्योगाला लागावें. मी त्यांना आणखीही सांगितलें कीं, हें तुम्हांला पटत असल्यास तुमच्या खर्चाची जबाबदारी घेण्यास मी तयार

आहे. हें काम बहुतेक अशक्य आहे अशी आम्हां उभयतांचीही समजूत होती व तसा उल्लेख मी आत्मवृत्तांत केलाही होता तथापि यत्नाची कमाल करून एकदां मनाची खात्री करून घ्यावी अशा हेतूनें त्यांनीं पुढें पाऊल टाकलें. हें करण्यापूर्वी त्यांनीं असें ठरविलें कीं, आश्रमाचें काम तहकूब केल्यामुळें त्याचें जें नुकसान होईल त्याहून अधिक चट्टा त्याला लागूं द्यावयाचा नाहीं. ह्या निश्चयानें त्यांनीं काम हातीं घेतलें व मुंबईतल्या अनेक शाळांत कांहीं मुदतपर्यंत राहून इष्ट हेतु साधण्यासाठीं त्यांनीं शक्य ते प्रयत्न केले परंतु त्यांचा फारच थोडा उपयोग झाला. इतके श्रम व काळ ह्या कामीं खर्चून आतां तें तसेंच अर्धवट सोडून देणें त्यांना व मला अत्यंत दुःखद वाटूं लागलें. त्या कामीं आशा करणें व्यर्थ आहे असें स्पष्ट दिसत होतें; पण आशेचा संभव नसतांही तिच्या मागें धांवणें हा जो मनुष्यस्वभावाचा दुर्बलपणा त्याला आम्ही अपवाद नव्हतों. आम्हांला असें वाटलें कीं, अत्यंत कठीण असा एकच राहिलेला उपाय—म्हणजे इंग्लंडांत अगर अमेरिकेंत वर्षसहामहिने राहून पाहणें—एकदां करून पहावा व त्या चक्रव्यूहांतून बाहेर पडावें; अगर हें नाटक शोकपर्यवसायी होणार असल्यास त्यांतच शेवटच्या अंकाची समाप्ति करून टाकावी. ह्या शेवटच्या उपायांत आशातंतु एवढाच होता कीं, रात्रंदिवस त्या भाषेशीं घर्षण झाल्यानें कांहीं उपयोग झाला तर झाला. लढाई संपल्यानंतर हा उपाय अमलांत आणावा व तोंपर्यंत पूर्वीचाच क्रम चालू ठेवावा असें ठरलें. एक वर्ष वाट पाहिल्यानंतर देखील युद्धाचा शेवट दृष्टीच्या आटोक्यांत येईना तेव्हां वाट पाहण्याला कंटाळून पार्वतीबाईंनीं ऑगस्ट १९१८ त जपानच्या मार्गानें अमेरिकेंत जाणाऱ्या बोटीवर पाय ठेविला व ता. ५ ऑक्टोबर रोजीं त्या अमेरिकेच्या पश्चिमकिनाऱ्यावर उतरल्या. ”

“ पौर्वात्यांच्या विचारसरणीप्रमाणें पार्वतीबाईंची इहलोकची यात्रा बरीच सफल झाली होती. प्रौढवयांत शिकावयास आरंभ करूनही त्यांनीं शिक्षकाचें तिसऱ्या वर्षांतील पहिल्या प्रतीचें सर्टिफिकेट मिळविलेंच होतें. त्यांच्या एका तपाच्या निरपेक्ष सेवेनें एका मोठ्या उपयोगी संस्थेच्या—अनाथबालिकाश्रमाच्या—उन्नतीला बरीच मदत झाली. त्यांचा एकुलता एक मुलगा एम्. ए.

होऊन त्यांच्याच प्रोत्साहनानें आश्रमाचा आजन्मसेवक झाला होता व त्याची नुकतीच स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या कॉलेजाच्या प्रिन्सिपलच्या जागीं नेमणूक झाली होती. आपल्या चलाख लहानग्या नातवाचे लाड पुरविण्याचेंही सुदैव त्यांना लाधलें होतें. तेव्हां आपण समाजाच्या व कुटुंबाच्या ऋणांतून मुक्त झालों असें त्यांस वाटूं लागलें व अशा स्थितींत मृगजळाप्रमाणें दूरदूर सरणाऱ्या आशेच्या नादीं लागून आपल्या जिवाला मुकावें लागलें तरी हरकत नाहीं अशी त्यांच्या मनाची तयारी झाली होती.आपण अंधारांत उडी घेत आहों, आपलें वय ४६ वर्षांचे आहे, चरितार्थासाठीं आपणास अगदींच अपरिचित अशा परक्या देशांत काम करावें लागणार, भाषेच्या अभावीं मुक्यासारखी आपली स्थिति होणार व कसलाही प्रसंग ओढवला तरी त्यांतून सुटण्याला आपणाजवळ द्रव्यबळ नाहीं ह्या सर्व गोष्टींची पूर्ण जाणीव असतांही, आश्रमाच्या एका पैशालाही न शिवतां जें काय होईल तें करावयाचें असा निश्चय करून, त्यांनीं आपणाला संकटांच्या दरींत लोटून दिलें. ज्या संकटांना तोंड देण्यास मी स्वतः तयार झालों नसतों त्यांत त्यांना लोटण्यास बऱ्याच अंशांनीं मी कारण झालों. क्रमाक्रमानें त्यांच्या मनाची तयारी माझ्या प्रोत्साहनानें झाली व असें करणें निर्दयपणाचें होतें हें मला कबूल केलें पाहिजे. माझ्या अपराधाची तीव्रता कमी करणारी काय ती एकच गोष्ट आहे. ती ही कीं, पार्वतीबाईमध्यें कांहीं विशेष गुण आहेत अशी माझी कल्पना आहे. आणि विशेष प्रसंगावांचून त्या गुणांच्या उत्कर्षाला वाव मिळत नाहीं. तेव्हां तिकडे जाण्यासाठीं त्यांना भर देण्यांत त्यांच्या अंगच्या विशेष सामर्थ्यांच्या विकासाला क्षेत्र सांपडावें हा एक हेतु होता. तथापि त्यांच्या मार्गांतल्या अडचणींमुळें त्यांना कदाचित् जिवालाही मुकावें लागेल हें मला स्पष्ट दिसत होतें. मजकडून होणाऱ्या मदतीसंबंधानें मात्र मीं त्यांजमध्यें भलतीच आशा उत्पन्न केली नाहीं. अमेरिकेंत जाणें व तिकडून परत येणें ह्या बद्दलचा प्रवासखर्च व त्याहून अधिक फारच थोडी द्रव्याची मदत देण्याचें मीं कबूल केलें. हें करण्यासही माझ्याजवळ पैसा नव्हताच. कर्ज काढून जरूर ती रक्कम भरावी व हळुहळू तिची फेड करावी असें मीं योजिलें होतें. परंतु मला एकसष्टावें वर्ष लागलें त्यावेळीं मुंबईतील व महाराष्ट्रांतील स्त्रियांनीं मला पंचवीसशें

रुपयांची थैली दिली. तींत थोडी भर घालून मीं आतां पर्यंत त्यांच्यासाठीं २७०० रुपये खर्चिले. स्त्रियांकडून मिळालेल्या देणगीचा भलत्याच मनोराज्यासाठीं खर्च करणें योग्य नव्हे हें मी जाणून आहें; व यत्न करून ही रक्कम सव्याज दुसऱ्या कामीं लावीन अशी मला उमेद आहे. "

"पार्वतीबाई उघड्या डोळ्यांनीं तर्कित व अतर्कित संकटांना तोंड देण्याला पुढें सरसावत होत्या व त्यांच्या भाराखालीं दडपून जाण्याची ही वेळ आली होती. पहिलें वर्ष सवावर्ष त्यांना शरीराच्या अस्वास्थ्यांत, पैशाच्या टंचाईत व काळजींत काढावें लागलें. त्यानंतर त्यांची परिस्थिति सह्य होऊं लागली व अलीकडे त्यांची स्थिति बरीच समाधानकारक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. दिवसांतून कांहीं वेळ त्यांना उपयुक्त कामीं लावितां येतो. ओ'रायली या उपनांवाच्या मायलेकींच्या लहान कुटुंबांत आतां त्यांना आश्रय मिळाला आहे. न्यूयॉर्कजवळ ब्रुकलिन येथें त्यांचें लहानसें घर आहे तेथें त्या राहतात. हें मध्यम स्थितींतलें कुटुंब असून त्यांची सांपत्तिक स्थिति साधारणच आहे. तरी पार्वतीबाईंना त्यांजकडून फार मदत होते. त्या कुटुंबांत त्यांची सुखानें राहण्याची सोय झाली आहे. तरी उपजीविकेसाठीं त्यांना अजूनही काम करावें लागतेंच. कुमारी ओ'रायली ह्या पन्नाशीच्या वयाच्या असून सार्वजनिक कामांत लक्ष घालणाऱ्या व विशेषतः कामगार वर्गाच्या हितासाठीं झटणाऱ्या आहेत. गेल्या वर्षीं सगळ्या जगाची कामगार-परिषद् वाशिंग्टन येथें भरली. त्या परिषदेस ह्यांनीं पार्वतीबाईंना आपल्या खर्चानें नेलें होतें व तेथील बऱ्याच संस्था त्यांनीं त्यांना दाखविल्या. ओ'रायलींचें कुटुंब फार प्रेमळ असून त्याची पार्वतीबाईंना अनेक प्रकारांनीं मदत होत आहे. पार्वतीबाईंनीं आपला फुरसतीचा कांहीं वेळ तेथल्या हिंदी व अमेरिकन स्त्रीपुरुषांना भेटून आश्रमाला कांहीं मदत करण्यासाठीं त्यांचीं मनें वळविण्यांत घालविला. अशा रीतीनें त्यांनीं आश्रमासाठीं चारशें डॉलर वर्गणी जमविली. परत येतेवेळीं प्रवास खर्चाला उपयोगी पडावी म्हणून सदर रक्कम मीं तेथें त्यांजवळच ठेविली आहे व तिची त्यावेळची किंमत, चौदाशें रुपये, आश्रमाकडे जमा केली आहे. अर्थात् ती रक्कम पूर्वी खर्च झालेल्या रकमेहून वेगळी आहे. हे चौदाशें रुपये व पुढें आणखी जमविल्यास ते सर्व

अमेरिकन स्कॉलरशिपफंड म्हणून आश्रमांत कायमचे शिल्लक रहावे व त्याच्या व्याजाचा उपयोग गरीब विधवांच्या शिक्षणासाठीं व्हावा अशी माझी इच्छा आहे. हें एक पार्वतीबाईच्या धाडसाचें व अमेरिकन औदार्याचें स्मारकच होऊन राहील. ओ'रायली मायलेकी व पार्वतीबाईना अनेक प्रकारें मदत करणारे हिंदी व अमेरिकन लोक यांचे मी ह्या ठिकाणीं संस्थेचे व स्वतःचेतर्फे मनःपूर्वक आभार मानितों."

"ह्या प्रकरणाचा शेवट एका वेळीं वाटत होता तितका हृदयभंजक होणार नाहीं अशी आशा वाटते. हें सर्व कथानक फार मनोरंजक व बोधप्रद होईल आणि सुरक्षितपणें हिंदुस्थानांत परत येण्याचें नशिबीं असल्यास पार्वतीबाई ही मनोवेधक हकीकत लिहून सर्वांना सादर करितील यांत शंका नाहीं. पण काळाच्या उदरांत काय आहे कोणी सांगावें ?"

पार्वतीबाईचे बाकी राहिलेले दिवस अमेरिकेंत विशेष कष्टांवाचून गेले. परत येतांना लंडन पॅरिस वगैरे शहरें पाहण्याची संधि त्यांना मिळाली. त्यांनीं एकंदर सुमारें चार हजार रुपये वर्गणी जमविली व दोन वर्षांपूर्वी आणखी दीड हजार रुपये त्यांनीं पूर्वी मिळविलेल्या वर्गणीदारांनीं पाठवून दिले. ही सर्व रक्कम अमेरिकन स्कॉलरशिपफंड म्हणून आश्रमाच्या कायमचे शिलकेंत जमा आहे. पार्वतीबाईचा इंग्रजी भाषा शिकण्याचा हेतु सफल झाला नाहीं. त्या परत आल्या त्या वेळचें त्यांचे मोडकें तोडकें इंग्लिश होतें तेंही नाहींसें झालें आहे. तथापि पाश्चात्य लोकांच्या सहवासाचा त्यांच्या विचारांवर परिणाम झालेला आहे. परत आल्यावर पार्वतीबाईनीं पुन्हां आश्रमाची वर्गणी जमविण्याचें काम सुरू केलें आहे. पार्वतीबाईचें चरित्र म्हणजे एक कादंबरीच आहे. हें चरित्र लवकरच प्रसिद्ध होणार आहे तेव्हां त्या संबंधानें आणखी लिहिण्याचें कारण नाहीं.

(१) आश्रमांत आतां सर्व प्रकारच्या सोई फार चांगल्या झाल्या आहेत. पूर्वी पिण्याला व स्वयंपाकाला कालव्याचेंच पाणी घ्यावें लागत असे. पावसाळ्यांत गढूळ पाणी येऊं लागलें म्हणजे फारच त्रास पडत असे व तें एक दोन दिवस निवळत ठेवावें लागत असे. आतां तेथें ट्यूबवेल् (Tube well) केली आहे. म्हणजे यंत्रानें जमिनींत साठ फूट खोल भोंक पाडून त्यांत खालपर्यंत नळ बसवून पंपानें पाणी घेण्याची सोय

केली आहे. हा हातपंप सहा सात वर्षांच्या मुलीलाही चालवितां येईल इतका हलका आहे. पिण्याला व स्वयंपाकाला हें पाणी त्या वसाहतीला पुरेसें होतें व पावसाळ्यांत देखील अगदीं स्वच्छ पाणी मिळूं शकतें.

( २ ) पूर्वी बाजारांतून धान्य आणावें, तें निवडून स्वच्छ करून दळणासाठीं पुन्हां शहरांत पाठवावें, असा द्राविडी प्राणायाम करावा लागे. आतां आश्रमानें ऑइल एंजिन आणलें आहे व त्याच्या साह्यानें दळण्याची गिरणी काढिली आहे. तिचा उपयोग आश्रमाला होऊन आजूबाजूच्या लोकांचेंही दळण ह्या गिरणीवर दळून दिलें जातें.

( ३ ) पूर्वी जिकडे तिकडे राकेलाचे दिवे वापरावे लागत. नेहमीं कांचा सडकून फुटावयाच्या व कंदील धुरानें खराब व्हावयाचे. आतां ऑईल इंजिनच्या मदतीनें डायनॅमो चालवून विजेच्या दिव्यांची सोय केली आहे.

( ४ ) एंजिन चालत असेल तेव्हां पंप चालवून उंच ठिकाणीं ठेविलेल्या टांकींत पाणी चढवून ठेवावयाचें व नंतर तें नळानें जरूर पडेल तेव्हां स्नानाच्या खोलींत उपयोगांत आणावयाचें व पाणी तापविण्याच्या बंबांत सोडावयाचें अशी व्यवस्था केली आहे.

( ५ ) आश्रमाच्या सभोंवतालची जागा स्वच्छ व सपाट केली आहे व शाळेचे अंगणांत आणि वाचनालयासमोर बाग केले आहेत.

( ६ ) येथें शाळांच्या व कॉलेजांच्या उपयोगासाठीं शास्त्रीय उपकरणें तयार करण्याचा कारखाना निघाला आहे. त्या कारखान्याला "जूनियर लॅबोरेटरी ॲपॅरेटस वर्कशॉप" असें नांव दिलें आहे. ह्यांतून तयार झालेलीं उपकरणें सरकारी विद्याखात्यानें हायस्कुलांच्या उपयोगासाठीं घेतलीं आहेत. शिवाय मुंबईचें रॉयल इन्स्टिटयूट, पुण्यांतील फर्ग्युसन व न्यू पूना कॉलेजें, धारवाडचें कर्नाटक कॉलेज व सुरत आणि अमदाबाद येथील कॉलेजें, ह्या सर्वांनीं मिळून आजपर्यंत सुमारें दहा हजार रुपयांचीं उपकरणें खरेदी केलेलीं आहेत. ह्या उपकरणांत विद्युत्संबंधीं उपकरणें मुख्य आहेत. हिंगण्याच्या वसाहतींत व एरंडवण्याच्या माळावरील कॉलेजाच्या वसाहतींत यांत्रिक दृष्टीच्या ज्या सुखसोयी झालेल्या आहेत त्या सर्वांचें श्रेय पार्वतीबाईंचे चिरंजीव श्रीयुत नारायण महादेव ऊर्फ नाना आठवले ह्यांस आहे. यांनीं विद्यार्थी असतांना प्रिन्सिपल केशवराव कानिटकर यांच्या प्रोत्साह-

नानें त्यांच्या नजरेखालीं फर्ग्युसन कॉलेजाच्या वर्कशॉपमध्यें एक वर्ष काम केलें व त्यांना शास्त्रीय उपकरणें बनविण्याच्या बाबतींत एक प्रकारची दृष्टि उत्पन्न झाली. तिचा त्यांनीं परिपोष करून स्वतःच्या हिंमतीवर तिच्या मूर्त सृष्टींतील कार्याला क्षेत्र निर्माण केलें. मुंबईच्या रॉयल इन्स्टिटयूटमध्यें एक प्रकारचें सूक्ष्मदर्शक यंत्र (Travelling Microscope) विलायतेहून येतांना त्याचा एक महत्वाचा भाग मोडून आलें, तें तेथील पदार्थविज्ञानशास्त्राचे अध्यापक व नानांचे सहाध्यायी प्रोफेसर परांजपे यांनीं मुंबईस नीट होईना म्हणून ह्या कारखान्यांत आणून टाकलें. नानांनीं त्यांत डोकें घालून पुष्कळ वेळ खर्चून तें दुरुस्त केलें. त्यांना या विषयाचा ध्यास लागून राहिला आहे.

कपड्यांनीं व दागदागिन्यांनीं मनुष्यदेहाला जशी शोभा येते त्याप्रमाणें आश्रमाचें बाह्य स्वरूप शोभायमान झालेलें आहे. पण ज्या जडदेहावर वस्त्रेंभूषणें चढवावयाचीं तो आश्रमाचा जड देह मात्र थोडासा कृश झालेला आहे हें कबूल करणें भाग आहे. आश्रमाच्या जड देहाचे मुख्य घटक दोन, द्रव्याचें बळ व विद्यार्थिनींच्या संख्येचें बळ. आश्रमाचे हे दोन्हीहि अवयव कांहींसे रोड झाले आहेत. आश्रमाच्या वाढत्या खर्चाला वार्षिक उत्पन्न पुरें पडत नाहीं. महायुद्धाच्या उत्तरार्धांत फार महागाई झाली त्या सुमारास वाडियाट्रस्टींकडून दरवर्षी तीन हजार रुपये याप्रमाणें पांच वर्षें मदत झाल्यामुळें तीं वर्षें निभावलीं. त्याच सुमारास बापूसाहेब चिपळूणकरांनीं आश्रमभाऊबीज फंड सुरू केला. त्यालाही पहिल्यानें चांगली मदत मिळून तीं कांहीं वर्षें बरीं गेलीं. अलीकडे तो फंड देखील रोडावला आहे. विद्यापीठाकडून सालिना पांच हजारांची मदत होत आहे व आश्रमाचे आजन्मसेवक विद्यापीठाकडून मिळणाऱ्या बेताच्या वेतनांतून पोटाला चिमटा घेऊन सालिना अडीचतीन हजारांची मदत करीत आहेत. थोडासा तरी भाऊबीज फंड आहेच व पार्वतीबाई हाडांचीं काडें करून मदत मिळवीत आहेत; तरी हीं सर्व साधनें अपुरींच पडत आहेत. दिवसेंदिवस आश्रमाला मदत करणाऱ्या मध्यमवर्गाची स्थिति खालावत चालली आहे, लोकांजवळ मदत मागणाऱ्या आमच्याच संस्था व इतरांच्या संस्था वाढत आहेत, ठिकठिकाणीं स्थानिक संस्थाही नव्या नव्या उत्पन्न होत आहेत आणि ह्या सर्वांची मागणी एकाच वर्गावर पडत आहे. ह्या सर्व गोष्टी

जरी खऱ्या आहेत तरी लोकांना राष्ट्रीय दृष्टीच्या कर्तव्यांची जाणीव अधिक प्रमाणांत होऊं लागली आहे व राष्ट्रीय संस्थांना मदत करण्याची लोकांची इच्छाही वाढत्या प्रमाणावर आहे ही गोष्ट खोटी नाहीं. आमच्याकडून जितके कसून प्रयत्न व्हावयाला पाहिजेत तितके ते होत नाहींत ही गोष्ट देखील कबूल केल्यावांचून गत्यंतर नाहीं. एका दृष्टीनें गेल्या बत्तीस वर्षांत आश्रमाचें जीवनकार्य बरेंच झालेलें आहे. आश्रमाच्या संस्थेनें महिला-विद्यापीठाला व त्याच्या अनुषंगानें चाललेल्या अनेक हायस्कुलांना जन्म दिला आहे. स्त्रियांच्या संबंधानें लोकमतांत फरक पडलेला स्पष्ट दिसून येतो त्याला कांहीं अंशीं आश्रम अप्रत्यक्ष रीतीनें कारण झालेला आहे. हें खरें असलें तरी आश्रमाच्या हातून अजून पुष्कळ लोकसेवा होण्यासारखी आहे व ती खचित होईल. आश्रमाच्या आजन्म-सेवक-सेविकांनीं ह्या कामीं अधिक लक्ष घातलें पाहिजे व तीं तें घालतील यांत शंका नाहीं.

आश्रमांतील विद्यार्थिनींची संख्या कमी होण्याला बरींच कारणें झालीं आहेत. सुशिक्षित मध्यम वर्गांतील लोकांचें आर्थिक सामर्थ्य कमी होत चाललें आहे. त्यामुळें मुलीसाठीं पैसा खर्च करून तिला अशा संस्थांमध्यें ठेवून शिक्षण देणें पुष्कळांना जड जातें. दुसरें कारण ठिकठिकाणीं मुलींच्या शिक्षणाची सोय होत आहे व उमरावती आणि इंदूर ह्या दोन ठिकाणीं वसतिगृहांची उत्तम सोय झालेली आहे. शिवाय मुलीला दुसऱ्या ठिकाणीं पाठवून खर्च करावयाचा त्यापेक्षां तिला आपल्या देखरेखीखालीं ठेवून मुलांच्या हायस्कुलांत शिक्षण द्यावें ह्या गोष्टीलाही कित्येक पालक तयार होऊं लागले आहेत. आमच्या आश्रमांत मिळणारें शिक्षण महिलाविद्या-पीठाच्या धोरणाचें असून त्याला सरकारी मान्यता नाहीं म्हणूनही कित्येक पालक आश्रमांत मुली पाठविण्यास कचरतात व केव्हां केव्हां त्यांना वरच्या इयत्तांतून काढून नेतात. सरतेशेवटीं आश्रमाचें द्रव्यसामर्थ्य बेताचेंच असल्यामुळें नादार विद्यार्थिनींची संख्या वाढवितां येत नाहीं आणि नादार विद्यार्थिनीसुद्धां कांहीं वर्षें संस्थेचा फायदा घेऊन नंतर राजमान्य संस्थां-कडे धांव घेतात. इतकें असूनही विद्यार्थिनींची संख्या म्हणण्यासारखी कमी झाली नाहीं ही त्यांत समाधानाची गोष्ट आहे. दिवसेंदिवस विद्या-पीठाची लोकप्रियता वाढत जाण्याचा संभव आहे व राजमान्यतेच्या बाब-

तींतही हळुहळू पुढें पाऊल पडण्याचा बराच संभव दिसत आहे. तेव्हां विद्यार्थिनींच्या संख्येच्या बाबतींतही निराश होण्याचें कारण नाहीं. आश्रमावरील लोकांचा विश्वास कायम आहे ही समाधानाची गोष्ट आहे. पुढील पृष्ठावरील कोष्टकावरून आश्रमाची सद्यःस्थिति लक्षांत येईल.

ह्या कोष्टकासंबंधानें थोडें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. पृष्ठ२८० वर दिलेल्या कोष्टकांत १९१४ अखेर दाखविलेली शिल्लक ४५२३६८१५८९ आहे.ह्या कोष्टकांत ती३६९२२८१५८८दाखविली आहे.ह्यांचें कारण१९१५ च्या आरंभीं अनाथ बालिकाश्रम, महिला विद्यालय आणि निष्काम-कर्म-मठ ह्या संस्थांचें एकीकरण झालें त्यावेळीं विद्यालयाच्या सुमारें ५०००० रुपयांच्या इमारती वगैरे आश्रमाकडे आल्या; त्यांजबरोबर विद्यालयाचें अजमासें आठ हजारांचें कर्जही आश्रमाकडे आलें ह्यामुळें ह्या कोष्टकांत ती शिल्लक कमी दाखविली आहे. ह्या कोष्टकांत दाखविलेली शेवटची शिल्लक बहुतेक साडेतीन व्याजाच्या प्रामिसरी नोटांच्या स्वरूपांत आहे व ती आश्रमाच्या चालू खर्चाला उपयोगी पडण्यासारखी नाहीं. व्याजांतून स्कॉलरशिपा व बक्षिसें देण्यासाठीं दिलेल्या देणग्यांनीं ती बनली आहे. ह्याशिवाय आपल्या हयातींत व्याज आपणास मिळावें व नंतर रक्कम आश्रमाकडे जावी अशा कांहीं व कांहीं परत करण्याच्या ठेवी आहेत त्या सर्व मिळून आज आश्रमाची शिल्लक ११०६३३८२ आहे. कोष्टकांत कित्येक वर्षी खर्चाच्या रकमेपेक्षां उत्पन्नाची रक्कम बरीच अधिक दिसून येते, पण तींतील बराच भाग व्याजाचा मात्र स्कालरशिपांचे कामीं उपयोग करून मुद्दल रक्कम स्थानिक फंडांत घालण्यासाठीं असतो. अलीकडे जमेची व खर्चाची तोंडें मिळवणें बरेंच कठिण होऊं लागले आहे.


| वर्ष | वर्ष अखेर विद्यार्थीनींची संख्या | वर्षांतील उत्पन्न | वर्षांतील खर्च | वर्षअखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १९१४ | २०० | | | ३५९२२-१५-८ |
| १९१५ | २२६ | २०९४५-३-२ | २३१५७-१४-१० | ३३७१०-४ |
| १९१६ | २१६ | ३४९६८-१२-९ | १७३९३-२ | ५१२८५-१४-९ |
| १९१७ | २७० | ३७०९४-७-६ | ४३६७६-४-७ | ४४७०४-१-८ |
| १९१८ | २६५ | ४६३९७-४-१० | ४११३१-९-३ | ४९९६९-१३-३ |
| १९१९ | २१८ | ३३८७३-५-१ | ३९४७८-१-१० | ४४३६५-६ |
| १९२० | १९८ | ३४०१२-१-६ | ४०२२४-८-८ | ३८१५२-९-४ |
| १९२१ | १९४ | ४०५६४-९ | ४१०७१-०-० | ३७६४५-१०-१ |
| १९२२ | २१६ | ४४३६७-१-२ | २८२९८-८ | ५३७१४-३-३ |
| १९२३ | २२७ | ३८८४८-५-१ | ३२७१६ | ५९८४६-८-४ |
| १९२४ | २१० | २९४८४-१-१ | ३११४१-१२-२ | ५८१८८-१३-३ |
| १९२५ | १७३ | २३३८२-७-१० | २७०३९-५-२ | ५४५३१-१५-११ |
| १९२६ | १७० | ३२३८०-११-११ | २७१९८-१-५ | ५९७१३-१०-५ |
| १९२७ | १७१ | ३५१७२-१४-७ | ३०२७०-१००४ | ६४६१५-१४-८ |

आश्रमाच्या बऱ्यावाईटाबद्दल जे जबाबदार आहेत त्या सर्व आश्रमाच्या आजन्म-सेवक-सेविकांचा उल्लेख होऊन गेलाच आहे; परंतु त्या सर्वांची यादी या ठिकाणीं एकत्र दिली असतां बरें पडेल:

१. प्रो. धोंडो केशव कर्वे, बी. ए.
२. श्री. पार्वतीबाई आठवले.
३. साहित्याचार्य प्रो. हरि रामचंद्र दिवेकर, एम्. ए.
४. प्रो. नारायण महादेव आठवले, एम्. ए.
५. प्रो. गोपाळ महादेव चिपळूणकर, एम्. ए.
६. प्रो. वासुदेव गोविंद मायदेव, एम्. ए.
७. श्री. विश्वनाथ आबाजी मोडक, बी. ए.
८. श्री. वारूबाई शेवडे, जी. ए.
९. प्रो. वामन मल्हार जोशी, एम्. ए.
१०. श्री. बनूबाई आहो, जी. ए.
११. प्रो. रामचंद्र हरि केळकर, एम्. ए.
१२. श्री. कमळाबाई देशपांडे, जी. ए.
१३. श्री. सीताबाई अण्णिगेरी, जी. ए.
१४. प्रि. नारायण महादेव पटवर्धन, एम्. ए., एल्. टी.
१५. श्री. गंगूबाई तांबोळे.

यांपैकीं बहुतेक सर्व मंडळींचें सामर्थ्य विद्यापीठाच्या कामीं खर्च पडत आहे. विद्यापीठ हें आश्रमाचें अप्रत्यक्ष कार्य आहे. त्याच्या प्रत्यक्ष कार्याकडे अधिक लक्ष पोंचणें जरूर आहे. विद्यापीठाचें फारच मोठें जोखीम मीं आपल्या शिरावर घेतल्यामुळें आश्रमाच्या कामाला मी निरुपयोगी झालों आहें. तथापि विद्यापीठाची आतां कर्जफेड झाल्यामुळें मला आश्रमाकडे थोडेंसें लक्ष देतां येईल असें वाटतें.

अनाथ बालिकाश्रमाच्या आजन्म सेवक सेविका.



# प्रकरण तिसरें

## महिला–विद्यापीठाची कल्पना

" हिंगण्याच्या संस्थांतून जर महाराष्ट्रासाठीं स्त्रियांची युनिव्हर्सिटी उत्क्रांत होईल तर मोठी बहार उडेल " हें वाक्य बारा वर्षांपूर्वी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचे विचार मनांत घोळूं लागले असतां आत्मवृत्ताच्या उपसंहारांत लिहिलें आहे. ह्या अमूर्त सृष्टींतील विचारांना मूर्त स्वरूप येऊन केवळ महाराष्ट्रासाठींच नव्हे पण ज्याचा उपयोग महाराष्ट्राबाहेरील प्रांतांनाही होऊं शकेल–व थोड्याशा प्रमाणानें आजही होत आहे–अशा प्रकारचें विद्यापीठ स्थापन होऊन त्याची जन्मापासूनची हकीकत सांगण्याचा सुयोग आज प्राप्त झाला आहे. ज्या अतर्क्य शक्तीच्या सहाय्यानें येथवर मजल आली तिजबद्दल मन कृतज्ञतेनें उचंबळून जातें.

मुलींच्या अभ्यासक्रमांत सुधारणा झाली पाहिजे हे विचार कधीं कधीं मनांत येत. १९०७ सालीं महिला–विद्यालयाच्या आरंभींच्या विनंतिपत्रांत पुढील उद्देश दिलेला आहे, " गृहिणीपदाचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या ज्याच्या योगानें मनावर पूर्णपणें ठसतील, व ज्याच्या योगानें समाजविषयक कर्तव्यांविषयीं चांगली ओळख होऊं शकेल, असें शिक्षण देऊन आपल्या समाजांत कांहीं सुशिक्षित स्त्रिया तयार करण्याचा यत्न करणें." तथापि ज्यांना अधिक शिक्षण घेणें असेल त्यांच्यासाठीं मॅट्रिक्युलेशन अगर व्हॅर्नेक्युलर फायनलची परीक्षा हेंच ध्येय ठेवून काम चाललें होतें. व अगदीं आकस्मिक रीतीनें विद्यापीठाची स्पष्ट कल्पना डोक्यांत आली नसती तर पूर्वींचाच क्रम पुढें चालू राहिला असता.

माझ्या आयुष्यांत कांहीं अकल्पित योग आलेले आहेत व त्यांमुळें माझ्या कार्याला एकदम निराळी दिशा लागलेली आहे. १९१५च्या ऑगस्ट महिन्याच्या सुमारास एके दिवशीं मी आश्रमांत काम करीत बसलों असतां त्या दिवसाचें टपाल माझ्या हातीं आलें. त्यांत एक बुकपोस्ट होतें. वेष्टन दूर केल्यावर आंतून ' जपान वुइमेन्स युनिव्हर्सिटी'च्या म्हणजे जपानी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या माहितीचें छोटेखानी पुस्तक निघालें. त्याचीं पानें चाळून तें टेबलाच्या खणांत ठेवून दिलें व हातांतलें काम पुढें चालू केलें.

तें पुस्तक कोणीं पाठविलें हें त्यावेळीं मला कळलें नाहीं. सोबत किंवा वेगळें पत्र नव्हतें. वेष्टणाऱ्या कागदावर पाठविणाराचें नांव आहे की काय किंवा निदान त्यावरील पोष्टाचा छाप पाहून तें कोणत्या ठिकाणीं टपालांत पडलें हें पाहण्याचीही त्यावेळीं मला जिज्ञासा झाली नाहीं. अनेकांकडचीं पत्रकें अगर पुस्तकें येतात त्यांतलेंच हें एक अशा अस्पष्ट विचारानें त्या पुस्तकाकडे मीं विशेष लक्ष दिलें नाहीं. पुढें तीनचार आठवड्यांनीं आणखी एक अकल्पित गोष्ट घडून आली. १९१५ सालच्या अखेरीला राष्ट्रीयसभा मुंबईस भरावयाची होती त्याचवेळीं राष्ट्रीय सामाजिक परिषदही व्हावयाची होती. सदर परिषदेचे सेक्रेटरी न्यायमूर्ति चंदावरकर यांनीं त्या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयीं मला पत्र लिहिलें. ही गोष्ट माझ्या कल्पनेबाहेर होती. कोनाकोपऱ्यांत काम करणाऱ्या मनुष्याला असलें जबाबदारीचें काम सांगण्यांत येईल असें माझ्या स्वप्नींही आलें नाहीं. माझ्या आटोक्याबाहेरचें हें काम आहे हें जाणून मीं तावडतोब त्यांना पत्र लिहिलें कीं कृपा करून आपण योग्य मनुष्याची निवड करा व मला ह्या संकटांतून सोडवा. हें माझें उत्तर त्यांना पटलें नाहीं. त्यांनीं माझ्या कांहीं मित्रांजवळ बोलून त्यांजकडून मजवर दडपण घालविलें व तें काम पत्करण्याचें मीं कसेंबसें कबूल केलें. ह्यानंतर अध्यक्षाच्या भाषणांत आपण काय बोलावें हा विचार मनांत घोळूं लागला. आपलीं जवळ जवळ वीस वर्षें स्त्रियांच्या शिक्षणाच्या कामांत गेलीं आहेत तेव्हां त्या भाषणांत स्त्रियांचें शिक्षण हाच मुख्य भाग असावा असें मीं ठरविलें. ह्यावेळीं जपानांतील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची हकीकत देणाऱ्या पुस्तकाची आठवण झाली व तें मीं अथपासून इतिपर्यंत वाचलें आणि कांहीं एक अवर्णनीय वारें माझ्या शरीरांत व मनांत खेळूं लागलें. जपानी बांधवांनीं ज्या मार्गाचा स्वीकार केला त्या मार्गाचा स्वीकार केला तरच आपल्या स्त्रियांमध्यें माध्यमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार बऱ्याच वेगानें करतां येईल असे विचार मनांत घोळूं लागले.

जपानी लोकांच्या तरी मनांत असे विचार कां आले हें पाहिलें पाहिजे. ६५ अगर ७० वर्षांपूर्वींचें जपान आणि तितक्याच वर्षांपूर्वींचें हिंदुस्थान हे दोन देश सामाजिक स्थितींत व शिक्षणाच्या बाबतींत समान होते. त्या

सुमाराला जपानी लोकांना व्यापारासाठीं व धर्मप्रसारासाठीं तिकडे गेलेल्या पाश्चात्य लोकांचा सहवास विशेष प्रमाणावर घडूं लागला. चाणाक्ष व दूरदर्शी जपानी लोकांच्या तेव्हांच नजरेस आलें कीं जर आपण ह्या लोकांच्या विद्या, कला, शास्त्रें, उद्योगधंदे व वाङ्मय हीं हस्तगत केलीं नाहींत तर पाव शतकाच्या आंत जपान अधोगतीला लागणार. जपानानें तावडतोब कितीतरी विद्यार्थी दरवर्षी युरोपांत व अमेरिकेंत पाठविण्यास सुरुवात केली. ह्यांनीं परत येऊन परदेशांत मिळविलेल्या ज्ञानाचा फायदा आपल्या देशांतील लोकांस द्यावा असा कम सुरूं झाला. जपानांत युनिव्हर्सिट्या निघाल्या व पुरुषांचें शिक्षण झपाट्यानें पुढें जाऊं लागलें. शेंकडों नव्हेत तर हजारों पदवीधर दरसाल निघूं लागले, पण स्त्रिया मागें पडल्या व पुरुषांचे विचार आणि स्त्रियांचे विचार यांमध्यें महदंतर दिसूं लागलें. असें अंतर राहूं दिल्यास राष्ट्राला अपायकारक होईल हा विचार कित्येक पुढाऱ्यांच्या डोक्यांत घोळूं लागला व मिस्टर नरूसे—हे पुढें त्या युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट म्हणजे चान्सेलर झाले—ह्यांना ह्या कामाचा ध्यास लागला. पांच वर्षे ह्या संबंधानें खटपट करून १९०० सालीं त्यांनीं ह्या युनिव्हर्सिटीची स्थापना केली.

जपानी लोकांच्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या प्रयत्नांत जो भाग मला विशेष आवडला त्यासंबंधाचे उतारे त्या लहान पुस्तकांतून देत आहें. माझ्या सामाजिक परिषदेच्या भाषणांतही हे उतारे मीं घेतले होते. ह्या उताऱ्यांतील विचार मला सर्वस्वी मान्य झाले* व त्या धोरणानें प्रयत्न करण्याचें मीं ठरविलें. सदर उतारे येणेंप्रमाणें:—

---

* येथें मला स्पष्टपणें हें सांगितलें पाहिजे कीं, पुढील लेखांत माझीं व्यक्तिविषयक मतें कित्येक प्रसंगीं येतील, पण माझीं मतें आणि स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचें धोरण हीं एक नव्हत. माझ्या सहकाऱ्यांचींही मतें माझ्या मतांहून भिन्न असतील. पुष्कळ लोक माझीं मतें तींच स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचीं मतें असा आपला समज करून घेतात व इतरांचाही तसा समज करून देण्याचा प्रयत्न करतात. स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचें धोरण सेनेट-सभेनें ठरविलेलें आहे. ह्या सभेंत आरंभीं ६० विद्वान् व अनुभवी स्त्रीपुरुष होते व गेलीं ८ वर्षे ८० आहेत. सेनेटच्या संमतीवांचून कोणतीही महत्त्वाची गोष्ट घडून येत नाहीं. युनिव्हर्सिटीचें धोरण ठरविणें, अभ्यासक्रम

"Our aim in establishing the Women's University is neither to copy the higher institutions for women in America and Europe nor to rival the men's University courses in this country. What we aim at is to frame our schedules of study so as to suit the mental and physical conditions of women at present, and to gradually raise the standard in accordance with general progress."

"स्त्रियांकरितां स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करण्यांत आमचा हेतु अमेरिका किंवा यूरोप यांतील स्त्रियांच्या उच्च शिक्षणाच्या संस्थांचें अनुकरण करणें हा नाहीं किंवा आपल्या देशांतील पुरुषांच्या विश्वविद्यालयांत नेमलेल्या अभ्यासक्रमाशीं स्पर्धा करणें हाहि नाही, तर वर्तमानकालीन स्त्रीवर्गाच्या शारिरिक व मानसिक स्थितीला अनुरूप होईल असा अभ्यासक्रम तयार करणें व सर्वसाधारण प्रगतीला अनुसरून तो हळूहळू वाढविणें हें आमचें ध्येय आहे."

"There is a widespread tendency to regard a woman merely as a tool or a machine destined solely for service at home or for the propagation of family line; and in opposition to such extreme tendencies, we feel the necessity of educating women as human beings, that we may be able to call forth their consciousness as personalities with infinite aspirations and longings."

"स्त्री म्हणजे घरकाम करण्याला अथवा वंश विस्ताराला उपयोगीं पडणारें एक साधन किंवा यंत्रच आहे असें मानण्याची एक सर्वसामान्य प्रवृत्ति आहे. अशा या अत्यंत एकांगी व एकपक्षीय समजुतीच्या उलट आमचें मत आहे. आम्हांला असें वाटतें कीं मानवजातीचा एक घटक या दृष्टीनेंच स्त्रियांना शिक्षण देणें अवश्य आहे. हेतु हा कीं त्यायोगें आशा व आकांक्षा यांचें अमर्याद क्षेत्र आपणांस मोकळें आहे ही भावना त्यांच्या मनांत उत्पन्न व्हावी."

"We cannot support another movement which aims at the so-called emancipation of women. In opposition to this tendency, we lay emphasis on home life as the chief sphere of women's acti-

---

पसंत करणें आणि धोरणांत किंवा अभ्यासक्रमांत बदल करणें हें सर्व सेनेटच्या अधिकारांतलें आहे. एकट्या व्यक्तीनें त्यांत ढवळाढवळ करणें शक्य नाहीं.

vities. Here her proper place is found as wife and mother, not indeed as a tool or ornament, but as an active partaker in the humanitarian and national spirit, which should animate a home... Our aim is to educate women that they shall come to realise their own special mission in life as free personal agents and as members of the Empire of Japan and that, as such they shall be able to perform their services as wives and mothers in a larger sense and more efficient manner than hitherto."

"स्त्री--दास्य--विमोचन या नांवानें ओळखली जाणारी चळवळ आम्हांला मान्य नाहीं. उलट, स्त्रीचें मुख्य कार्यक्षेत्र म्हणजे तिचें गृह या मुद्यावर आम्हीं विशेष भर देतों. या कार्यक्षेत्रांत पत्नी व माता म्हणून तिचें जें स्वभावोचित स्थान आहे तें केवळ गृहकृत्याच्या उपयोगाचें किंवा शोभेचें साधन अशा नात्याचें नसून, कुटुंबामध्यें जी एक राष्ट्रीय व विश्वबंधुत्वाची भावना नांदत असली पाहिजे त्या भावनेशीं उत्साहानें समरस होणारी एक व्यक्ति या नात्याचें तें आहे.........आमचा हेतु असा आहे कीं, स्त्रियांना जें शिक्षण द्यावयाचें त्यामुळें त्यांना आपण जपानी साम्राज्याच्या घटक असून कोणतेंही कार्य करण्याला स्वतंत्र अशा व्यक्ति आहों ही जाणीव व्हावी व तीमुळें स्वतःच्या कर्तव्याची ओळख त्यांना पटून पत्नी व माता म्हणून त्यांनीं केलेल्या सेवेला अधिक व्यापक अर्थ येऊन ती पूर्वीपेक्षां अधिक परिणामकारक व्हावी."

"But at the same time we must remember there will always be women who, owing to various reasons, do not marry. To these we must give room for realising their mission in life and utilising their own peculiar personal abilities. We must recognize their spheres of activity as legitimate, and not as existing on sufferance, and their lives as having important missions for the Nation and the community at large."

"कांहीं ना कांहीं कारणांमुळें लग्न न करणाऱ्या स्त्रिया समाजांत निघणारच, ही गोष्टहि आपण विसरून चालणार नाहीं. अशा स्त्रियांनाहि आपल्या आयुष्यांतील ध्येय साध्य करण्याची व त्यांच्यांत असलेले विशेष गुण कारणीं लावण्याची संधि देणें आवश्यक आहे. अशा प्रकारची

संधि देण्यांत आपण त्यांच्यावर मोठी मेहेरबानी करीत आहों असें नसून तो त्यांचा न्याय्य हक्क आहे व वास्तविक त्यांच्या जीवितानेंही बहुजनसमाजाचें व राष्ट्राचें महत्वाचें कार्य होणारें आहे असें आपण समजलें पाहिजे."

"Thus the principles, which shall govern us in educating women, are : first, to educate them as human beings, personalities; secondly to educate them as women in order to fit them to become good wives and wise mothers: and thirdly to educate them as members of the nation so that they may always remember that their lives at home are related in an important manner, however hidden, to the prosperity or decay of the nation.

एकंदरींत स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतींत आपण पुढील तत्वांना अनुसरून चाललें पाहिजेः—

( १ ) स्त्रिया म्हणजे मानवजातीचे घटक व स्वत्वविशिष्ट व्यक्ति आहेत हें ओळखून त्यांना शिक्षण देणें.

( २ ) सुपत्नी व सुमाता होण्याची पात्रता अंगीं येईल असें शिक्षण त्यांस देणें.

( ३ ) आपल्या प्रापंचिक जीवनाचा राष्ट्राच्या उन्नति–अवनतीशीं—अस्फुट असला तरी—निकट संबंध आहे असें त्यांच्या नेहमीं ध्यानांत राहील अशाप्रकारचें शिक्षण त्यांस देणें."

स्त्रियांच्या शिक्षणाचें धोरण कसें असावें ह्याबद्दल अलीकडे पाश्चात्य देशांतून ही असले विचार सुरू झाले आहेत. त्यांचा उल्लेख ह्या ठिकाणीं करणें वावगें होणार नाहीं. कोणतीही गोष्ट आहाराबाहेर गेल्यानंतर पीछेहाटीचे प्रयत्न करण्यापेक्षां अगोदरच सावध झालेलें बरें असें मला वाटतें. पुरुषांच्या सर्व विद्या, कला आणि शास्त्रें व पुरुषांचे सर्व व्यवसाय हस्तगत करून घेण्याचा कल किंवा सर्वतोपरी पुरुष बनण्याची प्रवृत्ति जी अतिरेकाला चाललेली आहे तिच्या विरुद्ध चळवळ पाश्चात्य देशांतून सुरू झालेली आहे. नाइन्टीन्थ सेंचरी ॲंड आफ्टर ( Nineteenth Century and After ) ह्या भारदस्त मासिकाच्या ऑगस्ट १९२७ च्या अंकांत डॉ. मेरिक् बूथ ( Dr. Meyrick Booth ) ह्यांनीं एक लेख लिहिला आहे त्यांतील विचार मननीय आहेत.

हर्लीच्या लोकमताचें दिग्दर्शन करतांना यानीं लिहिलें आहे:—

"To maintain that the sexes are almost, if not quite, identical in mental and moral attributes, and that they should enjoy identical education and pursue identical careers, is to be 'progressive'. On the other hand, those who see a profound meaning in the eternal polarity of the sexes, and maintain that civilisation will be enriched and vitalised through a full cultivation of this fruitful diversity, are without further ado stamped as 'reactionaries.'

"मानसिक व नैतिक गुणांचे बाबतींत स्त्रीपुरुषें हीं पूर्णपणें नसलीं तरी बहुतेक एकरूप आहेत, आणि म्हणून त्यांच्या शिक्षणाचें स्वरूपही एकच असलें पाहिजे, आणि त्यांचे व्यवसायही एकाच स्वरूपाचे असावेत असें प्रतिपादन करणें हें 'प्रागतिक' पणाचें लक्षण समजलें जातें. उलटपक्षीं स्त्री व पुरुष हीं नित्य भिन्न असून नित्य अभिमुख असलेल्या ध्रुवकोटींप्रमाणें आहेत या गोष्टींत ज्यांना कांहीं विशेष अर्थ दिसून येतो व स्त्रीपुरुषांमधील या सुफलदायी भिन्नत्वाचा पूर्ण विकास केला तरच संस्कृतीला चेतना मिळून ती अधिक संपन्न होईल असें ज्यांना वाटतें त्यांवर खुशाल परागतिकत्वाचा छाप मारण्यांत येतो."

आजच्या स्थितीचें वर्णन त्यानीं केलें आहे ते येणेंप्रमाणें:—

"The refusal of feminists to accept sex distinction as a basic social principle has made it impossible for them to develop any positive aims or ideals of their own, since these could only arise through a recognition of man's specific character. As a result, the superior positivity of the male has triumphed. The progress of modern feminism has come to mean little more in practice than the penetration of women into a man-made social and industrial system. Today it is the woman with her inborn pliability of character, who is busy adapting herself to all sorts of masculine careers. The girl of today has been hypnotised by

male influence. Devoid of any philosophy of life of her own, she is content to follow where men have gone before."

"स्त्री–पुरुषांमधील भेद समाजघटनेचें एक मूलभूत तत्त्व आहे ही गोष्ट स्त्रीपक्षपाती नाकबूल करितात आणि म्हणूनच त्यांना स्वतःचीं अशीं उद्दिष्टें व ध्येयें ठरवितां येणें शक्य नाहीं. कारण पुरुषांत कांहीं विशेष गुण आहेत असें मान्य केलें तरच अशा प्रकारचीं स्वतंत्र ध्येयें व उद्दिष्टें ठरवितां येतील. याचा परिणाम असा झाला आहे कीं, पुरुषांच्याच अभिनिवेशाचें प्राबल्य होऊन आज पुरुषवर्गानें प्रस्थापित केलेल्या सामाजिक व औद्योगिक संस्थांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचें स्थान मिळणें हेंच स्त्रीपक्षपाती वर्गाचें प्रत्यक्ष ध्येय होऊन बसलें आहे. आजकाल अशी स्थिति झाली आहे कीं, परिस्थितीपुढें वांकण्याच्या स्त्रियांच्या नैसर्गिक स्वभावामुळें सर्व प्रकारचे पुरुषी व्यवसाय करण्याची पात्रता आपल्या अंगीं आणण्याच्या उद्योगाला त्या लागल्या आहेत. हल्लींच्या युवतींवर पुरुषी पेशाच्या विचारांची मोहिनी पडली आहे. आपल्या जीविताचें अन्तिमसाध्य काय याविषयीं स्वतःचे असे कांहीं विचार नसल्यामुळें पुरुषांनीं स्वतःसाठीं मळलेल्या वाटेनें जाण्यांतच त्या धन्यता मानीत आहेत."

स्त्रीपुरुषांमधील भेद त्यांनीं येणेंप्रमाणें दाखविला आहेः—

"In a recent lecture to the Ethnological Society, Dr. Bernard Hollander gave a very clear explanation of some of the main characteristics of the typical woman, and related these to the specific structure of the body, brain and nervous system. Owing to greater relative importance of the sympathetic nervous system in women, and its greater fineness, women are more capable than men of experiencing and expressing feelings, such as joy, fear, grief, hope and are more instinctive and subjective in all their reactions. Men will never equal women in intuition quick receptivity, adaptability and 'emotionality.' On the other hand, the greater stability of the male nervous system is the result of a different constitution. Nature knows her own job, and if women were in nervous constitution like men they would be unfitted for their racial functions.

" थोड्याच दिवसांपूर्वी मानववंशशास्त्र-संस्थे ( Ethnological Society ) पुढें दिलेल्या आपल्या व्याख्यानांत डॉ. बर्नार्ड हॉलँडर यांनीं सर्वसामान्य स्त्रीचे अंगीं दिसून येणाऱ्या महत्त्वाच्या गुणधर्मांपैकीं कांहींचें अतिशय स्पष्ट विवेचन केलें. त्यांत त्यांनीं असें दाखविलें कीं स्त्रियांची विशिष्ट शरीररचना, त्यांचा मेंदू, व त्यांचें मज्जातंतुजाल ( Nervous System ) यांच्याशीं त्या गुणधर्मांचा निकट संबंध आहे. आनुकंपिक तंतुजालाचें ( Sympathetic nervous System ) स्त्रियांमध्यें सापेक्षतेनें अधिक महत्त्व असल्यामुळें व तें अधिक नाजूक असल्यामुळें आनंद, भीति, दुःख, आशा इत्यादि मनोवृत्ति अनुभवणें व त्या व्यक्त करणें या बाबतींत पुरुषांपेक्षां त्यांच्यामध्यें अधिक पात्रता आली आहे; व त्याच कारणामुळें या मनोवृत्तींच्या त्यांच्यावर होणाऱ्या प्रतिक्रिया अधिक अन्तःस्फूर्त व आत्माभिमुख असतात. पुरुषांनीं कितीही केलें तरी अंतःप्रज्ञा, शीघ्र-संस्कारक्षमत्व, प्रसंगानुरूप वागण्याची तयारी आणि भावनावशत्व या बाबतींत ते स्त्रियांची कधींही बरोबरी करूं शकणार नाहींत. उलटपक्षीं पुरुषांची घटनाच वेगळी असल्यामुळें त्यांच्या मज्जातंतूला अधिक स्थिरता आलेली आहे. निसर्गाला स्वीकृत कार्य चांगलें कळतें आणि स्त्रियांची मज्जातंतु-घटना पुरुषांसारखीच असती तर वंशविस्तारासंबंधीं स्त्रियांचीं जीं कार्यें आहेत तीं पार पाडण्यास त्या असमर्थ झाल्या असत्या."

पुरुषी बायका व बायकी पुरुष ह्यांसंबंधानें त्यांचें मत येणेंप्रमाणें आहे:— "Dr. Arabella Kenealy, in her thought-provoking work "Feminism and Sex Extinction," lays weight upon the basic significance for our civilization of sex difference. She makes it clear that masculinity in girls or women is as much a symptom of degeneration as would be femininity in men, and carries with it dangers no less serious for the welfare of society... Dr. Kenealy explains that while each parent transmits something of his or her sex type to the child, in the normal girl the feminine characteristics are dominant and the masculine recessive. Each sex contains potentialities of the other. The best men are those with a dash of the women. But should the opposite sex-characteristics be over-developed, we get degen-

eracy. The forcing of girls along masculine lines may result in serious and lasting injury to health.

" डॉ. ॲराबेला केनीली या बाईंनीं आपल्या "स्त्रीपक्षपातित्व व लिंगविशिष्ट गुणांचा नाश" ( Feminism and Sex Extinction ) या नांवाच्या विचारोद्बोधक ग्रंथांत मानव जातीच्या सुधारणेची इमारत स्त्रीपुरुषभेदाच्या पायावरच उभारलेली आहे या मुद्यावर विशेष जोर दिला आहे. त्यांनीं अगदीं स्पष्टपणें असें दाखविलें आहे कीं, पुरुषांनीं बायकी बनणें हें जितकें त्यांच्या अवनतीचें लक्षण होईल तितकेंच मुली किंवा स्त्रिया यांनीं पुरुषी बनणें हेंही त्यांच्या अवनतीचें लक्षण आहे. शिवाय त्यामुळें समाजहितालाही कमी धोका आहे असें नाहीं. वरील गोष्टीचें विवरण करितांना त्या म्हणतात कीं आईबाप आपापले विशिष्ट गुणधर्म आपल्या मुलांमध्यें संक्रमित करीत असतात हें जितकें खरें आहे तितकेंच हेंही खरें आहे कीं, सर्वसाधारण मुलींमध्यें तिच्या आईचेच गुणधर्म प्रबलतर असतात व बापाचे गुणधर्म त्या मानानें गुप्त असतात. पुरुष–जाति काय किंवा स्त्री जाति काय प्रत्येकींत दुसरीचे गुणधर्म गुप्त असतातच. उत्तम पुरुष कोणते तर ज्यांमध्यें स्त्रीगुणधर्मांची थोडीशी छटा असते ते; परंतु विरुद्ध जातीच्या गुणधर्मांची वाढ जर वाजवीपेक्षां फाजील झाली तर मात्र ती अधोगति होय. मुलींना पुरुषी वळणावर जाणें भाग पडल्यास त्याचे परिणाम त्यांच्या आरोग्याला घातक होतील. "

स्त्रीपुरुषभेद नाहींसा झाला तर काय होईल ह्यासंबंधानें त्यांनीं उतारा दिला आहे तो असा:—

" If woman's nature were really the same as that of man it would be a superfluity, a mere tautology. If women acquire the view that sex difference is only physical, and that mentally and spiritually they are of the same nature as men, and if they act on this assumption ( thus giving life a one-sidedly masculinen form ) then our civilisation will sooner or later sink into utter confusion and chaos. [ From an article in 'Die Frau.' ]

" स्त्री निसर्गतःच जर पुरुषासारखी असती तर तिचें अस्तित्व निरर्थक व पुनरुक्तिभूत झालें असतें. स्त्रीपुरुषांतील भेद केवळ शारीरिक

आहे, आणि मानसिक व आध्यात्मिक दृष्ट्या स्त्रिया पुरुषांप्रमाणेंच आहेत अशी स्त्रियांची कल्पना होऊन त्याप्रमाणें जर त्या वागूं लागल्या व अशा रीतीनें जीवनाला एकांगी पुरुषी वळण प्राप्त झालें तर आपल्या संस्कृतींत आज ना उद्यां गोंधळ माजून अनवस्थाप्रसंग उद्भवेल. [Die Frau (स्त्री) या जर्मन मासिकांतील एका लेखावरून ]"

स्त्रियांच्या अभ्यासक्रमाचा विचार करतांना स्त्रीपुरुषांमधील निश्चित भेद लक्षांत घेतला पाहिजे याविषयीं त्याचे म्हणणें:—"I do not, of course, maintain that the foregoing brief review of some of the results of the sex psychology gives us a clear-cut scheme. There is no such scheme. But if we should err in attempting too sharp a differentiation of the sexes, those err far more who believe, with the feminists, that sex distinction can safely be ignored in education and occupation. Red may fade imperceptibly into yellow. Nevertheless, there is such a thing as red and such a thing as yellow. And, however vague may be the border-land of mental and emotional sex distinctions, there is a masculine psychology and there is a feminine psychology, and these possess certain fairly well-defined qualities which I have sketched above."

"मानसशास्त्रांतील स्त्रीपुरुषविषयक सिद्धान्तांपैकीं कांहींचें आतांपर्यंत जें थोडक्यांत सिंहावलोकन केलें त्याच्या आधारें आपणांस (अभ्यासक्रमाची) एकादी पूर्णत्वानें सुनिश्चित योजना तयार करितां येईल असें माझें अर्थातच म्हणणें नाहीं. अशा प्रकारची योजना सांपडणार नाहीं. परंतु स्त्रीपुरुषांमध्यें अत्यंत सुनिश्चित भेद आहे असें मानण्यांत जर आपण चूक करीत असलोंच, तर स्त्रीपक्षपात्यांप्रमाणें ज्यांना असें वाटतें कीं शिक्षण व व्यवसाय यांच्या बाबतींत विचार करितांना हा भेद लक्षांत घेण्याचें मुळींच कारण नाहीं, ते आपल्याहून अधिक मोठी चूक करीत आहेत. तांबडा रंग फिका होत होत कोणाच्याही लक्षांत न येतां पिंवळसर होऊन अखेरीस पिंवळ्याशीं एकरूप होईल; तरी देखील तांबडा व पिंवळा हे दोन वेगवेगळे स्वतंत्र रंग आहेतच. त्याचप्रमाणें मनोरचना आणि भावना यांचे बाबतींत स्त्री-पुरुषांमधील सीमा कितीही अस्पष्ट असली तरी प्रत्येकांत बरेच स्पष्टपणें दिसून येणारे कांहीं विशिष्ट गुणधर्म आहेत हें मी वर दर्शविलेंच आहे."

खऱ्या सामाजिक प्रगतीसंबंधानें त्यांचें मतः—:—

"The line of social progress consists in duly recognising the broad distinction of sex and so moulding the educational system that it shall bring to full fruition all the potentialities of human bipolarity. It is my charge against the existing system that it tends to obliterate the life-giving difference of sex, that it trains girls to imitate and compete with men, rather than to fulfil their own natural gifts and to rejoice in all their feminine potentialities, welcoming even such limitations as they may impose."

"स्त्रीत्व व पुरुषत्व यांमध्यें निःसंदेह भेद आहे ही गोष्ट ओळखून मानवजातीच्या द्विमुखी घटनेंत ( human bipolarity ) अन्तर्हित असलेल्या सर्व गुणांचा पूर्ण विकास होईल अशी शिक्षणपद्धति निर्माण करणें ही सुधारणेची खरी दिशा होय. प्रचलित शिक्षणपद्धतीवर माझा असा आक्षेप आहे कीं, तिच्या योगानें अखिल जीवनाला प्राणभूत असलेला स्त्री-पुरुषांतील भेद हळुहळू नाहींसा होतो; व मुली आपल्या स्त्रीत्वामध्यें ज्या शक्ति गर्भित आहेत त्यांबद्दल आनंद मानून इतकेंच नव्हे तर स्त्रीत्वाबरोबर अवश्य येणाऱ्या नाना प्रकारच्या अडचणी आनंदानें पतकरून आपल्या निसर्गदत्त गुणांचा जो पूर्ण विकास करावयाचा तो न करितां पुरुषांची नक्कल करण्यास व त्यांच्याशीं स्पर्धा करण्यासच मात्र शिकतात."

त्यांचें म्हणणें कीं, स्त्री श्रेष्ठ कीं पुरुष श्रेष्ठ हा प्रश्नच मुळीं संभवत नाहीं:—

"We must endeavour to cleanse our schools and colleges of those false modes of thought which cause every attempt to make a wise distinction between the sexes to be regarded with suspicion as a probable attempt to assert male superiority. There is here no question at all of superiority or inferiority. In the light of male standards the female sex will certainly seem inferior. In the light of female standards the males would seem inferior. But if we adopt the comprehensive viewpoint of biology the sexes are seen to be equal in value while differing in function."

"स्त्रीपुरुषांत विवेकपूर्वक भेद करण्याच्या प्रत्येक प्रयत्नाकडे 'हा पुरुषाचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा तर प्रयत्न नसेल ना?' अशा संश-

यानें पाहण्याची प्रवृत्ति ज्या विचारसरणीमुळें होते त्या विचारसरणीची आपण आपल्या शाळांतून व कॉलेजांतून हकालपट्टी केली पाहिजे. या ठिकाणीं उच्चनीचत्वाचा मुळींच प्रश्न नाहीं. पुरुषांना लावावयाची कसोटी स्त्रियांना लावल्यास त्या केव्हांही कमीच पडणार. तसेंच स्त्रियांना लावावयाची कसोटी पुरुषांना लाविली तर तेहि कमीच पडतील. परंतु या प्रश्नाकडे जर आपण जीवनशास्त्राच्या व्यापक दृष्टीनें पाहिलें तर आपणांस असें दिसेल कीं, स्त्रीपुरुषांचीं कार्यक्षेत्रें भिन्न असलीं तरी दोघांची योग्यता सारखीच आहे. ”

मग स्त्रियांच्या शिक्षणाची योजना कशी करावी?

“Dr. J. W. Harms, who has made a special study of the problem of adolescence in its relation to the internal secretions (the ductless glands) comes to the conclusion (in which he is supported by other students in the same field) that: the conditions of growth for boys and girls are so widely different that we should remodel the educational system in order to bring it into line with our psychological knowledge. Girls should certainly not be prepared for the same examinations as boys, since this involves a forcing of the female nervous system at the wrong time. It is monstrous that girls should be thrust into the masculine educational scheme...; There are deep-going mental differences.

We must not forget, he says, that the existing system of higher education, with all its examinations etc. was evolved in order to suit boyish needs and periods of growth, and is totally unsuited to girls. In the interests of national health and the happiness and well-being of the female half of the population, he considers it urgently necessary to set up a system of girls' education (including special universities for women only) adapted to the specific psychology of woman.”

“डॉ. जे. डब्ल्यू हार्म्स यांनीं अस्फुट यौवनावस्था व शरीरांतील अंतर्रस या विषयाचा (विशेषतः वाहिनीरहित ग्रंथींचा) विशेष अभ्यास करून जो निष्कर्ष काढिला आहे (आणि जो त्याच विषयाचा अभ्यास करणाऱ्या

इतर शास्त्रज्ञांनाही मान्य आहे ) तो असा कीं, मुलगे व मुली यांच्या वाढीचे नियम अगदीं भिन्न असल्यामुळें आपण आपल्या शिक्षणपद्धतीची पुनर्घटना करून ती मानस शास्त्रांतील सिद्धान्तांशीं सुसंगत केली पाहिजे. पुरुषांसाठींच म्हणून सुरू केलेल्या परीक्षांसाठीं मुलींना तयारी करावयास लावणें हें अगदीं अयोग्य आहे. कारण अशा शिक्षणानें भलत्याच वयांत मुलींच्या मज्जातंतुजालावर ताण पडणें अपरिहार्य होतें. पुरुषी शिक्षण-पद्धतींत मुलींना लोटून देणें हें क्रूरपणाचें आहे कारण उभयतांमध्यें मूल-भूत असे मानसिक भेद आहेत....

ते म्हणतात कीं, उच्च शिक्षणाची प्रचलित पद्धति व तींत असलेल्या परीक्षा वगैरेची योजना पुरुषांच्या गरजा व त्यांच्या वाढीचे विशिष्ट काल यांना अनुरूप होईल अशा रीतीनें केलेली असून ती मुलींच्या दृष्टीनें सर्वस्वीं अयोग्य आहे, आणि म्हणून राष्ट्रीय आरोग्य आणि लोकसंख्येचा अर्धा भाग जो स्त्रिया त्यांचें सुख व कल्याण हीं लक्षांत घेतां मुलींकरितां स्वतंत्र व त्यांच्या विशिष्ट मनोरचनेला अनुरूप अशा शिक्षणपद्धतीची योजना ( या योजनेंत फक्त स्त्रियांकरितां काढलेल्या खास विश्वविद्यालयांचा अंतर्भाव होतो ) तयार करणें हें त्यांच्या मतें अत्यंत आवश्यक आहे. "

ही जी प्रतिक्रियेची लाट पाश्चात्य देशांतून पसरत आहे तिला शास्त्र-ज्ञांचें किती पाठबळ आहे व ती निवळ धार्मिक विचाराच्या किंवा जुन्या रीतीभातींत रुळलेल्या लोकांच्या केवळ प्रतिगामी धोरणाचें प्रतिबिंब नसून पुरोगामी लोकांमधून तिचा उद्भव कसा झाला आहे हें तो सबंध लेख व ह्यासंबंधाचे विचार ज्या पुस्तकांतून प्रसिद्ध होत आहेत तीं पुस्तकें (उदाहरणार्थ Sex Psychology ( sixth volume ) by Havelock Ellis; Adolesence by Stanley Hall, two volumes; Ethics of Feminism by Wadia; and Feminism and Sex Extinction by Arabella Cenealy ) वाचल्यावाचून कळणार नाहीं.

ऐवढा वेळपर्यंत ज्या विचारांचा ऊहापोह झाला त्यांचा मथितार्थ पुढील चार प्रमेयांत व्यक्त करतां येईल. मला या उद्योगाला प्रवृत्त करणारीं हींच चार प्रमेयें होत.

( १ ) आपण जबाबदार मानवी व्यक्ति आहों ही भावना व आपल्या सामर्थ्याविषयीं आत्मविश्वास ज्याच्या योगानें उत्पन्न होईल असें पुरुष-सामान्य शिक्षण स्त्रियांना देणें.

( २ ) आपल्या देहाचे घटक ज्याप्रमाणें भिन्न भिन्न पेशी, त्याप्रमाणें समाज किंवा राष्ट्ररूप देहाचे घटक जीं कुटुंबें तीं जोमदार व मनोहर बनविणें मुख्यतः कुटुंबांच्या सूत्रधार ज्या स्त्रिया त्यांजवर अवलंबून आहे. कुटुंब ही संस्था डळमळीत होईल अशी प्रवृत्ति स्त्रीवर्गांत उत्पन्न होऊं देणें राष्ट्राला विघातक आहे, तेव्हां कुटुंबें, इंग्रजींत Home ह्या शब्दांत किंवा 'गृहिणी गृहमुच्यते' या वाक्यांत जो गर्भित अर्थ सांठविला आहे तशीं बनविण्याचें सामर्थ्य ज्या शिक्षणाच्या योगानें स्त्रियांमध्यें उत्पन्न होईल, असें शिक्षण त्यांना देणें.

( ३ ) आपण राष्ट्राच्या घटक आहों ही भावना ज्या शिक्षणानें उत्पन्न होईल असें शिक्षण स्त्रियांना दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें मुलांमुलींच्या कोंवळ्या अन्तःकरणांत, राष्ट्रीय भावनांचें बीज पेरणें, राष्ट्रांतील साधुसंतांविषयीं पूज्यबुद्धि व पराक्रमी पुरुष ( युद्धांत पराक्रम दाखविणारेच केवळ नव्हत ) आणि तेजस्विनी स्त्रिया यांच्याबद्दल आदर उत्पन्न करणें हें अत्यंत नाजूक व पवित्र कर्तव्य राष्ट्रांतील आयांचें आहे. हें कर्तव्य उत्कृष्ट रीतीनें बजावण्याचें सामर्थ्य ज्या शिक्षणानें अंगीं येईल असें शिक्षण त्यांना देणें.

( ४ ) कांहीं कारणांनीं आपण संसारांत पडूं नये असें ज्या स्त्रियांना वाटत असेल त्यांनीं आपापलीं ध्येयें ठरवून तीं ध्येयें साध्य होण्याला ज्या शिक्षणाची जरूर असेल तें शिक्षण त्यांनीं अवश्य घ्यावें व आपली कर्तव्याची दिशा ठरवावी. अशा स्त्रियांचा लहानसा वर्गही राष्ट्राच्या स्थैर्याला व प्रगतीला आवश्यक आहे. स्त्रियांनीं अमुक करावें किंवा तमुक करूं नये अशा रीतीचे कायद्यानें किंवा समाजानें घातलेले निर्बंध साफ काढून टाकिले पाहिजेत. ह्या संबंधांत पुरुषांचे व स्त्रियांचे हक्क समान असावेत. कोणत्याही स्त्रीला अमुक विद्या आपण शिकावी किंवा अमुक उद्योग आपण करावा असें वाटेल तर कायद्याचीं अगर समाजाचीं बंधनें तिच्या मार्गांत आडवीं येऊं नयेत. तथापि समाजस्थैर्यासाठीं किंवा त्यांच्या शारीरिक व मानासिक घटनेचा विचार करितां सामान्यतः स्त्रियांनीं कोणतें

शिक्षण घ्यावें व कोणते उद्योग करावे ह्या विषयींचा विचार होणें अत्यंत जरुरीचें आहे. सर्व प्रकारच्या विचारांना वाव मिळाला पाहिजे व त्या विचारांचें कृतींत प्रतिबिंब उठविणारी त्या विचारांना वाहिलेली माणसें पाहिजेत. अशा विचारांच्या व कृतींच्या झगड्यांतूनच उत्क्रान्तीची वाट गेलेली आहे.

जपानांतील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची माहिती देणाऱ्या छोटेखानी पुस्तकांतील उताऱ्यांत दिसून येणाऱ्या धोरणानें नरुसे यांनीं १९०० सालीं काम सुरू केलें व त्यांत त्यांना यशही फार चांगलें आलें. त्या पुस्तकांत १९१२ पर्यंतची हकीकत दिली आहे. इतक्या मुदतींत त्या युनिव्हर्सिटीं-तून १२४३ स्त्रिया पदवीधर होऊन बाहेर पडल्या. १९०० सालाच्या पूर्वी सगळ्या जपान देशांत स्त्रियांचीं हायस्कुलें १२ होतीं तीं १९१२ त १८२ झालीं. इतकी विलक्षण प्रगति थोड्या काळांत झालेली पाहून आप-णही त्यांनीं घालून दिलेल्या मार्गानें जावें असें मला वाटूं लागलें. ह्या त्यांच्या युनिव्हर्सिटीला सरकारची मदत अगर सरकारचें नियंत्रण नाहीं. राजकुलां-तील अगर सरकारी अधिकाऱ्यांची मदत आहे पण संघटित सरकारचा संबंध नाहीं. आपल्या देशांत असलीं कामें करणाऱ्यांच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत याची जाणीव मला होती. अगोदर उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियाच फार थोड्या. त्यांत ज्या पदवीला अगर सर्टीफिकेटाला सरकारी मान्यता नसेल अशा मार्गाकडे वळणाऱ्या स्त्रिया कितीतरी थोड्या सांपडणार. दुसरें, आपणाजवळ पैसा नाहीं. आपली सामुग्री काय ती एक लहानसें हायस्कूल व स्वार्थत्यागानें काम करणारीं थोडींशीं योग्य माणसें. सुदैवानें सरकारची मदत मिळून अधिक पगार घेण्याची चट आमच्या आजन्मसेवकांस लागली नव्हती. अत्यंत थोड्या वेतनांत ते संतुष्ट होते व अशा कामाला ते खात्रीनें पुढें सरसावतील असा मला विश्वास होता. आपलीं वीस वर्षें स्त्रियांच्या ज्या संस्थांसाठीं खटपट करण्यांत गेलीं आहेत त्याच संस्थांना निराळें वळण देण्याचा प्रयत्न करावा असें माझ्या मनानें घेतलें व जेव्हां ही इच्छा प्रबळ होऊं लागली तेव्हां आश्रमांतील आजन्मसेवकां-जवळ ह्यासंबंधानें चर्चा करूं लागलों. त्यांची सहानुभूति मिळतांच आश्र-माच्या व्यवस्थापक मंडळीला कसें वळवावें हे विचार सुरू झाले, इतक्यांत

माझे मित्र व आश्रमाचे आजन्मसेवक श्री. महादेव केशव गाडगीळ बी. ए. ह्यांनीं अत्यंत उदार देणगी देण्याचें आश्वासन दिलें. त्यांनीं जें पत्र लिहिलें तें अक्षरशः येथें देतों.

" रा. रा. धोंडो केशव कर्वे यांसी सा. न. वि. वि. आज कित्येक महिन्यांपासून माझे मनांत विचार येत आहे कीं द्रव्यसंन्यास करावा. द्रव्याचा लोभ फार बंधनकारक आहे–उन्नतीचे मार्गांत आड येणारा आहे. म्हणून वडिलार्जित धनापैकीं पत्नीचे व मुलीचे खर्चाला बेताबातानें पुरेल इतकेंच द्रव्य त्यांचे नांवें ठेवावें व दहा हजार रुपये देऊन टाकावे व स्वतःचा खर्च अगदीं आटोपशीर ठेवून त्याकरितां स्वकष्टानें मिळवावें. हे दहा हजार रुपये गुंतले असल्यामुळें एकदम हातीं येण्यासारखे नाहींत तरी वाचादत्त झालें म्हणजे बरें अशा समजुतीनें हें पत्र आपणांस लिहीत आहें. दरवर्षास एक हजार प्रमाणें दहा वर्षांत ही रकम देईन. आनंदाची गोष्ट आहे कीं ह्या देणगीस पत्नीची व मुलीची संमति आहे.

ह्या रकमेचा उपयोग आपल्या " महाराष्ट्र वुइमेन्स युनिव्हर्सिटी " तील स्त्रियांकरितां पहिलें कॉलेज हिंगणें येथें स्थापन करणेचे कामीं व्हावा.

ह्या पत्राचा उपयोग आपले इच्छेनुरूप करण्यास माझी हरकत नाहीं. कळावें. लोभाची वृद्धी असावी हीच विनंति.

आपला

महादेव केशव गाडगीळ.

महिलाश्रम २१-१२-१५

वरील देणगीस आमची पूर्ण संमति आहे.

पार्वतीबाई गाडगीळ,

येसूबाई गाडगीळ. "

हें पत्र आल्याबरोबर प्रत्यक्ष उद्योगाला लागलों. प्रथमतः श्री. गाडगीळ व हरि रामचंद्र दिवेकर यांच्या विचारानें एक सर्क्युलर पत्र तयार केलें व मी आणि दिवेकर असे दाभाड्याच्या तळेगांवीं श्रीयुत शिवराम विनायक शेवडे यांजकडे गेलों. त्यांची अनुमति मिळून आम्ही तिथें डॉ. भांडारकर यांजकडे गेलों. त्यांनींही आम्हांस उत्तेजन देऊन अनुमतिदर्शक सही दिली. नंतर प्रो. भाटे, डॉ. ह. श्री. देव, श्रीमती रमाबाई रानडे,

प्रो. द. ल. सहस्रबुद्धे व डॉ. पां. दा. गुणे ह्या व्यवस्थापक मंडळीच्या सभासदांची संमति मिळाली व सर्वानुमतें ही सूचना पसंत झाली. सदर सर्क्युलर पत्र येणेंप्रमाणें:—"रा. रा. व्यवस्थापक मंडळीचे सभासद यांस:—आज दोनतीन महिने माझे मनांत अशी कल्पना घोळत आहे कीं, जपान देशांतील "जपान वुइमेन्स युनिव्हर्सिटी" चे धर्तीवर हिंदुस्थानांत वेगवेगळ्या देशी भाषांतून शिक्षण देणाऱ्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्यावांचून स्त्रीशिक्षणाचा पाया भक्कम होणार नाहीं, आणि दुय्यम व उच्च शिक्षणाचा प्रसारही व्हावा तितका झपाट्यानें होणार नाहीं. स्त्रियांचें शिक्षण सर्वस्वी पुरुषांप्रमाणेंच होत आहे हें बरें नव्हे. व तें कांहीं बाबतींत तरी पुरुषांच्या शिक्षणाहून भिन्न असणें जरूर आहे ही जी बऱ्याच विद्वानांची योग्य तक्रार आहे तिजकडे लक्ष देऊन आतां ह्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याची वेळ आली आहे, असें मनांत येऊन खालील सूचना सर्व सभासदांपुढें ठेवीत आहें. तिचा विचार होऊन आपलें मत प्रदर्शित करणेंची मेहेरबानी व्हावी.

ही सूचना आजच इतक्या घाईनें आपलेपुढें ठेवीत आहें याचें कारण असें कीं, माझे सहकारी गाडगीळ यांनीं मला सोबत जोडलेलें पत्र लिहून आणि सुंदर व उदार देणगी देऊन माझे विचारास मोठें पाठबळ दिलें. तसेंच मला येत्या सामाजिक परिषदेंत अध्यक्ष या नात्यानें भाषण करावयाचें आहे ती संधि ही योजना प्रकट करून तिला आपले राष्ट्रांतील विचारी लोकांची सहानुभूति मिळविण्यास अत्यंत योग्य आहे हाही विचार मनांत आला. ती सूचना येणेंप्रमाणें:—

सूचना:—महाराष्ट्रासाठीं स्त्रियांची मराठी भाषेंतून शिक्षण देणारी व इंग्रजी भाषा जींत आवश्यक विषय म्हणून शिकविली जाईल अशी युनिव्हर्सिटी स्थापन करण्याचा प्रयत्न अनाथबालिकाश्रमाचे मंडळीनें करावा व त्या युनिव्हर्सिटीचें पहिलें कॉलेज महिलाश्रमाला जोडून जितक्या त्वरेनें काढतां येईल तितकें काढावें. ह्या गोष्टींचा सांगोपांग विचार जानेवारी महिन्यांत व्यवस्थापक मंडळीचे सभेंत व्हावा.

पुणें ता. २३ डिसेंबर १९१५.

धोंडो केशव कर्वे"

इतक्यांतच आणखी एक आनंदाची गोष्ट घडली. कु. कृष्णाबाई ठाकूर यांनीं २४ ता. पत्र लिहून कळविलें कीं " प. वा. बळवंत गोविंद गोडबोले यांच्या स्मरणार्थ मी कांहीं रकम जमविलेली आहे तरी त्यांच्या नांवानें लायब्ररी बनविण्यासाठीं ४००० रुपये देण्याची माझी इच्छा आहे." ( ह्या रकमेपैकीं पुढें १९०० रुपये मिळाले. )

हें सर्व होतें तों डिसेंबरची २५ तारीख आली. प्रो. वासुदेवराव पटवर्धन यांच्या मदतीनें मीं माझें भाषण अगोदरच तयार केलें होतें तें इंडियन सोशल रिफॉर्मरचे संपादक मि. के. नटराजन् यांस दाखविलें. यांचेबद्दल मला विशेष प्रकारचा आदर फार वर्षांपासून होता व अजूनही आहे. माझें भाषण सुधारून देण्यासाठीं मी त्यांना विनंति केली व ती त्यांनीं मान्य केली. स्त्रीशिक्षणाबद्दलचे माझे विचार व स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची योजना त्यांना बिलकूल पसंत पडली नाहीं व तेव्हांच त्यांनीं आपली नापसंती स्पष्ट शब्दांनीं व्यक्त केली. त्यांचेकडून मला उत्तेजन मिळेल असें वाटत होतें पण माझी निराशा झाली. त्यांचें तसें प्रामाणिक मत होतें व पुढें ते त्यांनीं आपल्या रिफॉर्मरमध्यें ही स्पष्टपणें व्यक्त केलें. माझ्या भाषणांत आश्रमाचे व्यवस्थापक मंडळीनेंही योजना पसंत केली आहे व अशा प्रकारची युनिव्हर्सिटी काढण्याचा प्रयत्न केला जाईल असेंही मीं सांगून टाकिलें होतें. हें माझें भाषण चोहोंकडे प्रसिद्ध झाल्यानंतर सुमारें दोन महिन्यांनीं मिस् मार्गारेट ई. राबर्ट्स, हेड मिस्ट्रेस, गर्ल्स् ग्रॅमर स्कूल ब्रॅडफोर्ड यांनीं मला एक पत्र लिहिलें कीं आमच्या टीचर्स असोसिएशनच्या सभासदांना तुमच्या भाषणाच्या प्रती वांटावयाच्या आहेत तरी त्याच्या प्रती शिल्लक असल्यास दीडशें पाठवून द्याव्या व किंमत कळवावी. प्रती शिल्लक नसतील तर दुसरी आवृत्ती काढून प्रती पाठवाव्या. खर्च देण्यांत येईल. त्याप्रमाणें भाषणाची दुसरी आवृत्ती आर्यभूषण छापखान्यांतून काढून घेतली व त्यांजकडे प्रती पाठविल्या. ह्या आवृत्तीचा खर्च कबूल केल्याप्रमाणें त्यांनीं दिला. आतां माझेजवळ त्याची एकच प्रत शिल्लक आहे.

जपानांतील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची माहिती देणारें छोटेखानी पुस्तक कोणीं पाठविलें ही जिज्ञासा वाचकांस झालेली असेल, ती तृप्त केली पाहिजे. बनारसचे जमीनदार सुप्रसिद्ध दानशूर बाबू शिवप्रसाद गुप्त यांनीं सुमारें

चार वर्षांनंतर पत्र पाठवून कळविलें कीं तें पुस्तक मीं व माझे मित्र कलकत्त्याचे प्रो. विनयकुमार सरकार ह्यांनीं पाठविलें होतें. त्या पत्रांत आमचीं नांवें प्रसिद्ध करूं नयेत असें लिहिलें होतें. पुढें ते बेळगांव कॉंग्रेसनंतर परत जात असतां पुण्यास आले तेव्हां भेटीचे प्रसंगीं आपलीं नांवें सांगण्यास आपण प्रतिबंध करूं नये अशी त्यांस विनंति केली व ती त्यांनीं मान्य केली.

# प्रकरण चवथें

## महिला-विद्यापीठाची गर्भावस्था

सामाजिक परिषदेंतील भाषण झाल्यानंतर मी स्त्रियांच्या युनिव्ह-सिटीची म्हणजे विद्यापीठाची घटना करण्याच्या उद्योगाला लागलों. येथील सुमारें चौदापंधरा मंडळींची सभा या गोष्टीची चर्चा कर-ण्यासाठीं फर्ग्युसन कॉलेजांत भरविली. ह्यांपैकीं सुमारें एक तृतीयांश मंडळी ह्या प्रयत्नाला प्रतिकूल होती. विशेषकांत डॉ. परांजपे व हरिभाऊ आपटे हे असल्याचें स्मरतें. डॉ. परांजपे यांनीं आपलें प्रतिकूल मत अगोदरच व्यक्त केलेलें होतें. माझें एक लहानसें इंग्रजी चरित्र त्यांनीं लिहिलें, तें सामाजिक परिषदेच्या आधीं एक दोन दिवसच प्रसिद्ध झालें होतें. परिषदेंत स्त्रियांच्या युनिव्हार्सिटीच्याबद्दल माझी तरफदारी चालली होती व त्याचवेळीं हीं पुस्तकें परिषदेच्या मंडपांत व बाहेर विकलीं जात होतीं. सदर पुस्तकांत *Festina lente* असें एक लॅटिन वचन असून त्याचें इंग्रजींत भाषांतर hasten slowly (इतकी घाई करूं नका) असें दिलें होतें. त्यांच्या सल्याचा हेतु हा होता कीं, अजून आश्रमाला चांगलें स्थैर्य यावयास पाहिजे तें येऊं द्या व मग दुसरा उद्योग हातीं घेण्यास आपणांस ठीक पडेल. त्या सभेंतील दुसऱ्या तृतीयांश मंडळीपैकीं कांहींचा कल प्रतिकूल मताकडे व कांहींचा अनुकूल मताकडे होता. राहिलेला एकतृतीयांश मात्र अनुकूल असून, प्रयत्न करून पाहण्यास हरकत नाहीं, अशा मताचा होता. प्रो० केशवराव कानिटकर व प्रो० हरिभाऊ लिमये यांची पूर्ण सहानुभूति मिळाली. या उद्योगाला पहिलें द्रव्याचें सहाय्य प्रो० कानिटकर यांजकडून मिळालें. ही सभा आटोपल्याबरोबर त्यांनीं मला आपल्या घरीं नेलें व तीनशें रुप-यांच्या नोटा माझ्या हातांत दिल्या. ही सभा विद्यापीठासंबंधीं अनेक गोष्टींची चर्चा करण्यासाठीं बोलाविली होती. तींत ठराव व्हावयाचे नव्हते किंवा कांहीं निश्चित योजना ठरवावयाची नव्हती. मीं मात्र निश्चय केला होता कीं, लोकमत कसेंही असो, ह्या कामीं आपली शिकस्त करावयाची. ह्या सभेंत युनिव्हर्सिटी महाराष्ट्रासाठीं असावी; दरसाल दहा रुपये वर्गणी देणाऱ्या अगर तीनशें रुपये देणगी देणाऱ्या पदवीधरांचा एक मतदारसंघ

करावा; व पांच रुपये वार्षिक वर्गणी अगर दीडशें रुपये देणगी देणारांचा दुसरा मतदारसंघ करावा; वगैरे कांहीं गोष्टी बऱ्याच मंडळींना मान्य झाल्या.

ह्या सर्व गोष्टी आश्रमाच्या व्यवस्थापक मंडळीला मान्य होऊन त्यांना आश्रमाच्या असाधारण सभेकडून मंजुरी मिळावयास पाहिजे होती. सदर मंजुरी मिळविण्यासाठीं व्यवस्थापक मंडळीची सभा १९ जानेवारी १९१६ रोजीं फर्ग्युसन कॉलेजांत भरली. त्यावेळीं चारपांच इतर मंडळींनाही बोलाविलें होतें, व कुमारी कृष्णाबाई ठाकूर, प्रो. के. रा. कानिटकर, प्रो. ह. गो. लिमये व प्रो. विजापूरकर ही मंडळी हजर होती. या सभेंत नवीन काढावयाच्या संस्थेस "महाराष्ट्र शारदापीठ" हें नांव सुचविण्यांत आलें; व उद्देश आणि सेनेटचे सभासद निवडण्यासाठीं कांहीं नियम पसंत करण्यांत आले. प्रो कर्वे, प्रो. भाटे, प्रो. कानिटकर, प्रो. लिमये, श्री. न. चिं. केळकर व श्री. म. के. गाडगीळ ह्या सहा गृहस्थांची प्रोव्हिजनल कमेटी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीसाठीं जरूर त्या गोष्टी करण्यासाठीं नेमावी अशी शिफारस आश्रमाच्या सभासदांच्या असाधारण सभेला करण्याचें व ही असाधारण सभा १३ फेब्रुवारी १९१६ रोजीं भरविण्याचें ठरलें.

मध्यंतरीं महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. त्यावेळीं हिंदुस्थानसरकारच्या कौन्सिलांतील सर शंकरन् नायर यांजकडे विद्याखातें सोपविलें होतें. तेव्हां त्यांना ही कल्पना कशी काय आवडते हें पाहण्यासाठीं त्यांजकडे डेप्युटेशन घेऊन जावें असें आम्हीं ठरविलें व त्यांना पत्र लिहिलें. त्यांनीं कळविलें कीं "हिंदु युनिव्हर्सिटीच्या पायाचा दगड बसविण्याच्या समारंभाला आम्हांस जावयाचें आहे तरी बनारस येथें तुम्ही आमची भेट घ्या." आम्हांस हें सोयीचेंच झालें. कारण कलकत्त्यापर्यंत जाण्याच्या ऐवजीं बनारसपर्यंत जाऊन काम झालें व समारंभ पहाण्यास मिळाला. मी, हरिभाऊ दिवेकर व कृष्णाबाई ठाकूर अशीं डेप्युटेशनच्या स्वरूपांत बनारस येथें जाऊन सर शंकरन् नायर यांस भेटलों. त्यांना कल्पना बरी वाटली व तुमचें काम कांहीं स्वरूपाला आल्यानंतर पाहतां येईल असें त्यांनीं सांगितलें.

प्रो. पं. का. तेलंग ह्यांनीं मला डॉ. बिझांट यांजकडे नेलें. त्यांना ही योजना फार आवडली व "युनिव्हर्सिटी केवळ महाराष्ट्रासाठीं न काढतां तिला व्यापक स्वरूप द्या" अशी सल्ला त्यांनीं व प्रो. तेलंग यांनीं दिली. डॉ. बिझांट यांनीं त्याचवेळीं दीडशें रुपयांचा चेक दिला. दुसऱ्याही कित्येक गृहस्थांशीं बोलणें झालें व बऱ्याच मंडळींना हा विचार पसंत पडला. तेथून परत येतांना आम्ही अलाहाबादेस आलों व कायस्थ पाठशाळेचे प्रिन्सिपल बी. संजीवराव यांजकडे उतरलों. तेथें एक सभा होऊन त्या सभेंत स्त्रियांच्या शिक्षणावर व स्त्रियांचे युनिव्हर्सिटीसंबंधानें आमचीं भाषणें झालीं.

पूर्वी योजिल्याप्रमाणें आश्रमाच्या मंडळीची असाधारण सभा १३ फेब्रुवारी १९१६ रोजीं झाली व त्या सभेंत "भारतवर्षीय महिला-विद्यापीठ" अथवा "इंडियन् वुइमेन्स युनिव्हर्सिटी" हें नांव सुचविण्यांत आलें व व्यवस्थापक मंडळीच्या शिफारसी प्रमाणें प्रोव्हिजनल कमिटी कायम करण्यांत आली. आणि श्री. गाडगीळ ह्यांना त्या कमिटीचे सेक्रेटरी नेमण्यांत आलें. सेनेट व सिंडिकेट नेमली जाऊन त्यांचे स्वाधीन चार्ज होईपर्यंत प्रोव्हिजनल कमिटीनें काम करावें असें ठरलें. त्या सभेनें पूर्वी दिलेली मतदारांबद्दलची योजनाही पसंत केली.

प्रोव्हिजनल कमिटीनें लोकांपुढें ठेवण्यासारखी विद्यापीठाच्या घटनेसंबंधीं तात्पुरती योजना तयार केली व लोकांना भेटून त्यांची सहानुभूति व मदत मिळविण्याचें काम जारीनें सुरू करण्याची वेळ आली. एका बाजूला स्त्रियांना पुरुषांसारखेंच शिक्षण पाहिजे व तें इंग्रजींतूनच दिलें पाहिजे असें म्हणणारे पाश्चात्य शिक्षणांत फार पुढें गेलेले लोक होते व अजून आहेत. दुसऱ्या बाजूला जुन्या मताचे लोक. यांना हायस्कूलचें किंवा कॉलेजचें शिक्षण स्त्रियांना मुळींच नको होतें. सुशिक्षितांमध्यें सुद्धां अशा विचारांचे लोक बरेच आहेत. आम्हांला ह्या दोन पंथांच्या लोकांच्या मधून मार्ग काढावयाचा होता. वास्तविक हिंदुस्थानांतील पुरुषांच्या शिक्षणाचा अभ्यासक्रमही त्यांना योग्य होईल असा नव्हता व नाहीं. पाश्चात्य युनिव्हर्सिट्यांच्या वळणावर, इंग्रजी भाषेला फाजील महत्त्व देऊन अभ्यास

क्रम ठरविलेला आहे, तोच सरसकट सर्व स्त्रियांवर लादणें अत्यंत अनिष्ट आहे. पण या कित्येक लोकांचें म्हणणें कीं, " पुरुषांचा अभ्यासक्रमच चांगला सुधारण्याचे प्रयत्न करा व तोंपर्यंत पुरुषांचेंच शिक्षण स्त्रियांना मिळूं द्या." अशा मताच्या बऱ्याच लोकांनीं केवळ माझ्या पूर्वीच्या कामाकडे व ह्या नवीन कामांतील उत्साहाकडे पाहून, ह्या कार्याला मदत केली आहे. आमच्या सेनेटमध्यें सुद्धां अजून अशा मताचे कांहीं लोक असावेत असें वाटतें. ज्यांना मनाचा कल, काळ व द्रव्य यांची अनुकूलता असेल त्यांनीं पुरुषांचेंच शिक्षण घेण्यास हरकत नाहीं. ह्यासंबंधानें माझ्या सामाजिक परिषदेच्या भाषणांतील पुढील उतारे माझें मत स्पष्ट करतील:—

" Those women who have the time, money and inclination and can afford to go high enough on this ladder are welcome to follow these courses of study and our society will be better for them."

" ज्या स्त्रियांना काल, द्रव्य व मनःप्रवृत्ति यांची अनुकूलता असेल आणि या शिडीवर बरेंच उंच जाण्याचें ज्यांना सामर्थ्य असेल त्यांनीं खुशाल हा अभ्यासक्रम स्वीकारावा; त्यामुळें आपल्या समाजाचें हितच होईल. "

" I do not mean that the way should be rigoroasly barred against those whose ambition would be to beat men on thier own ground and compete with them for prizes and honours in the existing Universities. Those who would be in a position by intellectual, physical and financial equipments to do so would certainly be glorious ornaments to their kind and also to the whole community in the present conditions."

" पुरुषांच्याच क्षेत्रांत त्यांच्यावर ताण करणें व हल्लींच्या विश्वविद्यालयांतील पारितोषिकें मिळविणें व बहुमान संपादन करणें यांमध्यें पुरुषांशीं स्पर्धा करणें ही ज्यांची महत्त्वाकांक्षा असेल अशा स्त्रियांना प्रचलित अभ्यासक्रम घेण्याच्या कामीं सक्त मज्जाव व्हावा असें माझें म्हणणें नाहीं. हें शिक्षण घेण्याची ज्यांची बौद्धिक, शारीरिक व सांपत्तिक पात्रता असेल

अशा स्त्रिया म्हणजे वर्तमान परिस्थितींत केवळ स्त्रीजातीचेंच नव्हे तर सर्व-सामान्य समाजाचें उज्ज्वल भूषण होत. ”

ह्यावरून असें मात्र कोणीं समजूं नये कीं, बुद्धिमान् स्त्रियांनीं पुरुषांचेंच शिक्षण घ्यावें असें मला वाटतें. उलट पक्षीं बुद्धिमान् स्त्रियांना आमच्या युनिव्हर्सिटींत शिक्षण घेऊन आपलें ज्ञान वाटेल तितकें वाढवितां येईल व समाजोपयोगी कामें करतां येतील असें माझें मत आहे; तथापि रुळ-लेल्या मार्गानें जाण्याची व राजमान्य पदवीचें शिक्षण घेण्याची प्रवृत्ति सामान्यतः आढळून येणारच; तेव्हां अशा प्रवृत्तीच्या कांहीं बुद्धीमान स्त्रिया तिकडे गेल्यास त्यांत विशेष वावगें नाहीं. पण सामान्य बुद्धीच्या स्त्रियांनीं पुरुषांच्या युनिव्हर्सिटीकडे वळणें हें मात्र केवळ आत्मघातकी-पणाचें आहे असें म्हटल्यावांचून मला राहवत नाहीं.

वर्तमानपत्रांतून अगर मासिकांतून लेख लिहिणें, सभांतून भाषणें करणें, आपल्या जबाबदारीवर कांहीं कामें अंगावर घेऊन तीं चालविणें वगैरे गोष्टींत महिलाविद्यापीठाच्या पदवीधर स्त्रिया इतर विद्यापीठाच्या पदवी-धर स्त्रियांहून रतिमात्र कमी पडणार नाहींत; किंबहुना ह्या कामीं मातृ-भाषेचा विशेष अभ्यास झाल्यानें व सर्व विषय मातृभाषेंतून शिकल्यानें महिलाविद्यापीठाच्या पदवीधरांनाच या कामीं अधिक पात्रता येऊं शकेल. इंग्रजींतून सर्व विषय शिकून व पुरुषांप्रमाणेंच सर्व शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या हिंदु पदवीधर स्त्रियांनीं इंग्रजी भाषणें केलीं आहेत अगर लेख लिहिले आहेत असें फारसें आढळत नाहीं. मना-वर संस्कार होण्याच्या व उपयुक्ततेच्या दृष्टीनें महिलाविद्यापीठाचें शिक्ष-णच अधिक परिणामकारक होईल व होतें असें माझें ठाम मत आहे.

युनिव्हर्सिटी काढण्याचें कायमचें ठरून प्रोव्हिजनल कमिटी कायम होऊन काम सुरू झाल्यावर हिंदुस्थानांतल्या व इंग्लंडांतल्या कांहीं वजन-दार लोकांना पत्रें लिहून त्यांची सहानुभूति मिळवितां आल्यास पहावी असें मनांत आलें व अशा गृहस्थांकडे माझ्या भाषणाची एक प्रत, प्रोव्हि-जनल कमेटीनें काढलेलें छापील विनंतिपत्र व स्वतः लिहिलेलें एक पत्र, अशीं रवाना केलीं. त्यांपैकीं तीन गृहस्थांनीं विशेष उत्तेजनपर उत्तरें पाठ-

दिलीं. त्यांतील उतारे येथें देणें इष्ट वाटतें. डॉ. रवीन्द्रनाथ टागोर हे २५ मार्च १९१६ च्या पत्रांत लिहितातः—

"I am greatly interested in your proposal for a Women's University where education should be given through the Vernaculars. I agree with the arguments given in your printed circular both for the necessity of such an institution and also the urgency of starting it without passing through the elaborate process of delay in order to secure the Government recognition. It is far better that you should win it at the end, than pray for it in the beginning.

I am afraid I cannot sign the paper you enclose under any of its heads. All my available income must be given to my own school at Shantiniketan. At the same time I would wish to give you any moral support I can in your endeavours which have my heartiest sympathy."

"मातृभाषा ही बोधभाषा ठेवून आपण स्त्रियांकरितां एका विश्वविद्यालयाची जी योजना केली आहे तिच्याकडे माझें बरेंच लक्ष आहे. अशा प्रकारच्या संस्थेच्या आवश्यकतेविषयींचे, तसेंच सरकारी मान्यता मिळविण्याचे खटाटोपांत व्यर्थ कालक्षेप न करितां तिचें काम ताबडतोब चालू करण्याविषयींचे, आपण काढिलेल्या छापील पत्रकांतील सर्व युक्तिवाद मला पसंत आहे. आरंभापासून मान्यतेसाठीं याचना करीत बसण्यापेक्षां ती शेवटीं हक्कानें प्राप्त करून घेणें हें अधिक श्रेयस्कर आहे.

आपण पाठविलेल्या पत्रकांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि सदरांत मला माझें नांव देतां येणार नाहीं असें वाटतें. मजपाशीं उपलब्ध असलेलें सर्व द्रव्य मला शांतिनिकेतनांतील माझ्या स्वतःच्या शाळेस द्यावें लागणार आहे; तथापि तुमच्या प्रयत्नांबद्दल माझी मनापासून सहानुभूति असून शक्य तितकें नैतिक पाठबळ तुम्हांस देण्याची माझी इच्छा आहे."

डॉ. एच्. एस्. एल्. फिशर, व्हाइस चान्सेलर, शेफील्ड युनिव्हर्सिटी, हे एका पब्लिक सर्व्हिसेस कमिशनचे मेंबर असतांना हिंदुस्थानांत आले होते व त्यांनीं सर महादेव चौबळ यांचेबरोबर येऊन आश्रमाला भेट दिली होती. हे आपल्या ८ मे १९१६ च्या पत्रांत लिहितातः—

" I am very greatly interested in the outline scheme for an Indian Women's University which you have been kind enough to send me. The establishment of a university for women would put the crown upon the noble work which you are doing in India for female education and from the bottom of my heart I wish you every success. Doubtless you will meet with obstacles, but these your moral courage will assuredly overcome. May every success attend your efforts. "

" स्त्रियांच्या विश्वविद्यालयासंबंधींच्या योजनेची जी रूपरेषा आपण मजकडे पाठविली तिच्याकडे माझें बरेंच लक्ष वेधलेलें आहे. आपलें हिंदुस्थानांत स्त्री-शिक्षणाचें जें महत्त्वाचें कार्य चालू आहे त्यावर आपण स्त्रियांकरितां एका विश्वाविद्यालयाची स्थापना करून कळसच चढवीत आहांत. आपणांस पूर्ण यश लाभो असें मीं अगदीं मनापासून इच्छितों. आपणांस आपल्या मार्गांत अडचणी येणारच; परंतु आपण आपल्या नैतिक सामर्थ्यांच्या बळावर त्या दूर कराल अशी माझी खात्री आहे. आपणांस आपल्या प्रयत्नांत पूर्ण यश येवो. "

डॉ. फिशर ह्यांनीं सर महादेव चौबळ ह्यांच्या विनंतीवरून १९२५ सालीं महिला विद्यापीठाच्या पदवीदान–समारंभाच्या वेळचें भाषण लिहून पाठविलें होतें.

मि. सी. एफ्. अँड्रयूज हे आपल्या ६ जून १९१६चे पत्रांत लिहितातः—
" I have been very deeply interested in the papers you have sent me about the women's University and I do indeed congratulate you on the wonderful start you have made and the splendid lines you have laid down. I wish so much I had many thousands of rupees that I could give to it, but I am now without money of my own."

" स्त्रियांच्या विश्वाविद्यालयासंबंधाचीं जीं पत्रकें आपण मजकडे पाठविलीं तीं मला विशेष आवडलीं. आपण केलेला प्रारंभ मोठा कौतुकास्पद असून आपण घालून दिलेले मार्ग प्रशस्त आहेत; आणि या दोहोंबद्दल मी आपलें खरोखर फार अभिनंदन करितों. आपल्या कार्याला मदत देण्या-

करितां मजपाशीं हजारों रुपये असते तर काय बहार झाली असती ! परंतु आतां मजपाशीं स्वतःचा असा पैसा राहिला नाहीं."

कांहीं मंडळींनीं आपले विरुद्ध विचारही कळविले होते, आश्रमाला व महिलाविद्यालयाला मोठी मदत करणारे श्री. सीताराम नारायण पंडित व व त्याचप्रमाणें आश्रमासाठीं २००० रुपये स्कॉलर्शिपसाठीं देणारे गृहस्थ श्री. नारायण गणेश देशपांडे यांनीं स्त्रियांचे युनिव्ह्‌र्सिटीची आवश्यकता नाहीं असे अभिप्राय कळविले होते.

लोकमान्य टिळकांची या उद्योगाला सहानुभूति मिळाल्यास पहावी म्हणून मीं प्रयत्न केला, पण यश आलें नाहीं. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं हल्लींच्या शिक्षणानें आम्ही जसे संशयवादी ( Sceptics ) बनलों आहों तशाच स्त्रिया बनतील व आमच्या गृहसौख्याचा नाश होईल.

विद्याखात्यांतील बऱ्याच वरच्या दर्जाच्या हुद्यावर असणाऱ्या एका युरोपिअन गृहस्थांनीं आपला निषेध खालील कडक शब्दांत व्यक्त केला होता:-

"Starting such a University would mean prostituting the high ideals which go with the idea of a University."

"असलें विश्वविद्यालय स्थापन करणें म्हणजे 'विश्वविद्यालय' या शब्दानें ध्वनित होणाऱ्या उच्च ध्येयांपासून च्युत होणें होय."

स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या विरुद्ध असणारे आपले विचार आपल्या जवळ न ठेवतां ते वृत्तपत्रांतून अगर मासिकांतून प्रसिद्ध करणारे थोडे गृहस्थ होते. त्यांत इंडियन सोशल रिफॉर्मर पत्रानें पुढाकार घेतला होता. स्वतःचे प्रतिकूल अभिप्राय देणें चाललेंच होतें, पण इतरांच्या विरोधक लेखांचेही उतारे त्या पत्रांत येत होते.

२७ फेब्रुवारी १९१६ च्या अंकांत त्या पत्राचे संपादक लिहितात:—

"The immense personal devotion and sacrifice which enabled him (Prof. Karve) to make the Hindu Widows' Home at Poona what it is to-day, are bound to make any project which he conceives, if not a success, at least a serious distraction hampering progress, along established lines. We do not think that the scheme will succeed;it certainly does not deserve to succeed. What it may do is to lead to divided counsels and to further postpone-

ment of progress along established lines. We can only hope that the diversion created by Prof. Karve's scheme will be over by the time the war comes to an end, when Government may be expected to do something.'

" स्वतःची पूर्ण निष्ठा व मोठा स्वार्थत्याग या गुणांच्या बळावर त्यांना (प्रो. कर्व्यांना) पुणें येथील अनाथबालिकाश्रम नांवाच्या संस्थेला तिचें आजचें स्वरूप प्राप्त करून देतां आलें. याच गुणांच्या जोरावर त्यांनीं मनांत आणलेली कोणतीही योजना यशस्वी झाली नाहीं तरी ती-मुळें प्रचलित मार्गासंबंधानें बुद्धिभेद उत्पन्न होऊन चालू असलेल्या प्रगतीला विघ्न मात्र खास होईल. ही योजना यशस्वी होईल असें आम्हांस वाटत नाहीं व ती यशस्वी होण्याच्या योग्यतेचीहि खचित नाहीं. तिच्या योगानें एवढें मात्र होण्याची भीति आहे कीं, मतां-मतांचा गलबला माजून रुळलेल्या मार्गानें चालू असलेली प्रगति आणखी लांबणीवर पडेल. आम्हांला एवढीच आशा वाटते कीं प्रो. कर्वे यांच्या योजनेनें उत्पन्न झालेली खळबळ युद्ध संपण्याच्या सुमाराला नाहींशी होईल. त्या वेळीं सरकार कांहींना कांहीं करील अशी आशा करण्यास हरकत नाहीं."

ता. १२ मार्च १९१६ च्या अंकांत पुढील मजकूर आहे:—" It is because we are sure that notwithstanding Professor Karve's excellent intentions the new project will act as a stumbling block in the way of women's education, that we have felt ourselves constrained to express our disbelief in it in unmistakable terms."

"प्रो. कर्वे यांचे हेतु कितीही चांगले असले तरी त्यांच्या नवीन योजनेनें स्त्रियांच्या शिक्षणाच्या मार्गांत मोठी धोंड आडवी येणार आहे अशी आमची खात्री आहे आणि म्हणून त्या योजनेसंबंधीं आम्हांला वाटणारा अविश्वास अगदीं असंदिग्ध रीतीनें व्यक्त करणें आम्हांला भाग पडत आहे."

कोणतीही नवीन कल्पना निघाली कीं तिजबद्दल अनुकूल व प्रतिकूल असे विचार प्रकट व्हावयाचेच. विरोधी विचार प्रदर्शित करण्याचें व त्यांच्या प्रसाराचेंही काम केवळ सद्बुद्धीनेंच होत होतें, त्यांत व्यक्तिविषयक द्वेष नसून हा प्रयत्न समाजहिताला व स्त्रियांच्या उन्नतीला विघातक आहे

अशी प्रामाणिक समजूतच त्यांत होती, असें स्पष्ट दिसत होतें; म्हणून अनुकूल अभिप्रायांनीं हुरळून न जातां व प्रतिकूल अभिप्रायांनीं हताश न होतां ठेवतां येईल तितकी समतोल वृत्ति ठेवण्याचा मी यत्न करीत होतों.

कोणतेही नवीन विचार समाजाच्या हिताचे आहेत कीं अहिताचे आहेत हें पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें ठरावयाचें असतें. तेव्हां प्रत्येकानें आपल्या समजुतीप्रमाणें राष्ट्रकार्य करीत रहावें हाच उत्तम मार्ग.

आश्रमाचे खास सभेची मंजुरी मिळून प्रोव्हिजनल कमिटी स्थापन झाल्याबरोबर नेटानें काम करण्याची वेळ आली. मी प्रथम पुण्यांत आणि मुंबईत पुष्कळ लोकांना भेटून त्यांना मतदारसंघांत दाखल केलें व नंतर महात्मा गांधी पुण्यास आले असतां त्यांची गांठ घेतली. त्यावेळीं त्यांना फुरसत नसल्यामुळें ह्यासंबंधानें विचार करण्यासाठीं त्यांनीं मला मुंबईस बोलाविलें. मी त्यांना सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटींतील सेवक श्री. चितळिया यांचेबरोबर गांवदेवींत राहणाऱ्या त्यांचे मित्राच्या घरीं रात्रीं साडेआठाच्या सुमारास भेटलों. उच्च शिक्षणांत सुद्धां मातृभाषेला बोध भाषा करणें, गणितविषय ऐच्छिक ठेवणें, फक्त अंकगणित मात्र आवश्यक ठेवणें, प्रपंचशास्त्र व आरोग्यशास्त्र हा विषय आवश्यक ठेवून स्त्रियांना योग्य असा अभ्यासक्रम ठरविणें वगैरे सर्व भाग त्यांस पसंत पडले. पण इंग्रजी हा विषय आम्हीं आवश्यक ठेविला होता हें त्यांस पसंत पडलें नाहीं. उच्च शिक्षणांतसुद्धां इंग्रजी हा विषय ऐच्छिकच ठेवावा असें त्यांचें म्हणणें होतें. हें आम्हांस पटेना. तेव्हां आपण हा आग्रह धरला तर आम्हांस आपल्या सहानुभूतीशिवाय काम करणें भाग पडेल असें मीं त्यांस सांगितलें. महात्मा गांधीं हे कोणत्याही महत्त्वाच्या विषयावर एकदम कायमचें मत न देतां विचार करूनच काय तें ठरवितात. कांहीं वेळ विचार करून ते म्हणाले, "कर्वे, तुम्हीच आहांत म्हणून मीं आपला आग्रह सोडतों. पण माझें मत पहिल्याप्रमाणेंच म्हणजे इंग्रजी हा विषय स्त्रियांच्या उच्च शिक्षणांत सुद्धां ऐच्छिक ठेवावा असेंच आहे. तथापि तुमचा उद्योग चांगला आहे व त्या कामीं मदत करण्याची माझी इच्छा आहे." लागलेंच त्यांनीं दरसाल दहा रुपये देऊन मतदार होण्याचें कबूल केलें. महात्मा गांधींकडून मला द्रव्याची मदत नको होती; मला त्यांचा नैतिक पाठिंबा पाहिजे होता,

परंतु त्यांनीं आपली वर्गणी देण्याबद्दल आग्रह धरला, व दरसाल रिपोर्ट पाठवून ती वसूल करीत जा म्हणून सांगितलें व त्याप्रमाणें आम्हीं ते तुरुंगांत जाईपर्यंत केलें. नंतर मात्र वर्गणीसाठीं मीं त्यांना त्रास दिला नाहीं. त्यांची वर्गणी जमा होऊन त्यांचें नांव आमचे मतदारांत येत असतें. मग मी त्यांजबरोबर अहमदाबादेस गेलों. तेथें महात्माजींच्या अध्यक्षतेखालीं माझें स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीसंबंधानें व्याख्यान झालें. त्या व्याख्यानांत विशेष गोष्ट ही घडली कीं, मिस् चब् ह्या युरोपिअन बाई तेथील फीमेल ट्रेनिंग कॉलेजच्या प्रिन्सिपल होत्या त्यांना ही कल्पना पसंत पडून त्या सामान्य संघाच्या मतदार झाल्या व पुढें त्यांनीं एकदम दीडशें रुपयांची देणगी दिली. महात्माजींच्या पाठिंब्यामुळें अहमदाबादेंत वर्गणी-हि बरीच मिळाली. अशा रीतीनें ह्या संस्थेच्या गर्भावस्थेंत महात्मा गांधी यांची मोठी मदत झाली.

ह्या ठिकाणीं इंग्रजी हा विषय आवश्यक कां ठेविला याबद्दल थोडें लिहिलें पाहिजे. त्या वेळीं माध्यमिक शिक्षणांत देखील कोणताहि विषय शिकतांना इंग्रजीचा उपयोग आवश्यक होता. पुढें माध्यमिक शिक्षणांत बोध भाषा म्हणून हिचा उपयोग ऐच्छिक केला गेला. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना ज्ञानाचे दरवाजे मोकळे झाले पाहिजेत. आज तरी इंग्रजी किंवा दुसऱ्या कोणत्यातरी युरोपिअन भाषेवांचून हें होऊं शकत नाहीं. इंग्रजी भाषा ही आज अर्ध्या जगाची भाषा झाली आहे. कोणत्याही विषयाचें विशेष ज्ञान करून घ्यावयाचें असलें अगर कोणत्याही गोष्टीची विशेष माहिती पाहिजे असेल तर ती आज इंग्रजीच्या ज्ञानावांचून होणें शक्य नाहीं. फार काय आपल्या देशांतील पुढाऱ्यांचीं भाषणें प्रत्यक्ष ऐकणें अगर त्यांच्याशीं संभाषण करणें तेंही इंग्रजीवांचून आज होऊं शकत नाहीं. जपानांतील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटींत सुद्धां इंग्रजी भाषा हा विषय उच्च शिक्षणांत आवश्यक ठेविला आहे. जपानांत कांहीं इंग्रजांचें राज्य नाहीं, पण त्यांना देखील स्त्रियांच्या शिक्षणांत इंग्रजीची आवश्यकता वाटली. आपल्याकडे तर इंग्रजीचा उपयोग किती तरी आहे. ह्या गोष्टी विचारांत घेऊनच इंग्रजी हा विषय कॉलेजांत आवश्यक ठेविला आहे व हायस्कुलांतूनहि बहुतेक मुली हा विषय घेतात.

अहमदाबादेहून परत आल्यावर मी मद्रासला गेलों. तेथें दि राइट ऑनरेबल श्रीनिवास शास्त्री यांजकडे उतरलों. हा वेडा पीर असल्या असामान्य कार्याला हात घालून सहानुभूति व मदत मिळविण्यासाठीं मद्रासेस येतो हें पाहून त्यांना मोठा अचंबा वाटल्यासारखें दिसलें. अर्थात् पाहुणचाराच्या दृष्टीनें कोणतेंही व्यंग नव्हतें. आपणांला मजबद्दल कांहीं वाटावयास नको, आपण आपल्या सहकारी मंडळींपैकीं कोणीतरी मजबरोबर द्या व मी कांहीं मंडळींच्या भेटी घेतों असें मीं त्यांस सांगितलें, व पहिल्यानें 'हिंदु' पत्राचे संपादक श्रीयुत कस्तुरीरंग अय्यंगार यांस भेटलों. त्यांस योजना आवडली व लागलेंच त्यांनीं आपलें नांव पदवीधरांचे संघांत दाखल केलें. अशा रीतीनें त्या दिवशीं पांच–सहा नांवें पदवीधरांचे संघांत व तितकींच सामान्य संघांत दाखल झाल्यानंतर संध्याकाळीं घरीं आल्यावर नामदार शास्त्र्यांनीं कसें काय काम झालें म्हणून विचारलें. त्या वेळीं त्यांचेपुढें ज्या नोटबुकांत नांवें दाखल केलीं होतीं तें ठेविलें. तेव्हां त्यांनींही आपलें नांव पदवीधरांचे संघांत लिहून टाकलें. सुमारें एक आठवडा तेथें राहून कांहीं व्याख्यानें दिलीं व बऱ्याच मंडळींची सहानुभूति व मदत मिळविण्याचा प्रयत्न केला, व तो चांगलाच यशस्वी झाला. नंतर मदुरा, त्रिचनापल्ली, सेलम्, बंगलोर, तंजावर, कुंभकोणम्, विजगापट्टण, राजमहेंद्री, बऱ्हामपूर इतक्या ठिकाणीं आपल्या मित्रांना पत्रें लिहून माझी उतरण्याची, सभा भरण्याची वगैरे सोय ना. शास्त्र्यांनीं उत्कृष्ट प्रकारें केली. प्रत्येक ठिकाणीं कोणीतरी स्टेशनावर येऊन मला भेटावें व परत जातांना मला आगगाडींत बसवून द्यावें इतकी व्यवस्था होऊन मला कोणत्याही प्रकारें अडचण बिलकूल पडली नाहीं. नंतर मी कलकत्याला गेलों. तेथील व्यापारी श्री. माडगांवकर स्टेशनवर आले होते व त्यांजकडे जाण्याचा माझा विचार होता; पण डॉ. नीलरत्न सरकार यांनीं आग्रह केल्यावरून मीं त्यांजकडे गेलों. कलकत्ता येथें माझी चांगलीच फजिती उडाली. तेथील सभेंत माझें व्याख्यान संपल्यावर अध्यक्षांनीं त्यावर डिबेट ( चर्चा ) सुरू करण्यासाठीं वक्त्यांना आव्हान केलें. एकामागून एक वक्ता स्त्रियांची युनिव्हर्सिटी होणें किती अशक्य आहे हें सिद्ध करूं लागला. एका मोठ्या सुशिक्षित वजन-

दार गृहस्थांनीं तर असे उद्गार काढले कीं, स्त्रियांना उच्च शिक्षण देणें म्हणजे त्यांना उंच टांचांचे बूट घालावयास लावून लोकांचें लक्ष वेधणारा पोषाक करून आपला दिमाख दाखवीत नाचरेपणा करण्यास उत्तेजन देणें होय. Flirting ( नखरेबाजी ) ह्या शब्दाचा उपयोग त्यांनीं केला होता. अशा प्रसंगाला तोंड देण्याला मी अगदीं निरुपयोगी मनुष्य आहें. माझ्याजवळ सांगायला तरी काय होतें ? मुख्य गोष्टी मीं व्याख्यानांत सांगितल्याच होत्या. सेनेट ठरवील तो अभ्यासक्रम अंमलांत येणार. आज निश्चित असें कांहींच नव्हतें. मीं स्वस्थपणें टीका ऐकली व उत्तर देण्याचा प्रयत्न न करतां अध्यक्षांनींहि माझ्या वेडेपणाला अनुलक्षूनच भाषण करून सभा बरखास्त केली. एक मात्र आशेचा किरण एका कोंपऱ्यांतून आला. मंडळी व्याख्यानाच्या जागेहून जात असतां सेंट पॉल्स क्रिश्चन मिशन कॉलेजांतील प्रो. एस्. पी. वसवानी हे गृहस्थ माझ्या टेबलाशीं आले व ही योजना आपल्याला पसंत असल्याचें सांगून त्यांनीं आपलें नांव पदवी-धरांचे संघांत दाखल केलें. मद्रास इलाख्यांतील सहा-सात ठिकाणीं व बंगलोर येथें फारच चांगली मदत मिळाली होती. कलकत्यांत तशी मिळाली नाहीं. परंतु आणखी दोन दिवस कलकत्त्यांत राहून कित्येक लोकांच्या मीं भेटी घेतल्या, व पदवीधर संघांत आठ व सामान्य संघांत चार नांवें दाखल करून मी पुन्हां अलाहाबादेस आलों. तेथें चांगलें काम झालें. नंतर दिल्ली, लाहोर व जलंदर इतक्या ठिकाणीं जाऊन मी पुण्याला परत आलों. लाहोर व जलंदर येथें चांगली सहानुभूति व मदत मिळाली. मतदार मिळविण्याचे कामीं कु. कृष्णाबाई ठाकूर ( आतां सौ. सरलाबाई नाईक ), श्रीमती वेणूबाई नामजोशी ( आतां सौ. जानकीबाई साठे ) व श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनीं फार चांगली मदत केली. कृष्णाबाईनीं मध्यहिंदुस्थानांतील इंदोर देवास वगैरे ठिकाणीं व मध्यप्रांतांतील खांडवा बऱ्हाणपूर वगैरे ठिकाणीं आणि मुंबई व गोंडळ येथें काम केलें. वेणूबाईनीं नागपूरकडील मध्यप्रांताचा भाग व वऱ्हाड या ठिकाणीं काम केलें. पार्वतीबाईनीं कर्नाटकांत आणि बेळगांव, धारवाड, हुबळी, गदग, बल्लारी व विजापूर ह्या ठिकाणीं काम केलें. एप्रिलचे आरंभाला हें काम पुरें झालें. सुमारें बाराशें मतदार मिळाले. ग्रॅजुएट होऊन ज्यांचीं दहा वर्षें झालीं असतील

अगर एम्. ए., पी एच्. डी. वगैरे उच्च पदव्या ज्यांना मिळाल्या असतील अशाच स्त्रीपुरुष मतदारांना सेनेटचे सभासद होतां येईल अशी अट होती. अशा प्रकारच्या २६४ स्त्रीपुरुषांनी सेनेटसाठीं उमेदवार होण्याचें कबूल केलें. त्यांची यादी मतदारांकडे पाठविण्यांत आली. आश्रमाचे वर्गणीदारांनीं तीस सभासद निवडावे व युनिव्हर्सिटीच्या मतदारांनीं तीस निवडावे असें ठरलें होतें. ह्या तिसांपैकीं चोवीस पदवीधर मतदारांनीं व ६ सामान्य संघाच्या मतदारांनीं निवडावयाचे होते. उमेदवारांची यादी सर्व मतदारांकडे पाठविण्यांत आली. ज्यांची वर्गणी एप्रील अखेरपर्यंत आलेली असेल त्यांचीच मतें धरलीं जातील अशी सूचना मतदारांस देण्यांत आली होती. ह्याप्रमाणें सुमारें ६०० मतदारांना मत देण्याचा हक्क होता. आश्रमाच्या ४५० वर्गणीदारांपैकीं ८८ नीं मतें पाठविलीं होतीं. ३५९ पदवीधर मतदारांपैकीं २४१ नीं व १७५ सामान्य संघाच्या मतदारांपैकीं ९७ मतदारांनीं मतें पाठविलीं होतीं. मताधिक्याप्रमाणें सेनेटच्या साठ सभासदांची निवड मे महिन्याच्या आरंभीं कायम झाली. त्यांत पांच स्त्रिया होत्या. सभासदांची प्रांतवारी येणेंप्रमाणें होतीः—पुणें २७, मुंबई ८, गुजराथ ५, मध्यहिंदुस्थान ३, पंजाब १, युनायटेड् प्रॉव्हिन्सेस् २, बंगाल १, मध्यप्रांत १, दक्षिण महाराष्ट्र ३, कर्नाटक १, म्हैसूर २ व मद्रास ६. प्रोव्हिजनल कमिटीनें सेनेटपुढें ठेवण्यासाठीं नियमावली तयार केली व प्रवेश परीक्षेचा आणि कॉलेजांतील पहिल्या वर्षाचा अभ्यासक्रम तयार केला; आणि सेनेटच्या सभासदांकडे पहिल्या सभेंतील कामांचें टिपण व त्यासंबंधाचे सर्व कागद पाठविण्यांत आले.

आतां दोन मोठ्या अडचणीचे प्रश्न सोडवावयाचे राहिले होते. चॅन्सेलर ( अध्यक्ष ), व व्हाइस-चॅन्सेलर ( उपाध्यक्ष ) च्या कामाला योग्य अशीं माणसें शोधून काढून तें काम त्यांनीं पतकरावें ह्यासाठीं त्यांचें मन वळविणें हें मोठें कठीण काम होतें. मतदार मिळविण्याच्या कामांत व द्रव्याची मदत मिळविण्याच्या कामांत कल्पनेबाहेर यश आलें होतें. तथापि ह्या कार्याशीं एकजीव झालेलीं माणसें फार थोडीं होतीं. ह्या कामांत अपयश येण्याचा पुष्कळ संभव आहे असें बऱ्याच जणांना वाटत होतें; व माझें मलाही वाटत होतें. अशा स्थितींत हीं कामें करण्याला योग्य माणसें मिळणें

सोपें नव्हतें. मे महिन्यांत डॉ. भांडारकर लोणावळ्यास हवेसाठीं गेलेले होते. मी व हरीभाऊ दिवेकर लोणावळ्यास त्यांजकडे गेलों व त्यांना चॅन्सेलर होण्याविषयीं विनंति केली. त्यांनीं थोडेसे आढेवेढे घेतले, परंतु अखेरीस आमची विनंति मान्य करून आम्हांला आनंदित केलें. आतां व्हाइस–चॅन्सेलरचा प्रश्न राहिला. सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीच्या वार्षिक सभेसाठीं ना. श्रीनिवास शास्त्री आलेले होते त्यांना विनंति करण्यासाठीं आम्हीं गेलों. त्यांनीं युक्तीनें डॉ. परांजपे यांजकडून ह्या कामाची कबुली मिळाविली. डॉ. परांजपे यांना प्रत्यक्ष विचारण्याचा धीर आम्हांस होईना. त्यांचा या कार्याला प्रथमतः विरोधच होता, म्हणून त्यांचें नांव मतदारसंघांत दाखल करण्यालाही मीं गेलों नाहीं. सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचे श्री. वझे यांना विनंति करण्यासाठीं मीं सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटींत गेलों होतों. तेथें बसलों असतां डॉ. परांजपे तेथें आले व मतदारांची नोंद केलेलें नोटबुक माझेजवळ पडलें होतें तें घेऊन वाचूं लागले. त्यांत मुंबई, पुणें व इतर ठिकाणचीं मिळून ९५ नांवें मतदार-संघांत दाखल झालेलीं होतीं. लागलेंच त्यांनीं ९६ वें आपलें नांव त्या नोटबुकांत लिहिलें. नांवासमोर ५०० रुपयांच्या देणगीचा आंकडा घातला. एका बाजूनें कार्याविषयीं सहानुभूति अगदीं थोडी पण दुसऱ्या बाजूनें मजविषयीं विशेष प्रेम अशा कात्रींत ते सांपडले होते. पुढें ठिक-ठिकाणच्या लोकांची चांगली मदत व सहानुभूति मिळालेली पाहून त्यांना बरें वाटलें असें दिसत होतें. पण व्हाइस चॅन्सेलरचें काम ते पतकरतील असें वाटलें नव्हतें. श्रीनिवास शास्त्र्यांनीं त्यांचें मन वळविलें व डॉ. भांडार-कर यांना वळविल्याबद्दल झालेल्या आनंदापेक्षांही आम्हांस अधिक आनंद झाला.

सेनेटची पहिली सभा ता. ३ व ४ जून १९१६ ह्या दिवशीं फर्ग्युसन कॉलेजांत भरली. ६० सभासदांपैकीं ४३ सभासद हजर होते. हजर सभा-सदांत मद्रासच्या मिसेस कझिन्स व ना. श्रीनिवास शास्त्री; नागपूरचे रा. ब. वामनराव कोल्हटकर; अलाहाबादचे प्रिन्सिपल बी. संजीवराव; बडोद्याचे एन्. के. दिक्षित व गोविंदराव सरदेसाई; बनारसचे पं. का. तेलंग; अहमदनगरचे रा. ब. ग. कृ. चितळे; सातारचे श्री. सी. ग. देवधर;

नाशिकचे श्री.रा.ग.प्रधान; व पुण्याचे सर रामकृष्ण भांडारकर, डॉ. परांजपे, नामदार बा. सी. कामत, श्री. न. चिं. केळकर वगैरे पुण्याचे बहुतेक सभासद हजर होते. सेनेटचें काम २ दिवस चाललें होतें. प्रथम प्रोव्हिजनल कमेटीचे अध्यक्ष या नात्यानें सभेला सुरुवात मीं करून दिली व डॉ. भांडारकर व डॉ. परांजपे यांची चॅन्सेलर व व्हाइस–चॅन्सेलरचे जागीं योजना होऊन, डॉ. भांडारकर यांचे अध्यक्षतेखालीं काम सुरू झालें. एकंदर तीन बैठकी होऊन सर्व कामांचा निकाल लागला. दुसऱ्या व तिसऱ्या बैठकीला डॉ. भांडारकर हजर नसल्यामुळें डॉ. परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं सर्व कामें झालीं. अकरा सभासदांची सिंडिकेट ( कार्यकारी कमेटी ) कायम करण्यांत आली व रजिस्ट्रारचें काम मजवरच सोंपविण्यांत आलें. अशा रीतीनें ता. ३ जून १९१६ रोजीं भारतवर्षीय महिलाविद्यापीठाला वेगळें अस्तित्व प्राप्त झालें. आणि प्रोव्हिजनल कमिटीचे सेक्रेटरी श्रीयुत गाडगीळ यांनीं आपले कामाचा चार्ज मजकडे दिला, व युनिव्हर्सिटी ही स्वतंत्र संस्था होऊन ती आश्रमापासून वेगळी झाली. श्री. गाडगीळ यांनीं प्रोव्हिजनल कमेटीच्या सेक्रेटरीचें काम फार चांगल्या रीतीनें केल्यामुळें महिलाविद्यापीठाला व्यवस्थित स्वरूप लवकर देतां आलें. विद्यापीठाची नियमावली तयार करण्याच्या कामीं व अभ्यासक्रम ठरविण्याच्या कामीं प्रो. केशवराव कानिटकर व हरिभाऊ लिमये यांची फार चांगली मदत झाली.

महिलाविद्यापीठाची कल्पना मनांत आल्यापासून तीन चार महिन्यांतच ती सामाजिक परिषदेंतून ता. ३० डिसेंबर १९१५ रोजीं लोकांपुढें ठेवण्यांत आली व नंतर पांच महिने व चार दिवस एवढ्या अल्पावधीतच त्या कल्पनेला मूर्त स्वरूप देतां आलें. स्वावलंबन व स्वाभिमान यांचीच कास धरून काम झाल्यामुळेंच इतक्या जलदीनें काम पार पडलें. सरकारची मान्यता मिळविण्याच्या नादाला जर आम्ही लागलों असतों तर ह्या कामाला आरंभच कधीं झाला नसता. पुण्याच्या युनिव्हर्सिटीचा प्रश्न आज कसा भिजत पडला आहे तो पहा ! दहा लाख प्राथमिक खर्च व तीन लाख वार्षिक खर्च एवढ्याची तजवीज करा व पुढें कामाला हात घाला असा सल्ला ह्या कामीं पुढाऱ्यांना मिळाला आहे. हल्लीं ह्या युनि-

व्हर्सिटीसंबंधानें संभाषणांत अगर लेखांत एक अक्षरही आढळून येत नाहीं. लुटुपुटीची कां होईना पण आमची युनिव्हर्सिटी अस्तित्वांत येऊन ती अकरा वर्षे चालली आहे व स्त्रियांच्या शिक्षणाचें थोडेंसें तरी कार्य करीत आहे. जेवीन तर तुपाशीं नाहीं तर उपाशीं असा सरकारी व सरकारी मान्यतेच्या कामांचा प्रकार आहे!

## प्रकरण पांचवें

### महिला-विद्यापीठाचीं पहिलीं चार वर्षें

तारीख ३ जून १९१६ रोजीं महिला-विद्यापीठाचा जन्म होऊन त्याच दिवशीं त्याचें यथाविधि नामकरणही झालें. स्वतंत्रपणें हायस्कूल व कॉलेज चालविण्याचें सामर्थ्य विद्यापीठाचे अंगीं नसल्यामुळें आश्रमाचे आश्रयानें चाललेला महिलाश्रम व त्याच्याच आश्रयाखालीं निघणारें कॉलेज ह्या संस्था पहिल्या सेनेटच्या सभेंतच युनिव्हर्सिटीला जोडून घेण्याचा ठराव झाला होता. आतां हें कॉलेज म्हणजे 'महिलापाठशाळा' सुरू करणें हें पहिलें काम होतें. आरंभीं पाठशाळेच्या प्रिन्सिपलचें काम मजवर सोंपविण्यांत आलें. मी तारीख ९ जून १९१६ रोजीं आपले सहीनें वर्तमानपत्रांतून जाहिरात प्रसिद्ध केली कीं ज्यांची कोणत्याही युनिव्हर्सिटीची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालेली असेल त्यांना पाठशाळेंत घेतलें जाईल. त्या जाहिरातींत विद्यापीठाची पहिली मॅट्रिक्युलेशन म्हणजे प्रवेशपरीक्षा ता० २६ जून १९१६ रोजीं महिलाश्रमांत घेण्यांत येईल व ज्यांनीं कोणत्या तरी हायस्कुलांत मॅट्रिक्युलेशनच्या वर्गांत एक वर्ष अभ्यास केलेला असेल अशाच विद्यार्थिनींना या परीक्षेला बसतां येईल असाही मजकूर होता. महिलाश्रमांतून चार विद्यार्थिनी या परीक्षेला बसल्या व त्या चारीहि पास झाल्या. शिवाय मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालेली एक विद्यार्थिनी रेवतीबाई केतकर (हल्लीं रेवतीबाई कर्वे) पाठशाळेंत आली. मिळून पांच विद्यार्थिनींचा पहिल्या वर्षाचा वर्ग ता. ५ जुलई १९१६ रोजीं सुरू करण्यांत आला. अशा रीतीनें विद्यापीठाच्या खऱ्या कामाला आरंभ झाला.

"सर्वारंभास्तंडुलप्रस्थमूलाः" द्रव्य मिळविल्यावांचून विद्यापीठाची प्रगति होणें अशक्य हें स्पष्ट दिसत होतें. हें काम मुख्यत्वेंकरून माझ्यावरच पडलें. तेव्हां प्रिन्सिपलचें काम श्री. पार्वतीबाई आठवले यांचे चिरंजीव श्री. नारायण महादेव आठवले यांजवर व रजिस्ट्रारचें काम श्रीयुत हरि रामचंद्र दिवेकर यांजवर सोंपवून मी लोकमत तयार करणें व द्रव्या-

जॅन करणें या कार्यासाठीं मोकळा झालों. मला विद्यापीठाचा ऑर्गनायझर नेमलें. तेव्हांपासून आजपर्यंत मी हेंच काम करीत आहें.

पहिल्या चार वर्षांत विद्यापीठाचें म्हणण्यासारखें पुढें पाऊल पडलें नाहीं. प्राथमिक शाळांतील शिक्षकिणी तयार करण्यासाठीं १९१७ च्या जूनमध्यें आश्रमाचे मंडळीचे आश्रयाखालीं अध्यापिका शाळा उघडण्यांत आली व ती विद्यापीठाला जोडण्यांत आली. अशा रीतीनें महिलाश्रम, अध्यापिकाशाळा व महिलापाठशाळा या तीन संस्था म्हणजेच विद्यापीठ अशी स्थिती होती. तथापि या चार वर्षांत विद्यापीठाच्या चार पदवीधर स्त्रिया बाहेर पडल्या. पुढील कोष्टकावरून चार वर्षांतल्या विद्यापीठाच्या प्रगतीची कल्पना होईल.

| वर्ष | महिलापाठशाळेंतील विद्यार्थिनींची संख्या व अध्यापिका शाळेंतील संख्या. | | विद्यापीठाकडून आश्रमाला मिळालेली मदत. | खर्च वजा जातां वर्षअखेर राहिलेली एकंदर शिल्लक. |
|---|---|---|---|---|
| १९१६ | म० ५ | अ० ० | ० | रु. ३१७७३-१०-११ |
| १९१७ | ,, १३ | ,, १८ | रु. ४००० | रु. ७३३९४-११-५ |
| १९१८ | ,, १६ | ,, १८ | रु. ६००० | रु. ११६३८७-११-२ |
| १९१९ | ,, १७ | ,, ३८ | रु. ७००० | रु. १८९८३१-५-२ |
| १९२० जून अ. | ,, १७ | ,, ३८ | रु.८३४३-६-२ | रु. २१६०४१-१०-५ |

प्रत्येक वर्षी दाखविलेल्या शिलकेंत ३॥ टक्यांच्या प्रॉमिसरी नोटांच्या दर्शनी किंमतीचा बराच मोठा आंकडा आहे.

ह्या चार वर्षांत द्रव्याची मदत चांगलीच मिळाली असें वरील कोष्ट-कावरून लक्षांत येईल. ह्यांत दोन तीन देणग्यांचा उल्लेख विशेष रीतीनें करणें जरूर आहे. त्या मोठ्या म्हणून नव्हे पण विशेष प्रकारच्या सहानु-भूतीनें केलेल्या म्हणून त्यांची किंमत करितांना वेगळी कसोटी लाविली पाहिजे.

बाबू शिवप्रसाद गुप्त यांची आरंभीं मदत फार चांगली झाली. स्त्रियांची युनिव्हर्सिटी निघाली हें वर्तमानपत्रांतून वाचल्याबरोबर त्यांनीं पांचशें रुपयांचा चेक पाठविला. ह्यानंतर त्यांजकडून दरवर्षी जानेवारीच्या पहिल्या दुसऱ्या तारखेस ५०० रुपयांचा चेक यावयाचा. हा चेक ज्या शहरीं राष्ट्रीय सभेची बैठक असेल तेथून यावयाचा, व तो हिंदी मार्षेत लिहिलेला असून त्याखालीं हिंदींतच त्यांची सही केलेली असावयाची. अशा रीतीनें एकंदर तीन हजार रुपये त्यांजकडून आलेले आहेत. नंतर त्यांजकडून मदत मिळण्याचें बंद झालें. त्याचें कारण त्यांनीं सुमारें आपली दहालाखांची जिंदगी, 'काशी विद्यापीठ' ह्या नांवाचें राष्ट्रीय विद्यापीठ बनारस येथें स्थापन करण्यासाठीं दिली हें होय. हें विद्यापीठ पाहण्याची मला गेल्या डिसेंबर महिन्यांत संधि मिळाली. बनारस येथें गेलों असतां मला रिकाम्या हातांनीं परत पाठविणें बरें नव्हे हें जाणून त्यांनीं आपल्या पत्नी-कडून १५१ रुपयांची देणगी देवविली व इतर लोकांकडूनही थोडीशी मदत मिळवून दिली. ह्या गोष्टींवरून बाबू शिवप्रसाद ह्यांच्या मनोभूमि-केची कल्पना होईल.

सर वुइल्यम वेडर बर्न यांच्याशीं पत्रव्यवहार करण्याला एक अनपेक्षित कारण घडून आलें. माऊंट एव्हरेस्ट हें नांव ज्या गृहस्थांच्या नांवावरून हिमालयाच्या अत्युच्च शिखराला मिळालें, त्यांची कन्या मिस् एथेल एव्ह-रेस्ट हिनें आपल्या इस्टेटीचें मृत्युपत्र केलें. त्यांत कांहीं विशिष्ट देणग्या देऊन उरलेल्या द्रव्याचा विनियोग हल्लीं अस्तित्वांत नसलेल्या हिंदुस्थानां-तल्या हिंदी लोकांनीं चालविलेल्या एखाद्या स्वतंत्र शिक्षणसंस्थेला मदत करण्याचें कामीं व्हावा किंवा तशी संस्था मृत्युपत्राची व्यवस्था करणाऱ्या मंडळीस न दिसल्यास तशी निराळी संस्था काढावी असा उल्लेख केला होता. हें मृत्युपत्र १९१२ सालीं लिहिलें व पुढें ती मरण पावली. सदर

मृत्युपत्रांतला हा भाग हिंदुस्थानांतल्या कांहीं वर्तमानपत्रांत १९१६ च्या च्या जून महिन्याच्या सुमारास छापला गेला व तो कोणी तरी माझे नजरेस आणला. आमचे पांच मुलींचें कॉलेज लवकरच सुरू व्हावयाचें होतें, व वरील अटी आमचे संस्थेस लागू पडत होत्या. तेव्हां आपण यत्न करून पहावा असें मनांत आलें. सर वुइल्यम यांचें हिंदुस्थानावर विशेष प्रेम आहे हें मला माहीत होतें. पण त्यांची प्रत्यक्ष किंवा पत्रद्वारेंही ओळख झालेली नव्हती. सर्व्हंट ऑफ् इंडिया सोसायटींतून त्यांचा पत्ता आणवून मीं त्यांस एक पत्र लिहिलें व त्यांजकडे अनाथबालिकाश्रमाचे ( Widow's Home ) रिपोर्ट व विद्यापीठासंबंधानें काढलेलीं विनंतिपत्रें वगैरे कागदही पाठविले, व त्या मृत्युपत्राच्या व्यवस्थापकांकडे चौकशी करून आमचा अर्ज त्यांजकडे गुदरण्याविषयीं विनंती केली. चौकशीनंतर त्यांनीं असें कळविलें कीं लढाईमुळें सगळया सरकारी व खाजगी रोख्यांचे भाव फारच कमी झालेले आहेत; व त्यामुळें मिस् एव्हरेस्ट यांनीं ज्या विशिष्ट देणग्या देण्याविषयीं मृत्युपत्रांत लिहिलें आहे त्या पुरे पडण्याइतकाही पैसा तिच्या इस्टेटींतून निघत नाहीं, तेव्हां अवशेष राहण्याची गोष्टच बोलण्यास नको. जर पूर्वीची स्थिती कायम असती तर दीडपासून दोन लाख रुपये हिंदुस्थानच्या वांट्याला आले असते. रॉय्टरनें हिंदुस्थानांत पाठविले त्या तारेंत १४००० पौंड हिंदुस्थानांत अशा कॉलेजासाठीं ठेविले आहेत असा उल्लेख केला होता. सदर तार " इंडिया " पत्रांत छापली होती पण सर वुइल्यम ह्यांनीं 'मृत्युपत्रांत रक्कम लिहिली नव्हती तरी पण उरलेल्या पैशाचा विनियोग तसा करण्याबद्दल लिहिलें आहे' अशी हकीकत 'इंडिया पत्रांत' प्रसिद्ध केली. त्याचवेळीं फर्ग्युसन कॉलेजनें व महिलाविद्यापीठानें आपल्या मार्फत चौकशी केली वगैरेबद्दल उल्लेख केला आहे. हें पत्र २८–७–१६ च्या ' इंडिया ' मध्यें छापलें आहे.

त्यांना विनंति केल्याप्रमाणें हें काम तर त्यांनीं केलेंच. पण तेवढ्यावर ते थांबले नाहींत. आमच्या कामाबद्दल विशेष प्रकारचें प्रेम त्यांचे मनांत उत्पन्न झालें. सर्व रिपोर्ट वगैरे वाचून, आश्रमापासून स्त्रियांचे युनिव्हर्सिटीचा आरंभ कसा झाला ह्याबद्दल त्यांनीं दोन लेख लिहिले. एक त्यावेळीं लंडन येथें चालू असलेल्या इंडिया नांवाच्या आठवड्याच्या वर्त-

मानपत्रांत व दुसरा *Jus Suffraji* नांवाच्या सफ्रेजिस्टांच्या वर्तमानपत्रांत स्वतःचें कामसुद्धां मनुष्य जितक्या काळजीनें करणार नाहीं तितक्या काळजीनें केलेलें हें काम पाहून त्या गृहस्थांबद्दल विशेष आदर माझ्या अन्तःकरणांत उत्पन्न झाला. त्यांच्या पत्रांतून कांहीं उतारे येथें देणें इष्ट वाटतें:—

"I have read with the greatest interest and sympathy the printed papers you have sent me and you may rest assured that I will do all I can to help your valuable undertaking.

( 19th July 1916 )."

" आपण पाठविलेले सर्व कागद मी मोठ्या आस्थेनें व सहानुभूतिपूर्वक वाचून पाहिले आहेत; आपण अंगीकारिलेल्या या बहुमोल कार्याला मला जी जी मदत करतां येईल ती ती मी करीन अशी आपली खात्री असू द्या. ( १९ जुलै १९१६ ) "

" Since writing to you I have a letter from Mr. Pickering in reply to my letter to the Trustees under Miss Everest's will. It is disappointing. He says that owing to the war the value of investments has depreciated, and he fears that there will be little or no residue for the Indian benefaction, at any rate for sometime to come.

" Please see this week's India to which I have addressed a letter explaining the situation. I have taken the opportunity to give British sympathisers a brief account of your several activities on behalf of Indian women.

"As I should like to be associated with the incepton of the independent Poona movement for the higher education of Indian women, please accept enclosed cheque for Rs. 300– to be applied in such way as you may consider most useful. (25th July, 1916)"

" मी आपणांस मागील पत्र लिहिल्यानंतर मि. पिकरिंग यांजकडून मला एक पत्र आलें आहे. तें पत्र मी मिस् एव्हरेस्टच्या मृत्युपत्राच्या ट्रस्टींना लिहिलेल्या पत्राचें उत्तर असून तें बरेंच निराशाजनक आहे. त्यांत ते लिहितात कीं युद्धामुळें रोख्यांचे भाव उतरले आहेत व त्यामुळें

हिंदुस्थानाला द्यावयाच्या देणगीकरितां, कांहीं काळपर्यंत तरी निदान, कांहीं एक बाकी रहावयाची नाहीं व राहिलीच तर ती अत्यंत अल्प असेल.

" 'इंडिया' वृत्तपत्राचा ह्या आठवड्याचा अंक आपण कृपाकरून पहावा. मी त्यांत पत्र लिहिलें असून त्यांत एकंदर परिस्थिति स्पष्ट करून दाखविली आहे व या प्रसंगानेंच आपण हिंदी स्त्रियांच्या उन्नतीकरितां ज्या ज्या चळवळी करीत आहां त्यांचीं त्रोटक हकीकत इंग्लंडमध्यें असणाऱ्या हितचिंतकांकरितां दिलेली आहे.

" हिंदी स्त्रियांच्या उच्च शिक्षणाच्या ज्या चळवळीस पुण्यांत स्वतंत्र-पणें सुरुवात झाली आहे तिच्याशीं माझा संबंध असावा असें वाटल्यावरून मी सोबत तीनशें रुपयांचा चेक पाठवीत आहें, त्याचा अवश्य स्वीकार करून त्याचा तुम्हांस योग्य वाटेल तो विनियोग करावा (२५जुलै १९१६)"

I was also particularly interested to receive the little illustra ted pamphlet coniainting the history of the Widows' Home. I have been reading it aloud to Lady Wedderburn who much appreciates your work. (13th September 1916)."

" अनाथबालिकाश्रमाच्या इतिहासाचें एक छोटेंसें पुस्तक मिळालें तें मी आस्थेनें पाहिलें. लेडी वेडरबर्न यांना तें मी वाचून दाखवीत आहें. आपलें कार्य त्यांच्या फार पसंतीस उतरलें आहे."

" I hope that you duly received copy of 'Jus Suffraji' in which I wrote an article on Indian Women's University. It was written at the request of Mrs. Henry Fawcett, and marked copies were sent to a number of influential people here and in India, inclu ding Lords Morley, Bryce, and Reay the Viceroy and Governors of Bengal, Madras and Bombay. (13th September, 1916)"

" ' जस सफ्रेजी ' पत्राचा अंक आपणास मिळालाच असेल. मिसेस हेन्री फॉसेट यांच्या विनंतीवरून त्यांत मी भारत-वर्षीय-महिला-विद्यापीठा-वर एक लेख लिहिला आहे. त्या अंकाच्या प्रती लेखावर खुणा करून येथील व हिंदुस्थानांतील बऱ्याच वजनदार गृहस्थांकडे पाठविण्यांत आल्या असून त्यांत, लार्ड मोर्ले, लार्ड ब्राइस, लार्ड रे, तसेंच हिन्दुस्थानचे

व्हाइसरॉय आणि मुंबई, मद्रास व बंगाल या इलाख्यांचे गव्हर्नर या सर्वांचा समावेश केला आहे. ( १३ सप्टेंबर १९१६ ) ",

माझ्या एका मित्राला स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची कल्पना आवडली नाहीं. युनिव्हर्सिटी निघण्याच्या सुमारासच सरकारनें स्त्रियांच्या शिक्षणासंबंधानें पुढारी गृहस्थांचीं मतें मागविलीं होतीं. त्यासंबंधानें माझ्या मित्रानें २५ जून १९१६ तारखेचें, म्हणजे युनिव्हर्सिटी निघाल्यावर तीन आठवड्यांनीं, सरकारकडे पत्र पाठवून आपलीं मतें कळविलीं होतीं. सदर पत्राची नक्कल सर वुइल्यमशीं त्यांचा पत्रव्यवहार असल्यामुळें त्यांजकडे त्यांनीं पाठवून दिली. त्यासंबंधाचें उत्तर त्यांनीं माझ्या मित्राला पाठविलें; व तें त्यांचें उत्तर माझ्या मित्रानें माझ्याकडे अवलोकनार्थ पाठविलें. त्यांतील कांहीं भाग येथें देतों:—

"I confess that my sympathies are with Professor Karve's gallant attempt to found a Women's University. It may be a forlorn hope, but no great stronghold is taken without such an attack, and as the attempt is being made, I would gladly see it supported by all enlightened friends of Women's Higher education. ( 24th September, 1916 ). "

" प्रो. कर्वे यांनीं स्त्रियांसाठीं विश्वविद्यालय काढण्याचा जो धडाडीचा प्रयत्न सुरू केला आहे त्याला माझी पूर्ण सहानुभूति आहे असें मीं कबूल करतों. त्यांच्या आशेला विशेष आधार नसेल परंतु कोणताही मजबूत किल्ला अशा हल्ल्याशिवाय काबीज करतां येत नाहीं. आणि ज्या अर्थी अशा प्रयत्नाला सुरुवात होत आहे त्या अर्थी त्याला स्त्रियांच्या उच्च शिक्षणाविषयीं आस्था बाळगणारे सर्व सुसंस्कृत लोक साहाय्य करतील तर मला आनंद होईल. "

सर वुइल्यम वेडरबर्न यांनीं 'इंडियाबेनिफिट् फंड' काढलेला होता. त्यांच्या पश्चात् त्यांचे मित्र एच्. एस्. एल्. पोलक यांनीं त्या फंडाची व्यवस्था लाविली. त्यावेळीं आश्रमाला दीडशें पौंड व महिला विद्यापीठाला १०० पौंड देण्यांत आले.

डॉ. लांडे यांची देणगी त्यांना भूषणास्पद व माझ्यासारख्या काम करणाराला अत्यंत उत्तेजनकारक आहे. मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेचा अभ्यास पुरा करण्यालाहि जवळ पैसे नाहींत म्हणून यांना सातव्या इयत्तेतूनच हॉस्पिटल-असिस्टंटच्या वर्गांत जावें लागलें. पुढें सरकारी नोकरींत दाखल होऊन संधि येतांच त्यांनीं आफ्रिकेंत बदली करून घेतली. अखेरीस ते युगांडा प्रांतांतील जिंजा शहरीं होते. त्यांनीं आपली विधवा भाची आश्रमांत शिकण्यास ठेविली होती व ते एकदां आश्रम पाहून गेले होते. जून १९१६ मध्यें विद्यापीठ सुरू झालें व मार्च १९१७ मध्यें ते परलोकवासी झाले. ह्यावेळीं युनिव्हर्सिटीचें मनांत भरण्यासारखें काम मुळींच झालें नव्हतें. डॉ. लांडे यांनीं वर्तमानपत्रांतून व मासिकांतून या विद्यापीठाबद्दल कांहीं वाचलेलें होतें एवढेंच. २५ मार्च १९१७ रोजीं मृत्युपत्र झाल्यानंतर ता० ३० मार्च १९१७ रोजीं ते वारले. मृत्युपत्रांत,

"Trustees of Karve Female University (or whatever be the name of the Institution at Poona, India) will be my trustees in India."

" 'कर्वे फीमेल युनिव्हर्सिटीचे' (किंवा हिंदुस्थानांत पुणें शहरीं असलेल्या या संस्थेचें जें नांव असेल त्या नांवाच्या संस्थेचे) ट्रस्टी हे माझे हिंदुस्थानांतील ट्रस्टी होत." असा उल्लेख होता.

ह्या मृत्युपत्राप्रमाणें पैसे हातीं येण्याला अनेक अडचणी होत्या. युगांडा मधील वारसासंबंधीं कायद्याचें १०५ कलम येणेंप्रमाणें आहे:—

Cluase 105 of the Uganda Succession Ordinance is: "No man having a nephew or niece or any nearer relative shall have power to bequeath any property to religious or charitable uses, except by will executed not less than 12 months before his death and deposited within six months from its execution in some place provided by law for the Safe Custody of the wills of living persons.'

" धर्माच्या अगर परोपकाराच्या कामीं आपल्या मागें आपल्या मालमत्तेचा उपयोग व्हावा असें एखाद्यास वाटत असल्यास व पुतण्या किंवा

पुतणी किंवा भाचा किंवा भाची अथवा त्याहून जवळचा असा एखादा त्याचा नातेवाईक जिवंत असल्यास मरणापूर्वी निदान बारामहिने त्यासंबंधींचें मृत्युपत्र करून तें केल्यानंतर सहामहिन्यांचे आंत तें कायद्यानें सांगितलेल्या योग्य अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केलें गेलें असलें पाहिजे."

युगांडाच्या हायकोर्टानें तेथील ट्रस्टींना प्रोबेट देतांनाच पुढील अट घातली:—

"Leave to send the money to the trustees in India is given on Mr. Home (तेथील ट्रस्टींचे वकील) undertaking to inform the trustees, the wives and nephew that payment of the legacies to charitable institutions in this case is contrary to Section 105 of the Uganda Succession Ordinance 1905."

"मृत्युपत्रांत नोंदून ठेविलेल्या देणग्या धर्मादाय संस्थांना देणें हें युगांडा मधील वारसासंबंधींच्या १९०५ सालीं झालेल्या १०५ कलमाचे अन्वयें कायदेशीर रीतीनें बंधनकारक होत नाहीं ही गोष्ट डा. लांडे यांच्या मृत्युपत्राचे ट्रस्टी, त्यांच्या पत्नी, व त्यांचा भाचा यांना कळविण्याचें मि. होम यांनीं पतकरल्यावरून हिंदुस्थानांतील ट्रस्टींकडे पैसे पाठविण्याची परवानगी देण्यांत येत आहे."

आफ्रिकेंतील ट्रस्टींनीं ४०००० रुपये आमचेकडे पाठविले. डॉ. लांडे यांच्या मृत्युपत्राप्रमाणें व्यवस्था व्हावयाची होती. डॉ. लांडे यांची आई, त्यांच्या दोघी बायका किंवा भाचा यांनीं जर हरकत घेतली असती तर विद्यापीठाला अगर इतर संस्थांना कांहींएक फायदा झाला नसता. त्यांची आई व दोघी बायका यांना भेटण्यासाठीं मी नागपूर, वर्धा व अहमदनगर या ठिकाणीं जाऊन प्रत्येकांची भेट घेतली. त्यांनीं मोठ्या खुशीनें आपला सर्व हक्क सोडण्याचें कबूल केलें, व त्याप्रमाणें स्टँपवर सोडचिठी करून दिली. ती ठिकठिकाणच्या सबरजिस्ट्रारांकडे नोंदण्यांत आली व या सोडचिठ्या मुंबईच्या हायकोर्टांत दाखल झाल्यानंतर ट्रस्टींना प्रोबेट मिळालें व येथल्याही सर्व इस्टेटीची व्यवस्था लागून मृत्युपत्राप्रमाणें वांटणी झाली. त्यांच्या मृत्युपत्राप्रमाणें पैसाफंडाला रु० २०००, डिप्रेस्ड क्लास मिशनला २०००, नेटिव्ह इन्स्टिटयूशनला ३०००, व नडियादच्या

अनाथाश्रमास ५०० याप्रमाणें देणग्या देण्यांत आल्या. शिवाय त्यांचे मातोश्रीस ३०००, वडील बायकोस २००० व बहिणीस ५०० रुपये देण्यांत आले. आणि धाकट्या बायकोस ती तीस वर्षांची होईल तेव्हां २००० द्यावयाचे आहेत. ह्याशिवाय त्यांचे मातोश्रीला दरमहा २५,व प्रत्येक बायकोला दरमहा ३० याप्रमाणें त्यांच्या त्यांच्या हयातींत द्यावयाचे आहेत. आतांपर्यंत डॉ. लांडे यांचे मिळकतींतून २६७४९–२–३ इतकी रक्कम पुणें शहरांतील नाथीबाई कन्याशाळेसाठीं जी 'विठ्ठल राघोबा लांडे' इमारत झाली आहे तिचे खर्चाकडे देण्यासाठीं मिळालेली आहे व त्या ट्रस्टपैकीं १५८१४–९–१० येवढी रक्कम प्रॉमिसरी नोटांच्या वगैरे स्वरूपांत वेगळी ठेवलेली आहे.

विद्यापीठाच्या अगदीं बाल्यावस्थेंतही ही अकल्पित देणगी अनेक अडचणींतून पदरांत पडली ह्यामुळें मला विशेषच आनंद झाला. ज्यांच्याजवळ अलोट संपत्ति असते त्यांनीं मोठमोठ्या देणग्या दिल्या तर त्यांत विशेष आश्चर्य नाहीं. पण मध्यम स्थितींतल्या माणसानें आपल्या कष्टानें मिळविलेल्या बऱ्याच मोठ्या मिळकतीचा सुमारें चार पंचमांश भाग लोकोपयोगी संस्थांस वाटून द्यावा ही खरोखर मोठी अभिमानास्पद गोष्ट आहे.

विद्यापीठाचें कार्यक्षेत्र वाढलें तर पहावें म्हणून अहमदाबादेस चाललेलें महिला–विद्यालय विद्यापीठास जोडण्याचा प्रयत्न करण्यासाठीं मीं तेथें गेलों. त्या विद्यालयाच्या व्यवस्थापक मंडळीच्या सभासदांना व्यक्तिशः व एका ठिकाणीं भेटलों, व ह्या संबंधानें चर्चा केली. तेथील मंडळींना त्यांची शाळा विद्यापीठाला जोडणें आवडलें नाहीं. सरकारी अभ्यासक्रमापेक्षां वेगळा अभ्यासक्रम त्यांनींहि ठरविला होता. मॅट्रिक्युलेशनच्या बरोबरीची शालान्त परीक्षा घेण्याचें त्यांनीं योजिलें व आपलें काम स्वतंत्रपणें चालविण्याचें ठरविलें. अहमदाबादेस यश आलें असतें तर सुरतेस जाऊन तेथल्या महिला–विद्यालयाच्या चालकांना तशीच विनंति केली असती. परंतु तेथें अपयश आल्यामुळें सुरतेस जाण्याचा विचार रद्द केला.

जालंदर कन्यामहाविद्यालयासंबंधानेंही प्रयत्न करावासा वाटला. १९१८ सालीं पंजाबांत प्रचारासाठीं व वर्गणीसाठीं फिरत असतां तेथील कन्या–महाविद्यालयाचे उत्पादक व प्रवर्तक लाला देवराज ह्यांजकडेच उतरलों होतों.

त्यावेळीं संस्थेचा उत्सव असल्यामुळें सौ. सरोजिनी नायडूहि तेथें आल्या होत्या. त्यांच्या अध्यक्षतेखालीं माझें व्याख्यान झालें व 'तुम्हीं पंजाबांत स्त्रियांची वेगळी युनिव्हर्सिटी तरी काढा नाहींतर कन्या महाविद्यालय आमच्या युनिव्हर्सिटीस जोडून द्या' अशा प्रकारचे विचार मी प्रदर्शित केले व ते मिसेस् नायडू यांनाही पसंत पडले परंतु तशी कांहीं गोष्ट घडून आली नाहीं.

वर्षांतून सात आठ महिने तरी ह्या नवीन कल्पनेच्या प्रचारासाठीं व वर्गणीसाठीं हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागांत मी हिंडत असें. ५ जानेवारी १९२०चें विद्यापीठाच्या हकीकतीचें विनंतिपत्र छापलेलें आहे. त्यांत ज्या ठिकाणीं मी वर्गणीसाठीं गेलों त्या ठिकाणांची यादी देण्यांत आली आहे. ती जशीच्या तशीच येथें देत आहें. तिजवरून माझ्या प्रवासाची कल्पना होईल.

## स्थळांची यादीः—

डेक्कनः—सोलापूर, सातारा, वांई, नाशिक, सिन्नर, मालेगांव, पिंपळगांव बसवंत, जळगांव, भुसावळ, यावल, अहमदनगर, येवलें, चाळिसगांव, धुळें, अमळनेर, सासवड, भोर, भाटगर, शिरवळ, जुन्नर आणि खेड.

कोंकणः—कल्याण, भिवंडी, ठाणें, वसई, पनवेल, उरण, अलिबाग, महाड, दापोली, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, राजापूर, देवगड, मालवण, वेंगुर्लें आणि शिरोडा.


कर्नाटकः—बेळगांव, धारवाड, हुबळी, कुंदगोळ, गदग, बागलकोट, मुद्देबिहाळ, विजापूर आणि कारवार.

वऱ्हाडः—उमरावती, अकोलें, यवतमाळ, एलिचपूर, मूर्तिजापूर, कारंजा, शेगांव, खामगांव, मलकापूर, बुलढाणा, आणि वणी.


मध्यप्रांतः—नागपूर, वर्धा, बऱ्हाणपूर, खांडवा, आर्वी, हिंगणघाट, वरोरा, चांदा, भंडारा, हुषंगाबाद, इटार्सी, सोहागपूर, गादरवाडा, नरसिंगपूर, जबलपूर, सिहोरा, कटणी, दमोह, सागर, खुरई, हर्दा, आणि टेंभुर्णी.

बडोदें संस्थानः—बडोदें, पेटलाद, मेहसाणा, विसनगर, वडनगर पाटण, आणि अमरेळी.

उत्तर गुजराथेंतील संस्थानेंः—पालनपूर आणि सिधपूर.



प. वा. शेट विठ्ठलदास ठाकरसी.



प. वा. डा. विठ्ठल राघोबा लाड.

गुजराथः—बलसार, सुरत, भडोच, आनंद, नडिआद, खेडा, अमदाबाद, गोध्रा आणि दोहद.

काठेवाडः—लिंबडी, भावनगर, वडिया, जेतपूर, जुनागड, गोंडळ, राजकोट, जामनगर, वांकानेर आणि ध्रांगध्रा.

मध्य हिंदुस्थानः—मह्र, धार, देवास, रतलाम, उज्जन, भोपाळ, सेहोर, नरसिंहगड, ब्यावरा, राजगड.

इंदूर संस्थानः—इंदूर, बढवाई, मंडलेश्वर, महेश्वर, सनावद, खरगोण, महिदपूर, गरोठ, रामपुरा, कन्नोद आणि खातेगांव.

राजपुतानाः—झालरापाटण.

म्हैसूर संस्थानः—नंजनगुड, म्हैसूर, श्रीरंगपट्टण, फ्रेंच रॉक्स, चेन्नापटन, बंगलोर, तुमकुर, मद्दिगेरी, हासन, होले–नरसीपूर, चिकमगळूर, शिमोगा, सागर आणि तीर्थह्ली.

मद्रास इलाखाः—मद्रास, तंजावर, कुंभकोनम्, मदुरा, त्रिचनापल्ली, सेलम, विजगापट्टण, राजमहेंद्री आणि बऱ्हामपूर.

बंगालः—कलकत्ता.

संयुक्त प्रांतः—बनारस, अलहाबाद आणि आग्रा.

पंजाबः—पेशावर, रावळपिंडी, जेलम, गुजरात, सिआलकोट, गुजराणवाला, लाहोर, अमृतसर, फेरोझपूर, जलंदर, होशिआरपूर, अंबाला आणि दिल्ली.

सिंधः—कराची, हैदराबाद, सक्कर, रोहरी, शिकारपूर आणि लारखाना.

पोर्तुगीज प्रांतः—पणजी, म्हापसें आणि पेडणें.

हिंदुस्तानांतील लहान संस्थानेंः—इचलकरंजी, मुरूड (जंजिरा), सावंतवाडी, कुडाळ आणि भोर.

पहिल्या चार वर्षांत विद्यापीठाच्या कामाला कल्पनेबाहेर यश आलें. इतकें द्रव्यसहाय्य मिळेल हें माझ्या स्वप्नींही आलें नव्हतें. आमच्या परीक्षांना सरकारची मान्यता नाहीं यामुळें महिलाश्रमांतल्या कांहीं विद्यार्थिनी हुजूरपागेंत गेल्या. अशा स्थितींतही कॉलेजाला एवढ्यातरी विद्यार्थिनी मिळाल्या ही गोष्ट समाधान मानण्यासारखीच होती.

# प्रकरण सहावें

## सर विठ्ठलदास ठाकरसी यांची अनपेक्षित उदार देणगी.

सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या मनांत आमच्या युनिव्हर्सिटीविषयीं विशेष प्रकारचें प्रेम उत्पन्न होण्याला जें कारण घडलें तें अनपेक्षित गोष्टींपैकींच होय. विठ्ठलदासांनीं आपल्या मातुःश्रींच्या नांवानें स्कॉलर्शिपा देण्यासाठीं दरसाल हजार रुपये आश्रमाला द्यावे हा क्रम सुरू होऊन दोन वर्षें झालीं होतीं. त्यावेळीं युनिव्हर्सिटीला मदत मागण्यासाठीं मी त्यांजकडे गेलों होतों व त्यांनीं एक हजार रुपये दिले होते. पुढें सर विठ्ठलदास, सर विश्वेश्वर अय्या, शेट मुळराज खटाव व आणखी दोनतीन गृहस्थ ही मंडळी पृथ्वीप्रदक्षिणेसाठीं निघाली तेव्हां लेडी ठाकरसी व आणखी दोन स्त्रिया त्यांजबरोबर होत्या. सर विठ्ठलदास ह्यांनीं तुमचे कॉलेजांतील कोणी हुशार बाई चांगली इंग्रजी जाणणारी आमचेबरोबर येण्यास तयार असेल तर तिला लेडी ठाकरसींची सहचरी म्हणून आम्ही बरोबर नेऊं असें मला सांगितलें होतें. श्रीमती सीताबाई अण्णिगेरी ह्या त्यावेळीं कॉलेजांत शिकत होत्या, त्या जाण्यास तयार झाल्या, व त्यांना घेऊन मी ठाकरसींकडे गेलों. थोडेसें बोलणें झाल्यावर त्यांनीं त्यांना दोन दिवस घरीं राहण्यासाठीं बोलाविलें व त्यांचा उपयोग होईल असें पाहून त्यांनीं त्यांना बरोबर घेतलें व सर्व मंडळी चीन देशांतून जपानांत गेली आणि तेथें त्यांनीं टोकियो येथें स्त्रियांचे युनिव्हर्सिटीस भेट दिली. ही गोष्ट १९१९ सालीं घडली. तेथें सतराशें विद्यार्थिनी त्या युनिव्हर्सिटीच्या शाळांतून व कॉलेजांतून शिकत होत्या व सातशें विद्यार्थिनी युनिव्हर्सिटीला जोडलेल्या वसतिगृहांत राहून त्या युनिव्हर्सिटींतील शिक्षणाचा लाभ घेत होत्या. आपल्याकडील शिक्षण बहुधा पुस्तकीविद्येच्या स्वरूपाचें असतें. तेथें बागबगीचा बनविणें, शास्त्रीय पद्धतीनें कपडे धुणें, स्वयंपाक करणें व खोल्यांची व्यवस्था राखणें हे विषय विद्यार्थिनींकडून प्रत्यक्ष कामें करवून घेऊन शिकविण्यांत येत होते. तेथील सर्व व्यवस्था पाहून ठाकरसींचे मनावर फारच परिणाम झाला. अशा प्रकारची युनिव्हर्सिटी हिंदुस्थानांत असावी असे विचार त्यांचे मनांत खेळूं लागले. पुढें जपानांतून अमेरिकेस जात असतां वाटेंत आगबोटीवर गप्पा गोष्टींना पुष्कळ वेळ

असे. तक्तपोशीवर सर्व मंडळीं एकत्र बसून कधीं कधीं तासांचे तास नाना प्रकारच्या संभाषणांत घालवीत असत. पुष्कळ वेळां स्त्रियांच्या शिक्षणाचा व स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचा प्रश्न निघे, तेव्हां सीताबाईंना अनेक प्रश्न विचारले जात. स्वार्थत्यागानें काम करणारीं हिंगण्यास कोण कोण मंडळी आहेत, समाजांतील कोणत्या दर्जाच्या विद्यार्थिनी तेथें येत असतात, सकाळपासून संध्याकाळपर्यंतचा कार्यक्रम काय असतो वगैरे अनेक प्रश्नांची उत्तरें सीताबाईंना द्यावीं लागत. याचाही परिणाम ठाकरसींच्या मनावर फार झाला. सीताबाई त्यांचे बरोबर नऊ महिने होत्या त्या मुदतींतल्या त्यांच्या वर्तनानें ठाकरसी खूष होऊन गेले. कधीं कधीं आचारी आजारी पडला तर सीताबाईंनीं पुढें होऊन कामाला मान वांकवावी व अडचण भासूं देऊं नये. केव्हां केव्हां स्थानिक प्रमुख माणसांना मेजवानी देण्याचा प्रसंग आला तर आपलेकडील पक्वान्नें सीताबाईंनीं तयार करावीं व परदेशी माणसांना इकडील परी दाखवून प्रसंग उत्तम रितीनें साजरा होईल असें करावें. जपानांतील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीसारखी युनिव्हर्सिटी आपल्या देशांत असावी असे ठाकरसींचे विचार बळावत चालले होते व सीताबाईंच्या कर्तबगारीनें त्या विचारांना पुष्टि मिळाली. सीताबाई अण्णिगेरी ह्या अनाथ बालिकाश्रमाच्या मंडळीच्या आजन्मसेविका आहेत. ठाकरसींनीं त्यांचा कपड्यालत्त्याचा वगैरे सर्व खर्च संभाळून परत आल्यावर त्यांना पांचशें रुपयांचा चेक दिला. आरंभीं त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारचा करार केलेला नव्हता. त्यांनीं परत आल्यावर आपला कॉलेजांतील अभ्यास पुरा करून जी. ए. ची पदवी मिळविली व आतां त्या मुंबईतील नाथीबाई कन्याशाळेच्या मुख्य अध्यापिका झाल्या आहेत.

ठाकरसी परत आले तेव्हां त्यांना व सीताबाईंना भेटण्यासाठीं मी मुंबईस गेलों होतों व आगबोटींतून उतरल्याबरोबरच त्यांना बंदरावर भेटलों, तेव्हां त्यांनीं तिसरे प्रहरीं मला भेटल्यावांचून परत पुण्याला जाऊं नका असें सांगितलें. तिसरे प्रहरीं त्यांचे घरीं त्यांना भेटण्यास आलेल्या लोकांची गर्दी होती. त्या वेळीं त्यांनीं मला एवढेंच सांगितलें कीं तुमच्या युनिव्हर्सिटीसंबंधानें मला पुष्कळसें बोलावयाचें आहे; मला वेळ झाला म्हणजे मी तुम्हांस कळवीन. पुढें प्रिन्सिपल केशवराव कानिटकर व डॉ. परांजपे

यांजबरोबर महाबळेश्वर मुक्कामीं मी दोन तीन वेळां त्यांचेकडे जाऊन या संबंधानें चर्चा केली व अखेरीस त्यांनीं आपल्या सूचना युनिव्हर्सिटीकडे पाठविल्या, त्या थोड्याशा फेरफारानें मंजूर होऊन अखेर अटी ठरल्या त्यांतील मुख्य येणेंप्रमाणें:—

१ सर विठ्ठलदास ठाकरसी व त्यांचे वारस आणि मृत्युपत्राचे व्यवस्थापक यांनीं विद्यापीठाला दरसाल साडेबावन हजार रुपये निरंतर देत रहावें.

२ ह्या त्यांच्या देणगीसाठीं विद्यापीठानें पुढील गोष्टी कराव्या:—

( अ ) विद्यापीठानें आपलें नांव बदलून 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटी' म्हणजे 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी भारत--वर्षीय महिला--विद्यापीठ' असें ठेवावें.

( ब ) विद्यापीठानें तावडतोब पुण्यांत हायस्कूल काढावें.

( क ) विद्यापीठानें एकदम हिंगण्याचें कॉलेज आपल्या ताब्यांत घ्यावें लवकर तें शहराच्या जवळ नेऊन तेथें वसतिगृहाची सोय करावी.

( ड ) शक्य तितकें लवकर विद्यापीठानें मुंबईस एक हायस्कूल काढावें, व त्यांत मराठी आणि गुजराथी ह्या दोन्ही शाखा असाव्या आणि हायस्कुलाची वाढ होऊन पुढें कॉलेज काढतां येईल असें त्याचें धोरण असावें.

( ई ) पूर्ण कॉलेज झाल्यानंतर व जरूर त्या इमारती बांधून होतील तेव्हां विद्यापीठाचें ठाणें पुण्यांतून मुंबईस न्यावें. तसें होईपर्यंत १९२१ च्याजून पासून सेनेटच्या सभा मुंबइस भरत जाव्या आणि तेव्हांपासूनच सिंडिकेटच्या ही सभा मुंबई किंवा पुणें यांपैकीं सोईच्या ठिकाणीं भराव्या.

( फ ) पुण्यांतलें हायस्कुल व कॉलेज यांना अनुक्रमें श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळा व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला-पाठशाळा अशीं नांवें द्यावीं. शिवाय ज्या शैक्षणिक संस्थांचा खर्च सर्वस्वी विद्यापीठाकडून चालत असेल त्या सर्वांना श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी यांचेंच नांव द्यावें.

(ग) माझ्या हयातींत मी व माझ्या पश्चात् दामोदरदास ठाकरसी यांच्या पुरुष वारसानें सेनेटमधील पांच सभासद नेमावे. त्यांतल्या तिघांना सेनेटचा प्रतिनिधि होण्यास ज्या अटी लागत असतील त्या लागू पडल्या पाहिजेत. पण बाकीच्या दोघांना सेनेटमध्यें चालत असलेल्या कामांत योग्य भाग घेतां आला म्हणजे झालें.

३. विद्यापीठाला सरकारी मान्यता तरी मिळावी किंवा माझ्या देणगी-एवढा फंड विद्यापीठानें जमवावा. हें झाल्यानंतर ज्या प्रॉमिसरी नोटांचें व्याज ५२५०० रुपये येईल इतक्या प्रॉमिसरी नोटा विद्यापीठाचे स्वाधीन करण्यांत येतील. त्यानंतर दरसाल साडेबावन हजार रुपये देण्याची जबाबदारी राहणार नाहीं.

ह्या अटी मान्य होऊन देणगीचा स्वीकार झाल्याबरोबर हिंगण्यांतील कॉलेजाची म्हणजे महिला-पाठशाळेची व्यवस्था विद्यापीठाकडे देण्यांत आली व पुण्यांतील कन्याशाळाही विद्यापीठाकडे देऊन त्या दोहोंना श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला-पाठशाळा व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळा अशीं नांवें देण्यांत आलीं. सर विठ्ठलदास प्रो. कानिटकर व मी असे शाळेच्या सोईचें एकादें विकत घेण्यासारखें घर किंवा एकादी बखळ मिळूं शकते कीं काय हें पाहण्यासाठीं दोन-तीन वेळां हिंडलों, परंतु मनासारखी जागा मिळेना. कॉलेजसाठीं हल्लींची जागा सर विठ्ठलदास यांस फार आवडली व ती लागलीच १४०० रुपये एकर प्रमाणें २४ एकर जागा खरेदी केली. इमारती, प्लॅन व एस्टिमेट हीं सर विठ्ठलदास ह्यांनीं स्वतः आपल्या देखरेखीखालीं करविलीं, आणि कॉलेजची इमारत बांधविण्याचें काम त्यांचा बंडगार्डन जवळचे टेंकडी-वरील बंगला ज्यांनीं बांधला त्यांजवरच म्हणजे श्रीयुत नारायण विष्णु आठवले यांजवरच सोंपविलें. कॉलेजसाठीं मनांत भरण्यासारखी इमारत असावी असें सर विठ्ठलदास यांस वाटत असे व ते प्लॅन तयार करतांना वारंवार बदल करीत असत. त्यांचा आग्रह नसता तर आम्हीं एवढा पैसा इमारतीं-वर खरचला नसता. आमचेजवळ त्या वेळीं रोकड नव्हती म्हणून त्यांनीं एक लक्ष शहायशीं हजार रुपये विद्यापीठाला बिनव्याजीं उसने दिले व ते आम्ही हप्त्याहप्त्यांनीं फेडावे असें ठरविलें. त्या रकमेचा शेवटचा पंच-

वीस हजारांचा हप्ता गेल्या डिसेंबरांतच देण्यांत आला. दुर्दैवाची गोष्ट एवढीच कीं, कॉलेजाची पुरी झालेली इमारत पाहण्याला सर विठ्ठलदास हे जगले नाहींत. ते जर आज ह्यात असते तर विद्यापीठाचें पाऊल पुढें पडण्याला त्यांजकडून चांगली मदत झाली असती.

---



श्री. नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला पाठशाळेची इमारत. ( १९२३ )

# प्रकरण सातवें

## विद्यापीठाच्या धोरणानें चालणाऱ्या शाळा काढण्याचे प्रयत्न.

सर विठ्ठलदास यांची मदत मिळण्यापूर्वी पुणें शहरांत विद्यापीठाच्या धोरणानें चालणारी शाळा काढण्याचा प्रयत्न माझे सहकारी मित्र श्रीयुत गो. म. चिपळूणकर यांनीं केला. श्रीयुत चिपळूणकर व श्रीयुत त्रिं. रा. गद्रे यांनीं १९१७ च्या ऑगष्ट महिन्यांत पुण्यास 'कन्याशाळा' स्थापण्याशाठीं एक लहानसें मंडळ स्थापिलें व मुंबईत आणि पुण्यांत हिंडून त्यांनीं कांहीं फंड जमाविला व ३ विद्यार्थिनींनिशीं ती शाळा १९१८ च्या एप्रिल महिन्यांत सुरू केली. आश्रमाच्या आजन्म-सेवकांची ह्या प्रयत्नाला सहानुभूति होती, परंतु पैशाची जबाबदारी आश्रमानें घेतली नाहीं. विद्यापीठानेंही ह्या शाळेला मदत करणें शक्य नव्हतें. तेव्हां मदत मिळविण्याची सर्व जबाबदारी आमच्या बापूसाहेबांना (गो. म. चिपळूणकर ह्यांना आम्ही सर्व बापूसाहेब म्हणतों) घ्यावी लागली. त्या वर्षाच्या अखेरीस शाळेंत ५७ मुली झाल्या व १९२० सालांत ती संख्या ८३ झाली. शाळा पैशाच्या अडचणींतच होती, इतक्यांत सर विठ्ठलदास यांची देणगी मिळून ती शाळा विद्यापीठाचे स्वाधीन करण्यांत आली. बापूसाहेबांचें या शाळेवरील अपत्यप्रेम लक्षांत घेऊन विद्यापीठानें ह्या शाळेचें धुरीणत्व अजूनही त्यांजकडेच ठेविलें आहे व त्यांच्या धुरीणत्वाखालीं ह्या शाळेची चांगली भरभराटही होत आहे.

दुसरी शाळा काढण्याचा प्रयत्न मुंबईस करण्यांत आला. ह्या कामीं मुंबईचे श्रीयुत लक्ष्मणराव नाईक ह्यांनीं फार मदत केली. मुंबईत त्यावेळीं चालू असलेलें एखादें हायस्कूल जर महिलाविद्यापीठाच्या धोरणानें काम करण्यास तयार असेल व मराठी आणि गुजराथी अशा दोन्ही शाखा चालवील तर प्रयत्न करून पहावा आणि तें शक्य नसेल तर वेगळें हायस्कूल काढावें अशी सर विठ्ठलदास यांची इच्छा होती. त्याप्रमाणें दोन

ठिकाणीं प्रयत्न करण्यांत आला. चंदारामजी गर्ल्स हायस्कुलानें हें काम पतकरलें तर पहावें म्हणून त्याच्या कमेटीच्या बहुतेक गुजराथी सभासदांकडे मी व लक्ष्मणराव गेलों. हें हायस्कूल एका ट्रस्टच्या पैशांतून चाललेलें असल्यामुळें हायकोर्टाचे परवानगीशिवाय त्या कमेटीला ती शाळा खासगी युनिव्हर्सिटीच्या धोरणानें चालवितां आली नसती; पण कमेटीची इच्छा असती तर हायकोर्टाची तशी परवानगी मिळविणें कठीण पडलें नसतें. परंतु मुंबई युनिव्हर्सिटीचें धोरण सोडणें त्या मंडळींना पसंत पडेना. नंतर श्रीयुत गजानन भास्कर वैद्य यांनीं चालविलेल्या स्टूडंट्स् लिटररी सोसाइटीचे हायस्कूलासंबंधानें प्रयत्न केला पण तोही सफल झाला नाहीं. तेव्हां मुंबईत वेगळें हायस्कूल काढणें भाग आलें. प्रथम सर विठ्ठलदास यांचे सल्ल्यानें मुंबईचे श्रीयुत गोकुळदास कहानदास पारख यांच्या चौपाटीवरील घरांत कांहीं प्रमुख गृहस्थांची सभा भरली तींत सर विठ्ठलदासही हजर होते. बऱ्याच मोठ्या प्रमाणावर शाळा काढण्यासंबंधानें त्या सभेंत चर्चा झाली. शाळेसाठीं सोईवार जागा पाहण्याकरतां मी व लक्ष्मणराव बरेच हिंडलों. अखेरीस ठाकुरद्वाराजवळ नवरोजी स्ट्रीटमध्यें नवीन बांधलेल्या पारशांचे चाळींतील वरच्या मजल्यावरची जागा पसंत केली.

शाळेंत मराठी व गुजराथी असे दोन्ही भाग ठेवण्याचें ठरलें. श्रीयुत लक्ष्मणराव नायक हे मुंबईच्या स्मॉल कॉज कोर्टांत ट्रान्स्लेटर होते ह्यामुळें त्यांना गुजराथी व हिंदी भाषा चांगल्या येतात. त्यावेळीं त्यांनीं फर्लो रजा घेतली होती. लक्ष्मणरावांनींच शाळेच्या सुपरिटेंडेंटचें काम करावें अशी विनंति मी त्यांना केली व ती त्यांनीं मोठ्या आनंदानें मान्य केली व रजा संपतांच पेनशन घेऊन मोकळे झाले. त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांना वेतन देणें पैशाच्या टंचाईमुळें शक्य नव्हतें. मुंबईच्या शाळेला खर्च फार येतो. भाड्याखालींच बेजार होण्याची पाळी येते. परंतु ते मलबारहिलवर रहात असल्यामुळें गाडीच्या खर्चापुरतें आनरेरियम घेऊन काम करण्यास ते मोठ्या खुषीनें तयार झाले.

मुलींच्या शाळेंत मुलींवर देखरेख करणारी व शाळेच्याच इमारतींत राहणारी एखादी पोक्त बाई असल्यास बरें हें मनांत आणून श्रीमती पार्वतीबाई आठवले यांजकडे तें काम दिलें. पुढें शाळेंत गुजरातीची जरूर

राहिली नाहीं व श्रीमती सीताबाई अण्णिगेरी यांची मुख्य अध्यापिका म्हणून नेमणूक झाली तेव्हां पार्वतीबाईची तेथून सुटका झाली.

मुंबईच्या शाळेसाठीं बराच मोठा खर्च पुढें करावा लागणार हें लक्षांत आणून सर विठ्ठलदास यांची मदत मिळाल्यापासून दर वर्षाच्या अंदाज पत्रकांत मुंबईच्या शाळेसाठीं कांहीं रक्कम वेगळी काढून ठेवण्यांत येत असे. अशा रीतीनें कांहीं रक्कम चालू वर्षाच्या अंदाज–पत्रकांतून व कांहीं पूर्वीच्या शिलकेंतून खर्च करून मुंबईच्या शाळेचा खर्च भागविण्याचें ठरलें. ही शाळा ता. १ फेब्रुवारी १९२४ रोजीं उघडण्यांत आली. मुंबईत शाळा चालविण्याच्या अडचणींचा उल्लेख १९२४ च्या जून महिन्यांत सेनेटपुढें जो रिपोर्ट वाचण्यांत आला त्यांत केला आहे तो येणेंप्रमाणें:—

"The university has also made a further advance by opening a school in Bombay. But it was faced with two difficulties in carrying out the idea. First, the claims of vernaculars as media of instruction are not so keenly recognised by the cosmopolitan citizens of Bombay, as by the inhabitants of other places. Secondly, a school in Bombay necessarily means the outlay of a large amount of money. But the university was bound to take steps in this direction owing to the conditions laid down by the late Sir Vithaldas Thackersey. The first humble step was therefore taken and a small school with Marathi & Gujarati sides was opened in February last On account of the difficulties mentioned above, it is apprehended that the school may take a long time to flourish, but as stated above, we were bound to try the experiment and the promotors are determined to persevere in the matter and try their utmost to make it a success."

"युनिव्हर्सिटीनें मुंबईत एक शाळा काढून आपल्या कामाची आणखी प्रगति केली आहे. परंतु आपली कल्पना प्रत्यक्ष कृतींत आणतांना या संस्थेला दोन अडचणींना तोंड द्यावें लागलें. एक देशी भाषांचा बोधभाषा म्हणून उपयोग करण्याच्या बाबतींतील जरूरी इतर ठिकाणच्या लोकांना जितक्या तीव्रतेनें भासते तितकी ती मुंबईच्या सर्वजातीय व संमिश्र वस्तीच्या लोकांना भासत नाहीं. दुसरें असें कीं मुंबईत शाळा

काढणें म्हणजे अर्थातच बराच पैसा खर्ची घालणें होय. असें असतांहि युनिव्हर्सिटीला परलोकवासी सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं घातलेल्या अटींप्रमाणें या दिशेनें उपक्रम करणें जरूरीचें होतें. आणि म्हणूनच प्रथम लहानसा एक प्रयोग करण्यासाठीं गेल्या फेब्रुवारींत मराठी व गुजराथी अशा दोन्ही शाखा असलेली एक शाळा उघडण्यांत आली. वर सांगितलेल्या अडचणींमुळें शाळेची भरभराट होण्याला बराच वेळ लागेल कीं काय अशी भीति वाटत आहे. परंतु वर दर्शविल्याप्रमाणें हा प्रयत्न करून पाहणें आमचें कर्तव्य होतें, आणि या बाबतींत चिकाटी धरून तो पूर्ण यशस्वी करून दाखविण्यासाठीं आपली शिकस्त करावयाची असा चालकांचा निश्चय आहे."

गुजराथी वर्ग काढण्याचे हेतूनें दरमहा ६० रुपये पगारावर एका गुजराती शिक्षकाची योजना केली होती. पण सहा महिन्यांत कायत्या दोन गुजराथी मुली आल्या. त्यांतली एक लवकरच परत गेली. दुसरीही टिकण्याचें लक्षण दिसलें नाहीं. तेव्हां आठ महिन्यानंतर गुजराथी शिक्षकास रजा देऊन मराठी शाखा मात्र चालू ठेवली. ह्या शाळेला सर विठ्ठलदास यांच्या अटींप्रमाणें "श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळा, मुंबई," असें नांव आरंभापासूनच दिलेलें आहे.

ह्या शाळेची प्रगति बरी होत आहे. ह्या शाळेच्या सुपरिंटेंडेंटचें काम सर विठ्ठलदास यांजबरोबर पृथ्वीप्रदक्षिणा करून आलेल्या श्रीमती सीताबाई अण्णिगेरी यांजकडे दिलेलें आहे. हल्लीं ह्या शाळेंत ८२ मुली असून सहा इयत्ता आहेत. येत्या जूनमध्यें हें पूर्ण हायस्कूल होईल.

गुजराथी शाखा काढण्याचें काम मागें पडलें; परंतु मुंबईच्या 'वनिता-विश्रामा'नें गुजराथी मुलींचें हायस्कूल बनविण्याचा प्रयत्न करून पाहण्याचें मनांत आणलें आणि त्यास इतर शाळांच्या ग्रांटच्या अटी लागू न करितां बरीच ग्रांट देण्याचें सिंडिकेटनें कबूल केलें. ह्यामुळें ह्या विद्यापीठाच्या धोरणाचें गुजराथी मुलींसाठीं हायस्कूल वनिता विश्रामाच्या आश्रयाखालीं लवकरच पूर्णतेस येईल अशी आशा वाटूं लागली आहे. सध्या त्यांच्या शाळेंत चार इयत्ता असून त्या शाळेचें धुरीणत्व सर चिमणलाल सेटलवाड

यांच्या कन्या सौ. शारदाबाई दिवाण यांजकडे आहे. त्यांच्या नेतृत्वाखालीं ह्या शाळेची प्रगति चांगली होत आहे.

साताऱ्यांत मुलींच्या इंग्रजी शिक्षणाची सोय नव्हती. न्यू इंग्लिश स्कुलांत बऱ्याच मुली जात असत व अजूनही कांहीं जातात. पण मुलांच्या शाळेंत मुली पाठविणें पुष्कळ पालकांना आवडत नाहीं आणि ह्यामुळें त्यांच्या मुलींना शाळेचा फायदा मिळूं शकत नसे. श्रीयुत वाग्भट नारायण देशपांडे, श्रीयुत पंढरीनाथ वामन घाणेकर व डॉ. आगाशे यांच्या मनांत साताऱ्यास आमच्या युनिव्हर्सिटीच्या धोरणाची शाळा असावी असे विचार येत. त्या संबंधानें चर्चा करण्याकरतां त्यांनीं श्रीमती कमलाबाई देशपांडे ह्यांना व मला बोलाविलें. आम्ही या गोष्टीचा विचार करण्याकरतां १९२२ च्या आक्टोबर महिन्यांत दिवाळीच्या दिवसांत तेथें गेलों. शाळा इतक्या तांतडीनें निघेल असें कोणाच्या स्वप्नींही नव्हतें. कमलाबाईनीं आपल्या वडिलांना विचारलेलें नव्हतें व आश्रमाच्या आजन्मसेवकांचीही संमति विचारलेली नव्हती. संभाषण चाललें असतां एकदम माझ्या मनांत आलें कीं, 'शुभस्य शीघ्रम्'. कमलाबाईनीं शाळेची जबाबदारी घ्यावी व शाळा एकदम भाऊबिजेचे मुहूर्तावर सुरू करावी. वडिलांची परवानगी विचारलेली नसल्यामुळें कमलाबाईचें मन जरा कांकूं करीत होतें. आश्रमाच्या आजन्मसेवकमंडळाकडून परवानगी मिळवून देण्याची हमी मीं घेतली व कमलाबाईनींही रुकार दिला. एकदम आम्ही सर्व मंडळी श्रीयुत दादासाहेब करंदीकर व रावबहादूर काळे यांजकडे जाऊन त्यांची संमति मिळविली; आणि सहा सात विद्यार्थिनींच्या पालकांची अनुमति मिळविण्यांत आली व भाऊबिजेचे मुहूर्तावर सकाळीं दादासाहेब करंदीकरांच्या घराशेजारींच त्यांचें दुसरें घर आहे तेथें एकदम शाळेला सुरवात करण्यांत आली. त्याच दिवशीं संध्याकाळीं पाठक हॉलांत स्त्रीपुरुषांची मोठी सभा भरविण्यांत येऊन शाळा उघडल्याबद्दल जाहीर करण्यांत आलें व मदतीसाठीं विनंति करण्यांत आली. पांचसहा पुढारी मंडळींनीं प्रत्येकीं शंभर रुपये दिले व वर्गणीसाठीं ताट फिरवण्यांत आलें त्यांतही बरीच वर्गणी जमली. अशा रीतीनें एकदम शाळेला आरंभ करण्यांत आला. प्रमुख लोकांकडे जाऊन त्यांजकडून वर्गणीचे आंकडे घेण्याचें काम आम्ही

एक सारखें दोन दिवस करीत होतों. आतां ह्या शाळेला पूर्ण हायस्कूलचें स्वरूप आलेलें आहे. शाळेंत सुमारें नव्वद मुली आहेत. ह्या शाळेला मिळालेलें सर्व यश कमलाबाईमुळें आहे. त्यांनीं पहिलीं दोन वर्षें कांहींएक मोबदला न घेतां काम केलें व नंतरही निर्वाहापुरतेंच वेतन घेऊन त्या काम करीत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालीं ह्या शाळेची आणखीही भरभराट होईल अशी आशा आहे.

बेळगांवास मीं वर्गणीच्या कामासाठीं गेलों असतां माझ्या असें नजरेस आलें कीं तेथें मुलींच्या इंग्रजी शिक्षणाची सोय नसून सुखवस्तु लोकांच्या थोड्या मुली मुलांच्या मिशन हायस्कुलांत जात आहेत. ह्या ठिकाणीं प्रयत्न केला असतां विद्यापीठाच्या धोरणाची मुलींची शाळा चालूं शकेल असें मला वाटलें. आमच्या विद्यापीठाच्या गृहीतागमा श्री. बनूबाई आहो ह्यांना आश्रमाच्या आजन्मसेवकमंडळानें इकडे पाठविण्याचें ठरविलें व त्यांनीं ही अल्प वेतनावर ह्या ठिकाणीं काम करण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें मी व बनूबाई बेळगांवास आलों आणि आम्ही व श्री. मणेरीकर मिळून अनेक लोकांकडे जाऊन त्यांजकडून वार्षिक मदतीचे व देणगीचे आंकडे घेतले. ह्या कामासाठीं मला वीस दिवस बेळगांवास रहावें लागलें. ह्या शाळेला श्री. वेळवी, श्री. मुजुमदार, श्री. मणेरीकर, श्री. बोंद्रे, श्री. चिकोडी व श्री. खोत ह्यांची हस्तें परहस्तें चांगली मदत झाली आहे. श्री. मणेरीकर व श्री. खोत हे वृद्ध गृहस्थ आपला अमोलिक वेळ खर्चून शाळेंत मुलींना इंग्रजी विषयाचें शिक्षण देण्याचे प्रयत्न करीत आहेत. ह्या शाळेंत हल्लीं ६० विद्यार्थिनी आहेत. ह्या शाळेला मिळालेलें यश मुख्यत्वेंकरून श्री. बनूबाई आहो यांनीं केलेल्या निरपेक्ष श्रमांचें फल आहे.

मी सांगलीला गेलों असतां असें आढळून आलें कीं, मुलींचा इंग्रजी तिसऱ्या इयत्तेचाही वर्ग नसल्यामुळें विद्यार्थिनींस मुलांच्या हायस्कुलांत जावें लागतें. मुलांच्या हायस्कुलांत आपल्या मुली पाठविण्याची पुष्कळ पालकांची तयारी नसते. अर्थात् त्यांच्या मुली घरीं बसून राहतात. पुढें इंग्रजी तिसरी यत्ता शिकविण्याची सोय संस्थानच्या शाळेंत झाली; पण पुढले वर्ग चालविण्याची संस्थानच्या अधिकाऱ्यांची व चीफसाहेबांची तयारी दिसेना. संस्थानांतून मुलींच्या पुढल्या शिक्षणाची सोय होऊं शकत नाहीं असें

मला अधिकारीवर्गाकडून निश्चितपणें कळल्यावर मीं श्री. गंगूबाई गोगटे यांच्या मदतीनें १९२५ च्या जूनमध्यें मुलींचा इंग्रजी चवथ्या इयत्तेचा वर्ग काढला. नंतर १९२६ च्या जूनमध्यें पांचवी व १९२७ च्या जूनमध्यें सहावी निघाली. संस्थानांतून ह्या शाळेला थोडी ग्रँट मिळत आहे. ह्या शाळेसंबंधानें मला बरीच खटपट करावी लागली व अजूनही लागत आहे. सातारा, बेळगांव, सांगली, वाई, सोलापूर, येथील शाळांकडे मी विशेष लक्ष देतों व त्यांच्या योगक्षेमाविषयीं मला विशेष काळजी वाटते. ह्या सर्व ठिकाणीं मी कधीं कधीं जातों व हस्तें परहस्तें त्या शाळांसाठीं कांहीं होण्यासारखें असलें तर करतों.

विद्यापीठाची कल्पना पुष्कळांना पसंत आहे, व अशा धोरणाच्या शाळा ठिकठिकाणीं व्हाव्या अशी पुष्कळांची इच्छा असते. पण अशा शाळेसाठीं बराचसा स्वार्थत्याग करणारीं अगर तिच्या पाठीमागें लागून तिला मूर्त स्वरूप आणून देण्यासाठीं धडपडणारीं माणसें फार कमी आहेत. एखाद्या प्रान्तिक सरकारानें अगर संस्थानिकांनीं जर हें कार्य हातीं घेतलें तर पुष्कळ काम होऊं शकेल. पण हें व्हावें कसें ?

# प्रकरण आठवें

## महिला विद्यापीठाचा विस्तार

### अथवा

## विद्यापीठानें आजपर्यंत काय केलें ?

महाराष्ट्रासाठीं युनिव्हर्सिटी काढण्याच्या आकुंचित कल्पनेला व्यापक स्वरूप देऊन भारतवर्षीय महिलाविद्यापीठ असें नांव दिलें परंतु तें अंशतः तरी सार्थ कसें करितां येईल ह्या विवंचनेंत आम्हीं होतों. त्यासंबंधीं पूर्वी कसे प्रयत्न केले व ते कसे विफल झाले हें मागील एका प्रकरणांत आलेंच आहे. सुदैवानें १९२० च्या जून महिन्यांत सर विठ्ठलदास ह्यांचा आधार मिळाल्यामुळें हें काम सुलभ झालें. अहमदाबाद व सुरत येथें मुंबई युनिव्हार्सिटीच्या धोरणाहून वेगळें शिक्षण देण्याचा उपक्रम झाला होता, तो आतां उपयोगीं पडला. मुंबई युनिव्हिर्सिटीच्या मॅट्रिक्युलेशनपेक्षां वेगळा अभ्यासक्रम ठरवून " गुजराथ स्त्री केळवणी ( शिक्षण ) मंडळ"नें शालान्त परीक्षा घेण्याचें ठरविलें. आणि ही पहिली परीक्षा १९२० च्या जूनमध्यें घेण्यांत आली. ह्या परीक्षेला अहमदाबादच्या 'जिवकोर वनिता–विश्राम हायस्कुलां'तून तीन विद्यार्थिनी बसल्या होत्या त्या पास झाल्या. ही शालान्त परीक्षा त्या वर्षापुरती आमच्या विद्यापीठानें मान्य केली व त्या तीन मुलींनिशीं गुजराथ महिला पाठशाळा ह्या नांवाचें कॉलेज स्त्री केळवणीमंडळानें अहमदाबादेस सुरू करून तें आमच्या विद्यापीठाला जोडलें.

अहमदाबादच्या जिवकोर वनिताविश्राम हायस्कुलानेंही ह्या विद्यापीठाच्या धोरणानें काम चालविण्याचें ठरविलें व तें १९२० च्या ऑक्टोबर महिन्यांत विद्यापीठाला जोडण्यांत आलें.

सुरतचें 'महिलाविद्यालय' स्त्रियांना योग्य अशा प्रकारचें शिक्षण देण्यासाठीं १९१६ च्या जून महिन्यांत सुरू झालें होतें. तें १९२० च्या डिसेंबर महिन्यांत विद्यापीठाला जोडण्यांत आलें. अशा रीतीनें ठाकरसींची मदत मिळाल्यापासून ६ महिन्यांच्या आंतच गुजराथेंतील तीन संस्था

विद्यापीठाला जोडल्या गेल्या, व त्यांना दरसाल द्रव्याची मदतही विद्यापीठाकडून होऊं लागली. मालवण येथील कन्याशाळा तेथील उत्साही गृहस्थ श्री. के. एस्. देसाई यांनीं १९१४ च्या जूनमध्यें सुरू केली. १९१८ सालीं फीमेल एज्युकेशन सोसाइटी, मालवण, ही संस्था स्थापन होऊन तिनें ही शाळा चालविण्याची जबाबदारी आपल्यावर घेतली. ह्या संस्थेचे मुख्य चालक श्री. देसाई हेच आहेत. ही शाळा १९२२ च्या फेब्रुवारी महिन्यांत विद्यापीठाला जोडली गेली व तिला विद्यापीठाकडून वार्षिक द्रव्यसहाय्य मिळूं लागलें.

बडोद्यांतील महाराणी गर्ल्स् हायस्कूल हें मुंबई युनिव्हर्सिटीला जोडलेलें आहे. ह्या हायस्कुलांत आमच्या विद्यापीठाचाही अभ्यासक्रम सुरू व्हावा अशी खटपट करण्याकरितां १९२२ सालीं मीं बडोद्यास गेलों, व सुमारें दोन महिने तेथें राहिलों. पहिल्यानें तेथील पुढारी लोकांची एक सभा भरून ह्या प्रश्नाचा विचार केला. त्या सभेंत महाराजसाहेबांकडे पाठविण्यासाठीं एक अर्ज तयार करून त्यावर सुशिक्षित लोकांच्या सह्या घेऊन तो महाराजांकडे सादर करावा असें ठरलें. ह्या कामांत डॉ. सुमंत मेहता, श्री. सौ. शारदागौरी मेहता, विद्याखात्याचे डायरेक्टर श्री. एन्. के. दीक्षित, प. वा. कृष्णराव शारंगपाणी आणि गर्ल्स् हायस्कूलच्या प्रिन्सिपाल मिस्. एम्. ए. नीडहॅम् ह्या सर्वांनीं सहानुभूतिपूर्वक साहाय्य केलें. ह्या सर्वांच्या मदतीनें व पसंतीनें अर्जाचा नमुना तयार करून त्याजवर सह्या घेण्यासाठीं मीं प्रमुख लोकांकडे हिंडलों व सुमारें ३०० सह्या मिळविल्या. हा अर्ज मंजूर होऊन महाराणी हायस्कुलांतील प्रवेश परीक्षेचा वर्ग १९२२ सालीं विद्यापीठाला जोडण्यांत आला. आणि १९२३ पासून मराठी भाषेतून व गुजराथी भाषेतून अभ्यास करून विद्यार्थिनी महिला-विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेसाठीं बसूं लागल्या.

भावनगर एथील कांहीं उत्साही मंडळींनीं ह्या विद्यापीठाच्या धोरणानें १९२५ सालीं महिलाविद्यालय स्थापन केलें. १९२६ सालीं विद्यापीठाच्या इन्स्पेक्टरांनीं ही शाळा तपासली होती. १९२७ सालीं तें विद्यापीठाला जोडण्यांत येऊन त्याला थोडीशी ग्रँटही देण्यांत आली आहे. हें आतां पूर्ण हायस्कूल झालें आहे.

ह्याशिवाय सातारा, बेळगांव व सांगली येथील शाळांची हकीकत मागील प्रकरणांत दिली आहे. सातारा व बेळगांव येथील शाळा पूर्ण हायस्कुलाच्या स्वरूपाला आलेल्या आहेत. सांगली येथील शाळा लवकरच पूर्ण हायस्कूल होईल. ह्या सर्व शाळा विद्यापीठाला जोडलेल्या आहेत.

ह्या विद्यापीठाच्या धोरणानें चालणारीं कांहीं मिडल् स्कुलें आहेत. अकोला येथील टिळक कन्याशाळा सौ. इंदिराबाई कट्टी यांच्या नेतृत्वाखालीं चालली आहे. ही शाळा सुरू होऊन बरींच वर्षे झालीं आहेत. सोलापूर येथील सरस्वती-मंदिराचे आश्रयानें चाललेल्या शाळेच्या लेडी सुपरिंटेंडेंट कु. बनुबाई देशपांडे, जी. ए., या आहेत. श्रीयुत वि. आ. मोडक, अनाथबालिकाश्रमाचे आजन्मसेवक, यांनीं ह्या शाळेसाठीं फार खटपट केली. वाई येथें श्री. बापुसाहेब कायवटे व श्री. बापुसाहेब दातार ह्या उभय पेनशनर मुनसिफांच्या श्रमांनीं कन्याशाळा सुरू झालेली आहे. ह्या शाळेवर जी. ए. पर्यंत अभ्यास झालेल्या एका बाईची योजना झालेली आहे. रत्नागिरीची शाळा विद्यापीठाच्या जी. ए. बाई सौ. आनंदीबाई जोशी यांचे नेतृत्वाखालीं चाललेली आहे. ह्या शाळेसंबंधानें ह्यांनीं फार परिश्रम केले आहेत. व आज तीन वर्षे यांची खटपट चालू आहे.

ज्या ज्या प्रान्तांत वेगळी भाषा प्रचलित आहे अशा प्रत्येक प्रांतासाठीं स्वतंत्र स्त्रियांची युनिव्हर्सिटी असणें हें अन्तिम साध्य आहे. परंतु तशी परिस्थिति उत्पन्न होईपर्यंत मध्यवर्ती विद्यापीठाचा फायदा इतर प्रांतांनीं घेतल्यास वावगें होणार नाहीं. कोणत्याही प्रान्तांतल्या प्रचलित भाषेंत शिक्षण देणाऱ्या शाळा किंवा कॉलेजें जर ह्या विद्यापीठाला जोडलीं जातील तर त्यांना यथाशक्ति द्रव्यसाहाय्य देणें व त्यांतील विद्यार्थिनींच्या परीक्षा घेणें हीं कामें आमच्याकडून होऊं शकतील. ह्या सवलतीचा फायदा इतर प्रान्तांनीं जरूर करून घ्यावा.

शिक्षणाच्या मार्गांतील अडचणी दूर करून विद्या स्त्रियांच्या आटोक्यांत आणून देण्याचें कार्य ह्या विद्यापीठानें थोडेंसें केलें आहे. शाळेंत किंवा कॉलेजांत न जातां घरीं अभ्यास करून विद्यापीठाच्या परीक्षांना बसण्याची सवलत आहे. दुसरें विद्यार्थिनींना परीक्षेसाठीं लांबच लांब प्रवास करण्याचें कारण पडत नाहीं. ज्या शहरांत विद्यार्थिनींचा अभ्यासक्रम चालला असेल

त्या शहरांतच तेथल्या एकाद्या शाळेच्या सुपरिंटेंडंट बाईच्या देखरेखीखालीं परीक्षा घेण्याची योजना केली जाते. अशा रीतीनें अलाहाबाद, ग्वाल्हेर, कानपूर वगैरे ठिकाणीं ह्या विद्यापीठाच्या परीक्षांचे सेंटर कधीं कधीं झालेले आहेत. मराठी व गुजराथी ह्या भाषांतून शिक्षण देणाऱ्या शाळा व कॉलेजें आहेत. ह्याशिवाय हिंदी, बंगाली व ऊर्दू ह्या भाषांतून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थिनी कधीं कधीं ह्या विद्यापीठाच्या परीक्षांना बसतात. अशा रीतीनें सर्व अभ्यास घरीं करून ग्वाल्हेर येथील एक विद्यार्थिनी हिंदी भाषेंतून सर्व परीक्षा देऊन गृहीतागमा झालेली आहे. ग्वाल्हेर येथें मिस् हिल् ह्या अमेरिकन बाईनीं मुलांमुलींना इंग्रजी शिकविण्याची एक शाळा चालविली आहे. ह्या बाईंना आमचा अभ्यासक्रम पसंत पडला आहे व त्या आपल्या शाळेंतल्या विद्यार्थिनी आमच्या परीक्षांसाठीं तयार करीत असतात. मिस् हिल् ह्या आमच्या सेनेटच्या सभासदही आहेत. त्या हल्लीं अमेरिकेस गेल्या आहेत पण त्यांचें काम चालविण्यासाठीं आलेल्या बाईही त्यांचें अनुकरण करीत आहेत. कोणत्याही प्रान्तांतली एकच विद्यार्थिनी जरी आपल्या प्रांतांतल्या भाषेंतून अभ्यास करून परीक्षेस बसण्याची इच्छा दर्शवील तरी त्या भाषेसाठीं पुस्तकें मुक्रर करणारें मंडळ (Board of Studies बोर्ड ऑफ स्टडीज्) नेमण्यांत येईल व त्या विषयांत कोणतीं पुस्तकें वाचावयाचीं हें तिला कळविण्यांत येईल.

आणखी एका रीतीनें महिला–विद्यापीठाचें कार्यक्षेत्र वाढवितां आलें तर पहावें असें मनांत येऊन सुमारें पांच वर्षांपूर्वीं नाशिक येथें एक प्रयत्न करून पाहिला पण तो फसला. नाशिक येथें सरकारानें चालविलेलें जें मिडल् स्कूल आहे त्याला सात आठ हजार रुपये वार्षिक खर्च येतो. त्यांत इंग्रजी चारच इयत्तांचें शिक्षण दिलें जातें. हें स्कूल सरकारानें महिला विद्यापीठाच्या स्वाधीन करावें, चार इयत्तांपर्यंतचा त्यांचा अभ्यासक्रम आहे तसाच ठेवावा पुढें आमच्या धोरणानें वरच्या इयत्ताचे वर्ग काढून विद्यापीठानें तें पूर्ण हायस्कूल बनवावें व सरकारानें ती खर्चाची रक्कम विद्यापीठाच्या स्वाधीन करावी, अशा आशयाचा अर्ज नाशिकच्या मंडळीकडून करवावा असा माझा बेत होता. असें केल्यानें ज्यांना मुंबई युनिव्हर्सिटीचा अभ्यास करावयाचा असेल त्यांना पूर्वीप्रमाणें पुढें मुलांच्या

हायस्कुलांत जातां येईल; व इतरांना महिलाविद्यापीठाच्या प्रवेशपरीक्षेस बसतां येईल. अलीकडे बोधभाषा ह्या दृष्टीनें, मातृभाषांचा सरकारी हायस्कुलांत बराच प्रवेश झाल्यामुळें मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिक्युलेशन व विद्यापीठाची प्रवेश परीक्षा ह्यांमध्यें फारसा भेद राहिला नाहीं. ह्यासाठीं मी नाशिक येथील प्रमुख गृहस्थांच्या गांठी घेतल्या व दोन वेळां पुढाऱ्यांच्या सभांत ह्यासंबंधाची पुष्कळ चर्चा झाली. ह्या कामासाठीं मी आठ दिवस नाशिकास राहिलों होतों. एकमतानें सरकारकडे तसा अर्ज होणें शक्य नाहीं असें दिसून आल्यामुळें मला तो उद्योग सोडून देणें भाग पडलें.

आज स्त्रियांच्याहि माध्यमिक शिक्षणाकडे अधिक पैसा खर्च करण्याची सरकारची प्रवृत्ति नाहीं. सरकारनें इंग्रजी चार इयत्ता शिकविणारीं पांच मिडल् स्कुलें महाराष्ट्रांत व कर्नाटकांत मिळून ठाणें, नगर, नाशिक, विजापूर व धारवाड ह्या ठिकाणीं काढलीं आहेत. ह्यांतल्या कित्येकांनीं आम्हांला वर्षाचे आणखी सहाशें रुपये द्या म्हणजे आम्ही पांचवी इयत्ता काढतों अशा प्रकारची मागणी अनेक वेळां सरकाराकडे केली पण ती मंजूर झाली नाहीं. ह्या शाळा अगोदरच निघाल्या होत्या म्हणून त्या बंद करण्यांत आल्या नाहींत. हा प्रश्न जर वाढत्या खर्चाच्या नव्या मनूत उत्पन्न झाला असता तर अशा शाळा निघाल्याच नसत्या. सरकाराजवळ अधिक खर्च करण्याला पैसे नाहींत तेव्हां तेवढ्याच खर्चात पूर्ण हायस्कूलचें शिक्षण देतां येण्याचा संभव असला तर तो फायदा तरी लोकांना मिळावा अशी योजना झाली पाहिजे. सरकारनें आपलें एक मिडल् स्कूल महिलाविद्यापीठाच्या ताब्यांत द्यावें व त्या स्कूलसाठीं होणाऱ्या खर्चाइतकी रकम विद्यापीठाच्या स्वाधीन करावी. त्या स्कुलांतील कायम न झालेल्या शिक्षकांना योग्य नोटीस देऊन रजा द्यावी व कायम शिक्षकांची सोय सवडी सवडीनें इतर शाळांतून करावी. ही व्यवस्था तीन वर्षांपुरती मंजुर करून तेवढ्याच खर्चात पूर्ण हायस्कुलाचा फायदा मिळतो कीं काय तें पहावें. हा प्रयोग यशस्वी झाल्यास तशी दुसरी शाळा विद्यापीठाकडे द्यावी. यशस्वी न झाल्यास सरकारनें पुन्हां ती आपलेकडे परत घ्यावी. महिला विद्यापीठ ही संस्था आतां इतका विश्वास टाकण्याच्या योग्यतेची झाली आहे.

खाजगी संस्था कमी खर्चात सरकारी संस्थांच्या बरोबरीचें काम करूं

शकतात हा अनुभव मुलांच्या शिक्षणसंस्थांत आलेला आहे. ह्या विद्यापीठाला जोडलेल्या कांहीं मुलींच्या शाळाही बऱ्या प्रकारचें काम करीत आहेत हें सरकारी इन्स्पेक्टर त्या शाळांची परीक्षा घेत असतात आणि सरकारकडून त्या शाळांना ग्रँट मिळत असते ह्यावरून दिसून येण्यासारखें आहे. सरकारच्या मनांत आलें म्हणजे त्याला पाहिजे तें करितां येतें. विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांच्या मनांत असा प्रयोग करून पाहण्याचें आल्यास ते ही गोष्ट सहज करूं शकतील. मुंबई कौन्सिलांतील स्त्रीशिक्षणाच्या कैवारी सभासदांनींही सरकारला असा प्रयोग करून पहाण्यास सल्ला द्यावा. आमच्या कित्येक शाळांचें काम असावें तितकें समाधानकारक नसतें ह्याचें मुख्य कारण पैशाचा अभाव हें असल्यामुळें अधिक पगार देऊन हुशार शिक्षक नेमतां येत नाहींत. सरकारकडून चांगली मदत मिळाल्यास ह्याच शाळा चांगलें काम करून दाखवतील.

मागल्या व ह्या प्रकरणांत दिलेल्या हकीकतीवरून विद्यापीठानें स्त्रियांच्या माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठीं कोणते प्रयत्न केले तें लक्षांत येईल. मुंबईसरकारानें स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठीं वेगळा असा प्रयत्न केला नाहीं. पुरुषांसाठीं काढलेल्या कॉलेजांचा फायदा स्त्रिया घेऊं शकतात एवढेंच. अशा रीतीनें मुंबई युनिव्हर्सिटींतून आजपर्यंत सुमारें सव्वाशें हिंदुस्त्रिया बी. ए. झाल्या आहेत. आमच्या विद्यापीठांतून ४७ गृहीतागमा बाहेर पडल्या आहेत. सिंधप्रांत खेरीज करून बाकीच्या मुंबई इलाख्यांतील कॉलेजांत उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया सुमारें १६० आहेत. महिला विद्यापीठांत हें शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया ३५ आहेत. हें उच्च शिक्षणासंबंधानें झालें.

आतां माध्यमिक शिक्षणाच्या बाबतींत गुजराथेंत व महाराष्ट्रांत सरकाराकडून व विद्यापीठाकडून हिंदु स्त्रियांसाठीं झालेल्या कामांची तुलना करूं या. सरकारानें स्वतः चालविलेलीं मुलींचीं दोन हायस्कुलें एक पुण्यास व दुसरें अहमदाबादेस अशीं आहेत. खासगी प्रयत्नांनीं चाललेलीं पण ज्यांना सरकारची मदत आहे अशीं हिंदु मुलींचीं हायस्कुलें म्हणजे मुंबईचीं चंदारामजी गर्ल्स् हायस्कूल, स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीचें गर्ल्स् हायस्कूल, कोलंबा गर्ल्स हायस्कूल व कदाचित् आणखी एकदोन

असतील. महिला विद्यापीठाच्या मदतीनें केवळ खासगी प्रयत्नांनीं चाल-लेलीं हायस्कुलें चार आहेत. हिंगण्याचा महिलाश्रम, पुण्यांतील नाथीबाई ठाकरसी कन्याशाळा, अहमदाबादेंतील जीवकोर वनिताविश्राम व साताऱ्यांतील कन्याशाळा. सरकाराकडून व महिलाविद्यापीकडूनही ज्यांना मदत मिळते अशा माध्यमिक शिक्षणाच्या शाळा म्हटल्या म्हणजे मालवणची कन्याशाळा, बेळगांवचें महिलाविद्यालय व सुरतचें महिलाविद्यालय ह्या होत. केवळ सरकारानें चालविलेल्या इंग्रजी चवथ्या इयत्तेपर्यंतच्या शाळा महाराष्ट्रांत फक्त तीनच आहेत, त्या ठाणें नाशिक व अहमदनगर येथल्या विद्यापीठाच्या मदतीनें व कांहीं केवळ प्रोत्साहनानें चाललेल्या अशा प्रकारच्या शाळा म्हटल्या म्हणजे रत्नागिरीची कन्याशाळा, वाईतील कन्याशाळा, सोला-पुरच्या सरस्वती–मंदिरानें चालविलेली कन्याशाळा, मुंबईच्या वनिता-विश्रामाचें मिडल स्कूल व मुंबईची नाथीबाई ठाकरसी कन्याशाळा ह्या होत.

सरकारच्या मदतीनें किंवा त्या मदतीवांचूनही मुलांचीं हायस्कुलें चालविणें हें काम तितकें कठिण नाहीं. कारण मुलांना शिक्षण दिल्यावांचून गत्यंतर नाहीं असें लोकांना वाटत असल्यामुळें मुलांसाठीं बरीच मोठी फी देण्याची पालकांची तयारी असते. मुलींच्या हायस्कुलांची अगर मिडलस्कुलांची गोष्ट अगदीं वेगळी आहे. आधीं हें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या मुलींची संख्या फार थोडी, आणि त्या थोड्या मुली देखील जबर फी असेल तर निघून जाणार. अशा स्थितींत स्त्रियांमध्यें माध्यमिक शिक्षणाचा प्रसार कसा व्हावा हा मोठा बिकट प्रश्न होऊन बसला आहे. हा प्रश्न अल्पांशानें तरी सोडविण्याचा प्रयत्न विद्यापीठाच्या हातून झाला आहे. सरकारच्या प्रयत्नांनीं स्त्रियांच्या उच्च व माध्यमिक शिक्षणाच्या प्रसाराचें जें कार्य होत आहे त्याला थोडीशी पुस्ती जोडण्याचें काम विद्यापीठानें केलें आहे हें वर दिलेल्या माहितीवरून दिसून येईल. माध्यमिक शिक्षणाचें विद्यापीठानें जें कार्य चालविलें आहे त्याची स्पष्ट कल्पना पुढील कोष्टकावरून होईल.

| अनुक्रम नंबर | शाळेचें नांव | इंग्रजी किती इयत्ता शिकविल्या जातात | विद्यार्थिनींची संख्या | शाळा चालविणाऱ्या मंडळीचें अगर व्यक्तीचें नांव |
|---|---|---|---|---|
| १ | महिलाश्रम, हिंगणें | ७ | १०२ | अनाथ-बालिकाश्रमाची मंडळी. |
| २ | श्री. ना.दा. ठाकरसी क. पुणें. | ७ | ३५० | श्री.ना.दा.ठाकरसी भारतवर्षीय महिला-विद्यापीठ. |
| ३ | जिवकोर वनिताविश्राम अहम. | ७ | १५४ | गुजराथ स्त्री-केळवणी-मंडळ. |
| ४ | महिला-विद्यालय, सुरत | ७ | १९१ | महिला-विद्यालय मंडळ, सुरत. |
| ५ | कन्याशाळा, मालवण | ७ | ४४ | फीमेल एजुकेशन सोसाइटी, मालवण. |
| ६ | कन्याशाळा, सातारा | ७ | ९० | कन्या-शाळा-मंडळ, सातारा. |
| ७ | महाराणी गर्ल्स् हायस्कु.बडोदें. | ६,७ | ३२ | बडोदें संस्थानचें विद्या खातें. |
| ८ | श्री.ना.दा. ठाकरसी क. मुंबई, | ६ | ८२ | श्री. नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला-विद्यालय. |
| ९ | महिला विद्यालय, बेळगांव | ६ | ६० | महिला विद्यालय मंडळ, बेळगांव. |
| १० | टिळक कन्याशाळा, अकोला | ४ | २५ | श्रीयुत कट्टी व सौ. इंदिराबाई कट्टी. |
| ११ | कन्याशाळा, सांगली | ४,५,६ | १५ | कन्याशाळा मंडळ, सांगली. |
| १२ | कन्याशाळा, वाई | ३ | ३५ | कन्याशाळा मंडळ, वाई. |
| १३ | महिला-विद्यालय, रत्नागिरी | ३ | १३ | श्रीयुत ज. वा. जोशी व सौ. आनंदीबाई जोशी. |
| १४ | महिला-विद्यालय, भावनगर | ७ | ६३ | कांहीं उत्साही गुजराथी मंडळी. |
| १५ | कन्याशाळा, सोलापुर | ४ | ५५ | सरस्वती-मंदिर संस्था. |
| १६ | वनिताविश्राम इं. स्कुल, मुंबई | ४ | ४८ | वनिता-विश्राम संस्था. |
| | | एकूण | १३५९ | |

प्राथमिक शिक्षणालाही—सागरांत बिंदु या न्यायानें कां होईना—हात-भार लावण्याचें काम हें विद्यापीठ करीत आहे. मुलींच्या प्राथमिक शाळां-साठीं शिक्षकिणी तयार करण्यासाठीं हिंगण्याची अध्यापिका—शाळा यत्न करीत आहे व त्या शाळेला विद्यापीठाकडून मदत मिळत असून विद्या-र्थिनींची परीक्षा घेण्याचें काम विद्यापीठच करीत आहे. या परीक्षांना सर-कारी मान्यता मिळण्याची खटपट चालू असून ती बहुतेक यशस्वी झाली आहे. सरकारी अधिकारी व विद्यापीठाचे प्रतिनिधि या उभयतांचे विचारानें ठरलेल्या अटींना येत्या जूनमध्यें विद्यापीठाच्या सेनेटकडून मंजुरी मिळाली म्हणजे अध्यापिका—शाळेतून बाहेर पडणाऱ्या शिक्षकिणींच्या अडचणी दूर होतील आजपर्यंत या शाळेंतून पास होऊन निघालेल्या ४४ शिक्षकिणी आहेत व त्या कोणत्या—ना कोणत्या तरी प्राथमिक शाळांत काम करीत आहेत.

इंग्रजी भाषेच्या अवजड दडपणाखालीं व मॅट्रिक्युलेशन आणि बी. ए. हें ध्येय ठरवून चाललेल्या स्त्रियांच्या उच्च आणि माध्यमिक शिक्षणाचा प्रसार व्हावा तितका आणि व्हावा तितक्या वेगानें होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें दास्य-वृत्तींत मुरलेल्या आम्हां लोकांमध्यें सरकारच्या पाठिंब्यावाचून व मदती-वांचून स्त्रियांच्या उच्च आणि माध्यमिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणा-वर होण्याची आशा नको. हिंदुस्थानांत आज तरी शेंकडा ९० स्त्रियांचे हें शिक्षण आर्थिक स्वातंत्र्यासाठीं—नौकरीसाठीं—नसून केवळ ज्ञानार्जनासाठीं आहे. घरबसल्या करितां येण्यासारख्या धंद्याचें शिक्षण स्त्रियांना मिळेल तर तेंही जरूर पाहिजे. पण ह्या गोष्टीकडे कोणाचें लक्ष नसून पुरुषांप्रमाणेंच बी. ए., एम्. ए. होण्यासाठींच थोड्याशा स्त्रियांची धडपड चालली आहे व त्याच शिक्षणाला सरकारचें, सरकारी अधिकाऱ्यांचें आणि धनिकांचें पाठबळ मिळत आहे, पण पुष्कळांच्या उपयोगीं पडणाऱ्या कमी श्रमांच्या आणि विशेष जरूरीच्या शिक्षणाकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. तरी इंग्रजी भाषेनें आणि सरकारमान्य परीक्षांनीं ज्यांना मोहिनी घालून वेडें करून सोडलें नाहीं अशा मंडळींनीं योग्य विचार करून सरकारचें पाठबळ आणि सरकारची मदत स्त्रियांच्या योग्य शिक्षणाच्या प्रसारासाठीं मिळेल असे प्रयत्न ठिकठिकाणच्या कौन्सिलांतून झाले तरच हें स्त्रीशिक्षणप्रसाराचें काम श्वसास लागेल. नाहीं तर हल्लींप्रमाणें मुंगीच्याच पावलांनीं चालावें लागणार.

# प्रकरण नववें

## महिलाविद्यापीठाबद्दल लोकमत

हें अनेक प्रकारांनीं अजमावलें पाहिजे. प्रथमतः विरोधी मतांचा विचार करूं या. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या वचनाला महत्त्व देणाऱ्या जुन्या विचारांच्या लोकांना स्त्रियांचें शिक्षणच मुळीं पसंत नाहीं. सुशिक्षित लोकांमध्यें सुद्धां असा एक वर्ग आहे कीं त्याला प्राथमिक शिक्षणाच्या पलीकडे स्त्रीशिक्षणाची मजल जाऊं नये असें वाटतें. ह्या दोन वर्गांना फारसें महत्त्व देण्याचें कारण नाहीं. ह्यांशिवाय आणखी दोन लहानसे पण वजनदार पक्ष या विद्यापीठाचा विरोध करणारे आहेत. सामाजिक बाबतींत अत्यंत प्रगमनशील असा एक पक्ष आहे. त्याचें मुखपत्र 'इंडियन सोशल रिफॉर्मर' हें आहे व श्रीयुत के. नटराजन् हे त्याचे संपादक आहेत. दुसरा अतिशिक्षित लोकांचा एक वर्ग आहे; त्याचें अमुक एक मुखपत्र आहे असें म्हणतां येणार नाहीं. ह्या दोन पक्षाच्या मतांचा पहिल्यानें उल्लेख करतों. ह्या दोन्ही पक्षांच्या लोकांचें विद्यापीठांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणानें समाधान होत नाहीं. ह्यांपैकीं कित्येकांनीं ह्या चळवळीला द्रव्यद्वारा साहाय्य केलें आहे व व कांहीं थोडे विद्यापीठाच्या सेनेटचे सभासदही होते व असतील. एका गृहस्थांनीं "My heart goes with you but my head is with the Indian Social Reformer" "माझें हृदय तुमच्याकडे जातें, पण बुद्धि इंडियन सोशल रिफार्मरकडे वळते" असे उद्गार काढले होते. इंडियन सोशल रिफॉर्मर मधले कांहीं उतारे आरंभींच्या एका प्रकरणांत दिले आहेत. आणखी कांहीं उतारे येथें दिले असतां त्या पक्षाचें मत कळून येईल.

विद्यापीठाच्या प्रगतीबद्दल एक लहानसा रिपोर्ट रजिस्ट्रार यांनीं प्रसिद्ध केला होता त्यांत पुढील वाक्य होतें:—

"The desirability of a separate University for women is not now an open question and strenuous efforts are being made to make it a success."

" स्त्रियांची स्वतंत्र युनिव्हर्सिटी पाहिजे कीं नको हा प्रश्न आतां वादाचा राहिला नाहीं. ती यशस्वी व्हावी म्हणून नेटाचे प्रयत्न चालू आहेत. "

ह्या रिपोर्टावर टीका करतांना ८ एप्रिल १९१७ च्या रिफॉर्मरमध्यें पुढील वाक्यें आहेतः—

" It is, in the least, inopportune to say that 'the desirability.........open question." It appears rather that the enthusiasm for the moment is distinctly on the wane."

" स्त्रियांची स्वतंत्र युनिव्हर्सिटी पाहिजे कीं नको हा प्रश्न आतां वादग्रस्त राहिला नाहीं " असें म्हणणें निदान अप्रासंगिक तरी आहे. खरी स्थिति अशी आहे कीं या चळवळीच्या उत्साहाला अलीकडे तरी उतरती कळा लागली आहे. "

ता. ८ जुलई १९१७ च्या अंकापासून रिफार्मरच्या लिहिण्याचा रोंख थोडा बदलला. त्यापूर्वी नुकतीच मुंबई इलाख्यांतील शिक्षक लोकांची परिषद् मुंबईस भरली होती त्या परिषदेंत विद्यापीठाच्या अभिनंदनपर ठराव पास झाला होता. त्याला अनुलक्षून ८ जुलैच्या अंकांत पुढील वाक्यें आहेत.

" We are glad to join in the welcome accorded to Prof. Karve's Women's University and in the hope that, that experiment will prove a success. The need for facilities for women's education is so vast and pressing that it is foolish to pin our faith in any one plan and method. Numerous and repeated expriments are necessary to determine what the best and most suitable scheme is in the conditions of the country."

"प्रो. कर्वे यांनीं काढलेल्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचें जें अभिनंदन करण्यांत आलें व ती यशस्वी व्हावी अशी जी इच्छा प्रदर्शित करण्यांत आली तिला आम्ही आनंदानें दुजोरा देतों. स्त्रियांच्या शिक्षणाच्या सोई करणें हें कार्य इतकें व्यापक आणि निकडीचें आहे कीं एकादी विशिष्ट पद्धतीच किंवा योजनाच चांगली असा आग्रह धरून बसणें मूर्खपणाचें होईल. चालू परिस्थितींत शिक्षणाची कोणती योजना सर्वांत चांगली व उपयुक्त

होईल हें ठरविण्याकरितां भिन्न भिन्न प्रयोगांची जरूरी आहे व ते पुनः पुनः केले पाहिजेत."

"We are opposed, and have been so all along, to the idea of a separate University for Women. The sole object of a University is the promotion and advancement of learning. There is no sex in knowledge. A separate Women's University has always seemed to us to be reminiscent of the mediæval Hindu prohibition of sacred learning to women and Sudras—a prohibition based on a conception that has degraded the position of women in Hindu Society."

(*The Indian Social Refomer*, 20th July, 1920)

"स्त्रियांकरितां स्वतंत्र विश्वविद्यालय असावें या कल्पनेला आमचा पूर्वीपासूनच विरोध होता, व आजही तो तसाच आहे. कोणत्याही विश्वविद्यालयाचा मुख्य व एकच हेतु म्हणजे ज्ञानाची प्रगति व अभिवृद्धि हा होय. ज्ञान हें स्त्रीपुरूष भेद ओळखीत नाहीं. मध्ययुगीन स्त्रिया व शूद्र यांना वेदाध्ययनाची बंदी केल्याची आठवण हें स्त्रियांचें स्वतंत्र विद्यापीठ आज आम्हांस करून देत आहे. वरील बंदीच्या मुळाशीं जी मनोभावना होती तिच्यामुळेंच समाजांत हिंदु स्त्रियांचा दर्जा कमी होत गेला." (इंडियन सोशल रिफॉर्मर, २० जुलै १९२०)

"Sir Hormasji Wadya, presiding at the last annual meeting (Opening Ceremony) of the Poona Women's University, laid his finger on the weak spot of the Institution when he advised the College Authorities to give due and proper attention to the study of the English language and literature which must, he said, remain the *lingua franca* of the Indian nation for a long time to come, and which, therefore, deserved to be studied more carefully than merely as a second language. Professor Karve, in thanking Sir Hormusji, is reported to have regretted very much 'the lack of appreciation and moral courage on the part of the people,' who, he said, were still unwilling to take advantage of the facilities provided by the Indian Women's University for women's education. Experiments must continue to be made in

education, and Prof. Karve's experiment was well worth making if only to show that, in modern India, the idea of having a separate system of education for women, has no chance of acceptance. Those who are really earnest about giving the best education to their daughters naturally prefer to send them to institutions affiliated to the recognized Universities. Prof. Karve's claim that he was providing a national system has been superseded by the *Charka* school of educationists. It has also since become known that the majority of women students in Japan attend the same Universities as men* and that the Japanese Women's University is no more typical of Japanese, than Prof. Karve's of Indian, Women's aspirations. Instead of chiding the public for their 'lack of moral courage'—where does moral courage come in, we wonder—Prof. Karve would do well to adopt Sir Hormusji's suggestionφ which has all along been also ours, and convert his University into a Women's College affiliated to the Bombay University. A good college is better than a donbtful University.

( *The Indian Social Refoomer, 30th June, 1923* )

---

*Taking this to be the correct estimate, it must not be forgotten that Japanese language is the medium of instruction in men's Universitie in Japan. The Women's University of Tokyo also is still prospering. Its Silver Jubilee or the twentyfifth anniversary is going to be celebrated in this month ( April 1928 ) and in this connection an Exhibition is going to be held to show the work of modern women in all countries of the world in its various phases-literature, art, sciencc, politics, economics, education, music, religion, social service &c. An Indian Section of this exhibition is being organised and madam Yuki Hirota is in charge of this section. All this is being done by the Japan Women's University.

φ Sir Hormasji's suggestion is simply to pay more attention to the study of English than what is given to a second language and that is being done.

" पुणें येथील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या गेल्या वार्षिक सभेचे ( कॉलेजाच्या इमारतीच्या प्रवेशसमारंभाचे ) अध्यक्ष सर होर्मसजी वाडिया यांनीं इंग्रजी भाषा ही आणखी बरेच दिवस तरी हिंदी राष्ट्राची विचारविनिमयाची सर्वसामान्य भाषा राहणारच, व याकरितां त्या भाषेचा केवळ दुय्यम भाषा म्हणून होत असलेल्या अभ्यासापेक्षां जास्त काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे असा कालेजच्या अधिकाऱ्यांना उपदेश केला; असें करण्यांत त्यांनीं या संस्थेच्या दोषस्थळाचें नेमकें दिग्दर्शन केलें आहे. सर होर्मसजी वाडिया यांचे आभार मानतांना प्रो. कर्वे यांनीं भारतवर्षीय महिलाविद्यापीठानें स्त्रियांच्या शिक्षणाकरितां ज्या कांहीं सोई केल्या आहेत त्यांचा फायदा घेण्यास लोक अद्याप नाखुष असून त्यांमध्यें नैतिक धैर्याचा व गुणग्राहकत्वाचा जो अभाव दिसून येतो त्याबद्दल आपणास वाईट वाटतें असें म्हटल्याचें प्रसिद्ध झालें आहे. शिक्षणांत प्रयोग हे चालू असलेच पाहिजेत, व स्त्रियांकरितां स्वतंत्र अभ्यासक्रमाची जरूरी आहे ही कल्पना आधुनिक हिंदुस्थानाला ग्राह्य होण्यासारखी नाहीं हें दाखविण्याकरितां तरी प्रो. कर्वे यांनीं चालू केलेला प्रयोग करून पाहणें जरूर होतें. आपल्या मुलींना शक्य तितकें उत्तम शिक्षण द्यावें असें ज्यांना उत्कटतेनें वाटतें त्यांना साहजिकच आपल्या मुलींना सरकारी मान्यता असलेल्या विश्वविद्यालयांना जोडलेल्या शिक्षण–संस्थांतच पाठविणें अधिक आवडतें. आमचें शिक्षण म्हणजे राष्ट्रीय शिक्षण असें म्हणण्याचा प्रोफेसर कर्वे यांचा अधिकार आतां चरकापंथी शिक्षण–शास्त्रज्ञांनीं हिरावून घेतला आहे. अलीकडे सर्वांना हेंही कळून आलें आहे कीं, जपानांत विद्यार्थिनींपैकीं बऱ्याचशा विद्यार्थिनी पुरुषांकरितां निघालेल्या विश्वविद्यालयांतच जातात.* आणि प्रो. कर्वे यांचें विश्वविद्यालय हिंदी स्त्रियांच्या

* ही गोष्ट खरी असें धरून चाललें तरी जपानांत पुरुषांच्या युनिव्हार्सिटींत देखील जपानी भाषा हीच बोधभाषा आहे हें विसरतां कामा नये. शिवाय तेथील स्त्रियांच्या युनिव्हार्सिटीचें कामही चांगलें चाललें आहे. ह्याच महिन्यांत (एप्रील १९२८) त्या युनिव्हर्सिटीच्या रौप्य जुबिलीचा म्हणजे पंचविसावा वार्षिक समारंभ होणार आहे. ह्या निमित्तानें सगळ्या जगांतील स्त्रियांच्या कामाचें प्रदर्शन भरणार आहे. हीं कामें वाङ्मय, कलाकौशल्य भौतिक अगर आधिभौतिक शास्त्रें, राजनीति, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, गायनवादन, धर्म, समाजसेवा इत्यादि विषयांच्या संबंधानें

आकांक्षांना जितपत यथार्थतेनें मूर्त स्वरूप देणारें आहे, तितपतच जपानी स्त्रियांच्या आकांक्षांना जपानमधील स्त्रियांची युनिव्हर्सिटी मूर्त स्वरूप देणारी आहे. नैतिक धैर्याच्या (पण येथें नैतिक धैर्याचा प्रश्न येतो कसा कोणास ठाऊक!) अभावाबद्दल लोकांना दोष देण्यापेक्षां प्रो. कर्वे यांनीं सर होर्मसजी वाडिया यांनीं केलेली सूचना+ (व तीच सूचना आम्हीही आजपर्यंत सारखी करीत आहों.) मान्य करून आपल्या युनिव्हर्सिटीचें रूपान्तर स्त्रियांच्या कालेजांत करून तें मुंबई युनिव्हर्सिटीला जोडून टाकणें फार बरें. नांवाच्या विश्वविद्यालयापेक्षां सुव्यवस्थित रीतीनें चाललेलें कॉलेज फार बरें." (इंडियन सोशल रिफॉर्मर, ३० जून १९२३.)

"From the first, we have made no secret of our opinon that the Women's University represented a retrograde step in the movement for the elevation of the status of women in this country to something like equality with men. The education proposed to be given in it was planned to suit the prejudices of the average Indian...This concession to popular prejudice, however, has not helped to popularise the University, which after so many years and so much propaganda, has on its rolls fewer women than are to be found in the Fergusson and New Poona College. The fact is that those who think of the education of women at all seriously prefer the established Universities where at any rate the idea of the intellectual disparity between men and women is not emphasised as in the Women's University.*

The only other argument used to justify a separate Women's University in this Presdidency....was that the Vernaculars could be used as the media of Instrucation...In the initial stage, the

---

असावीं असें योजिलें आहे. ह्या प्रदर्शनांत हिंदुस्थानासाठीं एक वेगळा भाग राखून ठेविला आहे. या भागाची व्यवस्था मॅडम यूकी हिरोटा यांजकडे आहे. हा सर्व खटाटोप जपानांतील स्त्रियांची युनिव्हर्सिटी करीत आहे.

+ सर होर्मसजी यांची सूचना फक्त इंग्रजीकडे अधिक लक्ष देण्याबद्दलची होती व तसें लक्ष दिलेंही जात आहे.

* The Women's University does *not* emphasise the idea.

Verneulars are the media of instruction in all secondary schools almost up to the Matriculation standard, and as for higher education of the Indian people, Mr. Fisher agrees with Dr. R. P. Paranjpye and Sir M. B. Chaubal that " English must always hold an important place+ as being the one language common to the whole Indian Continent, but also as being a modern world language capable of expressing all the latest ideas in Pure and Applied Sciencs." Speaking of Dr. Paranjpye, it is a curious paradox that the Vice-Chancellor of the Women's University is a strong opponent for separte colleges for women in affiliation with the Bombay University...In our opinion, whatever justification there might have been for the Women's University ten years ago, there is none at all at present when the Bombay University is making its courses of study more varied and elastic. The Women's University in Poona can best become a college affiliated to the proposed Poona University. It is hardly worth while to maintain a separate University for the sake of 20 or 25 girls. The large sum of money at present spent on the University can better be utilised by making special provision in the Poona University for facilities for women students."

( *The Indian Social Reformer*, 4th July 1925 )

" स्त्रियांचा दर्जा वाढवून तो सामान्यतः पुरुषांच्या दर्जाइतका वर न्यावयाचा एतदर्थ जी चळवळ या देशांत चालू आहे तिचे दृष्टीनें स्त्रियांची युनिव्हर्सिटी ही मार्गे पाऊल टाकणारी संस्था आहे असें आम्हांस वाटतें, व तसें तें आम्ही प्रथमपासूनच उघड उघड म्हणत आलों आहों. तींत द्यावयाच्या शिक्षणाची योजना अशी केलेली आहे कीं ती सामान्य हिंदी माणसाच्या पूर्वग्रहांना प्रिय व्हावी. परंतु अशा तऱ्हेच्या लोकछंदानुवर्तनानेंहि ही युनिव्हर्सिटी लोकप्रिय होण्याला मदत झालेली दिसत नाहीं.

+ There is no difference of opinion among the promoters of the Indian Women's University. Keeping modern Indian languages as media of instruction they have giveh an important place to tne study of English.

कारण इतक्या कालावधीनंतर व त्या कल्पनेच्या प्रसाराची इतकी खटपट झाल्यानंतरही फर्ग्युसन कालेज व न्यू पूनाकालेज यांत असलेल्या विद्यार्थिनींच्या संख्येइतकी संख्याही आज तिच्या पटावर नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं, जे कोणी स्त्रियांच्या शिक्षणाचा थोड्या तरी गंभीरतेनें विचार करतात ते आपल्या मुलींना सर्वमान्य झालेल्या युनिव्हर्सिटीमध्येंच पाठविण्याचें पसंत करतात, कारण या संस्थांचे योगें स्त्रीपुरुषांमध्यें बौद्धिक दृष्ट्या भेद आहे या कल्पनेला—स्त्रियांच्या युनिव्हर्सिटींत जसें महत्त्व दिलें जातें + तसें दिलें जात नाहीं.

या इलाख्यांत स्त्रियांकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी पाहिजे हें सिद्ध करण्याकरितां दुसरें एकच कारण सांगण्यांत येत असतें आणि तें हें कीं, त्या युनिव्हर्सिटींत मातृभाषांचा बोधभाषा म्हणून उपयोग करितां येईल......सुरुवातीला सर्व दुय्यम शाळांतून जवळ जवळ मॅट्रिक्युलेशनपर्यंत मातृभाषा याच बोधभाषाही असतात; पण हिंदी लोकांच्या उच्च शिक्षणाविषयीं पाहिलें तर मि. फिशर यांचें डॉ. आर्. पी. परांजपे व सर एम्. बी. चौबळ यांच्या सारखेंच असें मत आहे कीं, इंग्रजी ही सर्व हिंदी राष्ट्राची एकच सर्वसामान्य भाषा आहे एवढेंच नव्हे तर ती सर्व तात्विक व व्यावहारिक शास्त्रांतील नवीन नवीन कल्पना व्यक्त करूं शकणारी सर्व आधुनिक जगाची भाषा आहे म्हणून त्या भाषेला महत्त्वाचें स्थान मिळालें पाहिजे. * डॉ. परांजपे यांचें नांव वर आलें त्यावरून आम्हांला येथें सहज म्हणावेंसें वाटतें कीं, मुंबई युनिव्हर्सिटीला जोडूनच परंतु स्त्रियांकरितां स्वतंत्र कॉलेज काढण्याच्या कल्पनेला विरोध करणारे गृहस्थ यायुनिव्हर्सिटीचे व्हाइसचान्सलर असावेत ही एक विलक्षण विसंगतिच आहे. आमच्या मतें स्त्रियांकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढणें कदाचित् दहावर्षांपूर्वी समर्थनीय झालें असेल परंतु आतां मुंबई युनिव्हर्सिटी आपल्या अभ्यासक्रमांत अधिक अधिक विविधता व लवचिकपणा आणण्याचा प्रयत्न करीत असतां, स्त्रियांकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी चालू ठेवण्याला कांहीं ही कारण नाहीं. पुणें येथील

---

+हें खरें नाहीं.

* याबदल महिला विद्यापीठाच्या चालकांचा मतभेद नाहीं. मातृभाषा या बोधभाषा ठेवून इंग्रजीला महत्त्वाचें स्थान त्यांनीं दिलें आहे.

स्त्रियांची युनिव्हर्सिटी ही भावी पुणें विश्वविद्यालयाला जोडलेलें एक कॉलेज झाल्यास उत्तम. वीस पंचवीस मुलींकरितां एक स्वतंत्र युनिव्ह-र्सिटी चालविणें यांत मुळींच हांशील नाहीं. हल्लीं या युनिव्हर्सिटीवर जो पुष्कळसा पैसा खर्च होत आहे त्याचा विनियोग पुणें विश्वविद्यालयामध्यें विद्यार्थिनींकरितां विशेष सोई करण्याचे कामीं केला गेला तर तो अधिक चांगला." ( इंडियन सोशल रिफॉर्मर ता. ४ जुलई १९२५. )

"Sir Moropant Joshi's address at the annual function held last Sunday to confer degrees on about half a dozen women students of the Poona Women's University, was in the nature of a special pleading for that institution. His position demanded Sir Moropant to speak up for the University, but his encomium was not warranted by the figures which he himself quoted. If after strenuous propaganda work carried on all over India, in season and out of season, to enlist students for it, ÷ the institution can only show 40 students on its roll after nearly a decade of its existence, it can be valued only as a failure. Either the ideal of the Indian Women's University in which the 'fictitious importance' attached to English in the other Universities has been transferred to wifehood and motherhood, does not appeal to the generality of women or they are averse to being shunted off from the common track of education. Sir Moropant thinks that Indian Women's education should accomodate itself to the fact that every Indian woman gets a chance to marry. It should be rather considered a healthy and welcome sign if our women do not look upon marriage as an economic necessity. It is not intelligible why some people are anxious to show that the Indian Women's University is the last word in Indian Women's education. As a matter of fact many a member who holds high and responsible position in the Senate of that Univer-

÷ Propaganda is for rousing people to think of the desirability of a departure from the established routine and to collect subscriptions and not for enlisting students.

sity takes care to send his daughter or ward to the recognized University. The Indian public may not condemn an institution outright, but they are too wise to mistake the chaff for the grain.ϕ Our contention is, let us not set a limit to the women's progress× and let us not say to her thus far shalt thou go and no further in the domain of education. We have no quarrel with the Women's University, but we take serious exeption to the attempt made to exalt it beyond its actual merits."

(*The Indian Social Reformrd*-3rd July 1926.)

"पुणें येथील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या सुमारें अर्धा डझन विद्यार्थिनींना पदव्या देण्यासाठीं गेल्या रविवारीं जो समारंभ झाला त्या प्रसंगीं सर मोरोपंत जोशी यांनीं केलेलें भाषण त्या संस्थेचें कसेंही करून समर्थन करण्याकरितां होतें. तें ज्या स्थानावरून बोलत होते त्या स्थानावरून युनिव्हर्सिटीला अनुकूल असें भाषण करणें त्यांस प्राप्तच होतें. परंतु त्यांनीं जी स्तुति केली त्या स्तुतीला त्यांनींच दिलेल्या आंकड्यांचा विशेष आधार नव्हता. विद्यार्थिनी मिळविण्याकरितां सर्व हिंदुस्थानभर वेळीं अवेळीं परिश्रमपूर्वक प्रचारकार्य * करूनही व दहा वर्षांच्या अवधीनंतरही या युनिव्हर्सिटीला आपल्या पटावर ४० विद्यार्थिनींपेक्षां अधिक नांवें दाखवितां येत नसतील तर हा प्रयत्न अयशस्वी झाला असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. दोहोंपैकीं एक कोणतें तरी खरें असलें पाहिजे—एक इतर युनिव्हर्सिट्यांमध्यें जें इंग्लिश भाषेला कृत्रिम महत्त्व देण्यांत येतें तें तेथून काढून पत्नीत्व व मातृत्व यांना

---

ϕ I am very doubtful whether the public can be credited with such discriminating powers. Even educated people show a lamentable want of this power. It is rather the tendency to go along the trodden path that keeps away people from new experiments.

× No responsible promoter of the Women's University is for putting such a limit.

* प्रचार कार्य हें छापी ठरीव पद्धतीहून वेगळ्या पद्धतीच्या अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे ह्याविषयीं लोकांना विचार करावयास लावण्यासाठीं व वर्गण्या मिळविण्यासाठीं असून विद्यार्थिनी मिळविण्यासाठीं नसतें. विद्यार्थिनी मिळविणें हें सोपें काम नसतें तें क्रमाक्रमानें हळुहळु व्हावयाचें असतें व ते होतही आहे.

देण्यांत यावें अशा प्रकारचें भारतवर्षीय महिलाविद्यापीठाचें ध्येय सामान्य स्त्रीला पसंत नसलें तरी पाहिजे अगर शिक्षणाचा; सामान्यतः चोखाळलेला मार्ग सोडून देऊन आपणांस एका बाजूला सारण्यांत यावें हें तरी त्यांना अमान्य असलें पाहिजे. सर मोरोपंत यांचें मत असें दिसतें कीं ज्याअर्थी प्रत्येक स्त्रीला लग्न करण्याची संधि मिळते त्याअर्थी या गोष्टीला अनुरूप होईल असें त्यांचें शिक्षण असावें. विवाह हा आर्थिक दृष्टीनें जरूर आहे असें आमचा स्त्रीवर्ग न मानील तर तें त्यांच्या मनाच्या जोमदारपणाचें चिन्ह होईल. हिंदी स्त्रियांचे शिक्षणाचे बाबतींत भारतवर्षीय महिलाविद्यापीठानें जें कांहीं केलें आहे त्याहून आतां अधिक करण्याचें राहिलें नाहीं असें दाखविण्याचा कांहीं लोक कां प्रयत्न करितात हें समजणें कठिण आहे. खरी गोष्ट सांगावयाची म्हणजे या युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्यें उच्च व जबाबदारीच्या स्थानांवर असलेले बरेच सभासद स्वतःच्या मुलीबाळींना सरकारनें मान्यता दिलेल्या युनिव्हर्सिटयांमध्यें घालण्याची खबरदारी घेतात. हिंदी जनता एखाद्या संस्थेला निखालस त्याज्य समजणार नाहीं, पण दाणा व तूस यांतील भेद ओळखण्याइतकें शहाणपण तिच्यांत आहे.* आमचें म्हणणें असें आहे कीं, आपण स्त्रियांच्या गतीला मर्यादा न घालतां शिक्षणाचे बाबतींत त्यांना 'येथपर्यंतच तुम्ही जा पुढें जातां कामा नये' असें म्हणण्याचें सोडून देऊं या.× भारतवर्षीय महिलाविद्यापीठाचे बाबतींत आमचे मनांत कांहीं एक वैषम्य नाहीं. पण तिच्या वास्तविक योग्यतेपेक्षां तिचा जो वाजवीपेक्षां फाजील बडेजाव करण्यांत येतो त्याविरुद्ध आक्षेप घेणें हें मात्र आम्हांस जरूरीचें वाटते." (इंडियन सोशल रिफॉर्मर ३ जुलै १९२६.)

गेल्या डिसेंबरचे अखेरीस मद्रास येथें भरलेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे श्रीयुत के. नटराजन् हे अध्यक्ष होते. त्या वेळीं त्यांनीं केलेल्या भाषणांत पुढील उल्लेख आहे:—

* जनतेला एवढ्या विवेकशक्तीबद्दल सर्टिफिकेट द्यावें कीं काय ह्याविषयीं मला बरीच शंका आहे. सुशिक्षितांमध्येंही ह्या विवेकशक्तीचा अभाव दिसून येतो. मळलेल्या वाटेनें जाण्याची प्रवृत्तिच पुष्कळांना नवीन प्रयागांपासून दूर ठेविते.

× ही गोष्ट महिला विद्यापीठाच्या चालकांस सर्वस्वी कबूल आहे. विद्यापीठाच्या चालकांपैकीं कोणाचेंही मत अशी मर्यादा घालावी असें नाहीं.

" I must not omit to refer here to the Women's University at Hingue Budruk which owes its existence almost entirely to the self-sacrificing zeal of Prof. Karve, whose services to women's cause in India will always be gratefully remembered by social reforerms all over the country. Personally, I hold that, in the present circumstances of our country, when a sort of tradition of women's intellectual inferiority has held sway for many centuries, it is necessary, at least till that tradition is wholly destroyed, to make no distinction in the courses of study especially in the higher education open to men and women. I have therefore been all along rather sceptical in my appreciation of the idea of a separate University with an altogether different curriculum of studies for women. But I have always acknowledged that every method and every system which promises to bring the benefits of education of some kind to girls and women who would otherwise go without them, is to be welcomed; and from that point of view the Women's University is a very valuable and interesting experiment."

" प्रो. कर्वे यांच्या स्वार्थत्यागपूर्वक उद्योगामुळेंच अस्तित्वांत आलेल्या हिंगणें बुद्रुक येथील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचा उल्लेख करण्याला मी विसरतां कामा नये. हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या उन्नतीप्रीत्यर्थ प्रो. कर्वे यांनीं केलेल्या कामगिरीचें स्मरण सर्व देशभर समाजसुधारक नेहमीं कृतज्ञतापूर्वक करतील. परंतु देशाच्या चालू परिस्थितींत स्त्रिया बौद्धिक दृष्टया पुरुषांपेक्षां कमीच आहेत असें मानण्याच्या एका प्रकारच्या प्रघातार्चे शेंकडों वर्षें समाजांत प्राबल्य असतां, तो प्रघात पूर्णपणें नाहींसा होईपर्यंत तरी स्त्रीपुरुषांसाठीं नेमलेल्या अभ्यासक्रमाचे बाबतींत–विशेषतः उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रमाचे बाबतींत–कांहींहि फरक न करणें अवश्य आहे असें माझें मत आहे. आणि म्हणूनच आतांपर्यंत स्त्रियांकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी असावी व त्यांच्याकरितां नेमावयाचा अभ्यासक्रमहि स्वतंत्र असावा या कल्पनेचें मूल्य निश्चित करतांना मी जरा संशयवृत्ति दाखवीत आलों आहें. परंतु मी नेहमीं असें म्हणत आलों

आहे कीं, योजना किंवा पद्धति कोणतीही असो, शिक्षणाचे फायदे एरवीं ज्या मुलींना किंवा स्त्रियांना मिळणें शक्य झालें नसतें त्यांना एखाद्या पद्धतीमुळें किंवा योजनेमुळें ते मिळत असल्यास तिचा आपण खुषीनें स्वीकार करावा. आणि याच दृष्टीनें स्त्रियांची युनिव्हर्सिटी हा एक अत्यंत उपयुक्त व चित्ताकर्षक प्रयोग आहे यांत शंका नाहीं.

आश्रमाच्या संस्थेपुरती पुनर्विवाहाविषयीं तटस्थ वृत्ति पत्करून मी विधवाशिक्षणाच्या कार्याकडे आपलें सामर्थ्य खर्चीं घालूं लागलों त्या वेळीं कांहीं सुधारक मंडळी मजवर रुष्ट होऊन, आतां हे पुनर्विवाहाचा द्वेष करितात व यांच्या संस्थेंतील मंडळी पुनर्विवाहाच्याविरुद्ध बाजूला विधवांचीं मनें वळवितात, अशा अर्थाचे आरोप करून हे पुनर्विवाहाच्या कार्याचें नुकसान करीत आहेत असें लोकांना भासवूं लागले तसलाच प्रकार माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांपैकीं शेंकडा पाउणशें स्त्रियांना माझ्या समजुतीनें अधिक उपयोगी होईल अशा अभ्यासक्रमाची योजना करून तिच्यासाठीं मी उत्साहानें काम करूं लागल्याबरोबर स्त्रीपक्षपाती वर्गांपैकीं कांहींचा झाला. यांनीं हें प्रतिगामी धोरण आंखलें आहे, यामुळें उच्च स्त्रियांच्या शिक्षणाचें पाऊल मागें पडणार आहे, स्त्रियांचा दर्जा कमी होणार आहे, स्त्रिया बुद्धीनें कमी असें यांचें मत असल्यामुळें यांनीं त्यांच्यासाठीं कमी दर्जाचा अभ्यासक्रम आंखला आहे, वगैरे गोष्टी ते प्रतिपादन करूं लागले. ज्याप्रमाणें पुनर्विवाहाच्या कार्याबद्दल माझ्या विचारांत यत्किंचित्‌ही फरक न पडतां मी विधवाशिक्षणाच्या कार्याला लागलों त्याचप्रमाणें स्त्रियांच्या उन्नतीबद्दलच्या विचारांत यत्किंचित्‌ही फरक न पडतां मी हें कार्य हातीं घेतलें आहे. स्त्रियांच्या हक्कांचा अगर दर्जाचा प्रश्न उद्भवला असतां मी कोणाला हार जाईन असें मला वाटत नाहीं. स्त्रिया बुद्धीनें कमी आहेत असें माझें मत बिलकूल नाहीं व या विद्यापीठाच्या इतर चालकांचेंहि नाहीं. पण आज शेंकडा ऐंशीं तरुणांना जसें अत्यंत निरुपयोगी शिक्षण मिळत आहे त्याचप्रमाणें शेंकडा ऐंशीं स्त्रियांना निरुपयोगी शिक्षण मिळत आहे. पुरुषांच्या शिक्षणांत फेरफार घडवून आणणें दूरापास्त आहे पण स्त्रियांच्या शिक्षणांत फेरफार घडवून आणणें तितकें दूरापास्त नाहीं. ह्यासाठीं ह्या दुसऱ्या कामांत मी धडपड करूं लागलों आहें. पुनर्विवाहाच्या कार्यासाठीं

अनेकांनीं अनेक खटपटी केल्या पण जनता तें मान्य करीत नाहीं म्हणून तें कार्यच अयोग्य अगर अनिष्ट असें म्हणणें आणि वेळीं अवेळीं या योजनेचा सगळ्या देशभर प्रसार होत असतां जनता तिचा फायदा घेत नाहीं ह्यासाठीं ती योजनाच अयोग्य असें अनुमान काढणें ह्या दोन गोष्टी तर्कशास्त्राच्या दृष्टीनें सारख्याच योग्यतेच्या ठरतील. * समाजाला जी गोष्ट ग्राह्य होत नाहीं ती त्याज्य असें ठरवावयाचें असल्यास कोणतीहि सुधारणा घडून यावयास नको. दहा बारा वर्षें धडपड झाल्यानंतरहि शिकणाऱ्या विद्यार्थिनी या योजनेकडे वळत नाहींत याचें कारण ही योजना अयोग्य हेंच असलें पाहिजे असें नाहीं. लोक सामान्यतः गतानुगतिक–रुळलेल्या मार्गानें जाणारे–असतात. नवीन मार्ग राजमार्ग झाला आहे हें दिसल्यावांचून ते त्याच्यावर पाऊल टाकीत नाहींत. नवीन मार्ग राजमान्य होण्याला दीर्घकालावधि लागत असतो. सरकारनें जर उद्यां जी. ए. ची. योग्यता नोकरीच्या दृष्टीनें बी. ए. च्या बरोबरीची ठरविली तर मुंबई युनिव्हर्सिटीकडे किती विद्यार्थिनी वळतील हें अनुमान काढण्याला मोठा तर्कशास्त्रज्ञ नको आहे. विद्यार्थिनींचा ओघ ह्या बाजूला कां वळत नाहीं ह्याचीं कारणें शोधून काढण्याला फारसें खोलांत शिरण्याचें कारण नाहीं. तीं अगदीं उघड उघड आहेत. सरकारी मान्यता मिळाली तर ह्या विद्यापीठाचा मार्ग बराच सुलभ होईल, पण ती मिळाली नाहीं तरी देखील अगदीं निराश होण्याचें कारण नाहीं. कालेंकरून ह्या विद्यापीठाचा उपयोग करून घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या वाढेल अशी मला खात्री आहे. एवढेंच नव्हे तर

---

* जनताचशी काय पण सुशिक्षित मंडळी देखील रूढीच्या—मग ती रूढि सामाजिक बाबतींतली असो कीं नैतिक बाबतींतली असो पलीकडे जाऊन ग्राह्याग्राह्यतेचा विचार करून कितपत वागतात ह्याबद्दल बरीच शंका आहे. ज्ञानासाठीं जे शिकत असतील त्यांजबद्दल प्रश्न नाहीं. परंतु कर्ज काढून सुद्धां सर्वांनीं बी. ए. च्या आणि एल्. एल्. बीच्या पाठीस लागावें ह्यावरून काय दिसून येतें? एक चाळीस पन्नास रुपये पगाराची जागा झाली असतां शेकडो बी. ए. लोकांच अर्ज यावेत याला काय म्हणावें? इंदूर संस्थानांत गेल्या सप्टेंबर महिन्यांत न्यायखात्यांतल्या सहा जागा भरावयाच्या होत्या त्यांच्यासाठीं एल्. एल्. बी. आणि बॅरिस्टर यांचे अकरांशाहून अधिक अर्ज आले होते ही गोष्ट काय दाखविते?

स्त्रियांच्या माध्यमिक व उच्च शिक्षणाचा बराचसा भाग हें विद्यापीठ व त्या नमुन्यावर निघणारीं दुसरीं विद्यापीठें बळकावून बसतील अशी मला उमेद आहे. तथापि उलट अनुभव येऊन विद्यापीटाच्या हातून कांहीं कार्य होत नाहींसें झाल्यास कांहीं मित्रांच्या सल्ल्याप्रमाणें ह्या संस्थेला मुंबई युनिव्हर्सिटीचें कॉलेज बनविण्यालाही मी तयार होईन. पण तसें करण्यापूर्वी अगदीं नाइलाज होईपर्यंत मी आपली शिकस्त केल्यावांचून राहणार नाहीं.

आतां दुसरा लहानसा पण अतिशिक्षित आणि वजनदार लोकांचा पक्ष काय म्हणतो तें पाहूं. या पक्षाचें मत कळण्याला एक चांगलें साधन आहे. मुंबई सरकारनें १९२४ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीच्या सुधारणेचा विचार करून सूचना करण्यासाठीं कमिटी नेमिली होती. त्या कमेटींत पुढील चवदा गृहस्थ होतेः--१ सर चिमणलाल सेटलवाड, (चेअरमन), २ डॉ. आर. पी. परांजपे, ३ मि. ए. एल्. कॉव्हर्न्टन (सेक्रेटरी), ४ रे. ई. ब्लॅटर, ५ मि. एम्. आर्. जयकर, ६ मि. एच्. पी. मोदी, ७ मि. के. नटराजन्, ८ कॅ. ई. व्ही. ससून ९ प्रो. के. टी. शहा, १० मि. मिर्झाअल्ली महंमदखान, ११ सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, नाइट; सी. आय्. ई., एम्. बी. ई., १२ सर फाजलभाई करीमभाई, नाइट., १३ मि. ए. बी. लठ्ठे. १४ मि. जे. बी. पेटिट. या कमिटीचें जें मत तेंच या दुसऱ्या पक्षाचें मत असें म्हणण्यास हरकत नाहीं. या कमिटीनें स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या प्रश्नाचा विचार करून आपलें मत दिलें तें येणेप्रमाणें:—

We have had the aims and objects of Mr. Karve's Indian University for Women at Hingne Budruk explained to us by its supporters and we have read the reports of its progress. But a majorty of the witnesses on this subject hold that a separate University for women is wasteful of money and effort and is likely to lower the standard of higher education for women. They think that co-education is a sounder principle at the University stage. Even those who are inclined to support the existing Women's University admit that, if the use of the Vernacular as a medium is in some degree admitted in the colleges of the Uni-

versity of Bombay and if provision of special options for women is made, a separate University is totally unnecessary. We are agreed that a seprate Women's University is wasteful of effort and money, and that a Women's University with the vernacular as its medium is not in the interests of higher education of women in this Presidency, for reasons which appear from what we have already said about the Vernacular in Universities. Moreover, there is no evidence of any real demand for such a form of education."

" हिंगणें बुद्रुक येथील प्रो. कर्वे यांच्या भारतवर्षीय महिलाविद्यापीठाचीं ध्येयें व त्याचे उद्देश यांचें विवरण त्या विश्वविद्यालयाच्या पुरस्कर्त्यांनीं केलें तें आमचेपाशीं असून आम्ही त्याच्या प्रगतीबद्दलचे अहवाल वाचले आहेत. परंतु या विषयावर ज्या गृहस्थांच्या साक्षी घेतल्या त्यांपैकीं बहुसंख्याकांचें मत असें आहे कीं, स्त्रियांकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढणें म्हणजे पैशाचा व श्रमाचा अपव्यय असून त्याच्या योगानें स्त्रियांच्या शिक्षणाचा दर्जा कमी होण्याचा संभव आहे. त्यांच्या मतें विश्वविद्यालयीन शिक्षणावस्थेंत ( स्त्री–पुरुषांचें ) सहशिक्षण हें तत्त्वतः अधिक निर्दोष आहे. अस्तित्वांत आलेल्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचा पुरस्कार करणारेही असें कबूल करतात कीं, मुंबई युनिव्हर्सिटीच्या कॉलेजांमधून मातृभाषेचा बोधभाषा म्हणून कांहीं प्रमाणांत उपयोग करण्याचें मान्य झालें व स्त्रियांकरितां म्हणून अधिक ऐच्छिक विषयांची व्यवस्था केली तर स्त्रियांकरितां निराळें विश्वविद्यालय काढण्याची कांहीही जरूरी नाहीं. आम्हां सर्वांचें मत असें आहे कीं, स्त्रियांकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढणें म्हणजे पैसा व श्रम व्यर्थ दवडण्यासारखें आहे, आणि मातृभाषा हीच जिच्यांत बोधभाषा आहे अशी स्त्रियांची स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढणें या इलाख्यांतील स्त्रियांच्या उच्च शिक्षणाला पोषक होणार नाहीं. विश्वविद्यालयांत मातृभाषेच्या उपयोगासंबंधीं आम्हीं जें कांहीं म्हटलें आहे त्यावरून आमचें वरील मत होण्याचीं कारणें कळून येण्यासारखीं आहेत. शिवाय अशा प्रकारच्या शिक्षणाला खरी मागणी असल्याचा पुरावा नाहीं. "

सामाजिक सुधारणांचे बाबतींतला अत्यंत प्रगमनशील पक्ष व हा दुसरा अतिशिक्षित लोकांचा पक्ष ह्या दोहोंमधील लोकांवर इंग्रजी भाषेनें अशी कांहीं मोहिनी घातली आहे कीं सरसकट सगळ्या विद्यार्थ्यांवर ह्या परकी भाषेचा अवजड बोजा टाकल्यानें जो शारीरिक व मानसिक शक्तींचा अपव्यय होत आहे त्याजकडे त्यांचें लक्षच जात नाहीं. त्यांना, असें वाटतें कीं ज्या योजनेंत इंग्रजीला प्राधान्य नाहीं ती योजना टाकाऊ असलीच पाहिजे. उच्च शिक्षणांत सुद्धां इंग्रजी मुळींच नको किंवा फार तर ऐच्छिक असावी असें म्हणणारेही लोक आहेत. आम्ही मधल्या मार्गानें जाऊं पाहतों.

पदवीदान समारंभाच्या वेळच्या अनेक भाषणांत इंग्रजी भाषेच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष देण्याबद्दल इशारा दिला आहे तो ठीक आहे. इंग्रजी भाषेच्या अभ्यासाला योग्य महत्व दिलें पाहिजे हें मत ह्या विद्यापीठाच्या चालकांपैकीं प्रत्येकाचें आहे. आज ती सगळ्या जगाची भाषा झालेली आहे. खुद्द आपल्या देशांतल्या निरनिराळ्या भागांतील लोकांशीं दळवळण ठेवण्यास ह्या भाषेचा उपयोग होत आहे व तो पुढेंही पुष्कळ वर्षे होत राहील. आज हिंदुस्थान जें एक राष्ट्र बनलें आहे तें इंग्रजी भाषेमुळें होय. तेव्हां इंग्रजी भाषेचा चांगला अभ्यास स्त्रियांनीं सुद्धां करावा येथपर्यंत मतभेद नाहीं. मतभेद होतो तो इंग्रजीचें फाजील स्तोम माजविणाऱ्या व इंग्रजी हीच बोधभाषा असली पाहिजे असा आग्रह धरणाऱ्या लोकांशीं होतो. ज्यांची मातृभाषा इंग्रजी नाहीं असे पृथ्वीच्या पाठीवर किती तरी लोक सांपडतील कीं ज्यांनीं आपल्या व्यवसायासाठीं, संशोधनासाठीं अगर अभ्यासासाठीं इंग्रजी भाषेचा उपयोग आम्हां सामान्य ग्राजुएटांपेक्षांही अधिक केला आहे, परंतु ज्यांचें बोलणें ऐकून व लिहिणें पाहून ज्यांना उच्चारांसाठीं स्पेलिंगांसाठीं व वाक्यरचनेसाठीं आमचे मॅट्रिक्युलेशनचे परीक्षक नापास करतील. कितीही मेहनत केली तरी हिंदी भाषांहून अत्यंत भिन्न असलेल्या इंग्रजी भाषेवर प्रभुत्व संपादन करणें शेंकडा एखाद्यालाच साधेल. सगळा अभ्यास इंग्रजी भाषेत करून अकरा वर्षे जिच्या अध्ययनांत घालविलीं ती कितपत अवगत होते याचें बरेंचसें ताजें उदाहरण आहे. मुंबई युनिव्हर्सिटींत इंग्रजी निबंधलेखन हा विषय वेगळा काढून

versity of Bombay and if provision of special options for women is made, a separate University is totally unnecessary. We are agreed that a seprate Women's University is wasteful of effort and money, and that a Women's University with the vernacular as its medium is not in the interests of higher education of women in this Presidency, for reasons which appear from what we have already said about the Vernacular in Universities. Moreover, there is no evidence of any real demand for such a form of education."

" हिंगणें बुद्रुक येथील प्रो. कर्वे यांच्या भारतवर्षीय महिलाविद्यापीठाचीं ध्येयें व त्याचे उद्देश यांचें विवरण त्या विश्वविद्यालयाच्या पुरस्कर्त्यांनीं केलें तें आमचेपाशीं असून आम्ही त्याच्या प्रगतीबद्दलचे अहवाल वाचले आहेत. परंतु या विषयावर ज्या गृहस्थांच्या साक्षी घेतल्या त्यांपैकीं बहुसंख्याकांचें मत असें आहे कीं, स्त्रियांकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढणें म्हणजे पैशाचा व श्रमाचा अपव्यय असून त्याच्या योगानें स्त्रियांच्या शिक्षणाचा दर्जा कमी होण्याचा संभव आहे. त्यांच्या मतें विश्वविद्यालयीन शिक्षणावस्थेंत ( स्त्री-पुरुषांचें ) सहशिक्षण हें तत्त्वतः अधिक निर्दोष आहे. अस्तित्वांत आलेल्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचा पुरस्कार करणारेही असें कबूल करतात कीं, मुंबई युनिव्हर्सिटीच्या कॉलेजांमधून मातृभाषेचा बोधभाषा म्हणून कांहीं प्रमाणांत उपयोग करण्याचें मान्य झालें व स्त्रियांकरितां म्हणून अधिक ऐच्छिक विषयांची व्यवस्था केली तर स्त्रियांकरितां निराळें विश्वविद्यालय काढण्याची कांहीही जरूरी नाहीं. आम्हां सर्वांचें मत असें आहे कीं, स्त्रियांकरितां स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढणें म्हणजे पैसा व श्रम व्यर्थ दवडण्यासारखें आहे, आणि मातृभाषा हीच जिच्यांत बोधभाषा आहे अशी स्त्रियांची स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढणें या इलाख्यांतील स्त्रियांच्या उच्च शिक्षणाला पोषक होणार नाहीं. विश्वविद्यालयांत मातृभाषेच्या उपयोगासंबंधीं आम्हीं जें कांहीं म्हटलें आहे त्यावरून आमचें वरील मत होण्याचीं कारणें कळून येण्यासारखीं आहेत. शिवाय अशा प्रकारच्या शिक्षणाला खरी मागणी असल्याचा पुरावा नाहीं."

सामाजिक सुधारणांचे बाबतींतला अत्यंत प्रगमनशील पक्ष व हा दुसरा अतिशिक्षित लोकांचा पक्ष ह्या दोहोंमधील लोकांवर इंग्रजी भाषेनें अशी कांहीं मोहिनी घातली आहे कीं सरसकट सगळ्या विद्यार्थ्यांवर ह्या परकी भाषेचा अवजड बोजा टाकल्यानें जो शारीरिक व मानसिक शक्तींचा अपव्यय होत आहे त्याजकडे त्यांचें लक्षच जात नाहीं. त्यांना, असें वाटतें कीं ज्या योजनेंत इंग्रजीला प्राधान्य नाहीं ती योजना टाकाऊ असलीच पाहिजे. उच्च शिक्षणांत सुद्धां इंग्रजी मुळींच नको किंवा फार तर ऐच्छिक असावी असें म्हणणारेही लोक आहेत. आम्ही मधल्या मार्गानें जाऊं पाहतों.

पदवीदान समारंभाच्या वेळच्या अनेक भाषणांत इंग्रजी भाषेच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष देण्याबद्दल इशारा दिला आहे तो ठीक आहे. इंग्रजी भाषेच्या अभ्यासाला योग्य महत्व दिलें पाहिजे हें मत ह्या विद्यापीठाच्या चालकांपैकीं प्रत्येकाचें आहे. आज ती सगळ्या जगाची भाषा झालेली आहे. खुद्द आपल्या देशांतल्या निरनिराळ्या भागांतील लोकांशीं दळवळण ठेवण्यास ह्या भाषेचा उपयोग होत आहे व तो पुढेंही पुष्कळ वर्षें होत राहील. आज हिंदुस्थान जें एक राष्ट्र बनलें आहे तें इंग्रजी भाषेमुळें होय. तेव्हां इंग्रजी भाषेचा चांगला अभ्यास स्त्रियांनीं सुद्धां करावा येथपर्यंत मतभेद नाहीं. मतभेद होतो तो इंग्रजीचें फाजील स्तोम माजविणाऱ्या व इंग्रजी हीच बोधभाषा असली पाहिजे असा आग्रह धरणाऱ्या लोकांशीं होतो. ज्यांची मातृभाषा इंग्रजी नाहीं असे पृथ्वीच्या पाठीवर किती तरी लोक सांपडतील कीं ज्यांनीं आपल्या व्यवसायासाठीं, संशोधनासाठीं अगर अभ्यासासाठीं इंग्रजी भाषेचा उपयोग आम्हां सामान्य ग्राजुएटांपेक्षांही अधिक केला आहे, परंतु ज्यांचें बोलणें ऐकून व लिहिणें पाहून ज्यांना उच्चारांसाठीं स्पेलिंगांसाठीं व वाक्यरचनेसाठीं आमचे मॅट्रिक्युलेशनचे परीक्षक नापास करतील. कितीही मेहनत केली तरी हिंदी भाषांहून अत्यंत भिन्न असलेल्या इंग्रजी भाषेवर प्रभुत्व संपादन करणें शेंकडा एखाद्यालाच साधेल. सगळा अभ्यास इंग्रजी भाषेंत करून अकरा वर्षें जिच्या अध्ययनांत घालविलीं ती कितपत अवगत होते याचें बरेंचसें ताजें उदाहरण आहे. मुंबई युनिव्हर्सिटींत इंग्रजी निबंधलेखन हा विषय वेगळा काढून

त्यांत प्रत्येक बी. ए. च्या उमेदवारानें पास झालें पाहिजे असा नियम केला होता. एका वर्षी बी. ए. च्या ११५० उमेदवारांपैकीं ५४० इंग्रजी निबंध-लेखन या विषयांस नापास झाले. ही गोष्ट गेल्या तीनचार वर्षांतली आहे. इंग्रजी भाषेचें बेरेंचसें ज्ञान झालेलें असलें म्हणजे प्रसंग पडतो तेव्हां अभ्यासानें मनुष्य तिचा योग्य उपयोग करावयास शिकतो. इंग्रजी भाषेचें महत्त्व जाणून इतर युनिव्हर्सिट्यांतून सेकंड लँग्वेजकडे म्हणजे दुसऱ्या भाषेकडे जितकें लक्ष दिलें जातें त्यापेक्षां बरेंच अधिक लक्ष महिलाविद्या-पीठांत इंग्रजीकडे दिलें जातें. आणि कित्येक शाळांत इयत्तेनें तें दिलें जात नसलें तर तें दिलें गेलें पाहिजे. हायस्कुलच्या आरंभापासून कॉले-जाच्या अखेरीपर्यंत इंग्रजी हा महत्वाचा आवश्यक विषय असला म्हणजे इंग्रजीचें जरूर तें ज्ञान सहज मिळूं शकतें.

ह्या दोन्ही विरोधी पक्षांच्या मतांमध्यें जें 'if' म्हणजे 'जर' 'तर' आहे तें फार महत्त्वाचें आहे. जर मातृभाषेचा प्रवेश सरकारी युनिव्ह-र्सिटींत होऊं लागला व प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र इत्यादि विषय स्त्रियां-साठीं ऐच्छिक ठेवले गेले तर मग स्त्रियांच्या वेगळ्या युनिव्हर्सिटीची आवश्यकता कोठें राहिली ? जोंपर्यंत सामान्य पदवीचें (Ordinary Degree) शिक्षण मातृभाषेला बोधभाषेचें स्थान देऊन होऊं लागलें नाहीं तोंपर्यंत स्त्रियांच्या वेगळ्या युनिव्हर्सिटीची आवश्यकता राहणारच. आमच्या मंद-गतीचा विचार केला असतां हें घडून येण्यास किती दशकें लागतील हें आज तरी सांगतां येत नाहीं.

असो. आतां अंशतः किंवा सर्वस्वी अनुकूल मतांचा विचार करूं या. असलीं कांहीं मतें पूर्वींच्या एका प्रकरणांत दिलीं आहेत. सामान्यतः स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या उच्च शिक्षणांत सुद्धां भेद केला पाहिजे असे विचार पाश्चात्य देशांतूनही प्रचलित होत आहेत हें नाइन्टीन्थ सेंचरी अँड आफ्टर मासिकांतील उतारे दिले आहेत त्यांवरून लक्षांत येईल. विद्वान् व वजनदार लोकांचें ह्या चळवळीला जर पाठबळ नसतें तर स्त्रियांची युनि-व्हर्सिटी अस्तित्वांत येणेंच शक्य झालें नसतें. आजपर्यंत ज्यांनीं चान्सेलर व व्हाइसचान्सेलरचें काम केलें व जे आज करीत आहेत, त्याचप्रमाणें



प. दा. लल्लुभाई आशाराम शहा



सर महादेव चौबळ.

सिंडिकेटच्या आणि सेनेटच्या सभासदांचें काम ज्यांनीं केलें व करीत आहेत त्यांची विद्वत्ता व त्यांचा दर्जा पुढील यादीवरून कळून येईल.

## महिलाविद्यापीठाचे आजपर्यंतचे चान्सेलर, व्हाइस-चान्सेलर व सिंडिकेटचे सभासद.

### चान्सेलर

डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, एम्. ए., पीएच्. डी.

सर महादेव भास्कर चौबळ, बी. ए. एल्एल्. बी., के. सी. आय्. ई., सी. एस्. आय्.

### व्हाइस-चान्सेलर

डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे एम्. ए. बी. एस्सी., डी. एस्सी.

प. वा. न्यायमूर्ति सर लल्लुभाई आशाराम शहा, एम्. ए. एल्एल्. बी.

### सिंडिकेटचे सभासद

प्रिन्सिपल केशव रामचंद्र कानिटकर, एम्. ए., बी. एस्सी.

प्रिन्सिपल विनायक गणेश आपटे, बी. ए.

डॉ. सुमंत बी. मेहता, एम्. बी.

सौ. शारदागौरी मेहता, बी. ए.

श्रीयुत केशवलाल सी देसाई, बी. ए., एल् एल् बी.

### १९२८ च्या आरंभींचे सिंडिकेटचे सभासद

धि ऑनरेबल सर चुनीलाल व्रजभूकनदास मेहता, एम्. ए., एल्एल्. बी. (चान्सेलर).

श्रीयुत बालकराम, एम्. ए., आय्. सी. एस्. (व्हाइस-चान्सेलर.)

डॉ. वाय्. जी. नाडगीर, एम्. एस्., एफ्. सी. पी. एस्., डीन, ग्रँट मेडिकल कॉलेज.

प्रिन्सिपल एन्. एम्. शहा, एम्. ए.

लेडी ठाकरसी.

कुमारी कृष्णाबाई तुळसकर, एम्. ए.
प्रो. विष्णु बळवंत नाईक, एम्. ए.
साहित्याचार्य प्रो. हरि रामचंद्र दिवेकर, एम्. ए.
प्रिन्सिपल नारायण महादेव आठवले, एम्. ए.
कुमारी इन्दिराबाई भागवत, बी. ए., प्रिन्सिपल, महिलापाठशाळा, अहमदाबाद.
प्रो. धोंडो केशव कर्वे, बी. ए.

## वरील सभासदांशिवाय सेनेटचे सभासद.

रा. ब. डॉ. पी. व्ही. शिखरे, एल्. एम्. ॲन्ड एस्.
प्रिन्सिपल एन्. एम्. पटवर्धन, एम्. ए., एल्. टी.
श्रीयुत बाळकृष्ण सी. कामत, बी. ए.
रा. ब. प्रो. दत्तात्रय लक्ष्मण सहस्रबुद्धे, एम्. एससी., एम्. एजी.
प्रो. रामचंद्र हरि केळकर, एम्. ए.
श्रीयुत रामचंद्र काशिनाथ भिडे, बी. ए.
प्रो. नारायण केशव बेहरे, एम्. ए., एल्. टी.
डॉ. सुमंत बी. मेहता, एम्. बी.
श्रीयुत बी. पी. ठाकोर, बी. ए.
श्रीयुत केशवलाल सी. देसाई, बी. ए., एल् एल्. बी.
श्रीयुत एम्. यू. अलमौला, बी. ए., बी. एससी.
प्रो. वामन मल्हार जोशी, एम्. ए.
श्रीयुत वाग्भट नारायण देशपांडे, बी. ए., एल् एल्. बी.
डॉ. एम्. एन्. आगाशे, एम्. बी. बी. एस.
प्रो. वासुदेव गोविंद मायदेव, एम्. ए.
श्रीयुत गोविंद काशिनाथ गाडगीळ, बी. ए. बॅरिस्टर ॲट लॉ.
श्रीयुत एच्. डी. नानावटी, बी. ए. एल् एल् बी.
प्रो. श्रीकृष्ण नीलकंठ चापेकर, एम्. ए., एल् एल. बी.
श्रीयुत व्ही. सी. जाधव, बी. ए.
सौ. ताराबाई प्रधान, बी. ए.

श्रीयुत जी. एन्. काजी, बी. ए.
श्रीयुत आर. जे ठाकोर, बी. ए., एल्एल्. बी
श्रीयुत के. एन्. देसाई, एम्. ए., एल् एल्. बी.
श्रीयुत पी. ए. धोंड, एम्. ए.
रा. ब. रावजी रामचंद्र काळे, बी. ए., एल्एल्. बी., एम्. एल्. सी.
प्रिन्सिपल केशव रामचंद्र कानिटकर, एम्. ए., बी. एस्सी.
सर महादेव भास्कर चौबळ, बी. ए. एल्एल. बी. के. सी. आय्. ई. सी. एस. आय्.
डॉ. के. के. जोशी, एम्. ए., पीएच्. डी.
प्रो. रघुनाथ धोंडो कर्वे, एम्. ए.
धि राइट ऑनरेबल मि. व्ही. श्रीनिवास शास्त्री, एम्. ए.,एल्. टी.,पी.सी.
प्रि. विनायक गणेश आपटे, बी. ए.
श्रीयुत मुकुंद आर. जयकर, एम्. ए., एलएल. बी., बॅरिस्टर ॲट लॉ., एम्. एल. ए.
डॉ. दिनकर धोंडो कर्वे, एम्. एससी., पीएच. डी.
प्रो. पंढरिनाथ काशिनाथ तेलंग, एम्. ए., एलएल. बी.
श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए. एलएल. बी., एम्.एल. ए.
सौ. सरलाबाई नाईक, एम्. ए.
प्रिन्सिपल गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.
प्रो. महादेव रामचंद्र परांजपे, एम्. ए., बी. एस्सी.
कुमारी मेबल ए. नीडहॅम, बी. ए.
कुमारी ॲग्निस जी. हिल,. बी. ए., बी. लिट्.
सौ. शारदागौरी मेहता, बी. ए.
प्रो. गोपाळ महादेव चिपळुणकर, एम्. ए.
सौ. मार्गारेट ई. कझन्स, बी. म्यूझिक.
डॉ. काशीबाई नवरंगे, बी. ए., एल्. एम्. ॲंड एस्.
डॉ. कृष्णाबाई केलवकर, एल्. एम्. ॲन्ड एस्.
श्रीयुत गोपाळ आर्. देव, बी. ए., बी. एल्.
प्रो. दत्तो वामन पोतदार, बी. ए.

श्रीयुत गंगाधर बाळकृष्ण गरूड, बी. ए.
श्रीयुत गणेश सदाशिव मराठे, एम्. ए., ए. आय्. आय्.
डॉ. सुंदराबाई कीर्तने, एल्. एम्. ॲन्ड एस्.
डॉ. श्रीपाद कृष्ण बेलवलकर, एम्. ए., पीएच्. डी.
प्रो. गणेश हरि केळकर, एम्. ए.
प्रो. गोपाळ बाळकृष्ण कोल्हटकर, एम्. ए.
प्रो. रामचंद्र कृष्ण लागू, एम्. ए.
प्रो. वाय्. डी. जोशी, एम्. ए.
श्रीयुत यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए., एल्एल्. बी.
श्रीयुत एन्. के. दीक्षित, बी. एम्. सी. पी.
डॉ. टी. सी. खांडवाला, एल्. एम्. ॲन्ड एस्.
न्यायमूर्ति गोविंद दिनानाथ माडगांवकर, बी. ए., आय्. सी. एस्.
श्रीयुत जव्हेरमल अमरसिंग, बी. ए.
सौ. स्नेहलताबाई पगार, बी. एस्सी., ए. एम्.
सौ. शान्ताबाई कशाळकर, बी. ए.
डॉ. गोपाळ रामचंद्र तांबे, एम्. ए., बी. एस्. सी., एल्. एम्. ॲन्ड एस्.
प्रो. डी. डी. कापडिया, एम्. ए.
श्रीयुत गोकुळदास एम्. शहा.
श्रीयुत माधवजी दामोदर ठाकरसी.
सर रमणभाई महिपतराम नीलकंठ, बी. ए. एल् एल्. बी.*
प्रिन्सिपल जिवराज एन्. मेहता, एम्. डी.
श्रीयुत विनायक त्रिंबक आगाशे, एल्. सी. ई.
प्रिन्सिपल जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, एम्. ए., एल्एल्. बी.

लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहिलें तर सेनेटच्या अगर सिंडिकेटच्या सभासदांचें नांव कमी व्हावें असा नियम आहे. हा नियम पाळून ही इतकी मंडळी आपले श्रम, वेळ व पैसा खर्च करून हा विद्यापीठाला

---

* हे नुकतेच परलोकवासी झाले.

मदत करीत आहेत ह्यावरून यांपैकीं कित्येकांचीं मतें विद्यापीठाच्या धोरणाला सर्वस्वी अनुकूल नसलीं तरी त्याजकडून कांहीं तरी इष्ट कार्य होत आहे असें त्यांस वाटत असलें पाहिजे.

सेनेटचे सभासद निवडणाऱ्या मतदारांची संख्या आज दहा वर्षें सरासरीच्या मानानें २५०० आहे. ह्यांत कोणत्या ना कोणत्या तरी युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांची संख्या सातशेंपासून आठशेंपर्यंत असते. ह्यांना दरसाल दहा रुपये व्याजाचें उत्पन्न होईल इतकी देणगी किंवा दरसाल दहा रुपये वर्गणी द्यावी लागते. इतर मतदारांना निदान दरसाल पांच रुपये व्याजाचें उत्पन्न होईल इतकी देणगी किंवा दरसाल पांच रुपये वर्गणी द्यावी लागते. वर्गणी आली नाहीं तर नांव मतदारांचे यादींतून कमी केलें जातें. ह्या इतर मतदारांतही पदवीधर, वकील वगैरे चांगल्या शिक्षित लोकांची संख्या पुष्कळ आहे. दरवर्षी दोनतीनशें मतदार गळतात ही गोष्ट खरी, पण तितकेच नवीन मतदार दरवर्षी दाखल केले जातात. इतक्या सुशिक्षित मंडळींची सहानुभूति वर्षानुवर्षे कायम आहे ह्यावरून काय अनुमान निघतें तें पहा. वेगवेगळ्या संघांतील मतदारांची संख्या पुढील कोष्टकावरून कळेल.

## निरनिराळ्या संघांतील मतदारांच्या संख्या दाखविणारें कोष्टक.

| वर्ष | आश्रयदात्यांचे संघांतील मतदार | पदवीधरांचे संघांतील मतदारांची संख्या. | | | सामान्य संघांतील मतदारांची संख्या. | | | सुशिक्षित स्त्रियांचे संघांतील मतदार. | एकूण मतदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायमचे मतदार | वार्षिक वर्गणी देणारे मतदार | एकूण | कायमचे मतदार | वार्षिक वर्गणी देणारे मतदार | एकूण | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १९१९ | १७ | | | ७७८ | | | १०५५ | ५३ | १९०३ |
| १९२० | २१ | | | ८२६ | | | १२१४ | ५७ | २११८ |
| १९२१ | २९ | | | ८२५ | | | १२४९ | ५८ | २१६१ |
| १९२२ | ३३ | | | ८८२ | | | १५२५ | ७८ | २५१८ |
| १९२३ | ४० | १४५ | ६८५ | ८३० | २१० | १२७६ | १४८६ | ८२ | २४३८ |
| १९२४ | ४५ | १४५ | ७२३ | ८६८ | २१० | १४९४ | १७०४ | ८३ | २७०० |
| १९२५ | ४९ | १९२ | ६१० | ८०२ | ३२१ | १३८३ | १७०४ | ८२ | २६३७ |
| १९२६ | ५३ | २०१ | ६०६ | ८०७ | ३५९ | १४९१ | १८५० | ८९ | २७९९ |
| १९२७ | ६५ | २०६ | ५७२ | ७७८ | ४०५ | १४६१ | १८६६ | ९८ | २८०७ |
| १९२८ | ६७ | २१२ | ५७१ | ७८३ | ४४८ | १४५५ | १९०३ | ११२ | २८६५ |

ह्या कोष्टकासंबंधानें थोडें स्पष्टीकरण केलें असतां बरें पडेल. आरंभीं १९१६ सालीं निवडणुक होऊन साठ सभासदांची जी सेनेट झाली तीच तीन वर्षें म्हणजे १९१९ च्या जूनपर्यंत कायम राहिली. तोंपर्यंत मतदारांना मतें देण्याचें कारण पडलें नाहीं व ह्यामुळें निरनिराळ्या संघांतील मतदारांची यादी प्रसिद्ध झाली नाहीं. पुढें दरवर्षी सेनेटमधील कांहीं जागा रिकाम्या व्हाव्या व त्या नवीन निवडणूक होऊन भरल्या जाव्या असा क्रम चालू आहे. सामान्यतः एकदां निवडून आल्यानंतर पांच वर्षें सभासदत्व राहतें; नंतर तें नांव कमी करावें असा नियम आहे. अशा रीतीनें कमी झालेल्या सभासदाला पुन्हां निवडून देतां येतें. पहिल्या चार वर्षांच्या मतदारांच्या यादींत कायमचे मतदार व वार्षिक वर्गण्या देणारे मतदार असा भेद केला गेला नव्हता.

सर विठ्ठलदास ठाकरसी ह्यांजकडून दरसाल साडेबावन हजारप्रमाणें व्याजाचे रुपये आलेले वजा जातां आजपर्यंत सुमारें पांच लाख रुपये ह्या विद्यापीठाला मिळाले आहेत. ह्यापैकीं सुमारें पावणे दोन लाख, एक हजार किंवा त्याहून अधिक देणगी देणाऱ्या सुमारें साठपांसष्ट लोकांकडून आले आहेत, पण बाकीचे सव्वातीन लाख सुशिक्षित मध्यम वर्गाकडून मिळालेले आहेत. कोणत्याही राष्ट्राची बळकटी ह्या सुशिक्षित मध्यम वर्गावरच अवलंबून असते अगदीं आरंभापासून महिलाविद्यापीठाला ह्या वर्गाचा मोठा आधार आहे. ह्या मोठ्या वर्गाची सहानुभूति नसती तर विद्यापीठाचें पाऊल पुढें पडणें अशक्य झालें असतें.

ह्या विद्यापीठाबद्दलचें लोकमत कळण्याला आणखी एक मार्ग आहे. ह्या विद्यापीठाच्या नमुन्यावर युनिव्हर्सिट्या काढण्याचा प्रयत्न इतर प्रांतांत झालेला आहे. ह्या प्रयत्नांना यश आलें नाहीं ही गोष्ट वेगळी. बंगाल्यांत स्त्रियांची युनिव्हर्सिटी काढण्यासाठीं एक कमिटी स्थापन झाली होती. तिचे अध्यक्ष सर अशुतोष चौधरी, हायकोर्ट जज्ज, हे होते व त्या कमिटींत डॉ. पी. सी. राय यांचें नांव होतें. त्या कमेटीनें एक सर्क्युलर काढून कांहीं विद्वान स्त्रीपुरुषांचीं मतें मागविलीं होतीं. ह्यासंबंधाचा एका वर्तमानपत्रांतील लेख तेवढाच कापून सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं मजकडे पाठविला होता. ह्या उद्योगाबद्दल पुढें कांहींएक ऐकूं आलें नाहीं.

पंजाबांत देखील कांहीं लोकांना ही इच्छा झाली होती. लाहोरच्या दयानंद वेदिक कालेजाचे उत्पादक व माजी प्रिन्सिपल लाला हंसराज यांनीं वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध केलें होतें कीं, तीन लाख रुपये जमल्यास हा उद्योग हातीं घेण्याची आपली इच्छा आहे. साठ हजार रुपयांची देणगी देण्याची आपली इच्छा एका धनिकानें वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्धही केली होती; परंतु पुढें जालिआँवाला बाग प्रकरण उपस्थित होऊन पंजाबांत विलक्षण परिस्थिति उत्पन्न झाली व ही गोष्ट मागें पडली.

अखिल भारतवर्षीय स्त्रियांची पहिली शैक्षणिक परिषद् पुणें येथें १९२७ च्या पहिल्या आठवड्यांत भरली होती तिनें पुढील दोन ठराव पास केले.

"That in all education of girls in India teaching in the ideals of motherhood and in the making of the home beautiful and attractive, as well as training in social service, should be kept uppermost."

" हिंदुस्थानांतील मुलींच्या शिक्षणांत मातृपदाच्या ध्येयांसंबंधींचें ज्ञान, त्याचप्रमाणें गृह सुंदर व आकर्षक कसें करावें यासंबंधींच्या कल्पना आणि समाजसेवेचे अनुभवयुक्त शिक्षण यांना अग्रस्थान देण्यांत यावें. "

"The Women's conference recommends that government recognition should be given to successful educational institutions which have been working on experimental lines advocated by this conference ( such as the Indian Women's University and others ) and which desire such recognition."

" ह्या स्त्रीपरिषदेची सरकारास अशी शिफारस आहे कीं, या परिषदेनें ज्या धोरणाचा पुरस्कार केला आहे त्यासंबंधींचे प्रयोग करून पाहणाऱ्या यशस्वी शिक्षणसंस्थांना ( उदाहरणार्थ भारतवर्षीय महिलाविद्यापीठ, व इतर संस्था असल्यास त्या ) त्या संस्थांची तशी इच्छा असल्यास सरकारनें मान्यता द्यावी. "

गेल्या फेब्रुवारींत दिल्ली येथें भरलेल्या स्त्रियांच्या शैक्षणिक परिषदेनें ह्या दोन ठरावांना पुनः मान्यता दिली आहे.

मुंबई इलाख्यांतील विद्याखात्याचा १९२५–२६ सालचा रिपोर्ट थोड्या महिन्यांपूर्वी झाला त्यांत विद्यापीठाबद्दल पुढील उल्लेख आहे.

"A number of schools throughout the presidency are affiliated to the Poona Women's University. Some of these are recognized by the Department. A special feature of these schools is that they use the Vernacular as the medium of instruction for all subjects except English throughout the school course."

"इलाख्यांतील बऱ्याच शाळा पुण्यांतील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीला जोडलेल्या आहेत. ह्यांपैकीं कांहीं विद्याखात्यांत नोंदलेल्या आहेत. या शाळांचें विशेष स्वरूप म्हटलें म्हणजे त्यांत शेवटच्या वर्गापर्यंत इंग्रजी-शिवाय सर्व विषयांचें शिक्षण मातृभाषेंतून दिलें जातें."

"The cause of women's education and of the uplift of women is nobly assisted by numerous societies and institutions in this presidency, the chief among which are the Seva Sadan Society, Poona, and Indian Women's University, Poona. The Education Inspector, C. D. reports:—

In the cause of female education, especially the education of adults, the efforts of Prof. D. K. Karve on the one hand and of Mr. G. K. Devdhar on the other are commendable. Prof. Karve's tiny little colory of 30 years ago has now developed into a full-fledged Uiversity for Indian Women. Its special feature is that the medium of instruction is the vernacular and the aim of adapting girls' curriculum to their special needs and conditions and of retaining the simplicity of Indian style of living is steadily kept in view."

"या इलाख्यांतील पुष्कळ मंडळ्यांची आणि संस्थांची स्त्रियांच्या शिक्षणाच्या आणि उन्नतीच्या कार्यांत मोठी मदत आहे. ह्यांत पुण्यांतील सेवासदन सोसायटी आणि भारतवर्षीय महिला विद्यापीठ ह्या संस्था प्रमुख होत. मध्भागाचें एज्युकेशन इन्स्पेक्टर लिहितात—

'स्त्रियांच्या विशेषतः प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या कामांत एका बाजूला प्रो. डी. के. कर्वे यांचे व दुसऱ्या बाजूला श्री. जी. के. देवधर यांचे प्रयत्न प्रशंसनीय आहेत. प्रो. कर्व्यांच्या ३० वर्षांपूर्वीच्या लहानशा वसा-

हतीला आतां पूर्णतेला आलेल्या हिंदी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचें स्वरूप आलेलें आहे. मातृभाषेचा बोधभाषा म्हणून उपयोग करणें, अभ्यासक्रम स्त्रियांच्या विशेष गरजांकडे व स्थितीकडे लक्ष देऊन ठरविणें आणि हिंदी राहणींतील साधेपणा कायम ठेवणें ह्या गोष्टींत या विद्यापीठाचें वैशिष्ट्य आहे."

आंध्र युनिव्हर्सिटीच्या ५ डिसेंबर १९२७ रोजीं भरलेल्या सेनेटच्या सभेंत पुढील ठराव पास झालाः—

"That the Senate request the Academic Council to consider the desirability of having separate courses of study, as alternative to the present courses, for women and to formulate proposals for giving effect to this policy, if it approves."

"हल्लींच्या शिक्षणक्रमाशीं समान्तर असा स्त्रियांसाठीं वेगळा वैकल्पिक अभ्यास क्रम ठरविण्याच्या इष्टतेचा विचार करावा व तसें करणें योग्य वाटल्यास तो मार्ग अमलांत आणण्याच्या दृष्टीनें सूचना पुढें आणाव्या अशी सेनेटची तज्ञ मंडळास विनंति आहे."

आंध्र युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर श्रीयुत सी. आर्. रेड्डी ह्यांनीं जगाचा प्रवास केला त्यावेळीं स्त्रियांना निराळ्या पद्धतीचें शिक्षण देणारीं अनेक कालेजें पाहिलीं त्यांची माहिती त्यांनीं १९१६ त "डेप्युटेशन स्टडी" "Deputation Study" ह्या पुस्तकांत प्रसिद्ध केली होती. अशा कॉलेजांत लंडनमधलें "किंग्स् कॉलेज फॉर वुइमेन" (Kings College for Women) हें प्रमुख आहे. वरील ठरावाला पुढें गति देण्यासाठीं श्रीयुत रेड्डी यांनीं टिप्पणवजा लिहिलेलें एक छोटेखानी पुस्तक रजिस्ट्रारमार्फत कित्येक स्त्रीपुरुषांकडे रवाना झालें आहे व त्यांजकडून ह्या योजनेसंबंधानें सूचना मागविल्या आहेत. ह्या पुस्तकांत पाश्चात्यांनीं चालविलेल्या कित्येक स्त्रियांच्या कॉलेजांत ह्या विषयांचा अभ्यासक्रम कसा ठेविला आहे ती माहिती दिली आहे. श्रीयुत रेड्डी यांची इच्छा आंध्र युनिव्हर्सिटीनें स्त्रियांना प्रपंचशास्त्र व समाजशास्त्र (Domestic and Social Science) या विषयांचें शिक्षण देण्यासाठीं स्त्रियांचें स्वतंत्र युनिव्हर्सिटी कॉलेज काढावें अशी आहे व तूर्त इंटरमीजिएट कॉलेजापासून सुरुवात करावी अशी त्यांची शिफारस आहे.

हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या शिक्षणासंबंधानें सर अतुलचंद्र चॅटरजी यांनीं लंडन येथें युनिव्हर्सिटी कॉलेजांत शिक्षणसंस्थांच्या परिषदेपुढें भाषण केलें त्या संबंधाच्या अग्रलेखांत ता. ३ जानेवारी १९२८ च्या टाइम्स् ऑफ् इंडियांत पुढील उल्लेख आहेः—

" The difficulties of the task are enormous. Only men and women gifted with imagination are likely to succeed. A great educational policy would involve enormous expense and teachers, for many obvious reasons, are hard to secure. The battle, however will be half won when Indian public opinion is agreed that female education is a necessity. Once there is agreement upon that, we may hope that public opinion will increase the prestige of those engaged in the fine vocation of teaching, and then some of the present difficulties of securing teachers will disappear. The task may seem hopeless; but not so hopeless as it was, now that professor Karve's little colony at Poona has developed into the Indian Women's University and the goal is splendid. That alone should be an incentive to the cooperative efforts of all who love their country.

" कार्याला ( स्त्रीशिक्षणप्रसाराच्या ) अडचणी अपरिमित आहेत. कल्पक स्त्रीपुरुषांनाच यशाचा मार्ग सांपडण्याचा संभव आहे. शिक्षणाच्या धोरणाचें ध्येय व्यापक ठेवणें म्हणजे खर्चही मोठाच येणार; आणि शिक्षक मिळणें दुरापास्त होणार. याचीं कारणें अनेक असून तीं अगदीं उघड उघड आहेत. परंतु स्त्रीशिक्षण अवश्य पाहिजे याबद्दल हिंदी जनतेचें ऐकमत्य असेल तर अर्धीअधिक लढाई आपण जिंकल्यासारखीच होईल. एकदां ही गोष्ट सर्वांनाच मान्य झाली म्हणजे लोकमतांत फरक पडून शिक्षणाच्या या उच्च धंद्यांत पडणाऱ्या व्यक्तींचा दर्जा वाढूं लागेल आणि मग शिक्षक मिळण्याची आतां जी अडचण पडते आहे ती पडणार नाहीं. या कामीं अपयश येणार असें वाटणें साहजिक आहे. परंतु आतां प्रो. कर्वे यांच्या पुणें येथील लहानशा संस्थेचें रूपांतर भारतवर्षीय महिलाविद्यापीठांत झालें आहे तेव्हां या पुढील काम पूर्वीइतकें निराशाजनक राहिलें नाहीं. आणि ध्येय तर उज्वल आहेच आहे. या नुसत्या ध्येयाकडेच जरी

नजर दिली तरी देशावर प्रेम करणाऱ्या सर्व व्यक्तींना सहकारितेनें प्रयत्न करण्याची स्फूर्ति मिळण्यासारखी आहे."

दिल्लीमध्यें ता. ७ फेब्रुवारी १९२८ रोजीं स्त्रियांची आखिल भारतवर्षीय शैक्षणिक परिषद भरली असतां लेडी अर्विन यांनीं जें भाषण केलें त्यांत त्यांनीं हिंदुस्थांतील स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल पुढील विचार प्रदर्शित केले आहेत.

**Lady Irwin said in her address to the All India Women's Conference:—**

**" To-day we see Girl's education developing on lines which are slavish imitation of boy's education. It is surely inappropriate that the curriculum for girls should be decided by the necessity of studying for a certain examination so that it may perforce exclude many, if not most of the subjects, we would most wish girls to learn. If public opinion, for example, demands that matriculation should be always the first test of excellence of a High School education, schools will necessarily be forced to meet that demand and the result will be, as I suggested, to drive us into a uniformity that fails to take account of the distinctive necessities of women. We must therefore do all in our power to set a different standard or to create a desire in the public mind and in the girls themselves for an education which will allow girls or, at any rate, a greater number of them to develop along other lines. What we should aim to give them is a practical knowledge of domestic subjects and laws of health which will enable them to fulfil one side of their duties as wives and mothers, reinforced by a study of those subjects which will help most to widen their interests and outlook.'**

***( Times of India, 8th February, 1928 ).***

" मुलींचें शिक्षण आज मुलांच्या शिक्षणाचेंच एक अंधानुकरण होऊं लागलें आहे. मुलींना एकाद्या परीक्षेकरितां म्हणून अभ्यास करण्याची आवश्यकता असावी आणि तशा दृष्टीनें त्यांचा अभ्यासक्रम ठरविला जावा हें खरोखर अनुचित आहे. कारण त्याचा परिणाम असा होतो कीं,

जे विषय मुलींनीं शिकावे अशी आपली अतिशय इच्छा असते त्यांपैकीं सर्वच नाहीं तरी बरेचसे विषय त्या अभ्यासक्रमांतून गाळावे लागतात. उदाहरणार्थ लोकमताची मागणी जर अशी असेल कीं मॅट्रिक्युलेशन परीक्षा हीच दुय्यम शिक्षणाची परिपूर्तता झाली आहे किंवा नाहीं हें अजमावण्याची पहिली कसोटी असावी तर ही मागणी जेणेंकरून पुरविली जाईल अशाच शाळा निघतील, आणि त्याचा परिणाम असा होईल कीं, मीं ध्वनित केल्याप्रमाणें आपल्या सर्वच शाळा एकाच सांच्याच्या निघतील व त्यामुळें स्त्रियांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेण्याचें राहून जाईल. म्हणून लोकांच्या व मुलींच्या पुढें एक निराळेंच ध्येय ठेवण्याचा व त्यांच्या मनांत अशा शिक्षणाची आवड उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला पाहिजे कीं त्यायोगें मुलींची, निदान त्यांच्यापैकीं बऱ्याच जणींची तरी, प्रगति निराळ्या मार्गानें होईल. आपण स्त्रियांना अशा प्रकारचें ज्ञान द्यावयास पाहिजे कीं, त्यांत गृहविषयक व्यावहारिक माहिती व आरोग्यासंबंधींचे नियम यांचा अंतर्भाव होईल. असें झालें म्हणजे पत्नी व माता या नात्यांनीं वरचेवर येणाऱ्या जबाबदाऱ्यांचा एक भाग त्या पूर्णपणें पार पाडूं शकतील. या ज्ञानाच्या जोडीला दुसरेही विषय असे घातले पाहिजेत कीं त्यांयोगें त्यांची दृष्टि अधिक व्यापक होऊन त्यांना अनेकविध गोष्टींकडे पूर्वीपेक्षां अधिकाधिक लक्ष लागूं शकेल.

# प्रकरण दहावें

## महिलाविद्यापीठाचें वैशिष्ट्य

इतर युनिव्हर्सिट्यांहून ही स्त्रियांची युनिव्हर्सिटी म्हणजे महिलाविद्यापीठ कोणत्या गोष्टींनीं भिन्न आहे हें ह्या प्रकरणांत दाखविण्याचा हेतु आहे. येथपर्यंतच्या हकीकतींत कित्येक गोष्टी सहजीं येऊन गेल्या आहेत, परंतु येथें प्रमुखत्वानें त्यांचा निर्देश करणें जरूर आहे.

महिलाविद्यापीठ ह्या नांवावरूनच स्त्रियांच्या दृष्टीनें विचार करून योग्य दिसेल तो अभ्यासक्रम यांत ठेवण्याचा हेतु स्पष्ट दिसतो. म्हणूनच प्रपंचशास्त्र आणि आरोग्यशास्त्र हा विषय सर्व परिक्षांतून आवश्यक ठेविला आहे. ह्या विषयाच्या अंगत्वानेंच वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, शरीररचनाशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, मानसशास्त्र व विशेषतः मुलांच्या मनोव्यापारांची मीमांसा ह्या विषयांची मूळ तत्त्वें शिकविलीं जातात. समाजशास्त्र हा विषय आवश्यक ठेविला आहे व गायनवादन आणि चित्रकला ह्या विषयांचाही समावेश झाला आहे.

पुरुषांना व स्त्रियांना सारखेच नडणारे दोषही ह्या विद्यापीठांतून काढून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या शिक्षणपद्धतींतील मोठा दोष, जो जगांत दुसऱ्या कोठेंही सांपडणार नाहीं तो, म्हटला म्हणजे इंग्रजी भाषेला दिलेलें फाजील महत्त्व व मातृभाषेची हेळसांड हा होय. सत्तर वर्षांपूर्वी जेव्हां युनिव्हर्सिट्यांना सुरुवात झाली तेव्हां असें होणें साहजिक होतें. त्यावेळीं देशी भाषांची प्रगति तितकी झालेली नव्हती. तथापि त्यावेळीं देशी भाषांना जें उत्तेजन देण्यांत येत होतें तें पुढें कमी झालें. मुंबई युनिव्हर्सिटीचे पहिले पदवीधर १८६२त बाहेर पडले त्यांत फक्त डॉ. भांडारकर यांचीच संस्कृत दुसरी भाषा होती. बाकीचे तिघे म्हणजे न्यायमूर्ति रानडे, श्रीयुत वामन आबाजी मोडक व श्रीयुत बाळ मंगेश वागळे हे होत. ह्यांची दुसरी भाषा मराठी होती. तेव्हांपासून १८७१ पर्यंत मराठी व गुजराती दुसरी भाषा घेऊन बाहेर पडलेले ग्राजुएट आढळतात. नंतर मातृभाषांना मज्जाव झाला तो इतका कीं हायस्कुलांतील इंग्रजी तिसऱ्या इयत्तेच्यापुढें

विद्यार्थ्याला मातृभाषेचा विटाळही होऊं नये. अलीकडेच मातृभाषेला थोड्या सवलती मिळूं लागल्या आहेत, पण मातृभाषा विरुद्ध इंग्रजी भाषा ह्यांचें झुंज अजून चालूच आहे. थोड्या वर्षांपूर्वी मॅट्रिक्युलेशनचे सर्व विषय इंग्रजी भाषेंतूनच शिकावे लागत होते.

पहिल्या अमदानींत वकीलीची परीक्षा मराठींत होत असून जिल्ह्याच्या कोर्टांत मराठींतून काम चालविणारे नांवाजलेले वकील असत. आरंभीं मराठींतून वैद्यकीचें शिक्षण घेऊन तयार झालेले हॉस्पिटल असिस्टंट असत. कायद्याचीं आधुनिक वैद्यकशास्त्राचीं पुस्तकें त्यावेळीं मराठींत झालेलीं होतीं. बडोदें संस्थानांत आधुनिक पाश्चात्य पद्धतीच्या वैद्यकीचें शिक्षण मराठींतून देण्याचा विशेष प्रयत्न झालेला होता. हा प्रकार असाच चालू राहता तर देशी भाषा इतक्या मागें पडल्या नसत्या. पण त्यांचें दुर्दैव ओढवलें व त्यांजवर बहिष्कार घालण्यांत आला.

श्रीयुत सय्यद रॉस मसूदजंग ह्यांना जपानांतील शिक्षणपद्धति पाहण्यासाठीं निजाम सरकारनें जपानांत पाठविलें होतें. हे ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटीचे बी. ए. असून इंडियन एज्युकेशन सर्व्हिसमध्यें प्रविष्ट झालेले आहेत. ह्यांना निजामसरकारनें मागून घेऊन यांचे हातीं विद्याखात्याचीं सूत्रें दिलेलीं आहेत. ह्यांनीं तीन महिने जपानांत राहून तेथील शिक्षणपद्धतीचा अभ्यास करून ‘ जपान आणि तेथील शिक्षणपद्धति ’ (Japan and its Educational System.) हें पुस्तक लिहून तें १९२३त प्रसिद्ध केलें. त्यांचें म्हणणें कीं जपानी लोकांनीं पाश्चात्य लोकांचें ज्ञान आपल्या भाषेंत आणून तें सर्वांच्या हवालीं केलें. आणि आम्ही हिंदुस्थानांत तें ज्ञान इंग्रजी भाषेचें कुलूप लावलेल्या पेटींत ठेविलें आहे व त्या कुलुपाची किल्ली फारच थोड्या म्हणजे इंग्रजी जाणणाऱ्या लोकांजवळच आहे. ही हिंदुस्थानानें घोडचूक केलेली आहे. त्यांच्या पुस्तकांतील कांहीं उतारे देणें मला इष्ट वाटतें.

It is only, thanks to the far-sighted policy of His Exalted Highness the Nizam of Hyderabad, that by the foundation of the Osmania University, where all instruction has to be imparted in the Urdu language, that step has at last been taken in India,

which was taken in Japan as early as the second half of the 19th century.

"Had the hope been fulfilled which was so confidently expressed in the Despatch from the Court of Directors of the East India Company to the Governor General in India, on the education of the people of India, dated the 19th July 1854 that:

'The vernacular literatures of India will be gradually enriched by translations of European books or by the original compositions of men whose minds have been imbued with the spirit of European advancement, so that European knowledge may gradually be placed in this manner within the reach of all classes of the people,' I feel convinced that the cultural position of India in every realm of human intellectual activity would not have been as low as it is to-day.

"My observation, limited though it is, of the intellectual life of the Japanese nation as a whole, and the study of her past history, have created in my mind the hope-giving belief that we Indians, as far as intellectual attainments are concerned, are certainly superior to them; what we, however, do lack are facilities for the proper development and training of what may be called our national genius. But I also feel that so long as modern thought and modern science on which alone can be based, with any certainty, the material progress of a nation, are allowed to remain, as they are to-day in India, locked up in a foreign language, progressive ideas can never spread with that speed which the present economic position with the other nations of the world demand."

" मातृभाषांचा बोधभाषा म्हणून उपयोग करण्याचा जो उपक्रम जपानमध्यें कितीतरी वर्षांपूर्वी म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतच करण्यांत आला तो आतां कोठें हिंदुस्थानांत होत आहे, ही गोष्ट उस्मानिया युनिव्हर्सिटी स्थापन झाली व तेथें सर्व शिक्षण ऊर्दूमधूनच देण्याचें ठरलें यामुळें शक्य झाली असून त्याचें श्रेय हैदराबादच्या दूरदर्शी व धोरणी निजाम सरकारालाच आहे.

ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांनीं हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरल साहेबांस सन १८५४ च्या जुलै महिन्याच्या १९ व्या तारखेस हिंदी लोकांच्या शिक्षणासंबंधीं खालीलप्रमाणें एक खलिता पाठविला:—

' युरोपियन भाषांत लिहिलेल्या पुस्तकांच्या भाषांतरानें किंवा ज्यांच्या मनांत युरोपीय संस्कृतीचें ज्ञान बिंबलें आहे अशा लोकांच्या स्वतंत्र प्रबंधांनीं हिंदुस्थानांतील देशी भाषांत लिहिलेलें वाङ्मय उत्तरोत्तर अधिक समृद्ध होत जाईल आणि अशा रीतीनें युरोपांतील ज्ञान सर्व वर्गांतील लोकांच्या आटोक्यांत येईल.'

या खलित्यांत पुढील सुपरिणामाविषयीं इतक्या खात्रीपूर्वक व्यक्त केलेली आशा जर सफल झाली असती तर मी खात्रीनें सांगतों कीं, बौद्धिक व्यापाराच्या प्रत्येक क्षेत्रांत संस्कृतिदृष्ट्या हिंदुस्थानचें जें आज खालच्या दर्जाचें स्थान आहे तें तसें राहिलें नसतें.

" जपानी राष्ट्राच्या बौद्धिक जीवनाचें माझें निरीक्षण मर्यादित असलें तरी त्यानें व त्यांच्या गतकालीन इतिहासाच्या अभ्यासानें माझ्या मनांत असा आशाजनक विश्वास उत्पन्न झाला आहे कीं, आम्ही हिंदी लोक बौद्धिक गुणांसंबंधींच बोलावयाचें झाल्यास खात्रीनें त्यांच्यापेक्षां वरच्या दर्जाचे आहों. मात्र आमच्यांत जी खरी उणीव आहे ती ही कीं, आमच्या राष्ट्रीय बुद्धिमत्तेचें शिक्षण व विकसन होईल अशा साधनांचा आमच्या देशांत अभाव आहे. मला असेंही वाटतें कीं, राष्ट्राची आधिभौतिक प्रगति ज्या आधुनिक कल्पनांवर व शास्त्रांवर खरोखर अवलंबून असते त्या कल्पना व तीं शास्त्रें जोंपर्यंत, हिंदुस्थातांत आज आहेत त्याप्रमाणें, परकी भाषेंत मोहोरबंद पडून आहेत, तोंपर्यंत प्रगतिपर कल्पनांचा प्रसार, हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिति व त्याला इतर राष्ट्रांबरोबर करावयाची चढाओढ हीं लक्षांत घेतां जितक्या झपाट्यानें व्हावयास पाहिजे तितक्या झपाट्यानें होणें शक्य नाहीं."

"To say that one's mother-tongue should not be made the medium of instruction for higher education, because it does not happen to be as highly developed for conveying scientific thought as some foreign language, is a dangerous proposition to advance. I dread to think what would have happened to Japan

today if they too like us had wasted energies for a hundred years in trying to give to a foregin language the position which nature meant their mother-tongue to have. The absurdity of the dread of using an Indian vernacular as the medium of instruction would be realised by any one who preached today in England that since there are better books for the study of chemistry in the German language than in English, German should therefore be the language in which all lectures on chemistry should be delivered in the Universities of England. All that can be reasonably proposed is that in England any one who wishes to study advanced chemistry should also know German so as to be able to consult the standard books on the subject."

"एकाद्याची मातृभाषा परकी भाषेसारखी शास्त्रीय विचार व्यक्त करण्याइतकी प्रगल्भ दशेस आली नाहीं म्हणून उच्च शिक्षणाचे बाबतींत तिचा बोधभाषा म्हणून उपयोग करूं नये असें प्रतिपादन करणें धोक्याचें आहे. जपानानेंही आपल्याप्रमाणेंच मातृभाषेचें शिक्षणांतील निसर्गसिद्ध स्थान परकी भाषेला देण्याच्या खटपटींत शंभर वर्षे आपल्या शक्तीचा अपव्यय केला असता तर आज त्या देशाची काय स्थिति झाली असती हा विचार मनांत आला म्हणजे भीति वाटते. हिंदुस्थानांतील एकाद्या भाषेचा बोधभाषा म्हणून उपयोग करावा या कल्पनेची पुष्कळ लोकांना भीतिच वाटते. परंतु या भीतीमध्यें जो वेडगळपणा आहे तो ध्यानांत येण्याकरितां अशी कल्पना करावी कीं एकादा मनुष्य इंग्लंडमध्यें जाऊन तेथील लोकांना उपदेश करीत आहे कीं 'ज्या अर्थी जर्मन भाषेमध्यें रसायन शास्त्रावर-अधिक चांगले ग्रंथ आहेत त्या अर्थी इंग्लंडमधल्या युनिव्हर्सिट्यांमध्यें रसायनशास्त्रावरील व्याख्यानें जर्मन भाषेंत व्हावींत.' जर्मन भाषेंतील सर्वमान्य ग्रंथ वाचतां यावे याकरितां उच्च रसायनशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला जर्मन भाषेचें ज्ञान पाहिजे असें फार तर आपल्याला प्रतिपादन करितां येईल."

"To enable our students to assimilate knowledge and to think for themselves, it is necessary that the process of thought as well as its expression should be made as natural as possible.

This can only be done by making the Vernaculars of India the media of instruction. Our experience of the students of the Osmania University, even though it is not a long one, has already convinced those professors of British Indian Universities who examined them in such subjects as Mathematics, History and Economics, that saved as these students now are from having to divert their attention from the subject matter to the grammatical construction of a foreign language, in which the students of other Universities in India have to study their books and to answer their question-papers, they are able not only to express themselves in their own mother-tongue more clearly, but also to show a firmer grasp of the subject of study than the students even of a higher class in the Universities established in British India.

"आमच्या विद्यार्थ्यांना त्यांनीं मिळविलेलें ज्ञान पचनीं पाडतां यावें व त्यांना स्वतंत्रपणें विचार करतां यावा म्हणून विचार करणें व तो व्यक्त करणें हे दोन्ही व्यापार शक्य तोंवर स्वाभाविकपणें होतील असें करणें आवश्यक आहे. हिंदुस्थानांतील देशी भाषांचा बोधभाषा म्हणून उपयोग केला तरच हें साध्य होण्यासारखें आहे. उस्मानिया युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांचा जो अनुभव आपणाला आला आहे तो फारसा नसला तरी त्यावरून खालसांतील युनिव्हर्सिट्यांमधील प्रोफेसरांची गणित, इतिहास, अर्थशास्त्र इत्यादि विषयांचे परीक्षक म्हणून अशी खात्री झाली आहे कीं खालसांतील युनिव्हर्सिट्यांमध्यें शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या परकी भाषेमध्यें पुस्तकें वाचावी लागतात व जींत प्रश्नांचीं उत्तरें लिहावीं लागतात त्या भाषेच्या व्याकरणविषयक रचनेकडे उस्मानिया युनिव्हर्सिटीमधील विद्यार्थ्यांना लक्ष द्यावें लागत नसल्यामुळे व तें त्यांना त्या त्या विषयाकडेच देतां येत असल्यामुळे त्यांना जें सांगावयाचें असतें तें अधिक स्पष्टपणें व्यक्त करितां येतें, इतकेंच नव्हे तर खालसामधील युनिव्हर्सिटींत त्यांच्याहून वरच्या वर्गांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षांही त्या विषयांवरील त्यांचें प्रभुत्व अधिक असतें."

देशी भाषांतून उच्च शिक्षण देण्याचा मोठ्या प्रमाणावर झालेला पहिला प्रयोग हरिद्वाराजवळच्या गुरुकुलाचा होय. हा त्यांचा प्रयोग यशस्वी झालेला

आहे. गुरुकुल पाहण्याची संधि मला गेल्या वर्षी मिळाली. हल्लीं तेथें आधुनिक पाश्चात्य वैद्यकीचेंही शिक्षण हिंदी भाषेंतून देण्यांत येत असतें. ह्या नंतरचा दुसरा प्रयत्न महिलाविद्यापीठाचा व तिसरा दक्षिण हैदराबादेंतील उस्मानिया युनिव्हर्सिटीचा. ह्यानंतर निघालेल्या राष्ट्रीय विद्यापीठांतूनही देशी भाषांना बोधभाषेचें स्थान दिलें आहे.

उच्च शिक्षणांत देखील मातृभाषेला बोधभाषा करणें—अर्थात् मातृभाषेंतून सर्व विषय शिकवणें—हा ह्या विद्यापीठाचा विशेष आहे. मातृभाषेच्या वाङ्मयाच्या अभ्यासालाही विद्यापीठाच्या परीक्षांतून प्रमुखस्थान दिलेलें आहे. ह्यामुळें आणखी एक कार्य सहजीं घडून येतें. आपली प्राचीन संस्कृति आणि आपली परंपरा ह्यांच्याशीं विद्यार्थिनींचा परिचय होणें आवश्यक आहे. आपल्या मध्यकालीन कविरायांच्या प्रासादिक कवनांत हे विषय वारंवार येऊन जातात.

इंग्रजी भाषेशीं चांगला परिचय होणें जरूर आहे, व ही गोष्ट हायस्कुलाच्या आरंभापासून कालेजाच्या अखेरीपर्यंत हा विषय आवश्यक ठेवून साधली आहे. कालेजांत शिकावयाच्या कित्येक विषयांवर मातृभाषेंत असावीं तशीं पुस्तकें उपलब्ध नाहींत. अशा विषयांच्या अभ्यासासाठीं इंग्रजी पुस्तकें नेमण्यांत येतात व तीं विद्यार्थिनींना वाचावीं लागतात. अर्थात् विषय मातृभाषेंतून समजविला जातो व परीक्षेच्या प्रश्नांचीं उत्तरें मातृभाषेंतूनच लिहावीं लागतात. जरूर पडेल तेव्हां इंग्रजी भाषेचा उपयोग करितां यावा इतकें इंग्रजीचें ज्ञान अवश्य पाहिजे व तें ह्या विद्यापीठांत मिळतेंही.

गणित विषयाची नावड असल्यामुळें ज्यांचीं नापास होण्यानें दोनतीन वर्षें फुकट जातात असे बरेच विद्यार्थी सांपडतील. गणित विषयासाठीं ज्यांना युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम सोडून देणें भाग पडलें असेही कांहीं थोडे विद्यार्थी सांपडतील. हिंदुस्थानांतील कित्येक युनिव्हर्सिट्यांनीं मॅट्रिक्युलेशनच्या नंतर गणित विषय आवश्यक ठेविला नाहीं, पण मुंबई युनिव्हर्सिटींत प्रीव्हियसच्या परीक्षेसाठीं तो अजून आवश्यक आहे. बी. ए. झाल्यावांचून गत्यन्तर नाहीं अशी समजूत असल्यामुळें बरेच तरुण विद्यार्थी हीं वर्षें घालवूनहि शेवटपर्यंत जाऊं शकतात. पण विद्यार्थिनींचीं अशीं वर्षें फुकट गेलीं तर

त्यांना मध्येंच अभ्यास थांबविण्याची वेळ येते. लग्नाच्या पूर्वी जेवढा वेळ सांपडेल तेवढ्याचा चांगला उपयोग करून घेतां आला पाहिजे ही गोष्ट मुलींचा अभ्यासक्रम ठरवितांना लक्षांत घेणें जरूर आहे. ह्या विद्यापीठांत अंकगणित हा विषय आवश्यक आहे पण बीजगणित व भूमिति यांची थोडीशी ओळख प्रवेश-परीक्षेपूर्वी करून दिली जाते इतकेंच. परीक्षेला हे विषय आवश्यक नाहींत. ह्या विषयांत गम्य असल्यास हे घ्यावे नाहीं तर त्यांच्या ऐवजीं दुसरे घ्यावे. अंकगणितापलीकडे गणित विषय न शिकतां महिलाविद्यापीठांत पदवीधर होतां येतें.

कॉलेजांत न जातां घरीं अभ्यास करूनही ह्या विद्यापीठाच्या परीक्षा देतां येतात व पदवीधरही होतां येतें. अशा रीतीनें दोन स्त्रिया पदवीधर झाल्या आहेत. माध्यमिक व उच्च शिक्षण स्त्रियांच्या आटोक्यांत आणून देणें हा ह्या विद्यापीठाचा एक हेतु आहे. परीक्षेसाठीं लांबच लांब प्रवास करून विद्यार्थिनींना परीक्षेच्या ठिकाणीं जावें लागतें. हा त्रास चुकविण्यासाठीं फार दूरची एकच विद्यार्थीण असली तरी तिची परीक्षा त्याच ठिकाणीं घेतली जाण्याची व्यवस्था करण्यांत येते. ह्या वर्षी अलवार येथील एक विद्यार्थीण परीक्षेला बसत आहे. तेथल्या शिक्षणखात्याच्या इन्स्पेक्टरच्या देखरेखीखालीं तिची परीक्षा घेण्याची व्यवस्था झाली आहे. प्रश्नपत्रिका येथून पाठविल्या जातील.

ह्या विद्यापीठाला राष्ट्रीय हें विशेषण अनेक दृष्टींनीं शोभण्यासारखें आहे. विद्यापीठाच्या अधिकाराचीं सर्व सूत्रें प्रातिनिधिक तत्त्वावर बनलेल्या सेनेटच्या हातांत आहेत. सर्व जातींच्या धर्मांच्या व प्रान्तांच्या लोकांना ह्या संस्थेचा फायदा घेतां येईल. मराठी, गुजराती, हिंदी, बंगाली व ऊर्दू ह्या बोधभाषांतून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थिनी ह्या विद्यापीठाचा फायदा घेत आहेत. ह्या वर्षी सिंधीभाषेंतून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थिनी प्रवेश परीक्षेला बसल्या आहेत. कोणत्याही प्रान्तांतलें तेथील प्रचलित भाषेंत शिक्षण देणारें हायस्कूल किंवा कॉलेज ह्या विद्यापीठाला जोडतां येईल. द्रव्याच्या बळावांचून युनिव्हर्सिटी चालणें शक्य नाहीं ही गोष्ट खरी, पण ह्या विद्यापीठाचा जन्म राजेरजवाड्यांच्या आणि श्रीमंतांच्या मोठमोठ्या देणग्यांच्या बळावर झालेला नसून तो सामान्य लोकांकडून मिळणाऱ्या

लहान लहान पण हजारों हजार देणग्यांच्या बळावर झाला आहे. व अशा लोकांच्या मदतीवरच त्याची अजूनही भिस्त आहे. थोडेसे अपवाद वगळले म्हणजे विद्यापीठाला राजेरजवाड्यांकडून व लक्ष्मीपुत्रांकडून मिळालेली मदत सामान्य लोकांच्या मदतीइतकीच आहे हें दिसून येईल.

इंग्रजी भाषेला फाजील महत्त्व न देतां कमी श्रमानें मातृभाषेंतून स्त्रियांना ज्ञान मिळविण्याचीं साधनें उपलब्ध करून द्यावीं या दृष्टीनें विद्यापीठाचे जोराचे प्रयत्न व्हावे अशी माझी इच्छा आहे. मनावर संस्कार होण्याच्या दृष्टीनें अगर बहुश्रुतपणाच्या दृष्टीनें ह्या विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा पास झालेल्या विद्यार्थिनी इतर युनिव्हर्सिट्यांतून मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालेल्या विद्यार्थिनींहून कमी नसाव्या व त्या तशा नाहींतही असें मला वाटतें. त्याच प्रमाणें आमच्या 'गृहीतागमा' सामान्य पदवी (Pass degree) मिळविलेल्या बी. ए. स्त्रियांपेक्षां कमी नाहींत असें म्हणण्यास मला शंका वाटत नाहीं. केवळ अपत्यप्रेमामुळें मी हें म्हणतों असें कोणी म्हणतील त्यांना माझें उत्तर एवढेंच कीं हें आज व्हावें तितक्या प्रमाणानें साध्य झालें नसेल तर तें साध्य झालें पाहिजे असें माझें म्हणणें आहे.

स्त्रियांच्या माध्यमिक शिक्षणाचा योग्य अभ्यासक्रम आंखून त्या शिक्षणाच्या प्रसाराचें अल्पस्वल्प कार्यही आपल्या हातून व्हावें हा ह्या विद्यापीठाचा हेतु आहे व त्याप्रमाणें त्याच्या हातून थोडेसें कार्य झालेलें आहे हें दुसऱ्या एका प्रकरणांतील माहितीवरून ध्यानांत येईल. केवळ स्वभाषेंतून माध्यमिक शिक्षण मिळावें अशी देखील योजना ह्या विद्यापीठानें केली आहे. इंग्रजी विषय वगळून बाकीचे प्रवेशपरीक्षेचे सर्व विषय कायम ठेवून एक परीक्षा ठरविलेली आहे, तिला 'मातृभाषेंतील माध्यमिक शिक्षणाची शेवटची परीक्षा' हें नांव दिलें आहे. ही पास झाली असल्यास फक्त इंग्रजी विषयांत पास झालें म्हणजे प्रवेश-परीक्षेचें सर्टिफिकेट मिळूं शकतें. ज्यांना इंग्रजी मुळींच शिकावयाचें नसतें किंवा ज्यांनीं इंग्रजी मध्येंच सोडून दिलेलें असतें त्यांना ही परीक्षा उपयोगीं पडते.

प्राथमिक शिक्षणाला थोडी मदत व्हावी ह्या हेतूनें प्राथमिक शाळांसाठीं शिक्षकिणी तयार करण्याकरितां स्त्रियांचीं कालेजें निघाल्यास तीं ह्या विद्यापीठाला जोडलीं जाऊन त्यांना थोडी वार्षिक मदत मिळूं शकते व

त्यांच्यासाठीं अभ्यासक्रम आंखून विद्यार्थिनींच्या परीक्षा घेऊन त्यांना सर्टिफिकिटें देण्याचें कार्य विद्यापीठाकडून होऊं शकेल. हिंगणें बुद्रुक येथील अध्यापिका शाळेचें काम विद्यापीठाच्या देखरेखीखालीं चाललें आहे. ह्याचा उपयोग किती झाला आहे हें दुसऱ्या एका प्रकरणांत दिलेल्या माहितीवरून कळून येईल.

ह्या संस्थेला युनिव्हर्सिटी हें नांव शोभत नाहीं असें कित्येकांचें म्हणणें आहे. त्यांचें म्हणणें कीं युनिव्हर्सिटीचें ध्येय इंटरमीजिएटच्या व पदवीच्याही पलीकडलें उच्चतर शिक्षण देण्याचें असलें पाहिजे. ह्या ध्येयाच्या बरेंच खालचें काम करणाऱ्या जगांतील अनेक संस्थांनीं हें नांव धारण केलें आहे. शब्दाच्या मूळ अर्थाकडे लक्ष दिलें असतां आणि ह्या संस्थेनें जें कार्य आपल्यासाठीं आंखून घेतलें आहे व त्यांतले कांहीं घडवूनही आणलें आहे त्याजकडे पाहतां युनिव्हर्सिटी हेंच नांव मला तरी यथार्थ दिसतें. इतर युनिव्हर्सिट्यांच्या पावलावर पाऊल ठेवून न चालतां ह्या युनिव्हर्सिटीनें आपलें क्षेत्र बरेंच व्यापक केलें आहे. नांव कोणतेंही असलें तरी संस्थेची योग्यता तिच्या कामावरूनच ठरत असते. तें काम लोकांच्या पुढें आहे.

# प्रकरण अकरावें

## मुंबई युनिव्हर्सिटी व महिलाविद्यापीठ ह्या दोहो- मधून निघणाऱ्या एका विशिष्ट वर्गातील पदवीधर स्त्रियांची तुलना

एकाच प्रकारचा माल काढणारे दोन कारखाने असले म्हणजे त्यांतील मालांचे गुणावगुण पाहून त्यांची तुलना करावी असें मनुष्याच्या सहज मनांत येतें. त्या मालाचा उपयोग स्वतः करावयाचा असला तर तो हें काम विशेष काळजीनें करतो. पण तसें नसलें तरी देखील जिज्ञासेच्या अगर कुतूहलाच्या दृष्टीनें हें तो करीत असतो. विशेषतः स्वदेशी आणि परदेशी कारखान्यांतून तोच माल निघत असला तर स्वदेशी माल किंचित् कमी दर्जाचा असला तरी 'श्रेयान् स्वधर्मो विगुणः' या न्यायानें कांहीं मनुष्यें स्वदेशी पतकरतात. स्वदेशी कारखान्यांना परदेशी कारखान्यांशीं टक्कर देणें फार जड जातें. रेल्वेच्या सवलती मिळत नाहींत. सरकारचा पाठिंबा नसतो. भांडवल पुरविणारे लोक साशंक असतात. इतक्या अडचणींतून परदेशी मालाशीं जवळ जवळ टक्कर देणारा माल जर स्वदेशी कारखान्यांत निघाला तर त्याचें कौतुक करून तो घ्यावा असें थोड्याशा मनुष्यांना वाटतें व तीं तो घेतात हें खरें, पण बऱ्याचशा विचारी लोकांची सुद्धां समजूत पडण्यास वेळ लागतो, मग जनतेची समजूत पडण्यास वेळ लागला तर त्यांत आश्चर्य नाहीं.

असा प्रकार शिक्षणसंस्थांतून निघणाऱ्या मालासंबंधानें म्हणजे त्या संस्थांत मिळणाऱ्या शिक्षणासंबंधानेंही होतो. प्रचलित पद्धतीनें शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या पाठीमागें राजमान्यतेचा जोर असतो. तसा स्वतःच्या बळावर काढलेल्या निराळ्या दिशेच्या संस्थांना नसतो. अशा संस्थांना अनेक अडचणींशीं झगडावयाचें असतें. आपल्या देशांत जीं अनेक राष्ट्रीय विद्यापीठें निघालीं त्यांना पहिल्या आवेशांत लोकमताचा बराच पाठिंबा मिळाला, पण तो आवेश ओसरल्यानंतर लोक केवळ व्यावहारिक दृष्टीनें विचार करूं लागले व राष्ट्रीय विद्यापीठांना रामराम ठोकून ते राजमान्य

शिक्षणाकडे वळले. राजमान्य शिक्षणांत जरी इतकी बेकारी माजली आहे, व शेंकडा दहा पंधरा विद्यार्थी वगळले तर बाकीच्यांना जरी केवळ मृगजळावरच तहान भागवून घ्यावी लागते तरी तिकडे जाण्याचा मोह सामान्य बुद्धीच्या किंवा त्याहून खालच्या पायरीच्या विद्यार्थ्यांनासुद्धां सोडीत नाहीं. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं शिक्षण बरें आहे कीं वाईट आहे ह्याचा विचार न होतां नोकरी मिळवून देण्याचें सामर्थ्य—हें सामर्थ्य तरी नकली आहे कीं खरें आहे हा विवेक रहात नाहीं तो नाहींच—त्याच्यांत किती आहे हा एकच विचार निर्णायक होऊन बसतो. तळेगांवच्या नवीन समर्थ विद्यालयासारख्या किंवा शांतिनिकेतनासारख्या केवळ शैक्षणिक दृष्टीनें उत्पन्न झालेल्या सुव्यवस्थित संस्थांना सुद्धां लोकांची ही विचारसरणी बाधक होते.

स्त्रियांच्या शिक्षणाची गोष्ट थोडीशी वेगळी आहे. त्यांना स्वावलंबी करणें किंवा आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देणें हा शेंकडा नव्वद मुलींच्या शिक्षणाचा तरी हेतु नसतो. तथापि रुळलेल्या मार्गानें जाण्याची प्रवृत्ति आणि राजमान्यता ह्यांचा वरचष्मा होतोच. महिला–विद्यापीठाला थोडीशी राजमान्यता मिळाली आहे व पुढें ती कदाचित् आणखी थोडीशी मिळण्याचा संभव आहे ही एक गोष्ट व राजमान्य शिक्षणामध्यें सुद्धां आर्थिक स्वातंत्र्य मिळण्याचा संभव बराच कमी होत चालला आहे ही दुसरी, ह्यांमुळें स्त्रियांच्या शिक्षणाकडे तुलनात्मक दृष्टीनें पाहण्याची प्रवृत्ति उत्पन्न करण्याचा यत्न अगदीं फुकट जाईल असें वाटत नाहीं. गणित विषय व शास्त्रीय विषय हे दोन ऐच्छिक विषय घेऊन ज्या विद्यार्थिनी महिला विद्यापीठाची प्रवेश परीक्षा पास होतील त्यांना एल्. सी. पी. एस्. परीक्षेचें वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या मेडिकल स्कुलांत दाखल होतां येईल. आज मुंबई युनिव्हर्सिटींतून बाहेर पडलेल्या ग्रॅजुएट (पदवीधर) व अंडर ग्रॅजुएट (बी. ए. न झालेल्या परंतु कॉलेजांतील एकदोन परीक्षांचें शिक्षण घेतलेल्या) स्त्रिया बऱ्याच आहेत. त्यांना सरकारी अगर खासगी नोकरी मिळणें बरेंच कठीण होऊं लागलें आहे. आरंभीं अशा स्त्रियांची संख्या फार थोडी असल्यामुळें त्यांना भराभर चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळत गेल्या. परंतु आतां ती स्थिति राहिली नाहीं. ह्यापुढें तर शिकलेल्या स्त्रियांमध्यें बेकारीच उत्पन्न

होणार. हल्लींही तशी स्थिति थोड्या प्रमाणानें जाणवूं लागली आहे. तेव्हां आपल्या मुलींना मुंबई युनिव्हर्सिटीचें शिक्षण द्यावें कीं, महिला–विद्यापीठाचें शिक्षण द्यावें हा विचार मुलींच्या पालकांना आज नाहीं उद्यां करावा लागणार.

तुलनात्मक दृष्टीनें विचार करतांना तीन चार मुद्यांकडे लक्ष दिलें पाहिजे. मनावर संस्कार होण्याच्या व बहुश्रतपणा अंगीं येण्याच्या दृष्टीनें कोणतें शिक्षण अधिक परिणामकारक होईल ? त्याचप्रमाणें योग्य वर मिळण्याला अमुक एक शिक्षण अधिक उपकारक होईल कीं काय ? कुटुंबाच्या व समाजाच्या उपयोगीं पडण्याची पात्रता कोणत्या शिक्षणानें अधिक येईल ? समाजांत वावरतांना अशिक्षित स्त्रियांवर परिणाम करण्याला इंग्रजी भाषेंतून शिकलेले स्त्रियांच्या व्यवहाराशीं संबंध नसलेले विषय अधिक उपयोगीं पडतील कीं मातृभाषेंतून शिकलेले प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, मानसशास्त्र व विशेषतः शिशुमानसविकास-शास्त्र हे उपयोगीं पडतील ? शिक्षणासाठीं जो खर्च करावयाचा व वेळ घालवावयाचा त्याचा मोबदला कोणत्या शिक्षणानें अधिक मिळेल ? कोणत्या शिक्षणानें शरीरावर वाईट परिणाम होण्याची भीति अधिक आहे ? व सरतेशेवटीं, प्रसंग आला असतां आपल्या पायांवर उभें राहतां येईल कीं नाहीं ? हे प्रश्न आतां केवळ उपपत्तीच्या दृष्टीनें व नुसत्या विचाराची कसोटी लावून सुटणार नाहींत. ते अनुभवानें सोडविले पाहिजेत. मुंबई युनिव्हर्सिटींतून व महिला–विद्यापीठांतून पदवीधर होऊन बाहेर पडलेल्या स्त्रिया आज समाजांत वावरत आहेत. त्यांच्या आयुष्यक्रमाकडे चिकित्सकबुद्धीनें पाहिलें असतां हे प्रश्न सोडवणें फारसें कठिण पडणार नाहीं. ह्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न करण्याची माझी इच्छा नाहीं. तो प्रयत्न प्रत्येक वाचकानें आपापल्यापरी करावा. हे प्रश्न सोडविण्याला लागणारी थोडी सामुग्री मात्र पुरविण्याचा माझा विचार आहे.

ज्या पदार्थांची तुलना करावयाची त्यांमध्यें बरेंचसें साम्य असावें लागतें. ह्यासाठीं ह्या दोन युनिव्हर्सिट्यांतील पदवीधर स्त्रियांमधून असे दोन वर्ग निवडून काढले पाहिजेत कीं त्यांमध्यें अनेक प्रकारचें साम्य असूं शकेल. महिला–विद्यापीठांतील पहिली पदवीधर स्त्री १९१९ त बाहेर पडली. ह्यासाठीं १९१९ पासून १९२७ पर्यंत बाहेर पडलेल्या पदवीधर स्त्रियांचीच तुलना करणें इष्ट होईल. दुसरी गोष्ट समान दर्जाच्याच स्त्रियां-

मध्यें तुलना व्हावी व त्यांची संख्याही जवळ जवळ सारखी असावी. देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे ह्या ब्राह्मणांच्या तीन पोटजातींतील पदवीधर स्त्रिया जर घेतल्या तर ह्या गोष्टी साधताहेत. ह्यासाठीं दोन कोष्टकें मी देत आहें त्यांवरून ह्या उभय विद्यापीठांतून निघालेल्या ह्या विशिष्ट वर्गातील स्त्रिया कोठें आहेत व काय करीत आहेत तें कळून येईल व प्रत्येक वाचकाला आपापलें मत बनावितां येईल. पुष्कळ वाचकांना ह्यांपैकीं बहुतेकांची प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष माहिती असण्याचाही संभव आहे.

## महिलाविद्यापीठांतील पदवीधर स्त्रिया

| अ. नं. व नांव | पदवीची पहिली परीक्षा पास झाल्याचें वर्ष | हल्लींची स्थिति व कामाचें स्वरूप. |
|---|---|---|
| १. श्रीमती वारूबाइ शेवडे जी. ए. | १९१९ | हिंगणें बुद्रुक येथील महिलाश्रमाचे वसतिगृहावर देखरेख. यांना गर्ल गाइडचें सेकंड ग्रेड सर्टीफिकेट मिळालें आहे व हिंगणें येथली गर्लगाइडच्या कंपनीच्या ह्या क्याप्टन आहेत. महिलाश्रमांत थोडें शिकवण्याचें कामही करतात. या हिंगण्याच्या अनाथबालिकाश्रम संस्थेच्या आजन्म—सेविका आहेत. |
| २. श्रीमती कमलाबाई देशपांडे, जी. ए. | १९२० | साताऱ्याची कन्याशाळा स्थापन करून ती पूर्ण हायस्कुलाच्या स्वरूपाला आणण्याचें श्रेय यांचें आहे. या त्या कन्याशाळेच्या सुपरिंटेंडेंट आहेत व सातारा डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या स्कूल कमिटीच्या सभासद आहेत. |
| ३. सौ. गंगूबाई पट- | १९२० | यांना गर्ल गाइडचें सेकंड ग्रेड सर्टीफिकेट |


| | | |
|---|---|---|
| वर्धन, जी. ए. | | मिळालें असून यांनीं प्रथम हिंगणें येथें गर्ल गाइडची कंपनी (पथक) स्थापन करून तिच्या त्या क्यापटन झाल्या. गेल्या वर्षी त्या एकाविशिष्ट अध्यापन पद्धतीचें शिक्षण त्या पद्धतीच्या उत्पादक मिस मांटेसुरी यांचेकडून घेण्यासाठीं लंडन येथें गेल्या. हल्लीं त्या तेथेंच मराया ग्रे कालेजांत शिक्षण शास्त्राचा अभ्यास करीत आहेत. तिकडे जाण्यापूर्वी त्या महिलाश्रमांत शिकवण्याचें काम करीत होत्या. |
| ४. सौ. रेवतीबाई कर्वे, जी. ए. | १९२० | यांनीं कांहीं वर्षे पुण्याच्या शाळेंत असिस्टंट सुपरिंटेंडेंटचें काम केलें. पुढें त्यांचा विवाह क्याप्टन शंकर धोंडो कर्वे, एम्. बी.बी. एस. मेडिकल प्राक्टिशनर, नैरोबी, (ब्रिटिश ईस्ट आफ्रिका) यांच्याशीं झाला. |
| ५. कुमारी गोदावरी बाई केतकर, पी. ए. | १९२१ | ह्या भारतीय नाट्यशास्त्रावर निबंध लिहून महिलाविद्यापीठाच्या 'प्रदेयागमा' झाल्या आहेत. या निबंधाचें ४०० पृष्ठांचें पुस्तक छापून झालें आहे. ह्या पुस्तकानें महाराष्ट्र वाङ्मयांत चांगली भर पडली आहे. या साताऱ्याच्या कन्याशाळेंत असिस्टंट सुपरिंटेंडेंट आहेत. |
| ६. श्रीमती रुक्मिणी अम्मा चिंतामणि-भटला, जी. ए. | १९२१ | या नेलोर येथील मुलींच्या इंग्रजी शाळेंत शिक्षिका आहेत. |
| ७. कुमारी कृष्णाबाई खरे, जी. ए. | १९२१ | यांना मध्यप्रांतांतील सरकारी विद्यालयांत घेतलें आहे. या उमरावती येथील मुलींच्या हायस्कुलांत शिक्षिका आहेत. यांजकडे मॅट्रिक्युलेशच्या वर्गाचे मराठी व संस्कृत हे विषय अनेक वेळां दिलेले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ८. सौ. आनंदीबाई जोशी, जी. ए. | १९२२ | यांचा विवाह रत्नागिरी येथील वकील श्रीयुत जनार्दन वामन जोशी, बी. ए. एल्एल्. बी., यांच्याशीं झाला आपला संसार संभाळून यांनीं रत्नागिरी येथें आज तीन वर्षें कन्याशाळा चालविली आहे. |
| ९. सौदामिनीबाई पंतवैद्य, जी. ए. | १९२२ | यांचा विवाह इंदूरचे श्रीयुत एम् व्ही. पंतवैद्य, बी. एस्सी., इलेक्ट्रिकल एंजिनियर यांच्याशीं झाला. |
| १०. श्रीमती दुर्गाबाई जोशी, जी. ए. | १९२२ | यांजकडे अकोल्यांतील भगिनी मंडळाचें नेतृत्व आहे. या अकोला येथील टिळक कन्याशाळेंतही थोडेसें काम करितात. |
| श्रीमती शांताबाई भाटवडेकर, जी. ए. | १९२२ | या नागपुर येथें भिडे कन्याशाळेंत सुपरिंटेंडेंट आहेत. या आखिल भारतीय स्त्री शिक्षण परिषदेच्या गेल्या फेब्रुवारी महिन्यांत दिल्ली येथील अधिवेशनासाठीं नागपूरतर्फे प्रतिनिधि म्हणून गेल्या होत्या. |
| १२. श्रीमंती सीताबाई अण्णिगेरी, जी. ए. | १९२२ | या सर विठ्ठलदास व लेडी विठ्ठलदास यांचे बरोबर पृथ्वीप्रदक्षिणा करून आल्या. यांना गर्लगाइडचें सेकंड ग्रेड सर्टिफिकेट मिळालें आहे. या मुंबईतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळेच्या सुपरिंटेंडेंट आहेत. याही दिल्ली येथील स्त्रीशिक्षणपरिषदेस मुंबईतर्फे प्रतिनिधि म्हणून गेल्या होत्या. |
| १३. सौ. सुमतिबाई देव, जी. ए. | १९२२ | यांचा विवाह नागपुरचे श्रीयुत पी.पी. देव. एम्. ए., एल्एल्. बी., वकील, नागपुर यांच्याशीं झाला. |
| १४. कुमारी बाळूबाई खरे, जी. ए. | १९२३ | या पुण्यांतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्या शाळेंत असिस्टंट सुपरिं- |

| | | |
|---|---|---|
| | | टेंडेंट आहेत. यांना गर्ल गाइडचें सेकंड ग्रेड सर्टिफिकेट मिळालें आहे. यांनीं कन्याशाळेंत एक गर्ल गाइडचें पथक तयार केलें आहे व त्याच्या या क्याप्टन आहेत. यांनीं 'प्रदेयागमा' परीक्षेसाठीं अलंकार शास्त्रावर एक निबंध लिहून पाठविला आहे. |
| १५. श्रीमती बनूबाई आठो, जी. ए. | १९२३ | बेळगांवचें महिला विद्यालय स्थापन करून तें जवळजवळ पूर्ण हायस्कुलाच्या स्वरूपाला आणण्याचें श्रेय यांना आहे. या त्या महिला-विद्यालयाच्या सुपरिंटेंडेंट आहेत. |
| १६. श्रीमती गंगूबाई लेले, जी. ए. | १९२४ | या नागपुर येथील भिडे कन्या शाळेंत काम करीत आहेत. |
| १७. सौ. वनमालाबाई तुळजापुरकर, जी. ए. | १९२५ | यांचा विवाह श्रीयुत दत्तो आपाजी तुळजापुरकर, बी. ए., एल्एल्. बी., हायकोर्ट वकील, मुंबई, यांच्याशीं झाला. त्यापूर्वीं या वाई येथील कन्या शाळेच्या सुपरिंटेंडेंट होत्या. |
| १८. कुमारी मथूबाई केतकर जी. ए. | १९२५ | या मुंबईतील नाथीबाई कन्या शाळेंत शिक्षिका आहेत. |
| १९. कुमारी वेंकूबाई सरदेशपांडे, जी. ए. | १९२५ | या पुणें येथील सेवासदनाच्या मुलींच्या हायस्कुलाच्या सुपरिंटेंडेंट आहेत. |
| २०. कुमारी शांताबाई केतकर जी. ए. | १९२५ | या सातारा येथील कन्या शाळेंत शिक्षिका आहेत. |
| २१. सौ. पद्मावतीबाई मंडलिक, जी. ए. | १९२५ | यांचा विवाह श्रीयुत गोपाळ शिवराम मंडलीक, बी. एस् सी., इलेक्ट्रिकल एंजिनियर यांच्याशीं झाला. |
| २२. श्रीमती सुशीलाबाई आठवले, जी. ए. | १९२६ | यांनीं कांहीं महिने पुण्यांतील कन्या शाळेंत व कांहीं महिने बेळगांवच्या कन्या शाळेंत शिक्षकिणीचें काम केलें. |



श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला पाठशाला अध्यापकवर्ग व विद्यार्थिनी.



श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला पाठशाला अध्यापकवर्ग व विद्यार्थिनी.

| | | |
|---|---|---|
| २३. कुमारी सुशीला-बाई घनेश्वर, जी. ए. | १९२६ | या बेळगांवच्या–महिला विद्यालयांत शिक्षिका आहेत. |
| २४. कुमारी अनसूया-बाई गद्रे, जी. ए. | १९२६ | या हिंगणेबुद्रुक येथील महिलाश्रमाच्या व वसतिगृहाच्या असिस्टंट सुपरिंटेंडेंट आहेत व महिलाश्रमांत शिक्षकाचें कामही करि-तात. |
| २५. कुमारी द्वारका-बाई जोगळेकर, जी. ए. | १९२६ | या पुण्यांतील कन्याशाळेंत शिक्षिका आहेत. |
| २६. कुमारी कावेरी-बाई जोशी, जी. ए. | १९२६ | या सांगलीच्या कन्याशाळेच्या सुपरिंटेंडेंट आहेत. |
| २७. कुमारी यमुना-बाई राजवाडे, जी. ए. | १९२६ | यांनीं कांहीं महिने बेळगांव येथील महिला-विद्यालयांत शिकवण्याचें काम केलें. |
| २८. कुमारी द्रौपदीबाई केतकर, जी. ए. | १९२७ | या सांगलीचे कन्याशाळेंत शिक्षिका आहेत. |

## मुंबई युनिव्हार्सिटींतील पदवीधर स्त्रिया.

| अ. नं. व नांव | पदवीची पहिली परीक्षा पास झाल्याचें वर्ष | हल्लींची स्थिति व हल्लींचें काम. |
|---|---|---|
| १. कुमारी गीताबाई हेरलेकर, बी.ए. | १९१९ | बडोदें येथील महाराणी गर्ल्स् हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| २. सौ. शारदाबाई नरवणे, बी. ए. | १९१९ | यांचा विवाह श्रीयुत एस. जी नरवणे, एंजिनियर, यांच्याशीं झाला. |
| ३. सौ. सुधाबाई ढवळे, एम्. ए. | १९२० | यांचा विवाह श्रीयुत रामचंद्र सदाशिव ढवळे, बी. ए. यांच्याशीं झाला. |
| ४. सौ. सुशीलाबाई मोडक, बी. ए. | १९२० | यांचा विवाह डॉ. यशवंत वामन मोडक, एल्. एम्. अँड एस्., बडोदें, यांच्याशीं झाला. |
| ५. सौ. भानुमती-बाई मोहनी, | १९२० | यांचा विवाह श्रीयुत दत्तात्रय कृष्ण मोहनी, एम्.ए.,एल्.टी.,नागपुर,यांच्याशीं झाला. |
| ६. कुमारी भवानी नटराजन्, बी.ए. | १९२० | या नुकत्याच इंडियन सोशल रिफार्मरच्या संपादिका झाल्या आहेत. यापूर्वी दादर येथील मुलींच्या इंग्रजी शाळेंत अवैतनिक काम करीत असत. |
| ७. श्रीमती गोदूबाई केळकर,बी.ए., बी. टी. | १९२१ | या पुण्यांतील फीमेल हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| ८. कुमारी यमुनाबाई भाटे, एम्. ए. | १९२१ | या पुण्यांतील फीमेल हायस्कुलांत शिक्षिका होत्या. हल्लीं या लंडन येथें शिक्षण शास्त्राचा अभ्यास करीत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ९. सौ. मालिनीबाई परांजपे, बी. ए. | १९२२ | यांचा विवाह मुंबईच्या रॉयल इन्स्टिटयूट-मधील प्रोफेसर गो. रा. परांजपे यांच्याशीं झाला. |
| १०. कुमारी अनसूयाबाई देवधर बी.ए. | १९२२ | या पुण्यांतील फीमेल हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| ११. कुमारी शान्ताबाई बापट, एम्. ए. | १९२३ | या पुण्यांतील फीमेल हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| १२. सौ. विमलाबाई देशपांडे एम्.ए. | १९२३ | यांचा विवाह श्रीयुत पुरुषोत्तम यशवंत देशपांडे एम्. ए., एल्‌एल्. बी., उमरावती यांच्याशीं झाला. या उमरावतीच्या गर्ल्स् हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| १३. कुमारी वेणूबाई पानसे, एम्.ए., बी. टी. | १९२३ | या पुण्यांतील फीमेल हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| १४. कुमारी रंगूबाई पोंक्षे, बी. ए., एल्. एल्. बी. | १९२३ | या पुण्यांतील सेवासदनाचे हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| १५. सौ. मथुराबाई बंबेवाले, बी.ए. | १९२३ | यांचा विवाह मध्यप्रांतांतील श्रीयुत बंबेवाले यांच्याशीं झाला. |
| १६. सौ. शकुंतलाबाई गाडगीळ, बी.एससी. | १९२३ | यांचा विवाह डॉ. श्रीकृष्ण नारायण गाडगीळ, नागपुर यांच्याशीं झाला. |
| १७. कुमारी सुशीलाबाई जकातदार, बी.ए. | १९२४ | या पास झाल्यानंतर लवकरच परलोकवासी झाल्या. |
| १८. कुमारीद्वारकाबाई भट, बी.ए., बी.टी. | १९२४ | या पुण्यांतील सेवासदनाच्या ट्रेनिंग कालेजाच्या प्रिन्सिपल आहेत. |
| १९. कुमारी चंद्राबाई पोंक्षे, बी. ए., एल्‌एल्. बी. | १९२५ | या पुण्यांतील सेवासदनाच्या हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| २०. सौ. सखूबाई मायदेव, बी. | १९२५ | यांचा विवाह श्रीयुत अनंत गोविंद मायदेव, बी. ई., यांच्याशीं झाला. बी. एस्. |

| | | |
|---|---|---|
| एस्सी. | | सी. झाल्यावर दीडवर्ष या फीमेल हायस्कूलमध्यें शिक्षिका होत्या. हल्लीं बारामतीस सेवासदनांत या शिकविण्याचें काम फुकट करीत आहेत. |
| २१. कुमारी कृष्णाबाई कोल्हटकर, एम्.ए. | १९२५ | या अलीकडे सांगली येथील कन्याशाळेंत दररोज एक तास अवैतनिक काम करीत आहेत. |
| २२. सौ. इंदिराबाई लेले, बी. ए. | १९२५ | यांचा विवाह श्रीयुत प्रताराव वासुदेव लेले सबजज्ज, चांदा यांच्याशीं झाला. |
| २३. कुमारी गंगुबाई काळे, बी. ए. | १९२५ | या हल्लीं विशेष कांहीं करीत नाहींत. |
| २४. सौ. इरावतीबाई कर्वे, बी. ए. | १९२६ | यांचा विवाह डॉ. दिनकर धोंडो कर्वे, एम्. एस्सी., पीएच्. डी., फर्ग्युसन कालेजांतील प्रोफेसर, यांच्याशीं झाला. या एक वर्ष फर्ग्युसन कॉलेजांत फेलो होत्या. |
| २५. सौ. शांताबाई नासिककर बी. ए. | १९२६ | यांचा विवाह डॉ. एस्. जी. नासिककर, एम्. बी. बी. एस्., पुणें, यांच्याशीं झाला. |
| २६. श्रीमती मुक्ताबाई लेले, बी. ए. | १९२६ | या सेवासदनांत शिक्षिका आहेत. |
| २७. कुमारी सिंधुबाई गोखले. बी. ए. | १९२६ | या मुंबईच्या सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजांत बी. टी. चा अभ्यास करीत आहेत. |
| २८. कुमारी सत्यप्रिया-बाई मराठे, बी. ए. | १९२६ | या अकोला येथील होमक्लासांत शिक्षिका आहेत. |
| २९. कुमारी सोनुबाई चिपळूणकर बी.ए. | १९२६ | या एम्. ए. चा अभ्यास करीत आहेत. |
| ३०. कुमारी शकुंतला-बाई परांजपे, बी. एस्सी. | १९२६ | या हल्लीं केंब्रीजमध्यें न्यूनहॅम कॉलेजांत शिकत आहेत. |
| ३१. कु. मथुराबाई. गोखले, बी. ए. | १९२७ | या एम्. ए. चा अभ्यास करीत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ३२. कु. कमलाबाई उकिडवे, बी.ए. | १९२७ | या एम्. ए. चा अभ्यास करीत आहेत. |
| ३३. कु. विमलाबाई गोखले, बी.ए. | १९२७ | या पुण्यांतील फीमेल हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| ३४. सौ. कमलाबाई जमखंडी बी. ए. | १९२७ | यांचा विवाह श्रीयुत जमखंडी यांच्याशीं झाला असून या हल्लीं विजापूरच्या सरकारी मिडल स्कुलांत शिक्षिका आहेत. |
| ३५. कु. शरयूबाई किर्लोस्कर, बी.ए. | १९२७ | यांचेसंबंधानें माहिती मिळाली नाहीं. |
| ३६. कु. शारदाबाई नागपुरकर बी.ए. | १९२७ | या पुण्याच्या सेवासदनांत शिक्षिका आहेत. |
| ३७. कु. शांताबाई परांजपे, बी. ए. | १९२७ | या पुण्याच्या फीमेल हायस्कुलांत शिक्षिका आहेत. |
| ३८. कु. मथुराबाई मुळे, बी. ए. | १९३७ | यांचे संबंधानें माहिती मिळाली नाहीं. |
| ३९. कु. मालतीबाई देवळालीकर बी.ए. | १९२७ | या कराची येथें एका मुलींच्या इंग्रजी शाळेंत शिक्षिका आहेत. |
| ४०. कु. इंदिराबाई दामले, बी. ए. | १९२७ | यांचे संबंधानें माहिती मिळाली नाहीं. |
| ४१. कु. तानुबाई चिरपुटकर बी.ए. | १९२७ | या पुण्यांतील कन्याशाळेंत शिक्षिका आहेत. |

ह्या ठिकाणीं एक दोन गोष्टी वाचकांच्या लक्षांत आणून देणें जरूर दिसतें. मुंबई युनिव्हर्सिटींतून बाहेर पडलेल्या ज्या स्त्रिया शिक्षण व्यवसायांत पडल्या आहेत त्या बहुतेक सरकारी शाळांत काम करीत आहेत. परंतु महिला-विद्यापीठांतून बाहेर पडलेल्या बऱ्याच पदवीधर स्त्रिया खासगी प्रयत्नांनीं निघालेल्या शाळांत स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर काम करीत आहेत. त्या शाळांना ऊर्जित दशा आणून देण्याला त्यांचे शाळेंत शिक्षण देण्याहून अन्य प्रकारचे श्रम कारणीभूत झालेले आहेत.

मुंबई युनिव्हर्सिटींतून किंवा महिला-विद्यापीठांतून बाहेर पडणाऱ्या

ग्रॅज्युएट व अंडर ग्रॅज्युएट स्त्रियांना स्वावलंबी व्हावयाचें असल्यास त्यांना आतां थोडे अपवाद वर्ज केले तर एकच मार्ग उरला आहे. तो म्हटला म्हणजे मोठ्या पगाराची हांव न धरतां जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणीं जाऊन खासगी शाळा काढणें हा होय. बऱ्या रीतीनें निर्वाह होईल इतकें वेतन त्यांना मिळूं शकेल. पण दुसरा कोणी आपल्याला वेतन देईल आणि मग आपण जाऊं असें म्हटलें तर मात्र कांहीं होणार नाहीं. स्वतः जाऊन लोकांचीं मनें वळवून दहा पांच मुलींचीच शाळा सुरू केली पाहिजे म्हणजे सर्व कांहीं जुळून येतें. नौकरीवर अवलंबून न राहतां अशा प्रकारचे प्रयत्न करणाऱ्या स्त्रीच्या अंगीं खरा आत्मविश्वास उत्पन्न होऊन तिजमध्यें अनेक गुणांचा परिपोष होईल व तिच्या हातून एरवीं न होणारें समाजकार्य होऊं शकेल.

पुरुषांच्या कॉलेजांतून उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांपैकीं शेंकडा ऐंशीं स्त्रियांना महिला–विद्यापीठांत मिळणारें शिक्षण अधिक उपकारक होईल असें माझें ठाम मत आहे. तें किती प्रमाणांत खरें आहे हें वाचकांना ठरवितां यावें ह्यासाठीं वरील याद्या दिल्या आहेत. त्यांत कोणाचा उपमर्द करण्याचा हेतु नाहीं. दोन्ही युनिव्हर्सिटीतून आजपर्यंत निघालेल्या व ह्यापुढें निघणाऱ्या पदवीधर स्त्रियांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय कामगिरीची तुलना करून ह्या गोष्टीचा निर्णय केला पाहिजे. ही गोष्ट राष्ट्राच्या जिव्हाळ्याची आहे ह्यासाठीं ह्या बाबतींत विचारपूर्वक लोकमत बनणें अत्यंत जरूर आहे.

# प्रकरण बारावें

## विद्यापीठाला मिळालेल्या ठळक देणग्या

## व

## विद्यापीठाची सांपत्तिक स्थिति

ठाकूर विठ्ठलदास यांच्या देणगीबद्दल विस्तृत हकीकत आलेलीच आहे. डॉ. लांडे यांच्या देणगीबद्दलही सविस्तर उल्लेख केलेलाच आहे. शेट मूळराज खटाव हे ठाकरसींच्या बरोबर पृथ्वीप्रदक्षिणेला गेलेल्या मंडळींत असून जपानांतील स्त्रियांची युनिव्हर्सिटी पाहिलेले व त्या संबंधींचे संवाद ऐकलेले होते. यांनीं खटाव मकनजी यांचे स्मरणार्थ हिंदु युनिव्हर्सिटीला स्त्रियांसाठीं वसतिगृह बांधण्याकरितां एक लाखाहून अधिक देणगी दिलेली होती. ठाकरसींच्या देणगीबद्दलही त्यांना माहिती होती. त्यांना भेटल्यानंतर इमारतींसंबंधानें त्यांनीं चौकशी केली. मुख्य इमारतीसंबंधाचें काम चालू होतें पण वसतिगृहासंबंधानें जरूरी होती. त्या इमारतीच्या खर्चाबद्दल निम्मे म्हणजे पंचवीस हजार रुपये देण्याचें त्यांनीं कबूल केलें व नकाशा तयार करून तो दाखविण्यासाठीं पुन्हा बोलाविलें. इमारतीला खर्च सत्तर हजार येईल असें नकाशा काढल्यानंतर अंदाज करितां दिसून आलें. तें त्यांस दाखविल्यानंतर त्यांनीं पस्तीस हजार रुपये देण्याचें कबूल केलें व "खटाव मकनजी वसतिगृह" कालेजाच्या इमारती शेजारीं बांधण्यांत आलें. या देणगीनें आम्हांस योग्य वेळीं फार मदत झाली. वसतिगृहावांचून आमचें चाललें नसतें व त्यासाठींही ठाकरसींनीं आम्हांस आणखी बिन व्याजीं कर्ज दिलें असतें परंतु तें फेडतां फेडतां नाकीं नव आले असते. ती जरूरी यांच्या देणगीमुळें राहिली नाहीं.

यानंतर साधारण मोठी देणगी म्हणजे कुमारी विठाबाई सामंत ( हल्लीं सौ. मनोरमाबाई लेले ) यांची. यांचे वडील व मातुःश्री हीं या आठ वर्षांच्या होण्यापूर्वींच परलोकवासी झालीं होतीं. यांच्या वडिलांच्या इच्छेनें त्यांनीं मृत्युपत्रांत लिहिल्यावरून यांचें सर्व प्रकारचें पालकत्व मजकडे आलें. या आमच्या कुटुंबांत व संस्थांत लहानाच्या मोठ्या झाल्या. यांच्या वडि-

लांनीं परोपकाराच्या कामीं बराच पैसा खरचला होता व आपल्या मुलीनें-ही अशा कामीं कांहीं करावें अशी इच्छा आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेविली होती. तीस अनुसरून सौ. मनोरमाबाईनीं सहा हजार आठशें रुपयांचीं कॅश सर्टीफिकिटें ( कांहीं १९२८ त व कांहीं १९३० त मुदत संपणारीं) विद्यापीठाला देणगीचे रूपानें दिलीं. त्यांच्या साडेतीन व्याजाच्या चाळीस हजारांच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा विद्यापीठाजवळ ठेवण्यास द्याव्या व त्यांचें सर्व व्याज त्यांचीं सर्व नातवंडें वयांत येतपर्यंत त्यांच्या कुटुंबास मिळावें व नंतर त्यांतील अर्धें विद्यापीठाकडे जाऊन राहिलेलें अर्धें नातवंडांत विभागून द्यावें अशी योजना त्यांचेमाझे विचारें ठरली होती व त्यासंबंधानें विद्यापीठाशीं पत्रव्यवहारही झाला होता; पण पुढें स्वतःच्या पैशाचा स्वतःला व्हावा तितका उपयोग होणार नाहीं हें मनांत येऊन ती योजना त्यांस पसंत न वाटल्यामुळें तशीच राहून गेली. मनोरमाबाईनीं उदार पणानें वर उल्लेखिलेली देणगी देऊन विद्यापीठाला व मला ऋणी करून ठेविलें आहे.

ग्वालेर दरबारकडून हल्लींचे महाराज गादीवर बसले त्या वेळीं विद्यापीठाला सहाहजार रुपयांची देणगी देण्यांत आली. यांचे वडील गादीवर असतांना सुमारें तीनचार वर्षांपूर्वीं मी त्यांना भेटलों होतों पण त्या वेळीं मदतीचा योग आला नाहीं. या देणगीचे कामीं रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांची खटपट विशेष उपयोगीं पडली.

यानंतर सांगण्यासारखी देणगी म्हणजे सर रतन टाटा ट्रस्टफंडांतील. श्रीयुत बी. जे. पादशा यांच्या मध्यस्तीनें हें काम करावें असें मनांत येऊन त्यांची भेट घेण्याची इच्छा पत्रानें त्यांस कळविली. त्यांनीं कामाचें स्वरूप पत्रद्वारेंच कळविण्याविषयीं लिहिल्यावरून त्यांजकडे विद्यापीठाच्या माहितीचे रिपोर्ट वगैरे पाठविले. कांहीं महिन्यांनीं दरसाल एक हजार प्रमाणें पांच वर्षें मदत होईल असें कळविण्यांत आलें व त्याप्रमाणें पांच हजार रुपये विद्यापीठाकडे जमा झाले.

यानंतर एकाच देणगीचा उल्लेख करावयाचा आहे. हा ती मोठी आहे म्हणून नव्हे, पण ती उत्कट भाववेनें व अगदीं मध्यम स्थितींतल्या माणसांकडून आहे म्हणून होय. श्रीयुत सखाराम नारायण करमळकर हे गृहस्थ

श्रीमती यमुनाबाई मोघे यांचे जवळचे आप्त आहेत. यमुनाबाईंना अनाथ-बालिकाश्रमांत आणून घालण्याचे कामीं यांनीं बरीच खटपट केली होती. यमुनाबाई मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाल्या व त्या हल्लीं मुंबईत शिक्षकिणीचें काम करीत आहेत. यमुनाबाईंच्या मुलीला चांगलें शिक्षण देण्याची उभयतांनीं खटपट केली. पण ती मॅट्रिक्युलेशनची परीक्षा झाल्यानंतर दुर्दैवानें मृत्युमुखीं पडली. या मुलीचें कांहीं चांगलें स्मारक करावें असें उभयतांनीं ठरविलें होतें. मी विद्यापीठाच्या कामासाठीं मिरजेस गेलों असतां श्रीयुत करमळकर हे प्रकृति सुधारण्यासाठीं तेथें राहत होते त्यांनीं मला बोलावून घेतलें व शेंकडा साडेपांच दराचे चार हजारांचे रोखे त्यांजवर विद्यापीठाच्या ट्रस्टींचीं नांवें घालून माझ्या स्वाधीन केले. या देणगीसाठीं कॉलेजच्या इमारतींतील एका खोलीला "कु. मनुबाई मोघे शाला" असें नांव दिलें आहे. ह्या प्रकारच्या देणग्यांनीं अशा कामांत पडणाऱ्या मनुष्यांना केवढें उत्तेजन येतें हें अनुभवावांचून कळणार नाहीं.

एक हजार रुपये किंवा त्याहून अधिक देणगी देणाऱ्या स्त्रीपुरुषांची यादी येणेंप्रमाणें:—

## महिलाविद्यापीठाच्या आश्रयदात्यांनीं दिलेल्या देणग्या.

| | |
|---|---|
| प. वा. सर विठ्ठलदास ठाकरसी. ( कांहीं अटी पुऱ्या पडल्यानंतर मुद्दल द्यावयाचें. तोंपर्यंत व्याज दरसाल ५२५०० रुपये द्यावयाचें. ) | १५०००० |
| प. वा. डॉ. विठ्ठल राघोबा लांडे, नागपूर. ( कांहीं अटींवर ) | ४०००० |
| श्रीयुत मूळराज खटाव, मुंबई. | ३५००० |
| सौ. मनोरमाबाई लेले, पुणें. | ७००० |
| हिज हायनेस धि महाराजा ऑफ् ग्वाल्हेर, ग्वाल्हेर. | ६००० |
| सर रतन टाटा ट्रस्ट, मुंबई. | ५००० |
| श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी. | ४००० |
| एन्. एम्. वाडिया ट्रस्ट, मुंबई. | ४००० |
| बाबू शिवप्रसाद गुप्त, बनारस. | ३००० |

| | |
|---|---|
| प. वा. श्रीमती इंदिराबाई वैद्य, मुंबई. | २४०० |
| श्रीयुत भास्कर वामन जोशी, उमरावती. | २३०० |
| श्रीमती सुंदराबाई महात्मे, मुंबई. | २४०० |
| प. वा. श्रीयुत काशीनाथ मोरेश्वर पिंगळे, मुंबई. | २००० |
| डॉ. सखाराम नारायण करमळकर, मुंबई. | २००० |
| श्रीमती यमुनाबाई मोघे, मुंबई. | २००० |
| हिज हायनेस धि ठाकोरसाहेब, लिंबडी. | २००० |
| श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन, सांगली. | २००० |
| इंडिया बेनिफिट ट्रस्टफंड, लंडन. | १५४१ |
| राजाबहादुर जी. कृष्णमाचारी, दक्षिणहैद्राबाद. | १५०० |
| श्रीयुत सिताराम सुबराव कानगो, बडोदें. | १३६० |
| श्रीयुत रणछोड भवान लोटवाला, मुंबई. | १३०० |
| डॉ. गोपाळ रामचंद्र तांबे, भुज. | १२५५ |
| श्रीयुत गंगाधर बळवंत तळवलकर, हरिगांव. | १२५० |
| हर हायनेस धि महाराणीसाहेब आफ् भरतपूर, भरतपूर. | ११०० |
| रा. ब. अनंत सदाशिव तांबे, बडोदें | १०२० |
| रा. ब. डा. दलजंगसिंग खनका, जयपूर. | १०२० |
| डॉ. धोंडो आप्पाजी पटवर्धन, अहमदाबाद. | १००० |
| श्रीयुत मोतीलाल माणिकचंद, अमळनेर. | १००० |
| हिज हायनेस धि महाराजासाहेब आफ् बांसदा, बांसदा. | १००० |
| श्रीमंत नरसिंगराव राजे घोरपडे, बडोदें. | १००० |
| महाराष्ट्र वाचनालय, बसरा. | १००० |
| लेडी रमाबाई पट्टणी, भावनगर. | १००० |
| श्रीमंत बाबासाहेब पंतसचीव, भोर. | १००० |
| सौ. अवंतिकाबाई गोखले, मुंबई. | १००० |
| सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, मुंबई. | १००० |
| न्यायमूर्ति गोविंद दिनानाथ माडगांवकर, मुंबई. | १००० |
| श्रीयुत हिरालाल अमृतलाल शहा, मुंबई. | १००० |
| श्रीयुत करमचंद चुनीलाल, मुंबई. | १००० |

| | |
|---|---|
| श्रीयुत मगनलाल प्रभूदास, मुंबई. | १००० |
| श्रीयुत मुरारजी गोकुळदास देवजी, मुंबई. | १००० |
| श्रीयुत शांताराम नारायण दाभोळकर, मुंबई. | १००० |
| श्रीमती शिरीनबाई पाटक, मुंबई. | १००० |
| डॉ. तुळजाराम सी. खांडवाला, मुंबई. | १००० |
| श्रीयुत वेलचंद छगनलाल, मुंबई. | १००० |
| हिज हायनेस धि नबाबसाहेब ऑफ् क्यांबे, खंबायत. | १००० |
| हर हायनेस धि महाराणीसाहेब आफ् धरमपूर, धरमपूर. | १००० |
| न्यायमूर्ति केशवराव कोरटकर, हैदराबाद दक्षिण | १००० |
| श्रीमंत वामन रामचंद्र नाईक, हैदराबाद दक्षिण. | १००० |
| श्रीमंत राणीसाहेब चंपावतीबाई प्रतापगिरजी, हैदराबाद दक्षिण. | १००० |
| श्रीयुत जमशेड एन. आर. मेहता, कराची. | १००० |
| सर होर्मसजी ए. वाडिया, खडकी. | १००० |
| दिवाण बहादुर कृष्णराव एल्. पावणसकर, किशनगड. | १००० |
| श्रीयुत सूरचंद केवलदास, कुणघेर. | १००० |
| प. वा. श्रीमंत अण्णासाहेब पटवर्धन, कुरुंदवाड. | १००० |
| हिज हायनेस धि महाराजासाहेब ऑफ् म्हैसूर, म्हैसूर. | १००० |
| हिज हायनेस धि युवराजसाहेब ऑफ् म्हैसूर, म्हैसूर. | १००० |
| कर्नल कृष्णाजी विष्णु कुकडे, नागपूर. | १००० |
| श्रीयुत जेसिंगभाई जव्हेर गुमान, पाटण. | १००० |
| श्रीयुत बी. के. बोस, पुणें. | १००० |
| श्रीयुत गोविंद काशीनाथ गाडगीळ, पुणें. | १००० |
| दिवाणबहादुर काशीनाथ रामचंद्र गोडबोले, पुणें. | १००० |
| हिज हायनेस धि महाराज राणासाहेब, पोरबंदर. | १००० |
| हर हायनेस धि महाराणीसाहेब, पोरबंदर. | १००० |
| श्रीयुत वाग्भट नारायण देशपांडे, सातारा. | १००० |
| प. वा. रा. ब. खंडूभाई गुलाबभाई देसाई, सुरत. | १००० |
| श्रीयुत गुलाबभाई कंथडजी देसाई, सुरत. | १००० |

| | |
|---|---|
| हर हायनेस धि महाराणीसाहेब, वढवाण. | १००० |
| रावबहादुर जम्नालाल बजाज, वर्धा. | १००० |

सर विठ्ठलदास ह्यांच्या देणगीनें विद्यापीठाला स्थैर्य आलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं, पण एकंदरींत विद्यापीठाची सांपत्तिक स्थिति समाधानकारक नाहीं. इमारतींसाठीं काढलेल्या एक लक्ष ब्यायशीं हजार रुपयांच्या बिनव्याजी कर्जाची फेड गेल्या डिसेंबरांत पंचवीस हजारांचा शेवटचा हप्ता देऊन झाली आहे एवढी त्यांत समाधानाची गोष्ट आहे. आतां विद्यापीठाजवळ प्रॉमिसरी नोटांच्या रूपानें सुमारें सव्वा लाख रुपयांची शिल्लक आहे. हे सव्वा लाख रुपये दर्शनी किंमतीच्या स्वरूपांत असून बहुतेक प्रॉमिसरी नोटा शेंकडा साडेतीन दराच्या आहेत. त्या सर्वांचें व्याज सुमारें चार हजार रुपये येतें. साडे बावन हजार रुपये ठाकरसींकडील व्याज आणि सुमारें दहा हजार रुपये वार्षिक वर्गण्यांचें उत्पन्न मिळून एकंदर साडे सहासष्ट हजार रुपये वार्षिक खर्चाची तरतूद झाली. ह्यांत वार्षिक वर्गण्यांचें उत्पन्न जें दहा हजार धरलें आहे तें अनिश्चित आहे. वर्षाचा एकंदर चालू खर्च सत्तर हजारांहून अधिक आहे व तो सालोसाल वाढत जाणारा आहे. उत्पन्न कमी झालें तर पूर्वीच्या शिलकेंतून तूट भरून काढावी लागेल. खर्चाच्या ठोकळ रकमांची कल्पना पुढील यादीवरून होईल.

| | |
|---|---|
| श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला–पाठशाळा येरंडवणें. | १६५०० |
| श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळा, पुणें. | १०००० |
| श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळा, मुंबई. | ९५०० |
| या विद्यापीठाला जोडलेल्या शाळांना वार्षिक मदत. | २२५०० |
| स्कालरशिपा व बक्षिसें | १५०० |
| छापणावळ | १२०० |
| ऑफिसच्या कामगारांचा पगार | ३००० |
| प्रवास खर्च वर्गणीच्या कामासाठीं व सेनेटच्या आणि सिंडिकेटच्या सभासदांचा | २५०० |
| परीक्षाखर्च परीक्षकांस देण्याच्या अत्यल्प वेतनासुद्धां | ३५०० |
| टपालखर्च | ८०० |

| | |
|---|---|
| स्टेशनरी वगैरे | ४०० |
| इमारतींचे विम्यासाठीं | ६०० |
| इतर किरकोळ बाबी | १००० |
| | ७३००० |

विद्यापीठानें उच्च शिक्षणासाठीं फारसा अधिक खर्च करण्याच्या भानगडींत पडूं नये. कारण कांहीं केलें तरी सरकारी मान्यता मिळेपर्यंत कॉलेजांतील विद्यार्थिनींची संख्या फारशी वाढण्याचा संभव नाहीं व आमच्या उच्च शिक्षणाला सरकारी मान्यता मिळण्याला अजून अवकाश आहे. तोंपर्यंत माध्यमिक शिक्षणाच्या प्रसाराचें अत्यंत महत्त्वाचें कार्य विद्यापीठानें हातीं घेतलें पाहिजे. ह्या कामीं विद्यापीठाला बरेंच यश आलें आहे व आणखी पुष्कळ काम होण्यासारखें आहे. पण हें सर्व द्रव्याच्या बळावर अवलंबून राहणार. वार्षिक वर्गण्यांशिवाय इतर देणग्या मिळून स्थाइक फंडांत जर भर पडेल आणि व्याजाचें उत्पन्न वाढेल तर पुढील कार्य सुव्यवस्थित रीतीनें चालेल. नाहींतर नेहमीं हातातोंडाशीं गांठ राहील व कसेंबसें जिवंत रहावयाचें एवढेंच ध्येय होऊन बसेल.

ठाकरसींची पंधरा लाखांची देणगी विद्यापीठाचे हातीं येण्यासाठीं जी मुख्य व सर्वांत कठिण अशी अट घातली आहे ती त्यांच्या देणगीइतका फंड विद्यापीठानें जमविला पाहिजे ही आहे. विद्यापीठाच्या स्थावर इस्टेटीसाठीं सुमारें साडेतीन लाख रुपये खर्ची पडले आहेत. हे व हल्लींची शिल्लक मिळून पांच लाख धरतां येतील. आतां आणखी दहा लाखांच्या दर्शनी किंमतीच्या प्रामिसरी नोटा घेतां येतील एवढा फंड विद्यापीठानें जमविला पाहिजे. माझ्या हयातींत ही गोष्ट घडून येण्याची मला आशा नाहीं. तथापि तिकडे नजर लावून एकसारखें काम करीत रहावें हा माझा हेतू आहे. आज चाललें आहे एवढें काम माझ्या हयातींत चालू राहिलें तरी मी आपणास भाग्यवान् मानीन. पण द्रव्याच्या अभावीं त्यांत मागें पाय घेण्याची वेळ आली तर मात्र मला वाईट वाटेल. पण तशा स्थितीलाहि तोंड देण्याची माझी तयारी आहे. काळाच्या उदरांत काय असेल तें असो!

# प्रकरण तेरावें

## महिलाविद्यापीठाच्या प्रचाराचें कार्य

विद्यापीठाचे उद्देश कोणते, त्यानें कोणतें कार्य करावयाचें योजिलें आहे व तें कितपत तडीस जात आहे हें लोकांच्या नजरेस आणावें व लोकांकडून द्रव्य सहाय्य मिळवावें ह्यासाठीं विद्यापीठ सुरू झाल्यावर थोड्याच महिन्यांनीं मी प्रचाराचें काम हातीं घेतलें व तेव्हां-पासून आज अकरा वर्षें तें सारखें करीत आहे. विद्यापीठ सुरू होण्या-पूर्वीही त्याची घटना करण्यासाठीं मला दोन महिने फिरावें लागलें. पहिल्या चार वर्षांत मी कोठें कोठें गेलों त्या स्थळांची यादी एका प्रक-रणांत दिली आहे तीवरून त्या वेळच्या माझ्या प्रवासाची कल्पना होईल. ह्या आठ वर्षांत पंजाब, बंगाल, बिहार व ओरिसा एवढे प्रान्त वर्ज करून बाकीच्या हिंदुस्थानच्या भागांत मी बराच प्रवास केला व मुख्य मुख्य शहरीं गेलों. ह्या आठ वर्षांत मी ज्या ठिकाणीं गेलों त्या शहरांची व गांवांची यादी तयार करण्यास बराच त्रास पडेल व ती लांबलचक होईल. तेव्हां तसें न करितां निराळ्या तऱ्हेनें माझ्या कामाची कल्पना होण्यासाठीं मी एक लहानसें कोष्टक देतों. १९२१सालापासून मी एक टिपण ठेवलें आहे त्यांत पांच रुपये अगर त्याहून अधिक व पांच रुपयांहून कमी वर्गण्या किती मिळाल्या त्या आंकड्यांची नोंद आहे. त्याचप्रमाणें वर्षांत किती दिवस प्रवास केला त्याचीही नोंद आहे. ह्यावरून असें दिसून येईल कीं गेल्या सात वर्षांत सरासरीनें दर वर्षी २६७ दिवस किंवा जवळ जवळ ९ महिने प्रवासांत गेले.

| वर्ष | पांच रुपये अगर त्यांहून अधिक वर्गण्यांची संख्या. | पांच रुपयांहून कमी वर्गण्यांची संख्या. | वर्षांतील प्रवासाचे दिवस. |
|---|---|---|---|
| १९२१ | ७१५ | २५७ | २८८ |
| १९२२ | २३३ | ४२५ | २५२ |
| १९२३ | ६६४ | १५३२ | २१३ |
| १९२४ | ६५७ | २९६८ | २४९ |
| १९२५ | ९९२ | ४००१ | ३०५ |
| १९२६ | ८२४ | २८३७ | २६२ |
| १९२७ | ७४२ | २२७९ | ३०४ |
| एकूण | ४८२७ | १४२९९ | |

कोणत्याही शहरीं जावयाचें म्हणजे अगोदर तेथल्या कोणा तरी संभावित गृहस्थास पत्र लिहून त्याजकडून जबाब आणविलेला असावयाचा. बहुतकरून एका मोठया शहरीं गेलें म्हणजे तेथूनच कोणाकडून तरी पुढल्या तीन चार ठिकाणच्या प्रतिष्ठित गृहस्थांना पत्रें लिहवावयाचीं व त्यांच्याकडून उतरण्याची सोय होईल असें उत्तर आलेलें असलें म्हणजे कोणत्या गाडीनें येणार हें अगोदर पत्रानें किंवा तारेनें कळवून ठेवावयाचें. बहुधा स्टेशनावर कोणी तरी येऊन मला उतरण्याचें ठिकाणीं न्यावें असें घडतें. क्वचित् चुकामुक झाल्यास जवळ पत्ता असावयाचाच त्या पत्त्यावर जावयाचें. तेथें वेळ फुकट जाऊं नये म्हणून अमुक वेळीं व्याख्यान करावें असें अगोदर सुचविलेलें असावयाचें व बहुतकरून तसें व्हावयाचें. कामाचा क्रम म्हणजे साधल्यास व्याख्यानापूर्वी कांहीं प्रतिष्ठित गृहस्थांच्या गांठी घ्यावयाच्या व त्यांना सभेला येण्यासाठीं विनंति करावयाची. सभा आटोपल्यानंतर शहराच्या मानानें पुढें दोन तीन अगर अधिक दिवस राहून स्थानिक गृहस्थांच्या मदतीनें प्रत्येकाकडे जाऊन वर्गणीसाठीं याचना करावयाची. हा क्रम वर्षांनुवर्षे चालू आहे.

महाराष्ट्रांत हिंडत असतांना बहुतकरून स्त्रियांची एक सभा करून तींत व्याख्यान देण्याचा क्रम ठेविला आहे. स्त्रियांच्या सभेंत संस्थेला मदत करण्यासंबंधाचा उल्लेख फारसा करीत नाहीं. परंतु एकादी खटपटी बाई अगर हुशार मास्तरीण असली तर तिनें अनेक ठिकाणीं जाऊन बायकांकडूनही वर्गणी जमवावी असें पुष्कळ वेळां घडलें आहे. स्त्रियांच्या सभांत प्राचीन काळीं स्त्रियांची योग्यता केवढी होती, त्यांना समाजांत किती मान मिळत असे व समाजावर त्यांचें केवढें वजन होतें ह्या गोष्टींचा उल्लेख करून हल्लींच्या त्यांच्या अवनत स्थितीची त्यांना जाणीव करून देण्याचा प्रयत्न करतों. वयातीत स्त्रियाही सभांना येतात व त्यांना शिक्षणाची अवश्यकता पटते.

आरंभीं महाराष्ट्राबाहेर काम करतांना फक्त इंग्रजी जाणणाऱ्या लोकांतच माझें काम होत असे. पण अलीकडे गुजराथी आणि हिंदी प्रान्तांत इंग्रजी न जाणणाऱ्या लोकांमध्यें व स्त्रियांमध्येंही कांहीं काम झालें तर करण्याचा प्रयत्न करितों. मला गुजराथी व हिंदी भाषा अवगत नाहींत. पण माझें व्याख्यान गुजराथी अगर हिंदी भाषेंत नागरी लिपींत छापून तयार ठेवतों व तें सभांतून वाचतों. हा प्रयोग चांगला यशस्वी होतो. ज्या ज्या ठिकाणीं आर्य समाजाच्या शाखा आहेत त्या त्या ठिकाणीं पडद्यांतील स्त्रियादेखील अशा व्याख्यानांचे वेळीं हजर राहूं शकतात. मात्र सभा फक्त स्त्रियांचीच असली पाहिजे व व्याख्यात्याशिवाय एकादाच वृद्ध मनुष्य हजर असावा.

अलीकडे चार वर्षें सार्वजनिक व्याख्यानाशिवाय प्रत्येक हायस्कुलांत व कॉलेजांत विद्यार्थि व शिक्षकमंडळी यांचेसाठीं वेगळें व्याख्यान करण्याचा प्रघात पाडला आहे. या व्याख्यानांचा मुख्य उद्देश तरुण विद्यार्थ्यांच्या मनांत या नव्या चळवळीविषयीं प्रेम उत्पन्न करावें हा असतो. विद्यार्थ्यांकडूनही पुष्कळवेळां आणा, अर्धा आणा अशा रीतीनें मदत होऊं शकते.

दोन तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत फिरत असतांना नासिक व नगर ह्या जिल्ह्यांत बऱ्याच लहान लहान गांवांत सुद्धां मी जात असें. ज्या गांवीं इंग्रजी जाणणारा मनुष्य एखादाच असावा अगर तोही नसावा पण मराठी पूर्ण सात इयत्ता शिकविणारी शाळा असावी अशा गांवीं जावें, सहाव्या

व सातव्या इयत्तेतले विद्यार्थी व शिक्षक आणि गांवांत केसरी वगैरे वर्तमानपत्रें वाचणारे कोणी लोक असल्यास व ते आल्यास ते अशांची सभा शाळेंतच करावी आणि व्याख्यान झाल्यानंतर तासदोनतासांच्या आंत आणा, अर्धा आणा करून चार दोन रुपये जमले तर पहावे व पुढल्या गांवीं जावें असा क्रम असे. खानदेशांत व रत्नागिरी जिल्ह्यांत ही असा कांहीं गांवीं गेलों आहे. पूर्वी पत्रें वगैरे लिहिण्याचेंही विशेष कारण नसे. भोजनाची सोय शाळामास्तर आपले घरीं किंवा एकाद्या सुखवस्तु गृहस्थाचे घरीं करीत. रेल्वेस्टेशनापासून चारपांच मैलावरच गांव असला म्हणजे सामान स्टेशनावर ठेवून तेथें चालतच जावें व काम आटोपून पुन्हा परत यावें असें घडत असे.

महाराष्ट्रांतील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं व इतर कांहीं मोठ्या गांवीं व महाराष्ट्राच्या बाहेर सगळ्या हिंदुस्थानभर प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणीं जावें अशी माझी इच्छा आहे. या प्रचारकार्यांचा प्रधान हेतु लक्षावधि माणसांमध्यें या चळवळीविषयीं प्रेम उत्पन्न करावें हा आहे. स्त्रियांच्या माध्यमिक शिक्षणाचा प्रसार शहरोशहरींच नव्हे तर गांवोगांवीं झाला पाहिजे. स्त्रियांमध्यें माध्यमिक शिक्षण फार मोठ्या प्रमाणावर पसरल्यावांचून राष्ट्रोन्नतीच्या प्रयत्नांना खरें तोंड लागणार नाहीं असें माझें ठाम मत आहे. हें शिक्षण इंग्रजी व्यतिरिक्त असलें तरी चालेल. केवळ सरकारच्या प्रयत्नांचा होईल तितका उपयोग करून घ्यावाच, पण खासगी प्रयत्नांनीं ह्या कार्याला नेट दिला पाहिजे. हे विचार लक्षावधि लोकांच्या कानावर जावे व ह्या कामीं खासगी प्रयत्न करण्याची लोकांमध्यें स्फूर्ति उत्पन्न व्हावी हा माझ्या प्रयत्नांचा मुख्य हेतु आहे. महिलाविद्यापीठासाठीं द्रव्यार्जन करणें हा देखील हेतु आहेच, पण अलीकडे मी त्याला गौणस्थान दिलें आहे.

माझें शरीर आणि मन हीं धडधाकट आहेत तोंपर्यंत हें प्रचारकार्य करीत रहावें अशी इच्छा आहे. ती कितपत पुरी होतें हें पहावयाचें.

---

## प्रकरण चौदावें

### महिलाविद्यापीठाच्या इतिहासावर सांधी-कोंधींतून प्रकाश पाडणाऱ्या कांहीं गोष्टी

एखाद्या आजीबाईच्या संसारांत ज्याप्रमाणें नेहमीं उपयोगी न पडणाऱ्या कांहीं वस्तु कोपऱ्यांत अगर माळ्यावर एका बाजूला टाकून ठेवलेल्या असतात त्याप्रमाणें कांहीं अडगळवजा गोष्टी या प्रकरणांत सांठवून ठेवण्याचा मीं विचार केला आहे.

पार्वतीबाई आठवले ह्या अमेरिकेंत गेल्या असतांना त्यांची अनेक ठिकाणीं ओळख झाली व त्यांनीं पुष्कळ लोकांजवळ आश्रमाचे व स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचे रिपोर्ट दिले होते. प्रो. विनय कुमार सरकार हे अमेरिकेंत असतां त्यांची व पार्वतीबाईची गांठ पडली होती व त्यांनींही पार्वतीबाईचा तेथल्या कित्येक लोकांशीं परिचय करून दिला होता. प्रो. विनय कुमार सरकार हे एकदां आमचा आश्रम पाहण्यास आले होते त्या वेळीं बैलाच्या छकड्यांतून आश्रमाची मंडळी जातां येतां त्यांनीं पाहिली होती व ही गोष्ट ते कित्येक अमेरिकन स्त्रीपुरुषांजवळ बोलले होते. अशा मंडळींपैकीं कांहींना बाबू धनगोपाळ मुकर्जी यांनीं वरील गोष्टीचें स्मरण देऊन स्त्रियांचे युनिव्हर्सिटीस एक मोटारबसची देणगी देवविली. ही देणगी पर्सनल सर्व्हिस फंडाच्या ट्रस्टींपैकीं एक श्रीमती आना एन्. डेव्हिस ह्या बाईच्या मार्फत आलेली आहे. ह्या देणगीचा आम्हांस फार उपयोग होत आहे.

विद्यापीठाच्या वर्गणीच्या कामांत मला एक चांगलाच अनुभव आला. एका शहरीं मध्यमस्थितींतल्या चांगल्या संभावित व वजनदार गृहस्थांकडे मी उतरलों. त्यांनीं मला वर्गणी मिळवून देण्याचे कामीं चांगली मदत केली व पाहुणचारही चांगला केला. त्यांचें इंपीरियल ब्यांकेंत खातें होतें. रोज वर्गणी मिळे ती त्यांचे जवळच ठेवावयास देत असें. पैसे विमा उतरलेल्या रजिष्टर पत्रानें न पाठवितां त्यांचे खात्यांत ठेवण्यास द्यावे व त्यांजकडून रजिस्ट्रारच्या नांवाचा चेक घेऊन तो पुण्यास पाठवावा असें मनांत आलें. त्यांनीं ब्यांकेंत पैसे भरून चेक दिला व तो मी पुण्यास पाठविला

पण तो वटला नाहीं. ते गृहस्थ अडचणींत होते हें मला त्यावेळीं कळलें नाहीं. मध्यंतरीं आणखी कोणाला तरी चेक दिल्यामुळें त्यांच्या खात्यांत शिल्लक उरली नाहीं. मला बुडविण्याचा त्यांचा हेतु खचित नव्हता. मीं कोणालाही दोष न लावतां चारशें सव्वीस रुपये मुकाट्यानें भरले व मोकळा झालों. त्या गृहस्थांना दोनतीन पत्रें लिहिलीं पण उत्तर येईना. शेवटीं अतिशय लाजून त्यांनीं उत्तर पाठविलें. त्यांना मी क्षमा केली. आपणाला कधीं सामर्थ्य आलें तर पैसे पाठवा नाहीं तर ते फिटले असें समजा एवढें त्यांना लिहून टाकलें. तेथल्या कोणत्याही गृहस्थाला त्यांच्या ह्या वर्तनाबद्दल मी लिहिलें नाहीं.

माझा मुलगा दिनकर हा बंगलोर येथें रिसर्च इन्स्टिटयूट मध्यें अभ्यास करीत असतां मला बंगलोर येथें जाण्याचा प्रसंग आला व रिसर्च इस्टिटयूटमध्यें एक व्याख्यान देण्याचें मी ठरविलें. मी पूर्वी एकदां तेथें व्याख्यान देऊन थोडीशी वर्गणीही जमविली होती. सभा जमल्यावर एका विद्यार्थ्यानें एकदम दिनकरनें अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना केली व लागलेंच दुसऱ्या विद्यार्थ्यानें तिला अनुमोदन दिलें. ह्या अकल्पित प्रकाराबद्दल मला आश्चर्य वाटलें. पण दिनकरनें बाचुकल्यासारखें न दाखवितां एकदम तें स्थान पटकावलें व शिरस्त्याप्रमाणें व्याख्यात्याची ओळख करून देऊन व सरतेशेवटीं समारोपाचें भाषण करून सभा बरखास्त केली. त्या रात्रीं तेथें मी राहिलों व वर्गणीचें कामही चांगलें झालें.

पुष्कळ वर्षें स्त्रियांच्या सहवासाला राहून व त्यांच्या उन्नतीसंबंधाचाच विचार करतां करतां त्यांच्या भाविकपणाचा एक गुण मी उचलला आहे. भक्तीनें देवावर तीळ, तांदूळ, फुलें यांची लाखोली वहावी किंवा देवाला अगर वडा–पिंपळाला लक्ष प्रदक्षिणा घालाव्या या व्यवसायांत भाविक बायका आपला बराच वेळ घालवितात. यांचें अनुकरण करून मी माझा पुष्कळसा वेळ सरस्वती देवीवर–अर्थात् महिलाविद्यापीठावर–वर्गण्यांची लाखोली वाहण्याचा संकल्प करून त्या कामीं खर्चीत आहें. ही गोष्ट मी कित्येक वेळां व्याख्यानांतही सांगतों व आणा अर्धा आणा वर्गणी देऊनही वर्गणी देणारांची संख्या एक लक्ष करण्यास मला मदत करा अशी विनंति करतों. हें काम या जन्मीं पुरें होण्याचें लक्षण दिसत नाहीं. कारण

सात वर्षे काम करून ही संख्या काय ती ११९२६ झाली आहे. या कामासंबंधानें विचार करूं लागलें म्हणजे लाख्या हरिदास म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका गृहस्थांच्या ऐकलेल्या गोष्टीची आठवण होते. यांनीं देवांपुढें लक्ष कीर्तनें करण्याचा संकल्प केला. बरोबर बैठका दिवे वगैरेही सर्व साहित्य ठेवून कोणत्याही गांवीं गेलें म्हणजे देवळांत जाऊन बैठक घालून रात्र असल्यास दिवे लावून कीर्तनाला आरंभ करावयाचा. कोणी श्रोते असल्यास ठीकच. नाहीं तर समोर देव आहेच. घरोघर देव असतातच तेव्हां संभावित गृहस्थांच्या घरीं जाऊन त्यांजकडेही कीर्तन करण्याचा परिपाठ यांचा होता. मीं या हरिदासांना प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें. अजून ते आहेत कीं नाहींत व त्यांचा क्रम चालू आहे कीं नाहीं कोण जाणे. केवळ लाखोलीच्याच पाठीस लागण्यास वेळ मिळाला तर तें कार्य होऊं शकेल व कदाचित् माझे हातून तें पुरें होईलही. पण आज विद्यापीठाचा खर्च चालविण्यासाठीं जरूर ती रक्कम मिळविण्यासाठीं धडपड करतां करतां हें कार्य जितकें साधेल तितकें करावयाचें आहे, ह्यामुळें तें मंद गतीनें चाललें आहे.

सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं दिलेल्या १,८६,००० रुपये बिनव्याजी कर्जाची फेड करण्यासंबंधानें असें ठरलें होतें कीं, वार्षिक वर्गण्यांचें उत्पन्न चालू खर्चाकडे लावून त्याशिवाय इतर देणग्या मिळतील त्या कर्जाचे फेडीचे कामीं लावाव्या. याप्रमाणें दोनतीन वर्षें पंचवीस हजार रुपये किंवा थोडी अधिक अशी फेड करण्यांत आली. फेडीच्या रकमेंत जरूर तेवढी भर घालून त्यांजकडून येणारे दरसाल साडे बावन हजार रुपये पुरे करण्यांत येत असत. एका वर्षी वर्गणी कमी येणार असें चिन्ह दिसूं लागलें तेव्हां त्या वर्षी पंचवीस हजार रुपये परत न करतां वर्गणीची रक्कम जमेल तेवढीच परत करूं असें सर विठ्ठलदास यांचे बंधु शेट माधवदास यांस कळविण्यांत आलें. तें वर्ष व्यापाराच्या भयंकर मंदीचें व त्यांच्या अडचणींचें होतें. तेव्हां पंचवीस हजार रुपये तुम्ही परत केलेच पाहिजेत असा त्यांनीं आग्रह धरला. वर्गण्या कमी जमल्या तर पूर्वीच्या शिलकेंतल्या प्रॉमिसरी नोटा विकून भर करण्याखेरीज दुसरा इलाज नव्हता. असें करणें होतां होईल तों टाळणें अवश्य होतें. सेनेटची सभा चालू असतांच हा प्रश्न

उद्भवला होता. सेनेटच्या पहिल्याच बैठकींतला जमाखर्चाच्या अंदाजपत्रकाचा विचार व्हावयाचा पण ह्या प्रश्नाचा विचार करून अंदाजपत्रक दुरुस्त करणें भाग होतें म्हणून तें दुसऱ्या दिवसाच्या बैठकीसाठीं ठेवलें गेलें. पुढें काय करावें हा विचार आम्ही आश्रमाचे आजन्मसेवक जमून केला. शाळांच्या मदतींतून कांहीं रक्कम कमी करावी व आपणाला मिळणाऱ्या पाऊणशें रुपयांच्या मासिक वेतनांतून दरमहा दहा रुपये परत भरणा करावे असें आम्हीं ठरविलें व त्याप्रमाणें अंदाजपत्रक दुरुस्त करून तें सेनेटमध्यें पास करून घेतलें. पुढें सुदैवानें वर्गण्या मिळून शाळांची मदत कमी केली होती ती व आजन्मसेवकांनीं भरणा केलेली रक्कम सेनेटच्या परवानगीनें परत देण्यांत आली. प्रसंगाला तोंड देण्याची आजन्मसेवकांची तयारी असते म्हणूनच अशा संस्था अस्तित्वांत येऊं शकतात व पुढें चालू राहतात.

मी वर्गणीसाठीं हिंडत असतां आलेला एक अनुभव येथें देण्यासारखा आहे. १९१७ सालीं मी बडोदें येथें गेलों असतां महाराजांची गांठ घेतली व त्यांनीं माझ्या व्याख्यानाला यावें अशी विनंति केली. त्यांनीं कॉलेजांत व्याख्यान करा व मला सवड झाल्यास मी येईन असें सांगितलें. महाराज व्याख्यानास आले पण दिवाण सर मनुभाई यांजकडून अशी सूचना मला देण्यांत आली कीं, महत्त्वाचा भाग मी अर्ध्या तासांत सांगावा म्हणजे महाराजांना कांहीं पाहुणे आलेले होते त्यांजकडे जातां येईल. मला व्याख्यानांत सर्व गोष्टी संगतवार सांगावयाच्या होत्या त्यामुळें मीं माझें व्याख्यान नेहेमीप्रमाणें बरोबर एक तास चालविलें. महाराज अखेरपर्यंत राहिले आणि त्यांनीं सुमारें वीस मिनिटें मोठें उत्साहजनक भाषण केलें. मला त्यांनीं हिंदुस्थानचे बुकर टीवॉशिंग्टन म्हटलें व नवीन इमारत होत आहे ती आपण स्त्रियांच्या कॉलेजाला देऊं शकूं वगैरे गोष्टींचा उल्लेख केला. महाराज राजवाड्यांत गेल्यावर त्यांनीं महाराणी साहेबांना सभेची हकीकत सांगितली व दुसरे दिवशीं सकाळीं मी उतरलों होतों तेथें पत्र घेऊन स्वार आला त्यांत संध्याकाळीं स्त्रियांचे सभेंत माझें व्याख्यान व्हावें व महाराणी साहेबांनीं त्या व्याख्यानाला यावें अशी योजना झाल्याचें मला कळविण्यांत आलें होतें. हा सर्व प्रकार होऊन गेल्यानंतर महाराजांच्या व महाराणी-साहेबांच्या भेटीलाही मी गेलों होतों. दोन तीन वर्षांपूर्वी महाराजांनीं युनि-

व्हार्सिटीचे आश्रयदाते व्हावें अशा अर्थाचें विनंतिपत्र मीं त्यांजकडे पाठविलें होतें. सदर पत्र महाराजांनीं वाचलें असेल कीं नाहीं ह्याबद्दल मला शंका आहे, पण त्याचा जबाब बडोद्याच्या शिक्षणखात्याचे कमिशनर यांजकडून आला तो येणेंप्रमाणें:—

Subject.

Appeal for contribution.

Sir, I have the honour to acknowledge the receipt of your letter No. 11, dated 17th November 1925, to the address of His Highness the Maharaja Saheb, which has been forwarded to this office for disposal, and to say that Sir Vithaldas, a Baroda subject, has contributed handsomely to the University Funds. Several Officials belonging to His Highness's Territories are paying annual subscriptions while others are in addition helping the University with their brains also. A class is started in the High School and the College for preparing students for the Women's University Examinations. What more need we do in the matter for an All India University?

( 4-1-1926 )

" विषयः—मदतीकरितां विनंति. " " महाराज, आपलें नंबर ११ ता. २७–११–२५ चें, महाराज साहेब श्रीमंत सरकार बडोदें यांना उद्देशून लिहिलेलें पत्र पोंचलें. तें आमचेकडे निकालाकरितां आल्यावरून आम्ही आपणास असें कळवावयाचें आहे कीं, सर विठ्ठलदास हे बडोदें संस्थानांतीलच एक प्रजाजन असून त्यांनीं आपल्या विश्वविद्यालयाच्या निधीप्रीत्यर्थ चांगली मदत केली आहे. श्रीमंत सरकारच्या ताब्यांतील मुलखांतले बरेच अधिकारी वार्षिक वर्गण्या देत आहेतच; शिवाय दुसरेही कांहींजण आर्थिक मदत देऊन आणखी बौद्धिक मदतही देत आहेत. येथील हायस्कुल व कालेज यांमधून स्त्रियांच्या विश्वविद्यालयाच्या परीक्षांसाठीं विद्यार्थिनी तयार करण्याकरतां एकेक वर्गही सुरू करण्यांत आला आहे. अखिल भारतवर्षाकरितां काढलेल्या या विद्यापीठासाठीं आम्ही आणखी मदत ती काय करावयाची ?"

प्रचाराच्या कामांत केव्हां केव्हां विलक्षण अनुभव येतात. प्रो. वासुदेव गोविंद मायदेव व मी असे दोघे एका गृहस्थांना भेटण्यासाठीं गेलों. हल्लीं नाना प्रकारचे लोक वर्गण्या मागण्यास जातात त्यामुळें कित्येक लोक अत्यंत त्रासून गेलेले असतात. हे गृहस्थ मुंबईतील व्यापारी असून हवेसाठीं पुण्यास रहावयास आले होते. आम्ही एका संस्थेसाठीं आलों आहों असें कळतांच अतिशय तिरस्कारपूर्वक त्यांनीं आम्हांस परत लाविलें व आम्हीं जावयास निघालों. प्रो. मायदेवांनीं जवळच उभे असलेल्या त्यांच्या एका आप्तास हे भेटावयास आलेले गृहस्थ अमुक आहेत असें जातां जातां सांगितलें. आम्हीं जरासे दूर गेल्यावर त्या गृहस्थांनीं त्या शेटजींस माझें नांव सांगितलें. त्याबरोबर त्यांनीं आम्हांस परत बोलावून चांगल्या रीतीनें आमच्याशीं बोलून आम्हांस परत पाठविलें व पुढें चांगली देणगीही दिली.

# प्रकरण पंधरावें

## वाचकांचा निरोप

बंधु भगिनींनो, आतां सरते शेवटीं आपला निरोप घेऊन हें लहानसें अंगीकृत कार्य पुरें करावयाचें आहे. कोणतेंही कार्य पाठीमागें तगादा असल्यावांचून होत नाहीं हा मनुष्यस्वभाव आहे. त्याला मी अपवाद नाहीं. मनोरंजनकारांचा तगादा नसता तर 'आत्मवृत्त' लिहून झालें नसतें. त्याचप्रमाणें माझ्या सहकारी मित्रांनीं माझ्या एकाहत्तरावे वाढदिवसाचे संधीस आत्मवृत्ताची दुसरी आवृत्ति काढण्याचें ठरवून विद्यापीठाच्या हकीकतीची जोड आत्मवृत्ताला देण्याचें योजिलें नसतें तर हें कार्य मी हातीं घेतलें असतें कीं नाहीं ह्याबद्दल मला जबर शंका आहे. विद्यापीठाची हकीकत मी लिहून काढावी अशा सूचना माझ्या कित्येक मित्रांनीं केल्या पण हें काम मी हातीं घेतलें नव्हतें. आतां नियमित मुदतींत तें मी कसेंबसें केलें आहे. ही लांबलचक व कित्येक ठिकाणीं अगदीं नीरस झालेली हकीकत आपणांस कशी काय आवडेल तें सांगतां येत नाहीं. तथापि विद्यापीठाचा इतिहास ह्या दृष्टीनें, ती कंटाळवाणी होण्याचा संभव असला तरी लिहिणें मला इष्ट वाटलें.

येथें विद्यापीठाच्या विस्तारासंबंधाचे माझे विचार नमूद करणें अप्रशस्त होणार नाहीं. राष्ट्राच्या प्रगतीचे विचार जसे पुरुषांच्या तसेच स्त्रियांच्याही अंतःकरणांत घोळत असले पाहिजेत. हे विचार उत्पन्न होऊन त्यांचा परिपोष होण्यास इंग्रजीसहित अथवा इंग्रजीविरहित माध्यमिक शिक्षण तरी पुरें मिळालें पाहिजे. ह्या शिक्षणाचा प्रसार फार मोठया प्रमाणावर करण्याचें ध्येय स्त्रियांच्या विद्यापीठांनीं ठेविलें पाहिजे. ह्या शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या शाळांसाठीं शिक्षकिणी पाहिजेत त्या ह्या विद्यापीठांनीं चालविलेल्या कॉलेजांत शिक्षण घेऊन तयार झाल्या पाहिजेत. ज्या ज्या प्रांतांत सुसंस्कृत वेगळी भाषा प्रचलित असेल त्या प्रत्येक प्रांतांत शक्य होईल तितकें लवकर एक स्त्रियांचें वेगळें विद्यापीठ स्थापित झालें पाहिजे व एक उच्च शिक्षणाचें कॉलेज पाहिजे. मुलींसाठीं हायस्कूलें व मिडल स्कूलें तालुक्याचाच काय पण त्याहूनही लहान गांवींसुद्धां झालीं पाहिजेत. दिवसेंदिवस खर्चाच्या राहणीमुळें व हुंडयामुळें योग्य वधूवरांची योजना होणें कठिण होत आहे आणि त्यामुळें कांहीं स्त्रियांनीं अविवाहित राहणें अप-

रिहार्य होणार हें स्पष्ट दिसत आहे. अशा स्त्रियांनीं नोकऱ्यांच्या पाठीस न लागतां, अल्प वेतनांत संतुष्ट राहून, स्त्रीशिक्षणप्रसाराच्या कार्याला वाहून घेतलें पाहिजे. स्त्रियांच्या माध्यमिक शिक्षणाच्या शाळांचें जाळें सगळ्या देशभर पसरलें पाहिजे. मुंबई इलाख्यापुरतें आपलें कार्यक्षेत्र संकुचित न करतां तें त्याबाहेर नेलें पाहिजे. या हेतूनेंच ह्या कार्याचा विस्तार बाहेरच्या क्षेत्रांत व्हावा ह्यासाठीं माझे प्रयत्न चाललेले असतात. व ते अखेरपर्यंत चालवावे असा माझा हेतु आहे. आणखी एक दोन तरी स्त्रियांचीं विद्यापीठें इतर प्रांतांत चाललेलीं पहावीं ही माझी इच्छा आहे.

आयुर्वेदाच्या ( पाश्चात्य व पौरस्त्य ज्ञानाच्या मिलाफानें झालेल्या ) शिक्षणाचा प्रसार आपल्या स्त्रीवर्गांत होणें अत्यंत जरूर आहे व महिला-विद्यापीठांत वाङ्मयात्मक विद्याशाखेप्रमाणें ( Faculty ) आयुर्वेद विद्या-शाखेचाही समावेश झाला पाहिजे. एम्. बी., बी. एस्. व एल्. सी. पी. एस्. परीक्षा पास झालेल्या डाक्टरणी जितक्या तयार होतील तितक्या पाहिजेच आहेत. पण ह्या परीक्षांचा अभ्यास इंग्रजीच्या द्वारें करावा लागतो व तो दीर्घकालावधीचा असल्यामुळें फारच थोड्या स्त्रिया हें शिक्षण घेऊन बाहेर पडतात, व पुढेंही त्यांची संख्या वाढण्याचा फारसा संभव नाहीं. ह्यासाठीं ज्याप्रमाणें प्राथमिक शिक्षण देण्यासाठीं बेताबातानें शिकलेल्या शिक्षकिणी ट्रेनिंग कालेजांतून तयार केल्या जातात व त्या पुऱ्या पडत नाहींत म्हणून व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा पास झालेल्यांना किंवा तीही परीक्षा पास न झालेल्या स्त्रियांना तें काम दिलें जातें, त्याप्रमाणें छाटाछूट केलेला आयुर्वेदाचा आटोपसर अभ्यासक्रम ठरवून मातृभाषेतून शिक्षण देऊन व इस्पितळांतही अनुभव देऊन स्त्रिया तयार करण्याचें काम महिलाविद्यापीठांनीं हातीं घेतलें पाहिजे. अशा पुष्कळशा स्त्रिया तयार झाल्या तर त्यांचा समाजाला मोठा उपयोग होईल.

आतां महाराष्ट्राला एक कळकळीची विनंति केल्यावांचून राहवत नाहीं. महाराष्ट्राबाहेर या विद्यापीठाला आतां फारशी मदत मिळेल असें मला वाटत नाहीं. महाराष्ट्रांत देखील ठिकठिकाणीं इतक्या संस्था निघाल्या आहेत कीं मध्यवर्ती संस्थेला मदत मागावयास गेलें असतां बरीच नाखुषी दिसून येते. स्थानिक संस्थांची जरूरी आहेच आहे, पण मध्यवर्ती संस्था

देखील पाहिजेतच. ज्याप्रमाणें प्रांतीवरील करासारखे कांहीं कर मध्यवर्ती हिंदुस्थानसरकारच्या खर्चासाठीं राखून ठेविले जातात व बाकीचें उत्पन्न प्रान्तिक सरकारांच्या खर्चाकडे मिळतें त्याचप्रमाणें राष्ट्रकार्याला लावण्याच्या मर्यादित द्रव्यापैकीं कांहीं प्रत्येकानें मध्यवर्ती संस्थांसाठीं राखून ठेविलें पाहिजे. ज्याप्रमाणें राजकीय कार्यक्षेत्रांत महाराष्ट्रानें वाटाड्याचें काम केलें त्याचप्रमाणें स्त्रियांच्या उन्नतीच्या व स्त्रीशिक्षणाच्या कार्यक्षेत्रांत महाराष्ट्रानें तेंच काम लहान प्रमाणावर तरी केलें आहे. हें कार्य करणाऱ्या अनाथ-बालिकाश्रम आणि महिला–विद्यापीठ ह्या संस्था महाराष्ट्रानें नामशेष होऊं देऊं नयेत. महाराष्ट्र दरिद्री आहे ही गोष्ट खरी, पण थेंबें थेंबें तळें सांचे या न्यायानें या उपयोगी संस्था जिवंत ठेवणें महाराष्ट्राच्या आटोक्याबाहेर नाहीं. या कर्तव्याला महाराष्ट्र जागेल अशी मला आशा आहे.

अनाथबालिकाश्रमाची व महिला–विद्यापीठाची जबाबदारी आपणावर घेणाऱ्या आश्रमाच्या आजन्म सेवक–सेविकांनाहि या ठिकाणीं दोन शब्द लिहावेसे वाटतात. आम्हीं महाराष्ट्रीय भांडखोर आहों हें ठरलेलेंच आहे. आमचें मतस्वातंत्र्य (!) दांडगें व त्यामुळें आमचीं भांडणेंही विकोपाला जाण्याचा संभव फार. यासाठीं आपणांला फार जपलें पाहिजे. आश्रम व विद्यापीठ यांची स्थिति आज विशेष काळजी करण्यासारखी नाहीं ही गोष्ट खरी; तथापि एकोप्यानें काम केल्यावांचून व प्रत्येक व्यक्तीनें आपलें बहुतेक सामर्थ्य या संस्थांच्या कामीं लाविल्यावांचून या जबाबदाऱ्या निभणें कठीण आहे. 'उपजणें मरणें न चुके नरा' हें जसें व्यक्तीला तसेंच संस्थांनाही लागू आहे. तथापि आपण दीर्घायुषी होण्याचा जसा प्रयत्न करीत असतों तसा आपल्या संस्था दीर्घायुषी करण्याचा प्रयत्न आपल्या हातून व्हावा ही माझी इच्छा आहे.

अखेरीस पहिल्या आवृत्तीच्या उपसंहारांत प्रदर्शित केलेले विचार पुन्हां एकदां या ठिकाणीं लिहून लेखणी खालीं ठेवितों. पुनर्जन्माच्या कल्पनेंत जर सत्य असेल व अंतकाळींच्या वासनेवर जर तो पुनर्जन्म अवलंबून असेल तर जगच्चालकानें माझें या कार्यावरील प्रेम अधिकाधिक वाढवावें व जन्मोजन्मीं मला या कार्यासाठीं तनमनधन अर्पण करण्याची बुद्धि द्यावी अशी त्याचेजवळ याचना करून मी आपणा सर्वांचा निरोप घेतों.

# परिशिष्ट

[ पुढील बखरीचा आत्मवृत्ताशीं संबंध नाहीं. परंतु आपल्या गांवाच्या स्थापनेची ही मनोरंजक माहिती आणखी कांहीं वर्षें काळाच्या दाढेंतून वांचवितां आली तर पहावें म्हणून ही बखर या ठिकाणीं श्रीयुत नारायण विश्वनाथ मंडलिक यांच्या परवानगीनें पुरवणीरूपानें देत आहें. रावसाहेब वि. ना. मंडलिक यांनीं ही बखर उजेडांत आणून ती छापून ठेविली नसती, तर ती अंधारांतच राहून काळाच्या भक्ष्यस्थानीं पडली असती. पन्नास वर्षांपूर्वी रावसाहेब मंडलिकांनीं छापलेल्या या लहानशा बखरीचीं छोटेखानी पुस्तकें त्यांच्या चिरंजीवांनीं जपून ठेविलीं म्हणून आज त्याच्या चारदोन प्रती तरी नजरेला पडत आहेत. हा उत्कृष्ट ऐतिहासिक लेख सर्वभक्षक काळाच्या दाढेंतून वांचविण्याचें श्रेय मुंबईच्या पूर्वींच्या टाऊन कौंसिलचे अध्यक्ष रा. सा. मंडलिक व हल्लींच्या टाउनकौन्सिलचे अध्यक्ष त्यांचे चिरंजीव यांजकडे आहे. ]

## मुरुड गांवाची हकीकत

[ सुमारें एक बंद फाटून गेला आहे. ] पाहून चित्तांत आणिलें कीं, एथें ग्रामाची रचना करावी; असें पाहून आसूद ग्रामास आले; तेथें ग्रामस्थांस पुसोन गुहागर एथें उभयतां बराबर शिष्य वैशंपायन असे त्रिवर्ग गुहागरास गेले. तेथें जाऊन तो जागा पदमाकर भट सित्ध पुरुष यास गांवची रचना करावयास नेमून देऊन, आपण व शिष्य असे उभयतां फिरून आसुदास वास्तव्य करून, तेथील रुद्रभूमिकास्थल मागून जंगल मोडावयास काम चालीस लाविलें. जंगल तोडितां तोडितां, गांवाचा मध्यभागीं वडाचा वृक्ष थोर होता तो सित्ध पुरुषाचा विचारें तोडावा असें चित्तांत आणून, बराबर दहा वीस ब्राह्मण व शिष्य वैशंपायन समागमें घेऊन वडाचा वृक्ष तोडावयास लागले. ते समयीं घाव घालितां दातार ब्राह्मण मृत पावला. तेव्हां सित्धानें चित्तांत पाहिलें तों यामध्यें पिशाच्य बहुत आहे, व वटवृक्षांत कोणी देवता आहे; तेव्हां त्या देवतेची प्रार्थना करून पिशाच्य याचें बंधारण करून ब्राह्मण जीवंत करविला. केल्यानंतर

सर्व जंगल मोडून क्षेत्र सिध्द केलें. त्याजवर गंगाधर सिध्द पुरुष व शिष्य वैशंपायन असे कर्णाटक प्रांतीं जाऊन गंडकी शिळेची मूर्ति घेऊन आले. त्यासी मुहूर्ती आपणा जवळ ठेऊन एक मुहूर्त गुहागरास पाठविली, व एक मुहूर्त दिव्यांस* पाठविली. एथील मुहूर्तीची स्थापना करावयाशी प्रारंभ केला तेव्हां वैशंपायन यांजकरवीं अनुष्ठान स्थापनेचें करऊन देव-स्थापना केली. पुढें गांवीं वतनदारांची स्थापना करितां प्रथम वैशंपायन व दातार यांची स्थापना करून वैशंपायन यासी सर्व ग्रामांतील उपाध्येपण दिलें, व दातारांस श्रीचे पूजेचा अधिकार दिला; आपले क्षेत्रीं गोचारास स्थल नाहीं तेव्हां शैकर वंशीचा जालंदर राजा जालगांवास होता त्याजवळ सिध्द पुरुष गंगाधर भट जाऊन, आपल्यास स्थळ मागितलें. तेव्हां त्याणें आसुद व फणसू व गिम्हवणें, व करदें या चौहा गांवीची भूमि, त्या लोकांजवळ राज्यानें वतन मागून सिध्दास दिली. यामध्यें कोणाचें सिध्दाखेरीज स्वामित्व दुसरियाचें नाहीं. असें करून राजाची आज्ञा घेऊन आपले क्षेत्रीं आले, आणि चतुःसीमेमध्यें जागजागीं पिशाच्य याचा रक्षणाकरितां जागजागीं देव देवस्थानें स्थापन केलीं; दक्षिणेस भद्रा-गिरी पर्वत, उत्तरेस चंद्रागिरी पर्वत, व पूर्वेस आसव नदी, पश्चिमेस समुद्र, चतुःसीमेमध्यें देवब्राह्मणाची दाक्षिणेकडून स्थापना करीत चालले. नदीचे अलीकडे क्षेत्रुपाल स्थापिला. त्याचा पश्चिमेकडून उभा मार्ग केला, आणि मार्गाचे पश्चिमभागीं आपणास स्थळ नेमून तेथें आपला शिष्य मानसपुत्र वैशंपायन यासी स्थापिलें. त्यासी आपला वडीलपणाचा मानपान, गंध, विडा व धर्माधिकार दिल्हे. आणि तेथें गडदू स्थापिला; आणि आपले स्थलांत निर्गुडादेवी गोरक्षणास स्थापिली. आपले उत्तरेस रुद्रभूमीस जावयास मार्ग ठेविला. स्त्रिया सहगमनास जातील, त्यांस बसावयासी स्थळ नेमिलें, आणि उभ्या मार्गाचे पूर्वेस श्री लक्ष्मीनारायण स्थापिला, आणि पूजेस भाव्याब्राह्मण स्थापिला. त्यासी स्थळ नेमून संन्निध ठेविला. त्याचे पूर्वभागीं बहिरवदेव व कालिकादेवी स्थापिली. आणि कितीयेक क्षेत्रुपाळ व देव त्याचे संनिध स्थापिले. त्याचे देवळास जावयासी मार्ग ठेविला. रुद्रभूमीचे मार्गाचे उत्तरेस वैशंपायन शिष्य स्थापून सर्व ग्रामाचे

* हें गांव म्हणजे दिवें बोर्ली अशी कथा आहे.

व देवळांतील सर्व देवाचें उपाध्येपण दिलें. त्याचे उत्तरेस नेना ब्राह्मण या नामेंकरून स्थापिला; त्यासी महाजनकीचा अधिकार दिला. त्याचा उत्तरेस बाल ब्राह्मण स्थापिला त्यासी वर्तकपणाचा अधिकार दिल्हा. त्याचे पूर्वेस पर्वताकडेस जावयासी मार्ग ठेविला. त्याचे उत्तरेस वरदाक्षायणी नामें करून स्थापिली. तेथून पुढें उभ्या मार्गांचे पश्चिमेस श्रीगंगानारायण याशी स्थापिला; आणि पूजेस परांजप्या ब्राह्मण स्थापिला. त्याचे उत्तरेस जोसी ब्राह्मण स्थापिला. त्याचे उत्तरेस क्षेत्रुपाळ स्थापिला. त्याचे उत्तरेस सुतार ब्राह्मण स्थापिला; त्यास वर्तकपणाचा अधिकार दिल्हा. त्याचे उत्तरेस पूर्व पश्चिमेस जावयासी मार्ग ठेविला. त्याचे उत्तरभागीं, ग्रामाचे मध्यभागीं, प्रथम श्रीची स्थापना केली. श्रीचे पूर्वभागीं चोहों देवांची स्थापना केली. त्याचे उत्तरभागीं, गोखला ब्राह्मण स्थापिला; त्यासी पूजेचा अधिकार दिल्हा. तेथून उभा मार्ग श्रीमाहादेश्वर याचे देवालयास जावयासी केला. त्याचे मध्यभागीं क्षेत्रुपाल स्थापिला. त्याचे पूर्वेस श्रीमहारुद्रासंनिध क्षेत्रुपाल स्थापिला. त्याचे पूर्वभागीं व पश्चिम उत्तर भागीं जागजागीं क्षेत्रुपाल स्थापिले. श्रीचे संनिध उत्तर भागीं स्वयंभुवा देव वटवृक्षामध्यें होती तिची स्थापना तेथेंच केली. श्रीचे संनिध क्षे_पाळ स्थापिला. शुभा देवीचे संनिध उत्तर भागीं दातार ब्राह्मण स्थापिला; त्यासी पूजेचा अधिकार दिल्हा, त्याचे उत्तरेस करंदीकर ब्राह्मण स्थापिला; त्यासी महाजनकीचा अधिकार दिल्हा. त्याचे उत्तरेस कोपरकर ब्राह्मण स्थापिला; त्यासी वर्तकपणाचा अधिकार दिल्हा. त्याचे उत्तरेस मार्गांचे पूर्वपाश्चिम भागीं जावयासी रुद्रभूमीस जावयासी मार्ग ठेविला. उभ्या मार्गांचे पूर्वेस श्रीनागलेश्वर स्थापिला. त्याचे संनिध गोडबोला ब्राह्मण स्थापिला. त्यासी पूजेचा अधिकार दिल्हा. त्याचे पश्चिमेस चंद्रभराडी देवता स्थापिली. नागलेश्वराचे पूर्वेस क्षेत्रुपाल स्थापिला. उभ्या मार्गांचे पश्चिमेस गडदूचा अलीकडे धारप ब्राह्मण स्थापिला; त्यासी वर्तकपणाचा अधिकार दिल्हा. त्याचे उत्तरेस शून्यालयासी स्थळ नेमिलें. त्याचे पूर्वेस आसूद ग्रामास जावयासी मार्ग ठेविला, आणि मार्गावर क्षेत्रुपाळ स्थापिला. त्याचे पूर्वेस पर्वताचे उत्तरेस नदीसंनिध क्षेत्रपाळ स्थापिला. शून्यालयाचा दक्षिणेस गडदू सीमा करून ठेविली. गडदूचे पश्चिमभागीं बनामध्यें बनचि या नामें करून देवी

स्थापिली. तिचे उत्तरेस नदीपलीकडेस चंद्रागिरीचे खालीं समुद्रतीरीं सीमादेव स्थापिली; तिचे पूर्वेस सोनार स्थापिला. याप्रमाणें देव देवस्थानें व आणखी क्षेत्रपाळ असे बहुत जागजागां पिशाच्य रक्षणास स्थापिले, आणखी वतनदार जागजागीं स्थापिले. आणि वतनदारांचे झुपल्यामध्यें गडदू स्थापिले. आणि चित्तांत पाहिलें तो पुढें यवनी राज्य होईल, याजकरितां गांवाचे उत्तरेस गडदू पलीकडेस शून्यालय बांधिलें. शून्यालयाचे पूर्वेस पश्चिमभागीं गडदू पलाकडे यवनास स्थळ ठेविलें, व इतर जातीस गडदू आलीकडेस व पलीकडेस स्थळ ठेविलें. फाल्गून वद्य ३० पासून कोण रविशीने वतनदारानें चालावें त्याचा तपशीलः—
अमावास्येचे दिवशीं श्रीचे एथून वसंतनवरात्रांचें सर्वांस गांवांमध्यें [ about 4 letters lost ] ( आमंत्रण ? ) दातारानें करावें. चैत्र शुद्ध १ चे दिवशीं तुऱ्या वाजंत्री याणें मानकरी यांचे व सर्वांचे घरोघर वाद्य वाजवावें. श्रीचा देवळांत व शुभादेवीचा देवळांत सडासंमार्जन घालून ग्रामस्थांस बसावयासी दातार याणें घालावें. घातल्यानंतर देवीस प्रातःकाळीं मलस्नान द्यावें. उदकानें श्रीचे द्वारींचा दोणी भरून पाद्य आचमनास ग्रामस्थांस ठेवावें. वैशंपायन उपाध्ये यांहीं प्रातःकाळीं श्रीचे देवळास जावें; गेल्यानंतर दातार याणे बसावयासी द्यावें, आणि पूजा साहित्य घेऊन दातार याणें देवीची पूजा करावयास द्यावें. आल्यानंतर दातार याणें पूजा करावी, आणि वैशंपायन याणीं पूजा सांगावी, आणि सदैव पुराण सांगावें; आणि ग्रामस्थ श्रीचे देवळीं आल्यानंतर जाचे घरीं मृत्यु पावले असेल त्याचे घरीं दहापांच ग्रामस्थ व महाजन, वर्तक, उपाध्ये, जोशी, व दातार, यांहीं जाऊन त्यासीं बहुमान करून वाजतगाजत श्रीचे देवळीं आणावें; आणि आणिल्यानंतर सर्वांहीं शुभादेवीचा देवळामध्यें बसावें, व बसल्यानंतर जोशी याणीं देवीचे सन्निध उभे राहून पंचांगश्रवण सर्वांस करावें, आणि पंचांग श्रीचा देवळांत ठेवावें. ठेविल्यानंतर दातार यानें विडा द्यावा. दिल्यानंतर वैशंपायन यांहीं श्रीचे संनिध बसोन सिद्ध पुरुषाची परिभाषा आमंत्रणाची आहे ती लिखित वाचावे, आणि ते दिवसी मुरडी [ स ] सत्पुरुष ब्राम्हण आहे त्यासी प्रथम लिखित लिहावें, लिखित वाचल्यानंतर दातारानें वैशंपायन यासी गंध, विडे, सेले, द्यावे; दिल्यानंतर

हरिकथा करवावी. हरिकथा जाहलियानंतर सर्वांस गंध विडे दक्षिणा द्यावी. दिल्यानंतर सर्वांहीं घरोघर जावें. सायंकाळीं पुराणास व हरिकथेस ग्रामस्थ गेल्यानंतर दातारानें बसावयासी घालावें, व पुराणास पाटसमई ठेवावी. पुराण व हरिकथा जाहलियावरी गंध विडे द्यावे. याप्रमाणें तृतीयापर्यंत वर्तणूक करावी. तृतीयेचे दिवशीं सोनार व तुऱ्या वाजंत्री यांही सिमा- देवीचे चैत्रीचें आमंत्रण गांवांमध्यें सर्वांस करावे. चतुर्थीचे दिवशीं सर्वांही श्रीसिमादेवीस नेवैद्य घेऊन जेवणास जावें. दातार याणें प्रात:काळीं मुखवास लावावयास सोनारानें दातारापासून मागून न्यावा. तेथें जेवणास गेल्या नंतरी मानकरी यांसी नैवेद्य द्यावे. त्याचा तपशील:—महा [ज] न दोन, येकूण नैवेद्य २; वर्तक चार, येकूण नैवेद्य (४) चार; उपाध्ये धर्माधिकारी दोन, येकूण नैवेद्य दोन; जोशी १ एक, येकूण नैवेद्य; १ [ 2 letters lost ] येक येकूण नैवेद्ययेक; दातार येक, येकूण नैवेद्य पांच ५; अधिकारी चोहों देवांचे, येकूण नैवेद्य चार; खरवळा येक, येकूण नैवेद्य १; वतनदार ब्राह्मण यासी परस्पर ग्रामस्थांकडील सोनार याणें नैवेद्य देववावे; व मराठे व इतर जात वतनदार गुरव बहिरीचा एक, एकूण नैवेद्य ५; आसूदाचा गुरव,एकूण नैवेद्य ५;हजाम ५; सालदुलचा वतनदार५; सुतार ५: सोनू कुंभार ३; गावडा ५; वारीक २; एकूण नैवेद्य ६; तुऱ्या वाजंत्री, ५; शिंपी, ५; परीट, ५; गोवळा, २; तेली, २; कासार, १. येणें प्रमाणें सोनारानें नैवेद्य द्यावे. जेवण जाहल्यानंतर जोशी याणें पंचांग सांगावें. लिखितास कागद कारभारी यांहीं वैशंपायन याजपाशीं द्यावे. दिल्यानंतर हरिकथा करवावी. दातारानें गंध विडे वैशंपायन यासी प्रथम द्यावे, व जोशी यासी द्यावे व माहाजन वर्तक यांस द्यावे, व सर्वांसही द्यावे. त्यानंतर तुऱ्या वाजंत्री यापाशीं वोवाळणी ग्रामसंमंधें इनामतींतून पैका वतनदारानें द्यावा. दिल्यानंतर मुखवास दातार याणें घेऊन त्याचे बरोबर सर्वांही वाजत गाजत पश्चिम मार्गानें समुद्र तीरानें यावें. येत्येसमयीं शून्यालयासमोर आलें म्हणजे, वाद्य क्षणमात्र वाजवूं नये. तेथून श्री दुर्गेचा पेठेंत यावें. आल्यानंतर ग्रामस्थ श्रीचे देवळा- जवळ असतील, ते व आपण सर्वांहीं परस्पर भेटावें. भेटल्यानंतर श्रीचा रथ उचलून दातारानें वर चढून रथ पेंठेमध्यें ब्राह्मणांहीं आणावा.

आणि दातारानें सर्व देवांस धुपारती करावी. केल्यानंतर यथास्थानें रथ ठेवावा. ठेविल्यानंतर श्रीचे देवळांत जाऊन हरिकथा करावी. गंध विडे यथा अनुक्रमें दातारानें द्यावे. दिल्यानंतर सर्वांहीं घरोघर जावें. रात्रौ वाजंत्री याणें शिद्ध पुरुषाचे स्थळाचे गडदूपासून वाजवीत सर्व मानकरी श्रीचा देवळास घेऊन जावें. सर्व गेलियानंतर, जो कोणी गेला नसेल त्यासी महाजन वर्तकांहि वारिकास पाठवून बोलावून आणावें. दातार याणें बसावयासी घालून, दिवे लावून ठेवावे. ठेविल्या नंतर पुराण व हरिकथा जाहलियावर यथाअनुक्रमें दातारानें गंध, विडे द्यावे; व सोनारास गंध लावून विडे द्यावे. याप्रमाणें नवरात्र चालावें. जोशी यांहीं नित्य श्रीचे देवळीं पंचांग श्रवण करावें. पंचमीचे दिवशीं प्रातःकाळीं श्रीचे व मानकरी यांचे घरोघर गुरवानें वाद्य वाजवावें. त्याचा अनुक्रमः—प्रथम श्रीचे आंगण्यामध्यें वाजवावें; म्हणजे श्रीचें व दाताराचें आंगणें, येक; व इतर देवासंन्निध वाजवावें; व मानकरी यांस तेथून नेना महाजन याचे दारीं वाजवावें; तेथून सिद्धाचे स्थळाशीं वैशंपायन यांचे दारीं वाजवावें; तेथून बाळवर्तक यांचे दारीं वाजवावें तेथून उपाध्ये यांचे दारीं वाजवावें; तेथून धारप यांचे दारीं वाजवावें; धारपा अगोधर करंदीकर माहाजन याचे दारीं वाजवावें; तेथून जोशी याचे दारी वाजवावें; तेथून सुतार वर्तक याचे दारीं वाजवावें; तेथून कोपरकर वर्तक याचे दारीं वाजवावें; तेथून ( about 3 letters lost ) र; याप्रमाणें प्रातःकाळीं व माध्यानकाळीं, व सायंकाळीं कथेस व पुराणास न्यावें; याजप्रमाणें पुराण व हरिकथा जाहलीयाजवर पूर्ववत् यथा अनुक्रमें गंध, विडे, गणेश पूजा द्यावी; याप्रमाणें चालावें. सप्तमीचे दिवशीं दातार याणें श्रीचे येथून केळवणास मानकरी यांसी व सेवकांस बोलवावें, आणि केळवण करावें. त्याचा अनुक्रमः—मानकरी महाजन २, व चाकर पडघणकर २ येकूण ४; वर्तक ४, पडघणकर ४, येकूण ८; उपाध्ये वैशंपायन व धर्माधिकारी २, शिष्य २, एकूण ४; हिरा जोशी १, व शिष्य १, एकूण २; खरवळा २, व जोर (?) चोहों देवांचे ४. येणेंप्रमाणें मानकरी ब्राह्मण यांस केळवणास बोलवावें, व इतर जातीचे मानकरी बोलवावे. सोनारानें रथ पुतळी भोग मुहुर्त उजळावयास न्यावी. दातारानें त्यास गंध, विडा

द्यावा. इतर जातीचे मानकरी बितपशील:—सोनार येक; वाजंत्री व ढोलकरी २; वारीक दोन; गावडा १; सुतार १; शिंपी १; साळी १; कुंभार १ गुरव आसुदकर १; न्हावी १; गुरव बहिरीचा १; गोवळा १; तेली १; परीट १; चाम्हार १, येणेंप्रमाणें इतर जातीचे मानकरी यांसी बोलवावे. अष्टमीचे दिवशीं सर्व मिळून श्रीचे ( about 4 letters lost ); भांडारांतील सर्व साहित्य समाराधनेचें घेऊन सर्वांहीं मिळून समाराधना करावी. आसूद येथें व करदें येथें आमंत्रण पाठवावें. सर्वांहीं श्रीचे समाराधनेस भोजनास जावें. सुतारानें स्थळ सडासंमार्जन घालून ठेवावें. दातार याणें रसईची पूजा करून नैवेद्य वाजत घेऊन जावा. उपाध्ये यांहीं पूजा सांगावयासी बरोबर जावें. तेथून आल्यानंतर समाराधनेस अन्नशुद्ध उपाध्यांहीं वाढून, दाताराकडून उदक सोडवावें. सोडिल्यानंतर भोजन जालियावर विडे, दक्षणा द्यावी. सायंकाळीं बाळ वर्तक यांहीं श्रीस महानैवेद्य करावा. उपाध्ये व धर्माधिकारी वैशंपायन जोशी ( about 4 letters lost ) प्रातःकाळीं आमंत्रण करावें. सायंकाळीं बोलावून आणून, महानैवेद्याचा संकल्प करून, नैवेद्य पूजा घेऊन श्रीचे देवळास वाजत गाजत जावें. गेल्यानंतर श्रीची पूजा करून वैणव पात्रामध्यें नैवेद्य घातला असेल तो श्रीस दाखवावा. नैवेद्य पूजा जाहल्यानंतर रथपुतळीस नैवेद्य दाखवावा;तेथें दाखविल्यानंतर भावई देव आहे तीसही दाखवावा.श्रीचे पृष्ठ भागीं क्षेत्रपाळ आहे, त्याची पूजा करून नैवेद्य दाखवावा. यानंतर गणपतीची पूजा करून नैवेद्य दाखवावा; आणि शुभा दे ( वी ) ची पूजा करून नैवेद्य दाखवावा. दाखविल्या नंतर ब्राह्मणांस गंध, विडे दाक्षिणा द्यावी. दिल्यानंतर शुभा देवीचे उत्तरभागीं तोरण तुन्यानें बांधलें असेल त्या खालून जावें. दाताराचे घरीं एकानें नैवेद्य जेवावयासी जावें, आणि सर्वांहीं घरास येऊन भोजन करावें. भोजन जाहल्या नंतर श्रीचे देवळीस जावें. गेल्यानंतर पुराण श्रवण जाहल्यानंतर श्रीचे अलंकार भूषणें भंडारांतून काढून माहाजन वर्तक यांणीं दाताराजवळ देऊन श्रीस घालवावे. घातल्यानंतर बाळवर्तक याणे श्रीचा दंड घेऊन श्री संनिध उभें असावें. मंडपामध्यें कोपरकर वर्तक याणें दिवे लावून चारी प्रहर तेलवात घालीत असावें; सुतार वर्तक याणें कुंचा श्रीसंनिध वायू घालीत असावें; महाजन

वर्तक यांहीं वारिका करून बसावयास मंडपामध्यें घालवावें; घातल्यानंतर परस्थळचे लोक आले असतील, त्यांचे जागे आहेत त्या त्या जागा त्यांसी बसवावे. बसल्यानंतर ग्रामस्थ व आसूदकर यांहीं एक ( adout 2 Letters lost ) दक्षिणेकडे उत्तरामुख बसावें. सिद्धाचे जागा सभा सन्मुख वैशंपायन यांहीं बसावें. बसल्यानंतर हरिकथा करवावी, व इतर गीत वाद्य नृत असा आनंद करावा. परस्थळचे ग्रहस्थ आले असतील, हरिकथेस आले नसले तर त्यांस आमंत्रण पाठवून बहुमान करून सभेस आणावे; आणून आनंद करावा. रात्रौ सोनारानें देव उभळावयासी नेली आहे ती आणावी, आणि सर्व सभेस गंध, विडे, क्षीराबत, दक्षिणा द्यावी, आणि प्रातःकाळीं सूर्योदय जाहला नाहीं तों सडासंमार्जन व देवीस स्नान घालून दातारानें ठेवावें. कोणी लोकांनीं देवीस गेले तर ( about 6 Letters Lost ) केलें असेल त्यांहीं श्रीचे देवळीं सैपाक करून ब्राह्मण सवासनी सांगून श्रीस नैवेद्य दाखवून सूर्योदयापूर्वी भोजन करावें. प्रातःकाळीं श्रीचे देवळीं सर्वांहीं येऊन घारपानें भोग मुहूर्त रथ पुतळी बाहेर आणावी, तेथें दातारानें पूजा करावी; केल्यानंतर घारपानें रथावर ठेवावी; बाळवर्तक याणे दंड घेऊन रथापुढें चालावें; सुतार वर्तक याणें रथाचें साहित्य पहावें, व निशाण घेऊन पुढें चालावें; शिंपी याणें रथ कापडावा; अनामि [कानें] आदर्श लावावा. दातारानें शुभा देवीचा मंडपांत वतनदारांस बसावयासी घालावें. घातल्यानंतर कारभारी यांहीं भंडारांतील अडशरी मुशाहिरा इतर जातीचे चाकरीचे लोक आहेत त्यांस कोपरकर वर्तक याणें अडशरी मुशाहिरा सर्वांस द्यावा. यथा अनुक्रमें द्यावा. यासी दातारानें प्रथम गंध विडा कोपरकरास द्यावा, दुसऱ्यानें जो महाजन यास द्यावा; त्याचेमागून धर्माधिकारी उपाध्ये यास द्यावा. त्याचेमागून जोशी यासी द्यावा; त्याचे मागून बाळवर्तक यासी द्यावा; त्यामागून घारप यासी द्यावा, व सुतार यास द्यावा. तेथून रथाजवळ यावें; आल्यानंतर नेना महाजन याणें सुपाऱ्यांचें मखर भरावें, त्यासी प्रथम दातारानें रथाजवळ गंध विडा द्यावा. त्याणें सुपाऱ्या मानकरी त्यांसी द्याव्या. पराजपे यानें केळीचें मखर भरावें; त्यासी दातारानें प्रथम गंध विडा द्यावा. त्याणीं केळीं प्रथम सिद्धाचे जागा वैशंपायन धर्माधिकारी यासी द्यावी, व सर्व मानकरी यासी द्यावी. त्यानंतर सोनार याणें रथाजवळ सोनें

रुपें याचा पाट श्रीस तेथें वसावयासी द्यावा. दिल्यानंतर घारप याणें रथाबरोबर चालावें. दातारानें रथावर चढावें. कोपरकर वर्तक याणें रथावरि चढून दिवटी ठेवावी. सर्व ब्राह्मणांहीं रथ उचलून पेठेंत न्यावा. तेथें गेल्यानंतर सुतार व घारप यांणीं अश्व व शुप्र चोहीं गांवचे मिळून रथ चालवावा. सर्वांहीं रथाबरोबर जावें. उत्तरेकडे प्रथम रथ न्यावा. घरोघर उभा करीत जावें. ब्राह्मण व सवाशीण बायको पूजानैवेद्य देतील, तो देवीस दाखवावा. घरोघरचीं बाळगोपाळें रथावर चढवावीं. दातारानें गांवामध्यें जागजागीं देवस्थानें आहेत त्यांस सर्वांस वरचेवर धुपारत करीत असावें. उत्तरेचा शेवडीस हद्द गडदूपासून अलीकडे फिरवावा. तेथून फिरून आणून श्री नागलेश्वराचा दक्षिण भार्गीचे बिदीनें नेते समई सोनारानें आपले घरची तेथें पूजा द्यावी, आणि आपले स्थळाशीं रथावरी मुलें बाळें चढवावीं. तेथून कोपरीचे बिदीनें रथ न्यावा. नेल्यानंतर माहादेश्वर व सर्व देवांस धुपारत करीत पेठेंत आणावा. पेठेंतून दक्षिणेचे शेवडीस नदीपर्यंत घरोघर उभा करीत आणावा. आणिल्यानंतर गुहागरचे देवीस धुपारत करून रथ फिरवावा, आणि नारायणाचे देवळाजवळ उभा करावा; तेथें शूद्र लोकांचे बाळ गोपाळांनीं श्रीचे पायां पडावें गोवळे यांस खांदेली यांस व सर्वांस पाणी उदक द्यावें. तेथून उपाध्ये वैशंपायन याचा स्थळापासून यांसी रथावरी घेऊन गंगानारायणपर्यंत यावें, व तेथें उपाध्ये यांहीं उतरावें; आणि गंगानारायण यांसी धुपारत करावी; करून रथ पेठेंत न्यावा. तेथें ब्राम्हणांहीं फिरून रथ घेऊन मंडपाजवळ यथास्थानें रथ ठेरावा. ठेवल्यानंतर श्रीचे दर्शनास जाऊन गंध विडे, घेऊन घरोघर जावें; सायंकाळीं सर्वांहीं त्यागास जावें. गेल्यानंतर तेथें वारिकानें उपोसित राहून, हातीं शस्त्र घेऊन प्रथम धर्माधिकारी वैशंपायन यासी हाक मारावी; दुसऱ्यानें उपाध्ये वैशंपायन यासी हाक मारावी; तिसऱ्यानें जोशी यासी हाक मारावी, चवथ्यानें [about 4 letters lost] हाक मारावी; याजप्रमाणें गांवचे व परगांवचे उपाध्ये जोशी यास हाक मारल्यानंतर त्यांसीं दातारानें गंध, विडे, सेले यथा अनुक्रमें द्यावे. चाकरीचे लोकांस मुशारा द्यावा. दशमीचे दिवशीं सर्वांहीं मिळून इनामतींतून शाहाळीं पाडून त्याचा उदकानें देवीस स्तपन घालावें, आणि पूजा करून उत्तम सोपस्कर नैवेद्य दाखवावा. दाखविल्यानंतर सर्वांस गंध, विडे, गणेश-

पूजा सर्वांस द्यावी. नवरात्र संपूर्ण करावें. चैत्र वद्य सप्तमीचे दिवशीं दातारानें जपाचें आमंत्रण सर्वांस घरोघर सांगावें अष्टमीचे दिवशीं, दातारानें संकल्प करून दातार यानें वैशंपायन उपाध्ये यांचे हातीं आचार-वर्ण द्यावें. यांहीं जप सर्वांकरून करवावा; अनुष्ठान संपवावें. संपल्यानंतर आच्यारी यांस सर्व ब्राह्मणांस गंध, विडे व दक्षिणा द्यावी. सर्वांही घरोघर जावें. चैत्र वद्य १४ चे दिवशीं, दातारानें उत्तावळ काढवावी. पिशाच्यास बळ द्यावी. वैशाख वद्य अमावास्येस, वारिकानें श्रीच्या देवळांत भावई देवी आहे, ती प्रातःकालीं दातारानें बाहेर आणून ठेवावी, आणि देवळा-मध्यें वारिकानें जाऊन सडासंमार्जन घालून तेथें बसलें असावें. गांवच्या बायका तिच्या दर्शनास जातील, पूजा नैवेद्य दक्षिणा ठेवतील, ते वारिकानें न्यावे. सायंकाळीं दातारानें देवी गर्भान्यांत ठेवावी, आणि वारिकानें सडासंमार्जन घालावें. ज्येष्ठ वद्य १४, मढेरू काढवावें. मढेराचें साहित्य बालवर्तक यांणीं करावें. दातारानें संकल्प करून उदक उपाध्ये यांहीं सोडवावें पूर्वी पिशाच्याहीं ब्राह्मण बळ घेतली होती, तेव्हां सिद्धांहीं ब्राह्मण त्याजकरवीं जीवंत करून, त्याशी नरबळ देऊं केली. त्यास वस्त्र नूतन घालावें, आणि सर्व गांवामध्यें शूद्रांहीं व गुरवांनीं समागमें जाऊन गांवभोंवतें फिरवून श्रीचा देवळास आणावा; आणि आणिल्यानंतर श्रीचें तीर्थ व सिद्धाचे हातींचे आड व तळ्या आहेत, त्याचें उदक आणून, त्याजवरी शिंपवावें; श्रीस धुपारत करावी; आणि सर्वांनीं श्रीजवळ प्रार्थना करावी. केल्यानंतर, श्रीनें त्यास जिवंत करावा. आषाडी दशमीपासून चातुर्मास दशमी एकादशीस श्रीचे पालखींत मुखवास घालून गांवा-मध्यें दातार यानें फिरवावी. लोक पूजा नैवेद्य देतील, ती घ्यावा. याप्रमाणें कार्तिकीपर्यंत चालवावें. श्रावण शु॥ चतुर्दशीस श्रीचे ऐथून श्रावणीचें आमंत्रण सर्वांस दातारानें करावें. पौर्णिमेचे दिवशीं सर्वांहीं उपाकर्मास जावें. उत्सर्जन माहादेश्वराचे देवळीं करावें. दातारानें श्रीचे देवळीं उपासकर्माचे अनुष्ठानाचें साहित्य करून ठेवावें, आणि दाता-रानें व सर्वांहीं संकल्प करून गणपती पूज्यन करून उपाध्यावर अक्षत टाकावी. उपाध्यांहीं अनुष्ठानास प्रारंभ करून समाप्तीस न्यावें. सभादीप आले असतील, ते ते यजमाना करवून संकल्प उपाध्ये यांहीं करवावा.

केल्यानंतर प्रथम श्रीस येक ठेवावा, दुसरा असल्यास उपाध्ये वैशंपायन यांस द्यावा. तिसरा असला तर धर्माधिकारी यासी द्यावा. चवथा असला तर जोशी यांसी द्यावा. पांचवा असला तर ( about 6 letters lost ) को-परकर यासी द्यावा. दुसरे असले, तर ग्रामस्थांचे मध्यें थोर ब्राह्मण असतील त्यांस द्यावे. दिल्यानंतर सर्वांहीं घरोघर जावें. उपाध्ये यांस दातारानें जेवावयासी बोलवावें. गांवामध्यें हव्यकव्य कार्य प्रयोजन जाचे घरीं होईल त्याणे अगोधर मानकरी यांच्या भेटी घेऊन यथा अनुक्रमें बोलवावें. श्रीचें देवळांत ग्रामसंमंधें अनुष्ठान होईल त्याचा संकल्प दातारानें करावा, आणि वैशंपायन याचे हातीं आचारीवर्ण द्यावें, व सदश्य वर्णही त्याचे हातीं द्यावें; व गांवामध्यें याजप्रमाणें वर्तणूक करावी. जोशी यास ब्राह्मत्व द्यावें. श्रावणीचा अनुष्ठानाचें ब्रह्मत्व वैशंपायन यांसी द्यावें. सिद्धाचा प्रथम गंध विडा मानमहत्व वैशंपायन यांस पुत्र म्हणून. यज (न) याचें ब्राह्मत्व जोशी याचें. गांवामध्यें उपाध्येपण व धर्माधिकार, असे दोन मान वैशंपायन याचे; तिसरा जोशी याचा. ( about 8 letters lost ) ब्राह्मणाखेरीज यज्ञोपवीताचा अधिकारी असेल त्यास, व गुजरास, व क्षेत्रीयास, व सोनारास, वैशंपायन याजखेरीज दुसरा कोणी उपाध्या नाहीं, जोशी या खेरीज दुसरा जोशी नाहीं. या प्रमाणें चालवावें. भाद्रपद शुद्ध ४ स लोक गणपतीस श्रीचे देवळांत आणितील, त्यास दातारानें गंध विडे द्यावे. भाद्रपद पोर्णिमा आमावास्यास दातारानें शारदी नवरात्राचे श्रीचे येथून गांवामध्यें आमंत्रण करावें. अश्वीन शुद्ध १ चे दिवशीं इनामतीचे पैकीं भांडारांतून घटस्थापनेचें साहित्य कारभारी यांहीं दाताराकडून आणवावें, आणि दातार याणें संकल्प करून नवरात्राचें आचारी वर्ण वैशंपायन यांचे हातीं देऊन घटस्थापना करावी. जप देवी महात्म याचा जप करून पुराण श्रवण करावें. सप्तमीचे दिवशीं जपाचें आमंत्रण दातारानें करावें. बालगोपाल येऊन, सर्वांहीं लहान थोरांहीं जप करावा. जपाचा संकल्प दातारानें करून उपाध्ये वैशंपायन यांचे हातीं वर्ण द्यावे. यांहीं समाप्तीस अनुष्ठान न्यावें. नवमीचे दिवशीं होमाचें साहित्य इनामती पैकीं आणावें. होम जाहल्यानंतर बलिदान करून, तुऱ्या वाजंत्री व वारीक यांहीं न्यावा. नेल्यानंतर श्रीस दुधानें अभिषेक करून स्तपन जाहलें म्हणजे उत्तम प्रकारें पुजा नैवेद्य दाखवावा,

व उपाध्यायांस व इतर ब्राह्मणांस विडा दक्षणा द्यावी. नवरात्राचे जपाचे मळा सेत उपाध्यांहीं लावून इनाम उपभोग करावा. दशमीचे दिवशीं प्रातःकाळीं सर्वांहीं श्रीचा देवळीं जाऊन उपाध्यांहीं दाताराकडून घटाचें विसर्जन करून सर्वांस अभिषेक करावा. सायंकाळीं सर्वांहीं सिमालंघनास श्री महादेश्वर याचे संनीध जाऊन शमीपूजन करावें, अथवा सीमेवर नदीसंनिध शमीपूजन करावें. केल्यानंतर सर्वांहीं वाजतगाजत श्रीचा देवळास येऊन दर्शन घ्यावें. घेतल्यानंतर सर्वांहीं घरोघर जावें. कार्तिक पौर्णिमेस त्रिपूर तेवावा. यासी सर्वांहीं जावें. सर्वांस इनामतींतून गंध विडे द्यावे. पौषमासीं मंगलवारीं इनामतींतून मंगलवारींचे मंगलवारीं सर्वांस गंध विडे द्यावे. माघमासीं शिवरात्रीचे दिवशीं सर्वां [about 4 letters lost] करावें. फाल्गून शुद्ध ५ पासून खेळी यांहीं यथा अनुक्रमानें देवळास व मानकरी यांचे दारीं मान द्यावा. दक्षिणेकडून मानकरी यांचे दारीं मान देत उत्तरेस जावें. पोर्णिमेचे दिवशीं सोनार याणें नवें नगर येथें क्षेत्रुपाळाचे पलीकडे पूर्वभागीं बली करावी. मानकरी ब्राह्मण यासी सोनारानें आमंत्रण करावें. सायंकाळीं तुऱ्या वाजंत्री याणें कोपरीचे बिदीनें वाजत न्यावें. तेथें गेल्यानंतर वैशंपायन यांहीं सोनारास पूजा सांगावी. सांगितल्या नंतर प्रथम गंध विडा वैशंपायन उपाध्ये यासी द्यावा; दुसरा माहाजन यास द्यावा, तिसरा दुसरे माहाजनास; चवथा दातारास द्यावा. पांचवा जोशी यासी द्यावा; सहावा बालवर्तक यासी द्यावा, तेथून धारप यास द्यावा; तेथून सुतार यासी द्यावा; तेमून कोपरकर वर्तक यांसी द्यावा; व इतर ग्रामस्थ जातील त्या सर्वांस गंध विडे द्यावे; व सर्वांहीं वाजत गाजत कोपरीचे मार्गानें श्री बहिरव याचे होळीचे संनिध यावें. आल्यानंतर दळवी याणें पूजा साहित्य वैशंपायन यांजपाशीं द्यावें. यांहीं पूजा करून सर्वांहीं प्रदक्षिणा करून होळी लावावी. होळी लागल्यानंतर गुरव व वारीक यांहीं सर्वांस घरोघर पावावें. प्रतीपदेचे दिवशीं सोनारानें पंचखूर जातीचे लोक मिळवून उत्तरेकडून दक्षिणेस बहिरव याचे होळीवर यावें. आल्यानंतर तेथून बहिरवाचा कौल घेऊन सर्वांहीं गांवामध्यें श्री नारायण याचे संनीध यावें. आल्यानंतर पुजारी याणें दोण भरून ठेविली असेल, तें उदक खेळी श्री क्षेत्रुपाळ याचे दर्शनास जातील, त्यांजवर उदक शिंपवावें. फिरोन ते आल्यानंतर तेथून धुरवाड

खेळतखेळत श्रीचा देवळापाशीं जावें. गेल्या नंतर उपाध्ये यांहीं मंत्र म्हणावा, म्हटल्या नंतर श्रीचा दर्शनास जावें. तेथून घरोघर जावें. पंचमीचे दिवशीं सोनारानें शिंपणें याचें आमंत्रण सर्व मानकरी यांसी करावें, व दातारासहि करावें. यानंतर सायंकाळीं तुऱ्यानें व वारिकानें दिवटी तेवून, तुऱ्यानें वाजत गाजत श्रीच्या देवळासी आणावे. आणिल्या-नंतर दातारानें हल्दिव ( i. e. हळदिवे ) उदक करून, आम्रपल्लव घेऊन श्री दुर्गेवर उदक शिंपवावें. तेथून शुभा देवीवर शिंपणें करावें. तेथून सर्वांहीं वाजतगाजत सर्व देवांस शिंपणें करीत करीत कोपरीचे बिदीनें होळीवर क्षेत्रुपालास जावें. तेथें जाऊन होळी वरून सोनार याचे घरीं नवे नगरास जावें. सोनारानें बसावयासी घालून मानकरी यांस बसवावें. बसल्यानंतर प्रथम अनुक्रमें गंध, विडे, व सेले दातारापासून सर्व मानकरी यांस द्यावे. दातारास दिल्यानंतर उपाध्यास द्यावा; तेथून पुढें जोशी यास द्यावा; तेथून महाजनक वर्तक यांसी द्यावा; तेथून उत्तरेकडून गांवामध्यें यावें. आल्या-नंतर गडदूपासून श्री सीमा देवीस शिंपणें करावें. तेथून सर्वांस देवांस शिंपणें करीत करीत दक्षिणेस यावें. आल्यानंतर क्षेत्रुपाळावरी सर्व उदक घालून, सर्वांहीं घरोघर जावें. याजप्रमाणें वतनदारांनीं चालावें. वठारें वाटून दिलीं. क्षेत्राचीं वठारें आठ. यांमधोन मानकरी यांणीं असावें. येणें-प्रमाणें गांवची रचना केली; तेव्हां कोपरी वठारास चंतर राज्यापासून दत घेतले, तेव्हां तेथील ब्राम्हण याची सत्ता निवृत्त करावी; ते समयीं ब्राम्हण तेथील उभे राहिले. तेव्हां ते बोलिले कीं, आम्हास आज्ञा काय. तेव्हां सिद्ध बोलिले कीं तुमचा वठारास आपली सत्ता धर्माधिकार [ about 4 letters lost ] उपाध्येपण व श्री महादेश्वराचा देवळींची पुराण आपले; व दुसरे आचारी वर्ण व सदश वर्ण आपले; प्रथम गंध आपले; येणेंप्रमाणें त्या ब्राम्हणांहीं सिद्धास दिल्हे. सिद्धांहीं मानसपुत्रास दिले; व आसुद ग्रामस्थ याजपासून चंपावती क्षेत्र नदीचे उत्तर भागीं नदीपासून व्याघ्रेश्व-राचे पूर्वेस पर्वतापर्यंत उपाध्येपण व धर्माधिकार व श्री व्याघ्रेश्वराचे देवळींचें आपणास त्यांहीं दत दिलें. आपण मानस पुत्रास दिलें; आणि सेतें पांच आपणास दिलीं. कोंपरीमध्यें वतनदार अधिकारी हिरा ज्योतिसी आपले ग्रामींचा. प्रथम आसुद ग्रामांतून ब्राम्हण समुदाय घेऊन क्षेत्र पाहावयासी येते

समयीं, नदीचे आलीकडे आले, तेव्हां प्रथम नूतन क्षेत्र असें नाम ठेवून, पुढें सागराचे तीरीं आले. त्याजवर वटवृक्षास छे [द] न करावयासी प्रारंभ केला करितांच त्यामध्यें देवता बहुत पिशाच्यें यांहीं क्षोभ करून घाव घालित त्या दातार ब्राह्मणाची बली घेतली; तेव्हां देवतांचें शांतवन करूः ब्राह्मण जीवंत करविला, आणि दुसरे नामाभिदान मूळवटग्रामस्थ असें ठेविलें. श्रीची व इतर ब्राह्मण याची स्थापना जागजागीं केली. देव देवस्थानें बहुत पिशाच्यरक्षणास स्थापना केल्या. श्रीस व आपणास शेतें नेमून ठेविलीं. आपले पुण्यतिथीस चिरेखाण बाविल नेमलें. श्रीस वोंवळे शेत नैवेद्यास नेमिलें. कनक शेत श्रीच्या फुला पानास नेमिलें. उंबरक्षेत्र श्रीचे यात्रेचे समाराधनास नेमिलें. लमग क्षेत्र श्रीचे यात्रेस तबूवेडि यासी. चंदन क्षेत्र आपले पुण्यतिथीचे ब्राह्मणास गंधास व विडे दक्षिणेस नेमिलें. गणेश सेत गणपती नागलेश्वर यासी नेमिलें. मड शेत मढेरु यासी नेमिलें. नदी पलीकडे आपणास व श्रीस शेत मागितलें. मागोन घेतलें. वरकड शेतें:—१ केशर शेत शून्यालयास नेमिलें; आड शेत ३ चोखंडे ४ चार (१) पांच; त्यामध्यें केशर शेत शून्यालयास नेमून दिलें; आणि चार आपणास व श्रीस धर्मादायास ठेविलीं; त्यामध्यें उत्पन्न होईल तें निमे भांडारांत ठेवावें, निमे आपल्या कुटुंबपोषणास आपले मानस पुत्रांनीं व दातारानें न्यावें. सीमा देवीस नैवेद्यास व यात्रेस देवीस नमूद देवलें सेत नेमिलें, आणि श्रीचे भांडारास चंद्राग शेत व माडीस सेतें नेमिलीं. दक्षिणेस आपल्या क्षेत्राचें परिमित, भीमसेन पाषाण पर्वत रूप याचे सन्मुख; पूर्वेस पर्वतावरील उदक, पश्चिमेस व उत्तरेस येतें तेथपर्यंत आपले क्षेत्राचा नियम. करवंदा क्षेत्र राज्यापासून आपणास मागून घेतलें; तेथें वडीलपणाचा मान व उपाध्येपण व धर्माधिकार व वडीलपण आपलें, आणि ब्राह्मणाची तेथें स्थापना केली. त्यांसी जळें स्थळें करून दिल्हीं, आणि आपणासहि ठेविलें शूद्र वतनदार होते तेही स्थापिले. आपले क्षेत्रांत शूद्र लोक कयेडीका क्षेत्र व नागलेश्वराचे पूर्व व उत्तर भागीं सेवकांस स्थळ देऊन इतर जातींस ठेविलें; आणि देव देवस्थानें यांचे संनिध आड व तळ्या ब्राह्मणांस स्नानसंध्यादिक गोधनांस असें सर्वांस उदक करून ठेविलें. ब्राह्मणास ग्रामाबहि

महारुद्राचे पूर्वभागीं दक्षिणेकडे पिंडदानास स्थळ उदक नेमून ठेविले. त्याचे उत्तर भागीं इतर जातींस रुद्रभुम जागजागा जातीजातीस नेमून ठेविली. माहादेश्वर याचे पूर्वभागींचे नदीचे उत्तरेस नूनन क्षेत्रींचा लोकांस रुद्रभूमी नेमून ठेविली. फुणसुवा क्षेत्र अधिकारी कोपरी पर्येत क्षेत्रुपालाचे दक्षिणेकडेस पूर्वपश्चिमेकडेस जावयाचा मार्ग करून ठेविला. त्याचे दक्षिणेस कोपरी अलीकडे उत्तर भागीं आपलें नूतन नगर आपण प्रथम नाम ठेविलें. येणें प्रमाणें क्षेत्र करून पिशाच्य मर्दनास देव देवस्थानें व अनेक क्षेत्रुपाळ जागजागा स्थापिले, आणि आपले पुण्यतिथीस व श्रीच्या भांडारास स्थळें नेमिलीं. आपले पुण्यतिर्थीचे चिरखान बाविल शेत नेमिलें; महादेश्वर यासी कोपरीमध्यें स्थल नैवेद्यास पेढिका क्षेत्र नेमिलें. त्याचे मध्यें येक अंश श्री देवाचा, येक अंश आपले पुण्यतिथीचा, येक अंश कोपरीचा ब्राह्मणाचा [ about 6 letters lost ] उत्तरेस श्रीचे यात्रेस व सदैव सर्वास गंध लावावयासी चंदन क्षेत्र चंदनास नेमिलें; तांबूलास सदैव नेमिलें, व आपणास दक्षिण भागीं स्नानसंध्येस वायुगंगा इचे तीरीं स्नान करावयासी पाषाण बसावयासी व उदकास दोण ठेविली; व तटाक संध्या करावयास बांधिले. आपले क्षेत्राची चतुःसीमाः—दक्षि[णे]स पर्वताचे वर उदक, उत्तरेचा पर्वतावर उदक, पूर्वेस पर्वताचे पाला कडेस पलीकडेस तिकडेस उदक जाय तेथ पर्येत, पश्चिमेस सागर. पूर्वील इकीकत लिहिली.

---

7260

कर्वे धोंडो केशव
आत्मवृत्त

| Name of borrower | Lent on | Received on |
|---|---|---|
| ...talia | 3 SEP 1957 | 12 SE... |

SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY
POONA 4.

1. Books drawn from the library may not be retained for longer than a fortnight.

2. Borrowers will be held strictly responsible for any damage done to books while they are in their possession.